[illegible] अणे

यांचे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५६

# लेख व भाषणें

REFBK-0004350

प्रकाशक
श्री. ह. जतकर
अध्यक्ष
बापूजी वाङ्मय मंडळ, यवतमाळ.



लोकनायक माधव श्रीहरी ऊर्फ बापूजी अणे १९३१.

# अनुक्रमणिका


पृष्ठें

१ संग्राहकाचें निवेदन १— ५
२ प्रस्तावना १— ५
३ जीवनवृत्त १— ४२
४ लेख व भाषणें १—६०२


## लेखविभाग: (१-१८८)


१ नवीन पंथ ऊर्फ निःशस्त्र प्रतिकार १

लेखांक १ स्वराज्याचे मार्ग १

,, २ ,, ५

,, ३ निःशस्त्र प्रतिकाराचे उद्देश ८

,, ४ साध्यसाधनचर्चा १२

,, ५ प्रतिकाराचे प्रकार (परिशिष्ट) ५६९

,, ६ सरंक्षक प्रतिकारविवरण (परिशिष्ट) ५७२

,, ७ सावधगिरी १६

,, ८ पंथवैशिष्ट्य व मर्यादा २२

,, ९ उपसंहार २६

२ हिंदुधर्माची मीमांसा ३३

३ मराठी वाङ्मयाचा जयजयकार ६८

लेखांक. १ ला वाङ्मयविवेचन ६८

,, २ वर्तमानपत्रें व मासिकें ७५

,, ३ धार्मिक मासिकें ८०

,, ४ संग्राहक मासिकें ८३

,, ५ कादंबरी, नाटकें व गोष्टी ८५

,, ६ ,, ९१

## लेखविभाग ( चालू )


| | |
|---|---|
| ,, ७ विवेचक मासिकें | ९८ |
| ,, ८ ,, | १०५ |
| ,, ९ विवेचक मासिकें | १०९ |
| ,, १० ,, | ११२ |
| शास्त्रीय मासिकें | ११५ |
| स्त्रीवर्गाकरितां मासिकें | ११६ |
| मुलांकरितां मासिकें | ११६ |
| ४ हिंदुमुसलमानांचें ऐक्य | ११८ |
| लेखांक. १ खिलाफत-संकट | ११८ |
| ,, २ ऐक्य व स्वातंत्र्यमीमांसा | १२३ |
| ५ दिल्लीसमेटाची मीमांसा | १३० |
| ६ लोकमान्यांचा लोकसंग्रह | १३५ |
| लेखांक. १ अर्जुनशंकानिरसन | १३५ |
| ,, २ व्यष्टिसमष्टि दृष्टि व लोकसंग्रहाचीं तत्त्वें | १४१ |
| ७ लोकमान्यांचें वर्तमानपत्रावरील ऋण | १४९ |
| ८ आम्ही स्वराज्यपक्ष कां सोडिला ? | १५३ |
| ९ पुढील मार्ग | १५६ |
| १० केवळ शेतकऱ्यांच्या हितार्थ | १६४ |
| ११ फॉरेस्टचा कायदा नवाच पाहिजे | १८२ |
| १२ गणपति देवता ( परिशिष्ट ) | ५८१ |


---

## भाषणविभाग. ( १८९-५६६ )


| | |
|---|---|
| १ मराठा | १९१ |
| २ विद्यार्थ्यांस उपदेश | २०१ |
| ३ पंजाबांतील दडपशाहीचा निषेध | २०५ |
| ४ समर्थांचें कार्य | २१२ |

## भाषणविभाग ( चालू )


५ यवतमाळ डिस्ट्रिक्ट–असोसिएशन–ची स्थापना २१९
६ लोकसंग्रह २२३
७ स्वराज्याशिवाय गत्यंतर नाहीं २२८
८ मुदतबंदी पद्धत बंद करा ! २३४
९ हिंदुस्थानचा साम्राज्याशीं संबंध २३७
१० संस्कृतिप्रसाराची मीमांसा २४६
११ ईश्वराचीं प्रतीकें सतजन २५०
१२ लोकमान्यांच्या कार्यास पाठिंबा द्या २५१
१३ सद्यःस्थिति २५४
१४ खिलाफतीची सुरक्षितता २५९
१५ जिल्हासभांची जरूरी २६२
१६ यवतमाळची राष्ट्रीय शाळा २६६
१७ जालियनवालाबाग स्मृतिदिन २६९
१८ तपस्वी डॉ. बाबासाहेब यांस पकडलें ! २७२
१९ बहिष्कार योग २७८
२० लोकमान्यांच्या आधींचें राजकारण २८१
२१ बुलढाणा जिल्हा परिषद २८५
२२ यवतमाळ जिल्हा परिषद २८९
२३ अकोल्याची महाराष्ट्र परिषद ३१०
२४ निःशस्त्र प्रतिकार ३१५
२५ म. गांधींचें थोरपण ३२३
२६ ग्रामपंचायती स्थापन करा ३२५
२७ कौन्सिलचे मतदारसंघ ३२६
२८ स्वराज्यपक्षाचीं मूलतत्त्वें ३३०
२९ नव्या पक्षाची माहिती ३३८
३० स्वराज्यपक्ष काय करणार ? ३४८

भाषणविभाग ( चालू )


| | |
|---|---|
| ३१ दिल्ली कांग्रेस व कौन्सिल प्रवेश | ३५४ |
| ३२ श्री समर्थांची शिकवणूक | ३६० |
| ३३ मतें कोणास द्यावींत ? | ३६३ |
| ३४ स्वराज्यपक्षाची यशस्वी कामगिरी | ३६६ |
| ३५ शिवराज्यारोहणोत्सव | ३७० |
| ३६ मुडिमन क. च्या रिपोर्टावर पं. नेहरूंची उपसूचना | ३७४ |
| ३७ नॅचरलायझेशन् बिल | ३७९ |
| ३८ प्रतियोगी सहकारिता | ३८३ |
| ३९ ठाणें जिल्हा परिषद | ३९८ |
| ४० साबरमतीचा करार | ४०१ |
| ४१ प्रतियोगी सहकाराचीं तत्त्वें | ४०६ |
| ४२ प्रतिसहकारिता | ४११ |
| ४३ लोकमान्यांचें अलौकिकत्व | ४१७ |
| ४४ सध्याचें राजकारण | ४२२ |
| ४५ मतदारांनों निर्णय द्या ! | ४२५ |
| ४६ राजकीय पक्षाची मीमांसा | ४२९ |
| ४७ वणीच्या मानपत्रास उत्तर | ४३५ |
| ४८ विदर्भ ग्रामपंचायत परिषद | ४३७ |
| ४९ त्रिशतसांवत्सरिक उत्सव | ४४२ |
| ५० गीतारहस्य | ४४५ |
| ५१ राष्ट्रीय ऐक्य | ४४९ |
| ५२ बालविवाह प्रतिबंधक कायदा | ४५१ |
| ५३ वऱ्हाड जमीनमहसुलाचा कायदा | ४५४ |
| ५४ येतें सायमन कमिशन | ४५९ |
| ५५ १३ वें महाराष्ट्र साहित्य संमेलन | ४६६ |
| ५६ वऱ्हाडची सर्वपक्षीय परिषद | ४८३ |
| ५७ ब्रिटिश साम्राज्यशाहीचा नायनाट करूं या ! | ४८९ |

भाषणविभाग ( चालू )


५८ रेल्वेबोर्डावर जादा सभासद नको ४९६
५९ पार्लमेंटच्या अंतिम अधिकाराचें बुजगावणें ४९९
६० सरकारचा अवाढव्य लष्करी खर्च ५०४
६१ सरकारचें जमीनमहसुलाचें धोरण ५०८
६२ खादीप्रचार व बहिष्कार ५११
६३ ग्रामपंचायतीचा कायदा ५१४
६४ जमीन, जनावरें व जंगल ५१८
६५ जंगलच्या तक्रारी ५२५
६६ निःशस्त्र प्रतिकार ५२७
६७ तरुणांवरील जबाबदारी ५३३
६८ विद्यार्थ्यांना स्फूर्तिदायक संदेश ५३७
६९ कायदेभंगास प्रयाण ५४१
७० भावी राज्यघटना व संस्थानिक ५४२
७१ वकिलांनीं काय करावें ? ५४५
७२ गांधी–आयर्विन समेट ५४७
७३ हिंदी राजकारणाचें भवितव्य ५५४
७४ मसूरची सातारा जिल्हा परिषद ५५९
७५ युद्धाच्या तयारींत राहा. ५६३

५ परिशिष्ट ५६७–६०२
६ सूचि १–७
बापूजी वाङ्मयमंडळाचे अधिकारी व सदस्य ८

## चित्रांची अनुक्रमणिका


१ लो. ना. मा. श्री. ऊर्फ बापूजी अणे (१९३१) मुखपृष्ठ

२ श्री. न. चिं. केळकर प्रस्तावना प्रारंभ
(पुणें अ. वि. गृहाच्या परवानगीनें)

३ लो. ना. बापूजी अणे यांचें हस्ताक्षर १

४ लो. ना. मा. श्री. ऊर्फ बापूजी अणे (१९०९) १९१

५ लो. ना. बापूजी अणे यांचा जंगलचा कायदेभंग ५४१

# संग्राहकाचें निवेदन

१. लोकनायक माधव श्रीहरि ऊर्फ बापूजी अणे यांच्या निवडक लेखांचा व भाषणांचा संकलित ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा योग आज येत आहे, याचा अत्यानंद होतो. अशा तऱ्हेचा संग्रह काढण्याची मूळची कल्पना माझे स्नेही दे.भ. डॉ. भा.म.टेंबे यांची. आणि त्यांच्याच खटपटीमुळें ९ एप्रिल १९३१ रोजीं यवतमाळातील कांहीं मित्रांची खाजगी सभा बोलावण्यांत येऊन या कार्यासाठीं एक तात्पुरतें 'बापूजी–वाङ्मय–मंडळ' स्थापन करण्यांत आलें. सदर मंडळातर्फे त्याचा अध्यक्ष या नात्यानें मी प्रस्तुत ग्रंथ प्रसिद्ध करीत आहें.

२. लो. ना. अणे यांनीं वेळोवेळीं विविध विषयावर जे लेख लिहिले व जीं भाषणें दिलीं, तीं सर्व निरनिराळ्या नियतकालिकांतून त्या त्या वेळीं जगासमोर आलीं आहेत. त्यांतील निवडक १२ लेख व ७४ भाषणें एवढींच काय तीं या ग्रथांत संग्रहित केलीं आहेत. पुरवणींतील 'गणपति देवता' हाच एक लेख अप्रकाशित असा आहे.

३. हे लेख व भाषणें यवतमाळचें माजी साप्ताहिक 'हरिकिशोर' व विद्यमान साप्ताहिक 'लोकमत' उमरावतीचा 'उदय' अकोल्याचा 'प्रजापक्ष' नागपूरचा 'महाराष्ट्र' जळगांवचें 'प्रागतिक' मुंबईचा माजी 'संदेश' पुण्याचा 'केसरी' वगैरे पत्रें आणि श्रुतिबोधाचा संक्रांतीचा तिळगूळ अंक व 'तेरावें महाराष्ट्र साहित्य संमेलन ग्वाल्हेर' या पुस्तकांतून घेतलीं आहेत. 'हरिकिशोर' च्या फायलांचा उपयोग करून घेण्याची परवानगी कै. पृथ्वीगीर हरिगीर ऊर्फ पापासाहेब यांच्या पत्नीनें दिली, आणि 'संदेश' चीं दुर्मिळ फायलें मिळवून देण्याची मध्यस्थी कै. अ. ब. कोल्हटकर यानीं केली व त्याप्रमाणें तीं रा. नारायणराव खरे पुणें यांनीं पाहूं दिलीं. भाषणविभागांतील 'जमीन, जनावरें व जंगल' हें कोठेंहि प्रसिद्ध न झालेलें भाषण रा. सा. उत्तमराव इटकीकर एम्. एल. सी. यांच्या कृपेनें प्राप्त झालें. तसेंच उपरिनिर्दिष्ट पत्रांच्या चालकांनीं आपापल्या पत्रांच्या फायलींचा आमच्या मंडळाला आनंदानें उपयोग करूं दिला. या महदुपकारांबद्दल या सर्वांचे मंडळातर्फे मी मनःपूर्वक आभार मानतों. हा संग्रह बाहेर

पडलेला पाहण्यास कै. पापासाहेब व कै. कोल्हटकर हे राहूं शकले नाहींत, हें दुर्दैव होय. पापासाहेबांची उणीव तर विशेषच भासते. लो. ना. अणे यानीं 'हरिकिशोर' ला आपल्या लेखांचें अनेकवार जें 'गुप्तदान' दिलें, त्याचा त्यांजकडून छडापत्ता लागला असता व प्रस्तुत ग्रंथांत आणखी कांहीं वाचनीय लेखांची भर पडली असती ! पण तो योग नव्हता हेंच खरें !

४. हा संग्रह लो. ना. अणे यांची परवानगी न घेतां एवढेंच नव्हे तर त्यांच्या अगदीं न कळत प्रसिद्ध केला जात आहे, हें येथें जाहीर करणें अवश्य आहे. अणे यांचा स्वभाव किती प्रसिद्धिपराङ्मुख आहे, हें त्यांच्या अंतेवासी जनांना ठाऊकच आहे. अशा परिस्थितींत त्यांची परवानगी घेण्याचा खटाटोप केला असता, तर हा ग्रंथ उजेडांत येणें दुर्घटच झालें असतें ! यामुळें 'बापूजी–वाङ्मय मंडळा'ला 'गुप्त कटा' चें स्वरूप येणें क्रमप्राप्तच होतें. याचा अपरिहार्य परिणाम असा झाला आहे कीं, प्रस्तुत संग्रहांतील मजकूर ग्रंथस्वरूपांत पुनर्मुद्रित होण्यापूर्वीं तो अणे यांच्या नजरेखालून जाऊं शकला नाहीं व त्यावर त्यांचा अखेरचा सफाईचा हात जो फिरावयाचा तोहि फिरला नाहीं ! हे सर्व लेख व भाषणें वर्तमानपत्रांतून नकलून घेतलीं आहेत आणि घाईघाईनें छापल्या जाणाऱ्या वर्तमानपत्रांतील मजकुरामध्यें 'मुद्रण-पिशाच्च' कसा धुडगूस घालतें, हें सर्वश्रुतच आहे. अर्थात् अणे यांच्याहि लेखादिकांना या पिशाच्चानें थोडेंफार झपाटलें असल्यास नवल नाहीं. यामुळें या ग्रंथांत कांहीं स्थळीं शब्दयोजना अगर वाक्यरचना यांत शैथिल्य राहिलेलें दिसेल; क्वचित् माहितीच्या दृष्टीनेंहि सदोषता असलेली आढळेल. परंतु हे प्रमाद काढून टाकणें म्हणजे अनधिकृत ढवळाढवळ करणें होय, या विचारानें हा सर्व मजकूर जशाचा तसाच ठेवण्याचें मंडळानें ठरविलें. तरी हें सर्व ध्यानांत घेऊन अशा तऱ्हेच्या दोषांकडे वाचकवृंद सदयतेनेंच पाहील, अशी पूर्ण उमेद आहे. द्वितीयावृत्तीचा सुयोग आल्यास या उणिवा दूर करण्यांत येतील, एवढेंच तूर्त नमूद करतों.

५. प्रस्तुत पुस्तकांत अणे यांचे निवडक तेवढेच लेख व भाषणें घेतलेलीं आहेत, हें वर सांगितलेंच आहे. अन्य लेखकांच्या ग्रंथांना त्यांनीं ज्या सुंदर प्रस्तावना लिहिलेल्या आहेत, त्या संग्राह्य असूनहि स्वतंत्रपणें लिहिलेल्या

नसल्यामुळें त्यांचा या ग्रंथांत समावेश केला नाहीं. या ग्रंथाचे लेखविभाग व भाषणविभाग असे दोन भाग पाडलेले असून परिशिष्टांत 'नवीन पंथ' या लेखमालेचे ५ व ६ हे लेखांक व ' गणपति देवता ' हा अमुद्रित लेख या मागाहून हातीं आलेल्या लेखांचा अंतर्भाव केलेला आहे. उपरोक्त लेख अणे यांच्या कपाटांत कधींचा धूळ खात पडला होता ! तो हस्तगत करण्याकरितां तर मंडळाला शुद्ध ' शर्विलकी विद्ये' चाच आश्रय करावा लागला !! अणे यांच्या हस्ताक्षराचा जो ब्लॉक पुस्तकांत दिला आहे, तो याच लेखावरून तयार केलेला आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईलच ! असो. आरंभीं लो. ना. अणे यांचें जीवनवृत्त दिलेलें आहे, त्यावरून वाचकांना त्यांची बरीचशी ओळख होईल अशी आशा आहे. अखेरीस सूचीहि जोडलेली आहे.

६. लेख व भाषणें यांची निवड करतांना जशी माहितीची व उपयुक्ततेची दृष्टि ठेविली होती, तशीच विषयवैचित्र्याचीहि पण दृष्टि ठेवण्यांत आली होती. राजकीय, धार्मिक, विभूतिपर, ऐतिहासिक वाङ्मयात्मक वगैरे अनेक विषयांना हे लेख व भाषणें वाहिलेलीं आहेत. अर्थात् त्यांचें वाचन वाचकांना कंटाळवाणें होणार नाहीं व शिवाय या भिन्न भिन्न विषयांसंबंधीं अणे यांचीं मतें काय आहेत, हेंहि त्यांना कळून येईल.

७. लेख व भाषणें यांच्याबद्दलची मंडळाची सर्वच निवड वाचकांना पसंत पडेल असें नाहीं हें खरें आहे. परंतु त्यांतील बराच मोठा भाग पूर्वग्रहरहित वाचकांना विचारप्रवर्तक वाटेल, अशी मंडळाची समजूत झाल्यामुळेंच हा ग्रंथ प्रकाशित करण्याचें धाडस केलें आहे. याखेरीज प्रस्तुत प्रकाशनाचा आणखीहि एक उद्देश आहे. लो. ना. अणे हे गेलीं पंचवीस वर्षे देशांत चाललेल्या निरनिराळ्या चळवळींत यथाशक्ति भाग घेत आहेत. विशेषत: या पाव शतकांत वऱ्हाड प्रांतांत ज्या चळवळी झाल्या, त्या सर्वांशीं अणे यांचा थोडाबहुत तरी संबंध या ना त्या मार्गानें खचित आलेला आहे; आणि त्याचें प्रतिबिंब कमीअधिक प्रमाणांत त्यांच्या लेखांमध्यें व भाषणांमध्यें उमटलेलें असल्यामुळें, त्यांच्या वचनावरून वऱ्हाडच्या गेल्या पंचवीस वर्षांच्या इतिहासाची वाचकांना पुष्कळच कल्पना होईल, व ती तशी त्यांना

थावी, हाहि एक हेतु हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याच्या मुळाशीं आहे. अर्थात् आमच्या मंडळाचे हे उद्देश कितपत साध्य झाले, हें विचक्षण वाचकांनींच ठरवावयाचें आहे.

८. लो. ना. अणे यांचे सन्माननीय मित्र व प्रख्यात साहित्याचार्य दे. भ. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांनीं मंडळाच्या विनंतीस मान देऊन या ग्रंथाला प्रस्तावना लिहून देण्याचें कबूल केलें, व त्याप्रमाणें वेळांत वेळ काढून अतिशय मार्मिक व उद्बोधक प्रस्तावना लिहून दिली, याबद्दल मंडळ त्यांचें फार आभारी आहे.

९. पुस्तकाच्या मुद्रणाप्रीत्यर्थ लागणारी रक्कम उभी करण्यासाठीं मंडळानें कांहीं सद्गृहस्थांना आर्थिक साह्याची याचना केली होती. त्याप्रमाणें रा. शंकरराव सरनाईक—पुसद, बाबासाहेब नापलेकर वकील, रामराव शिवराव पतकी, व भाऊराव भावे वकील—पांढरकवडा, आबासाहेब भेदी व हरीभाऊ दामले—वणी, व इतर सद्गृहस्थांनीं या कार्याला द्रव्यद्वारां हातभार लावला, याबद्दल मंडळ त्यांचें फार ऋणी आहे. त्यांच्या या मदतीखेरीज हें कार्य तडीस जाणेंच शक्य नव्हतें.

१०. द्रव्यसाह्याखेरीज इतर बाबतींतहि मंडळाला अनेकांनीं अनेक प्रकारची मदत केलेली आहे. वणीचे दे. भ. रामभाऊ भागवत यांनीं लो. ना. अणे यांच्या चरित्राविषयींची बरीच माहिती पुरविली. यवतमाळचे रा. शं. रा. गोडबोले, वकील, यांनीं ग्रंथाची अनुक्रमणिका व सूचि तयार करून दिली. प्रो. व्ही. एन्. वगारे, यवतमाळ, यांनीं अणे यांचा फोटो व त्यांच्या हस्ताक्षराचा नमुना बनवून दिला. पूर्वीचे यवतमाळचे पण सध्या पुण्यास असणारे 'लोकसंग्रह' छापखान्याचे व्यवस्थापक व माजी 'हरिकिशोर' पत्राचे तिसरे संपादक दे. भ. वि. गं. केतकर यांनीं आपलेपणानें अल्पावधींत पुस्तक सुबक रीतीनें छापून दिलें. तसेंच यवतमाळच्या 'विद्यागृहा'चे मुख्याध्यापक पण हल्लीं पुण्यास राहणारे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक रा. द. वि. आपटे यांनीं आमची अडचण लक्षांत घेऊन आपण होऊन अर्ध्याअधिक पुस्तकाचीं प्रुफें तपासून देण्याची तसदी घेतली. त्याचप्रमाणें 'महाराष्ट्रा'चे उपसंपादक श्री. पु. दि. ढवळे, यांनीं आम्हास अनेक तऱ्हेनें सहाय्य केलें आहे. या

अनेक प्रकारच्या साह्याबद्दल वरील सर्व सभ्य गृहस्थांचे मी मंडळातर्फे आभार मानतों.

११. आतां फक्त 'बापूजी–वाङ्मय–मंडळा'च्या सभासदांचे आभार मानण्याचें काम राहिलें. वस्तुतः त्यांचे आभार मानणें म्हणजे स्वतःचेच आभार मानण्यासारखें होणार आहे! परंतु प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध करण्याचें ठरल्यापासून तों तें प्रसिद्ध होईपर्यंत सतत सात आठ महिने मंडळाच्या कांहीं सभासदांनीं अविश्रांत श्रम घेतले नसते, तर हा ग्रंथ इतक्या लौकर प्रकाशित होणेंच शक्य नव्हतें, ही गोष्ट लक्षांत घेतली, म्हणजे त्यांच्या आभारप्रदर्शनाचें काम यद्यपि औपचारिक असलें, तथापि अत्यावश्यक आहे असें वाटल्याचून राहणार नाहीं. रा. त्र्यं. स. बापट वकील, व रा. ग. न. पंडित वकील, या चिटणीसद्वयानें आणि रा. अ. रं साकळे वकील, रा. स. ह. बल्लाळ, रा. रा. ब जोशी, डॉ. त्र्यं. ग. वंदे, रा. वामनराव देशपांडे इत्यादि सभासदांनीं वेळोवेळीं केलेल्या मदतीचें दृश्य फल म्हणजेच प्रस्तुत ग्रंथ होय! मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. भा. म. टेंबे हे तर या कार्याची प्रेरकशक्तीच होते, त्यांचे आभार शब्दांनीं मानतों म्हटलें तर शब्दच तोकडे पडतील! म्हणून त्या फंदांत न पडणेंच बरें!

शेवटीं जनताजनार्दनाची केलेली ही अल्पस्वल्प सेवा त्याच्या चरणीं रुजूं होवो, असें चिंतून हें निवेदन पुरें करितों.

टिळकरोड, यवतमाळ
देव दिवाळी
ता. १०।१२।३१

भी. ह. जतकर
अध्यक्ष
'बापूजी–वाङ्मय–मंडळ'

# प्रस्तावना



व-हाडचे सुप्रसिद्ध पुढारी, गेल्या सात वर्षांतील लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे एक प्रमुख सभासद, कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद, यवतमाळ येथील 'लोकमत' पत्राचे नैमित्तिक संपादक व ग्वाल्हेर येथील मराठी साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष, देशभक्त माधव श्रीहरि ऊर्फ बापूजी अणे यांचे लेख व भाषणें एकत्रित करून प्रस्तुतचा ग्रंथ प्रसिद्ध केला जात आहे. बापूजी अणे यांची प्रसिद्धि मुख्यतः राजकीय पुढारी या नात्यानेंच असल्यामुळें, कदाचित् कित्येकांना या ग्रंथाची विशेष नवलाई वाटेल. परंतु ज्यांना त्यांचा त्याहून निकट परिचय आहे त्यांना या पुस्तकानें नवल असें कांहींच वाटणार नाहीं. कारण राजकारणाप्रमाणें संस्कृतविद्या व मराठी वाङ्मय या दोहोंतहि बापूजींचा अनिरुद्ध संचार असल्याची त्यांना पुरी जाणीव आहे. त्यांना वाईट इतकेंच वाटेल कीं, प्रस्तुत पुस्तकांत न आलेलीं अशीं रा. अणे यांचीं कितीतरी भाषणें यांत आलेल्या भाषणाइतकींच स्फूर्तिदायक व तेजस्वी असतां, त्यांचा संग्रह करण्याचें साधन प्रस्तुत ग्रंथाच्या संग्राहकाला उपलब्ध झालें नाहीं. पण हा संग्राहकाचा दोष नसून, तो विशिष्ट परिस्थितीचाच दोष होय; व ती परिस्थिति म्हटली म्हणजे, बापूजी अणे यांचें यवतमाळसारख्या कांहींशा एका बाजूस असलेल्या जिल्ह्यांतील वास्तव्य, बरींच वर्षें त्यांनीं केलेला वकिलीचा धंदा व वर्तमानपत्रांच्या निकट सान्निध्याचा अभाव. यवतमाळसारख्या ठिकाणीं असतां, त्यांचे लेख व भाषणें इतकीं तरी संग्रहित करतां आलीं हेंच कोणी कांहींसें आश्चर्य मानील!

रा. अणे यांनीं उदरनिर्वाहाचा धंदा व सार्वजनिक कार्याचें एक उपयुक्त साधन म्हणून पूर्ववयांत कायद्याची परीक्षा देऊन वकिली सुरू केली; तथापि कलकत्ता विद्यापीठाच्या परीक्षा पास होण्याकरितां त्यांनीं जे विषय घेतले होते, ते विद्या, वाङ्मय व संस्कृति यांना अनुलक्षूनच होते आणि दैवाच्या कलाटणीनें ते वकील न होतां एकाद्या कॉलेजांत प्रोफेसर झाले असते, तर त्यांचें वाङ्मयव्यासंगाचें कार्य लोकांच्या नजरेंत याहून अधिक भरण्यासारखें झालें असतें. इतकेंच नव्हे तर सूक्ष्माभ्यासी ग्रंथकार या नात्यानें त्यांनीं खचित लौकिक मिळविला असता. पण लोकमान्य टिळक यांच्या चरित्राला स्वतः त्यांचें त्यांनाच अनपेक्षित असें वळण ज्याप्रमाणें मिळालें, म्हणजे ते विद्यापीठांतील प्रोफेसर न होतां लोकमान्य असे राजकीय पुढारी व वर्तमानपत्रकार झाले, त्याचप्रमाणें त्यांचे सच्छिष्य व परमभक्त बापूजी अणे यांच्याहि चरित्राला तसलेंच अनपेक्षित वळण लाभावें हें एका दृष्टीनें अनुरूपच झालें असें म्हटलें पाहिजे. पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरीं व राजकारणाच्या केन्द्रांत राहावयास मिळाल्यानें लोकमान्य टिळकांना केसरीपत्र हातीं घेतां आलें, व तें त्यांनीं आपल्या आवडत्या राजकारणाच्या सेवेला लावून अत्यन्त यशस्वी केलें. पण रा. अणे हे यवतमाळसारख्या ठिकाणीं असल्यामुळें, व त्यांतल्यात्यांत वर दर्शविल्याप्रमाणें बरींच वर्षे मुख्यतः वकिलीचा धंदा करावा लागल्यामुळें, त्यांना हव्या तशा वर्तमानपत्राची जोड मिळाली नाहीं.

अशा बाबतींत स्थलमाहात्म्य हें खरोखरच विशेष रीतीनें निर्णायक ठरतें ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. पुण्या–मुंबईबाहेर महाराष्ट्रांत बुद्धिमान्, अभ्यासू व वाङ्मयप्रेमी लोक नाहींत असें नाहीं. परंतु संकुचित क्षेत्राच्या जिल्ह्याचें नांवच वर्तमानपत्राला आपल्या क्षुद्रपणानें दूषवितें. उलट राजधानीच्या सान्निध्यानें व आधारानें पुष्कळ वर्तमानपत्रांना त्यांच्या योग्यतेहून अधिक प्रसिद्धि व उत्कर्ष लाभूं शकतो. तथापि रा. अणे यानीं त्यांतल्या त्यांत 'हरिकिशोर' पत्राला मदत करून, व 'लोकमत' पत्र स्वतःच्या स्फूर्तीनें नवें काढवून, वकिलीबरोबर त्याचाहि पुरा उपयोग जिल्ह्यांतील राष्ट्रीय सेवेला करून घेतला. प्रस्तुतच्या ग्रंथांत 'हरिकिशोर' व 'लोकमत' या दोन पत्रांतील बापूजींचे लेख प्रसिद्ध होत आहेत, ते वाचले असतां कोणालाहि

तेव्हांच असें दिसून येईल कीं, पुण्या–मुंबईकडील पत्रांना संपादक वर्गापैकीं एक म्हणून बापूजींचा लाभ झाला असता, तर त्यांच्या ओजस्वी लेखणीनें व सद्विद्याभिरुचीनें त्या वर्तमानपत्रांना कीर्ति मिळाल्याशिवाय राहिली नसती. 'हरिकिशोर' पत्राचे लागोपाठ दोन संपादक राजद्रोहाकरितां तुरुंगांत गेले ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे त्या पत्राची राष्ट्रीय वृत्ति किती बाणेदार होती हें लक्षांत येईलच. बापूजी अणे यांच्या बुद्धीला कायद्याच्या सूक्ष्म ज्ञानाचा संस्कार असल्यामुळें लेखक या नात्यानें त्याना तुरुंगांत जावें लागलें नसलें तरी, 'हरिकिशोर' व 'लोकमत' या दोन्ही पत्रांतील बापूजींचे राजकीय विषयावरील लेख वाचले असतां या दोन्ही पत्रांच्या बाणेदार-पणाला स्फूर्ति कोठून मिळाली असेल याची कल्पना कोणासहि सहज करतां येईल. 'लोकमत' पत्राच्या मार्मिकपणाला रा. बापूजी अणे यांचें गुरुत्वच पुष्कळसें कारणीभूत आहे.

रा. अणे हे नुसताच वकिलीचा धंदा करते, किंवा नुसतीच राजकीय चळवळ करते, तर त्यांच्या हातून जो वाङ्मयव्यवसाय झाला त्याहून पुष्कळच अधिक झाला असता यांत मुळींच शंका नाहीं. या दोन्ही कामांतील पुढारीपणानें व विशेषतः थोर सत्प्रवृत्ति, निरलसता, झीज लावून घेण्याची आवड, व मित्रकार्यांत उडी घेण्याची हौस, यांमुळें त्यांच्या नित्य नैमित्तिक अशा इतरहि सार्वजनिक कार्यांचा पसारा एवढा मोठा नेहमींच वाढलेला होता कीं, त्यामुळें हातांत लेखणी धरण्याला त्यांना बहुधा सवडच सांपडत नसे. तथापि खनपटीला बसणारे ऋणानुबंधी लोक भेटले असतां ते वेळांत वेळ काढूनहि लिहीत हें 'श्रुतिबोध' 'संदेश' पत्रांतून प्रसिद्ध झालेल्या व या पुस्तकांत समाविष्ट केलेल्या त्यांच्या लेखांवरून दिसून येईल. प्रस्तुत पुस्तकांत संग्रहित झालेल्या थोड्या भाषणांवरून रा. अणे यांच्या एकंदर भाषणविस्ताराची कल्पना कोणी करील तर ती अगदीं चुकीची ठरेल. कारण दरम्यानच्या कित्येक वर्षांत त्यांनीं दर आठवड्याला निदान एक दोन भाषणें केलीं असावींत हें प्रत्यक्ष हिशेब न करतां कोणीहि सांगू शकेल. कारण बापूजी हे जरी धंद्यानें वकील होते, तरी त्यांना एखाद्या न्यायकोर्टांत शपथेवर "तुमचा मुख्य व्यवसाय काय" असें विचारलें

असतें तर "राजकीय चळवळ" असेंच त्यांना प्रामाणिकपणें सांगणें प्राप्त झालें असतें. आणि त्यांनीं हा असा व्यवसाय केला म्हणूनच सर्व वऱ्हाड प्रांतांत, किंबहुना सर्व नागपूर–वऱ्हाड प्रांतांत, राष्ट्रीय चळवळ व संघटना यांच्या दृष्टीनें त्यांनीं यवतमाळ जिल्हा नमुनेदार करून दाखविला तसा तो एरवीं झालाच नसता. शाळेंतील खेळकर मुलांना नित्य-नैमित्तिक सुट्टयांची जशी आवड तशीच ती बापूजींनाहि होती. कारण रिकामा दिवस केव्हां मिळेल व जिल्ह्यांतील संघटनेच्या कार्याला केव्हां जाईन असें त्यांना नेहमीं होई. आणि कधीं ऊन न म्हणतां, कधीं पाऊस न म्हणतां, मिळेल तें वाहन व मिळतील ते सोबती घेऊन बाहेर पडावयाचें व दूरदूरच्या मजला मारून यावयाचें असा त्यांचा नित्यक्रम कित्येक वर्षें चालू होता. या चळवळीच्या जोरांत सहानुभूती व राष्ट्रप्रेमी अशा लोकांच्या सभांतून त्यांचीं भाषणें कशीं होत असतील याची कल्पना पुणें मुंबईसारख्या शहरीं त्यांचीं जीं भाषणें राजधानीच्या लोकांना ऐकावयास सांपडलीं त्या-वरून सहज करतां येईल. त्यांचीं भाषणें टिपून घेऊन प्रसिद्ध करण्याला रिपो-र्टर, छापखाने व वर्तमानपत्रें यांची अनुकूल जोड मिळाली नाहीं ही गोष्ट वेगळी. पण तिचें कारण केवल स्थलविशेष म्हणजे लेखनमुद्रणकलेच्या दृष्टीनें मागसलेला जिल्हा हेंच होय. म्हणून प्रस्तुत पुस्तक छापून प्रसिद्ध करून रा. अणे यांच्या मित्रमंडळींनीं त्यांच्या भाषण–लेखनशैलीचें गुणग्राहकत्व प्रकट केल्याबद्दल जरी आम्ही त्यांचें अभिनंदनच करितों, तरी रा. अणे यानीं एकंदरीनें केलेला भाषणव्यवसाय हा लक्षांत घेतां हें पुस्तक केवळ वानगी-दाखल ठरतें, असा अभिप्राय नमूद केल्याशिवाय मात्र आमच्यानें राहावत नाहीं. बापूजींना असेंहि म्हणतांना आम्ही ऐकलें आहे कीं, हातीं लेखणी घेणें हें त्यांना संकट वाटे. पण ज्याचा जो स्वभावगुण प्रमुख असेल त्याचाच जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याचा हक्क राष्ट्राला आहे, या दृष्टीनें त्यांच्या लेखणीपेक्षां त्यांच्या वाणीनें जें कार्य केलें, तेंच लेखणीच्या कार्याइतकें किंवा त्याहूनहि अधिक उपयुक्त ठरलें आहे यांत शंका नाहीं.

प्रस्तुत ग्रंथांतील राजकीय विषय सोडून देऊन धर्म व वाङ्मय या विष-यावरचे रा. अणे यांचे लेख वाचले असतां त्यांची खरी आवड व अभि-

रुचि कोणीकडे झुकत होती हें दिसून येईल. ग्वालेरच्या साहित्य संमेलनाचें अध्यक्ष त्यांना निवडण्यांत आलें, तेव्हां त्यांच्या वाङ्मयव्यासंगा संबंधानें ज्या एक दोन टीकाकारांनीं पृच्छा केली, त्यांना प्रस्तुत पुस्तकांतील 'मराठी वाङ्मयाचा जयजयकार' हा लेख आधीं वाचावयास मिळाला असता तर त्यांनीं तशी शंका उपस्थित केलीच नसती. कारण या लेखांतील मराठी वाङ्मयाचें रा. अणे यानीं केलेलें पर्यालोचन कोणत्याहि साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षाला शोभण्यासारखेंच आहे. हा लेख सुमारें पन्नास पानांचा असून त्यांतील विध्वंसक व विधायक अशा दोनहि टीका अत्यंत मार्मिक व सदभिरुचिदर्शक आहेत.नागपूरचे प्रसिद्ध कवि टेकाडे यांच्या काव्यसंग्रहाला रा. अणे यानीं लिहिलेली प्रस्तावना हीदेखील वेळांत वेळ काढून त्यांनीं ठेवलेल्या मराठी वाङ्मय परिचयाची व संस्कृत शास्त्रीय ग्रंथाची ओळख पटवून देणारी आहे. तसेंच हिंदुधर्माची मीमांसा हाहि लेख अत्यंत मार्मिक आहे.

असो. रा. अणे यांची अन्यकार्यव्यापृतता लक्षांत घेतली असतां त्यानीं वाङ्मयाच्या उद्योगांत इतकें तरी लक्ष घातलें हेंच विशेष होय; व त्याचें कारणहि हेंच कीं, सुशिक्षित सुसंस्कृत मनाला वाङ्मय हें लोकशिक्षणाचें साधन जितकें वाटतें तितकेंच तें आत्मसंतोषाचेंहि साधन वाटतें. सनातन संस्कृतीच्या भाविक मनाला, दिवसभर सर्व तऱ्हेचा ऐहिक व्यापार केला तरी, दिवसांतून केव्हां तरी एकवेळ देवदर्शन घेतल्यावाचून समाधान वाटत नाहीं. त्याप्रमाणें सुशिक्षित मनुष्याला रोज वाङ्मयाचें स्वरूप असणारीं चार अक्षरें वाचल्याशिवाय किंवा लिहिल्याशिवाय समाधान वाटत नाहीं. वृक्षविस्तार कितीहि मोठा असला तरी त्याच्या लहानशा फुलाफळांतच जीवनरसाचें सार व सत्त्व मधुबिंदूच्या रूपानें उतरतें. वाङ्मय हेंदेखील मनुष्याच्या ज्ञानविस्तारांतून अर्करूपानें स्रवणारे मधुबिंदूच होत. आणि वृक्षाच्या गोडीची किंवा सुगंधाची परीक्षा करण्याला एखादेहि फूल किंवा फळ पुरें होतें! प्रस्तुत पुस्तकाचे वाचकहि त्याला अणेरूपी ज्ञानवृक्षाचें एक लहानसें पण नमुनेदार फळ किंवा फूल या भावनेनेंच आदरितील यांत शंका नाहीं.

पुणें
ता. २१-११-३१

न. चिं. केळकर

# जीवन-वृत्त

# लोकनायक माधव श्रीहरि ऊर्फ बापूजी अणे

## यांचें

# जीवन-वृत्त

'Day by day be not unmoving,
Let thy life be deed on deed.'

—Goethe

'स्वदेशाचा उत्कर्ष, त्याचें स्वत्व कायम ठेवून करावयाचा असा बाणा आळगणारे व त्या कामीं तन-मन-धन खर्ची घालण्यास तयार असलेले कर्ते पुरुष देशांत उत्पन्न झाल्याशिवाय देशाचें डोकें वर निघत नाहीं.'

लो. टिळक.

—टि. सू. सं. १९५३

४३५०

## कुलवृत्तान्त

लो. ना. बापूजी अणे यांचें घराणें मूळ तेलंगणांतील. हें घराणें वऱ्हाडांत वस्तीस येऊन किती पिढ्या लोटल्या, याची माहिती मिळत नाहीं. त्यांचें मूळचें उपनांव 'अन्नवार' असें होतें व त्याचें कालांतरानें अणे या सुटसुटीत उपनांवांत रूपांतर झालें. पण तें कोणत्या पिढींत झालें याचा मात्र नक्की पत्ता लागत नाहीं. "वार" म्हणजे "वाला" किंवा एखादी वस्तु ज्यापाशीं आहे तो, अशा अर्थाचा तेलगू प्रत्यय असून अन्नवार म्हणजे अन्नाची समृद्धि असलेले अशी या उपनांवाची उपपत्ति लावण्यांत येते. अन्नदानाकडे विशेष कल असल्यामुळें या घराण्याचें नांव अन्नवार पडलें असावें असाहि कांहींचा तर्क आहे. अन्नदानाविषयीं अद्यापीहि या घराण्याचा लौकिक आहे.

अणे यांचें घराणें तेलगणांतून आलें, असें सांगितल्यावर त्या घराण्याचें सांस्कृतिक दृष्ट्या कोणतें वैशिष्ट्य असेल, हेंहि सहज कळण्यासारखें आहे.

कालाच्या विपरीत गतीमुळें आज जरी 'तेलंगी' म्हणजे लोचट असा पर्याय पडू लागला आहे, किंवा तेलंगी ब्राह्मण म्हणजे बल्लवाचार्यांच्या विद्येंत प्रवीण असलेला असा लोकांचा समज झालेला आहे, तरी अशा निकृष्ट परिस्थितींतहि वेदविद्येचे संरक्षक या नात्यानें हे लोक कमीअधिक प्रमाणांत आपल्या अस्तित्वाची ओळख आजहि जगाला करून देत असतात. ज्यावेळीं पुरातन वेदविद्येस समाजांत मान असून त्या विद्येस वाहिलेल्या विद्वानांच्या उपजीविकेचा भार समाजानें आपल्याकडे घेतला होता, त्याकाळीं या समाजांत अनेक विद्वान शास्त्री अगर पट्टीचे वैदिक निर्माण झाले असल्यास नवल नाहीं. अणे यांचें घराणेंहि पट्टीचें वैदिक म्हणून प्रसिद्ध असून त्या घराण्यांत वेदाची पठणपाठणपरंपरा फार जुन्या काळापासून चालू होती. अणे हे आपस्तंबशाखीय व गौतमगोत्रीय आहेत. बापूजींचे वडील कै. श्रीहरिभटजी ऊर्फ भाऊजी अणे हेहि उत्तम वैदिक ब्राह्मण म्हणून प्रसिद्ध असून कोणत्याहि परप्रांतीय पट्टीच्या वैदिकाला त्यांच्यासमोर पाठ म्हणतांना एक प्रकारचा वचक वाटत असे. त्यांनीं काशीसारख्या वेदविद्येच्या माहेरघरीं जाऊन आपल्या विद्वत्तेची साक्ष तेथील विद्वानांस पटविली होती. बापूजींचें मातुल घराणेंहि तेलंगणांतील मूळचें असून त्याचें उपनांव बल्कीवार हें आहे. हें घराणें अग्निहोत्र्याचें घराणें म्हणून प्रसिद्ध होतें. या आपस्तंबीय शाखेच्या कौंडिण्यगोत्रीय घराण्यांतील "बहिणाबाई" या बापूजींच्या मातुश्री होत. त्यांचे सासरचें नांव "रखमाबाई" असें होतें. परंतु माहेरचें नांवच प्रचारांत जास्त होतें. अशा अभिजात आईबापांच्या पोटीं बापूजींचा जन्म वणी येथें शके १८०२ श्रावण वद्य नवमी ( २९ आगष्ट १८८० ) रोजीं झाला. श्रीहरिभटजी यांचें प्रथम अपत्य "लक्ष्मणराव ऊर्फ अन्याजी" हे होत व बापूजी हे द्वितीय चिरंजीव होत. वणीस धंदा करीत असलेले डॉ. यादवराव हे बापूजींचे कनिष्ठ बंधु आहेत. त्यांच्यापेक्षांहि एक लहान भाऊ बालाजीपंत नांवाचे होते, ते १९१४ सालीं निधन पावले.

### बालपण व शिक्षण

बापूजींच्या बालपणीं त्यांची वृत्ति चपळ आणि खेळकर होती. पळणें, झाडावर चढणें, विटीदांडू किंवा चेंडूफळी वगैरे खेळ यांत ते बरेच प्रवीण

असत असें त्यांचे समवयस्क मित्र सांगतात. बापूजींची अंगकाठी मूळची ठेंगू आणि साधारणत: कृश असली, तरी प्रकृति मात्र निरोगी असून लहानपणांत त्यांना दुखण्याबहाण्याची फारशी बाधा झाली नाहीं. धाडसाचे खेळ खेळण्याची बापूजींना लहानपणीं विशेष आवड असे. वणीकडे 'गुद्दलपेंडी' नांवाचा आधुनिक बॉक्सिंगच्या पद्धतीचा परंतु सांघिक असा खेळ प्रचलित आहे, त्यांत बापूजी हौसेनें भाग घेत असत; आणि आपल्या चापल्य व कुशलता ह्या गुणांनीं ही वामन मूर्ति प्रतिपक्षास लोळवून चकित करी. यथाकाल उपनयनादि संस्कार झाल्यावर घरीं त्यांच्या वडिलांकडून त्यांना वेदाध्ययनाचे धडे मिळूं लागले व वयाच्या १४–१५ वर्षांपर्यंत त्यांची बहुतेक ऋक्संहिता म्हणून झाली होती. याशिवाय त्यांना याज्ञिकीचें शिक्षणहि देण्यांत आलें होतें. व या अल्पवयांतच विवाहोपनयनादि संस्कार सप्रयोग चालविण्याइतकी त्यांची त्यांत प्रगति झाली होती.

बापूजींच्या ठिकाणीं प्रामुख्यानें दिसून येणाऱ्या कर्मनिष्ठेचा पाया याच वयांत घातला गेला. रोजची स्नानसंध्या, देवपूजा व इतर नित्य–कर्मे अत्यंत श्रद्धेनें करण्याची त्यांना लहानपणांतच संवय लागली. आणि त्याच वेळीं त्यांच्या व्यक्ति–वैशिष्ट्याचें बीजारोपण झालें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

बदलत्या काळाला अनुसरून बापूजींना शाळेंतील शिक्षण देण्यासहि वडिलांनीं सुरवात केली व वणी येथील मराठी प्राथमिक शाळेंत व ए. व्ही. स्कूलमध्यें त्यांचें इंग्रजी ३ऱ्या इयत्तेपर्यंत शिक्षण झालें. वणी येथें त्यावेळीं हायस्कूल नसल्यामुळें पुढच्या शिक्षण–क्रमाकरितां बापूजींस चांद्यास त्यांच्या आतेकडे पाठविण्यांत आलें. कारण त्यावेळीं चांद्याला मॅट्रिकपर्यंत शिक्षणाची व्यवस्था होती. तेथें त्यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण होऊन नागपूरच्या नील सिटी हायस्कुलांतून ते प्रवेश–परीक्षा १८९८ सालीं उत्तीर्ण झाले. या काळांतील बापूजींच्या तोंडूनच ऐकलेली एक गोष्ट त्यांच्या स्वभावावर व पुढील चारित्र्यावर प्रकाश पाडणारी असल्यामुळें ती येथें द्यावीशी वाटतें. चांद्यास असतांना बापूजींच्या कांहीं सवंगड्यांना विडी ओढण्याचें व्यसन लागलें होतें व आपल्याला जडलेल्या दुष्ट व्यसनांत बापूजींनाहि ओढावें म्हणून त्यांनीं बरेच प्रयत्न केले ! सामदामादि उपाय थकल्यावर जबरदस्ती करून

पाहाण्याचेंहि त्यांनीं ठरविलें व एकदां एकीकडे बापूजींस नेऊन खालीं पाडून त्यांच्या तोंडांत त्यांनीं पेटविलेली विडी कोंबली! त्यावेळीं बापूजींनीं त्यांना निर्भयपणें सांगितलें कीं, " तुमचा जुलूम माझ्या तोंडांत विडी कोंबण्यापर्यंतच चालूं शकला. पण विडीचा धूर तोंडांत खेंचणें हें सर्वस्वीं माझ्या आधीन आहे, व तें मी कालत्रयींहि करणार नाहीं! तुमच्या चुगल्या अगर चहाड्या मी केव्हांहि वडील माणसांपाशीं सांगणार नाहीं, पण जर तुमचें गुपित कांहीं कारणामुळें फुटलें व मला त्यांनीं या बाबतींत विचारलें तर मात्र मी खरी गोष्ट सांगितल्याशिवाय राहणार नाहीं." या गोष्टीवरून लहानपणांतच बापूजींच्या अंगीं सत्यप्रीति, मनोनिग्रह व निर्भयपणा हे गुण कसे उतरले होते, हें चांगलें निदर्शनास येतें.

चांदा हायस्कूलचे त्या वेळचे हेडमास्तर श्री. केशवराव बक्षी यांची, विषय सुलभ करून सांगण्याविषयीं फार ख्याति असे. तसेंच त्यांचें आपल्या शिष्यवर्गावर अकृत्रिम व पितृवत् प्रेम असे. अशा उत्तम शिक्षकाच्या हाताखालीं बापूजींचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण झालें.

चांदा येथें असतांना बापूजींना मराठी वर्तमानपत्रें वाचावयाचा नाद लागला. विशेषत 'केसरी' वर्तमानपत्र ते नियमानें वाचीत असत. वैदिक घराण्याचे पिढीजाद संस्कार, प्रेमळ गुरूचा सहवास, 'केसरी' सारख्या राष्ट्रीय बाण्याच्या तेजस्वी वर्तमानपत्राचें वाचन या तीन गोष्टींचा बापूजींसारख्या तैलबुद्धीच्या विद्यार्थ्याच्या मनावर योग्य तो परिणाम होऊन एवढ्या लहान वयांतच त्यांचें अंतःकरण राष्ट्र, धर्म व संस्कृति यांचें पवित्र तीर्थ बनलें.

उत्तम धर्मनिष्ठ, कर्मनिष्ठ आणि विद्यासंपन्न घराण्यांत जन्म घेऊनहि आधुनिक शिक्षणाशीं संसर्ग होतांच स्वाभिमानशून्यता आणि स्वसंस्कृतीविषयीं बेपर्वाई ही जशी कित्येक आधुनिक विद्वानांत उत्पन्न झाली व होत आहे तसा परिणाम बापूजींच्या मनावर झाला नाहीं.

इंग्रजी शिक्षणानें त्यांची स्थिति एका भूमींतून उपटून अगदीं वेगळ्याच भूमींत लावलेल्या रोपट्यासारखी झाली नाहीं. त्यांचे पिढीजात संस्कार हे मूळचेच दृढतर, त्यांत बापूजींच्या उपजत बुद्धिसामर्थ्यानें जुन्या पिढींतील मर्म समजून घेण्यांतील शक्ति व पात्रता आल्यामुळें त्यांची दृष्टि चिकित्सक

होऊन, त्यांना जुन्या संस्कृतींतहि गुण आढळून आले यांत नवल नाहीं. व जुनें तेवढें त्याज्य अशी त्यांची कल्पना न होतां जुन्या-नव्यांचा योग्य संगम घडवून आणण्याकडे त्यांची बुद्धि वळावी हें स्वाभाविक आहे.

## विश्वविद्यालयांतील शिक्षण

प्रवेश-परीक्षा झाल्यावर उच्च शिक्षण घेण्याकरितां बापूजी नागपूरच्या मॉरिस कॉलेजमध्यें दाखल झाले. त्यावेळीं मॉरिस कॉलेजचे प्रिन्सिपाल महामहोपाध्याय श्री. केशवराव ताम्हण हे होते. म. म. ताम्हण यांचा विद्वत्तेबद्दल व शिक्षण-नैपुण्याबद्दल, फार लौकिक होता. हेहि चांदा हायस्कूलचे विद्यार्थी असल्यामुळे व बापूजींच्या घराण्याबद्दल त्यांना चांगली माहिती असल्यामुळें साहाजिकच बापूजींसारख्या हुषार व वेदविद्येचें अध्ययन केलल्या विद्यार्थ्याबद्दल त्यांना जास्त आपलेपणा वाटावा हें स्वाभाविक होतें. त्यांच्या हाताखालीं बापूजींचें विश्वविद्यालयीन शिक्षण झालें. विशेषतः संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास प्रि. ताम्हण यांच्या खास देखरेखीखालीं बापूजींनीं केला. प्रि. ताम्हण यांच्या परिचयाचे व अत्यंत विद्वान असलेले भटजीशास्त्री घाटे यांच्याकडे बापूजी हे प्राचीन व शास्त्रीय पद्धतीनें संस्कृत ग्रंथ शिकावयास जात असत. याप्रमाणें प्राचीन परंपरागत शास्त्रीय पद्धतीनें व आधुनिक चिकित्सक व तौलनिक पद्धतीनें त्यांनीं संस्कृत ग्रंथांचें परिशीलन केलें असल्यामुळें आधुनिक संस्कृतज्ञ व जुने शास्त्री, पंडित या दोघांनाहि बापूजींच्या धर्म व संस्कृति या विषयांतील ज्ञानाबद्दल आदर वाटतो. संस्कृत अध्ययनाबरोबरच इंग्रजी वाङ्मय, इतिहास व मराठी वाङ्मय या विषयांचें पद्धतशीर वाचन त्यांनीं या कालांत केलें.

कॉलेजमध्यें असतांना बापूजी टेनिस, फूटबॉल, क्रिकेट वगैरे खेळ खेळत नसत. परंतु या खेळांचे सामने पाहण्याची त्यांना बरीच हौस असे. बरोबरीच्या मित्र-मंडळींबरोबर हास्यविनोद करणें, सहल करावयास, पोहावयास किंवा डोंगर चढावयास जाणें वगैरे गोष्टींत त्यांचें मन रमत असे. सदासर्वदा पुस्तकांत डोकें खुपसून बसणारे ते ग्रंथकीटक नव्हते ही गोष्ट

ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. नागपूर हें भोंसल्यांचें राजधानीचें शहर असल्यामुळें तेथें गवई वगैरे कलावंतांचा बराच भरणा होता व बापूजी हे अशा गवयाच्या व विशेषतः तेथील प्रख्यात गवई बापू जोशी यांच्या बैठकीला बहुधा जात असल्यामुळें जरी हातांत तंबोरा घेऊन त्यांनीं गायन विषयाचा अभ्यास केला नाहीं, तरी त्यांतील शास्त्रीय ज्ञान त्यांनीं बरेंच हस्तगत केले आहे व गायनशास्त्रांतील रसज्ञ म्हणून त्यांचा फार लौकिक आहे. यामुळें यवतमाळांत येणाऱ्या उत्तम कलावंताला बापूजींना आपलें कसब एकदां तरी दाखविल्याशिवाय यवतमाळांतील आपला मुक्काम सार्थ झाला असें वाटत नाहीं.

या रीतीनें कॉलेजमधील चार वर्षें नागपूर येथें राहून ते १९०२ मध्यें कलकत्ता युनिव्हर्सिटीची बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

## विवाह व संतति

कॉलेजमध्यें प्रवेश केल्यावर सन १८९८ सालीं बापूजींचा विवाह बाळाघाटच्या बुचरकुंडे या वैदिक घराण्यांतील वे. शा. सं. शिवरामभटजी यांच्या मुलीशीं झाला. त्यांच्या पत्नीचें नांव यमुनाबाई असें होतें. सौ. यमुनाबाईचा इ. स. १९२५ मध्यें अंत झाला. बापूजींना आज दोन मुली व दोन मुलगे अशीं चार अपत्यें आहेत. दोन्ही मुलींचीं लग्नें झालीं असून, मुलगे शाळेंत शिकत आहेत.

## सरकारी नोकरी कां वकिली ?

बापूजी बी. ए. झाल्यावर त्यांनीं सरकारी नोकरींत शिरून एखादी अधिकाराची व मानाची जागा मिळवावी, अशी इच्छा त्यांचे वडील भाऊजी अणे यांची होती. परन्तु चरित्रनायकाच्या मनावर राष्ट्रीय वृत्तीचा जो संस्कार झाला होता, त्यामुळें त्यांच्या मनांत सरकारी नोकरींत शिरून दास्य–शृंखलाबद्ध व्हावें, असें कधींच आलें नाहीं. त्यावेळीं बापूजींनीं जर सरकारी नोकरींत शिरण्याची इच्छा दर्शविली असती, तर त्यांच्यासारख्या बुद्धिमान् मनुष्याला त्याकाळच्या परिस्थितीप्रमाणें ती सहज मिळणें शक्य होतें व त्यांच्या समकालीन सहाध्यायांप्रमाणें मोठ्या हुद्यावर काम करून

तें आज पेन्शन घेण्याच्या मर्यादेपर्यंतहि आलें असतें. बापूजींना सरकारी नोकरी दिली तरी नको होती, हें त्यांच्याच तोंडून ऐकलेल्या एका लहानशा आठवणीवरून ध्यानांत येईल.

बापूजी कॉलेजमध्यें असतांना ते कॉलेजमधील एका वाङ्मय संस्थेचे चिटणीस होते व त्या संस्थेमार्फत कॉलेजबाहेरच्या विद्वान् गृहस्थांचीं व्याख्यानें करण्याचा प्रघात असे. एकदां या संस्थेमार्फत कै. अच्युत सीताराम साठे या विद्वान वाङ्मयसेवकाचें व्याख्यान करावयाचें ठरलें. व्याख्यात्यांच्या सूचनेवरून त्या वेळच्या चीफ कमिशनरांच्या वडिलांनीं सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारावें म्हणून विनंति करण्याचें काम बापूजींकडे ते चिटणीस असल्यामुळें आलें. सदरहू गृहस्थ हे बहुभाषाभिज्ञ असून वृद्धापकाळांतहि निरनिराळ्या भाषा हस्तगत करण्याच्या उद्योगांत निमग्न असत. गव्हर्नमेंट हाऊसवर त्यांना भेटण्याकरितां बापूजी गेले असतां भेटीच्या सुरवातीलाच त्यांनीं बापूजींना " आपणाला कांहीं नोकरी वगैरे पाहिजे आहे कां ?" असें विचारलें. बापूजींनीं त्यांना नकारात्मक उत्तर देऊन, आपल्याला अध्यक्ष होण्याबद्दल विनंति करण्याकरितां मी आलों आहें, असें कळविलें. त्यावेळीं सदरहू साहेबबहादूर ओशाळल्यासारखे होऊन म्हणाले कीं, " नेहमीं तरुण माणसें माझ्याकडे येतात, ते बहुतकरून नोकरीकरितां वशिला मागण्याकरितांच येतात व म्हणूनच मी आपणांस असा प्रश्न केला, तरी त्याबद्दल आपण मनांत कांहीं आणूं नये." वृद्धापकाळाची सबब सांगून त्यांनीं सभेचें अध्यक्षस्थान नाकारलें. असो. या गोष्टीवरून तत्कालीन तरुणांची मनोवृत्ति कशी असे व त्याला बापूजी कसे अपवाद होते हें सहज दिसून येतें. अनायासें चीफ कमिशनरांच्या वडिलांची शिफारस मिळविण्याची संधि आली असतां ती दुसऱ्या एखाद्या तरुणानें वांया दवडली नसती ! बापूजींचें ध्येय सरकारी नोकरी हें नसल्यामुळें त्यांनीं बी. ए. झाल्यावर स्वतंत्र धंदा म्हणून वकिली करण्याकरितां बी. एल.चा अभ्यास करण्याचें ठरविलें. तत्कालीन परिस्थितींत वकिलीचा धंदाहि कीर्ति, मान, व संपत्ति मिळविण्याच्या दृष्टीनें आकर्षक होता, म्हणूनच बापूजींच्या वडिलांनीं त्यांना वकिलीचा अभ्यास करण्यास विशेषसा विरोध केला नाहीं.

## उमरावतीचें वास्तव्य

१९०४ सालीं बापूजी कायद्याच्या परीक्षेला बसले होते, परंतु नापास झाल्यामुळें त्यांनीं उमरावतीच्या 'काशीबाई प्रायव्हेट स्कूल' या शाळेंत शिक्षकाची नोकरी धरली. या शाळेंत असतांनाच बापूजींच्या सार्वजनिक आयुष्यास वस्तुतः सुरवात झाली. वऱ्हाडची जुनी राजधानी म्हणून, उमरावती शहर हें बरेंच पुढारलेलें होतें; व श्री. ना. दादासाहेब खापर्डे, के. रा. ब. मुधोळकर, सर मोरोपंत जोशी, श्री. जोग, काळे वगैरे प्रख्यात वकील पुढारी तेथें राहात होते. राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करावी या हेतूनें तेथें पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या धर्तीवर १० वर्षांपूर्वीं 'काशीबाई प्रायव्हेट स्कूल'ची स्थापना झाली होती. त्यामुळें त्या शाळेंतील शिक्षकहि आपल्या मगदुराप्रमाणें सार्वजनिक चळवळींत भाग घेत असत. वीर वामनराव जोशी हेहि त्यावेळीं 'काशीबाई प्रा. स्कूल'मध्यें शिक्षक म्हणून काम करीत असत. या सर्व प्रख्यात मंडळींशीं बापूजींचा सहवास घडून आला. बापूजी हे त्यांच्या विद्वत्तेमुळें व शिकविण्याच्या हातोटीमुळें विद्यार्थीवर्गांत फार प्रिय झाले होते व शारीरिक शिक्षणाकडे मुलांचें लक्ष वेधण्यांतहि त्यांनीं बरीच मेहनत घेतली. तेथील विद्यार्थ्यांमध्यें कशा प्रकारची वृत्ति जागृत करण्याचा प्रयत्न होत होता, हें 'हरिकिशोर' पत्राच्या १० एप्रिल १९०५ च्या अंकांत उमरावतीचें जें एक बातमीपत्र प्रसिद्ध झालें आहे, त्यावरून दृष्टोत्पत्तीस येतें. या बातमीपत्रांत वर्षप्रतिपदेच्या ध्वजारोपण प्रसंगानें विद्यार्थ्यांच्या मर्दानी खेळांचें प्रदर्शन का. प्रा. स्कूलच्या बोर्डिंगमध्यें झालें. सुप्रभातीं 'श्रीरामसमर्थ' अशी सोनेरी अक्षरांनीं झळकणारी ध्वजा उभारण्यांत आली व बापूजी व वीरवामनराव यांनीं मुलांस चार उपदेशपर शब्द सांगितले. नंतर निरनिराळ्या प्रकारचे मर्दानी खेळ दुपारीं करण्यांत येऊन शेवटीं "एक लटकी लढाई"हि झाली. तिचें वर्णन मनोरंजक असल्यामुळें आम्ही 'हरिकिशोर' मधून जसेंच्या तसेंच देत आहोंत:—

"कुस्त्या आटोपल्यावर लंगोट नेसलेलीं ५०-६० मुलें एकदम पटांगणांत उभीं राहिलेलीं दिसलीं. शीळ वाजतांक्षणींच जो तो आपापली टोळी घेऊन आपापल्या कामाकडे लक्ष देऊं लागला. दोन्ही पक्षांचे नायक आपल्या हाता-

खालील लोकांस सूचना देत होते. एकीकडे जर कांहीं जास्ती लोकांची अपेक्षा असली तर ज्या ठिकाणाहून एखादा काढून आणल्यास भागण्यासारखें आहे तेथून तो आणून त्या लोकांच्या मदतीकरतां पाठवीत असत. शिवाय सर्व टोळ्यांना सारखी मदत व्हावी म्हणून कांहीं निराळे लोक ठवले होते. कैद्यांना तुरुंगांत नेऊन टाकण्याकरितां कांहीं निराळे लोक होते. निशाणाचें सरक्षण करण्याकरितां व नायकांचें संरक्षण करण्याकरितां लोक ठेवलेले होतेच. अशा प्रकारें खऱ्या लढाईप्रमाणें व्यवस्था ठेवण्यांत आली होती व शेवटच्या हल्ल्याच्या वेळीं तर प्रेक्षकांची हंसतां हंसतां मुरकुंडी वळली. त्या वेळच्या झटापटी पाहून 'स्व' ह्या शब्दांमध्यें किती जादू भरली आहे याचा सर्वांस प्रत्यय येण्यासारखा होता व त्याचप्रमाणें आपण आपल्या लोकांकरितां झगडत आहों अशा विचारानें आपला आवेश कितपत वाढतो हें कळण्यास तो प्रसंग अतिशय उत्तम होता."

शेवटीं श्री. ना. दादासाहेब खापर्डे यांच्या हस्तें बक्षिससमारंभ होऊन हा समारंभ खलास झाला.

नोकरींत असल्यामुळें प्रत्यक्ष राजकारणांत बापूजी जरी उघडपणें भाग घेत नसत, तरी राजकारणाची चर्चा ते कै. भाऊसाहेब दुराणी वगैरे समवयस्क तरुण मंडळींशीं नेहमीं करीत असत व त्यांच्या व्याख्यानांची तयारीहि कित्येक वेळां करून देत असत. आम्हांला असें कळतें कीं, हिंदु लोकांना सरसहा 'असत्यवादी' म्हणणाऱ्या लॉर्ड कर्झन साहेबांचा निषेध करण्याकरितां उमरावतींत गणेश थिएटरमध्यें त्या कालांत एक सभा झाली होती. तींत कै. भाऊसाहेब दुराणी यांचें जें भाषण झालें तें इतकें जोरदार व मुद्देसूद झालें कीं, उमरावतीस तें बरेंच गाजलें गेलें. या भाषणाची तयारी करण्यांत कै. भाऊसाहेबांना बापूजींची बरीच मदत झाली होती. १९०६ सालीं लो. टिळक शिवजयंतीकरितां उमरावती येथें आले होते. त्या प्रसंगीं बापूजींची उपवक्ता म्हणून योजना झाली होती व त्या वेळचें "विभूति पूजन" या विषयावरील त्यांचें विवेचन श्रोतृवर्गाला फार पसंत पडलें होतें असें सांगतात. बापूजी उमरावती येथें असतांना एकदां असा प्रसंग घडला कीं, उमरावतीच्या कार्यकर्त्यांनीं मनावर न घेतल्यामुळें वार्षिक शिवजयंत्युत्सव साजरा

होतं नाहीं असें दिसलें. तेव्हां बापूजींनीं आपल्या घरीं श्रीशिवाजी महाराजांची तसबीर मांडून चार विद्यार्थ्यांना जमवून तो समारंभ पार पाडला.

शाळेला सुटी झाल्यावर बापूजी वणी व यवतमाळ येथें येत असत. त्यावेळीं तेथें सार्वजनिक सभांतून त्यांनीं अनेक व्याख्यानें दिल्याचे उल्लेख सांपडतात. अशाच व्याख्यानांपैकीं कांहीं व्याख्यानें या पुस्तकांत समाविष्ट केलीं आहेत. उमरावती येथें, प्रसिद्ध सत्पुरुष समाधिस्त गुलाबराव महाराज यांचाहि सहवास त्यांना घडला होता व त्यांच्याशीं बापूजींची तत्त्वज्ञानासारख्या विषयावर चर्चा होत असे.

## यवतमाळ जिल्ह्याची राष्ट्रीय त्रिमूर्ति

चरित्राचा हा काल संपविण्यापूर्वी एका गोष्टीचा उल्लेख करणें जरूर आहे. उमरावतीसच ' काशीबाई प्रा. स्कूल ' मध्यें कै. शामराव दादा देशपांडे हे विद्यार्थी म्हणून असतांना बापूजींचा व त्यांचा दृढ परिचय झाला. कै. शामराव दादा यांनीं पुढें देशाच्या सेवेकरितां शाळा सोडली, परंतु त्यांचा बापूजींशी अकृत्रिम स्नेहसंबंध जडला तो अखेरपर्यंत कायम होता. यवतमाळ जिल्ह्यांतील चळवळींत या दोघांनीं खांद्यास खांदा लावून काम केलें. कै. शामराव दादा यांचें वाचन दांडगें होतें व शाळेंत विद्यार्थीदशेंतहि उत्तम तालीमबाज व कट्टा राष्ट्रीय विचाराचा तरुण म्हणून त्यांची प्रसिद्धी होती.

कै. शामराव दादा देशपांडे यांच्या वक्तृत्वगुणाचा हा विशेष होता कीं, ते आपल्या श्रोतृवृन्दाच्या भूमिकेशीं समरस होऊन विषयाचें प्रतिपादन करीत असत. नेहमीं विद्वान लोकांचीं व्याख्यानें ऐकून चिकित्साखोर बनलेल्या पुण्याच्या श्रोतृवृन्दाकडूनहि त्यांनीं वाहवा मिळवली आहे. तसेंच खेडेगांवांच्या अडाणी समाजापुढेंहि त्यांच्याच भाषेंत बोलून व त्यांच्या नित्य परिचयाचेच दृष्टान्त देऊन ते त्यांच्यांत स्वराज्यासारख्या विषयाची गोडी उत्पन्न करीत. बैठकींत ते बसले असतांना अगदीं लहान लहान मुलांपासून तों थोर गृहस्थांपर्यंत सर्वांना मार्मिक कोटया व विनोद यांनीं ओथंबलेलें त्यांचें भाषण प्रिय वाटत असे.

यवतमाळ जिल्ह्यांत त्यानीं सतत दौरे काढून लोकांत फार मोठी जागृति केली. या जिल्ह्यांत राष्ट्रीय जागृति करण्याचें कार्य कै. शामराव दादा,

तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे व बापूजी या त्रिमूर्तिद्वारें एकवीस त्रिमूर्तीनेंच केलेलें आहे.

१९०७ सालीं बापूजी हे अखेरची बी. एल्. चा परीक्षा उत्तीर्ण झाले व वकिलीची सनद काढून यवतमाळ येथें त्यांनीं वकिलीच्या धंद्यास सुरुवात केली.

## यवतमाळचें राजकीय वळण

बापूजींच्या चरित्राच्या ह्या भागाची माहिती देण्यापूर्वी ज्या यवतमाळ गांवांत त्यांनीं आपल्या कार्याची मुहूर्तमेढ रोंविली, त्या गांवचें ते येण्यापूर्वी राजकीय वळण कसें होतें, याविषयीं दोन शब्द लिहिणें वावगें होणार नाहीं.

यवतमाळ हें वऱ्हाडांतील जुन्या शहरांपैकीं कांहीं गांव नाहीं. राज्यकारभाराच्या आणि ऑफिसरांच्या सोयीकरतां हें गांव जिल्ह्याचें मुख्य ठिकाण म्हणून इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर ठरविण्यांत आलें. तेव्हांपासून या गांवास महत्त्व येऊं लागलें. पन्नास वर्षांपूर्वी यवतमाळ हें एक केवळ 'येवतें' नांवाचें खेडें होतें. परंतु हवापाण्याच्या सोयीमुळे जिल्ह्याचें मुख्य ठिकाण बनविण्यांत आल्यानंतर 'येवत्या' चें स्वरूप पालटत चाललें; सरकारी अधिकारी, कचेरींचे कारकून, वकील, शिक्षक, वाणी, उदमी इत्यादिकांचा सर्व नवीन भरणा या गांवांत झाला. वरील नवीन लोकांनीं अर्थात् नवीन सुधारणा व कल्पना या गांवांत आपल्याबरोबर आणिल्या. गांवांत लायब्ररी, क्रिकेट क्लब, टेनिस क्लब, देशी खेळांचे क्लब, वक्तृत्वसभा इत्यादि करमणुकीच्या व शरीर व मन यांच्या संवर्धनाच्या संस्था स्थापन झाल्या. तीस वर्षांपूर्वी वऱ्हाडांत सामान्यतः सुधारकी थाटाची समजली जाणारी वर्तणूक करणारी मंडळीहि यवतमाळांत स्थाईक झाल्यामुळें हें एक पुढारलेलें गांव समजलें जाऊं लागलें. करमणुकीच्या संस्थांबरोबरच सार्वजनिक काम करण्याच्या हेतूनेंहि कांहीं संस्था गांवांत काढण्यांत आल्या होत्या. अर्थात् या चळवळी व संस्था जुन्या जमान्यांतील प्रघाताप्रमाणें सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रेरणेनें अगर कलानें निदान प्रत्यक्ष विरोध उत्पन्न न होईल अशा बेतानेंच चालत. सन १९०२ सालापासून गांवांत 'हरिकिशोर' या नांवाचें राष्ट्रीय विचारांचें साप्ताहिक कै. पृथ्वीगीर हरिगीर ऊर्फ भाऊसाहेब हे काढूं लागले.

वंगभंगानंतर सरकारी अधिकाऱ्यांच्या रोषास न जुमानताहि सार्वजनिक कार्य करणें जरूर आहे, असें येथील बऱ्याच लोकांस वाटूं लागलें, आणि स्वदेशी व बहिष्काराची जोराची चळवळ यवतमाळास सुरू झाली. राष्ट्रीय शिक्षण देण्याकरितां एक ' विद्यागृह ' नांवाची शाळाहि २५–३–१९०६ रोजीं वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर स्थापन झाली आणि सरकारी ए. व्ही. स्कूल पुष्कळ अंशीं रिकामें होऊन राष्ट्रीय शाळेंत विद्यार्थी उत्साहानें प्रविष्ट होऊं लागले.

यवतमाळ शहरांत अशा रीतीनें नवचैतन्य खेळूं लागलें असतां जिल्ह्यांत जागृतीची ज्योत पटविण्याकरितां कै. शामराव दादा देशपांडे, तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे व इतर पुढारी मंडळी राष्ट्रीय संदेश घेऊन सर्वत्र संचार करूं लागली. जिल्ह्याचें मुख्य पत्र जें 'हरिकिशोर' तेंहि आपल्या नांवास अन्वर्थकता येईल अशा नवीन चळवळीचा जोरानें पुरस्कार करूं लागलें होतें. या पत्रांत " नवीन पंथ किंवा निःशस्त्र ऊर्फ संरक्षक प्रतिकार " या नांवाची जी लेखमाला प्रसिद्ध झाली होती, ती आपल्या चरित्रनायकानेंच लिहिलेली आहे. ही सणसणीत लखमाला आजच्या परिस्थितींत वाचली म्हणजे राष्ट्रीय चळवळीचें तारू पुढें कोणत्या दिशेनें चालवावें व त्याचा शेवटचा मुक्काम कोठें व्हावयाचा आहे हें दाखविणारा तो एक नकाशाच आहे कीं काय असें वाचकांस वाटल्यास नवल नाहीं. या लेखमालेंतील कांहीं कांहीं वाक्यांना तर आज अचुक भविष्य वर्तविणाऱ्या ज्योतिषाच्या वाणीची किंमत आली आहे.

वर लिहिल्याप्रमाणें देशांतील आणि यवतमाळांतील परिस्थिति असतां बापूजी यवतमाळांत आले व त्यांनीं १९०७ सालीं वकिलीस सुरवात केली. थोड्याच अवधींत त्यांच्या कुशाग्र बुद्धीचा लौकिक पसरून धंद्याचा जम बसूं लागला. अचूक कोटिक्रमानें आणि परिणामकारी वक्तृत्वानें त्यांची न्यायाधीशावरहि छाप पडूं लागली आणि या तरुण वकिलाची येथील प्रमुख वकिलांत लौकरच गणना होऊं लागली. आपला धंदा हेंच आपलें आद्य-कर्तव्य होय, अशा बुद्धीनें बापूजी आपली वागणूक ठेवते तर आपल्या असामान्य हुशारीनें यवतमाळांतील वकिलांमध्यें धंदा आणि संपत्ति या दोन्ही

दृष्टीनीं त्यांना प्रथमस्थान सहज पटकावितां आलें असतें. परंतु बापूजींसारख्या देशस्थितीचा विचार करणाऱ्या जळजळीत देशभक्तास वकिलीच्या धंद्याचें कार्यक्षेत्र हें अत्यंत संकुचित वाटावें किंबहुना केवळ चरितार्थाचें साधन म्हणूनच त्याचा स्वीकार करून मुख्य भर देशकार्यावरच देण्याकडे त्यांच्या मनाचा ओढा असावा यांत नवल नाहीं.

यवतमाळ येथें वकिलीस सुरुवात करतांनाच त्यांनीं येथील वृद्ध व तरुण कार्यकर्त्यांनीं चालविलेल्या चळवळीस पूर्ण पाठिंबा द्यावयाचा एवढेंच नव्हे, तर तींत पुढाकार घेऊन देशकार्य शक्य तितकें नेटानें पुढें ढकलावयाचें असा निश्चय केला. राष्ट्रीय जागृतीच्या या प्रभातकालीं बापूजींनीं आपल्या ओजस्वी वक्तृत्वानें जनतेची निद्रा घालविण्यास सुरुवात केली. मधूनमधून "हरिकिशोर" साप्ताहिकांत ते लेखहि लिहीत असत अशी माहिती मिळते.

## दडपशाहीचा नंगा नाच

देशांत जोमानें वाढत असलेल्या नवचैतन्याचा अंकुर खुडून टाकून त्याची मोठ्या जोमदार वृक्षांत परिणति होऊं न देण्याच्या आसुरी आकांक्षेनें प्रेरित होऊन इतिहासानें निष्फळ ठरविलेल्या दडपशाहीच्या कुठाराचा नोकरशाहीनें लवकरच अवलंब केला व त्याचा पहिला घांव 'हरिकिशोर' पत्राचे पहिले संपादक कै. दे. भ. पृथ्वीगीर हरिगीर उर्फ पापासाहेब यांजवर पडला. १३ आगष्ट १९०७ रोजीं त्यांच्यावर १२४ अ व १५३ अ या कलमाखालीं मुकदमे होऊन त्यांना दोन वर्षांची सक्त मजुरी व एक हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली गेली. यवतमाळांत निर्भय अंतःकरणाच्या राष्ट्रीय कार्यकर्त्यांची वाण नसल्यामुळें लगेच 'हरिकिशोर' वर्तमानपत्र श्री. नरहर विठ्ठल भावे यांच्या संपादकत्वाखालीं चालू ठेवण्यांत आलें. पण त्याच्यावरहि खटला होऊन त्यांना तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा झाली. पुढें ती जबाबदारी श्री. विष्णु गंगाधर केतकर यांच्यावर पडली. यानंतर दडपशाहीच्या दैत्यानें याहीपेक्षां अक्राळविक्राळ स्वरूप धारण केलें व नोकरशाहीनें राष्ट्रीय चळवळीचीं पाळेंमुळें खणून काढण्याचा विडा उचलला. याच कालांत यवतमाळ येथें आपल्या चित्रगुप्ती खातेवह्या घेऊन गुप्त-

पोलीसखात्याचे क्रीव्हलंडसाहेब आले व त्यांनीं यवतमाळचें 'विद्यागृह' बंद केलें. यवतमाळच्या सार्वजनिक उत्सव मंडळासहि आपले सर्व कागदपत्र -साहेबमजकुराच्या हवालीं करावे लागले. तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे यांच्यावरहि क्रि. प्रो. को. १०८ कलमान्वयें खटला करण्यांत येऊन त्यांना भाषणबंदी करण्यांत आली. लवकरच बापूजींवरहि हा प्रसंग ओढवला. त्यांच्या रहात्या घराची झडती घेतली गेली. झडतींत बीजगणिताचीं टिपणें, श्री. पांगारकर यांचें 'मोरोपंतांचें चरित्र' महाभारत अशासारखींहि पुस्तकें जप्त करण्यांत आलीं. ता. १५–४–१९०९ रोजीं हनुमान जयंतीच्या निमित्तानें त्यांनीं दिलेल्या व्याख्यानावरून या खटल्याची उभारणी झाली होती. जनार्दन प्रसाद नांवाच्या एका जातीनें व भाषेनेंहि पूर्ण परदेशी असलेल्या पोलीस ऑफीसरनें केलेल्या एका चिठोऱ्यावरील टिपणावरून व दोन खेडवळ साक्षीदारांच्या जबान्यांवरून बापूजींवर आरोप शाबीत करण्यांत आला व ता. २२-६-१९०८ रोजीं त्यांच्याकडून ३००० रुपयांचा जातमुचलका व प्रत्येकीं २५०० चे दोन जामीन मागण्यांत आले. बचावाचा पुरावा म्हणून श्री. य. खु. देशपांडे, 'विद्यागृहा' चे मुख्याध्यापक श्री. दत्तोपंत आपटे व श्री. कोठेकर यांच्यासारख्या तज्ज्ञ माणसांच्या साक्षी देण्यांत आल्या होत्या. परंतु जेथें बीजगणिताच्या टिपणांमधेंहि राजद्रोह असल्याचा संशय सरकारास येत होता, तेथें अशा विद्वान माणसांचा पुरावा अग्राह्य समजला जाणें ही मुळींच आश्चर्याची गोष्ट नव्हती! लीगल प्रॅक्टिशनर्स ॲक्टखालीं फौजदारी कायद्यान्वयें शिक्षा झाली म्हणून त्यांची सनदहि एक वर्षपर्यंत रद्द करण्यांत आली. एका वर्षानंतर बापूजींना वकिलीची सनद मिळाली व त्यांनीं आपला धंदा पुनः सुरू केला. कॉलेजला रामराम ठोकून स्वतंत्र धंद्याच्या क्षेत्रांत पदार्पण करतांना कांहीं ठरीव अवधीपर्यंत सार्वजनिक चळवळींत पडावयाचें नाहीं, अशी भीष्मप्रतिज्ञा करणाऱ्या कृतनिश्चयी (!) तरुणांनीं बापूजींच्या आयुष्यांतील या काळाकडे जरूर लक्ष द्यावें.

सन १९०५ सालीं कै. लो. टिळक हे यवतमाळास आले होते. त्यावेळीं येथील राष्ट्रीय कार्यकर्त्यांचा कार्योत्साह व कार्यपद्धति पाहून त्यांनीं असे उद्गार काढले होते कीं, 'लवकरच हें लहानसें शहर लोकमताचें ठाणें

होइल.' लोकमान्यांची ही भविष्यवाणि बापूजींनीं व त्यांच्या राष्ट्रीय विचाराच्या सहकारी मित्रमंडळीनें १९०९ सालपर्यंतच्या अल्पावधींतच खरी करून दाखविली, एवढेंच नव्हे, तर आजपर्यंत या गांवचा या बाबतींत हा लौकिक कायम आहे.

१९०८ सालीं लो. टिळक यांच्यावर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांची मंडालेच्या तुरुंगामध्यें रवानगी झाल्यापासून तों १९१४ सालीं ते सुटून परत येईपर्यंतचा काळ महाराष्ट्रांतील चळवळ्या लोकांना कसा गेला, हें सर्वांना ठाऊकच आहे. सरकारनें दडपशाहीचा तृतीय नेत्र उघडून सर्व चळवळ्या लोकांना भस्मसात् करण्याची राक्षसी महत्त्वाकांक्षा धरलेली व गुप्त पोलिसांचा ससेमिरा चळवळीस थोडीफार सहानुभूति दाखविणाऱ्यांच्याहि पाठीमागें लागलेला, त्यामुळें साधारण जनसमाज भीतीनें व दहशतीनें इतका गांगरून गेला होता कीं, जो समाज यापूर्वी अशा लोकांचे आगतस्वागत व आदरातिथ्य करण्यांत आपणांस धन्य मानून घेत असे, तोच आतां पोलीसच्या धाकामुळें त्याच्या हाऱ्यामोऱ्यासहि उभा राहीनासा झाला. अशा परिस्थितींत सर्व दूरच्या लहानमोठ्या पुढाऱ्यांना स्वस्थ बसून अनुकूल कालाची प्रतीक्षा करण्यापलीकडे दुसरा इलाज नव्हता. हीच स्थिति यवतमाळच्या पुढारी मंडळाची झाली. तरीपण बापूजींच्या नेतृत्वाखालीं अशाहि अडचणीच्या काळांत यवतमाळचा राष्ट्रीय पक्ष अनेक गैरसोयी सोसूनहि गणेशोत्सव व शिवजयंती यांसारखे राष्ट्रीय प्रसंग अत्यंत निष्ठेनें साजरे करीत असे व आपल्या अंतःकरणरूपी स्थंडिलांत स्थापलेला राष्ट्रसेवेचा अग्नि अद्यून विझला नाहीं, हें सरकारच्या प्रत्ययास आणून देत असे. या काळांतील गणेशोत्सवांत गणपति देवतेची प्राणप्रतिष्ठा होण्यापूर्वी त्या देवतेच्या मृण्मय उत्सवमूर्तीस या घरांतून त्या घरांत असे घटकेघटकेनें धावते दौरे काढावे लागत असत, तर कित्येकवेळां शिवाजीचा उत्सवप्रसंग एकट्यादुकट्या माणसास शिवकालीन गनिमी काव्याच्या पद्धतीनें उरकून घ्यावा लागत असे. 'त्रिशतसांवत्सरिक उत्सवाच्या भाषणांत बापूजींनी या स्थितीचा आरंभींच उल्लेख केला आहे, तो वाचकांनीं जरूर पाहावा.

याच काळांत बापूजींवर त्यांच्या होतकरू कनिष्ठ बंधूंच्या व परमपूज्य वडिलांच्या निधनामुळें दोन कौटुंबिक आपत्तींचे घाले आले.

## आपत्कालांतील जागृतीचा नवीन मार्ग

वर उल्लेख केलेल्या दडपशाहीच्या तिमिरयुगांत उघडपणें राजकीय चळवळ करणें जेव्हां अशक्य झालें, तेव्हां बापूजींनीं आपलें जनसेवेचें व्रत एका निराळ्या पद्धतीनें अखंड चालू ठेविलें होतें. हळुहळू दडपशाहीच्या लोखंडी पंजाची मूठ ढिली पडावयाला लागल्याबरोबर गणेशोत्सवासारखे प्रसंग सोंवळ्या स्वरूपांत कां होईना, पण सामुदायिक होऊं लागले. अशा वेळेस निर्भेळ राजकीय विषयांचें लोकांना शिक्षण देणें अर्थात्‌च शक्य नव्हतें. परंतु वैदिक किंवा पौराणिक कथांच्या आधारानें बापूजी व्याख्यानें देऊन संकेतानें देशाच्या भविष्यकालाविषयीं लोकांच्या मनांत उत्साह व आशा उत्पन्न करीत असत. हीं व्याख्यानें फार परिश्रम घेऊन व संशोधन करून तयार केलेलीं असत. ‘ हिंदुधर्माची मीमांसा ’ हा लेख याच काळांत लिहिलेला आहे. ‘ गणपति ही संग्रहवादी देवता कशी ? ’ ‘ समुद्रमंथन ’ ‘ गीतेंतील यज्ञचक्र ’ वगैरे विषयांवर त्यांचीं या काळांत विद्वत्ताप्रचुर व स्वतंत्र विचारांचीं अशीं व्याख्यानें झालीं आहेत. परंतु तीं उतरून घेण्याची व्यवस्था नीट नसल्यामुळें वर्तमानपत्रांतून तीं प्रसिद्ध होऊ शकलीं नाहींत. व त्याच मुळें त्यांचा समावेश या पुस्तकांत करतां आला नाहीं. सुदैवानें गणपति देवतेसंबधींचा लेख मात्र बापूजींच्या जवळ लिहिलेला सांपडला. तो या पुस्तकांत देण्यांत येत आहे. याच विषयावर बोलण्याचा बापूजींना नुकताच ( इ. स. १९३१ ) कलकत्ता येथें प्रसंग आला असतांना त्यांनीं या लेखाचा उल्लेख केला होता. यानंतर १९१७ सालींहि अशाच तऱ्हेचें “ अरुणाची जन्मकथा ” हें व्याख्यान गणपति उत्सवांत त्यानीं दिलें होतें. त्याची यवतमाळच्या लोकांस अद्यापहि आठवण होते इतकें तें चांगलें झालें होतें. ‘संदेश’ मध्यें त्याचा अत्यंत त्रोटक सारांश आला असल्यामुळें त्या व्याख्यानाचा समावेश या पुस्तकांत होऊं शकला नाहीं.

## डिस्ट्रिक्ट असोसिएशनची स्थापना

असो. हाहि काळ निघून गेला. १९१४ सालीं लोकमान्य टिळक सुटले. सरकारहि महायुद्धामुळें भांबावून गेलें होतें. आरंभीं जरी लोकमान्य टिळकांच्या गायकवाड वाड्यावर सक्त पहारा ठेवून लो. टिळकांस व त्यांच्या अनुयायांस सरकारनें त्रास देणें सुरू केलें होतें, तरी महायुद्धाच्या दंग्यानें सरकारचे डोळे खाडकन् उघडले व सैन्यभरतीकरतां आपण बाहेर निघा व आपल्या वाणीनें तरुणांचीं मनें युद्धप्रवण करा, असें लोकमान्यांस सरकारला स्पष्ट शब्दानें नसलें, तरी आपल्या वागणुकीनें विनवावें लागलें.ज्या शिवाजी-उत्सवाचा सरकारनें चार दोन वर्षांपूर्वी द्वेष आरंभिला होता, त्याच शिवाजींचें व त्याच्या मराठ्यांचें पुण्यस्मरण करून सैन्यभरतीच्या कार्यक्रमाचें सरकारला पुण्याहवाचन करावे लागलें. असा अनुकूल काल प्राप्त झाल्याबरोबर राष्ट्रीय कार्यकर्ते फिरून जोमानें आपल्या उद्योगास लागले.सुरत कॉंग्रेसपासून जहालपक्षास कॉंग्रेस पारखी झाली होती व चळवळ करावयाची म्हणजे हातांत संस्था पाहिजे, या हेतूनें व प्रांतास नुकत्याच मिळालेल्या कौन्सिलांत लोकमताचें यथायोग्य प्रतिबिंब पडावें व सरकारी अधिकाऱ्यांवर संघटित°लोकमताचा दाब पडावा म्हणून बापूजींनीं सन १९१५ सालच्या पाडव्याच्या सुमुहूर्तावर आपल्या सहकारी मित्रांच्या साह्यानें यवतमाळ जिल्ह्यांत सार्वजनिक कार्य करण्याकरितां "डिस्ट्रिक्ट असोसिएशन" या नांवाची संस्था स्थापन केली. सर्व प्रकृतींच्या माणसांस वाव मिळावा व तत्कालीन बिकट परिस्थितींत काम करण्याच्या मार्गांत येणारे अडथळे शक्य तितके टाळण्याच्या हेतूनें या संस्थेचें ध्येय सर्व सनदशीर मार्गांचें अवलंबन करून हिंदुस्थानला वसाहतीचें स्वराज्य प्राप्त करून घेणें असें त्यावेळीं ठेवण्यांत आलें होतें. अखिल भारतीय प्रश्नाबरोबरच जिल्ह्यांतील लोकांच्या गैरसोयी व अडचणी सरकारसमोर मांडून त्यांची निकडीनें दाद लावून घ्यावयाचीं हेंहि कार्य या संस्थेनें आपल्या अंगावर घेतलें. या संस्थेतर्फे जिल्ह्यांत व वऱ्हाडांत बापूजींनीं पुनश्च चळवळ केली.पंधरा वर्षांच्या भरीव कामगिरीमुळें सर्व वऱ्हाडांत अग्रेसर राजकीय संस्था म्हणून या संस्थेचा लौकिक झाला आहे. त्याचें

सर्व श्रेय त्या संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष माधवरावजी अणे यांसच आहे. वऱ्हाडांत बिगार व महार बलुतें यांचा जो जुल्म होता, त्याचें उच्चाटन करण्याचें महत्त्वाचें कार्य या असोसिएशनकडून केवळ यवतमाळ जिल्ह्यांतच नाहीं, तर वऱ्हाडच्या चारी जिल्ह्यांत केलें गेलें आहे. या असोसिएशनमार्फत प्रतिवर्षी जिल्हा परिषदा आळीपाळीनें प्रत्येक तालुक्यांत फिरविल्या जातात. त्यांत जिल्ह्याच्या हिताच्या व अखिल भारतीय स्वरूपाच्या प्रश्नांवर जिल्ह्यांतील लोकमत अजमावलें जातें व दरवर्षीचा पुढील कार्यक्रम आंखला जातो. शहरांतल्याप्रमाणें खेडेगांवांतहि चळवळीचा प्रसार व्हावा या हेतूनें " परगणा परिषदा " भरविण्याची कल्पना रा. गंगाधर नागोराव हूड वकील यांनीं काढली व तिला असोसिएशननें उचलून धरून जिल्ह्यांतील अनेक परगण्यांतील खेडेगांवांतून परिषदा भरविल्या व त्यांत खेडेगांवांसंबंधींच्या प्रश्नांचा व शेतकऱ्यांच्या अडचणींचाच विचार प्रामुख्यानें करण्यांत येत असे. होमरूल लीगच्या व असहकारितेच्या चळवळीच्या काळांत या परिषदांचा फार उपयोग झाला. या परगणापरिषदांना बापूजी हे बहुधा हजर रहात असत व कित्येक परिषदांचे ते अध्यक्षहि असत. बिगारीचा जुल्म नष्ट करण्याकरितां असोसिएशनमार्फत सर्व वऱ्हाडमध्यें चळवळ करण्याकरितां " बिगारनिवारक मंडळ " नांवाची संस्था काढली होती व तिचे चिटणीस सुप्रसिद्ध समाजभूषण गोपाळरावजी कोठेकर वकील हे होते. रा. दादासाहेब कोठेकर यांनीं या बाबतींत फार प्रचंड चळवळ केली. एकीकडे बिगार घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर दिवाणी व फौजदारी फिर्यादी करण्यांत येऊन दुसरीकडे जनतेंतहि बिगारीच्या जुलमाविरुद्ध तीव्र प्रतिरोधाची वृत्ति बनवून वऱ्हाडांतून या जुलमाचें उच्चाटन करण्यांत आलें. असो. यवतमाळ जिल्ह्यांतील किंबहुना वऱ्हाडांतील सर्व चळवळींचें केंद्रस्थान ही असोसिएशन आहे असें म्हटलें तरी चालण्यासारखें आहे.

## होमरूल लीगची चळवळ

१९१६ सालीं लो. टिळकांनीं होमरूल लीगची मुहूर्तमेढ रोविली. बापूजींनीं या चळवळींत प्रामुख्यानें भाग घेतला व केवळ वऱ्हाड प्रांतांतच नाहीं

तर पुणें, मुंबई व बेळगांव या भागांत त्यांचीं या विषयावर व्याख्यानें झालीं आहेत. खुद्द लो. टिळकांच्या अध्यक्षतेखालीं पुण्यास त्यांचीं दोन व्याख्यानें झालीं होतीं व त्याप्रसंगीं लोकमान्यांनीं बापूजींची फार तारीफ केली होती.

काँग्रेसमध्यें शिरून ती काबीज करावी, असें लोकमान्यांप्रमाणेंच बापूजींचें मत असल्यामुळें राष्ट्रीय पक्षांतील कित्येक समेटाच्या विरुद्ध असलेल्या लोकांचीं मतें आपल्या बाजूस वळविण्यास बापूजींचा लोकमान्यांस फार उपयोग झाला. बेळगांव येथें बापूजींचें मुद्दाम या विषयावर बेळगांव परिषदेच्या वेळीं व्याख्यान झालें होतें.

सर्व हिंदुस्थानांत होमरूल लीगचे जास्त सभासद करण्याचा मान बापूजींच्या यवतमाळ जिल्ह्यानेंच मिळविला होता, यावरून बापूजींनीं या कार्याला किती नेटानें उचलून धरलें होतें, हें दृष्टोत्पत्तीस येईल. या कामांत बापूजींस विशेष सहाय्य यवतमाळांतील चिकाटीनें व निष्ठेनें कार्य करणारे श्री. लक्ष्मणराव ओक वकील यांचें झालें. दररोज एकतरी नवीन सभासद केल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं, असा त्यांनीं निश्चय केला होता व त्यांनीं एकट्यांनींच त्यावेळीं एक हजाराच्या वर सभासद केले होते !

१९१७ सालीं बापूजींचीं यवतमाळ गांवांत 'गीतारहस्या'वर निरनिराळ्या ठिकाणीं दररोज एक याप्रमाणें सात प्रवचनें झालीं. शेवटल्या दिवशीं येथील राममंदिरांत सप्ताहाच्या समाप्तीनिमित्त प्रवचन झालें, त्यांत दक्षणा म्हणून लोकांनीं होमरूल लीगचे सभासद व्हावें अशी मागणी केली. तिला अनुसरून जमलेली १०० रुपयांची दक्षणा बापूजींनीं होमरूल लीगला दिली व याशिवाय प्रत्येकीं १०० रु. वर्गणी देणारे पांच तहाह्यात सभासदहि मिळविले.

होमरूललीगचें शिष्टमंडळ घेऊन लो. टिळक व श्री. तात्यासाहेब केळकर हे विलायतेंत गेले असतांना त्यांच्या पश्चात् बापूजींनीं पुण्यास येऊन राहावें व 'केसरी' व होमरूल लीग यांची जबाबदारी स्वीकारावी, अशी लोकमान्यांची इच्छा होती व त्याप्रमाणें त्यांनीं बापूजींना विनंतीहि केली होती, यावरून बापूजींच्या कर्तृत्वाविषयीं व बुद्धिमत्तेविषयीं लोकमान्यांना केवढा आदर वाटत होता, हें दिसून येतें.

लोकमान्य विलायतेंतून परत आल्यावर काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टीची स्थापना करण्यांत आली. तिचा जाहीरनामा व घटना तयार करतांना बापूजींचें लोकमान्यांना बरेंच सहाय्य झालें. वऱ्हाडांतून या पार्टीतर्फे असेंब्लीच्या जागेकरितां उमेदवार म्हणून बापूजींचीच नेमणूक झाली होती.

## यवतमाळचें 'लोकमत' पत्र

"हरिकिशोर" पत्र दडपशाहीच्या काळांत वारंवार संकटें आलीं असतांनाहि जिवंत ठेवण्याची खटपट कशी करण्यांत आली, याचा वर उल्लेख आलाच आहे. परंतु अखेर त्या पत्राची १९१० सालीं इतिश्री झाली. जिल्ह्यांतील अनेक चळवळींना वर्तमानपत्राची अत्यंत जरूरी नेहमींच भासत असल्यामुळें बापूजींच्या प्रोत्साहनानें यवतमाळ येथें 'मुद्रण मंडळ' स्थापन करण्यांत येऊन 'लोकमत' वर्तमानपत्र श्री. सदाशिवराव बल्लाळ यांच्या संपादकत्वाखालीं १९१९ सालच्या वर्षप्रतिपदेला सुरू करण्यांत आलें. हें पत्र चालविण्याकरितां बापूजींना पैशाच्या दृष्टीनें बरीच झीज सोसावी लागली आहे.

## असहकारितेचा उदय

लो. टिळकांनीं स्थापिलेल्या काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टीनें आपले जाहिरनामे प्रसिद्ध करून नवीन कौन्सिलाकरितां राष्ट्रीय पक्षाचे उमेदवार ठिकठिकाणीं उभे केले होते. मॉन्टेग्यूसाहेबांनीं दिलेल्या सुधारणा अपुऱ्या व निराशाजनक आहेत असा जरी देशानें एकमतानें अमृतसरच्या राष्ट्रीय सभेंत त्यांजवर छाप मारिला होता, तरी लो. टिळकांच्या प्रसिद्ध गंगापूरच्या तारेंत पुकारिलेल्या "प्रतियोगी" धोरणानुसार टिळकांचे अनुयायी हे जमल्यास कौन्सिलांत स्वत:चें बहुमत स्थापन करून लोककल्याणाच्या गोष्टी घडवून आणणार होते. तें शक्य न झाल्यास कौन्सिलांत इतके दिवस प्रस्थापित झालेलें होयबांचें वातावरण बदलवून टाकून तेथें सरकारास जाब विचारणारा असा एक खंबीर पक्ष बनवून या सुधारणांचें बेगडी स्वरूप जनतेच्या नजरेस आणून द्यावें असा त्यांचा विचार होता. कौन्सिलाच्या कार्यक्रमानें देशांत क्षोभ उत्पन्न करून राष्ट्राचें गाडें आणखी पुढें ढकलावें अशा तया-

रींत टिळकपक्ष बसला होता. राष्ट्रकार्याचा राजसूय यज्ञ आरंभून त्यांत कौन्सिलांतील कार्यक्रमाचा अश्व सोडावा व त्याची गति जर सरकारनें कुंठित केली तर सरकारशीं त्या निमित्तानें दोन हात करावे अशा कार्य-प्रवण व शूर भूमिकेवर टिळकपक्ष अधिष्ठित होता. या लढ्याची पूर्व-तयारी म्हणून स्वदेशांत कामगार मतदार व खेडेगांव यांची संघटना करणें व परदेशांत चळवळीचीं केंद्रें स्थापन करून हिंदी प्रश्नांविषयीं आंतर-राष्ट्रीय सहानुभूति मिळविणें हीं दोन महत्त्वाचीं अंगें कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पार्टींत अंतर्भूत करण्यांत आलीं होतीं, परंतु याच वेळीं लोकमान्यांचा इह लोकींचा प्रवास समाप्त झाला आणि ज्या दिवशीं त्यांचें देहावसान झालें, त्याच दिवशीं महात्मा गांधी असहकारितेचा कार्यक्रम हातांत घेऊन राष्ट्रीय क्षितिजावर उदित झाले व आत्मशुद्धि व सरकारशीं असहकार्य या मंत्रांचा जप करूं लागले, अशा स्थितींत टिळकपक्ष किंचित्काल दिग्मूढ झाला अस-ल्यास नवल नाहीं. नंतर कलकत्ता येथें १९२० सालच्या सप्टेंबर महिन्यांत राष्ट्रीय सभेचें खास अधिवेशन स्वर्गीय लाला लजपतराय यांच्या अध्यक्षते-खालीं भरलें व तेथें असहकारितेचा ठराव बहुमतानें मंजूर झाला. या ठरा-वाला टिळकपक्षीयांनीं कसून विरोध केला. बापूजीहि या विरोधकांतले एक प्रमुख होते. असहकारितेच्या ठरावानुसार कौन्सिलच्या निवडणुकीला उमेद-वारांनीं उभें राहूं नये, व मतदारांनीं मतें देऊं नयेत असें सांगण्यांत येत होतें. परंतु कॉं.डे. पार्टीतर्फे उभे राहणाऱ्या उमेदवारांनीं या बाबतींत कांहीं करूं नये असा कलकत्यास संकेत ठरला असतांनाहि देशांत असहकारितेच्या मताचा एवढा मोठा झंझावात सुटला होता कीं,बहुतेक पुढारी व्यक्तींनीं निवडणुकींतून अंग काढून घेण्याचा निश्चय पार्टीची सभा भरण्यापूर्वीच जाहीर केला. तारीख १९ सप्टेंबर १९२० ला सरदारगृहांत पार्टीची सभा बॅ.बॅप्टीस्टांच्या अध्य-क्षतेखालीं भरली होती. या सभेंत एकट्या बापूजींनींच कौन्सिलवर बहिष्कार घालूं नये असें स्पष्ट सांगितलें, व त्याप्रमाणें मतहि दिलें; अर्थातच बहुमतानें राष्ट्रीय सभेच्या निर्णयाला मान द्यावा असा ठराव पार्टीच्या सभेंत पास झाल्यामुळें त्यांनीं असेंब्लीकरितां उमेदवार म्हणून उभें न राहण्याचें जाहीर केलें. परंतु कायदेकौन्सिलांत राष्ट्रीय पक्षाचे उमेदवार निवडून पाठविलेच

पाहिजेत असें त्यांचें मत असल्यामुळें आपल्या जागीं त्यांनीं या ग्रंथाचे सग्राहक श्री. जतकर यांना असेंब्लीकरितां उभे केले व ते अखेर निवडूनहि आले. कलकत्ता येथील खास अधिवेशनापासून तों नागपूर येथें १९२० सालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनापर्यंत बापूजींनीं असहकारितेच्या कार्यक्रमास कसून विरोध केला व तो त्यांना किती एकाकीपणें करावा लागला हें त्यांचें यवतमाळ जिल्हा परिषदेच्या ६ व्या अधिवेशनांत स्वागताध्यक्ष या नात्यानें केलेलें जें भाषण आहे तें वाचलें म्हणजे कळून येतें. नागपूरच्या राष्ट्रीय सभेच्या अगोदर महात्माजी व बापूजी हे दोघेहि नागपूर येथें तळ देऊन बसले होते व दोघेहि जनतेचें आपल्यास अनुकूल असें मतपरिवर्तन करून घेण्याचे शिकस्तीचे प्रयत्न करीत होते. महात्माजींचें कार्य कलकत्ता स्पे. कॉं. च्या ठरावामुळें बरेंच सोपें झालेलें होतें. परंतु बापूजींना मात्र बिकट चढणीच्या मार्गानें जावयाचें होतें. तथापि विरुद्ध लोकमत असतांनाहि आपल्याला पटेल तेंच बोलावयाचें असें बापूजींचें धोरण असल्यामुळें ते आपलीं मतें उघडपणें जाहीर व्याख्यानांतून सांगत असत. या व्याख्यानप्रसंगीं नागपुरांत भावनोत्तेजित श्रोतृवर्गापैकीं एकाकडून एकदां जोड्याचाहि आहेर त्यांच्याकडे आला होता! आव्हान केलें असतांहि ही भेकड व्यक्ति जेव्हां समोर येईना तेव्हां बापूजींनीं भर सभेंत या भेकडवृत्तीच्या क्षुद्र विरोधकास एवढेंच बजाविलें कीं, " हा आहेर परत करण्याची वेळ लौकरच येणार आहे! " पुढें घडलेल्या इतिहासावरून अशी वेळ लौकरच आली, हें राजकारणाच्या अभ्यासकांस सांगणें नकोच. या गोष्टीचा डॉ. बेझंटबाई यांनीं आपल्या 'न्यूइंडिया' पत्रांत उल्लेख करून निषेध केला होता.

नागपूरची राष्ट्रीय सभा झाल्यानंतर कौन्सिलच्या कार्यक्रमासंबंधीं कांहींहि करणें शक्य नव्हतें; कारण कॉं. डे. पक्ष निवडणुकीच्या कार्यक्रमांतून अगोदर बाहेर पडलेला होता. यानंतर बापूजींनीं असहकारितेच्या कार्यक्रमांतील,स्वतःस पटणाऱ्या तपशिलांची, जिल्ह्यांत जोरानें अंमलबजावणी कशी करतां येईल याचा विचार करून, स्वतःच्या व आपल्या सहकारी मित्रमंडळींच्या सह्यानिशीं एक जाहीरनामा काढिला व तो कार्यक्रम यशस्वी करण्याच्या ते खटपटीस लागले. खादीप्रसार, मद्यपानबंदी वगैरे विधायक कार्यक्रमाची चळवळ नेटानें

व निष्ठेनें बापूजींनीं केली. दारूच्या दुकानांवर बापूजी स्वतः पिकेटिंग करण्यास त्यावेळीं उभे राहात असत, राष्ट्रीय चळवळीचें अंग म्हणून वैयक्तिक दृष्ट्या सरकारी शाळेच्या बहिष्काराचें ज्या विद्यार्थ्यास महत्त्व पटेल, त्याची सोय व्हावी म्हणून यवतमाळांत परत 'राष्ट्रीय शाळा'हि स्थापन झाली. विशेष गाजावाजा न करतां त्यांनीं आपली वकिलीहि एक वर्षाकरितां सोडिली होती. विगार बलुत्याची आधींच सुरू असलेली चळवळ, याच वेळीं डॉ. तपस्वी बाबासाहेब परांजपे व बापूजी यांनीं जोरांत पुढें रेटली व ती सर्व वऱ्हाडभर पसरली. याचा परिणाम असा झाला कीं, १९०५ सालापासून स्वतःच्या संसारावर लाथ मारून सर्वस्वी देशसेवेस वाहून घेतलेल्या तपस्वी डॉ. बाबासाहेबांना अटक करून १२४ अ कलमाखालीं १५ महिन्यांची सक्तमजुरीच्या कैदेची शिक्षा ठोठावली गेली.

## बापूजींची विरोधाची भूमिका

सार्वजनिक आयुष्याच्या आरंभकालांत "निःशस्त्र प्रतिकारा''वर लेखमाला लिहिणाऱ्या बापूजींनीं असहकारितेच्या काळांत, महात्मा गांधी यांजबरोबर विरोध कां केला व त्यांची यावेळच्या विरोधांत कोणती भूमिका होती, याचें येथें थोडेंसें विवेचन केलें पाहिजे. नवीन पंथाच्या लेखांतून उपदेशिलेला स्वराज्य-प्राप्तीचा मार्ग व म. गांधींच्या असह-योगांतील मार्ग यांत विशेष भिन्नता नाहीं. कौंसिलें त्यावेळेस प्रातिनिधिक स्वरूपाचीं नसल्यामुळें कौंसिलविषयीं, नवीन पंथानें काय धोरण स्वीकारावयाचें याचें सहाजिकच त्या लेखमालेंत विवेचन आलेलें नाहीं, राष्ट्रीय शिक्षणाचा प्रयोग, वंगभंगाच्या चळवळींत होऊनच गेला होता. त्याचा अनुभव असा आला कीं, दडपशाहीचें सत्र एकदां सुरू झालें म्हणजे या संस्था सरकार भराभर गडप करतें व अशा वेळेस बऱ्याच तरुण विद्यार्थ्यांच्या आयुष्याची वाताहात होते, म्हणून कायदेभंगाचा कार्यक्रम करण्याचें निश्चित ठरविल्याशिवाय मुलें शाळेच्या बाहेर काढण्याच्या भरींत राष्ट्रानें पडूं नये असें बापूजींचें मत होतें. बाहेर पडलेल्या मुलांच्या शिक्षणाचीहि कांहीं सार्वत्रिक सोय कार्यक्रमांत नव्हती. देशाच्या स्वातंत्र्याकरितां, सर्व जनतेनें निःस्सीम स्वार्थत्याग केला पाहिजे हें खरें, पण वकील वर्गासारख्या

एखाद्या वर्गावर विशिष्ट प्रकारच्या स्वार्थत्यागाची अट टाकल्यामुळें व ती सर्वच वकिलांस निरनिराळ्या कारणांमुळें पाळणें शक्य नसल्यामुळें तो बहिष्कार सफळ न ठरतां, एका विशिष्ट वर्गाविषयीं समाजांत द्वेष माजविण्यास मात्र कारणीभूत व्हावयाचा व त्यामुळें अशा तीव्र चळवळींत समाजांतील निरनिराळ्या वर्गांची दिलजमाई असावी लागते ती नाहींशी होईल असें बापूजींना वाटत होतें.

नवीन कौन्सिलें हीं सत्तेचीं केंद्रें आहेत, आणि ज्यावेळीं स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं निकराची चळवळ होईल व त्या चळवळीनें चिडून नोकरशाही दडपशाहीचा आश्रय घेईल, त्यावेळीं तिच्या जुलमीपणाला आळा घालण्याकरितां कौन्सिलांचा पुष्कळच उपयोग करून घेतां येईल, अशी बापूजींची भावना होती; म्हणून कौन्सिलांवर बहिष्कार घालणें आत्मघातकीपणाचें आहे असा ते उपदेश करीत.

निःशस्त्र प्रतिकाराच्या कोणत्याहि चळवळीचें अंतिम ध्येय जुलमी सत्ता गाजविणारें प्रस्थापित राजयंत्र बंद पाडणें हें असतें. तें ध्येय सरकारी नियंत्रणाखालीं असलेल्या सर्व संस्थांवर बहिष्कार घालून साध्य करावें असा माहात्माजींचा कार्यक्रम. याविरुद्ध बापूजींचें म्हणणें इतकेंच कीं, लहानापासून मोठ्यापर्यंत सर्व सत्तेच्या जागा राष्ट्रीय पक्षानें आक्रमण करून स्वातंत्र्याकरितां "राष्ट्रीयसंघ" म्हणा किंवा कायदेभंग म्हणा पुकारल्यास हें ध्येय लवकर गांठतां येईल. त्याचप्रमाणें नवीन असहकारितेची एकदेशीय व स्वतःवर अनेक बंधनें घालून घेतलेली चळवळ करण्याच्या मार्गास बापूजींचा विरोध होता. राष्ट्रीय चळवळ यशस्वी करण्याकरितां हाताशीं येतील त्या साधनांचा उपयोग करून निर्वाणीचा प्रसंग येईल त्यावेळीं मात्र प्रत्येकाने जास्तींत जास्त स्वार्थत्याग करण्याच्या तयारींत राहावें, हें बापूजींचें म्हणणें होतें. बापूजींची या विरोधांत काय भूमिका होती, हें त्यांनीं वर उल्लेख केलेल्या परिषदेंत केलेलें भाषण वाचलें म्हणजे सहज समजून येईल. 'एक वर्षांत स्वराज्य' ह्या महात्मा गांधींच्या किंवा कॉंग्रेसच्या कल्पनेंत बापूजींना अतिशयोक्ति आहे असें मुळींच वाटत नव्हतें. त्याचा अर्थ ते इतकाच करीत होते कीं, नागपूर कॉंग्रेसनंतर पुढची कॉंग्रेस भरण्याच्या आधीं केव्हां-

तरी कॉंग्रेस "राष्ट्रीय संप" पुकारणार आहे, व त्याची तयारी असहकारितेच्या ठरावांत निर्दिष्ट केलेल्या मार्गानें करण्याचा कॉंग्रेसचा विचार आहे. कॉंग्रेसनें ठरविलेले हे निरनिराळे मार्ग विशिष्ट अनुक्रमपद्धतीनेंच आचरिले पाहिजेत असा त्या ठरावांतून मुळींच अर्थ निघत नाहीं. सर्वांनीं ठरावांत निर्दिष्ट केलेल्या मार्गांपैकीं साधतील तितक्या मार्गांचें अवलंबन करून, कॉंग्रेसच्या शेवटच्या हांकेस मात्र जय्यत तयारी ठेवावयाची असा त्या ठरावाचा बापूजींच्या मतें अर्थ होता व त्याप्रमाणें, नागपूर कॉंग्रेस झाल्यानंतर दोन तीन महिने परगणा-सभांतून, खेडोपाडीं जाऊन, ही राष्ट्रीय संपाची कल्पना त्यांनीं व्याख्यानांतून प्रसृत केली; परंतु पुढें झालेल्या वर्किंग कमिटीच्या ठरावांतून निरनिराळ्या तपशिलाविषयीं आग्रह दिसूं लागला, त्यामुळें मात्र हा राष्ट्रीय संपाचा किंवा कायदेभंगाचा दिवस एक वर्षाच्या आंत पुकारला जाईल, असें त्यांना दिसेना, म्हणूनच त्यांना या गोष्टीविषयीं तीव्र विरोध दाखवावा लागला. कायदेभंगांत ते केव्हांहि उडी घ्यावयास तयार होते, हें त्यांच्या भाषणाच्या शेवटच्या भागावरून दिसतें, व गेल्या सत्याग्रहांत त्यांनीं बजाविलेल्या कामगिरीवरून, असहकारितेच्या काळांतहि ती वेळ आली असती, तर ते या वेळेस जसे कोणाच्या मतास न जुमानतां सत्याग्रहांत सामील झाले, तसेंच त्याहीवेळीं सामील झाले असते. त्यांना पटलेल्या गोष्टींविषयींची चळवळ त्यांनीं किती उत्कृष्टपणें केली याचें वर्णन वर आलेंच आहे. कायदेभंगाची प्रत्यक्ष वेळ आली म्हणजे विद्यार्थी किंवा वकीलचसे काय पण समाजांतील सर्व थरांचे लोक आपोआप चळवळींत येऊन पडतात, हें गेल्या युद्धांत सिद्ध झालेंच आहे; याप्रमाणें विरोधाची भूमिका घेऊन, बापूजींना म. गांधींना प्रत्येक सभेंत विरोध करावा लागला. बापूजींचा विरोध, तात्त्विक मुद्यावर असल्यामुळें म. गांधींनामुद्धां, ते कित्येक वेळां निरुत्तर करीत असत, व बापूजींच्या भेदक व तर्कशुद्ध विवेचनाची तारीफ त्यांना करावी लागली होती.

## स्वराज्यपक्षाची स्थापना

असहकारितेचें ध्येय, जोंपर्यंत देशास कायदेभंगास तयार करण्याचें होतें, तोंपर्यंत मतभेद असतांनाहि बापूजींनीं त्या चळवळीस मनोभावें कसें साह्य

केलें, हें वर उल्लेखिलें आहे. पुढें चौरीचौऱ्याच्या दंग्यामुळें, बारडोलीचा बार फुसका ठरला व लौकरच म. गांधींना १२४ अ कलमाखालीं सहा वर्षांची शिक्षा होऊन चळवळीचीं सूत्रें त्यांच्या पट्टशिष्यांच्या हातीं आलीं. कायदेभंग–कमेटीनें सर्व देशभर फिरून, देश कायदेभंगास तयार नाहीं हा निर्णय दिला. कै. देशबंधु दास उमरावती येथें आले असतांना, त्यांनीं बापूजी अणे व त्यांच्या इतर सहकारी मित्रांबरोबर चर्चा करून, उमरावती येथें ता. ६ नोव्हेंबर १९२२ रोजीं, काँग्रेसच्या धोरणांत व कार्यक्रमांत बदल केला पाहिजे व तो कसा केला पाहिजे याचें दिग्दर्शन करणारी जाहीर घोषणा केली. कायदेकौन्सिलांवर काँग्रेसनें बहिष्कार घालून, त्यांचें महत्त्व जरी कमी करून टाकिलें होतें, तरी होयबांना त्यामुळें, तेथें जाण्यास मिळून कौन्सिलवरील बहिष्कार हा जनतेच्या दृष्टीनें निष्फळच ठरला होता. तेव्हां कौन्सिलांत 'शिरून बाहेरच्याप्रमाणें तेथेंहि आम्हांला असहकारिता करूं द्या,' हें कै. देशबंधु दास, पंडित नेहरू, केळकर, बापूजी वगैरेंचें म्हणणें होतें. परंतु इभ्रतीच्या भलत्याच कल्पनेस त्या वेळचे काँग्रेसचे सूत्रधार बळी पडले होते. त्यावेळचें काँग्रेसचें धोरण म्हणजे सरकारशीं प्रतिकारबुद्धीनेंहि संसर्ग होऊ न देणें, हिंदुमुसलमानांचें ऐक्य, खादीप्रसार व अस्पृश्योद्धार करणें हें होतें. प्रतिकार हा शब्दच काँग्रेसच्या कोशांत त्यावेळीं सांपडत नसे. कारण त्यामुळें अहिंसेचें व्रत मोडेल अशी गांधीभक्तांस भीति वाटत होती. बरें या कडक व्रतपालनाचें कायदेभंगाच्या स्वरूपांत कधीं उद्यापन करावयाचें या बाबतींत काँग्रेसनें मौन स्वीकारिलें होतें. अशा परिस्थितींत दासप्रभृतींस काँग्रेसमध्यें राहून काँग्रेसविरुद्ध बंडाचें निशाण रोवावें लागलें. स्वराज्यपक्षाचा वेगळा संसार थाटण्यास महाराष्ट्रानें प्रथमपासूनच कंबर बांधिली होती. कौन्सिलबहिष्काराचें वैय्यर्थ्य जनतेस पटवून देण्याचें कार्य वऱ्हाडांत बापूजींनीं, मध्यप्रांतांत डॉ. मुंजे व बॅ. अभ्यंकर यांनीं व महाराष्ट्रांत दे. भ. तात्यासाहेब केळकर व बॅ. जयकर यांनीं चोख बजाविलें होतें. इतकेंच नव्हे तर अकोला येथें १–१२–१९२१ रोजीं बृहन्महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या प्रांतिक काँग्रेस कमेटीच्या सभासदांची परिषद होऊन काँग्रेसच्या कार्यक्रमांत बदल पाहिजे असें ठरविण्यांत आलें होतें. काँग्रेसनें कौन्सिलप्रवेश आपल्या कडक अटी

स्वीकारून तरी स्वीकारावा असेहि आटोकाट प्रयत्न झाले, पण ते सर्व निष्फळ ठरून गया काँग्रेसमध्यें कौन्सिलप्रवेशाचा ठराव श्री. राजगोपाळाचारियर यांच्या पक्षानें बहुमतानें फेटाळून लाविला, तेव्हां मात्र कै. दासबाबूंच्या पक्षास निरुपायानें काँग्रेसमध्येंच आपला निराळा स्वराज्यपक्ष स्थापन करावा लागला. या पक्षाच्या स्थापनेंत बापूजींनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. कै. देशबंधू दास व कै. पंडित मोतीलाल हे स्वराज्यपक्षाच्या बाबतींत त्यांची नेहमीं सल्ला घेत असत. स्वराज्यपक्षानें लौकरच लोकमत इतकें आपल्या बाजूचें केलें कीं, दिल्ली येथें असहकारितावाद्यांना त्यांच्याशीं समेट करावा लागला. कोकोनाडा येथें भरलेल्या काँग्रेसला कौन्सिलप्रवेशास आपल्या संमतीचें शिक्कामोर्तब द्यावें लागलें.

वऱ्हाडांत स्वराज्यपक्ष स्थापन करून त्याची संघटना करण्याचें कार्य बापूजींवरच अखिल भारतीय स्वराज्यपक्षाच्या मंडळानें सोंपविलें होतें. बापूजींनीं त्याप्रमाणें हा पक्ष वऱ्हाडांत स्थापन केला व त्याचे तेच अध्यक्ष होते. स्वराज्यपक्षाला स्वतंत्र इंग्रजी दैनिक पत्राची फार आवश्यकता वाटू लागली व त्याकरितां कै. देशबंधूंनीं ' फॉरवर्ड ' नांवाचें पत्र काढिलें. त्या पत्राला स्थैर्य प्राप्त व्हावें म्हणून वऱ्हाडमधून स्वराज्यपक्षातर्फे सुमारें सात हजार रुपये बापूजी व तपस्वी बाबासाहेब परांजपे यांनीं जमा करून पाठविले. वऱ्हाडांतून या पक्षाचे प्रांतिक कौन्सिलकरितां उमेदवार उभे करण्यांत आले व ते बहुतेक बहुमतानें निवडून आले. बापूजी त्या पक्षातर्फे असेंब्लीकरितां प्रचंड बहुमतानें निवडून आले. स्वराज्यपक्षाचा कौन्सिलांतील असहकारितेचा कार्यक्रम जसा मध्यप्रांताच्या कौन्सिलांत सोळा आणे यशस्वी झाला, तसा दुसऱ्या कोणत्याहि प्रांतांत झाला नाहीं.

## प्रतिसहकार पक्ष

काँग्रेस कौन्सिलप्रवेशास मुळींच मान्यता देत नाहीं; तेव्हां केवळ संपूर्ण विरोधाकरितां तरी आम्हांस कौन्सिलांत जाऊं द्या, आम्ही दिवाणगिरीसारख्या अधिकाराच्या जागा स्वीकारीत नाहीं, असें राष्ट्रीय सभेंतील कट्टर असहकारितावाद्यांच्या समजुतीकरितां महाराष्ट्रीय टिळकपक्षास कबूल

करावें लागलें होतें. नुसत्या विरोधानें सरकार वठणीस येत नाहीं व लोकांस जाचणारे प्रश्नहि सरकारला स्वतःच्या मतानें लोकप्रतिनिधीस धाब्यावर बसवून निकालांत काढतां येतात. अशा परिस्थितींत अधिकाराच्या जागाहि स्वीकारून साधेल तें लोकहित व पडेल तो विरोध करून पाहणें हा स्वराज्य-पक्षाच्या कार्यक्रमांतून उपसिद्धांतच निघत होता. नुसत्या विरोधाचें वैय्यर्थ स्वराज्यपक्षीयांस पहिल्या वर्षाच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं पटूं लागलें होतें व त्याप्रमाणें हळूहळू धोरणांतहि बदल पडूं लागला होता. स्कीन कमेटीवर पं. मोतीलाल नेहरू जाऊन बसले होते; इतर कमेटयांवरहि स्वराज्यपक्षीय सभासद काम करीत होते. व असेंब्लीच्या अध्यक्षपदावर श्री. विठ्ठलभाई पटेलांची योजना झाली होती.स्वराज्यपक्षाच्या कार्यकारी मंडळांत सध्यां स्वराज्यपक्षाचें धोरण प्रतियोगी सहकारितेचें आहे किंवा स्वराज्यपक्षीयांनीं सर्व जबाबदारीच्या जागा स्वीकाराव्या अशा आशयाचे ठरावहि त्यांपैकीं कांहीं सभासदांनीं आणले होते.परंतु तशी हळूहळू कृति घडत असतांनाहि ते फेटाळले गेले. पं. मोतीलाल नेहरू यांचा ‘ हें आमचें धोरणच नव्हे ’ असा आग्रह दिसूं लागला, तेव्हां श्री. केळकर, जयकर, मुंजे, अणे यांना प्रतियोगी सहकारिता हें धोरणच बरोबर आहे व तेंच तुम्ही आजपर्यंत आचरत आलां आहांत, हें दाखविण्याकरितां पंडित मोतीलाल नेहरूंशीं विरोध करणें भाग पडलें. या काळांत व्याख्यानांतून वैयक्तिक हल्ले व व्यक्तिद्वेषाचें प्रदर्शन करणें हें नित्याचें होऊन बसलें होतें. पं. मोतीलाल यांचा पाठपुरावा करण्यास कॉंग्रेसहि सज्ज झाली होती. अशा अडचणीच्या काळांत स्वतःचें मत जनतेस पटवून देणें अत्यंत दुष्कर असतें. परंतु बापूजींच्या या वेळच्या व्याख्यानांतून उलटपक्षास प्रत्युत्तर म्हणूनदेखील या शिवराळ पद्धतीचा अवलंब केल्याचें दिसून येत नाहीं. समोर उभ्या असलेल्या प्रतिपक्षीयांचें धोरण व देशसेवा उदारमतानें कबूल करूनहि त्याचा आमचा तात्त्विक विरोध कोठें आहे, हें दाखवून आपली बाजू लोकांना पटवून देण्याचें कार्य बापूजींनीं अत्यंत कुशलतेनें पार पाडलें,असें त्यांनीं त्यावेळीं दिलेल्या व्याख्यानावरून दिसून येतें. मतभेद ओसरून दिलजमाई व्हावी याबद्दल किती शिकस्तीची खटपट यावेळींहि

झाली हें बापूजींचा " साबरमतीचा करार " या विषयावरील व्याख्यानांत पाहावयास मिळतें.

प्रतिसहकार पक्षाची स्थापना करण्याकरितां बृहन्महाराष्ट्रांतील प्रतिसहकारवाद्यांची परिषद बॅ. जयकर यांच्या अध्यक्षतेखालीं अकोला येथें १४ व १५ फेब्रुवारी १९२६ या दिवशीं होऊन प्रतिसहकार पक्ष स्थापन झाला. या पक्षाचा कार्यक्रम काँग्रेस डे. पार्टीच्या धोरणानुसार योग्य तो फेरबदल करून ठरविण्याकरितां जी एक कमिटी नेमली होती, तींत बापूजींचा समावेश करण्यांत आला होता. वऱ्हाड प्रांतांतील प्रतिसहकारपक्षाचे बापूजी हेच अध्यक्ष होते. स्वराज्यपक्षातर्फे असेंब्ली व कौन्सिलमध्यें निवडून गेलेले सभासद यांनीं कायदेमंडळांतील आपल्या जागांचा राजिनामा दिला व पुढें कौन्सिलच्या त्रैवार्षिक निवडणुकीकरितां, वऱ्हाडांतून प्रतिसहकारपक्षीय उमेदवार उभे करण्यांत आले होते. बापूजीहि असेंब्लीकरितां प्रतिसहकारपक्षातर्फे अविरोध निवडून आले.

मध्यप्रांताच्या नवीन कौन्सिलांत, स्वराज्यपक्षीय सभासदांचा दिवाणगिरी स्थापन करण्यास विरोध असतांनाहि प्र. स. पक्ष व इन्डिपेंडंट कांग्रेस पक्ष यांचें सहकार्य घडवून आणून दिवाणगिऱ्या स्थापन होण्याकरितां बापूजींनीं बरीच खटपट केली व तिला यश येऊन ना. राव व रामराव देशमुख हे दिवाण झाले.

## असेंब्लींतील कामगिरी

१९२६ सालच्या निवडणुकीनंतर कै. दे. भ. लाला लजपतराय व पं. मदनमोहन मालवीय यांच्या खटपटीमुळें, असेंब्लींतहि एक राष्ट्रीय पक्ष स्थापन झाला, व त्याचे चिटणीस म्हणून बापूजी नेमिले गेले. स्वराज्यपक्षातर्फेहि असेंब्लींत असतांना बापूजी त्या पक्षाचे 'प्रतोद' होते. सरकारला विरोध करण्याच्या बाबतींत कै. पं. मोतीलाल यांचा स्वराज्यपक्ष व राष्ट्रीय पक्ष हे एक होत असत, त्यामुळें सरकारास विरोध करणारा असा ६०|७० मंडळींचा एक गट निर्माण झाला.

यावेळीं बापूजींच्या हातून किती काम झालें व तें किती विविध स्वरूपाचें होतें हें त्यांच्या असेंब्लींतील भाषणावरून कळून येईलच. शारदा बिलसंबंधीं त्यांचा बऱ्याच सहकारी मित्रांबरोबर विरोध झाला. असेंब्लीतील रेल्वे फिनॅन्स कमेटीवर बापूजींनीं बरेच दिवस काम केलें. त्या कमिटीचे सभासद असतांना रेल्वे यूनियनचीं गाऱ्हाणीं दूर करण्याचे त्यांनीं बरेच प्रयत्न केले. रिझर्व्ह बिल असेंब्लीसमोर वादविवादास मांडिलें असतांना बापूजींनीं हें बिल यावेळीं सरकारास आणतां येत नाहीं, कारण यापूर्वीं अशाच तऱ्हेचें एक बिल सरकारनें असेंब्लीपुढें मांडिलें होतें; त्याचा अजून निर्णय लागावयाचा आहे असा एक मुद्दा उपस्थित केला व अध्यक्ष श्री. विठ्ठलभाई पटेल यांनीं बापूजींच्या तर्फे निर्णय देऊन, हिंदुस्थानच्या आर्थिक हितसंबंधीं विरुद्ध असलेलें तें बिल फेटाळून दिलें.

## सायमन् कमिशन व नेहरू रिपोर्ट

१९२८ सालीं हिंदुस्थानच्या राज्यघटनेचा फेरविचार करण्यासाठीं सायमन कमिशन नेमिलें गेलें. स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाविरुद्ध म्हणून राष्ट्रीय पक्षानें व त्यांतहि हिंदी गृहस्थाची नेमणूक केली नाहीं म्हणून नेमस्तपक्षानें या कमिशनवर बहिष्कार पुकारला व तो सर्व राष्ट्रानें उचलून धरिला. स्वार्थी जातिहिततत्पर लोकांशिवाय या कमिशनपुढें कोणीहि साक्ष देण्याकरितां गेले नाहींत. ही चळवळहि बापूजींनींच आपल्या प्रांतांत यशस्वी करून दाखविली. अकोला येथें भरलेल्या वऱ्हाड सर्वपक्षीय परिषदेचे व नागपूरच्या मध्यप्रांत–वऱ्हाड सर्वपक्षीय परिषदेचे बापूजी अध्यक्ष होते. इतर प्रांतांत कमिशनबरोबर सहकार्य करण्याकरितां, प्रांतिक कौन्सिलांतून कमिट्या नेमिल्या गेल्या, परंतु मध्यप्रांत कौन्सिलांत ती नेमली गेली नाहीं याचें, बरेंच श्रेय बापूजींकडे येतें.

बर्कन् हेड् साहेबांच्या आव्हानास उत्तर म्हणून व स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाप्रमाणें राष्ट्रास कोणती राज्यघटना पसंत आहे हें दाखविण्याकरितां कॉंग्रेसने परिषद भरविली होती. त्यांत असें ठरलें की, हिंदुस्थानच्या अखिल जनतेस पसंत पडेल अशी राज्यघटना तयार करण्याकरितां कै. पं. मोतीलाल नेहरू

यांच्या अध्यक्षतेखालीं एक निरनिराळ्या पक्षांतील व जातींतील प्रमुख माणसांची कमिटी नेमली जावी. या कमिटीवर बापूजींची नेमणूक झाली होती. प्रसिद्ध नेहरू रिपोर्ट लिहिण्यांत बापूजींनीं बराच भाग घेतला होता. जगांत निरनिराळ्या देशांत प्रचलित असलेल्या सर्व राज्यघटनांचा बापूजींनीं सूक्ष्म अभ्यास केलेला असल्यामुळें झालेल्या चर्चेत व रिपोर्ट लिहिण्यांत त्यांनीं कै. पं. मोतीलाल यांना फार मदत केली व त्यामुळें त्यांचे व पंडितजींचे फारच जिव्हाळ्याचे संबंध उत्पन्न झाले.

## काँग्रेसचा अभिमान

बापूजींना काँग्रेसचा फार अभिमान आहे. काँग्रेसच्या कांहीं गोष्टींशीं जरी त्यांचा विरोध असला, तरी त्यांनीं काँग्रेसच्या आज्ञांचें परिपालन अत्यंत कसोटीनें केलें आहे. १९२० सालीं त्यांच्या अंगावर चढलेली खादी अजून कायम आहे. खादीच्या आगमनामुळें शिरावरच्या पुणेरी पगडीचें मात्र त्यांनीं उच्चाटण केलें नाहीं. असहकारितेच्या काळांत त्यांनीं पगडी टाकून शुभ्र खादीची टोपी घालावी, म्हणून देवी सरोजिनी नायडू यांनीं फार प्रयत्न केले. बापूजींचें त्यांना एकच म्हणणें असे कीं, पगडीला सोयीस्कर अशी खादी मिळवून द्या, मी तिची पगडी बांधवून घालीत जाईन. देवी सरोजिनी यांनीं पुढें त्यांना बनारसचें रेशमी कापड पाठविलें होतें, त्याची त्यांनीं पगडी बांधवून घेतली होती. खादीच्या पगड्या मिळूं लागल्यापासून ते त्या वापरूं लागले आहेत. असहकारितेच्या काळांत काँग्रेसबरोबर विरोध करतांनाहि वैयक्तिक दृष्ट्या काँग्रेसच्या सर्व आज्ञांचें त्यांनीं परिपालन केलें होतें. प्रथम आज्ञापालन व मागाहून तक्रार अशी त्यांची काँग्रेसबरोबर भांडतांना रीत असल्यामुळें त्यांच्या विरोधास जास्त महत्त्व येतें. नवीन घटनेप्रमाणें वऱ्हाड प्रांतास प्रां. काँ. कमिटी मिळाल्यापासून १९३० पर्यंत बापूजी हेच तिचे अध्यक्ष होते. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचेहि ते पुष्कळ वर्षांपासून सभासद आहेत. लाहोर काँग्रेसनें पूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय स्वीकारल्यानंतर पं. जवाहिरलाल यांनीं 'काँग्रेसच्या अधिकाऱ्यांनीं ते कायदेमंडळांत असल्यास कायदे मंडळाचा राजिनामा तरी द्यावा, किंवा काँग्रेसमधील अधिकाराची जागा तरी सोडावी' असे जव्हां

फर्मान सोडिलें तेव्हां बापूजींनीं प्रां. कॉं. कमिटीच्या अध्यक्षत्वाचा राजीनामा दिला.

## सत्याग्रहांत उडी

कौन्सिलाविषयीं आरंभापासून बापूजींची कोणती वृत्ति होती याचें आम्ही मागें दिग्दर्शन केलेंच आहे. याच वृत्तीनें कायदेभंगाच्या कार्यक्रमास प्रत्यक्ष सुरुवात होईपर्यंत ते असेंब्लींत बसले होते, परंतु महात्मा गांधींनीं दांडी येथें मिठाचा सत्याग्रह सुरू केल्याबरोबर त्यांचें असेंब्लीच्या कामांतून लक्ष उडालें व अखेर असेंब्लीचा राजीनामा देऊन त प्रा. यु. मं. च अध्यक्ष वीर वामनराव जोशी यांच्या स्वराज्यसेनेंत एक साधा स्वयंसैनिक म्हणून दाखल झाले. वीर वामनरावांनीं त्यांची योग्यता जाणून त्यांना आपल्या प्रधान मंडळाचे एक सभासद म्हणून लगेच नेमून घेतलें.

बापूजी सत्याग्रहांत कां पडले याचें विवेचन करण्यापेक्षां आम्ही या संबंधीचे त्यांचेच विचार अगदीं अलीकडील एका लेखांत प्रगट झालेले आहेत ते त्यांच्याच शब्दांत उद्धृत करितों.

" ज्या भावनेनें लोकमान्य टिळकांच्या शिकवणुकीनें सार्वजनिक कार्यांत आम्ही पडलों व गेलीं २५।३० वर्षे यथाशक्ति तीं करण्याचा उद्योग केला, त्या भावनेचें उद्दिष्ट सर्व देशानें पारतंत्र्याच्या शृंखला तोडून टाकण्यासाठीं –स्वातंत्र्यप्राप्तीकरितां सामुदायिक निकराचा हल्ला या सत्तेवर चढविलाच पाहिजे हेंच होतें. तेव्हां अहिंसात्मक मार्गानें हा हल्ला चढविण्याचें शिंग महात्मा गांधींसारख्या एका थोर विभूतीनें फुंकलेलें कानीं पडतांच आम्हांला आमची भावनाच आमच्या अन्य व्यवसायाच्या स्थानावरून ओढून रणांगणाचा मार्ग दाखवूं लागली व तिला वश होऊन आम्ही आमच्याकडे सोंपविलेली कामगिरी यथाशक्ति पार पाडण्यास झटलों. "

बापूजी गेल्या युद्धांत सामील झाले त्यावेळीं वऱ्हाडांत मिठाचा सत्याग्रह व जप्त झालेल्या वाङ्मयाचें वाचन या स्वरूपांत सरकारबरोबर युद्ध सुरूं होतें. परंतु समुद्र जवळ नसल्यामुळें दहिहांडा येथील खाऱ्या विहिरीच्या पाण्याचेंच मीठ करावें लागे व त्यांत सरकारचें तादृश नुकसान होत नसे.

जप्त वाङ्मयवाचनानेंहि सर माँटेग्यू बटलरसारख्या थंड मुत्सद्याचें डोकें फिरलें नाहीं. त्यामुळें सरकारबरोबर आरंभलेल्या युद्धांत धरपकडीनें जो जोम भरावयाचा तो भरत नसे. तो कोणत्या उपायानें उत्पन्न करावा या-संबंधीं प्रां. यु. मंडळाचे अधिकारी विवंचनेंत पडले होते. बापूजींनीं जंगल सत्याग्रहाचा मार्ग दाखवून असें सिद्ध केलें कीं, मध्यप्रांत सरकार हा वनचर प्राणी आहे. व त्याच्याशीं झुंज ध्यायची म्हणजे युद्धमंडळास आपले मोर्चे जंगलाकडे फिरविले पाहिजेत. रानांतलें जनावर गांवांतील जप्तवाङ्मय वाचनाच्या गोंगाटानें किंवा पुडीभर मीठ फेकल्यानें कसें चवताळणार?

बापूजींच्या डि. असोसिएशननें जंगलच्या प्रश्नांचा अभ्यास त्यांच्या नेतृत्वाखालीं बरेच दिवसापासून चालविला होता. प्रत्येक परि-षदेंत जंगलच्या तक्रारी मांडण्यांत येत असत. मध्यप्रांत कौन्सिलांतील सभासदांच्या खटपटीनें फॉरेस्ट कमिटी नेमल्यावर सत्याग्रहाच्या पूर्वी दोन तीन महिने जिल्ह्यांतील रयतेच्या जंगलसंबंधींच्या तक्रारी जंगल परिषदांच्या द्वारें मांडण्याचा उपक्रम सुरू होताच. यावेळीं असोसिएशननें बापूजी अणे, रा. दत्तात्रय कृष्ण काणे ऊर्फ दादासाहेब, रामभाऊ जोशी व काशिनाथ रामचंद्र ऊर्फ बापुराव बापट यांची एक कमिटी नेमून जिल्ह्यांत या चळव-ळीस पाठबळ मिळेल किंवा नाहीं व जंगलचा कायदेभंग कोणत्या स्वरूपांत करावा याची चौकशी केली व प्रां. यु. मंडळास आपल्या सहकार्याचें आश्वा-सन देऊन त्यांनीं हा जंगल कादेभंगाचा प्रश्न हातीं घ्यावा अशी शिफारस केली. प्रांतिक यु. मंडळानें या शिफारशीप्रमाणें जंगल कायदेभंग करण्याचें ठरविलें व त्या विषयींचे सर्व अधिकार बापूजींना देऊन टाकले.

यानंतर बापूजींनीं सबंध प्रांतभर दोन महिन्यांचा दौरा काढून या प्रश्ना-संबधीं लोकांत उत्साह व जागृति उत्पन्न केली. त्यामुळें सरकारनें चिडून जाऊन प्रांतिक युद्धमंडळाचे अध्यक्ष वीर वामनराव यांस १२४ अ कलमा-खालीं अटक करून वऱ्हाडांत दडपशाहीस आरंभ केला. वीर वामनराव याना २ वर्षांची कैद झाली. कैदेंत जातांना त्यांनीं बापूजींना सर्वाधिकारी नेमलें. बापूजींच्या धोरणामुळें वऱ्हाडांत असहकारितावादी व प्रतिसहकार-

वादी या दोन सघटित शक्तींच्या प्रवाहांचा संगम झाला व त्यामुळे या युद्धाच्या पूर्व तयारीला बराच रंग चढला.

## ' स्वराज्याची पंढरी '

यवतमाळ जिल्ह्यांतील पुसद गांवाला लोकमान्यांनीं आपल्या १९१८ सालच्या प्रसिद्ध दौऱ्यांत 'स्वराज्याची पंढरी' म्हणून नामाभिधान दिलें होते. याच गांवीं १० जुलई १९३० रोजीं प्रांतिक युद्धमंडळातर्फे बापूजी हे गुरु-पौर्णिमेच्या मुहूर्तानें जंगलसत्याग्रह करणार असें जाहीर झालें. जुलै १० च्या आधींच एक आठवडाभर पुसद गांव हें स्वराज्यभक्तांनीं फुलून गेलें होतें. वऱ्हाडांतील सर्व प्रमुख पुढारी, नागपूरचे डॉ. मुंजे व इतर पुढारी व महाराष्ट्रांतील कार्यकर्ते हा सत्याग्रह पाहण्याकरितां व आपल्या भागांत तसाच कायदेभंग सुरू करतां यावा म्हणून पुसदला आले होते. ठिकठिकाणचे स्वयंसेवकहि जंगलच्या कायदेभंगांत भाग घेण्याकरितां तेथें येऊन बसले होते. ठरलेल्या दिवशीं सुप्रभातीं ठरलेल्या वेळीं बापूजींनीं पुसद गांवापासून ८ मैलांवर असलेल्या सरकारी जंगलांत त्यांना नजर करण्यांत आलेल्या चांदीच्या विळ्यानें गवत कापून कायदेभंग केला.

## वऱ्हाडचे बापूजी लोकनायक झाले

गुजराथच्या बापूजींनीं मिठाचा कायदेभंग करण्याची कल्पना काढून प्रथम दांडी येथें मिठाचा कायदा मोडला; त्याप्रमाणेंच सर्व हिंदुस्थानांत जंगलचा कायदेभंग करण्याचा पहिला मान वऱ्हाडच्या बापूजींनीं मिळविला आहे. असो. बापूजींची बुद्धिमत्ता, तीव्र देशभक्ति, अलोट स्वार्थत्याग आणि विमल चारित्र्य या गुणांमुळें वऱ्हाड–मध्यप्रांतांतील लोकांची त्यांच्यावर फार भक्ति आहे. जनतेच्या प्रीतींतील या देशभक्तावर इं. पी. कोड ३७९ कलमाखालीं म्हणजे चोरीच्या गुन्ह्याखालीं खटला होऊन त्याच दिवशीं त्यांना यवतमाळच्या तुरुंगामध्यें आणण्यांत आलें. बापूजींस यवतमाळ तुरुंगामध्यें आणलें हें कळल्याबरोबर यवतमाळचे हजारो नागरिक तुरुंगाच्या आवाराभोंवतीं जमा होऊन आम्हाला बापूजींचें दर्शन मिळालेंच पाहिजे, त्याशिवाय आम्ही येथून हलणार नाहीं असा आग्रह धरून बसले. तेव्हां उदईक त्यांचें

दर्शन घडवून आणण्याची खटपट करूं असें गांवांतील वजनदार पुढाऱ्यांनीं आश्वासन दिल्यावरून लोक परतले. दुसरे दिवशीं म्हणजे ११ तारखेला सकाळीं रा. जतकर वगैरे पुढाऱ्यांनीं तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना भेटून तुरुंगाच्या गजाच्या दारांतून बापूजींचें दर्शन करून देण्याची व्यवस्था केली. याप्रमाणें दर्शन घेण्यास यवतमाळांतील ८–१० हजार जनसमुदाय तुरुंगासमोर जमला होता.

बापूजी तुरुंगांत गेल्यावर सर्व प्रांतभर जंगल कायदेभंगाची प्रचंड वावटळ उठून कांहीं महिने प्रांतिक सरकार स्तिमित होऊन गेलें. बापूजींच्या यवतमाळ जिल्ह्यानेंहि कायदेभंगाचा कार्यक्रम शिस्तीनें व चिकाटीनें सतत ३ महिने अभिमानास्पद रीतीनें चालविला.

कॉंग्रेसच्या वर्किंग कमेटीनें ता. ५।८।१९३० रोजीं बापूजींच्या या नवीन तऱ्हेच्या कायदेभंगाबद्दल त्यांचें अभिनंदन केले. तसेंच असेंब्लीचे माजी अध्यक्ष श्री. विठ्ठलभाई पटेल यांनीं बापूजींच्या आवडत्या वऱ्हाडास प्रोत्साहनपर संदेश पाठविला.असेंब्लीमधील शेवटल्या शेवटल्या काळांत बापूजींचा व विठ्ठलभाईंचा इतका स्नेहसंबंध जडला होता कीं,असेंब्लींतील कामाकाजासंबंधीं रात्रीं ११–११ वाजेपर्यंत टेलीफोनवर बोलूनदेखील शेवटीं महत्त्वाच्या सल्लामसलतीकरितां ते त्यांना आपल्या बंगल्यावर बोलावून घेत असत.

यवतमाळ तुरुंगामधून ७।८ दिवसांतच बापूजींना शिवनी तुरुंगामध्यें नेलें. तेथें त्यांना वीर वामनराव, बॅ. अभ्यंकर व श्री. रविशंकर शुक्ल या देशभक्तांच्या संगतींत ए क्लासमध्यें ठेवण्यांत आलें होतें. तेथें असतांना त्यांनीं आपल्या आवडत्या महाभारत ग्रंथाचें परिशीलन केलें असून कांहीं टिपणेंहि करून ठेवलीं आहेत. महाभारतावर ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा विचार आहे. परंतु तो केव्हां फलद्रूप होईल तो खरा.

बापूजींनीं जंगलचा कायदा मोडला तेव्हांपासून वऱ्हाडच्या जनतेनें त्यांना 'लोकनायक' ही पदवी सहज स्फूर्तीनें अर्पण केली आहे.

## सुटून आल्यावर

सहा महिन्यांची शिक्षा पूर्ण भोगून बापूजी हे ता. १० जानेवारी १९३१ रोजीं सुटले व ते तसेच आपल्या वृद्ध मातोश्रीस भेटावयास वणीस गेले.नंतर

सर्व वऱ्हाडभर त्यांना मानपत्रें देण्यांत येऊन त्यांचा यथायोग्य गौरव झाला. थोड्याच दिवसांनीं महात्माजी व इतर राजकीय पुढारी यांना बंधमुक्त करण्यांत आलें व दिल्ली येथें समेटाची चर्चा महात्मा गांधी व लार्ड आयर्विन यांच्यामध्यें सुरू झाली. कॉंग्रेस वर्किंग कमेटीचे सभासद महात्माजींना सल्ला देण्याकरितां बसलेच होते. परंतु महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या सांगण्यावरून दे. भ. जमनालाल बजाज यांनीं खास तार करून बापूजींस दिल्लीस बोलावून घेतलें होतें. तेथें बापूजींच्या कुशाग्र राजकारणी बुद्धीचा निरनिराळे गुंतागुतीचे प्रश्न सोडविण्यांत महात्माजींना फार उपयोग झाला. महात्माजींना यावेळीं बापूजींच्या कर्तृत्वाचा जो परिचय झाला त्याचा परिणाम असा झाला कीं, पुढें कराची कॉंग्रेसनंतर कॉंग्रेसच्या वर्किंग कमेटीवर त्यांना नेमण्यांत आलें. यावेळीं आजच्या काळांत कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटींत नेमणूक होणें म्हणजे इंग्लंडांतील प्रधान मंडळांत जाऊन बसण्याच्या योग्यतेचें आहे.

कराची कॉंग्रेसला गेले असतांना त्यांच्या पश्चात् वणी येथें बापूजींच्या वृद्ध मातोश्री निवर्तल्या.

बापूजींच्या कार्याचा गौरव केवळ वऱ्हाड-नागपूर प्रांतांतच झाला नसून अखिल महाराष्ट्रांतहि तो तसा झाला. महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमेटीनें त्यांचा दौरा काढून त्यांचीं ठिकठिकाणीं व्याख्यानें करविलीं. पुणें येथें होत असलेली वसंत व्याख्यान माला बापूजींच्या व्याख्यानानेंच चालू वर्षी सुरू करण्यांत आली. याशिवाय सातारा जिल्हा परिषदेच्या मसूर येथील अधिवेशनाचे व सोलापूरच्या जिल्हा परिषदेचे ते अध्यक्ष निवडले गेले होते.

बंगालमधील कॉंग्रेस निवडणुकीच्या तंट्याचा निकाल देण्याकरितां उभय पक्षाच्या संमतीनें बापूजींना पंच म्हणून नेमण्यांत आलें होतें. परंतु पुढें डॉ. सेनगुप्त व श्री. सुभाषचंद्र बोस यांची आपापसांत समजूत झाली. अशी समजूत घडून येण्याला बापूजींचे प्रयत्न बरेचसे कारणीभूत झाले. यापुढें बंगाल प्रांतांतील होणाऱ्या निवडणुकी बापूजींच्याच देखरेखीखालीं होणार आहेत.

## वऱ्हाडचा प्रश्न

सार्वभौम सरकार व निजाम यांच्या वऱ्हाडविषयक १९०२मध्यें झालेल्या तहानंतर, ही वऱ्हाडची गाय मध्यप्रांताच्या खुंट्याला बांधिली गेली! वस्तुतः निजामचा वऱ्हाडवरील ताबा यापुढें नाहींसा झाला, पण वऱ्हाड-वरील हिंदुस्थानसरकारच्या परराष्ट्रीय खात्याचें नियंत्रण कायमच राहिलें, व धड ना संस्थानी मुलूख व धड ना निर्भेळ खालसा प्रांत अशी वऱ्हाडची विचित्र अवस्था झाली. इकडे वऱ्हाडची मध्यप्रांताशीं सांगड घातली गेल्यामुळें, दुसऱ्याला पहिल्याच्या उत्पन्नावर यथेच्छ चरावयाला सांपडूं लागलें! याचा भोगांत हल्लींच्या निजामाला वऱ्हाडप्रांत पुनः आपल्या सत्तेच्या भोंवऱ्यांत गरगरत राहावा अशी लहर येऊन, त्याप्रमाणें त्यांनीं लॉर्ड रेडिंग व्हॉइसरॉय होते, त्यावेळेपासून या दिशेनें खटपट चालू केली आणि गोलमेजपरिषदेच्या लंडनमधील दुसऱ्या अधिवेशनाच्या वेळीं तर एतद्विषयक प्रयत्नांना यशाचा मोहोर फुटण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. अर्थात् भावी राज्यघटनेंत हिंदुस्थानच्या इतर घटकावयवाप्रमाणेंच वऱ्हाडलाहि स्वतंत्र अस्तित्व व दर्जा प्राप्त करून देणें, व वऱ्हाडचा ओघळलेला रत्न-मणि, परत आपल्या माळेंत ओंवूं पाहण्याच्या निजामाच्या खटाटोपाला हाणून पाडणें, अशीं दुहेरी कामें हातीं घेणें वऱ्हाडच्या पुढाऱ्यांना भाग पडलें. त्याकरितां वऱ्हाडच्या सर्वपक्षीय परिषदेनें जी एक कार्यकारी कमिटी नेमिली आहे, तिच्या अध्यक्षत्वाची मानाची सुपारी बापूजींनाच मिळाली. आणि याप्रमाणें बापूजींनीं, आपल्या नेहेमींच्या धडाडीला अनुसरून या महत्त्वाच्या प्रश्नाला, लोकमतास धरून धसास लावण्याचा प्रयत्न चालविलेला आहे.

## व्यक्तिविषयक कर्मनिष्ठा

बापूजींची राहणी अत्यंत साधी व धार्मिक अशी आहे. प्रवासांतहि ते संध्यावंदन कधीं चुकूं देत नाहींत. दौऱ्यांत एखाद्या गांवीं, ते अपरात्रीं पोहोंचले तरी आपली अंतरिज्य सायंसंध्या उरकल्याशिवाय ते निजत नाहींत. यवतमाळांत बापूजी असले म्हणजे त्यांचें श्रीकेदारेश्वराचें दर्शन कधींहि चुकत नाहीं. प्रवासांत ते ज्यांच्या घरीं उतरले असतील त्यांच्या देवायतनांतील

बाणलिंगावर बेलाचें पान किंवा अक्षता वाहिल्याशिवाय ते जेवण्यास बसत नाहींत. तसेंच भोजनप्रसंग एखाद्या आचारशील जुन्या वळणाच्या गृहस्थाकडे असो, सोवळेंओवळें झूट समजणाऱ्या एखाद्या सुधारकाकडे असो, किंवा कॉंग्रेसच्या सभामंडपांतील सहभोजनाचा असो, बापूजी कद नेसल्याशिवाय कधींच जेवावयास बसावयाचे नाहींत. श्रावणी करण्यास जर भिक्षुक मिळाला नाहीं तर स्वतः पोथीवरून बापूजी श्रावणी करतात. स्वतःच्या आचारांविषयीं धर्मशास्त्राप्रमाणें इतके कडक निर्बंध पाळूनहि, इतर लोक तसे वागत नाहींत म्हणून त्यांच्याविषयीं तिरस्कार किंवा उपहासबुद्धि दाखविण्याची, जी साधारण कर्मठ माणसांत वृत्ति असते तिचा लवलेशहि बापूजींच्या अंगीं नाहीं.

ज्या धार्मिक आचारांची आज कर्मठपणा या सदरांत गणना होते, त्या आचारांसंबंधीं बापूजींचें असें मत आहे कीं, धर्माची जी 'धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा,' म्हणून आपल्या धर्मग्रंथांत व्याख्या केली आहे तींत उल्लेखिलेल्या जगाची म्हणजेच मानवी समाजाची प्रतिष्ठा कोणत्या वागणुकीमुळें होईल याचा विचार करूनच आपल्या पूर्वजांनीं हा आचारधर्म बसविला आहे, व त्यांत उपदेशिलेलीं कर्में कशीं करावींत याची पूर्ण तपशीलवार माहिती दिलेली आहे. हा आचारधर्म समाजांत रूढ झाल्याच्या योगानें समाजांत एकप्रकारची शिस्त, वक्तशीरपणा, संकल्पित कर्मासाठीं लागणाऱ्या वस्तूंची तपशीलवार जमवाजमव करण्याची आग्रहबुद्धि व संपादित द्रव्याची कामांच्या सोयीप्रमाणें पद्धतशीर मांडणी वगैरे समाजधारणेस अत्यंत उपयुक्त अशा गुणांचा परिपोष बहुजनसमाजांत होऊन तो समाज इतर बाबतींतहि कार्यक्षम होतो. कर्मविस्ताराबरोबरच आपत्कालीं कर्मसंक्षेप कसा करावा याचेंहि एक आपत्धर्म या सदराखालीं शास्त्र उत्पन्न केल्यामुळें हा आचारधर्म समाजास जाचक न होण्याची खबरदारी शास्त्रकारांनीं घेतली आहे. समाजाच्या बदलल्या परिस्थितींत तीं कर्में समाजाच्या प्रतिष्ठेस कारणीभूत होतील असें नाहीं. परंतु कालानुसार त्याच योग्यतेचें असें दुसरें कर्मकांड उत्पन्न होईपर्यंत समाजांत या संबधीं कायमच्या राहाव्यात म्हणून तरी हे आचार, अत्यंत श्रद्धापूर्वक प्रत्येक व्यक्तीनें पाळले पाहिजेत. 'यज्ञ' संस्थेसंबंधीं एक

ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा फार दिवसांपासून विचार आहे. धार्मिक बाबतींत वणी येथील सत्पुरुष श्री अप्पाजी महाराज यांचें ध्येय बापूजींनीं आपल्या डोळ्यासमोर ठेविलें आहे असें त्यांच्या आचरणावरून दिसून येतें.

## संभाषण व वर्तनांतील ऋजुता

बापूजींच्या भाषणांत मार्मिक विनोद भरलेला असतो, व आपल्या भाषण-चातुर्यानें व चतुरस्रपणामुळें ते लोकांवर नेहमीं आपली छाप ठेवितात. त्यामुळें आबालवृद्धांनाहि त्यांच्याजवळ जाऊन घटकाभर बोलत बसावेंसें वाटतें व बैठक संपल्यानंतर आपण बापूजींपासून कांहीं नवीन शिकलों या आनंदांत ते घरीं जातात. कितीहि विरोध उत्पन्न झाला तरी विरोधाचा विषय संपल्याबरोबर त्या व्यक्तीबरोबर पूर्ववत् प्रेमानें व ऋजुतेनें वागाव-याचें असें अजातशत्रुत्व बापूजींच्या वागणुकींत नेहेमीं दिसून येतें. त्यामुळें विपक्षीय व स्वपक्षीय लोकांच्या मनांत बापूजींच्याविषयीं अतिशय आदर व प्रेम असतें. या त्यांच्या वर्तनांतील खुबीमुळेंच महात्मा गांधींसारख्या थोर व्यक्तीसहि यवतमाळांत आल्याबरोबर 'मेरा भाई अने यहां नहीं है' याबद्दल विषाद वाटतो व पंडित मालवीयजींसारख्या बापूजींशीं सहमत असलेल्या वयोवृद्ध अनुभवी पुढाऱ्यासहि 'हम क्या है ? जो कुछ है सो तुमारे बापूजी है ! वोही संकटमे हम् लोगोकू मार्ग बतलाते है !' अशी त्यांची बैठकीच्या गप्पांत व व्यासपीठावरूनहि मुक्तकंठानें तारीफ करा-वीशी वाटते.

## प्रवासी बापूजी

बापूजींचें अर्धेअधिक आयुष्य आगगाडीच्या डब्यांत, किंवा मोटारीमध्यें अथवा बैलगाडींत गेलें आहे असें जर कोणी विधान केलें, तर त्यांत अति-शयोक्तीपेक्षां वस्तुस्थितीचाच जास्त भाग आहे असें निःसंशय म्हणतां येईल. बापूजींना "प्रवासी बापूजी" असें संबोधिलें तर तें मुळींच चुकीचें ठरणार नाहीं. यवतमाळांत बापूजी फार थोडे राहतात. आज बापूजी गांवांत दिसतात तर चार दोन दिवसांनीं कोणत्या तरी दूरच्या ठिकाणीं निघून गेले, अशी बातमी कळते. कधीं कधीं तर त्यांच्या येण्याजाण्याची बातमी एकाच दिवशीं एकसमयावच्छेदानें ऐकण्याचा प्रसंग येतो. आज मुंबईत तर उद्यां

कलकत्ता, तर परवां दिल्ली, असा त्यांचा नेहमीं कामानिमित्त प्रवास चाल-लेला असतो. जिल्ह्याच्या अगर प्रांताच्या कामानिमित्त,ते भर उन्हाळ्यांतहि दौरे काढीत असतात. जंगलसत्याग्रहाच्या व्याख्यानांची मोहीम त्यांनीं उन्हाळ्यांतच काढिली होती. सतत प्रवासामुळें बापूजींच्या वृत्तींत तितीक्षा हा गुण पूर्णपणें उतरला आहे. त्यांचें कोणत्याच गोष्टीवाचून अडत नाहीं. पूर्वीं त्यांना विडा खाण्याची संवय होती, परंतु ती त्यांनीं आपल्या प्रिय पत्नीच्या मृत्यूनंतर सोडून दिली. शिवणी जेलमध्यें त्यांनीं आपल्या आवडत्या सुपारीचा व तंबाखूचाहि त्याग केला होता.जुजबी चार कपडे व संध्या-वंदनाचीं उपकरणीं व कामाचे कागद यांनीं भरलेली एक लहानशी पेटी, पगडीचा डबा व एक प्रवाशी बिछाना या सरंजामावर बापूजी महिनेचे महिने काढूं शकतात. सार्वजनिक कामाकरितां सदा प्रवास करावा लागत असल्या-मुळें अत्यंत जिव्हाळ्याचीं अशींहि घरांतील माणसें आजारी असतांना, बापूजींना त्यांची काळजी आपल्या विश्वस्त डॉक्टरवर सोंपवून अनेक वेळां आपलें घर सोडावें लागलें आहे. याचा अर्थ, त्यांचें घरांतील मंडळीकडे दुर्लक्ष असतें असा नाहीं. असेंब्लीच्या खोलींतून घरीं मुलास पत्र लिहीत असतांना आपल्या पिंजऱ्यांतील पोपटाची काळजी घेण्यास ते बजावीत असतात. यावरून त्यांचें आपल्या परिवारावर किती प्रेम असतें हें दिसून येईल.

## वाङ्मयसेवा

बापूजींच्या हातून ग्रंथनिष्पत्ति अशी मुळींच झाली नाहीं. त्यांनीं काव्य, तत्त्वज्ञान, राजकारण वगैरे विषयांवरील बऱ्याच पुस्तकांस प्रस्तावना लिहिल्या आहेत व प्रस्तावनांतून त्या त्या पुस्तकांचा परिचय करून देत असतां त्यांनीं तदंतर्गत विषयांवर बरेंच स्वतंत्र विवेचन केलें आहे. उत्तम श्लोकांच्या प्राकृत गाथा, सप्तशती या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं ओवी या छंदासंबंधीं मोठें मार्मिक विवेचन केलें आहे. प्रस्तुत पुस्तकांतील त्यांची 'मराठी वाङ्मयाचा जयजयकार' ही 'संदेश' मधून प्रसिद्ध झालेली लेखमाला, ज्यावेळीं स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली, त्यावेळीं 'विविधज्ञान विस्तारा'सारख्या भारदस्त मासिकानें, त्या लेखमालेबद्दल प्रशंसोद्‌गार काढिले होते. त्यांच्या प्रवासी

त्तीमुळें, लेखनास जें स्वास्थ्य पाहिजे असतें तें त्यांना कधींच मिळालेलें नाहीं. परंतु अशाहि परिस्थितींत जें कांहीं थोडेंबहुत लेखन त्यांच्या हातून झालें आहे त्यांत त्यांची विद्वत्ता, संशोधनप्रेम व विचारस्वातंत्र्य हीं दिसून येतात, म्हणूनच विख्यात साहित्यभक्तांतहि त्यांच्याविषयीं आदर दिसून येतो. विदर्भ साहित्यसंघाचे ते उपाध्यक्ष आहेत व यवतमाळ येथील प्रसिद्ध शारदाश्रमाचे ते अध्यक्ष आहेत. यवतमाळास दे.भ.तात्यासाहेब केळकरांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या विदर्भ साहित्यसंघाच्या अधिवेशनाचे ते स्वागताध्यक्ष होते. नापूगर युनिव्हर्सिटीनेंहि त्यांना युनिव्हर्सिटी कोर्टाचे सभासद म्हणून नेमिलें होतें. ग्वालेर येथें १९२८ सालीं भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

## वाचन व विचार

फावल्या वेळांत बापूजींचें नेहमी वाचन सुरू असतें. ' महाभारत ' हा त्यांचा अतिशय आवडता ग्रंथ आहे. व त्याचें वाचन फुरसतीअर्ती ते नेहमीं करीत असतात. वाचनांत बापूजींची इतकी एकाग्रता होते कीं, समोर येऊन कोणी बसलें तरी त्यांना तास तास कळत नाहीं. जुन्या संस्कृतिविषयक ग्रंथवाचनाची त्यांना फार आवड आहे. कोणत्याहि प्रश्नासंबंधीं सशास्त्र व खोल विचार करण्याची बापूजींची पद्धत आहे. समाजसुधारणा करतांनाहि त्या संबधांत शास्त्रीय संशोधन करून मग त्या कराव्या असें त्यांचें म्हणणें असतें. कोणत्याहि विषयावर आपलें मत प्रदर्शित करण्यापूर्वी त्या विषयाचा सांगोपांग विचार उपलब्ध असलेली पूर्ण माहिती मिळविल्याशिवाय, ते आपलें तोंडी किंवा लेखी मत जाहीर करीत नाहींत, व त्यामुळें त्यांनीं मांडिलेल्या सिद्धांताचा फेरविचार करण्याचें त्यांना सहसा कारण पडत नाहीं.

## वक्तृत्व

बापूजींची वक्ता या नात्यानें बेझंटबाई, दासप्रभृती पहिल्या प्रतीच्या पुढाऱ्यांशीं बरोबरी होत नसली, तरी त्यांचें वक्तृत्व अतिशय प्रभावशाली असतें यांत शंका नाहीं. त्यांच्या वक्तृत्वाचें सारसर्वस्व, भावनोन्मीलन हें

नसून विचारप्रवर्तन हें आहे. एका इंग्रज लेखकानें एडमंड बर्कच्या वक्तृत्वाचें जें वर्णन केलेलें आहे, तेंच बापूजींच्या वक्तृत्वालाहि लागू पडतें. बर्कप्रमाणेंच त्यांचा आवाज किंचित् घोगरा आहे, त्याचप्रमाणें प्रतिपाद्य विषयाची तर्कशुद्ध मांडणी, पल्लेदार पण व्याकरणशुद्ध वाक्यें जोडण्याची लकब, व भाषण करतांना आवेशाचा होत असलेला आविर्भाव, इत्यादि आपल्या वक्तृत्वांतील आत्मीय गुण, बापूजींनीं बर्कपासूनच उचलले कीं काय असा भास होतो. या पद्धतीच्या वक्तृत्वगुणांत त्यांच्याशीं मुकाबला करणारे वक्ते महाराष्ट्रांत फारच थोडे सांपडतील.


बापूजींच्या वक्तृत्वांत हें एक वैशिष्ट्य आहे कीं, एखाद्या विशिष्ट कार्यक्रमाचा प्रचार करतांना एकाच विषयावर अनेक वेळां व निरनिराळ्या ठिकाणीं भाषणें करण्याचे जरी प्रसंग आले, तरी अशा प्रसंगीं तोच विषय श्रोत्यांसमोर मांडितांना, प्रत्येक प्रसंगीं प्रतिपादन करण्याची पद्धत किंवा दिलेले दृष्टांत अगदीं नवीन तऱ्हेचे असतात.

## उपसंहार

बापूजींनीं १९०६ सालीं राजकीय क्षेत्रांत उडी घेतली व त्या क्षेत्रांत ते आज सतत २५ वर्षे काम करीत आहेत. त्यांचे निवडक लेख व भाषणें प्रसिद्ध करून ‘ बापूजी वाङ्मय मंडळ ’ एक प्रकारें त्यांची रौप्यज्युबिली साजरी करीत आहे असें म्हटलें तरी चालेल.

बापूजींचा कीर्तिसूर्य आतां माध्यान्हीं तळपत आहे. त्यांच्याकडून या आपल्या मातृभूमीच्या उद्धारार्थ अजूनहि बरेंच कार्य व्हावयाचें आहे. तें कार्य करण्यासाठीं ईश्वर त्यांना अवश्य तें सामर्थ्य व दीर्घायुरारोग्य देवो अशी त्याच्या चरणीं अनन्य भावानें प्रार्थना करून आम्ही हें जीवनवृत्त संपवितों.

# लेखविभाग.



लो. ना. बापूजी अणे यांचें हस्ताक्षर.

# लोकनायक अणे

## यांचे

# लेख व भाषणें.

## नवीन पंथ

### निःशस्त्र ऊर्फ संरक्षक प्रतिकार

[ यवतमाळ येथील " हरिकिशोर " नामक साप्ताहिकांत १३ मे १९०७ पासून ८ जुलै १९०७ पर्यंतच्या अंकांत दे. भ. बापूजी अणे यांनीं पुढील उज्वल विचारांची लेखमालिका स्वतःचें नांव न देतां, संपादकीय म्हणून अग्रलेखांच्या जागीं लिहिली होती. या लेखमालेंतील क्रमांक ५ व ६ हे उपलब्ध होऊं शकले नाहींत. सं. ]

### लेखांक १ ला

अलीकडे राष्ट्रांत एक प्रकारची नवीन जागृति दृष्टीस पडत आहे आणि जिकडे तिकडे उमेदीचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. नवीन पंथांतील कामें करावयास नुक्ताच कोठें प्रारंभ झालेला आहे, तोंच अधिकारीवर्गानें आपला तृतीय नेत्र उघडून चळवळ जाळून खाक करून टाकण्याचा आव आणला आहे! पंजाबांत आणि बंगाल्यांत चळवळ हाणून पाडण्याकरितां अत्यंत उग्र, बेकायदेशीर आणि परिणामी अहितकर अशा उपायांची योजना सरकारी अधिकारी करीत आहेत व तिकडच्या नुसत्या तारेनें आलेल्या बातम्या वाचून आमच्याकडील " फुरसतीअंतीं देशसेवा " पंथाचे रडत राऊत गर्भगळित झालेले आहेत; आणि भीतीमुळें गांगरून जाऊन बोबडी वळल्यामुळें अडखळत अडखळत नवीन पंथाविषयीं अनुदार, कुचके आणि गैरसमज उत्पन्न करणारे घूत्कार सदरहू पक्षाकडील ' ज्ञानाचा व थंड मताचा ' प्रकाश पाडण्याचा मक्ता घेतलेले बहाद्दर काढीत आहेत! तेव्हां या असल्या पक्षपाती लेखामुळें नवीन पंथाच्या सामर्थ्याविषयीं, हेतूविषयीं आणि साध्याविषयीं लोकांच्या मनांत यथार्थ कल्पना आणणें अवश्य आहे, असें वाटल्या-

वरून आम्ही ही लेखमाला लिहावयास आरंभ केला आहे. या मालेंत नवीन पक्षाचीं मुख्य राजकीय तत्त्वें, त्यांची आवश्यकता, त्यांची मर्यादा व एकंदर धोरण यांचें सांगोपांग, व्यवस्थित आणि पद्धतशीर विवेचन व्हावयाचें आहे. त्याचप्रमाणें नेमस्त आणि जहाल, किंवा 'राजनिष्ठ' आणि 'राष्ट्रनिष्ठ' पुढाऱ्यांच्या मतांत असलेला फरक हा केवळ साधनांत आहे, साध्यांत नाहीं, सर्वांचें साध्य एकच आहे, असें जें वारंवार प्रतिपक्ष्याकडून प्रतिपादण्यांत येतें, त्यांतील पोकळपणा दाखवून दोन्ही पक्षांत मतभेद बाह्य अर्थभेदापासून उत्पन्न झाला नसून अन्तस्थ कारणांपासून जन्मलेला आहे, तो दोन्ही पक्षांतील पुढाऱ्यांच्या स्वातंत्र्याच्या किंवा स्वराज्याच्या कल्पनांमुळेंच उद्भूत झालेला आहे, हेंहि सिद्ध करणें जरूर आहे. नाहींतर खऱ्या बावनकशी सोन्यास या दुसऱ्या हलक्या दर्जाच्या धातूच्या संसर्गानें हिणकसपणा यावयाचा जबरदस्त संशय आहे.

जें स्वराज्य आम्हांस पाहिजे म्हणून उभयपक्षांतील पुढाऱ्यांचें ऐकमत्य आहे, तें वास्तविक आहे किंवा वरपांगीं आहे, हा प्रश्न तूर्त बाजूस ठेवून स्वराज्यप्राप्तीचे कोणते मार्ग आपणांस उपलब्ध आहेत तें पाहूं. पहिला मार्ग म्हटला म्हणजे अर्जद्वारां आणि अन्य रीतीनें सरकारी अधिकाऱ्यांचीं मनें प्रसन्न ठेवून आपला कार्यभाग साधावा असें म्हणणारांचा आहे. आजपर्यंत आमच्या पुढाऱ्यांनीं याच मार्गाचें अवलंबन केलें, आणि अजून देखील हाच मार्ग श्रेयस्कर आहे म्हणून ते कंठरवानें सांगत आहेत. परंतु या मार्गाच्या अवलंबनांत जे त्यांनीं अर्धशतक घालविलें, तेवढ्या अवधींत फलप्राप्ति काय झाली, असा प्रश्न विचारला असतां त्यांना समाधानकारक असें कोणतेंच उत्तर देतां येत नाहीं. प्राप्तीवरील आणि मिठावरील कर कमी करण्यांत आले, हें सांगितल्याबरोबर, त्यांच्या विरुद्ध गेल्या २५।३० वर्षांतील सरकारनें स्वीकारलेलें पिछेहाटीचें धोरण, युनिव्हर्सिटी ॲक्ट, मुंबई इलाख्यांतील जमीनधाऱ्याचा कायदा आणि लोकमताला पायाखालीं तुडवून करण्यांत आलेला वंगभंग इत्यादि एक ना दोन अनेक प्रमाणांची गर्दी उडण्याचा संभव आहे. हें माहीत असल्यामुळें वरील दोन करांचा नामनिर्देश करण्याचें देखील धैर्य आमच्या प्रतिपक्षीयांस होत नाहीं. आपल्या

दुःखाची कहाणी मोठया वक्तृत्वपूर्ण भाषेंत मांडून कोणत्याहि राष्ट्रानें परकीय जलचरांच्या मगरमिठींतून आपला मोक्ष करून घेतल्याचें इतिहास सांगत नाहीं व गतकालांत जी गोष्ट घडली नाहीं, ती भावी कालांत मनुष्यस्वभावांत कांहीं विलक्षण क्रांति झाल्याशिवाय घडून येणें तादृश संभवनीय नाहीं. तेव्हां "भिक्षां देहि"च्या मार्गानें राजकीय मोक्ष संपादूं पाहणारे आमचे नेमस्त पुढारी चिरडीस गेलेल्या आपल्या कंजूष यजमानांच्या हातून आपला कपाळमोक्ष मात्र करून घेतील; व त्यावेळीं कपाळावर बोट ठेवून मुळूंमुळूं अश्रु ढाळण्यापलीकडे त्यांच्या हातून दुसरें कांहींएक होणार नाहीं, हें आजपर्यंतच्या अनुभवावरून आम्ही निस्संदेह सांगू शकतों.

'भिक्षां देहि' पंथाची अशा रीतीनें विल्हेवाट लावल्यावर राजकीय चळवळ करण्याचे काय ते दोनच मार्ग आपणांस खुले आहेत. केवळ स्वतःच्या पायांवर उभें राहून आपली उन्नति करून घ्यावयाची हा एक, आणि प्रचलित राजकीय सत्तेचा व्यवस्थित रीतीनें प्रतिकार करावयाचा हा दुसरा. केवळ स्वावलंबनानें स्वोन्नति करून घ्यावयाची हें काम फार कठीण आहे, इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानच्या सद्यस्थितींत ही गोष्ट सकृद्दर्शनीं अशक्य आहे, असेंहि बरेचजण म्हणतील, हें नवीन पक्ष जाणून आहे. एखाद्या स्वतंत्र राष्ट्रानें स्वावलंबनानें दुसऱ्या कोणाच्याहि तोंडाकडे न पाहतां आपली उन्नति करून घेतों, असें म्हणणें निराळें; आणि परकीय सत्तेचें जड जोखड ज्यांच्या मानेवर बसलेलें आहे, असल्या सर्वथैव पराधीन बनलेल्या राष्ट्रानें मानेवरील जोखड सौम्य अगर उग्र अशा कोणत्या तरी उपायानें फेंकून दिल्याशिवाय स्वावलंबनावर भिस्त ठेवूनच आपल्या अभ्युदयाच्या प्रयत्नास लागणें हें निराळें. राजशक्तीचा पाठिंबा असल्याशिवाय कोणत्याहि राष्ट्रास आपली उन्नति करून घेणें अशक्य आहे. एखादी ज्ञाति आपलीं सामाजिक बंधनें नीट उपयोगांत आणून कदाचित् आपली प्रगति करून घेऊं शकेल. पण सामाजिक, शिक्षणविषयक किंवा औद्योगिक कोणत्याहि बाबतींत राष्ट्राची प्रगति व्हावयाची असेल, तर त्या राष्ट्राची सर्व विचारशक्ति व कर्तृत्वशक्ति जेथें एकवटली आहे, अशी एखादी संस्था पाहिजे, व त्या संस्थेच्या ठिकाणीं लोकमत आपल्या मागोमाग ओढून आणण्याचें सामर्थ्य

पाहिजे. असल्या प्रकारची नियामक संस्था जपानमध्यें असल्यामुळें तीस वर्षांत युरोपांतील एका बलाढ्य राष्ट्राशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य जपानच्या ठिकाणीं आलें, व असल्या संस्थांचा हिंदुस्थानांत अभाव असल्यामुळें, आणि सर्वथैव सावत्र आईप्रमाणें आम्हांस पाण्यांत पाहणाऱ्या, पण वरपांगी माया दाखविणाऱ्या स्वार्थैकतत्पर सरकारवर अवलंबून रहावें लागत असल्यामुळें आम्ही आपल्या अभ्युदयाकरितां गेलीं पन्नास वर्षें केलेल्या त्या घडपडीपासून जपानी लोकांच्या एक वर्षाच्या कामगिरीइतकें देखील फल निष्पन्न झालें नाहीं. एकोणिसाव्या शतकभर आम्ही तोंडानें देशोन्नतीची टकळी चालवीत पारतंत्र्याच्या काळ्याकभिन्न अंधकारांतून ठेंचा खात चाललों होतों, व त्याचा परिणाम असा झाला कीं, आमची प्रगति होणें दूरच राहिलें, पण उलट अधोगति मात्र झाली! वर चढण्याऐवजीं आमची स्थिति जास्त जास्त खालावत चालली; पूर्वजांचा तेजस्वीपणा आणि पाणीदारपणा जाऊन एक प्रकारचा भित्रेपणा व मिंधेपणा अंगांत शिरला. लोकमताचा ओघ आपल्याला इष्ट अशा दिशेनें वळविण्याचें सामर्थ्य जिच्या ठिकाणीं आहे, अशी राजकीय संस्था जोंपर्यंत अस्तित्वांत नाहीं, तोंपर्यंत एखादी दुसरी व्यक्ति किंवा एखादी दुसरी ज्ञाति आपली स्थिति सुधारून घेऊं शकेल, पण राष्ट्राच्या स्थितींत काडीमात्रहि फरक पाडतां येणें शक्य नाहीं. अशा स्थितींत देशोन्नतीकरितां केलेले सर्व प्रयत्न निष्फळ होतील, आणि मग ते निष्फळ झाले म्हणजे असलीं बिकट कामें तडाख्यानें उडवून देण्यास लागणारी चिकाटी, स्वार्थत्याग वगैरे गुणांचा वास आपल्या देशांतील लोकांत नाहीं, असें म्हणून राजकीय चळवळीच्या इतिहासाचा ओनामा अवगत नसल्यामुळें झालेल्या मूर्खपणाचें समर्थन करावयास लागूं! स्वतंत्र रीतीनें विचार करून त्याप्रमाणें वागण्याची संवय लोकांत असणें हें देशोन्नतीचें पहिलें कलम आहे; आणि गुलामगिरीच्या स्थितींत तेवढी गोष्ट केव्हांहि शक्य नसते. यानंतरचें दुसरें कलम म्हटलें म्हणजे राष्ट्रांतील लोकमत एकवटून त्याचें नियमन करणाऱ्या एका केन्द्रोपवर्ती संस्थेची संघटना करणें हें होय.

---

## लेखांक २ रा

गेल्या खेपेस लिहिल्याप्रमाणें राष्ट्रांतील लोकमत एकवटून त्याचें नियमन करणारी एक केन्द्रोपवर्ती संस्था नसल्यामुळे राष्ट्रोन्नतीस अत्यन्त अवश्य असे उद्देश तडीस नेण्याचें काम किती दुष्कर होतें, याचें ताजें उदाहरण पाहिजे असल्यास बंगाल्यांतील बहिष्काराची स्थिति कशी शोचनीय झाली आहे, तें पहा! विलायती मालाला बहिष्कार घातल्याशिवाय प्रांतावर ओढवलेलें संकट टाळतां येणें शक्य नाहीं, म्हणून वंगभंग कायम असेपर्यंत बंगाल इलाख्यांत असणाऱ्या प्रत्येक स्त्रीपुरुषानें बहिष्काराचा अंगीकार करणें अवश्य आहे व त्याप्रमाणें तो घालण्याचा त्यांचा निश्चय झालेला आहे, असें जगास वारंवार सांगण्यांत येतें. तथापि वस्तुस्थिति काय आहे? लोकांच्या मनावरील बहिष्काराची छाप हळुहळू कमी होत चालली आहे. याच कारणाकरितां राष्ट्रीय विश्वविद्यालयाचा प्रश्न अजून भिजत पडला आहे. युरोपांतील राष्ट्रांनीं जेव्हां बंदरावर मोर्चे लाविले, तेव्हां जपानचे डोळे एकदम उघडले! व सर्व सरदार लोकांनीं आपल्या वैय्यक्तिक सत्तेचा त्याग करून मिकॅडोला सर्वसत्ताधीश बादशहा केलें, व अशी सर्वसत्ताधारी राजकीय सत्ता निर्माण केल्यावर जेव्हां ते आपल्या राष्ट्राची सुधारणा करण्याच्या उद्योगास लागले, तेव्हां त्यांनीं हां हां म्हणतां सर्व जगास थक्क करून सोडणारी सुधारणा अत्यंत अल्प काळांत घडवून आणली. तथापि जपान हें स्वतंत्र असल्यामुळें असली संस्था निर्माण करण्याचें काम बऱ्याच अंशीं सोपें होतें, असें म्हटलें तरी चालेल. पण हिंदुस्थानांत जें सत्ताधारी नियामक मंडळ निर्माण करावयाचें आहे, त्याचें काम अत्यंत दुर्घट आहे. व्यवस्थित, शांतताप्रधान अशा परकीय राजसत्तेला प्रतिस्पर्धी अशी दुसरी राजसत्ता निर्माण करणें हें आमच्या पुढाऱ्यांचें कठीण तर खरेंच, पण तितकेंच महत्त्वाचें काम आहे. त्यांना जी मोठी क्रान्ति घडवून आणावयाची आहे तिचा वरील संस्था ही पाया आहे. त्यांच्यापुढें जो प्रश्न उभा आहे, तो हा आहे. परंतु हा सर्व खटाटोप व्यवस्थित रीतीनें पार पडण्याकरितां कांहीं विशेष परिस्थितीची जरूरी असते. ज्या देशांत वरील प्रयोग करावयाचा आहे, तेथील लोकांना सरकारी कायद्यापेक्षां जननिंदेची आणि सामाजिक

बहिष्काराची जास्त दहशत पाहिजे. त्याचप्रमाणें स्वहितविन्मुखता ऊर्फ स्वार्थत्याग हें त्या लोकांचें शीलच बनून गेलें पाहिजे. या दोन्ही गोष्टींची उणीव हिंदुस्थानांत मुळींच नाहीं. कायद्यांत विधवाविवाहाला उघड संमति दिली असतां देखील विधवाविवाहांच्या सख्येंत म्हणण्यासारखी वाढ गेल्या वीस वर्षांत दृष्टीस पडू नये, हें कशाचें लक्षण? तद्वतच निवृत्तिमार्गाची परंपरा अगदीं प्राचीन ऐतिहासिक कालापासून सारखी जर कोठें अविछिन्न कायम असेल, तर ती या भरतखंडांत आहे! तेव्हां प्रचलित परकीय राजसत्तेस प्रतिस्पर्धी व कांहीं अंशीं विरोधी अशी सत्ताधारी संस्था निर्माण करण्यास, ज्या दोन अटींची जरूरी आहे, त्या दोहोंचीहि पूर्तता येथें होत आहे. पण यापेक्षां आणखी एका तिसऱ्या गोष्टीचीहि तितकीच आवश्यकता आहे. युद्ध करून किंवा बंडाचें निशाण फडकावून स्वातंत्र्य मिळविणाऱ्या रणधुरंधरांना जी चिकाटी, जी सहनशीलता व संततकार्यक्षमता पाहिजे, त्यापेक्षां या गुणांची पुष्कळ पटींनीं जास्त आवश्यकता वरील मार्गानें क्रान्ति घडवून आणणारांच्या ठिकाणीं पाहिजे असते. हिंदुस्थानांत कांहीं जाती या गुणांनीं विशिष्ट आहेत. मराठे, शीख वगैरे लोकांच्या ठिकाणीं हे गुण असल्याबद्दल इतिहास साक्ष देत आहे. पण उलटपक्षीं इतर कांहीं ज्ञातींत त्यांचा पूर्ण लोप दिसतो. पण या गुणांसंबंधानें विशेष हें आहे कीं, वरिष्ठ सत्तेशीं झुंजण्याला सुरुवात झाली म्हणजे कांहीं कालानें या गुणांचा विकास लोकांमध्यें आपोआप व्हावयास लागतो, आणि वरिष्ठ प्रतिकूल सत्तेच्या दाबासरशीं चिरडून न जातां थोडाबहुत टिकाव मात्र धरतां आला पाहिजे, एवढ्यासाठीं चौथी गोष्ट अवश्य पाहिजे. हिंदुस्थानाशीं इंग्रजांचा जो संबंध आहे, तो अजीबात तोडून न टाकतां लोकनिर्मित संस्था ज्या चळवळी करील, त्यांत प्रचलित राजसत्तेनें ढवळाढवळ करतां उपयोगी नाहीं, आपल्या राजकीय धोरणानें घालून दिलेल्या रेषेपासून च्युत होतां कामा नये, असें कित्येकांचें मत आहे. पण ही गोष्ट मात्र खरोखरच कठिण आहे. अँग्लो इंडियनांच्या हिताला विघातक अशी चळवळ हाणून पाडण्याच्या कामांत सरकारची नेहमीं एका पायावर तयारी असते. बंगाल्यांत फुल्लर साहेबानें घातलेला गोंधळ व त्याच्या अनुयायांनीं हल्लीं चालविलेला येळकोट, पंजाबांत होऊन राहिलेला

जुल्म या गोष्टी आमच्या विधानाच्या पुष्टीकरणार्थ पुरेशा आहेत; आणि म्हणूनच या लेखाच्या आरंभीं आम्ही वाचकांना सुचवून ठेविलें आहे कीं, " स्वावलंबनानें स्वोन्नति " जेथपर्यंत करण्यास प्रत्यक्ष अडथळा येत नाहीं तोंपर्यंतच ती करून घेतली पाहिजे. या मार्गांत सरकारकडून विघ्नें यावयास लागलीं, तर काय करावयाचें हा निराळा प्रश्न आहे, व त्याचें उत्तरहि लौकरच देण्याचें आम्ही वाचकांस आश्वासन देतों.

केवळ स्वावलंबनानेंच आपली उन्नति करून घेतली पाहिजे, मग तें काम शांततेनें होवो अथवा न होवो. दीर्घकालीन परकीय सत्तेमुळें आमच्यांत जे अनेक दुर्गुण व राष्ट्रविघातक संवयी शिरल्या आहेत, त्या घालविण्याला व राष्ट्रपोषक अशा सद्गुणांचा विकास होण्याला या मार्गाचा फार उपयोग आहे. राष्ट्रीय सभेनें जरी आपली झोळी अजून फाडून टाकली नाहीं किंवा भिक्षापात्र फेंकून दिलें नाहीं, तरी तिनें या मार्गाचा अंगीकार बऱ्याच अंशीं केलेला आहे. जुन्या पुढाऱ्यांकडून या कल्पना ग्रहण केल्या जाणें शक्य नाहीं, अशी पुष्कळ विचाराअंतीं व खटपटीअंतीं खात्री झाल्यामुळें या नवीन विचारांच्या पुढाऱ्यांना आपला एक निराळाच पक्ष करावा लागला व राष्ट्रीय सभेकडून स्वतंत्र रीतीनें या कल्पनांचा स्वीकार करवावा लागला, व त्याचा परिणामहि फार चांगला झालेला आहे. राष्ट्रीय सभेनें बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण यांना आपली उघड संमति दिली आहे. स्वतंत्र लवाद कोर्टें स्थापन करून किंवा गांवपंचायती स्थापून त्यांच्या मार्फत दाव्यांचे निकाल लावण्याच्या प्रश्नास यंदाच्या नाहीं, तर त्याच्या पुढील वर्षाच्या विषयक्रमांत स्थान मिळालेंच पाहिजे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या प्रांतिक कमिट्यांची स्थापना वगैरे करण्यांत आलीच आहे, व त्यांचें स्वरूप आज पाहिजे तसें समाधानकारक नसलें, तरी ह्या संस्था पहिली पायरी चढून वर जावयास लागल्या आहेत, यांत कांहीं एक संशय नाहीं.

येथवर झालें तें ठीक झालें. पण हा सर्व प्रकार गुण्यागोविंदानें पार पडेल, अशी कोणाची समजूत असेल, तर ती निखालस चुकीची आहे. स्वार्थपरायण सरकार राष्ट्रहितवर्धक कल्पनांचा व चळवळींचा विध्वंस करण्याकरितां नेहमीं डोळ्यांत तेल घालून टपत बसलेलें असतें, ही गोष्ट विसरून

चालावयाचें नाहीं. सरकारचा हा ससेमिरा आपल्या मार्गे निरंतर राहणार, हें ध्यानांत धरूनच आपण कामाला लागलें पाहिजे. इतकेंच नव्हे, तर या सरकारी रोषापासून आपल्या चळवळीस अपाय होणार नाहीं, याचीहि खबरदारी घेतली पाहिजे. या बाबतींत काय योजना केली पाहिजे, याचा आतांपर्यंत मुळींच विचार झालेला नाहीं.

राष्ट्रोन्नतीचा तिसरा मार्ग म्हणजे सत्ताधीशांच्या अरेरावीचा व्यवस्थित रीतीनें प्रतिकार करणें हा होय. आतां हा प्रतिकार कोणत्या प्रकारचा राहील, हें सर्वस्वीं सरकारनें उत्पन्न केलेल्या परिस्थितीवर अवलंबून राहणार आहे. प्रतिकार सशस्त्र असावा किंवा निःशस्त्र असावा, संरक्षक असावा किंवा क्षोभोत्पादक असावा, हें आज नक्की सांगणें थोडें कठिण आहे. तथापि नवीन पंथांतील पुढाऱ्यांनीं तूर्त तरी त्या प्रतिकाराचें स्वरूप निःशस्त्र ऊर्फ संरक्षक असावें, असें ठरविलें आहे. तेव्हां आपल्या देशहितास आवश्यक अशा चळवळींचें काम व्यवस्थितपणें चालावें म्हणून एक लोकनिर्मित राजसंस्था निर्माण करूनच भागावयाचें नाहीं, तर या देशहिताच्या वाढत्या रोपाचा अंकुर खुडून टाकूं पाहणाऱ्या हितशत्रूंपासून त्याचा बचाव व्हावा म्हणून त्याच्या भोंवतीं संरक्षक प्रतिकाराचें (Defensive or passive resistance) कुंपण घालणें जरूर आहे.

---

## लेखांक ३ रा

गेल्या खेपेस निःशस्त्र प्रतिकाराच्या आवश्यकतेचा अल्प विचार झाला, आतां त्यांच्या उद्देशाकडे वळूं. प्रचलित राज्यपद्धतीच्या विरुद्ध जेव्हां संरक्षक प्रतिकाराचें शस्त्र उचलण्यांत येतें, तेव्हां तो प्रतिकार साधारणतः खालील चार पैकीं कोणत्या तरी एका उद्देशानें करण्यांत येतो ( १ ) परकीय सत्तेच्या शृंखलांनीं जखडलेल्या मातृभूमीची बंधनापासून मुक्तता करून, तिला पूर्णपणें स्वतंत्र करणें. ( २ ) प्रचलित राज्यपद्धतिऐवजीं दुसरी जास्त सुखकर राज्यपद्धति स्थापित करणें. ( ३ ) प्रचलित पद्धतींतील कांहीं

विशिष्ट दोषांचा परिहार करणें, किंवा (४) कांहीं दुःखांची दाद लावून घेणें. एकोणिसाव्या शतकांत हिंदुस्थानांतील राजकीय पुढाऱ्यांचें लक्ष या चौथ्या प्रकारच्या उद्देशानें पूर्णपणें वेधलें होतें, हें राष्ट्रीय सभेच्या गेल्या बावीस वर्षांच्या ठरावांचें विहंगम दृष्टीनें अवलोकन केलें तरी सहज समजून येईल. दर वीस वर्षांनीं किंवा तीस वर्षांनीं जमिनीची मोजणी करून सारा वाढविण्याची जी पद्धति सरकारनें सुरू केली आहे,ती शेतकीच्या सुधारणेस विघातक असल्यामुळें ती मोडून तिच्या ऐवजीं बंगाल्यांत असलेली कायमधाऱ्याची पद्धति सर्वत्र अमलांत आणावी. न्यायखातें आणि अंमलबजावणी खातें हीं दोन्हीं एकमेकांपासून पृथक् असावीं. आय. सी. एस.ची परीक्षा हिंदुस्थान आणि इंग्लंड या दोन्ही ठिकाणीं एकसमयावच्छेदेंकरून घ्यावी. या आणि याच सारख्या इतर मागण्या करण्यांत आमच्या पुढाऱ्यांनीं गेलें अर्ध शतक नुसता कंठशोष केला आहे! परंतु या सर्व अन्यायांचा प्रवाह ज्या उगमापासून निघाला आहे, आणि जेथून त्यांना द्रव्याचा आणि साधनांचा पुरवठा अखंड होत असतो, तोच मुळीं जर कलुषित आहे, तर वरील प्रवाहांतील घाण काढून टाकण्यापासून तादृश फायदा होणार नाहीं, हें पुढाऱ्यांच्या लक्षांत आलें नाहीं. कायमधाऱ्याची पद्धति सुरू केल्यापासून दर विसाव्या वर्षी जमीनधाऱ्याच्या रूपानें शेतकऱ्यांवर पडणारा बोजा जरी कमी करण्यांत आला, तरी कर बसविण्याचा सरकारचा अधिकार जेथपर्यंत अनियंत्रित आहे, तेंथपर्यंत कायमधाऱ्यामुळें होणाऱ्या नुकसानीचा वचपा इतर शेंकडों कर आणि पट्ट्या बसवून सरकारास काढून घेतां येईल! रा. महादेव राजाराम बोडस यांनीं "राजनीति" या ग्रंथावरील उपोद्घातांत, ही गोष्ट सप्रमाण सिद्ध करून दाखविली आहे. न्यायाचें खातें आणि अंमलबजावणी खातें हीं दोन्हीं जरी वेगळीं करण्यांत आलीं,तरी दोन्ही खात्यांतील महत्त्वाच्या आणि हुद्द्याच्या जागा "पांढऱ्या बाळां" करितांच ठेविल्या असल्यामुळें आणि न्यायखात्याच्या न्यायमूर्तीस मिळणारें प्रतिमासिक वेतन ठरविणें हें अंमलबजावणी खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अधिकारांत असल्यामुळें व दोन्ही खातीं बेजबाबदार अशा परकीय सरकारच्या सर्वथैव ताब्यांत असल्यामुळें

या पृथक्करणापासूनही आमच्या दुःखांचें म्हणण्यासारखें निराकरण होणें संभवनीय नाहीं. त्याचप्रमाणें, एतद्देशीय लोकांस जरी वरिष्ठ हुद्द्यांच्या जागीं नेमण्यांत आलें, तरी सरकारपक्षाकडे आपला कल दाखविल्यास आपली बढती लवकर होईल, अशी अंधुक आशा बहुश: त्यांच्या मनांत वाटत असल्यामुळें ते इंग्रज अंमलदारापेक्षां देखील जास्त जुलमी बनतात! राज्यकर्त्यांचे आपण सजातीय आहोंत अशी भावना इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनांत नेहमीं जागृत असल्यामुळें बढतीकरितां त्यांना कृत्रिम साधनांचें अवलंबन करण्याची विशेष आवश्यकता नसते. पण एतद्देशीय अधिकाऱ्यांना आपल्या पोषाखानें, राहणीनें, चालीरीतीनें, लोकमताच्या बेपर्वाईनें आणि इतर कृत्रिम उपायांनीं आपणही " त्या ईश्वराच्या आवडत्या लेंकरांपैकीं " एक आहोंत, असें दाखवावें लागतें! आणि म्हणून त्यांची 'बात' फारच शेफारलेली आणि लोकांना जाचक असते. शिवाय नोकरींत माणसें निवडून घेणें, परीक्षा पास करणें किंवा नेमलेल्या माणसांना कायम ठेवणें इत्यादि गोष्टी परकीय सरकारच्या हातांत असल्यामुळें वरिष्ठ हुद्द्यांच्या जागा नेटिव्हांस मिळाल्या, तरी आमच्या दुःखाची कहाणी संपली, असें म्हणतां येणार नाहीं. शिवाय एतद्देशीय नोकरांचा प्रवेश कांहीं विशेष मर्यादेपर्यंतच करण्यांत येईल; त्याच्या पुढील जबाबदारीच्या सर्व जागा पांढऱ्या लोकांकरितां राखून ठेवणें हें इंग्रजी सत्तेच्या चिरस्थायित्वाच्या दृष्टीनें अत्यंत अवश्य आहे, असें लॉर्ड कर्झननें एका ठरावांत स्पष्टपणें प्रसिद्ध केलें आहे. जेथें सर्व देश गोऱ्या बाळांना चरण्याकरितां एक विस्तीर्ण कुरण म्हणूनच ठेवलेला आहे, तेथें होम चार्जेस् रूपानें द्रव्याचा प्रचंड ओघ अखंडपणें विलायतेकडे जात आहे, अशी हाकाटी करून तरी काय उपयोग! शेंकडो जळवा लावून रक्तशोष करावा, अखेरीस क्षयाच्या बाधेनें देशाला मृत्युपंथास लावावें, हें तर या परकीय सरकारचें मुख्य धोरण आहे. या सर्व दुःखाचें मुख्य कारण हें आहे कीं, देशांतील करांच्या रूपानें येणाऱ्या द्रव्याचा विनियोग करण्याचा अधिकार जिच्या हातांत आहे, अशी जी राज्यसत्ता, ती लोकमतानुयायी नाहीं. ती अशी असणें जरूर आहे. या एका दिव्यौषधीनें हे सर्व रोग बरे होतात. प्रत्येकाकरितां निराळी मात्रा किंवा निराळा कषाय नको.

राज्यपद्धतींतील कांहीं विशेष दोष काढून टाकण्याकरितां किंवा कांहीं तक्रारींची दाद लावून घेण्याकरितां प्रतिकाराचें शस्त्र उचलून ज्या सरकारपासून यश मिळवितां येतें, तें सरकार स्वदेशी आणि लोकसत्ताक असावयास पाहिजे. रशिया किंवा हिंदुस्थानासारख्या देशांत, कीं जेथील राज्यपद्धति राजतंत्रानुयायी आहे, आणि जींत लोकमताला यत्किंचितही थारा नाहीं, तेथें नुसत्या चळवळीनें कांहींहि होणें शक्य नाहीं. हिंदुस्थानांत तर मुळीं या चळवळीला यश येण्याचा बिलकूल संभव नाहीं. कारण येथील सरकार परकीय, एकसत्ताक आणि परदेशनिवासी आहे. प्रथमतः स्वकीयांची योग्य तजवीज लाविल्यानंतर मग जितांच्या हितांकडे सवड झाल्यास ते पाहतील. त्याहून अधिक औदार्याची अपेक्षा करणें हें सृष्टिक्रमाविरुद्ध आहे. परकीय सत्तेच्या अंकित असलेल्या राष्ट्रानें या प्रतिकारास्त्राचा प्रयोग करतेवेळीं प्रचलित राज्यसत्तेचे ऐवजीं जींत लोकमतास पूर्ण थारा मिळाला आहे, अशा लोकसत्ताक राज्यपद्धतीची स्थापना करणें हाच उद्देश डोळ्यांपुढें ठेवणें जरूर आहे. आपल्या देशाला दुसऱ्या प्रमुख राष्ट्रांतील एक सुखी प्रांत बनविण्याच्या आकुंचित कल्पनेऐवजीं जगांतील प्रमुख सुधारलेल्या राष्ट्रांत आपल्या मातृभूमीची गणना व्हावी, अशी विशाल महत्त्वाकांक्षा ज्यांच्या मनांत वसत असेल त्यांनीं बेजबाबदार एकसत्ताक राज्यपद्धतीचा नायनाट करण्याच्या आणि त्याऐवजीं लोकसत्ताक पद्धति स्थापण्याच्या उद्योगास नेटानें लागलें पाहिजे.

एकोणिसाव्या शतकांतील आमच्या पुढाऱ्यांच्या मनांत केवळ प्रचलित पद्धतींतील कांहीं दुःसह दोष काढून टाकण्याचाच काय तो उद्देश होता. त्याच्यापेक्षां अधिक प्रगमनशील आणि विस्तृत उद्देश त्यांच्या मेंदूंत कधीं आलाच नाहीं, यांत कांहीं एक आश्चर्य नाहीं. त्यांनीं आपल्या राजकीय चळवळीचें धोरण, इंग्लंडच्या इतिहासावरून थोडेंसें ठरविलें होतें. जगांतील इतर देशांच्या इतिहासाविषयीं ते अगदींच अज्ञान होते. इंग्लंडचा इतिहास वाचणाराला असें दिसून येतें कीं, राजकारणाचे फक्त दोनच मार्ग इंग्लंडच्या लोकांस परिचित होते. एक तर बंडाचें निशाण उभारून राज्यसत्ता उलथून पाडणें आणि दुसरा कित्येक वर्षेपर्यंत एखाद्या प्रश्नावर वादाचें रणकंदन

भाजवून लोकमतानुकूल्य संपादन करावयाचें आणि ती गोष्ट करावयास लावणें. परंतु तीन प्रसंगीं पहिल्या मार्गाचें इंग्रज लोकांनीं अवलंबन केल्याचें इतिहासांत नमूद केलें आहे आणि बंडाच्या मार्गानें लोकमताचा राज्यसत्तेंत योग्य प्रवेश करून पुढें त्यांनीं चळवळीच्या मार्गानें कार्यभाग साधून घेण्यास आरंभ केला आहे. आमच्या पुढाऱ्यांच्या लक्षांत ही गोष्ट येत नाहीं.

---

## लेखांक ४ था

गेल्या खेपेस नि:शस्त्र प्रतिकाराच्या उद्देशाचें विवेचन करीत असतां आपण इंग्लंडच्या चळवळीचें अल्प निरीक्षण केलें. आतां मुख्य मुद्याकडे वळूं. मध्ययुगांत जेव्हां आगगाडी, तारायंत्र इत्यादि मनुष्य जातीचें परस्परांशीं दळणवळण वाढविणाऱ्या साधनांचा शोध झाला नव्हता, तेव्हांच्या वेळीं, जे चळवळीचे मार्ग इष्ट किंवा अवश्य असतील, ते आजच्या पालट-लेल्या मनूंत अगदीं जीर्ण आणि कुचकामाचे झाले आहेत. ज्याप्रमाणें एका पिढीच्या शास्त्रीय शोधाचा फायदा घेऊन दुसरी पिढी त्याचे पुढील शोध करण्याचें काम हातीं घेते, त्याचप्रमाणें इतिहासानें नमूद केलेल्या अनुभवाचा फायदा घेऊन पाऊल पुढें टाकलें पाहिजे. इंग्लंडला आपल्या राजकीय संस्था हल्लींच्या स्थितीस आणण्यास सरासरी सात आठशें वर्षे लागलीं, म्हणून आम्हांलाही तितकींच वर्षे लागतील असें म्हणणें शुद्ध वेड-गळपणाचें नसेल तर वस्तुस्थितीचें अज्ञान दाखविणारें तरी खास आहे. शिवाय लोकसत्ताक राज्यपद्धतीचा संचार आशिया खंडांत झाल्याचा जो चमत्कार आपल्या डोळ्यांसमोर घडून येत आहे, तो मागल्या पिढींतील लोकांना पहावयास मिळाला नव्हता व या पद्धतीचा आशियाटिक राष्ट्रें किती चांगला उपयोग करूं शकतात याचें प्रत्यंतर रूसो-जपानी युद्धाच्या वेळेस जसें आलें, तसें पूर्वी केव्हांच आलें नसल्यामुळें आजच्या नवीन पिढीचें राजकारण जुन्या पिढीहून निराळें आहे हें स्वाभाविक आहे. चौथी गोष्ट अशी आहे कीं, इंग्रज लोक हे सर्वथैव बलिष्ठ आहेत व आपण त्यांचे बंदे गुलाम होण्याच्याच लायकीचे आहोंत, असें बाळकडू इंग्रजी इतिहास-

कारांनीं जुन्या पिढीस पाजिलें होतें, व इंग्लंडमधील कांहीं धूर्त लोकांनीं मित्रत्वाचा आव घालून आमच्या भोळया पुढाऱ्यांना आपल्या आश्वासनांच्या आणि जाहीरनाम्यांच्या जाळयांत अडकावून टाकलें होतें, व इंग्रजांच्या सामर्थ्याविषयीं मनांत मोठी दहशत असल्यामुळें त्यांच्याविरुद्ध उघड दावा मांडून हक्क संपादन करण्याच्या नादीं ते लागले नाहींत. परंतु इंग्लंडच्या इतिहासांतील जो दुसरा चळवळीचा मार्ग त्याच्याच आश्रयानें त्यांनीं राजकारण करावयास सुरवात केली. नवीन पंथ आणि जुना पंथ यांतील मोटा भेद हा आहे कीं, जुन्या पंथाला हिंदुस्थानचे लोक कमकुवत, स्वार्थ-परायण, देशाभिमानशून्य आहेत असें वाटतें; तर उलट स्वदेशबांधवांच्या कर्तृत्वाची पूर्ण खात्री नवीन पंथास आहे. प्रसंग पडल्यास योग्य नेत्यांच्या निशाणाखालीं प्रतिपक्षीयांशीं दोन हात करण्याचें सामर्थ्य आपल्या लोकांत आहे, असा नवीन पंथाचा दृढ विश्वास आहे.

नवीन मार्गाचा उपयोग 'वंगभंग' रद्द व्हावा म्हणून करण्यांत आला. योग्य पुढारी नसतां व कोणतीही व्यवस्था नीट नसतांना या मार्गानें जी क्रांति घडवून आणिली, ती फार स्पृहणीय आहे. परंतु असल्या दिव्य अस्त्रांचा प्रयोग वंगभंगासारखी क्षुल्लक चिलटें चिरडण्याकडे न करतां स्वराज्यप्राप्ती-सारख्या स्पृहणीय साध्याच्या सिध्यर्थंच करावा, असा लोकांच्या मनाचा लौकर कलवळला आणि आज सर्व देशभर स्वराज्य कसें मिळेल व त्याच्या प्राप्त्यर्थ या नवीन मार्गाचा उपयोग कसा व कितपत करतां येईल, या एका प्रश्नाच्या विचारांत पुढारी गर्क झालेले दृष्टीस पडतात.

आतांपर्यंत या नवीन पंथाचें अंतिम साध्य काय आहे, याचें विवेचन केलें. आतां, या नवीन शस्त्रावांचून आम्हांला सद्यःस्थितींतून मुक्त होण्यास दुसरें कोणतेंच साधन नाहीं; हें नवीन शस्त्र हाच काय तो तरणोपाय आहे, एवढें सिद्ध करावयाचें आहे. या प्रतिकारापासून इष्ट सिद्धि करून घ्यावयाची असेल, तर प्रथमतः एक मध्यवर्ती सर्वसत्ताधीश राजकीय संस्था निर्माण केली पाहिजे, हें पहिल्या लेखांत सांगितलेंच आहे. स्वावलंबनाच्या साहाय्यानें ही संस्था प्रतिकाराचें खड्ग हातांत घेऊन जेव्हां एकदां रणमैदानावर येऊन

उभी राहील, तेव्हां तिच्या पराक्रमापुढें सर्व जग दिपून जाईल आणि आपल्या अधिकारांत आणि वैभवमदांत सर्व जगाला कस्पट समजणारे झारसारखे प्रबल राजेदेखील तिजपुढें माना वांकवूं लागतील. प्रतिकाराची जोड मिळाल्याशिवाय नुसत्या स्वावलंबनानें राष्ट्रकार्य होणें शक्य नाहीं. प्रतिकारसामर्थ्य जर लोकांच्या टिकाणीं आलें नसेल, निदान प्रतिकार-बुद्धि त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली नसेल, तर नुसत्या राष्ट्रीय शिक्षणाच्या शेंकडो शाळा आणि विश्वविद्यालयें काढलीं तरी शिक्षणाचीं जीं सूत्रें सरकारनें आपल्या हातीं ठेविलीं आहेत, तीं आपणांला हिसकून घेतां यावयाचीं नाहींत. ही प्रतिकारबुद्धि जर लोकांच्या ठायीं जागरूक नसेल, तर नुसत्या स्वावलंबनाच्या जोरावर जोमास आणलेला औद्योगिक उन्नतीचा वृक्ष करांच्या भारानें आणि कायद्यांच्या मारानें जमीनदोस्त करून टाकण्याचें परकीय सरकारचें सामर्थ्य आपणांस केव्हांच मर्यादित करतां यावयाचें नाहीं. त्याचप्रमाणें या प्रतिकारसामर्थ्याच्या अभावीं नुसत्या ग्रामपंचायती स्थापून न्यायदानाचे निमित्तानें कोट्यावधि रुपयांच्या दक्षिणेच्या प्रचंड ओघास आपणांस बांध घालतां यावयाचा नाहीं. या गोष्टी लोकांस कितीहि सुखकारक असल्या, तरी त्यांपासून सरकारी तिजोरीस आणि सत्तेस चट्टा बसणार असल्यामुळें कांहीं तरी असह्य जाच झाल्याशिवाय आपल्या सामर्थ्यास आपण होऊन केव्हांही आळा घालणार नाहीं. तरुण मुलांचीं कोंवळीं मनें देशविघातक मतांच्या जादूनें भारून टाकणें हें परकीय सरकारास अवश्य आहे. देशांतील सर्व संपत्तीची मनास वाटेल तशी लूट करण्याकरितां म्हणून तर ते येथें आले आहेत. लोकांना कमकुवत, भेकड, नामर्द आणि परावलंबी बनविण्याकरितां तर न्यायाचीं कोर्टें स्थापन करण्यांत आलीं आहेत ! अशा प्रकारच्या अमर्याद सत्तेचा आपण होऊन त्याग करतील, नुसत्या विनवणीनें, अर्जानें किंवा खुशामतीनें त्याग करतील, इतके मूर्ख इंग्रज लोक खात्रीनें नाहींत ! कोणत्याना कोणत्या तरी प्रतिकाराशिवाय ही गोष्ट साध्य नाहीं. नुसत्या स्वावलंबनानें जरी कदाचित् शिक्षणव्यवस्थेंतील कांहीं दोष काढण्याकडे किंवा न्यायखात्याची व्यवस्था विशेष सुकर करण्याकडे सरकारची प्रवृत्ति झाली, तरी नवीन पंथाचें

अंतिम साध्य—स्वराज्यप्राप्ति, तें सिद्ध होण्यास यापासून फारशी मदत होणार नाहीं. कांहीं तात्त्विक सुधारणा घडवून आणाव्या, किंवा कोणालाही आपल्या चालीपासून उपद्रव होणार नाहीं अशी खबरदारी घेऊन नंतर देशाभिमानाचीं कृत्यें करावीं, असें नवीन पंथाचें मत नाहीं. त्यांचें साध्य ठरलेलें आहे व त्याच्या प्राप्तीकरितां म्हणून त्याची धडपड सुरू आहे. देशांतील तरुण पिढीच्या मनावर कांहीं विशेष तऱ्हेचे संस्कार झाल्याशिवाय आणि त्यांच्या आचरणांत एक प्रकारचा करारीपणा आल्याशिवाय स्वराज्यसिद्धीकरितां लागणाऱ्या घनघोर संग्रामांत दोन हात करणें त्यांना शक्य नाहीं; म्हणून आम्ही राष्ट्रीय विद्यापीठाची अत्यंत अवश्यकता आहे, असें प्रतिपादन करतों. असें करतांना आमची शिक्षणपद्धति तात्त्विक दृष्ट्या उत्तम आहे कीं नाहीं, हा प्रश्न आमच्या डोळ्यांपुढें उभा रहात नाहीं. देशांतील उद्योगधंद्याची वाढ व्हावी म्हणून आमची खटपट सारखी सुरू आहे. परंतु बहिष्कारावांचून स्वदेशी अळणी आहे, असें आम्हास वाटतें. लॉर्ड मिंटोनें वर्णिलेली "प्रामाणिक स्वदेशी" आम्हांस बिलकूल मान्य नाहीं. स्वदेशी चळवळ ही राजकीय हेतुंकरितांच अवतीर्ण झाली आहे आणि ही गोष्ट आम्हाला लपवून ठेवावीशी वाटत नाहीं. आमच्या देशांतील लोक बहुश्रुत, विद्वान्, सधन आणि कलाकुशल कसे निपजतील, हा प्रश्न आमच्या पुढें नसून परसत्तेच्या सावटाखालीं वठणीस लागलेला स्वातंत्र्यवृक्ष पुन्हा टवटवीत कसा होईल, पारतंत्र्याच्या खग्रास ग्रहणानें काळाठिक्कर पडलेला स्वातंत्र्यसूर्य पुन: एकवार ग्रहणमुक्त केव्हां होईल, हाच काय तो मुख्य प्रश्न आहे. नामशेष व्हावयाच्या स्थितीस पोहोंचलेल्या भरतभूमीस मृत्यूच्या दाढेंतून ओढून काढून तिच्या थंडगार बनलेल्या मृतपिंडांत पुन: तेज आणि चैतन्य कसें आणितां येईल, हा सर्वांत अत्यंत महत्त्वाचा प्रश्न सर्व विचारी माणसापुढें अहर्निश उभा आहे. आणि म्हणूनच नवीन पंथाच्या प्रमुख पुढाऱ्यांत इतर किरकोळ बाबतींत कितीहि मतभेद असला, तरी या एका साध्यासंबंधानें त्यांच्यांत मतैक्य आहे. हल्लींच्या दुर्धर आणि सर्वथैव आमच्या अवनतीस कारणीभूत असलेल्या स्थितींतून आपली मुक्तता करून घेण्याकरितां एक प्रतिकारसमर्थ संस्था निर्माण

करून तिच्या द्वारें स्वराज्यप्राप्ति करून घेणें हाच आमचा तरणोपाय आहे, असें नवीन पंथानें ठरविलें आहे.

---

## लेखांक ७ वा

आतांपर्यंत संरक्षक प्रतिकाराच्या स्वरूपाचें, त्यांत अंतर्भूत होणाऱ्या मार्गांच्या ग्राह्याग्राह्यतेचें विवेचन झालें. संरक्षक प्रतिकारयोगांतील अंतिम साधन जें कर–दान–निषेध तेवढें टाकून बहिष्कारप्रमुख इतर सर्व साधनांचा उपयोग आपण आज करून घेतला पाहिजे, असा सिद्धांत मागील लेखांत प्रतिपादन केला आहे. बुद्धिबळाचा डाव खेळत असतां खेळाडू प्रत्येक मोहरें मागें पुढें देतांना मोहऱ्याच्या गतीमुळें उलट बाजूचा गडी आपलें मोहरें कसें लावील व त्याचा एकंदर डावावर काय परिणाम होईल, याचा अगोदर विचार करीत असतो. असा विचार न करतां 'उचल प्यादें कीं ठेव कोठेंतरी' असा हुडेलहप्पी खेळ खेळेल, तर त्यावर मात व्हावयास कांहींच उशीर लागणार नाहीं. बुद्धिबळाचा खेळ म्हणजे गहन राजकारणाची छोटीशी प्रतिमा आहे व पेशवाईंत तर या खेळाला राजकारण शिकविण्याच्या शाळेची योग्यता प्राप्त झाली होती. आपल्या हालचालीवर तोड करण्याकरितां शत्रूला आपल्या सैन्याच्या हालचालींत काय फेरबदल करावे लागतील, याचा अजमास न करतां एकदम हल्ला चढविणारा सेनापति, मग तो कितीही शूर असला तरी स्वतःसह एकंदर सैन्यास मृत्यूचे दरींत केव्हां लोटील, याचा नेम नाहीं. "भिक्षां देही" च्या मार्गाच्या वेळीं आपल्या राजकीय चळवळीकडे सरकार ज्या दृष्टीनें पाहात होतें त्याच दृष्टीनें संरक्षक प्रतिकाराकडेहि पाहील असा आपला समज करून घेऊन जर आपण गेरसावध राहूं, तर आपलें कार्य तडीस नेण्याचें काम आपल्या हातून पुरें होण्याची मुळींच आशा नको! या आपल्या बदललेल्या धोरणानुसार सरकारच्या वर्तनांतही फरक पडलाच पाहिजे; आणि आपली राष्ट्रजागृतीची चळवळ हाणून पाडण्याकरितां सरकार कोणत्या कडक अगर सौम्य उपायांची योजना करील याचेंहि निदान ठरवून त्यावर उलट उपायांची योजना करून ठेविली पाहिजे.

तूर्त तरी कायद्याचें जाणूनबुजून उल्लंघन न करतां जें करतां येईल तें केलें पाहिजे, असें मागील लेखांत संरक्षक प्रतिकाराच्या स्वरूपाचें विवेचन करतांना सांगितलें आहे. परंतु कायदे करणारांकडून न्याय, नीति, आणि युक्ति याचें उल्लंघन न करितां जर कायदे करण्यांत आले, तरच वरील धोरण आपणांला कायम ठेवितां येईल, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. नाहींतर वरिष्ठ कायदेकौन्सिलमध्यें लोकनियुक्त सभासदांच्या मतास धाब्यावर बसवून चळवळीला हाणून पाडण्याकरितां वाटेल तो कायदा सरकार पास करील, आणि लेखणीच्या पराक्रमानेंच आपली चळवळ नामशेष करून सोडील! याचें ठळक उदाहरण पीनल कोडामध्यें १२४ अ आणि १५३ अ हीं कलमें जेव्हां घालण्यांत आलीं व लोकमताची मुस्कुटदाबी करण्यांत आली, तेव्हां सर्वांच्या अवलोकनांत आलें. पूर्वीं असलेल्या राजद्रोहाच्या कलमांत वर्तमानपत्रांतील लेख येत नाहींत, पण त्यांतील टीका तर विषाप्रमाणें असह्य आहे, असें पाहतांच चामर्स साहेबांनीं त्या कलमाचें स्वरूप अत्यंत कडक करून ठेविलें. सरकारच्या विरुद्ध कोणी कांहीं लिहिलें किंवा भाषण केलें तर अधिकाऱ्यांच्या मनांत आल्यास त्याजवर राजद्रोहाचा खटला सहज करतां येतो व त्यांतून निर्दोष निघण्याची आरोपीला बिलकूल आशा नाहीं, हें गेल्या दहा वर्षांत राजद्रोहाचे जे खटले झालेले आहेत, त्यांवरून सहज दिसून येणार आहे. अशा कायद्यांची विल्हेवाट कशी लावावयाची, हें गेल्या दहा वर्षांत वक्त्यांच्या भाषणांतून आणि लेखकांच्या लेखांतून तीव्रतेचा पारा किती अंशानें वर चढला आहे, हें पाहिलें म्हणजे आपोआप समजतें. दुर्वासाच्या मागें लागलेल्या सुदर्शनाप्रमाणें किंवा डायोक्लीजच्या डोकीवर केशांतरानें लोंबणाऱ्या तरवारीप्रमाणें शाश्वत भीति उत्पन्न करणाऱ्या या १२४ अ ची, यत्किंचित्‌ही दिक्कत न बाळगतां, वर्तमानपत्राच्या संपादकांनीं आपलें लोकशिक्षणाचें काम निर्भीड रीतीनें, प्रसंगानुसार सौम्य अगर कडक भाषा वापरून केलें आहे. १८९८ च्या कायद्यानंतरच जहाल पक्षानें तीर्थविधि केलेल्या एखाद्या विधवा स्त्रीप्रमाणें सामाजिक सुधारणेस एका कोपऱ्यांत लोटून आपल्या कर्तबगारीस आरंभ केला आहे,

आणि या पतित आणि मरणोन्मुख भूदेवीच्या मुखावर भावि आशेच्या आनंदाची अंधुक छटा उमटलेली आज आपणांस दृष्टीस पडत आहे. सरकारी अधिकाऱ्यांनीं चालविलेल्या बेकायदेशीर आणि जुलमी वर्तनास कायदेशीर ठरविण्याकरितां जुन्या कायद्यांतच केवळ सोईस्कर फेरफार करण्यांत येतात, इतकेंच नव्हे, तर नवीन स्वतंत्र कायदेही याच उद्देशानें करण्यांत येतात. कर्झनसाहेबांच्या कारकीर्दींत व्हाइस् चॅन्सेलरसाहेबांच्या व त्यांच्याबरोबर री ओढूं लागणाऱ्या पांढऱ्या लोकांनीं युनिव्हर्सिटीच्या बाबतींत कायद्याला पायांखालीं तुडवून जी अंदाधुंदी केली, तिचें समर्थन करण्याकरितां वरिष्ठ कायदे कौंसिलांत पास करून घेतलेला ‘ व्हॅलिडेशन ॲक्ट ’ वरील विधानाची उत्तम साक्ष पटवितो. दरवडेखोरांना घरांतून घालविण्याकरितां प्रसंगास उचित अशा उपायांची योजना करणें ही गोष्ट जशी स्वसंरक्षणाच्या कायद्यांत येते, त्याचप्रमाणें राजकीय चळवळ हाणून पाडण्याकरितां केलेल्या कायद्याकडे दुर्लक्ष करून धिमेपणानें आपलें कर्तव्य करीत राहणें हें देखील स्वसंरक्षणांतच येईल. मग त्याबद्दल व्यक्तिश्च्या कितीहि शारीरिक किंवा मानसिक त्रास झाला तरी बेहत्तर. युक्ति आणि नीति यांच्या विरुद्ध असलेले कायदे करणारें सरकार केवढेंहि समर्थ असलें, तरी त्या कायद्याकडे दुर्लक्ष करून आपलें चळवळीचें काम चालू ठेविलें पाहिजे, असें या नवीन पंथानें ठरविलें आहे. राजद्रोहाच्या कायद्यांच्या प्रकरणांत लोकांनीं कित्ता घालून दिलाच आहे, तोच लोक पुढेंहि वळवितील व ती गोष्ट या नवीन पंथास मान्य आहे.

परंतु जुलुमास प्रवृत्त झालेल्या सरकारचें मन इतकें साशंक बनलेलें असतें कीं, बेकायदेशीर वर्तनास कायदेशीर ठरविण्याचा परीस हातांत असूनहि त्याचा उपयोग करून घेण्याचें धैर्य त्यास होत नाहीं. कायदेकौन्सिलांतून कायदा पास होण्यापूर्वीं चर्चेकरितां तो अगोदर प्रसिद्ध करावा लागतो व त्यावर अनुकूल व प्रतिकूल टीकेचा सारखा भडिमार होत असतो. त्यामुळें कदाचित् विलायतेंतील लोकांवर परिणाम होऊन कायदा अगदीं प्रथम स्वरूपांतच पसार होईल कीं नाहीं, याविषयीं सरकारला खात्री वाटत नस. त्यामुळें लोकांतील शांततेच्या संरक्षणाकरितां जे विशेष अधिकार पोलीस

खात्यांतील व अंमल खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांस कायद्यानें देऊन ठेविले आहेत, त्यांचा दुरुपयोग या चळवळीचा वीमोड करण्याकरितां करण्यास हे अधिकारी बिलकूल कचरत नाहींत, हें पंजाब व बंगालमधील सद्यः-स्थितीवरून दिसून येणार आहे. शांततापधान चळवळीस बंड ठरवून लोकांच्या पुढाऱ्यांना अपरिचित आणि अश्रुत अशा कायद्याअन्वयें हद्दपार करणें, लोकमतचर्चेच्या सभा बंद करणें, विद्यार्थी आणि शिक्षक यांना केवळ गुलाम बनविणारे व वर्तमानपत्रांची मुस्कुटदाबी करणारे ठराव प्रसिद्ध करणें, इत्यादि प्रकार आज सुरू करण्यांत आले आहेत. असल्या प्रकारांच्या उपायांची योजना न झाल्यास माझ्या जिल्ह्यांतील शांततेचा भंग होईल, असा भयोत्पादक निरोप वरिष्ठ अधिकाऱ्यापुढें पाठविल्या-बरोबर त्याजकडून संमति मिळते व कायदे करण्याच्या वृथा खटाटोपांत पडण्याची कांहींच जरूरी राहत नाहीं; आणि नवीन ठरावानें तर अशी आवश्यकताच राहिली नाहीं. असल्या जुलमी ठरावांना आणि हुकुमांना धैर्यानें तोंड देणें हेंच योग्य आहे. "वंदेमातरम्" संबंधानें काढलेला हुकूम लोकांकडून बंगालमध्यें मुळींच पाळण्यांत आला नाहीं. सुरेंद्रनाथ बानर्जीसारख्या नेमस्त पुढाऱ्यांनीं या हुकुमाचें जाणून बुजून उल्लंघन केलें. अशा प्रकारामुळें कांहीं लोकांस थोडासा त्रास झाला, पण सरक्युलर परत घेणें सरकारास भाग पडलें. सभाप्रतिबंधाचा हुकूम निर्माल्यवत् करण्याचा उत्तम उपाय म्हणजे एकसमयावच्छेदेंकरून गांवोगांव पोलि-सला न जुमानतां सभा भरविणें हाच होय, असा उपदेश बंगालचे पुढारी करीत आहेत, आणि या दिशेनें त्यांनीं कार्य करण्यास सुरवातहि केली आहे. अशा प्रकारें जागोजाग सभा भरल्या म्हणजे इतक्या सभा मोडण्यास पुरेसे पोलीस सरकारजवळ नाहींत व केव्हांहि राहणें शक्य नाहीं. बरें, सर्व अधिकाऱ्यांनीं आपली शक्ति या कामाकडेच खर्च केली, तर जो गोंधळ उडून जाईल, त्यामुळें शांततेच्या काळांत सरकारी तिजोरींत येऊन पडणाऱ्या पैशाचा प्रवाह बराच मंद होईल, आणि मग सरकारला वरील प्रकारचे हुकूम रद्द करावे लागतील. असें एक दोन प्रसंगीं अनुभवास आल्यावर मग ते या भानगडींत पडण्याचें सोडून देतील. तेव्हां हिंदुस्थानसरकार

किंवा स्थानिक अधिकारी यांनीं मतस्वातंत्र्य किंवा वर्तनस्वातंत्र्य खच्ची करून टाकण्याकरितां काढलेली कातर बोथट करून टाकणें हें नवीन पंथाचें दुसरें कलम आहे.

ज्यांच्या हिताविरुद्ध ही चळवळ आहे, त्यांनीं ती हाणून पाडण्याकरितां प्रयत्न केला तर त्यांत अस्वाभाविक असें कांहीं नाहीं. त्यांनीं चालविलेलीं कारस्थानें हीं नेहेमीं आपल्या हिताला विघातकच असावयाचीं, व मनुष्य त्यांच्या बंदोबस्ताच्या तयारींतहि असतो. परंतु याशिवाय आणखी कांहीं शत्रू आहेत, त्यांना ‘ गुप्तशत्रु ’ किंवा ‘ कुऱ्हाडीचे दांडे ’ असें नांव देतां येईल ! या गुप्तशत्रूंची खोड जिरविण्याचें काम कठीण आहे. कारण त्यांच्या कंपूंत क्षुल्लक स्वार्थास्तव देशद्रोह करण्यास प्रवृत्त झालेले आपले आप्तस्वकीय यांचीच भरती विशेष असते. या गोतास काळ होणाऱ्या कुऱ्हाडीच्या दांडयाचा वेळींच निकाल लावला नाहीं,तर ऐनवेळीं आपली मसलत फसून आपण सरकारच्या तावडींत अचानक जाऊन पडूं. स्वकीयांच्या आणि प्रेमी माणसांच्या हालचालीवर लक्ष न ठेविल्यामुळें ज्यूलियस सीझरसारख्या जगज्जेत्यास अंतकाळीं “ ब्रूटस, अरे तूंहि पण त्यांच्यांत आहेस ! ” असे निराशेचे उद्‌गार काढून प्राणांस मुकावें लागलें ! मोहामुळें स्वकीयांकडून चाललेल्या गोष्टींकडे आपण पुष्कळ वेळां कानाडोळा करीत असतों; व अखेरीस त्यांचें कारस्थान दृढ झालें म्हणजे मूग गिळून दैवाधीनत्व पत्करणं भाग पडतें. प्लासीच्या लढाईत सुराजउद्दवल्यावर व त्यामुळें एकंदर भरतखंडावर जो प्रसंग ओढवला तो इंग्रजांच्या तरवारीनें नव्हे, तर मीरजाफरच्या विश्वासघातकी आणि देशद्रोही वर्तनामुळें ! खाजगी वैमनस्याकरितां सर्व भरतभूमीस यवनदास्याच्या नरकांत लोटून देण्यास जयचंदासारखे देशद्रोही लोकच कारणीभूत झाले! या लोकांचीं कारस्थानें प्राथमिक स्थितींत अत्यंत क्षुल्लक वाटतात पण पुढें तीं देशहिताला विलक्षण विघातक होतात, हें लक्षांत ठेवूनच आपण त्यांच्या बंदोबस्तास अगदीं आरंभापासून लागलें पाहिजे. राष्ट्रोद्धारक चळवळीला प्रतिकूल असलेल्या आणि परकी सरकारची कांस धरणाऱ्या देशबुडव्यांवर सामाजिक बहिष्कार घालून त्यांचे धार्मिक आणि सामाजिक व्यवहार बंद पाडिले पाहिजेत. त्यांची समाजांत

छीथू केली पाहिजे! घराच्या बाहेर तोंड काढण्याचें त्यांना मुष्किल करून सोडलें पाहिजे!! या प्रकाराला लोक फाजीलपणा म्हणतील तर म्हणोत; पण असल्या निंद्य मार्गापासून देशबंधूंस परावृत्त करण्याचें यासारखें दुसरें साधन नाहीं. “ विलायती मालावर तर बहिष्कार घालाच, पण लोकमताला न जुमानतां विलायती माल मोठ्या ऐटीनें वापरणाऱ्या अधमांवरहि बहिष्कार घाला ”—असें सुब्रह्मण्यम् अय्यर यांनीं एके ठिकाणीं बोलून दाखविलें, त्याचें बीज तरी हेंच आहे. अधर्माचरण हातून घडल्यास त्या दोषी माणसाचे न्हावी व धोबी बंद करण्याची चाल फार पुरातन काळापासून आपणांत चालू आहे. देशोन्नतीकरितां चाललेली धडपड हें एक अतिपवित्र धर्मकृत्यच आहे आणि या धर्मकृत्यास प्रतिकूल असलेल्या स्वकीय राक्षसांना शासन करून ताळ्यावर आणणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे. सामाजिक बहिष्काराचा पाठिंबा मिळाल्याशिवाय राजकीय बहिष्कार यशस्वी होणें शक्य नाहीं, हें बंगालच्या उदाहरणावरून दिसून येण्यासारखें आहे. साखर, कापड आणि मीठ या तीन जिनसांवर बहिष्कार घालण्याचा निश्चय सर्व राष्ट्रानें केला असतां पश्चिम बंगाल्यांत त्या बहिष्काराची आंच विलायती व्यापाऱ्यांस चांगली पोहोंचल्यासारखी दिसत नाहीं. याचें मुख्य कारण हें आहे कीं, ही राष्ट्रीय आज्ञा उल्लंघन करणारांना समाजाकडून योग्य शासन मिळत नाहीं. समाजानें आपल्या ठिकाणीं असलेल्या सामर्थ्याचा उपयोग या देशद्रोही स्वार्थी लोकांच्या विरुद्ध करून त्यांना चिरडून टाकिलें पाहिजे. असल्या कांहीं व्यक्ती सपशेल निपचित झाल्या म्हणजे या देशद्रोह्यांच्या खाणींत नवीन धोंडे सांपडण्याचें आपोआप बंद होतें. उघड बंडाच्या वेळीं विश्वासघाताचें जितकें भय आहे, त्यापेक्षां संरक्षक प्रतिकारासारख्या गुप्तपणें सरकारवर हल्ला करणाऱ्या गनिमी युद्धांत जास्त आहे. सशस्त्र प्रतिकारांत विश्वासघातानें बिघडविलेली मसलत धमक असली तर तरवारीच्या धारेनें पुन्हां सुधरवितां येते. पण संरक्षक प्रतिकाराची घडी जर एकदम बिनसली, तर पुन्हां नीट जमवितांना विश्वकर्म्याची अक्कल गुंग होऊन जाईल! पंचवीस वर्षांचें कार्य एका तीन दिवसांच्या विश्वासघातकी लोकांच्या कृत्यानें जमीनदोस्त होऊन जाईल! मग अधिकाऱ्यांपुढें तोंड वेंगाडण्याचा ‘भिक्षां देहि’चा मार्ग किंवा

सशस्त्र प्रतिकार याशिवाय जुलमी सत्तेला ताळ्यावर आणण्याचें दुसरें साधन आपणांपाशीं राहणार नाहीं. म्हणून संरक्षक प्रतिकाराचें तिसरें कलम असें कीं, देशद्रोही व राष्ट्रीय आशांचें उल्लंघन करणाऱ्या निमकहराम लोकांवर सामाजिक व धार्मिक बहिष्कार घालून त्यांची सर्वत्र नाचक्की व फटफजिती करणें हेंहि सर्वांचें कर्तव्य आहे.

---

## लेखांक ८ वा.

संरक्षक प्रतिकार पूर्णपणें यशस्वी होण्यास ज्या तीन गोष्टींची जरूरी आहे, त्यांचें विवेचन मागील लेखांत केलें आहे. जुलमी आणि अन्यायी कायदे मोडण्याची जर आपली तयारी नसली, तर हल्लीं असलेल्या कायद्यांच्या संख्येंत एक दोन जास्त कायद्यांची भर घालून सरकारला आपली चळवळ सहज चिरडून टाकितां येईल. इतक्या सहज रीतीनें जी चळवळ चिरडून टाकितां येईल, ती करून न करून सारखेंच. त्याचप्रमाणें सर्वत्र कडक व उद्दाम हुकुमाची अंमलबजावणी सुरू करून थोडया महिन्यांच्या आंतच चळवळ नामशेष करणें सरकारला मुळींच जड जाणार नाहीं. तेव्हां अशा जुलमी हुकुमास फेंटाळून देऊन आपण आपल्या नैसर्गिक नागरिकांच्या हक्कांचा पूर्ण उपभोग घेतला पाहिजे. अशाच रीतीनें एकंदर लोकमतानें ठरविलेल्या गोष्टींचें जाणून बुजून केवळ सोयीसाठीं किंवा स्वार्थासाठीं उल्लंघन करणाऱ्या देशद्रोही व्यक्तींवर बहिष्कार टाकून त्यांना त्यांची स्थिति असह्य करून सोडिली पाहिजे. संरक्षक प्रतिकाराचीं हीं तीन मूलाधार सूत्रें आहेत, असें म्हटलें तरी चालेल. उपयुक्तता मान्य करून प्रसंगविशेषीं अम्मलबजावणी करण्यांत जर प्रतिकारवादी कचरतील, तर त्यांच्या चळवळीस यश येण्याचा फारच थोडा संभव आहे

परंतु या निःशस्त्र प्रतिकारास देखील कांहीं मर्यादा आहे. एखादा डाव चालला असतां दोन्ही बाजूंचे गडी जेथपर्यंत खेळाच्या सर्वसामान्य नियमांस अनुसरून खेळतात तेथपर्यंत ठीक असतें; पण एका पक्षानें या नियमांची पर्वा न करितां जर 'रोती' किंवा 'रडकी' खेळावयास आरंभ केला, तर

दुसरा पक्ष मग नियमबद्ध खेळ खेळण्यास मुळींच बांधला जात नाहीं. हा जसा लहान मुलांच्या खेळांतील नियम आहे, तोच नियम राजपक्ष आणि लोकपक्ष यांमधील तंटयासहि लागू होतो. कायद्याचें अतिक्रमण केल्याबद्दल सभाचालक व्यक्तिशः शिक्षा भोगण्यास तयार असूनहि सरकारच्या खुनशी आणि विकारवश अधिकाऱ्यांचें तेवढयानें समाधान न होतां एकंदर सभास्थानांत एकत्र झालेल्या जनसमूहावर गोळी झाडण्याचा किंवा अशस्त्र श्रोत्यांचीं डोकीं पोलीसच्या दंडुक्यांनीं मुद्दाम फोडण्याचा सररहा हुकूम देतील, तर मग संरक्षक प्रतिकारवाद्यांनीं निमूटपणें इतका उपमर्द सहन करणें हें त्यांच्या पौरुषास सर्वस्वी लाजिरवाणें होईल. अशा वेळीं सभास्थानांत येऊन धुडगूस घालणाऱ्या अधमांची—मग ते सरकारनें फेंकलेल्या मासिक तुकडयावर चरितार्थ चालवून शेंपूट हलविणारे श्ववृत्ति गुरखे असोत, किंवा सरकारच्या चिथावणीनें अन्यायास प्रवृत्त झालेले निमकहराम देशद्रोही गुंड असोत–त्या सर्वांची कणीक मऊ करणें हेंच आपल्या माणुसकीस शोभण्यासारखें होईल. काळा डगला किंवा सैन्यांतील शिपायांचा खाकी पोषाख हा त्यावेळीं आपल्या आत्मसंरक्षणाच्या हक्कास मुळींच बाधक होणार नाहीं. मेमनसिंग येथील विद्यार्थ्यांनीं किंवा कोमिल्ला येथील तरूण जवानमर्दांनीं, मुसलमान दंगेखोरांनीं, त्यांच्या प्रोत्साहकांनीं आणि अनुयायांनीं केलेला हल्ला परतविण्याकरितां जेव्हां हातांत लाठया घेतल्या, तेव्हां ते केवळ आत्मसंरक्षणाच्या आपल्या हक्काचा उपयोग करीत होते. इतकेंच नव्हे, तर ज्या प्रतापी बंदुकीच्या बारानें पूर्वबंगालमधील अधिकारी आपल्या कुंभकर्णी निद्रेंतून एकदम जागे झाले, तो बार जर एखाद्या निरपराधी अबलेचें पातिव्रत्य रक्षण करण्याकरितां, तिचा आडदांड दंगेखोरांकडून होणारा छळ, विटंबना आणि बेअब्रू बचाविण्याकरितां म्हणून इतर साधनांच्या अभावीं निरुपायास्तव करण्यांत आला असेल, आणि ती गोळी अशा एखाद्या मानवजातीस कालिमा आणणाऱ्या मांगहृदयी चांडाळाची छाती फोडून गेली असेल, तर ही बंदुक झाडणारांचें कृत्य आत्मसंरक्षणार्थ नव्हतें, असें कोण म्हणेल ! नवीन पंथानें जरी संरक्षक प्रतिकाराचा अंगिकार केला आहे, तरी झालेला जुलूम निमूटपणें बिनबोभाट सहन करणें हें या पंथाचें ब्रीद नाहीं.

तथापि त्याच्या उलट एखाद्या लहानशा झटापटींत किंवा क्षुल्लक मारामारींत चार दोन शेदाड शिपायांची रग जिरविणाऱ्या किंवा दहा पांच भेकाड गांवगुंडांना सैरावैरा जीव घेऊन पळावयास लावणाऱ्या तरण्याबांड मडळीचें 'योद्धा' किंवा 'वीरशिरोमणि' म्हणून अभिनंदन करणें इत्यादि दिखाऊ प्रकारहि या नवीन पंथास मुळींच मान्य नाहींत. चळवळीच्या आरंभीं आरंभीं दंग्याच्या वेळीं पगडी खालीं पडल्यामुळें एखादा दंडा मस्तकांत बसल्याबरोबर त्यावर उठलेल्या टेंगुळानें आपली मान उंच करून लोकांपुढें प्रदर्शन करण्याचा, व "देशकार्यार्थ प्राण अर्पणारा वीर" असा बहुमान उपटण्याचा आणि असल्या क्षुल्लक शारीरिक त्रासाची येशू ख्रिस्तानें मानव जातीच्या पापोद्धरणार्थ केलेल्या बायबलवर्णित स्वार्थत्यागाशीं तुलना करण्याचा लज्जास्पद प्रकार कोठें कोठें सुरू झाला होता. असल्या पोरकट मानाभिलाषाचा नवीन पंथास अत्यंत तिटकारा आहे. राष्ट्रकार्याकरितां तुरुंगवास, असह्य जाच, संसार सुखाची राखरांगोळी, इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष मृत्यु इत्यादि आपत्तींना धैर्यानें तोंड देऊन पुढें पाऊल टाकणाऱ्या नरशार्दूलासच काय तीं स्वार्थत्यागी, वीरशिरोमणि अशीं बहुमानाचीं उपपदें मिळतील. या उपपदांची खैरात वाटणें म्हणजे त्यांतील महत्त्व न ओळखणें होय. पावसाळ्यांत ज्याप्रमाणें दगडाखालीं विंचू हा आपला ठेवलेलाच, तसा खऱ्या स्वार्थत्यागाचा सुकाळ होण्याइतकें पुण्य या पृथ्वींतील कोणत्याच देशानें केलेलें नाहीं. आणि म्हणूनच, गल्लोगल्लीं ज्याप्रमाणं 'रावसाहेब' आणि 'रावबहादुरें' लागलीं आहेत, तशीं स्वार्थत्यागी माणसें मिळणें केव्हांहि संभवनीय नाहीं. कल्पनातीत हालअपेष्टा सहन केल्याशिवाय, टांकीचे घाव खाल्याशिवाय अंगीं देवपण येत नाहीं, असें नवीन पंथाचें ठाम मत आहे. वीस वर्षांपूर्वीं स्नानसंध्याशील कर्मठ ब्राह्मण मंडळींसमोर एखादा वारुणीचा पेला झोंकणारा, विषयलालसेस्तव एखाद्या तरुण व संपन्नपितृक गतभर्तृकेस सनाथ करणारा, प्रत्येक चटोर व टारगा समाजसुधारक आपणास 'ल्यूथर' म्हणवूं लागल्यानें ज्याप्रमाणें समाजसुधारणेचें कार्य अजिबात नासतें, तद्वतच थोडीशी दंग्यांत दुखापत झालेला, दंग्यांत पगडी

हरवलेला, एखाद्या खटल्यांत साधी कैद भोगणारा, प्रत्येक हूड गृहस्थ जर आपणास वॉशिंग्टन, मॅझिनी, ग्यारिबॉल्डी, किंवा प्रत्यक्ष श्रीशिवाजी महाराज म्हणवून घेऊं लागला, तर नवीन पंथाची देखील थोड्याच दिवसांत तीच गति होईल ! नवीन पंथाची रचना विशेष गंभीर तत्त्वावर झालेली आहे. उद्दाम मनोवृत्तीचें मुद्दाम पोषण करण्याकरितां अथवा त्यांच्या उपशमनार्थच केवळ त्याचा अवतार नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. तथापि देशांतील लोकांना खरे मर्द, धाडशी आणि कार्यक्षम करणें हें त्यांतील महत्त्वाचें कलम आहे. नवीन पंथास हिंदुस्थान हें पर्तीचा असह्य जाच मोठ्या धैर्यानें सहन करणाऱ्या अबलांचें बनवावयाचें नसून आपल्या दिव्य साध्याकरितां प्रसंगोपात्त रणांगणांत दोन हात करणाऱ्या जवानमर्द रणधुरंधरांचें हें राष्ट्र करावयाचें आहे ! हें कार्य फार कठीण व कालांतरानें साधणारें आहे, हें नवीन पंथ जाणून आहे.

संरक्षक प्रतिकाराचा रबर जरी पुष्कळ लवचीक आहे व प्रतिपक्षाकडून होणाऱ्या हालचाली निर्मूल करण्याकरितां आपण त्याला आतांपर्यंत बराच ताणला, तथापि त्यालाहि कांहीं मर्यादा आहे. प्रतिपक्षाच्या हालचाली वर निरूपण केलेल्या प्रकारापेक्षां जर जास्त तीव्र व उग्र व्हावयास लागल्या, तर त्यावर तोड करण्याकरितां जर हा रबर आपण जास्त ताणूं, तर तो तुटून जाईल. अशा वेळीं निःशस्त्र प्रतिकाराचें कवच फेंकून देऊन प्रक्षोभक प्रतिकाराचें चिलखत अंगांत चढविणें योग्य होतें, असें जगाचा इतिहास शिकवितो. निःशस्त्रप्रतिकार हा मुख्यत्वेंकरून सोशिकपणाचा, सहनशीलतेचाच मार्ग आहे व सहनशीलतेला कांहीं निसर्गरेखित मर्यादा आहे. त्याच्या पलीकडे सहन होणें शक्य नसतें. स्पार्टाच्या रणमैदानावर जेव्हां शत्रूशीं झुंजण्याकरितां स्पार्टन लोकांचें सैन्य व्यूह करून उभें राहिलें, त्यासरशीं त्याजवर शत्रूंनीं बाणांची प्रचंड वृष्टि केली व हजारो योद्ध्यांना घायाळ करून सोडिलें ! शत्रूकडून मारा सारखा सुरू होता; परंतु स्पार्टन सैन्यांतून मात्र एक देखील, तीर सुटला नव्हता. सेनापति आतां आज्ञा करील, अमळशानें हुकूम देईल, अशी सर्व सैन्य सारखी मार्गप्रतीक्षा करीत होतें. इतक्यांत "चढवा हल्ला" असा हुकूम मिळतांच स्पार्टन सैन्यानें सर्व शत्रूंस हां हां म्हणतां धुळींत

लोळविलें. हा हुकूम देण्यांत एका क्षणाचा जर अधिक विलंब लागला असता, तर सर्व स्पार्टन शिपायांनीं एकतर रणांगणावरून धूम पळ काढिला असता किंवा ते शत्रूवर बेहोष तुटून तरी पडले असते! कारण, शत्रूचा अचूक व असह्य मार इत्युत्तर सहन करणें हें त्यांना मुळींच शक्य नव्हतें! ही जशी त्यांची स्थिति, तशीच स्थिति संरक्षक प्रतिकाराची आहे. नवीन पंथाला संरक्षक प्रतिकाराचेंच स्तोम माजवावयाचें नाहीं, किंवा दुसऱ्या कोणत्याही मार्गाचे पोवाडे गावयाचे नाहींत. जगाचा इतिहास, व्यावहारिक अनुभव, राजनीतीचीं मूलतत्त्वें यांच्या सहाय्यानें विचार केला असतां, प्रस्तुत प्रसंगीं भरतखंडास स्वोद्धारार्थ, 'संरक्षक प्रतिकार' इष्ट आहे इतकेंच त्यानें ठरविलें आहे. हल्लींच्या परिस्थितींत एकदम क्रांति झाल्यास त्याला हा प्रतिकार सोडून द्यावा लागेल, हें तो जाणून आहे. परंतु जोंपर्यंत असा प्रसंग येत नाहीं, तोंपर्यंत या मार्गानें जाण्याचा त्याचा विचार आहे. राष्ट्रदेवता ही त्याचें आराध्य दैवत आहे, आणि स्वराज्यप्राप्ति एवढी सिद्धि त्याला मागावयाची आहे. मग ती प्राप्त होण्याकरितां करावी लागणारी भक्ति किंवा तपश्चर्या कितीही खडतर असली, तरी कांहीं हरकत नाहीं.

---

## लेखांक ७ वा

## उपसंहार.

गेल्या आठ लेखांत संरक्षक प्रतिकाराच्या ज्या तत्त्वांचें निरूपण केलें, व जीं प्रमेयें उद्धृत केलीं, त्या सर्वांचा या लेखांत समारोप करून आज या विषयाचा निरोप घ्यावयाचा विचार आहे.

संरक्षक प्रतिकाराचें-नव्हे-आमच्या एकंदर राष्ट्रीय चळवळीचें अंतिम साध्य स्वराज्यप्राप्ति आहे, ही गोष्ट गेल्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष आणि नवीन पंथाचे वृद्ध सेनापति पितामह दादाभाई नौरोजी यांनीं राष्ट्रीय सभेच्या पवित्र आणि पूज्य व्यासपीठावरून आपल्या अधिकारयुक्त वाणीनें सांगितली आहे, इतकेंच नव्हे, तर एका लहानशा पण जोरदार, सूचक व अर्थपूर्ण वाक्यांत

त्या स्वराज्याची रूपरेषाहि त्यांनीं काढून दाखविली आहे. संयुक्त राज्यांत ( ग्रेटब्रिटन व आयर्लंड ) जें स्वातंत्र्य नांदत आहे, तशा प्रकारचें स्वातंत्र्य या भरतखंडास प्राप्त करून देणें हें या राष्ट्रीय पुढाऱ्यांचें, विशेषत: नवीन पिढीचें अत्यंत पवित्र कर्तव्य आहे, असें त्यांनीं मोठ्या कळकळीनें व निक्षून वारंवार प्रतिपादन केलें आहे. ही आमच्या वृद्ध पितामहांची शेवटची इच्छा त्यांनीं आपल्या अंतकाळीं आपल्या आवडत्या नातवंडांपुढें व्यक्त केली आहे. शरपंजरीं पडलेल्या भीष्माचार्यांनीं " मी तृषाक्रांत आहे, मला थोडेंसें पाणी पाजा " असें काकुळतीस येऊन सांगितल्याबरोबर दुर्योधनादि कौरव चांदीची स्वच्छ झारी भरून आणण्याकरितां घराकडे जाऊं लागले असतां भीष्माचार्यांनीं "असल्या झारीच्या घोटभर पाण्यानें रणांगणावर तृषा शमविणारा हा गांगेय भीष्म नव्हे, " असे धीरोदात्त उद्गार काढून दुर्योधनाच्या व तत्पक्षीयांच्या कृतीचा निषेध केला व अर्जुन, भीम, युद्धिष्ठिरादि पंच पांडवांकडे त्यांनीं आपली दृष्टि फेंकली, तेव्हां अर्जुनानें तत्काल एका बाणासरशीं पातालवाहिनी भोगावतीचा प्रवाह ऊर्ध्वगामी करून तिच्या पवित्र उदकाची अखंड धारा पितामहांच्या मुखांत अचूक आणून सोडिली ! तेव्हां भीष्माचार्यांनीं मोठ्या प्रेमानें अर्जुनाला आलिंगन देऊन त्याच्या मस्तकाचें अवघ्राण केलें व त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेविला. अशाच रीतीनें आमच्या वृद्ध पितामहांची अंतकाळची तृषा शांत करण्याकरितां जुन्या पक्षांतील लोक रुप्याच्या करंड्यांतून अधिकाऱ्यांना मानपत्रें देऊन किंवा सोन्याचीं भिक्षापात्रें किंवा मखमलीच्या झोळ्या पुढें करून सरकारी अधिकाऱ्यांनीं दयार्द्र होऊन टाकलेले कांहीं हक्कांचे तुकडे घेऊन ते आमच्या पितामहांकडे येतील, तर त्यांचाहि ते तसाच निषेध करतील ! बहिष्काराचा तीर मारून पातालगत स्वातंत्र्य-भोगावतीच्या निर्मल उदकाची अखंड धारा त्यांच्या मुखांत आणून सोडणाऱ्या अर्जुनासच त्यांचा शुभ आशीर्वाद मिळणार आहे, हें नवीन पंथानें पक्कें लक्षांत ठेविलें आहे. स्वराज्यप्राप्तीपेक्षां कनिष्ठ प्रतीचें ध्येय अखिल भरतखंडांतील लोकांचीं मनें हलवून सोडूं शकणार नाहीं, त्यांच्या ठिकाणीं असलेल्या प्रचंड कर्तुम् अकर्तुम् समर्थ अशा गुप्त शक्तीला प्रकट करूं शकणार नाहीं किंवा त्यांना आत्मसामर्थ्याचा प्रत्यय आणून

देऊं शकणार नाहीं. एवढें मोठें कार्य घडवून आणण्यास स्वराज्यप्राप्तीसारखें उदात्त ध्येयच त्यांच्या डोळ्यासमोर रात्रंदिवस उभें असलें पाहिजे.

अशा प्रकारची सिद्धि प्राप्त व्हावयाचीं एकंदर शक्य अशक्य मिळून तीन साधनें आहेत. "भिक्षां देहि" मार्गानें हें कार्य होईल असें समजणारे लोक परकीयांच्या मादक आश्वासनांच्या सेवनाच्या कैफांत निःशंकपणें गुंग झाले आहेत ! त्यांचा कैफ अजून उतरला नाहीं. स्वावलंबनाच्या मार्गानें देखील आपण इष्ट स्थळास जाऊन पोहोंचूंच, अशी हमी त्यांना देतां येत नाहीं. तथापि, बरींच वर्षें पारतन्त्र्यांत काढल्यामुळें अंगीं जडलेल्या दुर्गुणांचें क्षालन करण्याकरितां या गंगोत्रीची कष्टयात्रा आपणाला केलीच पाहिजे, परंतु त्याबरोबरच या बिकट यात्रेंतील असह्य थंडीनें आपण वाटेंतच गारठलें जाऊं नये, किंवा परकीय क्रूर व हिंस्र श्वापदांपासून आपल्या जीवास अपाय होऊं नये, म्हणून जर आपण संरक्षक प्रतिकाराचा लोंकरी झगा अंगावर घातला, व प्रतिकारसामर्थ्याचें हत्यार जवळ बाळगलें, तर ही यात्रा सुखरूप रीतीनें आपणांला पार पाडितां येईल, असें हल्लींच्या स्थितीवरून अनुमान होतें. .

राष्ट्रीय सभेनें आपली मखमली झोळी अजून फाडून टाकिली नाहीं, तरी फाटलेल्या जागीं टांचे मारण्याचें तिनें सोडून दिलें आहे, व बरीच जीर्ण झाल्यामुळें ती लवकरच कुचकामाची होऊन तिचा सर्वस्वी तिला त्याग करणें भाग पडेल, असें उघड दिसत आहे. तिनें स्वावलंबनाच्या मार्गाचा थोडाबहुत अंगिकार केला आहे, परंतु ती राजकीय सत्ता आपल्या स्वाधीन करून घेण्याकरितां हा सर्व खटाटोप आहे. तिचें आनुकूल्यच या मार्गाला राहील व ती या देशांत चिरस्थायी होईल, अशा भ्रामक समजुती-वरच स्वावलंबनाला राष्ट्रीय सभेच्या ओसरीवर आपलें बिऱ्हाड ठेवावयास अवसर मिळालेला आहे. संरक्षक प्रतिकाराच्या बागुलबोवाला पाहून आमचे वतनदार पुढारी एखाद्या लहान पोराप्रमाणें भिऊन धूम पळत सुटतात ! तथापि भीतभीतच कां होईना, पण बहिष्कार 'कायदेशीर' आहे हें तत्त्व त्यांनीं मान्य केलें आहे. या दोन पक्षांत गेल्या राष्ट्रीय सभेचे वेळीं ही जी

तडजोड निघाली, ती कांहीं अंशीं समाधानकारक आहे हें खरें, पण एवढयानें नवीन पंथाचें कायमचें व खरें समाधान होत नाहीं. परकीय सरकार स्वदेशी चळवळीसारख्या त्यांच्या हितास प्रत्यक्ष विघातक गोष्टी सहन करून आम्हांस स्वावलंबन करण्यास प्रोत्साहन देईल, अशा भ्रामक कल्पनांस अर्धचंद्र देण्याची त्यानें तयारी चालविलेली आहे. " जेव्हां ग्रीक लोक उदार अंतःकरणानें आम्हांला कांहीं द्यावयाला येतात, तेव्हां देखील त्यांत कांहीं तरी कपट असेल, अशी आम्हांस भीति वाटते " हे लाआकूननें आपले शत्रू जे ग्रीक लोक त्यांविषयीं काढलेले सार्थ उद्‌गार प्रत्येक भारतवर्षीय देशभक्तानें हृत्पटलावर कोरून ठेविले पाहिजेत, असें या पंथाचें मत आहे. ' स्वदेशींत ' केवळ राष्ट्रीय शिक्षण किंवा औद्योगिक चळवळ एवढयाचाच अंतर्भाव न करितां, स्वदेशी दवाखाने, स्वदेशी न्यायमंदिरें, स्वदेशी विमा कंपन्या—सर्व कांहीं स्वदेशी बनवून परकीयांपुढें तोंड वेंगाडण्याचा प्रसंग टाळण्याच्या खटपटीस सर्व पुढाऱ्यांनीं लागलें पाहिजे. परकीयांच्या मालाला, त्यांच्या कचेऱ्यांना, त्यांच्या नोकऱ्यांना, इतकेंच नव्हे तर ज्यांत ज्यांत स्वत्वाचा अभाव, व परत्वाचा प्रादुर्भाव असेल, त्या सर्व बाबींस हळूहळू बहिष्कार घातला पाहिजे. बंगालमधील बहिष्काराची चळवळ हल्लीं केवळ विलायती मालापुरतीच आहे. परंतु तिचें क्षेत्र क्रमाक्रमानें वाढवीत वाढवीत सरकारी अधिकारी व परकीय व्यापारी यांनीं व्यापिलेली सर्व विस्तीर्ण भूमि आच्छादितां येईल, एवढें भव्य स्वरूप तिला देण्याची खटपट तिकडील पुढारी करीत आहेत.

स्वराज्य चालविण्यास समर्थ अशी जनता राष्ट्रांत निर्माण करणें व प्रत्येक कोनाकोपऱ्यांतून क्रमाक्रमानें परकीयांच्या जागीं आपलें स्वामित्व कायम करणें असें नव्या पंथाच्या पद्धतीचें दुहेरी धोरण आहे. इशाऱ्यासरशीं आपलें धोरण प्रक्षोभक करतां आलें पाहिजे, हें लक्षांत ठेवून तूर्त नव्या पंथानें संरक्षक प्रतिकाराचाच अवलंब केला आहे. एवढयाचकरितां सद्यःस्थितींत करदाननिषेधाची तीव्र कटयार प्रतिपक्षीयांच्या छातींत भोसकावयाचें सोडून अस्वलीप्रमाणें बहिष्कार व स्वदेशीच्या पंजाची मिठीच त्यांच्या मानेभोंवतीं घट्ट आंवळण्याची तजवीज त्यानें चालविली आहे. या प्रयत्नांत

कर देण्याचें अजिबात नाकारून सरकारी तिजोरी कोरडी ठणठणीत करण्याच्या ऐवजीं मद्यपाननिषेधाची चळवळ जोरानें चालवून सरकारच्या खजिन्यांत येऊन पडणाऱ्या अन्यायोपार्जित संपत्तीच्या प्रवाहास आटवून, सरकारी खजिना संपुष्टांत आणण्याचा आपण जारीनें प्रयत्न केला पाहिजे. फक्त वऱ्हाड व मध्यप्रांत मिळून अबकारीचें उत्पन्न सरासरी एक कोट रुपये आहे. त्याचप्रमाणें कोर्ट—फी, स्टॅम्प वगैरे आमच्या लक्षावधि रुपयांचा फन्ना उडवीत आहेत. तो द्रव्यौघ थांबविण्याकरितां गांवपंचायती स्थापन झाल्या पाहिजेत. जेथपर्यंत आमच्या मार्गांत कायद्यांचीं अनपेक्षित विघ्नें आणण्याच्या आडरानांत सरकार शिरणार नाहीं व आमच्या नैसर्गिक हक्कांची जबरीनें पायमल्ली करणार नाहीं, तेथपर्यंत आमची चळवळ कायद्यांनीं राखलेल्या मर्यादेच्या आंतच राखण्याचा आपण क्रम सुरू ठेवला पाहिजे. परंतु या आमच्या वैय्यक्तिक स्वातंत्र्यास मर्यादित करणारे अन्याय्य व जुलमी कायदे जर सरकार करील, तर हा निर्बंध पाळला जाणें शक्य नाहीं. अशा रीतीनें बेजबाबदार अधिकाऱ्यांनीं सोडलेले जुलमी वटहुकूम पाळले पाहिजेत, असा उपदेश करणाऱ्या किंवा राष्ट्राज्ञा मुद्दाम उल्लंघन करणाऱ्या देशद्रोह्याला राजद्रोह्यापेक्षांहि जास्त शासन सहन करावें लागतें, अशी बहुजनसमाजाची खात्री करून देण्याचा नवीन पंथानें दृढनिश्चय केला आहे.

सर्व देशभर निरनिराळ्या राजकीय संस्थांचें जाळें पसरून त्या सर्वांचें नियमन करणारी मध्यवर्ती राजकीय संस्था निर्माण करणें हा नवीन पंथाचा मुख्य उद्देश आहे; म्हणून राष्ट्रीय सभेला होतां होईल तों अशा तऱ्हेच्या वळणावर न्यावयाची त्याची खटपट सुरू आहे.

नवीन पंथांतील पुढाऱ्यांत मतवैचित्र्य कितीहि असलें, तरी स्वावलंबन व संरक्षक प्रतिकार हीं दोन राष्ट्रोद्धाराचीं साधनें आहेत, या बाबतींत यत्किंचित्‌हि मतभेद नाहीं. कित्येकांना संरक्षक प्रतिकाराच्या पुढील स्थितीची कल्पना नसेल, तर कित्येकांच्या दूरदृष्टीला भविष्यत्कालीन भीषण प्रसंगाचें अंधुक चित्र दिसत असेल. सारांश, संरक्षक प्रतिकार हा सध्याच्या स्थितींत उपयुक्त आहे, असें ऐकमत्य आहे. त्याच्या पलीकडील पायरी इष्टसिद्धी-

करितां केव्हां चढावी लागेल, याचा उहापोह करण्याची तूर्त कांहीं आवश्यकता नाहीं. राष्ट्रदेवीला पारतंत्र्यांतून काढून स्वातंत्र्याचा कुंकुमतिलक तिच्या मस्तकास लावावयाचा, एवढाच काय तो नवीन पंथाचा उद्देश आहे.

राष्ट्रोद्धार हा एक मोठा राजसूय यज्ञ आहे. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीयशिक्षण इत्यादि त्या यज्ञाचीं प्रधानांगें किंवा उपांगें आहेत. देवतांना सोमपान पाजून अवभृत स्नानानंतर स्वातंत्र्यफल आपणांस त्यांपासून घ्यावयाचें आहे. या यज्ञांतील कुंडांत धगधगणाऱ्या " चतुःशृंग सप्तजिह्व " अग्निनारायणाच्या तुष्टयर्थ आपणांजवळील सर्व द्रव्यांचें अर्पण केलें पाहिजे, नव्हे, आपणाला जें जें अत्यंत प्रिय असेल,त्या सर्वांची आहुति दिली पाहिजे. अखेरीस जरूर पडल्यास आपल्या प्राणांची पूर्णाहुति देऊन हा यज्ञ समाप्तीस नेला पाहिजे, असा नवीन पंथाचा कृतसंकल्प आहे.

'वंदेमातरम्'कर्ते म्हणतात—

" In any case, we must be prepared for the strenuous struggle, if we mean bussiness. The stress of action will make us a nation. It is through struggle, its inevitable failures and ultimate success, that we can attain the much-desired fitness. " याचा भावार्थ हाच कीं, आपण जर खरोखर कार्य ( राष्ट्रोद्धार ) साधणें असेल, तर त्याच्या सिध्यर्थ प्रचंड धडपडीची तयारी केली पाहिजे.(लढतां लढतां जसा योद्धा तयार होतो तद्वतच) कार्य करतां करतां स्वराष्ट्र तयार होईल. ठेंचा खातां खातां, व अपेश घेतां घेतांच पुढें यश मिळेल व आपण स्वराज्य करण्यास योग्य होऊं. असो. स्वराज्यप्राप्ति करून घ्यावयाची हा नवीन पंथाचा उद्देश आहे. या उद्देशानुकूल साधनें त्या पंथाला मान्य आहेत. कोणत्याहि एका विशिष्ट साधनाचा त्याला अभिमान नाहीं.फक्त पारतंत्र्य–पोषक साधनाभासाचा मात्र त्याजकडून निषेध करण्यांत येतो. सरंक्षक प्रतिकाराचा मार्ग हल्लींच्या परिस्थितींत बराच उपयोगी पडेल, असें त्याला वाटत असल्यामुळें तो त्या मार्गाचा उपदेश

करीत आहे. या मार्गानें कार्यसिद्धि झाली तर ठीकच आहे. नाहींतर निदान पुढील मार्ग तरी अधिक सुकर होईल. कसेंहि असलें, तरी 'शुभस्य शीघ्रम्' या न्यायानें आपण जितक्या लौकर या संरक्षक प्रतिकाराचा प्रत्यक्ष उपयोग करूं, तितकें आपण आपल्या साध्याच्या अधिक जवळ जाऊं व कालांतरानें मुक्कामाचें ठिकाण गाठूं, यांत तिळमात्र संदेह नाहीं.

# हिंदुधर्माची मीमांसा*

हरिः ॐ चत्वारि शृंगा त्रयो अस्य पादा द्वे शीर्षे सप्तहस्तासो अस्य । त्रिधा बद्धो वृषभो रोरवीति महो देवो मर्त्याँ आविवेश ॥

ऋग्वेद सं. २।३-२२।५

चतुर्विध पुरुषार्थ हींच ज्याचीं चार शृंगें आहेत, श्रुति, स्मृति व सदाचार हे ज्याचे तीन पाद आहेत, प्रवृत्ति व निवृत्ति हीं ज्याचीं दोन शीर्षें आहेत, वेदांगासहित षड्दर्शनें हे ज्याचे सप्त हस्त आहेत आणि ज्ञान, कर्म व योग या बंधनत्रयांनीं जो बद्ध झालेला आहे, असा दैदिप्यमान धर्म वृषभरूपानें गंभीर गर्जना करीत मर्त्यांत संचार करतो. —( भाषांतर-लेखककृत )

"वृषोहि भगवान् धर्मः ख्यातो लोकेषु भारत" या महाभारतांतील व्यासवचनानुसार हिंदुधर्माचें चित्र काढण्याचा प्रयत्न जर एखादा कुशल चित्रकार करील, तर त्या वृषभाच्या निरनिराळ्या अवयवांची योजना व ठेवण कशी रेखाटावी, याची कल्पना त्याला अवतरणात दिलेल्या मंत्रावरून बरोबर येईल. हिंदुधर्मांतील प्रमुख कल्पनांचा संग्रह संकेतरूपानें वरील मंत्रांत केला आहे. या मंत्राविषयीं वैदिक मतानुयायांची पूज्यबुद्धि इतकी विलक्षण आहे कीं, वरील मंत्र हा आपापल्या आवडत्या शास्त्राचें ऋषिप्रणित वर्णन आहे असें प्रत्येक शास्त्रकार समजतो व त्याच्या शास्त्राला जुळेल अशा रीतीनें त्याचा अर्थ करण्याचा प्रत्येकानें प्रयत्न केला आहे; म्हणूनच मींहि इतरत्र उपलब्ध नसलेल्या पद्धतीनें वरील मंत्राचा अर्थ करण्याचें धाडस केलें आहे. या पुरातन धर्माच्या स्तवनार्थ वैदिक ऋषींनीं मंजुळ सामें गाइलीं आहेत. भगवान् व्यासांसारख्यांनीं याच्या सत्वस्वरूपाचा सामान्य लोकांस बोध व्हावा म्हणून दयार्द्र अंतःकरणानें महाभारतसंहिता रचिली व अष्टादश पुराणांतून त्याच्या महतीचा विचार केला. अविद्याग्रस्त मूढ जनांच्या नेत्रांत ज्ञानांजन शलाका घालून चक्षुरुन्मीलन करण्याचा कपिलादि षड्दर्शनकारांनीं जो

* श्रुतिबोध-" सर्व धर्मांची परिषद्" संक्रांतीचा अंक १९१४.

प्रयत्न केला, तो केवळ याच्या यथार्थ रूपाचा व रहस्याचा विचारी लोकांना बोध व्हावा म्हणून. बौद्ध धर्मासारख्या अनीश्वरवादी मतांचें प्राबल्य होऊन जेव्हां अखिल भरतखंड पाखांडमय बनलें व चैतन्य विचारलुप्त झाल्यामुळें निर्वाण स्थिति ही पाषाणाचलतेचा अपरपर्याय म्हणून समजण्यांत याव-याला लागली, तेव्हां बालसंन्यास घेऊन शंकराचार्यांनीं आपल्या वाणीच्या व लेखणीच्या प्रभावानें जो आसेतु हिमाचल आर्यावर्त हलवून सोडला, तोहि या ऋषिप्रणित पुरातन धर्माकडे जनसमूहाची प्रवृत्ति व्हावी एवढ्याच साठीं. पुरातनकालींच हिंदुधर्माची पताका आकाशांत फडकवून तिच्या छत्राखालील शाश्वत सुखाच्या छायेंत सर्व जगतीतलावरील मनुष्यमात्राला आणून बसवि-ण्याचा भगीरथ प्रयत्न करणारे महात्मे उत्पन्न झाले, असें नसून, अलीकडे एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या पादांत विवेकानंदासारख्या तपस्वी पुरुषानें पृथ्वीप्रदक्षिणा करून अर्वाचीन शास्त्रपद्धतीनें त्यामधील तत्त्वाचें प्रतिपादन केलें व शिकागो येथें भरलेल्या धर्मपरिषदेंतील भिन्न भिन्न मतांच्या धर्मा-चार्यांना त्याच्या श्रेष्ठत्वाची साक्ष पटविली. शिकागोनंतर अनेक धर्मांच्या दर्श-नाचा हा मंगल प्रसंग पुन्हां प्राप्त झाला, हें पाहून या पुरातन हिंदुधर्मास अत्यंत धन्यता वाटते व तो त्या सर्वांचें अंतःकरणपूर्वक अभीष्ट चिंतन करतो; कारण त्याची पक्की समजूत आहे कीं, जगांतील सर्व धर्म मनुष्यप्राण्याच्या कल्याणाकरितांच उत्पन्न झाले आहेत व त्या त्या धर्माच्या अनुयायानें त्याचें योग्य परिपालन केल्यास प्रत्येक धर्म त्याच्या कल्याणास कारणीभूत होईल.

या अखिल धर्मदर्शनाच्या मंगलप्रसंगीं खेद मानण्यासारखें व्यंग एव-ढेंच आहे कीं, मागील अनेक प्रसंगीं या पुरातन हिंदु धर्माचें मंडन कर-ण्याचें कंकण ज्यांनीं बांधलें होतें, त्यांच्या योग्यतेचा विद्वान् आपणासमोर आज येत नसून, तें काम मजसारख्या एका ज्ञानलवदुर्विदग्धास करावें लागत आहे. एवढ्याच साठीं सर्वांस निक्षून विनंति आहे कीं, हिंदुधर्माचें रहस्य समजून घ्यावयाचें असेल, तर पुढें येणाऱ्या अल्प विवेचनावर आपली तृषा न भागवितां वरील महात्म्यांनीं आपलें बुद्धिवर्चस्व खर्च करून ग्रंथ-रूपानें जे गंभीर व गहन ज्ञानसागर निर्माण केले आहेत, त्या पवित्र तीर्थांत जाऊन स्नात व्हा, म्हणजे त्या सागराच्या तळाशीं असलेलीं गूढ

रहस्याचीं मौक्तिकें आपल्या हातास लागतील, तेव्हां आपणाला या गहन हिंदुधर्माच्या श्रेष्ठत्वाचेंच ज्ञान होईल. इतकेंच नाहीं, तर सच्चिदानंद नारायणाशीं आपली एकात्मता होऊन श्रेष्ठ कोण व कनिष्ठ कोण अशा प्रश्नाची परिषदा भरवून चर्चा करण्याची खटपटच उरणार नाहीं. इतका उपन्यास करून या प्रिय हिंदुधर्माच्या अल्पाध्ययनानें कळलेल्या रहस्याचें यथामति विवेचन करण्याचा मी उपक्रम करतों.

हिंदुधर्माची मीमांसा अनेक रीतींनीं करतां येण्यासारखी आहे. मीमांसा म्हणजे विचार. प्राथमिक स्थितींत वैदिक धर्माचें स्वरूप काय होतें, व पुढें परिस्थितीनुरूप रूपांतर कसें होत गेलें, याचें ऐतिहासिक दृष्ट्या विवेचन करणें हाहि एक मीमांसेचा प्रकार होऊ शकेल. हिंदुधर्माचें इतर धर्माहून भिन्न असें व्यतिरेक लक्षण बांधण्याचा प्रयत्नहि धर्ममीमांसाच होईल व याशिवाय इतर पद्धतींचें अवलंबन करूनहि धर्ममीमांसा करतां येईल; परंतु मी फक्त एकाच दृष्टीनें ही मीमांसा करणार आहें, हिंदुधर्म हा शब्द उच्चारल्याबरोबर ज्या अनेक कल्पनांचा समुदाय दृष्टीसमोर उभा राहतो, त्या सर्व कल्पनांना सामान्य अशी उपपत्ति काय आहे, एवढेंच मी पाहणार आहें. यामुळें हिंदुधर्मांतील कित्येक वादग्रस्त मुद्यांचा यांत उल्लेखदेखील येणार नाहीं. या उपपत्तीची मांडणी सयुक्तिक होण्याकरितां जेवढ्या कल्पनांचा निर्देश करणें जरूर आहे, तेवढ्यांचेंच परीक्षण थोडक्यांत करण्यांत येईल. ही उपपत्ति म्हणजे हिंदुधर्माचें भांडार उघडण्याची किल्ली आहे, व तिच्या साह्यानें या धर्मांतील प्रमुख प्रश्नांचें विवेचन करण्यास प्रवृत्त झालें असतां सकृद्दर्शनीं परस्परविरुद्ध दिसणाऱ्या कल्पना सुसंगत व व्यवस्थित आहेत, एवढी आपली खात्री होईल. अनेक वैचित्र्यांनीं युक्त असलेली व विविध पुष्पांत गुंफलेली ही हिंदुधर्माची माला ज्या एका सूत्रानें सूत्रित झालेली आहे, तें सूत्र काय आहे, हें पाहण्याचाच या निबंधाचा हेतु आहे.

परमेश्वरानें अनेकविध सृष्टि निर्माण केली, त्यांतच मनुष्यसृष्टीहि उत्पन्न झाली. धर्म हा इतर योनींकरितां नसून मनुष्यांकरितांच अवतीर्ण झाला. "मर्त्यान् आविवेश" या अवतरणांतर्गत मंत्रांतील

पदांचा अर्थ मर्त्यान्—मनुष्यान्—असा निरुक्तकारांनीं केला आहे व तो सर्वथैव योग्य आहे. सर्व भूतसृष्टींत मनुष्यप्राणी श्रेष्ठ आहे, ही कल्पना सर्व धर्मांना संमत आहे. मनुष्याचें इतर प्राण्यांहून श्रेष्ठत्व कशांत आहे, याचा विचार आर्यांच्या धर्मग्रंथांतून जितक्या सूक्ष्म रीतीनें केलेला आहे, तितका इतर धर्मग्रंथांतून केलेला क्वचित्‌च दृष्टीस पडतो. सकृद्दर्शनीं मनुष्याचें श्रेष्ठत्व प्रतिपादन करणारा सिद्धांत मोठासा गूढ आहे किंवा तो धर्मचर्चेंत विशेष निर्देशास पात्र आहे, असें पुष्कळांस वाटणार नाहीं; परंतु एखादें प्रमेय सर्वमान्य असलें, म्हणजे तें विशेष महत्त्वाचें नाहीं किंवा विशेष निर्देशास पात्र नाहीं, ही विचारसरणी कोणाहि समंजस मनुष्यास पटणार नाहीं. अत्यंत सामान्य व सर्वांस प्रत्यहीं अनुभवास येणाऱ्या गोष्टींकडे मननपूर्वक पाहण्याची संवय हा सर्व शास्त्रांचा पाया आहे आणि म्हणूनच मनुष्याचें इतर योनींहून श्रेष्ठत्व कशांत आहे, ही गोष्ट नीट समजून घेणें हें धर्म-वृक्षाचें बीज आहे. ह्या श्रेष्ठत्वाचा जितका जास्त सूक्ष्म विचार एखाद्या धर्मांत केला असेल, तितकी त्या धर्माची रचना जास्त पायाशुद्ध होईल व तितकीच त्या धर्माची इमारत भव्य व अधिक चिरंतन होईल.

धर्म हा मनुष्यांकरितांच निर्माण झाला, हें जितकें खरें आहे, तितकेंच तो मनुष्याबरोबरच जन्मास आला, हेंहि खरें आहे. मनुष्य व धर्म हे सहोदर आहेत. “ सह यज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः । अनेन प्रसविष्यध्व-मेष्वोऽस्त्विष्ट कामधुक् ” या भगवदुक्तींत धर्म व मनुष्य यांची सहोत्पत्ति स्पष्ट सांगितलेली आहे.

प्रजापतीनें प्रजेसह यज्ञ उत्पन्न केल्याचा सरलार्थ हाच कीं, प्रजोत्पत्ती-बरोबरच धर्मकल्पना सूक्ष्म रूपानें प्रादुर्भूत झाली. जेथें मनुष्य आहे, तेथें धर्म कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपानें असतोच. गर्भांत असलेल्या शिशूला अष्टम मासाच्या वेळीं बुद्धि उपस्थित होते व नवमासीं सर्वांगसंपूर्ण होतांच

“ मृतश्चाहं पुनर्जातो जातश्चाहं पुनर्मृतः
नानायोनि सहस्राणि मयोषितानियानि वै ॥
आहारा विविधा भुक्ताः पीता नानाविधाः स्तनाः
मातरो विविधा दृष्टाः पितरः सुहृदस्तथा ॥

आवाङ्मुख पीड्यमानो जन्तुश्चैव समन्वित:
सांख्ययोगं समभ्यस्येत् पुरुषं वा पंचविंशकम् ।

अशा तऱ्हेचा विचार तो गर्भस्थ शिशु करावयास लागतो. म्हणून जीं श्रुतींतून वचनें आढळतात, त्यांवरूनही धर्मकल्पना मनुष्यांत उत्पत्तिसिद्ध आहे–जन्मसिद्ध आहे–असें प्राचीन आर्यांचें मत होतें, हें स्पष्ट दिसतें. देवांनीं सृष्टयुत्पत्तीकरितां जे यज्ञ केले, " तानि धर्मानि प्रथमान्यासन् "–तेच प्रथम धर्म झाले, असें पुरुषसूक्तांत असलेलें वचन बहुतेक ब्राह्मणांच्या नित्यपाठांत आहे. तेव्हां मनुष्याबरोबर व मनुष्याकरितां निर्माण झालेला हा धर्म मनुष्याचें कोणतें कल्याण साधण्याकरितां अवतीर्ण झाला, याचें उत्तर देण्यापूर्वी, मनुष्याचें इतर प्राण्यांहून वैलक्षण्य कशांत आहे त्याची थोडीशी मीमांसा करणें जरूर आहे. कारण या वैलक्षण्याचा व धर्मकल्पनांचा फार निकट संबंध आहे हें वरील उद्धृत वचनावरून स्पष्ट दिसतें.

इतर प्राणी आणि मनुष्य यांच्या शरीररचनेंत कितीही फरक चर्मचक्षूंस दिसत असला तथापि अवयवांचें आकारवैचित्र्य व स्थलभेद यांपेक्षां तो फरक जास्त महत्त्वाचा नाहीं, हें सूक्ष्म दृष्टीनें पाहणाऱ्याच्या तेव्हांच लक्षांत येईल. इतर प्राणी आपापल्या अवयवांनीं ज्या क्रिया करतात, त्याच क्रिया मनुष्य स्वतःच्या इंद्रियांनीं करीत असतो. आहार, निद्रा, भय, मैथुन इत्यादि विकार मनुष्य आणि पश्वादिक प्राणी यांत सारखेच आहेत. असें असतांना परमेश्वरानें निर्माण केलेल्या भूतसृष्टींत मनुष्ययोनि श्रेष्ठ आहे, असें जें वारंवार प्रतिपादन करण्यांत येतें, त्याचा अर्थ काय? बाल्य, तारुण्य व जरा या तिन्ही अवस्था मर्त्य प्राण्यांना समान असतां मनुस्मृतींत "भूतानां प्राणिन: श्रेष्ठा: प्राणिनां बुद्धिजीविनः। बुद्धिमत्सु नराः श्रेष्ठाः। असें जें वचन आहे, त्याचें तात्पर्य काय? बुद्धिमत्ता हेंच मनुष्याचें वैलक्षण्य आहे. इतर प्राण्यांत बुद्धि नाहीं, ती मनुष्यांत आहे, हाच त्याचा मोठेपणा. कांहीं कांहीं प्राण्यांत थोडीबहुत बुद्धि असावी, असें प्राणिशास्त्रवेत्त्यांच्या म्हणण्यावरून दिसतें व मनुस्मृतींतील " प्राणिनां बुद्धिजीविनः। बुद्धि मत्सु नराः श्रेष्ठाः।" या वचनावरूनहि शास्त्रवेत्त्यांच्या या अनुमानास पुष्टि मिळते. तेव्हां इतर प्राण्यांतून क्वचित् आढळून येणारी बुद्धि व

मानवी बुद्धि यांच्यांत काय भेद आहे, हें पाहिलें पाहिजे. हेतुपूर्वक कार्य-सिध्यर्थ साधनयोजना करण्याची शक्ति (Deliberate adjustment of acts to ends) हा मानवी बुद्धींतील विशेष आहे. इतर प्राण्यांत दिसून येणाऱ्या बुद्धींत प्रयोजनाचा प्राय: अभाव असतो, परंतु मनुष्याची कोणतीहि क्रिया प्रयोजनशून्य असत नाहीं. " प्रयोजनमनुद्दिश्य न मंदोऽपि प्रवर्तते " असें संस्कृत भाषेंत एक सामान्य सुभाषितहि आहे.

हेतुपुरःसर कार्य करण्याची शक्ति हा मानवशास्त्राचा मुख्य विषय आहे. इंद्रियांकडून इष्ट कार्य घडवून आणण्याची प्रेरणा मनाकडून होते. प्रत्यक्ष कार्य दृष्टीस पडण्यापूर्वी कांहीं विशेष तयारी मनुष्याच्या अंतःकरणांत होत असते, व ही सर्व तयारी म्हणजे मनोव्यापार( Mental Activity ) आहे. या मनोव्यापाराचें सूक्ष्म पृथःकरण केलें असतां तीन अवस्था असल्याचें आपल्या दृष्टीस येईल. प्रथम विचाररूपानें ती क्रिया अंत:करणांत प्रगट होते, तद्नंतर तद्विषयक अनुकूल किंवा प्रतिकूल संवेदना उत्पन्न होतात; त्यापुढें तो विचार अनुकूल संवेदनांनीं युक्त असल्यास तें कार्य करण्याची इच्छा दृढ होते. या तीन स्थितींना पाश्चात्य शास्त्रवेत्त्यांनीं अनुक्रमें (Intellection) विचारावस्था, ( Feeling ) संवेदनावस्था, आणि ( Volition ) इच्छावस्था अशीं नांवें दिलीं आहेत. वरील अवस्थात्रयींतून गेल्याशिवाय कोणतीहि मनुष्यकृति घडत नाहीं. मानवी कार्य कितीहि क्षुल्लक असो वा महत् असो, तें प्रथमत: या अवस्थात्रयींच्या त्रिवेणी संगमांत स्नान होऊनच बाहेर पडतें. इतर व्यवहार व मनुष्यकृति यांत मुख्य भेद हा आहे. धर्माची कल्पना मनुष्यसृष्टीबरोबर अस्तित्वांत आली, असा हिंदुधर्माचा सिद्धांत असल्यामुळें हिंदुधर्मांतील ध्येयांशीं व वरील मानवी मनोव्यापारांशीं फार निकट संबंध आलेला आहे, किंबहुना, या मनोव्यापाराशिवाय दुसऱ्या कोणत्याहि मनुष्यस्थितीशीं हिंदुधर्मास फारसें कर्तव्य नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. "मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयो:" असें वेदव्यास कंठरवानें सांगत आहेत, याचें तरी बीज हेंच.

मनोव्यापारांतील या तीन अवस्थांना अत्यंत प्रगल्भ दशेस आणण्याचें साधन म्हणून धर्मकल्पना मनुष्ययोनीबरोबर जन्मास आली. धर्मकल्प-

नेची अगदीं प्राथमिक स्थिति जरी लक्षांत आणिली, तरी मानवी शक्तीहून प्रबळ अशी दुसरी एक शक्ति आहे व त्या शक्तीच्या सर्वस्वी आधीन मनुष्यकर्तृकक्रियांचें यशापयश व सुखदुःख आहे, अशा प्रकारचा समज तींत असल्याचें आपल्या दृष्टीस येतें. परंतु या शक्तीच्या स्वरूपाचें विवेचन सर्व मनुष्यसंघांत सारख्याच पद्धतीनें केलेलें दिसत नाहीं. कित्येक धर्मांतून परमेश्वर ही प्रेममूर्ति ( Love ) आहे, असें आढळून येईल, तर दुसऱ्या कित्येकांच्या मतें ईश्वर म्हणजे अहोरात्र युद्ध करून शत्रूंचा निःपात करणारा व शत्रुशोणिताचें आकंठ पान करणारा भीषण योद्धा आहे, असें दिसून येईल. कांहीं वनचरावस्थेंतील निषादादिकांस मृगयेच्या वेळीं आपल्या घनगंभीर गर्जनेनें भिववून सोडणाऱ्या सिंहव्याघ्रादि हिंस्र श्वापदांच्याच ठिकाणीं ईश्वराच्या प्रत्यक्ष स्वरूपाची प्रतिमा दृग्गोचर होईल, तर कृषिकर्मादिक शांत व्यवसायांत असलेल्या अन्य समाजास कालपर्जन्य पाहून कृषि सफल करणारे मेघ हेच ईश्वराचे अधिष्ठाते आहेत, अशी भावना उत्पन्न होईल. कित्येकांना ईश्वर हा नीतीचा सागर असें वाटेल, तर दुसऱ्यांना हा विद्यांचा अधिपति वाटून ते त्याचा धांवा करतील.

सारांश, ज्या स्थितीपर्यंत मनुष्यप्राणी पोहोंचला असेल, त्या स्थितीला अनुरूप अशी तो परमेश्वराची कल्पना करतो. तथापि कोणत्या ना कोणत्यातरी स्वरूपानें मनुष्यशक्तीहून श्रेष्ठ अशा दुसऱ्या शक्तीच्या उपासनेंत तो मग्न असल्याचें आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें. हिंदुधर्मांत जेव्हां धर्ममीमांसा व यज्ञमीमांसा करणारे तत्त्ववेत्ते व ब्रह्मवादी उत्पन्न झाले, त्या काळांत हिंदुसमाज हा प्रगल्भ दशेस येऊन पोहोंचला असल्यामुळें व मनुष्यप्राणी व इतर चौऱ्यांशी लक्ष योनींतील प्राणी यांतील वैलक्षण्याची मीमांसा करण्याची पोंच त्यांच्या ठायीं असल्यामुळें त्यांनीं या सर्वाधिष्ठात्री शक्तीच्या स्वरूपाचें वर्णन फारच व्यापक रीतीनें केलेलें आहे; इतकेंच केवळ नव्हे, तर त्या शक्तीशीं मनुष्यानें आपलें तादात्म्य करून घेणें व मनुष्य आणि वरील शक्ति यांमधील भेद कल्पनादृष्टीनें नाहींसा करून घेणें हेंच धर्माचें प्रयोजन आहे, अशा तऱ्हेचा सिद्धांत प्रतिपादन केला आहे.

धर्म शब्दाची व्याख्या आर्यग्रंथकारांनीं अनेक रीतींनें केलेली आहे.

कोणी साधनदृष्टीनें व्याख्या केली आहे, तर कोणी त्याच्यापासून प्राप्त होणाऱ्या साध्यावर दृष्टि ठेवून व्याख्या केलेली आहे. या अनेक व्याख्यांचा संग्रह करून त्याची एकवाक्यता ज्या मूलतत्त्वावर करतां येते, त्या तत्त्वाचें विवेचन वर थोडेंसें केलेलें आहे. पूर्वमीमांसेंत भगवान् जैमिनीनें 'चोदना लक्षणोऽर्थो धर्मः' अशी धर्मपदाची व्याख्या केली आहे व वैशेषिक दर्शनांत कणाद मुनींनीं "यतोऽभ्युदयनिःश्रेयसहेतुः" अशी धर्माची लक्षणा बांधलेली आहे. चोदनेच्या साहचर्यानें असणारी इतिकर्तव्यता हिलाच धर्म संज्ञा आहे, असें जैमिनी सांगतात तर अभ्युदय व निःश्रेयस् यांची प्राप्ति ज्यापासून होते, तो धर्म असा कणाद मुनींच्या वचनाचा आशय आहे. परस्परभिन्न दिसणाऱ्या या व्याख्या वस्तुतः एकच आहेत, व एकार्थाचेंच प्रतिपादन करतात, हें थोड्याशा विचारानें कळून येण्यासारखें आहे. चोदना म्हणजे काय? चोदना शब्दाचा धात्वर्थ प्रेरणा किंवा भावना असा आहे. कर्तव्यप्रतिपादक वचनांवरून मनुष्याच्या मनांत उत्पन्न होणारी जी स्थिति ती चोदना. हीं कर्तव्यप्रतिपादक वचनें श्रुतींतून असल्यामुळें श्रुतींतील विधिवाक्याला चोदना किंवा चोध अशी संज्ञा शास्त्रकारांनीं दिली आहे. वरील मनोभावना त्रिविध आहे, किंवा त्रिगुणात्मक आहे, असें वर विवेचन केलें आहे. विचार, संवेदना आणि इच्छा या तिन्हींचा समवाय 'भावना' या एका पदानें बोधित होतो; तेव्हां विचार, संवेदना आणि इच्छा या तिहींच्या संबंधीं जी जी कर्तव्यता तो तो धर्म, असा जैमिनीच्या वचनाचा अर्थ आहे. कणाद मुनींनीं ऐहिक व पारलौकिक हिताचें साधन धर्म आहे, असें जें म्हटलें आहे, त्यांत धर्माची व्याख्या करण्याचा प्रयत्न नसून त्यांत धर्माचें साध्य काय आहे, हें सांगण्याचा प्रयत्न केला आहे. धर्माचे उद्देश काय, या प्रश्नाचें उत्तर त्यांनीं दिलेलें आहे. धर्माचें स्वरूप काय, हा प्रश्न त्यांनीं विचारांतच घेतलेला नाहीं. ही गोष्ट लक्षांत ठेवली, म्हणजे या दोन व्याख्यांत मुळींच विरोध नाहीं हें तेव्हांच समजेल.

कोणताही धर्म आपल्या अनुयायांस ईश्वराची प्राप्ति व्हावी किंवा ईश्वराच्या प्रसादास आपले अनुयायी पात्र व्हावे, एवढ्यासाठीं अस्तित्वांत

आलेला असतो. मृत्यूनंतर ईश्वराच्या सन्निध आपण असावें, त्याच्या अत्यंत प्रियकर सेवकांत आपली गणना व्हावी, हीच महत्त्वाकांक्षा हिंदूंशिवाय इतर धर्मोपासकांत दृष्टीस पडते. परंतु हिंदुधर्मातील सत्पुरुषांची आकांक्षा जीवन्मुक्त होण्याची व ईश्वर व आपण यांत भेद नाहीं, अशी स्थिति प्राप्त करून घेण्याची असते. अद्वैतवाद हा हिंदुधर्माशिवाय इतरत्र कोठेंहि प्रतिपादिलेला आढळत नाहीं. अशा रीतीची स्थिति मनुष्य स्वकर्मानें प्राप्त करून घेऊं शकतो, ही कल्पना इतरांना मोठी विलक्षण व अयुक्तिक वाटते. परंतु परमेश्वराच्या स्वरूपाचें विवेचन हिंदुशास्त्रकारांनीं कसें केलें आहे, याचा विचार केला असतां या कल्पनेंत भांबावून जाण्यासारखें कांहींच नसून उलट इतकी सयुक्तिक दुसरी कोणतीच कल्पना नाहीं, हें आपल्या तेव्हांच लक्षांत येईल. तत्त्ववेत्त्यांनीं ईश्वराला सच्चिदानंद असें नांव दिलें आहे व सच्चिदानंदाहून भिन्न असें स्वरूप त्यास नाहीं, असें त्यांचें म्हणणें आहे. सत्, चित् आणि आनंद या तीन स्थितींनीं युक्त असें जें अखिल विश्वबीज तोच परमेश्वर, तीच अनाद्यंत शक्ति व तेंच परब्रह्म.

या तीन स्थितींशीं आणि वर सांगितलेल्या मनोव्यापारांतील तीन अवस्थांशीं काय संबंध आहे, तें पाहूं. पहिली विचारावस्था–मनुष्याच्या विचारशक्तीचें कार्य खरें काय आणि खोटें काय हें पाहण्याचें आहे. विचाराच्या कसोटीस कोणताहि प्रश्न लावण्याचा उद्देश सत्यपक्ष कोणता हें समजणें एवढाच असतो. हिचा जितका जास्त विकास तितकी सत्यपरीक्षणाची शक्ति वृद्धिंगत होत जाते. या शक्तीचा उपयोग करून मनुष्य जेव्हां सृष्टींतील विविध चमत्कारांचें अवलोकन करतो, तेव्हां या चमत्कारवैचित्र्याचें कारण काय, अशी त्यास जिज्ञासा उत्पन्न होते. आज पाहिलेल्या वस्तूंचें स्थित्यंतर दुसऱ्या दिवशीं दृष्टीस पडल्याबरोबर त्याच्या मनांत पूर्वीं अवलोकन केलेली स्थिति या वस्तूची नित्य नव्हे, असें अनुमान तो करतो; इतकेंच नाहीं, तर कांहीं काळानें ती अजीबात नाहींशी झालेली दिसते, तेव्हां ही वस्तु मुळींच शाश्वत नाहीं, असा त्याचा ग्रह होतो. याचप्रमाणें तो आपल्या दृष्टीचें क्षेत्र अधिकाधिक विस्तृत करून जसा जसा जास्त निरीक्षण करतो, तसतसें सभोवतीं दिस-

णाऱ्या लक्षावधि वस्तू–स्थावर व जंगम–या नित्य नसून नश्वर आहेत, अशी त्याच्या मनाची खात्री होत जाते व त्यानें आपला विचारक्रम असाच चालू ठेविल्यास दृश्य चमत्कारावरून बांधलेल्या अनुमानानें (Analogy) जगाचें बीज हेंच काय तें नित्य किंवा शाश्वत आहे, याच्याशिवाय दुसऱ्या सर्व वस्तू त्याचींच रूपांतरें किंवा स्थित्यंतरें आहेत, ही कल्पना त्याला अवगत होते. जगाचें बीज हेंच काय तें नित्य व सत्य आहे, असें ज्ञान त्यास होतें. " जन्मा द्यस्य यतः " या बादरायण सूत्रांतील दुसऱ्या सूत्रांत ब्रह्माचें हेंच लक्षण वरील विचारसरणीनें बांधलें आहे. जें नित्य आहे तें सत्य, व जें अनित्य किंवा अशाश्वत आहे तें असत्य. सत्य व नित्य हे पर्याय शब्द आहेत. अखिल ब्रह्मांडाचा कधीं न करपणारा अंकुर हेंच सत्य. तस्मात् परमेश्वर हा सत्यस्वरूप आहे, हाच सिद्धांत युक्तीस व तर्कास धरून आहे, असें त्यास दिसून येते.याच विचारशक्तीच्या जोरावर तो जेव्हां आपली दृष्टि भूगोलावरून खगोलावर फेंकतो आणि आकाशांत चमकणारे कोट्यावधि तारापुंज आपल्या तेजांनीं त्याची दृष्टि दिपवतात, तेव्हां त्या अनंतकोटी ब्रह्मांडाचें सद्बीजदेखील अनंत आहे, अशी प्रेरणा त्याच्या हृत्पटलावर बिंबून जाते. "सत्यं ज्ञानमनंत ब्रह्म" या सिद्धान्ताची त्यास स्फूर्ति होते, व अशा रीतीनें केवळ विचारशक्तीच्या बळावर तो सत्स्वरूपाचें आकलन करूं शकतो.

संवदेनाशक्तीमुळ मनुष्याला सुखदुःखाची जाणीव उत्पन्न होते. जगांत जें प्रेम व जो आनंद भरलेला आहे, त्या प्रेमाचा किंवा आनंदाचा सर्वांत मोठा वाटा मला मिळावा, म्हणून यच्चयावत् मनुष्यजातीची सारखी धडपड सुरू आहे. प्रत्येक इंद्रिय अनुकूल संवेदना होणाऱ्या वस्तूला अगदीं लालचावलेलें असतें; परंतु बारकाईनें विचार करणारास असा अनुभव येतो कीं, बहुतेक आनंदाच्या वस्तूंमधील आनंद थोडक्याच काळांत नाहींसा होतो. एकाच गोष्टीपासून नेहमीं टिकणारा आनंद त्यास मिळत नाहीं. खरोखर पाहतां आनंदानुभवाचा कंटाळा उत्पन्न न होतां आनंदाच्या प्रकाराचा कंटाळा उत्पन्न होतो. गुलाबाच्या फुलाच्या सुवासापासून उत्पन्न होणारा आनंद जर एक तासभर टिकणारा असला, तर मार्मिक

ग्रंथवाचनानें झालेला आनंद निदान एक दिवसभर तरी टिकतो. तेव्हां हळुहळूं मनुष्य जर अधिकाधिक उंच प्रतीच्या आनंदाच्या शोधार्थ निघाला, तर कल्पनेनें तरी त्याला असें वाटेल कीं, असें एक तत्त्व आहे कीं, ज्याचा प्रत्यय आला असतां आनंदास खंड नाहीं. संवेदना-मार्गानें परमेश्वरी तत्त्व आनंदमय आहे, असें तेव्हां त्यास कळून येईल. पृथ्वीतलावर दृष्टीस पडणाऱ्या कृमिकीटकादिकांपासून तों मनुष्यापर्यंतच्या सर्व योनींतील प्राण्यांची अहोरात्र चाललेली हालचाल, प्रत्यक्ष पृथ्वी व इतर सूर्यचंद्रादिकांचें परिभ्रमण, समाजांत होणाऱ्या क्रांती आणि विश्वांतील घडामोडी यांच्याकडे अवलोकन केलें असतां जिज्ञासू मनास त्या चेतनेच्या संतत प्रवाहाचें उगमस्थान कोठें असेल, असा विचार सहज उत्पन्न होतो, व अखिल ब्रह्मांडाला अव्याहत परिभ्रमणांत ठेवणारी ही मूळ शक्ति अत्यंत चैतन्ययुक्त असली पाहिजे, ही कल्पना त्याला सहज येते. म्हणूनच तो जगद्बीज–शक्ति ही चिन्मय आहे, असें समजतो.

"कारणगुणाः कार्ये संक्रामन्ति" असा न्यायशास्त्राचा सिद्धांत आहे. सृष्टि हें कार्य आहे व त्याचें कर्तृत्व परमेश्वराकडे असल्यामुळें तो त्याचें कारण आहे. या कार्यरूपी सृष्टींत तिच्यांतील अणूंतून व परमाणूंतूनदेखील त्यास सत्ता, आनंद आणि चैतन्य हींच भरलेलीं आहेत, असें दिसतांच या सर्वांचें कारण सच्चिदानंदस्वरूप आहे, असा त्यानें तर्क केल्यास–नव्हे, त्याचा दृढ-विश्वास बसल्यास तो अवास्तविक आहे, असें आपण म्हणाल काय? उपनिषदादि ग्रंथांतून ब्रह्मपदाचें सच्चिदानंद या शब्दांनीं वर्णन केलेलें आहे. हें शेंकडो वचनांवरून दाखवितां येईल.

मनुष्यप्राणी जितक्या गोष्टींचें अवलोकन करतो व ग्रहण करतो, त्या सर्व या तीन द्वारांपैकीं एकानें, दोहींनीं किंवा तिहींनीं ग्रहण करतो. जी वस्तु खरी, सुंदर व उपयुक्त अशा तिन्ही गुणांनीं युक्त असते, तिला तो फार किंमत देतो. तात्त्विक परिभाषेंत बोलावयाचें म्हणजे वस्तूचें उत्तमत्व किंवा गौणत्व तो तिच्यांतील सदंश, चिदंश व आनंदांश याच्या अधिक किंवा कमी प्रमाणावर ठरवितो. याहून अन्य तऱ्हेनें त्याच वस्तूची योग्यता ठरवितांच येत नाहीं. हा सिद्धान्त केवळ जड वस्तूलाच लागू नसून तो कल्पनांनाहि

लागू आहे. जी कल्पना सत्य, हृदयंगम आणि कार्यकारी या तिन्ही गुणांनीं अलंकृत असेल, तिची छाप मनुष्यावर सहज बसते, व थोर पुरुषांची कसोटी असल्या कल्पना प्रसवण्यांतच असते. ज्यानें असल्या कल्पनांची देणगी मनुष्यप्राण्याला दिली आहे, त्याच्या ऋणांतून मुक्त होण्याचे नानाविध उपाय तो योजीत असतो. त्याचीं स्तोत्रें गातो, त्याची पूजा करतो व त्याच्याविषयींचा आपला आदर अनेक तऱ्हांनीं तो व्यक्त करीत असतो, या सर्वांचें बीज एवढेंच आहे कीं, मनुष्याजवळ विचार, संवेदना आणि इच्छाशक्ति ऊर्फ चेतना या तीन श्रेष्ठपणाच्या कसोटी आहेत, म्हणूनच या तीन वृत्तींचें अनंत व अखंड अधिष्ठान जें असेल, तोच परमेश्वर असें जें हिंदुधर्मतत्त्ववेत्त्यांनीं ब्रह्मस्वरूपाचें निरूपण केलें आहे, तें यथार्थ आहे.

ज्या तीन अवस्थांचें श्रेष्ठ निधान परमेश्वर आहे, त्या तिन्ही अवस्था मनुष्याच्या ठिकाणीं जन्मसिद्ध आहेत व त्या अभ्यासानें वृद्धिंगत करतां येतात, ही कल्पना एकदां समाजांत नीट रुजली गेली, म्हणजे मनुष्य प्रयत्नांनीं परमेश्वर बनूं शकतो, ही कल्पना त्याच्या मागें ओघानेंच येणारी आहे. अद्वैतवाद उत्पन्न होण्यास वरील तऱ्हेची भूमिका मात्र पाहिजे. हिंदुधर्मानें मानसिक व्यापाराची मीमांसा करून मूळ तत्त्वाचा शोध लावल्यामुळें त्याच आधारस्तंभावर परमेश्वराविषयींच्या विवेचनाची भव्य इमारत उभारली गेली आहे. परब्रह्माशीं सरूपता, सलोकता व समीपता मिळवून सायुज्याची प्राप्ति मनुष्य करून घेऊं शकतो व तेंच मनुष्यजन्माचें इतिकर्तव्य आहे, असें निःसंदेह तत्त्व हिंदुधर्म कंठरवानें प्रतिपादन करतो.

ब्रह्मसायुज्य हेंच मनुष्यजन्माचें इतिकर्तव्य असें हिंदूंस कां वाटतें याचें खरें रहस्य त्या धर्मातील पुनर्जन्माची कल्पना नीट समजून घेतली असतां आपोआप उकलणारें आहे. जगांतील दुसऱ्या कोणत्याहि धर्माला हा पुनर्जन्मवाद मान्य नाहीं. परंतु आज हिंदुधर्मातील एखादा सिद्धांत जर पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांच्या विचारास जास्त आदरणीय झाला असेल, तर तो पुनर्जन्मवाद हाच होय. या एका कल्पनेमुळें प्राचीन हिंदु तत्त्ववेत्त्यांच्या विवेचक व सूक्ष्म पृथक्करण करणाऱ्या बुद्धीचें पाश्चात्य तत्त्ववेत्ते कौतुक करा-

वयास लागले व त्यांच्यांत सामान्यतः हिंदु तत्त्वज्ञानाच्या श्रेष्ठत्वाविषयीं आदरभाव उत्पन्न झाला. एकाच परिस्थितींत उत्पन्न झालेल्या दोन व्यक्तींच्या आयुष्यक्रमांत दिसणारें वैचित्र्य, बालपणींच एकांत दिसून येणारी कुशाग्रबुद्धि व दुसऱ्याच्या ठिकाणीं वास करणारें बुद्धिजाड्य इत्यादि अनेक वैविध्यांचें समाधानकारक स्पष्टीकरण करणारें जर कोणतें तत्त्व असेल, तर तें कर्मवाद व पुनर्जन्म हेंच होय. कर्मवाद व पुनर्जन्म हा तत्त्वज्ञानशास्त्रांतील अत्यंत क्रांतिकारक शोध ज्या ऋषींनीं लावला, त्यांनीं सृष्टींतील सर्व कूट प्रश्न सोडविले आहेत व अनंतकोटी ब्रह्मांडांतील चमत्कार त्यांना नयनसाक्ष झाले आहेत. पाश्चात्यांनीं परिणत स्थितीस आणिलेल्या भौतिक शास्त्रांचें मूलभूत प्रमेय असें आहे कीं, शक्ति ही अविनाश्य आहे, ती कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपानें आपलें अस्तित्व प्रगट करते; परंतु तिचा क्षय कधींहि होत नाहीं. जन्मास आलेला मनुष्य जन्मप्रभृतीति देहान्तापर्यंत ज्या क्रिया करीत असतो, त्या सर्व क्रियांच्या समवायानें उत्पन्न होणारी शक्ति पंचमहाभूतात्मक देहाचा पंचभूतांशीं संयोग होतांच नाहींशी होते, ही कल्पना वरील भौतिक शास्त्रवेत्त्यांना अत्यंत असमंजसपणाची वाटावी, हें स्वाभाविक आहे. तथापि त्या शक्तीचें रूपांतर काय होतें, याचें उत्तर त्यांना स्वतःच्या धर्मग्रंथांतून दिलेलें केव्हांच सांपडलेलें नाहीं. परंतु कर्मानुसार मृत मनुष्य फिरून जन्मास येतो, ही कल्पना उपनिषदादिक ग्रंथांतून त्यांच्या दृष्टीस पडल्याबरोबर कित्येक शतकेंपर्यंत यूरोपांतील तत्त्ववेत्त्यांस पडलेलें कोडें एकदम उकललें, व त्यांची दृष्टि ऋषिप्रणित धर्माविषयीं जास्त आदरयुक्तहि झाली. Law of Caution म्हणून पाश्चात्य न्यायशास्त्रांतून ज्या तत्त्वाचा मोठ्या गौरवानें निर्देश करण्यांत येतो त्यांत आणि हिंदु तत्त्वज्ञानांतील कर्मवादांत तिळभरहि भेद नाहीं. परंतु कर्मामुळें येणारा पुनर्जन्म मनुष्यांनीं टाळावा अशी हिंदुधर्माची अपेक्षा कां आहे, असा प्रश्न उत्पन्न झाल्यास वर परमेश्वराच्या सच्चिदानंद स्वरूपाचें जें विवरण केलें आहे, तिकडे थोडेंसें लक्षपूर्वक पाहिल्यास समजण्यासारखें आहे. मनुष्यांनीं मनुष्यदेहांत असून आपला कितीहि विकास करून घेतला तरी त्याची सत्ता, त्याचें प्रेम व त्याची कर्तृत्वशक्ति देहपातापर्यंत उत्पत्तिसिद्ध उपाधींमुळें, तो वास करीत असलेल्या भूगोलाच्या

पलीकडे कार्यकारी होणें दुरापास्त आहे. परंतु या भूगोलापलीकडे अनंतकोटी ब्रह्मांडांनीं गजबजलेला खगोल तो पाहात असतां त्या सर्वांतून आपलें अस्तित्व, आपलें प्रेम व आपलें कर्तृत्व प्रगट होणें हाच खरा या शक्तीचा पूर्ण विकास आहे व तो होणें म्हणजेच परमेश्वरस्वरूपाशीं एकतानता करून घेणें आहे. परंतु उत्पत्तिसिद्ध शरीरोपाधि ही त्या एकतानतेस अडथळा करणारी प्रचंड धोंड आहे. देहपातानंतर पुनरपि निरुपाधिक स्थितींत त्यास अधिष्ठान मिळेल, तरच मनुष्यांनीं स्वप्रयत्नानें पूर्ण विकसित केलेल्या शक्तिसामर्थ्यानें व्यक्तिभावास येणें शक्य आहे, ही कल्पना एकदां ग्रहण झाली म्हणजे उपाधींशीं वरील विकसित शक्तींची भेट होण्याचा योग येणार नाहीं, अशी स्थिति प्राप्त करून घेणें हेंच नरदेहाचें इतिकर्तव्य, ही विचारसरणी अगदीं क्रमप्राप्त व अपरिहार्य आहे. मनुष्य आपल्या कर्मानें कितीही पुण्याचा संचय करीत असला व देहपातानंतर यक्षगंधर्वादि श्रेष्ठ योनींतून जरी जीव जन्मास आला, तरी त्याच्या पूर्ण स्थितीस पोहोंचलेल्या वरील अवस्थात्रयींची क्रिया ही एकदेशीयच राहणार, म्हणून पुनर्जन्म तो दिव्य योनींत असो वा हीन योनींत असो—मुळींच नको, अशी गर्जना वेद वारंवार करतात.हिंदुधर्म दोन्ही हात वर करून सर्व जगास जन्ममरणाच्या फेऱ्यांतून आपणास मुक्त करून घ्या, असा उपदेश कंठरवानें करीत आहे,याचें तरी बीज हेंच आहे. अखिल ब्रह्मांडास व्यापून राहाणारी सत्ता, आनंद आणि चैतन्य यांशीं तादात्म्य पावणें हाच मनुष्यवैलक्षण्याचा आत्यंतिक विकास होय आणि हेंच ज्या हिंदुधर्माचें साध्य आहे, तो नरदेहास आलेल्या जीवांना ब्रह्मसायुज्य हाच परम पुरुषार्थ असें सांगत आहे, याचें कोणासहि आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

सभोंवतालच्या सृष्टीकडे पाहिलें असतां हेंच तत्त्व जागजागीं उपदेशिलें आहे असें, अवलोकनांत येतें. बीजापासून उत्पन्न झालेल्या वृक्षाची परिणति बीजस्थितींतच होते. परंतु ही बीजस्थिति जर तें बीज वृक्षाच्या वाढीस योग्य अशा जमीनींत म्हणजे उपाधींत पडणार नाहीं तरच टिकते; नाहींतर फिरून वृक्षत्वाला त्यास यावें लागतें. ब्रह्मसायुज्याशिवाय दृश्य व अदृश्य सृष्टींतील सत्तेशीं, चैतन्याशीं

व आनंदाशीं मनुष्यांतर्गत सत्ता, चैतन्य व आनंद यांनीं युक्त असलेला जीव कधींहि एकतानता पावणार नाहीं व उपाधींशीं जीवाचा संबंध टळल्याशिवाय देहस्थितींत केलेल्या अभ्यासानें मिळवलेली ही पात्रता व्यक्तिभावास येणार नाहीं; म्हणून पुनर्जन्मापासून पराङ्मुख होण्याविषयीं हिंदुधर्मशास्त्र वारंवार सूचना देत असतें.

हिंदुधर्माचें साध्य जें परब्रह्मस्वरूप व त्याच्या अनुषंगानें असणारे पुनर्जन्म व कर्मवाद यांचें येथपर्यंत विवेचन झालें; तरी हिंदुधर्माची मीमांसा संपली असें म्हणतां येत नाहीं. साध्याची कल्पना योग्य रीतीनें येण्याकरितां वरील दोन्ही वादांचें विस्तृत विवेचन करावें लागलें, व त्यामुळें पुनर्जन्मनिवृत्ति म्हणजेच मोक्ष व त्याचाच अर्थ ब्रह्मसायुज्य, या हिंदुधर्मांतील प्रमुख तत्वाची पुसट कल्पना तरी आपणांस खात्रीनें येईल; परंतु धर्म म्हणजे साध्य नसून साधन आहे, ती एक परमेश्वरप्राप्तीची किंवा ब्रह्मसायुज्याची सोपान परंपरा आहे, हा विचार केला म्हणजे धर्ममीमांसेला खरा आरंभ याच बिंदूपासून होतो, असें म्हणावें लागतें. षड्दर्शनकारांच्या, स्मृतिकारांच्या व इतर सामान्य हिंदु प्रबंधकारांच्या मतांनींसुद्धां ब्रह्मसायुज्य हें धर्माचें साध्य आहे व हें साध्य सिद्ध होईल, अशीच या पुराण हिंदुधर्माची रचना आहे, हें मी आतां खालील विवेचनांत दाखविण्याचा प्रयत्न करणार आहें.

मनुष्याची विचारशक्ति, संवेदना आणि चेतना यांचा आत्यंतिक विकास हेंच नरजन्माचें साध्य, हाच परम पुरुषार्थ आणि हीच नरदेहाची इतिकर्तव्यता हें हिंदुधर्माचें प्रमेय असल्यामुळें धर्मविचारास स्वाभाविकपणेंच त्रैविध्य किंवा त्रैमार्गत्व आलें आहे. ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग आणि कर्ममार्ग हीं वरील तीन वृत्तींच्या विकासाचीं तीन साधनें आहेत. ज्ञानानें विचारशक्तीचा विकास, भक्तीनें संवेदनाशक्तीचा विकास आणि कर्ममार्गानें चेतनाशक्तीचा विकास अपेक्षित आहे. विचारशक्ति ही मूळची ईश्वरदत्त देणगी असली, तरी अभ्यासाशिवाय बिनचूक विचार करण्याची संवय मनुष्याला लागत नाहीं. कोणतेंहि प्रमेय सत्य आहे किंवा असत्य आहे, हें सांगण्यास निरक्षर मनुष्यापेक्षां साक्षर मनुष्य जास्त योग्य आहे, हें कोणीहि कबूल करील,

विद्यार्जनांत बुद्धीची कुशाग्रता वाढविण्याचें सामर्थ्य आहे. विद्याभ्यासाच्या पाषाणावर घासल्याशिवाय विचारशक्तीला तीक्ष्ण धारा येत नाहीं व असत्य-निरसनाच्या कार्याला ती उपयुक्त होत नाहीं, एवढ्याचसाठीं ज्ञानमार्गाचें महत्त्व हिंदुधर्मानें अनेक रीतींनीं वर्णिलें आहे. विचारशक्तीचा योग्य विकास व्हावयास, ती सत्यान्वेषणप्रवण होण्यास व गूढ प्रमेयांचें आकलन करण्यास ती पात्र होण्यास ज्ञानाची आवश्यकता आहे. हें ज्ञान श्रुति, स्मृति, दर्शनें व इतर शास्त्रें यांच्या अध्ययनानें होतें. वरील ग्रंथांतून जगदुत्पत्ति, और्ध्व-देहिक स्थिति, परमेश्वरी स्वरूप इत्यादि अनेक प्रश्नांचा जो ऊहापोह केला आहे व सकृद्दर्शनीं विरुद्ध दिसणाऱ्या श्रौत वचनांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला आहे, त्या वादविवादात्मक पद्धतीचें अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्याची बुद्धि सत्यान्वेषणास सर्वथैव योग्य होते. "स्वाध्यायो धातव्यः" "स्वाध्यायान्मा प्रमदः" इत्यादि वाक्यांतून ज्ञानार्जनाविषयीं सूचना वारंवार श्रुती देत आहेत, याचें कारण तरी हेंच. ब्रह्मविद्येच्या अभ्यासास प्रवृत्त झालेल्या मुमुक्षूच्या लक्षणांत "नित्यानित्यविवेक" हें प्रथम लक्षण म्हणून साधन चतुष्ट-याचा विचार करतांना श्रीशंकराचार्यांनीं सांगून ठेविलें आहे. नित्य काय आणि अनित्य काय, हा प्रश्न सोडविण्याइतकी ज्याची बुद्धि अध्ययनादि-कांनीं परिपक्व झाली असेल, असा विद्वानच ब्रह्ममीमांसेचा अधिकारी आहे; इतरांना ब्रह्मविचार करण्याची योग्यताच नाहीं, असा श्रीमच्छंकराचार्यांनीं स्पष्ट अभिप्राय देऊन ठेविला आहे. " विद्याविदाय " नसून "नित्यानित्य-वस्तुविवेकार्थ " आहे, यापेक्षां ज्ञानार्जनाचा जास्त उदात्त हेतु कोणता असूं शकेल ?

सत्यान्वेषणाकरितांच ज्ञान संपादन करावयाचें व अशा हेतूनें अध्ययन करून ज्यांनीं स्वतःच्या ठिकाणीं सत्यान्वेषणपात्रता प्राप्त करून घेतली आहे तेच ज्ञानी. इतर परग्रंथगतविचारभारवाहक पशू मात्र आहेत. वेदार्थ न समजतां सर्व वेद मुखोद्गत करणाऱ्या वैदिकांना निरुक्तकार यास्काचार्य निवळ स्थाणूची उपमा देतात. सनातन आर्य संस्कृतीचा इतिहास, समाज-स्थिति, धर्मकल्पना इत्यादिकांचें भांडार जी श्रुति, तिचें अध्ययन प्रत्येक द्विजानें केलेंच पाहिजे, असा हिंदु धर्माचा जो अट्टाहास आहे, तो विचार-

शक्तीचा विकास योग्य मार्गानें व्हावा एवढ्याचकरितां आहे. ब्रह्मज्ञानाचीच चर्चा करणारीं उपनिषदें व तत्त्वज्ञानविषयक ग्रथ वारंवार ऋग्वेदादि श्रौत वाङ्मयांत येणाऱ्या वचनांचा अनेक रीतीनें विचार करतात, व कधीं कधीं तर एकाच मंत्राचा भिन्न भिन्न शास्त्रकार आपापल्या मतांप्रमाणें निरनिराळा अर्थ करतात. अशा स्थितींत या मूलाधार ग्रंथाचा जास्त साक्षात् परिचय नाहीं, त्याला ह्या अनेक मतवाद्यांतून सत्यार्थप्रतिपादक कोण याचा निर्णय करतां येणार नाहीं, व कोणत्याहि प्रमेयाविषयीं त्याची मनःस्थिति निःसंदेह होत नाहीं तेथपर्यंत सद्वस्तूच्या आकलनास तीं योग्य झाली, असें म्हणतां यावयाचें नाहीं.

केवळ तात्त्विक दृष्टीनें धर्ममीमांसा किंवा ब्रह्ममीमांसा करणाऱ्या ऋषींनीं आपल्या विचारसरणीच्या अनियंत्रित व अकुतोभय संचार करणाऱ्या गतीस श्रुतीचा लगाम कां लावून घेतला, याचें पुष्कळांना मोठें कोडें पडलें आहे. श्रुतिप्रामाण्य हा एक त्यांच्या विचारपद्धतींत मोठा दोष आहे, असें ते मानितात. श्रुतिप्रामाण्यावर आघात करणारे वीर फार पुरातन कालापासून उत्पन्न झाले आहेत, परंतु त्या सर्व झंझावाताचे आघात या श्रुतिरूप अश्वत्थानें सहन केले, इतकेंच नव्हे, तर त्यांचीं मुळें प्रत्येक वावटळीच्या आघाताबरोबर भरतभूमींत अधिकाधिक खोल गेलीं आहेत. या जुन्या आक्षेपकांच्या आक्षेपांचें निरसन "शास्त्रयोनित्वात्" या सूत्रावरील भाष्यांत श्रीमच्छंकराचार्यांनीं व सायणाचार्यांनीं आपल्या जगत्प्रसिद्ध ऋक्–भाष्याच्या उपोद्घातांत फार मार्मिक व सोपपत्तिक केलें आहे. भगवान् पतंजलींनीं आपल्या व्याकरण–महाभाष्यांत या प्रश्नाचा विचार केला आहे, व निरुक्तकार यास्काचार्यांनीं वरील तऱ्हेच्या आक्षेपकांना सणसणीत उत्तरें दिलीं आहेत.

परंतु नवीन टीकाकारांच्या आक्षेपांना समर्पक उत्तर ज्यांना पाहावयाचें असेल, त्यांनीं लो. टिळकांच्या ध्रुवसिद्धांतावरील सर्वमान्य ग्रंथाचा शेवटचा परिच्छेद अवश्य वाचून पाहावा, एवढीच सूचना आहे. जगतीतलावर उपलब्ध असलेल्या कोणत्याहि ग्रंथापेक्षां वेद अधिक प्राचीन आहेत; इतकेंच

नव्हे, तर प्रलयपूर्वकालीन मनुष्यसमाजाच्या स्थितीचें चित्र त्यांत असल्यामुळें त्या संस्कृतीची परंपरा चालविणाऱ्या आमच्या पूर्वजांना वेद हे प्रमाणग्रंथ वाटून त्यांनीं ते मुखोद्गत् करावे, हें अगदीं स्वाभाविक आहे. वेदप्रामाण्याचा हिंदुस्थानांत आलेल्या आर्यांनीं त्याग केला असता, तर त्यांची संस्कृति इतकी दीर्घ काळ टिकूनहि राहिली नसती; व तिची स्थिति काय झाली असती, याची थोडीशी कल्पना पाश्चात्य देशांतील आर्यशाखांना ज्याप्रमाणें पुढें शहाणपणाचे धडे इजिप्त देशांतील गुरुसन्निध अध्ययन करणाऱ्या ग्रीक लोकांपासून शिकावे लागले, व तत्पूर्वी कमींत कमी तीन हजार वर्षें निबिड अज्ञानांधकारांत काढावीं लागलीं, यावरून येण्यासारखी आहे. वेदप्रामाण्यामुळें पूर्वपरंपरा कायम राहण्यास कसें सहाय्य झालें आहे, हा एक स्वतंत्र विषय आहे. वेदांचें प्रामाण्य प्राचीन ऋषी कां मानीत, एवढें दाखविण्यासाठींच वर किंचित् विस्तार केला आहे. हिंदुधर्माचें व्यतिरेक लक्षण बांधतांना लो. टिळकांनीं 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु" हें हिंदुधर्माचें आद्यलक्षण सांगितलें आहे. याचें कारण काय हेंहि वरील विवेचनावरून लक्षांत येईल.

प्रत्येक धर्माला आधारभूत असा एखादा ग्रंथ असतोच. ख्रिस्ती धर्माचें बायबल, मुसलमानी धर्मात कुराण, त्याचप्रमाणें हिंदु धर्मात श्रुती आहेत. मूलग्रंथावर टीका, व्याख्या, भाष्य इत्यादि रूपानें केवढेंहि मोठें वाङ्मय तयार झालें असलें व या भिन्न भिन्न टीकाकारांनीं क्षुल्लक गोष्टीवर विशाल चर्चा करून नवीन पंथ निर्माण केले असले, तरी मूलाधार ग्रंथाच्या आश्रयानें जेथपर्यंत ते आपल्या मताची उभारणी करीत आहेत, तेथपर्यंत त्या ग्रंथांना मान्य समजणाऱ्या धर्माच्या अनुयायांत त्यांची गणना होते. हिंदुधर्मांत अनेक मतें प्रतिपादन करणारे पुरुष होऊन गेले; परंतु वेदाविषयींची प्रामाण्यबुद्धि त्या सर्वांनीं प्रगट केली आहे. त्यांचीं मतें वेदशरण आहेत. जेथपर्यंत तीं वेदशरण आहेत, तेथपर्यंत हिंदूंनीं त्यांकडे सत्यान्वेषण बुद्धीनें अवलोकन करण्यास तीं पात्र आहेत. परंतु श्रुतीला लाथाडून जो आपल्या मताची पताका आकाशांत स्वैर फडकवील, त्याजकडे हिंदुत्वाच्या दृष्टीनें पाहण्याची जरूर नाहीं. जो श्रुतीला लाथाडतो, तो परं-

परेनें आमच्या संस्कृतीवर दुगाण्या झाडतो, किंबहुना तो हिंदुत्वाचा उघड उपमर्द करतो; असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं.

वेद, वेदांगें, दर्शनें, स्मृति, आरण्यकें व उपनिषदें इत्यादिकांचें अध्ययन जो केवळ सत्यान्वेषण बुद्धीनें करील, त्याची विचारशक्ति नित्यानित्य-विवेकसंपन्न होऊन ब्रह्ममीमांसेसारख्या गंभीर विषयाचें अवगाहन करण्यास तो समर्थ होईल, यांत तिळमात्र संशय नाहीं. वेद हे परब्रह्माचे निःश्वास आहेत, "यस्य निश्वसितं वेदाः" अशी श्रुति आहे. मनुष्याचें अस्तित्व जेथपर्यंत तो श्वासोच्छ्वास करीत असतो, तेथपर्यंतच भूमितलावर आहे. पुढें मनुष्य म्हणून त्याची सत्ता लयास जाते; तद्वत् परब्रह्मसत्तेची प्रचीति वेदाध्ययनानेंच येईल, तद्व्यतिरिक्त अध्ययनानें येणार नाहीं, असें प्राचीन ऋषींचें मत आहे. अखिल जग वेदांपासून निर्माण झालें "यो वेदेभ्योऽखिलम् जगत्" हा त्यांचा सिद्धांत असल्यामुळें जगतांत दृग्गोचर होणारें तत्त्वज्ञान वेदगम्य आहे, असें ते समजतात. वेद अनंत आहेत. मंत्रद्रष्ट्यांना श्रुती दृष्टीस पडतात आणि श्रुतींत परस्पर विरोध नाहीं, या तीन कल्पना आमच्या तत्त्वज्ञानविषयक वाङ्मयाच्या मुळाशीं आहेत. वेदवृक्षावरील तत्त्वज्ञानाची शाखा जी एवढी विस्तारली व पल्लवित झाली, तिचें कारण या तीन कल्पनांची हिंदुधर्मांत असलेली मान्यता हेंच होय, हें वैदिक वाङ्मयाचा थोडा फार परिचय असेल, त्यास सहज दिसून येईल. मंत्रद्रष्ट्यांना श्रुतींची स्फूर्ति होते ही गोष्ट याज्ञवल्क्यानें सूर्योपासना करून आपले गुरु व पूर्व ऋषी यांना अपरिचित अशी शुक्लयजुःसंहिता प्राप्त करून घेतली, या कथेवरून, त्याचप्रमाणें ऋषिकन्या इतरा हिच्या पुत्रानें सांगितलेल्या ब्राह्मणग्रंथावरून दिसून येणारी आहे. वरील तीन कल्पना मान्य नसल्या, तर तत्त्वज्ञानवाङ्मयाचीं निधानें जीं उपनिषदें व आरण्यकें त्यांची श्रौत ग्रंथांत गणनाच झाली नसती, व उपनिषद्विचारांत जो कोठें कोठें मतभेद असल्याचा भास होतो, त्याचें निरसन करण्याकरितां आणि श्रौतवाक्यांची एकवाक्यता करण्याकरितां दर्शनादि ग्रंथ अवतीर्णहि झाले नसते. पराविद्येच्या ज्ञानाशिवाय मोक्ष नाहीं, व ही पराविद्या सर्व उपनिषदांत सांठविली असल्यामुळें या उपनिषदादिकांची श्रुतींत गणना

कशी झाली व त्यांच्यापासून पुढें मीमांसाकारांनीं ज्ञानकांड कसें विस्तारलें, याचा विचार करणें जरूर वाटल्यावरून हिंदुधर्मांतील या सर्वमान्य तीन गृहितकृत्यांचा वर उल्लेख केला आहे. सत्यान्वेषण हें ज्ञानमार्गाचें अंतिम साध्य आहे, व सत्यान्वेषण हें प्रमाणानुगामी आहे. प्रमाणाशिवाय कोणतीहि गोष्ट किंवा कल्पना खरी मानावयाची नाहीं, हा विचारी पुरुषांचा बाणा आहे. हिंदुशास्त्रकारांनीं, इतर देशांतील तर्कशास्त्रवेत्त्यांनीं प्रत्यक्ष अनुमान, उपमान इत्यादिक प्रमाणांचे जे प्रकार सांगितले आहेत, ते तर सर्वमान्य केले आहेतच, परंतु त्याशिवाय आप्तवाक्य म्हणून एका विशेष प्रमाणाची त्यांनीं योजना केली आहे. आप्तवाक्यप्रमाणांत श्रुति, स्मृति व सदाचार या त्रयींचा अंतर्भाव होतो. श्रुतिप्रामाण्याविषयीं वर थोडेंसें विवेचन झालें आहे, परंतु स्मृति व सदाचार यांच्या प्रामाण्याविषयींचा उल्लेख केल्याशिवाय ज्ञानकांडाचें विवेचन अपूर्ण राहील. स्मृतिग्रंथ हे विशेषतः श्रुतींतून स्पष्ट व इतस्ततः पसरलेल्या आज्ञांचें विषयवार वर्गीकरण करून सुबोध पद्धतींत प्रचलित व्यवहाराला अनुरूप अशी व्यवस्था करणारे प्रबंध आहेत. या स्मृतींच्या आधाराशिवाय अनेक वेदवचनें दुर्बोध झालीं असतीं, अनेक वैदिक तत्त्वांची मूलपीठिका लुप्त झाली असती. प्रत्यहीं वृद्धिंगत होत जाणाऱ्या आर्यसंघाचें पाऊल श्रुतिक्षु मार्गाहून रेखामात्रदेखील च्युत होऊं नये म्हणून नियंत्रणा करणारे नैमित्तिमन्वादिक स्मृतिकार उत्पन्न झाले. आर्यांशीं इतर संस्कृतीचें जास्त संघटन होऊन त्याचा परिणाम आर्यसंस्कृतीवर व्हावयास लागला असतां प्रागतिक तत्त्वाला विरोध न करतां त्या वाढत्या आर्यप्रपंचनौकेला नेहमीं श्रौत धर्माची ध्रुवतारका दाखविणारी लोहचुंबकाची शलाका मन्वादिकांनीं स्मृतिरूपानें निर्माण केली. आर्यसंस्कृतीचें विस्मरण होण्यासारख्या परिस्थितींत श्रौतधर्माची स्मृतिग्रंथांनीं जागृति ठेवली, म्हणूनच त्यांना ‘ स्मृति ’ ही संज्ञा देण्यांत आली. इतकी जरी दक्षता हिंदुधर्माच्या पुरस्कर्त्यांनीं घेतली, तरी जसजसा आर्यांचा इतर अनार्य वर्गांशीं अधिकाधिक संसर्ग व्हावयास लागला, तसतसे अनेक नवे नवे प्रश्न उपस्थित व्हावयास लागले व त्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें श्रुतींतून किंवा स्मृतींतून प्रत्यक्ष दिलेलीं नाहींत, ही गोष्ट त्यांच्या प्रत्ययास आली. अशा

प्रसंगीं धर्मांतील समर्थ पुरुषांचें वर्तन जसें होईल तोच धर्म व हें वर्तन हेंच प्रमाण समजून इतर अल्पधी लोकांनीं चालल्यास अधर्म नाहीं,अशी कल्पना उद्भूत झाली,आणि सदाचाराचा अंतर्भाव याप्रमाणें आप्तवाक्यांत करण्यांत आला. ‘ अथ यदि ते कर्म विचिकित्सा वा वृत्त विचिकित्सावा स्यात् । ये तत्र ब्राह्मणाः संमर्शिनः । युक्ताः आमुक्ताः धर्मकामाः स्युः । यथा ते तत्र वर्तेरन् तथा वर्तेथाः । अथाभ्याख्यातेषु । ये तत्र ब्राह्मणाः संमर्शिनः । इत्यादि पूर्ववत् यथा ते तेषु वर्तेरन् । तथा तेषु वर्तेथाः ।’ अशा प्रकारचीं जीं वाक्यें श्रुतींतून आढळतात, त्यावरून सदाचारप्रामाण्याची आवश्यकता कशी उत्पन्न झाली असेल, याची थोडीशी अटकळ बांधतां येते.

पूर्वजांनीं संपादित केलेल्या ज्ञानाचा योग्य अभ्यास करून व सर्व तऱ्हेच्या प्रमाणांनीं त्याची मीमांसा करून सत्यान्वेषणाच्या मार्गास लागलेल्याची बुद्धि नित्यानित्यविवेकसंपन्न होईल व कांहीं कालानें या अखिल ब्रह्मांडाच्या उत्पत्तीशीं वास करीत असलेल्या सद्वस्तूच्या आकलनास पात्र होईल. त्याची विचारशक्ति केवळ सत्यमय बनून जाईल व पराविद्येच्या मननाशिवाय दुसरें ज्ञान मिथ्या आहे, असा अनुभव त्याला येईल. ‘ सत्यम् ज्ञानमनन्तम् ब्रह्म ’ या ब्रह्मपदार्शीं त्याचें तादात्म्य होईल. हें ज्ञानमार्गाचें अंतिम साध्य ज्ञानार्जनानेंच सिद्ध होणार असल्यामुळें व आनंद आणि चैतन्य याला सत्तेचें अधिष्ठान असल्याशिवाय त्याची कल्पना तर्कगम्य देखील नसल्यामुळें ज्ञानमार्गाला इतर सर्व मार्गांपेक्षां श्रेष्ठत्व दिलेलें आहे. “ आत्मज्ञानादेव केवलान् मुक्तिः ” म्हणून आचार्यांनीं जें शारीरभाष्याचें उपन्यासांत कंठरवानें प्रतिपादन केलें आहे, त्याचें कारण तरी एवढेंच आहे.

ज्याप्रमाणें विचारशक्तीच्या विकासाकरितां ज्ञानमार्ग ऋषींनीं निर्माण केला, त्याचप्रमाणें कर्तृत्वशक्तीचा योग्य विकास व्हावा म्हणून कर्ममार्गाची प्रतिष्ठा करण्यांत आली. धर्म हा अभ्यासाचा विषय आहे, हा मननाचा भाग आहे. आचाराशीं त्याचा अर्थाअर्थी संबंध नाहीं, असें कांहीं अर्वाचीन विद्वान् मोटया आवेशानें प्रतिपादन करतात. कर्ममार्ग हा राष्ट्रांतील आळशी व निरुद्योगी लोकांना दुसऱ्याच्या श्रमावर उपजीविका करण्याचें मोठें साधन आहे, व याचमुळें भरत-

खंडाची मोठी हानि झाली आहे. असे विचार केवळ स्वदेशभक्तीनें प्रेरित होऊन कांहीं पुढाऱ्यांनीं काढल्याचें प्रस्तुत लेखकास माहीत आहे. कर्ममार्गाची केवळ अवहेलना करण्याकरितांच सुशिक्षित लोकांनीं नवीन धर्मस्थापना करण्याचा अव्यापारेषु व्यापार कसा केला आहे, हें बहुतेकांना अवगत आहे, आचाराविषयीं धर्मग्रंथांत जे सूक्ष्म नियम घालून दिले आहेत, ते वाचून तर कित्येकांनीं हिंदुधर्मातील सर्वमान्य ग्रंथांची शाळांतून शिकविल्या जाणाऱ्या कवाईतीच्या बुकांशींच तुलना केली आहे. या सर्वांच्या डोक्यांत अशी एक कल्पना शिरली आहे कीं, धर्म म्हणजे जगांतील गूढ रहस्यांचें विवेचन करणारें एक शास्त्र आहे. पदार्थविज्ञान, रसायन, गणित, ज्योतिष, भूगर्भ, मानस याचप्रमाणें धर्म हें एक शास्त्र आहे, व तत्त्वज्ञान हा त्या शास्त्राचा विषय आहे. इतर शास्त्रांचा अभ्यास जसा करावयाचा तसा धर्माचाहि करावयाचा. धर्मातील तत्त्वज्ञानाचे चार-दोन प्रमुख ग्रंथ वाचले म्हणजे धर्माचा अभ्यास संपला, यापलीकडे धर्माशीं मनुष्याचा अधिक संबंध आहे, हें तत्त्व त्या लोकांना मान्य नाहीं. ही कल्पना केवढी प्रमादयुक्त आहे,याचा विचार धर्माची व्याख्या जी वर केली आहे तिचा विचार केला असतां दिसून येईल. भिन्न धर्मीयांची व आमच्यांतील पुष्कळ सुशिक्षितांची या कर्ममार्गावर थोडी वक्रदृष्टि आहे, व आमच्यांतील जे धार्मिक म्हणुन गणले जाणारे विद्वान् आहेत, ते देखील हिंदुधर्माची थोरवी गाण्याचा प्रसंग आला असतां त्यांतील उपनिषदादि श्रौत ग्रंथांतून प्रतिपादलेल्या तत्त्वावरच भर देतात, आणि त्यांच्या विवेचनांतूनहि कर्ममार्गाची जवळ जवळ उपेक्षा झालेली दृष्टीस पडते. अशी जी कर्ममार्गासंबंधीं आमच्यांतील विद्वानांची स्थिति आहे, ती अत्यंत शोचनीय आहे, असें म्हटल्यावाचून राहावत नाहीं. याच्या उलट ज्या ऋषींच्या वचनांचा तत्त्वज्ञानाची प्रौढी सांगत असतांना हे लोक उल्लेख करतात, त्यांची सर्व भिस्त कर्ममार्गावर आहे हें ब्राह्मण, आरण्यकें व उपनिषदें यांचें वरवर अवलोकन करणारांच्याहि लक्षांत येईल. 'धर्मं चर' अशी श्रुति आहे. "आचारः प्रथमो धर्मः" म्हणून ब्राह्मण-ग्रंथांतून स्पष्ट निर्देश आहे. "स धर्मः किं न सेव्यते" असा आक्रोश वेद-

च्यास दोन्ही हात वर करून करीत असल्याचें दृष्टीस पडतें. अर्थ व काम हे दोन्ही पुरुषार्थ धर्मानेंच साध्य होतात, असें ते निक्षून सांगतात. याचा विचार केला असतां धर्म हा आचाराचा विषय आहे, असें निदान त्यांच्या मतानें तरी ठरतें. कर्ममार्गाविषयीं हा सामान्य तिरस्कार सुशिक्षितांस कसा उत्पन्न झाला, हा प्रश्न धर्ममीमांसेंत अप्रस्तुत असल्यामुळें तो भाग कितीहि मोहक असला, तरी तूर्त एका बाजूस ठेवणें भाग आहे.

कर्ममार्गानें चित्तशुद्धि होते, असें जुन्या पंडितांचें मत आहे. दुष्कर्मापासून पराङ्मुखता व सत्कर्माविषयीं उत्कट लालसा या मनःस्थितीस चित्तशुद्धि अशी संज्ञा आहे. कर्ममार्गाची योजना हे दोन्ही हेतू साध्य होण्यासारखी कशी आहे, एवढेंच आपणांस पाहावयाचें आहे. कर्म विधि आणि निषेध या दोन प्रकारचें आहे. निषिद्ध कर्में ज्यापासून मनुष्याच्या खऱ्या व चिरंतन उन्नतीस विघात होईल असल्या क्रिया, त्या कितीहि तत्काल, फलदायी व मोहक असल्या, तरी त्यांचा तिरस्कार करण्याकरितां व त्यांपासून परावृत्त होण्याकरितां सांगितल्या आहेत. 'न सुरां पिबेत् ।' 'मानोहिंसित् जातवेदो गामश्वं पुरुषं जगत्' इत्यादि अनेक निषेधपर वाक्यांतून सांगितलेले आचार व्यक्तीच्या किंवा समाजाच्या हितैकदृष्टीनेंच सांगितले आहेत. निषिद्ध कर्मांत ज्याची रति जास्त होईल, तो धर्मविचारास कायमचा मुकतो. सर्व नीतिशास्त्रांचा पाया या निषिद्ध कर्मांच्या निषेधपरिपालनांतच आहे. प्रत्येक नीतिवाक्य अनियंत्रित आचरण करणाऱ्या मनुष्याच्या गळ्यांत लोढणें अडकवीत असतें व त्याच्या स्वैराचारावर आळा घालीत असतें म्हणजे पर्यायानें निषेधात्मक असतें. धर्म आणि नीति यांचा संबंध हिंदुधर्मशास्त्राच्या दृष्टीनें इमारत आणि पाया इतका आहे. नीतीशिवाय मनुष्य धार्मिक बनूं शकत नाहीं. परंतु नीतिमान् मनुष्य धार्मिक असतोच, हें तत्त्व त्यास मान्य नाहीं. धार्मिक आचरण हें नीतिमत्तेपेक्षां बरेंच जास्त आहे. मनुष्य अत्यंत नीतिमान् असूनहि तो नास्तिक असूं शकतो, ही गोष्ट गेल्या शतकांत प्रसिद्धीस आलेल्या कित्येक तत्त्ववेत्त्यांच्या चरित्रांवरून स्पष्ट दिसून येईल. नीतीचा धर्माशीं घटस्फोट केला असतां केवढा अनर्थ होण्याचा संभव आहे, याची

कल्पना पाश्चात्य देशांत उत्पन्न झालेले मनुष्यविघातकांचे निहिलिस्ट, अनार्किस्ट इत्यादिक पंथ पाहिले व त्यांच्या सर्व मनुष्यजातीस लाजविणाऱ्या व त्यांच्या तोंडावर काळोखी फांसणाऱ्या कृष्णकृत्यांचें थोडेंसें निरीक्षण केलें असतां सर्वांच्या लक्षांत येईल. तेव्हां सर्व नीतिपर वचनांचा संग्रह धर्मग्रंथांतून करून धर्माचें आदितत्त्व म्हणून त्याचें शिक्षण देण्यांत हिंदुधर्मशास्त्रकारांनीं जी दूरदृष्टि दाखविली, ती प्रशंसनीय आहे. 'धर्मं चर' असें सांगण्यापूर्वी 'सत्यं वद' असा आदेश श्रुति एवढ्याच करतां करते. धर्माचें अंतिम साध्य मोक्ष हें असल्यामुळें मोक्षप्रतिकूल स्थिति उत्पन्न करणाऱ्या सर्व आचारांचा व विचारांचा हिंदुधर्मानें निषेध केला आहे व हा निषेध न पाळणाऱ्यास पुनरावृत्तीचें भ्रमण चुकवितां येणें शक्य नाहीं, म्हणून त्यानें सांगून ठेविलें आहे.

निषिद्ध कर्माशिवाय हिंदुधर्मांत अनेक कर्में मनुष्यानें केलीं पाहिजेत म्हणून आग्रह आहे. कर्म केल्याशिवाय कोणतेंहि फळ मिळत नाहीं. कर्तृत्वसंपन्न मनुष्यास दुःसाध्य अशी कोणतीच गोष्ट नाहीं. परंतु ही कर्तृत्वसंपन्नता मोक्षानुकूल असावी, तरच तिचा योग्य विकास होऊन चिच्छक्तीशीं मनुष्याचें तादात्म्य होईल; नाहींतर होणार नाहीं. यासाठीं कर्माचा मार्ग आंखून देणें शास्त्रकारांना भाग पडतें. परमेश्वर अनंतरूपानें या ब्रह्मांडांत व्यापून राहिला आहे व अनंत शक्तीनें या जगाचा गाडा तो सुरळीतपणें चालवितो, ती शक्ति मला प्राप्त व्हावी, तिचा माझ्यांत संचार व्हावा, म्हणून शक्तिमान् असणाऱ्या अनेक तेजःपुंज देवांची यज्ञयागादिकांनीं आराधना करावी. पर्जन्य पाडणारा इंद्र, आपल्या रसांनीं औषधिवनस्पत्यादिकांस जीवन देणाऱ्या शिवतमा, आपोदेवि, स्वप्रकाशानें जगाला उद्बोधित करणारा भगवान् सविता, इत्यादिकांच्या ठिकाणीं दृष्यमान् होणारी शक्तिमत्ता ही पारमेश्वरी आहे व तिच्या प्राप्त्यर्थ यज्ञयागादिक केले असतां ती मनुष्यांत क्रमाक्रमानें वृद्धिंगत होत जाते ही हिंदुधर्माभिमान्यांची भावना आहे. पृथ्वीतलावर सर्वांत देदिप्यमान असलेलें अग्नितत्त्व हें या सर्व देवांचें मुख आहे व अग्न्युपासना हें प्रत्येक द्विजाचें आद्य कर्तव्य आहे. त्याच्या द्वारानेंच इतर दिव्य शक्तींना आव्हान केलें असतां त्यांच्या

तेजाचा आपणांत संचार होईल व त्यांच्यासारखें आपण चैतन्यसंपन्न होऊं या विचारानें प्राचीन आर्यांनीं यज्ञयागादि संस्था निर्माण केल्या. अग्निमुखानें देवांचें हवन करणें हें आर्यसंस्कृतीचें व हिंदुधर्माचें वैशिष्टय आहे. वेदींत उज्ज्वल प्रकाशानें धगधगणाऱ्या अग्नीच्या सन्मुख उभा राहून व अनेक देवतादिकांना आपल्या परिश्रमानें आजन्म प्राप्त केलेल्या सर्व द्रव्यांचें हवनरूपानें समर्पण करून जेव्हां प्राचीन ऋषि " स मे ददातु प्रजां पशून् पुष्टिं यशः " असा वर मागत असेल, तेव्हां त्याच्या ठिकाणीं प्रजा, पशू, पुष्टि व यश हे पुनरपि द्विगुणित मिळविण्याची पात्रता खास येत असेल. जन्मतःच ज्या तीन ऋणांचा भार आपल्या माथ्यावर घेऊन मनुष्य येतो, त्यांपैकीं देवऋण हें प्रमुख आहे. त्या देवतांच्या अंशानेंच आपल्या शरीरांतील शक्ती कार्यपात्र झाल्या आहेत, व त्या देवतांच्या कृपाप्रसादानेंच त्या वृद्धिंगत व्हावयाच्या असल्यामुळें जर त्यांचा विकास परमेश्वरी चैतन्याशीं एकतानता होण्याच्या स्थितीपर्यंत न्यावयाचा असेल, तर या देवतांचें ऋण अत्यंत परिश्रमसाध्य व दक्षतेनें समाप्तीस जाणाऱ्या यज्ञादिकांच्याच द्वारें फेडिलें पाहिजे. निव्वळ स्वतः कर्तृत्वसंपन्न होण्यानेंच मनुष्याची कर्तव्यमर्यादा संपली, असें हिंदुधर्म मानीत नाहीं; तर पूर्वजांनीं ज्या कांहीं सत्कृत्यास आरंभ केला आहे, तें सत्कृत्य पुढें चालविण्याची जबाबदारी जन्मतःच आपणावर आली व ती आपण मृत्यूपर्यंत योग्य रीतीनें बजाविली, एवढयानेंच समाधान न मानितां आपल्यानंतर ती कामगिरी चालावी, म्हणून सत्पुत्र निर्माण केला पाहिजे, त्याशिवाय पूर्व पितरांच्या ऋणांतून मुक्त होण्याचा दुसरा मार्ग नाहीं. पितृऋणाची कल्पना ही परंपरा कायम ठेवण्याच्या बाबतींत आर्य लोक किती दक्ष असत, हें दर्शविते. परंपरा कायम ठेवण्यास पुत्रास सामर्थ्य आणि त्याशिवाय आपले स्वर्गस्थ पितर सद्गतीस जाणार नाहींत ही एक भावना सर्व हिंदुसमाजांत ज्या वेळीं जागृत होती, त्या वेळीं प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें पाहिजे म्हणून प्रतिपादन करण्याची पाळीच येत नव्हती. परंतु सर्व जन्मभर निव्वळ पोट भरण्यापलीकडे ज्यांनीं कांहींच व्यवसाय केला नाहीं, त्यांना असें कोणतें महत् कृत्य आहे कीं, जें माझ्यानंतरहि चालविलेंच पाहिजे, अशी उत्कंठा

वाटेल ? मीं मिळविलेल्या संपत्तीचा समाजास उपयोग होऊं नये, म्हणून दत्तक घेणारे विद्वान् आमच्यांत होऊन गेले, परंतु माझ्यामागें अमुक एका महत्कृत्याची माझ्याप्रमाणें व्यवस्था व्हावी, म्हणून औरस पुत्र नाहीं, तर दुसऱ्या एकाद्या कर्तृत्वसंपन्न पुरुषाच्या हवालीं आपली पुंजी करण्याची सद्बुद्धि होत गेली पाहिजे.

या दोन ऋणांबरोबर तिसरें एक ऋषिऋण आहे. प्राचीन ऋषींनीं अविश्रांत परिश्रमानें, अलौकिक बुद्धिमत्तेनें जो ज्ञानाचा अपूर्व संग्रह केला, त्याचें यथाविधि अध्ययन केल्यानें म्हणजे ब्रह्मचर्यानें या ऋणांतून मनुष्य मुक्त होतो.

या सर्व ऋणांचा विचार केला असतां, प्राचीन ऋषींच्या संस्कृतींचा आस्थापूर्वक अभ्यास करावयाचा, त्यांनीं कोणत्या शक्ती समाजांत जागृत केल्या हें नीट समजावून घ्यावयाचें ही पहिली स्थिति. यज्ञादिकांनीं त्या ऋषींच्या कार्याला मदत होण्याकरितां सर्व प्रकारच्या शक्ती जास्त वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करावयाचा, व ऋषिकार्यच पुढें चालवावयाचें ही दुसरी स्थिति. यानंतर सत्पुत्राला वरील तऱ्हेचें कार्य करण्याची पात्रता आणून देऊन त्याच्यावर त्या कार्याची जबाबदारी टाकून द्यावयाची ही तिसरी स्थिति.

या तीन स्थितींतून जो मनुष्य गेला, त्यास फलाभिसंधिरहित कार्य करण्याची पात्रता येते. ब्रह्मचर्य व गृहस्थाश्रम योग्य रीतीनें व कर्मांतील रहस्य समजून आणि देवतादिकांच्या सामर्थ्याची जाणीव मनांत बाळगून पाळल्यास तो या तिसऱ्या स्थितीच्या अंतापर्यंत येतो. परंतु फलाची अपेक्षा नसतां कार्य करण्याची इच्छा मनांत बाळगणें ही गोष्ट मोठी दुरापास्त आहे.

तृतीयाश्रमांत देवऋण, पितृऋण, ऋषिऋण यांतून मुक्त झाला असतां देखील शास्त्रोक्त यज्ञयागादिक कर्मांचा त्यास त्याग करतां येत नाहीं, याचें कारण काय ? त्याचप्रमाणें चतुर्थाश्रमांत म्हणजे ज्ञानावस्थेंत किंवा ज्ञानोत्तरकालींहि कर्मांचा त्याग करूं नये, म्हणून जीं शास्त्रांत वचनें आहेत, तीं काय म्हणून, असा प्रश्न उत्पन्न होतो. कर्माचें साध्य चिदंशाचा विकास करून घ्यावा हें तर आहेच व तो विकास योग्य फलाचा अभिलाष धरून तत्प्रीत्यर्थ केलेल्या कर्मानें होतच असतो. परंतु कर्मांत ज्ञानाभ्यासदेखील होत असतो. कर्म

ज्या ज्या प्रकारचें असेल, त्या त्या विषयावर वेदान्तशास्त्रांनीं जे सिद्धान्त प्रमुखत्वेंकरून सांगितले आहेत, त्या सर्वांचा निर्देश त्या कर्मांत केला असतो; व कर्माच्या वेळीं मनुष्याची जी शांत मन:स्थिति असते व त्याजकडून जे श्रद्धापूर्वक व्यवहार होतात,त्यामुळें त्यांच्या मनावर त्या तत्त्वांचा ठसा जास्त उमटला जात असतो, व मानसिक व्यापार, चिच्छक्ति व ज्ञानयुक्त असे बनतात. ज्ञानाचा अभ्यास म्हणजे वेदान्ताच्या पुस्तकांचीं पारायणें करणें हा नसून वेदान्त–वेद्यतत्त्वांची आपल्या आचरणांत व विचारांत एकात्मता करणें हा आहे. उदाहरणार्थ,श्राद्धसंस्कार जर घेतला तर पितरांची सद्गति व्हावी, एवढाच उद्देश असला, तरी त्याबरोबर वेदांतशास्त्रांत देहपातानंतर जीवयात्रेसंबंधीं जें विवेचन केलें आहे, त्या सर्वांचा उल्लेख आलेला आहे.

श्राद्धादिक संस्कार न केल्यामुळें दशारण्यांतील व्याधयोनीपासून व कुरुक्षेत्रांतील वेदपारंगत ब्राह्मण स्थितींत येईपर्यंत सात ब्राह्मणपुत्रांना सप्तजन्म कसे घ्यावे लागले इत्यादि पूर्वइतिहासाचें कथन केलें आहे,त्याचप्रमाणें अग्निष्वात्त व बर्हिषद पितर कोण आहेत,कोणास कोणती गति मिळते इत्यादि सर्व गोष्टींचा विचार श्राद्धयज्ञाच्या वेळीं श्राद्ध करणारा यजमान करीत असतो; व हा संस्कार आपल्या पूज्य पितरांच्या निधनस्मरणामुळें कोवळें बनलेल्या मनावर किती परिणामकारक होत असेल व जन्ममरणाचे फेरे चुकविण्याच्या त्याच्या कल्पनांस त्यांच्याकडून केवढें प्रोत्साहन मिळत असेल,याची कल्पना हे संस्कार त्यांतील मर्म समजून जे करीत असतील, त्यांसच येते. त्याचप्रमाणें इतर संस्कारांची व कर्मांचीहि स्थिति आहे. आयुष्यांतील सर्व धर्म–अर्थ–काम मिळविलेल्या मनुष्याचें कर्म केवळ ज्ञानाभ्यास व चित्तशुद्धि यांकरितां असल्यामुळें तो जेव्हां कर्मावसानी "ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु" असें म्हणतो, तेव्हां निःसंशय तें कर्म त्याला ब्रह्मस्थितीच्या जवळजवळ अधिकाधिक नेत असतें. ज्ञान आणि कर्म यांची सांगड मनुष्याला या वानप्रस्थाश्रमांत असतांना चतुर्थाश्रमाच्या महाद्वारांत नेऊन पोहोंचविते.

चतुर्थाश्रम हा आयुष्याचा अंतिम आश्रम बहुतेक वृद्धावस्थेची छाया पडल्यावर घेण्याचा प्रसंग येतो. ज्ञानमार्गानें व कर्ममार्गानें विकसित झालेल्या सच्चिच्छक्तीचा परब्रह्मशक्तीच्या ठिकाणीं ध्यानानें विनियोग कर-

ण्याचा मनुष्य या आश्रमांत अभ्यास करतो; व शरीराच्या आंत निवास करणाऱ्या आत्मतत्त्वाचें जगद्बीज परब्रह्मतत्त्वाशीं प्रत्यक्ष तादात्म्य करण्याच्या प्रयत्नास तो लागतो. योगमार्ग हा कर्म व ज्ञान या दोन मार्गांच्या अभ्यासानें मिळविलेल्या विचारशक्तीचा व चिच्छक्तीचा ब्रह्मरूपाशीं एकात्मता करण्याचा अभ्यास आहे. ज्ञानानें सत्यवस्तूचा विवेक करण्याचें सामर्थ्य जर बुद्धींत आलें नसेल, व आश्रमोचित कर्में करून ईश्वरशक्तीच्या अगाधत्वाचा प्रत्यय जर त्याच्या ठिकाणीं उत्पन्न झाला नसेल,तर योग हा जीवात्मा व परमात्मा यांचें ऐक्य करण्यास मुळींच समर्थ होत नाहीं. उलट योगमार्गांतील कांहीं अल्पाभ्यासानें साध्य होणाऱ्या एखाद्या दुसऱ्या सिद्धीपर्यंतच काय तें तो मजल मारूं शकेल,व फारतर भोळ्या व मूढ लोकांना फसविण्यांत त्याच्या आयुष्याचा व्यय होईल. योग हा चतुर्थाश्रमांतील आचार, ज्ञान व कर्म यांनीं युक्त आहे व म्हणूनच त्याचा निर्देश या दोन मार्गांच्या विवेचनाच्या अखेरीस केला आहे.

ऋणत्रयी, आश्रमचतुष्टय, व वर्णव्यवस्था या तीन गोष्टींचा कर्ममार्गाशींच निकट संबंध आहे. यांपैकीं मनुष्यांतील चिच्छक्तीच्या विकासास तीन ऋणें व चार आश्रम कसे पोषक आहेत, हें येथपर्यंत सांगण्यांत आलें आहे. वर्णव्यवस्थेविषयीं थोडासा उल्लेख केल्याशिवाय हा भाग सोडून उपासना—कांडाकडे वळतां येत नाहीं. हिंदुधर्मांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण कल्पिले आहेत. हे वर्ण जन्मसिद्ध आहेत किंवा गुणसिद्ध आहेत, या वादांत शिरण्याची माझी इच्छा नाहीं. ही वर्णव्यवस्था मान्य करण्यांत शास्त्रकारांनीं हिंदुधर्माची ज्या मूलभूत तत्त्वावर रचना केली, त्या तत्त्वांचा त्यांजकडून कांहीं अतिक्रम होतो कीं काय किंवा धर्माचें जें अंतिम साध्य त्यास ही वर्णव्यवस्थेची कल्पना पोषक आहे कीं नाहीं, एवढ्याच दृष्टीनें मी या प्रश्नाची चिकित्सा करणार आहें. वर्ण गुणकर्मविभागशः अस्तित्वांत आले, असें मानिलें, तरी हा गुणकर्मविभाग पुढें जन्मसिद्ध कसा झाला, हें समजणें फारसें कठीण नाहीं. आर्यसंस्कृति जसजशी जास्त व्यापक झाली, व तिचा विस्तार अधिकाधिक व्हावयास लागला, तसतशी कर्मविभागाच्या तत्त्वावर तिची स्थापना करणें जरूर पडलें. शास्त्राभ्यासाचा व्यासंग करणाऱ्या

व्यक्तींना युद्ध, प्रजारक्षण इत्यादि व्यवहारांतून आपलें मन काढून घेतल्याशिवाय स्वतःचा व्यासंग निर्वेध चालविणें अशक्य झालें. प्रजारक्षणासारख्या जबाबदारीच्या व्यवहारांत पडलेल्यांना वणिग्वृत्तीसारख्या अन्य व्यवहाराकडे दुर्लक्ष करून त्यांची जोपासना करण्याचें काम तिसऱ्या लोकांवर टाकणें भाग पडलें. अशा रीतीनें आर्यसंघांत विद्याव्यासंग व विद्यावृद्धि, प्रजारक्षण व युद्धकौशल्य, गोरक्षण व वाणिज्य, हीं तीन प्रकारचीं कर्मे करणारे तीन वर्ण निर्माण झाले. परंतु या तिन्ही वर्णांत वर वर्णन केलेली ऋणत्रयीची कल्पना अतिशय जागृत असल्यामुळें पितृ–ऋण फेडण्याकरितां "येनास्य पितरो याता येन याताः पितामहः । तेन यायात् सतां मार्ग तेन गच्छन्न ऋष्यति" ॥ या मनुवचनानुसार वडिलांनीं या तीनपैकीं जो व्यवसाय घेतला असेल, त्याचीच उन्नति व वृद्धि करणें हें आपलें परम कर्तव्य आहे, असें वाटावें, व स्वतः तेच व्यवसाय करून आपल्या पुत्रपौत्रांना देखील त्याच व्यवसायांत निष्णात करण्याचा त्यांनीं प्रयत्न करावा, हें अगदीं स्वाभाविक आहे. या पितृऋणाच्या कल्पनेमुळें जरी या व्यवसायाची अमर्याद वाढ आर्यसंघांत झाली तरी ते व्यवसाय आनुवंशिक होऊन बसले. वर्ण हे जन्मसिद्ध आहेत असें मत कालांतरानें सर्व समाजांत प्रसृत झालें. ब्राह्मणांकडे विद्यारक्षण, क्षत्रियांकडे प्रजारक्षण आणि वैश्यांकडे गोरक्षण अशीं कर्मे जन्मतांच येतात, ही कल्पना समाजांत दृढ झाली. ही कल्पना दृढमूल झाल्यावर वर्णव्यवस्थेच्या दृष्टीनें त्यांच्या आचारांचें व कर्मांचें प्राचीन ऋषींना पुनश्च परीक्षण करावें लागलें व त्या प्रत्येक वर्णाच्या कर्मांचा निर्देश करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. हा जो वर्णानुसार कर्मनिर्देश केला आहे, त्याजकडे बारकाईनें अवलोकन केल्यास कर्मकांड हें चिच्छक्तीचा विकास व्हावा एवढ्याच्यसाठीं कसें प्रवृत्त झालें, हें सहज समजून येईल. विद्याव्यासंगी वर्गाला विचारशक्तीस जितके परिश्रम द्यावे लागतात, तितके परिश्रम त्याला इतर शक्तीस द्यावे लागत नाहींत. खोलींत बसून गुरुचरणांजवळ रात्रंदिवस अध्ययन करणारा ब्राह्मण तेजस्विता संपादन करण्याकरितां इतर आचारांचें अवलंबन न करता, तर तो एक बौद्ध श्रवणाप्रमाणें निस्तेज कर्तृत्वहीन प्राणि बनला असता व कालांतरानें परिपक्क विचारशक्ति धारण कर-

ण्यास समर्थ असें तेजस्वी शरीर नसल्यामुळें कदाचित् नष्टप्रायहि झाला असता, आणि त्याच्या अस्तित्वाची साक्ष केवळ त्यानें लिहून ठेवलेल्या ग्रंथांतील अंतर्गत प्रमाणावरूनच काढण्याचा प्रसंग प्राचीन विद्याविशारदांस आला असता, ही शोचनीय स्थिति टळावी, म्हणून आचारसंपन्नतेची विलक्षण जबाबदारी त्याच्यावर लादण्यांत आली व ती त्यानें योग्य प्रकारें बजाविली. याची खूण एवढीच कीं, आजहि तो आपल्या बुद्धिमत्तेचें तेज सर्व जगावर पाडूं शकतो. ब्राह्मणांना आपल्या तेजस्वितेची वाढ करून घेण्याकरितां जितकीं कर्मं अहोरात्र करण्याची आज्ञा धर्मशास्त्रांतून आहे, तितकी इतर दोन वर्णांना नाहीं, याचें कारण तरी एवढेंच आहे. त्यांनीं अंगिकारलेल्या विद्याव्यासंगाच्या व्यवसायानें होणाऱ्या विचारशक्तीच्या विकासाबरोबरच त्यांच्या चिच्छक्तीचाहि विकास होत जावा म्हणूनच त्यांनीं सर्व शास्त्रोक्त विधि व आचार यथायोग्य पाळलेच पाहिजेत, अशी वेदाज्ञा आहे. ब्राह्मण श्रोत्रीय असेल, तरच तो सर्व वर्णांस पूज्य आहे; आणि श्रोत्रिय असेल तरच तो ब्रह्मनिष्ठ होऊं शकतो. अन्यथा ब्रह्मनिष्ठत्व त्याच्या ठिकाणीं संभवत नाहीं, अशीं स्पष्ट वचनें श्रुतिग्रंथांतून पुष्कळ स्थळीं आलेलीं आहेत. सार्थ वेदाध्ययन आणि आचारसंपन्नता हीं श्रोत्रियांचीं मुख्य लक्षणें आहेत. या लक्षणांनीं युक्त असल्याशिवाय तो श्रोत्रिय होऊं शकत नाहीं, त्याला श्रोत्रिय ही पदवी मिळत नाहीं. असा श्रोत्रिय ब्राह्मण म्हणजे अत्यंत कर्तृत्वसंपन्न व विचारसंपन्न पुरुष होय. देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ, मनुष्ययज्ञ आणि ब्रह्मयज्ञ हे पंचमहायज्ञ जो नित्य करीत असतो व ज्याच्याकडून अग्निहोमादि विधियज्ञ यथाकालीं संपादिले जातात, आणि जपयज्ञादिकांत जो दक्ष असतो, तो श्रोत्रिय ब्रह्मपदाचा अधिकारी होतो. तो आयु, तेज, वर्चस्, श्री, यश व ब्रह्मचर्य यांनीं युक्त होतो, असा तैत्तिरीयारण्यकांत मंत्र आहे.

परंतु ज्याचे व्यवसाय शरीरांतर्गत चेतनाशक्ति कार्यस्थितींत अत्यंत वेगानें आणित्याशिवाय यथायोग्य होणेंच शक्य नाहीं, असल्या क्षत्रिय वैश्य वर्णांना ब्राह्मणांकरितां सांगितलेल्या आचारांचें परिपालन करण्याचें कारण नाहीं. त्यांच्याकडे प्रजारक्षण, कृषि इत्यादिकांची जोपासना याशिवाय अन्य धर्मकर्में त्यांना फारच थोडीं सांगितलीं आहेत. चैतन्यशक्तीचा विकास

होण्यास ज्यांचे जन्मसिद्ध व्यवसाय पुरेसे आहेत, अशांना कर्मकांडाचा खटाटोप ब्राह्मणांइतका करावयास नको. त्यांनीं वेदाध्ययन करून ज्ञानाभ्यासोपयोगी अशीं अवश्य कर्में केलीं, म्हणजेच त्यांची इतिकर्तव्यता संपते. कोणत्या ना कोणत्या तरी मार्गांनीं विचारशक्ति व चिच्छक्ति यांचा पूर्ण विकास व्हावयाला पाहिजे, एवढेंच हिंदुधर्माचें साध्य असल्यामुळें वर्णधर्मात वरील तऱ्हेचा भेद हिंदु शास्त्रकारांनीं ठेविला आहे. अध्ययन, दान आणि इज्या हे या तीन वर्गाला समान धर्म आहेत. या तीन धर्मांनीं तो आपल्यांतील विचार, कर्तृत्व आणि संवेदना यांची वाढ करून घेतो. परंतु क्षत्रिय आणि वैश्य यांच्या व्यवसायांनीं त्यांच्यांत कर्तृत्वशक्ति जितकी पूर्णतेस येते, तितकी नित्यानित्यविवेक करणारी बुद्धि येत नसल्याकारणानें श्रोत्रिय ब्राह्मणाला त्यांनीं नेहमीं शरण राहून ज्ञानप्राप्ति करून घ्यावी, आणि नित्यानित्यवस्तुविवेकसंपन्नतेचा अधिकार आपणास मिळवून घ्यावा, असा धर्मशास्त्रकारांनीं निर्बंध घालून दिला आहे. ब्रह्मसायुज्याच्या प्राप्तीस ब्राह्मण क्षत्रियाला व वैश्याला अत्यंत अवश्यक होऊन बसला, एवढ्याच करितां ब्राह्मण हा या दोन्ही वर्णांहून श्रेष्ठ आहे, असें म्हणण्यांत येतें. एरव्हीं व्यवहारांत तिन्ही वर्णांची योग्यता सारखीच आहे, असे ठिकठिकाणीं उल्लेख आले आहेत. "नाब्रह्मक्षत्र मृध्नोति नाक्षत्रं ब्रह्मवर्धते । ब्रह्मक्षत्रं च संपृक्तमिहाचामुत्र वर्धते"। असें मनूचें वचन आहे. मनुस्मृतींतील १० व्या अध्यायांत सांगितलेल्या वैश्य धर्माचें योग्य परिपालन करण्यांत वैश्य पराकाष्ठेचा कर्तृत्वसंपन्न होईल, व त्यानें जर आश्रमोचित कर्में योग्य प्रकारें केलीं, तर त्याच्या तिन्ही शक्तींचा विकास होऊन अखेरीस तो ब्रह्मस्थितीस जाऊन मिळेल. " स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः। स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः" इत्यादि भगवद्गीतेंतील वाक्यांवरून हीच गोष्ट सिद्ध होते. वर्णानुसार आचरण करणारा मनुष्य कोणत्याहि वर्णांतला असला, तरी त्याला सिद्धस्थिति प्राप्त होते. मात्र त्यानें स्वकर्म केलें पाहिजे. त्यानें परमेश्वर कोण हें जाणलें पाहिजे व त्याच्या ठायीं कर्मार्पण करण्याइतकें त्याच्या विषयींचें प्रेम आपल्यांत वाढवून घेतलें पाहिजे. वर्णव्यवस्थेनुसार जीं कर्तव्यें शास्त्रकारांनीं प्रतिपादन केलीं आहेत, त्यांत

वर्णांचा विचार, संवेदना व चेतना या तिन्ही गुणांची वाढ होण्याची कशी व्यवस्था केली आहे, हें यावरून दिसेल.

सर्व धर्मशास्त्रांतून शूद्र वर्गाकरितां कोणताहि आचार त्याला ब्रह्मस्थिति मिळविण्याकरितां सांगितला नाहीं. तथापि वरील तीन वर्णांची सेवा ही त्यानें असूया न करतां केल्यास तोहि ब्रह्मपदाधिकारी होईल. त्याच्या त्या सेवाधर्माकडे लक्ष देऊन शास्त्रकारांना त्याच्या उद्धाराविषयीं बराच सूक्ष्म विचार करावा लागला आहे. सर्व भक्तिमार्गांची रचना प्रथमतः या वर्णाच्या उद्धाराकरितांच झाली आहे. उपासनाकांडाचें विवेचन करतांना या प्रश्नाचा थोडासा अधिक विचार करण्यांत येईल.

कर्ममार्ग व ज्ञानमार्ग या दोन मार्गांतच भक्तीची योजना प्राचीन आर्यांनीं केली होती. भक्तिमार्ग म्हणून स्वतंत्र मार्ग त्यांनीं काढला नव्हता. ईश्वराच्या कारुण्याविषयींची दृढश्रद्धा असल्याशिवाय यज्ञादिकां-सारख्या अचाट प्रयत्नानें साध्य होणारे उद्योग त्यांनीं केले नसते. गायनादिकांच्या सहाय्यानें मन तल्लीन करून घेण्याचा प्रघात यज्ञाच्या वेळीं जीं सामें उद्‌गात्याकडून गायिलीं जात होतीं, त्यांवरून पडला, हें उघड दिसतें. दान हा तिन्ही वर्णांचा प्रधान व समान धर्म आहे, हें पाहिलें असतां संवेदनाशक्तीची वाढ करण्याची योजना या दोन मार्गांच्या आंत कशी होती, हें दिसून येतें. अनुकंपा अगर प्रेम यांनीं प्रेरित झाल्याशिवाय मनुष्य दानाला प्रवृत्त होत नाहीं. या दानाचे अनेक प्रकार शास्त्रकारांनीं सांगून ठेवण्यांत त्यांचा हेतु इतकाच. कोणतीहि अडचण अगर दुःख शेजाऱ्यांस झालें असतां त्यांच्याविषयीं नुसतीं टिपें गाळून घरीं बसण्यापेक्षां त्याच्या दुःखाचा प्रतिकार करण्यास जावें हेंच प्रेमाचें खरें लक्षण आहे. संवेदनेबरोबर कर्तृत्वाचा विकास जर झाला नसेल, तर एखाद्याची दुःख-वार्ता कानावर पडल्याबरोबर मनुष्याचें अंतःकरण डळमळून जाईल. त्याच्या डोळ्यांतून दुःखाश्रू गळूं लागतील, परंतु त्यापलीकडे त्याच्याकडून कांहींहि होणार नाहीं. तत्प्रतिकारार्थ उपाय योजण्याची कल्पना त्याला येतहि नाहीं; आली असतां ती करण्याचें सामर्थ्य त्यानें अभ्यासानें मिळविलेंहि पण नसतें. परमेश्वराच्या नुसत्या प्रेमलीला गाऊन रात्रंदिवस तो प्रेमळ आहे, तो दयाळू

आहे, असें म्हणून चिंतन करणारा संत अंतःकरणानें अगदीं दयामय बनतो. क्षमा हेंच त्याचें जीवित होतें. ईश्वराचें प्रेम अगाध आहे, व जगांत सर्वत्र ईश्वरी प्रेम भरलें आहे, अशी त्याची भावना असल्यामुळें जगांत उत्पन्न होणाऱ्या आपत्ती मनुष्यप्रयत्नांनीं दूर होण्याची शक्यता त्यास पडत नाहीं. तो खरा दैववादी होतो. गेल्या एक हजार वर्षांचा भरतखंडाचा इतिहास परमेश्वराकडे नुसत्या प्रेममय दृष्टीनें पाहाणाऱ्या मनुष्याची जगांत काय हानि होते व तो कर्तृत्वशून्य होऊन कसा सर्वसह बनत जातो, याचें ठळक उदाहरण आहे. भक्ति किंवा उपासना हा मार्ग प्राचीन आर्यांस खात्रीनें अपरिचित नव्हता, त्यांनीं त्याची कर्म आणि ज्ञान यांच्या साहचर्यानें सांगड घातली होती. कर्तृत्वशक्ति व ज्ञान यांची पराकाष्ठा करीत असतांच संवेदनाशक्तीचा विकास व्हावा, अशी शास्त्रकारांनीं त्रैवर्णिकांकरितां योजना केली होती, व जेथपर्यंत संवेदनाशक्तीचा विकास या दोहोंच्या साहचर्यानें केला जात होता, तेथपर्यंत भरतखंडाकडे डोळा वर करून पाहण्याचें सामर्थ्य एकाहि राष्ट्रांत नव्हतें. परतु ज्ञान आणि कर्म यांतून फुटून जेव्हां भक्ति बाहेर निघाली व तिच्याच जोरावर ब्रह्मपरयात्रा करण्यास भरतखंड निघाला तेव्हांपासून तो कर्मयोगापासून भ्रष्ट होऊन ज्ञानयोगाला मुकला, शास्त्रांत नवीन शोध करण्याची पात्रता भरतखंडवासीयांची नष्ट झाली, कर्तृत्वसंपन्न राष्ट्राबरोबर शर्यत करण्याची त्याची ताकद कमी झाली, व उत्कलवासी हस्तपादविरहित जनार्दनाशीं त्याची स्पर्धा सुरू झाली. हा प्रकार कसा झाला हा इतिहासाचा भाग आहे, सबब या निबंधांत याचा विस्तार करण्याची गरज नाहीं.

शूद्र हा वर्ण खरोखर आर्यसंघापैकीं नसून आर्यांनीं जेव्हां भरतखंडांत येऊन वसाहत केली, तेव्हां अनार्यांशीं लढाया वगैरेंत जे अनार्य त्यांच्या हस्तगत होत, त्यांना त्यांनीं दास म्हणून आपल्या समाजांत वागवून घेतलें. जसजसा आर्यांच्या पराक्रमी बाहूंच्या कक्षेंत जास्त जास्त मुलूख येत चालला, तसतशी ही दस्यूंची संख्या वाढत चालली. या लोकांना जेते आर्य सेवकांप्रमाणें वागवीत आणि म्हणूनच त्यांचा धर्म ' परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि

स्वभावजम् ' अशा तऱ्हेचा पडला. मूळच्या आर्यसंघापैकीं कोणतीहि शाखा दुसऱ्या शाखेचें कायमचें दास्यत्व करण्यास तयार झाली नसती व झालीहि नाहीं. जे आर्य नव्हत अशा लोकांना निरुपायास्तव ती स्थिति पत्करावी लागली. परंतु आर्यसंस्कृतींत दास म्हणून कां होईना त्यांचा एकदां प्रवेश झाल्यावर त्यांच्या ऐहिक व पारलौकिक कल्याणांचा विचार करण्याची जबाबदारी आर्य लोकांवर आली. त्यांना वेदाचा अधिकार नसल्यामुळें तत्कालीन ज्ञान व कर्म या दोन्ही मार्गांनीं त्यांचें कल्याण होण्याचा रस्ता बंद होता. आर्यलोकांनीं ज्या मूळच्या रहिवाशांतील लोकांस आपले दास बनविलें होतें, त्यांच्यांत जे धर्म प्रचारांत होते, त्यांतील कांहीं गोष्टींना वैदिक स्वरूप देऊन या लोकांच्या पारलौकिक कल्याणाचा मार्ग मोकळा केला. कर्म आणि ज्ञान या दोहोंना सोडून जो भक्तिमार्ग निघाला, त्याची उत्पत्ति ही अशी आहे. शूद्र लोक मूळचे ज्या संघांत होते, ते संघच्या संघ जेव्हां आर्यसंस्कृतींत एका पाठीमागून एक समाविष्ट झाले, तसतशी आर्यसंस्कृतीचा ज्यावर थोडासा मुलामा आहे व ज्यांच्यांत आपल्या पूर्वधर्माची पूर्ण ओळख आहे आणि अज्ञ समाजांत अत्यंत स्वाभाविक असलेल्या मनोवृत्तिप्रबलतेस जो अनुसरून आहे, असा हा भक्तिमार्ग सर्वत्र प्रसृत झाला. कृत, त्रेत व द्वापार या तीन युगांत मनुष्याला आपल्या देहाचें सार्थक्य व जन्मसाफल्य करण्याकरितां तपश्चर्या, ज्ञान व यज्ञ हीं करावीं लागत असत. इतर युगांपेक्षां कलियुग हें नीच आहे, तेव्हां भगवत्प्राप्तीचें साधन अगदीं सोपें असें करून ठेविलें आहे, अशी वेडगळ लोकांची समजूत झालेली दिसते. व्रतादि साधनें आणि उपासना या नांवाखालीं सांप्रत मोडणारी भक्तिमार्गाची तऱ्हा ही आर्यांच्या उपासनामार्गाहून फार भिन्न आहे. हल्लींचा वारकरी पंथ फक्त डोळ्यांतून खळखळ अश्रुधारा ढाळणाऱ्या प्रेमळ मनाचीं मनुष्यें निर्माण करील, परंतु दूरदृष्टि आणि अविश्रांत श्रम यांची ज्यांत जरूरी आहे, असलीं अचाट कार्यें करणारे पूत त्यांतून निघणार नाहींत.

मनुष्याच्या वैलक्षण्याचा आत्यंतिक विकास व्हावयाचें साधन उपलब्ध करून देणें हें जें धर्माचें मुख्य काम तें त्यानें मनुष्यसंघाचीं जीं राष्ट्रें त्यांच्या उन्नतीस अडथळा येऊं न देतां केलें पाहिजे; इतकेंच नव्हे, तर प्रत्येक व्यक्ती-

च्या उन्नतीचा मार्ग व राष्ट्राच्या उन्नतीचा मार्ग हा एकच आहे, असें त्यानें दाखविलें पाहिजे. हिंदुधर्मानें हें कर्तव्य पूर्णपणें ओळखिलें आहे; व त्यानें चातुर्वर्ण्याचा सविस्तर विचार करून मनुष्याचीं जीं कर्तव्यें ठरवून दिलीं, तीं वरील हेतूस धरूनच आहेत. राजपुरोहित कसा असावा, मंत्री कसा असावा, समितींत कोण कोण सभासद असावेत, इत्यादि प्रश्नांची चर्चा धर्मग्रंथांतून केलेली आढळते ती देखील एवढ्याचकरितां. राजाचा पुरोहित कसा असावा याचा विचार ऐतरेय ब्राह्मणांत एके ठिकाणीं आला आहे; त्यावरून जगतांतील तत्त्वांचें हिंदुधर्मशास्त्रकारांनीं स्थूलवर्गीकरण कसें केलें होतें, व जड सृष्टींत लागू असलेले नियम सचेतन सृष्टीस लागू करण्याइतकी बुद्धि-विशालता त्यांच्या ठायीं कशी आली होती, याची कल्पना येईल. ज्याला तीन प्रकारच्या पुरोधा व तीन प्रकारचे पुरोहित यांचें ज्ञान आहे, तोच राष्ट्रगोप पुरोहित होय. पृथ्वी ही पुरोधा व अग्नि हा पुरोहित, अंतरिक्ष ही पुरोधा व वायु हा पुरोहित आणि द्यौ ही पुरोधा आणि आदित्य हा पुरोहित. या तीन पुरोधांचें व पुरोहितांचें ज्यास योग्य ज्ञान असेल, तोच खरा पुरोहित व त्यालाच राष्ट्रगोप–पुरोहित म्हणावें. इतर सर्व तिरोहित होत. "अशा तऱ्हेचा राष्ट्रगोप–पुरोहित ज्या राज्यांत आहे, त्यांतील ब्राह्मण विद्वान्, क्षत्रिय बलसंपन्न व विश हे एकजुटीनें वागणारे असतात" या ब्राह्मणांतील उताऱ्यांत पुरोहिताचे योग्य गुण सांगण्यांत आले. यापेक्षां थोड्या शब्दांत योग्य पुरोहिताचें वर्णन करणेंच अशक्य आहे. या मंत्रांतील पुरोधा व पुरोहित हे शब्द ( Static and dynamic ) स्थिति आणि चैतन्य याचे वाचक आहेत, व स्थितीला धरून प्रगति कशी होईल, असा प्रश्न मुत्सद्यांना नेहेमीं सोडवावा लागतो. परंपरेला न सोडतां प्रगतीचा मार्ग आंखणें हें काम मोठ्या बुद्धिमत्तेचें व कर्तृत्वसंपन्नतेचें आहे. असला अलौकिक पुरुषच राष्ट्रनौका चालवावयास योग्य आहे.

---

# मराठी वाङ्मयाचा जयजयकार

[ ही लेखमाला मुंबईच्या "संदेश" पत्राकरितां दे. भ. माधवराव अणे यांनीं लिहिली होती व ती त्या पत्रांत ता. २९ एप्रिल १९१५ च्या अंकांत व त्यानंतर १४ मे १९१५ पर्यंतच्या अंकांत क्रमशः प्रसिद्ध झाली होती–सं.]

## लेखांक १ ला

## सध्यांचीं मासिक पुस्तकें, त्यांचें स्वरूप व सुधारणेच्या दिशा

महाराष्ट्र वाङ्मयाच्या भक्तांना जर त्या वाङ्मयाचा योग्य विस्तार व्हावा अशी इच्छा असेल,तर त्यांनीं वरील प्रश्नाचा सूक्ष्म रीतीनें व सांगोपांग विचार करणें अवश्य आहे.मासिक पुस्तकांची सुस्थिति ही वाङ्मयाच्या योग्य अभ्युदयास किती आवश्यक आहे, हें वाङ्मय व त्याचे कार्य काय आहे व मासिक पुस्तकांचें कार्य काय आहे, याचा विचार केला असतां सहज लक्षांत येईल.

मराठी भाषेंत वाङ्मय हा शब्द इंग्रजींतील Literature या शब्दाचा पर्याय शब्द म्हणून योजण्यांत येत आहे.साहित्य व वाङ्मय हे दोन्हीहि शब्द एकाच अर्थांत मराठी ग्रंथांतून वापरले जातात. 'वाङ्मय' शब्दाचा धात्वर्थ जर घेतला तर, "वाचः विकारः" वाणीची जी विकृति तें वाङ्मय असा आहे. सुवर्ण ही प्रकृति व अलंकार ही त्याची विकृति आहे व मूळ वस्तूला मनोहरत्व, रम्यत्व किंवा चित्ताकर्षकत्व आणण्याकरितां त्याचें जें रूपांतर करण्यांत येतें, त्याला त्या वस्तूची विकृति म्हणण्याचा परिपाठ आहे. वाणीच्या ज्या स्वरूपांत वरील गुणांचें अस्तित्व दृष्टीस पडत नाहीं, त्याला वाङ्मय ही संज्ञा देतां येत नाहीं.

जें जें कांहीं लिखित स्थितींत असेल, त्याला वाङ्मय हें नांव देतां येणार नाहीं, हें उघड आहे. अक्षराला उत्तम वळण यावें म्हणून विद्यार्थ्याला बंडू-नानानें काढून दिलेला "श्रीमंत सकलगुणालंकरण" हा कित्ता याला कोणी वाङ्मय म्हणण्याचें धाडस करीत नाहीं, त्याचप्रमाणें भाषेंतील शब्दाच्या

कोशालाहि वाङ्मय अशी संज्ञा देतां येणार नाहीं. कोश, व्याकरण, छंद इत्यादिकांची वाङ्मयाच्या अध्ययनास कितीहि आवश्यकता असली, तरी त्यांची वाङ्मयग्रंथांत गणना होत नाहीं. प्राचीन पंडित आपल्या शिष्यांस काव्याचा पाठ देण्यापूर्वी अमरकोश, धातु व नामरूपावली, समासचक्र इत्यादि कांहीं आवश्यक विषयांचें ज्ञान करून देत असत, व या सर्व ग्रंथांस ते 'उपसाहित्य' असें म्हणत. 'उपसाहित्य' म्हटल्याशिवाय काव्याचा पाठ घेण्याचा अधिकार विद्यार्थ्यास येत नाहीं, असा त्यांचा सिद्धांत होता. अर्थात् वरील विषयांची गणना साहित्य किंवा वाङ्मयांत न करितां साहित्याध्ययनोपयोगी विषयाएवढीच त्यांची योग्यता समजण्यांत येते.

ज्याप्रमाणें व्याकरण, छंद, कोश वगैरे विषयांवरील ग्रंथांचा वाङ्मयांत समावेश होत नाहीं, त्याचप्रमाणें ज्याला 'शास्त्र' अशी संज्ञा आहे अशा विषयावरील ग्रंथहि वाङ्मयांत येऊं शकत नाहींत. शास्त्र आणि कला (Scientific & Technical) एतद्विषयक ग्रंथ कितीहि उपयुक्त व आवश्यक असले, तरी त्यामुळें भाषेच्या वाङ्मयाची वृद्धि होत नाहीं किंवा न्यूनताहि येत नाहीं. एखाद्या भाषेंत शास्त्रीय ग्रंथांचा पूर्ण अभाव असूनहि तींतील वाङ्मय हें अत्यंत श्रेष्ठ प्रतीचें असूं शकेल, किंबहुना कोणत्याहि प्रगल्भ भाषेचा इतिहास पाहिला असतां शास्त्रकर्ता निर्माण होण्यापूर्वींच एखादा प्रतिभासंपन्न कवि किंवा लेखक उदयास आल्याचें आपणास दृष्टीस पडेल. वाल्मीकि, होमर, चॉसर किंवा त्यांच्याहि पूर्वींचे वृद्ध कवि उदयास येण्यापूर्वी संस्कृत, ग्रीक किंवा इंग्रजी या भाषांतून शास्त्रग्रंथांची रचना मुळींच झाली नव्हती. गंगायमुनेच्या तटाकीं किंवा सप्तसिंधूंच्या प्रदेशांत विविध सृष्टदेवताक सूक्तें उच्च स्वानें म्हणणारे मंत्रद्रष्टे ऋषी झाल्यानंतर कित्येक शतकांनीं यज्ञयागादिकांची मीमांसा करणाऱ्या ब्रह्मवादींचा उदय झाला, हें प्राचीन इतिहासवेत्त्यांस अवगत आहेच. ज्या भाषेंत शास्त्रीय ग्रंथ व वाङ्मयांतील भेद लक्षांत घेतला जात नाहीं, ती भाषा अप्रगल्भ स्थितींतच असते. सुवर्णाचे दागिने होतात व नाणेंहि होतें, परंतु नाण्यांचा उपयोग दागिन्यांकडे करण्याचा प्रचार अज्ञ समाजांतून सुरू असतोच. ज्या समाजांत सौंदर्याची कल्पना नाहीं, अंगावर कोणत्या तरी रूपानें सोनें, रुपें

घालण्यांत यावें, एवढीच काय ती संपत्ति उपभोगण्याची हौस मात्र आहे, असल्या समाजाला उन्नतीच्या शिडीवरील पुष्कळच पायऱ्या चढावयाच्या राहिल्या आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. नाण्यांचा उपयोग निराळा व अलंकारांचा उपयोग निराळा, हा तारतम्य भाव उत्पन्न व्हावयास पुष्कळच बाबतींत समाजाची सुधारणा व्हावी लागते. समाजाचा व्याप अनेक दिशांनीं वाढावा लागतो. त्याचप्रमाणें शास्त्रीय व कलाविषयक ग्रंथ आणि वाङ्मयात्मक ग्रंथ यांचें पृथक्करण फक्त प्रगल्भ व अभियुक्त भाषांतूनच करण्यांत येतें; इतर भाषांतून या दोन्ही तऱ्हेच्या ग्रंथांचा वाङ्मयांत समावेश करतात व भाषेंतील वाङ्मयाचा विचार करतांना शास्त्रीय वगैरे ग्रंथांचाहि विचार करण्यांत येतो. हल्लीं मराठी भाषा इतक्या प्रौढ स्थितींत खचित येऊन पोहोंचली आहे कीं, तींतील लेखकांनीं वाङ्मय व शास्त्रीय किंवा धंदेविषयक ग्रंथरचना यांमधील भेद लक्षांत ठेवणें जरूर आहे.

वरील विवेचनावरून उपसाहित्यांत मोडणाऱ्या विषयावरील ग्रंथ, त्याचप्रमाणें शास्त्रीय आणि कलाविषयक ग्रंथ यांहून वाङ्मय भिन्न आहे, एवढी गोष्ट दृष्टोत्पत्तीस येईल, तथापि " वाङ्मय " या संज्ञेखालीं येणाऱ्या ग्रंथरचनेचें स्वरूप काय, याचा बोध होत नाहीं. 'पंचकाव्यव्युत्पन्न' म्हणून ज्या संस्कृतज्ञानाला प्राचीन पंडित लोक म्हणत असत आणि ज्यांचा 'रंडागीतानि काव्यानि' असा निंदाव्यंजक निर्देश करीत, ते संस्कृतज्ञ ज्या ग्रंथाच्या परिशीलनांत आपलें आयुष्य घालीत, त्यांना वाङ्मयात्मक ग्रंथ म्हणतां येईल. परंतु वरील विधानानें वाङ्मयाच्या स्वरूपाचें निदर्शन न होतां वाङ्मय नांवाखालीं मोडणाऱ्या पुस्तकसंग्रहाकडे अंगुलिनिर्देश करणें मात्र होईल. वाङ्मयाची व्याख्या करण्याचें काम कितीहि कठीण असलें, तरी ती करणें आवश्यक आहे. ज्या ग्रंथांच्या परिशीलनानें मनुष्याचें मन सुसंस्कृत होतें, वृत्ति उदात्त बनते, आणि शील नीतियुक्त होतें, त्या सर्व ग्रंथांना वाङ्मय असें म्हणतां येईल. मोर्ले यांनीं वाङ्मयाची एके ठिकाणीं व्याख्या केलेली आहे. ही व्याख्या थोडीशी लांब आहे, तथापि वाङ्मयाची इतक्या उत्तम रीतीनें व्याख्या केलेली दुसऱ्या कोठेंहि माझ्या पाहण्यांत आली नसल्यामुळें, मी ती जशीच्या तशीच खालीं उतरून घेतों:—

" Literature consists of all the books and they are not so many, where moral truth and human passion are touched with a certain largeness, sanity and attraction of form. My notion of a literary student is one, who through books explores strange voyages of man's moral reason, the impulses of the human heart, the chances and changes that have overtaken human weals of virtue and happiness of conduct and manners, and the shifting fortunes of great conceptions of truth and virtue. Poets, dramatists, humanists, satirists, masters of fictions, the great preachers, the character-writers, the magazine-writers, the great political orators–they are all literature, in so far as they teach us to know man and know human nature. This is what makes literature rightly sifted and rightly selected and rightly studied not the more elegant trifling that is so often and so erroneously supposed to be, but a proper instrument for a systematic training of the imagination and sympathies, and of a genial and varied moral sensibility.

( On Study of Literature )

" ज्या ग्रंथांमुळें नैतिक सत्य व मानवी मनोविकार यांना एक प्रकारचें विशदत्व, विचारबद्धता आणि सौंदर्य प्राप्त होतें, असल्या ग्रंथांच्या दृढ परिशीलनानें मनुष्यमात्राची सदसद्विवेकबुद्धि व मानवी अंतःकरणांत उठणाऱ्या मनोवृत्ती यांनीं केलेल्या पर्यटनाचा ज्याला शोध लावतां येतो, सद्गुण आणि सुख, शील आणि चालीरीति यांच्या कल्पनांत दैवी आपत्तींमुळें, अगर मानवी कृतीमुळें झालेल्या निरनिराळ्या स्थित्यंतराचा ज्याला तपास करितां येतो, त्याचप्रमाणें सत्य व सच्छील यांच्या ध्येयांत वारंवार घडलेल्या क्रांतीचा ज्याला माग काढितां येतो, अशा विद्वानालाच मी खरा

विद्याव्यासंगी अथवा वाङ्मयव्यासंगी समजतों. कवि, नाटककार, विनोदी लेखक, उपहासपटु ग्रंथकार, सुभाषितकार, राजकारणनिपुण वक्ते हे सर्व वाङ्मयनिर्मति होत. कारण यांच्या कृतीमुळें मनुष्य व मानवी स्वभाव यांची यथार्थ कल्पना लोकांना उत्पन्न होत असते. योग्य रीतीनें छाननी, निवड आणि अभ्यास केल्यास वाङ्मय हें केवळ क्षणिक मौजेचें साधन म्हणून जें नेहमीं समजण्यांत येतें,—परंतु जी समजूत अत्यंत चुकीची आहे—असा क्षणिक करमणुकीचा प्रकार न होतां, तें एक कल्पनाशक्ति,सहानुभूति, प्रेमळपणा व विविध नैतिक संवेदनांचा व्यवस्थित विकास करण्याचें प्रबळ साधन आहे असें समजण्यांत येतें याचें बीज तरी हेंच होय. ”

( वाङ्मयाचा अभ्यास—लॉर्ड मोर्ले )

एड्विन् अर्नोल्ड या आंग्ल वाङ्मयाच्या इतिहासकारानें जी व्याख्या केली आहे ती अशीः—

What remains after these deductions is literature in the strict or narrower sense, that is the assemblage of those works which are neither addressed to particular classes nor merely signs of things, but which treating of subjects that interest man and man and using words as the vehicles and exponents of thoughts, appeal to general human intellect and to common human heart.

“ वरील तऱ्हेचे लेख वजा केल्यावर जें शिल्लक राहतें,त्यालाच वाङ्मय ही संज्ञा संकुचित अर्थानें कां म्हणाना अन्वर्थक होईल. जे ग्रंथ कोणत्याहि विशिष्ट वर्गाला उद्देशून लिहिले नसून किंवा ज्यांतून शब्दयोजना वस्तुमात्रांचा संकेत दाखविण्याकरितां करण्यांत येत नसून मानवीसृष्टीची यथार्थ कल्पना मनुष्यमात्रास होईल, असल्या विषयावरच ज्यांत उहापोह केला असतो, ज्यांतील शब्द ‘ विचारांचे ’ वाहक व निदर्शक असतात आणि सामान्य मानवी बुद्धि आणि मानवी अंतःकरण यांस चालना देण्याकरितां

अगर हलवून सोडण्याकरितां जे ग्रंथ लिहिले असतात, अशा ग्रंथसमुदायास वाङ्मय म्हणतां येईल. (एडविन् अर्नोल्ड)

वरील व्याख्या नीट लक्षांत घेऊन जर वाङ्मयांत मोडणाऱ्या ग्रंथांचें वर्गीकरण केलें, तर तें सामान्यतः खालील प्रमाणें होईलः—

- वाङ्मय
  - गद्य
  - पद्य
    - नाटकें
    - काव्य (श्राव्य)
      - १ वीरात्मक
      - २ महाकाव्य
      - ३ विनोदी
      - ४ वर्णात्मक
      - ५ शोकरसात्मक
      - ६ भक्तिरसात्मक
      - वगैरे

- कादंबरी
- विनोदी व उपसंहार
- वक्तृत्व वृत्तपत्रें इत्यादि
- इतिहास चरित्र
- धर्मशास्त्र
- तत्त्वज्ञान व इतर सर्व टीकात्मक व चिकित्सक ग्रंथ

यावरून असें दिसून येतें कीं, सारस्वताच्या विस्तीर्ण प्रदेशांतील वाङ्मय हा एक सुंदर व सुपीक भाग आहे, व या मर्यादित प्रदेशांत मासिक पुस्तकांचें कार्य कोणतें आहे, हें आपण पाहिलें पाहिजे.

नियतकालीं प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयाचे वृत्तपत्रें व मासिकें असे दोन विभाग त्यांच्या प्रकाशनावधीवरून पाडतां येतात. प्रात्याह्निकापासून तों पाक्षिकापर्यंत सर्वांची गणना वर्तमानपत्रांत होते व मासिक, त्रैमासिक, षण्मासिक यांची गणना मासिकांत होत असते. परंतु हा भेद त्यांच्या बाह्य लक्ष-

णांवरूनच करण्यांत येतो. यापेक्षां कांहीं आंतरभेद या दोन तऱ्हांच्या प्रकाशनांत आहे किंवा नाहीं, हें आपण पाहूं.

वर्तमानपत्रें किंवा मासिक पुस्तकें या दोन्ही संस्था आपण विलायतेहूनच घेतल्या असल्याकारणानें तिकडच्या वर्तमानपत्रांत आणि मासिकांत काय भेद दृष्टीस पडतो, हें पाहिल्यास सदरहू प्रश्नावर बराच प्रकाश पडण्याचा संभव आहे. विलायतेंत वर्तमानपत्राचें कार्य अगदीं आरंभीं केवळ बातम्या पुरविण्याचेंच असे. पुढें प्रसिद्ध केलेल्या बातम्यांवर थोडयाफार टीका लिहिण्याचा प्रघात सुरू झाला. त्यानंतर राजकारणांत पडणाऱ्या व्यक्तींचें लक्ष वर्तमानपत्राच्या वाढत्या लोकप्रियतेकडे गेलें, तेव्हांपासूनच प्रचलित राजकीय विषयांची चर्चा करण्याकरितां अग्रलेख लिहिण्याचा संप्रदाय सुरू झाला. आंत प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व अग्रलेख यांतील संबंध विलायतेंतील प्रमुख पत्रांतून स्पष्ट दृष्टीस पडतो, व हिंदुस्थानांतील जीं थोडीबहुत वर्तमानपत्रें इंग्लंडांतील प्रमुख वर्तमानपत्रांच्या वळणावर चाललेलीं आहेत, त्यांच्यांतहि तोच प्रकार नजरेस येतो. तात्पर्य, वर्तमानपत्रांची संस्था ही वाङ्मयाला पोषक होईल अशा रीतीनें चालविण्यांत येत नाहीं. प्रसंगप्राप्त प्रश्नावर तात्कालिक लोकमत बनवून एखाद्या विशेष कार्याला जनतेला एकदम प्रवृत्त करणें हा वर्तमानपत्रांचा मुख्य उद्देश आहे, आणि म्हणूनच वर्तमानपत्रें ही प्रचंड शक्ति आहे, असें सुधारलेल्या देशांत लोक समजतात. विलायतेंत राजा व दोन पार्लमेंटचीं गृहें या त्रयीच्या बरोबरीनेंच वर्तमानपत्रकारांचा धंदा समजला जातो. राजकारणांत या त्रयीइतकाच वर्तमानपत्रांचा अधिकार आहे आणि एखाद्या विषयावर वर्तमानपत्रांतून चर्चा सुरू झाली म्हणजे मोठमोठ्या मुत्सद्यांनाहि आपल्या मौनाचा त्याग करून लोकप्रतिनिधींपुढें आपल्या कृतीचें समर्थन करण्याकरितां येणें कसें भाग पडतें, याचा अनुभव, वर्तमानपत्रांच्या वाचकांस वारंवार येत असतो. विलायतेंत वर्तमानपत्रांचा कांहीं विलक्षण दरारा आहे. त्यांची जरब मोठमोठ्या मुत्सद्यांनाहि वाटत असते. परंतु ही सर्व छाप, हें सर्व वजन व हा सर्व अधिकार मुत्सद्यांच्या कृत्यांवर डोळ्यांत तेल घालून पाहण्याची, व प्रसंगविशेषीं निर्भीड टीका करण्याची, त्याचप्रमाणें लोकमताचा ओघ एकदम मंत्रिमंडळावर सोडण्याची शक्ति त्यांच्यांत आहे, म्हणूनच त्यांना प्राप्त झाला आहे.

## लेखांक २ रा

# वर्तमानपत्रें व मासिकें

राजकारणांत वर्तमानपत्रांचा जो हा विलक्षण उपयोग होतो व पूर्वपरंपरेमुळें अशा तऱ्हेनें वर्तमानपत्राकडे पाहण्याची इंग्रज सरकारला जी संवय आहे, त्याचा विचार केला असतां वर्तमानपत्रांतील लेखकवर्गानें वाङ्मयाभिवृद्धि करण्याच्या बुद्धीनें आपली लेखणी न शिणवितां प्रचलित राजकीय, औद्योगिक, सांपत्तिक वगैरे प्रश्नांसंबंधीं सरकारचें धोरण कसें काय आहे, त्याचप्रमाणें राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेनें ठरविलेल्या राजकीय ध्येयाच्या प्राप्त्यर्थ सरकारनें व लोकांनीं काय केलें पाहिजे, याची चर्चा सद्यःप्राप्त विषयांच्या अनुरोधानें करणें हेंच अधिक श्रेयस्कर आहे. वर्तमानपत्रकारांचा धंदा हा जवळजवळ सरकार व लोक यांमध्यें तडजोड करणाऱ्याचा असतो. राज्यव्यवस्थेवरील टीका हें वर्तमानपत्रांचें जीवन आहे. हें जीवन त्यांना मिळेनासें झालें म्हणजे वर्तमानपत्रें आपोआप मृतप्राय होतात.वर्तमानपत्राकडून वाङ्मयांत कायमची भर अशी फार थोडी घातली जाते.मनुष्यांच्या मनोवृत्तींना झपाट्यानें आंदोलन देणाऱ्या लेखांतून क्वचित् प्रसंगीं वाङ्मयांतील अत्यंत सुंदर सुभाषितांनाहि मागें टाकण्यासारखे वेंचे येतील; परंतु वाङ्मयसेवा हा त्यांचा व्यवसाय नव्हे. लोकमत तयार करणें व तें कार्यकारी करणें हें त्यांचें प्रधान कर्तव्य आहे.

परंतु मासिकांची स्थिति याहून फार भिन्न आहे. कोणत्याहि देशांत एखाद्या विशिष्ट काळाच्या वाङ्मयाचा अभ्यास करावयाला लागलें म्हणजे एक प्रकारचें विचारसाम्य सर्व ग्रंथकारांतून असल्याचें आपल्या दृष्टीस पडतें. तो ग्रंथकार कवि असो, कादंबरीकार असो, तत्त्ववेत्ता असो, निबंधकार असो किंवा उपहासात्मक अथवा विनोदी लेखक असो, त्या सर्वांच्या ग्रंथरचनेंत कांहीं विशेष विचारांची छाप बसली आहे, असें सहज आढळून येतें. देशांत विविध कारणांमुळें होणाऱ्या घडामोडींचा परिणाम ग्रंथकारांवर होत असतो,आणि ग्रंथकारांच्या विचाराला त्या घडामोडींमुळें एक विशिष्ट परिणामकारक वळण लागत असतें. राष्ट्रीय परिस्थिति व तज्जन्य अगणित तदनु-

षंगिक महत्त्वाकांक्षा यांचें प्रतिबिंब प्रतिभासंपन्न ग्रंथकारांच्या पारदर्शक स्थितींत स्पष्ट उमटलेलें असतें. इंग्लंडमधील १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत प्रसिद्ध झालेल्या वाङ्मयाचें सूक्ष्म निरीक्षण करणारास सहज दृष्टीस पडेल कीं, उपयुक्ततावादाचा पगडा त्या वाङ्मयावर बसला आहे. मिल्ल, बेन्थाम, स्पेन्सर या तत्त्ववेत्त्यांचे ग्रंथ, अर्थशास्त्रावरील व्यासंगी लेखकांचे लेख, टेनिसनसारख्या राजकवीच्या काव्यांतील एकंदर विचारांचा ओघ, सामाजिक कादंबऱ्यांची एकाएकी झालेली वाढ या सर्वांचें एकच स्पष्ट कारण आहे. उपयुक्ततावाद हा त्या कालांत मुत्सद्दी, कवि, तत्ववेत्ते, कादंबरीकार, लेखक हे सर्व लोकप्रिय करण्याच्या प्रयत्नांत गुंतलेले आहेत, असें आपण पाहतों. हें चमत्कारिक विचारसाम्य सर्वश्रेष्ठ पण परस्पराहून भिन्न विषयांतील लेखकांत कां दृष्टीस पडतें, याचा विचार केला असतां मासिक पुस्तकांचें वाङ्मयवृद्धीस कसें सहाय्य होतें, हें आपोआप कळण्यासारखें आहे. परिस्थितीचा योग्य अभ्यास करण्याची ज्यांच्या मेंदूत शक्ति आहे व तींतून उन्नतीचा मार्ग कोणता हें ठरविण्याची ईश्वरबुद्धि ज्यांनीं अभ्यासानें विकासित केली आहे, असले विचारी लोक आपले विचार व ग्रह प्रथमतः मासिक पुस्तकांतून त्रोटकरूपानें मांडण्यास आरंभ करतात. विलायतेंतील मासिकांतील लेख कोणत्याहि विषयाचा सांगोपांग विचार करण्याकरितां लिहिलेले नसतात व त्यांत तसा उहापोह केल्याचें क्वचितच दृष्टीस पडतें. परंतु ते सूचक असतात, ते देशाला विचाराची व कर्तव्याची दिशा दाखविणारे असतात. लोकांच्या महत्त्वाकांक्षेच्या नौका कोणत्या दिशेनें हाकलावयाला पाहिजेत, हें दाखविण्याकरितां मासिक पुस्तकांतील लेख म्हणजे जणूं काय होकायंत्रच होत, असें म्हटल्यास हरकत नाहीं. जुन्या व नव्या वाङ्मयांचें परीक्षण याच उद्देशानें मासिक पुस्तकांतून करण्यांत येतें. मासिकपुस्तककार हे राष्ट्रशरीराची परीक्षा करणारे व त्याला पथ्य सांगणारे धन्वंतरी होत. वाङ्मयाकरितां इतस्ततः पडलेल्या अनेक विद्यासामुग्रींतून कोणती मूर्ति निर्माण करणें प्रस्तुत काळाला योग्य आहे, हें सांगणारे मार्मिक शिल्पचिकित्सक, मासिक पुस्तककार आहेत. एकदां त्यांनीं आपल्या लेख-

र्णांतून प्रेरणा करावयास आरंभ केला म्हणजे सर्व लेखकवर्ग त्याच कल्पनांच्या पाठीमागें लागतो. ती कल्पना राष्ट्राच्या पचनीं पडण्याकरितां निरनिराळ्या ग्रंथरूपी पक्वान्नांच्या मिषानें लेखकवर्ग समाजापुढें ठेवीत असतो व समाजांतील त्या रुचकर पक्वान्नांच्या स्वादिष्ट सेवनाबरोबर हे नूतन विचारहि आपल्या पचनीं पाडीत असतो. कोणतें नाटक करावयाचें हें एकदां सूत्रधारानें ठरवून टाकल्यावर, ज्याप्रमाणें कंपनींतील नटवर्ग आपापली भूमिका घेऊन तें नाटक प्रेक्षणीय व रम्य करण्याचा प्रयत्न करीत असतो, तद्वतच लेखकवर्गाची स्थिति होते. मासिक पुस्तककार हे वाङ्मयरूपी नाटकांत भिन्नभिन्न भूमिका घेणाऱ्या लेखकवर्गाचे सूत्रधार आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा जो स्वर लावील व जो ताल धरील, त्या स्वरांत व त्या तालांतच सर्व लेखकवर्ग गाऊं लागतो व नाचूं लागतो. मासिकपुस्तककार युद्धास उद्युक्त असलेल्या अफाट सैन्याचे सेनापति आहेत. त्यांनीं एकदां युद्धभूमीचा नकाशा ठरविला कीं, बाकीचे योद्धे आपापल्या स्थानीं उभे राहून अतुल पराक्रम गाजवूं लागतात. मासिकपुस्तककारांच्या अधिकारांचें हें वर्णन पुष्कळांना अतिशयोक्तीचें वाटण्याचा संभव आहे, परंतु इंग्लंडांतील मासिक पुस्तकें वाचण्याचा ज्यांना बराच नाद असेल, त्यांस वरील विधानांची सत्यता पटल्याशिवाय राहणार नाहीं.नामांकित मासिकपुस्तकांतून प्रसिद्ध होणाऱ्या सूत्रात्मक लेखांवर वाङ्मयांतील प्रौढ ग्रंथकार निरनिराळ्या दिशेनें भाष्यें लिहीत आहेत, असाच अनुभव त्यांना येईल. गेल्या शतकापासून युरोपांत जी विचारक्रांति होत आहे, तिचे प्रेरणात्मक लेख प्रथम मासिक पुस्तकांतूनच येऊन गेले व त्यानंतर त्या त्या विषयांवर सर्वांगसंपूर्ण विचार करणारे भारदस्त ग्रंथ अस्तित्वांत आले. प्रत्येक प्रसिद्ध मासिक पुस्तकाचें कांहीं तरी एक ठरीव धोरण असतें,व त्या दिशेनेंच तें मासिक चालविण्यांत येत असतें. वाङ्मयाच्या सागरास जाऊन मिळणाऱ्या ग्रंथगंगेचें उगमस्थान मासिकांतील लेखांतील कैलासांतच शोधावें लागतें. मासिकपुस्तककारांनीं ही जबाबदारी ओळखली नसती, तर निव्वळ करमणुकीपलीकडे त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. केवळ करमणूक हा वाङ्मयाचा उद्देश नाहीं, हें मासिक पुस्तककारांनीं नीट लक्षांत ठेविलें पाहिजे. प्रसिद्ध आंग्ल

ग्रंथकार कार्लाईल यांनीं वाङ्मयाच्या उद्देशासंबंधानें एके ठिकाणीं जे उद्गार काढिले आहेत, ते फार चिंतनीय आहेत—

"But after all in the loudest blaring and trumpeting of popularity it is ever to be borne in mind, as a truth remaining true for ever, that literature has other aims than that of harmlessly amusing indolent languid men. Or if literature have them not, then literature is a very poor affair and something else must have them and must accomplish them with thanks or without thanks, the thankful or thankless will not long world otherwise."

वरील विवेचनावरून ग्रंथपरीक्षा आणि दिग्दर्शन या ध्येयानेंच वाङ्मयाची फार मोठी सेवा मासिकपुस्तककारांकडून होत असते, व हें ध्येय डोळ्यांपुढें ठेविल्याशिवाय मासिक पुस्तकांची वाङ्मयांत प्रतिष्ठा होणें शक्य नाहीं, हें लक्षांत येईल.

वाङ्मयाची रूपरेषा मासिकपुस्तककारांकडून काढिली जाते, व ग्रंथकार आणि कवि हे त्यानंतर त्या चित्रांच्या भिन्नभिन्न अवयवांस योग्य उठाव आणण्याचा आणि निरनिराळे रंग भरण्याचा प्रयत्न करतात. वाङ्मयाचा प्रदेश सुपीक खरा, परंतु मासिकपुस्तककारांनीं जर हंगामशीर नांगरणी केली नाहीं, आणि ऋतुमानाला योग्य बीं पेरलें नाहीं, तर या सुपीक प्रदेशांत वाङ्मयाचें चित्रविचित्र फलपुष्पांनीं आनंदविणारें रम्य उद्यान दृष्टीस पडण्याऐवजीं कांटेरी झुडुपें,आणि कुंदा व गवत यांचीं डांगें मात्र चाललेलीं दिसतील. सरस्वतीच्या यात्रेंत मासिकपुस्तककार हे वाटाडे होत. त्यांच्याकडे रस्ते दाखविण्याचें व साफ ठेवण्याचें काम आहे, व यांच्या मार्गेंच सरस्वती आपल्या लवाजम्यानिशीं हळुहळू मार्ग क्रमीत असते. हे नेतील त्या दिशेनें ती गमन करिते. वाङ्मयदेवीच्या अत्यंत विश्वासू परिचारकाचें काम मासिकपुस्तककारांकडे आलें आहे.

कोणत्याहि भाषेंतील मासिक पुस्तक हातांत घेतलें असतां आज ती भाषा बोलणाऱ्या लोकांत कोणत्या विचारांचें प्राबल्य आहे, हें सहज लक्षांत

येतें. त्याचप्रमाणें संस्कृतीच्या किती पायऱ्या त्या लोकांना अजून चढावयाच्या आहेत, आणि किती चढून झाल्या आहेत, याची कल्पना येते. मासिक पुस्तकें म्हणजे राष्ट्रांतील विचार आणि विकार यांचें मापन करणारीं यंत्रेंच आहेत. ज्याप्रमाणें सरकार निरनिराळ्या खात्यांचा रिपोर्ट नियमित कालीं प्रसिद्ध करीत असतें, तशाच प्रकारची वाङ्मयाची सेवा, कांहीं अंशीं, मासिकपुस्तककारांकडून होत असते. विलायतेंत मासिक पुस्तकांना Review ही संज्ञा देण्यांत येते, त्याचें कारण तरी हेंच आहे. एकंदर राष्ट्रीय परिस्थितीचें समालोचन मासिक पुस्तकांतून करण्यांत येत असतें, इतकेंच नव्हे, तर स्वसमकालीन इतर देशांतील मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या लेखांचा सारांश देखील देण्याचा प्रघात विलायतेंतील नामांकित रिव्ह्यूमधून आढळण्यांत येतो. जगांतील विचारांचा ओघ कोणत्या दिशेनें वाहात आहे हें पाहण्याकरितां, व स्वदेशांतील विचाराला प्रसंगानुरूप वळण देण्याकरितां या व्यवस्थेचा किती उपयोग होतो, हें सांगावयास नकोच.

अर्थात् मासिक पुस्तकें स्वकालीन स्थितीचे आदर्श असलीं पाहिजेत, इतकेंच नव्हे, तर त्यांतील लेख सूचक Suggestive आणि विवेचक Critical अशा तऱ्हेचे पाहिजेत. वाङ्मयावर ज्यांचा कायमचा परिणाम होतो, अशीं मासिकें वरीलप्रमाणें असतात. एतद्व्यतिरिक्त मासिकांचे पुष्कळच प्रकार करतां येतात. निव्वळ मुलींकरितां, निव्वळ खेळाडूंकरितां, निव्वळ गप्पीदासांकरितां, केवळ उडाणटप्पूंकरितां आणि अशाच तऱ्हेनें वर्गीकरण करीत गेलें म्हणजे व्यक्तींकरीतां एक एक मासिक पुस्तक काढावयाला लागलें, तरी वर्गीकरण संपणार नाहीं, अशी माझी समजूत आहे. परंतु वाङ्मयाच्या सेवेकरितां जीं मासिकें निघतात, त्यांच्याविषयीं विचार कर्तव्य असतां त्यांची उपेक्षा केल्यास कांहीं हरकत नाहीं. मराठी मासिकांकडे पाहिलें असतां सामान्यतः त्यांचे सात प्रकार करतां येण्यासारखे आहेत. ते १ धार्मिक, २ संग्राहक, ३ मनोरंजक, ४ चिकित्सक ( विवेचक ), ५ शास्त्रीय व विशिष्ट कला आणि धंदेविषयक, ६ महिलावर्गाकरितां, ७ मुलांकरितां हे होत. या प्रत्येक प्रकारांत एखादंदुसरें तरी मासिकपुस्तक असें आहे कीं, ज्याच्याकडून त्या त्या दिशेनें बरीच कामगिरी झाली आहे.

## लेखांक ३ रा

# धार्मिक मासिकें

## ( प्रकार पहिला )

( १ ) धार्मिक मासिकांतून विशेषतः प्राचीन संस्कृत धार्मिक ग्रंथांचें भाषांतर हप्त्याहप्त्यानें प्रसिद्ध होत असतें. वे. शा. संपन्न काशीनाथशास्त्री लेले यांनीं चालविलेल्या " आर्यधर्मरहस्य " मासिकानें या संबंधानें फार मोठी कामगिरी बजाविली आहे. धर्ममासिकांतून त्यांनीं लिहिलेले लेख जरी पुष्कळदां एककल्ली असत, तरी प्राचीन संस्कृतींत विचार करण्यासारखें पुष्कळ आहे, एवढा विचार त्यांनीं तरुण मंडळींच्या मनांत उत्पन्न केला, यांत कांहीं शंका नाहीं. प्रो. भानु यांनीं काढलेली ' भगवद्गीता ' हें या तऱ्हेच्या मासिकांतील दुसरें महत्त्वाचें मासिक पुस्तक होय. प्रो. भानूंच्या भाषांतरांत अनेक दोषस्थळें आहेत, इतकेंच नव्हे, तर कांहीं कांहीं ठिकाणीं अर्थविपर्यास देखील झाला आहे; तथापि अध्यात्मविद्ये-विषयीं आस्था उत्पन्न करण्यांत या मासिकाचाहि चांगलाच उपयोग झाला, एवढें प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. हीं दोन्ही मासिकें हल्लीं बंद आहेत, परंतु याच धर्तीवर उपनिषत्प्रकाश वगैरे मासिकें अजून सुरू आहेत, व प्राचीन गीर्वाण वाङ्मयाचा महाराष्ट्रास परिचय करून देण्याचें काम त्यांजकडून व्यवस्थित रीतीनें होत आहे. तथापि एवढी सूचना करणें जरूर आहे कीं, वरील कार्य मासिकप्रकाशनाच्या द्वारानें करण्यापेक्षां एकदम एखाद्या ग्रंथाचें सबंध समूळ भाषांतर प्रसिद्ध करणें हेंच अधिक योग्य आहे. या मासिक पुस्तकामुळें असल्या विषयाविषयीं गोडी महाराष्ट्रांत उत्पन्न झाली आहे हें चिपळूणकर कंपनीनें काढिलेल्या महाभारताचें भाषांतर, लेलेशास्त्रयांनीं काढिलेल्या वाल्मिकीय रामायणाचें भाषांतर, श्रीमद्भागवताचें मराठी भाषांतर इत्यादि ग्रंथांच्या पुन्हा आवृत्त्या काढाव्या लागल्या, यावरून दृष्टीस पडतें. वरील तऱ्हेचे सबंध ग्रंथ एकदम प्रकाशित करण्यास द्रव्यबल आणि मनुष्यबल पाहिजे तें नसल्यामुळें मासिकाच्या रूपानें त्या ग्रंथांचें खंडशः प्रकाशन करण्यांत येतें. परंतु केव्हांहि झालें तरी

एखादा ग्रंथ समग्र अवलोकनांत आल्याशिवाय त्याचा इष्ट असा परिणाम लोकांच्या विचारशक्तीवर फारसा होत नाहीं. किंवा देशांतील विचारी लोकांना त्या ग्रंथाचा उपयोगहि होऊं शकत नाहीं. लेले शास्त्र्यांनीं शारीरभाष्यासारखा ग्रंथ खंडशः मासिकांतून प्रसिद्ध न करतां एकदम तीन भागांत प्रसिद्ध केल्यामुळें अध्यात्मविद्येचा सशास्त्र अभ्यास करणाऱ्या माणसांना फार मोठी सोय झाली आहे. तोच क्रम जर इतर प्राचीन ग्रंथ-प्रकाशनेच्छु स्वीकारतील, तर त्यांचा हेतु लवकरच तडीस जाईल. याशिवाय महाराष्ट्रांतच काय, परंतु सर्व भरतखंडांत असल्या प्रकाशकांचा पुष्कळ सुळसुळाट झाला होता, त्यांपैकीं बऱ्याच लोकांनीं आपलें अंगीकृत कार्य तडीस नेण्याऐवजीं ग्राहकांच्या हातांत थोड्याशा महिन्यांचे अंक देऊन मासिकें बंद केलीं व अशा रीतीनें ग्राहकांच्या द्रव्याचा अपहार केला. पुष्कळशा वाचकांना ही आंच लागली असल्यामुळें अशा मासिक पुस्तकास वर्गणीदार व्हावयास लोक कचरतात. याशिवाय खंडशः जितका ग्रंथाचा भाग त्यांना मिळाला असतो, तो जपून ठेवण्याचें काम त्यांच्याकडून बरोबर होत नाहीं, यामुळें तर या लोकांची फार मोठी नागवणूक होत असते. धार्मिक विषयाची चर्चा करणारें एखादें दुसरें मासिक असल्यास महाराष्ट्रास पाहिजे आहे. परंतु धार्मिक ग्रंथांचें मासिक पुस्तकाच्या रूपानें प्रकाशन करण्याऐवजीं ते ग्रंथ समग्र एकदम वाचकांच्या हातीं देण्याचा प्रकाशक प्रयत्न करतील, तर त्यांच्या हातून वाङ्मयाची सेवा व लोकसेवा अधिक चांगल्या रीतीनें होईल. धार्मिक मासिकासंबंधानें लिहीत असतां या तऱ्हेच्या प्रकाशनाचे महाराष्ट्रांतील उत्पादक कै. कुंटे यांचें विस्मरण होणें शक्य नाहीं. त्यांच्यासारख्या विद्वानानें चालविलेली ‘ षड्दर्शन-चिंतनिका ’ ही आज महाराष्ट्रांत नामशेष झाली आहे. याचें कारण ‘ चिन्तनिकेंतून ’ प्रसिद्ध झालेलीं भाषांतरें एक तर अपुरीं राहिलीं, व सर्व अंकांचा संग्रह करून प्रसिद्ध झालेल्या भागांचा संकलनात्मक ग्रंथ प्रसिद्ध करणारा प्रकाशक त्यास कोणी मिळाला नाहीं. मासिकांतून खंडशः प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांचें किती लवकर विस्मरण होतें, हें यावरून लक्षांत येईल, व

अशा विस्मृतिपंथांत जाणाऱ्या प्रकाशनाचा राष्ट्राच्या विचारशक्तीवर कांहींच संस्कार होणें शक्य नाहीं, हें देखील यावरून स्पष्ट होत आहे. प्राचीन गीर्वाण वाङ्मयाचा जितका जास्त परिचय होईल तितका बरा. परंतु हल्लीं तो ज्या तऱ्हेनें करण्याचा प्रयत्न होत आहे, ती तऱ्हा फारशी इष्ट नाहीं, एवढेंच मला सांगावयाचें आहे. संस्कृतभाषेंतील धार्मिक ग्रंथभांडार किती अफाट आहे, याचा विचार केला, म्हणजे निव्वळ मराठी वाचकांस त्याचा परिचय करून देण्याचें हल्लींच्या पद्धतीनेंच जर सुरू ठेविलें, तर त्यांतील भागालादेखील मराठी वेष देण्यास कित्येक शतकें लागतील असें वाटतें. यासंबंधीं प्रयत्न अधिक नेटानें आणि अधिक शिस्तवार झाल्याशिवाय हें कार्य यशस्वी होण्याचा संभव फारच कमी आहे. विलायतेंत ज्याप्रमाणें "पौर्वात्य पवित्र पुस्तकमालिके" चा उपक्रम कै. मोक्षमुल्लरप्रभृति पंडितांनीं केला, तशाच तऱ्हेचा उपक्रम इकडे होणें जरूर आहे. हें कार्य मासिक-पुस्तककारांच्या आटोक्याबाहेरचें आहे, ही गोष्ट गेल्या २०।२५ वर्षांच्या अनुभवावरून सिद्ध झाली आहे. बुद्धिबळ, व्यासंग आणि द्रव्यबळ यांचें ऐक्य झाल्याशिवाय या क्षेत्रांत कार्य करणें दुरापास्त आहे. अलाहाबादेस पाणिनी ऑफीसनें अशा प्रकारचें कार्य आपल्या शिरावर घेतलें आहे. आणि महाराष्ट्रांतील कांहीं प्रमुख वजनदार विद्वानांनीं या कार्याकरितां एखादें मंडळ स्थापन केलें, व सरकार, संस्थानिक आणि इतर श्रीमंत वर्ग यांचें सहाय्य मिळविण्याची खटपट केली, तरच तें कार्य सुसाध्य होईल. महाराष्ट्रांत संस्थानिक बरेच आहेत, सरदार लोकांची संख्या कमी नाहीं, सरकारचाहि आश्रय मिळवितां येण्यासारखा आहे. डॉ. भांडारकरांसारखे विद्वन्मणीहि अजून हयात आहेत, तेव्हां या लोकांचें लक्ष या प्रयत्नाकडे ओढल्याशिवाय गीर्वाण वाणींतील प्रचंड धर्मग्रथभांडार मराठींत येण्याची आशाच नको. अजून तीन वेद, पांच शास्त्रें, अनेक शाखांचे ब्राह्मण, सूत्र, निरुक्त वगैरे वेदांचीं उपांगें,स्मृति वगैरे शेकडो ग्रंथ असे आहेत कीं,ज्यांचा मराठी वाचकांना परिचय व्हावयाला पाहिजे आहे. मासिक पुस्तकाच्या टिटवीनें आपल्या चोंचीनें हा विस्तीर्णार्णव आटविण्याचा गेल्या २०।२५ वर्षांत बराच प्रयत्न करून पाहिला. निराशा

जनक स्थितींत आरंभदेखील भूषणास्पद आहे. मदतीची जरूरी आहे, पण प्रयत्न कार्यकारी, सद्यःफलदायी व्हावा अशी ज्यांची इच्छा आहे, त्यांना तो कालावधीवर लोटणें इष्ट वाटत नाहीं. आणि एवढाच मासिक पुस्तकांचा या क्षेत्रांत किती थोडा उपयोग झाला आहे, शिस्तवार प्रयत्नांच्या अभावीं मराठी वाचकांचें कसें नुकसान होत आहे, हें आणखी एका दृष्टीनें विचार केला असतां लक्षांत येतें. कांहीं कांहीं धार्मिक ग्रंथांचीं अपुरीं भाषांतरें दोन दोन, तीन तीनदेखील झालीं आहेत, व कित्येक भाषांतरांतून पहिल्या भाषांतरकाराचे शब्द मागेंपुढें फिरविण्यापेक्षां अधिक नवीनपणा दृष्टीस येत नाहीं. तेव्हां त्याच कार्याकरितां मराठी वाचकांना एकवेळेपेक्षां अधिक वेळ आपले पैसे खर्च करावे लागतात, परंतु नवीन पुस्तकाची मात्र भर पडत नाहीं. मराठी वाचकांशीं मासिकपुस्तककार मुद्दाम प्रतारणा करीत नाहींत, ही गोष्ट मात्र मला कबूल आहे. परंतु प्रयत्न संघटनात्मक व पद्धतशीर झाल्यास हा अनर्थ सहज टाळतां येण्यासारखा आहे.

## लेखांक ४ था.

## संग्राहक मासिकें

### ( प्रकार २ रा )

आतां मासिकांतील दुसरा वर्ग संग्राहक मासिकांचा. वर धार्मिक मासिकांसंबंधानें जें विवरण केलें आहे, त्यांतील बऱ्याचशा गोष्टी त्यांनाहि लागू पडतात. प्राचीन मराठी कविता व ऐतिहासिक लेख यांचा संग्रह या मासिकांच्या द्वारें करण्यांत येत आहे.

'काव्येतिहाससंग्रह' हें या वर्गाचें आद्य मासिक होय. याच्या द्वारें बरीच जुनी कविता व ऐतिहासिक लेख प्रकाशित झाले. नंतर इतिहाससंग्रह हा गळला व काव्यसंग्रह शिलकेंत राहिला. काव्यसंग्रहानें प्राचीन मराठी वाङ्मयाची जी सेवा केली आहे, तिची उपेक्षा करणें म्हणजे स्वतःला कृतघ्नतेच्या दोषास पात्र करून घेणें आहे. आज काव्यसंग्रहहि अस्तंगत झाला आहे. "महाराष्ट्र कवि" या मासिकाच्यामधून फिरून प्राचीन कवींचीं मंजुळ गीतें ऐकूं येऊं लागलीं, पण या कविकोकिलांचा हा निवासवृक्षहि आतां वठून गेला

आहे. तथापि प्राचीन कवींकरितांच जर विचार केला, तर त्याबद्दल विशेष खेद करण्याचें कारण नाहीं, असें आपणांस कळून येईल. प्राचीन कवींच्या ग्रंथांचा आस्थेवाईक अभ्यास करणारे विद्वान् महाराष्ट्रांत उत्पन्न झाले आहेत व त्यांच्या प्रयत्नास थोडेंसें व्यवस्थितपणाचें रूप यावयालाहि आरंभ झाला आहे. काव्यसंग्रहावरून प्रसिद्ध झालेल्या मोरोपंती ग्रंथापेक्षां अधिक शुद्ध व विश्वसनीय प्रत रा. पराडकरांनीं प्रसिद्ध केली आहे व रा. पराडकरांना द्रव्याची जरी अडचण त्रास देत आहे, तथापि तीहि प्रयत्नांतीं नाहींशी होईल अशी त्यांस उमेद आहे. श्रीसमर्थ रामदास व रामदासी सांप्रदायांतील वाङ्मय प्रसिद्ध करण्याचें काम धुळें येथील सत्कार्योत्तेजक सभेनें चालविलें आहे. त्याचप्रमाणें श्रीज्ञानेश्वर, श्रीएकनाथ इत्यादि प्रासादिक ग्रंथांच्या कित्येक सटीप आवृत्त्या निघाल्या आहेत. संतवर्य तुकारामाचे ग्रंथ कित्येक प्रकाशकांनीं अनेकवार प्रकाशित केले आहेत आणि त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट ही आहे कीं, सांप्रदायिक लोकांच लक्षहि या कार्याकडे लागलें आहे. निरनिराळ्या कवींच्या ग्रंथांचा अभ्यास करण्याकरितां संस्था स्थापन होत आहेत. परिषदेनें जर असल्या संस्थांना योग्य प्रोत्साहन देण्याची खटपट केली तर मासिक पुस्तकांच्याच प्रदेशांत वरील प्राचीन कवींना जें निष्कारण अतिक्रमण करावें लागतें, त्या कवींच्या ग्रंथांच्या योग्य अभ्यासासहि साह्य होणार आहे.

ऐतिहासिक लेखांच्या प्रकाशनाचा इतिहासहि असाच आहे. ज्यांचा अधिकार भरजरी पोषाख करण्याचा, त्यांच्या नशिबांत ज्याप्रमाणें दैवदुर्विलासामुळें कधीं कधीं तरी जेमतेम काया झांकण्याकरितां फाटके कपडे वापरण्याची पाळी येते, तद्वतच या प्राचीन कवींची आणि ऐतिहासिक लेखांची सध्यां स्थिति झालेली आहे. ज्या तऱ्हेचें एखादें पत्र प्रसिद्ध करण्याबद्दल पाश्चिमात्य देशांतून संपादक व प्रकाशक यांजवर द्रव्याची व मानाची वृष्टि होत असते, तशा तऱ्हेच्या लक्षावधि पत्रांचा अमूल्य संग्रह हातांत येऊन महाराष्ट्रांतील इतिहाससंशोधकांना मासिकपुस्तककारांचे उंबरठे झिजवावे लागतात, यापेक्षां अधिक लाजिरवाणी गोष्ट दुसरी कोणती आहे? या कार्यांत आज पंधरा वीस वर्षे अविश्रांत परिश्रम करणाऱ्या विद्वानांना युनिव्ह-

सिटींतून फेलो म्हणून निवडण्याची बुद्धि आमच्या सुशिक्षित वर्गांतहि उत्पन्न झाली नाहीं. परिषदेच्या कार्यकारी कमेटींतदेखील असल्या लोकांची योजना करण्यांत येत नाहीं, मग इतर स्थळीं त्यांचा नामनिर्देश होत नसल्यास त्यांत कांहींच खेद मानण्यासारखें नाहीं. रा. राजवाडे, रा. पारसनीस या व्यक्तींनीं आजपर्यंत या दिशेनें केवढें कार्य केलें आहे, व हें करीत असतां, विशेषतः रा. खरे आणि राजवाडे यांनीं केवढा स्वार्थत्याग केला आहे, याचा महाराष्ट्रानें कधीं तरी विचार केला आहे काय ? आपल्या जवळील बहुमोल 'लेखसंग्रह, ' 'ग्रंथमाला ' याची एका पाठीमागें एक काळाच्या जबड्यांत आहुति पडली, तथापि निराशेनेंहि निरुत्साह न होतां या महनीय व्यक्तींनीं आपलें प्रकाशनाचें कार्य सुरूंच ठेविलें आहे. मासिक पुस्तकांच्या चिंध्या आंगावर पांघरून लोकांत वावरण्याची सोय नाहीं असा त्यांना खडतर अनुभव येऊन, त्यांनीं आपले लेख स्वतंत्र पुस्तकरूपा-नेंच छापून काढण्यास सुरुवात केली आहे व अशा या आपल्या प्रयत्नास महाराष्ट्रांतील सर्व दर्जाच्या लोकांकडून साह्य व्हावें, एवढ्याकरितां रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं पुणें मुक्कामीं ' इतिहाससंशोधकमंडळा'-ची स्थापना केली आहे. या मंडळाचें कार्य क्रमाक्रमानें लोकप्रिय होत आहे, व परिषदेनें या प्रयत्नास द्रव्यसहाय्य व बुद्धिसहाय्य देण्याची कांहींतरी योजना करणें जरूर आहे. जर या संस्थेस योग्य उत्तेजन मिळालें, तर ऐतिहासिक लेखांचें प्रकाशन शीघ्र होईल, आणि मासिक पुस्तकांच्या प्रदे-शांतून वावरण्याची अस्पृहणीय अवश्यकता त्यांना राहाणार नाहीं.

लेखांक ५ वा

## कादंबरी, नाटकें व गोष्टी

तिसऱ्या प्रकारच्या मासिकांसबंधानें लिहिण्यापूर्वीं महाराष्ट्रांतील वाचना-भिरुचीवर दोन शब्द लिहिणें जरूर आहे. मराठी भाषेंतून प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयांतील शेंकडा ८० पुस्तकें कादंबरी, नाटकें व गोष्टी या सदराखालीं येणारीं असतात. कोणत्याहि पुस्तकालयांतील वाचकवर्गाचें टिपण पाहिलें, तर जवळजवळ शेंकडा ९० वाचक केवळ कादंबरीच्या वाचना-वर आपली ज्ञानतृषा भागवीत असतात असें दिसेल. ही स्थिति शोचनीय तर खरीच, परंतु कांहीं अंशीं अपरिहार्य आहे. अमेरिकेंत

कादंबरीवाचकांचें प्रमाण शेंकडा ५५।६० पर्यंत, व इंग्लंड व स्कॉट्लंडमध्यें तें ७५।८० पर्यंत आहे, असें लॉर्ड मोर्लेंनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. परंतु इंग्लंड व अमेरिका यांतील कादंबरीचा वाचकवर्ग आणि महाराष्ट्रांतील कादंबरीचा वाचकवर्ग हा फार भिन्न आहे. अमेरिकेंत व विलायतेंतहि निरक्षरत्व हा जवळजवळ गुन्हा असल्यामुळें अक्षरशत्रु लोक समाजांत दिसत नाहींत. परंतु ज्यांची विद्या अक्षरओळखीपलीकडे फारशी गेली नाहीं, अशांचीच संख्या फार मोठी आहे. ज्यांच्या पिढ्यानपिढ्या अज्ञानांधकारांत गेल्या, असला फार मोठा समूह एकदम विद्यामंदिरांत प्रविष्ट होऊन त्यांनीं कशीबशी अक्षरओळख करून घेतली आहे. परंतु त्यांच्यांत तेवढ्यामुळें, व ज्या व्यवसायांत त्यांना आयुष्याचा उरलेला भाग उदरनिर्वाहाकरिता काढावा लागतो त्या व्यवसायामुळें, विद्याभिरुचि उत्पन्न झाली नाहीं, असल्या लोकांत व आमच्याकडील 'सहीची निशाणी' करणाऱ्या लोकांत सदभिरुचीच्या दृष्टीनें फारच थोडी तफावत असते. म्हणूनच युरोपांतील कादंबरीचा वाचकवर्ग जरी शेंकडा ७५।८० इतका असला, तरी त्यापैकीं बहुतेक सर्व या वर्गांतून येतात, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. परंतु हिंदुस्थानांतील गोष्ट फार निराळी आहे. महाराष्ट्रांत पुस्तकें वाचण्याचा नाद असणारा वर्ग फार वरच्या दर्जाचा आहे. ज्यांच्या कित्येक पिढ्यांनीं शतकेंच्या शतकें विद्यार्जनांत काढिलीं, ज्यांच्या पूर्वजांनीं राजकारणांत व मुत्सद्देगिरींत आपली बुद्धिमत्ता व्यक्त केली, ज्यांच्या वडिलांनीं हजारो विद्वानांचा परामर्ष घेतला, अशा विद्याव्यासंगी वर्गांतून महाराष्ट्रांतील वाचकवर्ग उत्पन्न झाला आहे, असें असूनहि, जेव्हां कादंबरीच्या वाचकवर्गाचें प्रमाण आमच्यांत शेंकडा ८० पडतें, तेव्हां युरोपांतील वर्गाशीं तुलना करून स्वस्थ बसण्यासारखी परिस्थिति नाहीं, हें विशेषत: परिषदेनें लक्षांत ठेवावयास पाहिजे. इंग्रजीराज्याचा उदय होण्यापूर्वी ज्या वाङ्मयावर महाराष्ट्रीय लोकांच्या उड्या पडत होत्या व जें वाङ्मय त्यांनीं कंठगत करून ठेविलें होतें, त्यांत "भक्ति ज्ञान वैराग्य" याशिवाय दुसरा विषय येत नव्हता. महाराष्ट्रांतील पंडितांनीं संस्कृत भाषेंत प्रावीण्य मिळविल्यावर किंवा पुणेंकर पेशवे व नागपूरकर भोंसले वगैरे भूपतींच्या दरबारांतून

पंडित म्हणून पालखींत मिरविल्यावरहि त्यांच्याकडून जी मराठीची सेवा झाली, तींतहि गीर्वाण वाणींतील नाटकें, किंवा वासवदत्ता कादंबरी इत्यादि ग्रंथांतील शृंगाराचीं लेणीं महाराष्ट्र सरस्वतीवर चढविण्याचा प्रयत्न न करतां संतांनीं आपल्या प्रासादिक वाणींनीं अध्यात्म विषयाकडे महाराष्ट्रीयांचें मन ओढिलें त्याच विषयांची सशास्त्र मांडणी करण्याकडे या पंडितांनीं आपली बुद्धिमत्ता खर्च केली. पोवाडे, लावण्या हा भाग विद्वानांकडे न राहातां गोंधळी व तमासगीर या हलक्या दर्जाच्या लोकांकडेच ठेविला होता. ऐतिहासिक पोवाडे ऐकण्यास वरिष्ठवर्गाचे लोक जमत, परंतु लावणी ऐकणारा श्रोतृवर्ग हा नेहमीं खालच्या दर्जांतीलच असे. विलायतेंत कादंबरीवाचकांची संख्या मुख्यतः ज्या प्रकारच्या लोकसमुदायांतून येते, तशाच प्रकारचा वर्ग हे लावणी, छक्के, छकडी इत्यादि प्रकारचे प्रकार पाहाण्यास व ऐकण्यास येत. लावणी रचणारे कवि व कल्पित कथा सांगणारें गोंधळी आणि त्या काव्यावर खूष होणारा समाज हे दोन्ही एकाच वर्गांतून येत असत, ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. वरिष्ठ वर्गांनीं जर कधीं काळीं या प्रकारच्या वाङ्मयांत आपलें मन घातलें असेल, तर त्या तऱ्हेच्या काव्यसरणीलाहि परमेश्वरभक्तीची गोडी लावावी, या एकाच बुद्धीनें घातलें आहे आणि म्हणूनच इंग्रजीचा उदय होण्यापूर्वीच्या मराठी वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या प्राचीन वारकरी, हरिदास, भजनी मंडळी व इतर लोक यांस 'पुस्तकांची निवड' करण्याची जरूरी पडत नसे. परंतु इंग्रजीचा उदय झाल्यानंतर ही परिस्थिति एकाएकीं पालटली. गेल्या २५ वर्षांत तर मराठी वाङ्मयांत जी काय भर पडली, ती याच तऱ्हेच्या ग्रंथरचनेची आहे. दरिद्री महाराष्ट्राला इंग्रजी भाषेची चटक लागली, परंतु इंग्रजी वाङ्मयांतील गंभीर ग्रंथांचें अध्यापन करणें, हें त्यांच्या दारिद्र्यामुळें शक्तीच्या बाहेरचें होतें. त्यामुळें मॅट्रिक्युलेशनपर्यंत गेलेल्या शेंकडों विद्यार्थ्यांनीं तीन आण्यांपासून सहा आण्यापर्यंत मिळणाऱ्या स्वस्त व बारीक टाइपांतील कादंबरीच्या भिकार पुस्तकांचीं पारायणें करावयास आरंभ केला. मॅट्रिक्युलेशन परीक्षेपर्यंत ज्यांचें अध्ययन झालेलें आहे, अशा लोकांचा वर्ग हाच महाराष्ट्रांतील पुस्तकें वाचणारांचा वर्ग होय. या

वर्गांतील लोकांना दुर्दैवानें कादंबरी वाचनाचा नाद लागला. याच वर्गांतील लोक शिक्षणखात्यांत शिक्षक म्हणून सर्व महाराष्ट्रभर पसरले व त्यांच्या अभिरुचीचा परिणाम बऱ्याच अंशीं महाराष्ट्रावर झाला आहे. प्रत्येक इंग्रजी जाणणारा शिक्षक शाळेंत येत असतांना हातांत नेहमीं रेनॉल्ड्ससारख्या कादंबरीकाराचें एखादें पुस्तक घेऊन येत असे, ही गोष्ट १५–२० वर्षांपूर्वींच्या मध्यम प्रतीच्या शिक्षणसंस्थांची ओळख ज्यांची कायम असेल, त्यांना सांगण्याची जरूर नाहीं. या लोकांना कादंबरीवाचनाचें एवढें वेड कां लागलें, हें समजणें फारसें कठीण नाहीं. मॅट्रिक्युलेशन परीक्षेच्या अभ्यासांत इंग्रजी भाषेकरितां एखादें पुस्तक युनिव्हर्सिटीकडून नेमिलें जात नसे व त्यामुळें कोणतेंही एक पुस्तक उत्तम रीतीनें तयार करण्याची जबाबदारी शिक्षक किंवा विद्यार्थी या दोघांवरहि नव्हती. परंतु इंग्रजी भाषेंत उत्तीर्ण होण्याकरितां जे गुण मिळवावे लागत, त्यांचें प्रमाण मात्र फार जास्त असे. त्याचा परिणाम असा होत आला कीं, विद्यार्थ्याला शाळेंतून जें पुस्तक थोडें बहुत शिकविलें जात असे, त्याशिवाय इतर ग्रंथ वाचणें जरूर होतें व ही निवड करण्याचें काम विद्यार्थ्यांवर सोंपविण्यांत येत असे. शिक्षकांनीं दोन चार पुस्तकांची नांवनिशी दिली असली, तरी ती वाचून पाहिली कीं नाहीं याची परीक्षा विद्यार्थ्यांना देण्याची मुळींच पाळी येत नसल्यामुळें त्यांच्या वयाच्या प्रकृतीप्रमाणें व त्यांच्या भाषाज्ञानाच्या मगदुराप्रमाणें जीं पुस्तकें वाचण्यास व समजण्यास त्यांना कष्ट पडत नसत, अशा पुस्तकांकडे ते धांव घेत, व त्यामुळेंच कादंबरीवाचनाकडे विद्यार्थ्यांची प्रवृत्ति फार वाढली. इंग्रजी भाषा चांगली यावी म्हणून रेनॉल्ड्सुसारख्याच्या ग्रंथांकडे प्रथमतः विद्यार्थ्यांची दृष्टि जात असे. हायस्कुलांतील शिक्षकांनीं तर रेनॉल्ड्सच्या आंग्लभाषासरणीची प्रशंसा वारंवार केलेली प्रस्तुत लेखकास माहीत आहे. शिक्षकांनीं मुद्दाम शिफारस केलेल्या ॲडिसनचे निबंध, वॉशिंग्टन् आयर्व्हिंगचे लेख, लॅम्स्टेल्स् इत्यादि चांगल्या पुस्तकांतील सरासरी ५।५० पानेंसुद्धां शेंकडा ९० विद्यार्थ्यांकडून वाचलीं जात नसत, परंतु रेनॉल्ड्सुसारख्या ग्रंथकारांची निदान १५।२० पुस्तकें तरी परीक्षेच्या

वेळेपर्यंत पालथीं करण्यांत येत होतीं. अनेक तऱ्हेचीं वर्णनें, अनेक विकारांचीं शब्दचित्रें वारंवार या कादंबरीग्रंथांतून येत असल्यामुळें या वाचकांपैकीं बऱ्याच लोकांना चांगली इंग्रजी भाषा लिहितां येण्याच्या कामास या पुस्तकांचा फार उपयोग झाला. परंतु वयाच्या अत्यंत महत्त्वाच्या भागांत असल्या ग्रंथकारांशीं परिचय झाल्यामुळें त्यांच्या सबंध आयुष्यावर आणि एकंदर वाचनाभिरुचीवर कायमचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. आणि याच वर्गांतून शाळामास्तर वगैरे लोकांचा भरणा विशेष झाल्यामुळें राष्ट्रांतील यच्चावत् लोकसमाजाची सदभिरुचि बदलवून ती भ्रष्ट करण्यास हे लोक परंपरेनें कारणीभूत झाले आहेत. ‘भक्ति, ज्ञान, वैराग्य’ ह्या खडतर बंधनांनीं कित्येक शतकेंपर्यंत जखडून टाकिलेली वाचनशक्ति एकदम हीं बंधनें तोडून सैरावैरा या लोकांच्या मागें पळूं लागली, व तिची नियंत्रणा करण्यास कोणीहि लवकर पुढें आले नाहींत. महाराष्ट्रांतील वाचकांस कादंबरीवाचनाचें एवढें वेड कसें लागलें, हें समजण्याकरितांच वर ही विस्तृत मीमांसा केलेली आहे. या वेडाचा प्रतिकार करण्याकरितां ज्या लोकांना पुढें येण्याचें सामर्थ्य होतें, असे गृहस्थ म्हणजे युनिव्हर्सिटींतील उच्च परीक्षांचा अभ्यास करण्याची ज्यांना संधि मिळाली ते लोक. यांची गंभीर विषयांत गति होत असे व अशा विषयांच्या अध्यापनाची गोडी त्यांपैकीं कांहीं जणांत दिसून येत असे. परंतु युनिव्हर्सिटींतील उच्च पदवीधरांना मातृभाषेच्या द्वारां आपल्या ज्ञानाचा फायदा सामान्य जनाला देण्याची बुद्धि लवकर उत्पन्न झाली नाहीं. मातृभाषेच्या अध्ययनाची किंचित्हि सोय ज्या शिक्षणक्रमांत नाहीं, अशा पद्धतींत वयाचीं २०।२५ वर्षें काढल्यानंतर तिच्याविषयीं अभिमान उत्पन्न होणें व तिच्या सेवेविषयीं उद्युक्त होणें ही गोष्ट मनुष्यस्वभावास बरीच जड जाते; आणि यामुळें मराठी वाङ्मयावर कादंबरीवाचनानें पुष्ट झालेल्या अर्धशिक्षित लोकांचीच छाप बसली व मराठींतून अगदीं प्रथम प्रथम निघालेल्या अद्भुत कथानकापासून तों आजतागाईत प्रसिद्ध होत असलेल्या अगदीं शेवटल्या सामाजिक कादंबरीपर्यंत सर्वांच्या लेखणींतून शृंगाररसाचा प्रवाह अखिल महाराष्ट्रभर अव्याहत रीतीनें सारखा धो धो वहात आहे आणि एकंदर तरुणवर्ग या प्रवाहांत क्रीडा करीत आहे.

या स्थितीला कांहींतरी आळा घालणें जरूर आहे, एवढी गोष्ट " मनोरंजन मासिकांनीं " लक्षांत ठेविली तर निव्वळ पांचट गोष्टी आणि नीरस कथा यांहून श्रेष्ठ प्रतीचा विनोद व अधिक योग्यतेचें मनोरंजन करण्याचे मार्ग आहेत कीं नाहींत, हें पाहण्यास ते लागतील. परंतु या लोकाभिरुचीस मासिकपुस्तककारांनीं स्वत: बळी न पडतां आणि या दुष्ट प्रवृत्तीस पुष्ट होण्यासारखीं खाद्यें समाजापुढें न ठेवतां तिचें नियंत्रण करण्याकरितां कांहींतरी करणें जरूर आहे, एवढी जाणीव जरी या वर्गांतील मासिकपुस्तककारांनीं ठेविली, तरी सत्कार्यास आरंभ केल्याचें श्रेय त्यांना मिळणार आहे. " मनोरंजनार्थ " काढिलेल्या मासिकांनीं मनोरंजनाची आपली कल्पना अधिक उदात्त, अधिक गंभीर आणि अधिक श्रेष्ठ करून घेतली पाहिजे. विलायतेंतील सोसायटी मॅगॅझीनचें अनुकरण करणें सोपें आहे, पण असल्या भिकार वाङ्मयाचा विलायतेंतील मध्यम वर्गांतील स्त्रिया, भावी मजूरदार लोक यांवर जो अनिष्ट परिणाम होत आहे, त्याचें निराकरण अन्य रीतीनें करण्याचें सामर्थ्य विलायतेंतील लोकांत आहे. युनिव्हर्सिटीला जोडून गरीब लोकांना शास्त्रीय व वाङ्मयात्मक ज्ञान मोफत देण्याचीं साधनें लक्षावधि रुपये खर्चून त्यांनीं उपलब्ध केलीं आहेत. बायबलच्या लक्षावधि प्रती फुकट वाटणारे आणि फुरसतीच्या वेळीं त्यांतील उदात्त भाग वाचून दाखविणारे हजारो उपदेशक घरोघरीं पाठविण्याइतकी श्रीमंती व औदार्य इंग्लंडांतील लोकांत आहे. ज्या वर्गांत या भिकार वाचनाची गोडी अतोनात वाढली आहे, त्या वर्गाची गणना राष्ट्रांतील विचारी वर्गांत होत नाहीं. असल्या मजूर लोकांनीं पोटाकरितां दिवसभर काम केल्यावर रात्रीं झोंप येण्यापूर्वीं थोडीशी दारू घेणें व एखाद्या अश्लील कादंबरींतील एखादा ग्राम्य भाग वाचणें या गोष्टीचा राष्ट्राच्या विचारशक्तीवर किंवा कार्यशक्तीवर कांहींच परिणाम होत नाहीं. असल्या समाजाचादेखील कारभार सुव्यवस्थित चालावा म्हणून त्यांचा कैवार घेऊन भांडण्याकरितां मोठमोठे मुत्सद्दी कंबर कसून पुढें आले आहेत व त्यांनीं त्यांच्या हिताकरितां मोठमोठ्या परोपकारी संस्था स्थापन केल्या आहेत. तेव्हां विलायतेंतील सोसायटी मॅगॅझीनमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या प्रकारचा प्रतिध्वनि महा-

राष्ट्रीय मासिककारांनीं करण्यासारखी परिस्थिति इकडे मुळींच नाहीं. असल्या वाङ्मयाचे अनिष्ट परिणाम मात्र आमच्या समाजावर झाल्याशिवाय राहणार नाहींत. परंतु या परिणामाची तीव्रता न्यून करणाऱ्या साधनांपैकीं एकहि साधन आमच्याजवळ राहात नाहीं. याशिवाय वर सांगितलेंच आहे कीं, महाराष्ट्रांत ज्या वर्गांत वाचनाची अभिरुचि उत्पन्न झालेली असते, तो वर्ग राष्ट्रांतील विचारशक्ति व कार्यशक्ति ज्यांत एकवटली आहे असा आहे; व अशा वर्गांतील लोकांच्या मनावर तरुण वयांत ग्राम्य कल्पनांचा पगडा बसणें म्हणजे आपल्या मृत्यूचा मार्ग आपण होऊन तयार करणेंच आहे. या सर्व गोष्टींचा "मनोरंजना"सारख्या पहिल्या मासिकपुस्तककारांनीं मोठ्या कळकळीनें विचार करावयास पाहिजे आहे. स्त्री वर्गांतील सुशिक्षित स्त्रियांच्या हातांत आपलीं पुस्तकें पडतात, तर त्यांच्यासमोर जाऊन ज्या गोष्टी बोलण्याची कोणत्याहि हिंदूला लाज वाटेल किंवा संकोच वाटेल, असे प्रकार आपल्या मासिकांत प्रसिद्ध होणाऱ्या कथांतून व उपकथांतून येणार नाहींत, एवढी खबरदारी देखील घ्यावयाला जे लेखक व मासिकपुस्तककार तयार नाहींत, त्यांची निंदा कितीहि कडक शब्दांनीं केली, तरी ती थोडीच आहे.

### लेखांक ६ वा

## कादंबरी, नाटकें, गोष्टी

या पुस्तकांतून प्रसिद्ध होणाऱ्या कादंबऱ्या सर्वच वाईट असतात, असा जरी प्रकार नसला, तरी उच्च दर्जाची एकहि कादंबरी यांतून अजून प्रसिद्ध झाली नाहीं. आणि शेंकडा ९० तर अगदींच गचाळ आहेत. यांतील स्त्रीपुरुषांचीं चित्रें आणि चरित्रें वाचणाऱ्या कोणाहि स्वाभिमानी माणसास आपण हिंदु–समाज–द्वेष्ट्यानें बुद्धि पुरस्सर केलेले प्रकार पाहात आहोंत कीं काय, असें वाटतें. पाश्चात्य समाजांतून घेण्यासारख्या गोष्टी कोणत्या आहेत, याचा विचार करण्याचें सामर्थ्य ज्यांच्यांत नाहीं, असल्या लेखकांनीं आपला समाज, धर्म, चालीरीति, पोषाख व सामान्य राहणी या सर्वांवर सारखा हल्ला करण्याकरितां वाटेल तशा चहाटळ गोष्टी, प्रतिमासास असल्या चोपड्यांतून प्रसिद्ध कराव्या आणि तरुण मुलांमुलींच्या व कुलस्त्रियांच्या हातांत हे

लेख पडावेत, याचा केवढा विपरीत परिणाम राष्ट्रावर होत असेल, याची क्षणभर तरी कल्पना या संपादकांनीं केली आहे काय? अगोदरच विपरीत परिस्थितीमुळें उत्तम गुणांचा योग्य विकास होण्याची आमच्यांत अडचण आहे. त्यांत जर आमच्यांतील स्वाभिमान नष्ट करण्याचा जालीम उपाय आमच्या मनोरंजनार्थ वाहिलेल्या मासिकांनीं सुरू ठेवला, तर महाराष्ट्रानें आपल्या भावी उत्कर्षाचा वृक्ष समूळ तोडून टाकण्याचाच प्रयत्न सुरू केला आहे, असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें.

या आत्मघातकी मार्गापासून परावृत्त होण्याची बुद्धि आमच्या मासिक-पुस्तककारांस व त्यांतील लेखकांस जर लवकर झाली नाहीं, तर महाराष्ट्रावर हें मोठेंच संकट उद्भवलें म्हणून समजलें पाहिजे. हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि एतद्देशीय भाषांपेक्षा महाराष्ट्राची पूर्वपीठिका प्राचीन आहे. व प्रासादिक प्राचीन कवितेचा तिच्याइतका विपुल आणि उदात्त संग्रह दुसऱ्या कोणत्याहि भाषेच्या वाङ्मयांत नव्हता, असें असून आज जर आमच्यांतील कादंबरीकारांच्या कृतीची इतर देशी भाषांतील कादंबरी-कारकृतीशीं तुलना केली, तर आपल्याला लाजेनें खालीं मान घालणेंच भाग पडेल. वंग लेखकांनीं पूर्वपरंपरेवर आपल्या वाङ्मयाची इमारत उभी केली. सामाजिक प्रश्नावर केवढीहि रणकंदनें झाली तरी कादंबरीकार, कवि आणि इतर लेखकवर्ग यांना आपल्या समाजाचा व संस्कृतीचा तिरस्कार आला नसून त्यांजबद्दल अत्यंत आदर आहे, असें त्यांतील कांहीं रम्य कृतींच्या मराठी प्रतिकृति वाचणाऱ्यांच्याहि लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. ज्या समाजांत आपण वाढलों, त्याच्याविषयीं त्यांतील प्रत्येक लहान मोठ्या गोष्टीविषयींच्या तीव्र तिरस्काराच्या विषानें ज्यांचीं अंतःकरणें भरून गेलीं आहेत, असल्या लोकांच्या विषदिग्ध फूत्कारापासून समजाचा बचाव करणें जरूर आहे. ज्या लोकांना षट्शास्त्रसंपन्न पंडितांची कुचेष्टा करावीशी वाटते, आचारसंपन्न वैदिक हा ज्यांच्या उपहासाचा आवडता विषय आहे, देवपूजा करणाऱ्या, पतीला प्रत्यक्ष देवाप्रमाणें मान देणाऱ्या, घरांतील कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीशीं समतेनें व प्रेमानें वागणाऱ्या, कष्टास न कंटाळणाऱ्या, आपला पति व त्याचे आप्तवर्ग यांच्या सुखार्थ स्वसुखाची फिकीर न कर-

णाऱ्या आमच्या गृहदेवता, पतीबरोबर कौन्सिलमध्यें आलेल्या बजेटासारख्या किंवा चलनी नाण्यांसारख्या प्रश्नावर वादविवाद करण्यास असमर्थ आहेत म्हणून, अमेरिकेंतील एखाद्या स्त्रीनें नवरा रात्रीचे वेळीं चमत्कारिक रीतीनें खोकत असतो, म्हणून कोर्टांत घटस्फोटाची फिर्याद आणिली आहे, असें बहुमोल ज्ञान तिला नसतें म्हणून, किंवा पति आणि त्याचे स्नेही हे इंग्रजींत संभाषण करीत असतां मधून मधून आपल्या स्मित हास्यानें त्यांच्या भाषणास रंग आणावयास त्या तयार नसतात, एवढ्याचसाठीं ज्यांना गुलामाप्रमाणें दिसतात, त्या लेखकांच्या हातून समाजसेवा कशी काय होणार, हें समजणें कठीण आहे. हिंदूंहून इतर कोणत्याहि लोकांचा पोषाख यांना बरा दिसतो, इतर कोणत्याहि लोकांची भाषणशैली यांना प्रशस्त वाटते, इतर कोणत्याहि धर्मांतील विधि यांना संमत आहेत. परमेश्वरा ! असल्या हितचिंतकांपासून आमच्या मातृभाषेचें, मातृभूमीचें आणि परमपूज्य धर्माचें संरक्षण करण्याकरितां तूं आपल्या करुण दृष्टीचें आवरण आमच्यावर टाक. या जालीम आत्मवंचनेच्या विषानें महाराष्ट्राच्या शरीरांत जो आजपर्यंत संचार केला आहे, त्यामुळें त्याच्या शरीरावरील कांति गेली आहे व तो निस्तेज बनत चालला आहे. तर तूंच एखादा धन्वंतरी पाठवून देऊन या सर्पदंशाच्या विषापासून महाराष्ट्राला वाचीव. तूं नितांत कृपासागर आहेस. तुझ्या दयेच्या साम्राज्यांत महाराष्ट्रीयांकरितां एक जागा राखून ठेव व असल्या आत्मनिंदकांच्या बुद्धीला पालट पडेल अशी व्यवस्था कर.

या मनोरंजनार्थ निघणाऱ्या मासिक पुस्तकांतील लेखकांच्या मनःस्थितीचें वर थोडेंसें वर्णन दिलें आहे. परंतु समाजापुढें कोणतें ध्येय ठेवण्याचा यांचा विचार आहे, हें पाहावयास लागलों, तर त्याचा थांग लागणें कठीण आहे. यांच्या कादंबऱ्यांतून उत्कृष्ट मुत्सद्दी, उत्कृष्ट देशभक्त, वैराग्यसंपन्न सत्पुरुष, अतुल रणधुरंधर योद्धा, देशहितार्थ आपले प्राण धारातीर्थीं ठेवणारा पराक्रमी, या किंवा अशाच वाचकांच्या अंतःकरणांत उदात्त वृत्तींचा कल्लोळ उठविणाऱ्या व्यक्तींना हद्दपारीची शिक्षा झाली आहे. आंगठींतील खड्याप्रमाणें लहानशा, सुबक, संकुचित अशा प्रापंचिक जगांतील भिकार व्यक्तींचीच गर्दी यांच्या मेंदूच्या मर्यादित प्रदेशांत झालेली आहे. कोणी

एखाद्या विधवेला सनाथ करीन, असा निश्चय करून निघतो आणि आपल्या कल्पना कार्यसृष्टींत येत नाहींत, असें पाहून एके दिवशीं आपली आत्महत्या करून घेतो व त्याच्या डायरीवरून आमच्या लेखकांस कादंबरीरचना करण्याची स्फूर्ति होते. दुसरा एखादा आजन्म अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा चंद्रसूर्यास साक्ष ठेवून करतो, व त्याच चंद्रसूर्यासमोर पुन्हां "असल्या सुंदरीचा त्याग करून तिला आजन्म दुःखांत लोटण्याचा मला काय बरें अधिकार पोहोंचतो" या तर्कशास्त्राच्या दुर्भेद्य व्यूहांत सांपडल्यामुळें निमूटपणें वैवाहिक स्थिति पत्करतो. याहीपेक्षां अधिक उदात्त ध्येय अवनत हिंदु समाजाला कशाला हवें? असलीं नीरस ध्येयें समाजापुढें मांडून समाजास खच्ची करण्याचा प्रयत्न सारखा या मासिकांतून होत आहे व म्हणूनच त्यासंबंधानें वर एवढा विस्तार केला आहे.

अशा तऱ्हेच्या मासिकांस गिऱ्हाइकांची उणीव नसते. यांचा वाचकवर्ग फार मोठा आहे आणि त्यांतील बराच मोठा भाग स्त्री वर्गाचा व अपक्व बुद्धीच्या मुलांचा आहे. असल्या मासिकांवर ग्राहकांच्या उड्या असल्यामुळें त्यांची संख्या सारखी वाढत चालली आहे व त्याबरोबरच या मासिकांच्या संपादकांची सांपत्तिक स्थितीहि सुधारत चालली आहे. तथापि या सुधारणेबरोबर मासिकांचें अंतरंग सुधारण्याची इच्छा मात्र वाढत असलेली दृष्टीस पडत नाहीं. बाह्यांग मोहक करण्याचा प्रयत्न मात्र फार जोरानें चालू आहे. मळपृष्ठाकरितां वापरण्याचा कागद कोण अधिक झकाकीचा वापरतो, याबद्दल या संपादकांत जणूं काय अहमहमिका लागलेली दिसते. आंतील चित्रांच्या संख्येंत एक दुसऱ्याला खालीं खेंचण्याची शिकस्त करून राहिला आहे. मासिक पुस्तकें उघडल्याबरोबर जणूं काय नाटकाचा पडदा उघडल्याचा भास वाचकांस व्हावा, अशी संपादकांची तीव्र इच्छा दृष्टीस पडते. बाहेरच्या झकाकीनें आंतील गुणदोषान्वेषणाविषयीं वाचकांना अंध बनविण्याचा बुद्धिपुरःसर प्रयत्न यांच्याकडून होत आहे कीं काय, अशी शंका येते. महाराष्ट्रांतील रंगभूमि व मनोरंजक मासिकें या दोन्ही संस्थांची अवनति एकाच मार्गानें एकाच प्रमाणांत होत आहे. अभिनेय नाटकाची निवड करितांना त्यांतील कथानकाचें मनोहरत्व, प्रसंगाची गंभीरता, नाय-

काचें उच्चत्व किंवा कवीच्या कल्पनेचे विशदत्व, अभिनवत्व व औचित्य याचा विचार न होतां लोकांच्या ग्राम्य अभिरुचीस अनुसरून असलेल्या प्रवेशाची रेलचेल त्यांत झाली आहे किंवा नाहीं, आजपर्यंत प्रेक्षकांच्या नजरेस न पडलेली अशी अद्भुत सीनरी आणण्याची त्यांत कितपत सोय आहे, स्त्रीवेषधारी लहान अर्भकांचा घोळका रंगभूमीवर नाचण्याकरितां कितीदां आणतां येण्याची व्यवस्था या नाटकांत आहे, इत्यादि गोष्टीवरूनच नाटकमंडळ्यांकडून नाटक बहुधा करण्यांत येतें. सुदैवानें कोल्हटकर व खाडिलकर यांसारख्या लेखकांनीं या प्रकारास आळा घालण्याचा क्रम सुरू केला आहे व या बाबतींत तरी त्यांच्या प्रयत्नास यश येईल, अशी आशा बाळगण्यास बळकट कारणें आहेत. परंतु ज्या वर्गाच्या मासिकांसंबंधीं विवेचन चाललें आहे, त्यांजकडे पाहिलें म्हणजे आशेची एकदम निराशा होते. बहिरंगाविषयीं विलक्षण काळजी आणि अंतरंगाविषयीं बेफिकीरी, हें या मासिकांच्या स्वरूपाविषयीं सामान्य विधान करण्यास कांहींच हरकत नाहीं. यांच्या कथांतील नायक, नायिका व इतर गौणपात्रें यांच्या शब्दचित्रांवरून देखील वरील सिद्धांतासच बळकटी येते. चित्रें देण्यांत महाराष्ट्रांतील खऱ्या व परंपरागत सद्गुणांची ओळख वाचकांस व्हावी, किंवा महाराष्ट्राच्या प्राचीन वैभवाची, सामर्थ्याची, आणि कर्तुमकर्तुम् शक्तीविषयीं एक प्रकारचा आत्मविश्वास त्यांच्यांत उत्पन्न व्हावा, अथवा सद्यःस्थितींतील अधोगतीचीं टोचणीं त्यांच्या मनास बोचावी, हें धोरण नसून, ज्यांचीं नांवें ऐकण्यांत, किंवा चित्रें पाहण्यांत पुण्य ना पुरुषार्थ असल्या लोकांच्या चेहेऱ्यांच्या रांगा वाचकांच्या नजरेखालून एका पाठीमागून एक लावून देण्याचाच त्यांचा उद्देश असतो. कथाभागांतील प्रसंगाच्या उद्देशाला उद्देशून काढलेल्या चित्रांत चित्रकलेच्या दृष्टीनें काय गुणदोष असतात, हें सांगण्याचा मला अधिकार नाहीं परंतु हे प्रसंग एक तरुण आपल्या लाडकीचा कंकणरहित हस्त मोठ्या प्रेमानें धरून कुंकुमविरहित्वामुळें मुखकमलावरील रक्तिमेंत जो फिकटपणा आलेला असतो, तो नाहींसा करून टाकण्याकरितां व कपोलावर गुलाबी छटा खुलवून उठविण्याकरितां कडकडून चावा घेत आहे, असल्या जातीचेच फार असतात. मासिकें हीं तत्कालीन

समाजस्थितीचे आदर्श म्हणून समजलीं जातात; व मासिकांतील चित्रां-कडे संपादकाच्या खोलीबाहेरील दुनिया याच दृष्टीनें पाहात असते. ज्यांना महाराष्ट्राची खरी स्थिति माहीत नाहीं, असल्या एखाद्या वंगबंधूच्या नजरेस वरील चित्रें आलीं, तर सर्व महाराष्ट्र अत्यंत विषयलंपट बनत चाललें आहे, हें पाहून त्यास खेद झाल्याशिवाय राहणार नाहीं. विरह-व्यथित प्रणयी जनांच्या अश्रूंनीं कांहीं पानें भिजलेलीं सांपडतील, तर दुसरीं कांहीं पानें विरहानलज्वालांनीं दग्ध झालीं आहेत व त्यांतून उठणाऱ्या अर्थशून्यतेच्या धूम्रामुळें वाचकांचे डोळे पाण्यानें भरून आणून एक प्रकारची खिन्नता उत्पन्न करीत आहेत, असें दृष्टीस पडेल. तात्पर्य काय कीं चित्रें घ्या, कीं, कथा घ्या, दोन्हींतून प्रेमाशिवाय दुसरा रस नाहीं. प्रेमरसाचें यथार्थ चित्र काढण्याच्या प्रयत्नांत कालिदासासारख्या कविकुल-गुरूलादेखील अश्लीलता टाळणें कठिण झालें आहे. मग या विचारदुर्बल लेखकांची लेखणी आपली कथा अधिक लोकप्रिय, चटकदार करण्याकरितां कोणत्या देखाव्यांतून प्रवास करील, हें सांगण्याची अवश्य-कता नाहीं. शब्दचित्रें व दृष्टचित्रें हीं उभयतां याप्रमाणें समरस अशीं महाराष्ट्रांतील मासिकांत आहेत. चित्रें व डोळ्यांस दिपवून टाकणारी बाह्य झकाकी यांचा परिणाम वाचकवर्गावर कसा होत आहे, हें पाहिलें असतां या प्रकारच्या अतिरेकाची कोणाहि समंजस माणसाला चीड आल्याशिवाय राहणार नाहीं. बाह्य मोह उत्पन्न करून ग्राहकांस आपल्याकडे ओढण्याचा प्रकार दुकानदारीच्या दृष्टीनें गुण म्हणून समजण्यांत येईल, परंतु वाङ्मयाच्या दरबारांत ही फसवेगिरी अक्षम्य आहे. भुलथापा देऊन खोटा माल पदरांत बांधणें ही व्यापारी चलाखी न्यायाच्या गृहांत गुन्हा म्हणूनच समजण्यांत येते. असल्या बाह्य भपक्याची गोडी समाजाला लावणाऱ्या संपादकांकडून खऱ्या वाङ्मयाच्या प्रसारास केवढें विघ्न येत असेल, याची कल्पना महाराष्ट्रांतील वाचकवर्गाच्या सांपत्तिक स्थितीचा विचार केला असतां सहज लक्षांत येईल. 'विविधज्ञानविस्तार' सारख्या मासिकांची वर्गणी बंद करून असल्या मासिकांस वर्गणीदार झाल्याचीं कित्येक उदा-हरणें मला माहीत आहेत. असली संख्या मोजण्याचें एखादें साधन उप-

लब्ध असतें, तर ही संख्या आपल्या कल्पनेहून पुष्कळच जास्त आहे असें सहज दाखवितां आलें असतें. गौण भागाविषयीं विलक्षण आसक्ति वाचकवर्गांत उत्पन्न केल्यामुळें कोणाहि मध्यम स्थितींतील वर्गांतील विचारी माणसास मासिक पुस्तक काढणें वरील संपादकांनीं जवळ जवळ अशक्य केलं आहे. दहापांच चित्रें असल्याशिवाय मासिक पुस्तक हातांत धरण्याच्या लायकीचें नाहीं; अशी समज हळुंहळूं वाढूं लागली आहे. सरकारनें छापखान्याविषयीं कडक कायदा करून अगोदरच गरीब लोकांना ज्ञानप्रसार करण्याचा मार्ग जवळ जवळ बंद केला आहे व त्यांतच चित्रें देण्याच्या मोहक पद्धतीचा परिपाठ पाडून आमच्यांतील कांहीं संपादक त्या अडचणींत भर घालीत आहेत. मासिकांतील लेखांचें मर्म समजण्याकरितां प्रसंगविशेषीं चित्रें देण्याच्या परिपाठाला कोणीहि नांव ठेवणार नाहीं परंतु अमुक एक संख्या नियमितपणें देत जाण्याचा प्रघात मात्र फारसा हितावह नाहीं किंवा प्रशंसनीयहि नाहीं.

मासिक पुस्तकांनीं श्रीमंत माणसांच्या दिवाणखान्याशीं स्पर्धा करण्याचें कांहींच कारण नाहीं. कलापटु लोकांस आपल्या कौशल्याचा प्रसार करण्याचा मार्ग खुला आहे. परंतु मासिकपुस्तककारांनीं आपल्या पानांवर योग्य चित्रें काढण्याचें सामर्थ्य स्वतःच्या लेखणींत नाहीं म्हणून चित्रकारांना आपल्या कुंचल्याचा उपयोग करण्याकरितां हांक मारावी, ही मोठी खेदास्पद गोष्ट आहे. महाराष्ट्र गरीब आहे, त्यामुळें सरकारी नवीन पद्धतीनें शिक्षण अधिक महाग होत आहे, हें पाहिल्याबरोबर आमचे राजकीय पुढारी एकदम ओरड करतात, परंतु शिक्षणाचीं आमच्या हातांत असलेलीं साधनें दिवसेंदिवस आम्ही अधिकाधिक महाग करीत आहोंत, व असल्या साधनांची विपुलता होणें क्रमाक्रमानें अशक्य करीत आहोंत, इकडे मात्र आमच्यांतील विचारी लोकांचें लक्ष जात नाहीं, याला काय म्हणावें, हेंच समजत नाहीं. याच्या उलट बहिरंगाची सुधारणा करण्यांत विलक्षण यश संपादन केल्याबद्दल अभिनंदनपर पत्रें पाठविणाऱ्यांत या राजकीय पुढाऱ्यांपैकीं कित्येकांचीं नांवें सांपडतील. ज्याप्रमाणें एखाद्या गृहस्थाला संभावित

म्हणून राहावयाचें असल्यास अंगावर हिऱ्यामोत्यांचे दागिने घालण्याची अगर भरगच्ची किंवा मखमली पोषाख करण्याची जरूर नाहीं, त्याचप्रमाणें मासिक पुस्तकांना देखील चित्रांची विशेष गर्दी न उडवितां उपयुक्त आणि कार्यकारी बनतां येईल. या विधानाच्या पुष्ट्यर्थ खुद्द महाराष्ट्रांतील मनोरंजक मासिकांच्या पूर्व इतिहासाचें अवलोकनहि पुरें आहे. “ नाट्य-कथार्णवा ” सारख्या मासिकानें या क्षेत्रांत महाराष्ट्राची व एकंदर मराठी वाङ्मयाची जी सेवा केली, ती चित्रांच्या आणि चकचकीत मलपृष्ठांच्या अभावींच केली. त्यांत प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्या आणि नाटकें हीं स्वतंत्र अशीं थोडीं होतीं, परंतु परकीय भाषेंतील प्रतिभासपन्न कृतींचीं रूपांतरें अत्यंत मधुर मधुर अशा भाषेंत केलेलीं आहेत, व त्यांच्या त्या प्रयत्नामुळें एकाएकीं महाराष्ट्रांतील नाट्यवाङ्मयांत कशा प्रकारच्या ग्रंथांची भर करण्याकडे महाराष्ट्रांतील विद्वान् लोक कित्येक वर्षें लागले होते, हें रसिक वाचकांस विदित आहेच. कादंबरीचा ओघ ऐतिहासिक कथानकाकडे ओढण्याचा मान वरील ‘नाट्यकथार्णव’ आणि ‘विस्तारां’तून प्रसिद्ध झालेल्या ‘करण–वाघेला’ सारख्या कादंबरीच्या लेखकांकडेच आहे. परंतु हल्लींच्या मनूंत मासिक–पुस्तककार अंतरंगापेक्षां बहिरंगाचीच काळजी घेत आहेत आणि त्यांचा वाचकवर्गहि आंतरशुद्धीपेक्षां बाह्य टापटिपींतच मग्न झाला आहे, असें सूक्ष्म निरीक्षण करणारांच्या लक्षांत येईल.

---

### लेखांक ७ वा

## विवेचक मासिकें

### ( प्रकार चौथा )

यानंतर मासिकांचा वर्ग विवेचक मासिकांचा. मासिकाचें खरें कार्य याच तऱ्हेच्या मासिकांकडून होत असतें व यांच्यावरील जबाबदारीहि फार मोठी आहे. या निबंधाच्या आरंभीं मासिक पुस्तकांच्या संबंधीं जो सामान्य उल्लेख केला आहे, तो याच जातीच्या मासिकांना विशेषतः लागू पडतो. वजनदार मासिक पुस्तकें याच वर्गांतील असतात. इतर प्रकारच्या मासिकां-कडून त्यांचें कार्य बरोबर होत आहे किंवा नाहीं, हें पाहण्याचें काम यांचें

आहे. अशा वर्गाच्या मासिकांकडून वाङ्मयाला वळण घालण्यास कशी मदत होते, याचें विवरण अगोदर येऊन गेलेंच आहे. या भागांत महाराष्ट्रांतील कोणतीं मासिकें या सदराखालीं घालतां येण्यासारखीं आहेत, आजपर्यंत या जातीचीं जीं मासिकें होऊन गेलीं, त्यांच्याकडून मराठी वाङ्मयाची सेवा कशा प्रकारें झाली व महाराष्ट्रवाङ्मयावर त्याचा काय परिणाम झाला व हल्लींच्या मासिकांत ज़र अधिक सुधारणा करावयाची असेल, तर कोणत्या तऱ्हेचे लेख यावयाला पाहिजेत, या प्रश्नांचा त्रोटक विचार करावयाचा आहे.

'मराठीशाळापत्रक', 'लोकहितवादी', 'निबंधमाला', 'निबंधचंद्रिका', 'सुविचार समागम', 'ग्रंथमाला', 'सरस्वती मंदिर' इत्यादि या वर्गाचीं प्रमुख मासिकें आतां बंद झालीं आहेत. 'विविधज्ञान-विस्तार' हें सर्वांत जुनें मासिक महाराष्ट्राच्या सुदैवानें अजून हयात आहे. याशिवाय 'लोकशिक्षण', 'चित्रमयजगत्', 'ज्ञानांजन', 'नवें मन्वंतर' इत्यादि नवीन मासिकें याच दिशेने कार्य करण्याकरितां निघालीं आहेत.

मराठीभाषा व मराठ्यांचा इतिहास यांविषयीं महाराष्ट्रांत विलक्षण अभिमान उत्पन्न करण्याचें श्रेय निबंधमाला, विविधज्ञानविस्तारप्रभृति मासिकांसच आहे.

मराठी भाषेंत केवढें सामर्थ्य व आवेश आहे, ही गोष्ट निबंधमालाकारांनीं सर्व महाराष्ट्रीयांच्या पूर्णपणें प्रत्ययास आणून दिली आहे. कितीहि गहन विचार असले, तरी ते वाहून नेण्याची शक्ति मातृभाषेत आहे. तेवढ्याकरितां इंग्रजीभाषेचें अवलंबन करावयास नको, ही जाणीव मालाकारांपूर्वीच्या महाराष्ट्रास प्रायश. नव्हती, म्हणूनच आमच्यांतील अत्यंत बुद्धिवान्, विचारी व विद्वान् लोकांना इंग्रजींतून लेख लिहिण्याची व इंग्रजींतूनच व्याख्यान देण्याची संवय झाली होती. पदवीधर म्हटला कीं, त्याचा लेख एखाद्या प्रमुख इंग्रजी पत्रांतून किंवा मासिकांतून प्रसिद्ध व्हावयाचा. एखादें देशी पत्र काढल, तर पदवीधर विद्वान् हा इंग्रजी भागाचा संपादक असावयाचा व मराठी भागाकरितां मग दुसऱ्या कोणाची तरी योजना करावयाची. देशी पत्र निव्वळ मराठींतून काढल्यास सरकारांत व लोकांत

त्याचें वजन पडणार नाहीं, अशी समजूत असल्यामुळे प्रत्येक प्रमुख पत्र बहुधा द्विमुखी असे. भारदस्त लेख इंग्रजी मुखानें प्रगट होत असत, व सामान्य मजकूर मराठी मुखांतून बाहेर पडत असे. त्यावेळचीं वर्तमानपत्रें म्हणजे चतुर्मुखी ब्रह्मदेवाचीं लहान नातवंडें आहेत कीं काय, असें एखाद्यास सहज वाटण्याचा संभव आहे. एकसमयावच्छेदेंकरून चारी मुखांनीं चार वेद म्हणणारा ब्रह्मदेव आणि दोन तोंडांनीं एकदम इंग्रजी व मराठी भाषांतून ज्ञानाचा प्रकाश पाडणारीं त्यावेळचीं पत्रें यांत साम्य नाहीं, असें कोण म्हणेल ? परंतु ब्रह्मदेवानें योनिसंभवसृष्टि उत्पन्न करण्यापूर्वी कांहीं अयोनिसंभव मानसपुत्र उत्पन्न झाले, व तदनंतर उत्पन्न झालेल्या प्राणिमात्रांचें गुरुस्थान यांच्याकडे राहिलें, असा पौराणिक इतिहास आहे. कांहीं अशीं तसा प्रकार मराठी वाङ्मयाचाहि झालेला आहे. द्विमुखी पत्रांनंतर मराठींत रचना करणारे ग्रंथकार येण्यापूर्वींच मराठी मासिकें आलीं व त्यांनीं विद्वान् लोकांच्या मराठीविषयींच्या अनास्थेसंबंधानें निर्भीडपणें कोरडे ओढावयास प्रारंभ केला व निबंधमालाकारांनीं तर वाङ्मयांत ज्या तऱ्हेच्या ग्रंथांची त्यांना आवश्यकता त्यावेळेस वाटत होती, तशा प्रकारच्या विषयांवर स्वतंत्र, सूचक व ओजस्वी लेखांची माला गुंफण्यास आरंभ केला. सात वर्षेपर्यंत अव्याहत रीतीनें त्यांनीं महाराष्ट्रापुढें मराठी भाषेच्या अनेकविध रूपांचें प्रदर्शनच उघडून ठेविलें होतें, असें म्हटलें तरी चालेल. निबंधमाला म्हणजे मराठी भाषेच्या सामर्थ्याचें, सौंदर्याचें, सौष्ठवाचें व इतर अशाच श्रेष्ठ गुणांचें दिव्य प्रदर्शनच होतें. या प्रदर्शनांतील कोणत्याहि दालनांतून तुम्ही फिरा, तुमच्या नेत्रांस कधीं सुकुमार व सालंकार मूर्तीचें दर्शन होईल, तर कधीं ती आपले नेत्र क्रोधानें लाल करून एक प्रकारच्या धिःकारानें परभाषालंपट महाराष्ट्रीयांकडे पाहात आहे, असें आढळून येईल. कधीं आपल्या प्राचीन वैभवाचा लष्करी पोषाख अंगावर चढवून व खंद्या अश्वावर आरूढ होऊन मोठ्या चपलतेनें सर्व हिंदुस्थानभर सारखी वेगानें फिरत आहे, असा देखावा आपल्या डोळ्यासमोर येत आहे, तोंच पलीकडच्या दालनांतून अंगावरील सर्व दागिने काढून ठेवून आपले केंस मोकळे सोडले आहेत व अत्यंत चिंताक्रांत व दुःखी झाल्यामुळें जिची

तेजस्वी दृष्टि पाण्यानें भरून आली आहे, असा हृदयद्रावक देखावा आपल्या नजरेस येईल. कै. विष्णुशास्त्र्यांनीं तिला वाटेल त्या रीतीनें खेळविलें आहे व जगाच्या निदर्शनास तिचें श्रेष्ठत्व आणून दिलें आहे. गेल्या एक हजार वर्षांत मराठी भाषा ज्याला अंकित झाली होती, असे तीनच पुरुष होऊन गेले. एक शके बाराशें बारोत्तरांत आपल्या वयाच्या २२ व्या वर्षाच्या आंत भावार्थदीपिकेसारखी दिव्य सौंदर्यानें भरलेली, अध्यात्मविद्येच्या प्रकाशानें चमकणारी, सद्भक्तांच्या अंतःकरणांस उचंबळून सोडणारी रचना करणारे श्रीज्ञानेश्वरमहाराज, दुसरे कविवर्य मोरोपंत, आणि तिसरे विष्णुशास्त्री चिपळूणकर. या प्रतिभासंपन्न लेखकांस 'वाग्वश्येवानुवर्तते' हे उद्गार यथार्थ लागू पडतात. 'मी मराठी भाषेचा शिवाजी आहें' हे विष्णुशास्त्र्यांनीं स्वतःसंबंधीं काढलेले उद्गार यथार्थ नाहींत, असा कोणता रसिक म्हणूं शकेल? शिवाजी महाराजांपूर्वी महाराष्ट्राची जशी शोचनीय व अनुकंपनीय स्थिति झाली होती; तशीच मराठी गद्याची स्थिति शास्त्रीबोवांपूर्वी होती. महाराष्ट्रांतील कर्तीं माणसें परक्याच्या दारांत मर्दुमकी गाजवीत व आपल्या शौर्यानें व शहाणपणानें दुसऱ्याच्या मोठेपणाची भर करीत. त्याचप्रमाणें शास्त्रीबोवांच्या अगोदर जे लेखक झाले, ते बहुतकरून इंग्रजी किंवा संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें करणारे होते व त्यांच्या या कृतीमुळें मराठीचा गौरव न होतां या दुसऱ्या वाङ्मयांविषयीं विलक्षण आदर उत्पन्न होत होता. शास्त्रीबोवांनीं आपली यक्षिणीची कांडी फिरवून जेव्हां निबंधमालेंतून मराठीचें प्रदर्शन उघडावयास आरंभ केला, तेव्हां एकदम महाराष्ट्राच्या दृष्टीवरील अज्ञानपटल दूर झालें व त्याच्याठिकाणीं एक प्रकारचा आत्मविश्वास व आत्मप्रत्यय उत्पन्न झाला. या जादूच्या कांडीनें महाराष्ट्र शास्त्रीबोवांच्या हयातींत तर पूर्णपणें भारला होताच; परंतु त्या जादूचा प्रभाव अजूनहि दृष्टीस पडत आहे. पुस्तकपरीक्षण, काव्यविवेचन, इतिहास, चरित्र-ग्रंथ, प्राचीन मराठी कवींचें श्रेष्ठत्व, मराठी व्याकरण व कोश या सर्वांचा शास्त्रीबोवांनीं ठिकठिकाणीं मार्मिकपणें विचार केला आहे व त्यांच्या विचारांनीं मराठी वाङ्मयाला अत्यंत इष्ट असें वळण लागलें आहे. चरित्र-ग्रंथांची प्रवृत्ति, प्राचीन कवींविषयींची आस्था, ऐतिहासिक अभ्यासाची वाढ हीं त्याचीं दृश्य फळें आहेत.

मुख्यत: शास्त्रीबोवांच्या लेखांत जरी हा परिणाम असला, तरी कै. गोपाळ हरी देशमुख यांनीं 'लोकहितवादी' मधून प्रसिद्ध केलेले लेख व गोष्टी, कै. हरी माधव पंडित व त्यांचे स्नेही यांचे 'विविधज्ञानविस्तारां' तून प्रसिद्ध होत असलेले विविध विषयांवरील निबंध इत्यादि साह्याचा परिपोष त्याच वेळीं मिळाल्यामुळें तो परिणाम त्यांच्या हयातीनंतर आज इतकीं वर्षें टिकून राहिला आहे. तथापि आतां अशी वेळ आली आहे कीं, त्यांनीं जें वाङ्मयास वळण दिलें, त्याच्यापलीकडील मार्ग आंखून दिला पाहिजे, नाहींतर बऱ्यावाईट लेखकांची एकाच क्षेत्रांत विनाकारण गर्दी उडून एकालाहि आपला मार्ग व्यवस्थित रीतीनें व शीघ्र आक्रमितां येणार नाहीं.

शास्त्रीबोवांनीं व त्यांच्या समकालीन लेखकांनीं प्राचीन मराठी कविता व मराठयांचा इतिहास या विषयाकडे पदवीधर विद्वानांचें लक्ष खेंचलें व त्या क्षेत्रांत कित्येक ग्रंथकारांनीं केलेली रचना खरोखरीच अभिमानास्पद अशी आहे. परंतु शास्त्रीबोवांच्या काळीं उपलब्ध नव्हतीं किंवा निदान प्रमुखपणें दृष्टीस आलीं नव्हतीं, अशीं नवीन शास्त्रें आतां उदयास आलीं आहेत. या शास्त्रांच्या अध्ययनाची इतिहासाच्या योग्य अभ्यासास जरूर आहे. अशा विषयांवरील लेखक प्राय: महाराष्ट्रांत थोडेच आहेत. परंतु जीं दोन चार माणसें आहेत तीं बहुतकरून Indian Antiquity किंवा Royal Asiatic Society चें मासिक यांतूनच लिहीत असतात. अशा विषयांवरील लेख आतां मराठी मासिकांतून प्रसिद्ध झाले पाहिजेत. त्याचप्रमाणें शास्त्रीबोवांच्या वेळीं महाराष्ट्रांत सामाजिक प्रश्नावर धुमश्चक्री सुरू होती, आणि पाश्चात्यांच्या चालीरीतीच्या अनुकरणाच्या पाठीमागें बहुतेक सुशिक्षित वर्ग लागला होता, ती स्थिति पालटून सामाजिक प्रश्नांची जागा आतां राजकीय प्रश्नांनीं घेतली आहे व खुद्द सामाजिक प्रश्नांच्या विवेचनपद्धतींतहि फार फरक पडत चालला आहे. या दोन प्रश्नांवर इंग्रजी मासिकांतून आमच्या विद्वानांचे देखील फार अधिकारयुक्त लेख येतात. परंतु मराठी मासिकांकडे जर पाहिलें, तर राजकीय प्रश्नाचा वाराहि त्यांना खपत नाहीं, असें दिसतें. वर्तमानपत्रांतून होणाऱ्या चर्चेवर महाराष्ट्रीयांना

निर्वाह करावा लागतो. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, मराठी वाङ्मयांत राजकीय प्रश्नांवर सोपपत्तिक ग्रंथ मुळींच निर्माण झाले नाहींत. मराठी वाङ्मयांतील ही उणीव दूर करण्याचा खरा मार्ग म्हणजे मराठी मासिकांनीं या विषयाविषयींची आपली उदासीनता अजिबात टाकून दिली पाहिजे. "वाङ्मयाच्या क्षेत्रांत राजकारण" नको म्हणून जिकडून तिकडून सारखा ओरड ऐकण्यांत येत. परंतु राजकीय वक्तृत्व, राजनीतीवरील ग्रंथ आणि राजकीय तत्त्वज्ञान यांमुळेंच तर इंग्रजी वाङ्मयाला विलक्षण महत्त्व प्राप्त झालें आहे, ही गोष्ट विसरतां कामा नये. लोकांच्या अंतःकरणांत राजकीय महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाल्या आहेत आणि या आकांक्षांचें यथायोग्य व तात्त्विक दिग्दर्शन मासिकांतून न झाल्यास वाङ्मयवृद्धीचें एक अत्यंत प्रमुख अंग अगदीं क्षीण असें राहील. राजकीय प्रश्नांची गंभीर व सोपपत्तिक चर्चाहि विलायतेतील नामांकित मासिकांतून नेहमीं करण्यांत येते. कोणताहि प्रश्न उपस्थित झाला असतां विद्वान् लोक या रिव्ह्यूमधून आपले विचार प्रदर्शित करतात. परंतु आमचीं मराठी मासिक पुस्तक वाचणाऱ्यास वारकऱ्याबरोबर पंढरीच्या यात्रेस तरी जावें लागतें किंवा एखाद्या भिकार नायकाबरोबर शृंगारचेष्टा करण्यांत दिवस काढावा लागतो, अथवा एखाद्या जुन्या पंडिताबरोबर प्लेटो व सॉक्रेटीस यांचा वादविवाद ऐकत बसण्याची पाळी येते. सद्यःस्थितीची उपेक्षा करणाऱ्या कोणत्याहि लेखांत जिवंतपणा असल्याशिवाय वाचकांच्या वृत्तीवर किंवा वाङ्मयावर परिणाम करण्याचें सामर्थ्य त्यांत येत नाहीं. प्राचीन विद्यांचा अभ्यास तरी सद्यःस्थिति समजण्याकरितां पाहिजे. सर्व ज्ञान सद्यःस्थितीवर प्रकाश पाडण्यास साह्य करितें म्हणूनच हवें आहे. नुसता विद्यानंद उत्पन्न करण्याकरितां मासिकांचा अवतार नाहीं, त्यांचा वेष टीकाकाराचा आहे, ही गोष्ट त्यांनीं नेहमीं आपल्या उराशीं बाळगिली पाहिजे. सामाजिक, औद्योगिक, सांपत्तिक, राजकीय किंवा शिक्षणविषयक सर्व प्रश्नांचा विचार मासिकांतून होत असला पाहिजे व तो केवळ सद्यःस्थितीची यथार्थ कल्पना यावी आणि भावी उन्नतीचा मार्ग कोणता, हें दाखवावें, एवढ्याच बुद्धीनें व्हावयाला पाहिजे. लोकांत विचारजागृति करण्याचें काम मासिकपुस्तककार

करतील व किती दिशेनें विचार करतां येण्यासारखा आहे हें जर ते दाखवितील, तर वाङ्मयाच्या वृक्षास चारी बाजूंनीं पालवी फुटेल आणि हल्लीं चालू आहे या एकदेशी तऱ्हेनेंच जर मासिकें चालविलीं, तर त्यांचा समाजालाहि फारसा उपयोग नाहीं, किंवा वाङ्मयाला फारसा उपयोग नाहीं. असें स्पष्टपणें सांगण्यास कोणतीच हरकत नाहीं.

विवेचक मासिकांतून अत्यंत महत्त्वाच्या विषयाची उपेक्षा कशी होत आहे, हे वर सांगितलेंच आहे. मासिकांना कांहींतरी ठरीव धोरण पाहिजे. महाराष्ट्रांतील मासिकांत प्रायः धोरणाचा अभाव दृष्टीस पडतो. यामुळें त्यांत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांत बहुशः संगति म्हणून नसते. विविध विषयांवरील माहिती आपल्या मासिकाच्या आकारमानाप्रमाणें समाविष्ट करणें हेंच त्यांचें धोरण आहे. प्रतिपाद्य विषयांत कितीहि वैचित्र्य असलें, तरी तात्पर्यांत त्या सर्वांची एकवाक्यता पाहिजे. परंतु ही गोष्ट सिद्ध होण्याकरितां एकाच विचारानें प्रेरित झालेल्या दहापांच विद्वानांच्या संघाकडेच लेख लिहिण्याचें व निवडण्याचें काम पाहिजे. हल्लींच्या मासिकांतील लेखांकडे पाहिलें म्हणजे कोणीहि लेख पाठविल्यास त्याचा अनादर मासिकपुस्तककाराकडून सहसा होणार नाहीं, अशी उमेद एखाद्या अनभ्यस्त लेखकासदेखील येईल. मासिक अमुक एका विशिष्ट मताचा प्रसार समाजांत करण्याकरितां काढण्यांत आलें आहे, ही गोष्ट ठरली, म्हणजे कोणते लेख घ्यावयाचे व कोणते घ्यावयाचे नाहींत, याची निवड करण्याची जबाबदारी संपादकावर येते. त्याचप्रमाणें प्रसिद्ध करावयाच्या लेखांत देखील कमी महत्त्वाचा कोणता व अधिक महत्त्वाचा कोणता, हें त्यास ठरवावें लागतें व मासिकांतील लेखाची जागा त्याच्या कमी अधिक महत्त्वाच्या प्रमाणावरच अवलंबून ठेवणें त्यास भाग पडतें. असें धोरण नसलें म्हणजे लेखांच्या प्रकाशनांत मोठी अनवस्था उत्पन्न होत असते. साहरा वाळवंटाच्या वर्णनानें मासिकाचीं २५ पानें भरून निघालीं आहेत आणि वाङ्मयांत नवीन व मूल्यवान् भर घालणाऱ्या श्रेष्ठ कृतीच्या परीक्षणास पुरें पानदेखील मिळालें नाहीं, हा जो प्रकार मराठी मासिकांतून वारंवार दृष्टीस पडतो, याचें कारण मासिकपुस्तक-

कारांचें ध्येय म्हणून ठरलें नाहीं, हें होय. दर महिन्यास सर्व पानें पाठपोठ छापून काढून तीं वाचकांच्या हातांत दिलीं पाहिजेत, एवढीच विवंचना संपादकांना लागलेली असते. लेखांची निवड किंवा प्रकाशनाचा अनुक्रम देखील ठरविण्याची त्यांना जरूर भासत नाहीं. पुष्कळदां अत्यंत नीरस लेखांनीं सबंध मासिकाची जागा अडवून टाकल्यामुळें महत्त्वाच्या लेखांतील अगदींच थोडा भाग त्या अंकांत प्रसिद्ध होऊन वर ' अपूर्ण ' असा छाप मारलेला पाहणें वाचकांच्या नशीबीं येतें. या धोरणाच्या अभावाचा असाहि परिणाम होतो कीं, सबंध लेख हातीं येण्यापूर्वींच संपादक कधीं कधीं लेख प्रसिद्ध करावयास आरंभ करतात आणि अखेरीस त्यांना तो लेख अपुराच सोडावा लागतो.

## लेखांक ८ वा
## विवेचक मासिकें
### ( पुढें चालू )

अभिप्रायार्थ आलेल्या पुस्तकांची पोंच स्वीकारतांना सविस्तर अभिप्राय सवडीनुसार लवकरच देण्यांत येईल, असा शेरा मारल्याशिवाय तर संपादकांना चैन पडत नाहीं, परंतु त्यांतील कित्येक महत्त्वाच्या ग्रंथांचें परीक्षण महिनोगणतीच नव्हे, तर वर्षवर्ष करण्यांत येत नाहीं. याच्या उलट संपादकाला ज्या विषयाचें ज्ञान नाहीं, असल्या विषयांवरील ग्रंथांच्या परीक्षणानें अंकचे अंक भरून निघाल्याचींहि उदाहरणें दाखवितां येतील. धोरणाचाच अभाव असल्यामुळें लेखकांच्या लेखांचा आदर करण्यापूर्वीं प्रतिपाद्य विषयांत लेखकाची गति कितपत आहे, याची वास्तपूस्तदेखील करण्यांत येत नाहीं, या प्रकारांत इष्ट असा फरक थोडासा पडत चालल्याचें गेल्या दोन तीन वर्षांत दिसून येत आहे. तथापि मासिकांनीं आपलें ध्येय स्पष्ट रेखून टाकलें आहे, असें बिनधोक विधान करण्याइतकी लेखांची एकवाक्यता एक किंवा दोन मासिकें सोडून इतरांत दृष्टीस पडत नाहीं.

धोरण किंवा ध्येय ठरविणें हें अर्थात् प्रत्येक संपादकावरच अवलंबून राहाणार आहे. परंतु कांहीं विशिष्ट तऱ्हेचें व विद्वान् लोकांस पसंत पड-

ण्यासारखें ध्येय समोर ठेविल्याशिवाय आपल्या मासिकाचा योग्य आदर इतर व्यवसायबंधूंकडून होणार नाहीं, अशी कल्पना जर एकदां दृढ झाली, तर वाटेल त्याला उठल्याबसल्या मासिक पुस्तक काढण्याची हाव सुटणार नाहीं, व अनावश्यक शब्दविस्तार वाचण्याच्या परिश्रमांतून वाचकवर्गास सोडविण्याचें श्रेय हल्लींच्या मासिकपुस्तककारांकडे येईल. शिवाय ज्यांनीं व्यवस्थित रीतीनें समाजोन्नतिकारक प्रश्नांचा अभ्यास केला आहे व समाजाच्या उन्नतीची दिशा ठरवून टाकिली आहे, असल्या लोकांकडून लेख आणविण्याची आवश्यकता प्रचलित मासिकांच्या संपादकांना भासूं लागेल. नुसतो सुंदर भाषा लिहितां येते, एवढ्या सबबीवर मासिकांतील अग्रस्थानीं माझा लेख येईल, ही प्रतिज्ञा विचारदुर्बल लेखकास करण्यास सवडच राहणार नाहीं. मराठी मासिकांस जितका वजनदारपणा यावयाला पाहिजे, तितका अजून आला नाहीं, ही गोष्ट सर्व मासिकपुस्तककार कबूल करतील. याची लहानशी खूण अशी आहे कीं, आमच्या ज्या सर्वभारत व्यक्ति आहेत, त्यांना आपल्याविषयीं मराठी मासिकांतून काय बरावाईट मजकूर येतो हें पाहाण्याची, किंवा आपण हातीं घेतलेल्या एखाद्या विशिष्ट लोकोपयोगी चळवळीविषयीं किंवा कार्याविषयीं मराठी मासिकांचा काय अभिप्राय पडतो, हें समजून घेण्याची कल्पना स्वप्नांतदेखील येत नाहीं. याचें कारण त्यांची मातृभाषेविषयीं अनास्था हें तर आहेच. परंतु लोकनायक, विचारी किंवा विद्वान् म्हणून ज्यांचा लौकिक सर्व हिंदुस्थानभर गाजत आहे, राष्ट्रीय सभेसारख्या लौकिक संस्थांतून किंवा कौन्सिलसारख्या सरकारी संस्थांतून ज्यांच्या मताला मोठा मान मिळतो, व ज्यांचें वक्तृत्व आबालवृद्ध मोठ्या उत्सुकतेनें ऐकत असतात असल्या कर्त्या महाराष्ट्रीयांचे विचार मराठी मासिकांतून सहसा प्रसिद्ध होत नाहींत, व असल्या लोकांचें लेखनसाह्य मिळाल्याशिवाय मासिकांस भारदस्तपणा येणें अशक्य आहे. या विद्वानांकडून मराठी मासिकांची पूर्ण उपेक्षा होते, ही गोष्ट अक्षम्य आहे, किंबहुना निंद्य आहे, हें जरी कबूल केलें, तरी असल्या लोकांपाशीं लेखांची याचना करण्याचा क्रम जर आमच्या मासिकांच्या संपादकांनीं सुरू केला, तर तो प्रयत्न अगदींच अनाठायीं होईल,

असें मला वाटत नाहीं. बरें, एखाद्या ठिकाणीं थोडासा कटु अनुभव आला तर "याञ्चामोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा" या कालिदासोक्ती-प्रमाणें त्यास खचित समाधान करून घेतां येईल. परंतु असा अनुभव बहुशः येणार नाहीं, अशी आशा बाळगण्यास थोडींबहुत कारणें आहेत. निरनिराळ्या मासिकांनीं गेल्या ४।५ वर्षांत कांहीं विशेष सणानिमित्त जादा अंकाकरितां डॉ. भांडारकर, प्रो. भानू, रा. ब. वैद्य अशा विद्वान् लेखकां-कडून मुद्दाम लेख लिहवून घेतले. सर चंदावरकरासारख्या आंग्लभाषैक-भिज्ञ मराठी विद्वानानें असल्या अंकाकरितां कधीं कधीं लेख लिहिले आहेत. तेव्हां प्रचलित सामाजिक, राजकीय किंवा दुसऱ्या एखाद्या विषयावर त्यांचे लेख मिळवून ते छापण्याचा उपक्रम सुरू केला, तरी देखील विचारी वर्गाचें लक्ष या मासिकांकडे लागल्याशिवाय राहणार नाहीं व अशा रीतीनें या विद्वानांच्या मतप्रकाशनाचें स्थान म्हणून मासिकाकडे लोक पाहूं लागले, म्हणजे त्यांच्या नष्टचर्याचे दिवस संपल्याशिवाय राहणार नाहींत.

महाराष्ट्रांत ज्या पुरुषांना सार्वभारत ( All India reputation ) योग्यता प्राप्त होते, त्यांपैकीं पुष्कळांचें लक्ष मातृभाषेकडे कां जात नाहीं व आपले विचार प्रदर्शित करण्याकरितां एखाद्या मराठी मासिकाचा किंवा दैनिकाचा आश्रय न करतां एकदम इंग्रजी मासिकाकडे ते कां धांव घेतात, हें सकृद्दर्शनीं न उलगडण्यासारखें कोडें आहे खरें; परंतु थोडासा विचार केला असतां त्याचें स्पष्टीकरण करतां येणें शक्य आहे. महाराष्ट्रांतील सर्व चळवळी राजकीय असोत वा सामाजिक असोत, त्या अखिल भरतखंडाच्या हिताचा विचार करण्याकरितां काढिलेल्या आहेत. आसेतुहिमाचल आर्यावर्त हें एक राष्ट्र आहे, अशी कल्पना भरतखंडांत प्रसृत करावी, हा या चळवळीचा मुख्य उद्देश आहे. अशा एका राष्ट्रीयत्वाच्या विचारांत ज्यांचा काल जातो, त्या व्यक्तींना भरतखंडांतील सर्व प्रांतांतील विचारी लोकांना समजेल, अशा आंग्ल भाषेचा उपयोग करणें अपरिहार्य होतें. ज्या प्रश्नाचा सर्व हिंदुस्थानच्या हिताशीं संबंध येत नाहीं, असल्या प्रश्नाकडे महाराष्ट्रांतील कार्यकारी पुरुषांनीं नेहमीं दुर्लक्ष केलें आहे. ज्ञातिविषक, संस्कृतिमूलक, किंवा केवळ प्रांतिकसंस्था यांचें मूळ महाराष्ट्रांत रुजलें नाहीं. त्याचा परिणाम असा

झाला आहे कीं; महाराष्ट्राच्या गरजा महाराष्ट्राच्या उणीवा या भरतखंडांतील इतर भागांहून कांहीं भिन्न आहेत कीं नाहींत, याचा विचारच या लोकांकडून झाला नाहीं. राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषद, औद्योगिक परिषद इत्यादि सर्वभारत संस्थांचीं सूत्रें महाराष्ट्रीय विद्वान् आपल्या हातांत धरून ठेवितात; परंतु प्रांतिक सभा, साहित्यकार्य इत्यादि निव्वळ महाराष्ट्रीय प्रश्नांची त्यांना कधींच फिकीर वाटत नाहीं. याचें कारण भरतखंड हें एक-राष्ट्र आहे, या चुकीच्या कल्पनेचा पगडा त्यांच्या मनावर बसला आहे. भरतखंड हा पांचसहा राष्ट्रांचा संघ असून या सर्व राष्ट्रांना एकत्र करण्याकरितां सामान्य विद्या, सामान्य संस्कृति, सामान्य धर्म एवढीं बंधनें आहेत. या तीन साधनांनीं सर्व भरतखंड एकत्र झाला आहे. परंतु वस्तुतः विस्तार, ऐतिहासिक परंपरा, ज्ञातींचा संकर, मनोरचना या दृष्टीनें पाहिलें असतां भरतखंडांतर्गत निरनिराळ्या राष्ट्रांची उन्नति भिन्न भिन्न दिशेनें झाली आहे. या सर्व प्रगतींचा एकवटून एकच प्रवाह करण्याचा प्रयत्न यशस्वी होणें कठीण आहे. समान विद्या, समान धर्म आणि समान संस्कृति या सर्वसामान्य धर्मांस हल्लींच्या काळांत आणखी एका नवीन आणि अत्यंत महत्त्वाच्या बंधनाची जोड मिळाली आहे. एका छत्राखालीं सर्व राष्ट्रें आलीं असल्यामुळें सुखदुःखाचा समान अनुभव सर्वांना येत आहे. यामुळें सर्व भरतखंड एकराष्ट्र पूर्वी नसलें, तरी आतां तें एकराष्ट्र होण्याच्या तयारींत आहे, अशी आशा आमच्या पुढाऱ्यांस वाटत आहे; परंतु हा त्यांचा भ्रम आहे. आणि असल्या आकाशास गवसणी घालण्याच्या प्रयत्नांत सर्व महाराष्ट्रांतील कर्ते पुरुष लागल्यामुळें त्यांचें मातृभाषेकडे दुर्लक्ष झालें. महाराष्ट्रीयांविषयीं आपलें कांहीं विशेष कर्तव्य आहे, अशी भावना त्यांच्या अंतःकरणांतून निघून गेली. बंगाल प्रांत आज जो महाराष्ट्र वगैरे प्रांतांच्या पुढें गेला आहे, त्याचें कारण बंगाल हें एकराष्ट्र आहे, या कल्पनेची जोपासना त्यांच्याकडून गेल्या १००–१५० वर्षांत सारखी करण्यांत आली म्हणूनच आहे. महाराष्ट्रांतील कोणी विद्वान् I am neither a Hindu nor a Mohamaden "मी हिंदूहि नाहीं किंवा मुसलमानहि नाहीं" असे उद्‌गार काढतो व धड हिंदू ना मुसलमान असला

" मुरारेस्तृतीय पंथः" काढण्यांतच आपलें आयुष्य खर्ची घालतो, तर दुसरा कोणी I am an Indian first and a Hindu afterwards प्रथमतः मी इंडियन आहें असा विचार करीन, नंतर मी हिंदु आहें हा विचार माझ्या मनांत येईल, अशा प्रकारची प्रौढी मारीत निघतो. परंतु या सर्व विधानांत दिसून येणाऱ्या सर्वसंग्राहक वृत्तींत केवढेंहि मोहक वैशद्य असलें, तरी या वृत्तीपासून प्रत्यक्ष कार्य होण्यास फार व्यत्यय येतो. विश्वबंधुत्वाची कल्पना उराशीं बाळगणारा तत्त्ववेत्ता ज्याप्रमाणें प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांत निरुपयोगी ठरतो, तसेंच राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेची योग्य मर्यादा ज्यांना समजली नाहीं, असल्या माणसांच्या सदुक्तींचा व सत्कृत्यांचा स्थायिक परिणाम लोकांच्या शीलावर होत नाहीं. बंगालचे विद्वान् लोक बंगाल हें एक पृथक् राष्ट्र समजतात आणि कांहीं विशेष सुखदुःखाचा अनुभव आपल्या संस्कृतींत असलेल्या दुसऱ्या राष्ट्राबरोबर घेणें आपल्या नशिबीं आलें आहे, तेव्हां या समान आपत्तीच्या निरासाकरितां सर्वांनीं एकत्र होऊन विचार करणें व प्रतिकाराच्या साधनाची योजना करणें जरूर आहे, ही गोष्ट त्यांना पूर्णपणें पटली आहे. बंगालला राष्ट्रगीत आहे, बंगालनें राष्ट्रीय वाङ्मय तयार केलें; बंगाली लिपींत ग्रंथरचना केली नाहीं, असा एकहि विद्वान् त्या भागांत मिळणें मुष्कील आहे. मला माझ्या राष्ट्रानें म्हणजे बंगालनें थोर म्हणावें अशी महत्त्वाकांक्षा तिकडील विद्वानांत आहे, आणि त्यामुळें बंगवाङ्मयानें इतर सर्व वाङ्मयाला मागें टाकलें आहे. महाराष्ट्रांतील मासिकांनीं जें धोरण ठेवलें पाहिजे तें हें कीं, महाराष्ट्र हें एकराष्ट्र आहे, आणि भारत संस्कृतींत कांहीं विशेष तऱ्हेचा भाग महाराष्ट्रीयांनीं पार पाडावा, असा ईश्वरी संकेत आहे.

### लेखांक ९ वा

## विवेचक मासिकें

( पुढें चालू )

एकदां महाराष्ट्र हें एकराष्ट्र आहे, ही कल्पना महाराष्ट्रभर पसरली म्हणजे महाराष्ट्रांतील ज्या अनेक चळवळी अगदींच कंठगतप्राण अव-

स्थेंत आहेत, त्यांत नवीन चैतन्य उत्पन्न होईल, मातृभाषा या शब्दाचें स्वारस्य लोकाच्या लक्षांत येईल, मातृभूमि म्हणून ते महाराष्ट्राकडे पाहतील व हिच्या लेंकरांकडून धन्यता मिळाल्याशिवाय इतरत्र मिळविलेल्या लौकिकाची आमच्यांतील विद्वानांना प्रतिष्ठा वाटणार नाहीं. कै. रानडे, तेलंग, गोखले, डॉ. भांडारकर इत्यादि विद्वन्मणींच्या हातून मराठी वाङ्मयांत एका ओळीचीदेखील भर पडूं नये, याला काय म्हणावें, हेंच समजत नाहीं. खंडाला राष्ट्र समजणाऱ्या या व्यक्तींच्या प्रयत्नांमुळें खंडाच्या प्रगतीस तर विषेश सहाय्य झालें नाहीं, परंतु राष्ट्र मात्र शर्यतींत मागें पडत चाललें आहे. राष्ट्रीयत्वाच्या खऱ्या कल्पनेची वाढ बंगाल्यांत झाली असल्यामुळें वंगभंगाकरितां आमच्या वंगदेशीयांनीं आकाशपाताळ एक करून सोडलें होतें, अश्रुतपूर्व अशी चळवळ सुरू ठेवून सर्व देश सारखा चार वर्षे हालवून सोडला परंतु महाराष्ट्रांतील शेकडा ९० विद्वन्मणींना ही खबर देखील नाहीं कीं, महाराष्ट्र बंगालप्रमाणें केवळ द्विधाविभक्त झाला नाहीं तर तो पंचधाविभक्त झाला आहे. महाराष्ट्राचा विस्तार काय आहे, महाराष्ट्री किती स्वरूपानें आज बोलण्यांत येते, महाराष्ट्रांत कोणकोणत्या ज्ञातींचा अंतर्भाव होतो, महाराष्ट्रवाङ्मयाचें उगमस्थान व मूलपीठिका कोठें आहे, या गोष्टींचा तपास करण्याची आमच्यांतील विद्वानांस जरूर वाटत नाहीं. मराठी मासिकांनीं जें धोरण ठेवणें तें हेंच. मराठी वाचकांस महाराष्ट्राच्या राष्ट्रीयत्वाची कल्पना आली पाहिजे. रमेशचंद्र दत्त, गुरुदास बॅनर्जी, अशुतोष मुखोपाध्याय या लोकांनीं बंगालचा इतिहास, वंगसाहित्य इत्यादि कार्यांत किती श्रम घेतले आहेत आणि नवीन वंगराष्ट्र कसें निर्माण केलें, हें पाहिलें म्हणजे आमच्यातील विद्वान् म्हणून समजल्या जाणाऱ्या व्यक्तींचा तिरस्कार आल्याशिवाय राहात नाहीं. आकाशास गवसणी घालण्याच्या कल्पना भ्रामक आहेत. महाराष्ट्रीयानीं प्रथमतः महाराष्ट्राच्या स्थितीचा विचार करणें जरूर आहे. महाराष्ट्राच्या हितचिंतनापुढें इतर प्रश्न त्याला गौण वाटले पाहिजेत. या विचारसरणीचा उपक्रम कै. विष्णुशास्त्रयांनीं केलाच आहे. लो. टिळक, आगरकर, पंडित इत्यादि लेखकांनीं महाराष्ट्र हें एकराष्ट्र आहे, अशा रीतीनेंच महाराष्ट्राची सेवा करावयास आरंभ केला. आणि हीच

कल्पना दृढ करण्याचा प्रयत्न मासिकपुस्तककारांनीं ठेवला पाहिजे. मी महाराष्ट्रीय आहें, हा विचार प्रथम उद्‌धृत झाला पाहिजे. या विचारांत प्रांतिकत्व नसून राष्ट्रीयत्व आहे. प्रत्येकाच्या अंतःकरणांत ही भावना उभी झाली पाहिजे. एकत्र होणाऱ्या वस्तूलाच एकत्र करणें शक्य असतें. चालीरीति, शील, आणि पूर्वपरंपरा यांमुळें परस्परांहून भिन्न भिन्न असलेल्या निरनिराळ्या मनुष्यसंघांस राष्ट्र या नांवाखालीं एकवटणें कठीण आहे. कांहीं विशेष समानस्थिति उत्पन्न करून भिन्न मनुष्यसंघांत परस्परांविषयीं प्रेम, आदर, विश्वास व एककार्याभिमुखता उत्पन्न करतां येईल. परंतु राष्ट्रीयत्वाची भावना जागृत व्हावयास याहून अधिक निकट संबंधाची जरूरी असते. हा विषय अजिबात स्वतंत्र असल्यामुळें त्याचें सविस्तर विवेचन येथें करतां येत नाहीं. परंतु या चुकीच्या कल्पनेमागें महाराष्ट्रांतील नामांकित विद्वान् लागल्यामुळें मराठी वाङ्मय व महाराष्ट्राची एकंदर परिस्थिति शोचनीयावस्थेस येत चालली असल्यामुळें या कल्पनेचा जोरानें निषेध करून खरी राष्ट्रीयत्वाची कल्पना लोकांसमोर मांडणें जरूर झालें आहे; व एकंदर मराठी मासिकांना याच धोरणावर आपलीं मासिकें चालविण्यास इष्ट अशी विचारक्रांति लवकरच घडून येईल.

मराठी वाचकांस भरतखंडांतील इतर भागांतून चाललेल्या वाङ्मयविषयक इतर चळवळीचा वृत्तांत कळविण्याकरितां बंगाली, हिंदी, गुजराथी, तामील इत्यादि प्रमुख भाषांमधील वरिष्ठ प्रतीच्या मासिकांमधून प्रसिद्ध झालेल्या ठळक लेखांचा सारांशरूपानें संग्रह केल्यास फार उपयोग होईल. विलायतेंतील ‘ रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज ’ मध्यें हा क्रम सुरू आहे. अशा तऱ्हेचा क्रम मराठी मासिकांत नसल्यामुळें महाराष्ट्रांत इतर प्रांतांतील एकंदर स्थितीविषयीं विलक्षण दुराग्रह उत्पन्न झाले आहेत. १९०४ सालीं जी चळवळीची लाट सर्व हिंदुस्थानभर उसळली, ती उठण्याच्यापूर्वी चांगल्या सुशिक्षित विद्वानांचीदेखील अशी समजूत होती कीं, मराठी भाषेशिवाय इतर कोणत्याहि हिंदी भाषांमधून हल्लीं नांवाजण्यासारखी ग्रंथरचना होत नाहीं. सर्व भरतखंडांतील बुद्धिमत्ता पुणें व मुंबई या दोन शहरांतच काय ती सांठविली आहे. सर्व हिंदुस्थानांत पौरस्त्यविद्याप्रवीण

असे डॉ. भांडारकरच तेवढे आहेत. अशा एक ना दोन, अनेक गोष्टींत महाराष्ट्राच्या दृष्टींत संकुचितपणा आला आहे. याचें कारण महाराष्ट्राच्या बाहेरील इतर भागांविषयीं आमचें गाढ अज्ञान. इंग्रजी अंमल सुरू होण्यापूर्वी जुन्या पेशवाईंतील किंवा भोंसलेशाहींतील हरिदास, कवि इत्यादिकांना हिंदी वाङ्मयाचा उत्तम परिचय असे. इतकेंच नव्हे, तर हिंदी भाषांतून बहुतेक श्रेष्ठ मराठी कवींनीं थोडीबहुत सरस रचना केली आहे. त्याचप्रमाणें तीर्थयात्रांकरितां प्रत्येक गांवांतून कांहींतरी माणसें सर्व हिंदुस्थानभर फिरून आलेलीं अशीं असल्यामुळें त्यांच्या तोंडानें इतर भागांतील लोकांविषयीं महाराष्ट्रांतील लोकांना ज्ञान मिळत असे. मुलुखगिरी करण्याच्या प्रघातामुळें तर महाराष्ट्रांतील लढवय्ये लोकांनीं बहुतेक भरतखंड पादाक्रांत केला होता.

## लेखांक १० वा.

# विवेचक मासिकें

(पुढें चालू)

अशा रीतीनें जेव्हां दळणवळणाचे मार्ग किंवा पत्रव्यवहाराच्या सोयी आजपेक्षां पुष्कळच कमी होत्या, त्या काळांतदेखील महाराष्ट्रांतील समंजसवर्गाला हिंदुस्थानांतील इतर भागांच्या परिस्थतीची ओळख झालेली असे परंतु इंग्रजी अंमलानंतर इतर प्रांतांविषयीं एक प्रकारची बेफिकिरी व तिरस्कार महाराष्ट्रीय विद्वानांत प्रादुर्भूत झाला. 'ईश्वरचंद्र विद्यासागर' सारख्या बृहस्पतीतुल्य विद्वानांस आमच्या एका पंडितानें उघडपणें 'अविद्यासागर' म्हणून बंगाल्यांतील बुद्धिमत्तेविषयीं व विद्वत्तेविषयीं आपला तिरस्कार व्यक्त केला. याच्या उलट एकेकाळीं भरतखंडाचें साम्राज्य ज्यांच्या हातांत जाण्याच्या अगदीं बेतांत आलें होतें, त्या पराक्रमी भोसल्यांचे व पेशव्यांचे आम्ही वंशज आहोंत, या बुद्धीनें बंगाली लोक महाराष्ट्राकडे अत्यंत आदरयुक्त पाहूं लागले व आमचें वाङ्मय, आमच्या राजकीय व सामाजिक संस्था यांचा अभ्यास करणारे लेखक बंगाल्यांत उदयास आले. बंगाल्यांत प्रवास करण्याचा ज्यांना

ज्यांना प्रसंग आला असेल, त्यांना आमच्या बंगबंधूंच्या अंत:करणांत महाराष्ट्रीयांविषयीं असलेल्या पूज्य बुद्धीचे हजारो दाखले दृष्टीस पडले असतील. परंतु आम्हांला मात्र खोट्या अभिमानानें घेरल्यामुळें मृच्छकटिकांतील शकाराप्रमाणें "ही स्तुति आहे काय? तर मी स्तुतीस पात्रच आहें. आणखी चालूं द्या" असें वाटावयास लागलें व आम्ही बंगाली लोकांच्या मागें किती आहोंत, याची थोडी थोडी ओळख १९०४ सालापासून आम्हांला यावयाला लागली. आमच्यांतील एक दोन व्यक्ति भरतखंडांतील सर्व थोर व्यक्तींपेक्षां कांहीं बाबतींत श्रेष्ठ आहेत, हें जरी खरें असलें, तरी सर्वसामान्य रीतीनें हिंदुस्थानांतील बंगाली बंधूंनीं आपली प्रगति जास्त करून घेतली आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. आमच्या महाराष्ट्राच्या बुद्धींतील एकदेशीपणा व अहंमन्यत्व नाहींसें झाल्याशिवाय पुढला कार्यभाग त्यांच्याकडून उरकण्याची आशा नाहीं व तेवढ्यासाठींच मराठी मासिकांनीं इतर प्रांतांतील विचारी लोकांचे विचार महाराष्ट्रीयांपुढें मांडण्याची कांहींतरी सोय करणें जरूर आहे. दुसऱ्या भागांतील बुद्धिमत्तेचा व कार्यतत्परतेचा पूर्ण फायदा घेत घेत महाराष्ट्रीयांनीं जर महाराष्ट्राचें एकीकरण करण्यास व राष्ट्रीयत्वाची जाणीव उत्पन्न करण्यास आरंभ केला, तर थोडक्याच अवधींत महाराष्ट्र तेजस्विता व बुद्धिमत्ता यांचें माहेरघर होईल. इतरांच्या साह्याची आठवण कायम असल्यामुळें त्यांच्या सहकारित्वानें जीं कामें करावयाचीं तींत मन:पूर्वक साह्य करण्यास तत्पर राहील.

हल्लीं चालू असलेल्या विवेचक मासिकांतून पुष्कळदां विचार करण्यासारखे लेख येत आहेत. विशेषत: नवीन निघालेल्या "चित्रमयजगतानें" चित्रांवरील थोडेंसें लक्ष कमी केलें तर तें या वर्गाचें फारच नमुनेदार नवीन मासिक होईल असें मला वाटतें. चित्रें देण्यांत देखील, नाटकांतील निरनिराळ्या अनेक प्रसंगांचीं चित्रें मासिक पुस्तकांच्या वाचकांस दाखविण्याची विशेष जरूरी नाहीं. त्याऐवजीं मॉडर्न रिव्ह्यूमधून प्राचीन शिल्प व कला यांचें स्वरूप समजण्याकरितां किंवा एका संस्थेकडून होत असलेल्या परोपकारी कार्याची योग्य कल्पना देण्याकरितां किंवा भरत–

खंडांत जंगली व रानटी म्हणून समजलेल्या ज्या अनेक ज्ञाती आहेत त्यांच्या व्यावहारिक व सामाजिक कल्पनांचा इतिहास लोकांस कळावा म्हणून चित्रें दिलीं तर योग्य होईल. त्यांत प्रसिद्ध होणाऱ्या चित्रांविषयीं एवढी सूचना केवळ स्नेहबुद्धीनेंच मला करावीशी वाटते. "लोकशिक्षण"-कर्त्यांनीं आपणांपुढें जें ध्येय ठेविलें आहे, तें निःसंदेह उदात्त आहे. परंतु त्यांतून प्रसिद्ध होणाऱ्या लेखांत एक प्रकारचा भाषेचा अवजडपणा आहे, इकडे संपादकांचें लक्ष जात नाहींसें दिसतें. रा. पाध्यांसारखे दोन चार लेखक जर मिळविले, तर 'नवयुग' लवकरच नांवारूपास येईल. राजकीय विषयांची चर्चा करण्याकरितां या मासिकांतून प्रसिद्ध झालेले कांहीं लेख विचार करण्यासारखे आहेत. केरळ देशांतून उडून आलेल्या कोकिळानें आपल्या मधुर कूजितानें महाराष्ट्रीयांस बरींच वर्षें रिझविलें. परंतु आतां राष्ट्राला वासंतिक सौंदर्य अवलोकन करण्यांत मौज वाटत नाहीं हें पाहतांच "नव्या मन्वंतरांत" त्यानें फिरून दुसऱ्या रूपानें महाराष्ट्रीयांच्यापुढें आपल्या गायनाचे जलसे करावयास आरंभ केला आहे. भर तारुण्यांतील आवाजाची लकब खोकतां खोकतां दम आलेल्या वृद्धांत दृष्टीस पडणें शक्य नाहीं. परंतु कोणत्या वृद्धास आपल्या वृद्धापकाळाची आणि सामर्थ्यविहीनतेची कल्पना असते ! महाराष्ट्राच्या डोळ्यांवरील अज्ञानपटल दूर करण्याकरितां आजगांवकरांनीं "ज्ञानांजना"च्या डब्या स्वस्त किंमतीनें विक्रीस ठेवल्या आहेत. अंजनानें लोकांचा नेत्ररोग तर दूर झाला नाहीं, पण डोळ्यांची विलक्षण आग होते व ती जवळ जवळ कित्येक दिवसपर्यंत नाहींशी होत नाहीं. आजगांवकरांनीं एखाद्या अनुभवी वैद्याचा पोक्त सल्ला घेऊन अंजनांतील औषधी-द्रव्यांत थोडाफार फेरबदल करून तें कमी तीव्र व अधिक गुणकारी होण्याचा प्रयत्न करून पाहावा, अशी त्यांस आमची अगत्याची सूचना आहे. "विविध ज्ञानविस्तार" या जुन्या मासिकानें एका विशिष्ट पक्षांतील लोकांच्या मत-प्रकाशनाचा मक्ता घेऊन "विशिष्ट ज्ञानविस्तार"जर केला नाहीं, तर त्याची योग्यता व मान्यता पूर्ववत् राहील, यांत शंका नाहीं. सर्वांकडूनच होत असलेल्या सेवेबद्दल महाराष्ट्र त्यांचा ऋणी आहे. परंतु वर ज्या सूचना केल्या आहेत, त्यांचा या मासिकाच्या संपादकांनीं अवश्य विचार करावा, एवढी

सूचना करून मासिकांच्या बाकीच्या वर्गाविषयीं थोडासा उल्लेख करतों व हा लांबलेला लेख संपवितों.

## शास्त्रीय मासिकें

### ( प्रकार पांचवा )

निव्वळ शास्त्रीय असें एकहि मासिक महाराष्ट्रांत नाहीं. इतर देशांतून देखील अशीं मासिकें निरनिराळ्या शास्त्रांचा अभ्यास व शोध करणाऱ्या संस्थांच्या विद्यमानें प्रसिद्ध होत असतात.सामान्य वाचकांस शास्त्रीय मासिक-पुस्तक कधींहि आवडत नसतें व त्यांच्याकरितां असलीं मासिकें निघत नसतात. शास्त्रीय शोध करणाऱ्या मंडळ्या जेथपर्यंत महाराष्ट्रांत निघणार नाहींत, तेथपर्यंत खरें शास्त्रीय मासिक मराठींत निघणें अशक्य आहे. कारण या मासिकांतून विशेषत: एखाद्या विशिष्ट शास्त्रांत जे अनेक शोध जगांतील निरनिराळ्या शास्त्रज्ञांकडून होत असतात, त्यांच्या युक्तायुक्ततेची चर्चा करण्यांत येते व त्याचबरोबर ज्या संस्थेच्या विद्यमानें हें मासिक प्रसिद्ध होत असतें, त्या संस्थेनें केलेल्या शोधांचें सविस्तर वर्णन देण्यांत येतें.

मराठींतून प्रसिद्ध होणाऱ्या शास्त्रीय मासिकांस " शास्त्रीय " म्हणण्यापेक्षां ' कलाविषयक ' किंवा ' धंदेविषयक ' मासिकें म्हणणेंच जास्त सयुक्तिक होईल. 'शास्त्र' आणि 'कला' यांमधील भेद ज्यांना समजला आहे ते वैद्यकासंबंधीं, शेतकीसंबंधीं किंवा उद्योगधंदे, यांत्रिक माहिती किंवा व्यापार या विषयांवरील मासिकांस शास्त्रीय मासिकें हें नांव कधींहि देणार नाहींत. तथापि हल्लीं या जातीच्या मासिकांत डॉ. मॅननें चालविलेलें 'शेत, शेतकी व शेतकरी ' हें फार उपयुक्त मासिक आहे. इतर तऱ्हांच्या या वर्गांतील मासिकांवर अभिप्राय देण्यास मजपेक्षां त्या त्या धंद्यांतील लोकच अधिक पात्र आहेत. या बाबतींत प्रयत्न करणारांनीं महाराष्ट्रांतील प्रमुख उद्योगधंद्यांची योग्य माहिती मिळवून जर मासिकें काढलीं व त्या विषयांवरील पाश्चात्य ग्रंथांतून मिळणारें ज्ञान महाराष्ट्रांतील धंदेवाल्या लोकांस समयोग उपलब्ध होण्याची खटपट केली, तर एक मोठी उणीव दूर होईल.

## स्त्रीवर्गाकरितां मासिकें

( प्रकार सहावा )

'गृहिणी' 'भगिनीसमाचार' इत्यादि मासिके केवळ स्त्रीवर्गाकरितां निघत असतात. या मासिकांतून येणाऱ्या लेखांचें धोरण एकंदरीनें अभिनंदनीय आहे. " मासिक मनोरंजना " सारख्या मासिकांतून जीं स्त्रीविषयक ध्येयें प्रतिपादण्यांत येत आहेत, त्यांचा प्रतिकार करण्यास महाराष्ट्रांतील महिला वर्ग पुढें आला, हें महाराष्ट्राच्या जिवंतपणाचें दृश्य चिन्ह आहे. ज्यांच्या करितां 'मनोरंजनकार' अविश्रांत खटपट करतात, त्यांना मनोरंजनी सुधारणा नको, हें सांगावयाला आमच्यांतील सुशिक्षित स्त्रिया जरी समर्थ असल्या, तरी तेवढ्यानें पुरुषवर्गाची जबाबदारी कमी होत नाहीं, एवढा इषारा देणें जरूर आहे.

## मुलांकरितां मासिकें

( प्रकार सातवा )

मुलांकरितां बरींच मासिकें प्रसिद्ध होत आहेत. हीं पुस्तकें अधिक चित्ताकर्षक होण्याचा प्रयत्न करणें जरूर आहे. या पुस्तकांतून येणारे लेख बहुशः मुलांना आवडण्यासारखेच असतात. तथापि या मासिकांचा प्रौढ माणसाला व वाङ्मयालाहि उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे. महाराष्ट्रांत निरनिराळ्या भागांत ज्या निरनिराळ्या कथा व काहाण्या प्रचलित आहेत, त्या अगदीं काहाणींच्या पद्धतीनेंच देण्याचा उपक्रम सुरू केला, तर मुलांना त्या गोष्टी आवडतीलच. परंतु मराठी भाषेच्या इतिहासकारांस महाराष्ट्रांतील भिन्न भिन्न ज्ञातींची पूर्वपीठिका व परस्परसंबंध समजण्यास त्यांपासून फार मोठी मदत होईल. 'मोदक' स्वादिष्ट आहे. 'आनंद' कित्येक वेळ बहारीचा असतो. 'बालबोध' हा मुलांनींच नव्हे, तर प्रौढांनींहि ध्यानांत घेण्यासारखा आहे. बाह्यांग अधिक मोहक करण्याचा प्रयत्न या मासिकाविषयीं जरूर झाला पाहिजे. सर्व मासिकांची पृथक् पृथक् समालोचना करणें

इष्ट वाटत नसल्यामुळें प्रत्येक मासिकाचा नामनिर्देश करून गुणदोष दाखविले नाहींत. एकंदर राष्ट्राच्या गरजा काय आहेत, कोणत्या गुणांचा परिपोष झाला असतां महाराष्ट्राला आपली गेलेली अब्रू मिळवितां येईल व 'राष्ट्र' पदवीस पोहोंचतां येईल, आणि भरतखंडाच्या उद्धाराचा व तद्वारां जगदुद्धाराचा जो प्रयत्न भारतवर्षीयांच्या हातून व्हावा, असा परमेश्वरी संकेत आहे, त्या महत्कार्यांत आपली भूमिका योग्य रीतीनें पार पाडण्यास महाराष्ट्र कसा पात्र होईल, या दृष्टीनें ज्या सूचना इष्ट वाटल्या, त्या वर केल्या आहेत. त्यांचा योग्य विचार होऊन कालांतरानें महाराष्ट्र–वाङ्मय हें केवळ महाराष्ट्राच्या अभिमानाचाच नव्हे, तर सर्व भरतखंडाच्या व जगांतील सुधारलेल्या राष्ट्रांच्या अभ्यासाचा विषय होईल, अशा प्रयत्नास आमचे सरस्वतीभक्त लागतील, एवढी आशा प्रदर्शित करून व ही इच्छा जगन्नियंत्यानें सिद्धीस न्यावी, म्हणून त्याची अनन्य भावानें प्रार्थना करून मी आपला लेख संपवितों.

---

# हिंदुमुसलमानांचें ऐक्य

## लेखांक १ ला*

असहकारितेच्या कार्यक्रमानें सर्व राष्ट्र कसें मोहून गेलें आहे व त्या कार्यक्रमाचा सर्व राष्ट्रानें एकदम स्वीकार कां केला, हे प्रश्न वारंवार विचारण्यात येतात. आमच्या मतानें या कार्यक्रमांत जें नावीन्य व जी तेजस्विता आहे, त्यामुळें प्रायशः राजकारणांत अननुभवी असलेल्या जनतेच्या मनावर त्या कार्यक्रमाची छाप बसली. याशिवाय या कार्यक्रमाचा खिलापतीच्या अन्यायामुळें संतप्त झालेल्या सात कोटी मुसलमान बंधूनीं खिलापतीच्या अन्यायाच्या निराकरणार्थ स्वीकार केला होता, हें दुसरेंहि प्रबल कारण आहे. मुसलमान बंधु राष्ट्रीय सभेपासून प्रायशः दूर असत. त्यांच्या राजकीय संस्थेंतून हिंदी प्रश्नांचा विचार हिंदी राष्ट्राच्या सामान्य हिताच्या दृष्टीनें न होतां मुसलमानी जमातीच्या हितसंबंधापुरताच केला जात होता. लखनौ येथील सुप्रसिद्ध राष्ट्रीय सभेंत कै. लो. टिळक, बॅ. जिना, महमुदाबादचे राजेसाहेब, पंडित मदन मोहन मालवीय वगैरे पुढाऱ्यांच्या खटपटीमुळें हिंदु व मुसलमान यांच्या पुढाऱ्यांनीं एकमतानें एक संयुक्त योजना मंजूर केली होती. तरी कार्यकर्त्या मुसलमानांचा थोडासा वर्ग सोडून दिल्यास सामान्यतः मुसलमानसमाज हा राजकारणापासून अलिप्त असाच होता. मुसलमानी धर्म व संस्कृति ही एका प्रकारच्या विशिष्ट धार्मिक कल्पनांनीं बद्ध झालेली संहति आहे, व त्या सर्व वर्गाकडून जर एकसमयावच्छेदेंकरून एखादी क्रिया व्हावयाची असली, तर ज्या बंधनांनीं तो समाज एकवटलेला आहे, त्यांपैकीं एक किंवा अनेक बंधनांस धक्का बसण्यासारखें एखादें कारण उपस्थित व्हावें लागतें. त्याशिवाय केवळ राजकीय हक्क किंवा मनुष्यमात्राचे हक्क प्राप्त करून घेण्यासाठीं किंवा त्यांचें उल्लंघन होत असतां तें थांबविण्यासाठीं या समाजाकडून एखादी सांहतिक क्रिया होणें अवघड आहे. मुसलमानी समाज राष्ट्रीय सभेनें चालविलेल्या राजकीय हक्कांच्या झगड्यांत तटस्थ असतो, या गोष्टीची जाणीव हिंदी राष्ट्रांतील हिंदु व मुसलमान या दोन्ही वर्गांतील

---

*" लोकमत " ता. ३० जून सन १९२२

समंजस पुढाऱ्यांना होती, व त्यांचा तटस्थपणा काढून टाकण्याकरितां त्यांनीं वेळोवेळीं प्रयत्नहि केले. परंतु मुसलमानसमाजांतील कित्येक प्रमुख पुढाऱ्यांनीं आपली अशी समजूत करून घेतली होती कीं, इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानचें साम्राज्य दिल्लीच्या बादशहापासून मिळविलें असल्यामुळें इंग्रजांच्या खालोखाल हिंदुस्थानांत मुसलमानांचा मानमरातब असला पाहिजे. राज्यकर्त्यांच्या दोन जातींपैकीं आपली एक जात आहे, आपण जरी पराभूत असलों, तरी एके काळीं हिंदुस्थानच्या सामान्य जनतेवर बादशाही करणाऱ्या वर्गांतले आपण लोक आहोंत, ही भावना विद्वान् पण अभिमानसंपन्न मुसलमानी पुढाऱ्यांत प्रबल होत चालली होती. एका राजाचा पराभव करून जेव्हां दुसरा एखादा परकीय राजा नवीन देश काबीज करतो, तेव्हां नवीन मुलखांत जिकडे तिकडे स्थिरस्थावर होऊन तो पूर्ण आपल्या कबजांत येईपर्यंत पूर्वीचा राजा व त्याचे आप्तइष्ट यांच्या हातीं सत्ता न ठेवतांदेखील त्यांचा योग्य मानमरातब राखण्याची विशेष खबरदारी घेत असतो. सामान्य जनतेपेक्षां आपण श्रेष्ठ दर्जाचे लोक आहोंत, एवढी कल्पना त्यांच्यामध्यें सदैव जागृत राहील, अशा तऱ्हेनें आपल्या राजनीतीचें धोरण ठेवण्याची त्याच्याकडून खटपट होत असते, व यामुळें सामान्य जनता आपल्या उद्धारार्थ जेव्हां खटपट करावयास लागते, तेव्हां त्या प्रयत्नांत वरील मानमरातबीच्या कल्पनांत मुरलेला वर्ग सहसा सामील होत नाहीं, व त्यांच्या कर्तबगारीचा, वजनाचा व परंपरागत सहजप्राप्त राजकीय अनुभवाचा फायदा सामान्य जनतेस न मिळाल्यामुळें त्यांच्या प्रयत्नांत तडफ व तेज उत्पन्न होण्यास विलंब लागतो.

हिंदुस्थानच्या राजकीय संस्थांचे प्रयत्न एखाद्या विशिष्ट वर्गाकडून कितीहि आस्थापूर्वक व स्वार्थत्यागपूर्वक चालविले असले, तरी त्यांजकडे सात कोटी अशा एका प्रचंड वर्गाचें जेथपर्यंत पूर्ण दुर्लक्ष असेल, तेथपर्यंत राज्यकर्त्यांना वरील राजकीय संस्थांची उपेक्षा करणें सोपें असतें.

हिंदु व इतर समाज यांच्यापासून पृथक् राहण्यांतच आपलें मोठेपण आहे, ही कल्पना हिंदी मुसलमान वर्गांत दुसऱ्या एका कारणामुळेंहि दृढ होत चालली होती. हिंदु लोकांना हिंदुस्थानच्या बाहेर जर जगांत कोठे पाऊल

टाकावेंसें वाटलें, तर तें मजूरदार म्हणूनच टाकतां येणें शक्य आहे. आपल्या देशांत असतांना ज्यांना परकीय दास्याच्या शृंखला वागवाव्या लागतात, त्यांना दुसऱ्याच्या मुलखांत कांहीं प्रतिष्ठा ठेविली जात नाहीं, याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. सर्वत्र व सार्वत्रिक अपमान हाच त्यांच्या वाट्यास ठेवलेला असतो. हिंदुस्थानच्या चतुःसीमेबाहेर हिंदु म्हणविणाऱ्या हिंदी माणसाशीं स्वकीयत्वानें वागणारा एकहि देश आज जगाच्या पाटीवर नाहीं. हिंदूंना घरींदारीं अपमान, अशी त्यांची शोचनीय स्थिति आहे. पण सुदैवानें आमच्या मुसलमानबंधूंची स्थिति या बाबतींत थोडी अधिक बरी आहे. पाश्चात्यांच्या सर्वभक्षक जबड्यांतून वाचलेले असे स्वतंत्र देश अजून हयात आहेत व तेथें मुसलमानी सत्ता व मुसलमानी धर्म यांचेंच साम्राज्य नांदत आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या कक्षेतील इतर देशांतून जरी हिंदु व मुसलमान यांची स्थिति अत्यंत हलाकीची असली, तरी तुर्कस्थान, इराण, अफगाणिस्थान इत्यादि स्वतंत्र देशांत पाय टाकल्याबरोबर हिंदी मुसलमानांच्या अंगावर मूठभर मांस चढल्याशिवाय राहात नाहीं. हिंदुस्थानाबाहेर आपल्या संस्कृतीचे व धर्माचे वाली आज कायम आहेत, या एका विचारामुळें देखील दुर्बल हिंदूंपेक्षां मुसलमानांना आपला दर्जा वरिष्ठ आहे, असें वाटणें स्वाभाविक आहे. हिंदुस्थानच्या बाहेरील स्वतंत्र राष्ट्रांत आपल्या धर्मबांधवांचें स्वतंत्र राष्ट्र आजमितीस कायम आहे व जगाच्या उलथापालथींत त्यांच्यावांचून पान हालत नाहीं, हा विचार येथील मुसलमानबंधूंस स्फूर्तिदायक आहे व एवढ्यामुळें त्यांच्या मनाचा ओढा त्या स्वतंत्र देशाकडे असणें हें नैसर्गिक आहे. जेथपर्यंत युरोपांतील साम्राज्याकांक्षी पक्षाला देशाच्या स्वातंत्र्याचें अपहरण करण्याची दुष्ट बुद्धि झाल्याचें स्पष्टपणें निदर्शनास येत नव्हतें, तेथपर्यंत हिंदुस्थानांतील मुसलमान लोकांस हिंदूंशीं एकजीव होण्याची तीव्र आवश्यकता वाटणेंदेखील दुरापास्त होतें. गेल्या १५।२० वर्षांत तुर्कस्थानवर युरोपच्या कुटिल राजनीतीमुळें जेव्हां लहानमोठे युद्धाचे प्रसंग उत्पन्न झाले, तेव्हां हिंदी मुसलमानांच्या मनाची केवढी त्रेधा उडत होती, हें ज्यांनीं पाहिलें असेल, त्यांना आमच्या विधानाची सत्यता पटल्यावांचून राहाणार नाहीं.

तुर्कस्थानची सत्ता हें सर्व जगांतील मुसलमानांचें एकीकरण करण्याचें एक प्रबल केंद्रस्थान आहे. याच विचाराचा परिपोष हिंदी सुशिक्षित मुसलमानबंधूंस होत होता. तुर्कस्थानचे सुलतान हे सर्व मुसलमानी धर्माचे खलीफ असल्यामुळें त्यांना ही परिस्थिति सहज पटण्यासारखी आहे, हें जाणण्यास फारसे प्रयास पडले नाहींत. याच सुमारास पंजाबांतील सरकारी अंमलदारांकडून जे अत्याचार करण्यांत आले, त्यांत हिंदू व मुसलमान पुढारी यांचा सारख्याच रीतीनें छळ करण्यांत आला. एकाच रणक्षेत्रावर लढणाऱ्या दोन लढवय्यांमध्यें उत्पन्न होणारा स्नेहसंबंध हा केव्हांहि औपचारिक संबंधाचा नसतो, त्यांत सजीवपणा भरलेला असतो. त्यामुळेंहि मुसलमानांच्या खिलाफतीच्या दुःखाच्या निरसनार्थ त्यांना योग्य वाटतील त्या मार्गांनीं त्यांनीं खटपट करावी व हिंदुस्थानांतील राष्ट्रीय सभेच्या अनुयायांनीं त्यांच्या या धार्मिक झगड्यांत त्यांना मनःपूर्वक व सक्रिय सहाय्य करावें, अशी घोषणा अमृतसर येथील राष्ट्रीय सभेच्या मंडपांत करण्यांत आली.

मुसलमानी जमात ही जरी सर्व तऱ्हेनें तेजस्वी असली तरी हिंदुस्थानच्या गेल्या शें--दीडशें वर्षांच्या राजकीय चळवळीपासून ते प्रायशः अलिप्त राहिले असल्याकारणानें आपल्या समाजाचें धुरीणत्व एखाद्या कर्तबगार पुढाऱ्यानें घ्यावें व नवीन झगडा चालविण्याची दिशा आंखून द्यावी, ही इच्छा त्यांच्याकडून वारंवार प्रदर्शित करण्यांत आली. याप्रमाणें मुसलमानी जमातीचा सागर स्वार्थत्यागाच्या रसानें तुडुंब भरला असतां त्याला योग्य दिशेनें पाट फोडून कार्यास लावणाऱ्या मार्गदर्शकाची प्रतीक्षा करीत तो समाज बसला असतां म. गांधी यांनीं त्यांचें नेतृत्व करण्याचें जाहीर आश्वासन दिलें व सर्व मुसलमानी समाजानें त्यांच्या नेतृत्वाखालीं निष्ठापूर्वक वागण्याचें त्यांना आश्वासन दिलें. त्यांच्याकरितां म.गांधी यांनीं असहकारितेचा कार्यक्रम हाच तारक मंत्र म्हणून उपाय सांगितला व एक वेळ ऐहिक कारणामुळें उत्पन्न झालेल्या प्रेमाचें व स्नेहबुद्धीचें रूपांतर धार्मिक निष्टेंत व श्रध्देंत व्हावयास लागलें होतें. अशा परिस्थितींत हिंदुस्थानच्या ऐहिक उद्धाराकरितां चालविलेल्या झगड्यांत हिंदू जनतेशीं एकजीव व समरस होऊन राजकीय चळवळ तीव्रतेस नेण्याचा विचार त्यांच्यांत प्रबळ होणें पुष्कळ अंशीं कठिण जात होतें.

परंतु जर्मन युद्धानंतर तुर्कस्थान व त्याच्या अंकित असलेल्या देशाचे तुकडे पाडण्याचा रंग जेव्हां दिसावयास लागला व खलीफाची सत्ता कार्यकारी न ठेवितां केवळ नामधारी बनणार, अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं, तेव्हां हिंदी मुसलमानांना जगाच्या राजकारणांत प्रत्यक्षपणें आपणांला कांहींच कार्यभाग उचलतां येत नाहीं, या गोष्टीची जाणीव उत्पन्न झाली; व युरोपांतील लोभी राष्ट्रांच्या विशेषतः इंग्लंडच्या नजरेस आपल्या अंतःकरणांत पेटलेला क्षोभ आणून देण्याची आवश्यकता फार जोरानें भासूं लागली. शेंकडो वर्षांपासून आपल्या प्रेमाचें, श्रद्धेचें व आदराचें अधिष्ठान असलेली तुर्की सत्ता व खलीफाचें सिंहासन धुळीस मिळणार, हा विचार त्यांना दुःसह झाला व तुर्कस्थानच्या व खिलाफतीच्या बचावाकरितां वाटेल तो स्वार्थत्याग करण्याची हिंदी मुसलमानांनीं प्रतिज्ञा केली. तुर्की मुलुखाचे व खिलाफतीचे तुकडे करून ते परस्परांत वांटून घेण्याच्या गृध्रनीतीचा पुरस्कार करणारें इंग्रजी मुत्सद्दी मंडळ त्यांच्या डोळ्यांत सलूं लागलें व त्या इंग्रजी सत्तेचा प्रतिनिधि म्हणून राज्यकारभार चालविणाऱ्या हिंदी नोकरशाहीबरोबर झगडण्याची त्यांनीं तयारी चालविली.

राष्ट्रीय सभेच्या जन्मापासून तिच्या चालकांना, मुसलमानबंधूंना राष्ट्रीय सभेच्या गोटांत ओढण्याची जरूरी वाटत होतीच, तेव्हां मुसलमान बंधूंच्या या मनःस्थितीमुळें राष्ट्रीय सभेचें ध्येय खिलाफत कमेटीनें मान्य करून त्यांवर सात कोट मुसलमानबंधूंच्या संमतीचा शिक्का मारला. अशा परिस्थितींत जेव्हां राष्ट्रीय सभेच्या जादा अधिवेशनाच्या वेळीं राष्ट्राच्या विचाराकरितां वरील कार्यक्रम मांडण्यांत आला, तेव्हां हा कार्यक्रम मान्य केल्यास ३५ वर्षांपासून हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याची वाटत असलेली वांच्छा तृप्त होणार, या आनंदांत सर्व राष्ट्रीय सभा इतकी गर्क होऊन गेली कीं, त्या सभेच्या अनुभवी वर्गाकडून त्या कार्यक्रमाच्या गुणदोषांसंबंधानें जो कसून वाद करण्यांत आला, तिकडे त्या सभेनें म्हणण्यासारखें लक्षच दिलें नाहीं. या कार्यक्रमांत थोडासा फेरफार केला, तरी कदाचित् हें चिरवांछित ऐक्य घडून येण्यास व्यत्यय येतो कीं काय, अशा साशंक मनःस्थितींत सामान्य जनता असल्यामुळें तिनें शक्याशक्यतेचा विचार करण्याचें अजिबात टाकून

दिलें, व या कार्यक्रमावर राष्ट्रीय सभेच्या द्वारें सर्व राष्ट्राचा मोर्तब करून हिंदुमुसलमानांच्या ऐक्याची द्वाही सर्व जगभर फिरविली, असें म्हणावयास हरकत नाहीं; व ज्या दिव्य ऐक्याच्या भावनेनें प्रेरित होऊन राष्ट्रीय सभेच्या द्वारें सामान्य जनतेनें असहकारितेच्या कार्यक्रमास संमति दिली, त्याच भावनेनें व उल्हासानें तो कार्यक्रम यशस्वी करून दाखविण्याच्या उद्योगास हिंदु व मुसलमान हे एकमेकांच्या हातांत हात घालूं लागले. असहकारितेच्या कार्यक्रमास मिळालेल्या अपूर्व लोकप्रियतेच्या एका कारणाची या लेखांत एवढी मीमांसा करून बाकीच्या कारणांचा विचार यथावकाश करण्याचें अभिवचन देऊन हा लेख येथेंच संपवितों.

---

## लेखांक २ रा*

मागील लेखांत या विषयाचा जो थोडासा विचार करण्यांत आला, त्यावरून असहकारितेच्या कार्यक्रमाचा कलकत्ता येथील राष्ट्रीय सभेच्या जादा अधिवेशनाच्या वेळीं राष्ट्रानें स्वीकार केला, तेव्हां हिंदुमुसलमानांचें ऐक्य यामुळें घडून येईल, अशी सर्व हिंदी राष्ट्राला बळकट आशा वाटत होती, हें वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. आज या प्रश्नाचा विचार मुख्यत: या ऐक्याचा खरा अर्थ काय आहे, एवढें स्पष्ट करण्यापुरताच करावयाचा आहे.

पुष्कळदां कल्पनांचें खरें मर्म न कळल्यामुळें त्या कल्पनांस मूर्त स्वरूप आणण्याचे प्रयत्न योग्य रीतीनें होत नाहींत आणि प्रयत्न करणारांचे श्रम व्यर्थ जातात. हिंदु व मुसलमान या हिंदुस्थानांतील प्रमुख दोन वर्गांत ऐक्य झाल्याशिवाय हिंदुस्थानचा तरणोपाय नाहीं, ही गोष्ट सर्वमान्य आहे. या सिद्धांतावर आक्षेप घेणारा सखीचा लाल नेमस्त म्हणविणारांतसुद्धां सांपडणार नाहीं. ही गोष्ट इतकी सर्वमान्य असल्यामुळेंच या कल्पनेच्या उच्चारापेक्षां तिचें अधिक स्पष्टीकरण करण्याची कोणालाहि फारशी जरूरी भासली नाहीं. ज्या कल्पना सार्वत्रिक असतात व चोहोंकडे सुरू झालेल्या दृष्टीस पडतात, त्यांचें पृथक्करण करण्याची किंवा त्यासंबंधाचा कार्यकारण-

---

* "लोकमत" यवतमाळ ता. २८ जुलै १९२२

भाव शोधून काढण्याची प्रवृत्ति समाजांत बहुशः दृष्टीस पडत नाहीं. परंतु आमच्या मतानें जेव्हां एखादी सर्वमान्य कल्पना केवळ बुद्धिगम्य ठेवावयाची नसून कार्यप्रचोदक शक्ति म्हणून व्यवहार्य करावयाची असते, तेव्हां ती कितीहि सर्वमान्य असली, तरी तिचा सांगोपांग उहापोह होणें जरूर असतें. असा उहापोह होऊन तिचें यथार्थ स्वरूप लोकांच्या निदर्शनांत जेथपर्यंत येत नाहीं, तेथपर्यंत केवळ त्या कल्पनेच्या लोकमान्यतेमुळेंच अपेक्षित कार्यप्रचोदक शक्ति निर्माण होऊं शकत नाहीं, असें आमचें ठाम मत आहे व एवढयाचकरितां आम्हीं या लेखांत या कल्पनेच्या वास्तविक स्वरूपाचें आविष्करण करण्याचें योजिलें आहे.

वरवर पाहणारांस हिंदू व मुसलमान यांजमधील दुहीचें बीज धर्मभेदांत आहे, असें वाटण्याचा संभव आहे; व हें ऐक्य घडवून आणण्याचें काम म्हणजे हा धर्मभेद नष्ट करून उभय वर्गाला मान्य होईल असा एक नवीन धर्मपंथ स्थापन करणें व त्या धर्माची दोन्ही वर्गांस दीक्षा द्यावयास लावणें हा साधारण मार्ग म्हणून सांगण्यास वरील विचारसरणीचे लोक कचरणार नाहींत. किंबहुना या दिशेनें प्रयत्न करणारांच्या एकदोन पिढ्या हिंदुस्थानांत इंग्रजांच्या अव्वल अमदानींत होऊन गेल्याहि आहेत, व आजदेखील ही विचारसरणी अगदींच लुप्तप्राय झाली, असें म्हणणें थोडेंसें धाडसाचेंच होईल असें आम्हांस वाटतें. कांहीं विशिष्ट तत्त्वांचा पुरस्कार करून त्याच्या जोरावर जगांत ऐक्यभाव निर्माण करण्याची हांव धरणारे महत्त्वाकांक्षी पुरुष प्रत्येक शतकांत दहापांच तरी उत्पन्न होत असतात. परंतु ज्याप्रमाणें पृथ्वीवरील सर्व नद्या व नाले यांचे ओघ एकाच प्रचंड प्रवाहांत आणण्याचा कोणी उद्योग केल्यास तो सर्वस्वी निष्फळ ठरेल, त्याचप्रमाणें कांहीं सामान्य व विशिष्ट तत्त्वांच्या खाडींतून जगांतील निरनिराळ्या धर्मकल्पनांचे प्रवाह खेंचून आणण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थच जाणार आहेत. आकाशास गवसणी घालण्यासारखेंच हें काम आहे. परंतु महत्त्वाकांक्षेंत जर कोणता मोठा दुर्गुण असेल, तर पूर्वानुभवावरून बोध घेण्याची विन्मुखता हाच होय. त्यामुळें धार्मिक विचारांत वावरणाऱ्या महत्त्वाकांक्षी व्यक्ति प्रच्छन्न किंवा स्पष्ट रीतीनें वरील प्रकारचे प्रयत्न पुनः-

पुन्हा करीत असतात. मागील पिढीस आलेल्या अपयशानें त्यांचे मन यत्किंचित्‌देखील कचरत नाहीं. परंतु त्या पिढीनें आपल्या कल्पनेच्या प्रसारार्थ ज्या साधनांचा उपयोग केला असेल, तीं साधनें टाकून त्यांत थोडीबहुत दुरुस्ती करून अथवा सर्वथैव भिन्न साधनांचें अवलंबन करून ते आपल्या यत्नास लागत असतात. पूर्वींच्या लोकांनीं आपल्या कल्पनेच्या प्रसारार्थ केवळ धर्मोपदेशकाचे संघ निर्माण करून प्रयत्न केला असल्यास हे नवीन युगांतील महत्त्वाकांक्षी तत्त्ववेत्ते त्यामुळेंच धर्मैक्याची किंवा विश्वबंधुत्वाची कल्पना सिद्धीस गेली नाहीं, अशी आपल्या मनाची समजूत करून घेतात व दुसराच एखादा मार्ग शोधून काढण्याच्या खटाटोपास लागतात. मागील पिढीनें सर्व धर्मांच्या ऐक्यस्थापनेकरितां सर्वधर्मीयांचें ऐक्य एकसमयावच्छेदेंकरून घडवून आणण्याची खटपट केली असली, तर नवीन मन्वंतरांतील महत्त्वाकांक्षी तत्त्ववेत्ता प्रथमतः परस्परसान्निध्यांत असलेल्या अशा दोनतीन धर्मांचीच सांगड घालण्याच्या प्रयत्नास लागेल. परंतु हें केवळ साधनभिन्नत्व असतें. यांत साध्यभेद कोठेंहि नसतो. अशा कोणत्याहि विश्वबंधुत्वाच्या किंवा धर्मैक्याच्या कल्पनेचा परिपोष करण्याकरितां राष्ट्रीय सभेनें हिंदुमुसलमानांच्या ऐक्याचा प्रश्न हातीं घेतला नाहीं, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. विश्वबंधुत्व, जगदुद्धार इत्यादि कल्पनांत सकृद्दर्शनीं भासमान होणाऱ्या व्यापकतेचा पगडा मनोवृत्तिप्रधान लोकांच्या मनावर सहज बसतो व हल्लींच्या काळीं कित्येक प्रख्यात लेखक व वक्ते या कल्पनांवर आपली भिस्त ठेऊन हिंदुस्थानच्या भवितव्यतेचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. असल्या प्रयत्नांचा परिणाम प्रत्यक्ष कार्यरूपांत येणें तर स्वभावतःच अशक्य असतें. परंतु त्याचा दुसरा एक दुष्परिणाम असा होतो कीं, मर्यादित क्षेत्रांत कांहीं विशिष्ट कार्य घडवून आणणारे कांहीं उत्साही लोक भलत्याच कल्पनांच्या घोड्यावर स्वार होतात व हातीं घेतलेल्या कार्यावरील त्यांची निष्ठा डळमळीत होते व प्रयत्नांतहि शिथिलता येते. जगांत धर्मैक्य किंवा विश्वबंधुत्व स्थापन करण्याची पायरी म्हणून हिंदुमुसलमानांच्या ऐक्याचा प्रश्न राष्ट्रीय सभेस सोडविण्याची

बिलकूल जरूरी नाहीं, कारण अशा प्रकारचे प्रयत्न हे सर्वथैव अव्यवहार्य आहेत, ही राष्ट्रीय सभेच्या अनुयायी वर्गाची ठाम समजूत आहे.

राष्ट्रीय सभा ही राजकीय संस्था आहे व तिला आपलें राजकारण या विसाव्या शतकांत करावयाचें आहे. राष्ट्रीय सभेच्या राजकारणास जर शिष्ट राष्ट्रांकडून संमति मिळवावयाची असेल, तर शिष्ट राष्ट्रांनीं मान्य केलेल्या धर्मसंबंधीं धोरणाचाच राष्ट्रीय सभेनें अंगिकार केला पाहिजे, व त्याप्रमाणें तो केलाहि आहे. परधर्माविषयीं व परधर्मानुयायांविषयीं सहिष्णुता हें या धर्माचें मुख्य तत्त्व आहे. या तत्त्वामुळेंच प्रत्येक धर्मीयाला एक प्रकारचें धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त होतें. धर्म हा श्रद्धेचा विषय असल्यामुळें एकाच राष्ट्रांत नांदणाऱ्या भिन्न धर्मीयांनीं परस्परांच्या धर्मांविषयीं व धर्मश्रध्दे-विषयीं आदर बाळगणें हेंच त्यांच्या अभिवृद्धीच्या दृष्टीनें आवश्यक असतें. धर्मांतर करण्याचे प्रयत्न कोणत्याहि परिस्थितींत प्रचंड क्षोभ उत्पन्न करीत असतात. मग निर्बल व निःशेष आणि सर्वस्वी परसत्तेच्या अंकित झालेल्या जनतेंत जर भिन्न धर्मीयांविषयीं व परस्परांच्या धार्मिक व श्रध्देय तत्त्वांविषयीं सहानुभूतिपूर्वक पाहण्याच्या दृष्टीचा लोप झाला व स्वधर्मप्रसाराची इच्छा प्रबल होऊन प्रयत्न होऊं लागले, तर त्यांपासून केवढे अनर्थावह दुष्परिणाम होतील, हें सांगावयास नको. धार्मिक स्वातंत्र्याची खरी कल्पना हिंदु व मुसलमान जनतेंत प्रसृत होणें हें हिंदुमुसलमानांचें ऐक्य घडवून आणण्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेणाऱ्या व्यक्तींचें व संस्थांचें प्रधान कर्तव्य आहे. कोणत्याहि प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष आपत्तीच्या भ्रामक कल्पनेस भिऊन राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेस हिंदुमुसलमानांचें ऐक्य घडवून आणण्याचें काम करण्याची खरी जबाब-दारी वाटत असली, तर या प्रधान कर्तव्यापासून पराङ्मुख होतां यावयाचें नाहीं. हिंदुमुसलमानांचें ऐक्य हें दोन्ही वर्गांच्या सामान्य अभ्युदयाचें एक साधन असल्यामुळें धर्मांतराचे प्रयत्न अजिबात बंद झाले पाहिजेत. एकीकडे शपथपत्रिकेंत हिंदुमुसलमानऐक्याच्या कलमावर परमेश्वरास साक्ष ठेवून सही करावयाची व दुसरीकडे धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीस नवीन धर्माची दीक्षा देण्यास उदक किंवा उदी हातांत घ्यावयाची, या दोन गोष्टी

परस्परविरुद्ध आहेत. हिंदुमुसलमानांच्या ऐक्याची इमारत शाश्वत व टिकाऊ पायावर उभी करावयाची असली, तर धर्मांतराचे प्रयत्न परस्परांत अजिबात बंद कसे होतील व या उभयतांहून भिन्न असलेल्या अन्य धर्मीयांचे प्रयत्न-देखील निष्फळ कसे होतील, या गोष्टीची अनास्था करण्याची सोय नाहीं. राष्ट्रीय सभेला जें हिंदुमुसलमानांचें ऐक्य पाहिजे आहे, तें धार्मिक स्वातंत्र्याच्या कल्पनेस अनुकूल व वर निर्दिष्ट केलेल्या तऱ्हेचें पाहिजे आहे. हिंदूला हिंदु राहण्यास मुसलमानाकडून व्यत्यय येऊं नये, उलट त्यानें हिंदूच असण्यांत आपल्या राष्ट्राची खरी इभ्रत आहे, अशी कल्पना मुसलमानबंधूंच्या मनांत जागृत राहील; याउलट मुसलमानबंधूंना आपण अल्पसंख्यांक आहोंत, तरी आपल्या खऱ्या धर्माचरणास आसेतुहिमाचल कोठेंच हिंदुधर्मीयांकडून अडथळा होण्याचा संभव नाहीं, अशी खात्री वाटत राहील, तरच हिंदुमुसलमानांच्या ऐक्याचा प्रश्न हा आपल्या हातून सोडण्याच्या खऱ्या प्रयत्नास आपण लागलों, असें म्हणतां येईल. या बाबतींत हिंदु व मुसलमान या उभयतांच्याहि कल्पना फार कोत्या व चुकीच्या आहेत, आणि या कोत्या समजुतींपासून दोन्ही वर्गांचे पुढारी लोक सर्वस्वी मुक्त आहेत, असेंहि निश्चित म्हणतां येत नाहीं; किंबहुना हिंदु व मुसलमान यांचें ऐक्य घडवून आणण्याचे जे प्रयत्न हल्लीं सुरू आहेत, तिकडे पाहिलें असतां पुष्कळ पुढारी परप्रत्ययनेयबुद्धीनेंच या बाबतींत वागत आहेत, असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. पुष्कळ हिंदूंची अशी प्रामाणिक समजूत आहे कीं, गोरक्षण हें त्यांचें पवित्र कर्तव्य आहे. याच्या उलट अनेक धार्मिक व श्रद्धाळू मुसलमानबंधूंची तितकीच प्रामाणिक समजूत आहे.या प्रश्नाची तडजोड म्हणून मुसलमान बंधूंनीं गोवध सोडून द्यावा, अशी मागणी हिंदुसमाजाकडून केली जाते; आणि आम्ही गोवध बंद करण्याची खटपट करतों, असें प्रमुख मुसलमान पुढारी आश्वासन देतात इतकेंच नाहीं, तर बकरीदसारख्या प्रसंगीं गोवध न होण्याबद्दल त्यांच्याकडून आटोकाट प्रयत्न केला जातो. कांहीं लोक याहीपलीकडे जाऊन प्रत्यक्ष कायद्याच्या आश्रयानें गोवध बंद पाडण्याचे प्रयत्न करीत असल्याचें दृष्टीस पडतें. या सर्व लोकांच्या प्रामाणिक हेतूबद्दल आम्हांला अत्यंत

आदर आहे, व त्यांच्या प्रयत्नांस यश आलें, तर क्वचित् प्रसंगीं हिंदुमुसलमानांत जे कोठें कोठें या निमित्तानें दंगे होतात, ते होणार नाहींत, हें आम्हां सहि कबूल आहे. परंतु गोरक्षण हिंदूंना कितीहि प्रिय असलें, तरी मुसलमानांनीं कांहीं विशिष्ट धार्मिक प्रसंगीं गोवध करणें हें त्यांचें धार्मिक कृत्य आहे कीं नाहीं, याचा वाद घालून त्या बाबतींत कोणत्याहि प्रकारचा आग्रह धरणें हें धार्मिक स्वातंत्र्याच्या मूलभूत कल्पनेस सर्वस्वी विघातक आहे व या बाबतींत राजकीय कायद्याचा आश्रय घेणें हें तर आमच्या मतें राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचें लक्षण नसून गमविण्याचें दुश्चिन्ह आहे.

मशिदीसमोर वाद्यें वाजविण्याच्या बाबतींतदेखील हिंदूंकडून कित्येक वेळां आगळिक होते, तिचें कारणसुद्धां " धार्मिक स्वातंत्र्याची " कल्पना हिंदूंत जितकी पसरावयास पाहिजे, तितकी पसरविण्याचा मुळींच प्रयत्न होत नाहीं. कारण हिंदुमुसलमानांचें ऐक्य म्हणजे काय व त्याचें मूलभूत तत्त्व कोणतें, याचाच थांग अजून दोघांनाहि लागला नाहीं. मुसलमानांना जर गोवध करणें हें त्यांचें धार्मिक कर्तव्य आहे, असें वाटत असेल, तर त्यांनीं तो हिंदूंच्या डोळ्यांसमोर होणार नाहीं, एवढीच खबरदारी घ्यावी. यापेक्षां जास्त आग्रह धरण्याचा अधिकार कोणत्याहि हिंदूला—धार्मिक स्वातंत्र्याचा अभिमान बाळगणाऱ्या हिंदूला—नाहीं. याच्या उलट हिंदूला मुसलमान करणें हा धार्मिक स्वातंत्र्याच्या तत्त्वावर आघात आहे, अशी मुसलमान बंधूंची ठाम समजूत झाली पाहिजे.

गोवधासंबंधानें आम्ही जें वर विवेचन केलें आहे, तें पुष्कळ हिंदूंस कटु वाटेल, हें आम्ही जाणून आहोंत; परंतु राष्ट्रीय सभेला जें हिंदुमुसलमानांचें ऐक्य घडवून आणावयाचें आहे, त्याच्या मूलभूत तत्त्वांत धार्मिक स्वातंत्र्याचा समावेश होत असल्यामुळें हें 'हितवाक्य' 'मनोहारि' नसलें तरी स्पष्टपणें बोलणें हें आमचें पवित्र कर्तव्य आहे, असें आम्ही समजतों. दोन धर्मांतील अनेक धार्मिक रीतिरिवाज परस्परविरुद्ध असलेले दृष्टीस पडतील; परंतु एका धर्मांतील लोकांनीं दुसऱ्या धर्मांतील लोकांस त्यांचें धार्मिक कृत्य करण्याविरुद्ध आपल्या धार्मिक समजुतीचा उपयोग करणें म्हणजेच धार्मिक स्वातंत्र्याची आहुती देणें होय व या धार्मिक स्वातंत्र्याचा पाया, यथायोग्य

भरण्यांत आला नाहीं, तर किती अडचणी उपस्थित होतील, याचा नेम नाहीं. सोमयाग करणाऱ्या अध्वर्यूला मेध्य पशूचें आलंभन करण्याची मनाई करण्यास जैन लोक तयार होतात, हें देखील कधींकधीं घडत असतें. हा सर्व प्रकार धार्मिक स्वातंत्र्याच्या कल्पनेचा विकास हिंदूंत, मुसलमानांत किंवा जैनादि इतरधर्मीय वर्गात व्यवस्थित रीतीनें झाला नाहीं, त्यामुळेंच होत असतो. धार्मिक स्वातंत्र्य नसल्यास कोणताहि अल्पसंख्याक समाज बहुसंख्याक धर्मांकडून सहज चुरडला जाईल. हा चुरडण्याचा प्रकार चालू असतां ऐक्याची वृद्धि होईल, हा निव्वळ भ्रम आहे.

धार्मिक स्वातंत्र्य हा हिंदुमुसलमानांचें ऐक्य घडवून आणण्याच्या प्रयत्नांचा प्राण आहे व त्याची सिद्धी व्हावयासाठीं धर्मांतराचा उपक्रम अजिबात बंद व्हावयास पाहिजे व धार्मिक विधीनिमित्त करावे लागणारे आचार करण्यास धार्मिक समजुतीवर कोणत्याहि प्रकारचा आग्रह सामाजिक तडजोडीच्या रूपानें अगर कायद्याच्या आश्रयानें करणें योग्य नाहीं, इतका विचार या लेखांत केलेला आहे. या प्रश्नाचा अशाच दुसऱ्या एका व्यापक दृष्टीनें विचार करणें जरूर आहे. परंतु स्थलसंकोचास्तव त्या संबंधींचें विवेचन पुढील अंकावर टाकणें भाग आहे.

( कार्यबाहुल्यामुळें लोकनायक श्री. बापूजी अणे यांस या विषयावरील आपले विचार लिहून काढण्यास सवडच मिळाली नाहीं.—सं. )

---

# दिल्ली समेटाची मीमांसा*

दिल्ली येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या जादा अधिवेशनांत बरीच भवति न भवति होऊन अखेरीस कौन्सिलप्रवेशास सर्वस्वी अनुकूल असा ठराव प्रचंड बहुमतानें पास झाला. वऱ्हाडांतील राष्ट्रीय सभेच्या अनुयायांस या बातमीनें विशेष आनंद होईल. कारण १९२० सालीं कलकत्ता येथें महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या जादा अधिवेशनांत हिंदुस्थानांतील इतर सर्व प्रांतांपेक्षां वऱ्हाडांतील प्रतिनिधींनींच आपल्या प्रांतांतील बहुमत असहकारितेच्या ठरावांत ग्रथित केलेल्या कौन्सिलबहिष्काराच्या विशिष्ट पद्धतीस सर्वस्वी प्रतिकूल आहे, हें स्पष्टपणें राष्ट्राच्या निदर्शनास आणून दिलें होतें व तेव्हांपासून वरील बहिष्कार उठविण्याचा उद्योग अव्याहत चालविला होता. तीन वर्षेंपर्यंत चालविलेले प्रयत्न दिल्ली येथें यशस्वी झाले म्हणून त्यांना आनंद होणें अगदीं स्वाभाविक आहे व या आनंदानें प्रफुल्लित झालेलीं वऱ्हाडकर देशभक्तांचीं अंतःकरणें एकतानतेनें कायदेकौन्सिलें काबीज करण्याच्या उद्योगास लागतील, असा आम्हांस पूर्ण विश्वास आहे.

दिल्ली येथील कौन्सिलप्रवेशास संमति देणारा ठराव हा समेटाच्या स्वरूपाचा आहे, हें कोणाच्याहि लक्षांत येईल. परंतु हा समेट गया येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत न होतां दिल्ली येथें कां घडून आला, याचेंच पुष्कळ वाचकांस गूढ पडलें असेल. समेट झाला व तो कोणत्याहि कारणांनीं व केव्हांहि झाला, तरी आम्हांस पाहिजे होता व एवढ्याचसाठीं समेटाच्या कारणांची सविस्तर मीमांसा आज करीत बसण्याचें विशेष प्रयोजन आम्हांस दिसत नसलें, तरी कांहीं विशिष्ट गोष्टींचा उल्लेख करणें आवश्यक आहे. समेट होण्याचें मुख्य कारण म्हणजे राष्ट्रांतील बहुमत कौन्सिलप्रवेशास अनुकूल होत आहे, ही गोष्ट दिल्ली येथें असहयोगवाद्यांच्या पूर्णपणें

*"लोकमत" यवतमाळ ता. २१ सप्टेंबर १९२३

निदर्शनास येऊन चुकली. समेटास संमति द्यावी, नाहींतर पराजय पत्करावा, अशी आपत्ति या असहयोगी पुढाऱ्यांवर आल्यामुळेंच हा समेट शक्य झाला, हें प्रथमतः लक्षांत ठेविलें पाहिजे. देशबंधु दास, नेहरू किंवा केळकर यांच्यासारख्या पुढाऱ्यांची भीड पडून असहयोगवादी मंडळीनें समेटास संमति देऊन आपल्या मनाचें औदार्य प्रकट केल्यामुळें हा समेट झाला, असें नाहीं. उलट पुढाऱ्यांची मनसोक्त नालस्ती करूनदेखील लोकमत आपणांस अनुकूल होण्याऐवजीं दिवसेंदिवस प्रतिकूल होत चाललें आहे व कौन्सिलवादी पक्ष प्रबल होत चाललेला आहे, हें दिसून आल्यामुळें निरुपायास्तव व नाइलाज म्हणून या कट्टर पक्षांतील अध्वर्यूंनीं समेटास विरोध न करतां तदनुकूल किंवा तटस्थ वृत्ति धारण करण्याचें ठरविलें आहे. पराभवामुळें होणारी मानहानि टाळण्याकरितां समेटास संमति देऊन शिष्टपणा दाखवावा, हा विचार त्यांना मान्य झाला आहे.

समेट होण्याचें दुसरें कारण दिल्ली येथें असहयोगवाद्यांचें नेतृत्व मौलाना महंमदअल्ली यांचेकडे होतें, हें होय. म. गांधी यांना तुरुंगवास पत्करावा लागल्यापासून असहयोगांतील कट्टर पंथाचें अध्वर्युत्व दे. भ. राजगोपालाचार्य यांजकडे गेलें होतें. राजगोपालाचार्य व महंमदअल्ली या दोन व्यक्तींच्या स्वभावांत, अधिकारांत व कर्तबगारींत फार अंतर आहे. म. गांधी यांनीं असहयोगाचा विशिष्ट कार्यक्रम ज्यांच्या संमतीनें प्रथमतः आंखला, व ज्यांच्या सहाय्यानें देशभर चळवळीचा प्रसार केला, ते गृहस्थ मौ. महंमदअल्ली व शौकतअल्ली हे होत. त्याचप्रमाणें ज्या विशिष्ट कार्याकरितां त्या कार्यक्रमाची उभारणी करण्यांत आली, तें कार्य म्हणजे खिलाफतीवरील आपत्ति. अशी स्थिति असल्यामुळें कार्यक्रमांत फरक करणें योग्य होईल किंवा नाहीं, हें सांगण्याचा अधिकार मौ. महंमदअल्ली यांस जितका पोहोंचतो, तितका राजगोपालाचार्य किंवा त्यांचे साथीदार यांना पोहोंचत नव्हता, हें सहाजिक आहे; इतकेंच नाहीं, तर वरील विशिष्ट कार्याचें म्हणजे खिलाफतीसंबंधीं जें अवशिष्ट स्वरूप आज उरलेलें आहे, त्याच्या निराकरणार्थ कराव्या लागणाऱ्या भावी प्रयत्नांची जेवढी स्पष्ट कल्पना मौ. महंमदअल्ली यांना आहे, तेवढी राजगोपालाचार्यप्रभृति मंडळींना असणें

शक्य नाहीं. कौन्सिलबहिष्काराच्या विशिष्ट मार्गानें खिलाफत व पंजाब या दोन संकटांपासून मुक्त होण्यास कितपत सहाय्य झालें, याचा विचार करण्याची जबाबदारी राजगोपालाचार्यांपेक्षां मौ. महमदअल्ली यांजवरच अधिक आहे व यापुढें त्यासंबंधीं कांहीं प्रयत्न करणें अवश्य असल्यास राष्ट्रीय सभेनें देशांत कोणती परिस्थिति निर्माण केली पाहिजे, हें ठरविण्याची जोखीमहि त्यांच्यावरच अधिक आहे. ज्या गोष्टीकडे व परिस्थितीकडे मतांच्या अभिनिवेशानें अगर फाजील अभिमानानें अथवा गुरुनिष्ठेच्या अतिरेकानें राजगोपालाचार्यप्रभृति मंडळीला कानाडोळा करणें एकपरी क्षम्य होतें, तिजवरच आपल्या भावी कार्यक्रमाची उभारणी करण्याचें आणि राष्ट्रीय सभेची बिनसलेली घडी पुन्हा बसविण्याचें काम मौ. महमदअल्ली यांना टाळतां येणें शक्य नव्हतें. राजगोपालाचार्यप्रभृतींपुढें असहयोगपरिपालन हा प्रश्न प्रामुख्यानें होता. मौ. महंमद अल्ली यांजपुढें राष्ट्रकार्यपरिपालन हा प्रश्न प्रामुख्यानें होता. राजगोपालाचार्य यांना म. गांधींचें अनुयायित्व सिद्ध करण्याची आवश्यकता विशेष वाटत होती, तर मौ. महंमदअल्ली यांना बदललेल्या परिस्थितींत पंजाब व खिलाफत-आपत्तींचें निवारण व स्वराज्यप्राप्तीचें साधन म्हणून म. गांधींच्याबरोबर व त्यांच्या नेतृत्वाखालीं आपण सुरू केलेल्या चळवळीचें सामर्थ्य वृद्धिंगत कसें करतां येईल, हा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी पत्करणें भाग होतें. पण ही जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली म्हणूनच दे. भ. लाला लजपतराय, दे. भ. दास किंवा पं. मोतीलाल नेहरू यांच्या मतांचा त्यांना अधिक जबाबदारीनें विचार करणें भाग होतें. असहयोगाची चळवळ देशभर पसरविण्यांत ज्या विभूतींचा अलोट स्वार्थत्याग व अविश्रांत श्रम कारणीभूत झाले, त्या सेनानायकांचा अनुभविक सल्ला राजगोपालाचार्यप्रभृति पठिक पायदळवाल्यांना जरी पायाखालीं तुडविण्याच्या किंमतीची वाटत असली, तरी ती मौ. महंमदअल्लीसारख्या हुषार व चतुर सेनापतीस विचारांत घेण्यासारखीच वाटणें अपरिहार्य होतें. इष्टकार्यसिद्धि होण्याकरितां निराळी मसलत करणें भाग आहे व मार्‍याची जागा बदलणें जरूर आहे, असें सर्व सेनापति सांगत असतां केवळ अनुभवशून्य सैनि-

कांच्या बहुमतावर पूर्वीच्याच मार्गानें युद्ध चालू ठेवणारा सेनापति शूर ठरला तरी शहाणा ठरणार नाहीं किंवा यशस्वी होणार नाहीं, हें मौ. महंमदअल्ली यांना जितकें स्पष्टपणें कळण्यासारखें होतें, तितक्या स्पष्टपणें राजगोपालाचार्यप्रभृतींस कळणें शक्य नव्हतें. युद्धास सिद्ध असलेला प्रत्येक सैनिक हा जरी त्याच्या देशभक्तीस्तव व त्यागबुद्धीस्तव सर्वांच्या प्रशंसेस पात्र असला, तरी युद्धाचे व्यूह रचण्यांत त्याचा सल्ला फारसा उपयोगी पडत नसतो. त्याकरितां निरनिराळ्या प्रसंगीं प्रतिपक्षीयांवर हल्ले चढविले आहेत व बऱ्याच अंशीं यशस्वी करून दाखविले आहेत, असल्या अनुभविक युद्धविशारदांचीच सल्ला व सहाय्य मिळविणें जरूर आहे. मौ. महंमदअल्ली यांनीं याच दृष्टीनें प्रचलित परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करून कौन्सिलप्रवेशास अनुकूल असा समेट घडवून आणण्याकरितां आपली शिकस्त केली व परमेश्वराच्या कृपेनें त्यांत त्यांना यश आलें.

समेट होण्याचें तिसरें कारण म्हणजे नागपूर प्रांतांत सुरू केलेल्या सत्याग्रह-मोहिमेचा शेवट यशस्वी होण्यांत मुत्सद्देगिरीचा व तडजोडवृत्तीचा प्रत्यक्ष परिणाम असहयोगी अध्वर्यूंच्या निदर्शनास थोड्याच दिवसांपूर्वी येऊन चुकला, हें होय. सामान्य सैनिकांच्या त्यागबुद्धीस युक्तीचें सहाय्य दिल्यावाचून असल्या सत्याग्रही मोहीमेचा शेवट यशस्वी होणें दुर्धर आहे, ही गोष्ट श्री. वल्लभभाईप्रभृतींच्या मनांस आंतून तरी पटली असलीच पाहिजे, अशी आमची मनोदेवता आम्हांस सांगत आहे. युक्तीच्या व मुत्सद्देगिरीच्या अभावीं मुळशी संग्रामाची होत असलेली दुर्दशा आणि युक्ति व तडजोड या जोडगोळीनें नागपूर सत्याग्रहास आलेलें यश यांतील तारतम्यभाव असहयोगी अध्वर्यूंस दिसून न येण्याइतकें बुद्धिमांद्य त्यांच्यांत आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. तेव्हां वरील अनुभवामुळें पुढील चळवळीची जबाबदारी आपणांवर घ्यावयास सिद्ध असलेला एखादा खंदा पुढारी पुढें आल्याबरोबर त्याच्या शिरावर सर्व ओझें लादून त्याच्या पाठोपाठ व पावलांवर पावलें ठेवून चालण्याची कबुली देण्याची मनाची तयारी राजगोपालपक्षांतील प्रमुख व कर्त्या पुढाऱ्यांची होऊन गेली होती; व त्यामुळेंच बाबू राजेंद्रप्रसाद, श्री. वल्लभभाई वगैरेंनीं मौ. महमदअल्ली यांचें धोरण पसंत

नसूनसुद्धां आपण त्यांच्या मागें जाण्यास सिद्ध असल्याचें जाहीर वचन दिलें.

वरील कारणत्रयीबरोबरच आणखी एक महत्त्वाचें कारण म्हणजे दास-प्रभृति स्वराज्यपक्षीय पुढाऱ्यांच्या अंगीं वसत असलेली राष्ट्रीय ऐक्याच्या महतीची आवश्यकता. दिल्ली येथें आम्हांस पाहिजे तसा ठराव करून घेण्याचें सामर्थ्य अंगांत असूनहि प्रतिपक्षीयांचा पाडाव करून गया येथील अपमानाचा सूड उगवून घ्यावा, ही वृत्ति दासप्रभृतीयांच्या मनास शिवलीदेखील नाहीं. जर मनाचें औदार्य दाखविण्याची पाळी दिल्ली येथें कोणावर आली असेल, तरी ती असहयोगांतील कट्टर पंथ किंवा मौ. महंमदअल्ली यांजवर नसून स्वराज्यपक्षीय पुढाऱ्यांवरच होती, म्हणूनच विषयनियामक कमेटींत व इतरत्र स्वराज्यपक्षीय मंडळीवर अत्यंत दुःसह टीकेचा भडिमार निरनिराळ्या बाजूनीं होत असतांनादेखील आपल्या प्रतिपक्षीयांचीं मनें दुखविण्यासारखा एकहि उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडला नाहीं, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. राष्ट्रकार्यांत मानापमानाचें गांठोडें गुंडाळून ठेविलें पाहिजे, ही लोकमान्यांची शिकवण स्वराज्यपक्षीयांच्या अंतःकरणांत पूर्णपणें पटली असल्यामुळेंच गेल्या तीन वर्षांत अनेक दुरुत्तरें व उपहास त्यांना निमूटपणें सहन करतां आले व अखेरीस कौन्सिलप्रवेशास अनुकूल असा ठराव प्रतिपक्षीयांकडून मंजूर करून घेऊन लोकमान्यांच्या मध्यंतरीं स्तिमित झालेल्या कार्यरथाच्या चक्रास गतिमान करण्याचें सद्भाग्य त्यांना प्राप्त करून घेतां आलें, ही गोष्ट वाचकांच्या मनावर विशेष रीतीनें बिंबवावी म्हणून सांगूं इच्छितों.

या अनेक कारणांमुळें गया येथें त्याज्य ठरलेला समेट दिल्ली येथें मान्य झाला. आतां आमची सर्व राष्ट्रभक्तांस अशी अंतःकरणपूर्वक आग्रहाची सूचना आहे कीं, त्यांनीं पुढील तीन महिने राष्ट्रीय सभेंतील स्वराज्यपक्षीय उमेदवार येत्या निवडणुकींत पूर्णपणें यशस्वी होतील, या एकाच प्रयत्नास लागावें आणि देशांतील सर्व वर्गांचें प्रतिनिधीत्व करण्याचा अधिकार फक्त राष्ट्रीय सभेच्या अनुयायांसच आहे, इतर पक्षीय लोकांस नाहीं, ही गोष्ट जगाच्या निदर्शनास आणून द्यावी. दिल्लीच्या ठरावानंतर स्वराज्यपक्षाचे उमेदवार पराजित होऊन लिबरल, नेमस्त, बिझंटपक्षीय किंवा ' इतरेजन '

यांची कौन्सिलांत भरती झाली, तर राष्ट्र कौन्सिलप्रवेशास अनुकूल असलें तरी राष्ट्रीय सभा ही आपली एकच खरी प्रातिनिधिक संस्था आहे, हें मानण्यास तयार नाहीं, असें दिसून येईल; व यापेक्षां राष्ट्रीय सभेची अधिक मानखंडना दुसऱ्या कोणत्याहि रीतीनें होणें शक्य नाहीं. राष्ट्रीयसभेच्या अनुयायांकडूनच कौन्सिलें पूर्णपणें काबीज करून दाखविणें हें आतां राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक अनुयायाचें पवित्र कर्तव्य आहे व या कर्तव्यास आमच्या वऱ्हाडांतील राष्ट्रीय सभेचे सर्व अनुयायी पूर्णपणें जागतील व सर्व मतभेद विसरून नवीन निवडणुकींत यश संपादन करतील, असा आम्हांस पूर्ण विश्वास आहे.

---

## लोकमान्यांचा लोकसंग्रह*

कै. लोकमान्यांचें चरित्र एका शब्दांत सांगावयाचें म्हटल्यास " लोकसंग्रह " या एकाच शब्दांत सांगतां येईल. लोकसंग्रह म्हणजे काय व तो कां करावा, याचा त्यांनीं गीतारहस्यांत फार सूक्ष्म रीतीनें विचार केलेला आहे. या विवेचनांतच त्यांच्या आयुष्यक्रमांतील प्रमुख कार्याच्या आणि उद्योगाच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांचें प्रतिबिंब स्पष्टपणें दृष्टीस पडतें, म्हणून लो. टिळकांच्या चरित्राचा तात्त्विक दृष्ट्या विचार करतांना लोकसंग्रहाच्या कल्पनेची त्यांनीं केलेली मीमांसा अत्यंत महत्त्वाची आहे.

प्राकृत लोकांची अशी समजूत आहे कीं," लोकसंग्रह " म्हणजे लोकांना वश करून त्यांचा घोळका आपल्या सभोंवतीं गोळा करणें. लोक आणि संग्रह या दोन शब्दांचा जो रूढ अर्थ आहे, तो घेऊन वरील प्रकारचा अर्थ करण्यांत येतो, हें उघड आहे. परंतु गीतेंत भगवंतांनीं "लोकसंग्रह" या शब्दाचा जेथें जेथें उपयोग केला आहे, तेथें तेथें तो केवळ लौकिक अर्थानें केला नसून कांहीं विशिष्ट उदात्त कल्पना व्यक्त करण्याकरितां केला आहे, हें थोड्या विचाराअंतीं कोणासहि कळून येईल. अर्जुनाचा व्यामोह दूर करण्याकरितां भगवंतांनीं जीं अनेक प्रमेयें प्रतिपादन केलीं आहेत, त्यांतच "लोकसंग्रहमेवापि संपश्य-

---

* " लोकमत " यवतमाळ १ आगष्ट १९२४

न्कर्तुमर्हसि " या विधानाचा समावेश केलेला आहे. अर्जुनाचा व्यामोह व तज्जन्य शस्त्रसंन्यास यांचें निराकरण व्हावें, या हेतूनें भगवंतांनीं शास्त्रीय व ऐतिहासिक परंपरा अर्जुनासमोर व्यवस्थित रीतीनें मांडिली आणि नंतर लोकसंग्रहाच्या दृष्टीनेंसुद्धां कर्म करणें हेंच तुला उचित आहे, असें ठासून सांगितलें. यांतील रहस्य लक्षांत येण्यासाठीं अर्जुनाच्या व्यामोहाचें कारण नीट लक्षांत घेतलें पाहिजे. आपणासमोर युद्धार्थ उभे असलेल्या योद्ध्यांत पितृतुल्य पितामह, आचार्य, मातुल, पुत्र, पौत्र व सखे आहेत, हें पाहून अर्जुनाचें मन खेदयुक्त झालें व प्रथमत: त्याच्या अंत:करणांत कांहीं प्राकृत किंवा सामान्य विचार उत्पन्न झाले. राज्यादिक वैभव संपादन करून ज्यांना आनंदित करावयाचें, त्यांना मारून राज्य प्राप्त करून घेण्यांत कोणता पुरुषार्थ आहे ! त्यांच्या मृत्युजन्य दुःखाचें विस्मरण कधींहि होणें शक्य नसल्यामुळें राज्यादि वैभवाचा आम्हांला आनंदानें उपभोग घेतांच येणार नाहीं, अशा प्रकारच्या विचारांचें काहूर अर्जुनाच्या अंतःकरणांत उभें राहिलें. परंतु ज्या विचारांनीं त्याचें मन युद्धापासून परावृत्त झालें, ते विचार कुलक्षय व तज्जन्य भवितव्यता यासंबंधानें आहेत. युद्धामुळें कुलक्षय, कुलधर्मनाश, अधर्माभिभव, स्त्रियांचा दुराचार, वर्णसंकर, पितरांची अधोगति, शाश्वत जातिधर्माचा उच्छेद व अखेरीस नरकवास अशी एकांतून एक प्रकट होणारी संकटपरंपरा अर्जुनाच्या समोर उभी राहिली व त्यामुळेंच युद्धांतून परावृत्त व्हावें, असें त्याला वाटूं लागलें.

अर्जुन तोंडानें जरी ब्रह्मज्ञानाच्या व भूतदयेच्या गोष्टी बोलत असला, तरी तो अत्यंत भीतिग्रस्त झालेला आहे, ही गोष्ट श्रीकृष्णास स्पष्टपणें दिसत होती. युद्ध न करणें किंवा युद्धापासून परावृत्त होणें हाच उत्तम पक्ष असा सिद्धांत विचारपूर्वक ठरवून अर्जुनानें धनुष्य खालीं ठेवलें नसून आत्महत्त्येच्या, कुलक्षयाच्या, पूर्वजाधोगतीच्या आणि म्हणूनच भयानक वर्णसंकराच्या आणि जातिधर्मलोपाच्या अस्पष्ट कल्पनांचें भीषण चित्र डोळ्यासमोर एकाएकीं उभें राहिल्यामुळें भयभीत होऊन त्याच्या अंगांत थरकांप भरलेला आहे व हातांतील शस्त्र गळून पडलें आहे, ही गोष्ट भगवंतांच्या दृष्टीस पडली होती. अर्जुनाची बुद्धि विचारारूढ नसून विकारवश झालेली आहे, व एवढ्याच

साठीं भगवंतांनीं त्याच्या मनःस्थितीला उद्देशून कश्मल, क्लैब्य व हृदयदौर्बल्य या शब्दांची योजना केली आहे; व असलें हृदयदौर्बल्य अनार्यजुष्ट, अस्वर्ग्य व अकीर्तिकर आहे, असें प्रथमतःच सांगून अर्जुनाच्या शुष्क पांडित्याचा उपहासहि केला आहे. अर्जुना ! तुझ्या अवसानघातकी वृत्तीमुळें तूं अडाणी ठरशील, नरकाचा धनी होशील व शिष्ट लोकांत तुझी मानखंडणा होईल, हा इशारा भगवंतांनीं त्याला प्रथम दिला व त्याबरोबर अर्जुनाच्या अंतःकरणावरील कश्मलाचें दाट पटल थोडेंसें वितळावयास लागलें. भगवंतांनीं प्रथमतः वर सांगितल्याप्रमाणें किंचित् निर्भत्सना करून ‘ उत्तिष्ठ परंतप ’ असें म्हटल्याबरोबर अर्जुनाच्या ठिकाणीं ‘ स्वभावाची ’ किंचित् जाणीव उत्पन्न झाली, इतकेंच नव्हे, तर आपली प्रकृतावस्था ही आपल्या स्वभावाला सुसंगत नाहीं,तथापि स्वभावानुसार वर्तन आपल्या हातून दुर्घट आहे,कारण कार्पण्य दोषाच्या दडपणाखालीं आपली नैसर्गिक वृत्ति चूर होत आहे व आपली बुद्धि धर्मविचार करण्यास सर्वस्वी दुर्बल झालेली आहे हें त्याच्या तावडतोब निदर्शनास आलें. “ कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ” ही अर्जुनाची द्वितीयाध्यायांतील उक्ति आणि विषादाध्यायांतील शस्त्रत्यागांत दिग्दर्शित होणारी वृत्ति यांतील भेद कोणासहि कळून येण्यासारखा आहे.

अर्जुनास “ कर्मयोग, यज्ञचक्र व लोकसंग्रह ” या तीन तत्त्वांचें विशद विवेचन करून त्याच्या अंतःकरणावरील मोहपटलाचें निरसन भगवंतांनीं केलें आणि त्याची क्षात्रवृत्ति जागृत करून भगवंतांनीं भारतीय युद्धांत कौरवांचा निःपात केला.

प्रश्न हा आहे कीं, अर्जुन स्वभावतः भित्रा नसून एकाएकीं त्याचें धैर्य कां गळालें आणि अवसानघातक बुद्धि त्याच्या ठिकाणीं कां उत्पन्न झाली ? अर्जुनाचें धैर्य आणि पराक्रम सर्वविश्रुत होता. पूर्वीं अनेक प्रसंगीं त्याचा अनुभव व प्रत्यय सर्वांस आला होता. इंद्रादिक देवतांशींदेखील युद्ध करण्याच्या प्रसंगीं त्याच्या अंतःकरणास भीतीनें स्पर्श केला नव्हता. त्याचप्रमाणें क्षात्रकर्मांतील त्याचें नैपुण्य उत्तरगोग्रहणासारख्या प्रसंगीं अपूर्व उत्कटतेनें प्रगट झालें होतें. प्रत्यक्ष भारतीय युद्धांत ज्या आप्तेष्टांच्या

हत्येच्या भयानें त्याचें अंतःकरण विव्हल झालें होतें, त्याच आप्तेष्टांबरोबर अर्जुनाला विराटाच्या गाईंचीं खिल्लारें सोडविण्याकरितां युद्ध करावें लागलें. परंतु त्यावेळीं निर्भय अंतःकरणानें युद्धास सज्ज होऊन भीष्म द्रोणादिकांवर त्यानें शस्त्रास्त्रांचा भडिमार केला व यश संपादन केलें. त्याचप्रमाणें मनःसंयमासारख्या कठीण व्रताचें आचरण करण्यांत देखील अर्जुनानें आपली पराकाष्ठा केलेली आहे, असें महाभारताच्या वाचकांस दिसून येईल. उर्वशीसारख्या अप्सरेशीं गांठ पडली असतां त्यानें दाखविलेलें मनोधैर्य, किंवा अतुल क्षात्रतेजानें संपन्न असतां बृहन्नडेच्या स्थितींत विराटाच्या घरीं बारा महिने काढण्यांत प्रगट झालेली त्याची निश्चयी वृत्ति आणि प्रत्यक्ष आपल्या धर्मपत्नीची असह्हृदय विटंबना चाललेली आहे, हें उघड्या डोळ्यांनीं पाहात असतां स्व–स्वरूप प्रगट करण्याचा मोह आवरून आपत्ति सहन करण्यांत इष्टोत्पत्तीस येत असलेली त्याची सहनशीलता, कीचकाच्या बाबतींत विराटाकडून अत्यन्त पक्षपाती आणि अपमानास्पद वर्तन झालें, ही जाणीव असूनदेखील त्याच्या सेवेंत जितका काळ काढावयाचा करार करण्यांत आला, तो पुरा करण्यासाठीं गतगोष्टी विसरून त्याच्यावर आलेल्या संकटाचें निरसन करण्याकरितां व्यक्त झालेली कर्तव्यदक्ष उदारमनस्कता व युद्धक्षेत्रावर अकालीं प्रगट होण्यांत जें संकट होतें त्यासंबधाच्या औदासिन्यावरून सहज कळून येण्यासारखी निस्वार्थबुद्धि या अर्जुनाच्या उदात्त गुणांस दुसरीकडे तोड मिळणें कठीण आहे. उदार चरित्र, निश्चल व अभंग धैर्य, अतुल पराक्रम, अवर्णनीय सहिष्णुता आणि अपरिमित मनःसंयम हे गुण अर्जुनाच्या ठिकाणीं मूर्तिमंत वसत होते, याबद्दल कोणासहि शंका घेतां येणार नाहीं.

या गुणांबरोबरच अर्जुनाच्या जवळ जें विश्वासाचें अथवा श्रध्देचें बळ होतें, त्याची सर दुसऱ्या कोणत्याहि मानवी व्यक्तीस येणें शक्य नाहीं. परमेश्वर माझा पाठीराखा आहे, मी करतों तें भगवंतास पसंत आहे–नव्हे–माझी लाज प्रभूस आहे, तो माझें काज तडीस नेईल आणि भक्ताचें चोज पुरवील, हें अर्जुनास जितक्या विश्वासानें म्हणतां येत होतें, तितकें जगांतील कोणत्याहि व्यक्तीस म्हणतां येणें केव्हांहि शक्य नाहीं, असें आम्हांस वाटतें.

यानंतर इतरांना दुर्लभ असा आणखीहि एक विशेष गुण अर्जुनानें संपादन केला होता. अर्जुनाची भगवद्भक्ति, युद्धकौशल्य, लीनता आणि नीतिमत्ता यांमुळें त्याच्या प्रतिपक्षांतील भीष्म, द्रोण, कृपाचार्य यांच्यासारख्यांचीं मनें आदरानें व प्रेमानें उचंबळलेलीं होतीं. जेथें अर्जुन तेथें जय, अशी कौरवपक्षांतील प्रतापी सेनापति व मुत्सद्दी यांची दृढ समजूत होती. असें असतां अर्जुनास आयत्या वेळीं मोह कां उत्पन्न व्हावा, ऐनप्रसंगीं त्याला अवसानघातकी बुद्धि कां सुचावी आणि युद्धास तोंड लागण्याकरितां शस्त्रसंपात करण्याऐवजीं शस्त्रसंन्यास करण्याची प्रवृत्ति कां निर्माण व्हावी, हें एक मोठें गूढ आहे. शस्त्रसंन्यास करण्याचा विचार ज्या कारणांमुळें उत्पन्न झाला, त्यांत भूतदयेचीच भावना प्राधान्यानें त्याच्या अंतःकरणांत प्रादुर्भूत झाली होती, असें सकृद्दर्शनीं दिसून येतें. परंतु त्या भावनेचें स्वरूप किती एकांगी आहे, हा विचार त्यावेळीं अर्जुनास करतां येण्याइतकें स्थैर्य त्याच्या ठिकाणीं उरलेलें दिसत नाहीं. भावना उत्पन्न झाल्याबरोबर त्याच्या डोळ्यांत अश्रु येतात, अंगास कंप सुटतो व हातांतून शस्त्र खालीं गळून पडतें व जर प्रत्यक्ष भगवंताचें दुर्लभ सहाय्य त्यावेळीं त्याला लाभलें नसतें, तर युद्धास सिद्ध झालेल्या सैनिकांस शिबिरांत परत जाण्याचा हुकूमदेखील ताबडतोब सुटला असता व त्यानंतर काय प्रकार झाला असता, याची वाचकांस सहज कल्पना करतां येईल.

प्रतिपक्षीय सैन्यांतील आप्तेष्टांच्या हत्येच्या विचारांनीं भांबावून गेलेल्या अर्जुनाचें लक्ष जर स्वपक्षीय सैनिकांकडे त्याच भूतदयेच्या विचारांनीं प्रेरित होऊन गेलें असतें, तर शस्त्रसंन्यासाची आपली कृति किती अविचाराची व अनर्थक आहे, हें भगवंतांच्या मुखांतून तत्त्वज्ञानाची गंगा निघून त्याजवर येऊन पडण्यापूर्वींच त्याला कळून चुकलें असतें; व कदाचित् भगवद्गीता ऐकण्याचा प्रसंग निर्माण होण्यापूर्वींच त्यानें शत्रुसैन्यावर शस्त्रसंपात केला असता. परंतु केवळ भावनेच्या आश्रयानें राहणारे सद्गुण भगवद्भक्तीची बळकट जोड मिळाली असतांदेखील मनुष्यास–नव्हे, विशेषतः स्वकीयास–आयत्या वेळीं निरर्थक कसें तोंडघशी पाडूं शकतात, याचें मूर्तिमंत चित्र आर्यमानवजातीसमोर असावयास पाहिजे

म्हणूनच कीं काय, अर्जुनाचें मन स्वकीय पक्ष व स्वकार्य यांवर स्थित न रहातां आपल्या कृतीमुळें परकीयांवर येणारें संकट व त्यामुळें जगतांत होणारी भविष्यकालीन वाताहात या भावनेनें पूर्णपणें ग्रासलें गेलें असावें, असें वाटतें.

पांडवांच्या पक्षास सात अक्षौहिणी सैन्य येऊन मिळालें, तें पांडवांचा सत्पक्ष आहे, ही कल्पना सर्व भरतखंडभर पसरविण्यांत आली व मान्य झाली म्हणून, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल. वनवास व अज्ञातवास यांतून ते नुक्तेच परत आले होते; त्यांच्या जवळ त्यांचे पांच बंधू व त्यांचे पुत्र यांपेक्षां अधिक मनुष्यबळ नव्हतें. आपला सत्पक्ष आहे, ही गोष्ट वनवासांत असतांना ऋष्यादिकांच्या निदर्शनास त्यांनीं आणून दिली. म्हणूनच त्या तपस्वी लोकांच्या प्रयत्नामुळें व भगवान् श्रीकृष्णाच्या आटोकाट प्रयत्नांमुळें त्यांच्या पक्षास सात अक्षौहिणी सैन्य येऊन मिळालें व केवळ पांडवपक्ष यशस्वी करावा, या एका हेतूनें आपल्या सर्वस्वावर लाथ मारून ते दुर्योधनासारख्या कपटी व क्रूर सार्वभौमाशीं शत्रुत्व करण्यास सिद्ध होऊन रणांगणावर येऊन युद्धास उभे ठाकले होते. दुर्योधनाच्या विनंतीचा त्यांनीं उघड अव्हेर केला होता. श्रीकृष्णभगवानाला आपण शिष्टाईस पाठवून त्याचा अपमान दुर्योधनादिकांकडून झाला होता. असें असतां केवळ सत्पक्षास सहाय्य करावें, या एका दिव्य उद्देशासाठीं आपल्या सैन्यास आपल्या वडील बंधूच्या नेतृत्वाखालीं त्याच्या इच्छेनुसार प्रतिपक्षीयांस मिळण्यास मोकळीक देऊन स्वतः भगावान् श्रीकृष्ण अर्जुनाचें सारथ्य कर्म करावयास तयार झाले होते. दुर्योधनाचे जिवलग स्नेही व परम आप्त आपले पूर्वापार संबंध विसरून अर्जुनाच्या पक्षास येऊन मिळाले होते. याप्रमाणें त्या सर्वांना आपल्या व्यूहांत ठिकठिकाणीं युद्ध करण्याकरितां उभे केल्यानंतर व दुर्योधन आणि त्याचे पक्षपाती यांच्या प्रत्यक्ष दृष्टीस त्यांचें शत्रुत्व आणून दिल्यानंतर एखाद्या भावनेच्या लहरीबरोबर सर्व व्यूह ढांसळून पाडण्यांत आपण या सर्वांवर केवढें संकट ओढवून आणीत आहोंत, हा विचार अर्जुनाच्या मनांत कां आला नाहीं, याचें सर्वांना खरोखरच आश्चर्य वाटेल. दुर्योधनाचा क्रूर व कपटी स्वभाव याचा पूर्ण परिचय असतां युद्ध तहकूब केल्यास त्यापासून आपल्या

स्वकीय पक्षावर कोणती आपत्ति येईल, हें अर्जुनास कां कळूं नये ? अर्जुनासारखा वीर रणबहादूर निःशस्त्र झाल्यानंतर बाकीच्या तत्पक्षीय सैनिकांची तो धूळधाण केल्यावांचून राहणार नाहीं व खास पांडवांचा निःपात करून निःपांडवी पृथ्वीचें आधिपत्य प्राप्त केल्याशिवाय तो स्वस्थ बसावयाचा नाहीं, हा साधा विचार अर्जुनास सुचला नाहीं. एवढी गोष्ट–खास दुर्योधन व त्याचे कपटी साथीदार यांनीं याप्रमाणें धुमाकूळ केल्यानंतर कुलक्षयादिक संकट व तज्जन्य वर्णसंकर आणि कुलधर्म व जातिधर्म यांचा उच्छेद हा आपोआप होईल–ही गोष्ट देखील त्याच्या डोळ्यांसमोर आली नाहीं. भावनाप्राधान्यामुळें सद्गुण स्वकीयांच्या नाशाला कसे कारणीभूत होतात, याचें हें भीषण चित्र वाचकांनीं आपल्या डोळ्यासमोर आणिल्यास भगवंतांनीं कर्मयोग, यज्ञचक्र व लोकसंग्रह या तीन कार्यप्रवण तत्त्वांचा अर्जुनास कां उपदेश केला, हें कळून येईल व त्यांतील तत्त्वांचें महत्त्व काय आहे, हेंहि त्यांना समजून येईल.

## लेखांक २ रा*

अर्जुन हा वैराग्यादि अनेक अप्रतिम नैतिक गुणांचा निधि होता, युद्धकलाप्रवीण होता, धैर्याचा मेरू होता, औदार्याचा मांदार होता, शत्रुपक्षाकडील श्रेष्ठ विभूतींना सर्वतोपरी आदरणीय होता आणि भगवंताचा सखा होता. परंतु हे सर्व गुण भारतीय संस्कृतींतील एका अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीं सहाय्यक होऊन एक आकस्मिक आपत्ति कशी उत्पन्न झाली, याचें मागील लेखांत थोडेसें दिग्दर्शन केलें आहे. वैयक्तिक कार्यांत अर्जुनाच्या गुणांचा उत्कर्ष पराकाष्ठेस पोहोंचलेला सर्व भरतखंडांतील लोकांनीं अनेक वेळां अवलोकन केला होता व त्यामुळें अर्जुनाच्या मनावरहि वैयक्तिक कर्तृत्वाचें दाट आवरण चढलेलें होतें. भारतीय युद्धांत सेनापति म्हणून सैन्याची पाहाणी करीत असतांना आपण भाऊबंदकीचें खाजगी भांडण विकोपास नेऊन आत्महत्त्येस प्रवृत्त झालों, हाच विचार त्याच्या मनांत प्रामुख्यानें आला व त्यामुळेंच कुलक्षयापर्यंत असला तंटा नेणें नीतिदृष्टया गर्ह्य आहे,

* "लोकमत" ता. ८ आगष्ट १९२४

या विचारसरणीकडे त्याच्या मनानें धांव घेतली आणि वैयक्तिक वैराग्यानें ही आपत्ति टाळण्याचा निश्चय करून त्यानें शस्त्र खालीं ठेविलें, हें उघड आहे. इतकेंच नाहीं, तर श्रीकृष्णाकडून आपणाला हरप्रसंगीं जें परोपरीनें सहाय्य होत होतें, तें आपल्या भक्तीमुळें व प्रेमामुळें होत आहे, अशीच त्याच्या मनाची समजूत होती. त्याच्या वृत्तींत वैयक्तिक पुरुषार्थाची कल्पना पूर्णपणें बिंबलेली होती व जरी त्याच्या ठिकाणीं असलेल्या गुणसमुच्चयामुळें अखिल भारतवर्ष त्याजकडे पूज्यतेच्या दृष्टीनें पाहात होतें व सर्व भरतवर्षाचें नेतृत्व आपण करूं, अशा भावनेनें तो प्रेरित झाला होता, तरी त्याच्या अंतःकरणावरील संस्कार वैयक्तिक पुरुषार्थाच्याच कल्पनेनें युक्त असल्यामुळें सामुदायिक, सांस्कृतिक अथवा विराट स्वरूपाचें त्याला मुळींच आकलन झालें नव्हतें. जेथपर्यंत या विराट स्वरूपाचें ज्ञान त्यास होणार नाहीं, तेथपर्यंत भारतीय युद्धांत आपली भूमिका काय आहे, याचें यथार्थ ज्ञानहि अर्जुनास होणें शक्य नाहीं; व या ज्ञानाच्या अभावीं हा युद्धरूपी यज्ञ सिद्धीस न जातां प्रत्यहीं पर्वतप्राय प्रमादांच्या चढणउतरणीवर खालीं वर खेपा घालण्यांत व्यर्थ कालाचा अपव्यय होईल, हें जाणून भगवंतांनीं अर्जुनास कर्मयोगाचें रहस्य, यज्ञचक्राचें नियत व सर्वव्यापी परिभ्रमण आणि लोकसंग्रहरूपी कर्तव्याचें महात्म्य अनेक युक्तिवादांनीं, दृष्टांतांनीं, पूर्वपरंपरेच्या आश्रयानें, ऐतिहासिक प्रमाणांनीं आणि प्रत्यक्ष विराटस्वरूप दर्शनानें समजावून दिलें. ह्या ज्ञानाचा प्रत्यय, प्रतिपादन सुरू असतां जसजसा अर्जुनास येऊं लागला, तसतसा त्याचा व्यक्तिभाव व वैयक्तिक विचार यांचा लोप होऊं लागला आणि कांहींतरी नवीन दिव्य शक्तीचा संचार आपणांत होत आहे व तीच शक्ति एखाद्या यंत्राप्रमाणें आपणाला निमित्तमात्र पुढें करून आपणांकडून सुरळीत एक लोकसंग्रहकारक अत्यंत महत्कार्य करवून घेत आहे, हा विचार त्याच्या अंतःकरणांत आरूढ झाला. त्यानंतर तो दुर्योधन व तत्पक्षीय यांजकडे मातृतेच्या भावनेनें अथवा दायाद या संकुचित दृष्टीनें न बघतां भगवदीप्सित लोकसंग्रहकार्यास बुद्धिपुरस्सर विरोध करणारे मानवविग्रहधारी प्रत्यक्ष दैत्य आहेत, या दृष्टीनें पाहूं लागला व म्हणूनच अद्‌भुत असा पराक्रम करून त्याला सत्पक्षास विजय संपादन करून देण्याचें श्रेय मिळवितां आलें.

सामुदायिक कार्य आणि वैय्यक्तिक महत्त्वाकांक्षा यांचा कधींच मेळ बसूं शकत नाहीं, हा लोकसंग्रहधर्मांतील पहिला आणि अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत आहे. ही महत्त्वाकांक्षा स्वार्थविषयक असो, अथवा पारमार्थिक स्वरूपाची असो,त्यामुळें वरील सिद्धांतास कांहींहि बाध येत नाहीं. ज्या समुदायाकरितां अथवा समुच्चयात्मक संस्कृतीकरितां अथवा तत्सदृश एखाद्या विशिष्ट हेतूनें संघटित झालेल्या समष्टीकरितां कार्य करावयाचें असतें, त्या समुदायाच्या, समुच्चयात्मक संस्कृतीच्या किंवा तत्सदृश विशिष्ट कारणांनीं उत्पन्न झालेल्या समष्टीच्या उद्देशांशीं ज्याला समरस होतां येत नाहीं, अशा व्यक्तीकडे ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं तिचें कर्णधारित्व गेल्यास शस्त्रसंन्यासाचे, युद्धपराङ्-मुखतेचे व निष्क्रियतेचे प्रसंग एकवारच नव्हे, तर अनेकवार उत्पन्न झाल्या-शिवाय कधींहि राहणार नाहींत. वैयक्तिक श्रेष्ठतम गुणांची ओढ नेहमीं वैय-क्तिक अद्भुतपणा प्रकट करण्याकडेच असावयाची व जी गोष्ट व्यक्तिदृष्ट्या आपणास सुलभ व सहजतेनें करतां येते,तीच समाजांतील यच्चावत् घटका-वयवांस सहज व सुलभ असलीच पाहिजे, अशा विचाराचा तेथें प्रादुर्भाव झाल्याशिवाय राहात नाहीं.

अर्जुन व त्याचे चार बंधू यांच्या कौमार्यापासूनचा वृत्तांत वाचून पाहिला व त्याचें मनन केलें, तर त्यांत व्यष्टिदृष्टि निर्माण होणेंच शक्य आहे. समष्टि-दृष्टीच्या विकासास त्यांत फारच थोडा अवकाश आहे असें दिसून येईल. ज्या कौरवांच्या राजसभेंत भरतखंडाच्या भवितव्यतेवर शाश्वत परिणाम कर-णाऱ्या शेंकडों सल्लामसलती होत असत,त्या राजसभेपासून दूर,कधीं द्वैपायन ऋषींच्या आश्रमांत, तर कधीं लाक्षागृहांत त्यांना आपलें सर्व बाळपण काढावें लागलें. त्यांना आपलीं विवाहादिक मंगल कृत्यें केवळ स्वपराक्रमावर उरकून घ्यावीं लागलीं.गुरु द्रोण व पितामह भीष्म यांच्यासारख्या समदृष्टि आचार्यांचें अंतेवासित्व करण्याचें सद्भाग्य त्यांस लाधलें नसतें, तर क्षात्रकुलाला उचित अशा धनुर्वेदाच्या अध्ययनाऐवजीं ऋग्यजुःसाम या वेदत्रयीचे पाठ घेणें त्यांच्या नशिबीं आलें असतें. परंतु क्षात्रविद्या यथासांग संपादन केली, तरी राज्यशासनाचें कार्य युवराज या नात्यानें त्यांना केव्हांच करण्यास मिळालें नाहीं व त्यामुळेंच त्यांच्या ठिकाणीं व्यवहारदक्षता, चतुरस्रता

इत्यादि गुण ज्या प्रमाणांत विकसित व्हावयास पाहिजेत, तितके झाले नव्हते. शकुनि व कर्ण यांच्या सल्ल्यानें दुर्योधनानें पांडवांचा निःपात व्हावा, म्हणून जें जें जाळें पसरलें, त्या प्रत्येकांत ते सांपडले. त्यांतून ते आपल्या वैयक्तिक पराक्रमामुळें व शौर्यामुळें सुरक्षित व विजयी होऊन बाहेर आले, हें जरी खरें आहे, तरी ते प्रत्येक प्रसंगीं त्याच्या पाशांत जखडले जात असत, ही गोष्ट दृष्टीआड करतां यत नाहीं. वैयक्तिक शील व चारित्र्य यामुळें त्यांची छाप जरी सर्वांवर बसली होती, तरी त्यांच्या शत्रूचे उद्योग निर्मूल करण्याचा संघटित प्रयत्न त्यांना केव्हांच करतां आला नाहीं. त्यांची थोर नीतिमत्ता, अगाध पराक्रम व अद्वितीय भगवन्निष्ठा हे गुण सर्वांना आदर्शवत् वाटत होते. व तेवढ्यामुळें अडचणीच्या प्रसंगीं सार्वभौम दुर्योधनाचा रोष न होतां करतां येण्यासारखी मदत त्यांना सर्वांकडूनच मिळत असे. त्यांच्याविषयीं सर्वत्र सहानुभूति व त्यांच्या छळामुळें सार्वभौम दुर्योधन व त्याचे शकुनिप्रभृति मंत्रिजन यांजविषयीं एक प्रकारचा तिरस्कार हीं सर्वत्र पसरलीं होतीं. अशा स्थितींत ते राज्यपदारूढ होऊन त्यांनीं दिग्वजय संपादन केला व राजसूययज्ञाचा अपूर्व समारंभ करून सर्व भरतखंडांतील क्षत्रियांस आपली सार्वभौमसत्ता मान्य करावयास लावली. परंतु भीष्मद्रोणादिकांसारख्या आपल्या गुरूस कौरवपक्षांतून आपल्या पक्षाकडे आणण्याचें कार्य करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला नाहीं. अथवा दुर्योधनानें राजसूययज्ञाच्या प्रसंगीं शिशुपालास पुढें करून यज्ञविध्वंस करण्याचा जो घाट घातला होता, त्याबद्दल योग्य शासन करण्याचा संघटित उद्योगहि त्यांच्या हातून झाला नाहीं. त्यानंतर तेरा वर्षें त्यांना वनवासांत काढावीं लागलीं. त्या अवधींत त्यांच्या ठिकाणीं असलेल्या वैयक्तिक गुणांची कीर्ति ऋषिमुनि इत्यादिकांच्या मुखांतून भरतखंडभर सारखी पसरत होती. या अवधींत त्यांनीं बरींच पराक्रमाचीं कृत्यें केलीं, परंतु तीं सर्व त्यांच्या वैयक्तिक गुणांचींच द्योतकें आहेत. जंगलांतील मनुष्यादिकांनादेखील चकित करणारें वैराग्य व धर्मनिष्ठा आणि इंद्रादि दुर्जय असा पराक्रम हे त्यांच्या ठिकाणीं असणारे गुण कुरुक्षेत्रांतील समष्टिस्वरूपानें उपस्थित झालेल्या भारतसंग्रामरूप यज्ञाचें अध्वर्युत्व करण्यास पुरेसे

नाहींत, हा कटु अनुभव प्रत्यक्ष भगवंतालादेखील प्रत्यक्ष रणांगणावर घ्यावा लागला. ज्या भगवंताशीं अर्जुनाचें आत्यंतिक सख्य, त्याजकडून युद्धभूमीवर व्यूह रचून सेनापतीच्या स्थानावर अधिष्ठित होऊन स्वपरसैन्याचें निरीक्षण करण्याच्या वेळेपर्यंत या युद्धाचा उद्देश काय, व त्याचें स्वरूप काय, हें समजून घेण्याची बुद्धि अर्जुनास सुचली नाहीं, व युद्धाचें समष्टिस्वरूप त्याच्या लक्षांत आलें नाहीं, हें त्याच्या पूर्वचरित्रांतील अनुभवास पूर्णपणें सुसंगत आहे, असेंच मला वाटतें. लोकसंग्रहधर्म अर्जुनाला अगदींच अपरिचित नव्हता. तो नारदाच्या मुखांतून त्यानें पूर्वी एकवार ऐकिला होता. त्याचप्रमाणें राजधर्माचें त्याचें शिक्षणहि यथाशास्त्र ऋष्याश्रमांतून झालें होतें, परंतु राजविद्येसारखा सामुदायिक ज्ञानविशिष्ट विषय हा केवळ ग्रंथपाठ व्हावयाचा नसून तो प्रयोगशुद्ध तयार व्हावयास पाहिजे असतो आणि त्याचे नागर व जानपद जनांशीं संबंध नसलेल्या रानावनांत एकांतीं किंवा दूर देशीं राहणाऱ्या मनुष्यसंघांत जरी कांहीं यशस्वी अनुभव आले असले, तरी प्रत्यक्ष बरोबरीच्या हजारों योध्यांनीं फुलून गेलेल्या युद्धभूमीचें दर्शन होतांच क्षात्रवृत्ति लुप्त झाली आणि वैराग्यवृत्ति उदयास आली, यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. कोणत्या प्रसंगीं कोणती वृत्ति उचित आहे, हें ठरविणें अनुभवी राजकारणी पुरुषांशिवाय इतरांस केव्हांहि कठीण असतें, आणि म्हणून भगवंतांनीं कर्मयोग, यज्ञचक्र, आणि लोकसंग्रह व प्रत्यक्ष विश्वरूपदर्शन या सर्व तत्त्वांचा सविस्तर ऊहापोह करून अर्जुनाच्या ठिकाणीं समष्टिकार्याचें नेतृत्व करण्याची योग्यता आणून दिली. इतर सर्व गुणांचा विनियोग समष्टीचा उद्देश सिद्धीस नेण्याकरितां करणें हेंच समष्टिनेत्याचें पवित्र व प्रथम कर्तव्य आहे. आपल्याला विशेष अभिप्रेत असलेल्या ध्येयाला समष्टीला नेण्याचें कार्य सिद्ध होत नाहीं. उलट समष्टीचा उद्देश व कार्य याचा मात्र बिघाड होतो. लोकसंग्रहांतील हें विशेष तत्त्व आहे. लोकसंग्रहधर्मांत नेत्याचें काम समष्टीला कार्यप्रवण करण्याचें असतें. एक व्यक्ति अगर मूठभर व्यक्ति तत्त्वनिष्ठ झाल्यानें लोकसंग्रहाचें कार्य होऊं शकत नाहीं, हें या धर्माचें दुसरें तत्त्व आहे. भगवंतांनीं गीतेंत आपल्या अवतारकृत्याचें समर्थन

लोकसंग्रहाच्या तत्त्वावरच केलें आहे; व या अवतारकार्यास यश येण्याकरितां आपल्या उद्देशाचें तत्त्व अंशभूतानें समष्टींत प्रथम प्रगट करून नंतर भगवंत आपल्या अवतारकृत्यास आरंभ करतात. अंशावतार घेऊन देव भूमीवर येतात व नंतर परमेश्वर अवतार घेतो. या सामान्य व सर्वतोमान्य समजुतीचा अर्थ तरी हाच आहे. लोकसंग्रहाचें तिसरें तत्त्व असें आहे कीं, ज्याला लोकसंग्राहक कार्याचें धुरीणत्व घ्यावयाचें आहे, त्याचें सामान्य व नित्य व्यवहारांत लौकिकदृष्टया लोकोत्तर किंवा लोकविलक्षण असें कांहींहि असूं नये. " सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत । कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥" या श्लोकावरील लोकमान्यांची व्याख्या वाचण्यासारखी आहे. अज्ञान्यांस सुधारण्यासाठीं ज्ञात्यानें काय करणें अवश्य आहे, तें सांगतात–हे अर्जुना! (म्हणून) " लोकसंग्रह करूं इच्छिणाऱ्या पुरुषानें (व्यावहारिक) कर्मांत आसक्त झालेले अज्ञानी लोक ज्याप्रमाणें वागतात, त्याप्रमाणेंच पण आसक्ति सोडून वागलें पाहिजे." व्यावहारिक कर्में करणें अशक्य होईल, अशी निर्बंधाची परंपरा आंखून देऊन स्वतः त्या निर्बंधाचें तीव्र असिधाराव्रताप्रमाणें परिपालन करणें हें जरी वैयक्तिक चारित्र्यास खुलावट व शोभा आणणारें असलें, तरी त्यामुळें लोकसंग्रहाचें परिपालन होऊं शकत नाहीं, असा गीतेचा व रहस्यकार लोकमान्यांचा स्पष्ट अभिप्राय आहे. वरील तत्त्वांत काय रहस्य आहे, हा एक सविस्तर विवेचन करण्यासारखा विषय आहे. जनतेस अशक्य व अव्यवहार्य वाटणाऱ्या मार्गावरून जाण्यांत जरी कोणी कितीहि कसब किंवा करामत दाखविली, तरी वैयक्तिक पूज्यबुद्धि उत्पन्न करण्यापलीकडे त्याचा जनतेच्या पावित्र्यावर कायमचा असा तादृश परिणाम होत नाहीं. ही गोष्ट हजारों वर्षें अनुभवास येत आहे, एवढेंच वाचकांनीं लक्षांत ठेविल्यास त्यांना वरील गीतावाक्याचा अभिप्राय बरोबर कळेल. लोकसंग्रहाचें परिपालन करणाऱ्या विभूतींना आणखीहि एक पथ्य गीतेंत सांगितलें आहे. तें म्हणजे " न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् । ज्योषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥" लोकमान्य आपल्या गीतारहस्यांत या श्लोकाची व्याख्या करतात ती अशी—"कर्माच्या ठायीं आसक्त झालेल्या अज्ञानी लोकांच्या बुद्धीचा ज्ञानी पुरुषानें भेद करूं नये.

आणि ( आपण स्वतः ) युक्त म्हणजे योगयुक्त व सर्व कर्में करणारा होऊन लोकांना तीं करावयास लावावें." रहस्यकारांनीं बुद्धिभेद या शब्दाचा अर्थ विशद करण्याकरितां जो टीप ह्या व्याख्येखालीं घातली आहे,ती फारच महत्त्वाची असल्यामुळें तींतील कांहीं अवतरणें खालीं उद्धृत करतोंः—

" परंतु याचा (बुद्धिभेद करूं नये याचा) अर्थ लोकांना अज्ञानांत टेवावें असा नाहीं. 'लोकसंग्रह' म्हणजेच लोकांना शहाणें करून सोडणें असा अर्थ आहे. "

परंतु यावर कोणी अशी शंका घेईल कीं, लोकसंग्रह जरी कर्तव्य असला, तरी त्यासाठीं ज्ञानी पुरुषानें स्वतः कर्में करण्याची जरूरी नाहीं.लोकांना ज्ञान सांगितलें म्हणजे भागण्यासारखें आहे. याला उत्तर म्हणून भगवान् सांगतात कीं, सदाचरणाची ज्या लोकांना दृढ संवय लागलेली नसते ( आणि प्रायः बरेच लोक या वर्गांतले असतात ), त्यांना तोंडानें नुसतें ज्ञानच सांगितलें, तर हे लोक आपल्या गैरवर्तनाच्या समर्थनार्थ सदर ब्रह्मज्ञानाचा दुरुपयोग करतात व उलट अमुक ज्ञानी पुरुष असें म्हणतो, अशा नुसत्या चावटपणाच्या गोष्टी सांगूं लागतात, असें नेहमीं दृष्टीस पडतें. तसेंच ज्ञानी पुरुषानें कर्में अजिबात टाकलीं, म्हणजे अज्ञानी लोकांना निरुद्योगी होण्यास तो एक दाखलाच होतो. लोक अशा रीतीनें तर्कटी, चावट किंवा निरुद्योगी होणें यालाच बुद्धिभेद म्हटलें आहे आणि लोकांच्या बुद्धीचा अशा प्रकारें भेद करणें ज्ञात्या पुरुषास योग्य नाहीं. म्हणून जो पुरुष ज्ञानी असेल, त्यानें लोकसंग्रहार्थ म्हणजे लोकांना शहाणे व सदाचारी करण्यासाठीं आपण स्वतः संसारांत राहून लोकांना निष्काम कर्माचा म्हणजे सदाचरणाचा प्रत्यक्ष धडा घालून देणें व त्यांच्याकडून त्याप्रमाणें आचरण करविणें हें त्याचें या जगांतील महत्त्वाचें काम आहे, असा गीतेंत सिद्धांत केला आहे. यापेक्षां या तत्त्वाचा अधिक खुलासा करणें अनवश्यक आहे. परंतु हें धोरण सांभाळण्याकरितांच लोकमान्यांनीं सामाजिक प्रश्नांची चर्चा आपल्या बरोबरीच्या लोकांकडून होणारा उपहास सहन करून देखील फार पोक्त व दूरवर पोंच ठेवून केलेली आहे, हें वाचकांच्या लक्षांत आल्याशिवाय राहाणार नाहीं. याच्या उलट आर्यसमाजी हिंदु-

वगैरे लोकांचीं निष्कारण मनें दुखविण्यासारखे लेख पूर्ण माहिती न घेतां व शास्त्र आणि धर्म यांची वास्तपुस्त न करितां प्रसिद्ध केल्यामुळें हल्लीं केवढा बखेडा उत्पन्न झाला आहे, याचा विचार केल्यास लोकसंग्राहकत्वाचें अज्ञजनांचा बुद्धिभेद न करणें हें केवढें प्रमुख अंग आहे, हें वाचकांस सहज दिसून येईल.

याच तत्त्वावरून आणखी एक तत्त्व लोकसंग्रहधर्मांत ग्रथित करण्यांत येतें, तें पुढाऱ्यांनीं आपली जबाबदारी ओळखून वागण्यासंबंधीं आहे. "यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जन:" हा नियम लोकसंग्रहचिकीर्षूंना कधींहि विसरतां येत नाहीं. कृति व युक्ति यांतील विरोध या मार्गास जितका बाधक व मारक आहे तितका इतरत्र नाहीं. त्याचप्रमाणें लोकसंग्रह हा कर्तृत्वप्रवण धर्म असल्यामुळें त्यांत कोणतेंहि कार्य फाजील शंका व कुशंका काढून दिरंगाईवर टाकणें किंवा आरंभिलेलें कार्य भलत्याच सबबीचा दूरान्वय लावून टाकून देणें या गोष्टी अक्षम्य समजल्या जातात. आपला मुख्य उद्देश, शुद्ध आहे व आपणाकडून अन्याय्य मार्गाचें अनुसरण होत नाहीं,याची खबरदारी घेतली म्हणजे पुरे आहे. उपलब्ध सामुग्री, शुद्ध हेतु व न्याय्य मार्ग या तीन अटी पाळिल्या, म्हणजे कोणत्याहि विघ्नाकरितां प्रारब्धकर्म थांबविणें हें कमीपणाचें समजलें पाहिजे. कारण लोकसंग्रहाच्या तत्त्वांत अत्यंत निर्दोष अशी अवस्था मानण्यांत येत नाहीं. "सर्वारंभाहि दोषेण धूमेनाग्निरिवावृत:" हा या मार्गांतील सिद्धांत आहे. यांत हिंसा व अहिंसा अथवा सत्य व असत्य यांचा कीस काढण्यास अवसर नाहीं, शुष्क पांडित्यास वाव नाहीं आणि शब्दावडंबरास अवकाश नाहीं. भलत्याच परिस्थितींत पडलेल्या आघातप्रत्याघाताचे परिणाम आपणांवर बळेंच लादून कर्तव्यमुक्त होण्यास या मार्गांत जागा नाहीं. यशापयश हें सर्वस्वी पराधीन आहे, आपण केवळ कर्तव्याचे मालक आहोंत, ही यांतील मुख्य भावना असल्यामुळें 'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्' या विश्वासानें हा मार्ग आचरण करावा लागतो व अखेरीस तोच फलप्रद होणार. लोकमान्यांच्या चरित्राचें व शिकवणीचें सार या धर्माचें तत्त्व समजण्यांत आहे.

वर्तमानपत्रांवरील

# लो. टिळकांचें ऋण*

कै. लो. टिळक यांच्या निधनतिथीच्या दिवशीं त्यांच्या पुण्यस्मरणार्थ विशेष अंक काढण्याचा महाराष्ट्रांतील बहुतेक वर्तमानपत्रकारांनीं जो परिपाठ घातलेला आहे, त्यामुळें एकप्रकारें त्यांच्या ऋणांतून अंशतः मुक्त होण्याचेंच कार्य ते करीत आहेत, असें मला वाटतें.

लो. टिळकांनीं लोकशिक्षणाकरितां वर्तमानपत्राचा धंदा स्वीकारला व आज निदान महाराष्ट्रांत तरी या धंद्याला जें प्रतिष्ठित व प्रौढ स्वरूप आलेलें दृष्टीस पडतें, त्याचें श्रेय बव्हंशीं कै. लो. टिळक यांनाच आहे, असें कोणासहि प्रांजलपणें कबूल करावें लागेल.

लोकमान्यांनीं जेव्हां केसरीचें संपादकत्व आपणांकडे घेतलें, तेव्हां निव्वळ मराठी वर्तमानपत्र उपयुक्त व लोकप्रिय होणार नाहीं, असाच सर्व सुशिक्षितवर्गाचा समज होता. त्यामुळेंच निव्वळ मराठी वर्तमानपत्राचें संपादकत्व पत्करण्यास आंग्लविद्याविभूषित सुशिक्षित गृहस्थ मिळणें फार कठिण जात होतें. तत्कालिन प्रतिष्ठित देशी पत्रें बहुशः दुभाषी असत. सुशिक्षित संपादकांनीं इंग्रजी मजकूर लिहून द्यावा आणि मराठी मजकूर दुसऱ्या एखाद्या अगदींच सामान्य प्रतीच्या माणसाच्या हातून लिहिला जावा, असा संप्रदाय पडून गेला होता. परंतु कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं निबंधमालेच्या द्वारें निव्वळ मराठी भाषेंतून जें लोकमतजागृतीचें कार्य केलें, त्यामुळें मराठी भाषेंतून प्रगल्भ विचार मांडले गेल्यास ते ग्रहण करण्याचें सामर्थ्य महाराष्ट्रांतील केवळ लिहितांवाचतां येणाऱ्यासच नव्हे, तर सामान्यतः निरक्षर समजल्या जाणाऱ्या जनतेंतदेखील आहे, याचा अनुभव शास्त्रीबोवांना आल्यामुळें त्यांनीं आपल्या सहकारी मित्रांच्या जोरावर केसरीसारखें निव्वळ मराठी पत्र काढावयाचें साहस केलें. त्यांच्यासारख्या लोकोत्तर लेखकाच्या प्रगल्भ लेखनशैलीमुळें केसरीला त्या कालाच्या मानानें बरीच लोकप्रियता संपादन करतां आली. परंतु त्यांच्या अकालिक निधनामुळें या साहसावर जें संकट ओढवलें, त्याची योग्य कल्पना करणेंसुद्धां

*'लोकमत' लो. टिळक अंक ३१ जुलै १९२५

प्रस्तुतच्या पिढीस दुष्कर आहे. कारण त्यानंतर ज्यांच्याकडे केसरीचें संपादकत्व ओघानेंच आलें, त्यांनीं मराठी भाषेंतून लेखक या नात्यानें पूर्वी फारसा लौकिक मिळविला नव्हता. त्यामुळें कै. आगरकर व लो. टिळक यांच्यावर हें नवीन साहस–मराठी साप्ताहिकाची उपयुक्तता व लोकप्रियता सिद्ध करण्याचा हा नवीन प्रयोग–यशस्वी करण्याची जबाबदारी येऊन पडली. पुढें थोडक्याच अवधींत या दोन जिवलग देशभक्तांत मतभेदाचा खटका उडाल्यामुळें केसरी व मराठा या दोन्ही पत्रांचें संपादकत्व लो. टिळक यांच्याकडे आलें.यावेळेपर्यंत केसरींतून लिहिण्याचा लोकमान्यांना फारसा सराव नव्हता. याच्या उलट प्रौढ व तडफदार लेखक म्हणून कै. आगरकर यांनीं बराच लौकिक संपादन केलेला होता. मराठी भाषेंतून त्यांनीं केलेलें "विकारविलसित" या नांवाखालीं प्रसिद्ध झालेलें हॅम्लेटचें भाषांतर एका लोकप्रिय नाटक मंडळीकडून रंगभूमीवर आणण्यांत येत असल्यामुळें त्यांच्या लेखनकौशल्याबद्दल सामान्य जनतेंतसुद्धां एक प्रकारचा आदर उत्पन्न झालेला होता. त्यांचा केसरीशीं संबंध तुटून लोकमान्यांच्या गळ्यांत वर्तमानपत्रसंपादनाची माळ पडली, तेव्हां लोकमान्यांनीं आपल्यावर ही एक अतिशय मोठी जबाबदारी येऊन पडली आहे, व ही जर आपणांला नीट पार पाडतां आली नाहीं, तर आपला वैयक्तिक दुर्लौकिक होईल,एवढेंच केवळ नसून लोकसाधनाचें साधन म्हणून शुद्ध मराठी वर्तमानपत्राच्या धंद्याच्या ऊर्जितावस्थेवर देखील त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं, अशा तऱ्हेच्या भावनेनें आपल्या संपादकीय कारकीर्दीची सुरवात केली आणि यावज्जन्म त्यांची सर्व विद्वत्ता, बुद्धिबल आणि लेखनपटुता एका केसरीच्या सेवेंत संपादनास मिळाली नसती, व ती जर इतर सुबुद्ध माणसांप्रमाणें केवळ इतर तऱ्हेनें देशसेवेच्या कार्यांत खर्च झाली असती, तरी लोकमान्यांना महाराष्ट्राचेंच नव्हे, तर सर्व भरतखंडाचें नेतृत्व कदाचित् लौकर मिळवितां आलें असतें. परंतु ज्या नेत्याच्या पाठीमागें सामान्य व्यवहारदक्ष जनता नाहीं, त्या नेत्यास लौकिक मिळवितां येईल, परंतु सामर्थ्यसंपन्न होतां येणार नाहीं, हा त्यांचा ठाम सिद्धांत असल्यामुळें आंग्लविद्याविभूषित अखिल भारतीय पंडितांत अग्रेसरत्व मिळविण्याची हांव टाकून देऊन "रंजल्या गांजल्या" जनतेस सुबुद्ध

व कर्तव्यदक्ष करण्याचेंच व्रत त्यांनीं पत्करिलें.-केसरीची ही एकनिष्ठपणें सेवा करीत असतां त्यांच्यावर ज्या आपत्ती आल्या, त्यांमुळें मराठी वर्तमानपत्रांतील तेजस्वी विचारसरणीचा परिचय इतर प्रांतांतील पुढाऱ्यांना झाला व त्याचें अनुकरणच नव्हे, तर अनुवाद करण्याचाहि क्रम हिंदी व बंगाली पत्रकारांनीं सुरू केला. मराठी भाषा ही मुत्सद्यांची भाषा आहे, ही शूर जवान मर्दांची 'खडी जबान' आहे, असा तिचा लौकिक जो आज सर्व हिंदुस्थानभर ऐकूं येतो आणि मराठी वर्तमानपत्रांतील उताऱ्यांचीं भाषांतरें वारंवार मोठमोठ्या इंग्रजी पत्रांतून केलेलीं आढळतात, याचें सर्व श्रेय लोकमान्यांनीं केलेल्या एकनिष्ठ सेवेलाच देणें योग्य आहे. भारदस्त विचारसरणी व खोंचदार कोटिक्रम या बाबतींत केसरीची बरोबरी करणारें पत्र कोणत्याहि देशी भाषेंतीलच नव्हे, तर हिंदुस्थानांत प्रसिद्ध होणाऱ्या इंग्रजी भाषेंतील पत्रदेखील करूं शकत नव्हत. अशा तऱ्हेनें लोकमान्यांनीं मराठी वर्तमानपत्राकरितां भारतीय नियतकालिकवाङ्मयांत अत्यंत प्रतिष्ठित स्थान मिळविलें आहे व आजच्या मराठी वर्तमानपत्रकर्त्यांना त्यांचे वारस या नात्यानें या सर्व प्रतिष्ठारूप ठेवीचा लाभ मिळत आहे.

परंतु लोकमान्यांना वृत्तपत्राच्या धंद्यांत इतकें लक्ष कां घालावेंसें वाटलें, असाहि कित्येकांच्या मनांत प्रश्न उत्पन्न होण्याचा संभव आहे. आजसुद्धां थोडीबहुत सफाईदार भाषा लिहिण्याचा ज्याला सराव आहे, त्याला आपण एखादें पत्र सहज चटकदार रीतीनें चालवूं, अशी घमेंड वाटत असते. आणि याच भावनेमुळें कित्येक वर्तमानपत्रें उत्पन्न होतात व थोड्याच अवधींत नाहींशीं होतात, हें आपण पाहात असतों सफाईदार लिहिण्याची हौस, चटकदार लिहिण्याची अनावर इच्छा ही लोकमान्यांच्या संपादकत्वाची प्रेरकशक्ति नव्हती. त्यांची वर्तमानपत्राच्या धंद्याची कल्पना अत्यंत गंभीर होती. त्यांच्याच भाषेचा उपयोग करावयाचा झाल्यास "हा माझा स्वाध्याय आहे" असें ते म्हणत व स्वाध्यायाविषयीं कर्मठ श्रोत्रीय ब्राह्मणाच्या ठिकाणीं जो आदर, निरलसता व दाक्षिण्य असतें, तें सर्व केसरींतील लेख लिहीत असतां त्यांच्या ठिकाणीं एकवटून प्रकट होत असे. ही त्यांची भावना त्यांनीं केसरींतील लेखांतून अनेकवार व्यक्त केलेली आहे. ऋषि-

ऋण फेडण्याकरितां ज्याप्रमाणें वेदाध्ययन, त्याचप्रमाणें देशऋण फेडण्याकरितां केसरीचें संपादन हें माझें व्रत आहे, असे उद्गार त्यांनीं वारंवार काढलेले आहेत. ज्याप्रमाणें वेदाध्ययनी ब्राह्मण वेदपठण करीत असतां, "अपस्वरं हतायुष्यं विस्मरं व्याधिपीडितम्" हा नियम लक्षांत ठेवून एखाद्या स्वराचादेखील प्रमाद होऊं नये, याची दक्षता ठेवतो, त्याचप्रमाणें न कळत चूक होऊन केसरींतील लेखांत एखादा शब्ददेखील अधिकउणा करण्याची पाळी आपणांवर येऊं नये, याची ते काळजी बाळगीत असत, व म्हणूनच एका सुप्रसिद्ध प्रसंगीं आपल्या मित्राला लिहिलेल्या पत्रांत त्यांनीं स्वतःच्या लेखनशैलीसंबंधानें लिहितांना I am not a kaccha reed असे उद्गार काढले आहेत. या उद्गारांत कै. प्रो. गोखले यांचे दोष काढण्यापेक्षां स्वतःचें प्रमादराहित्य राखण्याबद्दल घेतलेल्या दक्षतेचें वर्णन अधिक आहे, असें कोणीहि निःपक्षपाती मनुष्य कबूल करील. अशा तऱ्हेच्या लोकविलक्षण आदरानें, प्रेमानें व उल्हासानें त्यांनीं वर्तमानपत्राचा व्यवसाय चालविला होता. म्हणूनच 'सुलतानी' मुळें केसरीचा वियोग झाल्यानंतर पुन्हां संपादकत्व स्वीकारण्याच्या प्रसंगीं त्यांनीं झालेल्या लेखनीय विश्रांतीचें वर्णन करतांना 'अनध्याय' झाला, अशी भाषा योजिली व संपादकीय लेखांची सुरुवात एखाद्या वेदाध्यायी ब्राह्मणाप्रमाणें "हरिः ॐ" या वैदिक संप्रदायानें केली. मराठी वर्तमानपत्रांना भाग्योदय व उर्जितावस्था आज जी दृष्टीस पडते आणि सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या व्यक्तीस संपादक म्हणून मिरविण्यांत जें भूषण वाटतें, त्याचें एक बलवत्तर कारण कै. लोकमान्यांनीं एकनिष्ट सेवेनें त्या व्यवसायास आणून दिलेली प्रतिष्ठा हें होय, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे सर्व मराठी पत्रकारांनीं त्यांच्या निधनतिथीच्या दिवशीं विशेष अंकाचें प्रकाशन करून कृतज्ञता व्यक्त करावी, हें स्वाभाविक होय. हाच उपक्रम असाच कायम राहून लोकमान्यांच्या आयुष्यांत त्यांनीं जीं दिव्य ध्येयें सामान्य जनतेच्या समोर ठेविलीं, तीं शीघ्र साध्य होण्याकरितां त्यांनीं आंखून दिलेल्या मार्गाचें आक्रमण करण्याची प्रवृत्ति अधिक जागृत होवो, ही प्रार्थना करून आणि लोकमान्यांच्या सायुज्यपदस्थ आत्म्यास अनन्यभावानें वंदन करून हें पुण्यस्मरण येथेंच संपवितों.

# आम्हीं स्वराज्यपक्ष कां सोडला? *

कानपूर येथें स्वराज्यपक्षानें ज्या धोरणाचा स्वीकार केला, त्याचा विचार केला असतां स्वराज्यपक्षांत राहून प्रतिसहकारितावादी महाराष्ट्रीयांस आपल्या मतानुसार लोकजागृतीचें कार्य करतां येणें शक्य नाहीं, हें स्पष्ट असल्यामुळें स्वराज्यपक्षांतून बाहेर पडण्याखेरीज त्यांना गत्यंतरच नव्हतें.प्रतियोगी सहकारितेचा पुरस्कार करणारांचें म्हणणें कानपूरच्या राष्ट्रीय सभेपुढें अत्यंत पद्धतशीर रीतीनें मांडण्यांत आलें. परंतु पं. मोतीलाल नेहरू यांनीं पक्षाभिनिवेशामुळें स्वतः तिकडे सर्वथा दुर्लक्ष केलें व राष्ट्रीय सभेंत जमलेल्या प्रतिनिधींना दुर्लक्ष करावयास लाविलें. कानपूर येथील ठरावांत आमच्या मतें विशेष आक्षेपार्ह मुद्दे आहेत ते हे:—

( १ ) राष्ट्रीय मागणींत एकवाक्यता करण्याचा जो प्रयत्न गेल्या बारा महिन्यांपासून असेंब्लींतील स्वराज्यपक्ष व स्वतंत्रपक्ष यांच्या दरम्यान चालू होता व ज्याला गेल्या सप्टेंबर महिन्यांत चांगलें यश आलें, त्या सर्व प्रयत्नावर कानपूरच्या ठरावानें बोळा फिरवला जात असून राष्ट्रीय मागणीचें स्वरूप व्यवस्थित, निश्चित व व्यवहार्य करण्याऐवजीं तें अत्यंत अनिश्चित व अव्यवस्थित करण्यांत आलें आहे.

( २ ) देशांत राजकीय कार्य करणारे परंतु तूर्त राष्ट्रीय सभेच्या बाहेर बसून काम करणारे जे दोनतीन प्रमुख राजकीय पक्ष आहेत, त्यांना राष्ट्रीय सभेच्या नेतृत्वाखालीं आणण्याचा प्रयत्न उपेक्षणीय ठरविण्यांत आला, इतकेंच नव्हे, तर त्या प्रयत्नास निदान पुढील बारा महिन्यांत तरी कोणत्याहि स्वरूपांत सुरुवात होण्याची शक्यता दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

( ३ ) सप्टेंबरनंतर होणाऱ्या कायदेमंडळाच्या निवडणुकी कोणत्या तत्त्वावर व्हाव्या, याचीं मूलभूत तत्त्वें आज कायम करण्यांत आलीं आहेत व त्या तत्त्वांत फेरबदल करण्याचा अधिकार स्वराज्यपक्ष किंवा ऑल इंडिया कांग्रेस कमिटी यांपैकीं एकाहि संस्थेकडे राखण्यांत आला नाहीं. नवीन निवडणुकीचा कार्यक्रम आतांच कायम करूं नये, ही बॅ. जयकर यांची

---

* 'लोकमत' यवतमाळ ता. १५ जानेवारी १९२६

उपसूचना किंवा तो ठरविण्याकरितां राष्ट्रीय सभेचें जादा अधिवेशन भरविण्यांत यावें, ही पं. मदनमोहन मालवीय या वृद्ध राष्ट्रसभाभक्तानें मांडलेली उपसूचना कौन्सिलप्रवेशास सर्वथा प्रतिकूल असलेल्या असहकारितावादी लोकांशीं संगनमत करून पं. मोतीलाल यांनीं फेटाळून लाविली! या सर्व कारवाईचा अर्थ इतकाच कीं, फेब्रुवारी महिन्याच्या अखेर ज्या अप्रतिहत व्यत्ययाच्या धोरणास सुरुवात होणार, त्या धोरणामुळें जनतेंतील मतदार संघाच्या मतांत कांहीं परिवर्तन झालें, तरी त्या परिवर्तनाचा कोणताच उपसर्ग आपल्या पक्षास व त्या पक्षाच्या राष्ट्रीय सभेंतील वर्चस्वास निदान पुढील बारा महिन्यांत पोहोंचूं नये, हाच पं. मोतीलाल नेहरू यांचा उद्देश आहे. पुढील निवडणुकीच्या आधीं राष्ट्रीय सभेपुढें आपल्या व्यत्ययात्मक धोरणानुसार आजपर्यंत करण्यांत आलेल्या व पुढील सहा महिन्यांत होणाऱ्या कारवाईची छाननी करण्याची संधि राष्ट्रास देणें इष्ट नाहीं, असें पं. मोतीलाल नेहरू यांना वाटत आहे, म्हणून आज जें राजकीय विषयासंबंधीं सामान्यतः उदासीन असणाऱ्या लोकांचें प्राबल्य राष्ट्रीय सभेंतील व ऑल इंडिया कमेटींतील सभासदांत अनायासेंच आहे, त्याचा फायदा घेण्याचा मोह त्यांना अनावर झाला व अधिकारत्याग व कायदेभंगाची पूर्वतयारी या दोन तत्त्वांवरच पुढील निवडणुकी राष्ट्रीय सभेच्या वतीनें लढविण्यांत आल्या पाहिजेत, असा स्पष्ट निर्णय कानपूर सभेकडून घेण्याचा अट्टाहास त्यांनीं केला.

( ४ ) त्याचप्रमाणें अप्रतिहत व्यत्ययाचा उपक्रम करण्यापूर्वीं मागणीवरील सरकारी जबाबाचें स्वरूप काय आहे, हें ठरविण्याकरितां त्यांनीं जी विशेष कमेटी नेमली, तिचा व ऑल इंडिया कांग्रेस कमेटीचा परस्परसंबंधदेखील श्रेष्ठ व कनिष्ठ भावाचा ठेवण्यांत आलेला आहे. सरकारी उत्तर हें समाधानकारक नाहीं, असें ठरल्यास या विशेष कमिटीनें राष्ट्रीय सभेच्या ठरावांत दिग्दर्शित केलेल्या तत्त्वानुसार व्यत्ययाच्या कार्यक्रमास सुरुवात करण्याकरितां मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांतील सभासदांस एकदम सूचना करण्याचा अधिकार आहे. परंतु या विशेष कमेटीच्या सभासदांस जरी सरकारी उत्तर अंशतः समाधानकारक असें वाटलें, तरी त्यांच्या या निर्णयास ऑल इंडिया कमिटीच्या सभासदांनीं एखाद्या विशेष बैठकींत संमति

दिल्याशिवाय तो निर्णय व्यर्थ आहे, या लटपटीच्या ठरावांतील अभिप्राय सर्वांस सहज कळण्यासारखा आहे. आज जी ऑ.इं.कॉं कमिटी, राष्ट्रीय सभेची विषयनियामक कमेटी या नात्यानें दहा महिन्यांनंतर होणाऱ्या निवडणुकीच्या मोहिमेंतील व्यत्ययमय मार्गास सर्वस्वी पोषक अशा एक दोन तत्त्वांचा निर्देश करून तीं कायम समजण्यांत यावीं, असा ठराव प्रचंड बहुमतानें मंजूर करिते, त्याच कमिटीला विशेष कमिटीनें सरकारी उत्तरावर अनुकूलतेचा अभिप्राय दिल्यामुळें जर अपीलें ऐकण्याचा प्रसंग आला, तर ती काय निर्णय देईल, हें कोणासहि सहज कळण्यासारखें आहे.

कानपूर येथें याप्रमाणें स्वराज्यपक्षानें हट्टास पेटून राजकीय पक्षांचें ऐक्य घडवून आणणें अशक्य करण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रीय मागणींतील असंदिग्धता काढून ती पुन्हां संदिग्ध व अनिश्चित केली आहे. पुढील निवडणुकींसंबंधानें आपल्या धोरणांतील प्रमुख तत्त्वें निश्चित केलीं आहेत. दरम्यानच्या काळांत जर लोकमतांत कांहीं फरक पडला, तर त्याचा परिणाम स्वराज्यपक्षाचा कार्यक्रम व अधिकार यांजवर निदान निवडणुकीची लढत होऊन जाईपर्यंत कोणत्याहि प्रकारें होऊं नये, याची शक्य तितकी खबरदारी घेतली आहे. इतक्या गोष्टी स्पष्ट असतांना ज्या लोकांना निवडणुकीच्या पूर्वी लोकमतांत इष्ट असें स्थित्यंतर घडवून आणणें अवश्य वाटतें, त्यांना स्वराज्य पक्षांत राहून ही चळवळ करणें प्रायः अशक्य आहे, असेंच म्हणणें प्राप्त आहे, व म्हणूनच बॅ. जयकर, मुंजे किंवा श्री. तात्यासाहेब केळकर या प्रमुख पुढाऱ्यांबरोबर वऱ्हाडांतील स्वराज्यपक्षीय बहुतेक प्रमुख कार्यकर्त्यांनीं स्वराज्यपक्षाचे राजिनामे दिले, हेंच युक्त झालें, असें मला वाटतें. यानंतर बाहेर पडलेल्या या मंडळीनें नवीन पक्षाची घटना कोणत्या तत्त्वावर करावी, व आपल्या चळवळीचा उपक्रम कसा करावा, याचा विचार जमल्यास पुढील लेखांतून करूं. तूर्त आज वाचकांचा येथेंच निरोप घेतों.

# पुढील मार्ग *

कानपूर येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत ठरल्याप्रमाणें स्वराज्यपक्षीय सभासद हे मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांतून ता. ८ मार्च रोजीं उठून निघून गेले. स्वराज्यपक्षाची स्थापना करतेवेळीं ज्या धोरणावर कायदे-कौन्सिलांतून स्वराजिष्टांनीं कामें करावयाचीं होतीं, त्या धोरणाचें तार्किक पर्य-वसान वरील प्रकारानेंच व्हावयास पाहिजे होतें आणि म्हणूनच स्वराज्यपक्षानें ता. ८ मार्च रोजीं एकजुटीनें कायदेकौन्सिलास रामराम ठोकला, यांत विस्मय वाटण्यासारखें कांहींच घडून आलेलें नाहीं. उलट अडीच वर्षांपर्यंत ते कायदेमंडळांत बसून एखादादुसरा प्रसंग खेरीजकरून इतर वेळीं बाकीच्या सभासदांबरोबर कौन्सिलांतील नित्य व नैमित्तिक सरकारनियो-जित व लोकनियोजित कार्यक्रम पार पाडण्यासाठीं आस्थापूर्वक परिश्रम करीत होते, याचेंच विचारी लोकांस अधिक आश्चर्य वाटून राहिलें होतें. वास्तविक पाहतां दिल्ली येथील असेंब्लीच्या बैठकींत १९२४ च्या फेब्रवारी महिन्यांत राष्ट्रीय मागणीचा ठराव सर्वानुमतें पास झाल्यानंतर सरकारनें त्या ठरावाला उत्तर म्हणून रिफॉर्म कमेटीची जेव्हां योजना जाहीर केली, तेव्हांच स्वराजिष्ट सभासदांच्या समोर आपण इत्युत्तर कायदेमंडळांतून राहणें इष्ट आहे कीं नाहीं, हा सवाल उभा राहावयास पाहिजे होता. परंतु त्यावेळीं आपल्या पक्षाच्या मूलभूत तत्त्वानुसार वर्तन करण्याचा प्रश्न स्वराज्य-पक्षाच्या अध्वर्यूंनीं बाजूस सारिला आणि कोणत्या निमित्तानें आपणांस कायदेमंडळांतून अखेरपर्यंत काम करावयास मिळेल, हें पाहण्याचा मोह त्यांना अनावर झाला. देशबंधु दास यांचें फरीदपूर येथील भाषण, असेंब्ली-तील गेल्या सप्टेंबरच्या बैठकींत तडजोड म्हणून मूल मागणीच्या ठरावांत केलेला फेरबदल, ना. पटेल यांची ॲसेंब्लीच्या अध्यक्षपदाच्या जागीं निवड-णूक, पं. मोतीलाल नेहरू यांचा स्कीन कमेटीच्या सभासदत्वाचा स्वीकार—या सर्व गोष्टी जर कांहीं एखाद्या विशिष्ट धोरणाच्या निदर्शक असतील, तर त्या फक्त एकच गोष्ट दाखवितात. प्रस्तुतच्या असमाधानकारक असलेल्या

---

* 'लोकमत' यवतमाळ ता. १९ मार्च १९२६

राज्यघटनेचा जनतेच्या हिताच्या दृष्टीनें जो उपयोग करून घेतां येण्यासारखा असेल, तेवढा करून घ्यावा, या बुद्धीनेंच या गोष्टी करण्यांत आल्या व येत आहेत. अशा धोरणानें काम करीत असतां जर निकराचा निरोध करण्याची संधि आली, तर तिचा तसा निरोध करण्यास वरील गोष्टींमुळें कांहीं व्यत्यय उत्पन्न होत नाहीं, असेंच स्वराज्यपक्षीय अध्वर्यूंस वाटत होतें, आणि म्हणूनच त्यांनीं त्या धोरणाचा स्वीकार केला होता, असें आम्हांस वाटतें.

वरील धोरण हें स्वराज्यपक्षाच्या मूलभूत ( म्हणजे सरसहा एकजात विरोधाच्या ) तत्त्वास विसंगत आहे, असें विधान करण्याचें साहस एखाद्यानें केल्यास यांत विसंगत अशी वस्तुस्थिति वस्तुतः नाहीं, असें उत्तर देऊन स्वराज्यपक्षीय अध्वर्यू त्या आक्षेपकाचें समाधानहि करीत होते.

आमच्या मतें वरील धोरणाचें समर्थन फक्त एकाच तऱ्हेनें होण्यासारखें आहे. एकतर तोंडानें आपण नाकबूल करीत असतांच प्रत्यक्ष कृतीनें जी सहकारिता करीत आहोंत, ती हिंदुस्थानसरकारला मान्य होऊन सुधारणांच्या मागणीचा पुन्हा विचार करण्यास ते प्रवृत्त होतील, अशी आशा या स्वराज्यपक्षींय अध्वर्यूंस वाटत असली पाहिजे. आपल्या शब्दांकडे अधिकारी दुर्लक्ष करतील आणि आपल्या कृतीचाच तेवढा निर्विकार मनानें त्यांच्याकडून विचार होईल, असें त्यांची मनोदेवता त्यांस सांगत असली पाहिजे; व असा विचार जर झाला, तर सुधारणांचा कायदा दुरुस्त करून घेण्याचें श्रेय स्वराज्यपक्षाच्या पदरांत आपोआप पडून त्या पक्षाचें निष्कंटक व अप्रतिहत वर्चस्व सर्व देशभर स्थापन होईल, व असें झालें म्हणजे त्या पक्षाला अपेक्षित असलेली चळवळ अधिक मागण्या पदरांत पाडून घेण्याकरितां करावयास सोपें जाईल, असेंच त्यांस निश्चितपणें वाटत असलें पाहिजे. इंग्रज अधिकारी व इंग्रज गृहस्थ यांत जो सूक्ष्म भेद वारंवार काढण्यांत येतो आणि अधिकारी या नात्यानें इंग्रजांना " सैतानाच्या " कोटींत नेऊन टाकणारे पुढारी 'सद्गृहस्थ' या नात्यानें इंग्रजांची मनमुराद प्रशंसा करीत असतात, हें आपल्यास पुष्कळदां पाहावयास मिळतें. म. गांधी, श्रीनिवासशास्त्री आणि पं. मोतीलाल नेहरू या सर्वांच्या मनोभूमिकेंत या एका बाबतींत विलक्षण साम्य आहे. या सर्वांस

इंग्रज ' गृहस्थ ' हा अनेक सद्गुणांचा पुतळा वाटतो व तो आदर्श हिंदुस्थानच्या लोकांनीं आपल्या डोळ्यासमोर ठेवावा, अशी त्यांची इच्छा दिसते. ही मुळांतली स्वराज्यपक्षीय अध्वर्यूंची इंग्रज मनुष्यांविषयींची दृष्टि असल्यामुळेंच त्यांच्या मनांत कधीं कधीं वरील तऱ्हेच्या आशा उत्पन्न होत असतात, आणि ह्या आशेलाच बळी पडून त्यांच्याकडून राजकीय धोरणाची आंखणीहि करण्यांत येत असते. इंग्रजी मुत्सद्यांना अपेक्षित अशा धोरणाचा प्रत्यक्ष वृत्तींत स्वीकार केल्यानंतर म्हणजे कृतीनें विरोधाची मान मुरगळण्याचें निष्ठुर कार्य झाल्यानंतर मी गुन्हेगार आहें, आतां फिरून असा गुन्हा करणार नाहीं, असा माफीचा कबुलीजबाब इंग्रज मनुष्य क्षणभर आपल्या अधिकाराचा मद विसरून आणि केवळ ' सद्गृहस्थ ' अथवा विश्वनागरिकदृष्टीचें अवलंबन करून देईलच देईल, अशी या स्वराज्यपक्षीय अध्वर्यूंनीं अटकळ बांधिली असावी. आणि म्हणूनच गेल्या दोन वर्षांत सरसहा विरोधाचें स्वरूप प्रगट करण्याचे जे प्रसंग उत्पन्न झाले, त्यांकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें आणि बुद्धिपुरस्सर मर्यादित सहकारितेच्या धोरणाचा अंगिकार त्यांनीं केला. प्रत्येक सहकारितेची गोष्ट करीत असतांना आम्हीं हें करतों, पण आम्हांस सहकारी समजण्याची आपण चूक करूं नका, हें बजावून सांगण्यास पं. मोतीलाल नेहरू हे कधींहि चुकत नसत. इतकेंहि करून त्यांना कोणी जर चुकीनें एखाद्या वेळीं सहकारी म्हणून संबोधिलें, तर तावडतोब ते वर्दळीवर येत असत, हेंहि आम्हांस माहीत आहे. ' मी वाटल्यास सहकारिता करीन, नव्हे पूर्ण सहकार्य करीन, पण असहकारितावादी म्हणूनच जगांत मिरवीन ' अशी पंडितजींची व त्यांच्या पक्षांतील बहुतेकांची मनःस्थिति होती. ही स्थिति एक प्रकारच्या मानसिक दौर्बल्याचीच द्योतक आहे. परंतु हें मानसिक दौर्बल्य थोडयाबहुत प्रमाणांत सर्व जगभर मनुष्यप्राण्यांत विशेषतः त्यांतील बुद्धिमान् व कर्तबगार वर्गांत दृष्टीस पडतें, म्हणून तेवढया गोष्टीबद्दल सज्जन माणसें थोर व्यक्तींची कींवच करतात, हेवा करीत नाहींत. किंबहुना हा सज्जनांचा एक धर्म आहे कीं, तो बाह्यरूपाच्या पलीकडे जाऊन अथवा आंत खोल शिरून त्यांतील तत्त्व व मतितार्थ काय आहे, हें पाहतो व संग्राह्य वाटल्यास तेवढाच भाग ग्रहण करतो, बाकीचा भुसा अथवा खड-

बडीत भाग फेंकून देतो. इंग्रज गृहस्थ अधिकारारूढ असला तरी त्याच्या गार्हस्थ्य गुणांचा प्रभाव आपल्या उपयोगी पडेल, ही बलवत्तर आशा पंडितजी व त्यांचे अनुयायी यांच्या ठिकाणीं उदित झाली होती व जेव्हां चार पांच महिन्यांत आशाभंग होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसावयास लागलीं, तेव्हां त्यांची बुद्धि कुंठित झाली आणि मदतीकरितां म. गांधी यांच्या सहाय्याची त्यांना याचना करावी लागली. ज्या म. गांधींशीं भांडून स्वराज्यपक्षाची त्यांनीं स्थापना केली आणि आपल्या कर्तबगारीवर आणि केवळ कामगिरीवर राष्ट्रीय सभा स्वराज्यपक्षाच्या वर्चस्वाखालीं आणूं, अशा वल्गना सरासरी दोन वर्षांपूर्वी करण्यांत आल्या होत्या, त्याच राष्ट्रीय सभेचीं सूत्रें चालविणारे म. गांधीयांना शरण जाऊन त्यांच्या सहाय्याची याचना पंडितजींना करावीलागली, आणि आजहि स्वराज्यपक्षाचें राष्ट्रीय सभेंतील वर्चस्व म्हणजे या पक्षाच्या कामगिरीचा प्रभाव नसून म. गांधी यांचें अनुपमेय औदार्य व सौजन्य यांचा तो प्रभाव आहे. स्वराज्यपक्षानें राष्ट्राच्या नांवानें मागणी केली आणि मुखानें असहकारिता व एकजात व्यत्यय यांची वटवट सारखी सुरू ठेवून हातांनीं सद्बुद्धीनें सहकार्य केलें. परंतु इंग्रजांचे गार्हस्थ्य गुण त्यामुळें प्रगट झालेले दृष्टीस न पडतां त्यांच्या निष्ठुर वृत्तीचा बेगुमानपणा मात्र त्यांच्या प्रत्ययास आला. या अडचणींत असहकारितेच्या भाषेच्या जोरावर त्यांना म. गांधी यांची प्रार्थना करतां आली; व त्यांनीं प्रसन्न होऊन त्या पक्षाच्या डोक्यावर वरदहस्त ठेविला. व राष्ट्रीय सभेच्या सिंहासनावर विराजमान होण्याचा बहुमान त्यांस अर्पण केला ! मुत्सद्देगिरीचा डाव अधिकाऱ्यांनीं हाणून पाडला, पण म. गांधींनीं त्या पक्षास उचलून धरण्याचें कंकण त्याच वेळीं आपल्या हातास बांधिलें. चढेलपणाच्या भाषेमुळें स्वराज्यपक्षाला आपल्या ध्येयाप्रीत्यर्थ चालू असलेल्या मार्गानें अधिक नेटानें काम करणें कौन्सिलांत राहून शक्य राहिलें नाहीं, असें आम्ही म्हणतों. स्वराज्यपक्षाच्या अध्वर्यूंनीं कौन्सिलचा रथ हांकण्याचें कार्य अंगावर घेतलें, पण शल्याप्रमाणें मुखानें अपशब्दांची लाखोली वाहणें सुरू ठेविलें. यामुळें रथाच्या हांकण्याचा फायदा तेवढा नोकरशाहीस मिळाला परंतु, त्यांजकडून आपलें कार्य करवून घेण्याच्या बाबतींत मात्र आपली फसगत झाली, हें पाहण्याचें त्यांच्या नशिबीं

आलें! एवढेंच नव्हे, तर ज्या कार्यक्रमावर जनतेंत जागृति उत्पन्न करण्याचें दोन वर्षांपूर्वी ठरविलें आणि म. गांधी यांच्या एकांतिक असहकारितेचा बींमोड करण्याची प्रतिज्ञा केली, त्या कार्यक्रमास त्यांना आज एकप्रकारें तिलांजली द्यावी लागली! आणि म. गांधींना शरण जाऊन केवळ त्यांच्या कृपाप्रसादावर आपल्या कर्तृत्वाची पुढची योजना त्यांना तयार करावी लागली.

राष्ट्रीय सभेच्या वतीनें म्हणून जो कार्यक्रम स्वराज्यपक्षीयांकडून पुढें मांडण्यांत येत आहे, तो नीट समजण्याकरितां इतका उपन्यास करणें आम्हांस जरूर वाटलें. हा कार्यक्रम असहकारितेला पोषक म्हणून पुढें मांडण्यांत येत आहे, ही गोष्ट वाचकांनीं नीट लक्षांत ठेविली पाहिजे. पुढच्या निवडणुकी लढविण्याचें कार्य कांग्रेसनें आपल्या अंगावर घेऊन स्वराज्यपक्षीय सभासदांना निवडून आणण्याचा जो विडा उचलेला आहे, तो सुप्तप्राय झालेल्या असहकारितेच्या कार्यक्रमाचें एक अंग म्हणूनच त्यांच्याकडून त्याची कारवाई प्रामुख्यानें व्हावयाची आहे.

कौन्सिलांतील एकजात विरोधक हा आपणांस असहकारितावादी म्हणून म्हणवून घेणार आणि त्याला सुसंगत असा असहकारितेच्या युगांत मुखमान्य झालेला विधायक कार्यक्रम सविनय कायदेभंगाची पूर्ण व आवश्यक तयारी म्हणून करीत राहाणार. पं. मोतीलाल नेहरू यांनीं ता. ८ मार्च रोजीं कौन्सिलामधून उठून येण्याच्यापूर्वी जें लहानसें भाषण केलें, त्यांतील आपल्या मागणीस पोषक असें जनसामर्थ्य आम्ही निर्माण करण्याच्या उद्योगास लागूं, असें मुद्दाम सांगून ठेविलें आहे. परंतु हें सँक्शन किंवा सामर्थ्य म्हणजे विधायक कार्यक्रमाचे लघुरुद्र, महारुद्र किंवा अतिरुद्र यापेक्षां कांहींच निराळें नाहीं, हें ता. ९ मार्चला जी ऑल इंडिया कॉंग्रेस कमेटीची सभा पुढील कार्यक्रमाच्या व आगामी निवडणुकीच्या तयारीचा विचार करण्याकरितां भरली होती, तिचे ठराव लक्षपूर्वक वाचल्यास कोणाच्याहि तावडतोब लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. ते ठराव आणि असहकारितेच्या भरदौडीच्या काळांत आणि बारडोलीमुक्कामीं युद्धसंन्यास केल्यानंतर विशेषतः जे

विधायक कार्यक्रमाच्या प्रसारार्थ ठराव करण्यांत येत होते, ते ठराव जर कोणी ताडून पाहील, तर त्याला असें आढळून येईल कीं, कौन्सिलनिवडणुकींतील यशाचें आमिष पुढें ठेवून म. गांधी यांनीं मोठ्या चातुर्यानें आणि कल्पकतेनें स्वराज्यपक्षीयांस आपल्या अराजकीय कार्यक्रमाचे पुरस्कर्ते केलें आहे. ज्या कार्यक्रमावर अराजकीय आणि अव्यवहार्य हा शेरा राष्ट्रानें गेल्या पांच वर्षांत अनुभवजन्य ज्ञानानें मारलेला आज सर्वत्र दृष्टीस पडत आहे, ज्या कार्यक्रमाच्या अराजकीय स्वरूपास कंटाळून व वैतागून त्याविरुद्ध बंड म्हणून स्वराज्यपक्षाची स्थापना करण्यांत आली, आणि ज्यावर सर्वत्र अव्यवहार्यतेचा छाप मारला जात आहे, हें आपल्या डोळ्यांनीं अहोरात्र पाहण्यापेक्षां कर्तव्यक्षेत्रांतून कांहीं वेळ विश्राम घेणें हेंच म.गांधींस उचित वाटलें, तोच अव्यवहार्य व अराजकीय कार्यक्रम राष्ट्रापुढें मांडून तद्द्वारां जनतारूपी परमेश्वरापासून सविनय कायदेभंग या निर्वाणीच्या अस्त्राची याचना करण्याचा निश्चय राष्ट्रीय सभेनें केलेला आहे ! ! राष्ट्रीय सभेच्या पुढच्या तयारीचा साधा अर्थ स्वराजिष्टांना त्यांनीं कौन्सिलांतून जनहिताचें कांहींहि कार्य न करितां एकजात विरोध करावा म्हणून निवडून आणणें आणि विधायक कार्यक्रमाची 'सविनय कायदेभंगाची पूर्वतयारी' या भपकेदार नांवाखालीं दवंडी देत सुटणें हाच आहे ! गेल्या पांच वर्षांत आलेल्या अनुभवानें ज्यांना मुळींच शहाणें व्हावयाचें नाहीं आणि आपल्या आवडत्या कल्पना आणि पूज्य विभूति यांचा व्यवहार्य–अव्यवहार्य, साध्यासाध्य, शक्याशक्य यांतील फरक इत्यादिकांचा यत्किंचित् विचार न करतां डांगोरा पिटणें हेंच ज्यांना पूज्य कर्तव्य वाटतें, अशा लोकांची छाप आतां राष्ट्रीय सभेवर पूर्णपणें बसलेली आहे. आणि त्यांच्या कच्छपीं लागलेल्या स्वराजिष्टांना आपल्या राजकीय कल्पनांचें व कर्तव्यांचें बलिदान करून या दरवेशाच्या दोरीच्या झटक्याच्या ठोक्याप्रमाणें एखाद्या पाळलेल्या अस्वलासारखें नाचण्याशिवाय दुसरें गत्यंतर नाहीं.

कौन्सिलांतील एकजात विरोधाचें धोरण हें कायदेभंग करण्याचें सामर्थ्य जनतेंत असून तें उपयोगांत आणण्याची तयारी असल्याशिवाय यशस्वी होत

नाहीं, हें तत्त्व कळण्याला स्वराज्यपक्षाच्या अध्वर्यूंना अडीच वर्षें कायदेमंडळांतून काम करून अनुभव घ्यावा लागला, याचें आम्हांला आश्चर्य वाटतें ! हें तत्त्व जर पूर्वीच कळलें होतें, असें म्हणावें, तर कायदेभंगाची तयारी नाहीं म्हणून कौन्सिलांतून प्रवेश करणें जरूर आहे, असा सल्ला देऊन त्यांनीं स्वराज्यपक्षाची स्थापना केली व कौन्सिलप्रवेशाचा कार्यक्रम ठरवून निवडणुकी लढविल्या याचा अर्थ काय ? कौन्सिलांतील मर्यादित सहकार्यतेनें केलेलें काम हें कायदेभंगाच्या प्रवृत्तीस अंशतः पोषक आहे, असें वाटून गेल्या अडीच वर्षांत त्यांनीं आपल्या कामाचें धोरण ठरविलें, असें म्हणावें, तर पुन्हां कौन्सिलांतून बाहेर पडल्यावर 'येरे माझ्या मागल्या' म्हणून विधायक कार्यक्रमाची तळी उचलण्यास लागण्याची यातायात करण्याचें त्यांना काय प्रयोजन ? बरें, कौन्सिलांतील एकजात विरोध अथवा मर्यादित सहकारिता या दोन्हींचा उपयोग जर कायदेभंगाच्या तयारीच्या दृष्टीनें शून्य असेल व हाच जर त्यांचा गेल्या अडीच वर्षांचा अनुभव असेल, तर एकदां कौन्सिलांना रामराम ठोकल्यानंतर त्यांनीं एकजात विरोध, अथवा अधिकारस्वीकारनिषेध अशा तत्त्वावर कां होईना, निवडणुकीची धामधूम पुन्हां करण्याचें प्रयोजन तरी काय ? अथवा या कायदेभंगाची तयारी झाली, तरी कौन्सिलांतून अडवणूक करून फजीत होऊन प्रतिनिधी बाहेर पडल्याशिवाय जनतेंत कायदेभंगाची मोहीम जारी करण्याचा अधिकार पोहोंचत नाहीं किंवा ती मोहीम यशस्वीपणें चालविण्याची ताकद येत नाहीं, अशी कांहीं शास्त्रीय उपपत्ति स्वराजिष्टांच्या अध्वर्यूंनीं बसवून ठेविली आहे काय ? विधायक कार्यक्रमाच्याच जोरावर जर कायदेभंगाची तयारी होऊं शकते, हा स्वराजिस्टांचा विश्वास असला व होता, असें गृहीत धरलें, तर त्यांनीं तीन वर्षांपूर्वीच्या निवडणुकी लढण्याचा तरी उद्योग कां केला व त्यांच्याकरितां राष्ट्रीय सभेनें येत्या सप्टेंबरमध्यें हा उद्योग करावा, असा आग्रह तरी त्यांनीं आतां कां धरावा ? आम्हांला तर या सर्व गोष्टींतून एकच तात्पर्य निघत असलेलें दृष्टीस पडत आहे. स्वराजिष्टांचा कौन्सिलांच्या आंत किंवा बाहेर स्वतःचा कार्यक्रम असा राहिलाच नाहीं. म. गांधी यांचा विधायक कार्यक्रम जो अनुभवानें अव्यवहार्य ठरला आणि

तात्त्विकदृष्ट्या जो अराजकीय आहे, तो त्यांचा कार्यक्रम आहे, व आपल्या या वैगुण्याची जाणीव स्वराज्यपक्षास झाल्यामुळेंच तो क्रमाक्रमानें गेल्या पांचसहा महिन्यांपासून म. गांधींच्या तत्त्वौघाच्या संसर्गांत येऊन हळुंहळूं चिकणमातीच्या ढेंकळाप्रमाणें विरघळावयास लागला, आणि कौन्सिलांतून उठून आल्यानंतर तर आतां पार विरघळून नाहींसा झाला आहे. त्याच्या अस्तित्वाची खूण म्हणजे म. गांधींच्या तत्त्वौघांत जी प्रसन्नता व निर्मळता होती, ती जाऊन त्या ठिकाणीं रजस्वलत्व अर्थात् गढूळपणा दिसत आहे, हीच होय.

# केवळ शेतकऱ्यांच्या हितार्थ*!

[ सन १९२५–२६ च्या हंगामांत यवतमाळ जिल्ह्यांत नापिकी झाली. शेतकऱ्यांस साऱ्याची तहकुबी व उदार हातानें तगाई देणें सरकारचें कर्तव्य होतें. तें न करतां चौथाई दंड बसविणें,तगाईचे अर्ज चौकशी न करतां नामंजूर करणें, असले प्रकार होऊं लागले. हीं गाऱ्हाणीं सरकारच्या कानावर यवतमाळ डिस्ट्रिक्ट असोसिएशननें २१मे १९२६ रोजीं पत्रद्वारें घातलीं.पण हें प्रकरण योग्य मार्गांनीं यावयास पाहिजे, असें मध्यप्रांत सरकारचें उत्तर आलें. तेव्हां डिस्ट्रिक्ट ॲसोसिएशननें हा पत्रव्यवहार तेव्हांचे डेप्युटी कमिशनर मि. राव यांच्याकडे पाठविला. त्यावर त्यांजकडून स्वतःच्या धोरणाच्या समर्थनार्थ एक पत्र १ जुलै १९२६रोजीं असोसिएशनकडे आलें.त्यावर असोसिएशनचे अध्यक्ष लो. ना. श्री.माधवरावजी अणे यांनीं विस्तृत उत्तर लिहून तें सर्व अधिकाऱ्यांकडे ता. ४ आगस्ट १९२६ रोजीं पाठविलें. त्यांतील महत्त्वाच्या भागाचें भाषांतर 'लोकमत' पत्रांत प्रसिद्ध झालें होतें. —सं. ]

## तगाईकरितां रक्कम कमी कां ?

यापुढें मी सविस्तर खुलासा करीत आहें, तो लक्षांत घेऊन आपला या जिल्ह्यांतील गुदस्ताच्या नापिकीसंबंधानें जो ग्रह झाला आहे, तो आपण बदलाल आणि शेतकरीवर्गाच्या सर्वस्वी निःसहाय स्थितींत त्यांना योग्य ती मदत देण्याची गरज आपल्या मनावर बिंबेल, अशी माझ्या असोसिएशनला उमेद वाटते. तगाईच्या प्रश्नासंबंधानें आपण आपल्या पत्रांत मुग्धता धारण केली, याबद्दल माझ्या संस्थेस खेद वाटतो. कारण तें गाऱ्हाणें अतिशय जिव्हाळ्याचें असून ती गोष्ट अत्यंत प्रमुखपणें अधिकाऱ्यांच्या लक्षांत आणण्याची आमची खटपट आहे. आपण आपल्या पत्रांत लिहितां कीं, कमिशनरनें लँड इंप्रुव्हमेंट ॲक्ट् आणि ॲग्रिकल्चरल लोन्स ॲक्ट् या कायद्यांअन्वयें या जिल्ह्यांत खर्च करण्याकरितां ६२५०० रु. ची रक्कम काढून ठेविली. आमचें म्हणणें असें कीं, या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति लक्षांत घेतली असतां ही रक्कम अत्यंत अपुरी होती. कोणत्या

* " लोकमत " यवतमाळ ता. १३–८–२६ व २०–८–२६

अंदाजाच्या भरंवशावर हें अलॉट्मेंट् करण्यांत आलें, याचा खुलासा आपल्या पत्रांत कोठेंहि सांपडला नाहीं. एवढी छोटीशी रकम या जिल्ह्याकरितां राखून ठेवण्याची जबाबदारी या जिल्ह्याच्या डेप्युटी कमिशनरकडे नसून ती वऱ्हाडच्या कमिशनरकडे आहे, असें ध्वनित करण्याचा जर सदरहू पत्राचा रोख असेल, तर १६ मार्च १९२६ रोजीं मध्यप्रांत कौन्सिलांत सरकारतर्फे जो खुलासा करण्यांत आला, त्यांत पुढील मजकूर आढळतो:—

चालू आणि येत्या वर्षांत शेतकऱ्यांना लॅन्ड् इंप्रुव्हमेंट ॲक्ट आणि अग्रिकल्चरल् लोन्स् ॲक्ट या कायद्याअन्वयें द्यावयाच्या रकमा त्या त्या जिल्ह्याच्या डेप्युटी कमिशनरास देण्याची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. या रकमा डेप्युटी कमिशनरांच्या अंदाजाप्रमाणें निश्चित केल्या असून त्यांनीं मागणी केली त्यांत मध्यप्रांत सरकारनें बिलकूल छाटाछाट केली नाहीं आणि यापेक्षांहि जास्त रकमा पाहिजे असल्यास त्यांजकरितां मागणी आल्यावर त्यांचा विचार करण्यांत येईल. डेप्युटी कमिशनरांनीं मागितलेल्या रकमा येणेंप्रमाणें आहेत:—

| जिल्हा | सन १९२५–२६ | सन १९२६–२७ |
|---|---|---|
| अमरावती | ५६७०० | ६५००० |
| अकोला | २२००० | २००००. |
| बुलढाणा | ९५००० | १४५००० |
| यवतमाळ | २५००० | ३५००० |

बियांकरितां १९००० एकूण २८४०००

## हा कृपणपणा डेप्युटी कमिशनरांचाच !

यावरून हें निर्विवाद आहे कीं, ज्या जिल्ह्याकरितां जी रकम मंजूर झाली तिची जबाबदारी त्याच जिल्ह्याच्या डेप्युटी कमिशनरकडे आहे, मध्यप्रांत सरकारकडे नाहीं. एवढेंच नव्हे, तर शेतकऱ्यांच्या मदतीसाठीं आणखी रकमा पाहिजे असल्यास त्या उदार हस्तानें देण्यास मध्यप्रांत सरकार तयार असल्याचें त्यांनीं कौन्सिलांतील खुलाशांत स्वच्छ व निःसंदिग्धपणें आश्वासन दिलें आहे. म्हणून या संस्थेचें आग्रहाचें म्हणणें आहे कीं, आपण १९२५–२६

आणि १९२६–२७ सालाकरितां तगाईच्या रकमा सरकाराकडून मागवून घेतल्या, त्या कोणत्या आधारावर, याचें दिग्दर्शन आपण अंशतः तरी करावयास पाहिजे होतें. त्याचप्रमाणें गेल्या नोव्हेंबरपासून तों मार्चपर्यंत या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची स्थिति बुलढाणा व अमरावती जिल्ह्यांतील शेतकऱ्यांपेक्षां अतिशयच समाधानकारक असल्याचें आपणांस कशामुळें वाटलें कीं, ज्यायोगें एवढीशी छोटी रकम तगाईकरितां मागून घेणें आपणांस योग्य दिसलें? याहि गोष्टीवर प्रकाश पडला असता, तर बरें झालें असतें! खालच्या अधिकाऱ्यांकडून आपणांकडे पिकांसंबंधीं कोणत्याहि प्रकारचे रिपोर्ट आलेले असोत, शेतकऱ्यांच्या दुर्दशेसंबंधानें आपणांस गेल्या डिसेंबरपासूनच जागे करण्यास या संस्थेनें कसूर केला नाहीं. ही वेळ नेमकी अशी होती कीं, तव्हां तुमचें ऑफिस मागावयाच्या तगाईचा आंकडा तयार करण्यांत गुंतलें होतें. या सुमारास म्हणजे १७ डिसेंबर १९२५ रोजीं या असोसिएशननें एक ठराव करून तो प्रांतिक सरकारकडे ता. १८ डिसेंबर रोजीं रवानाहि केला. त्यानंतर १२ जानेवारी १९२६ रोजीं दारव्हा तालुका-असोसिएशननें त्या तालुक्यांतील ४० खेड्यांतील नापिकीकडे लक्ष वेधण्याकरितां सरकारकडे एक तार पाठविली. त्या संस्थेनें केलेल्या ठरावांत असें नमूद करण्यांत आलें होतें कीं, शेतसाऱ्याची माफी अथवा तहकुबी याकरितां त्या खेड्यांतील लोकांचे अर्ज रवाना झाले असतां त्यांच्या स्थितीची चौकशी न करतां मुलकी अधिकाऱ्यांनीं शेतसारावसुलीचें काम सुरू केलें आहे.

## तहकुबी देणें नको म्हणूनच हा आंकडा!

जानेवारीच्या मध्याच्या सुमारास या जिल्ह्यांतील मुलकी अधिकाऱ्यांना हें कळून चुकलें असावें कीं, पिकांचे जे अंदाज खालच्या अधिकाऱ्यांकडून आले ते समाधानकारक नाहींत. म्हणूनच कीं काय १२ फेब्रुवारी १९२६ च्या सी. पी. गॅझेटांत या जिल्ह्यांतील पिकाच्या आणेवारीचा आंकडा १० आण्यांवरून ७ आण्यांवर उतरविण्यांत आला. या संबंधांत या असोसिएशनला असें विधान करावयास मुळींच संकोच वाटत नाहीं कीं, ज्या माफीतहकुबीकरितां शेतकऱ्यांनीं ओरड चालविली होती, ती त्यांना वस्तुतः देण्या-

सारखी परिस्थिति नाहीं, हें दाखविण्याकरितांच हा ७ आण्यांचा आंकडा नमूद केला असावा ! हा जो एक आणा 'हातचा' म्हणून राखून ठेवण्यांत आला, त्यांत हाच उद्देश असला पाहिजे. कारण तो आंकडा ६ आण्यांचा दिला असता, तर तहकुबीच्या नियमांअन्वयें शेतकऱ्यांना तहकुबी देणें भाग पडलें असतें !

## तहकुबी नाहीं, पण मग तगाई कां नको ?

तथापि हाहि ७ आण्यांचा आंकडा घेऊन चाललें कीं, ज्याच्या आधारावर डेप्युटी कमिशनरनें माफी-तहकुबीचे अर्ज भराभर फेंकून दिले, तरी याहि आंकड्यांवरून डेप्युटी कमिशनरनें अशी कल्पना करावयास पाहिजे होती कीं, यद्यपि नियमाअन्वयें तहकुबी देतां येत नाहीं, तथापि शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर तगाईच्या रकमा देण्यास भरपूर आधार आहे. तहकुबी किंवा माफी देणें हें शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिति व पुढील सालीं शेती करतां येण्याची त्यांची शक्ति यांवर अवलंबून असतें. पण यावेळीं कापसाच्या किंमती कल्पनेपेक्षांहि जास्त उतरल्या, हें डेप्युटी कमिशनर यांनीं लक्षांत घेतलें असतें, तर जो ७ आण्यांचा आंकडा दिसतो, त्याची किंमत वस्तुतः ४ आण्यांपेक्षांहि कमी आहे, हें त्यांना कळावयास पाहिजे होतें. गेल्या पांच वर्षांत ज्याचा या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांशीं थोडाबहुत संबंध आला असेल, त्याला हें सहज समजावयास पाहिजे कीं, यंदाच्या कापसाच्या किंमतींत शेतीस लागलेला खर्चहि भरून निघणें शक्य नव्हतें ! म्हणून या संस्थेचें म्हणणें आहे कीं, डेप्युटी कमिशनर यांनीं पिकाचा अंदाज १० आण्यांवरून ७ आण्यांवर आणिला, तेव्हांच त्यांनीं मध्यप्रांत सरकारकडे तगाईकरितां बऱ्याच मोठ्या रकमेची मागणी करावयास पाहिजे होती.

## विद्यमान डेप्युटी कमिशनर यांची अनास्था

पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं, या जिल्ह्यांत १९२५–२६ सालाकरितां २५००० रुपये आणि १९२६–२७ सालाकरितां ३५००० रुपयेच ॲलॉट करून घेण्यांत आले. गेल्या पांच वर्षांची सरासरी काढली, तर त्याहिपेक्षां हा आंकडा कमी आहे, असें दिसेल.

| साल | अग्रिकल्चरल् लोन्स | लॅंड इंप्रुव्हमेंट लोन्स | एकुण |
|---|---|---|---|
| १९१७–१८ | ९३३७ | २४८६३ | ३४२०० |
| १९१८–१९ | १९६४५१ | ४१३८५ | २३७८३६ |
| १९१९–२० | ३३००० | ५७००० | ९०००० |
| १९२०–२१ | २६५०० | ९०५०० | ११७००० |
| १९२१–२२ | ८५००० | ४०००० | १२५००० |
| १९२२–२३ | ३१००० | १३९०० | ४४९०० |
| १९२३–२४ | २४००० | १२२०० | ३६२०० |
| १९२४–२५ | १३००० | ११००० | २४००० |

सन १९२४–२५ सालापासून या सदराखालीं जर पूर्वीपेक्षां कमी रकमा मंजूर करून घेण्यांत आल्या असतील, तर त्यांची जबाबदारी हल्लींचे डेप्युटी कमिशनर मि. राव यांच्याकड आहे व यावरून शेतीचा धंदा सुधारणें अथवा शेतकी वर्गाच्या हितार्थ झटणें या बाबतींत त्यांचें असावें तेवढें लक्ष नाहीं, हें उघड आहे ! तथापि असें असलें तरी शेतकऱ्यांवर प्रसंग येईल, तेव्हां तरी हे डेप्युटी कमिशनर आपल्या आवडीनिवडी विसरून त्यांच्या मदतीस धांवतील, अशी या संस्थेची कल्पना झाली होती. पण काय!

## डोळे असतील तर सहज दिसेल !

फेब्रुवारी १९२६ च्या अखेरीस तर पिकांची व शेतकऱ्यांची स्थिति हा नुसता अंदाज करावयाचा विषय राहिलेला नव्हता, तर परमेश्वरानें ज्याला डोळे दिले आहेत, त्यांना पाहण्यासारखी व ज्यांना कान दिले आहेत, त्यांना ऐकण्यासारखी ती स्थिति होती !

या नापिकीमुळेंच को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांपासून सेंट्रल बँकांना आपल्या रकमा वसूल करतां आल्या नाहींत. उलटपक्षीं सोसायट्यांकडून कधीं नव्हती एवढी कर्जाकरितां मागणी होऊं लागली. शेतांच्या खाजगी रीतीनें झालेल्या विक्रया असोत, कीं त्यांचे जाहीर लिलांव असोत, त्यांच्या किंमती एकाएकीं उतरल्या. इंपीरियल बँकेवर कर्जाच्या भयंकर मागण्या होऊं लागल्या, कॉटन मार्केटमध्यें येणाऱ्या कापसाच्या गाड्यांची संख्या उतरली,

व्याजाचे दर वाढले. या सर्व गोष्टी शेतकऱ्याच्या दुर्धर स्थितीचीच साक्ष देत आहेत. जर जिल्हाधिपतींनीं या सर्व स्थितीची स्वतः सूक्ष्मपणें चौकशी करण्याचें मनावर घेतलें असतें, तर तसें करणें त्यांना मुळींच अवघड नव्हतें. पण अशी अडचण पडली असावी कीं, आपण एकदां जें मत पक्कें बनविलें, तेंच घट्ट धरून ठेवण्याचा अभिनिवेश त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाला असावा. आणि यानंतर या प्रश्नाकडे शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें पाहण्याऐवजीं डिस्ट्रिक्ट ऑफिसर या नात्यानें माझा बोज–प्रेस्टिज–कसा राहील, याच दृष्टीनें त्यांनीं पाहिलें असावें.

## सहानुभूतिशून्य जिल्हाधिपति !

यंदा या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची एवढी विपन्नावस्था असतां उमरावती व बुलढाणा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांपेक्षां त्यांची स्थिति जास्त चांगली आहे, असा डेक्कन कमिशनर यांचा समज दिसतो, पण तो कोणत्या आधारावर, हें त्यांचें तेच जाणोत ! वऱ्हाडच्या चारहि जिल्ह्यांत थोडेंबहुत राहिल्याचा ज्याला अनुभव आहे, त्याच्या लक्षांत हें आल्यावांचून राहात नाहीं कीं, सामान्य म्हणजे नापिकी नाहीं अशाहि सालांत या जिल्ह्यांतील सामान्य शेतकऱ्यांची स्थिति बरीच कमी दर्जाची व कनिष्ट असते. हें ध्यानांत धरलें म्हणजे तर नापिकीच्या सालांत इतर जिल्ह्यांपेक्षां या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा सरकारपासून जास्त मदत घेण्याचा हक्क असतो, हें सहज कळण्यासारखें आहे. सामान्य सालांतसुद्धां येथील शेतकऱ्याला खर्चाची तोंडमिळवणी करतांना नाकीं नव येतात ! आणि असल्या नापिकीच्याहि वर्षीं डेप्युटी कमिशनरजवळ तगाईकरितां द्यावयाच्या रकमा एवढ्या कमी असतात, हें त्यांना दिसलें म्हणजे जिल्हाधिकाऱ्यांच्या मनांत आपणांविषयीं असावी तेवढी सहानुभूति वसत नाहीं, असा त्यांचा ग्रह झाला, तर त्यांत आश्चर्य कोणतें ?

## स्थानिक अधिकाऱ्यांची असहायता !

शेतकऱ्यांकडून सारातहकुबीकरितां व तगाईकरितां पांचहि तालुक्यांतून एकंदर किती अर्ज आले, तगाईकरितां मागितलेल्या रकमांची बेरीज काय,

त्याचप्रमाणें मागणी केलेली रक्कम पूर्णतः किंवा अंशतः दिली असल्यास असे अर्ज किती, जूनअखेरपर्यंत वाटण्यांत आलेली तगाईची रक्कम केवढी, इत्यादि तपशिलांचा सविस्तर खुलासा आपल्या पत्रांतून होईल, अशी या संस्थेस अपेक्षा होती, पण ती सफल झाली नाहीं! असे तपशील खुलासेवार दिले असते, तर हें उघड झालें असतें कीं, स्थानिक अधिकाऱ्यांना तगाईचे अर्ज फडाफड नामंजूर करण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. कारण द्यायला रक्कमच जवळच नाहीं, तर ते अर्ज तरी कसे मंजूर करणार? अथवा अमक्याला भरपूर तगाई द्यायला पाहिजे, असें यद्यपि त्यांना दिसलें असलें, तरी त्यांना योग्य ती रक्कम भरपूर तर राहोच पण मुळीं देणारच कोठून? द्यायला जवळ पैसा नसल्यावर असले अर्ज नामंजूर करायला सबब सांगण्याची अडचण ती कोणती? आलेले अर्ज तगाई देण्यास जे पात्र नाहींत अशा इसमांकडूनच सामान्यतः आले, हें सिद्ध करण्याकरितां डेप्युटी कमिशनर यांनीं कांहीं उदाहरणें दिलीं आहेत पण—

## मत बदलण्याचें संकट पडलें!

या मुद्द्यावर ही संस्था आग्रहानें असें म्हणते कीं, असलें विधान सर्वसामान्यपणें करण्याएवढी योग्य आणि काळजीपूर्वक चौकशी खचित करण्यांत आली नसली पाहिजे. जे अनेक अर्ज तगाईकरितां देण्यांत आले आणि एका तालुक्यांत तर असल्या अर्जांची संख्या शेंकड्यांनीं मोजण्याएवढी आहे म्हणतात, त्यांपैकीं फारच थोडे अर्जदार-ज्यांची संख्याहि लक्षांत घेण्यासारखी नाहीं—तगाई देण्यास लायक होते, असें जें डेप्युटी कमिशनर यांचें म्हणणें आहे, तें या संस्थेस बिलकूल पटण्यासारखें नाहीं. हा जो सर्वसामान्य सिद्धांत ठोकून देण्यांत आलेला आहे, तो काळजीपूर्वक केलेल्या चौकशींचा निष्कर्ष म्हणून नव्हे, तर योग्य चौकशी न केल्याचा परिणाम आहे आणि चौकशी कां नाहीं, तर हातांत पैसा नाहीं म्हणून व प्रांतिक सरकारकडे जास्त पैसे मागावयाचें कशाच्या आधारावर, याचें जिल्हाधिपतीस संकट पडलें म्हणून. या संस्थेला पक्कें माहीत आहे कीं, असे कित्येक अर्जदार आहेत, ज्यांना त्यांच्या अर्जाचा निकाल करण्यापूर्वी त्यांना कांहीं

विचारपूसहि करण्यांत आलेली नाहीं. मनांत असतें तर वाटेल त्या तऱ्हेची चौकशी करण्याइतकी मनुष्यसामुग्री मुलकी अधिकाऱ्यांपाशीं जय्यत तयार असते. जर समाधानकारक रीतीनें चौकशी करण्यांत आली, किंबहुना वर्तमानपत्रांस व या संस्थेच्या प्रतिनिधींस हजर राहतां येईल, अशा रीतीनें ती जर केली, तर तगाईकरितां करण्यांत आलेल्या अर्जांपैकीं शेंकडा ९० अर्जदारांची स्थिति तगाई देण्यास योग्य आहे, असें दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं.

## कागदी घोडे नाचविण्यांत न्याय नाहीं

हल्लींच्या सुधारणा अस्तित्वांत आणतांना अशी एक आशा दाखविण्यांत आली होती कीं, डिस्पॅच आणि रिपोर्ट यांच्या द्वारें म्हणजे जड निर्जीव कागदांच्या साधनांनीं राज्यकारभार करण्याची पद्धत शक्यतोंपर्यंत नष्ट केली जाईल व तिच्या जागीं लोकप्रतिनिधींच्या द्वारें जिवंतपणाची राज्यव्यवस्था सुरू करण्यांत येईल. हें विधान खरें असल्यास या संस्थेचें मत असें आहे कीं, जिल्ह्यांतील कनिष्ट दर्जाच्या मुलकी अधिकाऱ्यांनीं व त्यांच्या हाताखालच्या नोकरांनीं खेडापाडीं जाऊन तेथील शेतकऱ्यांना विश्वासांत घेऊन त्यांच्या साहाय्यानें व सल्लामसलतीनें त्यांनीं चौकशी करण्याविषयींचें फर्मान डेप्युटी कमिशनर यांनीं सोडावयास पाहिजे होतें. नुसत्या कागदपत्रांनीं कारभार न्यायाचा तर होत नाहींच, पण त्यावर लोकांचा विश्वासहि बसत नसतो.

## अर्थ करण्याची आकुंचित दृष्टि

डेप्युटी कमिशनर यांचें असें म्हणणें आहे कीं, कायद्यांत नोकरांचे पगार देणें हें तगाई देण्याचें योग्य कारण मानितां येत नाहीं, पण त्या कायद्याच्या अर्थासंबंधानें ही अत्यंत आकुंचित दृष्टि होय. या दोन्ही कायद्यांमध्यें अमुक अर्जदार मोठ्या जमीनीचा मालक किंवा दुसरा छोटासा शेतकरी असा त्यांच्यामध्यें भेद केलेला नाहीं. इजारदार हा एक बडा शेतकरी असून नापिकीच्या सालांत इतर छोट्या शेतकऱ्यांप्रमाणें त्याच्याहि नाकातोंडांत पाणी जातें. नव्हे, त्याचें नुकसान उलट जास्त असतें. कारण कुळांकडून व्हावयाचा तो त्याचा वसूल होत नसतो आणि त्याला मात्र सरकारचें देणें पूर्ण भरावें लागत असतें. म्हणून छोटा बडा असा भेद मुलकी अधिका-

त्यांनीं न करतां, अर्जदारानें मागितलेली तगाई शेती सुधारण्याकरितां अगर शेतीची मशागत करण्याकरितां पाहिजे आहे कीं नाहीं, याची चौकशी करणें हेंच मुलकी अधिकाऱ्यांचें पाहणें असावयास पाहिजे. यंदाचें साल असें कांहीं विलक्षण आहे कीं, सावकारांना वसूल मिळाला नाहीं आणि घरच्या शेतीचें उत्पन्न पुढील हंगामाची तयारी करण्यास अपुरें पडलें, अशी स्थिति असतां ज्यांना 'सावकार' म्हणून म्हणतात व ज्यांना 'सावकार' म्हणूनच तगाई देण्याचें नाकारण्यांत आलें, तेहि कायद्याप्रमाणें तगाई घेण्यास वस्तुतः पात्रच होते. सरकारी चौकशीचे कागदपत्र व त्यांतील तपशील असोशिएशनजवळ नसल्यामुळें या संबंधांत मला ज्यास्त कांहीं लिहितां येत नाहीं, पण डेप्युटी कमिशनर यांच्या पत्रांतील पुढील वाक्यें वाचून मी थक्क झालों. डेप्युटी कमशनर लिहितातः—

## सत्यास सोडून डेप्युटी कमिशनर यांचें विधान

"तगाईकरितां अर्ज करणारांत कित्येक तक्रारी करणारे असून त्यांना त्या रकमा सरकारपासून स्वस्त दरानें घेऊन आपल्या कुळांना भारी व्याजाच्या दरानें द्यावयाच्या होत्या! एक ढोबळ उदाहरण म्हणजे जवळें येथून तगाईचे दोनच अर्ज होते व तेहि त्या गांवांतील मोठ्यांत मोठ्या सावकारांचे होत"!

डिस्ट्रिक्ट असोसिएशननें यासंबंधांत काळजीपूर्वक चौकशी केली असल्यामुळें मी निश्चितपणें सांगूं शकतों कीं, जवळ्याच्या "सावकारांवर" जो आरोप करण्यांत आलेला आहे, त्याला किंचितहि आधार नाहीं. पहिली गोष्ट अशी कीं, जवळ्याहून फक्त दोनच अर्ज आले, हें विधान सत्यास सोडून आहे. त्या गांवांतून दोनच अर्ज गेले, नसून कमींत कमी १५ अर्ज गेले आणि त्या गांवांतून ज्यांनीं अर्ज केले, त्यांत तेथील मोठ्यांत मोठ्या सावकारांचे अर्ज गेले होते, हेंहि म्हणणें खरें नाहीं!! त्या गांवीं दोघेजण इनकमटॅक्स देणारे असून तेच मोठ्यांत मोठे सावकार आहेत हें खरें. चौकशीअंतीं असें कळतें कीं, या दोघांपैकीं फक्त एकानेंच तगाईकरितां अर्ज केला होता. आणि त्याला हे पैसेहि व्याजानें इतर कुळांस द्यावयाचे होते, या म्हणण्यास

आधार नाहीं. तगाई कशाकरितां पाहिजे, याचा त्यानें आपल्या अर्जांत खुलासा केला होता; आणि दारव्ह्याच्या तहसीलदारापुढें केलेल्या कैफियतींत त्यानें शेतीच्या दुरुस्तीचे वगैरे तपशील सादर केले होते. पण त्याच्या विधानांच्या सत्यतेची चौकशी करण्याकरितां एक देखील मुलकी अधिकारी चौकशीस गेला असेल तर शपथ! जी गोष्ट या "सावकारा"ची तीच इतरहि अर्जदारांची! जें उदाहरण तगाईच्या अपव्ययाचें म्हणून डेप्युटी कमिशनर यांनीं दिलें, त्यावरून जर कांहीं सिद्ध होत असेल, तर तें हें कीं, दारव्हा तालुक्यांतील मुलकी अधिकाऱ्यांनीं तगाईच्या अर्जाची चौकशी केली, ती अत्यंत हलगर्जीपणाची होती!

## कायद्याच्या मूलभूत उद्देशावर गदा!

इजारदार व सावकारवर्ग हा सावकारी करणारा असल्यामुळें त्यांना नापिकीच्या सालांत शेती करणें मुष्कील असलें, तरी त्यांना कायद्याअन्वयें तगाई देतां येत नाहीं, हा जो सिद्धांत डेप्युटी कमिशनर यांनीं काढला आहे, तो या संस्थेस मान्य होऊं शकत नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे. आमच्या मतें कायद्यांतील शब्दांची योजना एवढी व्यापक आहे कीं, शेतकऱ्याला शेतीसंबंधानें जी जी अडचण येत असेल, तिचें निवारण करण्याकरितां कायद्याअन्वयें तगाई देतां येते. कायद्यांतील शब्दांचा अर्थ प्रांतिक सरकारनें त्याखालीं केलेल्या नियमानें संकुचित होऊं शकत नाहीं. या कायद्याचा हेतू, सावकाराची जागा सरकारनें भरून काढावी, असा नाहीं हें खरें; तथापि आम्हांला असें म्हणावयास मुळींच संकोच वाटावयाचें कारण नाहीं कीं, अत्यंत तीव्र अशा अडचणींत सांपडल्यामुळें शेतकऱ्याला सावकाराच्या घरांत खेंचून पाठवावें व त्याला परवडणार नाहीं, असा भारी व्याजाचा दर द्यावयास भाग पाडून वर त्याला आपली जिनगानीहि गहाण लिहून द्यावयास लावावी, असा या कायद्याचा उद्देश खचित नाहीं. यंदा तगाईचे अर्ज सरसहा नामंजूर करीत सुटण्याचा परिणाम हाच झाला आहे कीं, शेतकऱ्याला सावकाराकडे गेल्यावांचून गत्यंतर नाहीं, आणि तेंहि सावकार असे कीं, ज्यांचा डोळा आपल्या व्याजाची रक्कम वसूल करण्यापेक्षां गहाण लिहून

घेतलेली जिंदगी आपल्याला कशी पचवितां येईल, इकडेच असतो. असल्या संकटांपासून शेतकऱ्याचा बचाव करणें हा या कायद्याचा उद्देश खचित आहे आणि जो मुलकी अधिकारी त्याचा हा अर्थ जाणत नाहीं, तो इन्साफ तर योग्य प्रकारें देत नाहींच, पण कायद्याचा मूळ उद्देश विफल करतो, असें म्हटलें पाहिजे.

असोसिएशनला अजूनहि थोडीबहुत आशा आहे कीं, डेप्युटी कमिशनर याउपरहि तगाईच्या मोठ्या रकमा मागवून घेतील. तसें झाल्यास त्यांना औदार्याचें व न्यायदानाचें श्रेय मिळेल. आजची वेळ शेतकऱ्याला एवढी निकडीची आहे कीं, त्याला एक रुपया मिळाला तरी तो बहुमोल वाटतो आणि आज त्याच्या हातांत पडणारा पैसा तो शेतीच्याच कामास लावील, याबद्दल शंका नको.

## तगाई देतांना धडधडीत पक्षपात !

डिस्ट्रिक्ट असोसिएशनच्या माहितीप्रमाणें वणी तालुक्यांतून तगाईकरितां ६४ अर्ज करण्यांत आले, त्यांपैकीं फक्त १६ अर्ज मंजूर झाले असून त्यांनीं मागितलेली रकम फक्त अंशतःच देण्यांत आलेली आहे. केळापूर तालुक्यांत मुलकी अधिकाऱ्यांनीं जी चौकशी केली, ती डेप्युटी कमिशनर यांना समाधानकारक वाटते असें दिसतें; पण या संस्थेचें असें मत आहे कीं, ज्या रिपोर्टांत तगाईकरितां आलेल्या अर्जांपैकीं शेंकडा ५० अर्ज पोरकटपणाचे Frivolous आहेत असें म्हणण्यांत आलें आहे, त्या रिपोर्टसंबंधानें व अर्जसंबंधानें डेप्युटी कमिशनर यांनीं स्वतः चौकशी करावयास पाहिजे होती. केळापूर तालुक्यांतील अनेक अर्जदारांकडून आम्हांस कळतें कीं, त्यांनीं अर्ज दाखल केल्यानंतर मुलकी अधिकाऱ्यांकडून त्यांजकडे या संबंधांत कांहींएक चौकशी करण्यांत आली नाहीं. यावरून हें उघड दिसतें कीं, मुलकी अधिकाऱ्यांनीं केली असल्यास ही चौकशी एकतर्फी केली असावी. ज्या पाटीलपटवाऱ्यांचे अर्ज सढळपणानें मंजूर करण्यांत आलेले आहेत, अशा कांहीं पाटीलपटवाऱ्यांच्या संमतीनें अगर सल्ल्यानें बाकीचे अर्ज नामंजूर करण्यांत आले असतील, असें यावरून म्हणावें लागतें ! आम्हाला विश्वस-

ऱ्हीय माहितीवरून कळतें कीं, यवतमाळ तालुक्यांतील कोठा येथून कमींत कमी १५ अर्ज तगाईकरितां करण्यांत आले होते, त्यांपैकीं एकाला १०० आणि दुसऱ्याला १५० अशी फक्त दोघांनाच तगाई देण्यांत आली आणि हे भाग्यवंत अर्जदार कोण ? तर तेथील पाटील आणि पटवारी !!

## असोसिएशनचे आभार माना ! चिडूं नका !

डेप्युटी कमिशनर मि.राव यांनीं आपल्या पत्रांत जे आरोप व विधानें या संस्थेविरुद्ध केलीं आहेत, त्यांचा गंभीरपणानें विचार करण्याची आवश्यकता आम्हांस वाटत नाहीं. डिस्ट्रिक्ट असोसिएशननें तगाईचे अर्ज छापून शेतकऱ्यांना वाटले, अशी डेप्युटी कमिशनर यांनीं याबद्दल तक्रार केलेली आहे. यावर आमचें एवढेंच म्हणणें आहे कीं, मि. राव यांनीं १८८३ चा लॅन्ड् इंप्रुव्हमेंट लोन्स् ॲक्ट कलम १० खालीं केलेल्या नियमांपैकीं नियम १ पाहावा (वेरार रेव्हेन्यू मॅन्युअल २). या नियमांत असें म्हटलें आहे कीं:—

“ तगाईच्या अर्जांचे छापील नमुने शेतकऱ्यांस सर्व तहसिलीमधून मोफत दिले जातील; आणि जेव्हां जेव्हां रेव्हेन्यु इन्स्पेक्टर दौऱ्यावर जातील, त्यावेळीं मागणी असल्यास त्यांनीं हे छापील अर्ज गरजवंत शेतकऱ्यांना दिले पाहिजेत. ”

म्हणून ज्या खेड्यांतील लोकांना गेल्या हंगामांत असले अर्ज करण्याची जरूरी पडली, त्या खेड्यांतील शेतकऱ्यांना ते फुकट वाटण्याची व्यवस्था करण्याबद्दल डेप्युटी कमिशनर यांनीं खालच्या अधिकाऱ्यांस हुकूम सोडिले होते कीं काय, हें या संस्थेला कळेल तर फार चांगलें होईल! असोसिएशनची अशी कल्पना आहे कीं, गेल्या हंगामांत एकाहि खेड्यांतील एकाहि शेतकऱ्याला तगाईचा अर्ज करण्याची जरूरी आहे, असें मुलकी अधिकाऱ्यांस वाटलें नसावें ! या विधानांतील मर्म जर लक्षांत आलें असेल, तर या संस्थेनें शेतकऱ्यांची जी सेवा त्यांना मोफत अर्ज पुरवून बजावलेली आहे, तिजबद्दल डेप्युटी कमिशनर यांनीं असोसिएशनचे आभारच मानावयास पाहिजेत. चिडखोरपणा व संताप यांचा अवलंब करून त्यांनीं जे टोमणे मारूं पाहिले आहेत आणि जणों काय आपलें वर्तन शुद्ध न्यायीपणाचें व निर्दोष असून

असोसिएशननेंच आपणांवर निष्कारण मारा केला आहे, असें जें त्यांनीं आपल्या पत्रांत दर्शविलें आहे, त्याची कांहींएक जरूरी नव्हती !

### बेलाशक सक्त उपाय योजा !

डेप्युटी कमिशनर मि. राव यांचें सबंध पत्र व विशेषतः त्यांतील चौथाई दंडासंबंधाचा भाग म्हणजे शुष्क पांडित्याचा एक नमुना आहे ! त्यांत मि. राव यांनीं आपल्या विरुद्ध खात्रीनें निकाल होणाऱ्या मुकदम्यांतील वकीला-सारखें चातुर्य प्रकट केलें आहे. आपणांकडे एका जिल्ह्याचा कारभार असून तो करतांना अंतःकरणांत सहानुभूति व औदार्य धारण करून समत्वबुद्धीनें व लोकांच्या कल्याणास पोषक अशाच रीतीनें कायद्याचे अर्थ केले पाहिजेत, या गोष्टीचें त्यांना भान राहिलें नसावें, असें त्यांच्या ह्या पत्रा-वरून दिसतें. डेप्युटी कमिशनर यांनीं या संबंधांत केवढाहि जोराचा व संतापयुक्त निषेध केलेला असला, तरी आम्हांला पुनश्च खेदयुक्त अंतःकर-णानें हें म्हणणें अवश्य आहे कीं, गेल्या ५० वर्षांत शेतसाऱ्यांच्या बाबतींत करण्यांत आली नाहीं, एवढी सक्ति या वर्षी करण्यांत आली ! डेप्युटी कमि-शनर यांनीं शक्य त्या तऱ्हांनीं बारकाईची चौकशी केल्यानंतर शेतकऱ्यांच्या स्थितीसंबंधानें जें आपलें मत बनविलें आहे, तें चुकीचें असल्याचें आम्ही सप्रमाण सिद्ध करूं शकतों, असा आम्हांस विश्वास वाटत आहे. डेप्युटी कमिशनर यांच्या मनांतून एक संकट त्याच्या उद्भवापूर्वीच उन्मळून टाकावयाचें होतें. आणि या चिंतेच्या आवेशांत त्यांनीं आपल्या हाता-खालच्या मुलकी अधिकाऱ्यांस हेतुपुरःसर असे हुकूम सोडिले कीं, लॅन्ड् रेव्हेन्यु कोडमध्यें असणाऱ्या कसल्याहि कडक उपायांची अंमलबजावणी करण्यास मागें पुढें पाहूं नका ! कांहीं शेलक्या विवक्षित व्यक्तींविरुद्ध हे कडक उपाय योजिले, त्यामुळें सारा जिल्हाभर दहशत उत्पन्न झाली आणि प्रत्येक शेतकरी त्याची पराकाष्ठेची असहाय्यता होती, तरी कोठून तरी व म्हटल्या त्या अटी कबूल करून पैसा जमा करून भराभर सरकारदेणें देत सुटला. यंदाचा शेतसारा वसूल करण्याबाबत मुलकी अधिकाऱ्यांनीं एवढें उग्र रूप कां धारण केलें याचें वरीलशिवाय दुसरें कारण संभवनीय दिसत नाहीं !

## मि. राव यांचा वज्रलेप निर्णय !

डेप्युटी कमिशनर यांच्या म्हणण्याचा रोख असा दिसतो. ज्याअर्थी यंदा कोणाहि शेतकऱ्यास शेतसाऱ्याची तहकुबी अथवा माफी द्यावयास नको, असा आम्ही निर्णय केला आहे, त्याअर्थी सगळ्या जिल्ह्यांतला शेतसारा ठराविक तारखेपूर्वी सरकारच्या खजिन्यांत येऊन पडला पाहिजे. अर्थात् शेतकऱ्याला हा पैसा देण्याचें सामर्थ्य आहे कीं नाहीं, याचा विचार ते कशाला करणार ! कनिष्ट अधिकाऱ्यांकडून आलेल्या रिपोर्टावर त्यांनीं आपलें मत ( finding ) बनविलें व त्या अन्वयें शेतकऱ्यास कोणतीहि मदत द्यावयाची नाहीं, हा त्यांचा वज्रलेप निर्णय ! संस्थेचें मत डेप्युटी कमिशनर यांच्या मताहून वर निर्दिष्ट केलेल्या कारणांकरितां भिन्न असल्यामुळे त्यांच्या मतें डेप्युटी कमिशनर यांनीं यंदा शेतसारा वसूल करण्याच्या बाबतींत एवढी सक्ती करावयास नको होती !

## अनेक सक्तीचे उपाय एकदम कां ?

या संस्थेचें मत असें आहे कीं, ११९ कलमाखालीं शेतसारा वसूल करण्याच्या ज्या कारवाया एकापुढें एक सांगण्यांत आल्या आहेत, त्यांतील एकापेक्षा जास्त कारवाया एकसमयावच्छेदेंकरून अमलांत आणावयास तशीच कांहीं विलक्षण अपवादात्मक परिस्थिति म्हणजे ऐपत असूनसुद्धां शेतसारा न भरण्याचा कुळाचा निश्चय असावयास पाहिजे. एरव्हीं एकाच वेळीं दोन उपायांचा अवलंब करितां येत नाहीं आणि या कायद्याचें हें मर्म असल्यामुळेंच गेल्या ३० वर्षांत डेप्युटी कमिशनर यांनीं या कलमाखालील अधिकाराचा फारच जपून उपयोग केलेला आहे. 'may' या शब्दाचा या कलमांत मुद्दाम उपयोग करण्यांत आलेला आहे. त्याचा हाच उद्देश कीं, ह्या कारवाया करतांना डेप्युटी कमिशनर यांनीं अत्यंत समतोलपणाचा व तारतम्यबुद्धीचा उपयोग करावयास पाहिजे. असें असल्यामुळें यंदा या जिल्ह्यांतील मुलकी अधिकारी व खुद्द डेप्युटी कमिशनर यांनीं शेतकऱ्याची स्थिति पूर्णपणें समजावून न घेतां शेतसारा देण्याची तारीख टळतांच त्यांना दंड करणें, त्यांचीं शेतें जप्त

किंवा सरकारजमा करणें, किंबहुना त्यांना कैदहि करणें, असे उपाय योजिले, हें मोठ्या कष्टानें नमूद केल्याशिवाय राहवत नाहीं. १२१ कलमाखालीं प्रोसेस काढून डेप्युटी कमिशनर यांना शेतसारा एवढ्याच वेळांत वसूल करतां आला असता ! आणि अशा रीतीनें लोकांच्या ओरडीस जागा न देतां जर हें काम करतां येतें, तर असल्या कडक उपायांचा अवलंब करण्याची जरूरी काय ?

## प्रथम अज्ञानी, मागाहून दुराग्रही !

डेप्युटी कमिशनर यांना यंदाची शेतकऱ्यांची व ज्यांना धनत्तर जमीनदार म्हणून म्हणतात, त्यांची हलाखीची स्थिति यथार्थपणें समजलीच नाहीं! त्यांना जर तिची थोडीदेखील कल्पना असती, तर एवढ्या कडक उपायांचा अवलंब त्यांनीं आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांस खचित करूं दिला नसता. खरी गोष्ट अशी आहे कीं, प्रथम त्यांना कळलें नाहीं आणि मागाहून नवीन ज्ञान ग्रहण करावयाचें नाहीं, असा त्यांचा दुराग्रह दिसतो.

## ही बुद्धिपुरस्सर टाळाटाळी नव्हे !

शेतकऱ्यांना 'वुइल्फुल् डिफॉल्टर' म्हणजे बुद्धिपुरस्सर शेतसारा देण्याचें टाळणारा असें म्हणणें म्हणजे शब्दांचा दुरुपयोग करणें होय व हें सिद्ध करावयास कित्येक उदाहरणें देतां येतील. एका शेतकऱ्यानें पहिल्या हप्त्याच्या तारखेपूर्वींच ५०० पेक्षां जास्त शेतसारा भरून टाकला होता. त्यानें बाकीचे शें–सवाशें रुपये देण्याचें मुद्दाम टाळलें असेल, हें खरें मानणें अशक्य आहे. शेतकरी आधींच नापिकीनें त्रस्त होऊन गेलेला होता आणि त्यांत हे सवाईचे दंड म्हणजे जखमेवर वारच झाले ! मोठी इस्टेट म्हणजे रोख द्रव्य होय, असें समजणें चुकीचें आहे. आणि एकदां द्रव्याची टंचाई उत्पन्न झाली कीं, मोठ्या इस्टेटवाल्या माणसाची जास्तच त्रेधा उडते. कारण त्याला जुनें कर्ज फेडतां येत नाहीं व त्यामुळें सावकारापासून नवीन कर्ज मिळणें मुष्कील होतें, आणि याच कारणामुळें कित्येक मोठमोठ्या शेतकऱ्यांना यंदां वेळेवर शेतसारा भरतां आला नाहीं. दुसरी एक अडचण अशी कीं, सारा

वसूल करणाऱ्या पटवाऱ्याकडे एकापेक्षां जास्त खेडीं असतात व तो एकेका गांवाकरितां सारावसुलीचा दिवस मुक्रर करीत असतो. पटवारी नसला, तर पाटील सारा घेत नाहीं. पटवारी येण्याच्या दिवशीं कर्मधर्मसंयोगानें एखादा शेतकरी गांवीं हजर नसला किंवा त्या दिवशीं त्याच्या हातांत पैसे नसले कीं, त्याचें देणें 'थकल्याच्या' सदरांत जाऊन पडतें. याला बुद्धिपुरस्सर टाळाटाळी म्हणतां येत नाहीं. बरें, शेतकऱ्यानें परभारें सरकारी खजिन्यांत सारा पटवावा, तर तसा तो घेतला जात नाहीं. म्हणून तो १२१ कलमाखालीं नोटीस येईपर्यंत सहजच थांबतो. आणि ती आली म्हणजे नोटिशीच्या खर्चासह शेतसाऱ्याचे सगळे पैसे देऊन टाकतो. अशा रीतीनें त्याला शेतसारा नेमक्या दिवशीं पटविण्याच्या मार्गांत अनेक अडचणी असतात, व त्या डेप्युटी कमशनर यांनीं लक्षांत घ्यावयास पाहिजे होत्या. त्या ध्यानांत घेतां शेतकऱ्यांना ' बुइलफुल डिफॉल्टर ' समजून सवाईचे दंड करणें म्हणजे खरा इन्साफ नव्हे. बेरार लॅन्ड् रेव्हेन्यू कोडाचें मर्म लक्षांत आणलें, तर हें कबूलच करावें लागेल कीं, ११९ कलमाखालील एकापेक्षां जास्त उपायांचा एकदमच अवलंब फक्त अपवादात्मक विलक्षण परिस्थितींतच करावयाचा असतो. तशी परिस्थिति नसते, तेव्हां १२१ कलमाखालच्या नियमांचाच उपयोग केला पाहिजे.

## सगळा सारा देणारासहि दंड !

असेंहि दृष्टोत्पत्तीस आलें आहे कीं, कांहीं बाबतींत तर १२१ कलमाखालच्या नोटिसा देखील काढण्यांत आल्या नव्हत्या ! नोटीस केव्हां देतां येते आणि ती दिल्यानंतर किती दिवस जाऊं द्यावे लागतात, याहि बाबींकडे कित्येक वेळा दुर्लक्ष करण्यांत आलेलें दिसतें आणि या गैरशिस्तपणाचा कळस असा कीं, नोटीस मिळाल्यानंतर सगळाच्या सगळा शेतसारा पटवून टाकलेल्या शेतकऱ्यांसदेखील चौथाई दंड ठोठावण्यांत आले !

## दंड माफ करा व सविस्तर चौकशी करा!

या संस्थेची अशी मागणी आहे कीं, डेप्युटी क. यांनीं शेतकऱ्यांच्या हितार्थ असल्या रीतीनें दंड झालेल्या सर्वांचीं प्रकरणें मुद्दाम बोलावून घेऊन

त्यासंबंधीं सविस्तर चौकशी करावी आणि "डिफॉल्टर" समजले गेलेल्या शेतकऱ्यांना आपापल्या कैफियती दाखल करण्यास सांगावें. त्यांनीं असें केल्यास पुष्कळच प्रकरणांतील दंड माफ करण्याची परिस्थिति आहे, असें त्यांस खचित आढळून आल्याशिवाय राहाणार नाहीं. आणि एकदां केलेले दंड माफ कसे करावेत, तसें करावयास आपणांस कायदेशीर अधिकार कोठें आहे, अशी जर डेप्युटी कमिशनर यांना शंका असेल, तर त्यांनीं २५६ कलमाखालचे नियम पहावेत, म्हणजे त्यांना तसें करण्याचा अधिकार आहे, असें दिसून येईल. पुसद तालुक्यांतील १६ व वणी तालुक्यांतील सुमारें ४० जणांस अनुक्रमें २२ एप्रिल व १३ जूनपर्यंत सवाई दंड झाल्याची माहिती या संस्थेस मिळाली आहे. पण हेहि आंकडे थोडे नाहींत. खालच्या अधिकाऱ्यांचें दंड करण्याचें कृत्य समर्थनीय आहे कीं नाहीं, यासंबंधांत डेप्युटी कमिशनर यांनीं सर्वसाधारण चौकशी करण्याएवढे हे आंकडे खचित आहेत.

## केलेली कैद अन्यायाची होती

डेप्युटी कमिशनर यांनीं एका म्युनिसिपल कमिशनरास कैद केल्याचें म्हणून जें एक उदाहरण दिलें आहे, तें कायद्याचा किती अहृदयपणानें दुरुपयोग केला आहे, हें सिद्ध करण्यास पुरेसें आहे. या हुकुमाविरुद्ध अपीलहि होण्याचा संभव आहे आणि डेप्युटी कमिशनर यांच्यापुढेंच तें दाखल व्हावयाचें आहे, हें लक्षांत घेतलें, तर आपल्यासमोर येणाऱ्या आपल्या हाताखालच्या मुलकी अधिकाऱ्याच्या अन्याय्य अथवा आक्षेपार्ह कृत्याच्या समर्थनार्थ डेप्युटी कमिशनर यांनीं जे निःसंदिग्धपणाचे उद्गार काढले आहेत, ते वाचल्यावर या संस्थेस खेद वाटल्याशिवाय राहात नाहीं. या गृहस्थानें अपील केल्यास तो आपल्या बाबतींत करण्यांत आलेला अन्याय योग्य तऱ्हेनें डेप्युटी कमिशनर यांच्या मनावर बिंबविल्याशिवाय राहणार नाहीं, असा या संस्थेस विश्वास वाटत आहे. यापेक्षां जास्त आम्ही तूर्त लिहूं इच्छित नाहीं.

अखेरीस या संस्थेची अत्यंत कळकळीची अशी विनंति आहे कीं, शेतकऱ्यांची उघड उघड दिसून येणारी तीव्र अडचण लक्षांत घेऊन त्यांना

तगाई म्हणून देण्याकरितां आणखीं किती रक्कम लागेल, याचें एस्टिमेट डेप्युटी कमिशनर यांनीं याहिउपर तयार करावें, आणि यासंबंधांत चौकशी करावी, व ती वर्तमानपत्रांचे बातमीदार व या संस्थेचे प्रतिनिधी यांना खुली असावी. योग्य ती तजवीज यापुढेंहि होऊन या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांस अत्यंत जरूरी आहे ती तगाईरूपाची मदत त्यांना मिळेल, याबद्दल या संस्थेस फार आशा वाटत आहे.

---

# फॉरेस्टचा कायदा नवाच पाहिजे*

[सन १८७८ च्या इंडियन फॉरेस्ट ॲक्टची दुरुस्ती करणें व त्या दुरुस्ती-करितां कमेटी नेमणें यासंबंधीं एक ठराव कौन्सिल ऑफ स्टेटनें ९ मार्च १९२७ रोजीं पास केला. त्याबाबत प्रांतिक सरकारचीं मतें घेण्यांत आलीं. त्यावेळीं लोकनायक माधवरावजी अणे यांनींहि प्रांतिक सरकारकडे आपलें मत पाठविलें होतें. त्यांतील महत्त्वाच्या भागाचें भाषांतर 'लोकमत' पत्रांत प्रसिद्ध झालें होतें.—सं.]

## सरकाची कबुली

हिंदुस्थान सरकारचे लॉ मेंबर मि. एस. आर. दास यांनीं १५ फेब्रुवारी १९२७ रोजीं इंडियन फॉरेस्ट बिल विचारांत घ्यावें, असा ठराव कौन्सिल ऑफ स्टेटच्या बैठकींत आणला होता, त्यांतून वरील ठराव निघालेला आहे. त्या ठरावाच्या चर्चेवर भाषण करतांना ना. व्ही. रामदास पंतलु आणि ना. सर सी. शंकरन् नायर यांनीं ज्या टीका केल्या होत्या, त्यांना उत्तरें देतांना लॉ मेंबरांनीं केलेल्या सूचनांतून वस्तुतः हा ठराव निघालेला आहे. या ठरावावर बोलतांना लॉ मेंबरांनीं इतर ॲक्टांप्रमाणेंच या फॉरेस्टाच्याहि कायद्याची मुळांतच दुरुस्ती केली पाहिजे, याची कबुली दिली होती. तिचा फायदा घेऊन मि. अनुग्रहनारायण सिंह यांनीं कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें ९ मार्च रोजीं हा ठराव आणला. या ठरावाअन्वयें फॉरेस्टचा कायदा व इतर कायदे यांत दुरुस्ती करण्याकरितां एक कमिटी नेमण्याची मागणी करण्यांत आलेली होती. तिला ना. माणेकजी दादाभाई यांनीं एक उप-सूचना सुचविली ती अखेर पास झाली. यावर भाषण करतांना माणेकजी म्हणाले होते कीं, "ना. सर शंकरन् आणि रामदास पंतलु यांनीं या कायद्यांतील अत्यंत अक्षेपार्ह भाग दाखविले, ते अजिबात काढून टाकले पाहिजेत, यास माझी पूर्ण सहानुभूति आहे." हा कायदा प्रथम १८७८ मध्यें करण्यांत आला असून त्यांतील कित्येक कलमें आजच्या घटकेस

*"लोकमत"—यवतमाळ ता. १७-६-२७ व २४-६-२७

अगदींच निरुपयोगी झालीं आहेत व कित्येक आजच्या स्थितीस अगदींच गैरलागू झालेलीं आहेत. सरकारतर्फे मूळ ठरावास विरोध करतांना ना. खानबहादुर सर महमद हबिबुल्ला यांनीं भाषण केलें. त्यांत त्यांनींहि या कायद्याच्या दुरुस्तीस एक प्रकारें संमतीच दिली होती. अशा रीतीनें सरकारी व बिनसरकारी सभासदांची या दुरुस्तीस अनुकूलताच आहे.

## सिलेक्ट कमिटीकडे बिल गेलें

ले. असेंब्लीमध्यें हा विषय चर्चेसाठीं आला, तेव्हां २६ मार्च १९२७ रोजीं हें बिल सिलेक्ट कमेटीकडे पाठविण्याचा ठराव झाला. रिट्रेंचमेंट कमेटीनें आपल्या रिपोर्टांत फॉरेस्ट ॲक्टाच्या व्यवस्थेंत मूलतः बदल करण्याची सूचना केलेलीच आहे. पण या सूचनेची अंमलबारी अजून करण्यांत आली नाहीं. या सूचना अमलांत आणावयाच्या तर कायद्यांतच दुरुस्त्या केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. मध्यवर्ती सरकारनें प्रांतिक सरकारांवर फॉरेस्टच्या बाबतींत केवढा ताबा ठेवावा, हा एक महत्त्वाचा प्रश्न बनलेला आहे. कारण फॉरेस्ट हा नुसता प्रांतिक सरकारच्या ताब्यांत दिलेलाच नव्हे, तर दोन प्रांतांमध्यें दोन लोकनियुक्त दिवाणांकडे सोंपविलेला असा हा विषय बनलेला आहे. मुडिमन कमेटीनें तर अशीहि सूचना केलेली आहे कीं, नुसत्या दोनच नव्हे, तर साऱ्या मेजर प्रॉव्हिन्सेसमध्यें फॉरेस्ट हा विषय दिवाणांकडे सोंपविण्यांत यावा.

## दिवाणांची नामधारी सत्ता

अर्थात् या खात्यावर हिंदुस्थान सरकारची प्रत्यक्ष निगराणी असणें शक्य नाहीं. व या खात्याच्या उत्पन्नाचाहि हिंदुस्थान सरकारशीं कांहीं संबंध नाहीं. असें असतांहि आजचाच कायदा आणि त्याखालचे नियम हे असेच्या असेच ठेवून दिवाणांकडे हें खातें सोंपविणें, म्हणजे त्यावरील दिवाणांचें नियंत्रण नुसतें नामधारी होणारें आहे, यांत शंकाच नको. हल्लींच्या कायद्यान्वयें सर्व सत्ता हिंदुस्थान सरकारच्या हातांत आहे. तिजमध्यें लोकांच्या सत्तेचा अंशहि कल्पिलेला नाहीं. हल्लींच्या कायद्यान्वयें लोकांची नुस्ती सल्ला घेण्यासहि जागा नाहीं, मग लोकनियुक्त सभासदांनीं अगर त्यांच्या दिवाणानें त्या खात्यांत ढवळाढवळ करावयाची गोष्ट बोलावयास नको.

## सांगकाम्या दिवाण

आजच्या कायद्याप्रमाणें फॉरेस्ट खात्याचें सारें धोरण आंखणारें दिल्ली-सिमल्याचें हिंदुस्थान सरकार, आणि दिवाणांनीं काय करायचें, तर हिंदुस्थान सरकारनें घालून दिलेल्या धोरणाअन्वयें कॉन्सरव्हेटरांकडून तक्ते भरून येतात कीं नाहीं, हें पहावें! हें धोरण कसें असावें, हें ठरविण्यांत मात्र दिवाणांना काडीची सत्ता नाहीं. लोकांच्या गरजा व आकांक्षा लक्षांत घेऊन त्याप्रमाणें फॉरेस्ट खात्याचा कारभार करतों, असें दिवाणांनीं मनांत आणलें, तर तसें करणें त्यांना अशक्य आहे. कारण धोरण ठरविणारें हिंदुस्थान सरकार, आणि दिवाण म्हणजे त्यांच्या हाताखालचा सांगकाम्या.

## हल्लींची ॲटॉक्रसी नको

नाहीं म्हणावयास खुद्द हिंदुस्थान सरकारनेंहि १८७८ च्या फॉरेस्ट-खात्यांत आपण होऊन कांहीं सुधारणा केल्या आहेत. उदाहरणार्थ, कायद्याखालीं नियम करावयाचे असतात ती सत्ता त्यांनीं त्या त्या प्रांतिक सर-कारांकडे सोंपविलेली आहे. पण फॉरेस्ट हें खातें प्रांतिक सरकारकडे सोंपविणाऱ्या रिफॉर्म ॲक्टच्या जनकाचा हेतु एवढ्यानें सिद्धीस जाऊं शकत नाहीं. तो उद्देश सफल करावयाचा तर, या खात्याची सत्ता केवळ एकसत्ताक पद्धतीची आहे, ती पद्धत मुळांतच बंद केली पाहिजे व या काय-द्यांत अशा दुरुस्त्या केल्या पाहिजेत कीं, ज्यायोगें फारेस्टच्या धोरणाची अंमलबजावणी करणारा नोकरवर्ग लोकनियुक्त दिवाणाला जबाबदार होईल. पण हें करायला कायदा दुरुस्त केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

## फॉरेस्ट व रेल्वे

पुन्हां हें लक्षांत घेणें जरूर आहे कीं, फॉरेस्ट हा एक तुटक विषय समजतां येत नाहीं. पुष्कळ कारणांकरितां फॉरेस्टचा रेल्वेशीं निकट संबंध येत आहे. आजपर्यंत हीं दोन खातीं एकमेकांपासून तुटक, एवढेंच नव्हे, तर एकमेकांच्या हिताच्या आड येणारीं असें मानण्यांत येत असे. पण गेल्या चार वर्षांपासून हीं दोन खातीं एकमेकांस पोषक व सहाय्यक कशीं करतां

येतील, असा विचार या दोन्ही खात्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या डोक्यांत घोळूं लागलेला आहे. कदाचित् या दोहोंच्या संयोगांतून

**नवीनच खातें निघण्याचा संभव**

आहे. रेल्वे खात्यांतून फॉरेस्ट ॲड्व्हायसरची नेमणूक करण्यांत आलेली आहे. यावरून तज्ज्ञांचें एखादें नवीनच खातें निर्माण होण्याचा संभव दिसतो. ब्रह्मदेशामध्यें फॉरेस्ट खात्यानें जंगलांची पाहणी करण्याकरितां व तें काम सुलभतेनें करण्याकरितां एरियल् फॉरेस्ट सर्व्हे (म्हणजे विमानांच्या सहाय्यानें जंगलाची पाहणी ) चा स्वीकार केलेला आहे, ही एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अशी नवीन परिस्थिति, नव्या अडचणी, नवे विचार पुढें येत असतां देखील सन १८७८ सालीं तयार करण्यांत आलेला फॉरेस्टचा कायदा आजहि तसाच्या तसाच ठेवण्यांत काय कळा आहे ?

**या खात्याचे जनक जर्मन लोक**

फॉरेस्ट हें खातें बनवावें, ही कल्पना मूलतः जर्मन लोकांपासून उचललेली आहे. जर्मन फॉरेस्टरांचा मूळ उद्देश असा होता कीं, नद्या,नाले,ओढे यांना ज्या भागांतून पाण्याचा पुरवठा होतो, तेथें जंगलांचें रक्षण कसें करतां येईल? वाटेल त्या रीतीनें अथवा वाटेल त्यानें झाडें कापल्यामुळें जंगल नाहींसें केलें जातें, हें कसें टाळतां येईल वगैरे प्रश्न त्यांजपुढें होते.जर्मनांची नक्कल करणाऱ्या इंग्रज सरकारनें जेव्हां हा फॉरेस्टचा कायदा तयार केला, त्यावेळीं देखील त्यांच्या दृष्टीपुढें हेच उद्देश होते, पण तेव्हांच्या व आतांच्या परिस्थतींत व गरजांत जमीनअस्मानचें अंतर पडलेलें आहे. म्हणूनहि या कायद्यांत दुरुस्ती करणें अपरिहार्यच आहे. जंगलांचें संरक्षण कसें करावें, हा प्रश्न आतां सुटलेला आहे. आतां दुसरे प्रश्न आपणांपुढें उभे आहेत व ते सोडवितांना शेतकऱ्यांच्या गरजांचें सूक्ष्म ज्ञान, खेड्यांतील लोकांच्या सांपत्तिक स्थितीची बारीक माहिती, फॉरेस्ट शास्त्रांत आज घडवून आणलेल्या शोधांचें ज्ञान, जंगलचें उत्पन्न कसें वाढवावें व त्याचा बाजाराशीं निकट संबंध कसा पोहोंचवावा इत्यादि बाबी लक्षांत घेणें आवश्यक आहे. फॉरेस्ट खात्याच्या एखाद्या शाळेंत शिक्षण घेऊन त्या खात्याचा कारभार करूं लागणाऱ्या ऑफिसरांना वरील अनेक बाबींचा व गुंतागुंतींच्या प्रश्नांचा सांगोपांग

रीतीनें विचार करतां येणें अशक्य आहे. शिवाय वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जागीं युरोपियनांऐवजीं हिंदी लोकांची भरती करण्यांत यावयाची आहे, हाहि नवीनच विचारांत घेण्याचा एक प्रश्न आहे व त्या खात्यांतील वरिष्ठ नोकरांची भरती करणाऱ्या विभागावर हल्लीं ज्यांची सत्ता आहे, त्यांच्या जागीं बदल करून ती सत्ता हिंदी लोकांच्या हातीं देणें अवश्य झालें आहे.

## खेड्यांतील लोकांच्या असंख्य अडचणी

हल्लींच्या कायद्यामुळें खेडेगांवांतील लोकांना जो अनेक बाजूंनीं दुःसह ताप होत आहे, त्याचा तपास केल्यास या कायद्यांत आमूलाग्र फरक कां केला पाहिजे, हें लक्षांत येईल. विशेषतः गुरांची जोपासना व शेतकीच्या जनावरांची पैदास हे प्रश्न एवढे गंभीरस्वरूप धारण करून बसले आहेत कीं, हिंदुस्थान सरकार किंवा प्रांतिक सरकार यांना या प्रश्नांची क्षणभरहि उपेक्षा करून भागणार नाहीं. खेड्यांतील लोकांची अनेक बाजूंनीं दुर्दशा व कोंडमारा ज्या अनेक कारणांनीं होत आहे, त्यांत जंगलचा कायदा हें एक अत्यंत महत्त्वाचें कारण आहे, याकडे सरकारनें लक्ष पुरविणें अत्यंत अगत्याचें आहे. खेड्यांतील जनता व शहरांतील नागरिक यांच्यामध्यें एक प्रकारची अनिष्ट स्पर्धा उत्पन्न होऊं पाहात आहे व तिच्या मुळाशीं सरकारचें धोरण आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. असा एक सिद्धांत करण्यांत येऊं लागला आहे कीं, हल्लींच्या सुधारणायुगांतील सगळेचे सगळे फायदे शहरचे लोक घेतात व तेंहि खेड्यांतील लोकांचे लचके तोडून ! पण फॉरेस्ट कायदा व त्या खात्याचें प्रथमपासूनचें धोरण पाहा म्हणजे फॉरेस्ट ही सरकारची इस्टेट आहे, असें मानून त्यापासून शक्य तेवढें जास्त उत्पन्न काढणाऱ्या खटाटोपींत सरकारनें खेड्यांतील लोकांच्या अनादिकालापासून चालत आलेल्या हक्कांवर केवढे घाले घातलेले आहेत, तें दिसून येईल. सरकार स्वतःला जनतेच्या हिताचे कैवारी म्हणवून घेतें, पण त्यांना आपली ही प्रौढी सार्थ करून दाखवावयाची, तर त्यांनीं

## फॉरेस्टचें नियंत्रण ग्रामपंचायतींच्या स्वाधीन केलें पाहिजे

आणि फॉरेस्ट खात्यावरील ताबा त्या त्या प्रांतांतील लोकनियुक्त प्रतिनिधींच्या हातांत सोंपविला पाहिजे. फॉरेस्ट खात्याच्या उत्पन्नांत भर टाका-

वयाची ती यांत्रिक शोधांचा उपयोग, लोकनियुक्त सभासदांची सल्लामसलत व मदत घेऊन करावयास पाहिजे. अशा प्रकारें फॉरेस्टच्या कारभारांत लोकनियुक्त सभासदांचें चित्त वेधून घेऊन त्यावर त्यांचा ताबा बसविण्याचा मुख्य मार्ग म्हणजे या कायद्यांत आमूलाग्र बदलच केला पाहिजे व या दिशेनें त्याचें स्वरूपच पालटलें पाहिजे. असें न करतां फॉरेस्ट खातें सुधारूं पाहण्याच्या सर्व आशा व्यर्थ होत ! म्हणून हल्लींच्याच कायद्यास येथें एक तर तेथें एक अशीं ठिगळें जोडल्यापासून कांहीं एक फायदा होणें शक्य नाहीं. फॉरेस्टचा कायदा लोकमतानुवर्ती व लोकहितास पोषक करावयाचा तर त्याचीं मूलतत्त्वें व तीं अंमलांत आणण्याचें धोरण यांत मूलतःच वर निर्दिष्ट केलेल्या दिशेनें फरक घडवून आणला पाहिजे.

## कमिटी कशी असावयास पाहिजे ?

हा फरक घडवून आणण्याचें काम करण्याकरितां ज्या सूचना करावयाच्या, त्यांकरितां एखादी कमिटीच नेमली पाहिजे. पण त्या कमिटींत लें असेंब्ली व स्टेट कौन्सिल या दोहोंमधील लोकनियुक्त प्रतिनिधींचें भरपूर संख्याबल असलें पाहिजे. त्याचप्रमाणें ज्या प्रांतांत फॉरेस्टचे प्रश्न विशेष महत्त्वाचे आहेत, त्या प्रांतांतील कायदे कौन्सिलचेहि लोकनियुक्त प्रतिनिधी तींत असावयास पाहिजेत. त्या कमिटीला सर्व प्रांतांतील परिस्थितीचें सर्व बाजूंनीं निरीक्षण करण्याची संधि मिळाली पाहिजे, आणि कोणत्या सुधारणा सुचवावयाच्या त्यासंबंधांतहि त्या कमिटीचें क्षेत्र भरपूर व विस्तृत असें आंखून दिलें पाहिजे. या कमिटीला प्रांतोप्रांतीं फिरून सरकारी व बिनसरकारी गृहस्थांच्या साक्षी घेण्याचा अधिकार दिला पाहिजे. तसेंच प्रांतिक कौन्सिलनें व मध्यवर्ती कौन्सिलांनीं कोणत्या दिशेनें हा कायदा सुधारण्याविषयीं बिलें आणावींत याबद्दल शिफारशी करण्याचें स्वातंत्र्य या कमिटीस पाहिजे. माझी जोराची शिफारस आहे कीं, हिंदुस्थानसरकारनें प्रांतिक सरकारांचा सल्ला घेऊन या कमिटीवरील सभासदांची संख्या निश्चित करावी. मध्यवर्ती कौन्सिलांतून किती व प्रांतिक कौन्सिलांमधून किती सभासद घ्यावयाचे हें ठरवावें. आणि त्या त्या कौन्सिलांना आपा-

पले सभासद निवडून देण्याची तारीख मुक्रर करून द्यावी. इंपीरियल सर्व्हिसमध्यें ज्यानें बरेच दिवस विविध प्रकारचें जंगलविषयक काम केलें आहे, असा ऑफिसर या कमिटीचा सेक्रेटरी असावा आणि या कमिटींत लोकनियुक्त सभासदांचें बहुमत असावें. जंगलच्या कायद्यांत दुरुस्त्या सुचविण्याचें काम असल्या कमिटीकडे सोंपवावें, अशी माझी जोराची शिफारस आहे.

---



लोकनायक माधव श्रीहरी ऊर्फ बापूजी अणे (१९०९)

# भाषणविभाग

# लो. ना. अणे

यांचे

# लेख व भाषणें

## मराठा*

[ उमरावती येथील काशीबाई प्रायव्हेट हायस्कुलांतील शिक्षक रा. रा. माधवराव अणे बी. ए. यांचें ३१।३।१९०६ रोजीं सायंकाळीं येथील नाटकगृहांत ' मराठा ' या विषयावर व्याख्यान झालें. डॉ. नरहर गोपाळ सरदेसाई एल. एम्. ॲण्ड एस् यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. ]

" मी प्रथम जेव्हां येथें आलों, त्यावेळीं मला येथें व्याख्यान द्यावें लागेल, असें वाटलें नव्हतें. दोन दिवस पाहुणचारांत आनंदानें घालवून परत जावें, असा बेत होता. ज्या अभ्यासाविषयीं माझी ख्याति आहे, ( कंटाळा आहे असा भावार्थ ) तो अभ्यास येथें करण्याचा प्रसंग येईल, असें माझ्या ध्यानीं-मनींहि नव्हतें. पण मोंगलाईत ज्याप्रमाणें प्रत्येक गांवाला ड्यूटी वसूल करितात, त्याप्रमाणें येथील मंडळींनीं मजवर ही ड्यूटी लादली आहे, असें समजून मी वेडेवांकडे दोन शब्द आपणापुढें ठवीत आहें, ते गोड करून घेणें आपणांकडे आहे."—अशा अर्थाची विनोदी प्रस्तावना करून ते मुख्य विषयाकडे वळून म्हणाले " आज मी आपणाला या विषयावरील शास्त्रीय माहिती सांगणार आहें. ती मीं थोडीशी गोळा केली आहे, पण हल्लीं बरोबर आणिली नाहीं, त्यामुळें आजची माहिती कदाचित् शिस्तवार होणार नाहीं. असो. कोणत्याहि राष्ट्राचा इतिहास लिहावयाचा म्हटला म्हणजे त्यांत त्या राष्ट्राचा विस्तार, लोकस्थिति, तींत कसकसे फेरफार झाले वगैरे गोष्टींचें विवेचन उपोद्घातांत पाहिजे असतें, ही गोष्ट इतिहासकारानें विसरतां कामा नये. हा नियम सर्वत्र पाळलेला आढळतो. मात्र 'मराठ्यां'-

*' हरिकिशोर ' यवतमाळ ता. २।४।१९०६

च्या इतिहासांत या नियमांत पडलेला फरक ठळक रीतीनें दृष्टीस पडतो. 'मराठ्यां'चा इतिहास उघडल्याबरोबर त्यांत पहावें तों आपला एकदम एखाद्या राजाच्या कारकीर्दीला आरंभ! महाराष्ट्र देश कोणता, त्याचें भौत्तिक स्वरूप कसें आहे वगैरे महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष न देतां एकदम इतिहासाचे विवेचन करण्यास आरंभ झालेला आहे. पण त्यामुळें सोपपत्तिक विवेचन न होतां खऱ्या इतिहासावर प्रकाश पडत नाहीं. अलीकडे एकदोन पुस्तकांत असा प्रयत्न करण्यांत आला आहे. आणि पुढेंमागें एखादा चांगला इतिहासकार निपजेल, अशी आशा वाटूं लागली आहे. असो. आज मी आपणाला जे दोन शब्द सांगणार आहे, त्यांत (१) महाराष्ट्र देशाचा विस्तार, (२) मराठा शब्दाची व्युत्पत्ति, (३) मराठ्यांच्या इतिहासांत उणीवा कोणकोणत्या राहिल्या आहेत, (४) मराठ्यांच्या इतिहासापासून काय शिकावयाचें, या मुद्द्यांचें अल्प विवेचन करणार आहें.

## महाराष्ट्र शब्दाची व्युत्पत्ति

प्रथम महाराष्ट्र शब्दाची व्युत्पत्ति पाहूं. यासंबधीं विचार करूं लागलों असतां असें दिसून येतें कीं, आद्य इतिहासकार आमच्यापैकीं कोणीच झाला नाहीं. इकडचा हिरॉडोटस म्हणजे ग्रॅन्टडफ होय. त्यानें या शब्दाची जी व्युत्पत्ति दिली आहे, तीच प्रमाण मानिली जात आहे. ही व्युत्पत्ति इतक्या मत्सरग्रस्त बुद्धीनें केली आहे कीं, ती ऐकल्याबरोबर रक्त तापून जातें व तळपायाची आग मस्तकाला जाते. असें असतां ही व्युत्पत्ति अजून प्रमाण मानिली जावी, याचें सखेदाश्चर्य वाटतें. ते जाडे इतिहासकार लिहितात:–महाराष्ट्र म्हणजे महार+राष्ट्र, महार लोकांचा जो देश तो. अशी व्युत्पत्ति करण्याला त्यांनीं एक भरभक्कम पुरावाहि पुढें केला आहे. तो पुरावा कोणता म्हणाल, तर 'गांव तेथें महारवाडा' ही म्हण होय. या म्हणीच्या आधारें साहेबबहादुरांनीं वरील व्युत्पत्ति बसविली आहे. साहेबांनीं महार+राष्ट्र या दोन शब्दांचा जो समास केला आहे, तोहि घेडगुजरीच झाला आहे. महार हा शब्द पूर्वीच्या संस्कृत वाङ्मयांत सांपडत नाहीं. साहेबांनीं तो आपल्या कल्पनेनें घुसडून दिला आहे, त्यावरून त्यांचा

अनादर बुद्धि मात्र दिसून येते.अशा प्रकारें अनुमान काढण्याची संवय झाल्या-मुळें वाटेल तसे सिद्धांत ठोकून देण्याला त्यांना मुळींच दिक्कत वाटत नाहीं. एकदां आमचे गुरु प्रि. ताम्हने हे 'पदं गच्छंत्यनामयं' या उक्तीचें स्पष्टीकरण करून सांगत होते. त्यावेळीं वेबरसाहेबांनीं लढविलेली कोटी आम्हांला सांगत असतांना ते म्हणाले, वेबरसाहेबांनीं असा उल्लेख केला आहे कीं, अनामय पदाला पोहोंचण्याची इच्छा करणारे लोक रोगग्रस्त असले पाहिजेत व त्यावेळीं वैद्यांचा सुळसुळाट असला पाहिजे.त्यावेळीं मी म्हणालों कीं,याला एक उत्तर आहे, तें हें कीं, बायबलांतील प्रार्थनेंत 'Oh, God give me my daily bread'(परमेश्वरा मला माझी रोजची भाकरी दे)असें वाक्य आहे. तेव्हां परमेश्वराला अशा प्रकारें तें जेवण मागणारे लोक पहिल्या प्रतीचे भुकेकंगाल असले पाहिजेत ! अशा लोकांशिवाय अशी प्रार्थना कोण करील ? तात्पर्य काय कीं, कुतर्कच करीत बसलें, तर अशीं अनुमानें वाटेल तितकीं काढितां येतील. सांगण्याचा मतलब हाच कीं, ग्रॅन्टडफ साहेबांनीं 'मराठ्यां'चा इतिहास अशा तऱ्हेनें लिहिला आहे कीं, तो वाचतांना आरंभालाच तिरस्कार उत्पन्न व्हावा. असो. आतां आपण महाराष्ट्र शब्दाची व्युत्पत्ति काय, हें पाहू. संस्कृतभाषेची ज्याला थोडी-देखील माहिती आहे, तो चटकन सांगेल कीं, महाराष्ट्र म्हणजे महान्–मोठें राष्ट्र. आणि पूर्वी देशाचीं नांवें अशा प्रकारचीं असत, याला आधारहि आहे. भोज, महाभोज अशीं देशांचीं नांवें असत, आतां मराठा शब्द कसा बनला, हें पाहूं. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, 'मऱ्हट्ट' या शब्दावरून मराठा हा शब्द तयार झाला असावा. पण हें म्हणणें बरोबर नाहीं, असें माझें मत आहे. उलट मराठा या शब्दावरून मऱ्हट्ट शब्द झाला असावा, असें वाटतें. कारण पूर्वी प्राकृत शब्द संस्कृत रूपांत ठेवण्याचा प्रघात असे. 'नृसिंहचंपूत' 'पुण्यस्तंभ' नामक शहर आहे. हें शहर जर आपण नकाशांत पाहूं लागलों, तर कोठेंहि सांपडावयाचें नाहीं–पण तें 'पुणतांबें' या मराठी नांवाचें संस्कृत रूप आहे. माझें असें मत आहे कीं, मराठा शब्द 'वर्णविपर्यासा'नें महाराष्ट्र या संस्कृत शब्दा-वरून झालेला आहे.

## महाराष्ट्राचा विस्तार

आतां महाराष्ट्राच्या विस्ताराकडे वळूं. थोडया दिवसांपूर्वी प्रो. भानू हे एका व्याख्यानांत म्हणाले कीं, नागपूर वगैरे प्रांत महाराष्ट्राची वसाहत आहे. लोकमान्य बळवंतरावजी टिळक हे येथें (यवतमाळास) आले असतांना त्यांनीं जें व्याख्यान दिलें, त्यांतहि असाच उल्लेख आढळतो. या विधानाचें सरळ रीतीनें पृथक्करण केलें, तर स्पष्ट असें कळून येईल कीं, तंजावर ही जशी महाराष्ट्राची वसाहत किंवा अमेरिकेंतील कांहीं भाग जशी इंग्रजांची वसाहत तसाच वऱ्हाड, नागपूर वगैरे भाग महाराष्ट्राची वसाहत समजावयाची. हल्लीं ज्या निमुळत्या लहान प्रदेशाला आपण महाराष्ट्र समजतों, तितकी संकुचित मर्यादा पूर्वीं या प्रदेशाची खास नव्हती. याला पुष्कळ आधार आहेत. त्यांपैकीं पहिला विशेष महत्त्वाचा आधार म्हटला म्हणजे अशोक राजाचे ताम्रपट हा होय. या ताम्रपटांवरून असें कळतें कीं, अशोकानें आपले तीन धर्मोपदेशक महाराष्ट्रांत पाठविले होते. त्यावेळीं महाराष्ट्राचे तीन मोठमोठे भाग होते--(१) राष्ट्रिक–हल्लींचा महाराष्ट्र (२) अपरांतिक–कोंकणपट्टी (३) पट्टनिक--पैटणिक–पैठणकडील भाग–हे तिन्ही भाग मिळून महाराष्ट्र देश झालेला होता. पूर्वीं आपल्या या वऱ्हाडची मर्यादाहि हल्लींप्रमाणें मर्यादित नव्हती. 'मालविकाग्निमित्र' नाटकांत 'माधवसेन' व 'यज्ञसेन' या दोन राजपुत्रांचें भांडण आहे. त्यांचा जेव्हां तंटा लागला, तेव्हां त्यांना वऱ्हाडचे दोन सारखे भाग वांटून दिले. त्यावेळीं वर्धा नदी ही दोन्ही भागांच्या मध्यावर होती. म्हणजे हल्लीं जितका भाग वर्धेच्या पश्चिम बाजूला आहे, तितकाच भाग पूर्वेकडे होता. पूर्वीं रा. पारसनीस हे 'भारतवर्ष' नामक मासिक पुस्तक काढीत असत. त्यांत प्राचीन भूगोलाच्या वर्णनांत वऱ्हाडचा उल्लेख आलेला आहे, त्यावरून वऱ्हाडची मर्यादा बरीच विस्तृत होती, असें कळतें. याशिवाय आणखीं महत्त्वाचा पुरावा म्हटला म्हणजे महाराष्ट्र आद्यकवि 'मुकुंदराज' यांचें जन्मस्थान हा होय. या कवीची जन्मभूमि 'जोगाईचें आंबे' असावें, अशी समजूत आहे, पण ती बरोबर नाहीं. कारण या कवीनें केलेल्या 'अमृतानुभव' 'विवेक-

सिंधू ' वगैरे ग्रंथांत ' आंबें मनोहर ' व ' वेना ' नदी यांचा उल्लेख आहे. हें ' आंबें मनोहर ' म्हणजे आभोर ( भंडाऱ्याजवळचें ) हें गांव व 'वेना' म्हणजे तेथील ' वाईनगंगा ' नदी ही होय. शिवाय इतर भागांपेक्षां ' मुकुंदराज ' सांप्रदायी लोक या भंडाराभागांत जास्त आहेत. या साधूची समाधिहि तिकडेच असल्याबद्दल सी. पी. गॅझेटीयरमध्यें पुरावा आहे. या सर्व पुराव्यांवरून एवढें सिद्ध होतें कीं, पूर्वी महाराष्ट्राचा विस्तार हल्लींपेक्षां बराच मोठा होता. या विवेचनावरून आपल्या ध्यानीं येईलच कीं, महाराष्ट्राचा इतिहास असा पाहिजे कीं, त्यांत वसाहतवाले व वसाहत करणारे असा भेद नसावा; व जो कांहीं गैरसमज झालेला आहे, तो दूर करून एकदेशी कल्पनेला मुळींच जागा उरणार नाहीं, असा संपूर्ण आणि संकलित वृत्तांत त्यांत पाहिजे. तरच तो महाराष्ट्राचा इतिहास !

## मराठ्यांचे विशिष्ट गुण

आतां मराठ्यांच्या अंगीं विशेष गुण कोणते होते, या मुद्द्याकडे वळूं. प्रो. लेकी लिहितात, जगांत असे कांहीं लोक आहेत कीं, त्यांचा नामोच्चार केल्यावरोबर अंगांत वीरश्री संचार करूं लागते. त्यांच्या नांवांत अशी कांहीं जादू भरली असते कीं, त्यांचीं नांवें ऐकतांच मनोवृत्ती उचंबळून जातात. अशा लोकांची त्यांनीं एक यादी दिली आहे. या यादींत मराठे लोकांचें नांव नाहीं.याचें कारण त्यांनीं मराठ्यांचें नांव ऐकलें नसावें अथवा ग्रंथ लिहितांना त्यांना त्यांची विशेष माहिती लागली नसावी. तथापि या स्पृहणीय यादींत मराठ्यांचें नांव जरी सर्वांत अग्रस्थान पटकावणार नाहीं, तरी अगदीं त्याच्या जवळचें स्थान पटकावील, अशी माझी खात्री आहे. असो. यामुद्यासंबंधानें विचार करतांना मराठा म्हणजे काय, मराठा शब्दाची व्यापकता किती आहे वगैरे गोष्टींचा विचार करून त्यांना लोकनायकत्व कोणत्या गुणांमुळें प्राप्त झालें हें पाहूं. प्रथमतः आपणांला हें सांगितलें पाहिजे कीं, मराठे म्हणजे महाराष्ट्रांत राहणारे यच्चयावत लोक होत, असें मी समजतों. मराठे म्हणजे शिवाजीचे वंशज, एक विशिष्ट जात किंवा वेदोक्तांत ज्यांचा खल चाललेला आहे ते लोक नव्हत, तर महाराष्ट्राचें पाणी पिणारे, त्याच्या अन्नावर पोसले जाणारे सर्व लोक मराठे होत. अशी मी व्याख्या करतों. यांत हिंदु, शीख,

जैन वगैरे सर्व लोकांचा मी समावेश करतों. यांत मुसलमान बंधू येत नाहींत, पण कालांतरानें तेहि यावेत, अशी माझी उत्कट इच्छा आहे. सारांश, या महाराष्ट्रांत १०००–१५०० वर्षांपासून जे लोक राहात आहेत, त्यांना मी मराठे समजतों. या लोकांचें नांव उच्चारतांच हे लोक अलौकिक शूर होते, अशी कल्पना उभी राहाते. या लोकांचा वृत्तांत भारत, रामायण वगैरे जुन्या ग्रंथांतहि जागोजाग आढळतो. त्यावरून हे लोक जात्याच शूर, धाडशी व पाणीदार आहेत, असें कळून येतें. प्राचीन काळचे यादव व अर्वाचीन जाधव हे एकच होत, असें व्युत्पत्तिशास्त्रावरून कळतें. मराठ्यांच्या शूरत्वाविषयीं प्राचीन ग्रंथांत पुष्कळ उदाहरणें आहेत, त्यांपैकीं एकच उदाहरण देतों. हा प्रसंग म्हणजे 'अभिमन्युवधा' च्या वेळचा होय. त्या वेळीं कौरवांचा सारखा पराभव होत होता, त्यामुळें कौरव अगदीं हताश होऊन गेले होते. शेवटीं दुर्योधनानें द्रोणाचार्यांची अगदीं निर्भत्सना करून त्यांना म्हटलें कीं, आपण मनापासून मुळींच लढत नाहीं, नाहींतर सारखा पराभव कधींच झाला नसता. ही गोष्ट द्रोणाचार्यांना फारच लागली, तेव्हां ते म्हणाले, मी अर्जुनाशीं मात्र युद्ध करणार नाहीं. तुम्ही अर्जुनाला युद्धांत गुंतवून ठेवा म्हणजे मी मग सर्वांचा समाचार घेतों. त्यावेळीं अर्जुनाशीं युद्ध करण्याची कोणाची छाती होईना. शेवटीं कौरवसेनेंत जे 'संसप्तक वीर' होते ते पुढें झाले व त्यांनीं आपल्या अतुल पराक्रमानें अर्जुनास कुंठित केलें. हे 'संसप्तक वीर' यादव सेनेपैकींच होते. त्याचप्रमाणें 'शिशुपाळाचा वध' प्रत्यक्ष कृष्णाला करावा लागला. शिवाजीच्या वेळीं घडलेलीं उदाहरणें तर सर्वांना माहीतच आहेत. याच्या पूर्वी हरपाळदेव व रामदेव यांनींहि आपल्या पराक्रमानें सर्वांस थक्क करून सोडिलें होतें. सांगावयाचें तात्पर्य कीं, शौर्य हा गुण मराठ्यांत फार पुरातन कालापासून आहे.

## मुत्सद्देगिरी

मराठ्यांच्या आंगीं दुसरा गुण म्हटला म्हणजे मुत्सद्देगिरी हा होय. पूर्वी कौरवपांडवांच्या वेळीं कृष्णालाच शिष्टाई करावी लागली. त्यानंतरचें उदाहरण म्हटलें म्हणजे विद्यारण्य (पुढें सायणाचार्य या नांवानें प्रसिद्ध

झालेले ) स्वामींनीं हक्क व बुक्क यांच्या सहाय्यानें विजयानगरचें राज्य स्थापन केलें हें होय. त्याचप्रमाणें हेमाद्रीची मुत्सद्देगिरी सुप्रसिद्धच आहे. हा काल गेल्यानंतर महाराष्ट्रपादशाहीची आशा नसतांना प्रल्हाद निराजीसारख्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या पुरुषानें स्वराज्याची पुन्हा स्थापना करून आपली मुत्सद्देगिरी जगाच्या निदर्शनास आणिली. पुढें महाराष्ट्रराज्याची इमारत अगदीं डळमळीत होऊन आतां कोसळेल कीं घटकेंत कोसळेल, अशी स्थिति झाली असतांना प्रसिद्ध नाना फडणवीस यांनीं ती इमारत सांवरून धरून आपल्या अप्रतिम मुत्सद्देगिरीनें इंग्रजांसारख्या आपल्या शत्रूसहि थक्क करून सोडिलें व त्यांच्याकडून वाहवा मिळविली. अगदीं अलीकडचे मुत्सद्दी पुरुष म्हणजे कै. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे हे होत. सारांश, मराठे लोकांत हा गुण पूर्वापार वसत असून त्यांची परंपरा आजतागायत चालली आहे.

## स्वातंत्र्यप्रीति व धर्मश्रद्धा

मराठ्यांच्या अंगीं सर्वांत मोठा ठळक गुण म्हटला म्हणजे 'स्वातंत्र्यप्रीति' हा होय. हा गुण सर्वांपेक्षां मराठ्यांच्या अंगीं विशेष वास करतो, हें महाराष्ट्रस्थापकांची परंपरा पाहिली म्हणजे सहज कळून येतें. हक्क व बुक्क यांच्या सहाय्यानें विद्यारण्य स्वामींनीं केलेली विजयानगरच्या राज्याची स्थापना, मुसलमानांची दक्षिणेंत आलेली लाट परतविण्यांत रामदेव व हरपाळदेव यांनीं केलेली शिकस्त, ( पुढें त्यांना कालचक्र फिरल्यामुळें अपयश आलें हा भाग वेगळा ) त्यानंतर सर्व महाराष्ट्रदेश मुसलमानांच्या घशांत जाण्याचा प्रसंग आला असतां ( या प्रसंगाचें न्यायमूर्ति रानडे, रामदास स्वामी यांनीं चांगलें वर्णन केलें आहे. ) मराठे स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं सचोटीनें व धैर्यानें कार्यास आरंभ करून हिंदुपद स्थापन केलें. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर जेव्हां बेबंदशाही झाली, औरंगजेबासारखा कट्टा शत्रु दक्षिणेंत कायमचा तळ देऊन राहिला असतांना जेव्हां एकहि म्होरक्या नव्हता, ज्यावेळीं स्वातंत्र्यदीप मालवला होता, त्यावेळीं मराठ्यांनीं चिकाटी धरून, स्वराज्याकरितां आटोकाट प्रयत्न करून औरंगजेबाला अगदीं हताश करून

आपलें स्वातंत्र्य कायम ठेविलें. हा पुरावा अत्यंत महत्त्वाचा आहे. हा प्रसंग मराठ्यांच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा आहे. जगाच्या इतिहासांत या तोडीचें उदाहरण क्वचितच असेल. या मनोरम प्रसंगाचें चित्र न्यायमूर्ति रानडे यांनीं 'जिजी' नामक भागांत फारच मार्मिक रीतीनें रेखाटलें आहे. या प्रसंगीं पानपतच्या युद्धासारखीं मोठमोठीं युद्धें जरी झालीं नाहींत,तरी त्यावेळीं मराठ्यांनीं जी सारखी चिकाटी दाखविली ती अवर्णनीय होय. शिवाजीसारखा म्होरक्या असतांना काम करणें वेगळें व तसा अलौकिक पुरुष नसतांना काम करणें वेगळें. यावेळीं मराठ्यांनीं आपल्या स्वातंत्र्यप्रीतीचें जें निशाण उभारलें, तें " यावच्चंद्रदिवाकरौ " फडकत राहील. मराठ्यांच्या या स्वातंत्र्यप्रीतींत एक विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती ही कीं, ते लोक भौतिक स्वातंत्र्याकरितां हपापले नव्हते. त्यांचे स्वराज्याकरितां झालेले प्रयत्न पाशविक ( animal ) द्वेषमूलक मनोवृत्तींनीं झाले नाहींत. त्यांच्या सर्व प्रयत्नाला आध्यात्मिक पाया होता, भौतिक पाया नव्हता. खऱ्या वेदान्ततत्त्वानें ते वागत होते. राष्ट्रोन्नति आणि धर्मोन्नति हे दोन्ही प्रयत्न एकाच मार्गानें झाले पाहिजेत, त्यांची विरुद्ध दिशा असणें इष्ट नाहीं, हें तत्त्व लक्षांत बाळगून मराठ्यांनीं धर्मगुरूचें सहाय्य घेतलें होतें. समर्थांनीं म्हटलेंच आहे 'सामर्थ्य आहे चळवळीचें, पण पाहिजे अधिष्ठान परमेश्वराचें.' सारांश काय कीं, उन्नतीच्या मुळाशीं धर्माचा आधार पाहिजे. देश नास्तिक होत चालला असतां उन्नति होत नाहीं. 'फ्रेंच रेव्होल्युशन'चा इतका चांगला परिणाम झाला नाहीं, याचें कारण त्याला आध्यात्मिक पाया नव्हता. त्यावेळीं धर्मश्रद्धा नाहींशीं झाली होती. ब्रदरहुड ( Brotherhood ) व फ्रॅटरनिटी ( Fraternity ) या दांभिक नांवांखालीं जगाचा संहार चालला होता. व्हॉल्टेअरसारखे ग्रंथकर्ते उदयास येत होते. सारांश, नास्तिकपणाची वाढ त्या वेळच्या रेव्होल्यूशनचा चांगला परिणाम न होण्याचें कारण आहे. महाराष्ट्राची दुर्दशा झाली नाहीं, याचें कारण मराठ्यांची धर्मश्रद्धा हेंच होय. ल्यूथरच्या चरित्रांत त्याची धर्मश्रद्धा फारच उत्तम दिसून येते. त्या वेळच्या नास्तिक मंडळींनीं ल्यूथरचा छळ करून त्याला आपलें मत सिद्ध करण्यास

सांगितलें. इतकेंच नव्हे, तर त्याच्या बोटांस चिंध्या गुंडाळून त्यांवर तेल ओतिलें आणि आग लावून देऊन ते चांडाळ लोक त्याला टोंचून बोलूं लागले, अहो ल्यूथर, आतां आपल्या मताचा प्रभाव दाखवा. त्यांना तो धीरोदात्त पुरुष म्हणाला "दुसरा प्रभाव काय दाखवावयाचा आहे. माझें बोट जळतांना हा जो प्रकाश फांकला आहे, तोच माझ्या मताचा प्रकाश होय आणि बोट जळून जी राख पडत आहे, ती तुमचीं मतें जळून खाक झाल्याची खूण होय !" असें गंभीर उत्तर देऊन तो अचल उभा राहिला. अशाच प्रकारचें किंबहुना यापेक्षांहि उत्कृष्ट उदाहरण म्हटलें म्हणजे 'संभाजी' चें होय. औरंगजेबानें त्याला धरून त्याचे हाल हाल केले, अंगाची कातडी काढिली, तरी तो पुरुष काडीभर न डगमगतां हिंदु म्हणूनच मेला; प्राणाच्या आशेनें त्यानें धर्म सोडिला नाहीं. मराठ्यांची ही स्वातंत्र्यप्रीति आणि धर्मश्रद्धा अवर्णनीय होय व त्याबद्दल आपणाला अभिमान वाटला पाहिजे. मराठ्यांच्या आंगचा दुसरा ठळक गुण म्हटला म्हणजे 'जसा वारा येईल तशी पाठ देणें' ( Adaptability ) हा होय. परिस्थितीला अनुरूप वागण्याचें सामर्थ्य मराठ्यांच्या अंगीं विशेष दिसून येतें. पंथाभिमान ( Bigotry ) हा दुर्गुण महाराष्ट्रांत सांपडत नाहीं. उपनयन, विवाह वगैरे धार्मिक बाबतींत जशी मराठ्यांची धार्मिक उत्सवप्रियता दिसून यते, त्याचप्रमाणें शत्रूला गनिमी काव्यानें जेर करण्यांत त्यांचा उत्साह दिसून येतो, म्हणजे कधींहि निरुत्साही न होतां सारख्या उत्साहानें काम करणें, हा मराठ्यांच्या आंगचा विशेष गुण आहे. लॉर्ड कर्झनसाहेब 'स्वतःचें पोट भरण्याच्या लुच्चेगिरीचें' खापर आमच्या डोक्यावर फोडून तिला Oriental diplomacy हें नांव देतात, पण येथें ते सपशेल घसरले. कारण ही पौर्वात्य ( oriental) लुच्चेगिरी नसून सर्व जगाची लुच्चेगिरी आहे, Universal diplomacy आहे. 'शठे शाठ्यं समाचरेत्' लबाड लोकांशीं लबाडीनेंच वागणें हा गुण आहे. याला दुर्गुण समजून ग्रॅन्टडफ्साहेबांनीं मराठ्यांची निंदा केली आहे. पण ती आपली स्तुति समजून त्याबद्दल आपण अभिमान बाळगिला पाहिजे. 'एका गालावर मारिलें असतां दुसरा गाल पुढें करावा' अशा प्रकारचा गोड उपदेश ज्यांच्या धर्मग्रंथांत आढळतो, ते लोक याच्या

उलट रीतीनें वागतांना दृष्टीस पडतात. मुद्दाम जे लोक लबाडीनें वागतात, त्यांच्याशीं त्याच प्रकारानें वागणें हा दुर्गुण नव्हे. स्वाभिमान हा सद्गुण खरा, पण राष्ट्रहिताच्या वेळीं त्याला प्राधान्य देतां कामा नये. राष्ट्राच्या हितानहिताच्या वेळीं स्वाभिमान अगदीं बाजूस ठेविला पाहिजे. हा गुण मराठ्यांच्या आंगीं इतरांपेक्षां अधिक दिसून येतो. रजपूत वगैरे इतर लोक एकदां स्वाभिमानास पेटले म्हणजे मग त्यांना राष्ट्रहिताचें भान राहात नसे, तशी गोष्ट मराठ्यांची नव्हती. राष्ट्राचें हित डोळ्यांसमोर ठेऊन प्रसंगीं स्वतःचें महत्त्व बाजूला सारणें हा मोठा सद्गुण आहे, तो मराठ्यांच्या आंगीं विशेष होता. स्वाभिमानास पेटून राष्ट्राचें नुकसान केल्याचें अगदीं ताजें उदाहरण बोअर जनरल ‘ क्रांजी ’ याचें आहे. ‘ डिवेट ’ यांनीं आपल्या ‘ तीन वर्षांची लढाई ’ नामक पुस्तकांत असें म्हटलें आहे कीं, क्रांजी हा स्वाभिमानाबरोबर बोअर लोकांचे स्वातंत्र्य नष्ट करून टाकीत होता. क्रांजीचें कृत्य व्यक्ति या दृष्टीनें योग्य असेल, पण राष्ट्राच्या दृष्टीनें अयोग्य होय. मराठ्यांशीं तुलना करतां येईल, अशा हिंदुस्थानांत दोन जाती आहेत. एक शीख व दुसरे रजपूत लोक. हे लोक शूर व धाडशी खरे; पण त्यांच्यांत हेकटपणा हा मोठा दुर्गुण सांपडतो. शिवाय या लोकांनीं आपलें रक्त शुद्ध ठेवण्याची विशेष कळकळ बाळगिली नाहीं. ही गोष्ट परकीय लोकांच्या जास्त संघटणामुळें झाली असावी. कारण या लोकांचें परकीयांशीं संघटण फार अगोदर झालें म्हणून त्यांचें रक्त शुद्ध राहिलें नाहीं. शुद्ध रक्त ठवण्यांत मराठे श्रेष्ठ होत. असो. अशा पूर्वजांचे आपण वंशज आहोंत. त्यांच्या आंगीं असलेल्या सद्गुणांची परंपरा अजून कायम आहे, हें आतांपर्यंतच्या विवेचनावरून कळण्यासारखें आहे. तव्हां ती डोळ्यांपुढें ठवून पूर्ण आशेनें कालदेशवर्तमानानुरूप कार्यभार स्वतःच्या शिरावर घेऊन लोकनायकत्व पतकरणें व ती पूर्वपरंपरा कायम ठेवणें हें आम्हा मराठ्यांचें कर्तव्य आहे. ही जबाबदारी ओळखून पूर्ण एकीनें—

संगच्छध्वं संवदध्वं सवोमनांसि जानताम् ।
देवाभागं यथापूर्वे संजानाना उपासते ॥

या वेदोक्तीवर लक्ष देऊन आपण जर कार्य केलें, तर परमेश्वरकृपेनें खालीनें यश येईल.

---

# विद्यार्थ्यांस उपदेश*

रा. रा. माधवराव अणे बी. ए. यांचें विद्यार्थी समाजापुढें ता. १-४ १९०६ रोजीं सकाळीं व्याख्यान झालें. ते म्हणाले-

## चार आश्रम व तीन ऋणें

शास्त्रांत ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम असे चार आश्रम सांगितले आहेत. पुरातन काळीं या आर्यावर्तांत मनुष्याच्या आयुष्याची जुळणी या चार आश्रमांच्या योगानें होत असे. पूर्वी सर्व गोष्टी संगतवार चालत असत, याचें कारण वरील चार आश्रमच होत. तुम्ही विद्यार्थी आहांत. सध्यांचें तुमचें कर्तव्य म्हटलें म्हणजे ब्रह्मचर्याश्रमांत राहाण्याचें आहे. विद्यार्थ्यांचा मुख्य आश्रम म्हटला म्हणजे ब्रह्मचर्याश्रमच होय.

या आश्रमांतून तो पार पडला म्हणजे तो विद्यार्थी या दशेंतून पार पडला. मनुष्य ज्या वेळेस जन्माला येतो, त्यावेळेस तो देवऋण, ऋषिऋण, पितृऋण हीं तीन प्रकारचीं ऋणें बरोबर घेऊन येत असतो, त्यांपैकीं ऋषिऋण हें ब्रह्मचर्याश्रमानें फेडावयाचें असतें. पूर्वकालीन ऋषी ज्या मार्गानें गेले, त्या मार्गाबरहुकूम जाणें, ऋषींच्या आयुःक्रमाची पद्धत जशी होती तशी आपली ठेवणें, सारांश, ऋषींचें सर्वतोपरी अनुकरण करणें म्हणजे ऋषिऋण फेडणें असें म्हणतां येईल. ऋषिऋणाची मख्खी ब्रह्मचर्याश्रमांत आहे. सर्व तऱ्हेच्या विद्यांचा अभ्यास करणें व त्या योगानें शारीरिक व मानसिक उन्नति करून घेणें इत्यादि गोष्टी ब्रह्मचर्याश्रमांत येतात. दुसरें पितृऋण-योग्यकालीं शास्त्रीय पद्धतीनें विवाह करून संतति झाली म्हणजे पितृऋणांतून मनुष्य मुक्त झाला, असें शास्त्र सांगतें. इतर मार्गांनीं म्हणजे यथाकालीं व यथाशास्त्र विवाह न करितां जर संतति झाली, तर तो मनुष्य पितृऋणांतून मुक्त होत नाहीं. तिसरें देवऋण-हें इतरांपेक्षां जरा वेगळें आहे. आपणांस माहीतच आहे कीं, मनुष्याचा देह हा पंचमहाभूतांच्या तत्त्वांपासून झालेला आहे. तेव्हां मी स्वत: एक असून मजवर सर्व मनुष्यांचा-नव्हे-या भूतलांवरील सर्व प्राणिमात्रांचा कांहीं हक्क आहे, त्याच्याशिवाय मी जन्मास आलों नसतों व जरी आलों असतों, तरी माझी

* 'हरिकिशोर' यवतमाळ ता. ९-४-१९०६

वाढ झाली नसती, हें प्रत्येकानें लक्षांत ठेविलें पाहिजे.

आपल्या धर्मात वैश्वदेवाची चाल आहे. ज्या पंचमहाभूतांपासून देह उत्पन्न झाला, ज्या पचमहाभूतांच्या सहाय्यानें तो वाढला, त्यांना त्यांचा वांटा दिल्यावांचून जर आपण अन्नाचें सेवन केलें, तर तें कृत्य चोराचें होईल, सावाचें होणार नाहीं. आपणांला जगांत साव म्हणवून घ्यावयाचें आहे, चोर म्हणवून नव्हे. प्रत्यक्ष परमेश्वरांनीं गीतेंत "जो पंचमहायज्ञाला आपापला हविर्भाग दिल्यावांचून अन्नसेवन करितो, त्यास स्तेन–म्हणजे चोर–म्हणावें" असें सांगितलें आहे. कोणी अतिथिअभ्यागत घरीं आल्यास त्यास विन्मुख न घालवितां त्यास जेऊं घालावें, त्याचा सन्मान करावा, त्यास आदरानें वागवावें, असें शास्त्रवचन आहे. कारण त्या अतिथिअभ्यागताचा आपणांवर एक विशेष हक्क असतो. गृहस्थाश्रमांतील तें कर्तव्य आहे. केवळ कुटुंबपोषण करणें म्हणजे गृहस्थाश्रम नव्हे. आपलें व आपल्यावर ज्यांचा हक्क आहे, त्यांचें हित करणें म्हणजे गृहस्थाश्रमाप्रमाणें वागणें होय. असें नसल्यास त्यास गृहस्थाश्रम असें म्हणतां येणार नाहीं. यानंतर आयुःक्रमांतील तिसरा भाग म्हटला म्हणजे वानप्रस्थाश्रम होय. स्वदेशाची, तशीच एकंदर जगाची उन्नति कशी होईल, धर्माची उन्नति कशी होईल, ईश्वर कोठें आहे, ईश्वराचें स्वरूप काय, ईश्वराशीं स्नेहसंबंध जोडण्याचा मार्ग कोणता, वगैरे गुणप्रमेयांचा सोपपत्तिक विचार वनांत जाऊन मनुष्यास वानप्रस्थाश्रमीं करावा लागतो. घरच्या कुटुंबपोषणाची काळजी दूर झाली म्हणजे अर्थातच त्यांचें चित्त जगाच्या उन्नतीकडे लागतें, व म्हणून वनांत जाऊन वरील गुणप्रमेयांचा विचार तो करूं लागतो. वरील सर्व गोष्टींचा विचार पुरा झाला, त्यांत त्याची पूर्ण प्रगति झाली म्हणजे त्याचा वानप्रस्थाश्रम पुरा झाला. नंतर तो जगाच्या उद्धारार्थ वानप्रस्थाश्रमांत मिळविलेली ज्ञानरूपी सामुग्री घेऊन बाहेर पडत असे. असें झालें म्हणजे मनुष्याच्या आयुःक्रमाचा चौथा भाग जो संन्यासाश्रम त्यांत तो शिरला, असें म्हणावें.

### लोककल्याणार्थ स्वतःचा यज्ञ

वानप्रस्थाश्रमांत विचार करून जें ज्ञान संपादिलें असेल, त्याचा उपयोग मग तो लोकांस करून देई. सध्याचा संन्यासाश्रम म्हणजे त्या आश्रमाचा उप-

हास होय. जानवें तोडिलें, शेंडी काढून टाकिली, व एखाद्याच्या घरीं पुडी लावून अधुकल्ल्या मधुकल्ल्या आकंठ भोजन केलें म्हणजे संन्यासाश्रमाप्रमाणें राहिलें, असें होत नाहीं. कित्येक तर मरणाच्या आदल्या दिवशीं 'आतुर' नामक संन्यास घेतात. असें केल्यानें सद्गति मिळेल, असा त्यांचा भरंवसा असतो. हा त्या संन्यासाश्रमाचा उपहास नव्हे काय? पूर्वींचे संन्यासी अशा रीतीनें वागत नसत. जगाच्या उद्धारार्थ ते परिश्रम करीत व हेंच संन्यासाश्रमाचें लक्षण. पूर्वीं सर्व गाडें सुरळीत चालत असे, याचें कारण दुसरें कांहीं नसून सर्व कामांस माणसें विभागून दिलीं होतीं, हेंच होय. हल्लीं सार्वजनिक कामास कोणी मिळत नाहीं, याचें कारण काय? दुसरें कांहीं नाहीं. पूर्वींप्रमाणें चार आश्रमांची सोय नाहीं, हेंच होय. गृहस्थाश्रमांत मरेपर्यंत मनुष्य राहिल्यावर त्याचा सार्वजनिक कामाकडे उपयोग होणार कसा? पुरातन काळीं संन्यासी सार्वजनिक कामाकडे लागत असत व तेंच योग्य होतें. संन्यासाश्रम हा जानवें तोडण्यांत किंवा शेंडी काढण्यांत आहे, असें नाहीं. संन्यासाश्रमाचें जें मुख्य तत्त्व कीं, लोककल्याण करणें तें मनुष्य करूं लागला म्हणजे तो संन्यासाश्रमी झाला, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. कर्म म्हणजे काय? भूतांच्या उन्नतीला साह्यभूत होईल, अशा रीतीनें आपल्या सामर्थ्याचा व्यय करणें म्हणजे कर्म करणें झालें. कर्मापासून यज्ञाची उत्पत्ति आहे. लोककल्याणाकरितां स्वतःचा यज्ञ संन्यासाश्रमांत करावा लागतो. असो. वरील चार आश्रमांची जुळणी म्हणजे मनुष्याचें आयुष्य, असा प्रकार पूर्वीं होता. तो आतां नाहीं, म्हणून भरतखंड हें असें निकृष्ट दशेस आलें आहे. तुम्ही विद्यार्थी आहांत, तुमचें कर्तव्य म्हटलें म्हणजे विद्या संपादन करण्याचें आहे. ती विद्या जितकी लवकर संपादन करतां येईल, तितक्या लवकर ती संपादन केली पाहिजे. ह्याला चिकाटी पाहिजे. आपल्याशीं ज्यांचा संबंध जडला आहे, त्यांच्यांत चिकाटी हा एक मोठा गुण आहे. एक गोष्ट करावयाची म्हणून त्यांनीं ठरविलें कीं, ते त्या गोष्टीचा पिच्छा म्हणून सोडीत नाहींत. हा गुण खरोखर अनुकरण करण्यासारखा आहे. त्याचें तुम्ही अनुकरण करा.

## देशसेवा व धर्मसेवा

ज्या शिक्षणाच्या योगानें देवसेवा व देशसेवा यांचा उद्भव विद्यार्थ्यांच्या मनांत होईल, असें शिक्षण त्यास पाहिजे आहे. सध्यांच्या शिक्षणपद्धतींत देशसेवेचें शिक्षण तर बाजूलाच राहो, पण देवसेवेचें देखील शिक्षण मिळत नाहीं, हा त्या शिक्षणपद्धतींत मोठा दोष आहे. हा दोष नवीन तऱ्हेच्या शाळा काढून दूर करणें हें लोकनायकांचें कर्तव्य आहे. देशकार्याकरितां तयार व्हावयाचें असेल, तर जेथें स्वदेशसेवेचें व स्वधर्माचें शिक्षण मिळेल, तेथें गेलें पाहिजे. त्याशिवाय इलाज नाहीं. दुसरी गोष्ट तुम्हाला सांगावयाची ती ही कीं, तुमच्या अंगांत जर उच्छृंखळपणा असेल, तर तो काढून टाका. विद्यार्थ्यांच्या अंगांत उच्छृंखळपणा हा दोष असणें अत्यंत वाईट आहे. करारीपणा वेगळा व उच्छृंखळपणा वेगळा. जें कार्य देशहितासाठीं म्हणून आपण करींत आहों, त्याच्या आड कोणी आल्यास साधुवर्य तुकोबाच्या वचनाप्रमाणें 'हो का बापमाय त्यजावी ते' ह्या मार्गास अनुसरल्यावांचून गत्यंतर नाहीं. इतर वेळीं वडील असतील, त्यांना मानच दिला पाहिजे व त्यांच्याशीं विनयपूर्वक वागलें पाहिजे. एखाद्या मनुष्याबरोबर आपलें पटत नाहीं म्हणून त्याचा उपहास करणें, त्याची कुचाळी करणें, हें माणुसकीचें लक्षण नव्हे. सारांश, विद्यार्थ्यांत उच्छृंखळपणाचा अभाव असला पाहिजे. सध्यां विद्यार्थी आहेत, तेच पुढें लोकनायक होणार असतात. ज्यांच्या अंगीं आज्ञाधारकत्व नाहीं, त्यास लोकनायक होतां येणार नाहीं. ज्या शिपायाच्या अंगीं आज्ञाधारकत्व नाहीं, त्यास सेनापति होतां येणार नाहीं, असें म्हटलें आहे. कारण जर तो सेनापति झाला, तर त्यास हाताखालील लोकांस आज्ञा करण्याची दिशा समजणार नाहीं. तसें आज्ञाधारकत्व जर तुमच्या अंगीं नसेल, तर तुम्हांस लोकनायक होतां येणार नाहीं, हें लक्षांत ठेवा व म्हणूनच आज्ञाधारकत्व आपल्या अंगीं पूर्णपणें आणण्याचा प्रयत्न करा. प्रथम सांगितलेल्या चार आश्रमांप्रमाणें आपल्या वर्तनक्रमाची दिशा आंखून ठेवा. सर्व आश्रम जर आपण पाळूं लागलों, तर आपण आपलें राष्ट्र लवकर उदयास आणूं, यांत शंका नाहीं. तर ज्या चार गोष्टी वर सांगितल्या व ज्या पूर्णपणें ग्राह्य आहेत, त्या आपल्या आचरणांत आणण्याचा प्रयत्न करा.

# पंजाबांतील दडपशाहीचा निषेध *

[ता. ४ एप्रिल १९०७इसवी रोजीं यवतमाळ येथें केदारेश्वराच्या पटांगणांत दे. भ. अणे यांचें कै.श्री.बळिरामपंत सास्तीकर वकील यांच्या अध्यक्षतेखालीं व्याख्यान झालें. त्यावेळेस 'पंजाबी' पत्राचे संपादक श्री. आठवले व प्रेसचे मालक श्री. जंयवंतराव या दोघांवर राजद्रोहाचा खटला सुरू होता, त्या संबंधांत हें भाषण झालेलें आहे.]

## न्यायाच्या नांवाखालीं सरकारचा अन्याय

दे. भ. माधवराव अणे म्हणाले–मित्रहो, पंजाबांत सरकारी अधिकारी न्यायाच्या नांवाखालीं अन्याय करीत असून कायद्याचें पांघरूण घेऊन मोठी अरेरावी गाजवीत आहेत, त्याचा निषेध करण्यासाठीं व दे. आठवले व रा. जयवंतराव यांच्यावर आलेल्या संकटाविषयीं सहानुभूति व्यक्त करण्यासाठीं आज ही जाहीर सभा बोलावण्यांत आली आहे. हिंदुस्थानांत युरोपियन व नेटिव्ह यांच्यांत भांडण झालें असतां न्यायाच्या कोर्टांत बहुतकरून नेटिव्हांना न्याय मिळत नसून न्यायाच्या तराजूचा कांटा पुष्कळ वेळां युरोपियनांच्याकडे झुकतो, हें सिद्ध करण्याकरितां पंजाबांत ४।५ युरोपियनांविरुद्ध नेटिव्ह यांच्या खटल्याचा पुरावा त्यांनीं दिला होता. या खटल्यापैकींच एक खटला रफतअलीच्या खुनाचा होता. रफतअलीनें सुपरिंटेंडेंटचा धर्मविघातक हुकूम न ऐकिल्यामुळें तो मारला गेला अशा प्रकारचा मजकूर प्रसिद्ध करण्यांत आला होता. वर सांगितलेंच आहे कीं, चारपांच खटल्यांचा आधार देऊन पत्रकर्त्यास युरोपियन विरुद्ध हिंदी, अशा प्रकारच्या खटल्यांत न्याय होत नाहीं, हें सिद्ध करावयाचें होतें. हें सिद्ध करण्यांत रफतअलीचा खटला अनेक आधारांपैकीं एक म्हणून दिला होता. म्हणजे हा खटलाच लोकांपुढें मांडून युरोपियन व नेटिव्ह यांच्यामध्यें वितुष्ट आणावें, हा हेतु नसून न्यायाच्या मंदिरांत हिंदु लोकांस अन्याय मिळतो, ही गोष्ट

* 'हरिकिशोर' यवतमाळ ता. ६ मे १९०७.

पत्रकर्त्यांस विशेषतः स्थापित करावयाची होती. असा वास्तविक प्रकार असतांना मुख्य सिद्धांताकडे विशेष नजर न देतां पुराव्यांत हजर केलेल्या गौण गोष्टींकडे ( side issues ) सरकारनें लक्ष देऊन खटला उपस्थित केला. हें करण्यांत सरकारचा हेतु युरोपियन व नेटिव्ह यांच्यांत अशा लेखांनीं जो असंतोष उत्पन्न होतो, तो काढून टाकावा, हा नसून सध्यां जी जागृति उदयोन्मुख होऊन राष्ट्रभर आपला प्रकाश पाडण्याच्या बेतांत आहे, त्या जागृतीचा नायनाट करावा हाच आहे. 'पंजाबी'-वर खटला करावा, दोन संभावित सद्गृहस्थांना कारागृहांत टाकावें व या जालीम उपायानें इतर पत्रकर्त्यांना व चळवळ करणाऱ्या सुशिक्षितांना दहशत घालावी व राष्ट्रीय चळवळ चीत करावी, हाच सरकारचा हेतु आहे. असें नसतें, तर आज हिंदी लोक व युरोपियन यांच्यामध्यें बेबनाव उत्पन्न करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल अनेक खटले युरोपियनांवर करणें सरकारला प्राप्त होतें. कांहीं दिवसांपूर्वीं युरोपियनांवर अशा प्रकारचा खटला व्हावा, अशी पुष्कळ इंग्रजी पत्रें ओरडून सांगत असतांना सरकारनें खटला केला नाहीं.गेल्या कॉंग्रेसच्या वेळीं टाईम्स ऑफ इंडियामध्यें एक ना दोन जवळ जवळ पांच सहा लेख कॉंग्रेसमध्यें फूट पाडण्याच्या हेतूनें लिहिले होते. पण त्यांबद्दल सरकारनें या पत्रावर फिर्याद केली नाहीं. यापेक्षां जास्त मजबूत पुरावा पाहिजे असेल तर तो हा कीं, मिशनरी लोक भर रस्त्यावर आमच्या देवाचा, आमच्या पवित्र धर्माचा, आमच्या पूर्वजांचा, आमच्या चालीरीतींचा, आमच्या परंपरेचा अपमान करितात. तरी या मिशनऱ्यांवर जातीजातींत वैषम्य उत्पन्न केल्याबद्दलचा कोणी खटला केल्याचें ऐकिवांत नाहीं.

## सरकारनें विकत घेतलेलें श्राद्ध

वरील प्रमाणांवरून ही गोष्ट निर्विवाद ठरते कीं, असे खटले करण्यांत सरकारचा हेतु राष्ट्रीय पक्षाचे हातपाय मोडावे, असाच असावा. सरकार या भानगडींत पडलें नसतें तर चाललें असतें.सुपरिंटेंडेंटनें अब्रुनुकसानीची(defamation ) वाटेल तर ' पंजाबी' वर फिर्याद केली असती. हें विकत श्राद्ध

घेण्याची सरकारला कांहीं गरज नव्हती. पण सरकारची दृष्टि असे खटले करण्यांत लोकनायकांचा छळ करावा, त्यांना बदनाम करून फजीत करावें, अशी असावी, असें म्हणावें लागतें. सुमारें दोन वर्षांपूर्वी लो. बाळ गंगाधर टिळक याच्यावर कांहीं खाजगी भांडणाचा फायदा घेऊन सरकारनें खटला सुरू केला व सरासरी ६०,००० रुपयांचा चुराडा केला. ही गोष्ट ध्यानांत घेतली म्हणजे असल्या प्रकारच्या खटल्यांची मीमांसा लागते. राजद्रोहाच्या कलमाचे जनक सर जेम्स स्टीफन हे होत. जातीजातींत चुरस उत्पन्न करणें हा गुन्हा आहे, असा कायदा चामर्ससाहेबांनीं कौन्सिलपुढें आणला. हें कलम पीनल कोडामध्यें प्रविष्ट करण्याच्या वेळीं कौन्सिलमध्यें जो वादविवाद झाला, त्यामध्यें या कायद्यानें युरोपियन लोकांना कांहींच त्रास न होतां बिचाऱ्या हिंदी लोकांना मात्र हिसके बसतील, असें स्पष्ट सांगण्यांत आलें होतें व त्याचें प्रत्यंतर आज आपण पाहात आहोंत.

असे खटले करून देशभक्तांचा छळ केला असतां नवीन मतांचा प्रसार बंद पडेल, असें जर सरकारला वाटत असेल, तर ही सरकारची चूक आहे. सरकारनें हें पक्कें ध्यानात ठेवावें कीं, "The blood of the martyrs is the cement of the Church" देशकार्याकरितां किंवा कांहीं धीरोदात्त कल्पनेकरितां देशभक्तांचे जितके रक्तबिंदु पडतील, तितक्या प्रत्येक रक्तबिंदूबरोबर एक एक नवीन, सणसणीत, देशकार्यांत नवीन तेज ओतणारा देशभक्त निर्माण होईल !

## देशभक्तांच्या विपत्ती

कोणत्याहि नव्या मताचा उदय झाला म्हणजे त्या मताच्या पुरस्कर्त्यावर संकटें हीं यावयाचींच. लो. टिळक एकदां असें म्हणाल्याचें मला आठवतें कीं " These are the ordinary risks of our profession "–आमच्या धंद्यांतील हीं साधारण संकटें आहेत. यापेक्षां भयंकर तीव्र संकटें सोसण्यास आपण तयार झाल्याशिवाय नवीन मतांचा फैलाव होणार नाहीं. प्रसिद्ध प्रॉटेस्टंट मताचा पुढारी लूथर याच्या धैर्याचें उदाहरण मीं पूर्वीं सांगितलेंच आहे.

ग्रीस देशांत पिझस्ट्रटच्या मुलांपैकीं एका जुलमी राजाला पदच्युत करण्यासाठीं कांहीं तरुण मंडळींनीं कट केला. ( जगाचा इतिहास आपणाला हेंच सांगतो कीं, कोणत्याहि राष्ट्रहिताच्या कामाचा बोजा तरुणांवर पडतो. आणि म्हणूनच विद्यार्थ्यांनीं राजकीय चळवळींत पडणें अवश्य आहे. ) आपणांस मसलती करण्यास एक निर्भय जागा असावी, असें वाटल्यावरून त्यांनीं एका वृद्ध बाईचें घर पसंत केलें. असा हा कट चालू असतां ही बातमी राजास कोणी इसमानें दिली. राजानें लगेच त्या बाईला दरबारांत बोलाविलें. दरबारांत गेल्यावर आपण अबला, दैहिक यातना आपणाला सहन होणार नाहींत, म्हणून राजाकडे पाहिल्यासारखें करून ( आपणावर विश्वास ठेवून खलबत करणाऱ्या देशाभिमानी तरुणांचा घात होऊं नये, या बुद्धीनें) त्या बाईनें आपली जीभ हलकेंच पुढें काढली व हातानें खालच्या हनुवटीस धक्का दिला, त्यासरशीं जीभ तुटली व तरुणांचा जीव वांचला ! सांगावयाचा मुद्दा हा आहे कीं, नवीन मतांचा प्रसार करीत असतांना यातना ह्या सोसाव्या लागावयाच्याच, त्याला इलाज नाहीं. आपणांमध्यें म्हण आहे कीं, ' संताच्या वाणीला आमचेंच काय भय ? ' ही म्हण सर्व चळवळ करणारे राष्ट्रभक्त जाणतात, म्हणून ते संकटांस मोजीत नाहींत. गवंडी दगडाला टाकी मारीत असतांना एखाद्या वेळीं टाकी दगडावरून निसटून हातावर येते, म्हणून गवंड्यानें टाकी मारावयाचें सोडिलें आहे काय ? तद्वतच या पाषाणमय देशाला टाकी मारून सचेतन करीत असतांना एखाद्या वेळीं टाकी हातावर येईल, म्हणून टाकी देणें बंद पडणार नाहीं. अशा प्रकारें देशभक्त देशोद्धाराकरितां विपत्ति भोगींत असतांना आपण त्यांच्याविषयीं सहानुभूति दाखविली पाहिजे. ती सहानुभूति दाखविणें म्हणजे त्यांनीं जें कार्य उचललें आहे, त्या कार्यास आपण पाठिंबा देणें हें होय. बंगालच्या लोकांसंबंधानें जी सहानुभूति दाखविण्यांत येत आहे, त्या सहानुभूतींत व मोर्ले यांच्या सहानुभूतींत मला तर कांहीं फरक दिसत नाहीं.

## सहानुभूति कशी दाखवावी ?

बंगाल्यास जर खरीखुरी सहानुभूति दाखवावयाची असेल, तर बंगाल्यानें ज प्रतिकाराचें बहिष्कारशस्त्र उचललें आहे, त्याचाच आपण आश्रय केला

पाहिजे. बंगालप्रमाणें माझ्या प्रांतांतील लोक बहिष्काराला तयार नाहींत, हें रडगाणें गाण्यांत कांहीं जीव नाहीं. म्हणून 'पंजाबी'बद्दल तुम्हांला सहानुभूति दाखवावयाची असेल, तर 'पंजाबी'च्या मतांचा जोरानें प्रसार करा. सध्यां जें नवीन मत जोरावत आहे, त्यांत सामील व्हा. अशा रीतीनें जर आपण सामील झालों नाहीं, तर आपणांस स्वराज्याची आशा नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी 'स्वराज्य' भिक्षा मागून मिळेल असें वाटत होतें,व त्या वेळीं तुम्ही लायक झाल्यावर आम्ही आपला गाशा गुंडाळून आपल्या देशीं जाऊं, असें राज्यकर्त्यांकडून प्रतिपादन करण्यांत येत होतें,पण ते दिवस उरले नाहींत. इंग्लंडचे उदार मुत्सद्दी मोर्ले साहेब म्हणतात,माझ्या दृष्टीच्या टप्यानें भविष्यकाळचें जेवढें क्षेत्र आकलन केलें जातें, तेवढ्या क्षेत्रांत स्वराज्य उपभोगण्यास लायक झालेलें हिंदुस्थान मला दिसत नाहीं. इंग्लंडचे मुत्सद्दी असें धडधडीत म्हणत असतांना, व लार्ड कर्झनसारखे व्हाइसरॉय १८५८ सालच्या जाहीरनाम्यास अशक्य सनद म्हणून ठरवीत असतांना भिक्षांदेहीचा मार्गच चालू ठेवणें म्हणजे मूर्खपणा आहे. भिक्षा मागावयाचीच तर ती योग्य माणसापाशीं मागितली पाहिजे. 'ॐ भवति भिक्षां देहि' हा सवाल करितांना आईजवळ आपण भिक्षा मागतों. व्हिक्टोरिया राणीसाहेबांच्या कारकीर्दीत हा मंत्र कदाचित् योग्य झाला असता. परंतु तो आतां खास योग्य नाहीं. सरकारचें धोरण नीट ध्यानांत येण्याकरितां मी तुम्हांस एक उदाहरण सादर करतों. ज्यावेळेस इंग्रजी शिक्षण देण्यास इकडे आरंभ झाला,त्यावेळीं मेकॉलेसाहेबानें असें भाषण केलें कीं,ज्यावेळीं इंग्रजी विद्येनें हिंदी लोक जागे होऊन देश सुधारण्याकरितां धडपड करूं लागतील, त्यावेळेस आम्ही मोठ्या कौतुकानें त्यांच्या प्रयत्नांस पुष्टि देऊं व या शिक्षणाचीं मधुर फळें त्यांस खाऊं देऊं पार्लमेंटसभेंत अशा आशयाचें भाषण केल्यावर त्याच दिवशीं आमरण मेंढरें हांकीत असलेल्या आपल्या मिशनरी वडिलांस त्यानें असें पत्र लिहिल्याचें ( ट्रिव्हिलियनच्या सिलेक्शनमध्यें ) प्रसिद्ध झालें आहे कीं, इंग्रजी शिक्षण देण्यांत सरकारचा हेतु हिंदु लोकांच्या मनांत ख्रिस्ती धर्मासंबंधीं आदर उत्पन्न करावा व कालांतरानें सर्व राष्ट्र ख्रिस्ती करून इंग्रजी राज्य कायम करावें असा आहे. या गोष्टीवरून आपण आपला मार्ग उमजला पाहिजे.

भिक्षा मागून जर देत नाहींत, तर मग आपण काय करावें? कोणीहि एखादी वस्तु आम्ही देत नाहीं, असें म्हटल्यावर ती आम्ही घेतों, असेंच उत्तर द्यावयाचें! असो. आतां स्वराज्य आम्हांला दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं, ही गोष्ट समजून मुकाट्यानें ते देतील, तर त्यांचा मोठेपणा राहील, नाहींतर आम्हाला तें घेतलें पाहिजे. याकरितां आपण पश्चिमेकडून तोंड फिरवून पूर्वेकडे केलें पाहिजे. आतां इंग्लंडमधील सहानुभूतींत स्नान करण्याचा काळ गेला. यापुढें आपण आपल्या समाजाला, या भारतवर्षाला, हिंदुस्थान हा माझा देश आहे, या देशाच्या बऱ्यावाईटाचा विचार करण्याचा माझा जन्मतःच हक्क आहे, हें ज्ञान दिलें पाहिजे. नवीन मताचा चोहोंकडे प्रसार केला पाहिजे.

## नवमताचा उदय

सन १८९५ सालीं जेव्हां सार्वजनिक सभेंतून मवाळ मंडळी हंबरडा फोडीत बाहेर निघाली, तेव्हांपासून नवीन मताचा उदय झाला. गेल्या वर्ष-दोन वर्षांपूर्वी बंगालवर प्रसंग कोसळला. आज तो प्रसंग पंजाबवर आहे. आपल्यावर तो दहा वर्षांपूर्वीच ( १८९७ ) आला, पण महाराष्ट्रानें अशा प्रकारची चळवळ कांहींच केली नाहीं, ही मोठी शरमेची गोष्ट आहे. पंजाबांत देशभक्तांस सहा महिन्यांची कैद झाली, तर आपल्याकडे १॥ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती, हें आपणांस विदित आहेच. अशा प्रसंगीं आपणास सरकारदरबारीं न्याय मिळणार नाहीं. ‘ पंजाबी ’ वरच्या खटल्यासंबंधीं टीका करतांना केसरीकारांनीं मोठा मार्मिक लेख लिहिला आहे. ‘ पंजाबी ’ वरच्या खटल्याचा निकाल ऐकून ‘ इंग्लिशमन ’ पत्राची नुसती आग झाली व तें पत्र म्हणूं लागलें कीं, जर आणखी तीन वरिष्ठ कोर्टें असतीं, तर ‘ पंजाबी ’ चे संपादक व मालक अजिबात सुटले असते. त्यासंबंधीं केसरीकार लिहितात कीं, अशीं तीन कोर्टें आहेत. पहिलें प्रिव्ही कौन्सिल, दुसरें लोकमत, तिसरें अगदीं निर्दोष असें देवाचें न्यायमंदिर. या देवाच्या न्यायमंदिरांत आठवले व जयवंतराय हे निर्दोषी ठरून त्यांना बक्षिसहि मिळेल. अशा प्रकारें नव्या मताची वाढ आज दहा वर्षें

होत आहे, व या मतास वाढीस लावणाऱ्यांना कोर्टांतून मासलेवाईक न्याय-हि मिळत आहे. तरी आपलें धैर्य खचतां उपयोगी नाहीं. पांचसहा हजार वर्षांच्या विपरीत आपत्तींतून वाचलेला हा सर्वसुधारणेचा आदिपीठ असा आर्यावर्त मरणार नाहीं, अशी मला न्या. रानडयांप्रमाणें आशा वाटते. निखाऱ्यावर ज्याप्रमाणें राखेचें पटल असतें, त्याप्रमाणें हें आपल्यावर भ्रमाचें पटल आलें आहे. नवीन मतरूपी वायूच्या लहरींनीं हें पटल नाहींसें होईल व ज्या वेळीं देशाभिमानाचे निखारे पसरूं लागतील, त्यावेळीं १२४ अ, १५३ अ प्रमाणें इतर कायद्यांच्या काडयांचा कितीहि या निखाऱ्यावर ढीग केला, फार काय, पण सबंध पीनल कोडाचें जरी या अग्नीवर दडपण टाकलें, तरी या सर्व कायद्यांच्या गंज्यांची होळी होईल व या होळीच्या प्रकाशांत राष्ट्रीय देवतेची रमणीय विराट मूर्ति प्रगट होईल.

# समर्थांचें कार्य *

बुधवार ता. २६ फेब्रुवारी १९०८ रोजीं सायंकाळीं यवतमाळ येथील-श्रीविठ्ठलमंदिराच्या समोरील सुशोभित केलेल्या मंडपांत सार्वजनिक उत्सव-मंडळातर्फे दासनवमीच्या उत्सवानिमित्त दे.भ.माधवराव अणे बी.ए.बी. एल् यांचें व्याख्यान झालें. ते म्हणाले—

महाराष्ट्राच्या सामर्थ्याचा ज्यांनीं १७ व्या शतकांत सर्वांस प्रत्यय आणिला-त्या समर्थ रामदासस्वामींचा उत्सव साजरा करण्याकरितां आपण आज जमलों आहोंत. राष्ट्रांतील अशा मोठमोठ्या पुरुषांचे उत्सव करावे किंवा न करावे, हा एकेकाळीं वादाचा विषय होऊन बसला होता. परंतु सांप्रत हे उत्सव इतके सार्वजनिक झाले आहेत कीं, ते करूं नका, असें जरी कोणी सांगितलें, तरी तिकडे कोणी लक्ष देणार नाहींत. तेव्हां या प्रश्नावर विशेष चर्चा करण्याची माझी इच्छा नाहीं. राष्ट्रांत जिवंतपणा असल्याची हे अशा प्रकारचे उत्सव साक्ष देतात. महाराष्ट्रांत सतराव्या शतकांत जी राज्य-क्रांति झाली, त्या प्रसंगीं तत्कालीन साधुसंतांची तिला कितपत मदत झाली, यासंबंधीं विचार करण्याचा आज विचार आहे.

## संतांच्या कामगिरीविषयीं मतभेद

महाराष्ट्राच्या इतिहासाचें शास्त्रीयरीत्या परीक्षण करण्याची आम्हांला अजून संवय झालेली नाहीं. सतराव्या शतकाच्या राज्यक्रांतींत संतांनीं काय काम-गिरी केली, हें शास्त्रीयरीत्या ठरविण्याचा माझा इरादा आहे. याविषयीं प्रचलित विद्वानांमध्यें प्रमुखत्वानें तीन भिन्न भिन्न मतें आपणांस आढळून येतात. देशांत राज्यक्रांति घडून यावी, याच प्रमुख उद्देशानें तत्कालीन साधु-संत तीनचार शतकें खटपट करीत होते, असें एका पक्षाचें म्हणणें आहे. या संतमंडळीनें लोकांना निवृत्तितत्पर केलें. त्यांचा निवृत्तिमार्गाकडे या संतमंडळींनें ओढा लाविला. निवृत्तिमार्ग व प्रवृत्तिमार्ग या दोहोंचें पर-स्पर पूर्ण विरोधत्व असतां या संतमंडळींनीं राज्यक्रांतीसाठीं खटपट केली, असें म्हणणें चमत्कारिकच आहे. दुसरा एक पक्ष या साधुसंत मंडळ्यांनीं

* ' हरिकिशोर ' यवतमाळ ता. २–३–१९०८

कांहीं केलें नाहीं, असें म्हणतो. तिसरें मत, संतांनीं प्रत्यक्ष राज्यक्रांति जरी घडवून आणिली नसली, तरी त्यांनीं योग्य भूमि तयार केली, असें आहे. या तिन्ही मतांचें प्रतिपादन करणारे गृहस्थ विद्वान् आहेत. पहिल्या मताचें म्हणजे संतांनीं राज्यक्रांति घडवून आणिली, असें म्हणणारांत मयूरभक्त रा. पांगारकर हे प्रमुख होत. या प्रांतांत त्यांनीं हिंडून कांहीं व्याख्यानेंहि दिल्यामुळें ते इकडे पुष्कळांच्या परिचयाचे आहेत. मराठी काव्याचा, विशेषतः मोरोपंतांच्या काव्याचा यांचा व्यासंग फार दांडगा आहे. संतांनीं कांहींहि केलें नाहीं, असें म्हणणाऱ्यांत प्रसिद्ध इतिहाससंशोधक रा. वि. का. राजवाडे हे प्रमुख आहेत. यांनीं अनेक देशांच्या राज्यक्रांतीचे इतिहास त्या देशांच्या भाषेंत वाचले आहेत. फ्रान्सच्या राज्यक्रांतीचा इतिहास त्या वेळच्याच एका गृहस्थानें फ्रेंच भाषेंत लिहिलेला यांनीं वाचला आहे. रा. पांगारकरांपेक्षां या गृहस्थांचें मत जास्त महत्त्वाचें आहे; कारण पहिल्या गृहस्थाचें वाचन फक्त महाराष्ट्रकाव्यापुरतेंच आहे. तिसऱ्या मताचे प्रतिपादक कै. न्या. रानडे हे होत. यांच्याहि विद्वत्तेसंबंधीं व बुद्धिमत्तेविषयीं बरोबरी करणारीं हिंदुस्थानांत दोनचारच माणसें असतील. सामाजिक सुधारणेसंबंधीं त्यांच्यांत व इतरांत जरी मतभेद असले, तरी इतिहासविषयावर बोलण्याचा त्यांना बराच अधिकार असे. परंतु साधुसंतांची कामगिरी ओळखण्यास त्यांच्या ग्रंथांविषयीं जें प्रेम आणि भक्ति असावी लागते, त्यांचा न्यायमूर्तींपाशीं अभाव असल्यामुळें या प्रश्नासंबंधीं त्यांचें मत ग्राह्य होईलच, असें नाहीं. प्रचलित असलेल्या मतांतील आतां सांगितलेलीं हीं तीन प्रमुख मतें आहेत. यांतहि पुष्कळ पोटभेद आहेत. परंतु जास्त विस्तार न व्हावा एवढ्यासाठीं इतकेंच पुरें! या आतां सांगितलेल्या तीन विद्वानांच्या तीन मतांपैकीं सत्य कोणतें समजावयाचें, असा प्रश्न उभा राहतो. या तिन्हीहि मतांतून मला एक चौथेंच मत काढावयाचें आहे, व तत्पूर्वी थोड्या अवांतर गोष्टी सांगणें इष्ट आहे

## राष्ट्रोन्नतीच्या तीन अवस्था

कोणत्याहि मनुष्यास रोग झाला असतां, त्याचें निवारण होण्यास तीन पायऱ्या असतात. प्रथम मी रोगी आहें, अशी रोग्याची भावना व्हावी लागते.

या गोष्टीस संवेदना म्हणतात. संवेदना झाली म्हणजे रोग कोणता आहे, हें जाणण्यास वैद्याकडे जावें लागतें. मग तो रोगाचें निदान करतो म्हणजे रोगाचें नांव सांगतो व नंतर औषधोपचार करून तो रोग नष्ट करण्यासाठीं जी खटपट होते, तिला चिकित्सा म्हणतात. संवेदना, निदान व चिकित्सा या ज्याप्रमाणें व्यक्तीच्या रोगासंबंधीं पायऱ्या आहेत, तशाच त्या राष्ट्राच्याहि आहेत. व्यक्तींप्रमाणें राष्ट्राचीहि स्थिति आहे. राष्ट्रोन्नति होण्यास राष्ट्र प्रथम या तीन स्थितींतून गेलें पाहिजे. आपली अवनति होत आहे, अशी राष्ट्रांत संवेदना उत्पन्न झाली पाहिजे. राज्यक्रांति होण्याच्या पूर्वीं अशी संवेदना उत्पन्न व्हावी लागते व ही संवेदना सतराव्या शतकाच्या पूर्वीं झालेल्य कवींनीं उत्पन्न केली हें निर्विवाद आहे. त्यावेळच्या कवींच्या ओव्यांत अथवा अभंगांत धर्माची अवनति होत आहे, ही गोष्ट स्पष्ट केली होती. असें करण्यांत त्यांच्या मनांत राज्यक्रांतीची कल्पना होती किंवा नाहीं,हा प्रश्न निराळा आहे. हल्लीं उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून त्यांचा तसा उद्देश असल्याचें सिद्ध होत नाहीं. परंतु त्यांच्या या कार्याचा असा परिणाम झाला, ही गोष्ट मात्र खरी. संवेदना हा मनोवृत्तीचा गुण आहे व कवींतहि मनोवृत्तीचें प्राधान्य असल्यामुळें धर्माच्या अवनतीची संवेदना त्यांना होणें साहजिकच आहे. राष्ट्रांतहि संवेदना उत्पन्न झाल्यावर निदान करणारा तत्त्ववेत्ता लागत असतो, व असे रामदास उत्पन्न झाले. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं असें म्हटलें आहे कीं— "Now the work of the orator is over. He has run his day. A statesman is required to organise and utilize the forces that have been called into being by the genius of the orator." वक्त्यांचें काम संपलें, आतां राष्ट्राला तत्त्ववेत्त्यांची जरूरी आहे, असा बाबू साहेबांच्या म्हणण्याचा इत्यर्थ आहे व अशा तऱ्हेचा तत्त्ववेत्ता बंगाल्यांत उदयास आल्याचेंहि आपणांस माहीत आहेच.

## संतांचें खरें कार्य

श्रात्य पद्धतीनें पाहूं जातां क्रांत्युन्मुख राष्ट्रांत ( equality, fraternity and liberty ) समता, भ्रातृता आणि स्वतंत्रता या तीन

कल्पनांचा उदय होत असतो. आमच्या महाराष्ट्रांतील संतमालिकेनें यापैकीं पहिल्या दोन गोष्टी घडवून आणिल्या/वारकरी पंथ स्थापन झाल्यामुळें ज्ञानदेवापासून चोखामेळापर्यंत सर्वांत समता व बंधुभाव उत्पन्न झाला. धर्म हेंच त्या काळांतील श्रेष्ठ ध्येय असल्यामुळें धर्म व नीतीचें ज्ञान लोकांना झाल्यामुळें असंतोष उत्पन्न झाला./वारकरी पंथानें उत्पन्न केलेले समता, भ्रातृता हे गुण, व असंतोष यांमुळें संवेदना-काळ उत्पन्न झाला. यानंतर निदान करण्यास तत्त्ववेत्त्यांची जरूरी होती, व तें काम समर्थ रामदासस्वामींनीं पार पाडिलें. हल्लीं जी धर्मावनति झाली आहे, तिला कारण पारतंत्र्य असून स्वातंत्र्य हेंच त्यावर औषध आहे, अशी त्यांनीं चोहोंकडे गर्जना केली. या ठिकाणीं कवीचें व तत्त्ववेत्त्याचें काम संपलें. यानंतर स्वातंत्र्यप्राप्तीकरितां जीं कार्यें करावीं लागतात, तीं मुत्सद्यांकडून होतात. हें काम शिवाजीमहाराजांनीं पार पाडलें. या मुत्सद्देगिरींत समर्थांचें कितपत अंग होतें, हें सांगतां येत नाहीं. परंतु उपलब्ध पुराव्यांवरून तें नव्हतें, असेंच म्हणावें लागतें. तथापि या गोष्टीनें त्यांची योग्यता कमी होते, असें मात्र नाहीं. राष्ट्रांत स्वातंत्र्यप्रीति उत्पन्न करून देण्याच्या कामीं त्यांनीं तत्त्ववेत्ता या नात्यानें जी कामगिरी केली, ती खरोखर बहुमोल आहे; व याला जर मुत्सद्दीपणाची जोड पुराव्यानें मिळेल, तर तें जास्त चांगलें होईल. परंतु जोंपर्यंत असें सिद्ध झालें नाहीं, तोंपर्यंत नसतें महत्त्व एखाद्या व्यक्तीवर लादण्यापासून कांहींएक फायदा नसून उलट अपाय मात्र आहे./एक वीट आणि दुसरी वीट यांमध्यें चुना घालून भिंत बांधावी, असें सामान्य तत्त्व सांगितल्यानें जसा कोणी इंजिनीयर ठरत नाहीं, तसेंच चांगले लोक संग्रहीं बाळगावे, वाईटाचा त्याग करावा, असें म्हटल्यानें कोणी मुत्सद्दी ठरत नाहीं. साधारण मनुष्यासमुद्धां हीं सामान्य तत्त्वें समजतात.

## तत्त्ववेत्तेच खरे मार्गदर्शक असतात

आतां लोकांना स्वातंत्र्योन्मुख करण्यास निवृत्तिमार्गापासून प्रवृत्ति मार्गाकडे वळविण्यांत, स्वतंत्रतेची सर्वांना गोडी लावण्यांत समर्थांनीं कोणते उपाय योजिले, इकडे वळूं. 'दासबोध' हें एक त्यांचें पहिलें साधन होय. या ग्रंथांत

विशेष लक्षांत ठेवण्यासारखी ही गोष्ट आहे कीं, यांतील पहिले सात आठ दशक पूर्ण वेदांतपर आहेत व त्यानंतर राजकीय तत्त्वज्ञान त्यांत हळुहळू आणिलें आहे. याचें कारण असें असावें कीं, त्यावेळीं सर्वांचा भर मोक्ष-मार्गाकडे होता, तव्हां त्यांना तिकडून वळवून प्रवृत्तितत्पर करण्यासाठीं प्रथम समर्थांना एकदम विरोध दाखविणें इष्ट नव्हतें. पूर्वीच्या साधूंच्या मार्गाच्या अगदीं विरुद्ध जर समर्थांनीं उपदेश करण्यास सुरवात केली असती, तर त्याकडे कोणीहि ढुंकून पाहिलें नसतें. एवढ्यासाठींच प्रथम पूर्वीच्या साधुसंतांसारखेच समर्थ हे एक आहेत, असें लोकांना वाटण्यासाठीं वेदांत-शास्त्राचा उपदेश केला व नंतर सर्व लोक कह्यांत आले, असें पाहून राजकीय तत्त्वज्ञानास त्यांनीं प्रारंभ केला. सवेदना उत्पन्न करण्यासाठीं त्यावेळीं जे साधुसंत उत्पन्न झाले होते, त्यांनीं आपलें पुढारीपण निमूटपणें तत्त्ववेत्ते समर्थस्वामीस दिलें होतें, ही गोष्ट याप्रसंगीं विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. तुकाराममहाराजांकडे गुरूपदेश घेण्यासाठीं शिवाजी राजे गेले असतां त्यांनीं समर्थस्वामींकडे बोट दाखविलें ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. सद्यःस्थितींत राष्ट्रजागृति उत्पन्न करणाऱ्यांनीं आपलें पुढारीपण तत्त्व-वेत्त्यांच्या स्वाधीन करावयाचें तें न केल्यामुळेंच सुरतेचा अनिष्ट प्रकार घडून आला ! बाबू सुरेंद्रनाथ बानर्जीसारख्या वक्त्याची राष्ट्रीयसभेंत जी फजीती झाली, त्याबद्दल सर्वांना वाईट वाटतें. मलासुद्धां त्याबद्दल दुःख होतें. परंतु मी जर राष्ट्रीय सभेस गेलों असतों तर त्यांचा अपमान करणारांपैकीं मीहि एक झालों असतों. कारण सुरेंद्रनाथबाबूंचा जो अपमान झाला, तो राष्ट्र त्यांच्या कामाची किंमत ओळखीत नाहीं म्हणून नव्हे, तर हल्लींचा काळ संवेद-नाचा म्हणजे कवींचा अथवा वक्त्यांचा नसून तत्त्ववेत्त्याचा असतां पूर्वीच्या पुढाऱ्यांनीं याहि काळांत आपलेंच पुढारीपण स्वीकारलें जावें, म्हणून जो हट्ट धरिला, त्यामुळें होय ! असो.

## राष्ट्रीय उपास्य दैवत

स्वातंत्र्यप्रीति लोकांत उत्पन्न करून देण्यांत समर्थांनीं जे कांहीं प्रयत्न केले, त्यांपैकीं दासबोध हा एक होय. दुसरें त्यावेळीं सर्वांचें विठ्ठल हें जें

उपास्य दैवत झालें होतें, त्याच्याऐवजीं त्यांनीं रामाचें ध्येय लोकांच्या डोळ्यासमोर ठेवलें, याचें कारण असें असावें कीं, विठ्ठल हें भक्ताची वैयक्तिक इच्छा पूर्ण करणारें दैवत आहे. तसा प्रकार रामावताराचा नसून राष्ट्रोद्धारासाठीं या अवताराचें महत्त्व वर्णिलें आहे. धर्मावर व राष्ट्रावर घाला घालणाऱ्या रावणाच्या चिंधड्या उडवण्यासाठीं हा अवतार झाला आहे. वानरांसारख्या निर्बल प्राण्यांसदेखील सबलत्व आणून परक्यांविरुद्ध लढविण्यास सिद्ध करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं रामानें आणिलें. सर्वांस गुरुस्थानीं असलेल्या आपल्याच एका अवताराची म्हणजे परशुरामाची 'वृद्धत्वेन विचारणीय चरिताः' असें म्हणून कानउघाडणी करण्याचें धैर्य रामावताराच्या ठायींच दिसून येतें.

स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि ।
आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथाम् ॥

असे धीरोद्गार काढून लोकहितास्तव स्वसुखावर लाथ मारण्याचा स्वार्थत्यागीपणा दाखविणारे, प्रत्यक्ष शत्रूचा भाऊ बिभीषण यास त्याच्या गोटांतून फूस लावून आणणारे, नीतीच्या संकुचित कल्पनेकडे न पाहातां वालीचें निर्दलन करून श्रेष्ठ ध्येय ठेवणारे व सरतेशेवटीं आपण एकटेच मुक्त न होतां सर्व अयोध्या नगरी उद्धारणारे फक्त दाशरथी रामच आढळतात. म्हणून त्यांस राष्ट्राचें उपास्य दैवत बनविणें समर्थांना अवश्य वाटलें असावें. नाहींतर सर्व लोक विठ्ठलचरणीं मिलिंदायमान झाले असतांना मुद्दाम निराळें उपास्य दैवत काढण्याची त्यांना कांहीं अवश्यकता नव्हती.

रामदास स्वामी हे तत्त्ववेत्ते होते, हें त्यांस समर्थ म्हणत होते यावरून सिद्ध होतें. 'समर्थ' शब्दाची व्याख्याच दासबोधांत अशी सांगितली आहे कीं–

बहुत जनांस चालवी । नानामंडळें हालवी ॥
ऐसी हे समर्थ पदवी ॥ विवेकें होय.

समर्थ हें नांव खुद्द रामदासांच्या दासबोधांतच आढळतें असें नसून पूर्वीच्या तीनचार संतांनीं सुद्धां हा शब्द वापरला आहे. समर्थ ही पदवी

तत्त्ववेत्त्यांची आहे, मुत्सद्यांची नाहीं. विवेकाचा प्रांत समर्थांचा—तत्त्ववेत्त्यांचा-आहे आणि कृतीचा प्रांत मुत्सद्यांचा आहे. ज्ञानेश्वरींतसुद्धां समर्थ या शब्दाची व्याख्या अशीच केली आहे.

## सद्यःस्थितीशीं तुलना

या सर्व गोष्टींवरून सद्यःस्थितींत आपणांस बऱ्याच गोष्टी शिकतां येतील. सुरतेस कांग्रेसमध्यें दुही झाल्यामुळें जो तो नक्राश्रु ढाळतो आहे. परंतु राष्ट्राच्या क्रांतीच्या प्रसंगीं अशीं भांडणें व्हावयाचींच. सद्यःस्थितीचें ज्ञान करून देण्याचा म्हणजे संवेदना उत्पन्न करण्याचा जेव्हां काळ होता, तेव्हां सर्वांचें बहुमत, नव्हे, ऐक्यमत्य होतें. कांग्रेसचे ठराव तेव्हां एकमतानें पास होत. समर्थांच्या काळीं धार्मिकोन्नति हें ध्येय होतें. हल्लीं पैसा हें ध्येय झालें आहे. अशा प्रसंगीं आपण दरिद्री झालों आहों वगैरे गोष्टी सांगण्याच्या प्रसंगीं सर्वांत एकी होती. परंतु हा संवेदनाचा काल जाऊन जेव्हां निदानाची परिस्थिति प्राप्त झाली, आपल्या अधोगतीचें कारण परकीय सत्ता व आपली परावलंबी बुद्धि आहे, असें जेव्हां सांगण्याचा प्रसंग आला, तेव्हां जहाल आणि मवाळ यांच्यांत दुही उत्पन्न झाली. कवींच्या अथवा वक्त्यांच्या संवेदनाकाळांत जे सद्गृहस्थ अथवा देशभक्त गणले जात तेच, हल्लींच्या तत्त्वज्ञानाच्या काळांत मागें पडले पाहिजेत. ज्याप्रमाणें तत्त्ववेत्ते रामदास उत्पन्न झाल्यावर तुकारामासारख्या संतमंडळींनीं आपलें पुढारीपण सोडून दिलें, तसा प्रकार जोंपर्यंत होणार नाहीं, तोंपर्यंत असेंच चालावयाचें. आपण मात्र अशा गोष्टींमुळें स्वस्थ न बसतां आपलें कर्तव्य बजावीत असावें, म्हणजे झालें.

---

# यवतमाळ डिस्ट्रिक्ट असोसिएशनची स्थापना*

[ या नांवाची संस्था यवतमाळ येथें पाडव्याच्या सुमुहूर्तानें स्थापन झाली. सदरहू संस्थेची आवश्यकता कितपत आहे, हें समजावून सांगण्याकरितां सदरहू दिवशीं श्री. अणे यांनीं खालील आशयाचें भाषण केलें. ]

## अशा संस्थांची आवश्यकता

"इंग्रज सरकारनें" सुधारलेल्या कौन्सिलचा हक्क हिंदी लोकांना दिल्यामुळें हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत थोडाबहुत हातभार लावण्याची संधि आपणांला मिळाली आहे. लोकांना कौन्सिलांत आपले प्रतिनिधी पाठवितां येतात व त्यांच्या द्वारें आपलीं गाऱ्हाणीं सरकारच्या कानावर घालण्याची संधि त्यांना प्राप्त झाली आहे. एखाद्या विषयावर कौन्सिलमध्यें ठराव आणून किंवा आपल्याला इष्ट वाटत असलेल्या सुधारणा घडवून आणण्याकरितां एखादें बिल कौन्सिलपुढें ठेवून किंवा एखादा प्रश्न विचारून लोकमत सरकारच्या निदर्शनास आणण्याचें काम अत्यंत महत्त्वाचें आहे व या देणगीबद्दल सर्व हिंदी लोक सरकारचे ऋणी आहेत. तथापि या हक्काचा योग्य उपयोग जर करून घ्यावयाचा असला, तर लोकप्रतिनिधींना लोकस्थितीची बिनचुक माहिती असावयाला पाहिजे आणि त्यांनीं सार्वजनिक प्रश्नांचा आस्थापूर्वक अभ्यासहि केला पाहिजे.

मुंबई, मद्रास, किंवा बंगाल या प्रांतांत प्रेसिडेन्सी असोसिएशन, महाजनसभा, सार्वजनिक सभा, इंडियन असोसिएशन इत्यादि संस्थांचें साह्य कौन्सिलांत काम करणाऱ्या प्रतिनिधींना फार होतें. मद्रास इलाख्यांत तर जिल्हा व तालुका सभा यांची स्थापना बहुतेककरून प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणीं झाली असून सर्व इलाखाभर या संस्थांचें जाळें पसरलें आहे. या संस्था आज केवळ प्राथमिक अवस्थेंत असल्या, तरी हिंदुस्थानच्या भावी उत्कर्षास त्यांच्याकडून फार मोठें साह्य होणार आहे, असा माझा दृढ विश्वास आहे.

## कौन्सिलांचा उपयोग

मध्यप्रांत–वऱ्हाड या प्रांतांस कौन्सिलचा हक्क नुकताच मिळालेला आहे. प्रतिनिधींच्या निवडणुकीच्या वेळीं सर्व प्रांतभर जरी मोठी खळबळ उडाली

---

*'संदेश' मुंबई ता. ३० मार्च १९१५

व एकंदर प्रांतांत कांहींतरी नवीन राजकीय चैतन्य उत्पन्न झाल्याचा भास झाला, तरी थोडक्याच अवधींत लोकांना या नवीन हक्काचा विसर पडत चालला व या नवीन राजकीय हक्कांमुळें आपल्या स्थितींत व परिस्थितींत काय फरक पडला आहे, याची कल्पना तरी त्यांच्या अंतःकरणांत शिल्लक राहिली आहे किंवा नाहीं, याविषयीं मला जबरदस्त शंका आहे. या कौन्सिलांपासून आपला फायदा कसा करून घेतां येईल, ही गोष्ट जर लोकांच्या मनावर नीट रीतीनें बिंबली गेली, तर कौन्सिलसंबंधीं लोकांची वृत्ति उदासीन न राहतां अधिक आस्थापूर्वक अशी बनेल. एखाद्या अधिकाऱ्याकडून कांहीं प्रमाद घडला असतां त्यासंबंधीं कौन्सिल-मधील लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारितां येतो व अशा रीतीनें आपलीं कृत्यें व आपली वागणूक कौन्सिलमध्यें सभासदांच्या चर्चेचा विषय होण्याचा संभव आहे, या एका विचाराचा परिणामदेखील एकंदरींत राज्यव्यवस्थेची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर इष्ट असाच होईल. कौन्सिल-मधील सभासदांना लोकस्थितीसंबंधीं विश्वसनीय माहितीचा पुरवठा करणें आणि अशा रीतीनें प्रतिनिधी आणि लोक यांमधील संबंध नेहेमीं अप्रतिहत ठेवणें, हा एक अशा प्रकारच्या संस्थांचा उद्देश आहे.

## विचारपूर्वक मत बनविणें

आपण असें पाहतों कीं, चांगल्या शिकल्या सवरलेल्या आणि सार्वजनिक कामांत नेहेमीं पुढाकार घेणाऱ्या लोकांतदेखील सार्वजनिक प्रश्नांचा विचार करण्याची संवय नसते. वर्तमानपत्रांतील लेख वाचून प्रत्येक प्रश्नावर त्यांनीं आपापलीं मतें बनविलेलीं असतात. लोकमत तयार करण्याच्या कामांत वर्तमानपत्रांनीं फार मोठी कामगिरी केली आहे, ही गोष्ट मी पूर्ण-पणें जाणून आहें. परंतु प्रत्येक प्रांताची किंवा भागाची परिस्थिति थोडी फार परस्पराहून भिन्न असल्यामुळें वर्तमानपत्रांतून प्रगट होत असलेलें प्रत्येक सार्वजनिक विषयावरील मत सर्वच टिकाणीं सारखेंच ग्राह्य होण्यासारखें नसतें. आपल्या मध्यप्रांत व वऱ्हाडांत तर 'महाराष्ट्रा'शिवाय लोकदर्शक असें नांव घेण्यासारखें एकहि पत्र नाहीं. तेव्हां अशा स्थितींत प्रत्येक ठिकाणच्या

विचारी लोकांनीं आपल्या आणि राष्ट्रीय प्रश्नांचा स्थानिक परिस्थितीचें योग्य-मनन करून व ती लक्षांत घेऊन विचार करण्याची फार जरूरी आहे. अशा तऱ्हेचा अभ्यास करण्याची संवय विचारी वर्गांत उत्पन्न व्हावी, हा-देखील ही संस्था स्थापन करण्याचा दुसरा उद्देश आहे.

## नागरिकत्वाची जाणीव

राष्ट्रांतील नागरिक या नात्यानें आपलीं जीं कर्तव्यें आहेत, त्यांविषयीं सामान्यतःलोकांत जाणीव उत्पन्न व्हावी व नागरिकत्वाच्या हक्काची जबाबदारी लोकांना वाटावी, हा तिसरा उद्देश आहे. म्युनिसिपालिटी व लोकलबोर्डा-सारख्या उपयुक्त संस्थांकडे या प्रांतांतील सुशिक्षितांचें योग्य लक्ष नाहीं, ही गोष्ट कोणीहि कबूल करील. त्याचीं कारणें कांहींहि असलीं, तरी वस्तुस्थिति वरील प्रकारची आहे, ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. स्वराज्याच्या हक्कास पात्र होण्याकरितां ज्या गुणांची वाढ हिंदी लोकांत व्हावयास पाहिजे, असल्या गुणांचें बाळकडु हिंदी लोकांना म्युनिसिपालिटी व डिस्ट्रिक्ट बोर्ड या स्थानिक संस्थांतूनच मिळण्यासारखें आहे. राजनीतीच्या गहन तत्त्व-ज्ञानाच्या अभ्यासाचा ओनामा प्रथम येथेंच शिकला पाहिजे. याशिवाय कौन्सिलमध्यें सभासद पाठविण्याचा हक्क वरील संस्थांस मिळाला असल्या-मुळें त्यांची उपेक्षा करणें इतिउत्तर मुळींच हितावह नाहीं.

## वेगानें बदलणारी परिस्थिति

आपल्या प्रांतांतील परिस्थितींत किती विलक्षण वेगानें स्थित्यंतर घडून येत आहे, इकडे आपण लक्ष द्या. जिल्ह्यांतून आगगाडीचे रस्ते होत अस-ल्यामुळें पिसगांवसारख्या ठिकाणीं कोळशांच्या खाणीच्या कामास नुकतीच सुरुवात झाल्यामुळें आणि अशाच दुसऱ्या अनेक गोष्टींमुळें प्रत्यक्ष या जिल्ह्यांतील सांपत्तिक व औद्योगिक परिस्थिति फार वेगानें "बदलून राहिली" आहे. त्याप्रमाणेंच शिक्षणासंबंधानें सरकारनें स्वीकारलेल्या धोरणामुळें शिक्षण–प्रश्नाला विलक्षण महत्त्व येऊं पाहात आहे.

या सर्व गोष्टींचा विचार केला असतां ठिकठिकाणच्या विचारी लोकांनीं सार्वजनिक प्रश्नांची योग्य व अधिकारयुक्त चर्चा करण्याकरितां एकत्र

होऊन अशा तऱ्हेची एखादी संस्था निर्माण करण्याची सांप्रतकाळीं केवढी जरूरी आहे, हें आपल्या लक्षांत येईल.

## संस्थेचें ध्येय

सार्वजनिक प्रश्नांचा अभ्यास करण्याची प्रवृत्ति उत्पन्न करणें, असल्या अभ्यासाचीं साधनें विचारी लोकांना उपलब्ध करून देणें,सार्वजनिक प्रश्नांवरील लोकमताला योग्य वळण लावणें, प्रसंगविशेषीं लोकांच्या अडचणी, अर्ज, डेप्युटेशन वगैरे कायदेशीर मार्गानें सरकारच्या कानावर घालणें आणि हिंदुस्थानचा राज्यकारभार लोकहिताच्याच दृष्टीनें चालविण्याकरितां वेळोवेळीं सरकारला सूचना करणें हे या संस्थेचे उद्देश आहेत. हे उद्देश सिद्धीस नेण्याकरितां वेळोवेळीं काय काय योजना करावयाला पाहिजे आहेत,याचा आपण विचार करालच. तथापि एक लहानशी सूचना मी आपल्या विचाराकरितां आपणासमोर मांडितों. सदरहू संस्थेला जोडून राजकीय वाङ्मयाचा एक पुस्तकसंग्रह असावा व राजकीय विषयांवरील माहिती देणारे सरकारी रिपोर्ट, पत्रें, गॅझिटें वगैरे तेथें वाचावयाला मिळण्याची सोय व्हावी. तसेंच संस्थेच्या सभासदांची प्रत्येक महिन्याला एक सभा भरविण्यांत यावी व त्या सभेंत एखाद्या सभासदानें एखाद्या राजकीय, शिक्षणविषयक,सांपत्तिक किंवा औद्योगिक प्रश्नाचा एखादा निबंध वाचावा, अशी माझी सूचना आहे. संस्थेला स्वतंत्र जागा, ऑफिस व नोकर असावेत, व संस्थेचा पाया व्यवस्थितपणा व शिस्त या दोन गोष्टींवर असावा.

# लोकसंग्रह*

[ ता. १७ सप्टेंबर १९१५ रोजीं रात्रीं रॉड्रिग्ज थिएटरांत सार्वजनिक गणपत्युत्सवांत श्री. माधवराव अणे यांचें 'लोकसंग्रह' या विषयावर श्री. वामनराव जोशी "राक्षसी महात्त्वाकांक्षे"चे कर्ते यांच्या अध्यक्षतेखालीं व्याख्यान झालें. ]

व्याख्यात्यांनीं वैदिक मंत्रांनीं मंगलमूर्तीचें स्तवन करून आपल्या भाषणास सुरुवात केली. ते म्हणाले "आजचें माझें भाषण 'लोकसंग्रह' या विषयावर आहे. लोकसंग्रह या शब्दाचा लौकिक अर्थ समुदाय जमविणें, चार माणसें एका ठिकाणीं गोळा करणें वगैरे वगैरे आहे. परंतु माझें आजचें व्याख्यान वरील सामान्य विषयावर नाहीं, तर भगवद्गीतेंत ज्या लोकसंग्रहाच्या तत्त्वज्ञानाची जाणीव भगवंतांनीं अर्जुनास करून दिली, त्या लोकसंग्रहाचा अर्थ आज मी आपणांस सांगणार आहें. मागें दोन वर्षांपूर्वीं याच गणेशोत्सवांत झालेल्या माझ्या व्याख्यानांत मी श्रीगजाननाच्या मूर्तीची कल्पना आपल्यास सांगितली होती; व त्यावेळीं ऐतिहासिक माहितीवरून गणपति ही संग्रहवादी देवता कशी आहे, याचेंहि स्पष्टीकरण आपणांस केलें होतें. त्यानंतर गतवर्षीं 'समुद्रमंथन' हा विषय घेऊन त्यांत पौराणिक कथेच्या मुळाशीं ऐतिहासिक सत्य कसें जोडून असतें व त्याबद्दल आपण काय कर्तव्य बजाविलें पाहिजे, याचाहि खुलासा केला होता. यंदा मी लोकसंग्रह या विषयावर आपणांस माहिती सांगणार आहें. लोकसंग्रह मोक्षप्राप्तीला पोहोंचविण्यास कसा कारणीभूत होतो, त्यानें सामाजिक, राष्ट्रीय व विश्व मोक्ष कसा साधला जातो, या सर्वांचें विवेचन करण्यापूर्वीं लोकसंग्रह–धर्म भगवंतांनीं ज्या भगवद्गीतेंत सांगितला, त्या गीतेचें महत्त्व व ती कशी व कां उत्पन्न झाली याचा आज विचार करणार आहें.

ज्या प्रसंगीं श्रीकृष्णांनीं अर्जुनाला भगवद्गीता सांगितली, तो प्रसंग म्हणजे कौरवपांडवांमध्यें बेबनाव झाला असतां ज्याचें पर्यवसान शेवटीं कुरुक्षेत्राच्या ठायीं उभय पक्षांत युद्ध उपस्थित होण्यांत झालें, त्या युद्धांत दोन्ही सेना

* 'संदेश' मुंबई–ता. २२–९–१९१५

एकमेकांसमोर लढण्यास सिद्ध झाल्या असतां पुढील भयप्रद प्रसंगाची जाणीव होऊन अर्जुनाच्या मनांत व्यामोह उत्पन्न झाला, विषाद वाटूं लागला आणि त्यावेळीं हा व्यामोह दूर होण्यास भगवंतांनीं अर्जुनास जें ज्ञान सांगितलें, त्यांतच लोकसंग्रहाचें एक प्रमुख कलम आहे.

## अर्जुनाच्या शंकेचें स्वरूप

या लोकसंग्रहाचा विचार करण्यापूर्वी प्रथम आपण अर्जुनाच्या शंकेचें स्वरूप ओळखिलें पाहिजे. आजपर्यंत झालेल्या बऱ्याच महानुभाव टीकाकारांनीं भगवद्गीता ही अर्जुनाच्या मनांतील मोह अगर अज्ञान नाहींसें करण्याकरितांच भगवंतांनीं सांगितली, असें सिद्ध केलें आहे. परंतु माझ्या मतें अर्जुनाला त्यावेळीं बुद्धिभ्रंश तर झाला होताच, परंतु त्याहिपेक्षां त्याच्या मनाला "उत्साद्यंते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः" ॥ याप्रमाणें जी निराळीच भीति उत्पन्न झाली होती, ती भीति विश्वव्यापक कल्पनेला फारच विघातक होती. ती भीति म्हणजे अर्जुनाला वर्णसंकरासंबंधीं उत्पन्न झालेला व्यामोह हा होय.

आपले आप्तेष्ट, स्वजन मारले जातील, बायकामुलें पोरकीं होतील, वर्णसंकर होऊन पुढें कुलक्षय होईल व त्यामुळें धर्म नष्ट होईल, इतकेंच नाहीं, तर या सर्वांचा परिणाम रौरव नरकांत होईल, असें आम्ही ऐकत आलों. " नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम " यांतील ' अनुशुश्रुम ' असें आम्ही ऐकत आलों,—हे शब्द फारच महत्त्वाचे आहेत.

अर्जुनानें विचारलेल्या या शंकेचें समाधान भगवंतांनीं समोचित केलें आहे. प्रथम भगवंतांनीं मृत्यूचें विवेचन करून या शरीराशिवाय मनुष्यदेहांत जें अबाधित तत्त्व आहे, ज्याला कधींहि मरण नाहीं, ज्याला मी मारतों असें म्हणणें खोटें आहे, हें आप्तेष्टांचें मरण प्रवाहपतित कार्य आहे, त्याबद्दल तुला विषाद वाटूं नये म्हणून उपदेश केला, इतकेंच नाहीं, तर अर्जुनाच्या कुलक्षय व तज्जन्य संकटें या शंकेवर भगवंतांनीं सांगितलें कीं लोकसंग्रहकारक माझा धर्म आहे. जरी हा स्वधर्म विगुण अगर तात्पुरता असला, तरी त्यांत मरण इष्ट आहे. याशिवायहि भगवद्गीतेंतील चवथ्या अध्यायापूर्वीं भगवंतांनीं अर्जुनास सांगितलेली परंपरा व त्या परंपरेनुरूप " धर्मसंस्थापनार्थाय

संभवामि युगे युगे " निरनिराळ्या युगांत केलेले प्रयत्न यांचेंहि स्पष्टीकरण केलें. कर्म करीत असतां जनकादिक कसे सिद्धीला पोहोंचले, मला स्वतःला कर्म करणें किती अवश्य आहे व जर तें मी स्वतः करणार नाहीं, तर 'उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् । संकरस्यच कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥' जे भिन्न वर्ण आहेत त्यांमध्यें वर्णसंकर उत्पन्न होऊन त्या सर्वांचा कर्ता मी ठरेन, म्हणून अशा सर्वमान्य लोकसंग्रहापुढें कुलक्षयाचें मोठेंसें महत्त्व नाहीं. भगवंताची ही दृष्टि फारच मोठी आहे व त्यांच्या अंशभूत असलेल्या विभूतींचीहि अशीच व्यापक दृष्टि असावयाला पाहिजे आहे.

'लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि' यांतील 'एवापि' या शब्दावरून लोकसंग्रहाचें ज्ञान अर्जुनाला पूर्वींचेंच आहे, हें गृहीत धरूनच भगवान् कृष्ण बोलत असावेत, हें स्पष्ट होतें. हें ज्ञान अर्जुनाला पूर्वींच नारायणीयोपाख्यानांत नारदांनीं सांगितलें होतें. महाभारत हा नारायणीय धर्माचा 'जय' ग्रंथ आहे, ही गोष्ट महाभारताचा पहिलाच श्लोक वाचीत असतां स्पष्ट होतेः—

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।
देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ॥

नारायण म्हणजे प्रवर्तक पुराणपुरुष, नर म्हणजे अर्जुन अनुयायी, देवी सरस्वती म्हणजे विद्या व व्यास हा वक्ता, अष्टादश पुराणांचा मुनि. या सर्वांना वंदन करून ही जय कथा मी सांगतों, असा या वरील श्लोकाचा अर्थ आहे. 'जय' म्हणजेच भारत व या जयाची म्हणजे भारताची कथा इच्याशीं व लोकसंग्रहादिक जी सरस्वती विद्या आणि नरनारायण यांच्याशीं बराच संबंध आहे. ही जी जयाची म्हणजे भारताची कथा—ज्या कथेंत कौरव व पांडवांचें युद्ध झालें—त्याच्या मुळाशीं कांहींतरी भयंकर विरोध असल्याशिवाय युधिष्ठिरासारखे धीर वीर, भगवान् कृष्णासारखे ज्ञानी पडतेना; इतकेंच नाहीं, तर ज्या या भांडणांत अखंड भरतखंड दुभागलें गेलें, ज्या या क्षुल्लक गोष्टीकरितां सबंध भारतवर्षांत रक्तपात झाला, त्याच्या मुळाशीं

परस्परविरोधी असलेले हे दोन विचार कोणते असावेत, याबद्दलचा नीट खुलासा गीतेंतच सांपडला पाहिजे, असें मला वाटत होतें.

बळवंतरावजींचें गीतारहस्य मी वाचीत असतां याचा खुलासा नरनारायणीय धर्माच्या भागांत मला आढळला. हा नरनारायणीय धर्म म्हणजे काय, हें समजण्यास आपण आर्यसंस्कृतीचें पर्यालोचन केलें पाहिजे.

## नरनारायणीय धर्म व आर्यसंस्कृति

पूर्वी वेदकाळीं जेव्हां विष्णुदेवतेची उपासना पुढें आणण्याचा प्रयत्न झाला, त्यावेळीं पुराणांतरीं परिचित असलेली गोष्ट,श्रीविष्णूंनीं आपल्या उरोभागावर धारण केलेलें वत्सलांछन ही कथा तत्कालीन परिस्थतीची जाणीव पटविते. हें वत्सलांछन म्हणजे विष्णूच्या छातीवर भृगूनीं लाथ मारिली अशी कथा आहे. या कथेंतील तथ्य पाहूं गेलें असतां भृगुकालीं ज्या वैदिक देवतेची उपासना प्रचलित होती, त्या उपासनेविरुद्ध लोकसंग्रही नारायणीय धर्मवादी लोकांनीं विष्णूपासना मध्येंच घुसडून दिली, हें आहे. यावेळीं या नवीन पुढें येणाऱ्या उपासनेविरुद्ध भृगु, अंगिरा आदि ऋषिपक्षामध्यें मोठी चळवळ उडाली, व ती चळवळ किती जोराची असावी, हें विष्णूच्या छातीवर दिसणारें वत्सलांछन पटवीत आहे. पुढें हा नवीन पंथ वा सुधारणा गतकालीन लोकांच्या जसजशी पचनीं पडत गेली, तसतशी विष्णुदेवता ही वैदिक मानण्यांत येऊं लागली. कित्येकांनीं विष्णुदेवतेला उपेंद्र नांव दिलें. याप्रमाणें नारायणीय प्रगतिवादी लोकांनीं आपला विजय मिळविला. पुढें हळुहळू यज्ञकल्पनेची वाढ होऊं लागली. आर्यसंस्कृतींत साम्राज्याची हांव उत्पन्न झाली व अश्वमेध, ज्योतिष्टोम, सर्वजित् वगैरे यज्ञ प्रचारांत आले. तत्कालीन आर्यसंस्कृतींत ब्राह्मण, क्षत्रिय आणि विश् या तीनच वर्गांचा समावेश होत होता. कारण ते त्यावेळीं जेते असल्यामुळें ज्या जित लोकांशीं त्यांचा नेहेमीं संबंध येत असे, त्यांना ते दस्यु म्हणून संबोधित असत. त्या या दस्युवर्गाबद्दल प्रागतिक जो नारायणीय पंथ, त्याच्यासमोर प्रश्न उपस्थित झाला. इतकेंच नाहीं, तर तो नवीन वर्ग परिस्थितींत आपल्यामध्यें घेण्याचा प्रयत्न या नारायणीय अथवा वैष्णवधर्मीयांनींच केला व

तेव्हांपासून आर्यसंस्कृतींत चातुर्वर्ण्याचा समावेश झाला. या अशा तऱ्हेच्या गोष्टींचे दाखले पुराणांतरीं बरेच सांपडतील. परशुरामानें जी एकवीसवेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली, त्यांतील तत्त्व हेंच आहे. विश्वामित्र ब्राह्मण झाला, क्षत्रियांनीं ब्राह्मणांचा अधिकार ओढिला, वसिष्ठ नवीन मतास वळून त्यानें विश्वामित्रास महर्षिपदाचें दान दिलें वगैरे वगैरे गोष्टी हा या नारायणीय धर्म व प्राचीन धर्म यांमधील पहिला समेट होय. भार्गव हा भृगूच्याच वंशांतील असल्यामुळें प्राचीन संस्कृतीचा अभिमानी होता. श्रीरामचंद्रांनीं वानरादि जातींचा आदर करून त्यांचा आर्यसंस्कृतींत समावेश करून घेतला त्यामुळें पुढें श्रीराम व परशुराम यांचें युद्ध उपस्थित झालें, ही देखील या नारायणधर्माचीच कर्तबगारी होय. भीष्मद्रोणासारखे महापुरुष पांडवांचे चहाते असून केवळ कौरवांच्या अन्नानें भारले होते म्हणूनच पांडवांविरुद्ध लढावयाला तयार झाले काय? नाहीं. भीष्मद्रोण हे परशुरामाचे शिष्य होते, अर्थात हे पूर्वसंस्कृताचे अभिमानी होते. कौरवपक्ष हा पूर्वसंस्कृतीचा अभिमानी होता आणि या पूर्वसंस्कृतीवर श्रीकृष्णभक्त नारायणधर्मीय पांडवपक्षाला जय मिळवून लोकसंग्रह करावयाचा होता, आणि या ज्या जयामुळें आज ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चारी वर्णांचा आर्यसंस्कृतींत समावेश झाला, त्याचें सर्व श्रेय नरनारायणीय धर्मालाच आहे" त्याच नरनारायणाला नमस्कार करून—

> नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।
> देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ॥

हा श्लोक म्हणून रा. अणे यांनीं आपलें सुश्राव्य भाषण संपविलें.

---

# स्वराज्याशिवाय गत्यंतर नाहीं !*

ता. २९।१।१७ रोजीं पुणें येथील किर्लोस्कर थिएटरमध्यें ५॥ वाजतां स्वराज्यसंघातर्फे दे. भ. अणे यांचें जाहीर व्याख्यान झालें. रा. केळकर यांनीं सुरवातीला "रा. अणे यांची मूर्ति लहान असली, तरी कीर्ति मोठी आहे" (हंशा) अशा रीतीनें त्यांची ओळख करून दिली व लो. टिळकांस अध्यक्ष होण्यास सूचना केली. लो. टिळकांनीं व्याख्यात्यांची ओळख करून देतांना आमच्यामध्यें अत्यंत विचारी असे जे सद्‍गृहस्थ आहेत, त्यांत रा. अणे यांची प्रमुखपणे गणना होते, असा निर्देश केला. नंतर टाळ्यांच्या कडकडाटांत श्री. अणे बोलावयास उठले, ते म्हणाले–

" अध्यक्ष महाराज, सभ्यगृहस्थ व मित्रमंडळी, माझे मित्र रा. तात्यासाहेब केळकर व रा. गोखले यांनीं स्वराज्याविषयीं दोन शब्द बोलण्याविषयीं मला आज्ञा केली आहे. ज्या पुण्याकडे सर्व राष्ट्रीय चळवळीचें व जागृतीचें श्रेय मुख्यतः आहे, त्या पुण्यामध्यें मीं व्याख्यान द्यावें, ही गोष्ट चमत्कारिक खरीच !

## पुण्याच्या झऱ्यांतून

आम्ही बाहेरचे लोक पाणी पिऊन तहान भागवीत असतां बाहेरच्या मनुष्यानें येथें व्याख्यान देणें म्हणजे ' न्यूकॅसलला ' कोळसे पुरविण्यासारखें हास्यास्पद आहे ( हंशा ). पूर्वी अनेक वेळा कांहींना कांहीं सबबी काढून मीं आजपर्यंत वेळ मारून नेली, पण आज तात्यासाहेबांची आज्ञा मोडणें अशक्य झालें आहे.

गेल्या राष्ट्रीय सभेमध्यें स्वराज्याची योजना निश्चित झाली असून ती तूर्त अमलांत आणिली पाहिजे, असें ठरलें आहे. हा आमच्या स्वराज्याच्या मागणीचा पहिला हप्ता होय. स्वराज्याची मागणी करण्यापर्यंत आपली मजल कशी आली, हें कळावयाचें असल्यास आपणांस पूर्व इतिहासाकडे

---

* 'संदेश' मुंबई ता. १।२।१९१७

वळलें पाहिजे. पूर्वी देशसंरक्षणासाठीं राजा करभार घेत असे. प्रजेच्या अंतर्गत व्यवहारांत तो ढवळाढवळ करीत नसे. परंतु पाश्चात्य राजकारणामध्यें राजा व प्रजा यांचे व्यवहार तुटक राहत नाहींत. प्रजेचे सर्वच व्यवहार हल्लींच्या राजकारणांत अंतर्भूत होत असतात. राजकारणांत आमचा हात असावा, अशी जी मागणी केली जात आहे, ती एकप्रकारें

## इंग्रजी शिक्षणाचेंच फळ

होय. आमच्या जागृतीला निदान इंग्रजांनीं तरी भिण्यासारखें असें कांहीं नाहीं. पाश्चात्य शिक्षणानें शिक्षित झाल्यावर हिंदुस्थानचे लोक राजकारणामध्यें पूर्ण हक्क मागतील, तोच सोन्याचा दिवस होय, असें शिक्षणप्रसार करणाऱ्या मुत्सद्यांनीं बोलून दाखविलें होतें; व तो सोन्याचा दिवस आज उगवला आहे, हें पाहून इंग्रजांस खरोखर समाधान वाटलें पाहिजे. आमच्या जागृतीला जे लोक घाबरतात, त्यांच्या मनाची रचना वरील मुत्सद्यांहून कांहीं निराळीच असली पाहिजे, असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं ! ( टाळ्या ) हल्लींहि आमच्या आकांक्षा कायदेशीर आहेत व त्या पूर्ण झाल्या पाहिजेत, असें म्हणणारे इंग्रजांतहि कांहीं लोक आहेत. परवांच मध्यप्रांताच्या चीफ कमिशनरसाहेबांनीं स्वराज्याचें ध्येय न्याय्य आहे, असे उद्गार एका विशिष्ट प्रसंगीं काढिले, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. या मुत्सद्यांत व आमच्यांत विरोध आहे, तो एवढाच कीं, ते म्हणतात तुम्ही पात्र झालांत म्हणजे तुम्हांस स्वराज्य देऊं व आम्ही म्हणतों स्वराज्यास

## आम्ही आज पात्रच आहोंत.

आतां, " तुम्ही केव्हांहि पात्र होणार नाहीं," असें म्हणणाऱ्या कांहीं व्यक्ति नाहींत, असें नाहीं. या व्यक्तींमध्यें "कर्टिस" या नांवाचा एक मनुष्य आहे ( धिक्कार ). रेल्वेच्या डब्यांतील खिडक्यांतून किंवा गव्हर्नमेंट हाऊसच्या झरोक्यांतून हिंदुस्थानचें अवलोकन करून पुष्कळ प्रवाशांनीं साद्यंत इतिहास आजपर्यंत खरडले आहेत ! ( हंशा ) परंतु या कर्टिस्प्रवाशाच्या पाठीशीं एक राउंड टेबल संघ आहे व त्यांत कांहीं अधिकारीहि सामील आहेत, ही गोष्ट नुकतीच उघडकीस आली आहे. आमच्या आकां-

क्षांविषयीं बोलण्यांत अघळपघळ सहानुभूति दाखविणारे एक लेफ्टनंट गव्हर्नर या संघांत आहेत, हें उघडकीस आल्यामुळें मनाची थोडी चमत्कारिक स्थिति झाल्याशिवाय राहत नाहीं. कांहींहि असलें, तरी स्वराज्य मिळण्याच्या विरुद्ध सरकार नाहीं, इतकें खुशाल म्हणतां येतें. आमची चळवळ सुरू होऊन ५०।६० वर्षें झालीं आहेत.पहिल्यानें आपल्या लोकांना अधिकाराच्या जागा मिळाव्या म्हणून खटपट झाली. अधिकार हातांत असला म्हणजे लोकांचें कल्याण करतां येईल, अशी त्यावेळची समजूत होती. दादाभाईनीं या दिशेनें खटपट करून पार्लमेंटकडून सिव्हिल-सर्व्हिस्च्या परीक्षा दोन्ही देशांत घेण्यांत याव्या, म्हणून ठरवूनहि घेतलें. ठराव निष्फळ झाले, तरी कांहीं वरिष्ठ जागा हिंदु लोकांस मिळूं लागल्या. या जागांवर हिंदी लोक गेल्यानें प्रत्यक्ष फायदा जरी विशेष झालेला नाहीं, तरी आम्ही या कारभाराला योग्य आहोंत, असें सिद्ध झालें. उन्नतीचा

**हा खरा मार्ग नव्हे,**

असें समजल्यावर आमच्या चळवळीची दिशा कायदेकौन्सिलांकडे वळली. यानंतर मोर्लेमिंटो सुधारणा झाल्या व आमचे कांहीं भारदस्त लोक नामदारीच्या खुर्च्या आडवूं लागले ! या सुधारणा ऐकूनच कित्येकांस हर्षातिरेक झाला. डॉ. राशबिहारी घोष यांनीं तर असें बोलून दाखविलें कीं, "हिंदुस्थानवर आज मोठा कठिण प्रसंग गुदरला होता व या संकटामुळें देशाचें वाटोळें होतें कीं काय, अशी भीति वाटूं लागली होती! पण या मोर्लेमिंटोच्या सुधारणारूपी ढगांच्या अमृतवर्षावानें हें विघ्न टळणार, यांत शंका नाहीं! या अमृतबिंदूंचें पान करून २००।३०० वर्षांत पुरेल एवढी पुष्टि मिळवा!" हें राशबिहारींचें म्हणणें आज हास्यास्पद ठरलें असून त्यांनींहि गेल्या राष्ट्रीयसभेंत स्वराज्याच्या ठरावास संमति दिली आहे. मोर्लेमिंटोढगांत अमृत नसून साधें पाणीच आहे, असें लवकरच निदर्शनास आलें. यानंतर मानाला हपापलेले व इतर लोक यांत मात्र तंटे सुरू झाले.

**मोर्लेमिंटोसुधारणा फुसक्या ठरल्यावर**

कार्यकारी मंडळांत व स्टेट सेक्रेटरीच्या मंडळांत आपले लोक असतील तर चांगलें, असें लोकांस वाटूं लागलें. पण एखाददुसरा माणूस मंत्रीमंडळांत

गेल्यामुळें प्रत्यक्ष फायदा असा कांहींच न होतां उलट अप्रिय गोष्टी मात्र सरकार आपल्या प्रतिनिधींकडून करून घेतें, असा थोडक्यांत कटु अनुभव येऊन गेला, व त्याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे प्रेसॲक्ट होय. यानंतर हिंदुस्थानसरकार अनुकूल असलें, तरीहि स्टेटसेक्रेटरी आपलें कांहीं चालूं देत नाहीं, असा संयुक्तप्रांताच्या कार्यकारीमंडळाला अनुभव आला. स्टेट-सेक्रेटरी व त्यांचें कौन्सिल या निरर्थक गोष्टी असून आतां हें बंड नको, असें आम्ही म्हणूं लागलों आहोंत. कंपनीसरकारच्या वेळीं हिशेब ठेवणारे जें डायरेक्टरांचें बोर्ड होतें, तसल्याच प्रकारचें हें पिल्लूं असल्याचें आज उघड झालें आहे. ब्रिटिश जनतेला जबाबदार असें हिंदुस्थानसरकारचें राज्य असल्याचें जरी कितीहि सांगण्यांत येत असलें, तरी आजचा अनुभव निराळा आहे. एरव्हीं मात्र पार्लमेंटहौस बसावयास अपुरें पडतें, तेंच हिंदु-स्थानचा प्रश्न निघाला कीं रिकामें होतें. यावरून ब्रिटिश जनताहि आमच्या हिताचा निर्णय अशा रीतीनें लावील, असें वाटत नाहीं. इतक्या अनुभवानें जागे होऊन आज आपण

## स्वराज्यमागणीस सज्ज झालों आहोंत.

कायदेमंडळ आमच्या बहुमताचें असून मंत्रीमंडळ त्याला जबाबदार असलें पाहिजे, तरच कांहीं हक्कांचा अंश आपल्या हातांत आल्यासारखा होणार आहे. वसाहतीचें स्वराज्य आपल्या मागणीपेक्षां जास्त व्यापक असलें, तरी आजची मागणी पहिला हप्ता म्हणून मागितली पाहिजे. आमच्या आकांक्षांविरुद्ध वसाहतींची जारीनें खटपट सुरू असून राउंड टेबलच्या कर्टिससाहेबासारखे दूत संचारार्थ बाहेर पडले आहेत. हिंदुस्थान स्वराज्यास पात्र नाहीं—निदान आज तरी नाहीं—अशी ओरड या दूतांनीं चालविली आहे. अपात्रतेला कारण म्हणून हे लोक 'तुमचे मतदारसंघच नाहींत' अशी सबब पुढें आणीत असतात. पण ज्याला स्वराज्यच द्यावयाचें आहे, त्याला मतदारसंघहि निर्माण करतां येतील; शिवाय अशाच स्थितींत कानडादि वसाहतींना स्वराज्याचे हक्क मिळाले, तर आम्हांलाच ते कां मिळूं नयेत, हें कळत नाहीं !

स्वराज्याच्या चळवळीस योग्य असा समय आज प्राप्त झाला आहे. वसाहती साम्राज्याच्या पुनर्घटनेंत आपला भाग मिळविणार आहेत व साम्राज्याच्या भागीदार वसाहती झाल्यास

**केवढा अनर्थ ओढवेल,**

याची कल्पना आहे काय? हिंदुस्थानाला हमालांचे कारखाने समजण्याइतकी ज्यांची बुद्धि क्षुद्र आहे, त्यांचा अंमल आम्ही कधींहि सहन करतां कामा नये! (टाळ्या) वसाहतीचा हात आमच्या मानेवर पडूं नये, म्हणूनच आम्ही ही स्वराज्याच्या चळवळीची ढाल स्वसंरक्षणार्थ उचलली पाहिजे. स्वराज्य मिळाल्यानें केवळ आमचाच फायदा होईल असें नाहीं, तर त्यांत साम्राज्याचाहि फायदा आहे. कांहीं झालें तरी या युद्धाच्या अनुभवानें जागे होऊन साम्राज्याचें मनुष्यबळ वाढविण्याशिवाय गत्यंतर उरलेलें नाहीं. हें मनुष्यबळ हिंदुस्थान पुरवूं शकेल व याचकरितां आम्हांला स्वराज्य पाहिजे (टाळ्या). कांहीं लोक असेंहि म्हणतात कीं, "ही चळवळ कां करतां? याच राज्यपद्धतीपासून आपलें कल्याण आहे. मग तुम्हांला स्वराज्य कशाला हवें? आम्ही यांतच संतुष्ट राहिलें पाहिजे." पण या म्हणण्यांत अर्थ नाहीं.

**हिंदुस्थानांत असंतोष आहे,**

ही गोष्ट लपविण्यांत काय हंशील? बरें, आहे ही स्थिति कल्याणप्रद आहे, असें घटकाभर मानिलें, तरी सुद्धां तें उत्क्रांतितत्त्वाच्या विरुद्धच आहे. मूल नऊ महिने आईच्या पोटांत असतें, म्हणून आईबाप जर असा हट्ट धरूं लागले कीं, मुलानें आईच्याच पोटांत पुढेंहि दहाव्या अकराव्या महिन्यापर्यंत राहावें, तर तो वेडेपणा होईल (टाळ्या). नऊ महिन्यांनंतर मुलाची वाढ आईच्या देखरेखीखालीं पण पोटाबाहेर झालीच पाहिजे. त्याचप्रमाणें आम्ही आजपर्यंत साम्राज्याच्या पोटामध्यें सुखानें राहिलों असलों, तरी साम्राज्यानें आम्हांस त्याच्याच देखरेखीखालीं पण मोकळेपणें वावरूं दिलें पाहिजे, तरच आमची वाढ होईल. ही परिस्थिति प्राप्त व्हावी म्हणूनच आम्ही साम्राज्यांतर्गत असें स्वराज्य मागतों (टाळ्या).

आमच्या स्वराज्याशीं जगाच्या उन्नतीचाहि एकप्रकारें संबंध पोहोंचतो. जी पाश्चात्य संस्कृति आजपर्यंत आपली सुधारणेची मशाल पाजळीत होती,

तिलाहि या युद्धामुळें आपल्यांत कांहीं उणें आहे, असें भासूं लागलें आहे. आमची संस्कृति दहा हजार वर्षांची तरी निदान आहे. आमच्या संस्कृती-मध्यें जी जगण्याची जादू भरली आहे, ती जादू आज पाश्चात्य संस्कृतीस पाहिजे आहे. परंतु आम्हाला थोडा जास्त स्वतंत्रपणा असल्याशिवाय व राष्ट्र या नात्यानें आमचा मान वृद्धिंगत झाल्याशिवाय आमच्यापासून शिक्षण घेण्यास कोणीहि तयार होणार नाहीं. नोकरापासून कोणी कांहीं शिकला आहे काय? साम्राज्याला अंकित, पण स्वतंत्र असें अस्तित्व आम्हांला द्या, म्हणजे आम्ही सर्व मानवजातीचें हित कशांत आहे,ही जादू जगाला शिकवूं. अशा रीतीनें, जगाची भवितव्यता पूर्ण करण्याकरितां

## बादशहा व महाराणी

यांच्या वचनांची पूर्ति व्हावी म्हणून व आमच्या कल्याणाकरितां आम्हांस स्वराज्यप्राप्तीची खटपट जोरानें केली पाहिजे. मिळावयाचें असेल तेव्हां स्वराज्य मिळेल, असें म्हणून उदासीनता किंवा नैराश्य दाखविणें आज इष्ट नाहीं. साम्राज्याची स्वराज्यदानबुद्धि जागृत होईल असे प्रयत्न आम्हांस केले पाहिजेत. बलीनें एकदां एक मोठा यज्ञ आरंभिला व प्रतिज्ञा केली कीं, यज्ञ चालू असतां कोणी कांहीं मागितलें तरी त्यास तें देईन. याचनेकरितां बलीकडे पुष्कळ लोक आले व त्यांतच 'वामन' नांवाचा एक ब्राह्मण होता. वामनानें बलीजवळ त्रिपादभूमि मागितली. तेव्हां तेथें जे भिक्षुकांचे इतर मुलगे होते, ते वामनास हंसले. पण बलीजवळ शुक्राचार्य नांवाचा एक कर्टिस मुत्सद्दी होता ( हंशा व टाळ्या ). तो म्हणाला " या वामनाला-हिंदुस्थानला-कांहीं देऊं नका." बलीनें प्रतिज्ञाभंग करण्याचें साफ नाकारिलें. बली हा वामनाच्या हातावर उदक सोडणार, असें वाटतांच शुक्रानें बलीच्या मार्गांत अनेक विघ्नें आणलीं. मी इंग्लिश चॅनेल्मध्येंच बसेन, एडन् येथेंच अडथळा करीन, असें म्हणून त्यावेळच्या कर्टिस्नें

## झारीच्या तोंडाशीं आसन मांडिलें.

झारींतून पाणी पडेना, असें पाहतांच झारीचें तोंड दर्भानें टोंचून मोकळें करण्यांत आलें. उदक वामनाच्या हातावर पडलें, पण शुक्राचार्यांचा मात्र

डोळा गेला (हंशाच हंशा). त्रिपादभूमि दिल्यानें बलीचें साम्राज्य गेलें नाहीं. बलीला पाताळामध्यें साम्राज्य मिळालें आणि त्याच्या संरक्षणाची सर्व हमी वामनानें घेतली ( टाळ्या ). या दानापासून बली निर्भय झाला. आम्हीहि साम्राज्य सरकारास असेंच अश्वासन देतों कीं, आम्हांस स्वराज्य द्या म्हणजे आम्ही ३३ कोटी लोक साम्राज्याचें संरक्षण करूं व त्यावर एकहि संकट येऊं देणार नाहीं ( टाळ्यांचा कडकडाट ). या उदकाचा व रणयज्ञ-समाप्तीचा प्रसंग लवकरच येवो, अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. ( टाळ्यांचा एकसारखा गजर).

लोकमान्य समारोप करतांना म्हणाले कीं, "रा. अणे यांचें सुंदर व्याख्यान ऐकून लक्षांत आलेंच असेल कीं, हें यवतमाळचें पाणी कांहीं पुण्यावरून भरून नेलेलें नाहीं. हें मूळचें यवतमाळचेंच आहे."

---

# मुदतबंदीपद्धत बंद करा *

शुक्रवार ता. १६–२–१७ रोजीं यवतमाळ जिल्ह्यांतील रहिवाशांची जाहीर सभा तेथील डिस्ट्रिक्ट कॉंग्रेस कमिटीच्या विद्यमानें रॉड्रिग्ज थिएटरांत भरविण्यांत आली होती. इतर वक्त्यांचीं भाषणें झाल्यावर रा. माधवराव अणे हे टाळ्यांच्या प्रचंड गजरांत बोलावयास उठले, ते म्हणाले—

या ठरावासंबंधीं आपल्या येथील वृद्ध पुढारी रा. ब. मुंडले यांनीं सर्व माहिती आपणास दिलीच आहे. मी आपणांस कांहीं जास्त सांगणार, अशांतला भाग नाहीं. हा मुदतबंदी मजूरपद्धतीच्या मुदतीचा प्रश्न या अशा भलत्याच वेळीं कसा उत्पन्न झाला, ही शंका आपणां-पैकीं प्रत्येकास आली असेल. सरासरी तीन वर्षांपूर्वी असलीच दक्षिण आफ्रिकन प्रश्नासंबंधीं एक लाट उसळली होती, त्यावेळीं त्या चळवळीचा पुरस्कार के. ना. गोखले यांच्याकडे आला होता. त्यांच्या त्या वेळच्या चळवळीचा परिणाम अधिकारीवर्गावर होऊन त्या कार्यास थोडेसें यशहि आलें. लॉर्ड हार्डिंजसाहेब यांनीं आपल्या प्रयाणापूर्वी मद्रासला जें भाषण केलें,

* 'संदेश' मुंबई २३–२–१९१७

त्यांत त्यांनीं हिंदुस्थानची भरपूर स्तुति करून " यापुढें हिंदुस्थान हें मजुरांचें राष्ट्र आहे, ही म्हण केव्हांहि तें लावून घेणार नाहीं " असल्या तऱ्हेचे उद्गार काढल्याचें मला पक्कें स्मरतें. व्हॉइसराय लॉर्ड हार्डिंज यांच्या या भाषणामुळें सर्वत्र उमेद उत्पन्न झाली व

**" मजुरांचें राष्ट्र "**

म्हणून संबोधली जाणारी म्हण नाहींशी होणार, हिंदुस्थानला लागलेली ही भयंकर जखम बुजली जाणार, म्हणून सर्वत्रांस अत्यानंद झाला. सरकारनें आपला हा जो दृष्टिकोन बदलविला, याबद्दल हिंदी राष्ट्र आनंदाचे घुटके घेत आहे, तोंच मुदतबंदीची पद्धत आणखी पांच वर्षेपर्यंत इमानी हिंदी राष्ट्रावर अशीच चालू राहणार, ही बातमी विजेच्या कडकडाटाप्रमाणें हिंदुस्थानांत दुमदुमू लागली. एकीकडे सरकारनें आपला दृष्टिकोन बदलविला ही बातमी व दुसरीकडे हिंदी राष्ट्रानें युरोपियन मळेवाल्यांकडून आणखी पांच वर्षेपर्यंत असेंच

**फटके खात राहावें**

ही बातमी. अशा या स्थितींत सरकारचा हा दृष्टिकोन संक्रांतीच्या दृष्टीप्रमाणें हिंदुस्थानावर फिरला कीं काय अशी प्रत्येकास शंका येणें साहजिकच आहे ( टाळ्या ). पं. मालवीय यांना ही मुदतबंदीची पद्धति बंद करण्यासंबंधीं कौन्सिलामध्यें ठराव आणावयाचा होता. परंतु असला ठराव आणण्यास व्हाइसरॉयसाहेबांची मंजुरी पाहिजे असते. तसली मंजुरी पं. मालवीयजी यांना मिळाली तर नाहींच,परंतु कौन्सिल उघडण्याच्या वेळीं चेम्सफर्डसाहेबांनीं जें प्रास्ताविक भाषण केलें त्या भाषणांत त्यांनीं मंजुरी न देण्याचीं जीं कारणें सांगितलीं, त्यांवरून नीतीचें मापन करण्याचा तराजू सरकारजवळ दोन प्रकारचा आहे कीं काय, असें वाटूं लागलें. गुलामांची चाल बंद करतेवेळीं अनेक मळेवाल्यांनीं आपलें वजन खर्च केलें. कित्येकांनीं शेंकडो तक्रारी केल्या; तथापि त्यावेळीं नीति व पैसा या दोन मोहांच्या कचाटयांत सांपडून सरतेशेवटीं इंग्लंडच्या पार्लमेंटचें नीतीचें पारडें वर गेलें! त्यांनीं त्यावेळीं द्रव्यलोभाला महत्त्व दिलें नाहीं. नीति ही हिंदी लोकांचें

सर्वस्व आहे. आज ८००० हिंदी लोक मळ्यांत काम करीत आहेत. या ८००० लोकांपेक्षां कितीतरी पटीनें जास्त बाहेरदेशचे लोक, हिंदी राष्ट्र आज आपल्या खर्चानें पोशीत आहे. जें हिंदी राष्ट्र

## आल्यागेल्यांचें आदरातिथ्य

करूं शकतें, त्या राष्ट्राला केवळ मजुरीकरितां आपल्या देशांतील लोक बाहेर देशांत पाठविण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. कित्येक लोक 'तीन पुरुषाला एक बायको' हें प्रमाण अत्यंत अनीतिकारक आहे म्हणून तेथील अत्याचाराचें चित्र रेखाटीत आहेत. कदाचित् येत्या मे महिन्यांत जी सर्व वसाहतींची जंगी परिषद् भरविण्यांत येणार आहे, त्या परिषदेंत हें प्रमाण तिहीच्या ऐवजीं एका पुरुषाला एकच बायको असेंहि ठरविण्यांत येईल. परंतु हिंदुस्थानांतील नीतिमत्तेच्या कल्पनेंत एका पुरुषाला एक बायको ही कल्पनादेखील मोठीशी समाधानकारक नाहीं. साम्राज्यावर संकट आलें असतां ज्या हिंदुस्थाननें एकदिलानें व मनोभावें करून सरकारला मदत केली, त्याच हिंदुस्थानच्या लोकांना त्याच्या स्वामिभक्तीचें बक्षीस सरकारनें अशा तऱ्हेनें देणें न्याय्य होणार नाहीं, म्हणून सर्व यवतमाळजिल्ह्यांतील नागरिक खालीं लिहिलेला ठराव आज या सभेपुढें मांडीत आहोंत कीं—" सरकारनें फिजी बेटांतील मुदतबंदी मजूरपद्धतीची मुदत आणखी ५ वर्षे जास्त वाढविली आहे, याबद्दल ही सभा निषेध प्रगट करिते व ही वाढलेली मुदत ३१ मेच्या आंत रद्द करावी, अशी या सभेची सरकारास विनंति आहे."

# हिंदुस्थानचा साम्राज्याशीं संबंध

उभय स्वराज्यसंघांतर्फे रा. माधवराव अणे यांचें " हिंदुस्थानचा साम्राज्याशीं संबंध " या विषयावर मुंबईत श्रीकृष्ण लॉज्मध्यें डॉ. बाबासाहेब परांजपे यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर व्याख्यान झालें. ते आपल्या भाषणांत म्हणाले—

" आपल्या येण्याचा आजचा सुयोग आणून दिल्याबद्दल प्रथमतः मला डॉ. साठे व डॉ. वेलकर या उभयतांचे आभार मानिले पाहिजेत. कारण येथील लीगतर्फे व्याख्यान देण्याची आज्ञा मला एक वर्षापूर्वी झालेली होती, परंतु आजपर्यंत अनेक कारणांमुळें मला येथें येतां आलें नाहीं. आजसुद्धां चार शब्द बोलण्याच्या तयारीनें मी या ठिकाणीं आलेलों नाहीं, तरी समाजांत सध्यां ज्या विषयाची चर्चा सुरू आहे, ज्याच्यामागें सर्व विचारवंत पुढारी लागलेले आहेत, त्याचप्रमाणें ज्या विषयासंबंधानें सध्यां

**एकवाक्यता**

झालेली आहे व ज्यांना कांहीं देण्याची इच्छा असते, त्यांच्यांत व आमच्यांतसुद्धां ज्या विषयासंबंधानें एकवाक्यता होऊं पाहात आहे, अशाच विषयावर म्हणजे "हिंदुस्थानचा साम्राज्याशीं संबंध" या विषयावर मी बोलणार आहें.

इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशांचा कांहीं तरी संबंध आहे, तो कोठपर्यंत इष्ट आहे, त्यांत फरक होणें योग्य आहे किंवा नाहीं, हें आपणांला पाहावयाचें आहे. ब्रिटिश सरकार आपल्या अस्तित्वाचा प्रत्यय आम्हांला रोज रोज देत आहे. परंतु लोकांचें मत असें झालें आहे कीं, आहे हा संबंध हिंदुस्थानच्या कल्याणाचा नाहीं, अशा संबंधांतूनच हिंदुस्थानला वर येणें शक्य नाहीं, असा सर्वांचा ग्रह होऊन चुकला आहे. तो संबंध कसा असावा वगैरे संबंधानें जरी एकवाक्यता न होतां वाद होत असले, तरी एका विषयावर सर्वांची एकवाक्यता झालेली आहे आणि तो विषय म्हणजे—

---

* 'संदेश' मुंबई ता. २३ मे १९१७

## हल्लींचा संबंध इष्ट नाहीं,

तो हिंदुस्थानच्या कल्याणाचा नाहीं हाच होय. बराच मोठा फरक घडून आल्याशिवाय, कांहीं तरी क्रांति घडून आल्याशिवाय ती इष्टता प्राप्त होणें शक्य नाहीं. गेल्या तीस वर्षांच्या अनुभवानें आम्हांला हें शिकविलें आहे. जेव्हां कोणत्याहि एका गोष्टीवर मन स्थिर होतें, तेव्हांच ती प्राप्त होण्याची कांहींतरी आशा असते. काँग्रेसनें जर कांहीं केलें असेल, तर हेंच कीं, तिनें असलेल्या स्थितीबद्दल आमच्या मनांत वेळोवेळीं असंतोष उत्पन्न केला आहे, नाराजी उत्पन्न केली आहे. कोणत्याहि गोष्टीचा विकास कसा होत गेला, हें जर त्या गोष्टीच्या मुळाशीं जाऊन पाहिलें, तर असें दिसून येईल कीं, तिच्या मुळाशीं एक प्रकारची असंतोषवृत्ति वावरत होती, तिनेंच तें कार्य सिद्ध करून दिलें. या असंतोषांत, या नाराजींत अशी कांहीं जादू—सामर्थ्य म्हणा पाहिजे तर—भरलेली असते कीं, ज्यांच्यांत ती उत्पन्न होत असते, त्यांचें काम ती करून देतेच, परंतु शिवाय नाराजी ज्यांच्या संबंधानें असते, त्यांच्याहि मनावर असंतोषाचा पगडा बसविल्याशिवाय राहात नाहीं. त्यांना वाटूं लागलें आहे कीं, आहे हाच संबंध पाहिजे तितका कायम ठेवणें शक्य नाहीं. गेल्या दोन वर्षांत इंग्रज लेखक व इंग्रज मुत्सद्दी यांनीं आपल्या लेखांतून व भाषणांतून असें ध्वनित केलें आहे कीं, हिंदुस्थानांतील सध्याची स्थिति पालटली पाहिजे; म्हणजे काय, तें मात्र लिहिण्याच्या किंवा बोलण्याच्या भानगडींत कोणी फारसा पडत नाहीं. तीस वर्षांच्या चळवळीनें निदान एवढा तरी आम्हांला जय प्राप्त झालेला आहे. आजपर्यंत आम्ही क्रमविकासमार्गानें जात आलों. पहिली पायरी, त्यानंतर दुसरी पायरी हा क्रमवाद होय. या क्रमवादानें आम्हांला कांहीं विशेष असें प्राप्त झालेलें आहे काय ? कांहीं लोक याला असें उत्तर देतात कीं, कित्येक बाबतींत क्रमवादानें चालल्याशिवाय गत्यंतर नसतें. कां चालूं नये ? उत्क्रांतिवादांत असा एक बिंदु येत असतो, असें एक स्थळ येत असतें कीं, त्याच्यापुढें उन्नति करून घ्यावयाची असल्यास क्रमविकासवादाला बाजूस सारून—

## क्रांति करूनच पुढें जावें लागतें.

जेथें डोंगराची चढण व उतरण असा क्रम असतो, तेथें मध्यें एखादा खळगा येतोच येतो, व त्या ठिकाणीं उडी मारून गेल्याशिवाय गत्यंतर नसतें. त्याचप्रमाणें केव्हां केव्हां क्रमविकासवादावरून उडी मारून जावें लागतें. स्पेन्सरनें असें म्हणून ठेविलें आहे कीं–" Evolution does not always go by gradual steps, but there comes an action of leaping."

वॉरन् हेस्टिंग्जसाहेब जेव्हां आपली कारकीर्द येथें गाजवून व तुंबडी भरून विलायतेस गेले, तेव्हां तिकडील अधिकाऱ्यांपुढें हिंदुस्थानचा प्रश्न पहिल्यानें आला. त्यावेळीं बर्कसारख्या मुत्सद्यांनीं हिंदुस्थानची तरफदारी केलेली आहे. पिटसाहेबांनीं 'इंडिया बिल' पास करून घेतांना सांगितलें आहे कीं, "हिंदुस्थान देश हा अतिशय मौल्यवान् आहे. अमेरिकाखंड कांहीं कारणामुळें गमवावें लागलें. हिंदुस्थान मिळविला त्याचा तरी योग्य उपयोग करून घेतला पाहिजे. यासाठीं हिंदुस्थानचें आपणाला कांहीं तरी कल्याण केलें पाहिजे. मात्र आपलें तत्त्व म्हणजे--

### आंग्ल सत्ता कायम राखून

तिच्या अनुरोधानें काय तें करावयाचें, हें तत्त्व हिंदुस्थानच्या कारभारांत अद्यापि तसेंच आहे."

यानंतर व्याख्यात्यांनीं १८३३ सालापासून तों १८५८ पर्यंत राज्यकारभारांत झालेल्या स्थित्यंतराचें थोडक्यांत विवरण करून सांगितलें व १८५८ सालच्या बिकट प्रसंगीं सरकारला कांहींतरी सुधारणा करणें कसें प्राप्त झालें, तें सांगून व्याख्याते म्हणाले "आणीबाणीचे प्रसंग आले, बिकट परिस्थिति प्राप्त झाली, म्हणून सरकार राजकीय सुधारणा करण्याचें थांबलें, असें कधींहि घडून आलेलें नाहीं; उलट असाच काळ सुधारणा करण्याला कारणीभूत झालेला आहे. सध्याचा काळ भानगडीचा आहे आणि आणीबाणीचा आहे. अशा प्रसंगीं राजकीय प्रश्न पुढें मांडणें म्हणजे सरकारच्या चित्तवृत्ति व्यग्र करणें होय. हा कोटिक्रम निदान इंग्लंडला तरी खास पटणार नाहीं. कारण त्या

देशांत जेव्हां जेव्हां आपत्ती उत्पन्न झालेल्या आहेत, तेव्हां तेव्हांच सुधारणा करणें सरकारला प्राप्त झालेलें आहे. कानडांत जेव्हां भानगडी उपस्थित झाल्या, तेव्हां कानडाला बरेंचसें स्वातंत्र्य प्राप्त करून दिलें पाहिजे, असें तत्पूर्वी झालेल्या अमेरिकन युद्धानें इंग्लंडला शिकविलें होतें. यावरून प्रसंग येतात तेव्हांच सरकार सुधारणांकडे लक्ष देत असतें, नाहींतर एरव्हीं त्याचें दामटणें नेहमींप्रमाणें सुरू असतें, अशाप्रकारचा अनुभव आहे." यानंतर १८५८, १८६०, १८९२ या सालांत हिंदुस्थानांत घडून आलेल्या सुधारणांचें दिग्दर्शन करून व्याख्याते म्हणाले " १८९६ सालीं तुम्ही आपले प्रतिनिधी निवडून द्या, असें म्हणेंपर्यंत पाळी आली. या ठिकाणीं एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, प्रत्येक प्रसंगीं आंग्लवर्चस्वाला यत्किंचितसुद्धां धक्का बसूं न देतां काम करावयाचें. सर्व सुधारणांच्या

## मुळाशीं हें तत्त्व

आहे. १९११ सालच्या despatch मध्यें सुद्धां लोकप्रिय व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज यांनीं हेंच धोरण ठेविलें आहे. हा क्रमवाद ज्यांनीं स्वीकारिला, त्यांना

## सुधारणा म्हणजे अमृताचा पाऊस

वाटला. डॉ. रासबिहारी घोष यांनीं सुरतेच्या बखेडयानंतर मद्रासला जाऊन भरविलेल्या कांग्रेसमध्यें आजपर्यंतच्या सुधारणांनीं सरकारनें आपल्यावर अमृताचा वर्षाव पाडिला, असें सांगितलें आहे. या अमृतवर्षावानें आम्हांला कांहीं मृत्यु आलेला नाहीं, कारण अमृतानें कांहीं मरण येत नसतें ! या अमृतवर्षावानें आमचा एकप्रकारचा फायदाच झालेला आहे. १९०८ पासून १९११ सालापर्यंत आम्हांला शत्रु असणाऱ्या माणसांना–अशा वर्षावानें

## खरें कल्याण

होणार नाहीं, हें पटून ते आम्हाला येऊन मिळाले. अर्थात् लॉर्ड मोर्ले यांनीं पाडिलेला अमृतवर्षाव आमच्या कल्याणालाच अखेरीस कारणीभूत झाला.

आपणांला माहिती असेलच कीं, साम्राज्याच्या परिषदेंत हिंदुस्थानखेरीज असणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यांतर्गत वसाहतींना स्वतंत्रतेचे हक्क देण्यांत आले

असून हिंदुस्थानला नुसता साम्राज्याचा एक मुख्य भाग मानण्यांत आलेला आहे. येथपर्यंत आपली मजल येऊन ठेपलेली आहे.

## वचनेंच दिलीं नाहींत !

पुष्कळ लोक म्हणतात कीं, सरकारनें आम्हांला दिलेलीं वचनें मोडिलीं, परंतु मला नाहीं असें वाटत ! मला असें वाटतें कीं, सरकारनें आम्हाला वचनें दिलींच नाहींत. दिलींच नाहींत तर मोडणार कोठून? अहो आईच्या गर्भांत मूल वाढत असतें, पथ्य वगैरे करून आई त्या गर्भाचें पोषण करीत असते, परंतु ती आई जर म्हणाली कीं, माझें मूल चांगलें धष्टपुष्ट झालें पाहिजे आणि तें गर्भाशयांतच झालें पाहिजे असें म्हणून चालेल काय? (डॉ. साठे यांना मी हा प्रश्न विचारतों ) या हट्टाचा परिणाम काय होणार ? मूल बाहेर तर निघालें पाहिजे ? ( हशा व टाळ्या ) मूल बाहेर तरी निघालें पाहिजे, किंवा आईचें तरी बरेंवाईट झालें पाहिजे !! दुसरा मार्ग नाहीं. एखादा माळी असतो तो बीजारोपण करितो, रोपा वाढूं लागतो. माळी त्या रोप्याला पाणी घालून आळेंहि करतो. इतकें करून त्या माळ्यानें जर हट्ट धरिला कीं, अमुक उंचीपर्यंतच त्या झाडाची वाढ झाली पाहिजे, पुढें त्या वृक्षानें वाढूं नये, तर हें त्या माळ्याचें म्हणणें कसें बरें चालेल? माळ्याच्या म्हणण्याला न जुमानतां, तें झाड उत्तरोत्तर आपली वाढ करून घेण्याच्या मार्गाला लागेल. उत्क्रांतितत्त्व आम्हांला हेंच सांगत आहे. ज्या कांहीं कालपर्यंत वस्तुमात्राची उन्नति होत असते, त्या काळांत केव्हां तरी असा एक बिंदु येत असतो कीं, तेथें नेहमींचा क्रम ओलांडावा लागतो. मूल उदरांतून बाहेर पडूं लागलें म्हणजे

## आईला वेदना होतात,

त्या आईला सहन करणें प्राप्त असतें. त्याचप्रमाणें राष्ट्रांतील समाजाला वेदना होण्याचा काळ केव्हां केव्हां येत असतो. त्या वेदना होणें इष्ट असतें. त्यावेळीं मुलाला व आईला दोघांनाहि तो त्रास सहन करावा लागतो. ज्या बापाला मूल व्हावें अशी इच्छा असते, तो कनवाळु बाप पत्नीच्या वेदना

पाहात असतांना त्या कनवाळूपणानें सहन करीत असतो. मूल नको म्हण णारा बाप क्वचितच आढळेल! आपल्या पत्नीस वेदना होतात, म्हणून मूल नको म्हणतो तो बाप तरी कसला? वेदना ह्या व्हावयाच्याच! व त्या सहन केल्याशिवायहि गत्यंतर नसतें!

आमचें म्हणणें एवढेंच कीं, ज्या आमच्या मागण्यांचा तुम्ही निषेध करतां, त्या आम्हांला द्या. ज्यांचा उच्चार एकोणवीस सभासदांनीं आपल्या मसुद्यांत केलेला आहे व त्यांत कांकणभर जास्त भर घालून राष्ट्रीय सभेनें जो मसुदा तयार केलेला आहे, त्याप्रमाणें आमच्या मागण्या कबूल करा. आंग्ल सत्ता—आंग्लजातीची सत्ता—येथें कायम ठेविलीच पाहिजे, हा हट्ट कशाला? तो १७७३ पासून अद्यापपर्यंत चालत आलेलाच आहे. ज्या परिस्थितींत तुम्ही आमचें कल्याण करूं इच्छितां, त्या परिस्थितींत तें होणें शक्य नाहीं. सत्ता आमच्या हातांत आल्याशिवाय आमचें समाधान होणार नाहीं. सध्यां आहे ही स्थिति बदलून काय तें करा. परिस्थिति बदला म्हणजे काय? याचा अर्थ एवढाच कीं, ब्यूरॉक्रसीच्या हातांत सत्ता आहे ती काढून आमच्या हातांत द्या, एवढेंच आमचें म्हणणें आहे. तत्त्वाच्या दृष्टीनें पाहतां सध्यांचा कारभार हा बेजबाबदार राज्यकारभार नाहीं हें खरें, परंतु तो लोकमताला जबाबदार नाहीं. अधिकाऱ्यांच्या हातीं जबाबदारी ठेवून काय परिणाम होत असतो, तें आम्हांला कळून आलें आहे. पार्लमेंटमध्यें हिंदुस्थानचें बजेट सादर करण्याचा जेव्हां प्रसंग येत असतो, तेव्हां त्याच्या पूर्वींच १५ दिवस तें पास होऊन जातें, पण पार्लमेंटमध्यें येणारे नेहेमींचे सभासदसुद्धां त्यादिवशीं गैरहजर असतात.

असो. इंग्लिश लोकांनीं १००।१५० वर्षें आमचें कल्याण करून पाहिलें आहे. आमच्या कल्याणासाठीं त्या लोकांनीं हरप्रयत्न केले. एकसारखी कालवाकालव सुरूं करून ठेविली—परंतु आमचा अनुभव सांगतो कीं, अद्यापपर्यंत आमचें खरें कल्याण झालेलें नाहीं. कारण त्यांना तें करतां आलें नाहीं. त्यांचीसुद्धां हीच समजूत झालेली आहे. तेव्हां यापुढें आमच्या लोकांना मदतीला घेऊन तरी पाहावें. आम्ही दुरुपयोग केल्याचें आढळून

आल्यास दिलेली सवड तुम्हांला काढून घेतां येईल. १००।१५० वर्षांच्या प्रयत्नानें जें तुम्हाला करून दाखवितां आलें नाहीं, तें

**आम्ही करून दाखवितों.**

प्रजासत्ताक राज्याची तुम्हांला प्रचीति नाहीं. हा डोस तुम्हांला दिल्यास तुम्ही एकदम बेफाम होऊन जाल. तुम्हाला डॉक्टरकडे जावें लागेल आणि मग तुमचें दुखणें असाध्य होईल, अशा तऱ्हेचा कनवाळूपणाचा उपदेश कित्येकांकडून आम्हाला करण्यांत येतो. प्रातिनिधिक सत्ता ही आम्हाला इतकी अपरिचित आहे काय ? सिली नामक ग्रंथकारानें आपल्या एका ग्रंथांत बहुतेक सर्व राष्ट्रांतून democracy चा अधिकार म्हणजे लोकांच्या म्हणण्याप्रमाणें राज्यकारभार चालविण्याची पद्धति कशी होती, तें दाखविलें आहे. त्यांत हिंदुस्थानचाहि समावेश झालेला आहे.

स्मृतिसारख्या पंडितमान्य व लोकमान्य ग्रंथांतील कायद्याप्रमाणें प्राचीन राजांना वागावें लागत असे व असें न वागणाऱ्या राजाला पदच्युत करून काढून टाकण्यांत येत असे. स्मृतिसारखे ग्रथ हे मोठमोठया पंडितांकडून शिक्का बसून सर्व लोकांच्या संमतीनें बाहेर पडत असत. त्या ग्रंथांतील तत्त्वाप्रमाणें हजारो वर्षें आमच्या देशांतील कारभार चाललेला होता, यावरून लोकांनीं कायदे करावयाचे व राजानें ते मानावयाचे हें "डेमॉक्रसी" च्या मुळाशीं असलेलें तत्त्व आमच्यांत होतें, हें सिद्ध होत नाहीं काय? त्या काळीं शूद्र वर्ण नव्हता. खालावलेला, हीन, अशा दृष्टीनें कोणत्याहि वर्णाकडे पाहण्यांत येत नव्हतें. त्या काळीं होणाऱ्या यज्ञांत विद्वान् असे पुरोहित निवडून काढण्यांत येत असत. त्याकाळीं यज्ञांतून सोमरस पिण्यांत येत असे. मदकारक अल्कोहोलचा डोस आम्हाला कांहीं माहीत नव्हता. तो कोठून आला, तें कांहीं माहिती नाहीं. प्रातिनिधिक सत्तेचा शोध पाश्चात्य देशांतून १६ व्या व १७ व्या शतकांत लागला असेल, परंतु आम्हांला त्याची प्रचीति पुरातन कालापासून आहे. निवडणुकीच्या कामांत भिन्नभिन्न तत्त्वांचा अंगीकार करावा, या शास्त्राचा शोध त्या लोकांनीं लाविला असेल, परंतु शास्त्रीय शोध ही अशी गोष्ट आहे कीं, ज्यांनीं तो शोध लाविला, त्यांच्याच तो मालकीचा होत नाहीं. तो कोणाचीहि monopoly नाहीं. हा शास्त्रीय शोध आहे.

## लोकशाहीचा हा फरकोट आहे,

यानें तुम्हांला गरमी होईल, तुम्हाला उकडेल, अशी भीति दाखविण्यांत काय फायदा? म्हणतात ना कीं, "न देण्याचा वार शनिवार." म्युनिसिपालिटी-मध्यें प्रांतिक कौन्सिलांत किंवा वरिष्ठ कौन्सिलांत आम्हांला २५ प्रतिनिधी निवडून देतां येतात, मग ५०० प्रतिनिधी आम्हांला निवडितां येणार नाहींत कसें? हातांतील सत्तेचा त्याग करावा, असें त्यांस वाटत नाहीं, दुसरें काय? परंतु कालचक्र कांहीं बिकट असतें. आपण कल्पना करतों, त्याचप्रमाणें जग चालतें असें नाहीं. इच्छेविरुद्ध सुद्धां स्थित्यंतरें होतच असतात. आम्ही देणार नाहीं, असें ज्यांच्या मनांतून असतें तें मनांतच राहतें. मी देणार नाहीं, ही भाषा जरी अंतःकरणांतूनच असली, तरी ती बोलून दाखवितां येत नाहीं, असा काळ केव्हां केव्हां येत असतो. हा काळ सध्यां हिंदुस्थानासाठीं आलेला आहे. चिरोलसाहेबांच्या मतानें आमच्या राजनिष्ठेविषयीं साशंक झालेलीं माणसें आज आमच्या राजनिष्ठेचे पोवाडे गात आहेत. बेल्जमचा कैवार घेऊन बेल्जमला स्वातंत्र्य प्राप्त करून द्यावयाचें, अशी मोठी किंकाळी मारून इंग्लंड युद्धांत पडलेलें आहे. अमेरिकेला प्रशियन स्वातंत्र्याची काळजी वाटल्यामुळें तिनें आपणाला युद्धांत ढकलून घेतलेलें आहे, असा हा चमत्कारिक प्रसंग येऊन ठेपलेला आहे. अशा प्रसंगीं आम्ही स्वातंत्र्याची मागणी करण्यास हरकत कोणती? आम्हीं सळमेळ स्वातंत्र्य मागत आहोंत. इतरांप्रमाणें निर्भेळ स्वातंत्र्य मागण्याची आमची दानत नाहीं. पूर्वीं हिंदुस्थानांत आलेल्या ह्युएनत्संगासारख्या प्रवाशांनीं आमच्या कृतज्ञतेसंबंधानें वर्णनें लिहून ठेविलीं आहेत. जेथें तेथें ही कृतज्ञता व देशाभिमान या दोन गोष्टींचा मेळ कसा घालावा, हें आम्हाला सुरतेच्या बखेडयानें शिकविलें आहे. यानंतर दहा वर्षांत आमचें पाऊल रतिभरसुद्धां पुढें पडेना! तेव्हां 'होमरूल'ची चळवळ या दोन्ही गोष्टींचा मेळ घालण्यास समर्थ आहे, असें आढळून आलेलें आहे. तें कशासाठीं पाहिजे, हें आतां सांगण्याची जरूरी उरलेली नाहीं. आमची कर्तबगारी, आमचा अनुभव व आमचें सामर्थ्य यांचा आम्हाला स्वतःसाठीं व परक्यांसाठीं उपयोग करून घ्यावयाचा आहे. आमची संस्कृति आम्हाला जिवंत ठेवावयाची आहे. आमचें प्रेम भूमीपेक्षां आमच्य

संस्कृतावर जास्त आहे. तिच्यासाठीं दहा हजार वर्षांच्या स्वातंत्र्य व पारतंत्र्य यांच्या अनेकविध स्थित्यंतरांतून आम्ही आलेले आहोंत. होमरूलची चळवळ सुरू झाली. थोडयाच अवकाशांत तिचे

## पंधरा हजार सभासद झाले !

एवढ्यावरून होमरूलची लोकप्रियता किती आहे, तें दिसून येतें. तीस वर्षांत जें कोडें उलगडलें नाहीं, तें सध्यां सुटलेलें आहे. अजातशत्रुत्व व युधिष्ठिरत्व हीं दोन्हींहि तत्त्वें होमरूलमध्यें भरलेलीं आहेत. संघशक्तीची आवश्यकता किती आहे, तें सध्याच्या युद्धावरून जगाला कळून आलेलें आहे. साम्राज्यांतील ४० कोटी लोकसंख्येपैकीं सुमारें तीस एकतीस कोटी लोकांना वगळून बाकीच्या ७।८ कोटी लोकांना तेवढे स्वातंत्र्य द्यावयाचें, हें इष्ट आहे काय ? इतरांना स्वातंत्र्य देऊन आम्हां तीस कोटी लोकांना साम्राज्यसरकार

## नाराज ठेवणार काय ?

जे पुढारी आपलें मागणें पुढें मांडीत आहेत, अशांना लोकसमुदायानें उचलून धरिलें पाहिजे. आमच्यांत सामर्थ्य आहे, आम्ही अगदींच हतबल नाहीं, हें पटविणें हेंच होमरूलचें कार्य आहे. तुम्ही हिंदी लोक आहांत, तुम्ही जिवंत हिंदी लोक आहांत, हें होमरूलची चळवळ पटवीत आहे. प्रत्येकानें आपल्याशीं अशी खूणगांठ बांधिली पाहिजे कीं, जें सामर्थ्य अंगांत असेल, तें होमरूलच्यासाठीं खर्च करण्याचा निर्धार प्रत्येकानें केला पाहिजे. सर्व मुंबई शहरांत चार लाख होमरूलर या होमरूल कल्पनेचा पुरस्कार करण्यासाठीं बाहेर पडले पाहिजेत. मुंबई शहर म्हणजे

## शहाणपणाचा गड्डा आहे.

मुंबईत मुत्सद्दी लोक आहेत. त्यांचा दिमाख कायम राहतो कीं पदच्युत होतो, तें पाहावयाचें आहे. मुंबई शहर व्यवहारकुशल आहे. ती व्यवहारकुशलता या होमरूलच्या बाबतींत दिसून आली पाहिजे. तरी मुंबईचे लोक अत्यंत कळकळीनें या कार्याला सहाय्य करतील, अशी माझी खात्री आहे.

---

# संस्कृतिप्रसाराची मीमांसा *

यवतमाळ येथील श्रीगणेशोत्सवांत शनिवार ता. ६ सप्टेंबर १९१९ रोजीं सकाळीं ८ वाजतां श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या अध्यक्षतेखालीं दे. भ. माधवरावजी अणे यांचें "संस्कृतिप्रसाराची मीमांसा" या विषयावर व्याख्यान झालें. त्याचा त्रोटक सारांश—

## संस्कृति म्हणजे काय ?

संस्कृति हा शब्द इतका रूढ झालेला आहे कीं, त्याची व्याख्या करणें कठीण आहे व शास्त्रकारदेखील या शब्दाचा अर्थ वाचकांस जणूं काय अवगतच आहे, असें गृहीत धरून त्याची व्याख्या करण्याच्या भानगडींत पडले नाहींत. प्रमथनाथ बोस यांनीं Epochs of Civilisation या ग्रंथांत निरनिराळ्या राष्ट्रांच्या संस्कृती दिल्या आहेत, पण एकच कल्पना एखाद्या राष्ट्रांत प्राधान्येंकरून सर्वकाळ वसत आली, असें त्यांनींहि म्हटलें नाहीं. असो. हा शब्द व्याख्या करावयास इतका अवघड असला, तरी संस्कार या शब्दावरून त्याची सामान्य कल्पना करावयास हरकत नाहीं. वस्तूच्या मूळ स्वरूपावर संस्कार करून आपण ती व्यवहारांत आणितों. तद्वत् तत्त्ववेत्ते 'मनुष्य' या सामुग्रीचा उपयोग करीत असतात. आपणांला जसे दर्भ दगड, तशीं तत्त्ववेत्त्याला माणसें ! मनुष्य हा प्राणि व त्याचा समुदाय यांच्या हातून कोणतीं कार्यें घडविल्यास जगाचें कल्याण होईल, याचा विचार करून तत्त्ववेत्ते त्यांच्यापुढें जें ध्येय ठेवीत असतात व त्यांना ध्येयानुकूल करण्याकरितां मनुष्य या सामुग्रीवर जे संस्कार करीत असतात, त्यांचा 'संस्कृति' या शब्दांत समावेश होतो. ज्या समाजाला ध्येय नसतें, त्याला संस्कृतिहि अर्थातच नसते. संस्कृति ही जड वस्तु नव्हे. तो एक कल्पनासमूह होय.

## संस्कृति, धर्म व राष्ट्रीयत्व

संस्कृति ही प्राचीन कालापासून धर्माशीं संलग्न होती. धर्मभेदावरून संस्कृतीची भिन्नता ओळखली जात असे. पण गेल्या तीनचारशें वर्षांपासून युरोपमध्यें राष्ट्रीयत्वाची कल्पना उद्भूत झालेली आहे.

---

* 'लोकमत' यवतमाळ, ता. १२।९।१९३१.

राष्ट्रीयत्व म्हणजे स्थलविषयक अभिमान. एका संस्कृतीच्या पोटांत दहापांच राष्ट्रांचा अंतर्भाव होऊं शकतो. एकाच संस्कृतीचा अभिमान धारण करूनहि स्थलविशेषांत राहणाऱ्या लोकसमुदायाचे आपापल्या उन्नतीचे प्रयत्न सुरू झाले आहेत. धर्माभिमानापेक्षां राष्ट्रीयत्वाचा अभिमान संकुचित खरा, पण धर्माचें ध्येय जें विश्वबंधुत्व, त्याच्या पाठीस लागण्यापेक्षां आपापल्या देशविभागांतील जनसमुदायाचें कल्याण करणें बरें, हें संकुचित ध्येय निश्चित करून युरोपमधील राष्ट्रें गेल्या चारपांचशें वर्षांपासून आपल्या उन्नतीच्या मार्गास लागलीं आहेत. धर्म व त्याचें फळ अदृश्य आहे. पण धार्मिक सत्तेचा जाच मात्र प्रत्यक्ष आहे. म्हणून धर्माधिकाऱ्यांच्या निरंकुश सत्तेपासून जनतेस बचाविण्याकरितां त्यांनीं प्रयत्न चालविले व शेवटीं धार्मिक सुधारणांचा विषय बाजूस ठेऊन त्यांनीं राष्ट्रीयत्वाची कास धरिली. जगाचें कसेंहि असो, पण माझ्या देशाचें कल्याण झालें पाहिजे, या विचारास प्राधान्य मिळालें व आपलें राष्ट्र सर्वांत बलिष्ठ व्हावें, अशी महत्त्वाकांक्षा प्रत्येकाच्या मनांत उत्पन्न झाली. या उत्कर्षाबरोबरच आपल्या राष्ट्राची संस्कृति इतरांच्या माथीं मारण्याची हांव त्यांना सुटली व व्यापाराचा फैलाव, राज्याचा विस्तार याबरोबरच हीं युरोपियन राष्ट्रें आपल्या संस्कृतीचा प्रसार करीत सुटलीं. संकुचित ध्येय असल्यानें प्रत्यक्ष व्यवहारांत तीं जास्त कार्यक्षम व समर्थ ठरलीं. उलटपक्षीं विश्वबंधुत्वाचें उच्चतम ध्येय धारण करणारे आम्ही या चढाओढींत दुर्बल ठरलों. नवीन कांहीं करण्याची धमक अंगांत नाहीं, मागून चालत आलेली परंपरा जेमतेम चालवावयाची, या स्वभावामुळें आमच्या राजसत्तेंतहि त्राण उरलें नाहीं. गेल्या पांचसात शतकांच्या काळांत आमच्या राजसत्तेच्या मागें पापभीरुत्वाचा अंकुश लागलेला होता, म्हणून तिच्या हातून धडाडीचीं कृत्यें होईनाशीं झालीं. नवीन जोमानें वावरणाऱ्या युरोपियन राष्ट्रांशीं चढाओढ करण्यास आमची राजसत्ता असमर्थ ठरली.

## संस्कृतींचा झगडा

युरोपियन राष्ट्रें आपापल्या जन्मजात स्थलमर्यादेच्या बाहेर पडलीं. त्यांनीं महत्त्वाकांक्षांनीं प्रेरित होऊन आफ्रिका व अमेरिका खंडांत

आपल्या संस्कृतीचा पगडा बसविला, पण हिंदुस्थानांत आल्यावर त्यांची आपल्यापेक्षां वरिष्ठ अशा हिंदु संस्कृतीशीं गांठ पडली. आजपर्यंतचा त्यांचा अनुभव असा असे कीं, ज्यांचा त्यांच्याशीं संबंध येई, ते एकतर त्यांच्याशीं तद्रूप तरी होत, किंवा त्यांचें निमूर्लन तरी होई. पण हिंदुस्थानांत हीं दोन्ही शक्य नव्हतीं, उलटपक्षीं हिंदुस्थानची संस्कृतीच आम्हाला आत्मसात् करते कीं काय, अशी भीति त्यांना पडली. हिंदुस्थानांत चांगलें म्हणून जें जें दिसतें, तें आर्याचें आहे व ते आणि आम्ही एकच आहोंत, असा मानववंशशास्त्राच्या आधारें ते आमच्याशीं संबंध जोडूं लागले. तेव्हां शास्त्राच्या नांवाखालीं प्रतिपादल्या जाणाऱ्या असल्या गोष्टींनीं आमच्यापैकीं कित्येक लोकांस भ्रम पडूं लागला. असल्या कल्पना मनावर बिंबविण्याकरितां त्यांनीं शिक्षण सुरू केलें व पाश्चात्य संस्थांविषयीं लोकांच्या मनांत आवड उत्पन्न केली. पण मुख्य हेतु हा कीं, आपल्या धर्माचा पगडा येथील लोकांवर बसवावा. शिक्षणखात्याची स्थापना करणारे लार्ड मेकॉले यांनीं आपल्या बापास ही गोष्ट एका खाजगी पत्रांत लिहून कळविली होती. त्यावरून शिक्षण सुरू करण्याच्या मुळाशीं त्यांची कोणती कल्पना होती, तें स्पष्टपणें दिसून येतें. पण उच्च शिक्षण, राष्ट्रीयत्वाच्या संस्था व पाश्चात्यांचा सहवास यांमुळें आमची संस्कृति विलयास न जातां आमच्या मनांत पाश्चात्य पद्धतीच्या संस्था काढून स्वतःचें राष्ट्र त्यांच्या राष्ट्रांप्रमाणें प्रबल बनविण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. गुरूची विद्या गुरूस फळली, अशापैकीं हा प्रकार झाला ! पाश्चात्य राष्ट्रें विश्वबंधुत्वाची भाषा तोंडानें बोलतात. पण स्वतःच्या राष्ट्राचें कल्याण हा त्यांचा आद्य हेतु असतो. त्यामुळें स्वार्थापायीं त्यांना विश्वबंधुत्वाचें उच्च ध्येय गांठणें अशक्य झालें आहे. सुदैवानें आज स्वयंनिर्णयाचें तत्त्व जिकडे तिकडे बोलिलें जात आहे व त्याचा फायदा घेऊन चीन, हिंदुस्थानसारख्या राष्ट्रांनीं आपला फायदा करून घेतला पाहिजे. ह्या राष्ट्रांची संस्कृति फार प्राचीन व थोर आहे. पण राजसत्तेचा पाठिंबा असल्याशिवाय तिचा प्रसार होणें अशक्य आहे. आम्हांला आमची संस्कृति व राष्ट्रीयत्व या दोहोंचेंहि संवर्धन ह्या साम्राज्यांत राहून करणें शक्य आहे. साम्राज्याचा अभिमान बाळगावा, पण राष्ट्रीयत्व नष्ट होऊं न दिलें पाहिजे.

मि. ग्रॅटन यांनीं म्हटलें आहे कीं, उपकार फेडण्याकरितां कोणतीहि कुलीन स्त्री आपलें पातिव्रत्य गमाविण्यास तयार होणार नाहीं. तद्वत् कोणतेंहि स्वाभिमानी राष्ट्र दुसऱ्यांच्या ऋणांतून मुक्त होण्याकरितां आपल्या स्वातंत्र्यावर तिलांजलि देण्यास तयार होणार नाहीं.

## संस्कृतिसंवर्धनार्थ राजकीय स्वातंत्र्य हवें.

हें राष्ट्रीयत्व संभाळून, आपण आपल्या संस्कृतिप्रसारार्थ झटूं, तर भावी कालांतले पुष्कळ कलह कमी होतील. म्हणून आमच्या राष्ट्रीयत्वाचें पोषण व वर्धन होईल, अशी राजकीय सत्ता आमच्या हातीं देणेंच राज्यकर्त्यांनाहि श्रेयस्कर होणार आहे. असें न झाल्यास मात्र पाश्चात्य संस्कृति नष्ट होण्याचा संभव आहे, अशी भीति वाटूं लागली आहे. कारण महंमदीसंस्कृति झपाट्यानें उडया मारीत चालली असतां तिच्या दोन शाखा उत्पन्न झाल्या व ह्या द्वैधीकरणानें त्यांची आपसांत चुरस लागून ती संस्कृति हतबल झाली. तद्वत् जगाचें कल्याण करण्याकरितां इंग्लंडप्रमाणें अमेरिकाहि पुढें सरसावली आहे. संस्कृतिप्रसारार्थ त्यांची आपसांत अहमहमिका सुरू झाल्यास दोन्ही राष्ट्रें ज्या एकाच संस्कृतीचा प्रसार करूं पाहतात, तिजवर प्राणसंकट येण्याचा संभव आहे. हा अनिष्ट परिणाम टाळण्याकरितां तरी हिंदुस्थानच्या संस्कृतीचा प्रसार होईल, अशा रीतीनें राज्यकर्त्यांनीं आम्हांला राजकीय सत्ता दिली पाहिजे.

# ईश्वराचीं प्रतीकें संतजन *

रविवार ता. २१ सप्टेंबर १९१९ रोजीं संध्याकाळीं यवतमाळ डिस्ट्रिक्ट असोसिएशनच्या हॉलमध्यें दे. भ. बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखालीं नागरिकांची जाहीर सभा होऊन महात्मा गांधी यांच्या सुवर्ण ज्युबिलीचा समारंभ थाटानें साजरा करण्यांत आला. त्यावेळीं समारोपादाखल भाषण करतांना दे. भ. बापूजी अणे म्हणाले—

महात्मे व संतजन हीं ईश्वराचीं प्रतीकें होत. त्यांच्यावरून ईश्वराच्या अस्तित्वाची थोडीशी कल्पना करावयास जागा मिळते. ईश्वर ज्याप्रमाणें स्वतः कोणाचा किंकर नाहीं, दुसऱ्याच्या प्रकाशानें प्रकाशत नाहीं व स्वयंसिद्ध आहे, त्याचप्रमाणें संत हे या जगांत स्वतःच्या तेजानेंच प्रकाशमान होत असतात. म. गांधी हे आपल्या अंगच्या अत्यंत प्रखर सत्यनिष्ठेनें तळपत आहेत. आपल्या सत्यनिष्ठेपुढें ते आपल्या बांधवांची, सरकारची, फार काय ईश्वराचीसुद्धां पर्वा बाळगीत नाहींत ! कलकत्ता कांग्रेसच्या वेळेस बिहार प्रांतांतील हिंदुमुसलमानांच्या दंग्यांत हिंदु बांधवांस दोष देण्याचा ठराव पास करण्याचा त्यांचा आग्रह होता, तेव्हां त्यांनीं आपले हिंदु बांधव आपणांवर रागावतील,या विचारास थाराहि दिला नाहीं. इतकी निर्भयता आंगीं बाणण्याचें कारण त्यांची विश्वव्यापकता व उदारमनस्कता होय. चार वर्षांपूर्वी नागपुरास एका व्याख्यानांत मीं म्हटलें होतें कीं, म. गांधी आफ्रिका सोडून हिंदुस्थानांत राहावयास आले, या गोष्टीची हिंदुस्थानसरकारनें नोंद करावयास पाहिजे आहे. कारण ते स्वतः एका प्रचंड शक्तीचे निदर्शक आहेत. ते आपल्या एका शब्दानें सारी हिंदी जनता हलवून सोडूं शकतात. रौलट कायद्यास विरोध करतांना त्यांची ही शक्तिमत्ता निदर्शनास आली. सरकारला हें यापूर्वींच कळतें,तर रौलट् ॲक्टहि कदाचित् पास होता ना ! "मी भक्तांच्याठायीं वसतों" असें परमेश्वर म्हणतो व ही गोष्ट म. गांधी यांच्या चारित्र्यावरून आपल्या प्रत्ययास येते. या महात्म्यास परमेश्वर उदंड आयुष्य देवो.

---

* 'लोकमत' यवतमाळ ता. २६–९–१९१९

# लोकमान्यांच्या कार्यास पाठिंबा द्या ! *

ता. ३० नोव्हेंबर १९१९ रोजीं कोठा ( ता. यवतमाळ ) येथें श्री. लक्ष्मण रघुनाथ अभ्यंकर वकील यांच्या अध्यक्षतेखालीं जंगी जाहीर सभा झाली. तींत मुख्य व्याख्याते म्हणून दे. भ. बापूजी अणे म्हणाले—

## लोकमान्यांचें विलायतेंतून पुनरागमन

"लोकमान्य टिळक हिंदी लोकांचें डेप्युटेशन घेऊन विलायतेंत गेले होते. ते परवां मुंबईस परत आले आहेत. त्यांचें स्वागत बॅलर्ड पीयरवर करण्याकरितां जी मंडळी जमली होती, तींत वऱ्हाड-नागपूरचे प्रतिनिधी असून हिंदुस्थानच्या मायभूमीवर पदार्पण करितांना पहिला पुष्पहार, पहिला भाषणप्रसंग, पहिला नमस्कार कोणाशीं झाला असेल, तर तो आमच्याशीं! लोकमान्य टिळक यांचें मुंबईस झालेलें अश्रुतपूर्व स्वागत, त्यांचें निरनिराळ्या लोकांशीं झालेलें संभाषण, शांतारामाच्या चाळींतील प्रचंड मैदानांत हजारों लोकांच्या पुढें झालेलें त्यांचें अत्यंत मनोहर, आशाजनक व विनोदप्रचुर भाषण, लोकमान्यांची सुदृढ प्रकृति व उल्हसित वृत्ति यांचें वर्णन मी आपल्या वाणीनें कसें करूं ! असले प्रसंग डोळ्यांनींच पाहावयाचे असतात, शब्दांनीं वर्णावयाचे नसतात. आपण आम्हांला मुंबईस रवाना केलें नसलें, तरी आम्ही तुमच्या वतीनें लोकमान्यांचा सत्कार करण्यास मुंबईस जाऊन आलों." लोकमान्यांस विलायतेंत ज्या महत्त्वाच्या कामगिरीवर जावें लागलें, त्या होमरूल लीगच्या कार्याचें कथन करून व्याख्याते पुढें म्हणाले—

## " सुधारणा म्हणजे बाजारचा आयता माल

आमचे येथील अधिकारी आम्हांस काय पाहिजे, हें समजून घेण्याकरितां आपणांस अनुकूल जबाब देतील अशा 'जी-हुकूम' लोकांस प्रश्न विचारितात व त्यांच्यापासून मिळालेलीं ' ठीक आहे, सरकार ' हीं उत्तरें टिपून घेऊन तीं विलायतेस साम्राज्यसरकारकडे रवाना करितात. पण ' सर्व कांहीं ठीक आहे ' हें उत्तर आमच्या मनोवृत्तीचें निदर्शक नव्हे-आमचा अधिकारी वर्ग मात्र याच उत्तरांचे फोटो एन्लार्ज करून वरिष्ठ सरकार-

---

* "लोकमत" यवतमाळ ता. ५-१२-१९१९.

पुढें मांडतात व त्याला अनुसरून आमच्या सुधारणा आखून त्या इकडे बोलावून घेतात. पण बाजारचा आयता जोडा घरबसल्या माझ्या पायाला कसा येईल ? 'जोडयानें पायाला फोड येतो' अशी मी कितीहि तक्रार केली, तरी चांभार म्हणतो जोडा घट्ट होतो काय ? तर तो वापरा म्हणजे दोन दिवसांनीं पायांत येईल. बरें, तो सैल होत असला, तर तो म्हणतो उन्हानें तो आपोआप घटेल व पायास बरोबर येईल ! एकूण मी केलेला जोडा वाईट, असें तो कधीं म्हणून कबूल करावयाचा नाहीं; कारण त्याला आपला माल खपवावयाचा असतो! माझ्या पायास फोड यावा, असा त्याचा उद्देश नसेल, पण तो येतो खरा; व म्हणून माझा आग्रह आहे कीं, पायांचें माप घेऊन जोडा बनीव. हीच स्थिति आमच्या सुधारणांची आहे. आम्हाला काय पाहिजे याचा विचार न करतां त्या तयार केल्या जातात व त्या तयार करणारे कितीहि शहाणे असले, तरी त्या आमच्या मनाजोग्या व आमची प्रगति करण्यास समर्थ अशा कधींच होत नाहींत. उदाहरणार्थ,मोर्लेच्या सुधारणा पाहा. लॉर्ड मोर्ले दहा वर्षांपूर्वी म्हणत असत कीं, दूरवरच्या भविष्य काळावर मी नजर टाकून पाहतों, पर्ण हिंदुस्थानास स्वराज्य देण्याचा प्रसंग किंवा जरूरी माझ्या दृष्टीच्या टापूंत येत नाहीं. हा मुत्सद्दी अजून विद्यमान आहे व आपले शहाणपणाचे उद्‍गार अगदींच फोल, निरर्थक व अदूरदृष्टीचे ठरल्याचें त्याच्या प्रत्ययास आलें आहे.

## आपल्या चळवळीचा प्रभाव !

याच मोर्लेसाहेबांचा भक्त व पट्टशिष्य म्हणविण्यांत अभिमान बाळगणारा मि. मॉन्टेग्यु आपल्या गुरूच्या चुका दुरुस्त करून आम्हांला स्वराज्य देण्यास पुढें सरसावला आहे. पण असा काळ फिरविण्यास कारण आपली चळवळ मुख्यतः आहे, हें आपण विसरूं नका. तुमच्या म्हणण्यावरून तुमचे प्रतिनिधि म्हणून लोकमान्य विलातेस गेले. त्यांची तेथील कामगिरी तुम्ही वर्तमानपत्रांतून वारंवार वाचलीच असेल. त्यांनीं अमेरिकेचे प्रेसिडेंट वुइलसन्, इंग्लंडांतील मजूर पक्षाचे पुढारी व इतर वजनदार गृहस्थ यांचीं आश्वासनपत्रें आणिलीं आहेत. ही त्यांचा कामगिरी अगदीं बिनमोल आहे.

पण मोठ्या लोकांशीं नुसता संबंध जुळवून काम भागत नाहीं. तो संबंध कायम ठेविला पाहिजे. एखाद्या मुलाला आपली मुलगी देण्याचें कबूल केल्यावर तो वर मध्येंच कोणी उपटूं नये म्हणून त्याच्या बापाची जशी नाना तऱ्हांनीं मनधरणी करावी लागते व त्याच्याशीं घरोबा ठेवावा लागतो, त्याप्रमाणें लोकमान्यांनीं संपादन केलेला परिचय टिकवून वृद्धिंगत करण्याकरितां आपण खटपट केली पाहिजे. लाला लजपतरायांनीं अमेरिकेंत चालविलेल्या प्रयत्नांसहि आपण सहाय्य केलें पाहिजे. देशोद्धाराचें अवघड काम करण्यास आपलें सामान्य जनतेचें बुद्धिबल पुरें पडणार नाहीं, म्हणून बुद्धीनें काम करणाऱ्या लोकमान्यप्रभृति पुढाऱ्यांस आपण द्रव्यद्वारें मदत करणें आपलें कर्तव्य आहे. मी आपणांतर्फे लोकमान्यांस अभिवचन देऊन आलों आहें कीं, आपण हुकूम कराल तेव्हां आम्ही आपलें पुष्पपत्र आपल्या सेवेस हजर करूं. परवां मुंबईस रा. ब. चिंतामणराव वैद्य लोकमान्यांस म्हणाले कीं, आपण दौरा काढाल, तर हवें तेवढें द्रव्य वसूल करूं; पण मी म्हटलें, याकरितां लोकमान्य स्वतःच कशाला पाहिजेत? त्यांनीं फक्त मागणी करावी, ती पुरी करण्यास जनता सिद्ध आहे. आपण जर द्रव्यद्वारें या चळवळीस वेळोवेळीं व मनःपूर्वक मदत कराल, तर आजच्याहि सुधारणांत सरकारास पांच चार वर्षांतच फरक करावा लागेल. कारण राजकारणांत 'वज्रलेप' असें कांहींच नाहीं. मुत्सद्यांचा वज्रलेप निग्रहाच्या चळवळीच्या जोरानें सहज पुसून निघतो. माझी खात्री आहे कीं, आपण असा निग्रह कराल, तर पूर्ण स्वराज्य आपल्या पदरांत पडण्यास मोठासा काळ लागणार नाहीं. लोकमान्यांचा देह कांहीं चिरंजीव नाहीं. तो आज ना उद्यां पडणारच. पण तुम्ही जर त्यांचे खरे अनुयायी असाल, तर त्यांनीं जें ध्येय गांठण्याचे इतके दिवस परिश्रम केले, तें ध्येय संपादन केल्याची तोफ त्यांचा देह पडण्यापूर्वी त्यांच्या कानांवर जाईल, असें करा. ते स्वयंसत्ताक हिंदुस्थानचे पहिले प्राइम मिनिस्टर झाल्याचें पाहू, अशी महत्त्वाकांक्षा धारण करा म्हणजे राष्ट्राचें इच्छित मनोरथ तो परमेश्वर पुरें केल्याशिवाय राहणार नाहीं.

---

# सद्यःस्थिति*

पुणें येथें गायकवाडवाड्यांत लोकमान्य टिळक यांच्या अध्यक्षतेखाली श्री. माधवराव अणे यांचें "सद्यःस्थिति" या विषयावर व्याख्यान झालें. ते म्हणाले—

सद्यःस्थितींतील प्रामुख्यानें दिसणाऱ्या दोन गोष्टी म्हणजे मिळालेल्या सुधारणा व पुढील होणाऱ्या निवडणुकी या होत! या गोष्टींची वर्तमानपत्रांतून व व्यासपीठांवरून बरीच चर्चा झालेली आहे, व ती सर्व आपणांस माहीत आहे, असें मी धरून चालतों. त्यांतील गुणदोषांचा आपण विचारहि केला असेल. ह्या निवडणुकी होईपर्यंत जुनी राज्यपद्धति राहणार आहे. या सुधारणा घडवून आणिल्या पाहिजेत, याची लोकांना समजूत घालण्यासाठीं आज चार वर्षें जी चळवळ चालू होती, तिचेंच नांव

## स्वराज्याची चळवळ.

ता. २० आगस्ट १९१७ ला जो जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला, त्यावेळीं असें ठरलें कीं, आपल्या मागणींत एकमत होणार नाहीं. हा विचार विचाराच्या क्षेत्रांत होता. मॉंटेग्यू साहेब आले, मसुदा तयार झाला, रिपोर्ट प्रसिद्ध झाला, तेव्हां जहालमवाळांच्या भांडणास मूर्तस्वरूप आलें. कारण, नेमस्त असें म्हणावयास लागले कीं, या सुधारणा दिल्या इतक्या पुरे आहेत, उलटपक्षीं, त्यांनीं अजीर्ण होईल, जास्त नकोत! या शहाण्यांचें म्हणणें एवढ्यावरच संतुष्ट राहा. दुसरा म्हणाला, कांहीं झालें तरी आपलें पूर्वीचें ध्येय कायम ठेविलें पाहिजे. असे जे त्या वेळेस भेद झाले, ते तेव्हांपासून कायम राहिले. हें बिल ज्या स्वरूपांत इकडे आलें, तें येण्यांत तिकडे फार भांडणें झालीं, असें एक पक्ष सांगत आहे. मॉंटेग्यूसाहेब लुळे होते, पंगू होते म्हणून त्यांना साह्य करण्याकरितां येथील कांहीं शहाणे लोक आपली देहयष्टि कष्टवून तिकडे धांवून गेले. मॉंटेग्यूसाहेबाचे पाय कांहीं लोक ओढीत होते, त्यांचे पायहि लटपटत होते, पण आमच्या दंडाचा त्यांना आधार मिळाल्यामुळें ते आहेत त्या ठिकाणींच उभे राहिले, व म्हणूनच हें बिल पदरांत

* 'संदेश' मुंबई ता. ५ फेब्रुवारी १९२०

पडलें, असें कांहीं लोक सांगत आहेत. आम्हाला किती पाहिजे, याचा आवेशयुक्त पुरस्कार आम्ही केला, म्हणून या सुधारणा मिळाल्या, असेंहि म्हणण्यांत येतें. मॉंटेग्यूसाहेबांचें तोंड फिरून पाठ इकडे झाल्याबरोबर चेम्स्फर्डसाहेबांच्या मनावर छाप बसावयास लागली, व त्यांनीं लागलीच एक खलिता तयार केला. हिंदुस्थानांतील लोकांनीं जें शिष्टमंडळ पाठविलें त्यांनें तेथील लोकांची अशी खात्री करून दिली कीं, हिंदुस्थानांतील लोक

## आजच स्वराज्याला पात्र आहेत.

तेव्हां आतां सुरू झालेला हा तंटा महत्त्वाचा आहे, मतलबाचा आहे. या सुधारणांसंबंधीं तुम्ही जसें वागाल, त्यावरून पुढचें ठरणार आहे. लॉर्ड सिंह सांगत आहेत कीं, या सुधारणा पुरेशा आहेत. शिवाय ते म्हणतात कीं, या सुधारणांविषयीं जर कोणाला श्रेय द्यावयाचें असेल, तर तें मला नको व मॉंटेग्यूलाहि नको. तें सगळें श्रेय, त्या सर्वांचे वाटेकरी लॉर्ड चेम्सफर्ड हे होत. पूर्वी एकदां हें माझ्यामुळें झालें, असें त्यांनीं सांगितलें होतें, तें सर्वांच्या कानांत अजून घुमत आहे. सुधारणा चांगल्या म्हणा, ग्राह्य म्हणा असें सांगणारा एक पक्ष आहे. त्यांना मी असें सांगतों कीं, एखाद्या गाढवाला जर तुम्हांला हत्ती म्हणावयाचें असेल, तर खुशाल म्हणा, आमची कांहीं हरकत नाहीं ( हंशा ). आम्ही आपले गाढवाला गाढवच म्हणणार ! पण तो जर हट्टानें म्हणावयास लागला कीं, तें गाढव नाहीं, तो हत्ती आहे, तर त्याला सांगावयाचें बाबा,

## त्याच्यावर बैस आणि गांवभर मिरव !

(हंशा व टाळ्या). त्यांचें म्हणणें असें कीं, तें गाढव म्हणतां मग उकिरड्यावर कां फेंकीत नाहीं? पण आमचें म्हणणें असें कीं, त्याच्या योग्यतेनुरूप त्याच्याकडून काम हें करून घेतलेंच पाहिजे, व हत्ती मिळण्याकरितां खटपटहि केलीच पाहिजे. असा एक युक्तिवाद लढविण्यांत येतो कीं, आम्ही इतक्या मेहनतीनें आणलेली कल्याणकारक वस्तु हातची जाईल ! कोटिक्रम फारच सुंदर आहे. या सुधारणा निराशाजनक आहेत मग घेतां कां ? याचें उत्तर लोकमान्यांनीं दिलेलें आहे, तेव्हां तेंच पुनः पुन्हां सांगत नाहीं. एखाद्या

विद्यार्थ्यानें चांगला अभ्यास केला, परीक्षा झाली, पण नापास असा शेरा मिळविला (हंशा). खात्रीचा जो विषय त्यांतच नापास! मग त्याला हे शहाणे सांगणार कीं, पुढच्या वर्षी शाळेला जाऊं नकोस. (हंशाच हंशा). परीक्षेचा निकाल निराशाजनक म्हणतोस, मग शाळा सोड! (टाळ्या) निराश होणें, हताश होणें ही गोष्ट बरी नसली, तरी जास्त हक्क मिळविण्याची खटपट करावयाला कांहीं हरकत नाहीं, असें आम्हांस वाटतें. दुसरी कोटी अशी करण्यांत येतें कीं, निराशाजनक म्हणता मग ह्याच्यांत कां पडतां?

## हें तर्कशास्त्राला धरून नाहीं!

पण त्यांच्या या म्हणण्यांतला मला अर्थ कळत नाहीं. मी त्यांना असें उत्तर देतों कीं, पूर्वी त्यांच्या वडिलांनीं, गुरूंनीं अशा तऱ्हेचे उद्‌गार कधीं काढिले आहेत किंवा नाहींत? इंडियन युनिव्हर्सिटी ॲक्टाच्या वेळीं ना. गोखले म्हणाले होते कीं, हा ॲक्ट पास झाल्यावर शिक्षणाची वाढ खुंटेल. हा ॲक्ट् निराशाजनक आहे, असे उद्‌गार काढिले असतांना तो ॲक्ट् पास झाल्यावर युनिव्हर्सिटींत मेंबर होण्यास यांना लाज वाटली नाहीं! अर्थात् हा जो युक्तिवाद करण्यांत येत आहे तो फोल आहे. ह्यांत सत्यापेक्षां मतलबाचाच भाग अधिक आहे. आंत जावेसें वाटतें, तेव्हां रस्त्यांत जितकीं माणसें येतील तितकीं कमी करावयास पाहावें हा मुळाशीं हेतु आहे. इतकी स्थिति लक्षांत आली म्हणजे जें ठरेल त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे. सहकार्य कशा रीतीनें करतां, असा सवाल विचारण्यांत येत आहे. पण आमचें म्हणणें कीं, ज्यावेळीं जशी स्थिति असेल तसें ठरवूं! अजून त्याचे नियम प्रसिद्ध झाले पाहिजेत. प्रांतिक सरकारच्या हातांत किती राखीव हक्क (हंशा) येतात, व किती टाकाऊ (ट्रॅन्सफर्ड) (हंशा) येतात हें प्रसिद्ध झाल्यावर मग सहकार्य करावयाचें कां भांडावयाचें तें सांगूं. अजून बाजार भरावयाचा आहे. बाजार भरावयाच्या आधींच माल खरेदी करावयाचा कां लुटावयाचा हा प्रश्न काय उपयोगी? (हंशा).

सहकार्य हा शब्द दोन व्यक्तींचें अस्तित्व व्यक्त करतो. एकपक्ष सहकार्य करावयास तयार आहे, पण दुसरा पक्ष मुका आहे, तर काय होणार? ही जबाब-

दार राज्यपद्धति आहे,अशी आकाशवाणी झाली ! या पद्धतीची पाऊलवाट सोडलीत, तर गटारांत पडाल असें म्हणतात ( हंशा ). शिवाय असें सांगण्यांत येत आहे कीं, कौन्सिलांत जें काम होईल त्यावर भावी उत्कर्ष अवलंबून आहे, तेव्हां पक्षभेद मनांत बाळगून निवडणुकी करूं नका, हें म्हणणें केव्हां पटलें असतें ? हें असें सांगतात त्यांना पक्षभेद नसता तर ! ( हियर, हियर ! ) आमच्या पक्षाला कोणाचा आधार नाहीं, आमचा पक्ष बुडतो आहे असें म्हणून कोनाकोपऱ्यांत बसलेलीं म्हातारीं माणसें मिळविलीं मग आतां असें कशाकरितां म्हणतां ? ( हंशा ). पक्षभेद विसरून निवडणुकी करा ही भाषा वापरण्याच्या अगोदर चार पांच दिवस तेच आपण असें म्हणत होतां कीं,

## राष्ट्रीय सभा कुजली आहे,

तिला घाण सुटली आहे, ह्याकरितां चांगल्या हवेंत बाहेर पळावें ! (हंशा व टाळ्या).याचा गर्भितार्थ असा कीं,राष्ट्रीय सभेच्या कुजलेल्या हवेंतील लोकांना न निवडून देतां मोकळ्या हवेंत असणाऱ्या,एकेबाजूस असणाऱ्या,घरांमध्यें बायकांना बाजूला बसावें लागतें तद्वत् असणाऱ्या (हशाच हंशा) अशांना निवडून द्या ! इतके कांहीं आम्ही मूर्ख नाहीं कीं वरील कोटीक्रमाला फसूं ! सध्यां कोणी कोणालाहि अशिक्षित म्हणण्याचें कारण नाहीं. या सर्वांवरून असें ठरतें कीं पक्षभेद हा राहणारच! तेव्हां प्रत्येकानें असें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, आपल्यांतील पुढारीच निवडून दिला पाहिजे.

पहिली काळजी ही घेतली पाहिजे कीं, प्रत्येक मतदारसंघातर्फे एकच उमेदवार उभा राहिला पाहिजे. आपल्यांत जरी २५ लोक उभे राहण्याच्या योग्यतेचे आहेत, तरी त्यांतील एकालाच उभा करून बाकीच्या चोवीस जणांनीं स्वस्थ बसलें पाहिजे. आम्ही सर्व लायक आहोंत, असें जरी वाटत असलें, तरी एकच धाडिला पाहिजे. कित्येकांनीं कौन्सिलाचा अभ्यास केलेला असतो व तेथें काम केलें म्हणजे देशसेवाहि होते, हें जरी खरें असलें, तरी आपला पक्ष निवडणुकीच्या वेळीं यशस्वी होण्याकरितां तुम्हांला झीज सोशिली पाहिजे.

## आपापल्यांत भांडू नका !

या निवडणुकीच्या भांडणांत असा तोटा आहे कीं, दोघे भांडून तिसऱ्याचा लाभ होतो. या सुधारणा मिळण्याकरितां नोकरशाहीला जो कांहीं त्रास, जाच झाला, तो आपल्याकडून झाला आहे. मागला अनुभव असा आहे कीं, ज्यांच्या जाचामुळें सुधारणा झाल्या, त्यांचा जाच सुरू होतो. आपापसांत भांडणें उपयोगी नाहींत. अधिकाऱ्यांना असें वाटलें पाहिजे कीं, आपणांला सत्ताधारकांच्या बरोबर भांडावयाचें आहे. जे अधिकार सरकारच्या हातांत आहेत, ते त्यांना गुण्यागोविंदानें भोगूं द्यावेत किंवा कसें, हें तुमच्या हातांत आहे.

## या पहिल्या टकरीच्या वेळेला

आपला पक्ष खात्रीनें यशस्वी होईल, असे प्रयत्न केले पाहिजेत (टाळ्या). त्यांचें म्हणणें कीं सुधारणा दहा वर्षे पुरेशा आहेत, पण आम्ही जे बसणार ते असा निश्चय जाहीर करणार कीं, त्याच्या आंत यापुढील हप्ता मिळवूं (टाळ्या). सध्यां जें मिळालें तें कांहीं खुषीनें मिळालें नाहीं. हा राजसत्तेपैकीं एक तुकडा आमच्या अंगावर टाकण्यांत आला आहे. पण एवढें लक्षांत ठेवा कीं, तुमच्या विक्राळ स्वरूपाला भिऊन हा तुकडा तुमच्या अंगावर टांकण्यांत आला, तो खाऊन तशीच दृष्टि कायम ठेवा, म्हणजे पाठींत दंडुका न बसतां आणीक भाकरी मिळेल ! आहे एवढें पुरें, असें जर जाहीर केलेंत, तर फार विपरीत गोष्ट होणार आहे. सध्यां लीग ऑफ् नेशन्स्च्यापुढें आपलीं मतें मांडणें हें आपलें काम आहे. कारण लीग् ऑफ नेशन्स् सर्व राष्ट्रांचें आहे. नाहीं तर असें होईल कीं, ज्या लोकांना मत बनवितां येत नाहीं, त्यांना सेल्फ् डिटर्मिनेशन् कसें मिळावें ? ज्यांना अधिकारीवर्ग खूष ठेवावयाचा आहे, त्यांना सुधारणा घडवून आणणें होणार नाहीं. तात्पर्यार्थ, आपल्याला नवीन कौन्सिलची निवडणूक विशेष लक्षपूर्वक विचार करून केली पाहिजे. नाहीं तर भगीरथासारखी स्थिति होईल. भगीरथानें गंगा अशाकरितां आणिली कीं, सगराचीं हाडें भिजवावीं. पण सध्यां गंगेच्या काठीं राहणारे पंडे लोक सांगतात कीं, अजून तीं हाडें भिजावयाचीं आहेत. नाहीं-

तर त्यांच्यांतील महत्त्व नाहींसें होईल, पवित्रपणा नाहींसा होईल, व मग या पंड्यांचा उदरनिर्वाह चालावयाचा कसा ? (हंशा). तसें ही

सुधारणागंगा

आणिली, म्हणून जे धंदेवाईक बडवे म्हणत आहेत, त्यांच्या बोलण्यावर फसूं नका. नाहीं तर सुधारणागंगा येईल व धों धों वाहात जाऊन समुद्राला मिळेल. तेव्हां, तें चालूं न देतां त्या सगराचे वंशज ज्यांना खावयाला अन्न नाहीं, ज्यांचे नुसते अस्थिपंजर शिल्लक उरले आहेत, अशा त्याच्या वंशजांचीं हाडें, ते अस्थिपंजर, यांना सुधारणागंगेचें स्नान घालून त्यांच्या देहांत स्वराज्याचें चैतन्य उत्पन्न करा, अशी विनंति करून मी आपली रजा घेतों ( टाळ्या ).

---

# खिलाफतीच्या सुरक्षिततेबद्दल प्रार्थना*

शुक्रवार ता. ९ एप्रिल १९२० रोजीं संध्याकाळीं श्रीकेदारेश्वराजवळील मैदानांत राष्ट्रीय सप्ताहांतील व्याख्यानमालिकेंत तपस्वी डॉ. बाबाहेसाब परांजपे यांचें "खिलाफतीची सुरक्षितता" या संबंधानें व्याख्यान झाल्यावर सभेचा समारोप करितांना अध्यक्ष या नात्यानें दे. भ. बापूजी अणे यांनीं पुढील भाषण केलें:—

## मुसलमानांनीं खिस्ती राष्ट्रांस माणुसकी शिकविली.

खिलाफतीचें संरक्षण करण्याचे मुख्य उद्देश दोन. ते हे कीं, जगांत अनर्थ उत्पन्न होऊं नयेत व जगाची प्रगति कुंठित होऊं नये; व ह्या जगत् कल्याणाच्या कार्याकरितांच आम्ही हिंदुलोक बद्धपरिकर झालों आहोंत. कोणी म्हणतात कीं, खिलाफतीच्या रक्षणाचा जगाच्या उत्क्रांतीशीं काय संबंध आहे ? मुसलमानी धर्म जगताच्या पाठीवर नसला, तर जगाचें काय अडणार आहे ? तो अस्तित्वांत येण्यापूर्वी जगाचें काय अडलें होतें ? असल्या पोरकटपणाच्या आक्षेपांस तितक्याच पोरकटपणाचें उत्तर म्हणून असें म्हणतां येईल कीं, तुमचा खिस्ती धर्म उदयास येण्यापूर्वी

---

*'लोकमत' यवतमाळ ता. १६–४–१९२०

तरी जगाचें काय अडून राहिलें होतें ? आणि तो जन्मास आल्यानें जगाच्या उत्क्रांतीस कितीशी मदत झाली आहे ? पण असलीं उत्तरें व प्रत्युत्तरें सोडिलीं व या प्रश्नाचा शांतपणें विचार केला, तर त्यांपासून पुष्कळ गोष्टींचें ज्ञान होईल ! उत्क्रांति हा शब्द उच्चारल्याबरोबर ज्या प्रमुख दहापांच गोष्टी डोळ्यांसमोर उभ्या राहतात, त्यांतील बऱ्याच गोष्टी मुसलमानांनीं खिस्ती राष्ट्रांस शिकविल्या आहेत, हें इतिहासवाचकांस सहज दिसून येण्यासारखें आहे. पहिली गोष्ट ही कीं, मुसलमानांनीं खिस्ती राष्ट्रांस माणुसकी शिकविली ! ड्रेप नामक एका नामांकित लेखकानें लिहून ठेविलें आहे कीं, मुसलमानांनीं स्पेन, पोर्तुगालवर आपला अमल बसविला, त्यापूर्वी त्या देशांतील खिस्ती लोकांस स्वच्छता कशाशी खावी, याचें देखील ज्ञान नव्हतें ! ती त्यांना मुसलमानांनीं शिकविली. गांवांत चांगल्या सडका बांधण्याची कला त्यांना मुसलमानांनीं शिकविली व कार्डोव्हा आणि सालोमान्का येथील मुसलमानी अमलांतील सडकांच्या नमुन्यावर तेथून तीनशें वर्षांनीं खुद्द लंडन शहरांत बारा सडका बांधिल्या, याबद्दल त्यावेळीं इंग्रजांना केवढें कौतुक, केवढा अभिमान व केवढा हर्ष वाटला !

## समानतेचीहि शिकवणूक मुसलमानांचीच !

यावरून दिसून येईल कीं, सुधारणांच्या आदिभूत कल्पनांची शिकवणूक खिस्ती राष्ट्रांना मुसलमानांपासून मिळालेली आहे. असें आहे तर खिस्ती संस्कृतीच्या नंतरची मुसलमानी संस्कृति आहे, असें म्हणण्यांत व तिला त्याबद्दल कमीपणा देऊन हिणविण्यांत कोणता अर्थ आहे ? एखाद्या इंग्रज मनुष्याला विचारलें कीं, जगाच्या भलाईकरितां तुझ्या राष्ट्रानें काय केलें ? तर असा प्रश्न करणारावर तो प्रथम डोळे लाल करील, व फार तर असें उत्तर देईल कीं, गुलामगिरीचा नाश करण्यास माझ्या राष्ट्रानें परिश्रम केले ! पण याहि बाबतींत खरा मार्गदर्शक व पुढारी महंमद पैगंबरच आहे, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. राव व रंक, अमीर व फकीर, सरदार व रयत, गरीब व श्रीमंत हे सर्व सारख्या दर्जाचे समजले जावेत, एकानें आपल्या श्रीमंतीच्या किंवा सत्तेच्या बळावर दुसऱ्यास लाथाडणें हें माणुसकीस काळिमा फांसणारें

आहे, ही शिकवण जर प्रथम कोणी दिली असेल व आचरणांत आणिली असेल, तर ती महंमद पैगंबरानें. ख्रिस्ती राष्ट्रांनीं गुलामगिरीचा नायनाट करण्याचा प्रयत्न केला, पण तो महंमद पैगंबराच्या नंतर एक हजार वर्षांनीं. तो महंमद आजच्या " डिमोक्रसी " चा जनक आहे. रोमन व ग्रीक लोकांच्या कल्पनांवर महंमदी तत्त्वांचा शिक्का बसल्यानंतर त्यांच्यामधून आजच्या लोकसत्तेचा जन्म झाला आहे.सारांश,ख्रिस्ती राष्ट्रें आज ज्या गोष्टीं-बद्दल शेखी मिरवीत आहेत, त्यांबद्दल महंमदी संस्कृति ख्रिस्ती राष्ट्रांच्या गुरुस्थानीं आहे, ही गोष्ट लक्षांत बाळगिली म्हणजे मुसलमानांचें जगावरील अस्तित्व व त्यांची अनिर्बाध वाढ जगाच्या उत्क्रांतीस किती आवश्यक आहे हें सहज दिसून येईल. मुसलमान राष्ट्र ख्रिस्त्याच्या शेजारीं गेल्या आठशें वर्षांपासून नांदत असतां अजूनहि त्यांना मुसलमानी सत्ता आपल्या शेजारीं असलेली खपत नाहीं. तिचें युरोपांतून केव्हां उच्चाटन होईल, या विवंचनेंत ते असतात, यापेक्षां आणखी जास्त कुढेपणा तो कोणता ? युरोपच्या पवित्र भूमीस मुसलमानी राष्ट्राचा विटाळ खपत नाहीं, अशी ख्रिस्ती राष्ट्रांची भावना आहे. त्यांच्या मनांत दीर्घ द्वेष वसत आहे. तो संभावितीच्या शब्दांत कसा व्यक्त करावयाचा? असद्भावनेवर सुंदर भाषेचा मुलामा देऊन तिला सद्भावनेचें स्वरूप कसें द्यावयाचें याची कला त्यांना अवगत आहे ज्या बेटांतून ख्रिस्ती धर्माचा प्रवेश प्रथमतः युरोपखंडांत झाला, तें लहानसें बेट हजार वर्षांनंतर मुसलमानांच्या हातून ख्रिस्ती राष्ट्रांच्या हातीं परत आल्याबद्दल मि. अस्क्विथसारख्या समतोल वृत्तीच्या माणसास देखील इतका पराकाष्ठेचा आनंद वाटला कीं, तो त्याच्या पोटांत मावेना !

## पाश्चात्यांच्या शांततेच्या वृथा वल्गना

असल्या ख्रिस्ती राष्ट्रांना दुसऱ्यांचा धर्म रक्षण करण्याचें महत्त्व कसें कळणार ? तें रहस्य परधर्मसहिष्णु अशा आम्हां हिंदु लोकांसच कळणार आहे ! व म्हणून महंमदी बांधवांस मदत करण्यास आम्ही सिद्ध झालों आहोंत. ते हिंदुस्थानांत राहातात, एवढयाबद्दलच आम्ही त्यांना सहाय्य करतों, असें नाहीं, तर ब्राझीलमध्यें असा जुलूम झाला असता तरीदेखील आम्ही त्याच्या

प्रतिकारार्थ प्रयत्न केला असता ( टाळ्या ). ख्रिस्ती राष्ट्रांनीं आतांशा शांततेच्या नांवाखालीं हवा तसा कारभार करण्यास सुरवात केली आहे, पण त्यांच्या शांततेच्या वल्गना वृथा आहेत. खिलाफतीच्या प्रकरणाचा निकाल मुसलमानांच्या म्हणण्याप्रमाणें लागत नाहीं तोंपर्यंत जगांत शांतता झाली,असें म्हणणें चुकीचें आहे. आपण या बाबतींत कोणत्याहि राष्ट्राची मनधरणी करण्यापासून फायदा नाहीं, हें लक्षांत घेऊन सत्याचा वाली परमेश्वर आहे, त्याचवर पूर्ण निष्ठा ठेवावी व मागावयाचें तें त्यालाच मागावें. ( टाळ्या ).

---

# जिल्हासभांची जरूरी *

शनिवार ता. ९ एप्रिल १९२१ रोजीं सकाळीं ८॥ वाजतां यवतमाळ डिस्ट्रिक्ट असोसिएशनच्या हॉलमध्यें त्या संस्थेचा वार्षिक समारंभ झाला. त्यावेळीं अध्यक्ष या नात्यानें दे.भ.बापूजी अणे यांनीं पुढील भाषण केलें:—

### राष्ट्रीय सभा व तिचें क्षेत्र

दर जिल्ह्यामध्यें राष्ट्रीय सभेच्या अनुरोधानें कामें करणाऱ्या संस्था म्हणजे डिस्ट्रिक्ट कॉंग्रेस कमेटया होत. राष्ट्रीय सभा राष्ट्रीय प्रश्नांचा राष्ट्रीय दृष्टीनें विचार करून एकराष्ट्रीय धोरण आंखून देते; पण तिला प्रत्येक प्रांतांतील लोकांची परिस्थिति, अडचणी व त्या निवारण करण्याचे उपाय या संबंधांत दिशा दाखविणें शक्य नाहीं. राष्ट्रीय सभेनें आंखून दिलेलें धोरण लक्षांत ठेवून तदनुसार आपापले प्रश्न सोडविणें हें त्या त्या प्रांतांतील पुढारी व विचारवंत लोक यांचें कर्तव्य होय. हें तपशीलवारीचें काम राष्ट्रीय सभा किंवा तिच्या शाखा आपल्या हातांत इतःपर घेतील कीं नाहीं, याची शंकाच आहे. कॉंग्रेस कमिटया कॉंग्रेसचाच कार्यक्रम अमलांत आणण्याची खटपट करतील, त्यांना तुमच्या रोजच्या व्यवहारांतील प्रश्न हातीं घेण्यास सवड मिळावयाची नाहीं. उदाहरणार्थ राष्ट्रीय सभा म्हणते, येत्या तीस जूनच्या आधीं हिंदुस्थानमध्यें पचवीस लक्ष चरखे काम करीत राहिले पाहिजेत. अर्थात् आपापल्या जिल्ह्यांची लोकसंख्या व तेथील परिस्थिति यांचा हिशेब करून आपल्या वांटणीस येतील तितके चरखे घरोघर चालूं

---

* ' लोकमत ' यवतमाळ ता. १५–४–२१

करणें यांत कॉंग्रेस कमिटयांना आपले परिश्रम खर्च करावे लागणार आहेत. त्यांनीं हें काम करणें योग्यच आहे. तें करूं लागण्यास सर्व मतांच्या व सर्व पक्षांच्या लोकांनीं मदत करणें आवश्यकच आहे.

## रोजच्या अडचणी कोण सोडविणार ?

मग प्रश्न हा येऊन पडतो कीं, जनतेच्या रोजच्या व्यवहारांत अधिकारी-वर्गाकडून त्यांस ज्या अडचणी येतात, त्यांना जो जाच होतो, त्यांच्यावर जे जुलूम होतात, त्यांची जी मानहानि होते,त्या अडचणींचें निराकारण करावयाचें कीं नाहीं ? करावयाचें नसल्यास जनतेला अधिकाऱ्यांचा सासुरवास निमूटपणें सहन करण्याची आधींच संवय जडलेली आहे ती आपण वाढूं द्यावयाचा कीं काय ? व त्यांच्या अडचणींचें निवारण करावयाचें म्हटलें, तर तो प्रयत्न सुसंघटितपणें व पद्धतशीरपणें करावयास नको काय ? अशा दृष्टीनें विचार केला असतां माझ्या मनास असेंच वाटतें कीं, लोकांना नोकरशाहीकडून रात्रंदिवस जो उपद्रव होत असतो, त्यांतून त्यांची सोडवणूक करण्याकरितां आपल्या ह्या डिस्ट्रिक्ट असोसिएशन्सारख्या संस्था दर जिल्ह्यास पाहिजेत. कारण लोकांच्या ह्या अडचणी कांग्रेसच्या संस्था आपल्या हातांत घेणार नाहींत. हे प्रश्न डिस्ट्रिक्ट असोसिएशन्सारख्या संस्थांस केवळ आपल्याच हिंमतीवर सोडवावे लागणार आहेत. असें करतांना आपणांस कधीं राष्ट्रीय सभेच्या मागें पडावें लागेल, तर कधीं पुढेंहि जावें लागेल ! पण हें सर्व आपणांस कांग्रेसच्या संस्थांची सल्ला किंवा मदत न घेतां केवळ आपल्या जोखमीवरच करावें लागणार आहे. अमुक एक गोष्ट राष्ट्रीय सभेच्या तत्त्वाच्या आड येते, सबब ती करण्याची तुम्हांस मनाई आहे, अशा रीतीनें राष्ट्रीय सभा किंवा तिच्या संस्था तुम्हांस म्हणतील, असें मला वाटत नाहीं. आपल्या व्यवहारांत तिला असा निर्बंध घालतां येणार नाहीं, असें माझें मत आहे. तुम्ही आपलें वर्तन अमुक एक ठराविक रीतीनेंच केलें पाहिजे,असें सांगण्यासारखें हें असमंजसपणाचें होईल.

## अशा संस्था प्रत्येक जिल्ह्यांत पाहिजेत !

आपल्या नित्य व्यवहारांतील अडचणींचें निराकरण करणाऱ्या संस्था प्रत्येक जिल्ह्यांतून स्थापन होणें आवश्यक आहे. चांदा, भंडारा, खंडवा

वगैरे ठिकाणच्या मित्रांकडून मला आमच्या असोसिएशन्च्या आवश्यकते-संबंधानें विचारणा करण्यांत आल्या आहेत. त्यांस मी असेंच उत्तर देणार आहें व त्याची रूपरेषा म्हणून मीं आपणांस आजच्या प्रसंगानें या बाबतींतले माझे विचार सांगण्याचें ठरविलें आहे. एवढें खरें कीं, नोकरशाहीच्या हातांनीं जनतेस दररोज घेण्यांत येणाऱ्या चिमटयांवर मलमपट्टी लावणाऱ्या असोसिएशन्सारख्या संस्था व त्या त्या जिल्ह्यांतील कांग्रेसकमिटया यांच्या-मध्यें वरवर पाहणारांस थोडासा विसंगतपणा दिसेल. पण प्रत्यक्ष कामें करितांना कांहीं अडचणी येतील किंवा अशा रीतीनें कामें करणेंच अशक्य होईल, असें मला वाटत नाहीं.

**ह्या संस्था कॉंग्रेसपासून अलग असाव्या.**

असोसिएशनला लोकांचे रोजचे प्रश्न सोडवावयाचे असतात, तें काम कांग्रेस कमिटया करणार नाहींत, म्हणून असोसिएशनचें अस्तित्व कांग्रेस-मध्यें निमज्जित करण्याऐवजीं ह्या संस्था कांग्रेसपासून स्वतंत्र ठेवाव्या, त्या कांग्रेसच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालीं नसाव्यात, असें माझें मत आहे. कांग्रेसचा ठराव म्हणजे एक " मॅन्डेट् " आहे, त्या " मॅन्डेट " चे अर्थ रोजच्या व्यवहारांत कसे करण्यांत येत आहेत, हें पाहिलें म्हणजे कांग्रेसच्या ठरावाच्या चौकटींत न बसणाऱ्या ज्या बऱ्याचशा गोष्टी आपणांस कराव्या लागत आहेत, त्या अपवादांचें एक स्वतंत्र खातें करून तें असोसिएशनच्या स्वाधीन केलेलें बरें ! उदाहरणार्थ, बलुत्याचा प्रश्न घ्या. या बाबतींत या असोसिए-शननें आजवर जनतेची थोडीफार सेवा केलेली आहे. ती सेवा जनतेस पसंत पडलेली आहे आणि हा प्रश्न सुटण्याच्या जवळपास आलेला आहे. सरकारच्या पदरांत अन्यायाचें पुरें माप घालण्याची वेळ आलेली आहे. पण यापुढीलहि कार्य आपण याच मार्गानें करीत राहूं, तरच तें सिद्ध होईल. पण " कांग्रेसच्या ठरावांत बलुतें नाहीं " असें म्हणून आपण जर हा प्रश्न हातचा सोडून दिला, तर आजवरच्या सर्व कामगिरीवर पाणी पडेल ! आणि पुनः हा प्रश्न हातीं घेण्याचा प्रसंग आलाच, तर पुनरपि ' अ, आ ' पासून सुरुवात करावी लागणार आहे ! होमरूल लीग ही संस्था ज्याप्रमाणें कांग्रेसचें काम करणारी पण तिच्यापासून पृथक् आहे, त्याप्रमाणें आपली

असोसिएशन कांग्रेसच्या धोरणानें जरी काम करील, तरी सर्वस्वी तिच्या नियंत्रणाखालीं राहणार नाहीं.

## उत्सवांतहि घरचे देव पुजावेच लागतात !

कारण, राष्ट्रदेवतेस नैवेद्य पोहोंचावयाचा असला, तरी ग्रामदेवतेची उपेक्षा करून चालावयाचें नाहीं. एखाद्या मोठ्या उत्सवाच्या वेळेस तिची पूजा करावयाची झाली, तरी त्याकरितां घरांतील देवांची पूजा टाकतां येत नाहीं. राष्ट्राच्या उद्धाराकरितां राष्ट्रीय सभेनें घालून दिलेल्या मार्गानें चालावें लागतें. पण रोजच्या व्यवहारांत अडचणी करणाऱ्या नोकरशाहीरूपी क्षुद्र देवतांनाहि नैवेद्य पोहोंचवावा लागतो. मोठ्या देवतेच्या पूजनास जावयाचें आहे, या सबबीवर कोणी घरांतील देवांची पूजा टाकून जाईल, तर त्याची धर्मलंडांतच गणना होते ! म्हणून अधिकाऱ्यांच्या मुसक्या बांधण्याचें काम आपण सुरूं ठेविलेंच पाहिजे व त्याकरितां डिस्ट्रिक्ट असोसिएशन्सारख्या संस्थांची प्रत्येक जिल्ह्यास फार अवश्यकता आहे. प्रपंच आणि परमार्थ हे दोन्ही साधले पाहिजेत व तेहि एकसमयावच्छेदेंकरून साधले, तर त्यांत जास्त कौशल्य आहे. डिस्ट्रिक्ट असोसिएशन ही संस्था मोक्षाचें ध्येय समोर ठेवून आपला प्रपंच साधून देणारी आहे व कांग्रेस कमिटी ही संस्था मोक्ष गांठून देणारी होय, असा या दोहोंमध्यें परस्परसंबंध आहे. म्हणून या जिल्हासभेसारख्या संस्था दर जिल्ह्यांत स्थापन करून त्यांकरवीं आपण आपला प्रपंच आणि परमार्थ हीं दोन्ही साधलीं पाहिजेत.

# यवतमाळची दुसरी राष्ट्रीय शाळा*

ता. ९ एप्रिल १९२१ रोजीं सकाळीं यवतमाळ डिस्ट्रिक्ट असोसिएशनचा वार्षिक समारंभ पार पडल्यावर सर्व मंडळी जवळच शेट शेरमल सुरजमल यांच्या एका घरांत स्थापन होणाऱ्या राष्ट्रीय शाळेचा उद्घाटन समारंभ करावयास गेली. हा समारंभ दे. भ. बापूजी अणे यांच्याच हस्तें झाला. त्यावेळीं ते आपल्या भाषणांत म्हणाले—

## आमचा जुना अनुभव

यवतमाळांत १९०६ सालीं राष्ट्रीय शिक्षणाची शाळा काढण्यांत आली, ती १९०९ सालीं सरकारनें जबरदस्तीनें बंद केली. आतां पुन्हा पंधरा वर्षांनीं राष्ट्रीय शिक्षणाची लाट उसळली आहे. पण १९०६ सालीं या चळवळीसंबंधानें लोकांच्या अंगीं जो उत्साह दिसत होता, तो आज दिसत नाहीं. आम्हीं या प्रयोगांतून पूर्ण अनुभव घेऊन बाहेर पडलेले आहोंत व आपल्या शक्तीचा विनियोग कांहीं विशिष्ट प्रकारची जागृति करण्यांत करीत आहोंत. तथापि राष्ट्रीय शाळेंत शिकून राष्ट्रीय सेवेचा ओनामा घेतलेले माझे मित्र बाबासाहेब बापट वकील,त्याचप्रमाणें आपल्या अंगच्या चिकाटीनें विकट कामेंहि लीलेनें सिद्धीस नेणारे लक्ष्मणरावजी ऊर्फ नानासाहेब ओक, आणि बच्चूमहाराजासारखे राष्ट्रप्रेमी लोक विपरीत स्थिति पाहात असतांहि धैर्य धरून राष्ट्रीय शिक्षणाचें कार्य अंगावर घेत आहेत, याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें व त्यांस यश चिंतणें आवश्यक आहे. हें कार्य या गांवांत नवीन नाहीं. ज्यांनीं तें कधीं करून पाहिलें नाहीं, त्यांस त्यांत नाविन्य वाटत असेल, पण आपणांस हा अनुभव पूर्वींचाच आहे. १९०६ सालीं येथें राष्ट्रीयशाळा निघाली, तेव्हां तिला पहिल्या दिवशीं लोकांची सहानुभूति नव्हती. सरकारी शाळेंतील बरेचसे शिक्षक आणि विद्यार्थी एके दिवशीं रोजच्याप्रमाणें सरकारी शाळांत न जातां दुसऱ्याच एका इमारतींत बसले. हा त्या वेळचा राष्ट्रीय शाळेचा प्रारंभ होय. पुढें शिक्षक आणि विद्यार्थी यांनीं आपल्या कर्तबगारीनें लोकांचें प्रेम, सहानुभूति व सहाय्य संपादन केलें. तोच प्रकार याहि शाळेच्या बाबतींत व्हावयास मला हरकत दिसत

---

* 'लोकमत' यवतमाळ ता. १९–४–२१

नाहीं. आपणांस जें कार्य झेंपणार नाहीं म्हणून जुन्या कार्यकर्त्यांनीं, आजवर अंगावर घेतलें नाहीं, तें या नव्या जोमाच्या नव्या मंडळीनें अंगावर घेतलें, याजबद्दल त्यांसहि आनंदच वाटेल व या कार्यास सर्वांची मदत मिळेल, असें मला वाटतें (टाळ्या). सरकारी शिक्षणक्रमांत दोष आहेत, असें सर्व म्हणतात, पण ते दोष कोणते? ते काढून टाकावयाचे कसे? विद्यार्थी सर्वांगपूर्ण कसा करावयाचा? इत्यादि बाबतींत खोलवर विचार केलेला मला कोठें आढळत नाहीं. पुण्याच्या टिळक विद्यालयांतील कार्यक्रम घ्या, दिल्लीचा पाहा, अहमदाबादचा पाहा, नागपूरचा पाहा, सर्वत्र हेंच दिसून येईल! यापेक्षां सर गुरुदास बॅनर्जी यांनीं पंधरा वर्षांपूर्वी एक चोपडें लिहिलें, तें मला फारच उपयुक्त वाटतें.

## स्वतंत्र विचारांचा नागरिक बनविणें

राष्ट्रीय शाळा म्हणजे सरकारच्या मदतीशिवाय चालणाऱ्या शाळा काढिल्यानें राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न सुटतो, असें जर कोणास वाटत असेल, तर ती मोठी चूक होय, असें मला वाटतें. ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, हल्लींच्या सरकारी शिक्षणक्रमांतून निघालेला विद्यार्थी म्हणजे सरकारच्या ओंजळीनें पाणी पिणारा एक नागरिक बनतो. स्वातंत्र्य म्हणजे काय चीज आहे, स्वतंत्र विचार कसा असतो, स्वतंत्र नागरिक कसा असतो, हें बिचाऱ्याला कळत नाहीं. सुशिक्षितांपैकीं बरेच लोक सरकारी किंवा निमसरकारी नोकरींत गडप होतात; बाकी उरले ते वकील, डॉक्टर किंवा इंजिनियर. पण ते जरी प्रत्यक्षपणें सरकारी नोकरींत नसले, तरी त्यांचे विचार, राहणी, ध्येय, हीं सारीं थेट त्या सरकारी नोकरींतल्या मोठ्या मनुष्याप्रमाणें बनलेलीं असतात!

## आजचा सुशिक्षित वर्ग पाहा

वकीलवर्ग हा नांवाचा स्वतंत्र पण त्याचा जातभाई सरकारी नोकरींत शिरल्यावर ज्या थाटानें, दिमाखानें व ऐषआरामानें राहतो, जशा प्रकारची चैन उडवितो, तशा प्रकारची ऐषआराम करण्याची बुद्धि याला उत्पन्न होत असते! त्याचा सगळा प्रतिष्ठितपणा, संभाविति, जीवितसाफल्य त्या गाड्या-

घोडयांच्या, मोटारीच्या, बंगल्याच्या चैनींत सांठविलेलें असतें. अशी चैन करतां येणार नाहीं, तर शिकून उपयोग काय, अशी त्याची कल्पना झालेली असते ! साधु—सत्पुरुषांमध्यें त्याला आपलें ध्येय सांपडत नाहीं. त्याकरितां तो ह्या शृंखलाविभूषित सुशिक्षितांमध्यें फिरत असतो ! हें कसलें स्वातंत्र्य ! मनाची ही परतंत्रता नष्ट व्हावी, आपल्या संस्कृतीच्या झऱ्याचें पान आपण स्वतः आपल्या हातांनीं—दुसऱ्याच्या ओंजळीनें नव्हे—करावें, हें राष्ट्रीय शिक्षणाचें ध्येय असावयास पाहिजे. हल्लींच्या सुशिक्षित लोकांस ही संवय जडलेली आहे कीं, कामधंद्यांतून वेळ मिळाला कीं क्लबांत जावें, पत्ते खेळावे, क्रीडा कराव्या ! पण या शुष्क क्रीडांमध्यें द्रव्याचा अपव्यय करण्याऐवजीं त्यांनीं तोच पैसा आज स्थापन होणाऱ्या राष्ट्रीय शाळांसारख्या संस्थांना मदत करण्यांत घालविला, तर बरेंच राष्ट्रकार्य केल्याचें पुण्य त्यांना लाभणार आहे. ह्या शाळेस आज ना उद्यां सर्व लोकांची मदत मिळेल, असा मला पूर्ण भरंवसा वाटत आहे. मात्र तुम्ही अमुक कार्य हातांत कां घेत नाहीं, असे प्रश्न करून कोणास हिणविण्याऐवजीं ज्याला जें रुचेल, सुचेल व पटेल, तें कार्य त्यानें सद्भावनेनें व निष्ठापूर्वक करीत राहावें. माझा या शाळेस पूर्ण आशीर्वाद आहे, व ती उघडली असें म्हटल्यानेंच ती उघडली जाणार असल्यामुळें ती उघडली आहे, असें मी जाहीर करतों ( टाळ्यांचा गजर ).

---

# जालियनवाला-बाग-स्मृतिदिन*

येथील राष्ट्रीय सप्ताहांतील शेवटच्या दिवशीं म्हणजे मंगळवार ता. १३ एप्रिल १९२० रोजीं यवतमाळ येथें जालियनवाला-बाग-स्मारक-फंडाचें महत्त्व समजावून देण्याकरितां यवतमाळ नागरिकांची प्रचंड जाहीर सभा श्री. दत्तात्रय कृष्ण काणे यांच्या अध्यक्षतेखालीं होऊन तींत प्रमुख वक्ते म्हणून दे. भ. बापूजी अणे यांचें भाषण झालें, त्याचा सारांश—

## पंजाबी बांधवांचें वर्षश्राद्ध

पंजाबांतील नोकरशाहीच्या ज्या अनन्वित प्रकारांमुळें लोकांचीं मनें अत्यंत प्रक्षुब्ध झालीं, त्यांचें चिंतन निर्विकार मनानें करण्याच्या उद्देशानें, महात्मा गांधी यांनीं वर्षांतून एक आठवडाभर राष्ट्रीय सप्ताह पाळण्याची सूचना केलली आहे व ही कल्पना गांवोगांवच्या व खेडोपाड्यांच्या लोकांस इतकी पटली आहे कीं,पुढाऱ्यांस विशेषसे प्रयत्न करावे न लागतां ती हरएक ठिकाणीं उत्साहानें अंमलांत आणिली जात आहे. महात्मा गांधी यांनीं उपदिष्ट केलेल्या व्रताची सांगता उपवासादिकांच्या योगानें सर्व लोक करीत आहेत, हें त्यांच्या अंगीं उत्पन्न झालेलें बळ, निष्ठा व आत्मविश्वास यांचें निदर्शक आहे. महात्मा गांधी यांच्या उपवासाला कोणी हंसतात, पण या पवित्र कार्याला ज्या भावनेनें ते प्रेरित झालेले आहेत, ती भावना नसणाऱ्या निष्ठा-शून्य लोकांस उपवासाचें महत्त्व कसें कळणार ! असो. जालियनवाला बागेंत असें काय घडलें कीं, ज्याचें स्मरण व चिंतन एक सप्ताहभर करावयाचें, असा प्रश्न करणारास हें उत्तर आहे कीं, आजचा दिवस म्हणजे अमृतसर येथें गुदस्तां श्रीरामनवमीच्या पवित्र दिवशीं जनरल डायरप्रभृति पाशवी मनोवृत्तीच्या व सत्तेनें धुंद होऊन मानवी जीवितास तृणवत् लेखणाऱ्या अधिकाऱ्यांनीं केलेल्या अत्यंत भीषण प्रकारांची पुण्यतिथि आपण करीत आहोंत. गुदस्तां आपल्या कर्तव्यांत दक्ष असतां मदोन्मत्त अधिकाऱ्यांच्या क्रोधास बळी पडून परलोकवासी झालेल्या आपल्या पंजाबी बांधवांचें आपण

---

* 'लोकमत' यवतमाळ ता. १६-४-२०

वर्षश्राद्ध करीत आहोंत. तें संपादन केल्याशिवाय आपणास कोणत्याहि मंगल प्रसंगांत सामील होतां येत नाहीं. शास्त्रकारांच्या मतानें मृतांचे आत्मे एक वर्षानें पितृलोकास पोहोंचतात व त्यांच्यापूर्वी मृत झालेल्या पितरांशीं ते सपिंड म्हणजे एकरूप होत असतात व म्हणून आपणांस सपिंडी करावी लागत असते.

## असुदान करून मिळविलेली संपत्ति

जालियनवाला बागेंत राष्ट्रकार्यार्थ मेलेले आपले पंजाबी बांधव आपण आज करीत असलेल्या या सपिंडीच्या योगानें आपल्या पितृस्थानीं जाऊन बसलेले आहेत. ते इतःपर आपले बंधु राहिले नाहींत. ते तुमचे बाप, तुमचे आजे बनलेले आहेत ! ( टाळ्या ). आपल्यापैकीं कोणाच्याहि जन्मदात्या बापानें जेवढी इस्टेट आपल्याकरितां कमाविली नाहीं, तेवढी इस्टेट त्यांनीं तुम्हांआम्हांकरितां संपादन करून ठेवली आहे ( टाळ्यांचा कडकडाट ). पन्नाससाठ वर्षें सनदशीर चळवळ करून आपण करूं शकलों नसतों तें राष्ट्रीय चैतन्य त्यांनीं आपल्या प्राणत्यागानें निर्माण करून हिंदी राष्ट्रावर अगणित उपकार करून ठेविले आहेत. मृत्यूस भिऊन आपल्या कर्तव्यापासून च्युत व्हावयाचें नाहीं, हा धडा त्यांनीं आपणास शिकविला आहे व हें तत्त्व ज्यांस उमगलें, त्यांच्या हातांत यशाची किल्ली आली आहे, असें खास समजावें. आपण लोकांस जबाबदार आहोंत, ही जाणीव मनांत न बाळगतां जे स्वच्छंदानें राज्यकारभार करीत असतात, त्यांच्या राज्याची मुख्य भिस्त दोन गोष्टींवर असते ! त्या गोष्टी म्हणजे प्रजेच्या मनांत वसत असलेली राज्यकर्त्यांविषयींची भीति आणि त्यांच्या हातांत असलेलें लष्करी बळ. अर्थात् यांपैकीं एक जरी आधार नाहींसा झाला, तरी ती राजसत्ता संपुष्टांत आली, असें समजलें पाहिजे. जालियनवालाबागेंतील कत्तलीनें आम्हांला हें नाहीं शिकविलें कीं, इंग्रजसरकारजवळ लष्करी सामर्थ्य जास्त आहे. पण हें शिकविलें आहे कीं, तें त्यांचें पाशवी बळ कितीहि प्रचंड असलें, तरी सत्याचा आश्रय आम्हांस असल्यावर आम्हीं त्यास भिणार नाहीं. त्या बलाचा प्रतिकार आजवर कांहीं थोर व्यक्तींनीं स्वतःस सहा वर्षें बंदीवास सोसून किंवा फांशी जाऊन केला आहे पण असला प्रतिकार

हजारों लोकांनीं एकसमयावच्छेदानें केल्याचें आधुनिक काळांतील हें पहिलेंच उदाहरण होय ! या दृष्टीनेंच पाहिल्यास या प्रकारास अत्यंत श्रेष्ठ प्रकारचें महत्त्व आहे व तें लोकांच्या मनावर ठसलेलें आहे. म्हणूनच गांवचे गांव, प्रांतचे प्रांत, देशाचा देश, सर्व कानाकोपऱ्यांतील जनता या एका पवित्र कल्पनेनें भारली जाऊन हा राष्ट्रीय सप्ताह पार पाडीत आहे. जालियनवालाबागेंतील राक्षसी मनुष्यसंहाराची वार्ता इंग्लंडमध्यें प्रसिद्ध होतांच तेथील जनमत एकदम प्रक्षुब्ध झालें. आपल्या लष्करी बळास हिंदी जनता भीक घालीत नाहीं,

**गुण्या गोविंदानें वागा !**

आतां दोन खांबांवरची द्वारका एका खांबावर आली आहे, हें पाहून तेथील विचारी लोकांस असें वाटूं लागलें आहे कीं, आपले नोकर हिंदी लोकांशीं गुण्यागोविंदानें वागल्याशिवाय आपला निभाव लागणें दुष्कर आहे; व ह्या मताचा सर्व इंग्लंडभर अनुवाद होऊं लागल्यामुळेंच माझ्या प्रजेशीं स्नेहभावानें, गुण्यागोविंदानें वागा, असें येथील नोकरशाहीस सांगण्याकरितां गेल्या डिसेंबर महिन्यांत जॉर्ज बादशहांनीं एक जाहीरनामा काढिला. त्यांत हिंदी जनतेस थोडेसें गौणत्व दिल्याबद्दल कित्येकांस विषाद वाटत आहे, पण "गुण्यागोविंदानें वागा" असें नोकरशाहीसच सांगण्याचें प्रयोजन असल्यामुळें त्यांत लोकांस दोष दिला आहे. एऱ्हवीं लोकांना दोष दिल्याशिवाय नोकरशाही आपल्या वर्तनांत सुधारणा कशी करणार ? "लेकीस बोले, सुनेस लागे" हाच न्याय येथें समजा. जालीयनवालाबागेंतील प्रजासंहारानें हा जाहीरनामा काढावयास लाविला, हें एक मोठें कार्य केलें !

# तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे यांस पकडलें !*

वऱ्हाडांतील राष्ट्रकार्याचे एक आद्य प्रेरक व कट्टे कर्मयोगी तपस्वी डॉ. नरहर शिवराम ऊर्फ बाबासाहेब परांजपे यांना मध्यप्रांत सरकारनें ता. ७ मे १९२१ रोजीं मंगरुळ पीर येथें पकडून कैद केलें.त्यासंबंधानें लोकांचें मत व्यक्त करण्याकरितां ता. ८ मे रोजीं संध्याकाळीं येथाल टौनहॉलच्या मागील पटांगणांत श्री. पृथ्वीगीर हरिगीर यांच्या अध्यक्षतेखालीं प्रचंड जाहीर सभा झाली. तींत प्रमुख वक्ते म्हणून दे. भ. बापूजी अणे यांनीं पुढीलप्रमाणें अत्यंत स्फूर्तिदायक भाषण केलें. ते म्हणाले—

आपल्या जिल्ह्याचे वंदनीय पुढारी डॉ.बाबासाहेब परांजपे व वर्धा जिल्ह्यांत राष्ट्रीय जागृतीचें काम करून सर्वांच्या आदरास पात्र झालेले पंडित अर्जुनलाल शेटी या दोघांस मध्यप्रांत सरकारनें पकडलें आहे, त्याबद्दल लोकमत व्यक्त करण्याकरितां आपण येथें जमलों आहोंत. या दोघांहि कार्यकर्त्यांवर १२४ अ ची घोरपड येणार, ही कुवार्ता आपण पुष्कळ दिवसांपासून ऐकत होतों, म्हणून ती खरी ठरल्याबद्दल आपणांस आश्चर्य वाटेनासें झालें आहे. हे दोन पुरुष म्हणजे वऱ्हाड–मध्यप्रांतांतील प्रमुख कार्यकर्ते होत व खऱ्या कार्यकर्त्यांस सरकारनें पकडल्याची वार्ता ऐकण्याची लोकांना संवय होणें व ते तुरुंगांत गेलेले त्यांनीं पाहाणें,हें मला एका अर्थानें फार महत्त्वाचें वाटतें. सरकारच्या हल्लींच्या धोरणाच्या दृष्टीनें व आपल्या चळवळीच्या यशाच्या दृष्टीनें असें होणें अवश्यच आहे. आपल्या परमप्रिय, पूज्य,सन्माननीय मार्गदर्शक पुढाऱ्यांवर ही आपत्ति आल्यावरहि आपणांस आपले मामुली कारभार शांतवृत्तीनें करतां आले पाहिजेत.

## लोकमान्यांच्या मागोमाग

आपल्या चळवळीचा आत्मा शांततेंत, सहिष्णुतेंत आहे व तिची परीक्षा अशाच बिकट, भीषण व घोर प्रसंगांनीं होत असते! बाबासाहेबांच्या तोडीचा देशभक्त विरळा ! तुलना करणें उचित नाहीं. सर्वच देशभक्त श्रेष्ठ प्रतीचे आहेत, तथापि कोणाहिसंबंधीं यत्किंचितूहि न्यूनता मनांत न बाळगितां मी खात्रीनें असें म्हणूं शकतों कीं, त्यांच्या तोडीचा पुरुष आजमित्तीस सबंध महाराष्ट्रांत नाहीं ( टाळ्या ). आपणांस उचित वाटेल तें काम दुसऱ्या

---

* 'लोकमत' यवतमाळ ता. १३–५–२१

कोणाच्याहि मताची, सरकारची किंवा लोकांमधील श्रेष्ठांचीहि पर्वा न बाळ-गतां सततोद्योगानें करीत राहणें याच्यामागें स्वतःच्या तपश्चर्येची प्रतीति असावी लागत असते. असें असेल तरच मनुष्य आपण ओळखून ठेवलेल्या मार्गानें चालत असतो. अशा उच्च कोटींत बाबासाहेबांची गणना होते. त्यांचा निःस्सीम स्वार्थत्याग सर्वांच्या डोळ्यापुढें आहे, म्हणून मी त्याबद्दल कांहीं बोलूं इच्छित नाहीं. या जिल्ह्यांत सार्वजनिक आयुःक्रमास सुरुवात करून त्यांना सोळा वर्षें झालीं. इतक्या अवधींत केवळ देशसेवेशिवाय दुसरा विचार त्यांच्या मनास शिवला देखील नाहीं. या अनन्य चिंतनाच्या गुणांत लोकमान्य टिळकांच्या मागें ते एकटेच आहेत ( टाळ्या ). उदरनिर्वाहाचा प्रश्न त्यांनीं आपल्या मनापुढें क्षणभरदेखील येऊं दिला नाहीं; आणि स्वदेशहितचिंतनाव्यतिरिक्त एक क्षणहि वायां जाऊं दिला नाहीं. त्यांचेंच चरित्र पाहा म्हणजे दिसून येईल कीं, त्यांनीं मान, प्रतिष्ठा, लौकिक यांची कधीं फिकीर केली नाहीं. चांगलें काम कोणी करीत असला, तर त्याच्याकडे जाऊन त्याच्या मार्गांतील अडचणी समजाऊन घेऊन त्या निवारण कर-ण्यास ते सदैव तयार असत. केवळ देशकल्याणार्थ मी हें केलेंच पाहिजे, हा निर्मळ विचार निरंतर जागृत ठेऊन कार्य करीत राहणारांच्या अंगीं मनाचा थोरपणा पाहिजे असतो. पुष्पहारांची किंवा टाळ्यांची पर्वा न करितां कामाचें महत्त्व पटलें आहे, म्हणून तें करीत राहणें हा मनाचा थोरपणा होय! टाळ्या मिळत नाहींत, प्रतिष्ठा वाढत नाहीं म्हणून कार्यापासून परावृत्त होणारे कोणी देशभक्त नसतात, असें नाहीं. पण निरपेक्षपणें कार्य करणारांचें महत्त्व फार असतें. बाबासाहेबांनीं व्याख्यानांपेक्षां कित्येकांस गुप्तपणें म्हणजे गाजा-वाजा होऊं न देतां मदत केली, यांत त्यांच्या निरपेक्ष सेवेचें महत्त्व सांठविलें आहे. त्यांनीं व्याख्यानें शेंकडों दिलीं व मुडद्यांत देखील चैतन्य उत्पन्न कर-ण्याइतकीं तीं प्रभावशालीं असतात, याचा अनुभव आपणांस आहेच.

## व्याख्यानांपेक्षां सरकार कर्तबगारीस भितें !

तथापि व्याख्यानांपेक्षां त्यांच्या प्रत्यक्ष कामास, कार्यसंचालनेस महत्त्व जास्त आहे. आज येथें तर उद्यां पन्नास मैलांवर असे दौरे त्यांनीं कैक वेळ काढिले आहेत. मध्यप्रांतांत होमरूलच्या कामाचा प्रसार करण्याकरितां ते फिरले, तेव्हां

या जंगली मुलखांत अशी स्थिति असे कीं, एक अध्यक्ष, एकदोन सरकारी रिपोर्टर व भिडीभाडीनें गांवांतून बोलावून आणिलेले पांचचार श्रोते, एवढ्यांचीच जेमतेम सभा असे. पण अशाहि निराशाजनक परिस्थितींत स्वतःला हिंदी भाषा अवगत नसतां ते गेले व सतत चार महिने घरोघर हिंडून लोकांची नानापरीनें समजूत घालून, त्यांनीं होमरूल लीगचे दोन हजार सभासद केले व लौकरच खटल्यास सुरवात झाली. त्यांच्या ह्या कर्तृत्वामुळें सरकारनें मध्यप्रांतांत त्यांची मुस्कुटदाबी केली ती अजूनहि अमलांत आहे. त्यांच्या निस्पृह व कडक भाषेला सरकार घाबरत नाहीं, तर त्यांच्या कर्तबगारीस सरकार भितें. समोर हा मातीचा पिंड आहे, तो सजीव कसा करावा, खडकाळ जमीन नांगरून तेथें शुद्ध देशभक्तीचें बीज कसें रुजवावें हें त्यांस पूर्णपणें अवगत आहे. देशभक्तिविहीन निर्जिव मनुष्यास ते देशभक्तिमय व सजीव बनवितात. हा त्यांचा पराक्रम सरकारास असह्य वाटतो. या जिल्ह्यास जर राजकीय चळवळीचें कांहीं श्रेय असेल, तर तें सबंध बाबासाहेबांचें आहे ( टाळ्या ). पुसद भागाकडील कित्येक लोक त्यांस आज प्रत्यक्ष देव मानीत आहेत ! इतकें लोकांचें त्यांच्यावर निरतिशय प्रेम आहे. ह्या प्रेमाकरितां त्यांनीं कांहीं कोणास इस्टेट दिली नाहीं. उलट इस्टेट मिळविण्याच्या एकाच उद्योगांत गढलेल्या लोकांस त्यांनीं आपल्या निस्पृहत्वास अनुसरून "गाढव" म्हणून संबोधण्यास कमी केलें नाहीं. 'आमच्या गांवींच राहा व हेंच आपल्या कार्याचें क्षेत्र बनवा' असा त्यांस नागपूर, अकोला, पुणें, मुंबई इत्यादि शहरच्या लोकांचा आग्रह असे. याचें कारण बाबासाहेबांचें वरपांगीं दिखाऊ काम नसून त्यांच्या अंगीं असलेली अलोट कल्पकता, बुद्धिमत्ता व लोकांची समजूत पटवून देऊन त्यांस कार्यप्रवरण करण्याची असामान्य हातोटी होय !

## बुद्धीची परिणतावस्था

ते हातानें कधीं एक ओळ खरडत नाहींत व पुस्तक वाचतांना तर ते कधीं दृष्टीस पडत नाहींत. पण हजारो पुस्तकें वाचणारा एकीकडे आणि एकटे बाबासाहेब एकीकडे, असें त्यांचें ग्रंथाचें परिशीलन व मनन होऊन गेलेलें आहे. असा एकहि सार्वजनिक प्रश्न नाहीं कीं, ज्याचा त्यांनीं सांगो-

पांग विचार केलेला नाहीं व त्यावर आपलें ठाम मत बनविलेलें नाहीं. या-बाबतींत त्यांच्या बुद्धिमत्तेची परमावधि पाहावयास मिळते ! कोणी कितीहि पुस्तकें वाचून येवो, तो बाबासाहेबांच्या समोर गेला कीं, त्यांच्या चार आडव्या तिडव्या प्रश्नांपुढें लटपटलाच ! त्यांनीं आपल्या मनापुढें देश-सेवेचा एकच विचार ठेविला. भेटेल त्याच्याशीं वादविवाद करावा, शिक्षकासारखी त्याची समजूत घालावी, हा त्यांच्या क्रम अबाधित सुरू आहे. देशसेवेचा विचार व देशसेवेचें काम, या दोहोंत एकात्मता ठेवणें हें त्यांच्या जीवनाचें रहस्य आहे. त्यांच्या डोक्यानें आतांशीं तीन विषय घेतले, ते बिगार, बलुतें व मद्यपान; आणि या विषयासंबंधानें जागृत होईल तेंच लोकमत स्वराज्यसंपादनाच्या उपयोगी पडेल, हा आपल्या मनाशीं पक्का संकल्प करून ते कार्यास लागले. या बाबतींत कार्यकर्त्यां लोकांत मत-भेद असतांहि त्यांनीं आपल्याच समजुतीप्रमाणें नेटानें कार्य केलें. आतां त्यांनीं रहाटाचा चौथा विषय घेतलेला आहे. जो उपदेश करावयाचा, तशी कृति त्या गांवांत आपल्यासमोर करवून घेतल्याशिवाय पुढें जावयाचें नाहीं, हा त्यांचा नित्यक्रम आहे. त्यास अनुसरून ते जेथें जेथें फिरतात, तेथें आपल्या देखत रहाट बसवून ते सूत काढवून घेतात ! आकोटास त्यांनीं एक हजार रहाट सुरू केले आहेत. इतरांत व त्यांच्यांत जो जमीनअस्मानाचा फरक आहे तो हा ! ते विचार नुसते हवेंत फेकीत नाहींत, तर ते रुजवितात व कार्यक्षम करून पुढें जातात ! अधिकारी वर्गास राग येतो, तो त्यांच्या कडक भाषेचा नाहीं, तर त्यांच्या भगीरथ कार्य–कर्तृत्वाचा ! त्यांचा मेंदु तापतो तो बाबासाहेबांच्या कठोर शब्दांनीं नाहीं; कोणी कितीहि कटु बोलो, केवढीहि कडक भाषा वापरो, त्यांच्या ठिकाणीं इतका लोचटपणा आला आहे कीं, त्यांना त्याचें कांहीं एक वाटेनासें झालें आहे.

### बिगारबलुत्यांचें बंड उत्पन्न करणारे !

मात्र तुम्ही जर प्रत्यक्ष कार्य करीत राहाल, तर अधिकारीवर्गास गोड बोलणेंदेखील खपावयाचें नाहीं ! बिगार व बलुतें यासंबंधानें सामान्य जन-तेंत त्यांनीं जागृति केली, म्हणून बिगारबलुत्याचें बंड उत्पन्न करणारा पुरुष आमच्या जिल्ह्यामध्यें आहे, याचा आम्हांला अभिमान वाटतो ( टाळ्या ).

लोकांचा क्षोभ होईल कीं काय अशी भीति यत्किंचितदेखील मनांत न बाळगतां ते बिगार व बलुतें हे दोन प्रश्न हातांत घेऊन अकोला जिल्ह्यांत फिरले. लोकांच्या अंगचीं प्रतिकारशक्ति वाढवावी, रोजच्या कारभारांत त्यांना पदोपदीं जी जाचणूक होते, ती त्यांना तीक्ष्णपणें भासवावयाला लावून तिजमधून त्यांची सोडवणूक त्यांना आपल्या हातानें करून घेण्यास शिकवावें, हा त्यांचा मूळ उद्देश होता व आपल्या व्याख्यानांच्या योगानें त्यांनीं सबंध अकोला जिल्हा हलवून सोडिला ! वाशीम व मंगरूळ या दोन तालुक्यांवर १४४ कलम लावण्यांत आलें, तेव्हां लोकांची किती निराशा झाली, त्यांना बाबासाहेबांचीं भाषणें व ओजस्वी विचार किती पसंत पडले होते, हें मीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिलें आहे. असो. बाबासाहेबांवर आलेल्या या आपत्तीबद्दल मला बिलकुल वाईट वाटत नाहीं. ही आपत्ति आपणांपैकीं प्रत्येकावर येणार ! दडपशाहीच्या होमकुंडांत ज्या कित्येकांच्या आहुती पडण्याचा संभव आहे, त्यांत माझेंहि नांव आहे, हें लक्षांत बाळगून प्रत्येकानें देशसेवेचें व्रत सुरू ठेवावें, असें याप्रसंगीं माझें सर्वांस आग्रहाचें सांगणें आहे. एवढेंच नव्हे तर जोंपर्यंत दडपशाहीचा पाश आपणांवर पडत नाहीं तोंपर्यंत आपली मात्राच सरकारवर लागू पडली नाहीं, असें आपण समजावें (टाळ्या). या अटकेबद्दल मला सरकारला कांहीं दोष द्यावयाचा नाहीं किंवा तक्रार करावयाची नाहीं; तसें करणें फजूल आहे. सरकारवरील लोकांचा विश्वास पार नष्ट झाला आहे, म्हणून ते न्याय देतील असें आशाळभूतपणानें मानण्यांत अर्थ नाहीं व सरकारच्या निषेधाचाहि प्रश्न उरला नाहीं. त्याऐवजीं बाबासाहेब, वीर वामनराव, अर्जुनलालजी शेटी इत्यादिकांचें तुरुंगवासाबद्दल अभिनंदन करणेंच योग्य आहे व तसाच ठराव आपण पास कराल अशी मला उमेद आहे.

## शेकडोंजण जागृति करण्यास निघा !

पंडित अर्जुनलाल शेटी हे मुख्यतः राजस्थानच्या संस्थानांत राहणारे. इंग्रज सरकार ज्या मर्यादा स्वतःस लावून घेण्याविषयीं बोलतें, तेवढेंसुद्धां संस्थानिक करीत नाहींत. म्हणून मला इंग्रजसरकारच्या राज्यकारभारापेक्षांहि संस्थानिकांच्या राज्यकारभाराबद्दल जास्त राग येतो. अर्जुनलाल यांचा निस्पृहपणा,

कणखरपणा, तपस्या, स्वार्थत्याग यांचें तेज इतकें प्रभावी आहे कीं, ते जातील तेथें आपल्या गुणांची छाप पाडल्यावांचून राहात नाहींत. आपल्या जिल्ह्यांत ते नायगांव परगणासभेस हजर होते. एका ठरावासंबंधानें त्यांचा व आमचा मतभेद पडला व त्यावर बरेंच रण माजलें. तेव्हां पं. अर्जुनलाल यांचा विजय झाल्याशिवाय राहात नाहीं असें आम्हांस वाटलें. पण केवळ बाबा-साहेब परांजपे यांच्या योगानें तो प्रसंग टळला ! दररोज एक तरी व्याख्यान दिल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं असा निर्धार कांहीं दिवस करून त्यांनीं वर्धा जिल्हाभर कार्यकर्त्यांचें जाळें पसरलें. त्यांच्या ह्या कार्यकर्तृत्वाचा लाभ आपल्या जिल्ह्यासहि अनायासें घडला. असो.

ह्या आपत्तिग्रस्त देशभक्तांच्या ऋणांतून मुक्त व्हावयाचें म्हणजे हरताळ पाळणें हा एकच मार्ग नव्हे. त्यांचें काम त्यांच्याच निर्धारानें पुढें चाल-विलें पाहिजे. या उन्हाळ्याच्या दिवसांत प्रत्येक जिल्ह्यांतील शंभर माण-सांनीं गांवोगांव फिरलें पाहिजे व अशा पुण्यपुरुषास पकडणें म्हणजे केवढा गुन्हा होय हें सरकारच्या निदर्शनास आणून दिलें पाहिजे. असा निर्धार करून तुम्ही जर जिल्हाभर फिरणार नाहीं, तर बाबासाहेबांनीं या जिल्ह्यांत पंधरा वर्षें फुकट घालविलीं असें म्हणावें लागेल. केवळ हरताळ, सत्यनारायण, उपासतापास, यांनीं कांहीं एक होणार नाहीं. एक पुढारी गेला तर त्याचें कार्य करण्यास शेंकडोजण पुढें येतात असा हा आमचा रक्तबीज-वंश आहे, हें आपण सरकारास दाखविलें पाहिजे. असें होईल तर त्यांच्या पोटांत धडकी भरल्याशिवाय राहाणार नाहीं व कदाचित् आपणांस कार्य करण्याविषयीं उत्तेजन देण्याकरितांच सरकारनें बाबासाहेबांस पकडलें असें कां समजूं नये ?

# बहिष्कारयोग*

ता. १९ जुलै १९२१ रोजीं यवतमाळ येथें टौनहॉलच्या पटांगणांत श्री. भीमराव हणमंत जतकर वकील यांच्या अध्यक्षतेखालीं रा. माधवराव अणे यांचें व्याख्यान झालें. तें येणेंप्रमाणें:—

## ऊनाब्दिक श्राद्धाचें महत्त्व

आजचा गुरुपूजनाचा दिवस आहे. लोकमान्य इहलोकची यात्रा संपवून गेल्यास उद्यां बरोबर एक वर्ष पुरें होईल व आज त्यांचें ऊनाब्दिक श्राद्ध आहे. त्यानिमित्त आपण आपल्या गुरूचें पूजन करावयाचें म्हणजे त्यांनीं आपणांस जो उपदेश केला त्याचें चिंतन करून त्याप्रमाणें कृति करावयाचा निर्धार केला पाहिजे. असें केल्यानेंच त्यांचा आत्मा आपल्या निर्विकार ब्रह्मस्थितींत राहील. त्यांचें कार्य अपुरें राहिल्यास अगर आपण त्यांच्या उपदेशानुसार वर्तन करीत नाहीं असें त्यांना दिसून आल्यास त्यांना पुनश्च आपणांमध्यें यावें लागेल! त्यांना आपल्याकरितां पुनरपि जन्म घ्यावयास लावणें हें आपल्या शिष्यपणास उचित नाहीं. म्हणून त्यानीं उपदिष्ट केलेलें आचरण दृढ निश्चयानें करण्याची प्रतिज्ञा करूनच आपण आजचें ऊनाब्दिक श्राद्ध संपादन केलें पाहिजे. असो. लोकमान्यांच्या अत्यंत महत्त्वाच्या उपदेशापैकीं "बहिष्काराच्या तत्त्वाचा उपदेश" याचा विचार आज मुख्यतः करावयाचा आहे. हें तत्त्व लोकमान्यांनीं प्रथम १९०७ सालीं कलकत्त्यास उपदेशिलें व त्याचाच परिणाम म्हणून सरकारनें 'वज्रलेप' म्हटलेला वंगभंग रद्द झाला! हा आपणांस ताजा अनुभव आहे. मोर्लेसाहेब म्हणत कीं, बंगालची फाळणी ही वज्रलेप आहे, ती रद्द होणें अशक्य आहे. पण बहिष्काराच्या मात्रेनें तो वज्र लेप पुसून टाकला! तेव्हांहि आपणांजवळ शस्त्रें नव्हतीं व तीं नकोच होतीं. आजहि तीं आपणांजवळ नाहींत व त्यांची आपणांस जरूरीहि पण नाहीं. बहिष्काराच्या योगें आपल्या भाईबंदांच्या पोटास चिमटा बसतो, याचा अनुभव राज्यकर्त्यांस आहे व आपण एकमतानें व दृढतर निश्चयानें या बहिष्कारशस्त्राचा

* 'लोकमत' यवतमाळ ता. २२–७–१९२१

मारा करूं तर १९०७ सालाप्रमाणें आजच्याहि चळवळीस खात्रीनें यश मिळेल.

## अर्थशास्त्रापेक्षां पुरुषार्थशास्त्र बलिष्ट

हें शस्त्र सद्यःफलदायी आहे. याचा परिणाम होण्यास वर्षेंचीं वर्षे उलटावयास नकोत ! कांहीं अर्थशास्त्री शंका घेतात कीं, बहिष्कार यशस्वी होणार नाहीं. या बापड्या अर्थशास्त्र्यास आंकडेमोड करीत बसूं द्या. पण त्यांना काय माहीत कीं, अर्थशास्त्रापेक्षां पुरुषार्थशास्त्र बलिष्ट आहे ( टाळ्या ). आपण सर्वजण जर मनावर घेऊं, तर बहिष्कार यशस्वी करून दाखवून अर्थशास्त्रयांचीं अनुमानें, प्रमाणें, सिद्धांत, हीं खात्रीनें खोटीं पाडूं ( टाळ्यांचा कडकडाट ). हा बहिष्कारयोग इतका नेटानें आचरिला पाहिजे कीं, कोणाहि हिंदी व्यापाऱ्याला आपल्या दुकानांत परदेशी कपडा ठेवण्याची बुद्धि होऊं नये. आपण गिऱ्हाइकांनीं त्या मालास स्पर्शच करावयाचा नाहीं असा निश्चय केला, तर तो माल ते ठेवितील कोणासाठीं ? आपणा गिऱ्हाइकांचा निर्धार, त्यांना निराळें स्वदेशी कापडाचें दुकान तरी काढण्यास लावील, किंवा हल्लींच्या विलायती कपड्याच्या दुकानास कुलूप लावण्यास तरी भाग पाडील ! येथेंहि ग्राहकांनीं स्वयंनिर्णयाचा अवलंब जोरानेंच केला पाहिजे. अशा कणखर निश्चयानें आपण बहिष्कार यशस्वी करून सोडिला, आपल्या पुढाऱ्यांचा शब्द, कांग्रेसचा ठराव यांच्या मागें आपणांस समस्त जनतेचें पाठबळ आहे, असें सरकारच्या प्रत्ययास आणून दिलें, तर स्वराज्याचे पूर्ण हक्क न देण्याची नोकरशाहीची केवढीहि दांडगी इच्छा असली, तरी त्यांना स्वराज्य देणें भागच पडेल ( टाळ्या ). परदेशी कपडा ही परदास्याची खूण आहे, हा कांटा अंगास बोचत नसला तरी त्याचें विष सर्व शरीरांतून भिनतें. स्वराज्याची तहान तुम्हांस खरोखरच लागली असेल, तर हें परदेशी कपड्याचें गढूळ व विषमय पाणी पितां कामा नये ( टाळ्या ).

## पाताळची गंगा वर आणणारें अस्त्र

बहिष्काराचा तीर असा कांहीं अमोघ शस्त्र आहे कीं, तो मारल्याबरोबर पाताळांतूनसुद्धां स्वातंत्र्याची गंगा वर आणील! बहिष्काराची चळ-

बळ फसेल असे म्हणणारे डोळे उघडे ठेवून जगाकडे पाहात नाहींत असें म्हटलें पाहिजे. गेल्या बहिष्काराच्या चळवळीपासून तेरा वर्षांत, इंग्लंडच्या सामर्थ्यास कशी उतरती कळा लागली आहे व लोकपक्षाच्या बळांत कशी भर पडत आहे, याचे आंकडे आंकडेशास्त्र्यांनीं मोडून पाहावे, म्हणजे बहिष्काराच्या यशस्वितेसंबंधानें शंका घेणारे बिचारे पंडित "स्वपर बलाबल नेणुनि" बालिशपणें बोलतात असेंच म्हटलें पाहिजे दुसरें काय ? इंग्लंडची स्थिति आज 'मोठ्या घरचा पोकळ वासा' अशासारखी झालेली आहे ! त्याच्यामागें देशांतल्या व देशाबाहेरच्या अशा हजारो विवंचना लागल्या आहेत ! इंग्लंडची स्थिति अशी नसती तर ज्याला ते बंडखोर म्हणत होते, त्या डी व्हॅलेराची मनधरणी करण्याकरितां त्यांनीं स्मट्स्ची रवानगी केली नसती ! आपलें लोकशाहीचें सामर्थ्य कसें वाढत आहे याची जाणीव असू द्या, म्हणजे बहिष्कार फसेल अशी शंकासुद्धां तुम्हांस येणार नाहीं.

## परकीयांचें आर्थिक पारतंत्र्य झुगारा !

कोणी म्हणतात, बहिष्कार आचरा म्हणतां, पण आपल्या देशांत इतकें विपुल कापड पैदा होतें कोठें ? त्याला उत्तर असें कीं, तुम्ही आंगावर पांचपाच सातसात कपडे घालण्याचा 'षौक' कमी करा, म्हणजे देशांत पैदा होणारें कापड, आपल्या गरजा भागवून, परदेशींसुद्धां पाठवितां येईल ! जास्त कपडे उच्च संस्कृतीचें लक्षण होय, ही खोटी कल्पना पार झुगारून द्या. षट्शास्त्रसंपन्न पंडिताला उघडया अंगानें समाजांत बसण्याची लाज वाटत नाहीं, अशी आमची प्राचीन समजूत आहे. पण आतां मात्र फाटके देह पुष्कळ कपडयांनीं लपेटून संभावित दिसण्याची चाल पडली आहे ! परदेशीं प्रतिवर्षीं जाणाऱ्या साठ कोट रुपयांचा ओघ आपण बहिष्काराच्या जोरावर थांबवूं शकूं व परकीय कारखानदारांच्या आर्थिक पारतंत्र्यांतून आपण आपली सुटका करून घेतली तर नोकरशाहीची सत्ता संपुष्टांत आणण्याच्या आपल्या स्वराज्याच्या प्रयत्नांत खात्रीनें यश येईल. बहिष्कार यशस्वी केला कीं हीच नोकरशाही आपल्या कांग्रेसला विचारावयाला येईल कीं, आमच्या मनांतून असें करावयाचें आहे, यावर तुमचें काय म्हणणें आहे ? बहिष्काराच्या यशस्वीपणावर स्वराज्याची स्थापना

अवलंबून आहे. म्हणून आपण हिंदुस्थानरूपी सहस्रार्जुनाच्या शरीराचा एक अंश आहोंत हें लक्षांत बाळगून पराकाष्ठेचा प्रयत्न केला पाहिजे. लोकमान्यांनीं दिलेली शिकवणूक ध्यानांत धरा. डॉ. बाबासाहेब परांजपे यांच्या प्रयत्नांनीं या जिल्ह्याचा लौकिक झाला, त्या लौकिकास जागा व तुमच्यापैकीं शेंकडोजण घराबाहेर पडून बहिष्कार यशस्वी करण्यास झटा.

---

# लोकमान्यांच्या आधींचें राजकारण*

ता. २४ जुलै १९२१ रोजीं लो. टिळकजयंती उत्सवांत रा. माधवराव अणे यांचें झालेलें व्याख्यानः—

" लोकमान्यांच्या आयुष्यांतील कालक्रमानें घडलेल्या गोष्टी सर्वप्रसिद्धच आहेत. ते कधीं जन्मास आले, कॉलेजांत कोणत्या तारखेस गेले, त्यांनीं इतर व्यवसाय कोणते केले व कोणत्या तिथीस ते वारले हें सांगणें म्हणजे त्यांचें राजकारण सांगणें नाहीं. या सर्व गोष्टी प्रसिद्धच आहेत. त्यांची राजकारणाची किल्ली पाहावयाची असल्यास, त्यांनीं तें कोणत्या काळीं सुरू केलें व त्यावेळीं राजकारणाचें स्वरूप काय होतें, हें लक्ष लावून पाहिलें पाहिजे. त्यांनीं राजकारणाच्या रणांगणांत प्रवेश केला, तेव्हां तत्कालीन हिंदुस्थानी मुत्सद्यांच्या डोक्यांत. Divine dispensation चें पिशाच्च वावरत होतें. इंग्लंडचा व हिंदुस्थानचा राजकीय संबंध कांहीं ईश्वरी संकेताप्रमाणें घडून आलेला असून तो संबंध जगदीशाच्या मर्जीनुरूप यावच्चंद्रदिवाकरौ, म्हणजे इंग्लंड जिवंत असेतोंपर्यंत असाच चालणार आहे, असें त्या तत्त्वाचें रहस्य होतें व हें गृहीत धरून या पायावर सर्व राजकारणाचा पाया उभारलेला होता ! व त्यामुळें पतिपत्नीच्या वैवाहिक संबंधाप्रमाणें हा ईश्वरी संकेतानें घडून आलेला संबंध, कांहीं झालें तरी कोणत्याहि परिस्थितींत असाच कायम राहणें अपरिहार्य आहे, असें गृहीत धरून सर्व राजकारण होत असे.

---

* 'उदय'–उमरावती २६ जुलै १९२१

त्यामुळें हें राजकारण, विनंत्या, विनवण्या आणि शब्दच्छल व फार झालें तर राज्यकर्त्यांकडून वेळोवेळीं घडणारी शाब्दिक असंबद्धता ही दाखविण्यापलीकडे हें भिकाऱ्यांचें भिकारी राजकारण कधीं पुढें गेलें नाहीं.

## लोकमान्यांनीं पूर्वीचा मनु पालटला

हा मनु पालटण्याचें श्रेय जर कोणाकडे असेल तर तें लोकमान्यांच्याकडे आहे. Consent बिलासंबंधानें वादविवाद करीत असतांना, त्यांनीं Divine dispensation ला रजा देऊन असें खणखणीत स्वरानें प्रतिपादन केलें कीं, हिंदुस्थानचा व इंग्लंडचा संबंध हा एका करारनाम्यावर कायम झाला असून सर्व मानवी करारनाम्यांच्या संबंधाप्रमाणें हाहि एक कराराचा म्हणजे Contract चा संबंध आहे. मी घर भाड्यानें घेतांना जशा शर्ती करतों, त्याप्रमाणें कांहीं शर्तींवर इंग्लंडनें हिंदुस्थानचें राज्य स्वतःकडे घेतलें आहे.घर भाड्यानें घेण्याच्या करारांत जर Divine dispensation नाहीं, तर इंग्लंडनें हिंदुस्थानचा कारभार ज्या अटीवर हातीं घेतला, त्या अटींतहि Divine dispensation नाहीं. ह्या सर्व अटी १८५८ सालच्या करारनाम्यांत नमूद केलेल्या आहेत. त्या अटी ज्या दिवशीं त्यांस मोडण्याची दुर्बुद्धि होईल व ते तदनुरूप वागणार नाहींत, त्या दिवशीं हिंदुस्थान स्वहिताच्या दृष्टीनें योग्य दिसेल त्या मार्गानें विचार करण्यास स्वतंत्र आहे; व १८५८ सालचा हा करारनामा करीत असतां, राज्यकर्त्यांनीं सामाजिक बाबतींत हात घालण्याचा हक्क जर स्वतःकडे घेतलेला नाहीं, तर तो बळेंच Consent बिलाच्या रूपानें त्यांच्या खांद्यावर लादणें अत्यंत घातुक आहे, व त्या योगें आपण आपल्या पायांत एक बेडीचा लंगर अधिक अडकवून घेतों असें त्यांचें म्हणणें होतें. या सर्व कोटिक्रमांतील सार व प्राणभूत व त्यांच्या सर्व राजकारणाचा पाया, अशी एक गोष्ट आहे व ती ही कीं, इंग्लंडचा व हिंदुस्थानचा राजकीय संबंध हा एका कराराच्या धाग्यानें बांधलेला असून, तो ईश्वराच्या इच्छेपर्यंत नेऊन चिकटविण्याचें कांहींहि कारण नाहीं. १८९४ सालीं इंग्लंडच्या व्यापाऱ्यांच्या हिताकरितां हिंदुस्थानच्या मालावर जेव्हां जकात बसविण्यांत आली, तेव्हां इंग्लंडविषयींचा असलेला

दुसरा भ्रम त्यांनीं वितळवून टाकिला ! तुमच्या कल्याणाकरितां राज्य करण्यास आम्ही हिंदुस्थानांत आलों व तुमच्या कल्याणापेक्षां अन्य अपेक्षा आम्हाला नाहीं असें इंग्लंडनें म्हणावें व Divine dispensation च्या बापआजांनीं हिंदुस्थानांत ते धोकीत असावें असा क्रम जो चालू होता त्याचा लोकमान्यानीं भंग केला; व इंग्लंड स्वतःच्या हिताकरितां हिंदुस्थानवर राज्य करीत असून, ज्याला White man's burden म्हणतात ती गोष्ट खोटी आहे, असें त्यांनीं प्रथम प्रतिपादन केलें व हिंदुस्थानास पडणाऱ्या मोहाचा त्यांनीं निरास केला.

## क्रियासिद्धि स्वतःच्या पौरुषावर

Divine dispensation व White man's burden या दोन बिनमोल तत्त्वांपासून तिसरें एक तत्त्व निघालें होतें, तें असें कीं जगदीशाच्या मर्जीनुरूप पौर्वात्य व पाश्चात्य सुधारणांची एकी झाली असून, या एकीपासून जगाच्या कल्याणाचा कोंब उगवणार आहे आणि हिंदुस्थानच्या माणसास स्वतःची गुलामगिरी जगताच्या कल्याणाकरितां अवश्य आहे असें भासविण्यांत येऊन, त्या गुलामगिरींतला मानहानीचा कांटा बोथट करण्याचा मिशनरी वगैरे वर्गांचा सारखा प्रयत्न चालू होता व शास्त्रीय शोधांचे नवीन प्रयोग प्रथमतः हिंदुस्थानच्या माणसावर करून पाहण्याचा प्रयोग चालू होता. लो. टिळक म्हणत असत कीं, " मी शास्त्राचा द्वेष्टा नाहीं, पण कोणत्याहि नवीन शास्त्रीय शोधाचा प्रयोग प्रथमतः हिंदुस्थानच्या नरपशूवर करून पाहावा व तो शोध बरावाईट ठरविण्याकरितां हिंदुस्थानच्या माणसाचा देह बिनदिक्कत वापरावा, असें जो म्हणेल त्याचा मी वैरी आहें. " आणि मुल्कोमल या गांवीं प्लेगची लस अपूर्णावस्थेंतच असतांना केल्या गेलेल्या प्रयोगामुळें ऐन भाऊबिजेस जीं शेंसव्वाशें माणसें प्राणास मुकलीं आणि आम्हांस अंतरलीं त्यांचें उदाहरण घेऊन त्यांनीं स्वतःचें म्हणणें इतकें सोपपत्तिक सिद्ध केलें कीं, " White man's burden आणि Divine dispensation या दोहोंसहि हिंदुस्थानच्या राजकारणाला शेवटचा रामराम करावा लागला. हीं तत्त्वें राजकारणांतून

निघून गेल्याकारणानें स्वतःच्या शक्तीकडे हिंदुस्थान पाहूं लागला, आणि क्रियासिद्धि ही साधनांवर अवलंबून नसून स्वतःच्या पौरुषावर अवलंबून आहे, असें लोकमान्यांनीं प्रतिपादन केलें; व हिंदुस्थानच्या अशाहि असहाय स्थितींत स्वावलंबनानें व पौरुषानें हिंदुस्थानचा उद्धार करणें शक्य आहे असें त्यांनीं स्पष्टपणें प्रतिपादन केलें, आणि बंगालच्या फाळणीच्या वेळेस स्वमत सिद्ध करून दाखविण्याची त्यांना जी संधि आली ती त्यांनीं न दवडतां स्वतःचें मत सप्रयोग सिद्ध करून दाखविलें. Boycott च्या म्हणजे बहिष्काराच्या शस्त्रानें इंग्लंडच्या मुत्सद्यांनीं established fact म्हणून ठरविलेल्या बंगालच्या फाळणीवर त्यांनीं इतका प्रखर आघात करून दाखविला कीं, ती established fact रद्द करण्याकरितां राजेसाहेबांस स्वतःचें सिंहासन सोडून हिंदुस्थानच्या किनाऱ्यास पाय लावावे लागले. बंगालच्या दुःखाचा वाटेकरी सबंध हिंदुस्थान आहे व सहानुभूतीच्या वेदना हिंदुस्थानच्या सर्व देहास होत आहेत, असें जर त्या काळीं कोणी सिद्ध करून दाखविलें असेल, तर तें महाराष्ट्रानें—लोकमान्यांच्या महाराष्ट्रानें—सिद्ध करून दाखविलें. राजकारण जिव्हेच्या टोंकावर सोयीप्रमाणें आणून मेंदूच्या घडींत तें लपवून ठेवण्याचे दिवस मागें राहिले व जनतेत सप्रयोग राजकारण करून दाखविण्याचे दिवस आले, असें जेव्हां लोकमान्यांनीं बोलून दाखविलें, तव्हां बोलक्या राजकारणी मुत्सद्यांशीं त्यांना वांकडें व्हावें लागलें व दुही झाली. दुही होती म्हणून सुरतेस बखेडा झाला; बखेडा झाला म्हणून दुही झाली नाहीं. तेव्हांपासून सप्रयोग राजकारण हिंदुस्थानांत सुरू झालें.

## स्वदेशी व बहिष्कार ह्या 'शिवा' व 'घोरा' तनु

या प्रयोगाचें पहिलें तत्त्व स्वदेशी व बहिष्कार असें होतें. या शस्त्राला देवाप्रमाणें दोन तनू आहेत. एक शांत तनु व दुसरी घोरा तनु. स्वदेशी ही शांत तनु व बहिष्कार ही घोरा तनु आहे. हल्लीं या दोन्ही तनूंनीं हें अस्त्र वावरत आहे. सध्यां घोरा तनूचा प्रयोग सुरू आहे. या प्रयोगाला आपण मदत करावी. सहस्रार्जुन ज्याप्रमाणें सहस्रबाहूंनीं प्रत्यंच्या ओढून बाण

सोडीत असे, त्याप्रमाणें तेहतीस दुणी सहासष्ट कोटी हातांनीं आकर्ण प्रत्यंच्या ओढून हा बाण तुम्हीं सोडिला पाहिजे. माझ्या मागें माझे पुत्र माझा संसार कसा चालवितात हें लोकमान्यांचा आत्मा स्वर्गांतून पाहात नसेल, तर त्यांचें कार्य कोण पुरें करीत आहे हें तो पाहात असेल. त्यांचें कार्य अपुरें ठेवून त्यांच्या आत्म्याला तें पुरें करण्यास परत येणें भाग पाडणें म्हणजे त्यांच्या आत्म्याच्या सद्गतीचें दार बंद करणें होय; व तें आपण या श्राद्धकालीं कधींहि करणार नाहीं अशी माझी खात्री आहे. या कामीं कष्ट सोसावे लागतील ते आपण सोसा. लोकमान्य वीर होते, त्यांचें श्राद्ध वीरांनीं केलें पाहिजे व तें पौरुषानेंच साध्य झालें पाहिजे.

---

# बुलढाणा जिल्हा परिषद्*

ता. १५ आक्टोबर रोजीं बुलढाणा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दे. भ. श्री. अणे, यांचें चिखली येथें झालेलें व्याख्यानः—

## स्वार्थत्याग करण्याचे दिवस आले

अध्यक्षाचें भाषण हें औपचारिक आहे. सभासदांनीं सद्यःस्थितीचा कळकळीनें विचार करावा हा परिषदेचा मुख्य हेतु आहे. बडबड बंद करून प्रत्यक्ष कार्य करण्याचे दिवस आतां आले आहेत. वक्ते, कीर्तनकार व पुराणिक यांची स्तुति करण्याची वाईट खोड सोडून देऊन ते काय सांगतात, तें पचनीं पाडावयास आपण शिकलें पाहिजे. महात्माजींना बडबड आवडत नसून लोक आपलें सक्रिय अनुकरण करतील याच आशेवर एका वर्षांत स्वराज्य मिळविण्याचा त्यांनीं हुरूप धरिला. "लोक फक्त बडबड करावयास शिकले असून काडीइतकाहि स्वार्थत्याग करावयास ते तयार नाहींत" असे उद्गार महात्माजींनीं आपल्या मुंबईच्या भाषणांत काढिले. फार काय, पुढारी म्हणविणाऱ्यांनींदेखील अद्याप खरा स्वार्थत्याग करण्यास सुरवात केली नाहीं. सरकारी दडपशाहीला जर आपणांस आळा घालावयाचा असेल तर

* 'प्रजापक्ष'–अकोला ता. २३–१०–१९२१

पुढारी जें सांगतील तें करावयाची आपली तयारी पाहिजे. नोकरशाही दिवसें-दिवस जास्त जास्त वांकडीं पावलें टाकीत असून अलीबंधूंना पकडून तर नोकरशाहीनें आपल्या अपराधांची परमावधि केली आहे. जनतेच्या आकांक्षांची व ध्येयाची पायमल्ली करावयाची हें तर नोकरशाहीचें ब्रीदच आहे. परंतु सनदशीर चळवळीनुरूप लोकांचीं मनें आपल्या ध्येयाकडे वळविण्याचें एक पवित्र साधन जें भाषणस्वातंत्र्य त्यावरहि गदा आणून नोकरशाहीनें आपल्या नेहमींच्या क्षुद्रपणावर ताण केली आहे. सरकारी, लष्करी व मुलकी नोकऱ्या सोडून देण्याविषयींच्या ठरावाचा विपरीत अर्थ करून त्याला आळा घालणें म्हणजे सनदशीर चळवळ हाणून पाडणेंच होय. एका बाजूला निर्लज्ज नोकरशाही व तिचे पार्लमेंटमधील कैवारी आणि दुसऱ्या बाजूला एका व्यक्तीलाहि दुखवू नये अशी काळजी बाळगणारी जनता व शांततेच्या असहकारितेची चळवळ. या दोहोंमधला हा झगडा आहे.

## असहकारितेचें रहस्य

अशा वेळीं लोकांनीं जास्त तेजस्वी व्हावें, असा महात्माजींचा उपदेश आहे. तेजस्वी होण्याचे दोन उपाय आहेत. तेजस्वी लोकांची संगति करणें व तेजाशीं घर्षण करणें. दोन लाकडांचा अगर गारगोटयांचा एकमेकांवर आघात करून अग्नि उत्पन्न करतां येतो. तेज ही एक शक्ति आहे. ही शक्ति संपादन करून शत्रूचा प्रतिकार करण्याच्या कामीं तिचा उपयोग न करणें म्हणजेच अनत्याचार! ही शक्ति आपण मिळविली म्हणजे पुरे आहे. तेजस्वी पदार्थाशीं घर्षण करणें हा तेजस्वी होण्याचा दुसरा उपाय व नोकरशाहीचीं हीं सर्व साधनें लुलीं पाडणें म्हणजेच हा उपाय अमलांत आणणें होय व यालाच असहकारिता म्हणतात. शत्रूचीं साधनें नष्ट करणें म्हणजे तीं आपण मिळविल्यासारखें आहे. महात्माजींच्या असहकारितेचें हें रहस्य आहे. महात्माजींनीं कौन्सिलावर बहिष्कार घालण्याचा मंत्र सांगितला त्यावेळीं त्यांची अशी अटकळ होती कीं, सहकारवादी मवाळ प्रामाणिकपणें आपलीं कर्तव्यें बजावितील. परंतु गेल्या वर्षींच्या अनुभवानें हें सिद्ध झालें आहे कीं, मवाळ म्हणजे नोकरशाहीच्या हातांतील कळसुत्री बाहुलीं! परंतु यावेळीं

आपल्याला दुसऱ्याच्या चुका काढीत बसावयाचें नसून आपलें कर्तव्य काय इकडे लक्ष दिलें पाहिजे. आपल्या ध्येयाचा आदर्श महात्माजींच्या वर्तनांत पाहावयास मिळतो. त्यांनीं बहुतेक सर्व वस्त्रांचा त्याग केला आहे, तरी नख-शिखांत पोषाख करणाऱ्याशीं मोकळेपणानें बोलण्याची त्यांची तयारी असते. अगदीं अशिक्षित व मागसलेले लोकदेखील आपल्या हक्काचा जोरानें पुरस्कार करतील व त्याकरितां आपला तेजस्वीपणा व निर्धार दाखवितील, त्यावेळीं नोकरशाहीला ताबडतोब नमतें घ्यावें लागेल !

## कांसवाच्या पाठीवरील डोलारा

नोकरशाहीचा नाश करावयास अत्याचार किंवा जबरदस्ती इत्यादि गोष्टींची मुळीच जरूरी नाहीं. कारण जबरदस्ती करण्याइतका तिचा पायाच एवढा मजबूत नाहीं. नोकरशाही म्हणजे एका कांसवाच्या पाठीवरील डोलारा आहे, आणि ही कांसवाची पाठ म्हणजे हिंदी लोकांचें सहकार्य होय. या जंगी कांसवाची पाठ भाजण्याचा खटाटोप जर नोकरशाही करूं लागेल तर बत्तीस कोट लोकसंख्येच्या समुद्रांत नोकरशाहीला गटांगळ्या खाण्याची पाळी येईल. सनदशीर चळवळीचें आमिष असेल तरच हें कांसव गडबड करणार नाहीं. परंतु अलीबंधूंवर खटला करून सरकारनें हें आमिष काढून घेतलें आहे. आजपर्यंत पिढ्यानपिढ्या पोट जाळण्याच्या फक्त क्षुद्र बुद्धीनेंच लोक सरकारी नोकऱ्या करीत आले नाहींत, तर सरकारवर जनतेचा विश्वास होता म्हणून करीत आले. पोट जाळण्यासाठीं आम्ही आपल्या मुलांना ख्रिश्चन धर्मांत लोटणार नाहीं ( पोलीस अधिकाऱ्यांना उद्देशून ते म्हणाले ).

## सरकारी नोकरींतील हिंदी भाई

राष्ट्रगीताच्या वेळीं, सर्व सभागृहांतील लोक उठून उभे राहिले असतांना, वरिष्ठाचा हुकूम म्हणून हे लठ्ठ लोक बसून राहतात ! आपल्या लोकांशीं सहकार्य करण्याची आपल्याला बिलकूल गरज नाहीं, हीच कां कर्तव्यकर्माची योग्य जाणीव ! पोट भरण्यासाठीं आपल्याला चरखा घ्यावयाचा नसून, असल्या लोकांना चक्रावर फिरवून ताळ्यावर आणण्यासाठीं आप-

त्याला चरखा घ्यावयाचा आहे! ही हंसण्यावारी घालविण्याची गोष्ट नव्हे! व्याख्यान देऊन किंवा ऐकून कंठशोष करण्याची ही वेळ नव्हे. आसपासच्या लोकांना परदेशी मालाचा व्यापार करणें तुम्ही मुष्किलीचें करून सोडिलें पाहिजे. तुम्हांला खरोखरी कांहीं कळकळ वाटत असेल तर तुमचा प्रांत, तुमचा जिल्हा, निदान तुमचें शहर अस्सल हिंदी बनविण्याच्या मार्गास लागा! आम्ही स्वतःच्या गरजा वाढवून घेतल्या आहेत. आम्हाला एवढ्या कपड्यांची काय जरूर आहे?

## आपल्या गरजा कमी करा.

'एटिकेट' शिकविणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नादीं लागून हा दुर्गुण आपल्या अंगीं जडला आहे. 'आपल्या गरजा कमी करा' असें महात्माजींचें सांगणें आहे. चरख्याचा उपहास करण्याचा मनु आतां संपला आहे. आपल्या नेसत्या वस्त्रांप्रमाणेच तुम्ही चरख्याचा नेहेमीं उपयोग केला पाहिजे. अन्नाकरितांदेखील आज आम्ही नोकरशाहीवर अवलंबून आहों, कारण, गव्हाचा भाव अमेरिकेंतून लिहून येतो. तेव्हां या दोन पंक-गर्तांतून आपले पाय सोडवून घ्या. स्वयंसेवकांचीं पथकें उभारा. तुम्ही फसलां, तुमच्या मुलांना तरी आतां फसूं देऊं नका! नेभळट लोकांच्या शांततेंत कांहीं अर्थ नसून, शक्तिमान् लोकांची शांतताच परिणामकारक होते. सरकारी नोकरांनीं खादीचाच पोषाख वापरण्याचा निर्धार कायम ठेवण्याचा प्रयोग करून पाहिला तर त्यांना यश आल्याशिवाय राहणार नाहीं.

# यवतमाळ जिल्हा परिषद्

( अधिवेशन ६ वें )

[ यवतमाळ येथें १९२१ सालीं भरलेल्या वरील परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून दे. भ. माधवराव अणे यांनीं केलेलें भाषण. हें भाषण यवतमाळ जिल्हासभेनें त्यावेळीं स्वतंत्रपणें छापलें होतें.—सं. ]

नियोजित अध्यक्ष, प्रतिनिधि, प्रेरक व भगिनीनों !

यवतमाळ जिल्हा परिषदेच्या सहाव्या अधिवेशनाच्या मंगल प्रसंगानिमित्त आपण येथें एकत्र जमलेले आहांत हें पाहून मला जो आनंद होत आहे, तो शब्दांनीं व्यक्त करतां येण्यासारखा नाहीं. ज्या स्वातंत्र्यभक्तीनें प्रेरित होऊन आपण लांब प्रवासाची दगदग सोसून येथें आला आहांत, त्या आपल्या अंतःकरणांत अधिष्ठित असलेल्या स्वातंत्र्यदेवीला प्रथमतः मनःपूर्वक व भक्तिपूर्वक वंदन करून, नंतर स्वागतमंडळाच्या वतीनें मी आपलें 'स्वागतम्' या प्राचीन गीर्वाण वाणीनें प्रेमपूर्वक स्वागत करतों.

असल्या स्वागत संभाषणांतून कांहीं गोष्टींचा निर्देश करण्याचा जो परिपाठ गेल्या तीस चाळीस वर्षांपासून आपल्या आधुनिक राजर्षींनीं किंवा प्रचलित राजकीय चळवळींतील पूर्वाचार्यांनीं घालून दिलेला होता, त्यामुळें होणारा कालाचा अपव्यय टाळण्याकरितां राष्ट्रीय सभेच्या नव्या मनूंतील स्मृतींत स्वागताध्यक्षाच्या भाषणासंबंधीं कालमर्यादा घालून दिलेली आहे. तिचें उल्लंघन होऊ नये अशी माझी मनापासून इच्छा असली, तरी कृतींत या नियमाचें परिपालन होणार नाहीं अशी मला भीति वाटत आहे या जिल्ह्याचा भूगोल, इतिहास, लोकस्थिति वगैरे बाबींसंबंधानें मीं माझ्या भाषणांतून कांहींहि उल्लेख न करण्याचें ठरविलें आहे. याशिवाय या संबंधाची थोडीशी माहिती पहिल्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष माझे मित्र पुराणशास्त्रप्रिय यशवंतरावजी देशपांडे एम्. ए. यांच्या भाषणांत येऊन गेलेली आहे व सविस्तर हकीकतीची जिज्ञासा यवतमाळ गॅझिटीअरच्या जुन्या व नव्या आवृत्तीच्या परिशीलनानें तृप्त होण्यासारखी आहे. मी एवढेंच म्हणून ठेवतों कीं, इतिहास, भूगोल किंवा सामान्य जनतेची वंशविषयक व

व्यवसायविषयक स्थिति आणि राज्यकारभारासंबंधीं भूविभागणी वगैरे ही सहा वर्षांपूर्वी जी होती तीच अजूनहि कायम आहे. त्यांत म्हणण्यासारखा किंवा सांगण्यासारखा कांहीं फेरफार झाला नाहीं.

परंतु सहावें वार्षिक अधिवेशन हें पांढराकवडा येथें भरलेल्या पांचव्या अधिवेशनानंतर बारा महिन्यांच्या अवधींत न होतां जवळ जवळ १८ किंवा १९ महिन्यांनंतर भरविण्यांत येत आहे. याबद्दल आपणांपैकीं पुष्कळांस आश्चर्य वाटत असेल व त्यासंबंधानें दोन शब्द ऐकण्याची जिज्ञासाहि आपणांस वाटत असणें स्वाभाविक आहे. हें अधिवेशन इतक्या दीर्घावधीवर जाण्याचें मुख्य कारण गेल्या मागील दोन वर्षांत वरुणदेवतेची व पर्जन्य राजाची अवकृपा आमच्या जिल्ह्यावर झाली हेंच आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत येणाऱ्या पाहुण्यांना पोटभर मीठभाकरी घालण्याची तयारी असली तरी कोरड्या ठणठणीत खोल विहिरींकडे व शुष्कनीर कासारांकडे बोट दाखवून आमच्या डोळ्यांतील आसवांवर आपली तहान भागवून घ्या असें सांगण्याची पाळी आपणांवर येईल, या आपत्तीस भिऊन मृगानें कृपा केल्यानंतरच परिषद् भरविण्याचा विचार आम्हांस करावा लागला. त्यानंतर पेरणीवगैरेच्या दिवसांत शेतकीच्या कामामुळें आणि पावसाळ्यांत चिखल तुडवीत लांबचा प्रवास करण्यांत प्रतिनिधि व प्रेक्षक यांची अत्यंत गैरसोय होण्याचें निश्चित असल्यामुळें परिषद् दिवाळीनंतरच भरविणें इष्ट आहे, असा येथील चालक मंडळींचा विचार ठरला. वरील अस्मानी आपत्तीमुळेंच परिषदेची बैठक बारा महिन्यांच्या अवधींत न होतां इतक्या उशिरानें होत आहे.

एका दृष्टीनें ही बैठक इतक्या उशिरानें होत आहे, याबद्दल मला खेद न वाटतां एक प्रकारचें समाधान होत आहे. मध्यप्रदेश आणि वऱ्हाड या संयुक्तप्रांतांतून जिल्हापरिषदा भरवून राजकीय चळवळ केंद्रित व सुसंघटित करण्याचा उपक्रम सहा वर्षांपूर्वी यवतमाळ येथें झाला. त्याचवर्षी नागपूर येथें मृतावस्थेंत पडलेल्या प्रांतिक परिषद् संस्थेचें पुनरुज्जीवन करण्याचा उपक्रम डॉ. मुंजेप्रभृति नागपूर येथील पुढाऱ्यांनीं केला. यापूर्वी एकच वर्ष मध्यप्रांतांतील लेजिस्लेटिव्ह कौन्सिलची पहिली बैठक

नुकतीच पार पडून लोकनियुक्त सभासदांच्या द्वारानें कायदेकौन्सिलमधून आपल्या सुखदु:खाच्या प्रश्नाचा निर्णय करून घेण्याच्या प्रयत्नाची वऱ्हाड व मध्यप्रांतामधून सुरुवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. कायदेकौन्सिलांत जाणाऱ्या प्रतिनिधींना निरनिराळ्या सार्वजनिक तक्रारीसंबंधानें लोकमताच्या तीव्रतेची योग्य जाणीव असावी, आणि कौन्सिलमधून होणाऱ्या चर्चेची व निर्णयाची जिल्ह्यांतील जनतेस माहिती असावी हा यवतमाळ जिल्हापरिषद् काढण्यांत जे अनेक उद्देश होते, त्यांतील एक प्रमुख उद्देश होता. सरकारच्या दरबारांतील लोकनियुक्त प्रतिनिधी व जनतेच्या दरबारांतील जनतेचे प्रतिनिधी यांचीं मतें कोणत्याहि सार्वजनिक प्रश्नावर परस्परांशीं विसंगत किंवा विरुद्ध नसावीं व त्या दोन्हीहि प्रतिनिधींच्या स्वराज्यविषयक ध्येयांत व तत्प्राप्त्यर्थ होणाऱ्या प्रयत्नांत एकवाक्यता असावी. दोन्हीं ठिकाणांहून होणारे प्रयत्न परस्परपोषक व जनतेच्या प्रतिकार–सामर्थ्यास सर्वस्वी संवर्धक असावे आणि राजकीय आकांक्षांच्या दृष्टीनें एकजीव असलेल्या हिंदी जनतेंत निरनिराळ्या निमित्तानें फूट पाडून तिला शतधा विभक्त करणाऱ्या व बहुजिव्ह बनविण्याच्या प्रयत्नांचा परिणामकारक रीतीनें नायनाट करून तिला श्रीप्रभु रामचंद्राप्रमाणें एकवाणी व एकध्यानी होतां यावें अशासारख्या विचारसरणीवर आम्ही जिल्ह्यांतील चळवळीला योग्य वळण लावण्याकरितां जिल्हापरिषद् भरविण्याचा प्रथमत: उपक्रम केला. या आमच्या धोरणास आमचे परमपूज्य गुरु, भरतखंडांतील राष्ट्रीय चैतन्याचे जनक, स्वार्थत्याग संप्रदायाचे उत्पादक आणि कर्मयोग शास्त्राचे प्रवर्तक कै० लोकमान्य टिळक यांचें प्रोत्साहन असल्यामुळें आमचा उपक्रम वऱ्हाड व मध्यप्रदेश या प्रांतांतील सर्व जिल्ह्यांतील प्रमुख व कर्तृत्ववान् देशभक्तांना अनुकरणीय वाटला, हें पाहून मला व येथील माझे सर्व सहकारी मित्रमंडळींना आणि आमचे मार्गदर्शक नेते तपस्वी बाबासाहेब परांजपे व वीर वामनरावांचे प्रख्यात जोडीदार शामरावजी देशपांडे या सर्वांना एक प्रकारचा सात्त्विक अभिमान वाटत होता.

लखनौ येथें भरलेल्या इतिहासप्रसिद्ध राष्ट्रीय सभेंत नेमस्त व राष्ट्रीय या दोन्ही पक्षांचा समेट होऊन स्वराज्ययोजना मंजूर करण्यांत आली. ही

गोष्ट आपणां सर्वांस महशूर आहे, यानंतर अमृतसर येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनापर्यंत राष्ट्रीय सभेकडून स्वराज्यप्राप्तीकरितां कराव्या लागणाऱ्या चळवळीचें जें धोरण आंखण्यांत आलें होतें तें सर्वस्वी वर निर्दिष्ट केलेल्या धोरणाशीं सुसंगत असल्यामुळें चळवळींचें काम अधिक जोरानें चालविण्याचा हुरूप या जिल्ह्यांतील कार्यकर्त्या मंडळींत भरत गेला, इतकेंच नव्हे तर जिल्ह्यांतील चळवळीला प्रतिवर्षीं अधिक नमुनेदार, दमदार व प्रखर कशी करतां येईल, हा एकच विचार जिल्ह्यांतील पुढाऱ्यांच्या मनांत घोळत होता, हें मी निःसंदेहपणानें सांगूं शकतों. आमच्या सुदैवानें जवळ जवळ राजकीय चळवळीस सर्वस्वीं वाहून घेण्यास तयार असा एकतरी देशभक्त, जिल्ह्यांतील बहुतेक तालुक्यांतून मिळण्याचा संभव आम्हांस स्पष्ट दिसत असल्यामुळें सतत वर्षभर पुरण्यासारखीं कामें शोधून काढण्याची जरूरी वाढत चालली. याचमुळें परगणासभा स्थापन करून, त्या जिल्हाभर यशस्वी करून दाखविण्याचें श्रेय माझे मित्र शामरावजी देशपांडे व तात्यासाहेब हूड यांना मिळवितां आलें. या परगणासभेची स्थापना करण्यांत तात्यासाहेब यांनीं जी कल्पकता दाखविली तिजबद्दल त्यांचें शब्दांनीं अभिनंदन करणें शक्य नाहीं. या सभांमुळें बहुतेक ठिकाणीं नामशेष झालेल्या, कोठें जेमतेम जीव धरून बसलेल्या वतनदार वर्गाच्या हरळीच्या मुळीवर नवजीवनाचें सिंचन होऊन तो वर्ग नवीन पालटलेल्या परिस्थितींत राष्ट्रीय कार्यभाग उचलून आपल्या जुन्या प्रजेचें धुरीणत्व करण्यास सज्ज झाला. बहुतकरून या वर्गाचा आश्रित असलेला या जिल्ह्यांतील पाटीलपटवारीवर्गदेखील खडबडून जागा होऊं लागल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. मृतप्राय झालेली उमरावती येथील वतनदार सभा आपल्या कुंभकर्णी झोंपेंतून उठून डोळे चोळीत जांभई द्यावयास लागली. परगणासभांचा कार्यक्रम यशस्वी होत चालल्यामुळें राजकीय चळवळींचा प्रसार खेडयापाड्यांतून व्हावयास लागला व प्रचलित असमाधानकारक स्थितीसंबंधीं अंतःकरणांत असलेल्या असंतोषाच्या बीजास आपोआप अंकुर फुटूं लागला. या सभांच्या उपयुक्ततेचें व लोकप्रियतेचें मोठें बलवत्तर प्रमाण, म्हणजे या प्रांतांतील बहुतेक प्रमुख जिल्ह्यां-

तून परगणासभा भरविण्याचा परिपाठ गेल्या तीन वर्षांत पडला आणि या सभांची संख्या उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणावर आहे, हें होय. कोणतीहि चळवळ मोठमोठ्या वस्तीच्या गांवापासून शेतकऱ्यांच्या खेड्यांपर्यंत, वंजाऱ्यांच्या तांड्यांपर्यंत किंवा कोलामांच्या पोडांपर्यंत पोंचविण्यास यासारखें दुसरें साधन नाहीं, ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे. यानंतर पाटील-पटवारी संघाची प्राणप्रतिष्ठा झाली. कायरा येथें महात्मा गांधी यांनीं दुष्काळांत अधिकारीवर्गाकडून सारावसुलीचा होणारा जुलूम थांबविण्याकरितां सत्याग्रह चालविला, त्याचवेळीं या जिल्ह्यांतील वेणी, माहागांव वगैरे परगण्यांतील शेतकऱ्यांनीं, जिल्ह्यांतील व परगण्यांतील पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं कायद्यानें त्यांना सरकारकडून मिळावयाची मदत मिळविण्याकरितां जो अट्टहास केला व शेवटीं अधिकारी वर्गाला आपल्या चिकाटीनें वठणीस आणण्याचें उदाहरण घालून दिलें, त्यामुळें कार्यकारीमंडळींचा आवेश अधिक वाढत चालला. यानंतर पांढरकवडा तहशिलींतील २०–२५ गांवच्या लोकांनीं जंगलखात्याकडून होणाऱ्या जुलुमाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न निकरानें केला व आजपर्यंत नवीन वर्किंग प्लॅन्सच्या उपद्रवापासून आपला बराचसा बचाव करून घेतला. ह्या कामांत यश येण्यास जिल्हासभेच्या चालकांचे व विशेषतः पांढरकवडा येथील लोकमान्य वकील रा. गद्रे व त्यांचे सहकारी रा. पतकी, बर्वे वगैरे यांचेच अविश्रांत परिश्रम कारणीभूत झाले. अशा तऱ्हेनें लोकांचें निग्रहसामर्थ्य वाढत्या प्रमाणावर आहे हें पाहून अनादिकालापासून चालत आलेल्या बिगार व बलुता या जुलुमांचें केवळ या जिल्ह्यांतूनच नव्हे तर सर्व वऱ्हाड प्रांतांतून उच्चाटण करण्याचें अवाढव्य कार्य या जिल्ह्यांतील पुढाऱ्यांनीं आपल्या अंगावर घेतलें. सिमल्यांतील बिगारीच्या उच्चाटणाकरितां मि. स्टोक्स या परोपकारी अमेरिकन गृहस्थांनीं खटपट सुरू करण्यापूर्वीं बिगारीचा जुलूम ही एक क्षुल्लक व उपेक्षणीय बाब म्हणून समजण्यांत येत होती. परंतु या जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनीं बिगार व बलुता या दुकलीची एकसमयावच्छेदेंकरून हकालपट्टी करण्याचा संकल्प स्टोक्ससाहेबांच्या पूर्वींच केला. इतकेंच नव्हें तर स्टोक्ससाहेबांची आरोळी हिमालयाच्या दरींतून प्रतिध्वनित होण्याच्या पूर्वींच अजिंठ्याच्या घाटांतून

तपस्वी बाबासहेब, शामराव देशपांडे, तात्यासाहेब हूड, गोविंदशास्त्री पाठक, गोपाळराव कोठेकर, गद्रे, डॉ. अणे, बापुराव तुकाराम वगैरे पंचाननांच्या गर्जनांनीं जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांच्या अंतःकरणांत धडकी भरावयास लागली होती. स्टोक्ससाहेबांच्या प्रयत्नांचा एक इष्ट परिणाम झाला तो नमूद करणें अवश्य वाटतें. तो हा कीं, त्यानंतर वऱ्हाडांतील इतर जिल्ह्यांतील पुढारीहि या पापाचें निर्दालन करण्यास मोठ्या खुषीनें पुढें सरसावले व थोडक्याच दिवसांत सर्व प्रांतभर बिगारबलुत्याच्या चळवळीचा तीव्र वेगानें संचार व्हावयास लागला. या दोन्ही चळवळी यशस्वी होणार यांत कांहींएक शंका नाहीं. परंतु या सर्व चळवळी जरी लोकमताच्या जोरावर बाहेर चालू होत्या, तरी कायदेकौन्सिलमधून या तक्रारीचा लोकानुकूल निकाल करून घेण्याचे प्रयत्नहि सारखे सुरू होते, ही गोष्ट सांगणें जरूर आहे. या जोडगोळीच्या माऱ्यानें ही पिशाच्चांची दुकल या प्रांताबाहेर लवकरच कायमची पिटाळून लावूं अशी आम्हांस अजूनहि बळकट उमेद आहे. यवतमाळ जिल्हासभेच्या स्थापनेपासून तों पांढरकवडा येथें भरलेल्या मागील बैठकीपर्यंत एका विवक्षित धोरणावर चालविलेल्या अनेक चळवळींपैकीं कांहीं थोड्या ठळक व प्रमुख अशा चळवळींचा त्रोटक वृत्तांत वर दिला आहे. वरील वृत्तांत ज्या चळवळींचा उल्लेख करण्यांत आलेला आहे, त्या प्रांतिक किंवा स्थानिक दुःखाचें निराकरण करण्याच्या स्वरूपाच्या आहेत. सर्व राष्ट्रांत निरनिराळ्या रूपानें प्रकट होणाऱ्या सर्व आपत्तींचें मूळ जी हल्लींची, बेजबाबदार नोकरशाहीच्या रूपानें असलेली राज्यपद्धति, तिचें उच्चाटण करून स्वराज्य प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नाचा त्यांत कांहींच उल्लेख आलेला नाहीं. या बाबतींत या जिल्ह्याचें धोरण राष्ट्रीय सभा व बेळगांव येथें स्थापन झालेल्या इंडियन होमरूल लीग या संस्थेच्या प्रयत्नास सर्व तऱ्हेनें पुष्टी देण्याचें होतें, स्वराज्यसंघाच्या शाखा स्थापन करणें, सभासदांची भरती करणें, द्रव्यद्वारां संघाच्या कार्यास मदत करणें, संघाकडून येणाऱ्या वाङ्मयाचा प्रसार करणें व स्वराज्याचें ध्येय लोकप्रिय करून तत्प्राप्त्यर्थ कराव्या लागणाऱ्या खटपटींत उत्सुकतेनें व स्वार्थत्यागपूर्वक भाग घ्यावयास त्यांचीं मनें तयार करणें, हें या जिल्ह्यांत सुरू असलेल्या राष्ट्रीय

कार्याचें स्थूल स्वरूप होतें. या कार्यांत अधिकारी वर्गाकडून जो व्यत्यय येत गेला, त्याचा प्रतिकार कायदेशीर मार्गानें वारंवार करावा लागला. अधिकारी वर्गानें होमरूलच्या कार्याचा प्रसार होऊं नये म्हणून देशमुख, देशपांडे वगैरे वतनदार लोकांना वतनें बुडविण्याचा धाक दाखवून पाहिला. पाटील–पटवाऱ्यांना सरकारी नोकरांच्या अटी लावून त्यांची उपासमार करण्याचा-देखील प्रयत्न केला. पण या सर्व प्रयत्नांची कायदेशीर रीतीनें केलेल्या खटपटीपुढें व स्वार्थत्यागपूर्वक दाखविण्यांत आलेल्या चिकाटीपुढें फारशी डाळ शिजली नाहीं. तात्यासाहेब हूड, रामभाऊ गणोरीकर, देशपांडे वगैरे प्रमुख वतनदार मंडळींनीं जें बाणेदारपणाचें वर्तन केलें,त्यामुळें जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांना आपलें दडपशाहीचें शस्त्र निमूटपणें मागें घ्यावें लागलें. निरनिराळ्या स्थानिक व प्रांतिक प्रश्नांवर जोराची चळवळ सुरू असल्यामुळें राष्ट्रीय आकांक्षांच्या पूर्त्यर्थ चाललेल्या राष्ट्रीय झगड्यांत आपला योग्य भाग उचलण्यास जिल्ह्यांतील लोकांस कोणत्याहि प्रकारची अडचण पडली नाहीं. किंबहुना वरील प्रयत्नामुळें, लोकांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेल्या उत्साहामुळें व प्रतिकार-सामर्थ्यामुळें राष्ट्रीय झगड्यांतदेखील आपला जिल्हा, निदान महाराष्ट्रांत तरी इतरांच्या मागें पडूं नये अशी स्पृहणीय ईर्षा त्यांच्यांत दिसून येत होती व त्यामुळेंच स्वराज्यसंघातर्फे वसूल करण्यांत आलेल्या निधींत या एकट्या जिल्ह्याला पुष्कळच भर घालतां आली.

के. लोकमान्य टिळकांनीं काढलेल्या कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाचें काम सर्व वऱ्हाडभर व्यवस्थित करण्याची एक योजना तयार करण्यांत आली होती व वऱ्हाडांतील एकाहि नेमस्ताचा प्रवेश नवीन सुधारलेल्या कौन्सिलांत होऊं द्यावयाचा नाहीं, असा आपला निर्धार या जिल्ह्यांतील कार्यकर्त्या लोकांनीं प्रतिज्ञापत्र काढून जाहीर केल्यामुळें, निवडणुकीच्या धामधुमींतील पहिला खटका यवतमाळ येथील पुढारी व वऱ्हाडांतील नेमस्त पक्षाचे एक अध्वर्यु आणि हल्लीं मध्यप्रांत सरकारचे एक मंत्री नामदार मोरोपंत जोशी यांमध्यें उडून गेला होता. निवडणुकीची मोहीम योग्य रीतीनें व जोरानें चालविल्या-शिवाय प्रातिनिधिक स्वराज्याची कल्पना जनतेंत दृढमूल होणार नाहीं आणि तत्प्राप्त्यर्थ ते बद्धपरिकर होऊन वाटेल तो त्याग करण्याची त्यांची

तयारी होण्यास तिची अत्यंत आवश्यकता आहे, अशा कल्पनांवर सुधारणांची चर्चा सुरू असल्यापासून तों त्या कायद्याच्या स्वरूपांत परिणत होईपर्यंत सारखा भर देण्यांत आल्यामुळें,ठिकठिकाणीं परगणानिहाय व तालुकानिहाय मतदारसंघ निर्माण करण्याच्या प्रयत्नास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सुरवात झाली होती. पहिल्याच सलामीच्या चकमकींत आपण एकहि वार न खातां अधिकाऱ्यांच्या सहानुभूतीचें सामर्थ्य बरोबर घेऊन येणाऱ्या प्रतिपक्षांतील एका प्रमुख योद्धयाबरोबर चार सफाईचे हात करूं शकलों,यामुळें हा झगडा सर्व प्रांतभर यशस्वी करून दाखवूं या उमेदींत, या जिल्ह्यांतील सर्व प्रमुख कार्यकारी मंडळी होती व या त्यांच्या उमेदीस पूर्ण करण्याकरितां सर्वतोपरी साह्य करण्याचीं आश्वासनें वऱ्हाडांतील सर्व प्रांतिक पुढाऱ्यांकडून मिळालीं होतीं. या निवडणुकीच्या मोहिमेची तयारी मागील अधिवेशनांत करण्यांत आली होती.

अशा स्थितींत लोकमान्य टिळक हे एकाएकीं इहलोक सोडून गेले. सर्व भारतखंडभर त्यांच्या निधनानें जो हाहाःकार उडाला तो आपणाला विदित आहे. आमच्या दृष्टीनें तर त्यांच्या निधनामुळें राष्ट्रीय लोकशाहीपक्ष निर्माण करून, राष्ट्रीय आकांक्षा तृप्त करून घेण्याचा जो व्यूह त्यांनीं मोठ्या बुद्धिचातुर्यानें व मुत्सद्देगिरीनें रचला होता तो व्यूहच समूळ ढांसळून पडला. हिंदी पुढाऱ्यांनीं प्रातिनिधिक संस्थारूपाचें पाश्चात्य खड्ग हातांत घेऊन, तेहेतीस कोटी जनतेच्या मनोधैर्यरूपी उंच बुरुजावर उभे राहून, दडपशाहीच्या खंदकाच्या आंत दडून बसणाऱ्या नोकरशाहीवर अचूक व बिनतोड मारा करावा व त्याचबरोबर स्वातंत्र्यप्रीति व स्वार्थत्याग या दोन ज्वालाग्राही द्रव्यांनीं लोकमताचें दारूचें कोठार नेहमीं भरलेलें ठेवण्याची काळजी घ्यावी, अशा दुहेरी धोरणानें युद्ध चालू ठेवणारा एकहि कसलेला वीर राष्ट्रीय पक्षाच्या सैन्यांत नसल्यामुळें त्यांच्या पश्चात् या व्यूहाच्या प्रवेशस्थानावर खंबीरपणानें उभे राहून, त्याला योग्य ती चालना देण्यास कोणीहि योद्धा पुढें येऊं शकला नाहीं व यामुळेंच राष्ट्रीय पक्षांत विशेषत: महाराष्ट्रीय पुढाऱ्यांत दिङ्मूढता उत्पन्न झाली व अजूनपर्यंतदेखील ते या मूर्छेच्या बाहेर गेले आहेत कीं नाहींत हें सांगतां येत

नाहीं. लो. टिळकांत पार्थाचें धनुर्धारित्व व श्रीकृष्णाचें योगेश्वरत्व होतें. त्यामुळे त्यांनीं रचलेल्या व्यूहांचा भेद करण्यांत, ते ह्यात असते तर नोकरशाहीला यश न मिळतां, दहा वर्षांचा वायदा संपण्यापूर्वीच भरतखंड "श्री, विजय आणि भूति " या शक्तित्रयीनें मंडित झाला असता, यांत आम्हांस यत्किंचित्‌देखील शंका वाटत नाहीं. त्यांच्या निधनानें तीस वर्षांच्या एकनिष्ठ तपस्येच्या जोरावर रचलेला व्यूह ऐन आणीबाणीच्या वेळीं एकाएकीं ढांसळावयास लागला, एवढी गोष्ट मात्र प्रत्यक्ष आहे. परमेश्वरी न्यायाच्या साम्राज्यांत या व्यूहाच्या विस्कळण्यांतदेखील आमचें कल्याणच असेल व कदाचित् आमच्या मंद व मर्यादित दृष्टीला तें दिसत नसलें तर तो दोष आमचा आहे.

त्यानंतर कलकत्ता येथील जादा राष्ट्रीय सभेत जेव्हां महात्मा गांधींचा असहकारितेचा ठराव पास होऊन त्यावर राष्ट्राचा छाप मारण्यांत आला, त्यावेळीं अंगांत चिलखतें चढवून प्रतिपक्षीयांवर एका विशिष्ट स्थलीं हल्ला चढविण्याकरितां निघालेल्या लष्करी टोळीस 'चिलखतें व शस्त्रें फेंकून द्या आणि किल्ल्यावरील रोख सोडून कांहीं काळ आत्मनिरीक्षण करा' अशी आज्ञा केली असतां त्या लष्करी तुकडीची जी मनःस्थिति व्हावी, तशाच प्रकारची आमची मनःस्थिति झाली, हें मी प्रांजलपणें कबूल करतों. कोणीतरी वीर यावेळीं धैर्यानें पुढें येऊन चालत आलेल्या वाटेनेंच पुढें चला असें आम्हांस सांगेल, या आशेनेंच दिगंत गाजलेल्या अनेक दिग्गजाकडे आशापूर्ण दृष्टि फेंकीत, आपली वाट न सोडतां चालण्याचा कांहीं काल आम्ही प्रयत्न केला. पण अखेरीस कोणीहि हें कार्य शिरावर घेऊन राष्ट्रीय सभेच्या ठरावास न जुमानतां आपल्याच वाटेनें जाऊं इच्छिणाऱ्या आमच्यासारख्या सैनिकांच्या लहानशा तुकडीचें नायकत्व पत्करण्यास तयार नाहीं, हें पाहून आम्ही स्वतःच आपल्या लहानशा तुकडीचे मार्गदर्शक होण्याचें ठरविलें व या जिल्ह्यांतील पुढाऱ्यांनीं आपल्या सहीनिशीं एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. आम्ही आपली वाट किंवा स्थान न सोडतां आपल्या साथीदारांनीं एकाएकीं जी दुसरी वाट धरली आहे, तिजकडे व त्यांच्या सर्व हालचालींवर सहानुभूतिपूर्वक लक्ष ठेवण्याचा,व आपल्या तुकडीवर गैरसमजुतीनें व रागाच्या

भरांत शत्रू समजून जर आपल्या सांथीदारांकडून हल्ले चढविण्यांत आले, तर तेवढे समजूत घालून परत फिरविण्याचा आणि आपल्या सर्व पूर्वीच्या साथीदारांना परत हांक मारून चालू वाटेवर परत आणण्याकरितां आपल्या परीनें प्रयत्न करण्याचा निश्चय केला. नागपूर येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनापर्यंत या धोरणानें आम्हीं चाललों. त्यानंतर असहकारितेच्या कार्यक्रमांतील कौन्सिलच्या प्रश्नाचा निकाल होऊन गेल्यामुळें व त्या दृष्टीनें कांहींएक विशिष्ट कर्तव्य आम्हांस करण्यासारखें नसल्यामुळें, असहकारितेच्या तत्त्वास बाधक न होण्यासारखे प्रश्न हातांत घेऊन नागपूरच्या राष्ट्रीयसभेंत प्रत्यक्ष संमत झालेली राष्ट्रीय संघाची कल्पना लोकप्रिय करण्याच्या प्रयत्नास आम्ही लागलों.अर्थात् आम्ही आपली जुनी वाट सोडली, परंतु प्रत्यक्ष असहकारितावाद्यांच्या पाउलावर पाऊल न ठेवतां, त्यांच्या समागमें चालण्याचा व असहकारितेच्या ठरावांत समाविष्ट झालेल्या सर्वसाधारण तपशिलाविषयीं उदासीन राहून, पण त्यांत ग्रथित असलेल्या मूलभूत तत्त्वांचीच तेवढी कांस धरून, शक्य तितक्या जोरानें बलुता, बिगार आणि मद्यपाननिषेध या तीन प्रश्नांवर विशेष जोर देण्याचा निर्धार केला. असहकारितावाद्यांशीं कोणत्याहि तऱ्हेचा विरोध करण्याची आमची इच्छा नसल्यामुळें आणि सरकारच्या कच्छपीं लागणाऱ्या पक्षांशीं संसर्ग ठेवावयाचा नाहीं हा आमचा कृतसंकल्प असल्यामुळें, आम्हीं चालविलेल्या चळवळीला वऱ्हाडांतील सर्व असहकारितावाद्यांनीं मनःपूर्वक सहाय्य केलें.विशेषतः आमच्या जिल्ह्यांतील असहकारितावादाच्या सर्व तपशिलाचा मनापासून स्वीकार करणारे माझे सहकारी अनेक मित्र आहेत. त्यांत विशेषतः शिवप्रसाद देवीदिन उर्फ बच्चूमहाराज, विनायकराव शारंगपाणी, डॉ. अंबादासप्रभृति कार्यकर्त्या मंडळींचा उल्लेख करणें आवश्यक आहे. त्या सर्वांनीं मद्यपाननिषेध, बिगार, बलुता, यांच्या कार्यांत जिवापाड मेहनत घेतली, या गोष्टींचा स्पष्ट निर्देश न केल्यास मी कृतघ्नतेच्या दोषास पात्र होईन. मद्यपान निवारण्याचें कार्य हें जरी राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमांत समाविष्ट नव्हतें, तरी आत्मशुद्धीचें साधन असल्यामुळें वर्धा येथील सुप्रसिद्ध देशभक्त व कॉंग्रेसचे पुढारी शेट जमनलाल बजाज यांच्या खटपटीमुळें महात्मा गांधी यांजकडून त्या

कार्यास पूर्ण प्रोत्साहन मिळालें व त्यामुळें त्यासंबंधाची खटपट सर्व जिल्हाभर व प्रांतभर चांगलीच यशस्वी झाली.

या जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनीं असहकारितेच्या ठरावांतील आपल्यास पसंत असलेल्या गोष्टींसंबंधानें म्हणजे टिळक–स्वराज्य–फंड गोळा करणें व राष्ट्रीय सभेच्या घटनेनुसार काँग्रेस कमिटया स्थापन करणें, काँग्रेसपटावरील सभासदांची संख्या वाढविणें वगैरे बाबींत बरीच खटपट केली व या बाबतींत हा जिल्हा वऱ्हाडांतील इतर जिल्ह्यांच्या मागें राहिला नाहीं. स्वदेशी व बहिष्काराचा प्रसार करण्याकरितां जिल्हा काँग्रेस कमेटीमार्फत व्याख्यात्यांचे दौरे अनेकवार काढण्यांत आले व त्यासंबंधानें लोकमत बरेंच जागृत झालें आहे. सूत कांतणें व खादी तयार करणें या संबंधानेहि खटपटी सुरू आहेत. इकडे लोकांचें लक्ष यानंतर अधिक लागेल, अशी उमेद आहे.

इतर जिल्ह्यांच्या मानानें असहकारितेच्या कार्यक्रमांतील ज्या दोनतीन गोष्टींची बऱ्याच कार्यकर्त्यांकडून उपेक्षा करण्यांत आली, त्या म्हणजे शाळांवरील बहिष्कार आणि कोर्टांवरील बहिष्कार या होत. परंतु या बाबतींत मला येवढें सांगणें अवश्य वाटतें कीं, जिल्ह्यांत बऱ्याच ठिकाणीं राष्ट्रीय शाळा निघाल्या आहेत व असहकारितेच्या पुरस्कर्त्यांनीं त्या काढल्यानंतर जिल्ह्यांतील सर्व पुढारी त्या सुव्यवस्थित चालविण्याकरितां सहानुभूतिपूर्वक मदत करीत आहेत.कोर्टांवरील बहिष्काराच्या बाबतींत सर्व देशभर मुख्य भर देण्यांत आला,तो वकिलांनीं आपला धंदा सोडून देणें एवढयावर होता. या दृष्टीनें पाहिलें असतां नागपूरच्या काँग्रेसपासून थोडक्याच अवधीच्या आंत निदान ६ वकिलांनीं तरी त्या धंद्यावर निर्वाह करण्याचें टाकून दिलें आहे व मी मोठ्या अभिमानानें असें म्हणूं शकतों कीं, या बाबतींत दुसऱ्या कांहीं जिल्ह्यांपेक्षां यवतमाळ जिल्ह्यांतील वकिलांनीं घालून दिलेलें उदाहरण अधिक दिलदारपणाचें व स्वार्थत्यागाचें होतें. माझे मित्र अबदुलरोफ किंवा दामोदरपंत गद्रे या दोन्ही गृहस्थांनीं कलकत्याच्या काँग्रेसनंतर आपली वकिली तावडतोब तहकूब केली असूनदेखील,ही गोष्ट वर्तमानपत्रांतून जाहीर न करण्यांत त्यांनीं मनाचा जो मोठेपणा व देशकार्यैक दृष्टि दाखविली,त्याबद्दल त्यांची जेवढी प्रशंसा करावी तेवढी थोडी आहे. त्याच-

प्रमाणें रा.कोल्हे,ओक व हूड या तीन गृहस्थांनीं आज कित्येक महिन्यांपासून आपल्या धंद्यावर लाथ मारली आहे. परंतु राष्ट्रकार्याकरितां धंद्याची सर्वस्वी उपेक्षा किंबहुना त्याग करणें ही गोष्ट वेगळी व राष्ट्रीय सभेच्या ठरावानुसार न्यायाच्या कोर्टावर बहिष्कार घालणें ही गोष्ट वेगळी. वकिलांच्या धंदातहकुबीनें कोर्टावरील बहिष्कार यशस्वी होणें शक्य नाहीं, अशी प्रामाणिक समजूत असल्यामुळें त्या ठरावास मान देणें म्हणजे आपल्या विचारशक्तीचा व सद्सद्विवेकबुद्धीचा उपमर्द करणें आहे, असें वाटून केवळ आपल्या समजुतीप्रमाणें राष्ट्रकार्यातच आपला सर्व वेळ घालविण्यास सांपडावा व कांहीं काळपर्यंत राष्ट्रकार्यच आपल्या हातून व्हावें अशा हेतूनें,धंद्याकडे पूर्ण दुर्लक्ष करण्याचें ठरवून ज्या गृहस्थांनीं गेले ८–१० महिने अव्याहत देशकार्यांत घालविले, त्यांचें जाहीर अभिनंदन करणें मला आवश्यक वाटतें. याशिवाय धंद्याची फारशी फिकीर न करितां, जेमतेम निर्वाहापुरतें मिळवून, उरलेला सर्व वेळ सार्वजनिक कार्यांत घालणाऱ्या माझ्या कित्येक वकील मित्रांची नांवनिशी देणें मला अगत्याचें वाटतें. यवतमाळ येथील रा. साकळे,निळकंराव देशपांडे, बापट, पांडे किंवा दारव्हा येथील बापुसाहेब बापट या गृहस्थांनीं गेल्या १०–१२ महिन्यांत केलेली कामगिरी ही ज्यांना त्यांची गृहस्थिति व मनःस्थिति प्रत्यक्ष माहिती आहे त्यांना तर सांगण्याची जरूरच नाहीं, पण इतरांकरितां म्हणून मी मुद्दाम म्हणून ठेवतों कीं,वकिली तहकूब केलेल्या या जिल्ह्यांतील किंवा इतर ठिकाणच्यादेखील लोकांपेक्षां कोणत्याहि प्रकारें कमी दर्जाची नाहीं. याशिवाय असहकारितेच्या नांवाखालीं वकीलवर्गावर जी सकारण व निष्कारण सर्वत्र आग पाखडली जात आहे, तिचा जर कांहीं अंशदेखील या जिल्ह्यांत दृष्टीस पडत नसेल, तर त्याचें कारण या जिल्ह्यांतील असहकारितावाद्यांचा भारदस्त स्वभाव व समजूतदारपणा आणि उपरिनिर्दिष्ट गृहस्थांचें स्वार्थत्यागी वर्तन हें तर आहेच, पण त्या बरोबरच पांढरकवडा येथील अंबेकर, बर्वे, भावे व एलकुंचवार, त्याचप्रमाणें दारव्हा येथील थत्ते व दाऊ किंवा पुसद येथील नातू व सप्रे वगैरेंसारख्या कित्येक गृहस्थांचा सभोंवार सुरू असलेल्या उपहासाची पूर्ण उपेक्षा करून शांतपणें व समजूतदारपणें सार्वजनिक कार्याविषयीं पूर्वींइतकीच उत्सुकता ठेवण्याचा बाणा, हें देखील आहे.

वरील विवेचनावरून मागील अधिवेशनापासून तों आजपर्यंत जिल्ह्याची एकंदर मन:स्थिति व जिल्ह्यांत झालेली कामगिरी यांची आपणांस कांहीं तरी कल्पना करतां येईल. जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांपैकीं असहकारितेचा सर्व तपशील मंजूर करणारीहि थोडी मंडळी होती. परंतु अशा स्थितींतदेखील कोणत्याहि प्रकारानें पुढारी मंडळीनें आपलीं मनें परस्परांसंबंधानें कलुषित होऊं दिलीं नाहींत. एवढेंच नव्हे, तर सर्व पुढारी मग ते कट्टे असहयोगी असोत कीं अंशत: असहयोगी असोत, या सर्वांनीं एकदिलानें व जुटीनें चालण्याचा निश्चय केल्यामुळें नेमस्तपक्ष किंवा अमानसभेचा पक्ष यांना वर डोकें काढावयास अवकाश मिळाला नाहीं. उलट सरकारी अधिकाऱ्यांचीं डोकीं भणभणून सोडण्यासारखी प्रचंड चळवळ जिल्हाभर निदान सहा महिनेपर्यंत तरी चालली होती. दडपशाहीच्या सत्रांतील बराच मोठा वांटा या जिल्ह्याच्या हिश्शास आला आहे व त्याचा जिल्ह्यांतील देशभक्तांनीं मोठ्या आनंदानें स्वीकारहि केला आहे. परंतु सर्वच खटल्यांतून अरोपींनीं आपला डिफेन्स दिला असून,त्या कामीं त्यांना जिल्ह्यांतील वकीलवर्गानें निरपेक्ष सहाय्य केलेलें आहे, हें सांगणे जरूर आहे. यापेक्षांदेखील नोकरशाहीनें अधिक उग्र रूप धारण केलें, तरी या जिल्ह्यांतील जागृत झालेली जनता आपल्या अंगीकृत मार्गापासून तिळभरहि मागें हटणार नाहीं किंवा आजूबाजूस सरणार नाहीं याबद्दल आह्मांस किंचितदेखील संशय वाटत नाहीं. परंतु या दडपशाहीच्या सत्रांत या जिल्ह्यांतील लोकांना धक्का बसण्यासारखे दोन वार झाले आहेत. माझे मित्र उमरावती येथील देशभक्त वीर वामनराव आणि या जिल्ह्यांतील नूतन चैतन्याचे जनक तपस्वी बाबासाहेब परांजपे या उभयतांचा कारागृहवास ह्या दोन गोष्टी अत्यंत संतापजनक अशा घडल्या आहेत. या दोन्ही देशभक्तांनीं गेल्या १५–२० वर्षांतील आपल्या लोकोत्तर व स्वार्थशून्य देशसेवेनें विदर्भभूला कायमचें ऋणी करून ठेवलें आहे. त्यांच्या उदात्त व दिव्य आचरणाचें उद्दीपक उदाहरण डोळ्यांसमोर असलेल्या या जिल्ह्यांतील जनतेच्या अंत:करणांतून नोकरशाहीपासून होणाऱ्या दडपशाहीच्या भीतिरूप काळोखाचा आपोआप लोप होऊन स्वातंत्र्यप्रीतीच्या

प्रकाशानें ती उज्ज्वलित झाल्याशिवाय राहणार नाहींत. हे दोघे निःसीम देशभक्त परस्परांचे जिवलग स्नेही, परस्परांविषयीं अत्यंत आदर बाळगणारे आणि एकाच स्वराज्यसंघाच्या कार्याचा प्रचार करणारे. परंतु कलकत्ता येथील राष्ट्रीय सभेच्या जादा अधिवेशनानंतर एक असहकारितेच्या ठरावाचा पुरस्कार करणारे म्हणून संचार करावयास लागले, तर दुसरे असहकारितेच्या ठरावाचा अंशतः विरोध करण्यास व प्रतिकारप्रधान मार्गाचें उद्घाटन करण्यास सरसावून पुढें धांवले. या उभयतांनीं एकाच व्यासपीठावर उभे राहून एकमेकाला दंड थोपटून आव्हान केलेलें आहे, असा देखावा सभास्थानांत पाहणाऱ्या लोकांना, सभा विसर्जन होतांच दोघेहि गळ्यांत हात घालून पुढील देशकार्याच्या दिशेसंबंधीं अत्यंत प्रेमळपणानें बोलत आपल्या बिऱ्हाडास परत चालले आहेत, असा देखावादेखील पाहण्यास मिळालेला आहे. या दोन देशभक्तांच्या भिन्न शरीरांच्या आंत असलेलें मन कसें एक होतें, हें ज्यांना पाहावयाचें असेल त्यांनीं या दोन्ही देशभक्तांना ज्या व्याख्यानांबद्दल तुरुंगवास आला आहे, तीं व्याख्यानें वाचून पाहावींत. व्याघ्रस्वरूपानें वावरणाऱ्या आणि सर्व हिंदुस्थानांतील प्रजेची गरीब कोंकराप्रमाणें शिकार करणाऱ्या नोकरशाहींतील अधिकारी वर्गाचे हे दोघेहि केवळ कर्दनकाळ होते व या दोघांच्याहि वाणींत जें सामर्थ्य, जें तेज व जी प्रखरता होती, ती इतरत्र दृष्टीस पडणेंदेखील कठीण आहे. असल्या श्रेष्ठ देशभक्तांच्या सहवासास व त्यांच्या सामर्थ्यास वर्ष दीडवर्ष आम्हांस आंचवावें लागल्यामुळें या जिल्ह्यांतीलच नाहीं तर संबंध प्रांतांतील सार्वजनिक कार्य पुढें ढकलणाऱ्या शक्तीपैकीं दोन मोठीं एंजिनें बेकाम झाल्यासारखें वाटत आहे. त्या ऐवजीं लहान मोठ्या जोड्यांची आगळ घालून काम पुढें ढकलण्यासारखें जरी कित्येकांस वाटत असलें, तरी त्यांची तडफ आणि सफाई यांची उणीव प्रत्येक क्षणास भासल्याशिवाय राहाणार नाहीं.

या दोन्ही देशभक्तांस तुरुंगांतील अधिकाऱ्यांकडून सहानुभूतिपूर्वक वागविण्यांत येत आहे, हें ऐकून आपल्या संतप्त व उद्विग्न अंतःकरणांस कांहींसें समाधान वाटल्यावांचून राहाणार नाहीं. दे. भ. बाबासाहेब परांजपे यानीं जाहीर केलेल्या निर्धारावर सरकारतर्फे अधिकारयुक्त उत्तर म्हणून अजून देण्यांत

आलें नाहीं; तथापि आतांपर्यंत समजलेल्या माहितीवरून त्यांजकडून काम घेण्याचा आग्रह हुशंगाबाद येथील तुरुंगावरील अधिकाऱ्यांनीं धरला नाहीं एवढी गोष्ट नक्की आहे. या परिषदेंत सरकारनें बाबासाहेबांची प्रतिज्ञा पुरी करण्यास कोणत्याहि सबबीवर व्यत्यय आणतां कामा नये, म्हणून कांहीं तरी योग्य विचार होईल अशी माझी खात्री आहे

सद्गृहस्थहो ! परिषद् उशीरानें भरविण्यांत येत आहे याबद्दल मला खेद न होतां एक प्रकारचें समाधान होत आहे असें पूर्वीं जें विधान केलें आहे, त्याचा अर्थ इतकाच होता कीं, मागील वर्षाच्या अवधींत राष्ट्रीय सभेच्या ठरावास कांहीं अंशीं विरोधक व कांहीं अंशीं अनुकूल अशा धोरणानें चालण्याचा आम्हीं निश्चय केला व या आमच्या धोरणास जिल्ह्यांतील बहुतेक पुढाऱ्यांनीं आपली पुष्टि दिली. तें धोरण बरोबर होतें किंवा नाहीं हें जर परिषद् या पूर्वींच भरली असती, तर आपणांला ठरवितां आलें नसतें. आज असहकारितेच्या कार्यक्रमांतील सर्व गोष्टींसंबंधानें निरनिराळ्या प्रांतांतून जे प्रयत्न व्हावयाचे ते होऊन गेले आहेत, त्या सर्व प्रांतांतून जी कामगिरी तेथील उत्साही मंडळीला करतां येणें शक्य वाटलें, ती त्यांजकडून बजाविली गेली आहे व ती राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी मंडळाकडून वेळोवेळीं प्रसिद्ध करण्यांत आली आहे; व वर निर्दिष्ट केलेल्या धोरणास अनुसरून या जिल्ह्यांतून झालेल्या कामगिरीचें वर्णन दिलें आहे, तें एवढयासाठीं कीं, आम्हीं ठरविलेल्या धोरणासंबंधानें आपणाला स्वतंत्रपणें आपलें मत बनवितां यावें आणि पुढील सालाकरितां काय धोरण ठेवणें इष्ट आहे याचा विचार आपणांस करतां यावा.

आपल्या जिल्ह्याच्या कामगिरीचें पुढील वर्षाकरितां धोरण आंखतेवेळीं कांहीं विशेष गोष्टी लक्षांत ठेवणें आपणांस जरूर आहे. त्यांत सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे वऱ्हाड प्रांत निजाम सरकारला परत देण्यासंबंधानें निजाम सरकार व ब्रिटिश सरकार यांत चालू असलेली बरीच वाटाघाट ही होय. युवराजांच्या आगमनानिमित्त महायुद्धांत दिलेल्या लोकोत्तर सहाय्याबद्दल पारितोषक म्हणून वऱ्हाड, सार्वभौम ब्रिटिश सरकारकडून निजाम सरकारला परत दिला जाईल अशा प्रकारची दाट वदंता सर्वत्र ऐकूं येत आहे. या

बाबीसंबंधानें पडद्याआड चर्चा बरेच दिवसांपासून सुरू आहे, यांत शंका नाहीं. परंतु चर्चा निर्णयरूपास आली असून वऱ्हाडच्या जनतेस त्याची यत्किंचित्‌देखील खबर लागूं नये हा हल्लींच्या राज्यपद्धतींतील अत्यंत अनिष्ट प्रकार आहे. आमचा ब्रिटिश सरकार व निजामसरकार या दोघांनाहि असा सवाल आहे कीं, तुम्ही महायुद्धांत पडलां तेव्हां व युद्ध सुरू असतां कांहीं तत्त्वांचा पुरस्कार केल्याचें तुम्हांला स्मरण येतें किंवा नाहीं? राष्ट्रांराष्ट्रांतील तह हे एक गुप्त दस्तऐवज न समजतां त्यांची चर्चा चव्हाट्यावर झाली पाहिजे, हें एक तत्त्व त्यांत समाविष्ट होतें किंवा नाहीं? कोणत्याहि राज्यकर्त्यांना दुसऱ्या राज्यकर्त्यांशीं सलोखा राहावा म्हणून एखाद्या मुलुखाची देवघेव तेथील प्रजेच्या इच्छेविरुद्ध किंवा तिच्या इच्छेची वास्तपुस्तदेखील न करतां करणें, ह्या आजपर्यंत लोभाविष्ट राज्यकर्त्यांनीं घालून दिलेल्या रूढीचा नायनाट करण्याकरितांच हिंदी सैनिकांना व विशेषतः निजामसरकारच्या तैनातीस असलेल्या लष्करांना कोशाबाहेर तरवार काढण्यास तुम्ही सांगितलें होतें किंवा नाहीं? या तुमच्या गुप्त कारस्थानांत वऱ्हाडांतील ३०–३२ लक्ष लोकांच्या हिताहिताचा कांहींच संबंध नाहीं, अशी तुम्हां उभयतांचीच समजूत असेल तर तुम्हां उभयतांपैकीं एकाचीदेखील प्रजा म्हणून राहण्याचें प्रयोजन नाहीं, असा निर्धार करणें वऱ्हाडच्या प्रजेस भाग पडेल व असा निश्चय करण्यास ते चुकणार नाहींत, इतका इशारा देणें हें माझें कर्तव्य आहे असें मी समजतों.

सद्‌गृहस्थहो, आपण युवराजाच्या आगमनावर बहिष्कार घालण्याचे ठराव गांवोगांव पास करूनच येथें आलां असलां पाहिजे. युवराजाचें आगमनच जर आपण बहिष्कृत करीत आहांत, तर त्या आगमनानंतर त्यांच्या हातून होणाऱ्या गोष्टींत वऱ्हाडच्या देवघेवीचा व्यवहार झाल्यास, त्या व्यवहाराचा तुम्हाला यत्किंचित् मागमूस लागूं न देतां हा व्यवहार घडवून आणणाऱ्या दोन्ही सरकारला पूर्णपणें बहिष्कृत करण्याखेरीज आपणांला दुसरा मार्गच उरत नाहीं, हें मी आपणांला सांगून ठेवतों. आम्ही आज निजाम व इंग्रज या दोघांचीहि प्रजा आहोंत व आमच्या उत्पन्नांतून निजामच्या गंगाजळींत २५ लाख रुपयांची वार्षिक भरती होते. जवळ जवळ त्याच्या तिप्पट रक्कम इंग्रज सरकारचे खिशांत निरनिराळ्या रूपानें

जाते व कांहीं थोडे लाख रुपयेच काय ते आमच्या प्रांतावर खर्च करण्याकरितां शिल्लक ठेवले जातात. माझ्या म्हणण्याचा आशय हा आहे कीं, आमच्यापासून इंग्रज व निजाम या दोघांनाहि मोठमोठ्या रकमा मिळत आहेत; आणि म्हणून दोघांचेंहि स्वामित्व आमच्यावर आहे. आमच्या वऱ्हाड प्रांतावरून याप्रमाणें चौबेली नांगर साठवर्षांपासून फिरविण्यांत येत आहे. इतरांबरोबर सुधारणेचा वारा म्हणून वऱ्हाडच्या मंडळीला निवळ खुर्चीवर बसण्याचे आणि दुसऱ्यांच्या कारभारांत नसती ढवळाढवळ करण्याचेच तेवढे हक्क मिळाले आहेत. तेव्हां इंग्रजी अमदानींत राजकीय हक्कांच्या दृष्टीनें संस्थानी प्रजेपेक्षां आमची कांहींच जास्त प्रगति झाली नाहीं, ही जाणीव वऱ्हाडांतील प्रजेंत आहे ही गोष्ट इंग्रजी मुत्सद्यांनीं विसरून चालणें मुत्सद्देगिरीचें होणार नाहीं. त्याचप्रमाणें राज्ययंत्र सुरळीत करण्याच्या निमित्तानें दूरदूरच्या प्रांतांतील प्रांतस्थ प्रजेसंबंधीं सर्वस्वी सहानुभूतिशून्य असलेल्या लोकांचे तांडेचे तांडे अधिकाऱ्यांच्या रूपानें या प्रांतांत प्रतिवर्षी आणून सोडण्यांत येत असून त्यांच्या हातून प्रत्यहीं होणाऱ्या अन्यायाचे, पक्षपातित्वाचे आणि निर्दयतेचे शेंकडों प्रकार प्रांतभर घडतात, त्यामुळें जनतेची मनःस्थिति बऱ्याच विकोपास गेली आहे. प्रांतांतील मोठे धंदे साफ बुडाले असून, परप्रांतीय सावकारांच्या कर्जांत वऱ्हाड जो आकंठ बुडालेला दिसत आहे, त्याचेंदेखील खापर केवळ इंग्रजी पद्धतीवरच फुटलें जात आहे. वऱ्हाडांतील जनता ही इंग्रजी अमदानींत सर्वस्वी शेतांत राबणाऱ्या कुणब्याच्या दर्जास पोंचली असून, बाकीचा सर्व प्रतिष्ठितपणाचा मान पाश्चात्यांकडे किंवा चार पैसे मिळविण्याकरितां येथें आणून सोडलेल्या अन्यप्रांतीय अधिकारी वर्गाकडे हळूंहळू गेला आहे, किंवा जात आहे, ही स्थिति वऱ्हाडांतील लोक उघड्या डोळ्यांनीं पाहात आहेत. त्याचप्रमाणें प्रातिनिधिक राज्यकारभाराच्या उपक्रमासंबंधाचे औदासिन्य व मतस्वातंत्र्याविषयींची असहिष्णुता ही शेजारच्या मोंगलाई मुलखांत किती आहे, याचीहि वऱ्हाडच्या प्रजेला तंतोतंत माहिती आहे. त्यामुळें या महत्त्वाच्या प्रश्नाचा गुप्त निकाल या दोन्ही सरकारनें कांहीं जरी केला, तरी वऱ्हाडच्या प्रजेवर नीतिदृष्ट्या तो यत्किंचितदेखील बंधनकारक नाहीं, एवढेंच आज मला म्हणा-

वेसें वाटत आहे. वऱ्हाडांतील जनतेला उद्देशून मी एवढेंच सांगूं इच्छितों कीं, आर्यसंस्कृति ही राजाचा हक्क फक्त जमिनींतील उत्पन्नांतील षष्ठांश आहे एवढेंच सांगते, बाकीच्या कोणत्याहि बाबतींत राजाचा हक्क कबूल करीत नाहीं. भूमि व त्यावरील प्रजा यासंबंधानें प्रत्यक्ष भूमीच्या मुखांत म्हणून श्रुतीनें पुढील वाक्य घातलें आहे–" भूमिर्ह जगौ इति उदाहरन्तीं न मामर्त्यः कस्यचित् दातुमर्हति " ही वेदाज्ञा आहे व या वेदाज्ञेविरुद्ध झालेलें वर्तन आजपर्यंत जरी आपण सहन केलें असलें, तरी यानंतर आपणाला न विचारतां, आपल्या सुखदुःखांची वास्तपुस्त न ठेवतां माझे मित्र व आपले सर्वांचे पुढारी तपस्वी बाबासाहेब परांजपे यानीं म्हटल्याप्रमाणें वऱ्हाड व तेथील रहिवाशी म्हणजे एक कोठा व त्यांतील जनावरें समजून व्यवहार करणारे लोक सत्ताधीश असले तरी त्यांचा विरोधच नव्हे, तर दुर्दैवानें प्रसंग उत्पन्न झाल्यास त्यांना बहिष्कृत करणें हेंच स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचे अभिमानी म्हणून व वेदाज्ञानुयायी म्हणून आपलें कर्तव्य उरणार आहे.

अशा आणाबाणीच्या प्रसंगीं निःशस्त्र प्रजेला आपल्या सत्त्वास व अहिंसाव्रतास न सोडतां नोकरशाहीला किंवा अधिकारारूढ वर्गाला वठणीस आणण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न कसा करतां येईल, याची कल्पना हिंदी जनतेस देण्याकरितां व अभीप्सित ' स्वराज्य ' न मागतां आपल्याकडे आपोआप चालून येईल अशा प्रयत्नांचा प्रत्यक्ष मासला हिंदी जनतेच्या समोर ठेवण्याकरितां महात्मा गांधी हे गुजराथेंतील कांहीं विशिष्ट भागांतून सर्वव्यापी सत्याग्रहाचा पुकार व सुरुवात करणार आहेत. बंधूंनो आणि भगिनींनो, महात्मा गांधींच्या असहकारितेच्या कार्यक्रमाच्या शक्याशक्यतेसंबंधानें मतभेद देशांत असला तरी देशांतील अफाट जनतेचें तिला पाठबळ होतें, ही गोष्ट आपण विसरूं नका. तर्कदृष्टीनें व युक्तायुक्ततेच्या विचारानें शत्रूंकडून त्यांच्या कार्यक्रमाची जितकी छाननी झाली आहे, इतकी दुसऱ्या कोणत्याहि प्रश्नाची आजपर्यंत झाली नाहीं असें म्हणण्यांत यत्किंचित्देखील अतिशयोक्ति नाहीं. आपल्या कार्यक्रमांतील कांहीं भागांस मुळींच यश मिळालें नाहीं आणि बाकीचा भाग यशस्वी होण्यासारखा दिसत असला तरी अजून पुष्कळच कार्यभाग व्हावयाचा आहे. या गोष्टीची

जाणीव महात्मा गांधी यांना जितकी आहे इतकी दुसऱ्या कोणत्याहि व्यक्तीस नाहीं. पुष्कळ प्रांतांतील लोक सत्याग्रहाविषयीं गेल्या तीनचार महिन्यांत उतावीळ असल्याचें स्पष्टपणें दृष्टीस पडत असतां व त्या त्या प्रांतांतील पुढाऱ्यांनीं सत्याग्रहाचा सार्वत्रिक पुकार करण्याच्या बाबतींत महात्मा गांधी यांना अनेकवार आग्रहपूर्वक विनंति केली असतांदेखील अजून सर्व देश सत्याग्रहाची दीक्षा घेण्यास पात्र झाला नाहीं हें निर्भीडपणें सांगण्यास ते यत्किंचित्‌देखील कचरले नाहींत. अशा स्थितींतसुद्धां आपल्या प्रयत्नांत शैथिल्य येऊं न देतां व कोणत्याहि प्रकारें निराश न होतां त्यांनीं जर गुजराथेंतील एखाद्या विशिष्ट भागाची निवड सत्याग्रहाचा प्रत्यक्ष उपक्रम करण्याकरितां केली असेल, तर ती तेथील लोकांची मनः-स्थिति व परिस्थिति त्यांना पाहिजे अशा उच्च व धीरोदात्त स्थितीस बऱ्याच अंशानें पोंचली असल्याची त्यांची खात्री होण्यासारखीं प्रमाणें त्यांना तेथें दिसून आल्यामुळें केली असली पाहिजे, हें आपण लक्षांत ठेवा व हा गंभीर विचार जर आपल्या मनावर पटला तर असहकारितेच्या कार्यक्रमाच्या शक्याशक्यतेची काथ्याकूट करण्याची ही वेळ आहे किंवा नाहीं याची कांहींतरी जबाबदारी आपणास वाटल्याशिवाय राहणार नाहीं. गेल्या ४० वर्षांपासून ज्या स्वराज्यप्राप्तीकरितां हिंदी जनतेची धडपड सुरू आहे, त्या स्वराज्याकरितां महात्मा गांधी यांच्या दिशेनें जो निर्वाणीचा प्रयत्न सर्व देशाकडून व्हावयास पाहिजे, असें ते आज १२–१४ महिन्यांपासून कंठर-वानें सांगत फिरत आहेत, त्या प्रयत्नांत सामील होण्याची जोखीम सर्व देशांवर टाकण्यापूर्वीं, प्रयोगादाखल आपल्या विश्वासू अनुयायांच्या जोरावर एका विशिष्ट स्थलीं स्वतःच सत्याग्रहाचा पहिला धडा लाख, अर्धा लाख लोकसंख्येस बरोबर घेऊन घालून देणार आहेत व त्या प्रयत्नाचें योग्य निरीक्षण करून आपल्या प्रांताचा वकूब व झालेली कामगिरी यांचा तार-तम्य ज्ञानानें विचार करून स्वराज्यप्राप्तीकरितां आणि पंजाब व खिलाफत या दुःखांचें निर्मूलन करण्याकरितां सत्याग्रहाची सुरुवात करणें इष्ट वाटल्यास तशी सुरुवात करण्यास प्रांतिक कांग्रेस कमिटयांना अधिकार देण्यांत आलेला आहे. वैयक्तिक, स्थानिकप्रश्नविषयक आणि सर्वव्यापी अशा तऱ्हेनें सत्या-

ग्रहाचें वर्गीकरण करण्यांत आलें असून, स्थानिक दुःखनिवारणार्थ सत्याग्रहाचा उपक्रम करणाऱ्या व्यक्तीस व समूहास राष्ट्रीय सभेच्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें पसार केलेल्या ठरावांतील अटी लागू नसून, त्या फक्त सर्वव्यापी सत्याग्रह करूं इच्छिणाऱ्या समूहास किंवा स्वराज्यप्राप्त्यर्थ सत्याग्रह करणाऱ्या व्यक्तीसच लागू आहेत, असा खुलासा बंगालचे देशभक्त बॅरिस्टर दास यांजकडून करण्यांत आलेला आहे. सर्वव्यापी सत्याग्रहाची दीक्षा मात्र कांहीं विशिष्ट अटींची पूर्तता झालेली दिसल्याशिवाय कोणत्याहि व्यक्तीस किंवा विशिष्ट भागास देण्यांत येऊं नये, अशा तऱ्हेचा निर्बंध प्रांतिक कॉंग्रेस कमिटीवर घालण्यांत आलेला आहे. सर्वव्यापी सत्याग्रहांत समाविष्ट होणाऱ्या व्यक्तीची व एखाद्या भागाची तयारी म्हणजे आपणांवर इंग्रजी राज्य नाहीं असें समजून स्वतःच त्या भागांतील व्यवस्था सुरळीतपणें चालविण्याची आणि हा प्रयत्न हाणून पाडण्याकरितां अधिकारी वर्गाकडून होणाऱ्या सर्व तऱ्हेच्या उपद्रवास न जुमानतां येणाऱ्या हाल अपेष्टांचें आनंदानें स्वागत करण्याची तयारी होय. सर्वव्यापी सत्याग्रह हें त्या भागापुरतें इंग्रजी सत्तेविरुद्ध केवळ स्वातंत्र्यप्राप्तीस सत्ताधिकाऱ्यांना अनुकूल करून घेण्याकरितां निःशस्त्र व शांतातप्रधान बंड आहे, ही गोष्ट आपण नीट ध्यानांत ठेवा. भरतखंडांतच नव्हे तर, जगताच्या ज्ञात इतिहासांत स्वातंत्र्यप्राप्तीकरितां झालेल्या क्रांतीच्या इतिहासांत महात्मा गांधींच्या प्रयत्नासारखा प्रयत्न केल्याचा दाखला मिळावयाचा नाहीं. असा एक अपूर्व प्रयोग ते करून दाखविणार आहेत, हा विचार तुमच्या मनांत नीट ठसला आणि देशाच्या स्वातंत्र्याचा दुसरा कोणत्याहि तऱ्हेचा निर्वाणीचा प्रयत्न करण्याची आशा तूर्त जरी तुम्हांस दिसत नसली, तरी हा महात्मा गांधींचा स्वातंत्र्यप्राप्तीचा दिव्य प्रयत्न गुजराथेंत सुरू असतांना आपली वृत्ति कशी असावी याचा विचार कोणत्याहि पक्षभेदाच्या दृष्टीनें करणें, हें महत्पाप आहे असा विचार आपल्या मनांत उद्भूत झाल्याशिवाय राहणार नाहीं. आपापल्या जागीं तयारीनें उभे राहा व प्रांतिक कॉंग्रेस कमिटी किंवा वर्किंग कमिटीचा इषारा मिळाल्याशिवाय पुढें चालू करूं नका. फक्त अटींच्या निमित्तानें घालून दिलेलें काम इमानें इतबारें

आपापल्या मर्यादेंत यशस्वी करण्यांत मग्न असा. तेथपर्यंत मी एकटा आपल्या निवडक सांथीदारांच्या जोरावर इंग्रजी सत्तेचा गुजराथेंतील एका विशिष्ट भागांत असलेला बुरूज जमीनदोस्त करण्याची पराकाष्ठा करतों. त्यांतील डांवपेंच नीट न्याहाळून पाहा, अशी या राष्ट्रीय सेनापतीची, स्वातंत्र्यैकनिष्ठ भीष्मपितामहाची सर्व राष्ट्रभक्तांस व त्यांच्या अनुयायीवर्गास आज्ञा आहे. या आज्ञेचें परिपालन करण्याची जबाबदारी जाणून, आपल्या जिल्ह्यांतील अंतर्गत कारभाराच्या व अडचणींच्या प्रश्नाचा विचार करावा, एवढीच कळकळीची विनंति करून मी हें माझें प्रास्तविक भाषण संपवितों; व तत्पूर्वी जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनीं गतवर्षी घालून दिलेल्या धोरणामुळें आपणांला अनेक ठिकाणीं टीका, उपहास किंवा उपमर्द सहन करावे लागले असतांदेखील तपस्वी बाबासाहेबांसारख्या पुढाऱ्यांचें अनुयायित्व कायम राखून या जिल्ह्यांतील पुढाऱ्यांची सर्वतोपरी अब्रू वचाविली व विपरीत परिस्थितींतदेखील अभिमानानें सांगतां येण्यासारख्या कामगिरीचा मार्ग आपण आम्हांस सुकर करून दिला, या आपल्या उपकाराच्या ऋणांनीं बांधल्या गेलेल्या सर्व पुढाऱ्यांतर्फे मी या जिल्ह्यांतील सर्वांचे, सहकारी, असहकारी किंवा अंशतः सहकारी प्रतिनिधींचे व प्रेक्षकांचे, स्त्रीपुरुषांचे, आबालवृद्धांचे मनःपूर्वक आभार मानून सर्व कार्यकर्त्या मंडळींतर्फे असें जाहीर आश्वासन देऊन ठेवतों कीं, आपली सर्व देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीकरितां, आपल्या वऱ्हाड प्रांताच्या स्थितीचा निकाल आपल्या मतानुकूल करून घेण्याकरितां, आणि स्थानिक दुःखाचें निराकरण करण्याकरितां म्हणून जेवढें पुढें जाण्याची इच्छा या सभेंतील ठरावाच्या रूपानें प्रकट होईल, त्याच्या पुढें दोन हात जाण्यास, कोणतीहि फिकीर न करतां, आम्ही मागें घेणार नाहीं.

परमेश्वर या आणीबाणीच्या वेळेस क्षुल्लक विचारांच्या अंधकारास आपल्या अंतःकरणांतून काढून टाकून उदात्त विचारांच्या व आचारांच्या प्रकाशकिरणांनीं तीं उज्वलित करो, एवढीच त्या जगन्नियंत्याची अनन्य भावानें प्रार्थना करून मी हें लांबलेलें भाषण संपवितों व आपली रजा घेतों.

# अकोल्याची महाराष्ट्र परिषद्*

[ ता. १ व २ डिसेंबर रोजीं अकोला येथें अखिल महाराष्ट्र परिषद श्री. नरसिंह चिंतामण केळकर, संपादक केसरी यांच्या अध्यक्षतेखालीं यशस्वितेनें पार पडली. तींत पास झालेल्या ठरावास परिषदेबाहेरील लोकमताची अनुकूलता नाहीं असें दर्शविण्याकरितां कांहीं 'असहकार्यांनीं' "हे आमचे प्रतिनिधीच नव्हत" असें म्हणावयास सुरुवात केली. या आक्षेपकांना उत्तर देण्याकरितां यवतमाळ येथें १८ डिसेंबर १९२१ रोजीं संध्याकाळीं टौनहॉलच्या मागील पटांगणांत श्री. गंगाधर नागोराव हूड यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या जाहीर सभेंत द. भ. बापूजी अणे यांनीं पुढील स्फूर्तिदायक भाषण केलें.]

## मतभेद मोजण्याकरितांच ही परिषद्

आतां लौकरच तुमचे प्रतिनिधी अहमदाबादच्या कांग्रेसला जावयास निघणार आहेत. ते ज्यांच्या वतीनें म्हणून जाणार त्यांचीं मतें काय आहेत, त्यांची देशप्रेमार्थ कितपत स्वार्थत्याग करण्याची तयारी आहे, वगैरे बाबतींत त्यांना तुमचीं मतें कांग्रेसपुढें मांडावयाचीं आहेत. अकोल्यास जी अखिल महाराष्ट्रीय परिषद् झाली ती मुख्यतः याच कामाकरितां होती! प्रांतिक कां. क. चे सभासद, कांग्रेसकरितां निवडलेले प्रतिनिधी व ऑ. इं.कां. क. चे सभासद एवढ्या लोकप्रतिनिधींस या सभेकरितां पाचारण केलें होतें व त्यांचीं मतें काय आहेत हें अजमावण्याकरितांच ही परिषद् जुळवून आणण्यांत आली होती. आपलीं मतें कोणावर लादावीं, या परिषदेचा ठराव सर्वांवर बंधनकारक आहे असें सांगत सुटावें, किंवा महाराष्ट्रांत मुळीं मतभेदच नाहींत असें म्हणावें हा आमचा केव्हांहि उद्देश नव्हता. ही एक गोष्ट पुरतेपणीं समजावून घ्या, म्हणजे हल्लीं अकोल्याच्या परिषदेसंबंधानें जो एक गैरसमज माजविण्यांत येतो, तो किती निरर्थक व मुद्यास सोडून आहे हें आपल्या लक्षांत येईल. बोलाविलेले सर्वच प्रतिनिधी अकोल्यास जमले नव्हते हें मला मान्य आहे व म्हणूनच जमलेल्या प्रतिनिधींपैकीं इत-

---

* 'लोकमत' यवतमाळ ता. २३-१२-२१

क्यांनीं अशीं मतें दिलीं व इतक्यांनीं अशी मतें दिलीं अशा प्रकारचा निर्णय जाहीर करण्यांत आलेला आहे. असहकारितेच्या तपशीलासंबंधानें प्रथमपासूनच महाराष्ट्रीयांत मतभेद पडला आहे, हें कोणासहि नाकबूल करतां यावयाचें नाहीं व हा मतभेद केवढया प्रमाणावर आहे हें अजमावून पाहण्याचाच आमचा मूळ इरादा होता. पाहिजे तेवढीं माणसें जमवून आपणांस इष्ट असा ठराव पास करून घ्यावा, हा आमचा उद्देश मुळींच नव्हता.

## आमचे प्रतिनिधी नव्हत याचा अर्थ कळतो काय ?

दुसरें, अकोल्यास जमले ते आमचे प्रतिनिधी नव्हते, असें कित्येकजण प्रतिपादन करीत असल्याचें मी आतांशा वाचतों. पण असें म्हणणारांना आपण काय बोलतों याचा अर्थहि कळत नाहीं व त्यांत किती अनर्थ भरला आहे, याची कल्पनाहि नाहीं असें खेदानें म्हणावें लागतें, कारण अकोल्यास जमलेले जर आमचे प्रतिनिधी नव्हत, तर अहमदाबादेला जमणारे सुद्धां त्याच अर्थानें व त्याच न्यायानें आमचे प्रतिनिधी नव्हत असें म्हणण्याचा प्रसंग येणार ! ही अनवस्था आपणांस इष्ट आहे काय ? काँग्रेसच्या अनहितावर टपलेले आपले हितशत्रु आहेत, ते तुमचेच शब्द उचलतील व म्हणतील कीं काँग्रेस ही कांहीं प्रातिनिधिक संस्था नव्हे, अर्थात् तेथें जमलेल्या लोकांचे विचार, ठराव, भावना व आकांक्षा ह्या सर्व सामान्य जनतेच्या नव्हत ! असें जर आपले हितशत्रु म्हणतील तर तें आपणांस रुचेल काय ? म्हणून असला आक्षेप घेणारांस माझें सांगणें आहे कीं " हे आमचे प्रतिनिधीच नव्हत" ही अदूरदर्शीपणाची, गैर मुत्सद्दीपणाची, असमंजसपणाची व अनर्थावह ओरड करण्याची पद्धत सोडून द्यावयास आपणांस शिकलें पाहिजे. अमुक एकच मत आमच्या वतीनें मांडा एवढें सांगण्याचा तुम्हांला पूर्ण हक्क आहे. पण हें सांगून आपला प्रतिनिधि निवडला पाहिजे, म्हणजे 'फलाणे आमचे प्रतिनिधीच नव्हत' अशी ओरड करण्यांत कांहीं अर्थ उरत नाहीं. अकोल्यास बहुमत मिळालेला ठराव हाणून पाडण्याकरितां तुम्ही जर हा युक्तिवाद पुढें कराल, तर हाच युक्तिवाद हातांशीं घेऊन तुमचे हितशत्रु तुमच्या

सर्व जनतेच्या संस्थावर "मूले कुठार" आणितील ! अकोल्याच्या परिषदेंतील ठराव ज्यांस मंजूर नाहीं, त्यांनीं हे आमचे प्रतिनिधी नव्हत, त्यांचा ठराव आम्हांस कबूल नाहीं असें अव्यवस्थितपणाचें बोलणें न बोलतां 'अकोल्यास सगळेच प्रतिनिधी जमले नव्हते, व जे जमले होते त्यांपैकीं फक्त इतक्या जणांचें तें मत आहे, पण जवळपास तितकेच त्या मताच्या विरुद्ध होते ' असें फार तर म्हणावें असें माझें या अक्षेपकांस सांगणं आहे. आपला मतभेद तीव्र शब्दांनीं कठोर भाषेंत मांडण्यास प्रत्येकास अधिकार आहे, पण आपल्या बोलण्याचा अर्थ न कळतां भलतेंचे बोलण्यानें, भाषेंत सावधगिरी न ठेविल्यानें व कांहीं एक विशिष्ट हेतु साधण्याकरितां भलताच म्हणजे सदोष युक्तिवाद हाताशीं धरल्यानें प्रातिनिधिक संस्था चालविण्याची आपली पात्रता सिद्ध करण्याचा हेतु सफल न होतां, त्याऐवजीं आपलें कार्य मात्र अवघड होणार आहे, हें या आक्षेपकांस माझें निःपक्षपात बुद्धीनें व मित्रत्वाचें सांगणें आहे व एवढ्याचकरितां मला आज अकोल्याच्या परिषदेचा उल्लेख मुद्दाम करावा लागला आहे.

## सद्यःस्थिति

आतां सद्यःस्थितीचें एका वाक्यांत वर्णन करावयाचें तर अशी आणीबाणीची व परीक्षेची वेळ, कांग्रेसच्या आयुष्यांत, नव्हे गेल्या ५०।६० वर्षांत कधीं आली नव्हती, असें म्हटल्यानें होणार आहे. आजवरचा असहकारितेचा कार्यक्रम म्हणजे सत्याग्रहाची पूर्वतयारी म्हणून होता. कायदेभंगास सर्व ठिकाणची जनता अनुकूल होत असल्यामुळें किती वकीलांनीं वकिल्या सोडिल्या, किती विद्यार्थ्यांनीं शाळा ओस पाडिल्या, वगैरे बाबतींत कोष्टकें मांडून शाब्दपांडित्य करण्याचें कांहींएक प्रयोजन उरलें नाहीं. म्हणून कायदेभंग कसा यशस्वी करितां येईल, या एकाच गोष्टीवर सर्वांनीं आपले मतभेद बाजूस सारून आपलें लक्ष एकवटलें पाहिजे. दिल्लीच्या चार अटी सर्वांनींच पुऱ्या केल्या नसतील हें कबूल, पण कायदेभंग करण्यास जनता अत्यंत उत्कंठित झालेली आहे व तिचा उत्कंठा पुरी करण्याकरितांच परमेश्वरानें आजची परिस्थिति निर्माण केली आहे, असें म्हणावें लागतें. गंजलेले कायदे

उपयोगांत आणून लोकांची कायदेभंगाची इच्छा पुरी करण्याची नोकरशाहीस बुद्धि झालेली आहे. यांत आपल्या कल्याणाचाच कांहीं तरी परमेश्वरी संकल्प खास असला पाहिजे. असें नसतें तर कायदेभंगाची तात्त्विक मीमांसा व शाब्दिक काथ्याकूट अहमदाबादच्या कांग्रेसमध्यें करावा लागला असता ? कालपर्यंत लॉर्ड रीडिंग यांच्या ठिकाणीं मुत्सद्देगिरी असावी अशी माझी कल्पना होती, पण बंगाल्यांतील पकडापकडीचे प्रकार पाहून, माझी ती कल्पना पार मावळली आहे. प्रजावात्सल्याचें या नोकरशाहीच ढोंग परमेश्वरानें आतां फोडलें आहे. ढोंगालासुद्धां कांहीं मर्यादा असते. या मर्यादेपुढें परमेश्वर प्रत्यक्ष विष्णूशंकरांनासुद्धां ढोंग करूं देत नाहीं व नोकरशाहीचें हें ढोंग परमेश्वरानें प्रत्यक्ष युवराजाच्या समक्ष उघडे केलें आहे.

**आतां हा सहानुभूतीचा पडदा पुरा फाटला**

असून लॉर्ड रीडिंग यानीं त्याला टांचे मारण्याचे कितीहि प्रयत्न केले, तरी ते टांचे भरून सुई पुढें जातांच मागचे टांचे उखडल्याशिवाय राहत नाहींत. स्वराज्य मिळविण्याची एक संधि आपण नुकतीच गमाविली. आज परमेश्वरानें दुसरी संधि आणून दिली आहे, तिचा तरी आतां पुरतेपणीं उपयोग केला पाहिजे. नोकरशाहीची सत्ता नेस्तनाबूद करावी, हा नागपूर कांग्रेसच्या ठरावाचा मुख्य उद्देश होता, तो या देशांत युवराज असेपर्यंतच सिद्धीस नेण्याचा निकराचा प्रयत्न केला पाहिजे. युवराज निघून गेल्यावर नुसता वावदूकपणा करीत बसावें लागणार म्हणून हें सोन्याचें ताट वाढून आलें आहे, त्याचा योग्य तो उपयोग केला पाहिजे. आजची नोकरशाहीची सत्ता मुख्यतः कायद्याच्या भयावर बद्धमूल झालेली आहे. लष्करचें भय हें सुद्धां त्यापुढें गौण आहे. कायद्याची भीति आतां नष्ट होत चालली आहे. तुरुंगांत जाणें यांत कोणी आतां अप्रतिष्ठा मानीत नाहीं. तुरुंगांत आनंदानें जाण्यास सिद्ध असलेले देशभक्त आतां गांवोगांव निर्माण होत आहेत. " लोकांनीं असा वेडेपणा कां करावा याचा अर्थच मला कळत नाहीं " असें लॉर्ड रीडिंग म्हणतात. पण आपण सहस्रावधींनीं तुरुंग भरून काढून प्रत्यक्ष युवराजास साक्ष ठेवून लॉर्ड रीडिंग यास त्यांच्या शंकेचा अर्थ समजावून दिला पाहिजे ( टाळ्यांचा कडकडाट ).

## हातांत बिड्या घालून घेऊन उपदेश करा !

आपलें राज्य लष्कराच्या बळावर चाललें आहे, ही कल्पना लॉर्ड रीडिंग यानीं मनांत घट्ट धरली असल्यामुळें, देशबंधु दास यांच्यासारख्यांच्या तुरुंगवासाचा अर्थ त्यांना कळत नसेल. पण लजपतराय, नेहरू, दास यांनीं स्वतः बंदिवासांत जाऊन तो अर्थ लॉर्ड रीडिंग यांस समजावून देण्याची जबाबदारी आपणांवर टाकिली आहे व म्हणून दारूवरील बहिष्कार, परदेशी कापडावरील बहिष्कार इत्यादि लोकहिताच्या गोष्टी सुसंघटित रीतीनें यशस्वी करण्याकरितां आपण गांवोगांव स्वयंसेवक पथकें स्थापिलीं पाहिजेत. 'वसुल्याचा भूर्दंड केवळ अन्यायाचा व जुलूमाचा आहे, सबब तुला मी जप्ती करूं देणार नाहीं' असें शेतकऱ्यानें अधिकाऱ्यास बेधडक सांगावें, पण आमच्या स्वयंसेवकांनीं प्रथम आपल्या हातांत बिड्या घालून घ्याव्या व तुरुंगांत जातांना त्यांनीं शेतकऱ्यास हा उपदेश करावा ( टाळ्या ). सारांश आजवरच्या असहकारितेच्या तपशिलासंबंधानें असलेल्या मतभेदास स्थान न देतां व त्या वादावरील सर्व लक्ष काढून प्रत्यक्ष कार्य करून दाखविण्यांत आपलें तन, मन, धन, खर्च करा असें माझें आपणांस कळकळीचें सांगणें आहे.

---

# निःशस्त्र प्रतिकार*

यवतमाळ येथील राष्ट्रीय सप्ताहांत ता. १३ एप्रिल १९२२ रोजीं रात्रीं ९ वाजतां टौनहॉलच्या मागील फरशीवर श्री. माधवराव अणे यांचें श्री. भीमराव हणमंत जतकर यांच्या अध्यक्षतेखालीं व्याख्यान झालें. ते येणेंप्रमाणें:—

## सत्याग्रह व निःशस्त्र प्रतिकार यांतील भेद

सत्याग्रह व निशःस्त्र प्रतिकार हीं एक नसून, दोन्ही परस्परांपासून तत्त्वतःच भिन्न आहेत. सत्याग्रहाच्या मुळाशीं कल्पना असते ती ही कीं, मी केवळ सत्याचा आश्रय करून आपला इष्ट हेतु सिद्धीस नेईन व तो सिद्धीस नेतांना मी कशाला म्हणून भिणार नाहीं. मातीचें कठीण ढेंकूळ ज्याप्रमाणें पाण्यांत टाकलें कीं आपोआप विरघळत जातें, त्याकरितां बोट लावण्याची किंवा दुसऱ्या कोणत्याहि प्रयत्नाची आवश्यकता नसते, तद्वत् मी आपले सद्गुण वाढविले कीं जुलमी सत्ता आपोआप नाहींशी होईल, अशी सत्याग्रही माणसाची भावना असते ! याच्या उलट निःशस्त्र प्रतिकार करणारा असें समजत असतो कीं, जुलमी सत्ता जेथें जेथें अन्याय करिते, तेथें तेथें तिला विरोध करूनच ती ताब्यांत आणितां येते. एरव्हीं तिला विरोध न केला तर प्रजेची चळवळ ती केव्हांच दाबून टाकिते व असे आघात वारंवार होऊं लागले म्हणजे प्रजेला वर डोकें काढावयाला जागा मिळत नाहीं आणि जुलमी सत्ताच बळावत जाते.सद्गुणांमध्यें, शुद्ध नीतिमत्तेमध्यें मी कोणालाहि हार जाणार नाहीं, या बाबतींत मी जगांतील कोणत्याहि मनुष्यापेक्षां कमी दर्जाचा ठरणार नाहीं, ही सत्याग्रहाचा अवलंब करणाराची मुख्य कल्पना असते व म्हणून त्याचा भर स्वतःचे सद्गुण वाढविण्याकडे असतो. अर्थात् समाजाकडून जर सत्याग्रह करून घ्यावयाचा असेल, तर समाजहि सद्गुणवान् करणें व त्याची नीतिमत्ता सुधारणें आवश्यक असतें. दुसरा मनुष्य माझ्याप्रमाणें वर्तन करील कीं नाहीं याची पर्वा सत्याग्रही मनुष्य कधीं करीत नसतो. निःशस्त्र प्रतिकारास मात्र अशा प्रकारें सद्गुणसंवर्धनाची जरूरी नसते. सद्गुणसंवर्धन ही कांहीं निःशस्त्र प्रतिकाराची आव-

* 'लोकमत' यवतमाळ ता. १४–४–२२

श्यक अट नसते. कमी नीतिमान् मनुष्याचा अगर मनुष्य समुदायाचा निःशस्त्र प्रतिकाराच्या वेळीं उपयोग होऊं शकतो, पण असला हिणकस मनुष्य सत्याग्रहाच्या कामीं अगदीं नालायक असतो. सद्‌गुणांचा विकास हें सत्याग्रहाचें बीज होय ! पण निःशस्त्र प्रतिकारास त्याची अत्यंत आवश्यकता नसते, असा या दोहोंत फरक आहे.

### निःशस्त्र प्रतिकाराचा उगम

निःशस्त्र प्रतिकार म्हटला कीं, तेथें एका पक्षास राजा किंवा सरकार व दुसऱ्या पक्षास रयत असा बोध होतो. दोन व्यक्तींमधील कलहाच्या बाबतींत निःशस्त्र प्रतिकार हा शब्द फारसा लावीत नाहींत, तेथें सत्याग्रह हा शब्द योजिला जातो. असो. निःशस्त्र प्रतिकार हा शब्द व ही कल्पना फार प्राचीन काळची नाहीं, ती गेल्या एक दीड शतकांतली आहे. आधुनिक राष्ट्रांतील प्रजांनीं सरकारपासून आपले हक्क घेण्याकरितां या शस्त्राचा उपयोग केला आहे. इंग्लंडांत हॅम्डन् आणि पिम् यांनीं याचा प्रथम उपयोग केला. मात्र आश्चर्याची गोष्ट ही कीं, जो देश प्रजासत्ताक राज्यपद्धतीची जननी म्हणून समजला जातो, त्या फ्रान्सनें १८६० सालीं याचा अवलंब केला नाहीं. प्राचीन काळीं देशावर स्वामित्व राजाचें—राजा ह्या एका व्यक्तीचें असे व प्रजाजन त्याच्या अंकित असत. त्या कालीं आपले हक्क कोणापासून घेण्याची गोष्ट निघाली कीं, स्वभावतःच तलवारीस हात जात असे. तेव्हां निःशस्त्र प्रतिकाराची कल्पनादेखील येईना ! पण, आतां सरकार या शब्दाचा अर्थ बदलत बदलत असा झाला आहे कीं, देशांतील लोकांची सामुदायिक इच्छा प्रकट करणारी शक्ति तिचें नांव सरकार. अर्थात् ज्या लोकांची इच्छा प्रकट व्हावयाची ते लोक आणि ती इच्छा कायद्याच्या रूपानें प्रकट करणाऱ्या संस्थेचे चालक या दोहोंमध्यें एकात्मता आहे ही गोष्ट आजच्या 'सरकार' या शब्दांत गृहीत धरलेली आहे. प्रजा आणि त्यांच्या इच्छा प्रकट करून त्या अमलांत आणणाऱ्या संस्थेचे चालक या दोहोंमध्यें अशा प्रकारें एकरूपता आणली असल्यामुळें ज्या प्रजेला सरकारपासून हक्क घ्यावयाचे असतात, त्या प्रजेला सरकारवर शस्त्र उगारणें हितावह नसतें. कारण सरकारवर वार म्हणजे स्वतःच्या अंगावर घाव अशी स्थिति असते. पण पूर्वीच्या काळीं

अमुक एका वंशांत किंवा अमक्या आईबापांच्या पोटीं जन्म झाला म्हणजे तो मनुष्य राजा या संज्ञेस पात्र होईल व बाकीचे मनुष्य प्राणी त्याच्या इच्छेनें वागणारी प्रजा समजली जात असे व या दोहोंतहि भिन्नता होती, म्हणून शस्त्रास्त्रांची गरज उत्पन्न होई. पण आतां सरकार या कल्पनेंत तो भेदभावाचा संबंध नष्ट झालेला आहे व तें एकच असल्यामुळें शस्त्राचें काम उरलेलें नाहीं.

### 'परकाय' सरकार व प्रजा

आपल्या डाव्या हातास खाज सुटली म्हणजे आपण हळूंच उजव्या हातानें खाजवून कंड शमवितों, पण दुसऱ्यास खाजवावयास सांगितलें तर तो रक्त काढीपर्यंत नखांचा उपयोग करतो, कारण त्याची व आपली एकात्मता नसते. हाच प्रकार परकीय सरकार व प्रजा यांच्यामधील लढ्याच्या साधनांत असतो. प्रजेला सरकारपासून हक्क ध्यावयाचे झाले तर त्यांना आतां निःशस्त्र प्रतिकाराचा अवलंब करावा लागतो. प्रजासत्ताक राज्यपद्धतीची कल्पना निघाल्यापासून सशस्त्र प्रतिकाराची जागा निःशस्त्र प्रतिकारानें भरून काढिली आहे. रशियांत लेनिन् यानें जें राज्य स्थापन केलें आहे, तें निःशस्त्र प्रतिकाराचें उदाहरण होय. आतां प्रश्न हा येतो कीं, निःशस्त्र प्रतिकाराची आवश्यकता केव्हां उत्पन्न होते ? सरकार ही संस्था व प्रजा यांमध्य तत्त्वतः भेदभाव नाहींच, तर मग निःशस्त्र प्रतिकार करण्याचें प्रयोजन तरी कोणतें? याचें उत्तर हें कीं, लोकांच्या इच्छा कायदारूपानें प्रकट करणारी संस्था ( म्हणजे सरकार ) हें जर आपलें काम बरोबर रीतीनें करणार नाहीं, तर ही गोष्ट प्रजेच्या मनांत शल्यासारखी बोचत राहते व ती असह्नीय होऊं लागली म्हणजे निःशस्त्र प्रतिकाराच्या रूपानें दृश्यमान होते. अर्थात् निःशस्त्र प्रतिकाराचा अवलंब करण्यापूर्वी सरकारच्या अन्यायांची व दुष्कृत्यांची जाणीव लोकांस पूर्णपणें असली पाहिजे व ती नसेल तर निःशस्त्र प्रतिकार पुकारणेंहि असमर्थनीय होतें.

### निःशस्त्र प्रतिकाराची पहिली अट

आजचें सरकार ( अर्थात् लोकांच्या इच्छा कायद्याच्या रूपानें प्रकट करणारी सत्ता ) आणि प्रजाजन यांच्यामध्यें एकरूपता नाहीं व सरकारच्या

संबंधानें लोकांच्या मनांत असंतोष वसत आहे हें खरें.पण त्या असंतोषाची तीव्रता वाढल्याशिवाय, तो निःशस्त्र प्रतिकारामध्यें परिणत होऊं शकणार नाहीं. अत्यंत तीव्र असंतोष, सरकारच्या राज्यपद्धतीविषयीं तिटकारा व त्या पद्धतीस प्रजाजनांची असमति असणें एवढी निःशस्त्र प्रतिकाराची पहिली आवश्यक अट आहे. म्हणून निःशस्त्र प्रतिकाराचा अवलंब करावयाचा असेल, तर आजचा असंतोष पुष्कळ पटींनीं वाढलेला असला पाहिजे हे स्पष्ट आहे. आज जर लोकांच्या मतावर कोणत्याहि प्रकारचें कृत्रिम दडपण न टाकितां त्यांस असा सवाल केला कीं, तुम्हांला आजची राज्यपद्धति हवी काय, ती तुम्हांला पसंत आहे काय? तर "नको बुवा, ही दीडशें वर्षांची ब्याद"! असेंच उत्तर त्यांच्याकडून आल्याशिवाय राहावयाचें नाहीं. यासंबंधांत जर रेफरेंडम् (प्रत्येक मनुष्याचें मत) घेतला तर तो आजच्या सरकारच्या खात्रीनें विरुद्ध पडेल. "नको हें राज्य" असेंच बहुमत होईल. पण असला 'रेफरेंडम्' घेण्याची सरकारची छाती होत नाहीं. "सामान्य जनता आम्हांलाच अनुकूल आहे" एवढें मोघमपणानें विधान करून ते आपला कार्यभाग उरकून घेतात, ती गोष्ट रेफरेंडम् घेऊन प्रत्यक्षपणें शाबित करण्याच्या भानगडींत ते पडत नाहींत. ही गोष्ट गृहीत धरणेंच त्यांना ज़ास्त सोयीस्कर आहे व म्हणूनच या बाबतींत ते लोकपक्षास असें आव्हान देत नाहींत. पण जर सामान्य जनता आजच्या सरकारला खरोखरीच कंटाळली असेल व ती आपणांस अनुकूल झाली असेल, तर आपण ती गोष्ट प्रत्यक्ष पुराव्यानें सिद्ध करून द्यावयास पाहिजे. ही सिद्धता गेल्या कायदे कौन्सिलच्या निवणुकीच्या वेळीं आपणांस सहज करतां आली असती, पण राष्ट्रानें आपल्या विचारसरणीचें धोरण बदललें असल्यामुळें आपणांस त्या संधीचा फायदा घेतां आला नाहीं. अमके लोक निःशस्त्र प्रतिकारास तयार आहेत, असें नुसतें तोंडानें बोलल्यानें तो सिद्धीस जात नाहीं, तर ज्यांना तो करावयाचा असतो त्या लोकांच्या इच्छा कोणत्या तरी एखाद्या प्रश्नावर सरकारच्या विरुद्ध निःसंशयपणें प्रकट व्हावयास पाहिजेत, पण अशा रीतीनें त्या प्रकट झाल्या नाहींत तर निःशस्त्र प्रतिकार पुकारणें असमर्थनीय होतें !

### सरकार व प्रजा यांची भिन्नता कशी ओळखावी?

सरकार व प्रजा यांच्यामध्यें एकात्मता आहे कीं भिन्नता आहे, हें ओळखण्याचीं दोन स्थानें आहेत. कायदा म्हणजे वस्तुतः लोकांच्या इच्छांच्या प्रकटीकरणाचें दृश्य रूप होय. सरकारनें कायदा केल्यावर तो जर लोकांना मनःपूर्वक व विचारपूर्वक पसंत पडला, तर सरकार व प्रजा हीं एकरूप आहेत असें समजावयास हरकत नाहीं; पण कायदा जर लोकांच्या इच्छा प्रकट करणारा नसेल, तर सरकार व जनता हीं भिन्नभिन्न आहेत असें समजावें. ही एकात्मता अगर भिन्नरूपता ओळखण्याचा दुसरा प्रकार म्हणजे कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधाचा होय! सरकारनें केलेला कायदा लोक सुखानें, स्वसंतोषानें अमलांत आणितात अशी स्थिति असते, तेव्हां सरकार व प्रजा एकरूप आहेत असें म्हणतां येतें. पण ती अमलबजावणी जेव्हां प्रजेस जाचक वाटूं लागते, तेव्हां सरकार व प्रजा हीं एकरूप नाहींत, असें निःसंशय समजावें! लोकांना कायदे पसंत नसूनहि ते त्यांना पसंत आहेत असा भास जर सरकार करीत असेल, किंवा कायद्याची अमलबजावणी त्यांना अनर्थावह वाटत असूनहि लोक त्याची अंमलबजावणी खुषीनें करतात असा बाहणा जर सरकार करीत असेल, तर या दोहोंमधील ही एकरूपता खरी नसून कृत्रिम आहे असें समजलें पाहिजे. या कृत्रिम एकरूपतेवर खरेंपणाचें मोहपटल जोंपर्यंत सरकारास टाकितां येतें, तोंपर्यंत लोकांस निःशस्त्र प्रतिकाराचा पुकारा करतां येत नाहीं. तो करावयाचा असेल तर सरकार व प्रजा यांमधील भिन्नता प्रत्यक्ष प्रमाणांनींच वरचेवर सिद्ध करून दाखवावयास पाहिजे. सरकारविषयीं असंतोष आहे, असें मोघम म्हटल्यानें निःशस्त्र प्रतिकाराची युक्तता सिद्ध होत नाहीं. तो असंतोष एखाद्या निमित्तानें सिद्धच करून दाखविला पाहिजे. कौन्सिलनिवडणुकीच्या प्रसंगीं साधारण जनसमूह सरकारच्या विरुद्ध आहे ही गोष्ट आंकड्यांनिशीं सिद्ध करतां आली असती व तसें झालें असतें तर "प्रजा आम्हांला अनुकूल आहे" असें म्हणण्यास सरकारला तोंड राहिलें नसतें. पण ही गोष्ट सिद्ध करण्याची संधि आपण दवडिली व म्हणून हें सिद्ध करून दाखविण्यापूर्वी निःशस्त्र-प्रतिकाराचा पुकारा करणेंहि अनाठायींच होणारें आहे.

## दुसरी अट म्हणजे स्वार्थत्यागाची तयारी

निःशस्त्र प्रतिकार पुकारला म्हणजे सरकार प्रजेला आपले शत्रु लेखतें व शत्रूस द्यावयाचा तो हरतऱ्हेचा त्रास प्रजेस देतें. अर्थात् तो सहन करण्याची पात्रता लोकांनीं आपल्या अंगीं आणिली पाहिजे. हा त्रास सहन करणें, पडेल तो स्वार्थत्याग आनंदानें करणें इत्यादि गुण निःशस्त्र प्रतिकाराचा पुकारा करण्यापूर्वी लोकांच्या अंगीं बाणले असले पाहिजेत व ते गुण लोकांच्या अंगीं संचारले आहेत कीं नाहीं, हें पाहणें पुढाऱ्यांचें कर्तव्य असतें. ही अट पुरी केल्याशिवाय निःशस्त्र प्रतिकाराचा पुकाराच करतां येत नाहीं. प्रजेच्या अंगीं प्रथम हें सामर्थ्य बाणलें असलें पाहिजे, तेव्हांच निःशस्त्र प्रतिकाराचा पुकारा करतां येतो. रशियामध्यें जी क्रांति घडून आली ती निःशस्त्र प्रतिकाराच्या जोरावर. तिच्यापूर्वी पुढाऱ्यांनीं लोकांची सहनशीलता, स्वार्थत्याग इत्यादि बाबतींत तयारी केली होती, एवढेंच नव्हे तर सरकार व प्रजाजन यांमध्यें एकरूपता नाहीं हें सिद्ध करून लोकांचें राज्य स्थापन करण्याकरितां त्यांनीं होत्या नव्हत्या त्या सर्व सार्वजनिक सरकारी व निमसरकारी संस्था आपल्या मताच्या लोकांनीं भरून टाकिल्या. त्यांनीं आपले पोलीस तयार केले, सर्व देशभर आपल्या सुसंघटित संस्थांचें जाळें पसरून टाकिलें. अशा रीतीनें आपली शक्ति सर्वत्र फैलावली आहे याची खात्री करून घेतल्यावर व झारचें सैन्य जर्मनीशीं लढत आहे, या संधीचा फायदा घेऊन लोकपक्षाचा पुढारी लेनिन् यानें एके दिवशीं असें जाहीर केलें कीं, झार हा कांहीं रशियाचा राजा नव्हे. त्यासरशीं एवढा बलाढ्य मी मी म्हणणारा झार, पण तोहि एका क्षणांत पदच्युत झाला ! सर्व संस्था लेनिननें हस्तगत केल्याच होत्या. त्या संस्थांतून काम करणाऱ्या माणसांस राज्यशकट चालविण्याचा जो प्रत्यक्ष अनुभव आला होता, त्याचा उपयोग प्रजा व सरकार यांमध्यें झगडा चालू झाला त्यावेळीं लोकसत्ता स्थापण्याच्या कामीं त्यानें केला. अर्थात् त्याला लोकांचें राज्य स्थापन करण्यास शस्त्रांचा अवलंब करावा लागला नाहीं. यांतूनच पुढें सोव्हिएट सरकार निर्माण झालें. तो इतिहास सर्वांस विदितच आहे. शस्त्रांच्या सहाय्यावांचून राजास पदच्युत करून लोकांस आपलें राज्य स्थापन

करतां येतें, याचें रशियांतील राज्यक्रांति हें एक मोठें ढळढळीत उदाहरण आहे.

## प्रातिनिधिक संस्था वळकावून बसा !

सरकार ही एक सुसंघटित संस्था आहे व तिला टक्कर द्यावयाची असली तर तें काम एकएकटया व्यक्तीनें भागावयाचें नाहीं. त्याकरितां लोकांच्या सुसंघटित संस्थाच असावयास पाहिजेत. या संस्थांचें जाळें देशभर पसरलें पाहिजे. या दृष्टीनें पाहतां कौन्सिलें, म्युनिसिपालिटया, डिस्ट्रिक्ट बोर्डें असल्याच नव्हत, तर यःकश्चित सॅनिटेशन् पंचायतसारख्या सुद्धां प्रातिनिधिक स्वरूपाच्या संस्था लोकांनीं आपल्या हातांत ठेवावयास पाहिजेत. निःशस्त्र प्रतिकार करावयाचा असेल तर असल्या संस्थांकडे दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं. भस्मासुराचा हात त्याच्याच डोक्यावर ठेविला तेव्हां तो भस्मभूत झाला ! तद्वत्, ज्या सरकारपासून असल्या संस्थांस थोडी कां होईना, पण नियंत्रणाची सत्ता प्राप्त होते, त्या सरकारविरुद्ध या संस्थांचा उपयोग केल्यानेंच लोकपक्षाच्या कार्यास यश येणें संभवनीय आहे. सत्याग्रह यशस्वी होण्यापूर्वीं सर्वच्या सर्व जनता, सद्गुणमयी बनली असली पाहिजे, त्याशिवाय तो सत्याग्रह कार्यकारी होणार नाहीं. निःशस्त्र प्रतिकाराचें शिक्षण प्रातिनिधिक सुसंघटित संस्थांच्या साच्यांतून नेल्यानें प्रजेस देतां येतें. ठराविक परीक्षांतून किंवा कार्यपद्धतींतून गेल्यानें जसा लहान अधिकारी मोठ्या अधिकारावर रूढ होऊं शकतो, तोच प्रकार निःशस्त्र प्रतिकाराच्या शिक्षणाचा आहे. सरकारविरुद्ध पुकारावयाचा निःशस्त्र प्रतिकार, व्यक्तीच्या योगानें सिद्धीस जाणारा नसून, असल्या संस्थांच्या द्वारेंच कार्यकारी होणारा असतो. लोकांच्या ठिकाणीं नुसता उत्साह उत्पन्न झाल्यानें, देशाभिमान जागृत झाल्यानें कार्यभाग होत नाहीं, तर तो कार्यकारी केल्यानेंच इष्टफलसिद्धि होणार आहे. कोठारांत पुष्कळ दारू असल्यानें शत्रूवर जय मिळत नाहीं, ती दारू बंदुकींत घालून तिचा योग्य दिशेनें मारा केला तरच जय मिळेल. तद्वत् लोकांच्या उत्साहाची बारूद संस्थारूपीं उल्हाट यंत्रांत भरून त्याचा मारा सरकारवर केला, तरच त्यांच्या उत्साहाचें व देशाभिमानाचें चीज होणार आहे. या संस्थांचा उपयोग करतां

करतां लोकांच्या अंगीं एक प्रकारची शिस्त उत्पन्न होत असते.संस्थांच्या द्वारें लोकांची जी संघटना होते, तिच्या योगानेंच देशाभिमान कार्यकारी होऊं शकतो, एरव्हीं होत नाहीं. असो.

## सद्गुणसंवर्धन कीं संघटना बलवर्धन

कौन्सिलें, म्युनिसिपालिटया, बोर्डें इत्यादि संस्था लोकपक्षानें आपल्या ताब्यांत घेण्याची आवश्यकता कां आहे, याचें जास्त विवेचन करण्याची जरूरी नाहीं. सत्याग्रह व निःशस्त्र प्रतिकार यांपैकीं कशानें स्वराज्य खात्री-पूर्वक मिळेल असा प्रश्न केल्यास त्याचें उत्तर हेंच कीं, यांपैकीं कोण-त्याहि एका मार्गानें मिळेल. पण दोन्ही ठिकाणीं अट ही कीं, त्यांची अत्यंत जोरानें ( intensively ) अंमलबजावणी केलीच पाहिजे. तथापि हे दोन्ही मार्ग इष्ट स्थलास नेऊन पोंचविणारे असले, तरी जनतेचा संग्रह कोणत्या मार्गानें लवकर करतां येईल, सद्गुणसंवर्धनास लोक आधीं तयार होतील कीं, नीतिमत्ता वाढविण्याच्या भानगडींत पडण्याऐवजीं संघटनाबलावर ते निःशस्त्र प्रतिकार करण्यास आधीं उद्युक्त होतील, इत्यादि प्रश्न फार महत्त्वाचे आहेत व त्यांचा विचार शांतपणानें करावयास पाहिजे. निःशस्त्र प्रतिकारास कौन्सिलें, बोर्डें, म्युनिसिपालिटया इत्यादि प्रातिनिधिक संस्था, लोकपक्षाच्या हातांत असल्यापासून केवढा मोठा फायदा होतो, हें सुरत, अहमदाबाद येथील म्युनिसिपालिटयांनीं जगाच्या निदर्शनास आणि-लेंच आहे. कोणत्याहि व्यक्तीस हा झगडा उग्र स्वरूपांत सरकारशीं करतां आला नसता. पण कौन्सिलसारख्या संस्था लोकपक्षानें आपल्या हाताशीं घेण्याकरितां कांग्रेससारख्या लोकपक्षाच्या मध्यवर्ति संस्थेनें संमति दिली पाहिजे. त्याशिवाय संस्थांच्या द्वारें सरकारशीं झगडणें व त्यांतून निःशस्त्र प्रतिकारापर्यंत मजल नेऊन सरकारवर विजय संपादन करणें अशक्य होणार आहे.

# महात्मा गांधींचें थोरपण !*

ता. २ ऑक्टोबर १९२२ रोजीं संध्याकाळीं यवतमाळच्या टौनहॉल मागील पटांगणांत म. गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त वऱ्हाड प्रां. कॉं. क. चे उत्साही चिटणीस व उमरावतीचे वकील श्री. वामनराव मोहरील यांचे व्याख्यान झाल्यानंतर, अध्यक्ष म्हणून समारोप करतांना दे. भ. बापूजी अणे म्हणाले:—

## " न हि सत्यात्परो धर्मः " हें तत्त्वज्ञान पौरस्त्यच !

जें तत्त्वज्ञान अगर अध्यात्मज्ञान म. गांधी यांच्या तोंडून बाहेर पडलें, तें समजाऊन व पटवून घेणें आपलें कर्तव्य आहे. आतां वामनराव मोहरील यांनीं म. गांधी यांची येशू खिस्ताशीं तुलना करून त्यांस श्रेष्ठ ठरविलें आहे. असलें दृष्टांत देण्यांत कोणाचाहि म. गांधींविषयीं कलुषितपणा असतो, असें नाहीं. पुष्कळ लोकांना त्यांची खिस्त, टॉलस्टॉय, सॉक्रेटीस अशा पाश्चात्य विभूतींशीं तुलना करण्यांत भूषण वाटतें. पण माझी समजूत आहे कीं, खिस्ताच्या वर ज्यांची कल्पना जात नाहीं तेच उपमेय म्हणून त्यांचा उल्लेख करतात. त्यांचें तत्त्वज्ञान त्यांच्या जन्मापूर्वी कैक शतकें या देशांत उत्पन्न झालें आहे व तें पाहण्याकरितां उपनिषदाकडे नजर टाका म्हणजे तें दिसेल. " न हि सत्यात्परो धर्मः " हा उपनिषदांमधील त्रिकालाबाधित सत्य सिद्धांत आहे. त्याकरितां आपणांस येशूकडे किंवा सॉक्रेटिसाकडे पाहण्याची जरूरी नाहीं. सत्य हेंच जगाचें मूल कारण आहे. त्यांतच जगाचा लय होणार. अर्थात जग हें घटमान स्थितींतहि सत्य स्वरूपच असलें पाहिजे. तसें नसेल, त्यांत जर कांहीं आघात,असंतोष,असमाधान,अस्वस्थता उत्पन्न झाली असेल, तर तें मूलस्थानापासून च्युत झालें असलें पाहिजे हें ओघानेंच प्राप्त होतें. पाश्चात्यांचा जडवाद म्हणजे जगास सत्यापासून परावृत्त करणेंच होय ! कारण तो अशांतीवर शांतीचा, दुःखावर सुखाचा, असत्यावर सत्याचा भास उत्पन्न करितो. अर्थात् जी संस्कृति या जडवादाचें पोषण

---

*'लोकमत' यवतमाळ ता. ६–१०–२२

करिते ती संस्कृति त्याज्य ठरवून म. गांधी हे पौरस्त्य संस्कृतीमधील साध्या राहणीचा स्वीकार करण्यावर कां आग्रह धरितात हें यावरून दिसून येईल ! असत्याच्या आधारावर उभारलेली सुधारणा अशांती प्रसवणार नाहीं तर काय करील ?

## जगाला तारणाऱ्या महात्म्यांत गणना !

म. गांधी यांचा दुसरा सिद्धांत आत्मक्लेश सहन करण्याचा आहे. तोहि आमच्या पौरस्त्य संस्कृतीमधीलच होय! "अतप्ततनुर्न तद्धाम आप्नुते" ज्यानें आपली तनु म्हणजे काया तापविली, झिजविली, कष्टविली नाहीं, त्याला तें परम शांतीचें स्थान प्राप्त होणार नाहीं, अशी श्रुति बोलते. मध्वसांप्रदायी आहेत त्यांचा तर हा मुख्य सिद्धान्त आहे. ( मध्वानुयायी रा. अण्णासाहेब जतकर हंसतात त्यांस उद्देशून म्हणतात ) होय, शरीरकष्ट करण्याऐवजीं शरीरावर मुद्रा धारण करण्याचा मध्वांचा सांप्रदाय पडला आहे खरा ! पण त्याचा खरा अर्थ हाच होय कीं, जगताच्या कल्याणाकरितां शरीर तापविलें म्हणजे झिजविलें पाहिजे व म.गांधीहि याच सत्य सिद्धांताचें प्रतिपादन करीत आहेत. जग जडवादांत बुडून स्व-स्वरूपापासून भ्रष्ट होऊं पाहतें, अशा अवनत काळांत सत्य सिद्धांताचें प्रतिपादन व तदनुरूप आचरण करून स्वस्थितीवर नेण्यास जे महात्मे जन्मास येत असतात, त्यांतच म. गांधी यांची गणना होते व असला एक थोर पुरुष जन्मास आला अशा काळांत आपण विद्यमान आहोंत याबद्दल आपणांस पराकाष्ठेचा आनंद वाटला पाहिजे. या त्यांच्या गूढ सिद्धांताचें मनन करणें हाच त्यांच्या गैरहजेरींत त्यांचें स्मरण ठेवण्याचा मार्ग आहे.

---

# ग्रामपंचायती गांवोगांव स्थापन करा*

गुरुवार ता. ५ आक्टोबर १९२२ रोजीं सायंकाळीं टौनहॉलच्या मागील फरशीवर नामदार रा. ब. नारायणराव केळकर दिवाण, यांचें व्याख्यान झालें. त्याचा समारोप करतांना दे. भ. बापूजी अणे आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले:—

## स्वराज्यराजसूयाकरितां हें अग्निहोत्र अवश्यच

मला एका गृहस्थानें एकदां असा प्रश्न केला कीं, कां हो, आतां पूर्वीसारखे राजसूय यज्ञ कां होत नाहींत ? मीं त्याला उत्तर दिलें कीं, आतां पूर्वींच्यासारखे अग्निहोत्री गांवोगांवीं सांपडतात कोठें ? ठिकठिकाणीं अग्निहोत्रें चालतील तरच राजसूयाची सांगता सिद्ध होणारी आहे. हाच न्याय प्रस्तुत व्यवहारांत लागतो. प्रातिनिधिक संस्थांच्या द्वारें स्वराज्यरूपी मोठा अश्वमेध करण्याचा आपला निश्चय असेल, तर आपण गांवोगांव ग्रामपंचायतीचीं अग्निहोत्रें चालू ठेविलीं पाहिजेत. सर्व देश मिळून जें एक स्वराज्य स्थापावयाचें आहे, त्याचें एकेक प्रतीक, एकेक नमुना प्रत्येक खेडयांतून स्थापन केला पाहिजे. खेडयापाडयांत असली एकेक संस्था काढून तिच्या द्वारें आपलीं कामें सुसंघटित रीतीनें करून घेण्याचा प्रयत्न आपण सतत दहापांच वर्षें सुरू ठेविला तर ही खात्री बाळगा कीं, सर्व देशभर स्वराज्यसंपादनाचा जो दांडगा प्रयत्न सुरू आहे, त्याच्या आड कोणतीच शक्ति येऊं शकणार नाहीं ( टाळ्या ). असलीं कामें करतांना तीं डोळ्यांत भरत नाहींत व म्हणूनच त्यांची प्रायशः उपेक्षा होत असते. तसें न करितां गांवोगांव, नॉन्–को–ऑपरेशन्चीं कामें करण्याकरितां, ग्रामपंचायती स्थापन करा. अशी खटपट करा म्हणून सांगणारा एक दिवाण आपल्या प्रांतास लाभला हें आपलें भाग्य समजलें पाहिजे ( टाळ्या ). पुष्कळ वेळ अनेक कारणांच्या योगानें आपले प्रयत्न म्हणजे राष्ट्रीय शाळा स्थापन करणें वगैरे, डबघाईस येऊं पाहतात, पण त्याच गोष्टी आपणांस कौन्सिलच्या आश्रयानें करतां आल्या

* 'लोकमत' यवतमाळ ता. १३–१०–२२.

तर पहाव्या, यांत कांहीं वावगें नाहीं. आपणांला आपलें हित साधावयाचें आहे. मग तें कौन्सिलच्या बाहेर राहून होवो किंवा त्यांत शिरून होवो. कौन्सिलांत राहून कौन्सिलाबाहेर कसे प्रयत्न करावयाचे, या बाबतींत नारायणरावजींनीं आपले विचार मन मोकळे करून आपणांसमोर मांडिले, ते आपण शांत चित्तानें ऐकून घेतले, याबद्दल मी त्यांचे व तुमचे आभार मानितों.

---

# कौन्सिलचे मतदारसंघ

यवतमाळास टिळक–स्वराज्य–संघाची सहावी वार्षिक परिषद ता. १० व ११ डिसेंबर १९२२ रोजीं श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. तींत कौन्सिल मतदारांचे संघ बनविण्यासंबंधाच्या मुख्य ठरावावर दे. भ. बापूजी अणे यांचें महत्त्वाचें असें पुढील भाषण झालें. ते म्हणाले—

## मतदारांचीं मंडळें स्थापा.

ठराव येणेंप्रमाणें आहे—

"प्रचलित सुधारणांच्या कायद्या अन्वयें मिळालेल्या अधिकारांचें यथार्थ स्वरूप मतदार लोकांच्या मनावर बिंबवून, अधिक अधिकार प्राप्त करून घेण्याच्या कामीं त्यांचें सक्रिय सहाय्य मिळविण्याकरितां, चालू सालीं संघानें नवीन कायद्यान्वयें, मतदानाचा अधिकार प्राप्त झालेल्या मतदारांचीं प्रांतानिहाय व जिल्हानिहाय मतदारमंडळें स्थापन करावीं व त्या संबंधांत जरूर तो प्रयत्न करावा."

हा जो महत्त्वाचा ठराव मी आपणांपुढें मांडीत आहें, त्यावर वऱ्हाडांतील दोन अमोलिक हिरे म्हणजे तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे व वीर वामनराव जोशी यांची चकमक पाहावयास मिळणार आहे! पण हा ठराव या दोघांची मान्यता मिळवून बाहेर पडलेला असल्यामुळें त्यावर परिषदेंत मतभेदास जागा मिळेल असें वाटत नाहीं. बाबासाहेब व वामनराव या दोघांनाहि

* 'लोकमत' यवतमाळ ता. १५–१२–२२

पसंत होण्यासारखा ठराव जर कोणा एकास लिहून काढितां येत असेल, तर तो या माधवराव अण्यांनाच ! ( हंशा व टाळ्या ). कारण या दोघांशीं माझा फार वर्षांचा इतका ऋणानुबंध आहे. वस्तुत: या ठरावावर हेच दोन वक्ते बोलणार आहेत. एवढेंच नव्हे–ते न बोलल्यास सबंध हॅम्लेट नाटक होऊन हॅम्लेट हेंच मुख्य पात्र रंगभूमीवर न आल्यासारखें होणार आहे. असो. कौन्सिलप्रवेशासंबंधाचा वाद आतां अगदींच उत्तान झालेला आहे. तथापि या ठरावांत गोंविलेली भाषा दोन्ही पक्षांस पटण्यासारखी असून, त्याची अंमलबजावणी करणें हें दोघांचेंहि सामान्य कर्तव्य होय, असें मला वाटतें. कौन्सिलप्रवेशवादी आणि बहिष्कारवादी या दोघांच्याहि मनांतून मतदारांचें हितच साधावयाचें आहे.

## अज्ञानजन्य प्रमाद हा विजय नव्हे !

गेल्या कौन्सिलनिवडणुकीच्या वेळेस ‘ मतें देऊं नका ’ असा अविरत उपदेश केल्यामुळें मतदार मतें देण्यास गेले नाहींत, असा आपणांस अभिमान वाटतो. पण तीच लोकांची मन:स्थिति कायम टिकत नाहीं. आज मतदारांच्या मतांत एवढा फरक पडलेला स्पष्ट दिसत आहे कीं, ते आपल्या वजनाखालीं नाहींत असें म्हणण्याचा प्रसंग आलेला आहे. एवढेंच नव्हें तर असेंहि म्हणतां येईल कीं, मागील निवडणुकीच्या वेळींदेखील लोक मतें देण्यास गेले नाहींत, याचें कारण त्यांच्या अंगीं असलेलें मताविषयीं गाढ अज्ञान होय; आणि हा पक्ष जर खरा धरून चाललों तर आजहि पुन्हा कौन्सिल-बहिष्कारावर आग्रह धरणें म्हणजे सामान्य जनतेच्या अंगीं आपल्या मत-दानाच्या महत्त्वाविषयीं जें अज्ञान आहे, तें कायम टिकविण्याचा प्रयत्न करण्यासारखेंच होणार आहे. ह्या अज्ञानजन्य प्रमादास विजय ही संज्ञा देऊन राष्ट्राच्या अनहिताचें खापर हातीं बाळगण्यांत काय प्रौढी आहे ? आजचे थोडे लोक बहिष्काराच्या चाळणींतून बाहेर पडून कौन्सिलांत जाऊन बसले आहेत; त्यांना तेथें मुक्तकंठानें सरकारशीं बोलतां येत नाहीं, कारण सरकारशीं धमकीनें बोलण्यापूर्वी लोकमताचें प्रचंड तुफान उठविण्याचें साधन माझ्या हाताशीं आहे, ही जाणीव असावयास पाहिजे ती त्यांना आज नाहीं. म्हणून माझा दोन्ही पक्षांस उघड सवाल आहे कीं, आजचीच

स्थिति पुढें चालूं ठेवणार कीं, मतदार लोकांवर काँग्रेसची छाप बसवून तिच्या हातून राष्ट्रकार्य करवून घेणार ? या देशांत मतदानाचा हक्क मनुष्यमात्रास दिला जात नाहीं, तोंपर्यंत सरकारवर वजन घालण्याकरितां हल्लींच्या मतदारांचाच उपयोग करणें प्राप्त आहे. पण आजच्या मतदारांवर सरकार आपल्या कृपाछत्राखालील बड्या माणसांकडून नानातऱ्हेचे दाब बसवूं शकतें, हें त्यांना पुरें माहीत आहे. म्हणून आपल्या मोठमोठ्या सभांतील ठराव व भाषणं, राज्य उलथून पाडण्याच्या प्रतिज्ञा, यांचा त्यांच्यावर कांहींएक परिणाम होत नाहीं. ही स्थिति इतःपर टिकूं देणें आपणांस खरोखर लज्जास्पद आहे. म्हणुन कौन्सिलांत प्रवेश करावयाचा असला तरी तसें मतदारांना आपल्या तोंडानें म्हणूं द्या अगर त्या बाहेर राहावयाचें तरी तें मतदारांच्याच तोंडून बाहेर पडूं द्या. जे मतदार नाहींत त्यांच्या शब्दाला या बाबतींत किंमत नाहीं.

## एकाचें कर्म व दुसऱ्याच्या हातून संकल्पोदक !

कर्म करावयाचें एकाला, व संकल्प दुसऱ्याच्या हातून, असला प्रकार येथें नको. कौन्सिलप्रमाणें इतर दोन, म्हणजे शाळा व कोर्ट; यांच्यावरील बहिष्कारांतहि हीच स्थिति आहे. ज्यांच्या घरीं पोरें नाहींत, त्यांनीं शाळेच्या बहिष्काराच्या ठरावावर हात वर करावयाचा व ज्याला कोर्टाची पायरी चढावयाची नाहीं, त्यानें कोर्टबहिष्कार प्रतिपादन करावयाचा ! एखाद्या कार्यासंबंधानें एखाद्या विशिष्ट वर्गावर किंवा ज्ञातीवर कांहीं जबाबदारी टाकावयाची झाली, तर त्या वर्गाला स्वतःच्या बाबतींत काय करतां येईल, कोणतें काम त्याना झेंपेल, याचा कयास करावयास हवा. पण, काँग्रेसमधील तिन्ही सुप्रसिद्ध बहिष्कार असल्या लोकांनीं पास केले कीं, ज्यांचा त्या बहिष्काराशीं जातीचा, गोताचा व वंशाचा कोणत्याहि प्रकारें संबंध नाहीं (हंशा). या लोकांनीं हात वर केले, पण माना दुसऱ्यांच्या उडविल्या गेल्या ! (हंशा व टाळ्या). कलकत्त्यास कौन्सिलबहिष्काराचा ठराव पास करते वेळीं, त्यास अनुमति देणारे लोक कौन्सिलचे मतदार आहेत कीं नाहींत, याचीदेखील वास्तपुस्त करण्यांत आली नाहीं. माझें म्हणणें कीं, योग्य प्रकारें

चौकशी न करितां भलत्यावर भलती जबाबदारी कां टाकितां ! आणि ती पुरी न झाल्यावर पश्चात्ताप करण्याचा प्रसंग आपणांवर कां ओढून घेतां !

### हलवायाच्या घरावर तुळशीपत्र

म्हणून माझें म्हणणें असें कीं, आतां विलंब न लावितां, मतदारांचे संघ स्थापन करा व त्यांच्या तोंडून जी भाषा, जी आज्ञा निघेल, त्याबरहुकूम वर्तनक्रम आंखा. एकाच्या होनाहींवर, दुसऱ्यावर जबाबदारी टाकूं नका. असें करणें याचेंच नांव "हलवायाच्या घरावर तुळशीपत्र" ( हंशा ). सरकार राज्यकारभार चालवीत आहे, तो ह्या मतदार वर्गाच्याच नांवावर. आतां, त्यांचे संघ निर्माण करून, असें सिद्ध करून दाखवा कीं, हा मतदारवर्ग सरकारला अनुकूल नसून, काँग्रेसला अनुकूल आहे. असें करतांना आपण मतदार लोकांस त्यांच्या मतांचें, हक्कांचें, जबाबदाऱ्यांचें व अधिकारांचें जें ज्ञान करून देत आहोंत, तें त्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीनें मौल्यवान् आहे. म्हणून हे मतदारांचे संघ निर्माण करा. त्यांच्या तोंडून बहिष्कार निघाला तर तो शब्द त्यांची आज्ञा म्हणून प्रमाण मानूं, कारण त्या बहिष्कारास किंमत आहे. तसें होत नाहीं. मतदार लोकांच्या तोंडून अधिकारयुक्त वाणीनें बहिष्कार जाहीर होत नाहीं, तोंपर्यंत आजच्या बहिष्काराच्या ओरडीस किंमत नाहीं. असो. आपण हा ठराव एकमतानें निर्विवाद पास कराल अशी आशा करितों.

# स्वराज्यपक्षाचीं मूलभूत तत्त्वें*

[ देशबंधु चित्तरंजन दास यानीं पुढाकार घेऊन जो "स्वराज्यपक्ष" काढिला त्याच्या तत्त्वांची समजूत व प्रसार करण्याच्या उद्देशानें दे. भ. बापूजी अणे यांनीं १९२३ च्या फेब्रुवारीमध्यें वऱ्हाडप्रांतांत ठिकठिकाणीं व्याख्यानें देण्याकरितां दौरा काढिला होता. त्यापैकीं यवतमाळ येथें टौन हॉलच्या मागील पटांगणांत ता. ५ फेब्रुवारी १९२३ रोजीं त्यांनीं हें जाहीर व्याख्यान दिलें. ]

## काँग्रेसमध्येंच राहणारा हा पक्ष

दासबाबूंनीं आपल्या ह्या पक्षाची प्राणप्रतिष्ठा करून त्याचीं मूलभूत तत्त्वें व धोरण हीं जाहीर केलींच आहेत व त्यावर अनुकूल व प्रतिकूल टीकाहि होऊं लागल्या आहेत. या पक्षासंबंधानेंच जास्त स्पष्टीकरण आपणांपुढें करण्याचें मीं योजिलें आहे, येथून वऱ्हाडांतील कांहीं प्रमुख शहरीं जाऊन, तेथील जनतेपुढें मी आपले विचार मांडणार आहें. प्रथम लक्षांत ठेवण्याच्या गोष्टी त्या ह्या कीं, ( १ ) असला एक पक्ष असावा हें ठरलें आहे, ( २ ) हा पक्ष एशियाटिक संघ आणि ब्रिटिश मालावरील बहिष्कार यांवर जास्त जोर देणार, ( ३ ) कौन्सिलें काबीज करणार, ( ४ ) राजकीय सुधारणांचा म्हणजे स्वराज्याचा असंदिग्ध मसुदा तयार करून तो कौन्सिलच्या द्वारें सरकारपुढें मांडणार आणि ( ५ ) सरकारनें तो मान्य केला नाहीं तर सरकारला प्रत्येक जागीं अडवून सोडणार. एवढ्या गोष्टी यापक्षानें निश्चित केल्या आहेत. आमचा पक्ष स्वतंत्रपणें काम करील, तरी तो काँग्रेसचे प्रातिनिधिक स्वरूप मान्य करणारा असल्यामुळें ती संस्था सोडून तो जाऊं इच्छित नाहीं. आज ना उद्यां आपल्या मतांची त्या संस्थेवर छाप पाडूं या उमेदीनें हा पक्ष काम करणार आहे. हल्लीं असें मानण्यांत येतें कीं, काँग्रेसच्या ठरावाशीं आपलें मत जुळत नसलें तरी आपलीं मतें काँग्रेस कबूल करीतोंपर्यंत तिच्या मताबरहुकूमच वागलें पाहिजे. पण या पक्षानें आपल्या मतास काँग्रेसकडून मान्यता मिळविण्याचा तीन वर्षेपर्यंत पराकाष्टेचा

*'लोकमत' यवतमाळ ता. ९।२।२३

प्रयत्न केला.कितीहि सांगितलें तरी लोक आपलीं मतें घट्ट धरून ठेवीत असल्यामुळें इतःपर शब्दप्रमाणांनीं त्यांचीं मतें आपल्याकडे वळवून घेणें म्हणजे कालाचा अपव्ययच होणार आहे; आणि गेलीं तीन वर्षें जशीं हातां-तून निघून गेलीं, तशीं पुढील तीन वर्षेंपर्यंत कौन्सिलें हातांतून जाण्याचा संभव आहे.हल्लींच्या बहुमतवाल्या पक्षाला आपणांकडे वेधून घेण्याचा एखादा मार्ग असेल तर तो शब्दप्रामाण्य दाखविण्याचा नसून प्रत्यक्ष कृतीला लागण्याचाच आहे.

## आमच्या मतीस पटेल तेंच करूं

म्हणून आपल्या मताप्रमाणें कृति करण्याकरितां, आम्हांस हा पक्ष स्थापन करणें अपरिहार्य झालें आहे. त्याशिवाय आम्हांला दुसरा मार्गच उरला नाहीं. अर्थात् हा पक्ष आपल्या वर्तनानें असें दाखवीत आहे कीं, काँग्रेसचा ठराव म्हणजे अनुल्लंघनीय आज्ञा नव्हे, तर ती एका जबाबदार संस्थेकडून आलेली एक सूचना होय ! ह्या सूचनेस आम्ही शिरसा वंदन करूं, पण आमच्या मतीस पटेल त्याच मार्गाचें अवलंबन आम्ही करणार आहोंत ! या पक्षानें राष्ट्रीय सभेचें क्रीड मंजूर केलें आहे. सर्व शांततेच्या उपायांनीं स्वराज्य मिळविणें, हें तें क्रीड होय ! पण तें काँग्रेसचें ध्येय म्हणून या पक्षानें स्वीकारलेलें नसून, स्वतंत्र बुद्धीनें तें त्यास पटतें म्हणून त्यानें तें अंगिका-रिलें आहे. शिवाय, जो मनुष्य हें क्रीड पत्करील, तो कांग्रेसच्या एकाहि संस्थेचा सभासद नसला तरी या नूतन पक्षाचा अनुयायी होऊं शकेल, हें त्याचें एक वैशिष्ट्य आहे. अर्थात् हा पक्ष केवळ आणि सर्वस्वी राष्ट्रीय सभेच्या अनुयायांचा नसून, तो एक स्वतंत्र पक्ष आहे. काँग्रेसनें, हें आजचें क्रीड उद्यां बदललें तरी हा पक्ष तें बदलीलच असें मात्र कोणी समजूं नये ! कोणी म्हणतात नेमस्तांचाहि एक स्वतंत्र पक्ष आहे, तसेंच तुम्ही झालांत. पण त्यांच्यांत व आमच्यांत फरक आहे तो हा कीं, नेमस्त हे राष्ट्रीय सभेवर आपल्या मतांची छाप पाडूं इच्छित नाहींत; आम्ही काँग्रेस संस्थेमध्येंच राहून तिला अंकित करून घेऊं इच्छितों. आम्हीं आजवर कौन्सिलप्रवेशास अनुकूल असा पुष्कळ युक्तिवाद केला. उलट पक्षाचें

उत्तर असें कीं, कौन्सिलांत जाऊन कांहीं एक फायदा होणें शक्य नाहीं. पण जिभेस साखरेचा स्पर्श न होऊं देण्याची प्रतिज्ञा करून जर कोणी असें म्हणेल कीं, साखर गोड आहे हें सिद्ध करून दाखवा, तर तें कसें करावयाचें? तशांतलाच हा भाग आहे.

## चर्चा पुरे, कृति करूं द्या.

कौन्सिलांत गेल्यानें नोकरशाहीस वठणीवर आणण्याचे प्रयत्न कोणत्या प्रमाणापर्यंत करणें शक्य आहे, हें कौन्सिलांत जाऊन बसल्याशिवाय कसें सिद्ध करून दाखवितां येईल? खरी गोष्ट अशी आहे कीं, आतां चर्चा पुरें झाली. चर्चेनें व शब्दप्रमाणानें कोणींहि कोणाचें मत पालटवूं शकत नाहीं. म्हणून प्रत्यक्ष कृति करावयास लागणें हें या पक्षास अपरिहार्य होऊन बसलें आहे! गयेच्या कॉंग्रेसमध्यें तडजोडीचे ठराव आणिले, भिक्षे-सारखासुद्धां ठराव आणिला, पण राजगोपालाचार्य आपल्या स्थानावरून हालण्यास तिळमात्र तयार नव्हते! कोणी कोणी लोक–ते जबाबदार आहेत मी त्यांचीं नांवें घेऊं इच्छित नाहीं–ते येथपर्यंत म्हणाले कीं, तुम्ही कौन्सि लच्या जागांकरितां उभे राहाल, तर सरकारी उमेदवारांस आम्ही मतें देववूं, पण तुमचा पाडाव करूं! शिव शिव!! कट्टर असहकारवाद्यांच्या तोंडून कोण ही सूडाची भाषा! माझी पक्की खात्री आहे कीं, असे शब्द उच्चारणारे गृहस्थ तसली कृति करावयाच्या वेळेस खास लाजतील. पण त्यांचा हट्ट कोणत्या मजलेपर्यंत गेला होता, हें दाखविण्यापुरताच मी त्यांच्या उक्तीचा उल्लेख केला आहे. मी असें म्हणतों कीं, तुमच्यानें प्रतिकार करवत नाहीं, तर ज्यांना ती करण्याची उमेद आहे त्यांना तो करण्याची मुभा ठेवा. पण तें सोडून तुम्ही आमच्या शत्रूंस जाऊन मिळण्याची भाषा बोलतां, यास काय म्हणावें!

## पोलादी चौकट कायम ठेवून स्वराज्य!

१९१७ सालीं लोकपक्षाची चळवळ एवढया दांडग्या प्रमाणावर झाली कीं, नोकरशाहीवर तिचें दडपण पडून हल्लींचा सुधारणाकायदा पास करण्यांत आला. पण तेव्हांच्या सरकारच्या मानेवरील भय गेल्या तीन वर्षांच्या अवधींत इतकें नामशेष करण्यांत आलें आहे कीं, जबाबदार पद्धतीचें

स्वराज्य हिंदुस्थानांत सुरू करणें हें आमचें धोरण आहे, असें गंभीर स्वरानें स्टेट सेक्रेटरीच्या तोंडून जाहीर करणारें, त्याचा रिफॉर्म ॲक्टच्या प्रस्तावनेमध्यें मुद्दाम उल्लेख करणारें सरकार, आज बेलाशक असें म्हणावयास प्रवृत्त झालें आहे कीं, सनदी नोकरांची पोलादी चौकट शाबूत ठेवणें, हें आमचें प्रथम कर्तव्य आहे ! व तें सांभाळून मग काय कमीजास्त द्यावयाचें त्याचा विचार करतां येईल ! खरें म्हटलें तर सनदी नोकरांच्या हातची एक एक सत्ता क्रमाक्रमानें काढून घेऊन ती लोकांच्या हातांत आणून ठेवणें, यांचेंच नांव जबाबदारीचें स्वराज्य; पण आजचें सरकार सनदी नोकरांची सत्ता संकुचित करण्याऐवजीं ती जास्त दृढ करूं पाहात आहे व त्याकरितां त्यांनीं एक कमिशनहि नेमून टाकिलें आहे. आपणांस आतां लोकमतास भिण्याचें कांहीं एक कारण नाहीं, अशी त्यांची मन:स्थिति झाली असल्याचें त्यांच्या ह्या कृतीवरून व उक्तीवरून स्पष्ट होत नाहीं काय ? १९१७ सालच्या बादशाही जाहिरनाम्याला त्यांनीं हा हरताळ फासला आहे. पण असें कां झालें ? तर ज्या लोकमताला भिऊन त्यांनीं जाहिरनामा काढिला व सुधारणाकायदा पास केला, तें त्यांच्या मनावरील लोकमताचें भय नष्ट झालें आहे. कर्झननें अठ्ठावनच्या जाहीरनाम्यास अशक्य सनद म्हटलें तीच गत आजचे जबाबदार मुत्सद्दी आजच्या रिफार्म ॲक्टची करूं पाहात आहेत ! गेल्या तीन वर्षांतील चळवळीच्या यशस्वितेचें मापन आम्ही या एकाच दृष्टीनें करणार कीं, लोकमताचा दाब सरकारवर कितपत पाडला जातो ? व आजवरच्या असहकाराच्या चळवळीनें देशाचें इतर दृष्टींनीं कितपत हित झालें हें पाहणें अवांतर होय ! राजकीय दृष्ट्या ती कितपत यशस्वी झाली हें आमचें पाहणें आहे.

## पक्ष काढणें अपरिहार्यच झालें.

रिफार्म ॲक्टाची अंमलबजावणी आम्ही इमानें इतबारें करूं, अशीं आश्वासनें देणारे नोकर आज तीं नियंत्रणें खुशाल झुगारून देऊं पाहात आहेत ! खुद्द पब्लिक्सर्व्हिस कमिशननें ज्या प्रमाणांत हिंदी नोकरांची संख्या वाढविण्याची शिफारस केली आहे, तेंहि प्रमाण सोडून देण्यांत येत आहे.

रोजच्या व्यवहारांत असल्या भयंकर घडामोडी होत असतां, त्यांच्या मनास कांहींएक न वाटतां नुसत्या तात्त्विक विचारांनीं लोकांना भुलविण्यांत कित्येकांना पुरुषार्थ वाटतो ! पण माझा प्रतिस्पर्धी जो मला काल भीत होता, तो आज मला न भितां एक गुद्दा देऊन पुढें जातो असें ज्यांना दिसतें, ते आजच्या राष्ट्रीय सभेच्या धोरणांत फरक मागणार नाहींत तर काय करतील ? ते असें करणार नाहींत तर त्यांना आपल्या सदसद्विवेकबुद्धीशीं बेइमान व्हावें लागेल ! प्रतिस्पर्ध्यानें केलेली मानखंडना व पादताडन ज्यांना चालतें–नव्हे–तें सहन करण्यांत ज्यांना आपलें बलवर्धन झालें असें वाटतें, त्यांची गोष्ट वेगळी ! पण सगळेंच जग असल्या मनोवृत्तीचें नसतें ! ह्याच ठिकाणीं बहुसंख्यांकांचा व आमचा फरक पडतो, म्हणून वेगळा पक्ष काढणें आम्हांस अनिवार्य झालें आहे !

## हा पक्ष गंभीरपणें राजकारण करील.

हा पक्ष एशियाटिक संघ निर्माण करून त्यांच्या द्वारें आपलें परराष्ट्रीय राजकारण सुरू ठेवील ! हल्लीं कॉंग्रेसचें राजकारणाशीं वावडें आहे. तथापि ह्या कामाची रूपरेषा ठरविण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत आली होती. जें काम करावयाचें मनांतून नसतें, तें करावयाचें अंगावर येऊन पडलेंच म्हणजे मनुष्य जशी अळंटळं करितो, तशीच या कमिटीची अवस्था झाली. या कमिटीनें एक निबंधवजा रिपोर्ट लिहिला तो असा:–'अहो, परराष्ट्रीयांनो, इंग्रज सरकार तुमच्याशीं तहनामे करून जर ते मोडत असतील, तर त्यांच्या तसल्या कृत्यांशीं आम्हां हिंदवासियांचा कांहींएक संबंध नाहीं हें लक्षांत ठेवा. तहनाम्यामुळें तुमच्यावर जी आपत्ति येत असेल, ती आमच्यामुळें नव्हे' वगैरे. जणूं काय इंग्रज सरकारच्या जांचांतून इतर राष्ट्रांची सोडवणूक करण्याकरितां ही कमिटी नेमिली होती ! परराष्ट्रांशीं संबंध जुळवून त्यांची नैतिक सहानुभूति मिळविणें व तद्द्वारें आपले राजकीय प्रश्न सोडविणें हें प्रमुख कर्तव्य बाजूस टाकून, या कमिटीनें असले निबंध लिहीत राहणें हें कसलें राजकारण तें कळत नाहीं ! म्हणून गंभीरपणानें राजकारण करण्याकरितां हा पक्ष एशियाटिक संघाची खटपट करणार आहे.

## स्वराज्याची मागणी स्पष्ट शब्दांत मांडूं.

हा पक्ष राष्ट्राची स्वराज्याची मागणी निश्चित शब्दांत मांडणार आहे. आपण कोणत्या अधिकारांच्या प्राप्तीकरितां, कोणता राजकीय दर्जा मिळविण्याकरितां, चळवळ करीत आहोंत, याची स्पष्ट कल्पना लोकांना असणें अत्यंत जरूर आहे. हल्लींच्या राष्ट्रीय सभेच्या चालकांस हें ध्येय मुद्दाम संदिग्ध ठेवावयाचें दिसतें; कारण तें निश्चित केलें तर त्यांत " याचना " आहे असें त्यांच्या मनास वाटतें व म्हणूनच त्यांना असा मसुदा तयार करावयाचा नाहीं. खादी म्हणजेच स्वराज्य ! चरखा म्हणजेच स्वराज्य !! तुरुंगवास म्हणजेच स्वराज्य !!! असले अलंकार वापरून तेंच खरें स्वराज्य होय, अशाहि त्याच्या व्याख्या प्रत्यहीं करण्यांत येत आहेत. पण ज्या जनतेच्या साह्यावर व सहानुभूतीवर स्वराज्याच्या भांडणाची भिस्त आहे, त्यांना स्वराज्याची स्पष्ट कल्पना दिली नाहीं, या नुसत्या अलंकारिक भाषेवर आणि उत्तेजक मनोभावनांवरच त्यांना झुलत ठेविलें, तर त्यांचा स्वराज्यविषयक उत्साह फार दिवस टिकणार नाहीं. म्हणून हा पक्ष स्वराज्याची स्पष्ट कल्पना असंदिग्ध शब्दांत मांडणार आहे. अगदीं लहान खेड्याच्या कारभारापासून तों तहत सगळ्या हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें हालविण्यापर्यंत सर्व प्रकारच्या लोकांस कोणतें स्वातंत्र्य व कोणते हक्क असणें आवश्यक आहे हें हा पक्ष नक्की करील व ती योजना सरकारपुढें कौन्सिलच्या द्वारें मांडील. तिजसंबंधानें सरकार कांहींएक करण्याचें नाकारील तर कौन्सिलांतून अडवणुकीचें धोरण स्वीकारण्यांत येईल. आजच्या नॉन्-को-ऑपरेटरांच्या पक्षास कोणत्याहि तऱ्हेचा प्रतिकार नीतिबाह्य वाटतो ! ते म्हणतात, राजाशीं राजनिष्ठ राहून हल्लींच्या सुधारणा प्रामाणिकपणें यशस्वी करीन अशी शपथ घेतल्यानंतर त्या हाणून पाडण्याचा प्रयत्न करणें, हें त्या शपथेशीं विसंगत व अनीतिमूलक होय. पण येथें नीतिमत्तेचे शाब्दिक वादविवाद व तात्त्विक काथ्याकूट काय कामाचा ! "किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः" अशा रीतीनें सत्य-असत्य,नीति-अनीति यांच्या वादविवादांत महान् श्रेष्ठ तपस्वी मुनींची मति गुंग होऊन त्यांची दिशाभूल होते. असले प्रश्न आजची सभा सोडविण्याचा आव घालीत आहे.

## सत्यासत्याचा तात्त्विक काथ्याकूट कांग्रेसमध्यें कां !

आम्हाला एवढेंच म्हणावयाचें आहे कीं, असल्या प्रश्नाकरितां राष्ट्रीय-सभेचा अवतारहि नाहीं, तें तिचें कामहि नव्हे, व तेथें जमणारे लोक मुनि-वर्यांच्याहि वरच्या दर्जास पोहोंचलेले नव्हत ! निदान राष्ट्रीय सभेनें तसें नसावें, असा या पक्षाचा आग्रह आहे. समजा कीं, माझ्या तिजोरीची किल्ली एखाद्यानें जबरदस्तीनें घेऊन आपल्या जानव्यास अडकविली; मला ती परत घ्यावयाची आहे म्हणून मीं त्याच्या जानव्यास हात घातला, तेव्हां जर कोणी साधुपणाचा आव घालून असें म्हणूं लागला कीं, अहो, केवढें तें त्याचें यज्ञोपवीत ! त्याचें सगळें पुण्यबळ त्यांत सांठविलेलें ! आणि त्यावर तुम्ही हात घालितां ! कोण हें तामसी कृत्य ! हा घाला, त्याच्या एकट्याच्याच पुण्यबलावर नसून, त्याचा तुम्हीं कधीं न पाहिलेला, पण हल्लीं स्वर्गस्थ असलेला बाप, त्याची सुशील, साध्वी, धर्मपरायण पत्नी, यांच्या नांवांचीं जानवीं त्याच्या गळ्यांत आहेत, त्याजवर हात घालणें, म्हणजे त्या पुण्यात्म्यांचाहि निष्कारण छळ करणें होय, असले शास्त्रार्थ कोणी सांगूं लागला, तर त्याला काय म्हणावें ? साधी गोष्ट, माझी किल्ली मी परत घेणार. पण त्या ठिकाणीं, केवढें नीति–अनीतीचें–सत्यासत्याचें तत्त्वज्ञान ! आम्हांला तें नको आहे. राजनिष्ठेची शपथ घेऊनहि, कौन्सिलांत गेल्यावर काय करावयाचें तें आम्हाला कळतें, व आमच्या प्रतिस्पर्ध्यांनाहि त्याचें पुरें ज्ञान आहे. कारण आम्ही परस्परांस पूर्ण ओळखितों ! हा साधा रोजचा मामुली व्यवहार व तो मामुली व्यवहारासारखाच करावयाचा आहे. तेथील विरोध नॉन्–को–ऑपरेटरांच्या धर्मांत व तत्त्वज्ञानांत वसत नाहीं. मात्र मौज अशी कीं, हरतऱ्हेनें, युक्तिप्रयुक्तीनें, प्रत्यक्ष 'सूड' घेण्याची भाषा वापरेपर्यंतदेखील आमच्याशीं विरोध करण्यांत त्यांचा धर्म मुळींच भंग पावत नाहीं ! आम्हांला, नीति–अनीतीवर निबंध लिहावयाचे नाहींत व प्रवचनें करावयाचीं नाहींत !

## मातृभूमीचा उद्धार हाच आमचा धर्म

परमेश्वरास अंतःकरणांत साक्ष ठेवून, अंतिम सत्य व न्याय यांजशीं प्रामाणिक राहून, आणि मातृभूमीचा उद्धार सदैव डोळ्यांपुढें जागृत ठेवून,

आम्हांला ज्या प्रसंगीं जी युक्ति सुचेल, त्या युक्तीचें अवलंबन आम्ही करूं एवढाच आमचा धर्म आहे (टाळ्यांचा गजर). नोकरशाहीच्या राज्ययंत्रांत सर्व ठिकाणीं घुसून तें काबीज करणें हें आमच्या हिताच्या दृष्टीनें, अत्यंत आवश्यक आहे. हल्लीं, सर्वत्र उपदेशिला जात आहे पण आचरिला जात मात्र नाहीं, असा असहकार एकाहि देशानें अवलंबिलेला नाहीं. प्रत्येक देशांतील राज्यक्रांतिकारकांनीं तेथील सर्व संस्था हस्तगत केल्यानंतरच त्यांनीं राज्यक्रांतीचें शिंग फुंकारिलें, असें इतिहास सांगत आहे. "आमचें तें शील नव्हे" असेंहि आज गंभीरपणें सांगण्यांत येतें. असलें विधान खोडून काढण्यास, स्वतंत्र व्याख्यानें द्यावीं लागतील. आज तूर्त एवढेंच सांगतों कीं, हें आमचें शील नव्हे असें कबूल करावयास हा पक्ष मुळींच तयार नाहीं. ( हिअर! हिअर ! ). या देशाचा सर्व इतिहास व पुराणें, आणि आमची संस्कृति यांजविषयीं पूर्ण अज्ञान दर्शविणारें हें विधान आहे!

## कौन्सिलें म्हणजे गाजराच्या पुंग्या

शेवटीं या नूतन पक्षातर्फे मी एवढेंच सांगतों कीं,आम्ही काँग्रेसच्या विधायक कार्यक्रमाच्या यत्किंचितहि आड येऊं इच्छित नाहीं. इतर सर्व राजकीय कामें अजिबात बाजूस टाकून फक्त विधायक कार्यक्रमावर आपलें शक्तिसर्वस्व खर्च करण्यास आम्ही तयार नाहीं, हा आमच्या अशक्तपणाचा पाहिजे तर कबुलीजबाब समजा. पण गेल्या चाळीस वर्षांत काँग्रेसनें जसें राजकारण चालविलें,तसेंच इतःपर आम्ही राजकारण चालविणार. या दृष्टीनें पाहतां हल्लींच्या फुटीचें मला कांहीं वाईट वाटत नाहीं. मधल्या उंचवटयामुळें नदीचा प्रवाह थोडा वेळ दुभंगला तरी तो पुन्हां एकत्र होतो.त्याप्रमाणें आज ना उद्यां आपण पुन्हां एकत्र होऊं असा आम्हांला विश्वास आहे. हल्लींचीं कौन्सिलें म्हणजे स्वराज्य होय असें आम्ही मानीत नाहीं.कितीं झालें तरी ती एक गाजराची पुंगी होय ! वाजली तर ठोकच ! न वाजली तर मोडून भाजी करून खाल्ली ! ( टाळ्या ). राजकीय प्रतिकाराचा चाळीस वर्षांचा झगडा 'निरर्थक' ठरवून एका वर्षांत स्वराज्य मिळविण्याच्या प्रति-

झेचा काय उपयोग झाला तो आपण पाहिलाच आहे. आतां त्या एकाच मार्गाचा प्रयोग करून पाहण्याची मुदत संपली. अजूनहि ज्यांना प्रयोग करावयाचा आहे, त्यांनीं तो खुशाल चालू ठेवावा. आम्ही त्यांच्या आड बिलकुल येत नाहीं. मात्र आम्ही आपल्या मताप्रमाणें इतःपर काम करीत राहणार व त्याकरितांच हा नवीन पक्ष स्थापन केला आहे. त्याच्या प्रांतोप्रांतीं, जिल्ह्याजिल्ह्यांतून, तालुक्यातालुक्यांतून व गांवोगांव शाखा काढून मतदारांचे संघ स्थापन करावे लागतील. या संघांतर्फे पुढील निवडणुकींत आपले कौन्सिलांतील उमेदवार यशस्वीपणें निवडून आणावयाचे आहेत. या कामीं आपण सर्व जण मनोभावें आम्हांस मदत करा, एवढीच माझी आपणांस अगत्याची व आग्रहाची विनंति आहे.

---

# नव्या पक्षाची माहिती*

दे. भ. बापूजी अणे यांचें ता. ७ । २ । १९२३ रोजां ' नव्या पक्षाची माहिती ' या विषयावर झालेलें जाहीर भाषणः—

### प्रधान मुद्यावर दुमत म्हणून हा पक्ष

मुंबईस ठरलेली या नव्या पक्षाची योजना जरी कच्ची असली, तरी येत्या २० फेब्रुवारीला होणाऱ्या अलाहाबाद येथील ह्या पक्षाच्या सामान्य सभेंत कायम राहील असें स्पष्ट दिसतें. काँग्रेस–खिलाफत–स्वराज्यपक्ष निघाल्यापासून ह्यावर अनुकूल व प्रतिकूल टीका पुष्कळ झाली आहे. अल्पमतानें फुटून निघून आपला एक पक्ष काढून काम करूं नये असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण त्यांना हें कळत नाहीं कीं, 'नवा पक्ष' नेहमीं अल्प मतवालेच काढीत असतात. आज देशांत अल्पमत व बहुमत असे दोन पक्ष स्पष्ट झाले आहेत, ह्यात बिलकुल शंका नाहीं. फक्त अल्प मताच्या मंडळींनीं आपला वेगळा पक्ष काढावा कीं नाहीं एवढीच कांहींना शंका येते. पण अशा शंका घेणारांनीं हें पाहिलें पाहिजे कीं, नवा पक्ष काढिला जात आहे हा कांहीं प्रधान

* 'उदय' उमरावती ता. १३ फेब्रुवारी १९२३

मुद्यावर मतभेद होऊन काढिला जात आहे कीं, गौण मुद्यावर काढिला जात आहे? जर प्रधान मुद्यावर काढिला जात असेल, तर पक्ष काढिला जात आहे हेंच उघड बरोबर आहे; आणि गौण मुद्यावर निघत असेल तर मग त्याबद्दल प्रश्न ! पण कौन्सिल ही बाब क्षुल्लक कशी ? कलकत्त्यास ऑल इंडिया काँग्रेसच्या बैठकींत सतत सहा दिवस जवळजवळ अहोरात्र देशांतील विचारी लोकांनीं किंवा तुम्ही, विचारी समजून, निवडून दिलेल्या प्रतिनिधींनीं जो ह्या प्रश्नाचा खल केला, तो हा प्रश्न क्षुल्लक म्हणून होय ? हा प्रश्न क्षुल्लक असला तर याच्यावर एवढा वादच कशाला माजला असता ! शेवटीं शेवटीं इतकेंहि करून कलकत्त्यास कांहीं ठरलें नाहींच ! आणि इतकें होऊन कलकत्त्यास एकहि ह्या पक्षाचा माणूस त्या पक्षाला, किंवा त्या पक्षाचा माणूस ह्या पक्षाला आला नाहीं ! शेवटीं गयेवर सर्व निकाल ढकलिला ! पण गयेसहि कोणीहि दुसऱ्यास वळवूं शकला नाहीं. अगदीं पहिल्या पासून शेवटपर्यंत अनुकूल ते अनुकूल व प्रतिकूल ते प्रतिकूल. एका माणसाचा फरक झाला नाहीं ! दोन वेळ ह्या एका वर्षांत हा प्रयोग झाला.

## एकटा काय तो शहाणा !

गयेस तर असा धडाका उडाला कीं, देशानें कांहीं अडचणीचे प्रश्न सोडविण्यासाठीं जीं सात शहाणीं म्हणून माणसें कायदेभंग–चौकशी–कमिटीच्या रूपानें नेमलीं त्यांतील पांचपांच, सहासहा माणसें ज्या गोष्टीला अनुकूल व एकच माणूस प्रतिकूल, तीहि नापास! तो एकटाच तेवढा शहाणा ठरला! जे देशांतले सर्वांतले बुद्धिमान्, सर्वांतले स्वार्थत्यागी, सर्वांतले निःस्पृह, ते मूर्ख ठरले आणि एकच तेवढा शहाणा ठरला ! कायदेभंग–चौकशी–कमिटीनें ‘ सर्वानुमतें ’ मंजूर केलेलेंहि नापसंत ! “ अजून आमची खात्री करून देत बसा, तुम्हांला वाटतें तसें वागून जनतेला तें करून दाखवूं नका ” असें बहुमतवाल्या पुढाऱ्यांनीं म्हणणें, याचा मला एकच अर्थ वाटतो कीं, “ जन्मभर बहुमत करून घेण्याचा यत्न करूं नका ” ! आणखी एक निवडणूक गमविणें म्हणजे आणखी तीन वर्षें वस्तुपाठाचीं गमविणें होय ! पूर्वीची एक निवडणूक गमविल्यानें तीन वर्षें आधींच गेलीं

आहेत; म्हणजे एकंदर सहा वर्षे जाणार ? सुधारणांच्या कायद्यांत पुढच्या हप्त्याकरितां दहा वर्षांची मुदत घातली आहे. त्याचा खरा अर्थ असा कीं, " दहा वर्षें तुम्ही कांहीं जास्त मागूं नका आणि मागितलें तर आम्ही देणार नाहीं " असें सरकार ह्या कलमाच्या द्वारां हिंदी लोकांस बजावीत आहे. पण आपल्याच कॉंग्रेसनें पूर्वी ठराव पास केले होते कीं, आम्ही आजहि स्वराज्याला पात्र आहोंत ! म्हणून राष्ट्रीय सभेनें सुधारणांच्या कायद्यानंतरच्या ठरावांनीं सरकारला बजाविलें कीं तुमची इच्छा नसली तरी दहा वर्षांच्या आंत हा प्रश्न पुन्हां तुम्हांला आम्ही हातीं घ्यावयाला लावूं आणि अधिक पुढचे हक्क मिळवूं ! हें ब्रीद कॉंग्रेसनें अमृतसरच्या ठरावानें पत्करिलें. पण आणखी एक नवा पक्ष त्याहूनहि अधीर निघाला ! त्यानें एका वर्षांत सबंध स्वराज्य मिळविण्याची प्रतिज्ञा केली ! लोक अधीर झालेलेच होते. ह्या एक वर्षाच्या प्रतिज्ञेमुळेंच ह्या नव्या पक्षास फार लोक येऊन मिळाले हें मी उघड सांगतों. तें एक वर्ष तर केव्हांच निघून गेलें ! पण आतां ही मंडळी पुनः कोणत्याच मुदतीची प्रतिज्ञा करीत नाहीं. एका वर्षांत स्वराज्य नाहीं मिळालें म्हणून त्यांना तें आतां केव्हांहि मिळालेलें कां चालतें ? कॉंग्रेसच्या दहा वर्षांच्या ब्रीदाचें काय झालें ? जेव्हां हें दहा वर्षांचें ब्रीद पास झालें तेव्हां हें दोन्ही पक्षाला सारखेंच मान्य होतें. राजगोपालाचार्य म्हणतात विधायक कार्यक्रम केला कीं असे गुण अंगीं येतील कीं, स्वराज्य मिळाल्यावर आपणांस तें राखतां येईल !

## पण स्वराज्य मिळण्याची वाट काय ?

तें कधीं आणि कशानें मिळणार? सगळ्या गोष्टी स्वराज्य मिळाल्यानंतरच्या बोलणें सुरू आहे, त्यानेंच स्वराज्य मिळणार असेल तर मिळो! जगांत जें कधीं कोणीं आजवर करून पाहिलें नाहीं, तेंच जर कोणी करून पाहतों म्हणूं लागला, तर हें तुझें होणारच नाहीं म्हणून तरी त्याला कोण म्हणणार ? सबंध जगतांत व सबंध हिंदुस्थानांत नीतीचें एक इतकें परिमाण पाहिजे म्हणून असहकारितेंत सर्व यत्न चालला आहे ! पण भरतवर्षाचा सबंध इतिहास ज्यांच्या परंपरेनें उज्ज्वल झाला आहे, त्या साधुसत्पुरुषांनीं आज हजारों वर्षे

ह्याच यत्न केला आहे; पण अजून तो यशस्वी झाला नाहीं. मनुष्यस्वभाव इतक्या लौकर पालटत नाहीं. हा हजारों, नव्हे कोटयवधि वर्षांचा प्रश्न आहे. अशा रीतीनें मनुष्यस्वभाव पालटून मग आपल्याला स्वराज्य मिळेल, म्हणून इतके दिवस तुम्ही स्वराज्यावांचून राहावयाला तयार आहांत काय? अमृतसरच्या प्रतिज्ञा तुम्हांला आठवत नसतील, पण आम्हांला आठवतात. आतां एक तर राहोच पण कोणी तीन, पांच, दहा किंवा पन्नास वर्षांचीहि प्रतिज्ञा करीत नाहीं. कारण तितक्याहि मुदतींत, ह्या कार्यक्रमानें स्वराज्य मिळविण्याची हिंमत नाहीं! ह्या तुमच्या अप्रतिकाराच्या 'नीती'च्या कार्यक्रमानें कदाचित् लोक अधिक नेभळे होतील, अधिक सोशीक होतील, कदाचित् परक्यांच्या लाथा व छळ, अधिक निमुटपणें सोसून घेतील! पण अधिक स्वराज्याला लायक कसे होतील, हाच प्रश्न आहे. अशा परिस्थितींत "तुमच्या कायद्यांतील दहा वर्षांच्या मुदतीच्या पूर्वी तुम्हांला हा स्वराज्याचा प्रश्न हातीं घ्यावयाला लावूं व नवा हप्ता देण्यास भाग पाडूं" म्हणून म्हणणारांस ह्यानंतर स्वस्थ बसणें शक्य नाहीं व आपलें काम सुरू करणें भाग झालें आहे. नवा पक्ष हा रणांगणावर प्रेमाची भाषा बोलणारा पक्ष नाहीं. प्रेममय परमेश्वर स्वतःहि परिस्थितीप्रमाणें 'घोरा किंवा अशिवा' तनु घेऊन उग्र रूप धारण करितो, तर त्याचाच अंश जो मनुष्य त्यालाहि परिस्थित्यनुरूप राग, द्वेष, प्रेम हे विकार उत्पन्न झालेच पाहिजेत! हे विकार परिस्थित्यनुरूप उत्पन्न होणें हें ह्या दृष्टीनें उघड परमेश्वराच्या अधिक जवळ जाणें आहे.

## विरोधानें शील कसें बिघडतें!

असें जर न झालें तर तुम्ही ज्याचे अंश आहांत तो देव तो नाहीं एवढेंच मी म्हणेन. विरोधांत शील बिघडतें हें विधानच चूक आहे. उलट कॉंग्रेस ह्या नीतिप्रसारासाठीं उपयोगांत आणणें हें न्याय्य आहे काय? असें मीच आपणांस विचारतों! आजवर लोक जर कशानें असहकारितेला वश झाले असतील तर ते या असहकारितेंत 'विरोध' आहे, या भावनेनेंच झाले आहेत! मी असहकारितावादी पुढाऱ्यांना सांगतों कीं, तुम्हीं आपलींच पूर्वींची

भाषणें वाचा. आणि आतां असक्यांत विरोध आहे म्हणून हें नको असें म्हणणें, म्हणजे जनतेची एकप्रकारची फसवणूक करणें आहे. प्रस्तुत राज्ययंत्रांत न घुसलांत तर स्वतंत्र राज्य स्थापन करणें हा एकच मार्ग उरतो. पण असें स्वतंत्र राज्य स्थापणें हाहि 'विरोध' आहे. म. गांधींना हें सांगितलें तेव्हां ते म्हणाले कीं, आम्हांला स्वतंत्र राज्य स्थापावयाचें नाहीं. आम्हांला ह्याच सरकारशीं तडजोड करूनच स्वराज्य मिळवावयाचें आहे. मूल दाखवून भीक मागणाऱ्या भिकारणीप्रमाणें देहदंडानें—आत्मक्लेशानें—दुसऱ्यांस कींव आणून कांहीं मिळविणें हें याचनेहूनहि वाईट आहे. आणि ह्या वृत्तीला "स्वावलंबन" "पराक्रम" हें नांव देणें हा निव्वळ शब्दाचा दुरुपयोग आहे.

## हा शुद्ध मेषपात्रपणा आहे !

हा गुण, मिळालेलें स्वराज्य राखण्यासहि कामाचा नाहीं. आणि अशा मेषपात्रपणानें स्वराज्य मिळालेंच, तर अशा मेषपात्रपणानें जें मिळालें तें कोणीहि थोबाडींत मारून घेऊन जाईल. "विरोध" गेला कीं पराक्रम गेला. निव्वळ दुःख सोसणें हा जर पराक्रम असेल तर कोणता मेषपात्र आजपर्यंत पराक्रम केल्यावांचून मेला आहे ? दुखणाईत सहासहा महिने दुःख सोशीत नाइलाजानें अंथरुणावर पडतात ! ते नाइलाजानें दुखणाईत आणि तुम्ही स्वेच्छेचे दुखणाईत ! इतकाच तुमच्यांत व त्यांच्यांत फरक ! तसेंच उनाड मुलाच्या घटकेच्या संगतींत बापाच्या कितीतरी दिवसांच्या शिकवणीवर बोळ फिरतो.तसा इतकेंहि करून शिकवलेला हिंदुस्थान, इंग्लंड व इंग्लंडमुळें इतर दहावीस अशा, सर्व "उनाड" राष्ट्रांच्या संगतींत पडला आहे. ह्या संगतीचा परिणाम ह्या सर्व नीतिशिक्षणावर बोळा फिरविल्याखेरीज कधींहि राहणार नाहीं हें विसरून कांहीं उपयोग नाहीं. विरोधांत संसर्ग हा आलाच पाहिजे. म्हणूनच "संसर्ग" म्हणजेच "सहकारिता" ही व्याख्या अगदीं चूक आहे. आणि "राजकीय" दृष्टीनें जर विरोध करावयाचा असेल तर ज्या ठिकाणीं राज्यघटना होते, जेथून कारभार चालतो, जेथें सत्तेचें ठिकाण आहे तेथेंच

गेलें पाहिजे; आणि मग मुद्दाम खाजवून भांडणें काढिलीं पाहिजेत, सतावून सतावून सत्ताधाऱ्यांस अगदीं संताप आणिला पाहिजे व संतापांत त्यांच्याकडून भलभलतें होऊं दिलें पाहिजे व इतकें झाल्यावर पुढचें पाहून घेऊं. पुष्कळ विचारतात, कौन्सिलांत गेल्यावर तुम्ही काय काय करणार, सांगा. लढाई सुरू होण्यापूर्वींच सबंध लढाई कशा क्रमानें होईल हें जगांत सांगणारा कोण आहे ? प्रतिपक्षाच्या हालचालीवर आपलें पुढील धोरण राहणार ! असहकारितेच्या चळवळीनें स्वराज्याची हांक जनतेंत दूरपर्यंत नेऊन पोंहचविली असेल पण हें या चळवळीचें कांहीं एकच मुख्य काम नाहीं.

## सरकारवर काय परिणाम झाला तो पाहा.

मूळ सरकारवर परिणाम करण्याकरितां चळवळ काढली. तेव्हां सरकारवर परिणाम किती व काय झाला हें मुख्य पाहा. टिळक होमरूल लीग १९१६ सालीं स्थापन केली गेली व हिंदुमुसलमानांची खरी एकी घडवून आणिली गेली. कॉंग्रेस लीग स्कीम, ही हिंदुमुसलमानांमध्यें एकी घडवून आणून, ज्यांनीं तयार केली, त्यांनीं मूळ हिंदुमुसलमानांची एकी केली, आणि अशी एकी घडवून आणून सरकारला महायुद्धाच्या अडचणींत गांठून ही सबंध राष्ट्राची मागणी सरकारच्या तोंडावर टाकण्यांत आली,तेव्हां नाइलाज होऊन, "स्वराज्य" देतों ही भाषा १९१७ सालीं सरकारला बोलावीच लागली, व त्या संपूर्ण स्वराज्याच्या सौद्याचा विसार म्हणून ह्या प्रस्तुत सुधारणांचा एक रुपया, सरकारला लोकांना द्यावाच लागला ! अमृतसरपर्यंत सरकारला हीच भाषा बोलावी लागली. १९२१ च्या जूनपर्यंत सरकारला हीच भाषा बोलावी लागली. इतका सरकारवर त्या चळवळीचा परिणाम झाला. पण १९२० सालीं ही एका वर्षाच्या प्रतिज्ञेची चळवळ निघाली. आणि ह्या चळचळीच्या तीन वर्षांनतर, आज सरकारची भाषा काय आहे ! सरकार काय बोलत आहे ? सिव्हिल सर्व्हिस हा हिंदुस्थानच्या राज्ययंत्राचा लोखंडी सांगाडा आहे आणि तो कायम राहिलाच पाहिजे असें मि. लाइड जॉर्ज व स्वत: भारतमंत्री लॉर्ड पील बोलत आहेत ! आम्हाला खरी सत्ता तर ह्या सनदी नोकरांपासूनच घेणें आहे. ह्याचा खरा अर्थ

हा कीं, जो आम्हांला भिऊन तीन वर्षांपूर्वी दुरून जात होता, तो मिश्यांवर पीळ देऊन "देत नाहीं जा" म्हणून जवळ येऊन आज तुम्हांला म्हणत आहे.

## हा तुमच्या पराक्रमाचा परिणाम !

हा तुमच्या तीन वर्षांच्या "पराक्रमा" नंतरचा परिणाम झाला आहे, आणि हा तुम्ही आपल्या हातानें घडवून आणिला आहे. सिव्हिल सर्व्हिस हा लोखंडी सांगाडा आहे असें सांगण्याचा अर्थ हा आहे कीं, सुधारणांचा कायदा 'परत घेतो' 'मोडतो'! हे सांगण्यासाठीं हें जाहीर भाषण केलेलें आहे. हा ज्या अर्थी गेल्या तीन वर्षांच्या चळवळीचा सरकारवर परिणाम झाला आहे, त्या अर्थी ही चळवळ सर्व चुकली आहे, आणि म्हणूनच दहा वर्षांत तुम्हाला हा प्रश्न पुन्हा हातीं घ्यावयाला लावूं व पुढचा हप्ता द्यावयाला लावूं असा पण, ज्यांनीं अमृतसरला केला, त्यांना हा मानाचा प्रश्न होऊन बसला आहे. प्रतिपक्षाचें हें उघड आव्हान आलेलें आहे आणि म्हणूनच कॉंग्रेस खिलाफत स्वराज्यपक्ष स्थापन करणें भाग झालेलें आहे. आणखी एक निवडणूक दवडिल्यास तीन गेलीं तर्शी दहापैकीं सहा वर्षें जात आहेत. स्वराज्य ही एक प्रकारची क्रांति आहे. आणि प्रातिनिधिक संस्थांत आपलीं माणसें नेऊन बसविल्यावाचून, कोणत्याहि देशानें क्रांतीचें शिंग फुंकलेलें नाहीं व कोणत्याहि देशांतील क्रांति ह्यावांचून घडून आलेली नाहीं हा सर्व जगाचा अनुभव आहे. ह्या जगाच्या अनुभवानें जावें असें आम्हांस वाटत आहे. ज्या नव्या रस्त्यानें गेल्या दोन तीन वर्षांत तुम्ही जावयास निघाला होतां, त्याचा वाटाड्याहि गेला आहे. दुसऱ्या कोणाला ती वाट माहीत नाहीं आणि कोणातरी मोकाट जनावराच्या मागें रानावनांत भटकत राहून कोठें तरी गधे घाटांत जाऊन पडण्यास आम्ही तयार नाहीं.

## आम्ही आंधळयाच्या मागें जाणारे नव्हत.

गधे घाटांत व्यर्थ जाऊन पडण्यांत उपयोग नाहीं. तुम्हांला सत्याग्रह कळलेला नाहीं हें गांधी जाणून होते. बार्डोलीच्या एका दुय्यम कार्यकर्त्याला

" बार्डोली सत्याग्रहाला तयार आहे काय? " म्हणून मीं प्रश्न केला असतां, त्यांनीं "होय" म्हणून उत्तर दिलें. मी त्यांना विचारलें कीं "सत्याग्रह" म्हणजे काय ? त्यांनीं उत्तर दिलें " मला माहीत नाहीं. " सत्याग्रह म्हणजे काय हें माहीत नसतांना सत्याग्रहास बार्डोली तयार आहे, हें मात्र या चळवळींत सांगतां येतें आणि त्याना सांगतां आलें ! तुम्हांला सत्याग्रहाचें खरें तत्त्व व पूर्ण शास्त्र कळलेलें नाहीं, ही खात्री असल्यामुळेंच वर्किंग कमिटीचे, रोज सत्याग्रहाची फोड करून सांगण्याकरितां सारखे नवे नवे ठराव होत असत व त्या ठरावाचे अर्थ, त्या अर्थावर भाष्यें व भाष्यांवर टीका अशा नित्य "यंग इंडियां"तून प्रसिद्ध होत असत. नाहीं तर हें सर्व कां होत असे ? तुम्हांला सत्याग्रहाचें शास्त्र कळलेलें नाहीं म्हणूनच योग्य रीतीनें सत्याग्रह चालविण्यासाठीं म. गांधींनीं स्वतःला आपल्या हातानें डिक्टेटर नेमून घेतलें. स्वतःच्या बडेजावीकरितां नव्हे. माझ्याशिवाय हें शास्त्र कोणालाहि माहीत नाहीं व अजून कळलेलें नाहीं; असेंच त्यांनीं ह्या आपल्या कृतींनीं स्पष्ट बोलून दाखविलें. अशा स्थितींत अंगांत धमक नसतांना व आपण जें करीत आहों तें माहीत नसतांना उगाच गांधीजींचा आव अंगीं आणून, केवळ कौन्सिलाच्या बाबतींत लोकांस विरुद्ध मतें द्यावयास लावण्यासाठींच म्हणून कायदेभंग करण्याच्या लोकांना बाता मारणें हा निव्वळ शौर्याचें ढोंग किंवा पोकळ कुर्रा ( bluff ) आहे.

## हा तुमचा लपंडाव आहे

सत्याचें नित्य प्रतिपादन करणारास हा कसा शोभतो हा प्रश्न आहे ! आणि तुमच्या सत्यत्वाबद्दल कितीहि आदर असला तरी पक्षाभिमानाला पेटून हा तुम्ही लपंडाव केला आहे असें श्रा. राजगोपालांना मी जाहीर रीतीनें सांगत आहें.सत्याग्रहाला तयारी पाहिजे कशाला? तयारीच्या नांवानें कां लोकांना झुलवितां ? बंगालमध्यें गतवर्षीं सहा हजार लोक एकदम सत्याग्रह करून, तुरुं-गांत गेले, तेव्हां कोणती तयारी केली होती ? त्यांना कोणतें शिक्षण दिलें होतें ? सत्याग्रह हा प्रसंग आला असतांच होत असतो ! तुम्हांला करावयाचें नाहीं तें, गांधींचें केवळ अनुकरण करण्यासाठीं,तुम्ही बोलत आहां व देशाला फसवीत आहां. तडजोडीसाठीं गयेला असाहि ठराव आणिला गेला होता

कीं, कांग्रेसमधील पुष्कळांस कौन्सिलांत जाणें नापसंत आहे, तरीपण कांहींस कौन्सिलांत जाणें जरूर वाटतें, व त्यांना कौन्सिलांत जाऊं द्यावें. पण हाहि ठराव नापास करण्यांत आला, अय्यंगार यांची सूचनाहि नापास करण्यांत आली. ह्याचें खरें कारण सभेंत सांगण्याची त्यांना लाज वाटते ! खाजगींत ही मंडळी स्पष्ट सांगतात कीं, एकदां कौन्सिलांत गेल्यावर ही मंडळी बोलल्याप्रमाणें करणार नाहींत ! अविश्वास हें कारण ! ह्यांना दास नेहरू-साग्ख्यांबद्दल अविश्वास वाटतो, मग आम्हांला जें धडधडीत तुमच्या ठरा-वांत दिसत आहे तें आम्ही कां बोलूं नये ? नरसोपंत केळकर प्रत्यक्ष सांग-तात कीं, मी व दास एकमतानें वागणार आहोंत, तरी " केळकरांचें व दासांचें पटत नाहीं " म्हणून ओरडत बसणें ह्याचा अर्थ अविश्वास, दुसरा कांहीं नाहीं.

## सत्याच्या बाता व शौर्याचें ढोंग

तुम्हींहि इकडे सत्याच्या बाता मारितां व इकडे शौर्याचें ढोंग करतां, म्हणून आमच्याहि, तुमच्याविषयींच्या, आदरास व विश्वासास धक्का बसला आहे. मी कोणाविषयींहि आपलें मन कलुषित करूं इच्छित नाहीं,पण परदेशीय राजकारण व प्रातिनिधिक संस्था काबीज करणें, ह्या दासपक्षाच्या दोन विशिष्ट गोष्टींपैकीं परदेशीय राजकारण आम्ही मुद्दाम त्या पक्षाच्या कार्यक्रमांत कां घेतलें हें मी आपणांस सांगूं इच्छितों. परदेशीय राजकारण करण्याचें थोड्या-दिवसांपूर्वी कांग्रेसमध्येंहि ठरलें होतें,पण त्या वेळीं इंग्रजांनीं केलेल्या तहनाम्यां-ना आमची संमति नसते हें परदेशांना जाहीर करावें असा फक्त ठराव परदेशी राजकारण म्हणून पास करण्यांत आला. जणू कांहीं परदेशांस हें ठाऊकच नव्हतें. हें परदेशांस पुरतेंपणीं ठाऊक आहे म्हणून तर "गुलामांचें राष्ट्र" म्हणून हिंदुस्थान जगभर प्रसिद्ध आहे. पण करावयाचें नव्हतें, त्याला ही पळवाट काढली. आणि म्हणूनच हाहि प्रश्न आम्हीं प्रामुख्यानें हातीं घेतला आहे. देवानेंहि पुढें उपदेवता पाठविल्या व तयारी झाल्यावर आपण अव-तार घेऊन काम केलें असा पुराणांतरींचाहि दाखला आहे. ही देवांचीहि 'कॅप्चरिंग पॉलिसी' (काबीज करीत जाण्याचें धोरण) आहे. हा दासपक्ष कांग्रेसलाहि सोडीत नाहीं. कारण कांग्रेसहि त्याला

कौन्सिलप्रमाणेंच, एके दिवशीं " कॅप्चर " करावयाची आहे. आणि ती ' कॅप्चर ' होईल त्या दिवशींच कौन्सिलें कॅप्चर केल्याचा खरा उपयोग होणार आहे. तुम्हीं आम्हाला लाथाडिलें, तरी कांग्रेसविषयींचें आमचें प्रेम जात नाहीं. व

## आम्ही कांग्रेस सोडणार नाहीं.

आम्ही मवाळांस मिळणें, कोणत्याहि दृष्टीनें, कालत्रयीं शक्य नाहीं. प्रतिपक्षीहि हें जाणतात. पण मुद्दाम आमच्याविषयीं खोटा गैरसमज पसरविण्यांत येत आहे. आमच्या प्रांतांत तरी आम्हांला हाणून पाडण्यासाठीं मवाळांना निवडणुकींत मदत करण्यासारखे प्रकार घडतील असें मला मुळींच वाटत नाहीं. हें सांगण्याचें कारण आहे. गयेस एक आमचे मित्र बोलिले कीं, मवाळांना मदत करूं, पण तुम्हाला कौन्सिलच्या निवडणुकींत हाणून पाडूं! मीं उत्तर केलें, कांहीं हरकत नाहीं; तुमचें खरें स्वरूप तरी त्यानें लोकांना दाखवून देऊं. तुम्ही असें करणार असाल तर तुम्ही असें करावें म्हणूनच मुद्दाम निवडणुकींना उभे राहूं. तुमच्या तोंडावरचा पडदा फाडून तुमचें खरें स्वरूप तरी लोकांना उघडें करून दाखवूं. वऱ्हाडला व मध्यप्रांताला कौन्सिलांतील प्रत्येक जागा खरोखरी अक्षरशः काबीज करणें शक्य आहे. अशा स्थितींत जर आपल्याच्यानें त्या जिंकवल्या नाहींत, तर तो केवळ आपला आळस ठरेल.असे आळशी ठरूं नका एवढेंच माझें आपणांस शेवटीं सांगणें आहे.

# स्वराज्यपक्ष काय करणार ?*

[ता. १७–५–२३ रोजीं श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं दे. भ. बापुजी अणे ह्यांचें उमरावतीच्या जोग चौकांत झालेलें जाहीर व्याख्यान.]

## लढा काम केल्यानें मिटेल, वाद केल्यानें नाहीं.

" हिंदुस्थानांत मतवैचित्र्याचा देखावा कांहीं नवीन नाहीं. धर्माच्या बाबतींत आज किती तरी निरनिराळीं मतें प्रचलित असून सर्वांना सुखा-समाधानानें राहातां येत आहे. हा देखावा आपण प्रत्यक्ष पाहात असतां, राजकीय बाबींसंबंधीं अनेक मतें प्रचलित झालीं असतां, त्यांसंबंधीं आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं, अगर त्यामुळें वैषम्य वाटण्याचेंहि कारण नाहीं. जसजसा काळ लोटेल तसतशी ही मतवैचित्र्याची तीव्रता कमी होईल, व ती आपल्या अंगवळणीं पडेल. त्यामुळें कोणासहि अस्वस्थ वाटण्याचें कारण नाहीं. मला आज धर्मबाबींसंबंधानें बोलणें नाहीं. राजकीय मतांतरासंबंधीं मला एवढेंच म्हणावयाचें आहे कीं, ज्यानें त्यानें आपापल्या कामास सुरुवात करून तें कसून करावें यांतच हित आहे. एका पक्षानें दुसऱ्या पक्षाच्या हेतूसंबंधीं वृथा आरोप न करितां केवळ स्वतःच्या कामाकडे लक्ष दिल्यास, काम करण्यांत प्रत्यक्ष येणाऱ्या अडचणींमुळें दोन्ही पक्षांस ज्या साधारण अडचणी लागतील, त्यांमुळें निदान तेवढ्या बाबतींत एकमत होऊन लढा अधिक लवकर मिटण्याचा संभव आहे. माझें असें मत आहे कीं, लढा काम केल्यानें मिटेल, वाद केल्यानें मिटणार नाहीं. हल्लीं चालू असलेला लढा मुख्यतः कौन्सिलसंबंधानें आहे, हें सर्वांस माहीतच आहे. साधारण सर्व कौन्सिलांकडे जर आज पाहिलें तर कौन्सिलांत हल्लीं चार प्रकारचे लोक असलेले दृष्टीस पडतील.

## कौन्सिलांतील चार पक्ष

( १ ) हल्लींच्या सुधारणांचा उपयोग करून घेऊन त्यांतून जेवढा फायदा निघेल तेवढा बघावयाचा; फायदा न निघाल्यास तसेंच काम चालू

* 'उदय' उमरावती ता. २२।५।१९२३

ठेवावयाचें, व पुढें मागें कांहीं तरी हित होईल अशा आशेवर बसावयाचें असा एक पक्ष आहे. या पक्षास सरकारास विरोध करावयाचा नाहीं. हा मवाळांचा पक्ष असून आमच्या प्रांताच्या कौन्सिलमध्यें तरी निदान या मताचीं ९ किंवा १० माणसें आहेत, त्याहून अधिक नाहींत.

( २ ) दुसरा एक पक्ष असा आहे कीं, तो स्वतःच्या समाजापुरतें हित पाहातो. तेवढ्यापुरतें हित पाहिल्यानंतर इतर कामांत सरकारास साह्य करण्यास तो तयार आहे; मग त्यांत देशाचें हित होवो अगर न होवो.

( ३ ) तिसरा एक पक्ष असा आहे कीं, ज्यास कौन्सिलांत जाणें ही एक मानाची व जगांत भूषणावह गोष्ट वाटते एवढेंच. तेथें जाऊन मग देशाचें हित साधतां येवो अगर न येवो, त्याकडे त्याचें दुर्लक्षच असतें.

( ४ ) व चवथा पक्ष म्हणजे सरकारनियुक्त सभासद.

## विरोध करणारा पक्षच कौन्सिलांत पाठवा

या वर्गीकरणावरून असें स्पष्ट दिसतें कीं, सरकारला कसून विरोध करून केवळ देशाच्या हिताच्या दृष्टीनें काम करणारा असा यांत एकहि वर्ग नाहीं. कॉंग्रेसमध्यें कौन्सिल पार्टी म्हणून प्रसिद्ध झालेला जो वर्ग आहे, त्याची गोष्ट याहून अगदीं भिन्न आहे. आम्ही सरकारपाशीं स्वराज्याच्या हक्काच्या अगर ज्यापासून स्वराज्य खात्रीनें प्राप्त होईल व ज्यांत स्वराज्यप्राप्तीचें बीज आहे अशा मागण्या करणार आहोंत, व त्या मागण्या सरकारनें नाकारल्यास सरकारास शक्य तितका कसून सर्व परींनीं विरोध करणार आहोंत. हल्लीं नॉन्-को-ऑपरेशन या शब्दाचा जो अर्थ केला जातो, त्या केवळ पारिभाषिक अर्थान्वयें जरी यास नॉन्-को-ऑपरेशन म्हणतां आलें नाहीं, तरी त्यास को-ऑपरेशन कोणच्याहि अर्थानें खात्रीनें म्हणतां येणार नाहीं. एर्वीतेर्वी कौन्सिलें भरतातच व ओस पडत नाहींत, तर माझा असा सवाल आहे कीं, एका विशिष्ट पद्धतीनें देशाचें हित करूं पाहणारा पक्षच कौन्सिलमध्यें कां जाऊं नये ? व कोणातरी अपरिचित, कॉंग्रेसबाहेरील मनुष्यास मनसोक्त व्यवहार करण्यास कौन्सिलमध्यें पाठविण्यापेक्षां मीं सांगितलेल्या

प्रकारच्या धोरणानें, उघड उघड कॉंग्रेसमध्यें राहून कौन्सिलांत शिरूं पाहा-णाऱ्या पक्षास कॉंग्रेसमध्यें हल्लीं असलेल्या इतर पक्षांनीं मदत कां करूं नये? को–ऑपरेशन करण्याकरितांच जे जातात त्यांसच कौन्सिलमध्यें जाण्याची सवड करून द्यावयाची व नॉन्–को–ऑपरेशन प्रत्यक्ष कौन्सिलमध्यें आचरून दाखविण्यास जातों म्हणतात त्यांस अडथळा करावयाचा, असा हट्ट तरी कां असावा? हा हट्ट समजसपणाचा नाहीं.

## आम्हालाहि प्रयोग करून पाहूं द्या.

आमचा पक्ष कौन्सिलमध्यें गेल्यानंतर सरकारचा बनेल अशी एक कुशंका काढण्यांत येते. परंतु कुशंकेपलीकडे यास अधिक महत्त्व नाहीं. कारण जोंवर आमची पारख झाली नाहीं व जोंवर आम्हांस आम्हीं म्हणतों त्याप्रमाणें यत्न करण्यास सवड मिळाली नाहीं, तोंवर केवळ अशी शंका घेण्यानें शंका घेणाऱ्याच्या मनांतील असद्भाव तेवढा व्यक्त होतो, या पलीकडे कांहींहि नाहीं. आजपर्यंतच्या सर्व इतिहासांत राष्ट्रीय पक्ष कौन्सिलांत गेल्याचें उदाहरणच नाहीं आणि पूर्वेतिहासाच्या अभावीं पुढें काय होईल याविषयीं अनुमान करणें, हें अनुमान करणारांचें धाष्टर्य आहे. राष्ट्रानें प्रयोगादाखल महात्माजींना तीन वर्षें दिलीं. राष्ट्रीय पक्षासहि प्रयोगादाखल कां होईनात, हीं पुढील तीन वर्षें मिळालीं पाहिजेत, असें माझें म्हणणें आहे. कौन्सिलांत जाऊं नका म्हणणें व तदनुरोधानें काम करणें अत्यंत सोपें आहे. कारण त्यांत कांहींहि करण्याची जबाबदारी नाहीं. आमचें काम त्याहून अधिक बिकट आहे. कारण कांहीं तरी करून दाखविण्याची जबाबदारी आम्ही आमच्या शिरावर घेत आहों. प्रत्येक प्रांतांत आमचें संख्याबल वाढलें पाहिजे व बहुसंख्येनें आमचीं माणसें कौन्सिलांत गेलीं पाहिजेत. लोक आम्हांस विचारतात, तुम्ही अल्पसंख्येनें गेलांत व कौन्सिलांत तुमची बहुसंख्या झाली नाहीं तर तुम्ही काय कराल? कौन्सिलांत आमची जरी अल्पसंख्या झाली, तरीहि आम्हांस काम करण्याचे अनेक मार्ग आहेत. परंतु मी त्यांचा ऊहापोह येथें करूं इच्छित नाहीं. अल्पसंख्येविषयीं विचारच कां करावा हें मला कळत नाहीं. आम्ही बहुसंख्येनें जाऊं अशी माझी खात्री आहे व आमच्या बंधूंनीं आम्हांस

न जाऊं देण्याचा हक्क धरून आम्हांस खेंचून धरलें,व आम्हांस अल्पसंख्येनें जाणें भाग पाडलें, तर पुढें काय करावयाचें हें ठरविण्यास अद्याप अवकाश आहे. तथापि आम्ही अल्पसंख्येनें जरी गेलों, तरी मतदार लोकांस त्यांच्या हक्कांचें शिक्षण देण्याचें निवडणुकीपूर्वी जें आमच्याकडून काम होईल, तें काम कदाचित प्रत्यक्ष निवडणुकीपेक्षांहि अधिक महत्त्वाचें आहे असें मला वाटतें.

### आम्ही कायदेभंगाची भावना उत्पन्न करूं.

प्रत्येक मतदारास 'सरकारवर दाव घालण्याचा मजजवळ अधिकार आहे' ही पूर्ण जाणीव पटली पाहिजे व मी करीन तर या सरकारचा राज्यशकट बंद पाडीन, असा त्यास विश्वास उत्पन्न झाला पाहिजे.मतदारानें निवडून दिलेल्या प्रतिनिधींचें सरकार ऐकत नाहीं, असा जेव्हां वारंवार देखावा मतदारांच्या डोळ्यांपुढें होईल, तेव्हांच सिव्हिल डिस्ओबीडियन्सविषयींची भावना मतदारांच्या अन्तःकरणांत उत्पन्न होईल. आणि सिव्हिल डिस्ओबीडियन्स उत्पन्न करण्याची प्रतिज्ञा करून आज देशभर हिंडणाऱ्या लोकांपेक्षां सिव्हिल डिसओबीडियन्सची खरोखर परिस्थिति आम्ही कौन्सिलमध्यें जाऊन उत्पन्न केली, असें जेव्हां ही प्रतिज्ञा करणाऱ्यांच्या लक्षांत येईल, तव्हां त्यांना आमचें काम कबूल करावें लागेल व ही मंडळी करूं पाहाणाऱ्या कायदेभंगाची परिस्थिति खरोखर आम्हीं उत्पन्न करून दिली, म्हणून ही मंडळी आमच्याशीं सख्य करतील अशी मला दृढ आशा आहे. ही गोष्ट मतदार स्वस्थ बसून होणारी नसून, मतदारांस स्वतःच्या हक्कांची जाणीव उत्पन्न झाल्यानेंच होणारी आहे. जनता हक्कांची अंमलबजावणी करीत असतां, तीस विरोध आल्या-मुळें देशांत क्रांति घडत असते. हक्कांची अंमलबजावणी न केल्यानें क्रांति घडत नसते. नवा पक्ष काँग्रेस 'नंतर' स्थापन झाला, पण त्याच्या आधीं पक्षभेदाचें व्होटिंग बहुमतवाल्यांनीं गया काँग्रेसमध्यें केलें; व बहुमत-वाला म्हणून

### काँग्रेसमध्यें एक पक्ष आहे हें दाखवून दिलें.

तेव्हां अशा परिस्थितींत अल्पमताला जगण्याकरितांच वेगळा पक्ष स्थापन करणें भाग पडलें. गयेस कायदेभंग–चौकशी–कमिटीच्या सर्व सूचना ज्या झाणून पाडल्या गेल्या, त्या एका तत्त्वाला धरून, म्हणजे त्या सूचना पूर्ण

अप्रतिकाराच्या तत्त्वाला धरून नाहींत म्हणून, मुद्दाम हाणून पाडल्या गेल्या व परिणाम वाटेल तो होवो, अप्रतिकाराचें तत्त्व यत्किंचित्‌हि दुखवूं द्यावयाचें नाहीं, अशा हट्टानें हाणून पाडल्या गेल्या. आम्हांस अवश्य वाटणाऱ्या गोष्टींपैकीं तुम्ही कांहींच विचारांत घेणार नाहीं, तर आम्हांस नाइलाजानें नवा पक्ष काढावा लागेल, असें अल्पमतवाल्यांनीं सांगितलें होतें हें मी छपवून ठेवूं इच्छित नाहीं; पण बहुमतवाल्यांना जर टाळावयाचें असतें, टाळावयाची इच्छा असती, तर हें टाळणें त्यांच्या हातचें होतें. मुद्याच्या महत्त्वाच्या गोष्टी तर दूरच राहोत, पण कायदेभंग—चौकशी—कमिटींतल्या देशांतल्या सर्वांत मुख्य पांचसहा विचारी माणसांची नुसती अब्रू राखण्यापुरतेंहि बहुमतवाल्यांनीं कांहीं केलें नाहीं. आज अडीच तीन वर्षें देशांत सतत वाद झाला. व्हावयाचीच असती तर कोणत्याहि एका पक्षाची इतक्यांत समजूत झालीच असती. तेव्हां शब्दप्रामाण्यानें, शाब्दिक वादानें, हें आतां होत नाहीं हें पक्के ठरलें. पण आपण म्हणतों हें न झाल्यास देशाचें नुकसान आहे असें ज्यांस अजून वाटतेंच त्यांनीं काय करावयाचें? त्यांना आतां फक्त एकच मार्ग उरला आणि तो हा कीं, “ साखर कांहीं गोड नाहीं, पण वाटेल तें झालें तरी खात्री पटवून घेण्यासाठीं मी ती खाऊन कांहीं पाहाणार नाहीं ” असा वाद करणाऱ्या माणसाच्या तोंडांत बळेंच साखर कोंबली पाहिजे हा होय.

### शब्दापेक्षां वस्तुपाठच बरा

आतां आम्ही कौन्सिलांच्या बाबतींत काय म्हणतों, तें प्रत्यक्ष करून दाखविल्यावांचून, जनतेला वस्तुपाठानें शिकविल्यावाचून दुसरा मार्ग नाहीं. जनतेपेक्षां जनतेचे पुढारी किंवा प्रतिनिधी अधिक बुद्धिमान् किंवा समंजस असणार, असें म्हणण्यांत जनतेचा कोणताहि अपमान नाहीं. पुढाऱ्यांची किंवा प्रतिनिधींची व शिकलेल्यांची जर शब्दानें खात्री पटत नाहीं, तर जनतेचीहि शब्दानें खात्री पटणार नाहीं. तिला वस्तुपाठानेंच शिकविलें पाहिजे; तसें वागून करून दाखविलें पाहिजे.

गेल्या तीन वर्षांत हिंदु—मुसलमानांची एकी व इतर सर्व धर्मीयांची एकी जोरानें प्रतिपादन करण्यांत आली, व आज हिंदु—मुसलमानांची एकी बिघ-

ढत आहे म्हणून आक्रोश सुरू आहे. ज्या एकीकरितां इतके परिश्रम व इतका कंठशोष केला, ती एकी आज बिघडण्याचें कारण कौन्सिलमध्यें राष्ट्राचीं माणसें नसून, भलभलतीं माणसें शिरलीं हें होय. याकडे जावें तितकें लक्ष अद्यापि गेलेलें दिसत नाहीं. पंजाबमध्यें हिंदुमुसलमानांमध्यें झालेल्या बेबनावाची चौकशी करण्याकरितां जे पुढारी गेले होते, त्यांचें असें म्हणणें आहे कीं, या बेकीस खरोखरी सुरुवात कौन्सिलांत करण्यांत आली व राष्ट्रसेवेकडे दृष्टि न ठेवितां, स्वजातीच्याच सेवेकडे दृष्टि ठेवणारीं माणसें कौन्सिलांत असल्यामुळें व राष्ट्रहिताकडे न पाहतां त्यांनीं अयोग्य रीतीनें ज्ञातिविषयक प्रश्नांचा विचार केल्यामुळें, हिंदु-मुसलमानांच्या लढयानें कौन्सिलच्या रिपोर्टांतील भाषणें ओतप्रोत भरलेलीं दिसतात. ज्ञातिज्ञातींचा प्रश्न एकीकडे ठेवून, हिंदुस्थानच्या हिताकडे लक्ष देणारीं माणसें कौन्सिलांत गेलीं पाहिजेत व प्रातिनिधिक संस्था कार्बीज करण्याची गोडी जनतेस लाविली पाहिजे."

# दिल्ली कॉंग्रेस व कौन्सिलप्रवेश*

[ यवतमाळ येथील सार्वजनिक गणेशोत्सवमंडळामार्फत ता. २२ सप्टेंबर १९२३ रोजीं, टाऊन हॉलमध्यें श्री. भीमराव हणमंत जतकर यांच्या अध्यक्षतेखालीं दे. भ. बापूजी अणे यांचें हें व्याख्यान झालें. ]

आज देशांत राजकीय असे चार पक्ष आहेत, ( १ ) असहकारितावादी, ( २ ) स्वराज्यपक्ष, ( ३ ) नेमस्त व ( ४ ) बेझण्टपक्ष. आज देशांत जी परिस्थिति निर्माण झालेली आहे, तिचा विचार करितां, सदरहु चारहि पक्षांचा समेट, ऐक्यमत होण्यास मदत करील, अशा थोर व राष्ट्रैक्य बुद्धीनें राष्ट्रीय सभेच्या सेक्रेटरीनें चारहि पक्षांच्या पुढाऱ्यांची परिषद दिल्ली येथें भरविण्याचें ठरवून, त्याप्रमाणें त्यांना निमंत्रणें पाठविलीं होतीं. केनिया प्रश्नामुळें मवाळ व बेझण्टपक्ष यांतील पुढाऱ्यांच्या उद्गारांवरून ऐक्याचा मार्ग निघेल असा संभव वाटत असल्यामुळें पुढाऱ्यांची परिषद बोलावली होती. परंतु अत्यंत खेदाची गोष्ट ही कीं, कॉंग्रेसमधील दोन पक्षांच्या नेत्यांशिवाय इतर पक्षांचे पुढारी सभेस हजरच राहिले नाहींत ! यावरून त्या पक्षांतील पुढाऱ्यांमध्यें औदार्याचा अभाव असल्याचें दिसून आलें, इतकेंच नव्हे तर राष्ट्रीय सभेच्या निमंत्रणाचा अपमान अगर उपेक्षा करण्यांत आपण देशहिताची बेपर्वा करीत आहोंत, याचेंहि भान त्यांना राहिलें नाहीं. सुमारें दीड वर्षापूर्वीं मुंबई येथें सर शंकरन् नायर यांच्या अध्यक्षतेखालीं भरणाऱ्या, सर्व राजकीय पक्षांच्या प्रातिनिधिक परिषदेस हजर राहण्याबद्दल कॉंग्रेसपक्षास निमंत्रण आलें असतां तो पक्ष त्या सभेस हजर राहिला. यावरून राष्ट्रैक्याबद्दल उदार व अनुदार वृत्ति कोणाची आहे, हें स्पष्ट दिसून येईल. नेमस्त व बेझण्ट पक्षांच्या ठिकाणीं राष्ट्रीय सभावाल्यांच्यासंबंधीं उदार वृत्ति नसल्यामुळें, पुढाऱ्यांच्या परिषदेचा उपयोग झाला नाहीं, याचा दोष त्यांच्याकडे असतांना, पुढाऱ्यांमध्यें समेट झाला नाहीं, अशी द्वाही फिरविण्यांत ॲंग्लो-इंडियन पत्रकारांना कांहींच

---

* 'लोकमत' यवतमाळ ता. २८–९–२३.

दिक्कत वाटली नाहीं. ह्या परिषदेंत जो समेट व्हावयाचा होता, तो चारहि राजकीय पक्षांत व्हावयाचा होता; त्यांपैकीं दोन पक्ष परिषदेस हजरच राहिले नाहींत, तर समेट झाला नाहीं अशीं कंडी पिटविण्यांत काय साधतां येईल तें पाहावें, असा ॲंग्लो-इंडियन पत्रकारांचा नेहमींचाच कावा असतो, त्याला अनुसरूनच त्यांनीं ती बातमी पसरविली. पण त्यांचा कांहींच संबंध राष्ट्रीय सभेंतील पक्षांच्या समेटासंबंधीं नव्हता, इतकेंच मला या पुढाऱ्यांच्या परिषदेविषयीं व ॲंग्लो-इंडियन पत्रकारांसंबंधानें सांगावयाचें आहे.

## कौन्सिलसंबंधीं कॉंग्रेसचें धोरण

दिल्ली कॉंग्रेसमध्यें कौन्सिलप्रवेशाचा प्रश्न दुसऱ्या एका प्रश्नावर अवलंबून होता व तो प्रश्न म्हणजे बंगाल प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या दोन सभांपैकीं कोणती सभा कायदेशीर आहे हा होय. एका सभेची बाजू मांडणारे दे. बं. दास असून दुसऱ्या बाजूनें बानर्जी होते. विषयनियामक कमिटीनें पं. मदन मोहन मालवीय यांस निकाल देण्याकरितां नेमलें होतें. परंतु कॉंग्रेसमध्यें कायदेपंडितांचें प्राबल्य असल्यामुळें, पं. मदन मोहन मालवीय यांच्या या प्रश्नासंबंधानें अधिकारमर्यादेचा प्रश्न निघाला व अखेर निर्णय विषयनियामक कमिटींत होऊन, दे. बं. दास यांच्या पक्षाची सभा हीच खरी प्रां. कां. क. ची कायदेशीर सभा ठरली व अशा रीतीनें ७०० प्रतिनिधींची संख्या समेटाच्या प्रश्नास चालन देण्यास मिळाली. त्याबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, मौ. महमदअल्ली हे व्यक्तिश: कौन्सिलप्रवेशास अनुकूल नव्हते, तथापि समेट व्हावा अशा मताचे ते असल्यामुळेंच तडजोड शक्य झाली. दोन्ही पक्षांना असहकारितेचीं तत्त्वें कबूल आहेत, पण तत्त्वांच्या अर्थभिन्नतेमुळें त्यांच्यांत साहचर्य राहूं नये, या मताचे ते नसल्यामुळें समेट शक्य झाला. असहयोगांत प्रतिकार आहे कीं नाहीं, हा वादाचा मुद्दा होता; पण तेवढ्यामुळें दोन्ही पक्षांना कॉंग्रेसमध्यें बसून काम करण्यास अडचण पडूं नये. वैदिक धर्मांतील द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत अशा भिन्न मतानुयायांना एकत्र साहचर्यानें राहणें जसें कठीण नाहीं, अगर मुसल्मानी धर्मांतील भिन्न

मतानुयायांना एकाच कुराणाच्या आधारें आपलीं मतें व आचार संभाळून एकत्र नांदतां येणें शक्य आहे, तीच स्थिति या वादग्रस्त असहकारासंबंधानें आहे. म्हणूनच त्या तत्त्वानुसार सर्वंकष असा ठराव विषयनियामक कमिटींत पास झाला. त्या ठरावांत असहयोग कायम ठेवून व्यक्तिस्वातंत्र्य मान्य करण्यांत आलें आहे. त्या व्यक्तिस्वातंत्र्याला योग्य मर्यादा घालून तो ठराव अखेर राष्ट्रीय सभेनें पास केला आहे. स्वराज्यपक्षाचें प्रचंड बहुमत असतांना समेटच कसा झाला असा प्रश्न उत्पन्न होतो. पण

## ऐक्याकरितां समेट हाच मार्ग आहे.

स्नेह राखण्याकरितां समेटाची, तडजोडीची, जरूरी उत्पन्न होते. देशकार्याकरितां भांडणें मिटवावीं लागतात, तीं जिवंत ठेवून चालत नाहीं, हें स्वराज्यपक्ष पूर्ण जाणून असल्यामुळें व तदर्थ समेट हाच योग्य मार्ग आहे असे त्या पक्षास वाटत असल्यामुळें, सर्व दुरुत्तरें सहन करून, उत्तरें देण्याची संधि असतां तोंडास खीळ घालून, सर्वस्वीं आपल्या इच्छेप्रमाणें ठराव पास करून घेण्याची ताकद असतांना, 'असहयोग' ज्या एकीकरणाकरितां निघाला असें महात्माजी सांगतात, त्या तत्त्वाचे पूर्ण रहस्य जाणणारा स्वराज्यपक्ष असल्यामुळें, त्यांनीं उदार मनानें समेट केला हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. 'असहयोगी' म्हणून टेंभा मिरविणारांना तो कळला नाहीं असेंच म्हणणें प्राप्त आहे.

## स्वराज्यपक्ष काय करणार ?

कौन्सिलें ही बाहेरच्या चळवळीला व्यत्ययकारक होऊं नयेत अशी खटपट करून तीं बंद तरी पाडलीं पाहिजेत, किंवा तीं दुरुस्त तरी केलीं पाहिजेत. कौन्सिलें उध्वस्त करावयाचीं म्हणजे कांहीं तेथील भिंती पाडावयाच्या नाहींत, अगर गव्हर्नरला तेथून उचलून बाहेर आणून ठेवावयाचें नाहीं! सुधारणाकायद्यान्वयें कौन्सिलचा कारभार बंद पाडून एकट्याच्या इच्छेनें, एकतंत्रानें, परकीय नोकर म्हणून, परकीय सत्तेचा प्रतिनिधि म्हणून, गव्हर्नरला अगर गव्हर्नर–जनरलला कारभार करावयास भाग पाडणें, अगर कायद्यांत आमच्या इच्छांस अनुसरून योग्य त्या दुरुस्त्या करण्यापर्यंत त्याचा पर्यायानें

ब्रिटिश पार्लमेंटवर दाब आणणें, असा कौन्सिलें उध्वस्त करण्याचा अर्थ आहे. लोकांच्या इच्छांप्रमाणें कारभार चालला नाहीं हें सिद्ध करण्यास कौन्सिलांच्या आंत व बाहेर चळवळ केली पाहिजे. स्वत: मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं. तसेंच स्वतः मेल्याशिवाय, झिजल्याशिवाय, राजकीय मोक्ष नाहीं, हें लक्षांत ठेवा. देशांत ऐक्य पाहिजे व कौन्सिल चळवळीलाहि इतर चळवळींप्रमाणें ऐक्य पाहिजे. बाहेरच्या चळवळीला तेज येण्याकरितां तिचा नाद कौन्सिलांच्या चार दिवालींच्या आंतूनहि दुमदुमला पाहिजे. ह्या कौन्सिलच्या कामाकरितां जसें देशांत ऐक्य पाहिजे, तशीच त्याला परदेशांतील लोकांची नैतिक सहानुभूतिहि पण पाहिजे आहे. याचीं उदाहरणें म्हणजे सशस्त्र बंडानें स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न करणारें आयर्लंड व इजिप्त हीं पाहा. प्रयत्न सशस्त्र असो, वा निःशस्त्र असो, परकीय देशाची सहानुभूति हा यशःप्राप्तींतला एक आवश्यक भाग आहे असा स्वराज्यपक्षाचा विश्वास आहे, व तो त्या दिशेनें प्रयत्न करणार आहे. हिंदुस्थानचा कारभार तेथील लोकांच्या संमतीनें कायदेकौन्सिलच्या द्वारें चालतो, असा डांगोरा ब्रिटिश पार्लमेंटकडून पिटला जात असतो. तो बंद करून वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान परदेशांस करून देणें हें राजकीय चळवळीचें एक प्रमुख अंग आहे. सरकारी 'नाटक' उघडें करून दाखविणें, 'कौन्सिलचें रूपडें' बाहेरील जगासमोर त्याच्या नागड्या स्वरूपांत मांडणें इष्ट आहे. ज्या रीतीनें स्वराज्यपक्ष कौन्सिलें मोडतो असें म्हणत आहे, त्याची खरी माहिती परदेशांत प्रसृत करणें हें त्या चळवळीला पोषकच होणार आहे.

## जें करावयाचें त्याची वाच्यता कशाला?

"तुम्ही कौन्सिलें कशीं मोडणार?" असाहि प्रश्न विचारण्यांत येतो. राजकारणाच्या दृष्टीनें त्याचा ऊहापोह न करणेंच बरें. ज्या गोष्टी करून सोडावयाच्या असतात त्यांची वाच्यता उपयोगी तर नाहींच, पण कार्याची हानि करणारी असते. असा प्रश्न कोणी करूं नये व त्याचें उत्तरहि कोणी देऊं नये हें बरें; पण त्याची थोडीशी कल्पना अशी करा कीं, "अधिकाराच्या जागा स्वराज्यपक्षीयांनीं न–स्वीकारणें" असा एक आमच्या पक्षाच्या कार्यक्रमांत

निर्बंध आहे. त्याला धरून कोणी दिवाणगिरी किंवा दुसरी अधिकाराची जागा स्वीकारली नाहीं, तर कायदेशीर रीतीनें कौन्सिलचें कामच होऊं शकत नाहीं. पण ही रीत यशस्वी करणें, स्वराज्यपक्षीयांचें कौन्सिलांत बहुमत होण्यावर अवलंबून आहे. स्वराज्यपक्षीय सभासद दिवाणगिरीवर नेमला जाणार नाहीं हें जितकें खरें, तितकेंच बहुमताचा पाठिंबा नसतांना दिवाणाला आपलीं खातीं चालवितां येणार नाहींत हेंहि खरें आहे. त्याला एकतर राजीनामा द्यावा लागेल, किंवा स्वराज्यपक्षीयांत मिसळून जावें लागेल; म्हणजे काय चमत्कार, काय दृश्य तेथें दिसेल तें पाहा! असा प्रसंग उत्पन्न झाल्यावर देशाची एकच मागणी एकमुखानें करायला व ती अंमलांत आणण्याकरितां कराव्या लागणाऱ्या चळवळीला, कौन्सिलांत व बाहेर अनुकूल असें वातावरण उत्पन्न होईल, व त्याचकरतां देशांत ऐक्याची, व स्वराज्यपक्षाचे अनुयायी कौन्सिलांत निवडून पाठवून त्यांचें तेथें बहुमत करण्याची आवश्यकता आहे. गेल्या तीन वर्षांतील कौन्सिलांचा अनुभव पाहा. कांहीं तेथें शिष्ट म्हणून मिरविण्याकरतां, कांहीं स्वार्थ साधण्याकरतां, कांहीं 'पंडित' म्हणून तेथें गेले. अशा निरनिराळ्या हेतूनें तेथें गेलेल्यांच्या हातून कांहीं एक राष्ट्रकार्य झालें नाहीं; इतकेंच नाहीं,पण बादशाही जाहीरनाम्यास अनुसरून सरकारपक्षाशीं सहकार्य करण्याकरितां जे गेले, ते तोंडघशीं मात्र पडले! मवाळांनीं सरकारशीं सहकार्य करून लष्करी खर्च, पगारवाढ, करवाढ वगैरे कृत्यांना संमति दिली.पण दिवाणांकडे सोपविलेलीं खातीं शिक्षण, आरोग्य या बाबतींत मवाळपक्षास यश आलें नाहीं; न्याय व अंमलबजावणी या खात्यांची फारकत करतां आली नाहीं. सारांश, सरकारनें मवाळपक्षाच्या सहकार्याचा पूर्ण फायदा घेतला, पण मवाळांना मात्र सरकारकडून उलट प्राप्ति कांहींच झाली नाहीं. मवाळांचें कौन्सिलसंबंधीं कार्य व धोरण हीं सपशेल अयशस्वीं झालीं आहेत.म्हणून लोकमान्यांनीं रिस्पॉनसिव्ह को-ऑपरेशन या शब्दानें जें उत्तर बादशाही जाहीरनाम्याला दिलें होतें, तेंच एक धोरण कौन्सिलांच्या बाबतींत योग्य व मुत्सद्देगिरीचें आहे असाच अनुभव येत असल्यामुळें, त्या संबंधानें देशांतील अनेक राजकीय संस्थांच्या कार्यक्रमापेक्षां स्वराज्यपक्षाचा कार्यक्रम हाच तर्कशास्त्रदृष्ट्या सर्वांत योग्य आहे,

असें दिसून येईल. हाहि एक प्रयत्न करून [illegible] [illegible]करितां हा समेट घडवून आणण्यांत आला आहे. दिल्ली काँग्रेसनें समेटाचा ठराव पास केल्यानें राष्ट्रीय पक्षांतील पुढाऱ्यांच्या बुद्धीचें व मुत्सद्देगिरीचें खोबरें निघालें नाहीं असें आमच्या हितशत्रूंच्या डोळयांना दिसलें ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे.

## राष्ट्रीयसभावालेच खरे लोकप्रतिनिधि

समेट झाला एवढयानेंच कार्यभाग होत नाहीं. आतां यापुढें राष्ट्रीय सभा-भक्तांनीं राष्ट्रीय सभेंतील स्वराज्यपक्षाचे उमेदवार येत्या निवडणुकींत निवडून येतील असा प्रयत्न केला पाहिजे. कौन्सिलप्रवेशासंबंधानें ज्यांना धर्म किंवा सदसद्विवेकबुद्धि आडवी येत असेल, त्यांनीं इवें तर स्वस्थ बसावें; पण ज्यांना काँग्रेसची इज्जत व इभ्रत अत्यन्त मौल्यवान् वाटते, अशा कट्टर असहकारितावादी काँग्रेसभक्तांनीं या कार्यांत प्रत्यक्ष भाग घेऊन तेच उमेदवार निवडून येतील अशी खटपट हस्तें परहस्तें केली पाहिजे. काँग्रेसची इज्जत संभाळण्याच्या वेळीं कौन्सिलबहिष्कारार्थ त्यांनीं जशी मनोभावें खटपट केली, तशीच आतां कौन्सिलप्रवेशार्थ त्यांनीं खटपट केली पाहिजे. निवडणुकीचा झगडा सरकारपक्ष व राष्ट्रीयसभापक्ष यांमध्यें आहे. सामान्य जनतेच्या मनावर सरकारपेक्षां राष्ट्रीय सभेच्या मतांची छाप जास्त आहे हें या निवडणुकीच्या वेळीं सिद्ध व्हावयाचें आहे; लोकप्रतिनिधि म्हणून कौन्सिलांत बसण्याचा अधिकार राष्ट्रीय सभावाल्यांसच आहे, इतरेजनांस नाहीं, हें सिद्ध करण्याचा प्रसंग आला आहे, व या निवडणुकी यशस्वी करून सर्व जनता सरकारास योग्य तें उत्तर आपल्या कृतीनें देईल अशी मला आशा आहे.

# श्री समर्थांची शिकवणूक *

श्रीरामदास नवमीच्या निमित्तानें २४ फेब्रुवारी १९२४ रोजीं संध्याकाळीं ६॥ वाजतां शिवराम थिएटरमध्यें तपस्वी डॉ.बाबासाहेब परांजपे यांचें अत्यंत तेजस्वी व्याख्यान झाल्यानतर समारोप करतांना अध्यक्ष द. भ. बापूजी अणे म्हणाले:—

बाबासाहेबांनीं एकाहि पुस्तकाचा आश्रय न घेतां श्रीसमर्थांच्या चरित्राचें जें विवेचन केलें तें इतकें तंतोतंत व सुंदर आहे कीं, भाराभर पुस्तकें वाचून बोलणारांनाहि त्यांत कांहीं भर घालतां येईल असें मला वाटत नाहीं. आणि पुस्तकांच्या आश्रयानें व खुद्द समर्थांच्या शब्दांत जर कोणाला त्यांचें चरित्र समजावून घ्यावयाचें असेल, तर त्यांनीं शंकरराव देवांचा दासबोध घेऊन त्याची प्रस्तावना वाचावी,अशी मी शिफारस करितों. बाबासाहेबांनीं केलेल्या विवेचनावरून असें दिसून येईल कीं,रामदासांनीं त्या वेळेस केलेल्या कार्याच्या योगानें महाराष्ट्रामध्यें अंत:करणाचा असा उदारपणा व मनाचा असा थोरपणा उत्पन्न केला होता कीं, कांहीं बाबतींत मतभेद जरी असले तरी ते पोटांत ठेवून माननीयांचा श्रेष्ठपणा कबूल करण्याची बुद्धि महाराष्ट्रीयांमध्यें उत्पन्न झाली होती. इतर सर्वसामान्य साधुवर्गाहून रामदासांचा पंथ भिन्न होता हें सर्वसंमत आहे. पण ह्या भिन्नतेमुळें लोकांनीं त्यांना 'हे साधूच नव्हत' असें कधीं मानलें नाहीं. त्यांचा संप्रदाय जरी वेगळा असला, तरी हेहि उच्च कोटीचे श्रेष्ठ पुरुष व बाकीच्या साधूंइतकेच वन्दनीय मानावेत हा थोरपणा महाराष्ट्रीयांच्या अंगीं बाणलेला होता. हे साधूच नव्हत असें त्या वेळच्या लोकांनीं म्हटलें असतें, तर तें त्यांना फारच सोईचें झालें असतें ! कारण, इतर साधुसत्पुरुषांपेक्षां समर्थांचा जर कांहीं विशेष असला तर तो हा कीं, बाकीचे सगळे सत्पुरुष आपल्या धोपट मार्गानें जात असून, समर्थांनींच तेवढा आपला वेगळा पंथ आंखला होता व तो हा कीं ते "बंडखोर" शिवाजीचे गुरु होते ! 'माझा मंत्र घे' असें त्यांनीं शिवाजीस म्हटल्याचा कोठें दाखला नाहीं, पण तो शिष्य बनल्यानंतर असल्या,

---

*'लोकमत' यवतमाळ ता. २९-२-२४

म्हणवून घेण्यांत त्यांना अभिमान वाटे! हा त्यांच्यांत व इतर साधूंत महत्त्वाचा फरक आहे. ह्यामुळें त्यांना त्या काळीं "समर्थ" ही अन्वर्थक पदवी प्राप्त झाली. समर्थांना शिवाजी हा शिष्य मिळाल्यानंतर त्यांनीं आपल्या संचारांत शिवाजीचें नांव घेण्यास, त्याची माहिती सांगण्यास किंवा त्याच्या कार्याचा प्रसार करण्यास कमी केलें नसलें पाहिजे हें उघड आहे. शिवाजीविषयीं पोटांतून तर प्रेम आहे, पण उघडपणें त्याच्या नांवाचा किंवा कार्याचा उच्चार करण्याची काय जरूरी, असा कोता विचार करणारे समर्थ नव्हते. अशा रीतीनें जेथें जेथें म्हणून समर्थांचें शिष्य-मंडळ स्थापन झालें, तेथें तेथें शिवाजीच्या कार्यासंबंधीं माहितीचा प्रसार झाला असला पाहिजे; अर्थात् आज हजारों रुपये खर्च करून, पब्लिसिटी ब्यूरो जें कार्य करीत आहे, तें कार्य एक छदामहि न घेतां केवळ कार्यप्रेमा-स्तव समर्थांनीं केलें. समर्थांनीं राजकारण केल्याचा पुरावा अजूनपर्यंत उपलब्ध नाहीं, पण त्यांना माहीत होतें कीं, संघशक्ति म्हणजे एक प्रकारची बंदुकीची नळी आहे. जवळ खंडोगणतीं दारूगोळा तयार असून तो ज्या द्वारें सोडावयाचा त्या नळ्या तयार नसल्या तर तो फुकट जातो; म्हणून या संघशक्तीचा कोणी तरी उपयोग करीलच हें जाणून त्यांनीं संघशक्तीच्या नळ्या महाराष्ट्रभर तयार करून ठेविल्या. तपस्वी बाबासाहेबांनीं सांगितल्या-प्रमाणें यांतच समर्थांच्या शिकवणीचें रहस्य भरलेलें आहे. पण त्यांचे हें रहस्य न जाणतां अनुकरण केलें तर तेंहि सर्व काळ हितावह होणार नाहीं. रामदासांनीं मारुतीच्या मूर्ती स्थापिल्या म्हणून आपण आजहि तेंच कार्य हातांत घेऊं असें जो म्हणेल तो अंधानुयायीच ठरेल. तो मूर्ती स्थापील, पण रामदासमात्र होणार नाहीं. ज्यावेळेस जी गोष्ट करणें समाजाच्या हिताचें असते, त्यावेळेस ती गोष्ट करण्यांत खरी कर्तबगारी व श्रेष्ठता असते. शहाजहा-नाला अनुकूलता, हौस, फुरसत व पैसा होता म्हणून त्यानें ताजमहाल बांधला; त्याचें अनुकरण करून आज जर कोणी त्याची प्रतिकृति उठवून देऊं लागला, तर त्याला आज कोणी शहाजहान म्हणेल काय? त्याच-प्रमाणें केवळ उच्च तत्त्वांची घोषणा करून मला करावयाचें तें कार्य

उत्कृष्ट सामुग्री मिळाल्यानंतरच करीन, नाहीं तर करणार नाहीं, असा आग्रह जर कोणी धरून बसेल तर तोहि 'समर्थ' पदवीस योग्य ठरणार नाहीं. ज्या वेळेस जी सामुग्री उपलब्ध असेल, त्यावेळेस तीच आपल्या इष्ट कार्याला अनुकूल करून घेऊन उपयोगी लावतां येईल तोच खरा श्रेष्ठ व कुशल नेता म्हणावयाचा. पवित्रपणाच्या नांवाखालीं

**गंगोदकाच्या चिखलानेंच घर बांधीन,**

असा आग्रह जो कोणी धरील त्याची गंगाजलाची कावड वर्षांतून दोनदां देखील येण्याची मारामार ! तिकडून कावड येते तों पहिला चिखल वाळलेला ! एवंच, त्याचा चिखल कांहीं तयार व्हायचा नाहीं व घर बांधण्यास सुरुवात व्हायची नाहीं. पवित्रपणाचें असें सोंग करूं पाहणाराचे जन्मच्या जन्म जातील, पण घर तयार व्हायचें नाहीं. यापेक्षां घर तयार व्हावें अशी ज्याला इच्छा असेल तो असें म्हणेल कीं, गंगा पवित्र आहे तर तिला मी वंदन करितों, पण माझें घर बांधून द्यायला ती माउली कशाला हवी ? म्हणून आपल्या घराचा चिखल गंगोदकानें तयार करण्याच्या भानगडींत न पडतां तो म्हणेल कीं, माझ्या गांवांतील खाऱ्या पाण्याची विहीर किंवा डबकें मला चालेल, पण गंगोदक नको ! असला कार्यकुशल मनुष्य गंगाजल आणणार नाहीं हें खरें, पण घर बांधण्याचा आपला हेतु पुरवून घेईल हें खास ! समर्थांनीं तरी हेंच केलें. आपणांस पाहिजे अशा सामुग्रीच्या सिद्धतेची वाट पाहात न बसतां त्यांनीं तयार असलेल्या सामुग्रीचा आपल्या कामीं उपयोग केला, व यांतच त्यांचें 'समर्थपण' सांठविलेलें आहे. माझ्या मतें हीच त्यांची खरी शिकवणूक आहे. अनुकूल सामुग्री केव्हां उत्पन्न होईल व तिचा मी केव्हां उपयोग करून आपलें कार्य साधीन, अशी वाट पाहात न बसतां, उपलब्ध असलेल्या सामुग्रीचा आपल्या कार्याकडे उपयोग करण्यांतच खरें चातुर्य आहे, व हें चातुर्य समर्थांनीं दाखविलें म्हणूनच त्यांना त्यांच्या काळांत 'समर्थ' पद प्राप्त झालें, व त्यांच्या नांवाबद्दल व कृतीबद्दल आपणांस आजहि पूज्यभाव वाटत आहे.

---

# मतें कोणास द्यावींत ? *

७ डिसेंबर १९२४ रोजीं संध्याकाळीं ४॥ वाजतां राळेगांव येथें भगवंतराव इंगळे यांच्या घरासमोरील पटांगणांत, श्री. माधवराव कोल्हे, एम्. एल्. सी. यांच्या अध्यक्षतेखालीं दे. भ. बापूजी अणे यांचें "भावी निवडणुकींत कोणास मतें द्यावींत ?" या विषयावर पुढील भाषण झालें. ते म्हणाले:—

## मतदान ही काय वस्तु आहे ?

मतदारांच्या याद्या प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांत तुमचीं नांवें आहेत. आपणांस साहजिक असा प्रश्न पडेल कीं, माझें नांव त्या यादींत कां ? मतदान ही काय वस्तु आहे ? मतदार हा शब्द हिंदुस्थानांत अगदीं नवा आहे. मताला काय किंमत आहे याची कल्पना आपण इंग्लड, फ्रान्स, अमेरिका, जर्मनी वगैरे देशांतील राज्यकारभाराकडे पाहाल तर आपणांस बरोबर येईल. त्या देशांतून मतदार होणें म्हणजे स्वतःची इज्जत समजतात. तें भूषण आहे असें मानण्यांत येतें. इग्लंडनें गेल्या शंभर वर्षांत सहा सात वेळां मतदानाचा हक्क वाढविण्याचे कायदे पार्लमेंटकडून पास करून घेतले. कां ? तर देशाचा राज्यकारभार चालविण्याच्या कामीं मताला त्या देशांतून किंमत आहे म्हणून. तशी किंमत आपल्या हिंदुस्थान देशांत मताला गेल्या ४।५ वर्षांत येऊं लागली आहे. ती वाढविण्याचें काम आपलें आहे. इंग्लंड, मताच्या जोरावर ७०० मुखत्यार पार्लमेंटांत पाठवून आपला कारभार त्यांच्या मार्फत चालवितें. आपणांला आपले मुखत्यार निवडून त्यांच्या मार्फत जिल्ह्याचा कारभार चालवायचा आहे.

## 'खुंटीवरच्या कावळ्यां'चें राज्य

आज स्थिति कशी आहे ती पाहा. आपल्या जिल्ह्याचा सर्व कारभार एक डेप्युटी कमिशनर पाहतो. तो पगारी नोकर आहे. इंग्लंडचे लोक आपल्या ७०० मुखत्यारांमार्फत पार्लमेंटच्या द्वारें हिंदुस्थानचा राज्यकारभार चालवीत आहेत; तो या नोकरामार्फत चाललेला आहे. इंग्लंडचा कारभार पार्ले-

* 'लोकमत' यवतमाळ ता. १९-१२-२४

मेंटतर्फे चालतो, तथापि त्या देशाचे लहान गट करण्यांत आले आहेत. त्यांचा कारभार कौंटी कौन्सिलमार्फत चालविला जातो. त्याचप्रमाणें हिंदुस्थानचा कारभार चालविण्याकरितां जिल्हानिहाय डेप्युटी कमिशनर नेमले आहेत. परंतु त्या देशांत मतदारांनीं निवडून दिलेल्या मुखत्यारांमार्फत कौंटीचा कारभार चालतो. म्हणजे तेथें लोकशाही ऊर्फ प्रजासत्ताक राज्यपद्धति आहे, तर येथें डेप्युटी कमिशनरसारख्या "खुंटीवरच्या कावळ्या" प्रमाणें असलेल्या मनुष्याकडून जिल्ह्याचा कारभार हांकला जातो! म्हणजे येथें एकतंत्री राज्यपद्धति आहे. यालाच "उंटावरून शेळ्या हांकणें" म्हणतात! जिल्ह्याच्या सुखदुःखांचा मालक डेप्युटी कमिशनर! राळेगांवला तारऑफिस पाहिजे किंवा नको, अगर गुरांचा दवाखाना पाहिजे कीं नको, किंवा नापिका आहे कीं नाहीं हें सर्व ठरविण्याचा अधिकार एकट्या डेप्युटी कमिशनरला आहे. एकटा मनुष्य सर्वज्ञ असूं शकत नाहीं. तो म्हणेल तें खरें! त्यानें नको म्हटलें कीं नको. सारांश, तो करील ती पूर्वदिशा! असा प्रकार येथें आहे. ही स्थिति आम्हांला बदलायची आहे. जिल्ह्याच्या सुखदुःखांचा विचार एका मनुष्याच्या लहरीवर न ठेवतां, लोकांनीं निवडून दिलेल्या मुखत्यारांवर सोपवायचा आहे. ज्याप्रमाणें वरिष्ठ सरकारास एखादी बाब जिल्ह्यांत करावयाची झाल्यास डेप्युटी कमिशनरास विचारण्यांत येतें, त्याचप्रमाणें जिल्हाबोर्डास विचारण्यांत आलें पाहिजे. जिल्हाबोर्ड म्हणेल ती गोष्ट खरी, इतरांच्या म्हणण्यास किंमत नाहीं, असे हक्क संपादन करण्याची वेळ आली आहे.

## प्रतिनिधी निर्भय असावेत

हल्लीं देशांत सुरू असलेल्या स्वराज्यसंपादनाचा हाच अर्थ आहे. वरील प्रकारचा हक्क संपादन करून जिल्हाबोर्ड हेंच जिल्ह्याचें मुख्य व मुखत्यार अशी स्थिति आपणांस प्राप्त करून घ्यावयाची असल्यास, आपण लोकलबोर्डाच्या येत्या निवडणुकींत निर्भय मताचीं माणसें निवडून पाठवा. जिल्ह्यांतील लोकांना जी गोष्ट पाहिजे, त्याबद्दल डि. बो. ला विचारण्यांत आलें पाहिजे. एका मनुष्यास विचारूं नका असें धैर्यानें म्हणणारे लोक येत्या

निवडणुकींत आपण निवडा. तुम्ही त्याला आपल्या कामाचा जाब विचारूं शकाल, त्याला आपल्यासमोर आपल्या कामाचा अहवाल द्यावा लागेल, त्यावेळेस त्याला लायक अगर नालायक म्हणण्याचा आपणांस अधिकार आहे; यालाच मताचा अधिकार म्हणतात. आपले असलेले अधिकार संभाळून, अधिक अधिकार मिळविण्यास मदत करूं शकतील असे दमदार उमेदवारच निवडून पाठवा. तोंडपुजे पाठवूं नका. परवांचेंच उदाहरण पाहा. ना. गव्हर्नर सर फ्रँक स्लाय यांना मानपत्र देण्यासंबंधीं ठराव यवतमाळ जिल्हाबोर्डांत आला, तो बहुमतानें नापास झाला. लोकांवर रुसून बसलेल्या गव्हर्नरला मानपत्र द्या कां ? प्रश्न लहानसा पण फार महत्वाचा आहे. लोकांनीं निवडून दिलेल्या कायदेकौन्सिलच्या सभासदांना आपला हक्क, कौन्सिलची बैठक न बोलावून बजावूं देण्यास जो मनुष्य—जो गव्हर्नर तयार नाहीं, रुसून बसतो, त्याला मानपत्र देणें म्हणजे वऱ्हाडांतील मतदारांचा अपमान करणें आहे. असे लहान मोठे प्रश्न बोर्डापुढें येतात; अशा परीक्षेच्या वेळीं लोकमताची बाजू संभाळणारे निर्भय वृत्तीचे सभासद निवडून पाठविण्याची जबाबदारी मतदारांवर येऊन पडली आहे. आपल्याला सरकारशीं युक्तीनें भांडायचें आहे. ज्या संस्था सरकार आपल्या ताब्यांत ठेवूं पाहातें, त्या लोकांनीं आपल्या कबज्यांत प्रथम घेतल्या पाहिजेत. तालुकाबोर्ड, जिल्हाकौन्सिल, म्युनिसिपालिटी, कायदेकौन्सिल हीं सरकारच्या आधाराचीं स्थानें होत; पण वस्तुतः ह्या लोकांच्या मालकीच्या संस्था असल्यामुळें सरकारचा हा आधार काढून घेऊन नोकरशाहीस लगडें करून आपणांस शरण यावयास लाविलें पाहिजे.

## राष्ट्रीय सभेचें मत तें लोकमत

आज ४० वर्षें राष्ट्रीय सभा अशा प्रकारची लोकशाही स्थापन करण्याच्या उद्योगांत आहे. ती संस्था नष्ट करण्याचा, तिचें लोकांवरील वजन कमी करण्याचा प्रयत्न नोकरशाहीकडून सुरू आहे. परंतु लो.मा. टिळक, म.गांधी अशांसारख्या अलौकिक पुरुषांकडून ती संस्था उलट सतेज ठेवण्यांत आली आहे. सरकारचा राग–द्वेष सहन करून आपले पुढारी, जनतेच्या हिताचा रथ पुढें

टकलीत आहेत. अशा राष्ट्रीय सभेचें मत तेंच लोकमत होय व तें सिद्ध करण्याची वेळ म्हणजे असले निवडणुकीचे प्रसंग होत. यावेळीं तहशिलदारादि अधिकाऱ्यांकडून तुमच्यावर दाब येण्याचा संभव आहे, पण त्यांची भीड बाळगू नका. एवढें धैर्य आपण बाळगिलें पाहिजे. सरकारशीं हुज्जत घालूं शकतील अशांनाच मतें द्या. सरकारी अधिकाऱ्यांच्या धाकाला, लोभाला बळी पडणारे जे आहेत, अशांना मतें देऊं नका. बिगार बलुत्याच्या चळवळीच्या वेळेस तुम्हीं जो निर्भयपणा, कणखरपणा, स्वाभिमान दाखविला तोच याहि निवडणुकीच्या बाबतींत दाखवा.

---

# स्वराज्यपक्षाची यशस्वी कामगिरी*

[ सन १९२५ च्या मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवाड्यांत दे. भ. बापुजी अणे यांनीं आपल्या सहकार्यकर्त्यांसह सवण, महागांव, उमरखेड, पुसद या भागांत व्याख्यानांचा दौरा काढून जागोजागीं जागृति केली. या दौऱ्यांतील पुसदचें व्याख्यान पुढें देण्यांत येत आहे. ]

## दिसतें तसें नसतें

स्वराज्याची चळवळ आजकालची नाहीं. राजकारणाला वेगवेगळें वळण वेळोवेळीं मिळत असतें. सन १९२१सालापासून म.गांधी यांनीं असहकारितां सुरू केली व एक वर्षांत स्वराज्य मिळविण्याचा चंग बांधून पुढाऱ्यांनीं राजकारणाच्या आखाड्यांत पाय ठेवला. त्या असहकारितेच्या काळांत राजकारणाचें वारें खेडोपाडीं पसरलें. आतां तो असहकारितेचा झंझावात कमी झाला आहे. लोकांच्या आशा,उमेदी व उत्साह यांस ओहोटी लागली आहे; एवढेंच नव्हे तर राजकारण थंडावलें, राजकीय आकांक्षांविषयीं लोक उदासीन बनले, असेहि उद्गार कोठें कोठें ऐकूं यायला लागले आहेत ! असेंहि म्हणणारांस त्यांच्या त्यांच्या दृष्टीनें सबळ कारणें आहेत. उदाहरणार्थ

* 'लोकमत' यवतमाळ ता. १९-६-२५

काँग्रेसमध्यें राजकारणापेक्षां ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद, अस्पृश्यतानिवारण, हिंदु–मुसलमान, खादी–चरखा इत्यादि प्रश्नांना जास्त महत्त्व दिलें जात आहे. वरवर पाहाणारांना ही स्थिति विपरीत दिसते खरी, पण दिसतें तसें पुष्कळदां नसतेंहि !

## विपरीत स्थितीचीं कारणें

ही विपरीत परिस्थिति खरोखर देशाच्या प्रगतीला प्रतिकूल नसून, अनुकूल व पोषकच आहे. स्वराज्याचा प्रश्न बाजूस ठेवून, देशांतले मोठमोठे पुढारी आज अहोरात्र खादी, अस्पृश्योद्धार, हिंदु–मुसलमान या गोष्टींची चर्चा कां करीत आहेत ? हा खरोखर एक प्रश्नच आहे. पण तो कांहीं आजच नव्यानें उद्‌भवलेला नाहीं. काँग्रेस ही राजकीय संस्था असूनहि, तिनें आपलें राजकीय ध्येय बाजूस सारून, या सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमावरच आपली नजर खिळविलेली आहे. एक वर्षांत स्वराज्य मिळविणारे महात्मा गांधी आज केवळ खादी व अस्पृश्योद्धार यांशिवाय गोष्ट बोलत नाहींत. याचा अर्थ हाच होतो कीं, या प्रश्नांचा निकाल लावल्याखेरीज स्वराज्याच्या मार्गावर पुढें पाऊल टाकणें शक्य नाहीं, असें देशांतील पुढाऱ्यांना वाटत असलें पाहिजे. हल्लींचें जग प्रातिनिधिकत्वाचें भोक्तें आहे. पूर्वीच्या प्रमाणें एकाच व्यक्तीच्या मतानें प्रजेची अनुमति न घेतां राज्य करण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. शिवाजीराजाच्या वेळच्या सारखें झालें तरी एकतंत्रीं राज्य आज कोणास नको आहे! राजसत्ता अशा रीतीनें विभागली जाणें, हेंच भावी स्वराज्याचें लक्षण आहे. उद्यांच्या स्वराज्याचे वांटेकरी सर्व जाती व सर्व पंथ होणार आहेत. तेव्हां अल्पसंख्याकांना हिंदुस्थानास स्वराज्य मिळालें तर आपलें कसें होईल अशी भीति वाटण्याचें कांहीं एक कारण नाहीं. तरी पण त्यांना ही चिंता आज वाटतें हें खरें, आणि म्हणूनच ते आपापल्या हितानहिताचे प्रश्न आजच तुमच्या पुढें ठेवून सोडवून घेऊं पाहातात.

## यांतच आशेचा किरण आहे.

आमचा प्रश्न समाधानकारक सोडवाल तर आम्ही तुम्ही एक, नाहीं तर तुमचें तुम्ही पाहून घ्या ! असाच या लोकांच्या कृतीचा अर्थ आहे. समा-

धानाची गोष्ट ही कीं, इतर मार्गांचा आश्रय न करितां काँग्रेसकडेच येण्याची त्यांना बुद्धि सुचते, यांतच आशेचा किरण आहे. नाहीं तर स्वराज्य मिळण्यापूर्वी आपला प्रश्न सुटला तर सुटेल, पुढें आपणांस कोणी विचारणार नाहीं, असें जे अल्पसंख्याकांना वाटतें तेंहि स्वाभाविकच आहे म्हणायचें. कारण महायुद्धाच्या वेळीं दिलेलीं वचनें बगलेंत घालून, वेळ निघून गेल्यावर हिंदुस्थानच्या तोंडाला इंग्रजांनीं पानें पुसलीं हें त्यांनीं पाहिलें आहे.

## हें दिसणारें शैथिल्य खरें नव्हे.

तेव्हां याच गोष्टीचें अनुकरण करून मागाहून आपल्या मागण्यांना वाटाण्याच्या अक्षता लावायला हे देशांतील बहुसंख्याक उद्युक्त होतील, असा संशय त्यांना येतो, व म्हणूनच ते आपले प्रश्न काँग्रेसपुढें ठेवीत आहेत. या त्यांच्या करणींतलें स्वारस्य ज्यांना कळेल, त्यांना राजकारण थंडावलें हें कधींच खरें वाटणार नाहीं. स्वराज्य मिळविण्याकरितां सर्व जातींच्या, अल्पसंख्याकांच्या मदतीची सुद्धां जरूर आहे, हें लक्षांत घेतलें तर माझ्या वरील बोलण्याचा अर्थ कळणें कठीण नाहीं. दिल्लीस ऐक्य परिषदेकरितां जमलेल्या निरनिराळ्या प्रांतांतील पुढाऱ्यांची निःस्वार्थ कळकळ ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिली आहे, त्यांना राजकारण थंडावलें आहे, असें म्हणणें हास्यास्पद वाटेल. आज देशांत जें शैथिल्य दिसत आहे तें शैथिल्य नव्हें; तर स्वराज्याच्या मार्गांतील अंतर्गत विघ्नें आणि आपसांतील कलह यांच्यावर नाशकारक उपाययोजना करण्याकरितां देशाची दृष्टि अंतर्मुख झाली आहे, म्हणून घातुक शैथिल्य हा केवळ मिथ्याभास आहे.

## मध्यप्रांत कौन्सिलची मर्दुमकी !

सरकारला विरोध करण्याचें काम स्वराज्यपक्ष करीत आहे. पूर्वी हा पक्ष कौन्सिलच्या बाहेर होता. काँग्रेसचा शिक्का घेऊन, कौन्सिलमध्यें सरकारशीं विरोध करायला किंवा नोकरशाहीच्या बेगुमान कारभाराला आळा घालण्याकरितां तो कौन्सिलांत शिरला. या पक्षाच्या मागें लोकमत आहे हें सरकारास पकें माहीत आहे, म्हणून कौन्सिलनिवडणुकीच्या आधींपासून हा प्रश्न कौन्सिलमध्यें न येऊं देण्याची सरकारनें शिकस्त केली, तरी कमीजास्त

प्रमाणानें सर्व प्रांतांतून हा पक्ष कौन्सिलमध्यें निवडून आलाच. त्यानें सरकारास भंडावून सोडिलें! सर्वांत जास्त विरोध झाला तो सी. पी. च्या कौन्सिलांत! सरकारची एवढी कुचंबणा झाली कीं, त्यांनीं कौन्सिलची बैठक बारा महिने बोलावली नाहीं. ही मर्दुमकी साऱ्या हिंदुस्थानांत आपल्याच प्रांतानें दाखविली आहे, याबद्दल आपणांस अभिमान वाटला पाहिजे! नागपूरप्रमाणेंच बंगालमध्येंहि जवळपास ही स्थिति झाली. लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत हा पक्ष बऱ्याच कमी प्रमाणांत आहे. तरी तेथेंसुद्धां या पक्षानें बरेच वेळ सरकारची फजिती केली. असें जाहीर करण्यांत आलें होतें कीं, १९३० पावेतों सुधारणाकायद्याची मात्रा किंवा वेलांटीहि बदलावयाची नाहीं.

## याचें श्रेय स्वराज्यपक्षालाच

नंतर असेंब्लीमध्यें या पक्षानें एक ठराव आणून खडाजंगी सुरू केली, तेव्हां या संबंधांत कांहींतरी विचार केला पाहिजे, अशी मनोवृत्ति नोकरशाहीच्या ठिकाणीं उत्पन्न झाली, यांतलें इंगित काय आहे? आज हिंदुस्थानचे व्हॉईसराय लॉर्ड रीडिंग हे स्टेट सेक्रेटरीशीं खलबत करावयास इंग्लंडला गेले आहेत, त्याचा अर्थ झाला तरी हाच आहे हें पक्कें समजा आणि याचें श्रेय कोणाला असेल तर तें स्वराज्यपक्षालाच आहे हें विसरूं नका. स्वराज्यपक्ष कॉंग्रेसनें दिलेल्या मुखत्यारपत्रावर काम करीत आहे. जोंवर मालकाची इज्जत, तोंवरच मुखत्यारास किंमत असते. मालकाचें दिवाळें वाजलें कीं, मुखत्याराला कोण विचारतो? दुर्दैवानें कॉंग्रेसचें दिवाळें वाजण्याचीं चिन्हें दिसत आहेत. तिचे सभासद फार रोडावले आहेत, म्हणून तिचे सभासद वाढवा. कॉंग्रेस सूत मागते, म्हणून तुम्ही तिच्याशीं असलेलें आपलें सूत तोडूं नका. कारण तिजमुळेंच स्वराज्यपक्षास किंमत आहे. कॉंग्रेसशीं आपलें सोयर सुतक नाहीं, या विचारसरणीस काडीचाहि थारा न देतां तिचें बळ वाढवा व त्या योगें स्वराज्य संपादन करा.

---

# शिवराज्यारोहणोत्सव*

नागपूरच्या 'राष्ट्रीय-उत्सव-मंडळा' तर्फे शिवराज्यारोहणोत्सवानिमित्त गेल्याच्या मागील शुक्रवारीं म्हणजे ता. १४-६-२५ रोजीं रात्रीं टौनहॉलच्या पटांगणांत डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखालीं दे. भ. माधवराव अणे यांचें व्याख्यान झालें. ते म्हणाले--

## साम्राज्याच्या हांवेंतच त्यांचें मरण

असल्या प्रकारचे उत्सव हें आपल्या पूर्वजांचें तर्पणच होय. डोळ्यांपुढें दिसणाऱ्या प्रस्तुत निराशाजनक परिस्थितीचें वातावरण असल्या उत्सव-प्रसंगीं नाहींसें होऊन, अंत:करणांत निद्रित असलेल्या खऱ्या भावना जागृत होत असतात. रायगडावर छत्रपति शिवाजीमहाराज सिंहासनावर बसले असून त्यांचा राज्याभिषेक होत आहे, हें २५० वर्षांपूर्वीचें चित्र डोळ्यांपुढें उभें केलें कीं, सांप्रतची निराशामय परिस्थिति पार नाहींशी होईल व अघटित वाटणाऱ्या गोष्टी शक्य वाटूं लागतील. आज आपल्यासमोर ज्या प्रकारची बिकट परिस्थिति आहे, तशीच शिवाजी महाराजांच्या वेळींहि होती. त्यावेळच्या व आतांच्या अडचणींचें स्वरूप वेगळें, इतकेंच. त्या वेळीं दिल्लीच्या तक्तावर सामर्थ्यवान् व कट्टा साम्राज्यवादी औरंगजेब बसला होता व सर्व हिंदुस्थान देशभर आपलें एकछत्री साम्राज्य स्थापण्याचा त्याचा अट्टाहास सुरूं होता. त्याच्या पदरीं मोठमोठाले निष्ठावान् हिंदू सरदारहि होते व ते दिल्लीच्या तक्तास मानून बादशहाची एकनिष्ठपणानें कामगिरी बजावीत होते; हल्लींच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचा एखादा मेंबरहि एकनिष्ठ नसेल! औरंगजेबाच्या पाठीशीं अशा प्रकारें जरी प्रचंड सामर्थ्य होतें, तरी इतर लहान लहान राज्यांचा नाश करून एकछत्री साम्राज्य स्थापण्याची त्याची जी हांव होती तींतच त्याचें मरण होतें, ही गोष्ट शिवाजीनें ओळखिली! गिळल्या जाणाऱ्या इतर राज्यांच्या नाराजीचा फायदा मुत्सद्दी शिवाजीनें ताबडतोब घेतला.

---

* 'महाराष्ट्र' नागपूर ता. १४-६-१९२५.

## इंग्रजांचा प्रच्छन्न साम्राज्यवाद

आज इंग्रजी राजकारणावरहि साम्राज्यवादाचा पगडा आहे. इंग्रज मुत्सद्दी शुद्धीवर असतांना ते बोलत नसले, तरी बेभान होऊन बोलूं लागले कीं, त्यांच्या पोटांतला प्रच्छन्न साम्राज्यवाद त्यांच्या तोंडून अचानक बाहेर पडतो ! त्यांचा लोकसत्तावादाचा देखावा बाहेरचा आहे, ती एक प्रकारची भुरळ आहे, हें हिंदी लोकांनीं जाणलें पाहिजे. २५० वर्षांपूर्वीची परिस्थिति आठवली, तर आजची परिस्थिति निराशामय खचित करणारी नाहीं. स्वराज्य मिळालें तर आमचें काय होईल असें खिस्ती, युरोपियन, इतकेंच काय पण आमच्यांतील ब्राह्मणेतर लोकसुद्धां विचारूं लागले आहेत ! पण ब्राह्मणेतरांनीं मूठभर ब्राह्मणांची भीति कां बाळगावी ? मानले तर ब्राह्मण, नाहीं तर तेहि शूद्रच आहेत ! ब्राह्मण म्हणजे नुसता दक्षणा घेणारा, त्याच्याजवळ कसले हक्क मागतां ? त्याच्या हातांत काय आहे ? तुम्हांला ब्राह्मण नको असतील, तर कोणत्याच प्रातिनिधिक संस्थेंत ते निवडून येऊं शकणार नाहींत. ब्राह्मणांना घरीं स्वस्थ बसावें लागलें, तरी कांहीं खेद मानण्याचें कारण नाहीं; पण ब्राह्मणेतर, जमिनदार, खिस्ती, मुसलमान, युरोपियन इत्यादि सर्वांनींच जर स्वराज्यांत आमची गति काय होणार, अशी भीति बाळगली तर शिल्लक कोण राहिलें ? मग स्वराज्य हवें तरी कोणाला ?

## स्वत्वाची विस्मृति पाडण्याचे प्रयत्न

पण या सर्व गोंधळाचें कारण एकच आहे आणि तें म्हणजे पूर्वीं हिंदुस्थानांत हिंदुपदपादशाही होती याची आपणांस विस्मृति पडली हेंच होय. आपणांस अशी विस्मृति पाडण्याचेच आज प्रयत्न चालू आहेत. या नागपुरांत जेव्हां भोसलेशाही होती, तेव्हां मुसलमान व लष्करी अधिकारी त्यांच्या पदरीं होतेच. मुसलमानांचा छळ केव्हांच झाला नाहीं, मग अशा प्रकारच्या शंका विचारण्याचें कारण काय ? पारतंत्र्याचा वीट आला म्हणजे वरवर दिसणाऱ्या सर्व अडचणी पार नाहींशा होतात. परिस्थित्यनुरूप जातीजातींतील निर्बंध आतां पुष्कळ सैल झाले असून, सर्व जाती एकत्रित

करण्यास पूर्वीपेक्षां आज सोपें झालें आहे. आणि जरी कांहीं निर्बंध असले, तरी ते पुढे करून स्वराज्याची चळवळ कां थांबवितां ? स्वराज्यप्राप्त्यर्थ जो कोणी जास्त बळ खर्च करील, त्यासच पुढच्या स्वराज्यांत जास्त हक्क मिळतील, हें अगदीं सरळ व उघड आहे. ज्याच्या त्याच्या प्रयत्नाच्या मानानें स्वराज्यांत हक्कांची वाटणी आपोआपच होते. ज्या कोणास स्वराज्यांत सर्व हक्क हवे असतील, त्यांनीं स्वराज्य मिळविण्यासाठींहि आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे.हक्क देण्याच्या बाबतींत कंजूषपणा करणाऱ्या कद्रू अधिकाऱ्यांशीं भांडा ! सत्ताहीन मूठभर ब्राह्मणांशीं भांडून तुम्हांला काय मिळणार ! शिवछत्रपतीनें कठीण प्रसंगीं आपसांतील भेदाभेद नाहींसे करून ज्याप्रमाणें स्वराज्यस्थापनेचा प्रयत्न केला, तसा प्रयत्न करून आधीं पारतंत्र्यरूपी सर्वांत मोठ्या भेदकाचें उच्चाटण करा, कीं मग लहानमोठे, उच्चनीच इ. किरकोळ भेद आपोआपच नाहींसे होतील.

## साधनांवर आग्रह धरूं नका.

शिवाजी महाराजांच्या चरित्रांत आणखी एक गोष्ट दृष्टीस पडते, ती ही कीं, त्यांनीं साध्य प्राप्त करण्यासाठीं अमुकच एका साधनाचा उपयोग करीन, असा आग्रह कधींच धरला नाहीं. प्रसंगास अनुसरून सर्व प्रकारच्या साधनांचा त्यांनीं अवलंब केला. परकीय सत्तेखालीं राहणें ही सर्वांत मोठी अनीति आहे. ती नाहींशीं करण्याच्या प्रयत्नांत नीति-अनीतीचे क्षुल्लक नियम लागूं करणें रास्त नाहीं. या खटपटींत गुंतलेल्या अलौकिक पुरुषास सामान्य माणसाचीं क्षुल्लक नीतिबंधनें बंधनकारक होत नाहींत. राष्ट्राचें कल्याण करणें हीच सर्वांत मोठी नीति त्यांच्या डोळ्यांपुढें असते. जशी परिस्थिति असेल, प्रतिपक्षी जसा असेल, तशा तऱ्हेनेंच शिवाजी महाराज वेळोवेळीं वागले. आज साध्यापेक्षां साधनाचीच बडेजावी माजली आहे. साध्य विसरून जाऊन साधनांचेच जोंपर्यंत देव्हारे माजविण्यांत येत आहेत, तोंपर्यंत बिलंदर इंग्रजांच्या हातून कांहीं मिळणार नाहीं, हें लक्षांत ठेवा !

## आज पोरखेळ माजला आहे.

हिंदी लोक वाटेल तीं साधनें उपयोगांत आणण्यास तयार आहेत असें जव्हां त्यांना समजेल, तेव्हांच ते वठणीवर येतील. मी अमुकच अवलंब

करीन अशी बेडी आपल्या पायांत अडकवून घेण्यांत काय अर्थ आहे ? स्वातंत्र्याच्या साध्याचा विसर पडून, साधनावर जोर दिल्यामुळें आज सारा पोरखेळ झाला आहे. देशहितापुढें विवक्षित साधनाची कांहीं किंमत नाहीं. शिवाजीला औरंगजेब बादशहा "डोंगरांतला उंदीर" असें म्हणत असे, पण तें तुच्छतेनें म्हणत असे, असें वाटत नाहीं. यांत शिवाजीचें यथार्थ गुणवर्णनच होतें. शिवाजी आपलें साम्राज्य तर पोखरतोच; पण त्याला धरायाला किंवा मारायला जावें तर सांपडत मात्र नाहीं, असा 'डोंगरांतला उंदीर' याचा अर्थ आहे. डॉ. रवींद्रनाथ टागोरसारखे तत्त्ववेत्ते तर हिंदुस्थाननें जगाला कोणता संदेश द्यावा, याच विचारांत पडले आहेत ! हा निष्कारण उपद्व्याप हवा कशाला ?

## तत्त्वज्ञान्यांच्या नादीं लागूं नका.

घरांतच कोणी संदेश ऐकत नाहीं, तर जगांत तुमचा संदेश कोण ऐकतो ? सर्व जगाला गवसणी घालणाऱ्या उच्च वातावरणांत विहार करणारे असे तत्त्ववेत्ते सर्व राष्ट्रांत असतातच. पण व्यवहारी व संसारी माणसांनीं मात्र त्यांच्या नादीं लागण्याचें कारण नाहीं; फार तर श्रांत झालेल्या जीवास करमणूक म्हणून वाटल्यास त्या उच्च वातावरणांत एखादा फेरफटका मारावा ! विवाहाचें उच्च व गूढ तत्त्व एखाद्यास न कळलें, म्हणून मुलें होण्याचें थांबतें काय ? त्याचें प्रजोत्पादन चाललेलेंच असतें. सारांश, व्यावहारिक दृष्टि ठेवून कार्य करूं लागलें कीं, फळ हें मिळतेंच; त्यासाठीं उच्च वातावरणांत भराऱ्या मारण्याचें कारण नाहीं. शिवाजी महाराज दिल्लीस कैदेंत असतांना, त्यांनीं कैद्याच्या नीति-अनीतीचा विचार केला नाहीं, हिकमत लढवून आपली सुटका करून घेतली. तशी सुटका त्यांनीं करून घेतली नसती, तर महाराष्ट्राला स्वातंत्र्य मिळालें नसतें. श्री शिवाजी महाराजांच्या चरित्रांतील वागणूक लक्षांत घ्या. त्यांचा राज्यारोहणोत्सव आठवा, आपण त्यांचेच वंशज आहोंत हें विसरूं नका, म्हणजे आपल्या डोळ्यांसमोरील निराशा पार नाहींशी होऊन सर्वत्र आशेचें साम्राज्य दिसूं लागेल.

मुडिमन कमिटीच्या रिपोर्टावर

# पंडित नेहरूंची उपसूचना*

सप्टेंबर १९२५ च्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें सर अॅलेक्झांडर मुडिमन यानीं मेजॉरिटी रिपोर्ट पास करण्यासंबंधीं ठराव आणला होता, त्यावर पं. मोतीलाल नेहरू यांनीं आपली उपसूचना आणली. तींत लोकपक्षाच्या मागण्या ग्रथित केल्या होत्या. सरकारच्या भरभक्कम विरोधास न जुमानतां, ही लोकपक्षीय उपसूचना ७२ विरुद्ध ४५ मतांनीं पास झाली. या ऐतिहासिक दृष्टया संस्मरणीय अशा प्रसंगीं दे. भ. बापूजींनीं ता. ८-९-१९२५ रोजीं असेंब्लीमध्यें अत्यंत सुंदर भाषण केलें, तें येणेंप्रमाणें:—

## कोऱ्या चेकवर आमची सही मागतात !

अध्यक्ष महाराज ! बरेचसे सभासद माझ्या पूर्वी बोलून गेलेले असल्यामुळें, मला या विषयावर बोलून नवीन कांहीं सांगणें अवघड झालें आहे; तथापि एवढें म्हणावयास हरकत नाहीं कीं, सर अॅलेक्झांडर मुडिमन यांचा हा ठराव ' बाल्ड ' ( टक्कल पडलेला ! ) आणि ' ब्लँक ' ( कोरा करकरीत ) आहे ! त्याला नाहीं आगा नाहीं पिच्छा ! ! कदाचित् त्याच्या समर्थनार्थ सरसाहेबांपाशीं साधनसामुग्रीचा अभावहि असेल ! त्यांचा ठराव कोरा असें म्हणण्याचें कारण असें कीं, त्याच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांना आमची सहानुभूति तेवढी त्यांना हवी आहे. याचा अर्थ त्यांच्या मनांतून कोऱ्या चेकवर आमची सही द्यावयाची आहे एवढाच दिसतो ! तसें पाहाल तर मुडिमन कमिटीच्या रिपोर्टाच्या बुडाशीं तत्त्व तरी कोणतें आहे ? छेः ! तो खरोखरच तत्त्वशून्य रिपोर्ट आहे. एका महत्त्वपूर्ण चौकशी-कमिटीच्या रिपोर्टाची विल्हेवाट लावण्याकरितां ठराव मांडावयाचा असतो, तो कधीं असा अनिश्चित असतो काय ? सरकारनें हे दोन्ही रिपोर्ट समोरासमोर ठेवून त्या संबंधानें काय करावयाचें, याचा विचार केला असलाच पाहिजे, व असें असेल तरच मायनॉरिटीचा रिपोर्ट बाजूस ठेवून मेजॉ-

---

*'लोकमत' यवतमाळ ता. २५-९-२५

रिटीचा रिपोर्ट अंमलांत आणण्याचा त्यांना अधिकार पोहोंचतो. पण मायनॉरिटी रिपोर्ट ज्या साक्षीपुराव्यावरून लिहिण्यांत आला, त्याकडे त्यांनीं लक्षच दिलें नाहीं. म्हणून मायनॉरिटी रिपोर्ट जो त्यांनीं बाजूस टाकला त्याचें कारण तो त्याज्य म्हणून नव्हे, तर त्यासंबंधानें त्यांचें निश्चित असे कांहीं पूर्वग्रह होते म्हणून होय.

## सरकारला इकडे आड तिकडे विहीर !

दुसरें, मला तरी असें दिसतें कीं, या रिपोर्टाच्या बाबतींत सरकारची स्थिति अशी झाली आहे कीं, खाल्लें तर बाधतें, टाकलें तर चावतें ! द्विदल पद्धतीचा प्रयोग करून पाहिला आहे. तो यशस्वी झाला आहे म्हणावें तर ॲसेंब्ली म्हणणार, हं सरकार ! काढा पाहूं पुढील सुधारणांचा हप्ता ! उलट पक्षीं, प्रयोग फसला असें म्हणावें तर या असेंब्लीनें ज्या सूचना केल्या आहेत त्याऐवजीं स्वतःच्या अशा सूचना करण्याची जबाबदारी अंगावर येऊन पडणार. एकूण इकडे आड तिकडे विहीर ही शृंगापत्ति टाळण्याकरितां ते म्हणतात कीं, सुधारणा अंशतः यशस्वी झाल्या आहेत. यावरून माझें असें मत झालें आहे कीं, मुडिमन कमिटीचा रिपोर्ट म्हणजे घोटाळलेल्या मनःस्थितीचा एक मासला होय. याच्या उलट पंडितजींच्या उपसूचनेंत बरेच महत्त्वाचे प्रश्न संकलित केले गेलेले आहेत. द्विदलपद्धतीचा प्रयोग व्हावा तसा अजून झालाच नाहीं असें सरकार म्हणत असेल तर मी विचारतों, मग असें वातावरण तरी कोणतें, कीं ज्यांत तो प्रयोग निश्चित मनानें करतां येईल? असेंब्लीच्या बाहेरील प्रक्षुब्ध वातावरण व जननिंदा यांची क्षिति न बाळगतां, जे तुमच्या कौन्सिलांत येऊन बसले व पहिल्या तीन वर्षांत त्यांना प्रामाणिकपणें करतां येण्यासारखें जें होतें तें ज्यांनीं केलें, त्यांची साक्ष घ्याल तर काय दिसून येतें ?

## टोणग्याचे आंचळ

ते स्वच्छ म्हणतात कीं, आम्ही या डायार्कीच्या टोणग्याचे आंचळ पुष्कळ आशेनें चोळले, पण त्यांतून एक थेंबहि बाहेर आला नाहीं. असल्या इमान-

वंतांचें सहकार्य असूनहि डायार्कीचा प्रयोग साधला नाहीं, तर मग यापेक्षां जास्त चांगली परिस्थिति कोणती व ती केव्हां लाभणारी आहे. ? मायनॉरिटी रिपोर्टांत १५१ पृष्ठावर केलेलें एक विधान मी आपणांस थोडक्यांत सादर करितों. तें असें:—

" सुधारणांना ट्रायलच मिळाली नाहीं असें कित्येक म्हणतात, तें आम्हांला पसंत नाहीं. सुधारणांना अनुकूल असलेले लोक कौन्सिलांत आल्यावर त्यांनीं कामें केलीं त्यापेक्षां चांगलें काम जे मुळीं सुधारणांच्या विरुद्धच होते ते कौन्सिलांत आले असते तर कसें झालें असतें, हें आम्हांस कळत नाहीं. खरें म्हणाल तर सुधारणांचे द्वेष्टे सुधारणांवर बहिष्कार पुकारून बाहेर राहिले हेंच बरें झालें. "

ज्यांनीं सुधारणा खऱ्याखुऱ्या भावानें चोखाळल्या त्यांचें हें मत होय. हाच रिपोर्ट यापुढें म्हणतो.—

" हे लोक जर कौन्सिलांतून येते, तर सुधारणांचा गाडा पहिल्याच तीन वर्षांत विचकला असता. कौन्सिलच्या बाहेर प्रतिकूल वातावरण होतें हें खरें, पण त्याचा संपर्क आंतील वातावरणास झाला नव्हता. "

प्रत्यक्ष अनुभव घेणाराचें हें मत आहे ! अत्यंत अनुकूल अशा परिस्थितींत सुधारणांचा प्रयोग करण्यांत आला यांत संदेह नाहीं. पण असें असूनहि तो साधला नाहीं. याचें कारण एकच व तें हें कीं,

## मुळांत सुधारणाच टाकाऊ आहेत !

माझे जहांबाज दोस्त कर्नल क्रॉफर्ड म्हणतात कीं, ' रीझनेबल ' माणसांनीं ' रीझनेबल स्पिरिट ' दाखवून सुधारणा चालविल्या तर त्या चालण्यासारख्याहि आहेत. पण कोणत्याहि राजकीय घटनेची ही कसोटी नव्हे. जनतेनें आपले प्रतिनिधी निवडावयाचे असतात व अशा रीतीनें निवडलेल्या प्रतिनिधींना जी घटना चालवितां येईल तिचेंच नांव घटना. तुमचीं " रीझनेबल " माणसें तरी कोणतीं ? आणि त्यांचें " रीझनेबल स्पिरिट " तरी कोणतें ? सरकार नेहमीं असें धरून चालतें कीं, आम्ही करतों तें नेहमीं बरोबर असतें, पण लोकांचे प्रतिनिधीच " रीझनेबल स्पिरिट " नें कामें

करीत नाहींत ! " रीझनेबल स्पिरिट " म्हणजे तरी काय वस्तु आहे ? तुमच्या मतानें ' रीझनेबल ' अशीं माणसें तरी कोणतीं आहेत ? यांत वस्तुत: मुद्दा हा आहे कीं, जर तूर्तची राज्यघटना योग्य रीतीनें चालवून पाहतां येण्यासारखी असेल तर–आणि आली आहे यांत शंकाच नाहीं—आणि चालविल्यानंतर जर ती अपुरी पडली तर त्यापासून निष्कर्ष एवढाच निघतो कीं, देशांत परिस्थिति कोणत्या प्रकारची आहे व लोकांना कोणत्या प्रकारची राज्यघटना हवा आहे, या गोष्टीच ती घटना बनवितांना विचारांत घेतल्या गेल्या नाहींत. प्रामाणिक माणसांनीं प्रामाणिक रीतीनें सुधारणा चालवून पाहिल्या आहेत. त्यांना ' ट्रायल ' देण्याकरितां त्यांनीं आपलीं ठाम मतेंहि त्या वेळेपुरतीं बाजूस ठेविलीं होतीं. असलीं माणसें मिळालीं असतांहि तुम्ही असें म्हणूं शकता काय कीं, सुधारणा चांगल्या रीतीने चालविल्या नाहींत म्हणून ?

## सरकारच्या मतें पाहावा तो खाष्टच !

सर शिवस्वामी आय्यर यांनीं ज्या लोकांचा उल्लेख केला, त्यांचे सरकारनें गोडवे गाऊन त्यांच्या कार्याची प्रशंसाहि केली आहे. आतां सरकार त्यांनाच कोणत्या तोंडाने " अन्-रीझनेबल " म्हणणार ? म्हणजे सरकारच्या मतें या देशांत जो माणूस पाहावा तो " अन्-रीझनेबल " च आहे ! हिंदी माणूस म्हटला कीं, तो सरकारच्या दृष्टीनें असा खाष्टच असावयाचा तर ! राज्य-घटना बनवितांना सरकार देशांतील परिस्थिति लक्षांत घेत नाहीं व लोकांच्या आकांक्षा किती उंच गेल्या आहेत याची फिकीर करीत नाहीं ! आणि सरकार असें जोंवर करीत राहील तोंवर त्यांनीं केलेली कोणतीहि घटना आजच्यासारखीच कुचकामाची व त्याज्य ठरणार हेंहि पण निश्चित आहे. म्हणून माझे पुढारी पं. मोतीलाल नेहरू यांची सूचना सरकारच्या फार उपयोगाची आहे. ती सरकारनें स्वीकारली, तर त्यांजवर असला तोंड खालीं घालण्यासारखा प्रसंग पुन: येणार नाहीं. ती उपसूचना सरकारनें कबूल केली तर राज्यघटना आम्हीं बनविली, ती आमची आहे अशी परिस्थिति उत्पन्न होईल. ती घटना आम्ही तयार करू; अर्थात्, ती कर

तांना आम्ही तुमचा सल्ला घेऊं, आणि त्यानंतरहि आमची घटना अयशस्वी ठरली तर तो दोष तुमचा नसून आमचा आहे. इतःपर आम्ही तुमच्या माथीं अपेशाचें खापर फोडूं इच्छित नाहीं; तुमच्या विरुद्ध कडक भाषा वापरावी तरी कोठपर्यंत? त्याचा आम्हांस वीट आला आहे. निष्कारण तुमच्या मर्मी जाऊन झोंबतील अशीं भाषणें करण्याचा आम्हांस कंटाळा आला आहे. शक्यतोंपर्यंत हें टाळण्याची आमची इच्छा आहे व ती अंमलांत आणावयास एकच मार्ग आहे, तो हा कीं, आपलें मन जरा मोठें करा, थोडें औदार्य धारण करा. औदार्य हा शब्द तुमच्या मनास जरासा गोड वाटावा म्हणून मी मुद्दाम वापरतों आहे, कारण तुमच्याविरुद्ध अतिशय तीक्ष्ण व कटु टीकेचा भडिमार होत आहे. माझी इच्छा आहे कीं, पंडितजींच्या उपसूचनेचा सरकारनें वेळींच उदार मन करून स्वीकार करावा. लॉर्ड बर्कनहेडच्या आव्हानास आमचें हें स्पष्ट उत्तर होय! आम्ही आपलें मन प्रांजल करून तुमच्याशीं दोस्तीचें हस्तांदोलन करावयास पुढें आलों आहोंत. तुम्ही उलट आपला हात पुढें करणार नाहीं, तर काय परिणाम ओढवतील हें सांगणें माझ्यासारख्या सामान्य शक्तीच्या माणसाच्या आंवाक्याबाहेरचें आहे. राष्ट्राच्या वतीनें म्हणून ज्यांना अधिकारयुक्त वाणीनें बोलण्याचा अधिकार आहे,जनतेकरितां जे खस्ता सोसून कामें करीत आहेत, ज्यांना लोक अत्यंत पूज्य लेखत आहेत, अशा राष्ट्रनेत्यांना या गोष्टी हातांत घ्याव्या लागतील, असल्या गोष्टींकडे कानाडोळा करूं नका. आम्ही ज्या गोष्टी करावयास मागतों, त्या तुम्ही वेळेवर न केल्या तर आमचे आजचे ठराव म्हणजे देशांत पुढें मागें संभवनीय असलेल्या

## भयंकर क्रांतीचीं पूर्वचिन्हेंच समजा.

असली क्रान्ति लौकरच घडवून आणणें किंवा ती अजिबात टाळणें हें सर्वस्वीं तुमच्याच स्वाधीन आहे. आमच्याकडे त्या संबंधांत कांहींदेखील नाहीं. माझी सूचना एवढीच आहे कीं, वेळींच सावधान राहा व आपलें कर्तव्य करा. वेळ जाऊं द्या कीं, चपेटा बसलाच समजा. इंग्रजांच्या समजुतीप्रमाणें कालपुरुषाच्या डाव्या हातांत एक कोयता व डोक्यावर एक झुलूप

असतें. त्याचें झुल्प पकडण्यास तुम्ही चुकलांत तर त्या कालपुरुषाच्या डाव्या हातांतल्या विळ्याचा तुमच्यावर घाव झाल्याशिवाय राहणार नाहीं आणि असें होईल तर मग तुम्हांला आजच्या दिवसाची आठवण येईल आणि मग धाय मोकलून रडाल व म्हणाल कीं, पं. मोतीलाल नेहरू यांची उप-सूचना स्वीकारली असती तर बरें झालें असतें.

---

# नॅचरलायझेशन बिलावरील भाषण*

सप्टेंबर १९२५ च्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें मि. दोरास्वामी अय्यंगार यांनीं आणलेल्या नॅचरलायझेशन बिलावरील सूचनेवर दे. भ. बापूजी अणे यांचें भाषण झालें, तें येणंप्रमाणें—

माझे सन्माननीय स्नेही मि. दोरास्वामी अय्यंगार हे या बिलावरील आपल्या सूचनेवर भाषण करीत असतां,अनेकांनीं त्यांच्या हें ध्यानांत आणून देण्याचा प्रयत्न केला कीं, सिलेक्ट कमिटीकडे हें बिल पाठविण्यांत कांहींच लाभ नाहीं; कारण परराष्ट्रीय प्रजाजनत्वाच्या नागरिकांना ब्रिटिश प्रजाजनाचे हक्क देण्याचाच या बिलाचा उद्देश आहे, आणि ब्रिटिश प्रजाजनत्वाची व्याख्या ब्रिटिश राष्ट्राच्या कायदेपुस्तकांत दिलेली आहे ती बदलणें तुमच्या हातांत मुळींच नाहीं. हें सर्वांशीं खरें आहे,त्यामुळें आपली स्थिति अधिकच अडचणीची होऊन बसली आहे, आणि म्हणूनच हें बिल लोकमत अजमावण्याकरितां प्रसिद्ध करावें अशी सूचना आणण्याचें मीं ठरविलें.

येथें बसलेल्या सन्माननीय सभासदांच्या तीव्र बुद्धिमत्तेसंबंधीं आणि कायदेशास्त्रांतील पांडित्यासंबंधीं मला मुळींच शंका नाहीं; पण इंपीरियल स्टॅच्यूटमध्यें दिलेल्या ब्रिटिश प्रजाजनाच्या व्याख्येंतील मख्खी यांपैकीं फारच थोड्यांच्या लक्षांत आली असेल, याबद्दल मात्र मला मुळींच संशय वाटत नाहीं. वसाहती व बादशाहांच्या प्रत्यक्ष वर्चस्वाखालचे मुलूख, यांत जन्मास आलेला माणूस ब्रिटिश प्रजाजन समजण्यांत यावा, अशी ती व्याख्या आहे. आपल्यासमोर असलेल्या या बिलांत ब्रिटिश प्रजाजनत्वाची व्याख्या दिलेली

* 'लोकमत' यवतमाळ ता. १६-१०-२५

असून,ब्रिटिश नॅशनॅलिटी आणि अलायन्स स्टेट्स ॲक्टच्या २७ व्या कलमा-कडे नुसतें बोट दाखविलें आहे; आणि खरें म्हटलें तर त्या कलमांतदेखील पूर्ण व्याख्या आढळत नसून त्यांत १ ल्या कलमाचा निर्देश केलेलाच तेवढा दिसतो. असें असतां आपणांपुढें असलेल्या कायद्यांत स्पष्ट आणि असंदिग्ध अशी व्याख्या न देतां, केवळ वर सांगितलेला उल्लेख करणें कितपत योग्य आहे ? कारण ज्याचा उल्लेख यांत केलेला आहे, तें पुस्तक प्रत्येक मॅजिस्ट्रे-टाच्या संग्रहालयांत असेलच असें म्हणवत नाहीं. ब्रिटिश नागरिकत्वाचा प्रत्यक्ष व्यवहारांत जो अर्थ केला जातो,तो त्या व्याख्येहून भिन्न आहे. त्यांत दिलेली व्याख्या इतकी गुंतागुंतीची आहे कीं, तीमुळे ब्रिटिश साम्राज्यांत राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ब्रिटिश नागरिकत्वाचा हक्क प्राप्त होतो. पण हिंदी संस्थानांना मात्र तो अधिकार प्राप्त होणें नाहीं. म्हणून आपल्या सोयीप्रमाणें त्या व्याख्येंत इष्ट ते बदल करतां येणें शक्य आहे कीं नाहीं हेंच आपणांला पाहावयाचें आहे. या कायद्यांत वसाहती आणि हिंदुस्थान यांचा दर्जा समान समजण्यांत आलेला नाहीं. सदर कायद्यांतील ९ व्या व १० व्या कलमान्वयें सर्टिफिकेट देणें व परत घेणें वगैरेसंबंधीं जे सर्व निर्बंध आहेत,ते वसाहतींना बंधनकारक आहेत असेंहि नाहीं. या कायद्यांत निर्देशिलेल्या वसाहती तरी कोणत्या ? दक्षिण आफ्रिकेतील व इतर गोऱ्या वसाहतींचा त्यांत निर्देश आहे, पण हिंदुस्थानचा त्यांत नामनिर्देशहि नाहीं ! उपरिनिर्दिष्ट कायदे-पुस्तक हें नांवाला जरी ब्रिटिश स्टॅच्यूट असलें, तरी स्टेट सेक्रेटरीनें दिलेलें सर्टिफिकेट, ज्या वसाहतींनीं त्या कायद्यातील दुसऱ्या भागाला मान्यता दिलेली नसेल, अशा वसाहतींत निरुपयोगी ठरतें. पण त्या वसाहतींच्या यादींतून हिंदुस्थानचेंच तेवढे नांव वगळण्यांत आलेलें असल्यामुळें, तेंच सर्टिफिकेट हिंदुस्थानावर बेलाशक लादलें जाऊं शकतें, ही दुसरी एक आपत्ति आहे.

आपल्या देशांत कायदेमंडळादिकांचा हा प्रचंड प्रदर्शनीय व दिखाऊ डोलारा जरी निर्माण करण्यात आलेला असला, तरी तो व इतर वसाहती यांच्या दर्जांत करण्यांत आलेला फरक, आणि त्यामुळें आपली स्थिति किती अगतिक झालेली आहे, हें या गोष्टीमुळे अधिकच स्पष्टपणें प्रत्ययास

येतें. पण याच कायद्याचें २६ वें जें कलम आहे, तें आपल्या फार उपयोगी येण्यासारखें आहे. या कलमाच्या योगानें ब्रिटिश नागरिकांचे भिन्न भिन्न संघ हे भिन्न भिन्न प्रकारांनीं वागविण्याचा हक्क ज्या देशाला कायदेमंडळ आहे व ज्या मंडळानें तसा कायदा पास केला आहे, त्याला आहे आणि म्हणून या कलमाच्या सहाय्यानें असे भिन्न भिन्न संघ कसे पाडावे व त्यांना कशा प्रकारें वागविणें इष्ट आहे, याचा आपण येथें विचार करू. हा प्रश्न सोडविणें मोठें कठीण काम आहे; पण या कायद्याचीं पानें लक्षपूर्वक चाळल्यावर या कोडयांतून सुटण्याच्या आशेचा किरण माझ्या दृष्टीस पडला.

जरा बारीक नजरेनें पाहणारांस हेंहि दिसून येईल कीं, ज्याप्रमाणें हिंदी संस्थानी प्रजेला ब्रिटिश नागरिकत्वापासून आपणांपुढें असलेल्या या कायद्यानें वंचित केलें आहे, त्याप्रमाणें युरोपियन व अमेरिकनांनादेखील या कायद्याचा लाभ घेतां येणार नाहीं. एशियाटिकांनाच यांत गोंवण्यांत आलेलें आहे. हें असें कां? याचें उत्तर गृहमंत्र्यांनींहि केलेल्या भाषणांत कोठें आढळत नाहीं. एखाद्या अमेरिकनाला अगर युरोपियनाला त्याची इच्छा असली तरी, या देशांत स्थावर होतां येऊं नये असा जर त्याचा उद्देश असला, तर तोहि ब्रिटिश नॅशनॅलिटी व स्टेटस् ऑफ अलायन्स ॲक्टान्वयें त्याला नागरिकत्वाचा हक्क मिळूं शकतो, असें असल्यामुळें निष्फळ ठरतो. आपल्यापुढें असलेली सूचना मंजूर होऊन हें बिल जर सिलेक्ट कमिटीकडे सोंपविण्यांत आलें, तर गृहमंत्र्यांना या गोष्टीचा खुलासा करावा लागेल. ज्या सिलेक्ट कमिटींतून मंजूर होऊन हें बिल आजच्या स्वरूपांत आपणांपुढें आलें आहे, तींतील सभासदांनादेखील या प्रश्नांचें समर्पक उत्तर देतां आलें नाहीं, आणि सरकारी सभासदांनाहि त्याचें स्पष्टीकरण करतां आलें नाहीं. म्हणून नव्यानें जर हें बिल सिलेक्ट कमिटीकडे सोंपविण्यांत आलें, तर अवश्य असलेला फेरफार करणें शक्य होईल.

एशियांतील परराष्ट्रीयांचे दोन विभाग पडतात, एक हिंदी संस्थानें व दुसरा हिंदेतर एशियांतील राष्ट्रें. हिंदी संस्थानांतील प्रजाजन म्हणजे हिंदी

संस्थानिकांच्या अमलाखालचे ब्रिटिश प्रजाजनच होत. असें असतां ते व हिंदेतर राष्ट्रांतील लोक यांना एकाच माळेंत गोविणें हें न्यायसंमत होईल कां? संस्थानी प्रजाहि तुमच्या आमच्यासारखी ब्रिटिश समजणेंच न्याय्य आहे. उलट हिंदेतर एशियाटिकांची गोष्ट याहून भिन्न आहे, आणि तितकेंच त्यांच्या बाबतींतलें धोरण ठरविणेंहि कठिण आहे. अशी परिस्थिति असल्यामुळें, या दोघांत फरक करणें इष्ट आहे; एवढेंच नव्हे तर हिंदेतर एशियाटिकांना नागरिकत्वाचे हक्क द्यावयाचे ते आपल्या फायद्याच्या दृष्टीनें इष्ट असलें तरच. नाहीं तर आपलें नाक कापून स्वतःला अपशकून करून घेतल्यासारखें होणार आहे. या साऱ्या गोष्टींचा खल करावयाचा तर तो सिलेक्ट कमिटींतच करतां येणें शक्य आहे; इतरत्र नाहीं.

तिसरा आणि महत्त्वाचा मुद्दा असा आहे कीं, वऱ्हाड ब्रिटिश राज्यांत मोडत नाहीं, निजाम सरकारच्या राज्यांत मोडतो. आपण हेंहि पाहिलें असेल कीं, माझ्या नांवाला कायदे मंडळाच्या सभासदांच्या यादींत जं स्थान मिळतें तें सरकारी व बिन सरकारी या दोहोंच्या मधलें मिळतें. आतां गव्हमेंट ऑफ इंडिया ॲक्टांत तशी व्यवस्था असल्यामुळें वऱ्हाडच्या प्रतिनिधीच्या सभासदत्वासंबंधीं कांहीं भानगड उत्पन्न होत नाहीं हा प्रश्न वेगळा! गेलीं ७० वर्षें माझा प्रान्त तुमच्या अमलाखालीं आहे आणि एवढ्या मुदतीनंतरहि ब्रिटिश नागरिक म्हणवून घेण्याचा हक्क मला मिळत नाहीं! तरी पांच वर्षांवर ज्याचे दिवस या देशांत गेले नाहींत आणि तेहि दिवस तरी सुखासुखी त्यानें हिंदुस्थानचें चिंतन करीतच घालविले असतील याला तरी काय पुरावा? त्याला मात्र खुशाल ब्रिटिश प्रजाजनत्वाची सनद तुम्ही अर्पण करणार! सुखाच्या, दुःखाच्या, अडचणींच्या आणि विपत्तींच्या साऱ्या समयीं गेलीं ७० वर्षें आम्ही तुमचे म्हणून राहिलों. असें असतां थोड्याशा दिवसांच्या साहचर्यानंतर एखाद्या परकीय माणसाला तुम्ही आपला समजावयाला तयार आहांत, पण आम्हांला मात्र वर्षानुवर्षांच्या सहवासानंतरहि ब्रिटिश प्रजाजन मानायला तुम्ही तयार असूं नये, याला काय म्हणावें! वऱ्हाडेतर ब्रिटिश प्रदेशांतून वऱ्हाडांत येऊन राहणारी व्यक्ति ही ब्रिटिश प्रजाजनच समजली जाईल, पण वऱ्हाडांतून वऱ्हाडेतर

हिंदुस्थानांत जाणाऱ्या व्यक्तीला मात्र त्या अधिकारापासून अलिप्त ठेवण्यांत आलें आहे. बरें, परदेशांतून हिंदुस्थानांत येणाऱ्या माणसाला नुसताच ब्रिटिश नागरिकत्वाचा हक्क मिळेल असें नव्हे, तर तो हक्क ब्रिटिश हिंदुस्थानांत जन्मास आलेल्या कोणत्याहि ब्रिटिश प्रजाजनाच्या हक्काहून लवभरहि कमी असणार नाहीं. अशी सारी परिस्थिति आहे आणि या कायद्यानें निर्माण केलेल्या व्याख्येच्या उपरिनिर्दिष्ट घोटाळ्यांतून बाहेर पडण्याकरितां म्हणून मि. दोरास्वामी अय्यंगार यांच्या सूचनेला मी दुजोरा देतों.

---

# प्रतियोगी सहकारिता *

गेल्या रविवारीं ता. २२-११-१९२५ रोजीं नागपूरच्या हेमंत व्याख्यानमालेंत डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. अणे यांचें "प्रतियोगी सहकारिते'वर सुश्राव्य व्याख्यान झालें. श्री. अणे आपल्या व्याख्यानांत म्हणालेः—

## माझा नागपूरच्या श्रोत्यांशीं परिचय

हेमंत व्याख्यानमालेच्या चालकांनीं दीड महिन्यापूर्वी मला जेव्हां मालेंत व्याख्यान देण्याची विनंति केली, त्याचवेळीं मी प्रतियोगी सहकारितेच्या मताचा आहें व मला त्या विषयाची आवड आहे, हें जाणूनच कीं काय, या विषयावर बोलण्यास सुचविलें होतें. हें सांगण्याचा हेतु एवढाच कीं, आजचा विषय चालू वादविवादामुळें निवडण्यांत आला नसून, त्याची निवड हा वाद निघण्यापूर्वीच झाली होती. या विषयावर पांच वर्षांपूर्वी याच ठिकाणीं मीं व्याख्यान दिलें होतें. १९२० च्या डिसेंबरचा पहिला आठवडा मला आठवतो (हंशा). [ १९२० सालीं श्री. अणे यांच्या व्याख्यानांत कोणी एका महानुभावानें जोडा फेंकला होता. ] विद्यार्थीदशेपासूनचा माझा काळ नागपुरांत गेला असल्याकारणानें तेव्हांपासून माझा येथील श्रोत्यांशीं परिचय आहे. नागपूर सोडून गेल्यापासून मी बहुधा प्रतिवर्षी नागपूरच्या श्रोत्यांपुढें येतच असतों व आजपर्यंतचे सर्व प्रसंग चांगले निभले असेंच मला वाटतें ( हशा ).

---

* 'महाराष्ट्र' नागपूर ता. २९-११-२५

## काँग्रेसचें धोरण बदलत गेलें.

गेल्या पांच वर्षांतील एकंदर हालचालींवरून हेंच दिसून येईल कीं, मीं त्यावेळीं प्रतियोगी सहकारितेबद्दल जें सांगितलें तेंच सत्य होतें. गेल्या पांच वर्षांत धोरण बदललें कीं नाहीं तें स्पष्ट दिसून येईल. या पांच वर्षांतील आढावा काढला म्हणजे स्पष्ट दिसून येईल कीं, तोंडानें नाहीं नाहीं म्हणत असतां कांग्रेसच्या धोरणांत बदल होत गेला आहे; व नाहीं नाहीं असें म्हणत असतांनाच आपण त्या गोष्टी करीत आलां आहांत. मनुष्याचें धोरण काय आहे तें तो १००-१५० कदम चालून गेला कीं आपोआपच कळतें व तें धोरण कोणतें आहे हें स्पष्ट होतें आणि मग त्यावरूनच त्या धोरणास नांव पडतें. वाट चालणारा जरी आपण कोठें चाललों आहों हें सांगत नसला, तरी त्याच्या मार्गावरून व त्याचें तोंड कोणत्या दिशेला आहे तें पाहून पाहणारा त्या धोरणाला नांव देऊं शकतो. मग तुला जर तुझ्या धोरणाचें नांव माहीत नसेल, तर त्या पाहणाऱ्याला विचार म्हणजे तो त्या धोरणाचें नांव सांगेल ( हंशा ). लोक सांगतील कीं, आजचें तुझें धोरण प्रतियोगी सहकारिता हेंच आहे. मला प्रतियोगी सहकारिता म्हणजे काय तें समजत नाहीं, असें कांहीं लोक म्हणतात. हें म्हणणें खरें नाहीं. ते लोक जेव्हां कळत नाहीं असें म्हणतात, तेव्हां ते ही भाषा केवळ सोईसाठीं बोलत असतात. "मला प्रतियोगी सहकारिता कळत नाहीं" असें म्हणणें त्यांस त्यावेळीं सोयीचें असतें म्हणून ते असें बोलतात.

## कळत नाहीं हें म्हणणें ढोंगाचें आहे.

मी त्या लोकांना असें विचारतों कीं, तुम्हांला ही प्रतियोगी सहकारिता केव्हांपासून कळेनाशी झाली ? ( हंशा ). तुम्हांला गेल्या ५।२५ वर्षांच्या काँग्रेसच्या इतिहासाचें स्मरण आहे कीं नाहीं ? कीं तो इतिहासच विसरलांत ! तुम्हांला काय कळत नाहीं ? तुम्हीं ज्या वेळीं असहकारिता काढलीत व प्रतियोगी सहकारितेला विरोध केला, त्यावेळीं तुम्हांला ती कळत होती कीं नव्हती ? व त्यावेळीं जर ती तुम्हांला कळत होती, तर ती गेल्या पांच वर्षांतच तुम्हांला कळेनाशी झाली कीं काय ? आम्हांला प्रतियोगी सह-

कारिता कळते, पण पटत नाहीं, असें सरळ कां बोलत नाहीं! आज आमचा मतभेद आहे असें कां म्हणत नाहीं ? जे लोक " मला प्रतियोगी सहकारिता कळत नाहीं" असें म्हणतात, त्यांचें तें ढोंग आहे. अमृतसरला प्रतियोगी सह-कारिता म्हणजे काय तें ठासून कळत होतें, मग आजच कसें कळेनासें झालें? अलीकडे कित्येक लोक प्रतियोगी सहकारितेचा अर्थ डिक्शनऱ्यांतून धुंडाळूं लागले आहेत (हंशा) आणि मग 'रिस्पॉन्सिव्ह' हें 'रिस्पॉन्स'चें विशेषण आहे वगैरे व्युत्पत्तीहि सुरू झाली (हंशा). नांवांत व्याकरणशुद्ध अर्थाचा प्रश्न नाहीं. एका आईबापांनीं मुलाचें नांव 'गोटया' असें ठेवलें, तेव्हां त्याची उत्पत्ति दगडापासून आहे असा अर्थ लावणार कीं काय ? (हंशा). एकदां एखाद्या वस्तूचें अगर धोरणाचें अमुक एक नांव ठेवलें म्हणजे त्याचा बोध त्याच नांवानें होत असतो व झाला पाहिजे. आज मला जो खेद वाटतो तो एकाच गोष्टीचा. हे लोक कळत असून कळत नाहीं असें म्हणण्याचा आग्रह धरितात! आज आम्हांला प्रतियोगी सहकारितेचें धोरण इष्ट वाटत नाहीं, हें म्हणणें सरळ आहे. पण ज्या शब्दाकरितां तुम्ही अमृतसरला भांडलांत, बिपिन-चंद्र पालसारख्या माणसानें ज्या शब्दाला त्यावेळीं विरोध केला —पण जो गृहस्थ आज तेंच धोरण इष्ट आहे असें म्हणत आहे—वगैरे गोष्टी तुम्ही विसरलांत कीं काय ? कीं, गेलीं ५ वर्षें हा विसरण्याचाच काळ होता ? गेल्या पांच वर्षांत ज्यानें जुनें सांभाळून ठेवलें असेल त्याची शहामत असें म्हणण्याचा प्रसंग आज आला आहे ( हंशा ). जो मनुष्य हुषार व बुद्धिमान् आहे, तो एकदां ग्रहण केलेली कल्पना विसरूं शकत नाहीं. फार तर पहिल्यानेंच ती त्याच्या डोक्यांत शिरावयास जो काय काळ लागेल तो लागेल ( हंशा ). मग आज ही विसरभोळेपणाची भाषा बोल-ण्याचा मोह कां सुटला ? याचें कारण एकच कीं, आज आम्हांला प्रतिसह-कारिता कळत नाहीं, असें म्हणणें त्यांना सोईस्कर आहे. कळत नाहीं हें म्हणण्यांतील खुबी अशी आहे.

## लोकमान्यांची प्रतियोगी सहकारिता

प्रति–सहकारिता या शब्दप्रयोगाची योजना अत्यंत विचारपूर्वक कर-ण्यांत आली आहे. लो. टिळकांच्या नेतृत्वाखालीं कॉंग्रेसचें जें शिष्टमंडळ

विलायतेस गेलें होतें, तेथेंच प्रति–सहकारितेचें धोरण प्रतिपादण्यास त्यांनीं सुरवात केली. सुधारणांचा खर्डा प्रसिद्ध होतांच, सत्यमूर्ति यांनीं त्यावर बहि-ष्कार टाकण्याचा एक ठराव लंडनच्या एका सभेंत मांडला. परंतु टिळकांनीं तो ठराव पास होऊं दिला नाहीं. ते म्हणाले, सुधारणांचा कायदा पास झाल्या-वर त्यांचा किती उपयोग करावयाचा कीं त्या मोडून टाकावयाच्या तो विचार मग करूं. टिळक परत हिंदुस्थानांत आले व त्यांस लवकरच अमृतसर कॉंग्रेस-साठीं जावें लागलें. वाटेंत त्यांस बादशहांचा जाहीरनामा वाचावयास मिळाला. हिंदुस्थानच्या लोकांनीं आमच्या अधिकाऱ्यांशीं सहकार्य करावें असें आव्हान त्यांत हिंदी प्रजेस केलें होतें. बादशहांच्या या पत्रास उत्तर देतांना लोकमान्यां-नीं सहकार्याला Responsive (प्रतियोगी) हें विशेषण लावून लोकांच्या सहकार्याचें स्वरूप कसें राहील हें थोडक्यांत स्पष्टपणें नमूद केलें. त्यांत त्यांनीं 'होहि' म्हटलें नाहीं; व 'नाहीं' असेंहि म्हटलेलें नाहीं. 'हो' अगर 'नाहीं' हें तुमच्या अधिकाऱ्यांच्या वागणुकीवर अवलंबून राहील, असा त्याचा अर्थ आहे. ज्यांना प्रतिसहकारितेचा अर्थ कळत नाहीं, त्यांनीं

## तो अर्थ अमृतसरच्या ठरावांत पाहावा.

त्या ठरावाचा, वेळ येईल त्याप्रमाणें सुधारणा तोडणें–जोडणें जें योग्य दिसेल तें करूं, असा अर्थ आहे. शहाणे लोक पुढील ५–२५ वर्षांचा कार्यक्रम आंखून ठेवीत नसतात; ते पुढील वर्तणुकीचा आजच निश्चय करून ठेवीत नाहींत. पुढें जसा काय प्रसंग येईल तसें ते वागत असतात. लोकमान्यांपुढें, या सुधारणांचा आज त्यांचा किती उप-योग करून घेतां येईल व त्या सुधारणा स्वराज्याचे अधिक हक्क मिळवि-ण्यासाठीं जरूर तो लोकक्षोभ उत्पन्न करण्यास किती उपयोगी पडतील, हा प्रश्न होता. परंतु ते पुढें वारले; व त्यांच्यामागें पुन्हां "स्वराज्या"च्या व्याख्येपासून सुरुवात झाली. या भानगडींत स्वराज्याची जी कल्पना आणून देण्यांत आली होती, तीहि नष्ट झाली व ती कल्पना लोकांपुढें मूर्त स्वरूपांत पुनः मांडण्याचा प्रसंग आला. गेल्या सप्टेंबरांत असेंब्लीनें स्वराज्याचा जी मागणी केली, ती पूर्वीच्या स्वराज्याच्या कल्पने-

हून फारशी भिन्न नाहीं, हें स्पष्ट दिसून येईल. सुधारणा कायद्यान्वयें आमच्या अपेक्षेप्रमाणें आम्हांला हक्क मिळाले नाहींत, ही गोष्ट अमृतसरलाच आम्हांला कळली होती. सुधारणांवर आमचा मुख्य राग आहे तो एवढ्याचसाठीं कीं, स्वराज्यास आज आम्ही पात्र नाहीं, असा त्यांत आरोप केलेला आहे. परंतु पुढें जे कांहीं थोडेसे अधिकार आम्हांला देण्यांत आले आहेत,त्यांचा उपयोग करून घेण्याच्या वेळीं तो प्रश्न आमच्यापुढें प्रत्येक वेळीं उभा राहात नाहीं. तेव्हां पहिला अपमान गिळून पुढें काम करावें लागतें व तें आपणांस केलें पाहिजे. ह्या सुधारणा मिळण्यापूर्वी आम्हीं जी चळवळ केली, देशांत जो असंतोष पेदा केला, तो या एवढ्याच सुधारणा मिळण्याच्या लायकीचा होता.

**सरकारला अडवल्याशिवाय कांहीं मिळणार नाहीं.**

सध्यां काँग्रेसमध्यें असलेले पक्ष व मवाळ यांच्यांत मुख्य फरक असा आहे कीं, जोर लावल्याशिवाय कांहींहि मिळणार नाहीं, ही काँग्रेसमधील सर्व पक्षांची समजूत आहे. मवाळांना असें वाटतें कीं, इंग्रजांच्या चांगुलपणावरच आपले पुढील हक्क मिळणें न मिळणें अवलंबून आहे. इंग्रजांत मॉंटेग्यूसारखा एखादा भला मनुष्य उपजेल व त्याला सामोपचाराच्या चार गोष्टी सांगितल्या म्हणजे तो कांहीं देईल. तसें नच झालें तर मी देवावर हवाला देऊन बसेन असें ना. शास्त्रयांसारखा मवाळ म्हणतो. आमचा असा भरंवसा आहे कीं, त्यांना सतावल्याशिवाय, पदोपदीं अडविल्याशिवाय आम्हांला कांहींहि मिळणार नाहीं. इंग्रजांशीं सख्य ठेवणें हें मवाळांचें ब्रीद आहे, उलट आम्हीं असें म्हणणारे आहोंत कीं, तुमचेंआमचें सख्य न बनेल तर बरें ! लोकक्षोभाची आंच लागल्याशिवाय इंग्रज कांहींहि देत नाहींत. तेव्हां कोणतीहि चळवळ करीत असतां तिनें लोकक्षोभ होईल कीं नाहीं हा प्रश्न आमच्यापुढें असतो. सुधारणांचा होईल तो उपयोग करून घेण्यांत टिळकांचें लक्ष या सुधारणांचा उपयोग आणखी लोकक्षोभ निर्माण करण्याकडे कसा करून घेतां येईल इकडे होतें. इंग्रज लोक संन्यासी नाहींत, त्यांच्या संस्कृतींतच मुळीं ती कल्पना नाहीं. ते सर्व प्रकार आमच्याच वाट्याला आले आहेत ( हंशा ), व आज इंग्रज व्यवहारांत आमच्यापेक्षां

अधिक शहाणे ठरले आहेत. सुधारणांचा होईल तो थोडाबहुत उपयोग करून घ्यावा, कारण त्यानें लोकक्षोभ अधिक करतां येईल, ही टिळकांची भावना असल्यामुळें त्यांनीं अमृतसरला ठरावाच्या भाषेचा अट्टाहास धरला होता व अखेर समेट होऊन अमृतसरचा ठराव पास झाला.

## पण म्हणे मॉंटेग्यूचे आभार मानावयाचे !

तेथें एकानें मॉंटेग्यूचे आभार मानण्याचा हट्ट धरिला, तर दुसरे पूर्ण सहकार्याचें उदक सोडावयास तयार होते. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊनच टिळकांनीं कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पक्ष काढून त्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. लोकांना स्वराज्याची कल्पना नीट व प्रत्यक्ष समजावून देण्यासाठीं सुधारणांचा उपयोग टिळकांना करावयाचा होता. व्याख्येच्या भानगडींत मोठमोठे शहाणे लोकहि पिसे होतात. शेतकऱ्याला तुमचें लोकशाही स्वराज्य समजत नाहीं. परंतु त्याच्या शेताचा धुरा जर कोणी फोडला, तर मात्र तो लगेच नांगर त्याच्या डोक्यांत घालावयास तयार होतो. कारण त्याला ठाऊक असतें कीं, आज हा शेताचा धुरा फुटूं देणें म्हणजे वर्षाची भाकर घालवून बसणें होय. सुखाचें विधायक स्वरूप समजून देत, असतांच तो अडाणी माणूस मागें सांगितलेल्या गोष्टी विसरून जातो, परंतु त्याला एक चिमटा घेतला कीं, लगेंच सुखदुःखाची कल्पना येते. नाहीं तर ब्रह्माच्या व्याख्येपेक्षांहि अवघड व्याख्या करून स्वराज्याची कल्पना लोकांस पटवूं म्हणाल तर त्या ब्रह्मघोटाळ्यांतून बाहेर पडणेंच नको.

## खरा विरोध म्हणजे व्यत्यय होय.

कोणत्याहि गोष्टींतील स्वहित व त्याचा खरा उपयोग यांची योग्य कल्पना आल्याखेरीज मनुष्याला खरा विरोध करतां येणार नाहीं. "तुझे हे गमजे, ही अरेरावी मी चालूं देणार नाहीं" असें कौन्सिलांत नुसतें नमूद करून ठेवण्यापासून कांहींहि फायदा नाहीं. सरकारला तुम्हीं तोंडी विरोध केलांत, पण त्यांच्या कामांत व्यत्यय आणूं शकला नाहीं, कारण त्या विरोधाला लोकक्षोभाचा पाठिंबा मिळाला नाहीं. विरोध ही नुसती कल्पना आहे, व्यत्यय हा प्रत्यक्ष परिणाम आहे. व्यत्ययाचा प्रयत्न हा विरोध

होय. विरोध करण्याचा मुख्य हेतु सरकारच्या कामांत व्यत्यय उत्पन्न करणें हा आहे. नुसता विरोध करणें यांत कांहीं विशेष नाहीं; कारण नाहीं म्हटलें तरी सरकारचा कारभार चालण्याचें कांहीं थांबत नाहीं. एकदां विरोध केल्यावर व्यत्यय करण्याच्या तयारीस लागलें पाहिजे व यासाठीं लोकांस 'स्वत्वा'ची कल्पना आणून दिली पाहिजे. मागील अनुभवावरून आपण असें म्हणूं शकतों कीं, सामान्य शेतकरी हा तुमच्या आमच्या अगोदर या लढ्यांत दमणार नाहीं. परतु तुम्हीं त्याला स्वत्वाची कल्पना नीट करून न दिल्यामुळें त्याचा दम अखेरपर्यंत टिकून राहात नाहीं. त्यानें तुमच्या-प्रमाणें १५–२० वर्षें पुस्तकी ज्ञान संपादन करण्यांत खर्च केलीं असतीं म्हणजे लोकशाही स्वराज्याची त्याला योग्य कल्पना आली असती. ती कल्पना त्याला यावी अशी जर तुमची खटपट असेल, तर त्याला वस्तुपाठ–प्रदर्शन–पद्धतीनें त्याची जाणीव करून दिली पाहिजे. लहान मुलांना, अज्ञ लोकांना, प्रत्यक्ष वस्तु दाखवून ज्ञान करून दिल्याखेरीज त्याचें मर्म समजत नाहीं. पूर्वींचे मार्ग भिन्न होते व लोकहि भिन्न होते. राज्य मिळावयाचें असें म्हटलें कीं,त्याच्या डोक्यांत हेंच येतें ( हंशा ). आज आपले मार्ग भिन्न आहेत. मठ्ठ डोक्यांत तुमच्या त्या शाब्दिक कल्पना शिरतच नाहींत. संघटित संस्था कशा अस-तात ह्याची जाणीव लोकांना करून देण्यासाठीं तसल्या संस्थांच्या लहान लहान प्रतिमा त्यांच्यासमोर मांडल्या पाहिजेत. टिळकांना ही कला उत्तम साधली होती. एका तासाच्या बोलण्यांत गीतेचें सार समजून देण्याची त्यांची तयारी असे. आपणांस काय मिळवावयाचें आहे व त्याचें स्वरूप काय आहे हें लोकांच्या प्रत्यक्ष निदर्शनास आणून दिलें पाहिजे.

## हल्लींचा वाद कां निघाला ?

हल्लींच्या वादाचें बीज पाटणाच्या ऑ. इं. काँ. कमिटींत रुजलें होतें. श्री.जयकर–केळकरांनीं हा वाद-काढला. त्यांनीं स्वराज्यपक्षाविरुद्ध बंड केलें, म्हणून हा वाद निघाला नाहीं. पं. मोतीलाल नेहरूंचें लक्ष कानपूरच्या काँग्रेसवर आहे. त्यांना ती काँग्रेस स्वराज्यपक्षाच्या ताब्यांत घ्यावयाची आहे

व आपण जर 'प्रतियोगी सहकारिता करतों, असें म्हणूं तर आपल्या हातीं काँग्रेस येणें कठीण जाईल,ती कदाचित् येणारहि नाहीं,म्हणून नेहरूंना आज " प्रतियोगी सहकारिता " आपणांला समजत नाहीं' असें सोंग करावें लागत आहे. केळकर–जयकरांचे राजीनामे आले हें त्यांच्या पोटांत पाटणापासून प्रति–सहकारितेविरुद्ध जी मळमळ होती, ती एकदम ओकून पडण्यास एक कारण सांपडलें एवढेंच ! पाटणा येथें पं. नेहरूंवर डॉ. पट्टाभिसितारामय्या यांनीं असा आरोप केला कीं, स्वराज्यपक्षाचें असेंब्लींतील आजचें धोरण हें 'प्रतिसहकारितेचें' आहे.त्यावर एकदम पंडितजी रागावले व नंतर पुढारी कसा असावा, संभावितपणा कशाला म्हणतात, वगैरेवर पंडितजी व म. गांधी यांनीं एक व्याख्यान झोडल्यावर पाटणाचा हा समारंभ आटोपला(हंशा) पाटणाला भरलेल्या वर्किंग कमिटींत असेंब्लीची स्वराज्याची मागणी मंजूर झाली व तो ठराव ऑ. इं. काँग्रेस कमिटीपुढें मांडावा असें ठरलें. परंतु तेथें तो पास होण्याची आशा दिसेना म्हणून पं. नेहरूंनीं तो ठराव ऑ. इं. काँ. कमिटीपुढें मांडलाच नाहीं.

## काँग्रेसमध्यें बंड

पाटणाला कांग्रेसची घटना ऑ. इं. काँ. कमिटीनें बदलली, हें कांग्रेसमध्यें सर्वांच्या संमतीनें एक ' बंड ' च झालें ! त्या बंडानें काँग्रेसमध्यें ' डायार्की ' स्थापण्यांत आली. पं. नेहरूंना राज्यघटनेंत ' डायार्की ' चालत नाहीं, परंतु काँग्रेसमध्यें मात्र चालते! (हंशा). तेथें त्यांना ती Unworkable वाटली नाहीं. सूतसंघाच्या कारभारांत काँग्रेसला हात घालण्याचा अधिकार नाहीं; परंतु कांग्रेसमध्यें मात्र प्रत्येक बाबतींत मत देण्याचा हक्क सूतसंघाच्या सभासदांना आहे. असो.आतां कानपूरच्या काँग्रेसमध्यें स्वराज्यपक्षाचें धोरण व नवी घटना हीं चर्चेसाठीं येणार आहेत व काँग्रेस स्वराज्यपक्षाच्या हातांत यावी म्हणून नेहरू तेथें खटपट करणार आहेत.अशा वेळीं पट्टाभिसीताराम यांनीं केलेला आरोप खोटा आहे हें जाहीर करणें पंडितजीस जरूर वाटतें व म्हणून ही मोहीम त्यांनीं सुरू केली आहे. केळकर–जयकरांच्या राजीनाम्याचें निमित्त फालतु आहे ( हंशा ). पंडितजींच्या-

पुढें कानपूर असल्यामुळें तांबे प्रकरणाचा फायदा घेऊन ते प्रतियोगी सहकारितेचें हिडीस व भेसूर चित्र रंगवीत आहेत ! पं. नेहरूंना प्रतियोगी सहकारिता कळते, पण आपण जर आजच्या धोरणाच्या पुढली पायरी कबूल केली तर हा कानपूरचा डाव साधणार नाहीं, म्हणून त्यांना आज " मला प्रतिसहकारिता कळत नाहीं " हें असें म्हणणें सोईचें झालें आहे ! हा प्रयोग झालाच नाहीं !

## आंत शिरून यंत्र बंद पाडा !

दिवाणगिऱ्या स्वीकारा, म्हणजे सरकारच्या कामांत कांहीं व्यत्यय आणतां येईल, असें आम्ही म्हणतों. ते म्हणतात, हें करतां येणार नाहीं. मी विचारतों, तें कशावरून म्हणतां ? यंत्रांत हात घालण्याची क्रिया अजून झालेलीच नाहीं. मोटार थांबवावयाला आम्ही गेलों; पण जाऊन बसलों मागच्या स्प्रिंगच्या गाद्यांवर ( हंशा ). जर मोटार बंद पाडावयाची, तर मोटार-ड्रायव्हरच्या जागीं जाऊन बसा व यंत्राची तपासणी करा; फायदा होतोसें दिसलें तर बसलें, नाहीं तर उतरून गेलें ! ( हंशा ). परंतु ड्रायव्हरच्या जागीं न बसतांच कोणता स्क्रू काढला पाहिजे किंवा कोणत्या चाकांत खिळा मारला पाहिजे हें न पाहातांच 'होत नाहीं' असें कां म्हणतां ? हा प्रयोग जरी यशस्वी न झाला तरी तुमचें नुकसान खात्रीनें होणार नाहीं. पूर्वी जो मनुष्य ( म्हणजे मवाळ ) ड्रायव्हरच्या जागीं जाऊन बसला होता, तो मुळीं यंत्र मोडण्यासाठीं बसलाच नव्हता; व त्याच्यामागें त्या कामीं त्याला मदत करण्याशाठीं ( कौन्सिलांत ) माणसेंहि नव्हतीं. म्हणून त्याच्या हातून कांहीं झालें नाहीं. जनतेचें पूर्ण कल्याण करण्याची सत्ता आम्हांला मिळालेली नाहीं, म्हणून या सुधारणा थोतांड आहेत; परंतु त्यांतूनहि जें काय मिळवतां येण्यासारखें असेल तें आपण मिळविलें पाहिजे.

## याकरितां दिवाणगिऱ्या पाहिजेत.

दिवाणगिरी स्वीकारल्यास सहकारिता करावी लागेल असें म्हणतात. परंतु दुसऱ्याच्या खिशांतील ४ आणे काढावयाचे झाल्यास, त्याच्या खिशांत हात घातलाच पाहिजे व हे चार आणे जर आपल्या खिशांत

असतील तर मग अगदीं आलिंगन देण्याइतकेंहि जवळ जावें लागेल. ( हंशा ). मवाळ व प्रतिसहकारवादी 'परंतु, आम्हीं दिवाणगिऱ्या स्वीकाराव्या ' असें म्हणूं लागतांच तुम्ही व नेमस्त यांच्यांत फरक काय ? असा प्रश्न करण्यांत येतो. दोघांचीहि क्रिया एकच आहे; परंतु हेतू भिन्न आहेत. मवाळांना इंग्रजांच्या सौजन्यानें जें काय पदरांत पडेल तेवढेंच पाहिजे. आम्हांला त्यांना तकलीफ देऊन अधिक मिळवावयाचें आहे. ड्रायव्हरच्या जागेवर बसण्यापुरतें दोघांतहि साम्य आहे; परंतु एकाला शक्य तर एंजिनच बंद पाडावयाचें आहे व दुसऱ्याच्या मनास तो विचारहि शिवत नाहीं. त्यांना आपल्या सौजन्याचें प्रदर्शन करावयाचें आहे; आम्हांला नोकरशाहीला सतावून सोडावयाचें आहे. . दिवाणगिरी स्वीकारावी असें आम्हीं म्हणतांच ती जागाच वाईट आहे, तेथें गेल्यानें मनुष्य मोहास बळी पडतो, तो सरकारचा मनुष्य होतो, वगैरे आक्षेप घेतले जातात. मी विचारतों एंजिनवर बसण्याला तुम्ही एवढें भितां काय म्हणून ! तें एंजिन मोडण्याचा प्रयत्न खंबीरपणें करील असा एकहि मनुष्य तुमच्याजवळ नाहीं काय ! मग त्या कामगिरीसाठीं हा एवढा मोठा संघ निर्माण कशाला केला व हें वाळूचें गाठोडें बांधलें तरी कशाला ? आपल्या पक्षांतील शिस्तीच्या, संघटनेच्या व स्वार्थत्यागाच्या लांब लांब गोष्टी मोठ्या अभिमानानें बोलतां, त्या काय म्हणून ? तेथें गेल्यावर मोह पडेल ही भाषा बोलणें म्हणजे मूलच्छेदी पांडित्य दाखविणें होय. या कारणासाठीं जर ती जागा तुम्ही स्वीकारण्याचें टाळत असाल तर मग एवढ्या

## मोठमोठ्या बाता मारतां कशाला ?

चालू कौन्सिलच्या हयातींत आम्हीं दिवाणगिऱ्या स्वीकारणार नाहीं, असें वचन मतदारांस दिलें आहे, ही गोष्ट आम्हांला माहीत आहे. परंतु आम्ही दिवाणगिऱ्या घ्याव्या असें जें प्रतिपादितों तें पुढील निवडणुकीला अनुलक्षून आहे. पांच वर्षें फुकट गेलीं, तसें आणखी एक वर्ष फुकट जाईल. परंतु येत्या कानपूर काँग्रेसचा निकाल पुढील निवडणुकीच्या वेळीं आमच्या बोकांडी बसणार आहे. कारण १९२६ च्या निवडणुकीच्या दरम्यान ही

एकच काँग्रेस भरणार असल्यामुळें आमचें म्हणणें पुढें मांडण्यास हीच वेळ योग्य आहे. आम्ही आज जें बोलत आहोंत यांत पक्षाचा विरोध किंवा घात नाहीं. हें पुढील धोरणाचें भांडण आहे व म्हणून हा आजचा वाद करणें अप्रासंगिक नाहीं. पक्षाची शिस्त लादण्याच्या युक्त्या आज दोन वर्षे तुम्ही आमच्याशीं कशा खेळलांत हें आम्ही जाणून आहोंत. इतके दिवस आम्हीं तुमच्या या युक्त्या चालूं दिल्या. परंतु हीं सहा वर्षे गेलीं तशीं आणखी ३ वर्षें जाऊं देण्यास तयार नाहीं. पुढचीं तीन वर्षेंहि अशींच जाऊं द्या, असें सांगण्याचें पाप करण्यास मी तयार नाहीं. अमृतसरच्या काँग्रेसनंतर, टिळकांच्या मृत्यूनंतर एक आकस्मिक संकट उद्‌भवलें व त्या झंझावातानें आम्हीं आंखलेला कार्यक्रम पार कोठें उडून गेला ! आम्हीहि हवेंत हेलखावे खाऊं लागलों, यामुळें हातास जें लागेल त्याचा आश्रय घेत घेत आज कोठें आमचे पाय जमिनीस लागत आहेत. प्रतियोगी सहकारितेचें धोरण मरणें शक्य नाहीं. फिनिक्स पक्ष्याची अशी एक गोष्ट सांगतात कीं, त्याला जरी जाळलें तरी तो राखेंतून जिवंत होतो. त्याप्रमाणें

## प्रतियोगी सहकारिताहि अमर आहे.

त्याचा अनुभव गेलीं दोन वर्षे आलाच आहे. गेल्या दोन वर्षांत सतत विरोधाचें धोरण टाकून देऊन आपल्या धोरणांत स्वराज्य पक्षानें फरक कां म्हणून केले ? कारण लोकांपुढें त्यांच्या डोळ्यांत भरेल असें काम करीत आहोंत हें दाखविण्याची जरूरी त्यांना भासूं लागली. असेंब्लींत गेल्यावर पहिले तीन महिने एकमेकांचीं तोंडें पाहाण्याचा धंदा केला. परंतु नंतर आपोआप हळूहळू बदल करण्यांत आला. कमिटयांवर जागा स्वीकारणें, असेंब्लींच्या अध्यक्षाच्या जागीं आपला उमेदवार नेमणें, येथपर्यंत फरक होत आले. पाटणा येथील स्कीन कमिटीवरील नेमणुकीला स्वराज्यपक्षाच्या कौन्सिलची परवानगी मिळविण्याचें चटश्राद्धहि उरकवून घेण्यांत आलें. त्याच वेळीं केव्हांहि कोणत्याहि कमिटीवर जाण्यास स्वराज्यपक्षाच्या सभासदाला परवानगी देऊन टाकावी असा प्रश्न पुढें आला. परंतु तसें केल्यास दिवाणगिऱ्या स्वीकारण्यासहि हरकत होणार नाहीं, या भीतीनें तो ठराव करण्याचें रहित झालें. आतां

आम्ही निरनिराळ्या कमिटयांवर जाऊन बसूं लागलों आहों. पण तेथें तरी विरोध कोठें होत आहे? फायर्नन्स कमिटीवर मी आहें पण तेथें तर विरोध होऊंच शकत नाहीं. पण तेथें जाण्यांत फायदा काय ? तेथें या खात्याचे पैसे काढून त्या खात्याला पुरीव, तमक्या खात्यांत खर्च अधिक होतो तो कमी कर असला प्रकार चालू आहे. मग कमिटयांवर जाण्याचें कां ठरविलें ? तेथे गेल्यावर एरवी जी माहिती मिळत नाहीं, ती तेथें मिळते व आंतून कारभार कसा चालतो याची जाणीव येते हा फायदा करून घेण्यासाठीं कमिटयांतून घुसावें असें ठरलें.

## स्कीन कमिटीवर तरी पंडितजी कां गेले ?

तर एरवीं लष्करी कारभाराचे अंतरंग आपल्याला समजून येत नाहीं म्हणून. मग मी विचारतों कीं, आणखी थोडें पुढें सरून दिवाणगिऱ्या कां स्वीकारीत नाहीं ? तेथें जाऊन बसलांत तर याहीपेक्षां चांगलें अंतरंग तुम्हांला पाहावयास मिळेल.तुम्हीं आजपर्यंत जे फरक केलेत ते लोकांस कांहीं काम दाखविण्यांत यावें म्हणूनच ना ? लोकांची अपेक्षा कीं, तुम्ही कौन्सिलांत व असेंब्लींत जाऊन कांहीं कराल. पुढच्या निवडणुकीच्या वेळीं तुम्हीं मतदारांस आपण काय दिवे लावले म्हणून सांगणार? कीं "आम्हीं काय केलें हें तुम्हांला कळलें नाहीं यांतच आमच्या कर्तबगारीची मख्खी आहे" असें त्यांना सांगणार ? ( हंशा ). केलेले फरक करण्यांत तुमची काय कल्पना होती ? आम्ही दिवाणगिऱ्या स्वीकारा असें म्हणतों,तेव्हां सरकारचा 'रिस्पॉन्स' कोठें आहे असें विचारतां. पण तुम्ही १९२४ मध्यें 'राउंड टेबल'ची मागणी केल्यानंतर आपल्या कार्यक्रमांत व धोरणांत फरक केलांत तेव्हां

## तुम्हांला काय रिस्पॉन्स मिळाला होता ?

तेव्हांच्या व आजच्या परिस्थितींत काय फरक झाला ? व या १ वर्षांत तरी आतां काय फरक होणार आहे ? तुमच्या हातीं वैकुंठ थोडाच येणार आहे ! तुमच्या या मागणीला " रिस्पॉन्स " द्यावयाचा म्हणजे इंग्रजांनीं आपलें चंबुगबाळें हिंदुस्थानांतून घेऊन जावयाचें. हा एकच ' रिस्पॉन्स ' तुम्हांला सुखासुखी देण्याइतके इंग्रज दुधखुळे नाहींत. उद्यां सरकारनें'कमि-

शनें नेमतों' म्हटलें म्हणजे 'रिस्पॉन्स' मिळाला असेंच जर तुम्हांला म्हणावयाचें असेल तर खुशाल म्हणा, मी तरी त्याला खरा 'रिस्पॉन्स' समजत नाहीं. कारण कमिशनवर कोण माणसें नेमणार व त्यांच्यापुढें काय प्रश्न ठेवणार ही शंका राहातेच. गेल्या दीडशें वर्षांत इंग्रजांचें सौजन्य-दौर्जन्य जें काय आहे तें आमच्या चांगलें अनुभवास आलें आहे. फरक एवढाच कीं, वारन हेस्टिंग्ज जाऊन त्यांच्या जागीं रीडिंग आले आहेत (हंशा). कौन्सिलांत शिरून जर तेथील सर्व साधनांचा उपयोग करून घ्यावयाचा नसेल, तर मग आपण कौन्सिलांत नसलेलेंच बरें! पुढील निवडणुकीस आम्हीं दिवाणगिऱ्या घ्यावयास तयार झालें पाहिजे. दिवाणगिऱ्या स्वीकारल्या म्हणजे स्वराज्याचा आम्हांला मोक्ष मिळत नाहीं, तर निदान नुसतें मारुतीचें दर्शन तरी घडूं द्या ! ( हंशा ). आपण कांहीं करावयाचें नाहीं, मतदारांची अपेक्षा काय आहे तिकडे लक्ष द्यावयाचें नाहीं व वर तुला कळलें नाहीं यांतच आमच्या कर्तबगारीचा मख्खी आहे असें म्हणावयाचें, असला बेशरमपणा आणखी चालूं देण्यास मी तयार नाहीं.

## असला गोंधळ मी चालू देणार नाहीं.

तुम्ही जर मतदारांचें जें काय थोडेंसें हित होण्यासारखें आहे तेंहि पदरांत पाडून देणार नसला, तर या लोकांना निवडून देऊं नका असें सांगण्यास मी तयार आहें. आहे असलाच गोंधळ चालूं देण्याचें पाप मी करणार नाहीं. मध्यप्रांतांत एकदां बजेट फेटाळल्यावर पुनः तो प्रसंग येऊं नये, असेंच प्रत्येक कौन्सिलरला वाटत होतें. कारण निष्कारण लोकांच्या हिताला विरोध केल्याचें पाप माथीं बसत होतें. मतदार अज्ञान आहेत. तरी त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेतां कामा नये. ज्याला कामच करावयाचें नाहीं, त्याला आहे हा कार्यक्रम चांगला वाटणारच. सध्यांच परप्रांतस्थ मित्रांना एके ठिकाणीं जमण्यास कौन्सिलचा उपयोग चांगला होत आहे(हंशा). आधींच सरकारी कामकाजापुढें आमच्या बिनसरकारी कामकाजास वाव मिळत नाहीं. गेल्या दोन वर्षांत १००-१२५ बिलांपैकीं २-३ बिलें तेवढीं निकालांत निघालीं. कांहींहि काम न करतां गप्पा मारायला सध्यां कौन्सिलें ही चांगली सोय झाली आहे ! आज

'गर्भधारणा' झाली म्हणून सांगावें, व उद्यां 'गर्भपात' झाला असें म्हणावें; कारण बाहेर कांहींच दाखवावें लागत नाहीं. ( हंशा ). आज मौज अशी आहे कीं, विधायक कामगिरी करावी असें सर्वत्र म्हणतात. पण ती करावयाची कशी! भलत्याच जोखमीच्या भीतीनें हें काम आज अंगाबाहेर टाकण्यांत येत आहे. काम करावयास लागा म्हणजे कोठें अडतें तें कळेल. जोडा कोठें चावतो, हें घालणाऱ्याला कळतें.

## दिवाणगिरीच्या अभावीं होणारी लोकांची दैना

गांवोगांव ग्रामपंचायती स्थापा असें तुम्ही म्हणतां. एका महिन्यांत यवतमाळ जिल्ह्यांतील १००० खेड्यांपैकीं ५०० गांवीं ग्रामपंचायती स्थापूं अशी आमची उमेद; परंतु पुऱ्या ५ ही पंचायती स्थापून झाल्या नाहींत. एक दिवस जाऊन आम्हीं लोकांच्या सह्या आणाव्यात; व दुसऱ्या दिवशीं तहशीलदार जाऊन ' ग्रामपंचायत नको ' असें जाहीर करतो; व आमची मेहनत पाण्यांत जाते. प्राथमिक शिक्षणाच्या आम्हीं काढलेल्या शाळांना पैशाच्या अभावीं आम्हींच कुलपें ठोकावींत, असा प्रसंग आला आहे. कौन्सिलनें पैसा मजूर केला; परंतु डायरेक्टर पैसा मंजूर करील तर आम्हांला पैसा मिळणार. म्हणजे दिवाण नसल्यामुळें कौन्सिलनें मंजूर केलेला पैसाहि आज आमच्या उपयोगी पडत नाहीं! लोकांचें अकल्याण होत असतांना, तें तुमच्यानें पाहावत असेल, तर आम्ही तुमच्या निष्ठुर वृत्तीची प्रशंसा करूं. आमच्यानें असें निष्ठुर होववत नाहीं. लढाईच्या तयारीखालींच लोकांना आज लुबाडणें चालू आहे. लढाई चालू असतां हें क्षम्य आहे; परंतु तिच्या नांवाखालीं चालणारी ही लूट आम्हांला पसंत नाहीं. आज 'रिस्पॉन्स'च नाहीं तर रिस्पॉन्सिव्ह कोऑपरेशन तुम्ही करणार कसें? असें आम्हांला विचारण्यांत येतें. स्वराज्याच्या घटनेच्या बाबतींत आज रिस्पॉन्स नाहीं हें आम्हाला कबूल आहे. परंतु आज ४० वर्षें कॉंग्रेसनें दुसऱ्या कांहीं मागण्या केल्या होत्या कीं नव्हत्या? कीं, त्या सर्व मागण्या १९२० च्या महापुरांत वाहून गेल्या? ज्यावेळीं आज तुम्ही 'रिस्पॉन्स' नाहीं म्हणतां, तेव्हां गेल्या ३०-३५ वर्षांचा कॉंग्रेसचा इतिहास तुम्हीं दृष्टीआड करीत असतां! आज चालू असलेलें दळण आणखी दळत बसण्याची आमची तयारी नाहीं.

## प्रतियोगी सहकारितेचें तत्त्व

पूर्वी आम्हीं केलेल्या ज्या मागण्या सरकार आज कबूल करीत असेल, त्या सर्व पदरांत पाडून घेऊन, स्वराज्याच्या घटनेचा लढा पुढें चालू ठेवावयाचा हें प्रतिसहकारितेचे तत्त्व आहे. मवाळांच्या वागणुकींत विरोध हा अपवाद आहे; आमचें तें जीवन आहे. मवाळ व प्रतिसहकारवादी यांच्यांतील फरक हा आहे. कारण मतदार हाच आमचा परमेश्वर आहे, ( हिअर, हिअर ). कौन्सिलांत नुसतें बहुमत मिळवून ' जितम् ' असें म्हणून बसल्यानें इतिकर्तव्य होत नाहीं. आम्हीं इतके दिवस तुमच्या म्हणण्याप्रमाणे चाललों. झंझावातांत सांपडल्यानंतर जमिनीवर येण्यासाठीं जें हातास लागलें त्याचा आश्रय केला. आतां जमिनीवर पाय लागतांच झंझावात सुरू होण्यापूर्वीं आम्हीं जी प्रतिज्ञा केली होती, ती तडीस नेणार, मग त्यासाठीं मध्यंतरीं केलेल्या प्रतिज्ञा मोडाव्या लागल्या तरी त्याची आम्हांला पर्वा नाहीं. या मधल्या प्रतिज्ञा मोडल्याबद्दल परमेश्वर जी शिक्षा करील ती मी भोगीन. एका विशिष्ट पक्षाला दिलेल्या वचनापेक्षां मला ३० कोटी लोकांच्या कल्याणाची काळजी जास्त आहे व तें कल्याण साधण्यासाठीं मला एखाद्या पक्षास दिलेलें वचन मोडावें लागलें, तरी मी मोडण्यास भिणार नाहीं. आज आम्हीं हीं मतें प्रतिपादीत आहोंत, म्हणून स्वराज्यपक्षांत फूट पाडण्यांत येत आहे, असा आरोप आमच्यावर केला जात आहे. परंतु तो आरोप घेणें इष्ट नाहीं. कारण लोकांपुढे हे विचार कानपूर काँग्रेसपूर्वींच मांडले जाणें अवश्य आहे.

## पुढील निवडणुकीकरितां हा वाद आहे.

टिळकांच्या मृत्यूच्या वेळीं पवित्र अंतःकरणानें केलेली प्रतिज्ञा पाळणें हें आम्ही आपलें अधिक पवित्र कर्तव्य समजतों. प्रतिसहकारिता टिळकांची आहे, म्हणून ती घ्या असें मी म्हणत नाहीं. परंतु तसें म्हणण्याचा मला पूर्ण हक्क आहे, हेंहि मी सांगून ठेवतों. आज जरी आमच्यावर प्रतिज्ञाभंगाचा कोणी आरोप केला, तरी त्याच्याकडे आम्ही दुर्लक्ष करूं, परंतु दिवाण-

गिऱ्या चालू अमदानींत घ्या, असें आम्ही म्हणत नाहीं हेंहि विसरूं नका. कारण एक वर्ष आणखी फुकट गेलें म्हणून कांहीं देश बुडणार नाहीं. देवानें हिंदुस्थानला पुष्कळसें आयुष्य दिलें आहे. आज प्रश्न आहे तो १९२६ च्या निवडणुकीचा आहे व तो सोडविण्यासाठीं हा वाद करणें जरूर आहे. असें म्हणून श्री. अणे यांनीं आपलें भाषण संपविलें.

---

# ठाणें जिल्हा परिषद*

## ( अधिवेशन ४ थें, मुक्काम पालघर )

पालघर येथें ही परिषद भरली असतां,अध्यक्ष या नात्यानें श्री. माधवराव अणे यांनीं ता. २८–११–२५ रोजीं केलेलें भाषणः—

### जिल्हा परिषदांचें द्विविध कर्तव्य

स्वागताध्यक्षांच्या भाषणावरून हा जिल्हा कर्तव्यदक्ष व बुद्धिमान् अशा पुरुषांचा असल्याचें सिद्ध झालें आहे. अशा स्थितींत मजसारख्या दूरच्या माणसास अध्यक्ष बोलावण्यांत गरजेपेक्षां त्यांचें सौजन्यच अधिक दिसून येतें. जिल्हासभेस दुहेरी विचार करावयाचा असतो, एक स्थानिक प्रश्नांचा व दुसरा राष्ट्रीय बाबींचा. स्थानिक प्रश्नांची चर्चा करणें हें जसें जिल्हा-सभेचें काम,तसेंच राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेस आपला सल्ला निर्भीडपणें देणें व राष्ट्रीय चैतन्य आपल्या भागांत खेळविणें,हें तिचें दुसरें काम होय. देशांतील वातावरण सध्यां बरेंच क्षुब्ध झालें आहे, यामुळें आपसांत मतभेद झाला तरी परकीय सत्ता आपणावर आहे, व ती नष्ट करणें आपलें आद्य कर्तव्य आहे, याचें कोणांहि विस्मरण पडूं देतां कामा नये. हिंदुस्थानचें राजकारण परकीय सत्तेनें आधींच इतकें बिघडलें आहे कीं, आमच्यांत कितीहि मतभेद झाले, तरी तें याहून अधिक बिघडणें शक्य नाहीं. अशा वेळीं जिल्हासभेनें आपल्या निर्भीड सूचनांनीं राष्ट्रीय सभेस इष्ट वळण लावण्यास कसूर करतां कामा नये.

---

* 'केसरी' पुणें ता. १–१२–२५.

## परसत्तेविरुद्ध प्रतिकारशक्ति निर्माण करा.

विचारस्वातंत्र्य व आचारस्वातंत्र्य आम्हास अद्यापि नीट समजलें नाहीं. तें रुजलें म्हणजे देशांत परसत्तेविरुद्ध प्रतिकारशक्ति उत्पन्न होण्यास विलंब लागणार नाहीं. विचार निर्लोभ मनांतून प्रसूत झाले पाहिजेत. आज वाद उपस्थित झाला आहे खरा, पण त्यांतील व्यक्तींचीं नामरूपें विसरून जाऊन तत्त्वावर दृष्टि ठेवा. वादास क्षुल्लक कारणें निमित्तमात्र झालीं असलीं, तरी मूळ कारणें खोल व महत्त्वाचीं आहेत.

सन १९२० सालीं असहयोग जन्मास आला. त्यास यावें तसें यश आलें नाहीं. त्यापुढें कायदेभंगकमिटी नेमण्यांत आली व देशभर पुरावा घेत फिरली. तिनें कायदेभंगास देश तयार नाहीं, असा निर्णय सांगितला. स्वराज्यपक्षाची स्थापना झाली व देशबंधु दास यांजपुढें कौन्सिलप्रवेशास देश कसा तयार होईल हा प्रश्न पडला. त्यासाठीं स्वराज्यपक्षाचें धोरण राष्ट्रीय सभेच्या धोरणास धरून पाहिजे असें त्यांचें मत ठरलें. कौन्सिलप्रवेश व कौन्सिलबहिष्कार त्यावेळीं समरूपच होते. बेळगांवास असहयोग तहकूब झाला याकरितां असहयोगाची छाया जेथें म्हणून अद्यापि पडली असेल, तेथून ती काढण्याचा उद्योग केला पाहिजे.

## अमृतसरच्या धोरणाची स्थापना

बेळगांवच्या राष्ट्रीय सभेनंतर पांच महिन्यांनीं साताऱ्यास प्रांतिक परिषद भरली. आणि अमृतसरच्या धर्तीवर राजकीय धोरण न्यावें, असें त्या परिषदेंत ठरलें. महाराष्ट्रांतील कांहीं असहयोग्यांस सातारचें धोरण पसंत नव्हतें. परंतु पाटणाच्या ऑल इं. कमेटींत म. गांधींनीं तें धोरण स्वीकारतांच त्याविरुद्ध बोलण्याची त्याच महाराष्ट्रीय असहयोग्यांची छाती झाली नाहीं, हें त्यांच्या स्वतंत्र बुद्धीचें द्योतक खास नव्हे. प्रतियोगी सहकारितेच्या धोरणावर पं. मोतीलाल वगैरे पुढाऱ्यांनीं ज्या गोष्टी केल्या,त्यांस आम्हीं अनुमोदन दिलें. गेल्या दोन वर्षांच्या अनुभवावरून अधिकाराच्या जागा स्वराज्यपक्षानें पत्करल्यावांचून गत्यंतर नाहीं, अशी आमची खात्री झाली आहे. गंगोत्रीच्या गंगेचें स्वरूप जाऊन, ती समुद्रास मिळाल्यानें तिची उंची समुद्र-

सपाटीइतकी राहाते; तसेंच अधिकाराच्या जागा पत्करल्यानें स्वराज्यपक्षाचें होईल अशी कांहीं स्वराजिस्टांस भीति पडली आहे. परंतु राजकीय गंगा सामान्य लोकांच्या आटोक्यांत आली पाहिजे व ती याच उपायानें येणार आहे, ही मुद्याची गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं. अधिकाराच्या जागा घेऊन ते कार्य साधणार आहे. विघातक कार्य करीत असतांहि, विधायक कार्य आपल्याला करतां येतें, असें स्वराज्यपक्षास या उपायानें दाखवितां येईल.

## कॉंग्रेसला निर्भीड सल्ला द्या !

एकीकडे खंबीर लोकांचा पक्ष म्हणून स्वराज्यपक्षास शाबासकी देणें व दुसरीकडे स्वराज्यपक्षाच्या लोकांनीं अधिकाराच्या जागा पत्करल्या असतां,ते लोभाविष्ट होतील असें म्हणणें, या परस्परविरुद्ध मतांची संगती कशी लावावयाची, हेंच मला समजत नाहीं. स्वराज्यपक्षाचा कार्यक्रम आतां कानपुरांत ठरावयाचा आहे. अशा वेळीं योग्य तो सल्ला निर्भीडपणें देणें हें ठाणें जिल्ह्याचें कर्तव्य आहे. अमृतसर येथें १९१९ मध्यें भरलेल्या राष्ट्रीय सभेनंतर खरोखर राजकारणाचा विचार करणारी सभा कानपूरचीच होय. या दृष्टीनें पाहिल्यास सदर राष्ट्रीय सभेनें अमृतसरच्या वळणावर येऊन, पुढील राजकारणास सुरवात करावी ही गोष्ट क्रमप्राप्त आहे. कौन्सिलच्या निवडणुकी कानपूरच्या राष्ट्रीयसभेनंतर कांहीं महिन्यांनीं होणार असल्यामुळें त्या निवडणुकीवर कानपूरची छाप बसणार आहे, हें ओळखून ठाणें जिल्हा-सभेनें योग्य तोच सल्ला राष्ट्रीयसभेस द्यावा अशी माझी विनंति आहे.

# साबरमतीचा करार

गेल्या रविवारीं रात्रीं ८॥ वाजतां नागपूर येथें टॉनहॉलच्या पटांगणांत श्री. बापुजी अणे यांचें " साबरमतीचा करार " या विषयावर डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर व्याख्यान झालें. त्यावेळीं ते म्हणाले:—

साबरमतीच्या करारासंबंधीची बहुतेक सर्व हकीगत वर्तमानपत्रांतून मुलाखती, व्याख्यानें वगैरेंच्या रूपानें प्रसिद्ध झालीच आहे. आतां त्या विषयासंबंधीं कांहीं सांगावयाचें उरलें असें नाहीं; तरी पण त्या समेटा-संबंधींचा सर्व प्रकार मीं प्रत्यक्ष पाहिला असल्यामुळें, त्यासंबंधीं चार गोष्टी सांगण्यासाठीं मी येथें उभा आहें. या समेटप्रकरणावर राष्ट्राची भवित-व्यता अवलंबून होती; म्हणून हा विषय मला व्याख्यानासाठीं सुचवि-ण्यांत आला.

## नागपूरकरांची समेटप्रियता

समेटाची जेव्हां वाटाघाट सुरू झाली, तेव्हां ' नागपुरांत समेटाची जरूरी भासत नाहीं ' असें लोकमत प्रसिद्ध झाल्याचं मीं वाचलें होतें. तें लोकमत जर खरें मानलें, तर तो समेट कां मोडला हें जाणण्याची तरी नागपूरकरांस काय जरूरी ? परंतु माझी खात्री होती व आहे कीं, तें नाग-पूरचें खरें लोकमत नव्हतें. समंजस व विचारी लोकांस समेट मोडला, हें ऐकून वाईटच वाटलें. तंटे–बखेडे माजावे व एकानें दुसऱ्याला चीत करावें, अशा भांडखोर वृत्तीचे कांहीं लोक आहेत. परंतु आमच्या नागपूर शहराची भांडखोरपणापेक्षां समेटाकडेच अधिक प्रवृत्ति आहे. सात्त्विक देशभक्तांचा समाज या शहरांत असून ऐक्याशिवाय तरणोपाय नाहीं, याची त्याला जाणीव आहे. समेटाच्या वाटाघाटीपूर्वीं हल्लीं जो बोध सुरू आहे, त्याचें बीज नाग-पुरास स्वराज्यपक्षाच्या वर्किंग कमिटीची जी बैठक झाली, तींत पेरलें गेलें. स्व-राज्य पक्षाचें व्यत्ययाचें–मी त्याला विरोध म्हणावयास तयार नाहीं– जें धोरण

---

*'महाराष्ट्र' नागपूर ता. २३–५–१९२६

चालू आहे, तेंच पुढें चालवावें असें पंडितजीप्रभृतींचें म्हणणें पडलें. आम्हीं म्हटलें, हाच कार्यक्रम पुढें चालविणें अशक्य आहे. देशाच्या प्रस्तुत गरजा लक्षांत घेऊन व परिस्थितीला शरण जाऊन कराव्या लागणाऱ्या गोष्टी केल्याच पाहिजेत. आमच्या या म्हणण्याचा प्रतिध्वनि सर्वत्र उमटूं लागला; व प्रतिसहयोगी पक्षाचा कार्यक्रम पुढें मांडण्यांत आला. परंतु परिस्थितीकडे दुर्लक्ष करण्याचा हट्टीपणा सुटेना. अखेर याच अट्टहासाचा विपरीत परिणाम होऊं नये म्हणून समेटाचें बोलणें सुरू झालें, व मुंबईला

### गप्प बसण्याचा समेट

झाला ! उभयपक्षीं जरी असा करार झाला, तरी जुनाच कार्यक्रम प्रतिपादण्याचें कार्य मात्र थांबलें नव्हतें. एकमेकांविषयीं अपशब्द वापरण्याचा कुयोग टाळतां येतो,तो तरी चार दिवस टाळून पाहावा,म्हणून कानपूर काँग्रेसपर्यंत गप्प राहाण्यास आम्ही तयार झालों. कानपुरास समेटाच्या ज्या समंजसपणाच्या सूचना करण्यांत आल्या, त्या फेटाळून लावण्यांत आल्यामुळें समेट फसला आणि त्याचीच पुनरावृत्ति ऑ. इं. काँ. कमेटींत झाली.

### राजकारणांत मतदारांचें स्थान

१९२६ सालीं कोणत्या तत्त्वांवर निवडणुकी लढावयाच्या,याची एक जंत्री कानपूर काँग्रेसनें तयार केली. परंतु त्यांत हळूंच असें वाक्य घालून ठेवण्यांत आलें आहे कीं,काँग्रेसला जरूर वाटल्यास निवडणुकी झाल्यावर येत्या काँग्रेसमध्यें हा निवडणुकीचा कार्यक्रम बदलावा.म्हणजे निवडणुकी झाल्यावर "निवडणुकीचा कार्यक्रम" हे बदलणार ! जणूं काय मतदार ही त्यांच्या खिसगणतींत घेण्यासारखी गोष्टच नाहीं ! स्वराज्यपक्षाविरुद्ध माझी प्रथम पासूनच तक्रार आहे कीं, मतदारांना जो मान व जें महत्त्व द्यावयास पाहिजे, तें त्यांनीं दिलें नाहीं. मतदारांपुढें घेतलेली शपथ बंधनकारक आहे. निवडणुकीनंतर ती शपथ मोडतां येत नाहीं. परंतु कांग्रेस निवडणुकीनंतर आपला कार्यक्रम बदलणार आहे. हा कावा न ओळखण्याइतके आम्ही दुधखुळे नाहीं. स्वराज्य पक्षाचा गेल्या २॥–३ वर्षांचा इतिहास आमच्या डोळ्यांपुढें आहेच. येत्या निवडणुकींत कांग्रेसपक्षाचें बहुमत होणार नाहीं, या कल्पनेवरच

काँग्रेसनें आपला कार्यक्रम आंखला आहे. परंतु जर बहुमत झालें, तर या अशक्य कार्यक्रमांत बदल करण्याची संधि मिळावी म्हणून ती पळवाट ठेवली आहे. मतदारांची ही फसवणूक आहे. निवडणुकीचा कोणता कार्यक्रम असावा हें ठरविण्याचा अधिकार काँग्रेसला आहे; परंतु निवडणुकीनंतर त्यांत फेरबदल करण्याचा अधिकार मात्र तिला पोंचत नाहीं. मागाहून असा फरक करणें म्हणजे मतदारांची वंचना करणें होय. मतदार हा इज्जतदार व शिष्ट आहे हें विसरून चालणार नाहीं. अशा पळवाटा ठेवून आम्ही सरकारला विरोध करूं, असें मतदारांस सांगण्याची शूर बहादुरकी आम्हांला नको. कानपूर काँग्रेसनंतर अशी परिस्थिति निर्माण झाल्यामुळें वंचकांच्या संघांत जावें कीं, आपणांस जें काय पटतें तें प्रामाणिकपणें मतदारांपुढें उघड उघड मांडून स्वतंत्रपणें उद्योग करावा, हा प्रश्न आमच्यापुढें उभा राहिला.

## प्रतिसहकार पक्षाची स्थापना

यानंतर अकोल्यास परिषद भरून प्रतिसहकार पक्ष स्थापन करण्यांत आला, तेथें जो देशहिताचा व समंजसपणाचा कार्यक्रम आंखण्यांत आला, तो इतर प्रांतांतील लोकांनीं जशाचा तसा मान्य केला. स्वराज्यपक्षांत किती लोक आहेत, तें मी जाणतों; परंतु (करंदीकर वकीलः—आणि तुमच्या पक्षांत किती आहेत तेंहि सांगा! ) परंतु मुख्य मुद्दा तो नाहीं. माझे मित्र मला विचारतात, तुमच्या पक्षांत किती लोक आहेत? स्वराज्यपक्षाचे लोक वगळून बाकीचें सबंध हिंदुस्थान प्रतिसहकार पक्षाचेंच आहे ( हंशा ). आमचा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यावर निश्चलपणें आराम खुर्चीवर पडून राहणारा मनुष्यहि घराबाहेर पडला व ऐक्यासाठीं खटपट करूं लागला. अशा लोकांनीं मुंबईला 'ऐक्य परिषद' भरवून प्रतिसहकारपक्षाचाच कार्यक्रम जवळ जवळ मान्य केला. त्यांनींहि कायदेभंगाचें तत्त्व मान्य केलें. नेमस्तांना थोडेंफार कणखर करून, जहाल तत्त्वाकडे चार पावलें आम्ही खेचून नेलें ही प्रतिसहकार पक्षाची लहान कामगिरी नव्हे. त्यामुळें राष्ट्राचा फायदाच झाला आहे. मवाळ प्रतिसहकार पक्षाला मिळाले,ही गोष्ट बरी नाहीं असा विचार पंडितजींना सुचला. 'देश मेला तरी चालेल, परंतु

मी आपला हट्ट सोडणार नाहीं' अशा हट्टी वृत्तीच्या लोकांना समेटाचें बोलणें करणें अवश्य वाटलें. लाहोरच्या भाषणांत त्यांनीं सांगितलें कीं, "प्रतिसहकारवाल्यांची व आमची जात एकच आहे. त्यांच्याविषयीं मी तिरस्कारानें बोलूं शकत नाहीं." त्या वेळीं पंडितजी गंगासिंधूच्या निर्मल वातावरणांत होते. त्यांना राष्ट्राचें कल्याण करण्याची इच्छा झाली होती. त्या वेळीं त्यांच्या हृदयावर दक्षिणेंतील काळ्या फत्तराचें पटल चढलें नव्हतें, म्हणून त्यांनीं श्री. रंगस्वामी अय्यंगार यांच्याकडून माहिती मागवून व 'समेट करावा अशी माझी इच्छा आहे' असें पत्र लिहून समेटाच्या वाटाघाटीसाठीं पाचारण केलें. साबरमतीला या वाटाघाटीसाठीं जमल्यावर समेटाची चर्चा सुरू झाली. तेथें असेंब्लीच्या मागणीस सरकारचें 'उत्तर' (रिस्पॉन्स) मिळालें नाहीं याबद्दल एकवाक्यताच होती. परंतु 'रिस्पॉन्स' मिळेल तरच अधिकाराच्या जागा स्वीकाराव्या, असें नेहरूपक्षाचें म्हणणें पडलें. आम्हीं म्हटलें तुम्हांला स्वराज्याचे हक्क मिळाल्यावर अधिकाराच्या जागा स्वीकाराव्या कीं नाहीं हा प्रश्नच उरणार नाहीं. हे हक्क मिळविण्यासाठीं अधिकारातिक्रमण करावें. अधिकाराच्या जागा बळकावणें, हा सरकारला आपली मागणी पुरी करण्यास भाग पाडणाऱ्या कार्यक्रमाचाच एक भाग राहील. तेव्हां तडजोड करून कांहीं अटींवर अधिकाराच्या जागा स्वीकारण्यास हरकत नाहीं,याची कबुली पंडितजींनां दिली व या अटी पूर्ण झाल्या कीं नाहीं हें त्या त्या प्रांतांतील काँग्रेस कौन्सिलर्सनीं ठरवावें व त्या बाबतींत अखेर निर्णय प. नेहरू व श्री. जयकर यांच्या कमेटीनें द्यावा; परंतु त्या दोघांत मतभेद झाल्यास म. गांधींनीं सरपंचाचें काम करावें असेंहि ठरलें होतें. या समेटावर सर्वांच्या सह्या होऊन ऐक्याचें बाळ जन्मास आलें.

## बारशाऐवजीं मारणें झालें !

यावेळीं सुईणीचें काम सरोजिनीबाईनें केलें! राष्ट्रदेवीला ऐक्यरत्न व्हावें व त्याचें सुईणपण आपण करून तें बालक आपण खेळवावें, ही सरोजिनीबाईची इच्छा. हा समेट झाला तेव्हां आतां इतर पक्षांना वाट मोकळी झाली, असें म्हणून त्यांनीं सर्व पक्षांना पेढे खाण्यासाठीं म्हणून साबरमतीला

बोलाविलें. त्याप्रमाणें आम्ही बारशाला गेलों; परंतु अखेर बारावें करून परत आलों ( हंशा ). साबरमतीला खरें ऐक्याचें बालक आमच्यापुढें न ठेवतां ज्या मुलाची सुंता दिल्लीला झाली होती,तेंच कानपूरचें बालक आमच्यापुढें करण्यांत आलें ( हंशा ), व हेंच तें बालक समजा असें आम्हांला सांगूं लागले. आम्हीं म्हटलें, हें तें मूळचें बालक नव्हे. याची सुंता जशी दिल्लीला झाली, तशी त्याची कुरबानीहि दिल्लीला होऊं द्या ( हंशा ); त्या पोराशीं आम्हांला कर्तव्य नाहीं.

## पंडितजींनीं माघें घेतलें.

हा प्रकार पन्ना दाईची गोष्ट सांगतात, त्यापेक्षां विपरीत झाला. येथें राजपुत्राला वांचविण्याऐवजीं त्याचाच प्राण घेण्यांत आला. पंडितजींना आम्हीं विचारलें, समेटाच्या सह्यांचा कागद ऑ. इं. कॉं. कमिटीपुढें मांडावयास तुम्ही तयार आहांत काय ? तो मसुदा पुढें मांडा म्हणजे झालें. परंतु या गोष्टीला पं. नेहरू कबूल झाले नाहींत. ते म्हणाले, मसुद्याचा अर्थ न समजतां मीं त्यावर सही केली, व सरोजिनीबाई म्हणूं लागल्या कीं, मीं फक्त 'साक्षीदार' म्हणून सही केली आहे. सारांश ऐक्याच्या पोटांत कट्यार खुपसून खून करण्यांत आला; व भलत्याच मसुद्यावरच आमची मान्यता मागण्यांत येऊं लागली. यांतील कावा आमच्या लक्षांत आल्यामुळें आम्ही ऑ. इं. कॉं. कमेटीच्या सभेस हजर राहण्याचेंच नाकारलें. समेट मोडला ही गोष्ट आदयतेनें सांगण्यासारखी नाहीं. झालेल्या प्रकाराबद्दल आनंद मानणारे कांहीं लोक आहेत. तुमचें कांहीं कां होईना परंतु आमच्या म्हणण्याबाहेर कांहीं गोष्ट होऊं देणार नाहीं, असा अहंपणा ज्यांना असेल त्यांनाच त्यांत आनंद वाटेल. असो. पूर्वीं मीं एकदां सांगितलें होतें कीं, प्रतिसहयोग आम्हांला कळत नाहीं, हें म्हणणें ढोंगीपणाचें आहे; त्याची सत्यता आपणांस अलीकडे पटलीच आहे. रोजच्या व्यवहारांतील तत्त्वें राजकारणाला लागूं करावयाचा तो एक प्रयत्न आहे " असें म्हणून श्री. अणे यांनीं आपलें भाषण संपविलें.

# प्रतियोगी सहकाराचीं तत्त्वें *

दारव्हा येथें ता. ५ जून १९२६ रोजीं संध्याकाळीं इलोयट लायब्ररीच्या पटांगणांत श्री. माधव नारायण ऊर्फ बापूसाहेब डाऊ यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या जाहीर सभेंत श्री. बापूजी अणे यांचें "प्रतियोगी सहकाराचीं तत्त्वें" या विषयावर पुढील व्याख्यान झालें. ते म्हणाले:—

## अमृतसर कॉंग्रेसचें धोरण कां सुटलें?

राष्ट्रीय सभेनें सतत तीस पस्तीस वर्षे खटपट करून, आत्मकल्याणाकरितां नोकरशाहीशीं वागण्याचें जें धोरण निश्चित केलें आहे, तें अमृतसर कॉंग्रेसच्या ठरावांत प्रतिबिंबित झालें आहे. पण हें धोरण ठरविण्याचा व तें प्रत्यक्ष अमलांत आणण्याचा काळ यांच्या दरम्यान हंटर कमिटीच्या रिपोर्टाची प्रसिद्धि झाली. त्यामुळें त्या धोरणास भलतेंच विकृत स्वरूप आलें. अमृतसरला नोकरशाहीकडून एवढा भयंकर मानवी जीविताचा संहार झाला, तरी त्याबद्दल त्यांना यत्किंचित्‌हि वाईट वाटलें नाहीं व दोषी अधिकाऱ्याना एवढेंदेखील शासन करावयास ते तयार झाले नाहींत. याबद्दल समस्त जनतेंत जो भयंकर प्रक्षोभ उत्पन्न झाला, तो अगदीं स्वाभाविक व पूर्णपणें समर्थनीय होता. पण खाजगी व्यवहारांत रागाच्या भरांत मनुष्य जें वर्तन करतो, तें सार्वजनिक व्यवहारांत करणें युक्तच असतें असें नाहीं. कोणाचा राग आला म्हणजे त्याचें तोंडदेखील पाहूं नये असें वाटतें हें ठीक आहे. ह्यांच खाजगी व्यवहारांतला अनुभव असलेल्या आणि खाजगीपेक्षां सार्वजनिक प्रपंच जास्त विचारपूर्वक करावा लागतो याची जाणीव नसलेल्या प्रतिनिधींनींच नोकरशाहीच्या वाऱ्यावर देखील उभें न राहण्याचा, म्हणजे अनेक प्रकारचे बहिष्कार पाळण्याचा ठराव केला. आपल्या आंगच्या आध्यात्मिक बलाची छाप पडून म्हणा, किंवा तीव्र सात्त्विक संतापाची दहशत बाटून म्हणा, नोकरशाही लोकांचें मनोवांच्छित पुरें करील असा त्यावेळीं कांहीं लोकांस विश्वास वाटत होता. पण अमृतसर

* 'लोकमत' यवतमाळ ता. ११–६–२६

काँग्रेसमध्यें ठरलेलें धोरण सोडून संन्यासमार्ग अवलंबण्याचा परिणाम काय झाला तो आपण सर्वांनीं अनुभविलेलाच आहे. खाजगी प्रपंच करण्यापेक्षां जास्त विशाल अनुभव नसलेल्या प्रतिनिधींकडून अशा रीतीनें राष्ट्रीय धोरण बदलण्यांत आलें, याचें कारण माझ्या मतें शिस्तशीरपणें मोठ्या प्रश्नांचा अभ्यास करण्याच्या संवयीचा अभाव होय. नोकरशाहीनें दिलेल्या सुधारणा सुखासुखीनें दिल्या नसतील, त्या देण्यांत तिचा लोककल्याणबुद्धि शेंकडा शंभर नसेल. मी म्हणतों त्यांत नोकरशाहानें लोकहित साधण्यापेक्षां स्वहित साधण्याचीच जास्त खबरदारी घेतली असेल. या साऱ्या गोष्टी गृहीत धरल्या तरी लोकपक्षाचें हें कर्तव्य उरतें कीं, या वाइटांतून आम्हाला आमच्या हिताचें सार कितपत आणि कसें काढतां येतें, असली व्यापक बुद्धि राष्ट्रीय प्रश्नांचा विचार करतांना साधारण करावी लागत असते.

## सार्वजनिक प्रश्नांचा आस्थापूर्वक अभ्यास

सार्वजनिक प्रश्नांचा अभ्यास आस्थेवाईकपणानें सतत परिश्रम करून केल्याशिवाय असली हिताहिताची विवेचकबुद्धि उत्पन्न होत नसते. हिंदुस्थानांतील जनतेंत स्वार्थत्याग, धैर्य,देशाभिमान इत्यादि गुणांची फारशी वाण नाहीं. पण खरी वाण कशाची असेल,तर आस्थापूर्वक सार्वजनिक प्रश्नांचा अभ्यास करणारांची. २५२ जिल्ह्यांत कांहीं २५२ माणसें या वर्णनाचीं दाखवितां येणार नाहींत. एकाद्या जिल्ह्यांत दहापांच किंवा एकाद्या शहरांत पांचपंचवीस माणसें या कसोटीस उतरणारीं असतील. पण सामान्य जनतेंमध्यें मात्र असल्या स्वभावाच्या माणसांचा फारच मोठा अभाव आहे. देशाचें हित व्हावें, याविषयीं रात्रंदिवस तळमळ लागलेलीं हजारों व लाखों माणसें आहेत. पण साधकबाधक प्रमाणांचा सांगोपांग विचार करून निर्णय बनविणारीं माणसें फार विरळ. असल्या देशप्रेमी पण अनभ्यासीच लोकांचा भरणा राष्ट्रीय सभेंत असल्यामुळें तेथें होणाऱ्या ठरावांत विसंगति दिसून आली तर त्यांत नवल काय ! नोकरशाही स्वार्थी खरी, पण तिच्याहि स्वार्थमय योजनांमधून मला आपला राष्ट्रीय स्वार्थ कसा काढतां येईल, हें विवेचक

शक्तीनें शोधून काढून त्यावर राष्ट्रीय धोरणाची उभारणी केली, तरच ती राष्ट्रीय कल्याणास पोषक होते. असली हंस—क्षीर दृष्टि केवळ खाजगी प्रपंच करणारांच्या ठिकाणीं असूं शकत नाहीं. ही दृष्टि ज्याच्याजवळ असते तो एकान्तिक उपाय सुचवीत नाहीं, अथवा विकाराची भाषा बोलूं शकत नाहीं.

## प्रतिसहकार पक्षाचा विशेष

प्रतिसहकार पक्षाचा इतर पक्षांहून कांहीं विशेष असेल तर तो विवेचकबुद्धि संबंधाचा आहे. हा पक्ष एकांतिक विचारसरणीचा नाहीं, ‘ बालादपि सुभाषितं ग्राह्यम् ’ ‘ स्त्रीरत्नं दुष्कुलादपि ’ अशीं अनुभविक वचनें आहेत. वंशक्षय होत असेल तर स्त्रीच्या कुलाचा फार बारकाईनें तपास न करितां तिचें पाणिग्रहण करावें असे वृद्धवचन आहे. हल्लींच्या सुधारणांतहि काय थोडाबहुत असेल तो ग्राह्यांश जमेस धरून आपलें स्वराज्य-प्राप्तीचें भांडण निकरानें व नेटानें चालू ठेवावें, असें विवेचकशक्ति खर्च करून आग्रहानें प्रतिपादणारा हा प्रतिसहकार पक्ष आहे. या पक्षांतील पुढारी आपला “ बाणा ” राखण्याकरितां जनतेच्या सार्वजनिक हितावर उदार होणार नाहीं. सरकार सुष्ट कीं दुष्ट ? दुष्ट असेल तर मग त्यांच्याशीं सहकार्य कसें करितां ? असहकारच करा ! असा एकच एकान्तिक विचार पुढें करून जनतेस वागावयास सांगणारा हा पक्ष नव्हे. या पक्षाला जनतेच्या अडचणींची जाणीव व त्या दूर करण्याची फिकीर आहे. अमकी गोष्ट असहकारितेच्या तत्त्वास बाध आणणारी आहे, असें म्हणून जनतेच्या हिताची पर्वा न करितां, तिजपासून दूर राहण्यास सांगणारा हा पक्ष नव्हे. ज्या दिवाणगिऱ्यांविरुद्ध असहकार पक्षाचा एवढा तीव्र कटाक्ष होता त्या सरकारच्या कृपेचें फळ नव्हे, तो लोकांचा हक्क असून, लोकांची सेवा लोकांच्या कल्याणाकरितां, लोकप्रतिनिधींच्या संमतीनें करण्याची संधि होय अशी या पक्षाची विचारसरणी आहे.

## लोककल्याणाचें व्रत

दुष्काळ पडून लोकांचे केवढेहि हाल झाले तरी चालतील, पण नोकरशाहीच्या यंत्राचा उपयोग करून लोककल्याणाच्या योजना करावयास मी तयार

नाहीं–असा एककल्लीपणाचा विचार या पक्षापुढें नाहीं. नोकरीवाल्यांचा पक्ष म्हणून या पक्षाची हेटाळणी करणारे व स्वतःस शूर व देशभक्त म्हणून समजणारे कांहीं लोक आहेत. त्यांच्या हेटाळणीनें गोंधळून जाणारा व टवाळी करणारांच्या वाक्छळामुळें लोककल्याणाचें व्रत सोडून देणारा हा पक्ष नव्हे. नोकरशाहीशीं संबंध ठेवूं नका, त्यांच्या कौन्सिलांत जाऊं नका, गेलांत तरी लोकहिताचीं कामें न करितां तेथून उठून या, असें प्रतिपादणाऱ्या पक्षाचे उमेदवार तुम्ही आपले प्रतिनिधी म्हणून येत्या निवडणुकींत निवडून पाठविणार, कीं नोकरशाहीशीं स्वराज्याप्रीत्यर्थ निकराचा झगडा सुरू ठेवून लोकहिताचीं कामें करणाऱ्या पक्षास तुम्ही मतें देणार? हा माझा तुम्हांस सवाल आहे. तुम्ही दुसरा कोणताहि विचार मनांत येऊं न देतां, केवळ आपलें हित लक्षांत घ्या असें माझें मतदारांस सांगणें आहे. नोकरशाहीशीं सहकार्य करितां? असहकारितेचा बाणा सोडून दिवाणगिऱ्या स्वीकारण्याचा नामर्दपणा करितां? यापेक्षां मरण आलेलें काय वाईट? असल्या शूरपणाची भाषा वापरणारे जनतेच्या मरणाबद्दल बेफिकीर असतात असें माझें म्हणणें आहे! काय वाटेल तें करीन, पण आपली असहकारितेची बाणी राखीन, असें मिशावर ताव देऊन बोलणारे, यांना सामान्य जनतेच्या हालांची जाणीव नसते. यंदाच्या नापिकीनें त्रस्त झालेले शेंकडों व हजारों शेतकरी शेतसाऱ्याची तहकुबी किंवा तगाई मिळावी म्हणून अधिकाऱ्यांकडे अर्जांवर अर्ज करीत आहेत. त्यांच्या या विपत्तींत त्यांचे भागीदार होऊन करितां आल्यास त्यांना यथाशक्ति सहाय्य करावयाचें, कीं शौर्याच्या व मरणाच्या भाषा बोलून त्यांच्या आपत्तींकडे दुर्लक्ष्य करावयाचें? सामान्य जनतेला दुर्धर आपत्तींच्या अनेक नांग्या सर्व बाजूंनीं दंश करीत आहेत. त्यांच्या वेदना यथाशक्ति नाहींशा करण्याचा प्रयत्न करणारा, लोकांचीं सुखदुःखें जाणून त्याकरितां स्वतःच्या वैयक्तिक मानापमानाची चाड न ठेवतां झटत राहणारा हा प्रतिसहकारपक्ष आहे.

## अलौकिक वैद्याची मात्रा

आसन्नमरण झालेल्या रोग्यास सुधारण्याकरितां महत्तपश्चर्या करून धन्वंतरी आणण्याची कोणी खटपट करीत असेल तर ती अवश्य करावी. त्या

प्रयत्नास आमचें साह्य आहे. पण त्याबरोबरच आमचें म्हणणें आहे कीं, तसला धन्वंतरी येण्याच्या अगोदर रोगी इहलोकची यात्रा संपवून जाऊं नये म्हणून आपल्याजवळ असलेली मात्रा उगाळून कां देऊं नये? व असले उपाय कोणी करीत असेल, तर त्याच्या आड कोणी काय म्हणून यावें? सुदैवानें आपल्याशीं एका अलौकिक वैद्यानें तयार करून ठेवलेली एक मात्रा आहे व तिचा उपयोग करण्याचा या पक्षाचा निर्धार आहे. आपल्या साऱ्या आयुष्यांतील अनुभवाचा निष्कर्ष म्हणून जें अखेरचें धोरण लोकमान्यांनीं निश्चित करून व शब्दांत लिहून काढलें होतें, पण त्यांच्या आकस्मिक निधनामुळें ज्याची अमलबजावणी करावयाची राष्ट्रास संधि मिळूं शकली नाहीं, त्या धोरणावर हा प्रतियोगीसहकार पक्ष काम करणार आहे. या पक्षांत जातीगोतीला प्राधान्य नाहीं. शहाणपणानें, प्रामाणिकपणें व धडाडीनें कामें करणारीं माणसें या पक्षास पाहिजे आहेत. नोकरशाहीच्या राज्ययंत्राचा फायदा घेऊन, त्याच्या द्वारें लोकांची सेवा करण्याची संधि हा पक्ष दवडणारा नाहीं. असली संधि दवडणें म्हणजे देशभक्ति होय असें हा पक्ष मानीत नाहीं. जनतेचें हित हा आपल्या चिंतनाचा व कर्तव्याचा मुख्य विषय होय हें जाणून व कै. लो. टिळकांचें प्रतियोगीसहकारितेचें धोरण पुढें ठेवून आम्हांला काम करावयाचें आहे. म्हणून याच पक्षाच्या उमेदवारांस मतदारांनीं येत्या निवडणुकींत मतें द्यावींत अशी माझी आपणांस विनंति आहे.

# प्रतिसहकारिता *

ता. २५-६-१९२६ इ. रोजीं बॅ. रामराव देशमुख ह्यांच्या अध्यक्षते-खालीं वरील विषयावर श्री. अणे यांचें भाषण झालें. ते म्हणाले:—

मी आज चार पांच वर्षांपूर्वीच्या राजकारणाची आठवण आपणांस करून देणार आहें, ह्या अध्यक्षांच्या वाक्यांत माझ्या भाषणाचें एका दृष्टीनें सर्व सार आहे. अतिशय भीति व अतिशय प्रीति, जेथें असते तेथून सत्य कधींहि बरोबर कळत नाहीं. हीं दोन्ही सोडून देऊन पाहिल्या-नेंच खरी वस्तुस्थिति कळते.

## उसन्या डोळ्यांनीं पाहूं नका !

आज कोणत्याहि वक्त्याच्या अगर वर्तमानपत्राच्या उसन्या घेतलेल्या डोळ्यांनीं हिंदुस्थानकडे न पाहतां स्वतःच्या डोळ्यांनीं हिंदुस्थानकडे, तुमच्या भोंवतालीं असलेल्या हिंदुस्थानचा भाग पाहा; म्हणजे तुम्हांला त्यावरून, सबंध हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीची बरोबर कल्पना करितां येईल, आणि ही कल्पना मनांत आणून, व 'हिंदुस्थानचें कल्याण' येवढेंच दृष्टीपुढें ठेवून, तुम्ही स्वतः आतां काय तें योग्यायोग्य ठरविण्याला शिका, हें माझें आजच्या मतदारांना व सर्व हिंदी जनतेला वारंवार सांगणें आहे. आम्ही काय म्हणतों तें ऐका व खरें माना म्हणून सांगणें व तुम्ही स्वतः पाहावयाला शिका असें सांगणें, हाच इतर पक्षांत व आमच्यांत फरक आहे. इतर पक्षांनीं कॉंग्रेस हातांत असतां १९२० सालापासून वकीलांच्या बाबतींत, कौन्सिलबहिष्काराच्या द्वारां मतदारांच्या बाबतींत, मुलांनीं शाळा सोडाव्यात, म्हणतांना पालकांच्या बाबतींत, वगैरे वाटतील तसे ठराव पास केले. पण ते करितांना त्यांनीं लोकांच्या एकाहि सुसंघटित व प्रातिनिधिक संस्थेस फुकाचें एकदां विचारलें सुद्धां नाहीं. हें प्रातिनिधिक स्वरूपाचें राजकारण नव्हे. हें नोकरशाहीच्या जुलमी पद्धतीचें गुलामी मनोवृत्तींत पडलेलें प्रतिबिंब आहे. १९२० सालच्या कॉंग्रेसच्या विषयनियामक मंडळाच्या बैठकीपासून,

* 'उदय' उमरावती ता. २९ जून १९२६.

व त्यानंतर भरलेल्या काँग्रेस डेमोक्रॅटिक पार्टीच्या सभेपासून मी आजपर्यंत असल्या ठरावांना विरोधच करीत आलों आहें. असले ठराव पास करून मग ते अमलांत न आले म्हणजे देशाच्या माथीं नालायकीचा शिक्का राष्ट्रीय संस्थेतर्फे मारण्यापेक्षां, त्या त्या ठरावाशीं संबंध असलेल्या कोणालाहि न विचारतां पास केलेले असले ठराव ज्यांनीं करविले,अशा कोणत्याहि व केवळ्याहि व्यक्तीलाच मी नालायक म्हणेन. मला हिंदुस्थान देश बिलकूल नालायक वाटत नाहीं; मला हिंदुस्थानचा अभिमान वाटतो. हिंदुस्थानला एकाद्या व्यक्तीबद्दल कितीहि आदरभाव वाटत असला,तरी त्या व्यक्तीनें प्रातिनिधिक राजकारणाच्या पद्धतीला मोडून पास करविलेले ठराव लोकांनीं बिलकूल अमलांत आणले नाहींत. ह्यांत हेंच दिसून येते कीं, देशाची बुद्धि अगदीं शाबूत आहे. ‘ आमच्या प्रातिनिधिक संस्थांना न विचारतां तुम्ही असले भलभलते ठराव कां पास केले ? ’ असा ह्यांत, देशांतील लोकांनीं हे ठराव पास करणारांना सरळ प्रश्न केला आहे. इतकी ज्या देशाची राजकीय बुद्धि शाबूत आहे, त्या देशाचा मला अभिमान वाटतो. कारण ह्यांत हेंच तत्त्व ठरलें कीं, जें आम्हांला न विचारतां केलें, तें देशी माणसांनीं केलेलें असो, अगर परदेशी माणसांनीं केलेलें असो,तें आम्हांला मान्य नाहीं,व तें आम्ही करणार नाहीं असें देशास स्पष्टपणे वाटत आहे. आपल्या देशाला

## स्वातंत्र्य मिळावें ही ईश्वरी इच्छा

आहे, हें देवाचें काम आहे असें जर तुम्हांला अन्तःकरणपूर्वक वाटत असेल, तर वाटेल त्या मार्गानें देशाचें स्वातंत्र्य घडवून आणा.मार्गाच्या पापपुण्याची जबाबदारी देवावर सोंपवा ! हें जर देवाचेंच कार्य असेल तर तें घडवून आणण्याच्या मार्गाबद्दल तो आपला पापपुण्याचा हिशोब पाहून घेईल. देशाच्या स्वातंत्र्यापुढें वाम मार्ग व चांगले मार्ग पाहात बसणारा मी माणूस नव्हे. नागपूरला हल्लीं चाललेल्या एका व्याख्यानमालेंत प्रतिपक्षीयांची जी व्यक्तिविषयक निंदा केली जाते, तीवरून देशांत काय करावयाचें आहे हें कळल्यामुळें ती व्याख्यानमाला सुरू झालेली दिसत नाहीं, तर आपणांतील कोणाला मारावयाचें आहे, एवढेंच ती व्याख्यानमाला देणारांचें ठरलेलें

आहे असें दिसतें. मला तसें करावयाचें नाहीं, म्हणून मी फक्त तत्त्वाविषयींच बोलणार आहें. फसो कीं जिंको, पण तत्त्वाकरितांच देशांत राजकारण होऊं द्या. पूर्वी डेमोक्रॅटिक पार्टी निघाली ती नुसत्या कांग्रेसचें वाटेल तें काम करण्याकरितां नव्हे, किंवा स्वतंत्र लोकशाहीचें ( डेमॉक्रसीचें ) काम करण्याकरितां नव्हे. कॉंग्रेसच्या द्वारें डेमॉक्रसीचें शिक्षण देण्यासाठीं व डेमॉक्रसीचें काम करण्यासाठीं निघालेला तो पक्ष होता. कॉंग्रेस जर स्वतः डेमोक्रॅटिक नसेल, तर त्या पक्षाला कॉंग्रेसचीहि जरूरी नव्हती. डेमॉक्रसीचें काम करण्यापुरती त्याला कॉंग्रेस पाहिजे होती, आणि कॉंग्रेस जरी तें काम करीत नसेल, तरी ती तशी उपयोगी पडेल अशा रीतीनें फिरवून घेणें हेंहि त्या पक्षाला आपलें कामच वाटत होतें.

## सर्वेषाम् अडवणूक निरुपयोगी

स्वराज्य पक्षाची सर्वेषां अडवणूक म्हणजे एका दृष्टीनें बटवा बदलून व अधिक झगझगीत बटव्यांतून तीच ती मात्रा काढून देण्याप्रमाणें आहे. ही सर्वेषां अडवणूक चालू शकत नाहीं, हें गेलीं तीन वर्षें स्पष्टपणें सिद्ध झालें आहे. पाटणाच्या ऑ. इं. कॉं. कमेटीच्या सभेंत मला हेंच दिसून आलें कीं, ही जुनी मात्रा आतां स्वतःच्या गुणावर खपत नाहीं म्हणून ती कॉंग्रेसच्या नांवावरच खपवावयास पाहिजे हें पं. मोतीलाल नेहरूंनीं पक्कें ओळखलें होतें व म्हणूनच त्यांनीं तेथें केलें तसें वर्तन केलें. कांहींहि कारण असो, पण आम्ही कौन्सिलांत व असेंब्लींत गेलों तेव्हां अगदीं पहिल्या दिवसापासून सर्वेषां अडवणूक चालत नाहीं असें वाटल्यामुळें, रोज थोडें थोडें धोरण बदलण्यास आम्हीं सुरवात केली. तेव्हां हेतु हाच होता कीं, शेवटीं हें धोरण पूर्णपणें प्रतियोगी सहकारितेचें करावें. कानपूर कॉंग्रेसच्या ठरावांतील तत्त्व हें आहे कीं, द्विदल राज्यपद्धति ही दुष्ट आहे, ही आम्हांला नको.

## कॉंग्रेसमध्यें द्विदल राज्यपद्धति !

पण असा ठराव करितांना त्याच कॉंग्रेसमध्यें विणकरी शाखा व राजकीय शाखा यांच्या रूपानें द्विदल राज्यपद्धति चालू केली गेली. ह्या

दोन शाखांचे पैसे व हिशेब वेगळाले केले गेले. गांधीजींच्या विणकरी शाखेला पंडितजींच्या राजकीय शाखेंत ढवळाढवळ करण्याचा अधिकार ठेवण्यांत आला, पण पंडितजींच्या शाखेला गांधीजींच्या विणकरी शाखेंत हात घालण्याचा अधिकार ठेवला गेला नाहीं ! आणि अशा रीतीनें द्विदल राज्यपद्धतीहि चालण्याजोगी आहे, ह्याचा खुद्द कॉंग्रेसमध्यें प्रयोग करून दाखविणें सुरू करून दिलें. कॉंग्रेसमध्यें जर द्विदल राज्यपद्धति खपते, तर राजकारणांतहि सध्यांपुरती ती कां खपूं नये ? खरोखरी द्विदल राज्यपद्धति चालवूनहि चालत नाहीं हेंच आम्हीं सिद्ध करून दाखविलें पाहिजे. आम्ही या द्विदल राज्यपद्धतीपासून जितकें दूर राहू, तितकें तिचें आयुष्य लांबत जातें. नोकरशाहीचें राज्ययंत्र जर आपल्याला एकदम संबंध नाहींसें करितां येत नसेल, तर त्याच्या शक्य तितकें जवळ उभें राहून त्याचा एक एक अवयव सारखा तोडीत राहिलें पाहिजे. घरीं बसून कसलेहि बीर मंत्र जपून ' छू मंतर ' म्हटल्यानें नोकरशाहीचें राज्ययंत्र खास नाहींसें होत नाहीं.

## तत्त्वमय प्रतिकार नको !

हल्लीं आमच्या जिल्ह्यांत नापिकी झाली असूनहि सारा देण्यास तारखेपलीकडे एक दिवस उशीर झाल्यास अधिकारी आपल्या सत्तेंतील तिन्ही प्रकारच्या शिक्षा शेतकऱ्यांना करितात असा आम्हांला रोज अनुभव येत आहे. पण जिल्हाधिकाऱ्याच्यावर ही तक्रार न्यावी कोठें ? जेथें तक्रार न्यावयाची तेथें आमचे कोणीच नाहीं. रा. ब. केळकर मवाळ असले तरी त्यांच्याहि डोक्यांत देशहिताच्या कांहीं बऱ्या वाईट कल्पना होत्याच, व त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या काळांत आपल्या खात्यांना वळण लावून ठेवलीं. पण त्यांनीं सुरू केलेलीं लहान सहान धोरणें हीं कशीं नष्ट होतील ह्याचा सतत यत्न स्थानिक स्वराज्य व शिक्षण या दोन्ही खात्यांत हल्लीं सुरू आहेत. तेजस्वी राजकारण करावयाला गेले, व राजकारणांत माघार घेऊन बसले अशी आज स्थिति झाली आहे. जे ऑनररी मॅजिस्ट्रेट लोकमान्यांच्या गळ्यांत हार घालण्यासाठीं धांवत होते, ते आज डेप्युटी कमिशनर आपल्या गांवीं कधीं येईल

याची वाट पाहात बसतात, हें तुमच्या डोळ्यांना दिसत कसें नाहीं? म्हणून दुरून सूक्ष्म देहानें व कारणशरीरानें नोकरशाहीला तत्त्वमय प्रतिकार न करीत बसतां, जवळ जाऊन प्रत्यक्ष जड शरीरानें शक्य तितका अधिक प्रतिकार केला पाहिजे.

## सरकारी तिजोरींतील पैसाहि आमचाच

आम्हांला नोकरीवाला पक्ष म्हटल्याची मला बिलकुल खंत वाटत नाहीं. आपण देशाचे गुलाम आहोंत, ह्या समजुतीनें जन्मभर देशाची नोकरी करावी ही माझी यावद्देहाची महत्त्वाकांक्षा आहे. तसाच सरकारी तिजोरींतील पैसाहि आमचाच आहे, नोकरशाहीनें तो इंग्लंडांतून आणलेला नाहीं. सरकारी तिजोरींतील पैसा हा आमचा आहे ही भावना नाहीं म्हणून तर देशाचे हे असे हाल चालू आहेत " ब्राह्मणाला दिली गाय, मला तिचें काय ? " ह्या वृत्तीनें सरकारच्या हवालीं करांच्या वगैरे रूपानें गेलेला पैसा हा जणूं कांहीं दान केला आहे, अशा समजुतीनें आपण त्याच्या हिशेबाची व खर्चाची पुरती वास्तपुस्त करितां येत असून करीत नाहीं, ही आमची चूक आहे. करांच्या बाबतींत ही दानाची वृत्ति आमच्या राजकारणांत नाहीं. आम्ही असें म्हणतों कीं, त्या पैशाचा शक्य तों सद्व्ययच करण्यासाठीं व नोकरशाहीच्या तो कामीं पडूं नये म्हणून जागोजाग उभें राहून त्याच्या अपव्ययाचा प्रतिबंध करा व सद्व्ययाला मदत करा. शिक्षणाला मंजूर झालेले पांच लाख रुपये, त्या खात्यांतील गोऱ्या अधिकाऱ्यांचे पगार वाढविण्यांत व इमारतीच्या दगडा-मातींत खर्च करण्यांत येतात व एकाहि अधिक मुलाला शिक्षण देण्यांत येत नाहीं, असा या खात्याचा कारभार हल्लीं सुरू आहे. खर्चाची व्यवस्था जर पाहावयाची नसेल तर बजेटसाठीं कौन्सिलची बैठक, तींतील येवढा वादविवाद, त्यांतील येवढी माराहाणी हा सर्व खटाटोप पाहिजे कशाला ? आज तुम्ही बजेट मंजूर करितां व पैसा खर्चावयाला देशाच्या शत्रूंच्या हातीं—नोकरशाहीच्या हातीं—देऊन येतां ! लोकांचें प्रत्यक्ष हित मारण्यापेक्षां तुमचें तत्त्व मेलें तरी मला चालेल. भावनेवर व कल्पनातरंगावर राजकारण न नेतां, व्यवहाराशीं पुन: राजकारणाची गाठ घालून देण्यासाठींच आमचा पक्ष निर्माण झाला आहे.

### नवा 'नॅशनॅलिस्ट' पक्ष

आम्हांला असेंहि विचारण्यांत येतें कीं, नव्या 'नॅशनॅलिस्ट' पार्टीशीं तुम्हीं संगनमत केलेलें आहे कीं काय ? आमचें उत्तर असें आहे कीं, आम्हीं संगनमत केलेलें नाहीं. येत्या निवडणुकींत आम्ही दोन्ही पक्ष वेगवेगळालेच राहणार आहों. बॅ. जयकरांनींहि असेंच करण्याचें ठरविलें असल्याचें मला कळलें आहे. आमचा ह्याविषयीं ठराव काय आहे तो लक्षांत घ्या. त्या ठरावांत अशा आशयाचे शब्द आहेत कीं, जितक्या प्रमाणांत नॅशनॅलिस्ट पार्टीचें आमच्या पक्षाशीं जुळतें असेल, तितक्या प्रमाणांत त्यांच्याशीं सहकार्य करावें. असें तर आम्ही नोकरशाहीलाहि म्हणतों. हें तर आमचें मूलभूत तत्त्वच आहे. या आमच्या प्रतिसहकारितेच्या तत्त्वानुसार इतरांप्रमाणेंच आम्ही नॅशनल पार्टीशींहि वागण्यास तयार आहों, हें संगनमत नव्हे. आमचीं दोन प्रमुख माणसें आम्ही त्यांच्या पक्षाची सभासद करून ठेवलीं, पण उलट त्यांच्या पक्षांतील एकहि प्रमुख मनुष्य आमच्या पक्षाचा अद्यापि सभासद झालेला नाहीं. ह्यांतच त्यांची पारख झाली आणि त्या पक्षाचें व आमचें जुळणें शक्यहि नाहीं. कारण इकडे हायकोर्टाचा जज्ज व्हावें व तिकडे जाऊन कॉंग्रेसचा अध्यक्ष व्हावें, हें जें लोकमान्यांपूर्वीचें राजकारण, त्याचेच सर्व बडे बडे प्रतिनिधी अद्यापि त्या पक्षांत भरलेले आहेत.

### हीं वत्सलांछनें तुम्हीच सांभाळा !

त्यांच्यापैकीं एका प्रमुखाला मीं तोंडावरच सांगितलें कीं, साहेबाच्या संपर्कानें तुमच्या पक्षाच्या बहुतेक बड्या बड्या धेंडांच्या छातीवर व डोक्यावर जीं वत्सलांछनें उमटलीं आहेत, त्यांच्यावर काव्य करून चंद्रावरील लांछनाप्रमाणें त्यांचा बचाव करण्याची पाळी आमच्यावर आलेली कधींच आम्हांस नको आहे. हीं आपलीं वत्सलांछनें तुमचीं तुम्हीच सांभाळा !

### 'स्वतंत्र' म्हणून एक पक्ष

आणखी 'स्वतंत्र' म्हणून एक पक्ष आहे ! हा 'स्वतंत्र' म्हणजे पासंगाप्रमाणें कधीं ह्या दांडीला, तर कधीं त्या दांडीला असा जाऊन प्रसंगाप्रमाणें दोन्हीकडे लोंबकळणारा पक्ष आहे. पक्षनिर्मिति ही राजकारणांत

ज्या संघटनेच्या कारणाकरितां झाली, तिच्याकडे लक्ष देतां ह्याला पक्ष तरी कसें म्हणावें व हा निर्माण तरी कसा झाला, ह्याचेंच आश्चर्य वाटतें. ह्या पक्षाच्या लोकांना माझें असें सांगणें आहे कीं, प्रसंगाप्रमाणें पासंगासारखें ह्या दांडीवरून त्या दांडीवर असें लोंबकळत हिंडूं नका, खरोखरी वजन पडेल असा कोणता तरी एक पक्ष धरा व खंडींत, मणांत, शेरांत, पासरींत, नासरींत कोठें तरी मानलें जाल असें वजनांत पडा! शेवटीं मला तुम्हांला हेंच सांगावयाचें आहे कीं, आमचा प्रतियोगी सहकारिता पक्ष हा लोकमान्यांचें राजकारण पुनरुज्जीवित करणारा आहे. गेल्या पांच वर्षांचा सर्व अनुभव विचारांत घेऊन बनलेला तो पक्ष आहे, व म्हणुन येत्या कौन्सिलनिवडणुकींत तुम्ही त्या पक्षाच्या उमेदवारांनाच निवडून द्या!

---

# लोकमान्यांचें अलौकिकत्व*

टिळक सप्ताहानिमित्त ता. ३१–७–२६ इ. रोजीं श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. बापूजी अणे ह्यांचें उमरावती येथें झालेलें भाषणः—

## लोकमान्यांचें धोरण

बाकीच्या लोकांची स्मृति मृत्युलेख लिहून किंवा श्राद्ध करून विसरून जाते; पण "लोकमान्यांनीं ह्या वेळीं काय केलें असतें" असा त्यांच्या माघारीं सहा वर्षांनींहि विचार करावासा वाटतो, ह्यांतच त्यांचें अलौकिकत्व आहे. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळून जेव्हां त्याच्या सिंहासनावरून लोकमान्यांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण केलें जाईल, त्याच दिवशीं लोकमान्यांचा खरा मृत्युलेख लिहिला जाईल व तेंच त्यांचें खरें पुण्यस्मरण. लोकमान्यस्मृतीवरून गेल्या सहा वर्षांत असें दिसून आलें आहे कीं, रुचीइतकेंच स्मृतींतहि वैचित्र्य असतें! व तेंहि रुचीमुळेंच होतें असें वाटतें!

* 'उदय' उमरावती ता. ३–८–१९२६

पण सर्वांची एकमात्र एकवाक्यता आहे कीं, जो कांहीं गोंधळ चालू आहे त्यापेक्षां लोकमान्यांनीं कांहीं तरी वेगळें केलें असतें. लोकमान्यांचें धोरण असें होतें कीं, प्रचलित व्यवहार लोकांना अधिक सुकर करून देऊन शिवाय त्यांना अधिक मिळण्याची व्यवस्था करीत राहावयाचें. लोक सुखी व्हावे, व हें सुख तिसरा परका पाहुणा घरांत येऊन मालक होऊन बसल्यानें मिळत नाहीं, हे दोन सिद्धान्त लोकमान्यांपूर्वींच्या मवाळांनाहि कबूल होते व लोकमान्यांनाहि कबूल होते. पण या परकीय सत्तेशीं झगडा उभा करावा, हा जो ह्यावर लोकमान्यांचा उपाय, तो मवाळांना मान्य नव्हता. म्हणून ह्या दोघांचे मार्ग दोन झाले.

## गतिमान् राजकारणाचे प्रणेते

मवाळांचें राजकारण ‘ स्टॅटिक ’ म्हणजे स्वास्थ्याच्या काळचें: हिंदुस्थान स्वतंत्र आहे हें गृहित धरून चालू केल्याप्रमाणें आहे. व लोकमान्यांचें राजकारण ‘ डायनॉमिक ’ म्हणजे ‘ गतिमान्, ’ हिंदुस्थान परतंत्र आहे व स्वराज्य प्रथम मिळविलें पाहिजे, ह्या स्वरूपाचें आहे. असें गतिमान् राजकारण करणारे लोकमान्य हे हिंदुस्थानांतील पहिले पुरुष होत व म्हणूनच प्रस्तुत अस्तित्वांत असलेल्या नोकरशाही सत्तेशीं त्यांचा उभा दावा पडला. मघां सांगितलेल्या पहिल्या दोन प्रश्नांना मवाळांचीं व लोकमान्यांचीं उत्तरें एकच होतीं; म्हणून तेवढ्यावरून आम्ही व लोकमान्य एकच म्हणून खोटें बोलण्यास कांहींनीं सुरवात केली आहे. पण एवढें मात्र खरें कीं, ह्या एक म्हणणाऱ्या मंडळींपैकीं हालअपेष्टा, छळ व तुरुगवास हे सर्व फक्त एकट्या लोकमान्यांच्याच वाट्याला आले व “ त्यांच्यांतल्याच ” दुसऱ्याच्या वाट्याला सर्व सरकारी मानमरातब किताब व पदव्या आल्या. यांतील एकजण हे सर्व सरकारी मानमरातब, किताब सांभाळून काय होईल तें राजकारण करीत होते, तर दुसऱ्यानें देह पडेतों कष्ट सोसून जनतेची सेवा केली. सतत वीस वर्षें लोकांत ही वृत्ति व हें स्वराज्यप्रेम मुरलें होतें, म्हणूनच येवढें अमूक एक करा म्हणजे एका वर्षांत स्वराज्य देतों म्हणून १९२० सालीं आरोळी

उठतांच १९२०-२१-२२ सालीं झालेली खळबळ देशांत होऊं शकली. ह्या तीन वर्षांचें आंदोलन म्हणजे इ. स. १८९८ ते १९०८ पर्यंत लोकमान्यांनीं केलेला उपदेश व प्रतिपादन केलेलीं मतें, १९०८ ते १९१४ पर्यंत त्यांनीं सोसलेले हाल व कारागृहवास व १९१४ ते १९२० पर्यंत त्यांनीं झगडण्यासाठीं म्हणून अतिश्रमपूर्वक तयार केलेलें राष्ट्रीय संघटन ह्यांच्याच पुण्याईचें अश्रुतपूर्व असें केवळ फळ होय.

## देहदंडाविणें यश नाहीं.

पन्नाशींच्या वयांत १९०८ सालीं मध्यरात्रींच्या सुमाराला त्यांना जेव्हां ६ वर्षांची जबरदस्त शिक्षा देण्यांत आली व आतां बहुधा लोकमान्य पुनः डोळ्यांनीं दिसत नाहींत असें सर्वांना वाटलें, त्या भीषण प्रसंगीं जीं वाक्यें त्या पुरुषाच्या तोंडून निघालीं, तीं वाक्यें हें त्यांच्या राजकारणाचें सार होय. "माझ्या देहदंडानेंच हें माझें कार्य वाढावयाचें आहे असें दिसतें. येथें दिसतात त्यापेक्षां जगताचें भवितव्य ठरविणाऱ्या श्रेष्ठतर शक्ती आहेत, आणि ज्यूरी कांहींहि म्हणो, मी सांगतों कीं मी निरपराधीच आहें." अशा आशयाचे ते उद्गार होते ह्या उद्गारांतूनच पहिला सिद्धान्त हा निघतो कीं, जो ह्या परतंत्र देशाचें काम करील, त्याला देहदंड घ्यावा लागेल. आणि दुसरा सिद्धान्त त्याच्यांतूनच हा निघतो कीं, देहदंडावांचून हें काम होणारच नाहीं. आणि ह्या दोन सिद्धांतांपेक्षां १९२० ते २५ मध्यें झालेल्या चळवळींत जास्त काय होतें ? लोकमान्यांनीं एकदोन वाक्यांत जें सांगितलें तें सांगण्यास पुढें इतरांना ग्रंथचे ग्रंथ लिहावे लागले इतकाच फरक आहे. पण लोकमान्य हीं एक दोनच वाक्यें अशा ठिकाणीं, अशा प्रसंगीं, अशा मोक्यावर, व अशा रीतीनें बोलले कीं, तो भारताएवढा एक ग्रंथच आहे.

## मूर्तिमंत आर्यसंस्कृति !

लोकमान्यांनीं फक्त गीतेवर टीकाच लिहिली नाहीं, तर ते स्वतः साक्षात् भारतरूप होते. हिंदुस्थानांत आर्यसंस्कृति मनुष्यरूप धारण करून 'टिळक' नांव घेऊन आमच्यांत ४० वर्षें प्रत्यक्ष वावरली. देश स्वतंत्र असता तर आद्य शंकराचार्यांप्रमाणें मनुष्यप्राण्याला हजारों वर्षें विचार करण्यास पुर-

तील असे अनेक अलौकिक ग्रंथ व अलौकिक विचार ह्या महापुरुषानें मार्ग निर्माण करून ठेवले असते. ईश्वरानें त्या पुरुषाला अशी अगाध बुद्धिमत्ता दिलेलीच होती. अशा रीतीनें लोकमान्य सर्वस्वी आर्यसंस्कृतिरूपच असल्यामुळें ते ह्या संस्कृतींतील प्रत्येक शाखेंतील दोष काढून टाकण्यासाठीं नानाप्रकारें झटत असत. लोकमान्यांचें राजकारण हें नुसतें राजकारण नव्हतें, तर तें आर्यसंस्कृतीचच पुनरुज्जीवन होतें. म्हणूनच राजसत्तेच्या बळावर आमच्यावर एक परकीय संस्कृति लादूं पाहणारे आमचे परकीय राज्यकर्ते लोकमान्यांवर अत्यंत दांत खात असत. नोकरशाहीच्या या प्रयत्नांच्या मुळावरच लोकमान्यांचा घाव होता. लोकमान्यांपेक्षांहि कौन्सिलांत अधिक कडक भाषा वापरणारे तेव्हांहि होते; तरी पण त्यांना गोंजारण्यांत येत असे! लोकमान्यांची भाषा त्यांच्याहून सौम्य असली, तरी त्याच्या आंतली सुरी अतिशय जलाल असून, आपल्या सर्व प्रयत्नांचा अगदीं प्राण घेणारी आहे हें नोकरशाहीला पुरतें कळत होतें; म्हणूनच लोकमान्यांचें नांव मात्र काढलें कीं, तिला अगदीं सचैल स्नान करावेंसें होई! लोकमान्यांनीं प्राचीन संशोधन केलें तें ह्या आर्यसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनाकरितांच. त्यांनीं गीतारहस्य लिहून ह्या भरतखंडाच्या तरुणपिढीला बजावून सांगितलें कीं, तुम्ही स्वतः धर्मक्षेत्रांत उभे राहा, आणि कुरुक्षेत्राच्या संग्रामाला भिऊं नका! पुढें अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा व्यामोह हिंदुस्थानाला पडणार आहे हें त्यांच्या दृष्टीला आगाऊ दिसलें म्हणूनच कीं काय, त्यांनीं गीतारहस्याच्या रूपानें आर्य-तत्त्वज्ञानाचें भांडार ह्या तरुण पिढीला आधींच उपलब्ध करून ठेवलें. हें भांडार जवळ होतें म्हणून ह्या पांच वर्षांच्या व्यामोहांतून जगून आतां थोडें बाहेर तरी पडलों. कांहीं विलक्षण नेमानेमच असा कीं, तीस वर्षांपूर्वी मनांत आलेल्या कल्पनेवर लोकमान्यांच्या हातून अशाच वेळीं हा ग्रंथ लिहिला गेला व प्रसिद्ध केला गेला कीं, त्यांच्याविषयींचा आदर व हा राष्ट्रीय व्यामोह हे बरोबरच उत्पन्न झाले. लोकमान्यांचें चरित्र व त्यांचा गीतारहस्य हा ग्रंथ ह्यांच्यांत जें सादृश्य सांपडतें व त्यांत जो मेळ आहे, तो इतरत्र कोठेंहि सांपडत नाहीं. इतरांना आपल्या चरित्रांतील चिल्हरचाल्हर गोष्टी आपल्या हातानें आपल्या चरि-

त्रांत लिहाव्या लागतात. लोकमान्यांच्या चरित्रांत बाळपणापासून तों सार्वजनिक कार्याच्या शेवटापर्यंत पूर्ण एकसूत्रीपणा आहे. म्हणूनच त्यांना 'अवतार' म्हणण्याकडे प्रवृत्ति होते. वाल्या कोळ्याचा जगतांत प्रयत्नानें वाल्मीकि होऊं शकतो; पण जन्मतः शुक असणें हें कांहीं निराळें आहे. "तन्मयतया" वडिलांनीं "पुत्र" म्हणून हांक मारल्याबरोबर शुकांनीं मी ह्या नात्यासाठीं जन्मलों नाहीं, म्हणून तत्त्वज्ञानात्मक उत्तरापासूनच बोलण्यास प्रारंभ केला. लोकमान्यहि कॉलेजांतून शिक्षण संपवून बाहेर पडले तेच मुळीं 'लोककल्याण' घेऊन बाहेर पडले. वडील वारले होते, चुलत्यांनीं वाढविलें होतें. त्या चुलत्यांनीं अशीच 'तन्मयतया' हांक मारली तरी लोकमान्यांनीं मागें पाहिलें नाहीं. आणि कधींहि लवमात्र तक्रार न करितां आजन्म खपून लोककल्याणाचें काम केलें. कारण " क्रिया सिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे, " थोरांची यशःप्राप्ति त्यांच्या स्वतःच्या सामर्थ्यावर अवलंबून असते; साधनांच्यावर नसते.

## स्वयंसिद्धाचें स्वयंसिद्ध चारित्र

"लोक मला मिळाले नाहींत म्हणून माझें फसलें" " तुम्ही अमूक करून दाखवा, मग मी तमूक करून दाखवितों" "मला नाचतां येतें पण हें आंगणच वांकडें आहे " अशी तक्रार त्यांनीं उभ्या जन्मांत कधीं केली नाहीं. आहेत त्याच लोकांकडून मी काम करवून दाखवीन ही त्यांची धमक होती. अशी तक्रार करणारांचीं चरित्रें हीं कृत्रिम असतात. लोकमान्यांचें सिद्ध चरित्र आहे. स्वयंभू पुरुषाचें, स्वयंसिद्ध पुरुषाचें तें चरित्र आहे. आज असा प्रसंग आला आहे कीं, वीस वीस वर्षें ज्यांनीं खांद्याला खांदा लावून कामें केलीं ते एकमेकांना " देशद्रोही " म्हणत आहेत ! पण हें लोकमान्यांचें सिद्ध चरित्रच असें आहे कीं, ह्याचा विचार मननपूर्वक केला तर कशाहि अडचणींतील मनुष्याला धीर देणारा प्रसंग त्याला त्यांत कोठें ना कोठें सांपडतोच सांपडतो. आगरकरांचें आणि टिळकांचें भांडण आजच्या वादासारखेंच होतें. म्हणून आपण वर्षांतून एकहि दिवसाचा सगळा वेळ शांत मनानें, शिकण्याच्या भावनेनें, श्रद्धेनें लोकमान्यांविषयींच्या खऱ्या विचारांत घालवं

तर वर्षभर पुरेल इतकी धैर्याची सामुग्री खास आपणांस मिळेल. ह्या पुरुषाची अलौकिक बुद्धिमत्ता, अपूर्व स्वार्थत्याग, अगाध विद्वत्ता, अलोट धैर्य व अपार क्रियाशक्ति ह्यांपैकीं ह्या चिंतनानें एक अंशहि आपल्यांत उतरला तरी पुरें आहे.

---

## सध्यांचें राजकारण*

नागपूर येथें ता. १६ सप्टेंबर १९२६ रोजीं गणेशोत्सवांत श्री. बापूजी अणे यानीं दिलेलें व्याख्यानः—

### समेट पं. मोतीलालनीं मोडला

पंडित मालवीय यांच्या निमंत्रणावरून समेट करण्यासाठीं आम्ही दिल्लीस गेलों होतों, परंतु पं. मोतीलाल नेहरू यानीं समेटाच्या अटींसंबंधीं आपलें स्वतःचें कांहींहि मत न कळवितां एका माणसामार्फत आपल्या सहकाऱ्यांच्या पत्रांचें व तारांचें मेंडोळें तेवढें पं.मालवीयांकडे पाठवून दिलें. ते स्वतः दिल्लीला समेटाच्या वेळीं हजरहि राहिले नाहींत. एवढी त्यांनीं समेटाबद्दल आस्था दाखविली ! ते साबरमतीच्यापुढें एक पाऊलहि टाकण्यास तयार नाहींत. "आतां आपण भांडूं व निवडणुकी झाल्यावर समेटाचें काय तें पाहूं" असें त्यांनीं जाहीर केलें आहे. आम्हांला Seekers and hunters of offices, नोकरीवाले असें म्हणतात; परंतु दिवाणगिऱ्या कोणत्या अटीवर घ्याव्या याची चर्चा करण्यास आम्ही तयार असतांनाहि पं. नेहरू मात्र त्यासंबंधीं स्वतःचें मत सांगण्यासच बैसाठीं हजर राहिले नाहींत. हें सांगण्याचें कारण एवढेंच कीं, समेट मोडला याची जबाबदारी सर्वस्वीं पं. मोतीलाल यांजवरच आहे, ही गोष्ट आपल्या स्पष्टपणें लक्षांत यावी. आज फूट कायम आहे, दोन्ही पक्षांत तीव्र मतभेद आहेत, ही गोष्ट ध्यानांत ठेवा म्हणजे पुढें काय करावयाचें, कोणास मतें द्यावयाचीं तें ठरविण्यास आपणांस ठीक पडेल.

---

* 'महाराष्ट्र' नागपूर ता. १९–९–१९२६

## स्वराज्य पक्षांतील वाढती फूट

आज स्वराज्य पक्षाची काय स्थिति आहे ती पाहा. स्वराजिस्टांतून अनेक लोक फुटून निघत आहेत. लाला लजपतरायांनींहि आतां तो पक्ष सोडून दिला आहे. आपल्या या मध्यप्रांतांतून आपण जे विश्वासाचे म्हणून लोक असेंब्लीत स्वराज्य पक्षातर्फे निवडून पाठविले, त्यांपैकीं बॅ. अभ्यंकरांशिवाय इतरांनीं गेलीं ३ वर्षे उघडया डोळ्यांनीं कामाचा अनुभव घेतल्यानंतर स्वराज्यपक्षाचा त्याग केला आहे.बहुमताचा हा अनुभव आहे कीं, हल्लींच्याच कार्यपद्धतीनें पुढें काम चालवून कांहीं फायदा होणार नाहीं. महाराष्ट्रांतील लोकांस " तुम्ही कलहप्रिय आहांत, चालत्या गाड्यांस खीळ घालण्याची वृत्ति तुमच्यांत आहे " असें नेहमीं म्हणण्यांत येतें. कोणतीहि नवी गोष्ट करण्याच्या कामीं अग्रगामित्वाचा मान आमच्याकडे थोडाबहुत आहे खरा; परंतु आज ज्यांनीं उघड्या डोळ्यांनीं कार्य करून कामाचा अनुभव घेतला आहे त्या सर्वांचा हाच अनुभव आहे कीं, हल्लींचें धोरण सोडलें पाहिजे. ज्यांनीं अनेक स्नेह्यासोबत्यांचे शिव्याशाप घेऊन स्वराज्यपक्षाच्या कौन्सिलांतून कार्याची धुरा वाहिली ते माझे मित्र बॅ. राव हेहि आज स्वराज्यपक्षांतून फुटून निघाले आहेत. कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर बसलेल्या पुढाऱ्यांचें काय मत आहे तें पाहा. श्री. सरोजनी नायडू यांना एकी हवी, त्यांना दोन्हीं पक्षांत समेट होणें इष्ट वाटतें. मौ. अबुल कलाम आझाद यांचेंहि मत समेटाला अनुकूल आहे. पं. मोतीलाल हे मात्र हल्लींचेंच धोरण कायम असावें असें प्रतिपादतात ! याच्या उलट लाला लजपतराय, नागपूर कॉंग्रेसचे अध्यक्ष विजयराघवाचार्य व पं. मालवीय हे हल्लींचा कार्यक्रम बदलविला पाहिजे या मताचे आहेत.

## सतत विरोधाचें धोरण सोडा !

सारांश, हल्लीं स्वराज्यपक्षांतून पुष्कळ पुढारी बाहेर पडत आहेत व मध्यप्रांतांत तर माझे मित्र बॅ. अभ्यंकर यांच्याशिवाय कोणीहि स्वराजिस्ट पुढारी उरलेला नाहीं. नाहीं म्हणावयास आमचे जुने मवाळ मिनिस्टर रा.

व. केळकर हे मात्र अभ्यंकरांच्या जोडीला चालू कार्यक्रमाचा गोवर्धन उचलण्यास सज्ज झाले आहेत. पण मला खात्री आहे कीं, ही तुन्हाटी दगा देईल ! ती मोडून पडेल ( हंशा ) व सर्व भार अभ्यंकरांवर पडेल. अनुभवापासून शहाणपण शिकावयाचें असेल तर सतत विरोधाचें धोरण सोडलेंच पाहिजे. एका प्रांतांत बहुमत झालें म्हणजे त्यानें त्याबद्दल प्रायश्चित्त म्हणून नुकसान सोसावयाचें व इतरांचें बहुमत नाहीं म्हणून त्यांना विरोधाचें कारणच नाहीं ! यासाठीं कानपुरास डॉ. मुंजे यानीं अशी सूचना आणली कीं, ४–५ मोठ्या प्रांतांत काँग्रेसचें बहुमत झालें तर अडवणुकीचा कार्यक्रम करावा; परंतु ही सूचना पं. नेहरूंस मान्य झाली नाहीं. एकाच प्रांताचा बळी देण्याइतके आम्ही निर्घृण नाहीं. सतत विरोधाच्या धोरणामुळें तुम्ही शेतकऱ्यांचें भयंकर नुकसान केलें आहे. " सेट्लमेंट बिल " तहकूब केल्यावर अनेक जिल्ह्यांत जमाबंदीचा नवा बंदोबस्त होऊन शेतकऱ्यांवर २०–२० वर्षांसाठीं अधिक करांचें ओझें लादलें गेलें. याची जबाबदारी स्वराज्यपक्षावरच आहे, ही गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाहीं.

## तुम्हीं जनता सरकाराभिमुख केली !

मतदारांनीं तुम्हांला तेव्हां निवडून दिलें खरें; परंतु त्यांना तुमची ' अडवणूक' समजलीच नव्हती. निवडणूक होतांच ते "आमच्या गांवची सडक करवून द्या " " आमच्या गांवाला विहीर हवी ती देववा " असें सांगू लागले व तुम्हीं या गोष्टी न केल्यामुळें लोकाभिमुख न राहतां सामान्य जनता सरकाराभिमुख होऊं लागली ! सरळ डेप्युटी कमिशनरच्या बंगल्यावर जाऊन त्याजजवळ आपलें गाऱ्हाणें लोक मांडू लागले आहेत. सारांश, जनतेंत असा अश्रेयस्कर फरक तुमच्या धोरणानें पडूं लागला असल्यामुळें तें बदलणें जरूर झालें आहे. परंतु आज काँग्रेस या गोष्टीकडे दुर्लक्ष करीत आहे. आजपर्यंतचा अनुभव असा आहे कीं, अगोदर लोकांनीं प्रत्यक्ष करून दाखविल्याशिवाय काँग्रेस त्या मार्गावर येतच नाहीं.

## प्रतिसहकारवाद्यांसच निवडा !

काँग्रेसला आपलें धोरण बदलविण्यास भाग पाडावयाचें असेल तर मतदारांनीं येत्या निवडणुकींत प्रतिसहकारवाद्यांसच निवडावें म्हणजे काँग्रेस आपलें

धोरण बदलील. येत्या निवडणुकींत जर प्रतिसहकार पक्षाला बहुमतात निवडून याल तर काँग्रेसचे अध्यक्ष श्रीनिवास अय्यंगारहि असें सांगतील कीं— " आम्ही या कार्यक्रमाला कधींच विरुद्ध नव्हतों, फक्त काँग्रेसनें तो मंजूर केल्यावर तो अमलांत आणूं एवढेंच आमचें म्हणणें होतें " (हंशा). सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, आतां काँग्रेसवर जर वजन पाडावयाचें असेल तर मतदारांनीं प्रतिसहकारवाद्यांसच निवडून द्यावें व नवा कार्यक्रम स्वीकारण्यास तिला भाग पाडावें. कार्यक्रमांतील फरक घडवून आणण्यास आपण येत्या निवडणुकींत स्वराजिष्टाना मतें न देतां तीं प्रतिसहकार पक्षालाच द्या एवढी माझी आपणांस विनंति आहे.

---

# मतदारांनो, निर्णय द्या !*

सिताबर्डी नागपूर येथील सार्वजनिक गणेशोत्सवातर्फे ता. १७ सप्टेंबर १९२६ इ. रोजीं बॅ. गोविंदराव देशमूख यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. बापूजी अणे यांचें झालेलें भाषणः—

## मतदारांनो, तुम्हीच शासन करा !

" माझीं नागपुरास तीन व्याख्यानें झालीं, त्यांपैकीं प्रत्येक ठिकाणीं चालकांनीं मला " सद्यःस्थिती"वर भाषण करण्यास सांगितलें; यावरून हल्लीं आपसांत चाललेल्या अंतःकलहाचा व तज्जन्य अनिष्ट परिणामांची जाणीव लोकांस आहे व ते भांडणाऱ्या पक्षांपैकीं प्रत्येकाचें म्हणणें ऐकून घेऊन त्यावर विचार करून अखेरीस आपला निर्णय देणार हें उघड आहे. हल्लींच्या अंतःकलहाबद्दल मतदार मंडळाला खेदच वाटत असला पाहिजे. जो पक्ष हट्टानें व हेकेखोरपणानें आपसांत समेट करण्याचें नाकारील व आपसांतील दुहीमुळें कौन्सिलांत सरकारी पक्षाचें बहुमत होऊं देण्यास मदत करील, त्यास शासन करण्याचें साधन आतां मतदारमंडळास उपलब्ध

---

* 'महाराष्ट्र' नागपूर ता. १९–९–१९२६

झालें आहे. ५–१० वर्षांपूर्वी लोक दुबळे होते; आज निवडणुकीच्या वेळीं कोणता पक्ष चुकत आहे व कोणता बरोबर आहे, याचा निर्णय मतदारांस देता येतो. हा हक्क मतदारांनीं विचारपूर्वक व भीडमुर्वत न धरतां बजावावा अशी माझी त्यांस आग्रहाची विनंति आहे. नव्या सुधारणांच्या मनूंत पहिलीं तीन वर्षें कौन्सिलबहिष्कारांत गेलीं. नवीं कौन्सिलें ओस पडल्यास सरकार वठणीस येईल अशी असहकारिता वाद्यांची समजूत होती, पण ती चुकली. कौन्सिलें ओस पडलीं नाहींत, तेथें कांहीं लोक गेलेच व सरकारी कारभार सुरळीत चालला. तेव्हां निदान कौन्सिलांत जाऊन तरी कामकाज बंद पाडावें, अशी कल्पना निघाली आणि स्वराज्यपक्ष स्थापन झाला. परंतु गेल्या निवडणुकींत बहुतेक सर्वच प्रांतांत स्वराज्यपक्षाचें अल्प मत झाल्याकारणानें—बंगाल व मध्यप्रांत हे दोन प्रांत खेरीज करून कोठेंच बहुमत असें नाहीं—त्यांनीं सुधारणांचा कायदा खुशाल चालूं ठेवला. फक्त आमच्या प्रांतांत मात्र—निदान पहिल्या वर्षांत तरी—कौन्सिलमार्फत आपण सरकारास कांहींच करूं दिलें नाहीं. पण यामुळें काय परिणाम झाला ?

## नोकरशाही बेलगाम व बेगुमान बनली !

सरकारचा कारभार यत्किंचित् तरी अडला काय ? नाहीं. पण उलट सरकारी अधिकाऱ्यांवर नजर ठेवणारा दिवाण वगैरे कोणी नसल्याकारणानें नोकरशाहींतील नोकर बेगुमान व बेफिकीर झाले; व आपल्या मनास वाटेल तसा कारभार करूं लागले. म्हणजे १९०९–१० सालीं येथें—कौन्सिल वगैरे नसतां—जसा अनियंत्रित कारभार चालत असे, तसाच कारभार गेलीं तीन वर्षं चालत आहे ! आतां आपणांपुढें प्रश्न असा आहे कीं, येत्या ३ वर्षांतहि आपण सरकारास असाच अनियंत्रित कारभार चालवूं देणार, कीं आपणांस दिवाणामार्फत जे थोडे बहुत अधिकार चालविण्याची सवड आहे, तिचा फायदा घेऊन लोकांचें होतां होईल तितकें कल्याण करणार ? हा केवळ तीन वर्षांपुरताच प्रश्न नाहीं. या तीन वर्षांनंतर जेव्हां रॉयल कमिशन येईल, तेव्हां हा वऱ्हाड–मध्यप्रांत इतर प्रांतांइतकासुद्धां प्रगत नाहीं; इतर प्रांतांनीं सुधा-

रणांचा फायदा घेतला पण मध्यप्रांतानें तो घेतला नाहीं; सबब हा प्रांत नालायक व मागासलेला आहे असें कमिशनकडून म्हणवून घेणार काय ? इतर प्रांतांस जास्त हक्क मिळतील–निदान आहेत ते तरी कायम राहतील-पण मध्यप्रांतांत गेल्या तीन वर्षांचें धोरण कायम राहिल्यास, हल्लीं आहेत ते हक्कहि काढून घेतले जाऊन पुन्हा या प्रांतांत नोकरशाहीचा कारभार एकतंत्री सुरूं होईल, अशी भीति वाटते !

## करबंदीच्या वाता आज तरी व्यर्थ आहेत !

कांहीं लोक म्हणतात कीं, "आमच्या सुधारणा काढून घेतल्या तरी आम्हांला त्याची पर्वा नाहीं !" असें म्हणणाऱ्या शूरांच्या अंगीं इतर प्रांत आम्हांला टाकून आपले हे हक्क कसे उपभोगतात तें पाहूं अशी धमक असल्यास न कळे ! (हंशा).पण मी तुम्हांला सांगतों कीं, इतर प्रांत आपले हक्क खुशाल उपभोगतील, व सहानुभूतीचे ठराव पास करतील ! (हंशा). तीन वर्षें अनियंत्रित कारभार चालूं दिल्यास त्यामुळें देशांत कांहीं मोठा जोम पैदा होईल, निःशस्त्र बंड उभारतां येईल, करबदीची चळवळ सुरूं करितां येईल, अशी जर यत्किंचित्‌हि आशा मला असती, तर हीं तीन वर्षें अनियत्रित सत्ता चालू देण्यास आम्ही खुशीनें तयार झालों असतों. पण करबंदीच्या व सर्व सरकारी काम बंद पाडण्याच्या गप्पा आजच्या परिस्थितींत व्यर्थ आहेत. सर्व लोक सरकारी नोकऱ्या सोडून व कर न दिल्यामुळें सर्व मालमत्ता जप्त होऊन जेव्हां रिकामे बसतील, तेव्हां त्या बेकारांना कांहीं दिवस तरी खाऊं घालण्याची तयारी पुढाऱ्यांपाशीं आहे काय ? इंग्लंडसारख्या संपन्न देशांत कांहीं लक्ष बेकारांच्या पोटापाण्याची तरतूद करतांना सरकारच्या नाकीं नव येतात. मग निःशस्त्र बंड पुकारल्यावर कोट्यवधि लोकांच्या पोटापाण्याची सोय कशी लावणार ? करबंदीची भाषा बोलणारांना त्या भाषेचा पूर्ण अर्थ व त्यापासून होणारे परिणाम यांची यथार्थ कल्पनाहि नसावी असें दिसतें. निवडणुकी जिंकण्यासाठीं जर ही करबंदीची व कायदेभंगाची भाषा ते बोलत असतील, तर लोकांनीं त्या थापांस फसूं नये ! सद्यःस्थितींत करबंदीची चळवळ शक्य नाहीं, म्हणून आज जे कांहीं

करतां येण्यासारखें आहे, तेंच करून शक्य तितकें लोकहित साधणें व लोकांना जास्त निकराच्या भांडणासाठीं हळुहळू तयार करणें हेंच पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे.

### संसाऱ्यास संन्यास देणार कीं काय ?

मतदारांपैकीं शेंकडा ९०—९५ लोक संसारी आहेत. त्यांना संन्याशी समजून—"तुमच्या क्षुल्लक सोयी गैरसोयींकडे आम्ही लक्ष देणार नाहीं. आम्ही फक्त स्वराज्याकडे लक्ष देणार!"—असें पुढाऱ्यांनीं त्यांस सांगणें म्हणजे संसारी लोकांस संन्यास घेण्यास सांगण्यासारखेंच आहे. म्हणून माझा लोकांस असा सवाल आहे कीं, जनतेचें शक्य तितकें हित साधणारे व कौन्सिलापासून शक्य तो फायदा लोकांस करून देणारे प्रतिनिधी तुम्हांस कौन्सिलांत पाहिजेत कीं, स्वराज्याच्या व करबंदीच्या पोकळ गप्पा सांगणारे पण कौन्सिलें सोडून पळून जाणारे प्रतिनिधी तुम्हांस हवेत याचा निर्णय तुम्ही येत्या निवडणुकींत दिला पाहिजे.

---

# राजकीय पक्षांची मीमांसा

१९२६ सालच्या कौन्सिल निवडणुकींत उमरावती येथें ३।४ दिवस प्रतिसहकार पक्षाच्या समर्थनार्थ व्याख्यानें करविण्यांत आलीं. या व्याख्यानमालेत वीर वामनराव जोशी, सर मोरोपंत जोशी व प्रतिसहकार पक्षाचे स्थानिक नेते यांनीं आपआपल्या पक्षाची बाजू मांडली. शेवटल्या दिवशीं श्री. बापूजी अण ह्यांचे खालील आशयाचें भाषण झालें:—

मीं आज तुमच्यापुढें प्रतियोगी सहकार पक्षाच्या कार्यक्रमासंबंधीं विवेचन करणार आहें. निरनिराळ्या पक्षांचे जबाबदार लोक आपल्यापुढें बोलून गेले आहेत, हें मी जाणतों. प्रतियोगी सहकारपक्ष कसा उत्पन्न झाला हें आतां सांगत न बसतां, केवळ त्याचा कार्यक्रम सांगितला तर इतर कार्यक्रमाशीं त्याची तुलना करून आपणांस आपलीं मतें ठरवितां येतील. असहकार पक्षातर्फे तर कौन्सिलांत उमेदवार असणेंच शक्य नाहीं. कारण त्यांच्या दृष्टीनें कौन्सिलांत जाणेंच हराम म्हणजे पाप आहे. "ब्राह्मणेतर" पक्ष हा राजकारणांतील पक्ष नसून जातिभेदामुळें उत्पन्न झालेला पक्ष आहे. सबब केवळ राजकारणाच्या दृष्टीनें बोलत असतां, हा पक्ष जमेस धरतां येत नाहीं. शेवटीं नेमस्त पक्ष, कॉंग्रेस म्हणजे स्वराज्यपक्ष व प्रतियोगी सहकार पक्ष, असे तीनच पक्ष उरतात. ह्यांहिपेकीं नेमस्तपक्षाचा उमेदवार हल्लीं कोणीहि उभा नाहीं. नेमस्तपक्ष हल्लीं 'नॅशनल' नांवाच्या पक्षामध्यें अंतर्भूत झाला आहे, असें मानलें जातें. परंतु तें कसेंहि असलें, तरी मवाळ अगर नॅशनल पक्षातर्फे वऱ्हाडांत कोणी उमेदवार उभा नाहीं येवढें मात्र खरें. नेमस्त पक्षास उमेदवार नसल्याकारणानें दुसऱ्या पक्षांतील उमेदवारांच्या गुणावगुणांच्या चर्चेपलीकडे त्यास राजकारण उरलेलें नाहीं आणि अशा प्रकारच्या चर्चेस वैयक्तिक स्वरूप आल्यावाचून राहात नाहीं. कारण तत्त्वाऐवजीं व्यक्तींच्या गुणदोषांची मीमांसा त्यास करावी लागते. सर मोरोपंत जोशी ह्यांनीं चालविलेल्या चर्चेस हें स्वरूप येणें अपरिहार्य झालें आहे.

---

* 'उदय' उमरावती ता. २६–१०–१९२६

## 'दत्तक' घेणारा पक्ष

वामनरावजींचीहि तीच गति झाली आहे. ते स्वतःला ज्या पक्षाचे म्हणवितात त्या पक्षाचा उमेदवार शक्य नाहीं म्हणून दुसऱ्या पक्षाचा उमेदवार 'दत्तक' घेतला असल्याची ते भाषा वापरीत असतात! दत्तक घेतला असे म्हणण्यांत जसा परकेपणाचा समावेश होतो, तसाच कांहीं अशुभ कल्पनांचाहि समावेश होतो! सख्खे गणगोत कोणी उरले नाहीं, म्हणून आपला वारसा दुसऱ्यास देण्याकरितां दत्तक घेतला जातो व स्वतःच्या समाप्तीची त्याच्याचबरोबर त्यांत अपेक्षा व्यक्त केली जाते. वामनरावजी हल्लीं कॉंग्रेस पक्षास मदत करीत आहेत व या पक्षांत तेज व "जिद्" आहे असें त्यांचें म्हणणें आहे. तें काय असेल तें असो! परंतु वामनरावजीस त्यांचा एकांतवास सोडून पुनरपि रणांगणावर येऊन उभें राहणें भाग पडण्याइतकें तेज व जिद्द आमच्या पक्षांत आहे, येवढें मात्र हल्लींच्या प्रकारावरून सिद्ध झालें आहे व यांतच आम्ही आमचा पहिला व मोठा विजय समजतों. आमच्या पक्षानें निदान देशभर इतकी चळवळ करून ठेवली आहे कीं, स्वस्थ बसण्याचा हट्ट धरून बसणारांस आपली प्रतिज्ञा पूर्ण करणें अशक्य झालें आहे. आमच्या पक्षाचें ज्यास सभासद व्हावयाचें असेल, त्यानें कॉंग्रेसचे सभासद असलेंच पाहिजे, असा ज्या प्रांतांनीं निर्बंध ठेवला आहे, त्यांपैकीं वऱ्हाड हा एक प्रांत आहे. या निर्बंधाचें कारण असें कीं, हा पक्ष १९१९ इसवी सालच्याच राजकारणाचें कालानुरोधाप्रमाणें आजचें रूपांतर असून आमचें ध्येय आम्ही कॉंग्रेसच्या मार्फत साध्य करूं इच्छितों; व कांग्रेसची इभ्रत, परदेशांतील कॉंग्रेसचा बोज व कॉंग्रेसचें संघटण ह्यांत पडेल तितकी भरच आम्हांस पाडावयाची आहे. आम्हांस कांग्रेसचें जें जिव्हाळ्याचें प्रेम आहे, तें आमच्या आक्षेपकांत मात्र नाहीं. हा आपआपल्या मनाच्या ठेवणीचा प्रश्न आहे. मवाळास हें प्रेम नाहीं. कॉंग्रेसशीं थोडी नाबनती झाल्याबरोबर रूसून बाहेर निघून निराळी संस्था व निराळें धोरण करण्याची मवाळांप्रमाणें आमची प्रवृत्ति नाहीं. आम्ही कॉंग्रेसशीं होईल तसें सहकार्य करूं इच्छितों, परंतु कॉंग्रेसविरहित संस्थेंत आम्हांस मानाची जागाहि नको आहे. आम्ही कॉंग्रेसमध्यें राहून

## काँग्रेसविरुद्ध बंड करतों

असा आक्षेप आमच्यावर आहे. काँग्रेस ही सबंध राष्ट्राची असल्यामुळें आपलें मत काँग्रेसच्या मंडपांत व्यक्त करण्याचा जितका एकाद्यास हक्क आहे व तें जितकें काँग्रेसमध्यें मत व्यक्त करणें आहे, तितकाच काँग्रेसच्या बाहेरहि मत व्यक्त करण्याचा लोकांस हक्क आहे, व तेंहि तितकेंच " काँग्रेस-मध्यें " मत व्यक्त करणें आहे. आज काँग्रेसमध्यें १०–१५ हजार लोक सभासद आहेत; आणि ह्या १०–१५ हजार लोकांचें मत म्हणजे राष्ट्राचें मत आणि साठ लाख मतदारांचें मत हें राष्ट्राचें मत नाहीं असें म्हणणें कधींहि सयुक्तिक होणार नाहीं. काँग्रेस जर चुकत असेल तर ती चूक दुरुस्त करण्याचा अधिकार राष्ट्रांतील सर्व जनतेस आहे. आणि राष्ट्रानें चूक दाखवून दिल्यानंतर जर काँग्रेस ऐकणार नाहीं, तर जो कांहीं परिणाम होईल तो काँग्रेसला उघड्या डोळ्यांनीं पाहावा लागेल. राष्ट्रांतील साठ लक्ष लोकांचें मत अजमावून पाहाण्याचा तीन वर्षांनीं एकदां प्रसंग येतो आणि तो प्रसंग गमावून वर्किंग कमिटींत बसलेल्या चारदोन व्यक्तींच्या तोंडांतून निघणारीं वाक्यें वेदतुल्य मानण्यास आम्हीं तयार नाहीं. राष्ट्र आपलें मत या निवडणुकीच्या वेळीं बोलून दाखवीत असतां, काँग्रेसशीं जर त्याचें संगनमत झालें नाहीं, तर काँग्रेसनें आपला ठराव बदलावा. पंधरा हजार माणसांच्या मताप्रमाणें साठ लक्ष लोकांच्या प्रतिनिधींनीं चालावें असा हट्ट धरणें न्यायास किंवा व्यवहारास संमत नाहीं.

## राष्ट्रदेवतेचें सौम्य व उग्र स्वरूप

काँग्रेसच्या मंडपामध्यें राष्ट्रदेवतेचें उग्र व सौम्य स्वरूप असतें तर या अफाट देशांत पसरलेल्या जनतेंत राष्ट्रदेवतेचें उग्र व विश्व स्वरूप प्रगट होतें. सौम्य स्वरूपाची आराधना सोपी असेल, व विश्वस्वरूपाची आराधना दुर्धर असेल, पण आम्ही ती करण्यास तयार आहों; व यशःप्राप्तीची आम्हांस आशा व उमेद आहे. मोतीलाल नेहरूंची मोठी चूक झाली ती अशी कीं, त्यांनीं स्वतःची इज्जत वांचविण्यासाठीं काँग्रेसच्या नांवाखालीं एका पक्षाच्या अंगावर सबंध राष्ट्राच्या इज्जतीचें आवरण घातलें व एका

पक्षाच्या विरुद्ध बोलणें म्हणजे राष्ट्राविरुद्ध बोलणें होय असा भास उत्पन्न केला. पक्षाच्या चुका राष्ट्राच्या चुका ठरवून ते राष्ट्राच्या इज्जतीची हानि करीत आहेत. आणि स्वतःच्या बचावाकरितां सबंध राष्ट्र इरेस घालीत आहेत, हें त्यांस व आजच्या स्वराज्य पक्षाच्या मदतगारांस समजत नाहीं. खरोखरी "गलेलठ्ठ" पगारांचा ह्या मंडळीस राग दिसत नाहीं. तसें असतें तर गलेलठ्ठ पगार खाल्लेल्यांचा वामनरावजींनीं हात धरला नसता. त्यांचें म्हणणें तरी काय आहे? काय दुसऱ्या पक्षांत त्यागी माणसेंच नाहींत? कीं, त्या पक्षांतून उमेदवार नुसत्या पगाराच्याच लालचीनें कौन्सिलांत जातो व त्यास मदत करणारे सर्व लोक कांहीं लालूच असल्यामुळें मदत करतात! जेव्हां दिवाणगिरी नव्हती तेव्हां आज दिसणाऱ्या आमच्यापैकीं कोणी कधीं झिजून जनतेचें कार्य केलेलें नाहीं कीं काय? आणि स्वराज्यपक्षांत काय खालपासून वरपर्यंत त्यागी लोकांचीच मालिका गोवून ठेवलेली आहे! तुलनात्मक दृष्टीनें पाहूंच गेल्यास कोणच्याहि कसोटीनें आमचा पक्ष सरसच न ठरल्यास निदान हीन टरेल असें नाहीं. निस्पृहपणानें व निर्मोह मनानें काम करणारे कार्यकर्ते याहि पक्षांत आहेत व पगाराच्या लालचीमुळें हा पक्ष कौन्सिलांत जातो असें म्हणणें अजाणपणाचें आहे.

## राष्ट्र स्वतःच नडलें, सरकार नाहीं.

स्वराज्य पक्षानें जी कामगिरी केली तीबद्दल उणें बोलण्याची माझी इच्छा नाहीं. कोणचेंहि काम करूं लागलें, म्हणजेच अडचणी अनुभवास येतात; कांहींच न करणारास सर्वच सोपें आहे. स्वराज्यपक्षाच्या धोरणामुळें राष्ट्रच स्वतः नडलें, सरकार नडलें नाहीं, असा अनुभव आला. आणि हा अनुभव घेऊन कौन्सिलांतून परत आलेल्या लोकांपैकीं तेंच धोरण पुनरपि चालविण्याकरितां पुनरपि कौन्सिलांत जाऊं इच्छिणारा उमेदवार विरळाच सांपडेल. पूर्वी सभासदांनीं जें करून दाखविलें नाहीं, तें आम्हीं करून दाखवूं अशी "जिद्दीच्या" नांवाखालीं फुशारकी मारणें सोपें आहे. परंतु पूर्वीच्यांचा अनुभव जमेस धरतां भलत्याच 'जिद्दी' पायीं राष्ट्राचें अहित करणें असमंजस-

पणाचें आहे. आपण जो उमेदवार निवडाल तो आपला मुखत्यार म्हणून तीन वर्षेपर्यंत कौन्सिलमध्यें जाऊन बसेल आणि तीन वर्षे मी कोणचें धोरण ठेवीन हें सांगणारा उमेदवार तुम्हीं निवडला पाहिजे. कॉंग्रेसचा उमेदवार तीन वर्षांचा कार्यक्रम कसा चालवील हें तुम्हांस सांगूं शकत नाहीं. पुढें कॉंग्रेस काय ठरवील ह्याची कांहीं जाणीव नसतां कॉंग्रेसच्या म्हणण्याप्रमाणें वागेन म्हणणारा मनुष्य स्वतः बुद्धि व कर्तबगारी मी उपयोगांत आणणार नाहीं अशा सारखीच जवळजवळ हमी देतो! राष्ट्रांत परिवर्तन घडवून आणावयाचें असल्यास कालानुसंधान ठेवून प्रतिपक्षाच्या हालचालीवर नजर देऊन प्रसंगानुसार स्वतःच्या बुद्धीनुरूप वागणारीं माणसें कौन्सिलांत गेलीं पाहिजेत. मोहापासून दूर पळून जाऊन वैराग्याची शेखी मारण्यांत पुरुषार्थ नाहीं. मनांत हिंमत ठेवून प्रत्यक्ष मोहाशीं झगडण्यांत व निर्मोह राहण्यांतच पुरुषार्थ आहे. जग सर्व निर्मोह झाल्यानंतर व प्रत्येक मनुष्य विरक्त झाल्यानंतर मग कौन्सिलांत जावयाचें अगर स्वराज्याचे लढे लढावयाचे ठरविल्यास काल संपेपर्यंत व जगाची रहाटी बंद पडेपर्यंत वाट पाहावी लागेल! मागच्या तीन वर्षांत जर दिवाण नेमले गेले असते, तर वर्ष-वर्ष कौन्सिल बंद राहिल्याचा इतिहास घडला नसता. जिल्हा-अधिकारी आज किती तोऱ्यानें वागतात व शेतकऱ्यांची किती गांजणूक चाललेली आहे, ह्याचें खरें स्वरूप त्यांच्याशीं प्रत्यक्ष संबंध आल्याखेरीज समजत नाहीं.

## शब्दांचे भ्रामक अर्थ

स्वावलंबन व परावलंबन ह्या शब्दांचे खोटे अर्थ करून कौन्सिलांतून मिळालेलें तेवढें परावलंबनाचें व बाहेर कांहीं मिळो वा न मिळो तें तेवढें स्वावलंबनाचें, असा भ्रम उत्पन्न करून घेण्यांत फायदा काय आहे? बाहेर वर्गणीवर चाललेली शाळा तेवढी स्वावलंबी कां आणि दिवाणाकडून जनतेनें बहुमताच्या जोरावर सरकारी तिजोरीला काढावयाला लावलेली शाळा मात्र तेवढी परावलंबी कां? सरकारी धोरण आवडत नसल्यास सरकारांत बदल करून, जेणेंकरून सरकार आपलें होईल व लोकांचे प्रतिनिधी सर-

कारची सत्ता वापरतील असें करा. सरकारास आपणाकरितां जें जें करणें नाहीं तें तें सर्वच आपण बाहेर राहून करूं, अशी स्वावलंबनाची व्याख्या करणें भ्रामक आहे. दिवाणांच्या मार्फत लोकसत्तेनें आपलें हित करून घ्यावें व नसेल त्यासाठीं झगडत असावें असें ठोकळ मानानें आमच्या कार्याचें स्वरूप व हा आमचा कार्यक्रम आहे. ज्याच्याजवळ कांहीं आहे तोच कांहीं तरी देईल. ज्याच्याजवळ कांहींच नाहीं तो कांहीं देणार नाहीं. जर जनतेच्या हातीं सत्ता येईल तर लोकांचें कल्याण होईल, एरवीं होणार नाहीं.

यानंतर सर मोरोपंत जोशी ह्यांनीं प्रतिसहकारावरील आक्षेप आपल्या भाषणांत मांडल्यावर त्याला श्री. बापूजी अणे यांनीं उत्तरादाखल केलेलें भाषणः—

बाजारांतील वस्तु विकत आणण्याची अक्कल नसतां जसा कोणीहि घरीं बसून राहणारा मनुष्य बाजाराचा सौदा आणणाऱ्यास महाग सवदा केलास म्हणून दूषण देऊन टाकीत असतो व स्वतः बाजारांत सौदा करण्याची अक्कल नसतांहि रोज व्यवहार करणाऱ्यास वेड्यांत काढतो, त्याप्रमाणें सर मोरोपंतांचे आक्षेप आहेत. जो जगांत वागतो, लोकांच्या गरजा समजून घेऊन त्यांच्याकरितां झिजतो, आणि जनतेस हिताचें वळण लावण्याचा यत्न करितो, त्यास काय कष्ट करावे लागतात, हें सर मोरोपंतांस माहीत नाहीं. पांच वर्षें गलेलठ्ठ पगार खाल्ल्यानंतर दुसरे पगाराकरितां चाललेले आहेत असें संदिग्धपणानें सुचविणें थोरपणाचें द्योतक नाहीं. जन्मभर सरकारी नोकरी केल्यानंतर लोकांस उपदेश करणें व कार्यकर्त्यांविरुद्ध संशय उत्पन्न होतील असें संदिग्ध बोलणें बोलणारास शोभत नाहीं. सर मोरोपंतांच्या पक्षाचा उमेदवार नसतां, दुसरा पक्ष कसा हतबल होईल ह्याविषयीं त्यांनीं चालविलेली खटपटहि शहाणपणाची नाहीं. आम्हीं कांहीं दिवस कामाकरितां वकिली तहकूब केली होती हें खरें आहे व त्या दिवसांत सार्वजनिक व फुकट करावयाच्या कामाशिवाय नवीन काम घेतलेलें आम्हांस स्मरत नाहीं. पण आम्ही असहकारितेकरितां वकिली तहकूब करीत आहों असें आम्हीं मुद्दाम जाहीर केलें नाहीं, कारण अमुकच एक प्रामाणिक धंदा वाईट आहे हें तत्त्वच आम्हांस मान्य नव्हतें व दुसरी गोष्ट म्हणजे ही कीं, आम्ही असहकारिते-

करितां वकिली सोडली असें आम्हीं जाहीर केलें असतें तर केवळ परिस्थिती-मुळें ज्या इतर कांहीं कार्यकर्त्यास वकिली सोडणें शक्य नव्हतें, त्यांस आम्हीं निष्कारण खालीं पाहावयास लावल्यासारखें झालें असतें. तें आम्हांस नको होतें म्हणूनच आम्ही मुद्दाम असहकारितेकरितां वकिली तहकूब केली आहे असें जाहीर करवून घेतलें नाहीं.

---

# वणीच्या मानपत्रास उत्तर *

वणी येथें इंग्रजी मराठी शाळेचा सुवर्ण ज्युबिली व विद्यार्थी संमेलन दे. भ. बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडलें. श्री. अणे म्हणाले:—

**श्रद्धेनें, ऐक्यानें व प्रेमानें कार्य करा.**

मला या मानपत्रांत केलेलें वर्णन मुळींच पसंत नाहीं. त्यावरून आपण किती अल्पसंतुष्ट आहांत, हें मात्र दिसून येतें. माणसाच्या हातून लोक-कल्याण किती झालें, याकडे तुम्ही पाहात नाहीं. कोणी मनुष्य सार्वजनिक कार्यासाठीं धडपड करीत असला, तरी लोक त्याच्यावर संतुष्ट होतात ! या तुमच्या अल्पसंतुष्टतेमुळेंच इंग्रज सरकारचें राज्य येथें चिरस्थायी झालें आहे. सार्वजनिक कार्याची आस्था मला आहे, असें म्हणून हें मानपत्र आपण मला दिलें आहे. पण त्याचा गर्भितार्थ असा आहे कीं, मला सार्व-जनिक कामाची आस्था असली पाहिजे ! आपण सर्वांनीं मतभेद विसरून एकचित्तानें व श्रद्धेनें या ठिकाणीं जमलांत तशा श्रद्धेनें ऐक्यानें व प्रेमबुद्धीनें सर्वांनीं काम करावें असें दाखविण्याचाहि आपला उद्देश असेल. आजच्या परिस्थितींत सौजन्य व परमतसहिष्णुता यांची जरूरी आहे. मतभेद विसरून ऐक्यानें काम केलें तरच आज धर्मकारण किंवा राजकारण यशस्वी होईल. लग्नाच्या प्रसंगीं जांवयाला देव कल्पून वृद्ध सासरासुद्धां त्याला नमस्कार करतो. तसाच हा औपचारिक प्रसंग आहे. तथापि हा केवळ वरवरचा देखावा आहे असें मी म्हणत नाहीं. तुमचें गांव हें कळकळीच्या कामाचें

* 'महाराष्ट्र' नागपूर ता. २३–१–२७

कद्र आहे. प्रसंग आल्यास आपण या कळकळीचा अंश सहज प्रकट कराल असा मला भरंवसा वाटतो. हें मानपत्र म्हणजे एक करारनामाच होय. आज समाजांत कित्येक लोक रुसले आहेत, पण एकदां ज्यांच्या हातून चुका झाल्या त्यांनाच फिरून काम करूं द्या असें मी म्हणेन.

## दुसरी प्रतिस्पर्धी जनता उभी करा.

आज आपणांवर श्वेतवर्णीय जनता राज्य करीत आहे. त्यांचा वरचष्मा आपणांस आज असह्य झाला आहे. तो वरचष्मा आज कोणत्याच देशास आवडेनासा झाला आहे. ' आमचा बादशहा कांहीं करूं शकत नाहीं ! अशी बढाई हे लोक मारीत असतात. अशी ही आंग्ल जनता प्रबल आहे. त्यांच्याशीं भांडावयाचें म्हटलें किंवा साम्योपचार करावयाचा म्हटला तरी त्यासाठीं एक दुसरी जनताच उभी राहिली पाहिजे. हें जनतादेवतांचें युद्ध आहे. सारांश हल्लींची राज्यव्यवस्था अमूर्त स्वरूपाची आहे व तिच्याशीं अमूर्त अशा लोकशाहीनेंच भांडणें शक्य आहे. लोकमान्यांनीं ३३ वर्षांच्या व्यासंगानंतर ' जनताजनार्दन ' ही देवाची अमूर्त कल्पना गीतारहस्यांत प्रथम प्रकट केली. या जनताजनार्दनाचा कोणताहि एक अंश, एक भाग रुष्ट झाला असेल तोंपर्यंत आपणांस ' अमुक अमुक गोष्ट झालीच पाहिजे ' असें आग्रहानें म्हणतां येत नाहीं.

## राष्ट्रीय सभा म्हणजे जनताजनार्दनाचें देऊळ

सारांश, रुष्ट झालेला अंश प्रसन्न होईपर्यंत आपणांस त्या जनतेची सेवा करीत राहाणें भाग आहे. मतभेद नष्ट केले पाहिजेत. लोकमान्यांनीं हेंच कार्य केलें. त्यांच्या कृतीचें रहस्य हेंच कीं, लोकांच्या आकांक्षा व राजकारण हीं त्यांनीं जवळजवळ आणिलीं, तीं एकरूप करण्याचा प्रयत्न केला. सर्व मतांचे व सर्व जातींचे लोक राष्ट्रीय सभेंत कसे येतील याबद्दल त्यांचा प्रयत्न सुरू असे व तोच झगडा हल्लींहि सुरू आहे. राष्ट्रीय सभा ही जनता-जनार्दनाचें देऊळ, म्हणूनच तिची थोर योग्यता आहे. असो आपल्या सहानुभूतीची मला माझ्या कार्यांत मदत होईल अशी मला आशा आहे. म्हणून हा खलिता, हें मानपत्र मी ठेवून घेतों. याचा मोबदला मी कसा देऊं शकेन हें मात्र मला आज सांगतां येत नाहीं ! ”

# विदर्भ ग्रामपंचायत-परिषद्
## अधिवेशन १ लें.

[ दर्यापूर येथें वरील परिषदेचें प्रथम अधिवेशन भरलें असतांना परिषदेचे अध्यक्ष म्हणून श्री. माधव श्रीहरी अणे यानीं ता. १६ एप्रिल १९२७ रोजीं भाषण केलें. सदरहु परिषदेचा अहवाल, अध्यक्ष, वऱ्हाड ग्रामपंचायत-संघ, अमरावती यांनीं प्रकाशित केला, त्यावरून हें भाषण येथें दिलें आहे. ]

अनेक प्रकारच्या चळवळींच्या व योजनांच्या मागें आपण लागल्यानें ग्रामपंचायतींचा प्रश्न आजपर्यंत बाजूस पडला होता; त्यास महत्त्व आणण्यासाठीं तपस्वी बाबासाहेब परांजपे ह्यानीं आटोकाट प्रयत्न केले व आजच्या प्रसंगास तेच योग्य अध्यक्ष झाले असते. आज बाबासाहेब येथे नाहींत ह्याबद्दल आपणांस खेद वाटणें साहजिक आहे. गेले चार महिने ते बंगाल व आसाम ह्या प्रांतांत ह्या चळवळीचा प्रचार करीत आहेत आणि महाराष्ट्राच्या कर्तबगीरावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. आपली ग्रामपंचायतीची चळवळ नवी नाहीं. लोकलबोर्ड, म्युनिसिपालिट्या व कौन्सिलें ह्या संस्था आपणांस नव्या आहेत. मात्र ग्रामसंस्था हा आपला सर्वांत जुना व पुरातन दोस्त आहे. तो आपल्या उन्नतीच्या, त्याचप्रमाणे अवनतीच्या कालांतहि सावलीप्रमाणें आपल्यामागें चालत आला आहे. पण 'अतिपरिचयात् अवज्ञा' या न्यायानें आजपर्यंत आपल्या हातून त्याची अवहेलना झाली आहे. इतर नव्या अपरिचित संस्थांच्या वाढीप्रीत्यर्थ आपण ४०।५० वर्षे खर्ची घातलीं व आपल्या ह्या जुन्या दोस्ताकडे आपण दुर्लक्ष केलें. लोकलबोर्ड, म्युनिसिपल कमिट्या व कौन्सिलें ह्यांसारख्या नव्या दोस्तांच्या स्तुतिस्तोत्रांत आपण गढून गेलों होतों, आणि त्यांच्या अभिवृद्ध्यर्थ एकसारखा दुंदुभिनाद होत गेला. त्याकरितां आपण इमानेंइतबारें खटपट केली, पण अनुभव असा आला कीं, त्यांतील परकीयत्व नष्ट होत नाहीं, किंवा त्या आत्मसात् होत नाहींत. त्यांपासून आपणांस म्हणण्यासारखा फायदा झाला नाहीं. स्वराज्यप्राप्तीची प्रेरणा लोकांच्या मनांत जागृत करण्यास ह्या संस्था निरुपयोगी

ठरल्या, इतकेंच नव्हे, तर त्यांच्या ह्या स्वरूपामुळें अंतःकरण छिन्नविच्छिन्न करण्याजोगी परिस्थिति उत्पन्न झाली. तेव्हां ह्या संस्थांचें आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं असें वाटून कौन्सिल–बहिष्कारापर्यंत मजल गेली. त्यावेळीं परिस्थितीचें निरीक्षण करतां वैदिक कालापूर्वीपासून आमच्यामागें एकसारखा असलेला हा दोस्त नजरेस आला. ग्रामसंस्था ही हरळीच्या मुळासारखी आहे. वरचेवर पाणी टाकून तिची जोपासना कराल तर हिरवेंगार बिछायत दिसून येईल. तिकडे दुर्लक्ष कराल तर ती जरी वाळलेली दिसली, तरी थोडासा पाऊस पडतांच वाढीस लागून ती आपलें पूर्वस्वरूप धारण करील. तेव्हां आम्हांस कळून आलें कीं, भावी उत्कर्षाची आशा उत्पन्न करण्याजोगी कोणती संस्था असेल तर ती ग्रामपंचायत–संस्था होय. ह्या संस्थेच्या अस्तित्वाची साक्ष स्मृति, वेद, पुराणें, व परकीयांनीं लिहिलेलीं प्रवासवर्णनें ह्यांत सांपडते. निरनिराळ्या संस्थांच्या भपक्यामुळें ह्या संस्थांकडे दुर्लक्ष होतें. आम्हांस आपल्या हक्कांची जाणीव झाली, आम्ही त्यांची मागणी करूं लागलों, व ज्यांच्या हातीं आमचे हक्क आम्हांस देणे आहे तेहि देतों म्हणूं लागले; पण

## हल्लींचे हे कर्ण कृपण आहेत.

ते देतों म्हणतात, पण खरोखर देतात किंवा नाहीं ह्याची शंका उत्पन्न झाली आहे. आज खेडयांत शेंकडा ८० लोक राहातात. शहरांत राहाणारांस स्वच्छ हवा व पाणी मिळत नाहीं म्हणून त्यांची आयुर्मर्यादा कमी झाली व मृत्यूचें प्रमाण वाढलें असें म्हणतात. खेडयांत तरी भरपूर हवा आणि पाणी आहेना? मग तेथें मृत्यूच्या प्रमाणांत वाढ कां आहे? एकादा एपिडेमिक येतो आणि लक्षावधि लोकांचे बळी घेतो. अशा तऱ्हेनें प्रत्येक बाबतींत खेडयांतील जनतेची खालावलेली स्थिति नजरेस येते. ती मृत्युपंथास लागलेली दिसते. आपत्तींना तोंड देण्याचें सामर्थ्य खेडयांत उरलेलें नाहीं. आमच्या सांपत्तिक अभ्युदयाचें दिसणारें चित्र भ्रामक आहे. आज खरोखर पाहिलें असतां, खेडयांत मूर्तिमंत विपन्नावस्था दिसते. मुंबईच्या गोद्या, मजूर, कारखाने ह्यांवरून हिंदुस्थान औद्योगिक शर्यत खेळत आहे असें म्हणतात. पण मी म्हणतों कीं, शर्यत कोण खेळत असेल तें असो, देश मात्र शर्यतीचें मैदान झाला आहे.

'कलौ संघे शक्तिः' ह्या तत्त्वावर म्यु० कमिट्या व डि. कौन्सिलें निघालीं; पण खेड्यांतील लोकांचा संघ कसा करावा इकडे दुर्लक्ष करण्यांत आलें. खेड्यांतील लोकांत सामर्थ्याबद्दल आत्मविश्वास उरला नाहीं. आत्मविश्वास नाहींसा झाला म्हणजे ह्यातून कांहींच होत नाहीं. तेव्हां हा आत्मविश्वास कसा उत्पन्न करावा याचा विचार निघून,ग्रामसंस्थेनें संघशक्ति वाढवूनच तो करतां येईल असें दिसून आलें. आजपर्यंत ग्रामसंस्था हा संशोधनाचा विषय होता. पण आतां संशोधनाचा विचार जाऊन तो प्रत्यक्ष कृतीचा विषय झाला आहे. खेड्यापाड्यांत चैतन्य उत्पन्न करण्याच्या हेतूनें हा प्रश्न हातीं घेतला जाणें जरूर होतें. आपल्या प्रान्तांत श्री. जठारसाहेबांस ह्या बाबतींत चौकशी करावयास लावून ह्या कामास सुरुवात झाली, नंतर कायदा पास करण्यांत आला. पुढें संस्थेची वाढ करण्याचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमून तिचा रिपोर्ट बाहेर आला. करांचा बागुलबुवा दाखविण्यांत आला. रिपोर्टनंतर पंचायत स्थापन करणें सुकर झालें असलें तरी काम करून दाखविणें कठिण झालें आहे. असें सांगण्यांत येतें कीं, यामुळें गांवांत भांडणें व तट उत्पन्न झाले, व खेडें हें भांडण्याचें ठिकाण बनलें.

## ग्रामकंटक नांवाचा प्राणी

उत्पन्न झाला. पण मी म्हणतों कीं,ही स्थिति नवीन नाहीं. पूर्वी जर भांडणें नसतीं तर पंचायतींची जरूरीच काय होती ? भांडणें नाहींशीं करण्याचीच ही मात्रा आहे. अनेक नवे नवे उपाय थकले; आतां ही आमची पुरातन मात्रा घ्या व करावीं लागणारीं कडक पथ्यें करा. लवकर गुण न आला तरी निराश होऊं नका.आमच्या ह्या संस्थेनें इंग्रज इतिहासकारहि चकित झाला आहे. आजपर्यंत आमच्या देशांत अनेक पंथांचें, धर्मांचे, व संस्कृतींचे लोक आले, पण त्या सर्वांना आत्मसात् करण्यांत आलें आहे. माशाला खावयास आलेल्यानें गाळांत रुतावें आणि पुढें मासा बनून आमच्या स्वरूपांतच आमच्या बरोबरीनें राहावें, असा अनुभव आला आहे. हल्लींच्या राज्यकर्त्यांनाहि मी हिंदुस्थानांत मुरतों कीं काय अशी भीति वाटत आहे. कारण ग्रामसंस्थेच्या परिकोटाच्या बळावर परकीय संस्कृति आली, तरी हिंदी जनता मूळ स्वरूप

व मूळ संस्कृति विसरली नाहीं. परकीय संस्कृतीच्या अनेक वावटळी आल्या आणि गेल्या, पण ग्रामसंस्थेच्या ह्या छत्रामुळें हिंदुस्थान आहे तसाच कायम आहे. हिंदुस्थानांतील खेड्यांनीं हिंदुस्थानाला पूर्वीप्रमाणें कायम ठेवला आहे. पूर्वी करीत असलेलें कामच खेडेकरी आज करीत आहे. तो आज पूर्वीप्रमाणेंच वस्त्रें वापरीत आहे, पूर्वीप्रमाणेंच आपल्या मोडक्यातोडक्या झोपडींत राहात आहे, आणि आपल्या गुरांढोरांत पूर्वीप्रमाणेंच दंग आहे. हें अविरत, अकुंठित सातत्य हिंदुस्थानांत जिवंत व्यक्तीच्या रूपानें लिहिलेलें खेड्यांत सांपडतें. आपणांवर अनेक प्रकारचा मारा होत आहे. आपल्याला आपल्या स्वरूपाचा विसर पडावा, आपला अभिमान नष्ट व्हावा, व नव्या नव्या व्यवहारांत आपणांस ओढावें असे प्रयत्न प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, ज्ञात वा अज्ञात स्वरूपांत होत आहेत. तेव्हां आपलें मूलभूत तत्त्व कायम ठेवून, जरूर तेवढें स्थित्यंतर करून घेणें असेल तर त्या ग्रामसंस्थांनींच हें कार्य होईल. ज्या कोणाच्या बळावर बौद्धधर्मासारखा फितुरीचा हल्ला नामशेष झाला, जें बळ राजशक्तींत नाहीं, तें ह्या संस्थेंत आहे. सत्तेचा, धर्माचा अगर इतर कोणत्याहि प्रकारच्या जुलमाचा ज्या कोणाच्या बळावर आपण प्रतिकार करूं शकलों, तोच कोट उकरून जुलमाचा प्रतिकार करा. अनेक नवीं देवळें बांधण्यापेक्षां ग्रामसंस्थेसारख्या देवळाचा व त्यांतील स्वयंभू व जागृत शिवलिंगाचा जीर्णोद्धार करा; ह्या जनताजनार्दनरूपी देवतेस शाश्वत अधिष्ठान निर्माण करा. रामदासी सांप्रदायाप्रमाणें ज्याप्रमाणें गांवोगांव मारुति पाहिजे व मारुति नसला तर मंगलकार्य होत नाहीं, त्याचप्रमाणें ही ग्रामदेवता गांवांत नसली तर मंगलकार्य होणार नाहीं. रोज आपण धार्मिक प्रसंगीं इष्ट देवतेचें, कुलदेवतेचें व ग्रामदेवतेचें अभिवादन करतांच. एकीचें आकुंचित स्वरूप असतें तर दुसरीचें पहिलीपेक्षां विस्तृत स्वरूप असतें. गांवोगांव ही ग्रामदेवता स्थापन झाली तर तिच्या मार्फत विराटस्वरूपी परमेश्वराचें दर्शन होईल. तें दर्शन होण्यास ही दुर्बीण आहे. स्वराज्याचा प्रश्न जिवंत व सक्रिय करावयाचा असेल तर ग्रामदेवतेच्या स्वरूपांतूनच त्या परमेश्वराचें दर्शन घेतलें पाहिजे. असें केलें तरच कार्यसिद्धि येईल. स्वराज्याचा आजपर्यंतचा आपला प्रयत्न 'आधीं कळस मग

पाया ' असा होता; पण आतां चुकी सुधारा. ग्रामसंस्थारूपी दोरी वळून तींत गांवाची जुडी बांधा. अन्यायी माणसापुढें आपल्या न्याय्य मागण्या मागण्याचा प्रसंग यावा ही खरोखर करुण काहाणी आहे; तेव्हां, दुसऱ्यापुढें तोंड वेंगाडण्याची संवय सोडा, व ग्रामसंस्थेचा प्रश्न अमोह असला तरी तो विचारांत जरूर घ्या. ग्रामसंस्था म्हणजे एक अग्निहोत्र आहे. देशभक्ति, ऐक्य, परस्परविश्वास, वगैरे पांच अग्नींची उपासना होऊन पुढें कराव्या लागणाऱ्या मोठ्या यज्ञांत आत्मबलिदान करण्याची तयारी होईल. एकदां ह्या संस्था निर्माण झाल्या म्हणजे त्यांना विचारल्याशिवाय राज्यकारभार करणें अशक्य होईल.

ह्यानंतर अध्यक्षांनीं महारपट्टीचा कांहीं भाग पंचायतींना द्यावा, भंडारा वगैरेचा खर्च पंचायतीमार्फत करून शिल्लक पंचायतीकडे राहावी व मद्रास प्रान्ताप्रमाणें जंगलाचा कारभार पंचायतीकडे द्यावा वगैरे सूचना केल्या. अशा आशयाचें अध्यक्षांचें भाषण सुमारें दीड तास झालें.

# त्रिशतसांवत्सरिक उत्सव *

४ मे १९२७ रोजीं संध्याकाळीं श्रीशिवछत्रपति यांच्या त्रिशतसांवत्सरिक उत्सवानिमित्त डॉ. भास्कर महादेव टेंबे, एल. आर. सी.पी.अँड एस्. यांच्या अध्यक्षतेखालीं यवतमाळ येथें विठ्ठलमंदिराच्या पटांगणांत श्री. बापूजी अणे यांचें अतिशय स्फूर्तिदायक व्याख्यान झालें.

## उत्सवाच्या मुळाशीं स्वातंत्र्याची भावना

श्रीशिवछत्रपतींचा ३०० वर्षांचा उत्सव करण्याची कल्पना काढतांच तिला मद्रास, बंगाल, पंजाब वगैरे सर्व प्रांतांतून आनंदानें व उत्साहानें मान्यता मिळाली; याचें कारण श्रीशिवछत्रपति हे ज्या तत्त्वाचे प्रतिनिधि आहेत त्या तत्त्वाची समस्त हिंदुस्थानवासियांच्या अंतःकरणांत जोराची प्रेरणा झाली आहे व ती प्रेरणा योग्य संधि येतांच प्रकट होऊं पाहाते हें आहे. ही स्वातंत्र्य-संपादनाची इच्छा एवढी तीव्र असल्यामुळें श्रीछत्रपति हे कोणत्या प्रांतांतले, कोणती भाषा बोलणारे व कोणत्या जातीचे होते याची इतर प्रांतांतील लोक चौकशीहि करीत नाहींत. शिकलेले लोक ही भावना बोलून दाखवितात, अशिक्षितांस ती बोलतां येत नाहीं एवढेंच; पण त्यांच्या मनोमय इच्छांत व भावनांत फरक नाही. असा एक काळ होता कीं, ज्यावेळेस अमरावतीस आम्हीं फक्त चार जणांनीं हा उत्सव साजरा केला. नाहीं म्हणावयास दोन पोलीस मात्र आमचीं भाषणें ध्यावयास हजर होते. पण न शिकलेल्या लोकांना बोलतां येत नाहीं म्हणून त्यांना स्वातंत्र्यप्रेम नाहीं, तें काय तें मूठभर सुशिक्षितांच्याच ठायीं आहे असा जर सरकार याचा अर्थ समजत असेल, तर त्यांना जनतेच्या अंतःकरणाचा ठाव अजून घेतां आला नाहीं असेंच म्हटले पाहिजे. ज्या उत्सवास चौघे हजर होते, त्यास आतां हजारों लोक जमूं लागले आहेत हें मूक जनतेचें सरकारच्या आक्षेपास उत्तरच होय! थोड्याच वर्षांपूर्वी सरकार जें नांव तोंडानें उच्चारूं देत नव्हतें त्या विभूतीचा उत्सव साजरा करण्याकरितां आपल्या कचेऱ्यांना तें स्वतः सुट्या देऊं लागलें आहे.

---

* 'लोकमत' यवतमाळ ता. १३-५-२७

## हा काळाचा अगाध महिमा

असून त्याचा प्रवाह कोणीकडे चालला आहे याचें निदर्शक आहे. छत्रपतींनीं परकीय सत्तेचा वरपगडा नष्ट केला. हे उत्सव करणारांचेंहि अंतिम ध्येय तेंच आहे याबद्दल कोणालाहि शंका नसेलच. पण याची पूर्ण जाणीव असूनहि सरकारनें या उत्सवास आपली मान्यता दिली आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. परकीयांना या देशांत परकीय या नात्यानें राहण्याचा व आपला वरचष्मा गाजविण्याचा हक्क नाहीं हें अशिक्षित जनतेच्याहि मनावर आतां पूर्णपणें बिंबलेलें आहे. हें ध्येय साध्य करण्याच्या प्रयत्नांत आजवर सुशिक्षितांनींच आपली शक्ति खर्च केली आहे. पण याकामीं अजून अशिक्षितांच्या बुद्धीचा, कल्पकतेचा, उत्साहाचा व शक्तीचा खर्च झालेला नाहीं. हा न खर्च झालेल्या शक्तीचा अफाट सांठा देशभर पसरलेला आहे व तिचा उपयोग या कामीं कसा करावयाचा हेंच चातुर्याचें काम आहे. सुशिक्षितांची बुद्धिमत्ता उपयुक्त खरी, पण त्यांच्यापैकीं कित्येकांचे जीवन परकीय सत्तेच्या आश्रयावर अवलंबून असल्यामुळें ज्या धडाडीनें स्वातंत्र्यसंपादनाचें काम करावयाचें

## त्या धडाडीचा अभाव सुशिक्षितांत

आढळला तर त्याबद्दल त्यांना दोष देण्याचें किंवा आश्चर्य मानण्याचें कांहीं कारण नाहीं. अशिक्षितांची धडाडी व सुशिक्षितांची बुद्धिमत्ता यांचा योग बरोबर जुळवून हें काम केलें पाहिजे. न शिकलेल्या अफाट जनसमूहांत संख्येनें अत्यंत बलवान् असा अस्पृश्यांचा वर्ग आहे. त्यांच्या शक्तीचा उपयोग अजून स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नांत करून घेतला गेलेला नाहीं. हा उपयोग आपणांस कसा करून घेतां येईल, याची चिंता बाळगून त्यांनाहि स्वातंत्र्यप्राप्तीचें काम आपलेंच आहे हें वाटावयास लावून कार्यप्रवृत्त केलें पाहिजे. ही आपलेपणाची भावना त्यांच्या ठिकाणीं ज्या मानानें आपण दृढ करूं, त्या मानानें त्यांचें सहाय्य या कामीं मिळेल. म्हणून तो प्रयत्न जास्त मोठ्या प्रमाणावर करणें राष्ट्रीय दृष्टया आवश्यक आहे. छत्रपतींचे जसे मावळे तसे आजचे आपले अस्पृश्य मानले गेलेले सात कोटी बांधव आहेत (टाळ्या).

त्यांचा सामाजिक उद्धार हा राष्ट्रीय उन्नतीच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे हें लक्षांत बाळगून अस्पृश्यतानिवारणाच्या कामास सर्वांनीं मनःपूर्वक सहाय्य केलें पाहिजे. कोणी म्हणतात हें कलियुग आहे, यावेळीं असेंच चालावयाचें. पण वस्तुतः

## चारहि युगें एकाच काळीं संभवतात

अशी माझी स्वतःची कल्पना आहे. एकच मनुष्य किंवा एकच राष्ट्र एका दिवशीं या चारहि अवस्था अनुभवूं शकतें. "कलिः शयानो भवति" ज्यावेळीं सुस्तपणानें व कांहीं एक न करितां पडून राहावेसें वाटतें, तेव्हां तो काळ कलियुगाचा समजावा. पण त्याच माणसास हातपाय हालविण्याची बुद्धि झाली कीं तो द्वापारयुगांत येतो. उभा राहिला कीं त्रेतायुगांत प्रवेश करतो, आणि चालूं लागला कीं कृतयुगांत जातो. अशी कल्पना केल्यास कलियुगाच्या प्रचलित कल्पनेनें पछाडलेल्या आपल्या राष्ट्रबांधवांत आत्मोद्धार करून घेण्याचें चैतन्य उत्पन्न होईल. सर्वस्वी दैववादाचा अवलंब करण्याची आत्मघातकी बुद्धि या कल्पनेनें नष्ट होईल. दैववादानें पुरुषार्थ करणाची बुद्धि कुंठित होते; पण प्रयत्न केल्यास आपण त्रेतायुगांत प्रवेश करूं शकतों; हें कळलें म्हणजे पुरुषार्थ करून आत्मोद्धार करून घेण्याच्या प्रबल व अनिवार महत्त्वाकांक्षेचा उदय झाल्याशिवाय राहात नाहीं. या देशाच्या हिताचा अनेक बाजूंनीं नाश करणारे लोक या देशांत पसरले आहेत, व

## कावळा अमर असतो असा समज

पुष्कळांच्या ठिकाणीं बद्धमूल झालेला असतो. पण तो सर्वस्वीं खरा नाहीं. मरण पावलेले कावळे मीं स्वतः पाहिलेले आहेत. थोड्या वर्षांपूर्वी भयंकर उष्णमानाचें असें एक साल होऊन गेलें कीं, त्यावेळीं असह्य तापानें हजारों कावळे पटापट मरून पडले! या आपल्या राष्ट्रीय हितावर टपलेल्या काकबुद्धीचा नाश किती लौकर करतां येईल, या संबंधानेंच सर्वांचे प्रयत्न सुरूं आहेत व त्या दिवसाचीच सारे जण वाट पाहात आहेत. मात्र ही उष्णता आपल्या अंतःकरणांतून तेवढ्या तीव्रतेनें उत्पन्न केली पाहिजे. (हिअर

हिअर.) राष्ट्रीय स्वातंत्र्यसंपादनाची एवढी प्रखर भावना सर्वांच्या ठिकाणीं उत्पन्न करणें हा असल्या उत्सवाचा मूळ उद्देश असतो व तो लक्षांत ठेवून आपण आपलें सद्यःप्राप्त कर्तव्य करीत राहिलों तर परमेश्वर आपल्या राष्ट्रीय सद्भावना सिद्धीस नेल्याशिवाय खचित राहणार नाहीं.

---

# गीतारहस्य*

ता. १७ जुलै १९२७ रोजीं टिळकसप्ताहांत श्री. बापूजी अणे ह्यांचें गीता-रहस्य ह्या विषयावर झालेलें भाषणः—

## लोकमान्यांच्या आयुष्याचें सार

वर्षाचे कांहीं दिवस लोकमान्यांच्या स्मरणांत घालविल्यानें स्फूर्ति मिळते व हल्लींच्यासारख्या दिङ्मूढ स्थितींत पुढील मार्ग दिसतो म्हणून हे सप्ताह आपण करतों. अंतःकरण आशायुक्त कशानें होईल ह्याचा विचार करणें हें प्रत्यक्ष काम करण्याइतकेंच महत्त्वाचें आहे. लोकमान्यांनीं आपल्या आयुष्याचें सार गीता-रहस्यांत ओतलेलें आहे व आयुष्यभर लोकांना मार्गदर्शक होईल असा हा ग्रंथ आहे. म्हणून प्रत्येकानें हा अगदीं जीवाला लावून ठेवला पाहिजे. एका गृहस्थानें महाराष्ट्रांतील हजार दोन हजार वाङ्मय-भक्तांना उत्तम चार ग्रंथ विचारले असतां ज्ञानेश्वरीचा दुसरा नंबर येऊन या ग्रंथाचा पहिला नंबर आला! हा लहानसहान मान नव्हे. लोकमान्यांच्या मावारीं व त्यांतहि त्यांचें राजकारण मागें पडत असतां त्यांच्या ह्या ग्रथास महाराष्ट्राकडून प्रशस्तिपत्र मिळालेलें आहे! हें त्यांतल्या त्यांत विशेष लक्षांत घेण्याजोगें आहे. राजकारणांतील लोकमान्यांच्या सगळ्यांत मोठ्या प्रति-स्पर्ध्यांनीं—हा शब्द मी चांगल्या अर्थींच येथें वापरतों—गीतेचा अर्थ ह्या ग्रंथाच्या गुजराथी भाषांतरावरूनच समजून घेतला आहे. लोकमान्यांनीं ह्या ग्रंथाला 'कर्मयोगशास्त्र' असें नांव दिलें आहे, व तें योग्य आहे. शास्त्र म्हणण्या-जोगाच हा ग्रंथ त्यांनीं लिहिला आहे. ब्रह्मलोकनिवासी आद्य शंकराचार्या-

* 'उदय' ता. १९-७-१९२७.

नतर सुमारें गेल्या दोन हजार वर्षांत अलौकिक बुद्धि चालवून व सूक्ष्म विचार करून वेदान्तांत नवीन सिद्धान्त प्रस्थापित करणारा किंवा पुनरुजीवन करणारा पुरुष लोकमान्यांशिवाय झालाच नाहीं. थोर राजकीय कामगिरीपेक्षांहि ह्या एका शास्त्राचे प्रणेते म्हणूनच लोकमान्य हिंदु सस्कृतींत अधिक राहातील असें वाटतें.

## लोकमान्यांची साक्षात् वाङ्मय मूर्ति !

'गीतारहस्य' ग्रंथ म्हणजे, प्रत्यक्ष मूर्ति गेल्यावर लोकमान्यांची मागें राहिलेली साक्षात् वाङ्मयमूर्ति आहे. आर्यसंस्कृति सबंध बुडत असतां ज्यांनीं ती वाचविली त्या सर्व जगांत अलौकिक गणलेल्या आद्य शंकराचार्यांसारख्या लोकोत्तर पुरुषाला वादी करून 'प्रतिवाद' म्हणून हा ग्रंथ लोकमान्यांनीं लिहिला आहे व संन्यासमार्गाला जबरदस्त तडाका मारला आहे. एक आपलें मत प्रथम घेऊन तें गीतेंतून काढून दाखविलें अशा गीतेवरील बाकीच्या टीका आहेत. पण गीता घेऊन तींतूनच अगदीं सरळ काय मत निघतें हें दाखविणारा हा ग्रंथ आहे. सांहिती, वारुणी व याज्ञिकी हे उपनिषदांचे तीन वर्ग, तीं कोठें सांपडतात ह्यावरून पाडलेले नसून त्यांतील तत्त्वज्ञानाच्या तऱ्हेवरून हे वर्ग पाडलेले आहेत. समष्टिदृष्टीनें जगाकडे पाहून त्यावरून म्हणजे आधिभौतिक दृष्टीनें सिद्धान्त करणाऱ्या उपनिषदांस 'सांहिती' म्हणतात. आधिदैवत पद्धतीनें विचार करणारांस 'याज्ञिकी' म्हणतात. अध्यात्मज्ञानाच्या म्हणजे ज्याला हल्लीं Psychological म्हणतां येईल अशा पद्धतीनें विचार कारणारास 'वारुणी' म्हणतात. म्हणूनच सर्वोपनिषद्सार अशा गीतेवर टीका लिहितांना गीतारहस्यांत या प्रत्येक दृष्टीनें एक एक भाग मुद्दाम लिहिण्यांत आला आहे. पाश्चात्य विचारांत जडवादी हे आधिभौतिक; सर्व 'रॅशनॅलिस्ट' व 'इन्टयुइशलिस्टस्' हे आधिदैविक; व अलीकडले सर्व 'स्पिरिच्युॲलिस्ट' व 'ऑकल्टिस्टस्' हे आध्यात्मिक पद्धतीचे होत.

## गीतेंतील दोन मुख्य सिद्धान्त

गीतारहस्यांत दोन मुख्य सिद्धान्त आहेत; एक कर्म हें शाश्वत आहे, व दुसरा कांहीं विशिष्ट तऱ्हेनें म्हणजे फलाशात्यागपूर्वक तें केलें असत

मोक्षाला तें प्रतिबंधक होत नाहीं; व ज्ञानोत्तरहि तें करावें. त्रिगुणांचें साम्य बिघडून त्यांच्यांत वैषम्य उत्पन्न होणें, ह्या खळबळीला आमच्याकडे 'आप' (पाणी) म्हटलें आहे. ह्या आपापासून सृष्ट्युत्पत्ति झाली. 'होमोजिनस्' ह्याच्यापासून 'हेटेरॉजिनस्'कडे जाणें ह्यालाच पाश्चात्य भौतिक शास्त्रांतहि 'उत्क्रांति' म्हटलें आहे. बीजाचें रोप होतें, रोपाचा वृक्ष होतो, खूप फांद्या, असंख्य पानें, फुलें व फळें त्याला येतात व अखेर त्यांत बीं उत्पन्न होतें. ह्यांत दोन गोष्टी झाल्या. एक, एकाचें अनेक झालें व दुसरी बीजापासून सर्व निघून बीं पुन: आपल्या मूळ स्वरूपाला परत आल. येथें एक उत्क्रांति पूर्ण झाली. ह्यालाच मोक्ष म्हणतात. आंबा तयार झाल्या वर फक्त त्याचा गीरच खातां येतो; कोय खातां येत नाहीं. महत्त्व धरून कर्म केल्यावर तें पुढल्या कर्माचें, फळाचें, किंवा बंधनाचें बीं-कोय-निर्माणच करतें. पण कोय तयार होण्यापूर्वींच करी खाऊन टाकली तर त्या कोयीसकट ती खाऊन टाकतां येते. ममत्वबुद्धि न धरतां कर्म केलें तर बंधनाचें बीजच निर्माण होत नाहीं. संन्यासमार्गी जें सोडा-वयाला सांगतात, तें सर्व सोडावयाला अर्जुन आयताच तयार झाला असतां त्याला गीता सांगून त्या गोष्टीपासून परावृत्त करून त्याच्याकडून युद्ध करविलें गेलें आहे हें विसरून चालणार नाहीं. अन्याय करण्यापूर्वींचें स्वकीयांचें नातें अन्याय केल्यावर विसरलें पाहिजे हा सिद्धांत गीतेंत आहे. अर्जुन त्या सर्वांचें 'नातें' पाहात होता, पण हे सर्व 'लुच्चे' आहेत हे विसरत होता; हें नुसतें भाऊबंदांच्या 'इस्टेटी' करितां भांडण असतें तर, त्यांत सबंध हिंदुस्थान कशाला पडला असता! ऋषि, प्रवर व कुल यांचा अभिमान वाढतां वाढतां एका काळीं हिंदुस्थानांत इतका वाढला होता कीं, कुला-भिमानासाठीं व कुलशुद्धीसाठीं लोक राष्ट्रालाहि तुच्छ मानण्यास तयार होते. ह्या स्थितींत अर्जुन होता. ह्याचा कोणीच विचार केला नसल्यामुळें गीता-रहस्याखेरीज गीतेच्या पहिल्या अध्यायांतील अर्जुनाच्या खऱ्या शंकांस सम-र्पक उत्तरें दुसरीकडे कोठेंहि मिळत नाहींत. भगवंतांनीं अर्जुनाला सांगितलें कीं, ह्या लोकांच्या नुसत्या बाहेरच्या शरीराकडे पाहूं नकोस; ह्यांच्या सूक्ष्म लिंग शरीराकडे पाहा, म्हणजे हे लोक खरे कसे आहेत तें तुला समजेल.

शेवटीं "नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा.....करिष्ये वचनं तव" ही पावती येईपर्यंत भगवंतांनीं अर्जुनाला उपदेश करण्याचें सोडलें नाहीं. गीतारहस्याची दुसरी गोष्ट ही कीं, गीता हा भारतांतील भाग आहे. ह्या नात्यानें तिच्या शांतिपर्वांतील ५६ व्या अध्यायापासून ९० व्या अध्यायापर्यंत भीष्मानीं युधिष्ठिरास केलेल्या उपदेशासारख्या भागांशीं मेळ घालून, हा ग्रंथ लिहिला आहे. हीच शांतिपर्वांतील भीष्मांची दंडनीति सांगितल्याबद्दल डॉ. मुंज्यांवर व्यर्थ टोका होत आहे! हल्लींचा हिंदु निराश व बेंगरूळ होऊन बसला आहे, कारण—

### त्याचा वेदान्त खोटा होऊन बसला आहे

तो जग भलत्याच अर्थानें 'मिथ्या' मानतो! अहिंसा धर्म जो एकदां बौद्ध काळीं हिंदुस्थानच्या माथीं बसला, त्यानें पराक्रमात्मक व पौरुषात्मक श्रौत धर्म मारून टाकल्यानें, फक्त गृह्यधर्माला चिकटून व संकुचित व स्वार्थी बनून आपल्या खऱ्या संस्कृतीचा विघात झाल्यामुळें हिंदु असा होऊन बसला आहे. कुमारिल भट्ट, आद्य शंकराचार्य, विद्यारण्य, हेमेंद्र ह्या परंपरेनें तेव्हां हा श्रौतधर्म पुनरुज्जीवित केला होता. त्यानंतर लोकमान्य टिळकांनीं प्रथम ह्या धर्माच्या व आपल्या खऱ्या संस्कृतीच्या पुनरुज्जीवनार्थ हा एवढा गीतारहस्य ग्रंथ लिहिला.

# राष्ट्रीय ऐक्य*

२२ जुलै १९२७ रोजीं श्री. दिनकरशास्त्री कानडे एम्. ए. यांचें यवतमाळ येथील टाऊनहॉलमध्यें 'राष्ट्रीय ऐक्य' या विषयावर व्याख्यान झाल्यावर, श्री. बापूजी अणे यानीं समारोप केला. त्याचा सारांश असा:—

हल्लीं सर्वांच्या मनांत परस्परांविषयीं साशंक वृत्ति व तेढ उत्पन्न झालेली आहे. प्रचलित सत्ता नष्ट करून स्वतःचें स्वामित्व प्रस्थापित करण्याची तीव्र मनोवृत्ति सर्वत्र उदयाला आली असली म्हणजे क्षुल्लक कारणावरून उत्पन्न होणाऱ्या भेदास फारशी जागा मिळत नाहीं. सामान्य जनतेंतील भेदाभेदांचा तिरस्कार करून समत्व स्थापन करण्याचे प्रयत्न अनेक वर्षांपासून सुरू आहेत. ब्राह्मो, आर्य, प्रार्थनासमाज हीं त्याचीं उदाहरणें आहेत. त्यांची आवश्यकता आजवर एवढी तीव्र भासली नाहीं. आज राजकीय स्थितींत अंतर पडलें आहे. आपण परकीयांचे अंकित राहिल्यास राष्ट्राचें अस्तित्व नष्ट होण्याची धास्ती पडली आहे, म्हणून आजच्या प्रयत्नांत जास्त तीव्रता येणें स्वाभाविक आहे. पण

## प्रयत्नांत सातत्य व तीव्रता

असल्याशिवाय ध्येय सिद्धीस जाणें शक्य नसतें. आपल्या प्रयत्नामुळें राज्यकर्त्यांच्या मनास धक्का बसूं नये हा विचार मनांत असल्यास आपल्या प्रयत्नास तीव्रता येणें शक्य नाहीं व याच विचारानें एकाच आंखलेल्या धोरणानें आपलें काम अव्याहतपणें चालू ठेवणें, त्यांत खंड पडूं न देणें, त्याचें सूत्र तुटूं न देणें हें त्यांतील सातत्य होय. एका विचाराचे सर्व कार्यकर्ते एका बैठकींतून बसून शांतपणें व दूरदृष्टीनें विचार करतील तर तुटलेला धागा जोडून पुनः तेथून सुरुवात करणें अशक्य नाहीं. पक्षापक्षाचें पार्थक्य कायम ठेवूनहि संघटितपणें सर्वांनीं एकच कार्य करणें शक्य आहे. शास्त्रीबुवा म्हणतात त्याप्रमाणें आपसांत हक्क वाटून घेण्याच्या पायावर केवढेहि तहनामे

*'लोकमत' यवतमाळ ता. २९–७–२७.

केले तरी त्या चिटोऱ्यांनीं तहनामे होणें शक्य नाहीं. भौगोलिक मर्यादेचा अभिमान व स्वत्वाची पूर्ण जाणीव मनांत ठेवून स्वराज्यसंपादनार्थ जे त्यागपुरस्सर प्रयत्न करतील, तेच राष्ट्रीय ऐक्याचे जनक होतील. स्वराज्यांत आपलें वजन नसलें तर आम्हांला मुळीं स्वराज्यच नको! आम्ही ज्यांत अग्रेसर राहूं असें स्वराज्य असलें तरच तें पाहिजे ही मनोवृत्ति राष्ट्रीयत्वास पोषक नाहीं. पारतंत्र्याची चीड मनांत नसून नुसते हक्क उपभोगण्याची अनावर इच्छा ज्यांना आहे, त्यांच्या ठिकाणीं राष्ट्रीयत्व बिंबलेलें नसतें. हक्क आपल्या वाट्यास यवोत वा न येवोत, ते स्वकीयांस मिळाले पाहिजेत अशी जी मनोवृत्ति

## तीच खरी राष्ट्रीय मनोवृत्ति होय.

असली मनोवृत्ति जनतेंत बिंबविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ती बिंबविण्याचें उत्तम स्थळ म्हणजे ग्रामपंचायती होत. तहनाम्यांनीं कृत्रिम ऐक्य उत्पन्न करण्याचे केवढेहि प्रयत्न केले, तरी राज्यकर्त्यांनीं एखादा नवा डाव टाकताच ते तहनामे मोडले जातात व याचा अनुभव लखनौच्या कराराच्या बाबतींत आलेलाच आहे. स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय गत्यंतर नाहीं हा एकच विचार सर्व जनतेच्या मनावर तीव्रतेनें बिंबविण्याचा शिस्तशीर, संघटित आणि विस्तृत प्रमाणावर प्रयत्न केला तरच राष्ट्रीय ऐक्य उत्पन्न होऊं शकेल.

# बालविवाह प्रतिबंधाचा कायदा*

[ सिमल्याच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या बैठकींत १५ सप्टेंबर १९२७ रोजीं रायसाहेब हरबिलास सारडा यांनीं बालविवाह–प्रतिबंधाचें बिल पुढें मांडलें. लग्नांत मुलीचें वय १२ वर्षांपेक्षां कमी नसावें व मुलाचें वय १६ च्या खालीं नसावें; याखालीं मुलामुलींचें वय असून त्यांचें लग्न झालें तर तें गैरकायदा समजून रद्द व्हावें व त्यांना वंशपरंपरा मिळणारी इस्टेट व हक्क मिळूं नयेत अशा स्वरूपाचें हें बिल होतें. यावर श्री. बापूजी अणे यांनीं धर्मशास्त्र व व्यवहार यांस धरून भाषण केलें. या भाषणाचें भाषांतर पुढें दिलें आहे.]

माझे मित्र लाला लजपतराय आणि बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या मतांशीं न जुळणारे विचार या सभेपुढें मांडण्याचें कटु कर्तव्य मला दुःखानें करणें भाग आहे ! बालविवाहाची पद्धत अनिष्ट असून तिनें हिंदुसमाज पोखरून खाल्ला आहे. या बाबतींत या बिलाचे पुरस्कर्ते रा. सा. सारडा यांच्याशीं माझें एकमतच आहे. मी जो मुद्दा उपस्थित करीत आहें तो धार्मिक स्वरूपाचा नव्हे व त्याच्या धार्मिक बाबीचा विशेष विचार करण्याचा माझा आज मानसहि नाहीं. ज्या लोकांचे हितसंबंध आपण रक्षण करीत आहोंत, त्यांच्या हितावर या बिलाचा काय परिणाम होईल याचा व्यावहारिक दृष्ट्या आपण विचार करावा, असें माझें या सभेस सांगणें आहे. तसें पाहिल्यास हें बिल मला निःसंशयपणें व सर्वतोपरी अनिष्ट दिसतें ! कांहीं विशिष्ट वयोमर्यादेखालीं

## झालेले विवाह गैरकायदा ठरविणें

हा या बिलाचा उद्देश आहे ! याचा अर्थ लक्षांत घ्या ! लग्न कशाला म्हणतात ? कांहीं विशिष्ट धर्मसंस्कार केले म्हणजे त्या दंपत्यास पतिपत्नीत्वाचे अधिकार प्राप्त होतात, अशी आहे वस्तुस्थिति. पण जर एखादा कायदा करून आपण धार्मिक संस्कारांमुळें प्राप्त होणारे अधिकार हिरावून घेऊं लागलों, तर लोकांच्या धार्मिक समजुती व चालीरीति यांमध्यें हरकत

* 'लोकमत' यवतमाळ ता. ७–१०–२७

घेतल्यासारखें होणार नाहीं काय ? ज्या धार्मिक विधींनीं पतिपत्नीत्वाचे हक्क प्राप्त होतात, त्या शास्त्रीय संस्कारास धार्मिकदृष्ट्या कांहीं एक किंमत नाहीं असें आपण लोकांना सांगणार कीं काय ? येथें बसलेले सभासद आपण असे आहांत काय कीं, ज्यांना धर्मशास्त्र कळतें असें मानून लोकांनीं तुमचा शब्द प्रमाण मानावा ! कोणी येथलें एक वाक्य, तर कोणी तेथला एक श्लोक आपल्या भाषणांत उद्धृत केला आहे. पण लग्नाच्या वेळीं वय काय असावें हा माझा वादाचा मुद्दा नव्हे. तो मुद्दाच अलग आहे. पण कांहीं विशिष्ट धर्मसंस्कार होऊन गेल्यानंतर ज्यांना पतित्वाचे व पत्नीत्वाचे हक्क प्राप्त झालेले असतात, त्यांचा तो दर्जा काढून टाकणारा असा जर कायदा आपण कराल तर ज्यांना आम्ही पूज्य धार्मिक विश्वासाची बाब समजतों, त्यावर आपण प्रहार करीत आहांत असेंच म्हटलें पाहिजे ! पण तो प्रश्न अजीबात बाजूस ठेविला तरी ज्यांना श्रुतिस्मृति-वाचनाचा गंधहि नाहीं, परकीय भाषांतील भाषांतरित ग्रंथांच्या मधून मधून वाचनानेंच ज्यांना त्या ग्रंथांचें तुटक ज्ञान प्राप्त झालेलें आहे, अशा योग्यतेच्या विद्वानांपासून

## श्रुतिस्मृतींचे सिद्धांत ऐकून घेणारा

मी नव्हे ! ज्यांनीं ते ग्रंथ मुळांतून वाचले असतील त्यांनाच त्याचें रहस्य कळेल. माझे मित्र जयकर यांनीं मोठ्या वक्तृत्वपूर्ण भाषेत कांहीं मुद्यांवर जोर दिला खरा; तरी त्यांच्याशीं वादाचे दोन हात करण्याची माझी तयारी आहे. माझें म्हणणें असें आहे कीं, नवरा–बायकोचा दर्जा समाजांत प्राप्त करून घेण्याचें साधन जर कोणतें असेल, तर शास्त्रानें घालून दिलेले कांहीं विशिष्ट संस्कार करणें हेंच होय. त्या संस्कारांचा एकच अर्थ आहे. विवाह कोणत्या वयानंतर करावे हा प्रश्न अजीबात वेगळा आहे. पण एकदां कां शास्त्रोक्त संस्कार होऊन गेले कीं, मग अमुक एका विशिष्ट मर्यादेच्या खालीं ज्यांनीं विवाह केले, त्यांना यद्यपि आपण दंड ठेविला तरी त्या संस्कारांनीं ह्या स्त्रीपुरुषांस प्राप्त झालेला पतिपत्नीत्वाचा दर्जा तुम्हांस हिरावून घेतां येणार नाहीं; आणि असें करूं पाहाल तर हजारों वर्षांपासून पवित्र मानले

गेलेल्या धार्मिक संस्कारांत तुम्हीं ढवळाढवळ केली असेंच निष्पन्न होईल. हा कायदा पास केल्यास त्याचे व्यावहारिक परिणाम काय होतील ते पाहा. कल्पना करा कीं, तुमच्या विशिष्ट वयोमर्यादेखालीं एखाद्या मुलीचें लग्न केलें; तर या कायद्यान्वयें तें अर्थातच गैरकायदा ठरणार. पण मग असल्या मुलीचा सामाजिक दर्जा कोणता ! कायदा म्हणणार कीं ही बाई अविवाहित आहे ! पण कायद्यानें असें म्हटलें म्हणून बहुजनसमाज तिला कुमारी समजून तिचें पाणिग्रहण करावयास तयार राहील अशी कल्पना आहे काय ? दुर्दैवानें देशांत बालविधवांची संख्या फार मोठी आहे. त्यांच्या दुःस्थितीबद्दल सर्वांसच खेद वाटतो, म्हणून त्या दुःखाच्या निवारणार्थ हें बिल अवश्य आहे असें सांगण्यांत येतें; पण जावत्कालपर्यंत तुमचीं गैरकायदा लग्नें खरोखरच बे-कायदा आहेत असें समाज मानावयास तयार होत नाहीं, तोंपर्यंत असला कायदा करणें भयावह आहे. या कायद्याचा एक परिणाम असा होणें संभवनीय आहे कीं, आज अशा कांहीं स्त्रिया त्यांचे पती मृत्यु पावल्यामुळें विधवा झालेल्या आहेत, तशा तुमच्या या कायद्यामुळें त्यांचे विवाह रद्द ठरून

**पति विद्यमान असलेल्या विधवांचा वर्ग**

निर्माण होईल ! लग्न झालेले कित्येक पुरुष विधुर ठरतील ! व विवाहित स्त्रिया कुमारिका म्हणाव्या लागतील ! ! ! कित्येक जातींतील लोक हें मानणार नाहींत आणि मग असल्या स्त्रीपुरुषांची नैतिकदृष्ट्या किंवा कायद्याच्या दृष्टीनें स्थिति कोणती म्हणावयाची ? म्हणून असला कायदा करण्यापेक्षां प्रथम या प्रश्नावर लोकमत काय आहे तें अजमावणें श्रेयस्कर नव्हे काय ? माझ्या मतें असल्या अनिष्ट परिणामांची होममेंबरास पूर्ण कल्पना आहे व म्हणूनच त्यांनीं हें बिल लोकमताकरितां प्रसिद्ध करण्याचा आग्रह धरिला. एखाद्या कायद्यान्वयें सामाजिक सुधारणेच्या चक्रास मोठी गति मिळते एवढ्या सबबीवरच वाटेल तो कायदा चटकन् मंजूर करण्याचा सरकारवर आग्रह धरणें हें समाजाच्या हिताच्या दृष्टीनें युक्त नाहीं. माझे सन्माननीय नेते लालाजी यांचें हेंच धोरण दिसतें. सरकारी सभासद व

कांहीं लोकनियुक्त सभासद यांनीं या बाबतींत जरा जपून चालण्याचा जो सल्ला दिला, तो लालाजींस खपत नसल्याचें त्यांच्या भाषणावरून दिसतें. पण माझें आग्रहाचें हेंच सांगणें आहे कीं, असल्या महत्त्वाच्या प्रश्नावर एवढी घिसाडघाई उपयोगाची नाहीं. कर्णविवरांत सामाजिक सुधारणेचें गान सुरू आहे व त्याच्या गायनाचे मंजुळ आलाप या कायद्याच्या शब्दांत ऐकूं येतात, एवढ्यावरच असला कायदा मंजूर करणें इष्ट नाहीं. जनसमूहाचें मत काय आहे तें समजून घेण्याएवढाहि धीर लालाजींना धरवत नाहीं! म्हणून हें बिल सिलेक्ट कमिटीकडे सोंपविण्याच्या सूचनेस विरोध करून मी ना. मि. क्रेरर यांच्या उपसूचनेस पुष्टि देतों.

---

# वऱ्हाड जमीनमहसुलाचा कायदा *

वऱ्हाड जमीनमहसुलाच्या कायद्यांत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें कोणत्या सुधारणा करणें आवश्यक आहे यासंबंधानें लोकजागृति करण्याकरितां लो. ना. बापूजी अणे यानीं ५ नोव्हेंबर १९२७ पासून १६ नोव्हेंबरपर्यंत वऱ्हाडच्या चारहि जिल्ह्यांतून दौरा काढला होता. तो संपवून परत आल्यानंतर १६ नोव्हेंबर रोजीं संध्याकाळीं शिवराम थिएटरमध्यें श्री. भीमराव हणमंत ऊर्फ अण्णासाहेब जतकर यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या जाहीर सभेंत त्यानीं व्याख्यान दिलें, तें येणेंप्रमाणें:—

## जमिनीवर शेतकऱ्यांचें स्वामित्व

प्रत्येक सरकारला निश्चित उत्पन्नाच्या अशा कांहीं बाबी पाहिजेच असतात, त्यांपैकीं जमिनीचा महसूल ही एक बाब आहे. शेतीची जमीन हें हल्लींचें सरकार आपल्या मालकीचें मुख्य भांडवल समजत आहे. म्हणून शेतावर सरकारचें स्वामित्व आहे असें गृहीत धरून त्या भांडवलावर योग्य तें व्याज कराच्या स्वरूपानें वसूल करण्याचा अधिकार स्वतःकडे ठेवूं पाहात

*'लोकमत' यवतमाळ ता. १८–११–२७

आहे. उलट पक्षीं शेती हाच जीवनाचा आधार,तो नसल्यास आपली उपासमार होणार, म्हणून तिजवरील स्वामित्वाचा वेदकाळापासून चाललेला व राज्यसंस्थेनें मान्य केलेला हक्क जपून ठेवणें, हें शेतकरी वर्गाचें अवश्य कर्तव्यच होय. सरकार म्हणतें कीं, जमीन आमच्या मालकीची आहे; तें आमचें भांडवल तुम्ही वापरतां, म्हणून त्यावर आमचें व्याज द्या. शेतकऱ्याचें म्हणणें कीं, जमिनीवर राजाचें स्वामित्व केव्हांच नव्हतें, स्वामित्व अनादिकालापासून आमचेंच आहे. जमीन हें आम्हां शेतकऱ्यांचें भांडवल आहे. पण त्याचा योग्य तऱ्हेनें सांभाळ करण्याची व्यवस्था सरकार करतें, म्हणून आम्ही त्या भांडवलावरील निव्वळ उत्पन्नाचा योग्य प्रमाणांत ठरविलेला अंश द्यावयास सिद्ध आहोंत. असा हा जमिनीवरील मालकीचा झगडा आहे.

## भूपति म्हणजे भूमीचा स्वामी नव्हे,

पूर्वी Occupant या शब्दाचा अर्थ शेती वाहाणारा व ज्याचें स्वामित्व जमिनीवर आहे तो, असा मानण्यांत आला होता. पण त्यांतून 'स्वामित्व' हा शब्द सरकारनें युक्तीनें काढून टाकला आहे. म्हणजे या शब्दास इंग्रजींत कांहीं अर्थ नाहीं. हिंदुस्थानांत आल्यावर लोभीपणानें इंग्रज अधिकारी बरेच इंग्रजी शब्दांचे अर्थ विसरत असावेत ! पण हा शुष्क कोटिक्रम आहे. हिंदुस्थानांत शेतकऱ्यांची जमिनीवर मालकी केव्हांच नव्हती असें सरकारतर्फे सांगण्यांत येतें, पण यास कोठेंच आधार नाहीं. राजा हा जमिनीचा मालक असें कोठेंच सांगण्यांत आलेलें नाहीं. जमिनीवरील उत्पन्नाचा विशिष्ट अंश त्याला द्यावा लागतो हें खरें; पण तो द्यावयाचा म्हणून जर राजा जमिनीचा मालक ठरेल, तर त्याच न्यायानें इनकमटॅक्स सरकारला द्यावा लागतो म्हणून व्यापाऱ्यांच्या वरच्या भांडवलावर सरकारचें स्वामित्व चटकन् जाऊन बसेल ! 'भूप', 'भूपति' या शब्दांवरून राजास भूमीचा मालक ठरविलें, तर 'नृप' म्हटल्यानें राजा हा सर्व लोकांचा मालक व सारे लोक त्याचे गुलाम ठरतील ! एवढेंच नव्हे तर गुराखी यांस 'गोप' हा शब्द असल्यानें तो गुराखीच गाईचा मालक ठरेल ! व चारा-

वयाकरितां जंगलांत नेलेल्या गाई त्यानें परत आणल्यावर त्याची ती आपणांस देणगीच समजावी लागेल.

## कर्षण करणाराचें भूमीवर स्वामित्व

व्यवहार पाहाल तर असें दिसेल कीं, पूर्वींच्याहि राजांच्या खास मालकीच्या अशा खाजगी जमिनी असत. राज्यांतील शेतकी ही त्यांची खाजगी मालमत्ता कधींच समजण्यांत आलेली नाहीं. राजाचें राज्य गेलें तरी त्याच्या खाजगी जमिनीवरील त्याचें स्वामित्व नष्ट होत नसे. अशा जमिनीस 'सरफ-ई-खास' अशी संज्ञा होती. हल्लीं शेतीच्या जमिनीच्या व्याख्या 'नांगराचा फाळ खोल जाईल' एवढी संकुचित केली जाते! उद्देश असा कीं, त्याखालीं खाण सांपडल्यास तिजवर सरकारचें स्वामित्व सांगून, त्या खाणींतील संपत्तीचा उपभोग परकीय व्यापाऱ्यांस देतां यावा. पण पूर्वीच्या राज्यांत जमिनीच्या देवघेवीचे व्यवहार होत तेव्हां 'जलतृणकाष्ठपाषाणासह' अशी जमिनीच्या स्वामित्वाची व्याख्या असे व ती तत्कालीन राज्यसंस्थेकडून मान्य करण्यांत आलेली असे. ब्राह्मण ग्रंथांमधून अशी एक कथा आहे कीं, विश्वकर्मभिवन नांवाच्या राजानें दिग्विजय करून परत आल्यानंतर, कश्यप ऋषीला घेऊन मी समुद्रांत बुडी मारीन असें म्हटलें. ही कथा अलंकारिक आहे व तिचा अर्थ एवढाच कीं, त्यावेळच्या प्रजाजनांनीं भूमिदान करूं इच्छिणाऱ्या राजाशीं झगडा करून त्यास भंडावून सोडून त्याचें भूमिदान अशक्य केलें असलें पाहिजे. असो. वस्तुतः जमिनीवर मालकी त्याचीच कीं, जे तिचें कर्षण करितात. ब्राह्मणाचें भांडवल त्याच्या बुद्धिमत्तेचें, क्षत्रियाचें भांडवल त्याच्या पराक्रमाचें, वैश्याचें त्याच्या व्यापाराचें, तद्वत् कृषिकर्म करणाराचें भांडवल म्हणजे त्याची जमीन होय व तिजवर त्याची जन्मसिद्ध मालकी आहे. इतर बलुतेदार आपलें बलुतें मागतात तसें पाहिजे तर

## मोठ्यांत मोठा बलुतेदार सरकार

असल्यामुळें त्यानें आपलें बलुतें घ्यावें; पण यापुढें जाऊन ते जमिनीवर मालकी हक्क सांगू पाहील, तर तें कसें समर्थनीय ठरेल! सरकारनें आपलें स्वामित्व एकदां प्रस्थापित केलें म्हणजे तें आपल्या मालकीच्या भांडवलावर वाटेल तें

व्याज मागूं शकेल ! अर्थात् जमिनीवर केवढा कर लादावा याची सर्व सत्ता तें आपणांकडेच ठेवणार; त्या संबंधांत एक शब्दहि बोलण्याचा अधिकार शेतकऱ्यास उरणार नाहीं. उद्यां जर शेतकीचें खातें लोकांकडे सोंपविण्यांत आलें तर सरकार म्हणणार कीं, कर बसविण्याचा अधिकार आम्हीं राखून ठेवलेला आहे, तुम्ही फक्त तें आमचे कर वसूल करून देण्याचा जिम्मा अगर 'स्वातंत्र्य' घ्यावें ! आज सर्वत्र स्वयंनिर्णयाची भाषा सुरू असतां, सरकार शेतकरी वर्गाच्या स्वयंनिर्णयावर अशा प्रकारें घाला घालीत आहे ! म्हणून जमिनीवरील स्वामित्व सरकारचें कीं शेतकऱ्यांचें हा नुसता शब्दच्छलाचा व उपेक्षणीय विचार नसून, शेतकऱ्याच्या हिताच्या दृष्टीनें केवढा महत्त्वाचा आहे हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल.

## सरकारचें वर्धनशील भांडवल

सरकार हें जमिनीस आपलें भांडवल समजतें; एवढेंच नव्हे त्यांच्या मतें तें वर्धनशील आहे. दर तीस वर्षांनीं त्याची शेंकडा ३३ तरी वाढ झालीच पाहिजे. ही वाढ लोकांच्या डोळ्यांत भरूं नये म्हणून त्यावर काळाचा लांबलचक पडदा टाकण्यांत येतो. या शेतसाऱ्याच्या वाढीबरोबर सरकार आपल्या इतर खात्यांच्या उत्पन्नाचीहि वाढ अनायासेंच करतें; कारण इतर बरेच कर शेतकऱ्यांवर अवलंबून असतात. सरकार आपल्या राज्यकारभाराचा खर्च वाढत्या प्रमाणांत ठेवीत आहे तोंवर तें हा कर एकसारखा वाढवीत जाणार हें उघड आहे. पण ही वाढ तेव्हांच रास्त व समर्थनीय होईल कीं, जेव्हां शेतींतील उत्पन्नाचें प्रमाण वाढतें राहील. पण जरी शेतकऱ्याला एका खंडीस पूर्वीपेक्षां दुप्पट तिप्पट रुपये मिळत असले, तरी त्याचा खर्चहि दुपटी तिपटीनें वाढलेला आहे. मग वाढलेला सारा तो कशाच्या माथीं देणार? दर एकरीं उत्पन्नाचें प्रमाण एका खंडीच्या ऐवजीं दोन खंडी झालें तरच या धंद्यांत किफायत आहे असें म्हणतां येईल. तोंवर म्हणतां येणार नाहीं. शेतीच्या बेसुमार वाढलेल्या किंमती व शेतीचे मक्ते यांजवरून साराआकारणी वाढविणें अर्थशास्त्रास सोडून आहे. इतर धंद्यांतून प्राप्तीचा कर आकारण्यांत येतो तो त्या धंद्यांत निव्वळ नफा किती उरतो यावर अवलंबून असतो व

तेंच तत्त्व शेतीच्या बाबतींत अनुसरलें पाहिजे. पण वऱ्हाडांत प्रथम शेतसाऱ्याची आकारणी केली तेव्हां ही दृष्टि नव्हती व आतां तर नाहींच नाहीं! इंग्रजांच्या पूर्वींच्या आमदानींत प्रजाजन शेतीच्या कराने केवढे गांजले होते याचीं वर्णनें इंग्रजांनीं केलीं आहेत; पण तोच सारा इंग्रजांनीं जमिनीवर बसविला आणि तोच जुलमी कर त्यांनीं वाढत्या प्रमाणावर बसविण्याचें धोरण अवलंबिलें आहे.

## शेतसारा निवळ उत्पन्नावर असावा

शेतसारा हा जमिनीचें निव्वळ उत्पन्न पाहून त्यावर आकारिला पाहिजे. जमिनीच्या किंमती, मक्त्याच्या रकमा किंवा गहाणांचे आंकडे घेऊन सारा वाढ करणें अन्यायाचें आहे.सरकारी व्यवस्था आहे म्हणून unearned increment बसविण्याचा अधिकार सरकार गाजवितें,तर त्यांत शेतकऱ्यांच्या उद्योगास कांहींच किंमत नाहीं काय! ही मेहनतहि हिशेबांत घेतली पाहिजे. जमिनींत गुंतलेल्या भांडवलावरील व्याज, शेतीचा खर्च, तिजवर राबणाऱ्या मालकाच्या देखरेखीचा खर्च, बैल, कोठा वगैरे बाबतींत वरचेवर करावा लागणारा खर्च हे सर्व सरकारी खात्यांतील हिशेबांप्रमाणें योग्य प्रमाणांत आकारून त्याची कुलउत्पन्नांतून वजावट केल्यावर राहील तेंच निव्वळ उत्पन्न समजलें पाहिजे. अशा रीतीनें काढलेल्या निव्वळ उत्पन्नाचा निम्मा हिस्साहि देण्यास शेतकरी तयार होईल. कोणत्याहि धंद्यावरील कर अशा रीतीनें आकारला तरच तो धंदा चालेल. पण शेतसाऱ्याच्या बाबतींत सरकारला असला कांहींएक हिशेब पाहावयास नको! मग बिचारा शेतकरी ऋणमुक्त होण्याची आशा कोठून! त्या धंद्यांतील कर्ज त्या धंद्यांतून फेडण्याची व्यवस्था होईल तरच तो चालेल, एरव्हीं तो कसा चालेल! पण एवढा बारीक हिशेब पुढें मांडला म्हणजे सरकार म्हणतें, तुमचें म्हणणें अव्यवहार्य आहे! न कर्त्याचा वार शनवार म्हणतात तो असा.

वऱ्हाडचे प्रतिनिधी शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें विचार करतील व कोणाच्याहि भिडस बळी पडणार नाहींत अशी आशा आहे.

---

# येतें सायमन कमिशन*

श्री. बापूजी अणे यांचें 'येतें, सायमन कमिशन' या विषयावर हेमंतव्याख्यानमालेंतील १८ वें व्याख्यान गुरुवार ता. ८-१२-१९२७ रोजीं झालें. ते म्हणाले:—

आतां ग्रहणाचे वेध लागलेले आहेत व थोडयाच वेळांत ग्रहण लागेल. तें लागण्यापूर्वीच आपलें भाषण आटोपीन, आपणांला ग्रहण लागूं देणार नाहीं ( हंशा ). दुसरेंहि ग्रहण लौकरच लागणार असून त्याचे वेधहि एव्हांपासून लागले आहेत. सायमन कमिशनचें ग्रहण लवकरच आपल्या देशाला लागूं पाहात आहे. तसें तें आपण लागूं देणार नाहीं असा मला भरवंसा आहे. चालू डिसेंबर महिन्यांत सर्व पक्षांचीं वार्षिक संमेलनें होऊन, त्यांत प्रचलित विषयांबद्दल मतें प्रदर्शित केलीं जातात. अशा वेळीं आपण आपले विचार लोकांपुढें मांडून, व त्यांचीं मतें समजाऊन घेऊन, वरील वार्षिक सभांना जावें हें योग्य आहे; व म्हणूनच मीं आज हा विषय घेतला आहे.

## कमिशन आज कां नेमिलें ?

हिंदुस्थानांत ही नवी राज्यघटना अमलांत येऊन ७-८ वर्षे झालीं, तेव्हांपासून १९२५ पर्यंत आम्ही सुधारणांच्या पुढील हप्त्यासंबंधीं तीन चार वेळां आपलें म्हणणें असेंब्लींतून मांडिलें. पण तिकडे सरकारनें त्या वेळीं लक्ष दिलें नाहीं. त्या वेळीं सरकारला कमिशन नेमितां आलें असतें, पण तेव्हां तें न नेमितां इलींच्या हुजूर सरकारनें आतां नेमिलें आहे. याचीं कारणें दोन तीन संभवतात. इंग्लंडांतील हुजूर, प्रागतिक व मजूर हे पक्ष एकाच माळेचे मणी आहेत. मजूरपक्षाचा हिंदुस्थानच्या पुढारलेल्या (जहाल) चळवळीशीं संबंध अधिक येतो ही गोष्ट खरी. परंतु हा पक्ष हिंदुस्थानचा मोठा दोस्त व तो हिंदुस्थानला कांहीं विशेष देईल या मताचा मी नाहीं. परंतु हुजूर पक्षापेक्षां या पक्षाचें राजकारण हिंदुस्थानच्या

---

* 'महाराष्ट्र' नागपूर ११-१२-२७

बाबतींत अधिक उदार राहील अशी भीति हुजूरपक्षाला वाटते. आतां लवकरच आपल्या हातची सत्ता जाऊन हा मजूरपक्ष प्रबळ होईल अशीहि या हुजूरपक्षाला भीति वाटते. तेव्हां आपल्या हातांतील सत्ता जाण्यापूर्वीच हिंदुस्थानाबाबतचें पुढील दहा वर्षांचें धोरण तरी आपणच आखावें, निदान त्याची रूपरेषा तरी आपण नक्की ठरवावी, म्हणून हुजूर-पक्षानें यावेळीं हें कमिशन नेमिलें आहे.

## हुजूरपक्षाच्या मजूरपक्षास पायबंद

हुजूरपक्षानें मजूरपक्षाला हा पायबंद घातला आहे. मजूरपक्षाचे दोन सभा-सद कमिशनवर नेमून त्या पक्षाला आपल्या धोरणाला बांधून घ्यावें हा डाव यांत आहे. प्रागतिक पक्षाची हुजूरपक्षाला भीति वाटत नाहीं. हिंदु-स्थानांतल्या प्रमाणेंच तेथेंहि तो पक्ष मृतप्रायच आहे. तो पक्ष अजिबात निःशेष होऊं नये, त्याची आठवण कायम राहावी म्हणून पार्लमेंटच्या अजब-घरांत इंग्रज लोक हे नेमून ठेवीत असतात ( हंशा ). असो. हुजूर पक्षाचें वैशिष्ट्य असें आहे कीं, त्याचा नेहमीं प्रगतीस विरोध असतो व त्याला अनुसरूनच त्यांनीं ही तरतूद केलेली आहे. तो पक्ष इकडील नोकरशाहीशीं एकजीव झालेला आहे. लोकांना हवें होतें तेव्हां कमिशन नेमलें नाहीं व आज तुम्ही हें कमिशन नेमा, असा कोणी त्यांच्याजवळ हट्टहि घेतला नाहीं. सुधारणा कायद्यान्वयें हें कमिशन नेमण्याला त्यांना अजून दोन तीन वर्षांचा अवधि होता, परंतु आतां एक दीड वर्षांतच आपलें मरण आहे, आपल्या हातची सत्ता जाईल, या भीतीनें हुजूरपक्षानें वरील उद्देश मनांत धरून हें कमिशन नेमिलें आहे. त्यांनीं मरतां मरतां हिंदुस्थानावर झाडलेली ही लाथ आहे.

## कमिशनवर बहिष्कार घालण्यांत एकवाक्यता

हिंदुस्थानांतील सर्व पक्षांची या कमिशनवर बहिष्कार घालण्याच्या बाब-तींत एकवाक्यता आहे. प्रत्येकाच्या बहिष्काराला कारणें निराळीं आहेत हें खरें; पण बहिष्कार सर्वांनाच हवा आहे. कमिशनवर एकहि हिंदी मनुष्य मेलेला नाहीं, याबद्दल बर्कनहेड साहेबांनीं जो खुलासा, जें समर्थन केलें,

आहे तें पाहून प्रत्येक हिंदी मनुष्याला संताप आल्याशिवाय राहात नाहीं. त्यांनीं यावेळीं आमच्या गृहकलहाचा फायदा घेतला आहे. आमच्यांत हिताहिताची दृष्टि नाहीं, एवढी आमची अधोगति झाली आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. आणि हेंच सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं एका कुलटेला हाताशीं धरून हिंदुस्थानची बदनामी जगांत करविली आहे. मनुष्यांचा एकमेकांशीं विरोध राहूं शकतो व तो संभावितपणें प्रकट करितां येतो. परंतु जेव्हां हा विरोध प्रकट करण्यासाठीं, एखादा मनुष्य आपल्या प्रतिस्पर्ध्यामागें गांवांतील टारगट पोरें लावतो, तेव्हां तो अत्यंत दीर्घद्वेषी आहे, त्याला व्यक्तिद्वेषच वाटतो असें स्पष्ट समजावें ( हंशा ).

## बर्कनहेड खोटें बोलतो

आमच्यांत लायक माणसेंच नाहींत असें जें बर्कनहेड बोलले,तें सपशेल खोटें. चारपांचच महिन्यांपूर्वीं जेव्हां दक्षिण आफ्रिकेंत अखिल हिंदुस्थानच्या वतीनें एक हिंदी प्रतिनिधि नेमण्याचा प्रसंग आला, तेव्हां सबंध हिंदुस्थाननें एक-मुखानें आपला एकच प्रतिनिधि सुचविला व तो सरकारनें नेमिला कीं नाहीं? त्या नेमणुकीशीं बर्कनहेड यांचा संबंध नव्हता काय ? एरव्हीं जेव्हां त्यांना हिंदी माणसें नेमावयाचीं असतात, तेव्हां लायक हिंदी माणसें मिळतातच कीं नाहीं? कीं तीं माणसें नालायक असूनहि सरकार नेमितें व त्यांनीं केलेला अन्याय त्यांना चालतो ? हिंदुस्थानांत या कमिशनची घोषणा होतांच सर्व पक्षांच्या हिंदी लोकांनीं त्यावर बहिष्कार पुकारला; तेव्हां हे कायदेपंडित असें म्हणाले कीं, आम्ही कमिशनवर हीं माणसें कां नेमिलीं हें ऐकून घेई-पर्यंत मत प्रदर्शित करूं नका. पण हे बृहस्पति काय बोलणार हें आम्हांला माहीतच होतें. त्यांनीं या खुलाशांत हिंदुस्थानविषयीं अपशब्द वापरून आपल्या कृतीचें कटु शब्दांनीं समर्थन केलें आहे. ते म्हणाले " मला हिंदी गृहस्थ भेटले त्यांना मीं विचारिलें, ' आम्हीं आमचे आय. सी. एस्. काढून घेतले, आमचें गोरें सैन्य आम्ही काढून घेतलें तर तें तुम्हांला चालेल काय? मग तुमचें कसें होईल! यावर तुम्ही हें करा, असें म्हणणारा एकहि गृहस्थ मला सापडला नाहीं. "

३० ले.

## हिंदुस्थान हातचा गेला तर ?

'नाहीं' 'तुम्ही जाऊं नका' असें म्हणणारे हे सखीचे लाल त्यांना कोण भेटले कोण जाणें ? ( हंशा ). मी त्यांना म्हणतों, तुम्ही आतां आपलें चंबूगवाळें उचला व हिंदुस्थानांतून चालते व्हा. आणि हिंदुस्थानशीं काडी-इतकाहि संबंध न ठेवितां सात दिवस तर जगून दाखवा. हिंदुस्थानांतून तुमचें राज्य गेलें तर आपलें काय होईल हाच प्रश्न त्यांना अधिक महत्त्वाचा आहे. मी असें सांगतों कीं, हिंदुस्थान जर इंग्लंडच्या हातचा गेला तर सात दिवसांत इंग्लंड मरेल. सारांश, आमची काळजी वाहण्याचें इंग्लंडला कारण नाहीं. येऊनजाऊन हे गेले तर दुसरा एखादा बोकांडी बसेल एवढीच भीति. पण आज काय मोठ्या प्रतिष्ठेनें आपण जगूं शकतों ? हल्लींहून आणखी वाईट स्थिति ती काय येणार! गेल्या सात वर्षांत इंग्लंड आपल्या बेकारीचा प्रश्न अजून सोडवूं शकलें नाहीं. व हिंदुस्थान आजच हातचा गेला तर इंग्लंड सात दिवस तरी जगेल कीं नाहीं याची वानवाच आहे. हिंदुस्थानांतून व इतर ठिकाणांहून इंग्लंडनें कांहींहि धनधान्य न नेलें तर खायला कोळसा व पिण्याला क्षारोदक अशी इंग्लंडची स्थिति होईल. अशा परिस्थितींत आम्हीं गेलों तर तुमचें कसें होईल असें म्हणणें हा शुद्ध बेशरमपणा आहे.

## या गाढवांच्या मताला काय किंमत !

आतां आपण बर्कनहेड साहेबांचा दुसरा मुद्दा घेऊं ! आम्ही कमिशनर नेमिले जाण्यास नालायक कां? तर आमचीं स्वराज्यासंबंधीं मतें पूर्वींच बनलीं आहेत म्हणून ! आणि पार्लमेंटच्या या सप्तऋषींचीं मतें काय अगदीं कोरीं करकरीत, स्फटिकाप्रमाणें डागरहित आहेत ? पार्लमेंटमधील सात शहाणे ! इंग्लंडांत असा एकहि सार्वजनिक कार्यकर्ता नाहीं कीं, ज्यानें हिंदुस्थान-विषयीं विचार केलेला नाहीं. कमिशनवर हे नेमिलेले सभासद, जर निर्वि-कार व कांहींहि मत नसलेले असतील, तर मग या गाढवांच्या मताला काय किंमत राहील ? हे सर्वसंपन्न सप्तर्षि असेच आहेत काय ? पार्ल-मेंटच्या सातशें सभासदांतून हे सात शहाणे निवडलेले आहेत ! सर साय-मन् हे प्रागतिक पक्षाचे कायदेपंडित आहेत. कायदेपंडित हे विद्वान्

असणारच (हंशा). पण, तें आपल्या विद्वत्तेचा दुरुपयोग करणार नाहींत, याची काय हमी ? बर्कनहेड म्हणतात, आम्हाला नोकरशाहीचाहि एक प्रतिनिधि नेमावा लागला असता. हें खूळ तर कांहीं औरच आहे ! नोकरशाही ही तुमची नोकर, तिचा प्रतिनिधि काय म्हणून नेमावयाचा ? आमचें भांडण नोकरशाहीशीं नाहीं; आमचें भांडण इंग्लंडशीं आहे. मग हा नसता पक्षकार मध्येंच कां निर्माण करतां !

## स्वयंनिर्णयाची पायमल्ली म्हणून बहिष्कार !

कमिशनवर बहिष्कार कां घालावा, याचें तिसरें पण सर्वांत महत्त्वाचें कारण म्हणजे, स्वयंनिर्णयाचें तत्त्व कमिशन नेमण्यांत मान्य केलेलें नाहीं हें होय ! १९२५ च्या फेब्रुवारींत व सप्टेंबरमध्यें ज्या मागण्या असेंब्लीनें केल्या, त्या मान्य केल्या किंवा त्याशीं जुळणारी योजना मान्य केली, तर हिंदुस्थानच्या स्वयंनिर्णयास मान्यता द्यावी लागली असती ! पण अशा मान्यतेचा नुसता वासहि ज्यांत येईल, अशी गोष्ट त्यांना करावयाची नाहीं, आणि म्हणून हा सर्व खटाटोप आहे. १९१४ सालीं, आम्हीं होमरूल लीग स्थापन केली, त्यांतदेखील आमचें हेंच तत्त्व होतें कीं, जें काय आम्ही मिळवूं तें आम्ही आपल्या श्रमानें मिळवूं. इंग्लंडची देणगी म्हणून आम्हाला कांहीं नको ! इंग्लंडची न्यायबुद्धि जागृत करून, आम्ही कांहीं मिळवूं अशी आम्हाला कधींच आशा नव्हती व नाहीं, आज हें कमिशन नेमून, आमच्या स्वयंनिर्णयाच्या हक्कांसहि इंग्लंडनें हरताळ फांसला आहे.

## इंग्लंडला उत्तर कसें द्यावें ?

आतां, इंग्लंडला उत्तर कसें द्यावें हा आपल्यापुढें प्रश्न आहे. नुसता बहिष्कार पुकारून भागणार नाहीं. आपण जें करूं तें शत्रूला बोंचेल, असें असलें पाहिजे ! प्रतिकाराचा भाग ही ध्येयप्राप्तीच्या मार्गावरील एक पायरी आहे. शिडीचा तो शेवटचा टप्पा नव्हे ! इंग्लंडनें हिंदुस्थानचा जो अपमान केला आहे, त्याला एकएकट्यानें उत्तर देऊन भागणार नाहीं, त्याला सर्वांनीं मिळून उत्तर दिलें पाहिजे. बर्कनहेड म्हणतात, "माझें आव्हान कोणीच स्वीकारीत नाहीं." पण त्यांच्या आव्हानांत तथ्यच नसल्यामुळ

त्यांनीं केलेलें आव्हान हें उचल्याचें आव्हान आहे. रस्त्यानें एखादा गुंड उगाच दंड थोपटीत " आव, कोन लडनेवाला है " असें ओरडत जातो, पण तो असें आव्हान देतो म्हणून त्याचें आव्हान कोणताहि सशक्त मनुष्य-देखील स्वीकारीत नाहीं. बर्कनहेडचें आव्हान याच दर्जाचें आहे. "तुम्ही जें कराल तें आम्ही मान्य करू " असें त्यांनीं आम्हांला अभिवचन द्यावें,व मग " करा पाहूं कशी एकी करून दाखवितां तीं ? " असें त्यांनीं आम्हांला खुशाल आव्हान करावें ! आम्ही तें आव्हान स्वीकारून ठरीव मुदतींत हिंदुस्थानच्या सर्व पक्षांची एकमुखी मागणी तयार करूं व तुमच्या आव्हानास उत्तर देऊं ! पण असें कबूल न करितां उगाच 'माझें आव्हान कोणी स्वीकारीत नाहीं " अशी बडबड करण्यांत अर्थ नाहीं.

## एकी करा व राष्ट्रीय कमिशन नेमा.

असें जरी असलें तरी आपल्यांतील सर्व पक्षांची एकी घडवून आणणें जरूर आहे. यावेळीं प्रत्येक पक्षानें आपापले दुराग्रह बाजूस सारून एका निशाणाखालीं एकत्रित झालें पाहिजे. १९१७ सालचें दृश्य १९२७ सालीं पुन्हां एकदां दिसूं द्या व आम्ही वैयक्तिक किंवा जातीय बऱ्यावाइटाकडे दुर्लक्ष करून हिंदुस्थानचें राष्ट्रीय हित कशांत आहे हें जाणूं शकतों हें एकदां प्रत्ययास आणून द्या. दुसऱ्यांना दाखविण्यासाठीं हें करा असें मी म्हणत नाहीं. परंतु आपण सर्व प्रकारचे भेद विसरून राष्ट्राचें बरेंवाईट कशांत आहे हें सामुदायिक रीत्या बघूं शकतों, असा आपल्यांत नवा विश्वास निर्माण करूं या व गेल्या दहा वर्षांत जें दृश्य कॉंग्रेसच्या व्यासपीठावर दिसलें नाहीं तें पुन्हां एकदां दाखवूं या ! राष्ट्रीय कमिशन नेमा. आपली राष्ट्रीय मागणी तयार करण्यासाठीं कॉंग्रेसनें सर्व पक्षांचें मिळून एक राष्ट्रीय कमिशन नेमावें व त्यानें सायमन कमिशनबरोबरच गांवोगांव हिंडून आपला पुरावा गोळा करावा;असें केल्यास सायमन कमिशनवरील बहिष्कार किती यशस्वी झाला, हेंहि आपोआप जगजाहीर होईल. ह्या कमिशनसमोर साक्षी देण्यासाठीं धरून बांधून मागल्या दारानें माणसें आणविलीं जातील. त्यासाठीं नवे रावबहादूर व खानबहादूर निर्माणहि करण्यांत येतील ! पण ज्याला म्हणून हिंदी राज-

कारणांत किंमत आहे, असा एकहि हिंदी गृहस्थ सायमन कमिशनपुढें साक्ष देण्यास जाणार नाहीं.

## सायमन कमिशनला पळ काढावयाला लावा !

उलट आमच्या राष्ट्रीय कमिशनपुढें, आत्मस्फूर्तीनें साक्ष देण्यास प्रमुख व वजनदार हिंदी गृहस्थ हवे तितके येतील. राष्ट्रीय वर्तमानपत्रांनीं या दोन्ही कमिशनच्या कामकाजाची माहिती समोरासमोर मांडून दाखवावी. आपण सायमन कमिशनवर असा बहिष्कार घातला म्हणजे तें येथून लवकर पळ काढील, व पुढच्या हिंवाळ्यांत पुन्हा येतांना तें कमिशन ही बहिष्काराची थंडी बाधूं नये म्हणून तावडतोब विलायतेंतून नवे जाड कोट, नवीं कवचें घालून येईल. अगोदर एकी करा. हें सर्व करण्यासाठीं कॉंग्रेसनें आपलीं दारें सर्व पक्षांना खुलीं केलीं पाहिजेत. लखनौ कॉंग्रेसमध्यें जसे सर्व पक्ष एकत्रित झाले होते, तसे पुन्हां मद्रासला सर्व पक्ष एकत्रित करा; व आपली नवी मागणी, नवी घटना तयार करून, सर्व पक्षांच्या संस्थांचीं जादा अधिवेशनें भरवून त्यावर राष्ट्रीय संमतीचें शिक्कामोर्तब करा; म्हणजे आपण एकोप्यानें राष्ट्रकार्य करूं शकतों हें सिद्ध होऊन, आपल्यांत नव्यानें आत्मविश्वास निर्माण होईल, व इंग्लंडला, बर्कनहेडला व सायमन कमिशनला योग्य उत्तर दिल्याचेंहि समाधान वाटेल ! (टाळ्या).

---

# १३ वें महाराष्ट्र साहित्य-संमेलन

## ( सं. ग्वाल्हेर )

[ ग्वाल्हेर येथें १३ वें महाराष्ट्र साहित्य संमेलन श्री. माधव श्रीहरि अणे यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. त्यावेळीं संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ता. ७ एप्रिल १९२८ इ. रोजीं त्यांचें झालेलें भाषण संमेलनाच्या अहवालावरून खालीं दिलें आहे. ]

ह्या तेराव्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनाचें अध्यक्षपद मला देऊन आपण जो माझा गौरव व सन्मान केला त्याबद्दल कृतज्ञतापूर्वक आपले आभार मानणें हें मी माझें आद्य कर्तव्य समजतों. माझ्या हातून ग्रंथरचनेच्या रूपानें कांहींच कामगिरी झालेली नाहीं. प्रसंगोपात्त दोनतीन निबंध व चार पांच ग्रंथांस प्रस्तावना लिहिण्यापलीकडे मराठी वाङ्मयाची मीं कोणतीच सेवा केली नाहीं. या एवढ्या तुटपुंज्या सामुग्रीवर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासारख्या केवळ विद्वत्प्रांशु फलप्राप्तीची आकांक्षा मजसारख्या वामनप्राय माणसाच्या ठिकाणीं उद्भूत होणें केव्हांहि शक्य नव्हतें.

आपल्या अभिनव कौशल्यानें ज्यांनीं यावज्जीव साहित्यसेवाव्रत अव्याहत चालवून दिगन्त कीर्ति संपादन केला आहे, व जे महाराष्ट्रीय साहित्यप्रेमी जनतेच्या आदरास सर्वथैव पात्र आहेत, अशा पांचपंचवीस विद्वन्मणींचीं नांवें, संध्येंतील नांवांप्रमाणें मुखोद्गत असतां, त्यांना वगळून माझ्यासारख्या साहित्यक्षेत्रांत प्रायश: अपरिचित अशा व्यक्तीची निवड करण्यांत स्वागत-मंडळाचा काय हेतु असेल हें मला सांगतां येत नाहीं. मी स्वत: साहित्यसेवक नाहीं, परंतु अनेक साहित्यसेवकांचा स्नेही आहे व कित्येकांशीं तर माझा संबंध जिव्हाळ्याचा आहे. अशाच कांहीं मित्रांच्या प्रेमळपणामुळें ही अकल्पित आपत्ति मजवर ओढवली आहे असें मला वाटतें. God save me from my friends—“ मित्रेभ्य: परित्रायस्व ” असे उद्गार काढण्याचा प्रसंग कधीं कधीं माणसांवर येत असतो हा अनुभव आपणापैकीं कांहीं जणांस आला असेल. माझी ओळख करून देतांना

माझ्या निकटच्या स्नेह्यांना—श्री. काळे यांस—माझा साहित्याशीं कोणता संबंध आला हें सांगतांना मोठीच पंचाईत पडली व "अस्माकं बदरीचक्रं युष्माकं बदरीतरुः" याप्रमाणें बादरायण संबंध जोडावा लागला. माझी साहित्यसेवा काय आहे याची कल्पना यावरून आपणांस आली असेलच.

इतकें जरी आहे तरी ज्याअर्थीं आपण ही निवड केली आहे, त्याअर्थीं मजकडून या संमेलनाचें कार्य निर्विघ्नपणें पार पाडण्यास आपणांकडून पूर्ण साह्य होईल याबद्दल मला यत्किंचित् शंका वाटण्याचें कारण नाहीं. रस-सिद्ध कवींना एका सुभिषितकारानें "सुकृतिनः" असें म्हटलें आहे. तेव्हां "अंगीकृत सुकृतिनः परिपालयन्ति" या नीतीचें अनुकरण त्यांच्या हातून साहजिकपणेंच होईल.

ज्या सन्मान्य स्थानावरून चार शब्द बोलण्याची आपण मला संधि दिली आहे तें महास्थान मंडित करण्याचा मान आजपर्यंत ज्यांना मिळाला त्यांपैकीं एखाददुसरा अपवाद खेरीजकरून बहुतेक सर्वांकडून महाराष्ट्र वाङ्मयाची उच्च प्रतीची सेवा झालेली आहे. कै. अण्णासाहेब महाजनी यांच्या 'कुसुमाञ्जली'च्या परिमलावर लुब्ध होऊन अजूनहि रसिक भृंगांचे थवे गुंजारव करीत, त्यांतील कुसुमांचा रसास्वाद चाखावयास तत्पर असलेले दृष्टीस पडतात. कै. कानिटकरांच्या 'संमोहलहरी'नें ज्याच्या हृदयास चटका लावून आनंदमूढ केलें नाहीं, असा महाराष्ट्रीय वाचक सांपडावयाचा नाहीं. टेनिसनच्या इंग्रजी 'राजकुमारी'स महाराष्ट्रीय वेष देऊन 'इंदिरा' काव्य निर्माण करण्यांत कै. कीर्तिकर यांनीं केलेल्या सेवेचें महत्त्व 'मिलर'ची देवी शर्मिष्ठा करण्यापेक्षां खात्रीनें कमी नाहीं. किंबहुना 'इंदिरा' आज २५–३० वर्षें रसिकांच्या अन्तःकपाटांत लीलेनें विहार करीत आहे. म्हणूनच आज देवी शर्मिष्ठेस आशीर्वचन द्यावयास महाराष्ट्र एकदिलानें उत्सुक झाला आहे असें मला वाटतें. कधीं कधीं कविकृतींत भवितव्याची पूर्वसूचना मोठ्या मार्मिकतेनें केलेली आढळते. चिकित्सक व कवि या दोन्ही दृष्टींनीं श्री. आगाशे व पटवर्धन यांनीं केलेली रचना महाराष्ट्रीयांस विश्रुत आहे. कै. आपटे हे तर महाराष्ट्रीय कादंबरीसंप्रदायाचे प्रवर्तकच होत. त्यांच्या एकट्याच्या कृतीनें सबंध कादंबरीरचनेचा ओघ अद्भुत व

विस्मयोत्पादक कथाकल्पतरूच्या निबिड अरण्यांतून बाहेर पडून, मनुष्य-वस्तीनें गजबजलेल्या शहरांच्या बाजूनें कसा वाहूं लागला व त्या संथ, प्रशान्त व गंभीर प्रवाहांत वाचकांस 'आजकालच्या गोष्टी'चें प्रतिबिंब स्वच्छ दिसावयास लागून ते आपल्या मनाशींच 'पण लक्षांत कोण घेतो ?' हा प्रश्न कसा विचारावयास लागले, या मनोरंजक प्रश्नांचा सविस्तर विचार करण्यास या भाषणांत अवकाश नाहीं. कै. आगरकरांच्या कठोर आघातां मुळें ज्यांचीं अन्तःकरणें हादरून जात, व सुधारणा व सुधारक यांच्या संबंधानें विमुख बनत, तच लोक कै. हरिभाऊंच्या कादंबरीचे घोट मिटक्या मारून घ्यावयास तयार होत. आपट्यांची कुशल लेखणी म्हणजे यक्षिणीची कांडीच होय ! ती एकदां, दोनदां व तीनदां फिरली कीं, वाचकांवर एक प्रकारची भुरळ पडत असे व त्यांचे सर्व पूर्वग्रह नष्ट होऊन ते ग्रंथकर्त्याच्या कथाभागाशीं व तद्वत् विचारांशीं तल्लीन होत. अशी अद्‌भुत मोहकता त्यांच्या लेखनशैलींत होती म्हणूनच 'महाराष्ट्र साहित्य सम्राट्' ही पदवी त्यांना यथार्थतः शोभते. वंगसाहित्यांत वंकिमचन्द्र चट्टोपाध्याय यांचें जें स्थान, तेंच महाराष्ट्रीय वाङ्मयांत कै. आपटे यांचें आहे. वैद्य, केळकर, किबे, कोल्हटकर या साहित्यसेवकांचें वाङ्मक्षेत्रांत किती उच्च स्थान आहे याचें वर्णन करण्याची आवश्यकताच नाहीं. त्यांपैकीं प्रत्येकानें केलेली रचना ही अत्यंत हृदयंगम व विचारोद्दीपक अशीच आहे. ज्यांनीं स्वतः वाङ्मयांत—निदान माझ्या माहितीप्रमाणें तरी—फारशी नवीन भर घातली नाहीं, परंतु जे अनेक वाङ्मयभक्तांचे प्रेमळ मित्र आहेत, असे साताऱ्याचे दादासाहेब करंदीकर यांनींहि १९१५ सालीं या संमेलनाचें अध्यक्षस्थान सुशोभित केलें होतें हें पाहून मला थोडा धीर येतो. दादासाहेबांचा व्यासंग दांडगा आहे. त्यांना आतां पुराणपुरुष Grand old man या नांवानें संबोधण्यास हरकत नाहीं, त्यांचें वर्तन दाखला म्हणून आपणांपुढें ठेवून माझ्या अध्यक्षपदाचें थोडेंबहुत समर्थन करतां येण्यासारखें आहे.

सद्गृहस्थहो व भगिनींनो ! मी विदर्भस्थ आहें व ग्वाल्हेर शहरांत विदर्भस्थ प्रख्यात कवि व संतशिरोमणि देवनाथ महाराज यांनीं राम नवमीच्या

दिवशीं " तुज काय म्हणावें आम्ही, दयाळू नाथ जगाचा तूं स्वामी " या पदानें विश्वोद्धारक गोविंदाची प्रेमपूर्ण करुणा भाकून इहलोकची यात्रा संपविली. यामुळें विदर्भदेशीय वाङ्मयभक्तांस तर ग्वाल्हेर नगरी म्हणजे एक अत्यंत दर्शनीय व पवित्र क्षेत्र वाटतें. कदाचित् त्या प्रख्यात कवीच्या समाधीसन्निध साहित्यसंमेलनाचें अध्यक्षस्थान विदर्भप्रांतीय एका गृहस्थानें स्वीकारावें हा जो अकल्पित योग जुळून आला तो त्या समाधिस्थ नाथांच्या ज्ञानप्रेरणेचाहि प्रभाव असेल; आणि असें असलें तर माझ्या मनांत कसलीच शंकाकुशंका येण्याचें कारण नाहीं. सर्व भार श्रीनाथांवर टाकून प्रस्तुत कार्यासंबंधींचे विचार मी थोडक्यांत आपणांपुढें मांडणार आहें.

१९२८ सालीं येथें भरलेलें हें महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचें १३ वें अधिवेशन आहे. ग्रंथकार संमेलनाची परिणति बडोदें येथें १९०९सालीं साहित्यसंमेलनांत झाली, आणि कै. न्या. रानडे, डॉ. कुंटप्रभृति विद्वानांच्या आश्रयाखालीं ग्रंथकारसंमेलनाचें प्रथम अधिवेशन १८८५ सालीं झालें. म्हणजे ४३ वर्षांत एकूण तेराच अधिवेशनें झालीं आहेत. पहिल्या बैठकीनंतर संमेलनास वीस वर्षे अज्ञातवासांत काढावीं लागलीं. त्यानंतर १९०५ मध्यें कै. रा. ब. पारसनीस यांनीं सातारा शहरीं श्री. दादासाहेब करंदीकर यांना पौरोहित्य देऊन जातकर्मादि संस्कार केले, व नंतर चार वर्षेपर्यंत पुणेकरांनीं या संस्थेचें लालनपालन करून १९०९ सालीं बटोदरक्षेत्रीं विद्याप्रिय श्रीमंत सयाजीराव यांच्या आश्रयास पाठविल्यावर संमेलनाचें चौलोपनयन संस्कार करण्यांत आले, व पाहिलें नामाभिधान सोडून दुसरें आश्रमधर्मानुरूप असें महाराष्ट्र साहित्यसंमेलन हें नांव देण्यांत आलें. व्रतसिद्धयर्थ नियमावलीचा 'दंड' व साहित्यपरिषदेची 'मेखला' हि त्यांस अर्पण करण्यांत आली. त्यानंतर आकोला, इंदूर, बडोदें आणि मुंबई इतक्या ठिकाणीं झालेलीं अधिवेशनें संस्मरणीय अशींच असलीं तरी दर दोन अधिवेशनांत अनुक्रमें ३, २, ४ व ५ वर्षांचा काल गेलेला आहे ही गोष्ट फार खेदजनक, अतएव चिंतनीय आहे. पुण्यास भरलेल्या मागाल संमेलनानंतर एक वर्षाच्या आंतच कालातिक्रम होऊं न देतां हें प्रस्तुत अधिवेशन ग्वाल्हेरकर साहित्यप्रेमी सज्जनांकडून भरविण्यांत येत आहे याबद्दल अखिल महाराष्ट्रांतील वाङ्मय-

सेवक येथील स्वागतमंडळास शतशः धन्यवाद देतील. महाराष्ट्रीयांच्या अंगीं अशा संस्था अव्याहतपणें चालविण्याचें सामर्थ्य नाहीं ? कां असल्या संस्थां-संबंधानें त्यांस अद्यापि पुरेशी आस्था वाटत नाहीं ? किंवा संमेलनाच्या घटनेंतच कांहीं दोष असल्यानें अकल्पित स्थानिक अडचणी उत्पन्न झाल्यास प्रतिवार्षिक अधिवेशनें नियमितपणें भरविण्यास अडचण पडते कीं काय ? इत्यादि अनेक प्रश्न आपणांपुढें आहेत त्यांचा विचार अवश्य व्हावयास पाहिजे. १९१२ सालीं अकोला येथें भरलेल्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष कै. श्री. महाजनी यानीं आपल्या भाषणांत या बाबीचा प्रामुख्यानें उल्लेख करून "महाराष्ट्र परिषदे-विषयीं सहानुभूति सर्व महाराष्ट्रभर उत्पन्न होण्यास प्रतिवर्षी संमेलन कोणत्या तरी विशिष्ट भागांत भरलें पाहिजे, " असें आग्रहानें व निक्षून सांगितलें आहे. परंतु या वृद्ध साहित्यभक्ताच्या आग्रहाचा महाराष्ट्रीय जनतेवर फारसा परिणाम झालेला दृष्टीस पडत नाहीं, असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. मला उमेद आहे कीं, या प्रश्नाचा योग्य तो खल प्रस्तुत अधिवेशनांत होईल व ही अधिवेशनपरंपरा अविच्छिन्न ठेवण्यासंबंधीं कांहींतरी निश्चित योजना स्वीकारली जाईल.

साहित्यसंमेलन म्हणजे श्रीशारदा देवीच्या वाङ्मयपूजेचा साहित्यभक्तां-कडून होणारा मंगलोत्सव होय. ही गोष्ट जर नीट लक्षांत घेतली, तर भारतीय पंचांगांत या उत्सवाप्रीत्यर्थ तीन दिवस स्वतंत्र काढून ठेवण्यांत आले पाहिजेत व प्रतिवर्षी ठराविक तीन दिवसात तो उत्सव नियमित स्थळीं यथासांग पार पाडला पाहिजे. साहित्यपरिषद व संमेलन यांतील परस्पर संबंध अधिक निगडित व परस्परपोषक कसे होतील याचा विचार करावयास हवा.

मराठी भाषा बोलणाऱ्या वर्गांत आपल्या मायभाषेचा जाज्वल्य अभिमान आहे यांत शंका नाहीं. महाराष्ट्रापासून दूर असलेल्या देशी संस्थानांतील महाराष्ट्रीय प्रजेकडून आजपर्यंत संमेलनाचीं चार अधिवेशनें मोठ्या उत्सा-हानें भरविण्यांत आलीं, आणि हेंच माझ्या मतें मायभाषेवरील प्रेमाचें द्योतक आहे. बडोदा, इंदूर व ग्वाल्हेर या संस्थानी प्रजेंत महाराष्ट्र साहित्यसेवकां-संबंधीं दिसून येणारा आदर व प्रेम अपूर्व आहेत. दिवसानुदिवस महा-राष्ट्रीय वाङ्मयाची प्रगति व प्रसार होत असतां साहित्यसंमेलनें मात्र

नियमित भरत नाहींत ही गोष्ट विषादकारक आहे. बंगाली व हिंदी साहित्यसंमेलनें आपणापेक्षां अधिक नियमितपणें भरतात, हें आपण पाहतों, तर आपणात एतत्संबंधीं शैथिल्याचें कारण काय? सामाजिक परिषदा, औद्योगिक सभा, संगीत संमेलनें, राजकीय मजलसी आणि धार्मिक उत्सव हे वर्षानुवर्ष महाराष्ट्रीयांकडून यथासांग पार पाडले जातात, मग साहित्य संमेलनाचाच ओघ अखंडित कां वाहात नाहीं? तो अडखळतो कां व कोठें? हे प्रश्न मी आपणांपुढें उपस्थित करितों त्याचा विचार पोक्तपणें व पूर्वग्रहरहित दृष्टीनें आपण कराल अशी मला आशा आहे.

मागील तीन अधिवेशनांच्या अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत दोन बैठकींच्या मधल्या काळांत प्रसिद्ध झालेल्या ग्रथांचा थोडाबहुत परामर्ष घेण्याचा परिपाठ पाडलेला आहे. त्यांचा वाङ्मयक्षेत्रांतील अधिकारच असा होता कीं, त्यांजकडून होणाऱ्या बऱ्यावाईट टीकेनें कोणत्याहि लेखकास विषाद वाटणें शक्य नव्हतें. परतु मजसारख्या निग्रंथ साहित्यप्रेमी माणसास अशी जोखीम घेणें इष्ट वाटत नाहीं; परंतु साहित्याच्या विस्तृत क्षेत्रांतील कोणत्याहि शाखेचें आपण अवलोकन केलें, तरी गेल्या १० महिन्यांत आपलें पाऊल मागें नसून पुढेंच पडत आहे एवढें मोघम विधान करण्यास मला कांहींच हरकत वाटत नाहीं. कादंबरी, काव्य व नाटकें हीं वाङ्मयक्षेत्रांतील अत्यन्त मनोवेधक व आल्हाददायक बाग, त्यांतहि अभिनव व मनोहर फुलझाडांचे ताटवे लावण्यांत आलेले दृष्टीस पडतात. श्री. खाडिलकर व वीर वामनराव यांजसारख्या लोकप्रिय नाटककारांनीं नवीन नाटकें लिहून महाराष्ट्रीय नाटयसृष्टींत अधिक मनोवेधकता आणली आहे.

महाराष्ट्रांत तरी निदान निव्वळ शास्त्रीय व ऐतिहासिक विषयांचा व्यासंग करणाऱ्या वर्गांतून कादंबरीकार निर्माण झालेले नाहींत. बंगाल्यांत के. रमेशचन्द्र दत्तांसारखीं कांहीं उदाहरणें आहेत. इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण या विषयांवर अधिकारयुक्त व प्रमाणग्रंथ लिहिणाऱ्या या प्रतिभासंपन्न विद्वन्मणींचा वंगसाहित्यांत श्रेष्ठ कादंबरीकार या नात्यानेंहि लौकिक आहे. आपल्याकडे कांहीं इतिहासज्ञांनीं एखाददुसरें नाटक लिहिण्याचें धाष्ट्य केल्याचें आढळून येतें. परंतु कादंबरीलेखनाच्या क्षेत्राकडे अजूनहि

पाळीव जनावरें राखीव जंगलाकडे पाहतात; तद्वतच, निष्क्रिय कौतुकमय दृष्टीनें पाहण्याचीच वृत्ति त्यांच्यांत प्रायशः आढळून येते असें सामान्य विधान करण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं.

कादंबरीसंबधानें पंडितंमन्यांत नाकें मुरडण्याचा एक संप्रदायच होऊन गेला आहे. परंतु सामान्य जनतेंत वाङ्मयांतील हीच शाखा अधिक लोकप्रिय होत आहे व दिवसेंदिवस होत जाणार ही गोष्ट साहित्याची श्रेष्ठ सेवा करणारांनीं दृष्टीआड करण्यांत अर्थ नाहीं; व एवढ्याचसाठीं त्यांत शिरूं पाहणाऱ्या दोषांचें उच्चाटन करण्याचा उत्तम मार्ग म्हणून त्यांनीं आपली प्रगल्भ बुद्धि या शाखेच्या परिपोषणार्थ लावणें, साहित्यांत औचित्य व सदभिरुचि कायम ठेवण्याच्या दृष्टीनें अवश्य आहे असें मी म्हणतों. कादंबरीकारांनीं बरीच चांगली वाचनीय ग्रंथांची भर गेल्या दोन वर्षांत घातली आहे. एका लेखकानें तर 'बंधनाच्या पलीकडे' जाऊन निर्व्याज प्रेमी जनांच्या मनोवृत्तीचें जें चित्र रेखाटलें आहे, त्यावरून प्रस्तुत सुशिक्षित तरुण पिढीच्या अन्तःकरणांत सामाजिक क्रान्तीच्या कल्पनांचें कसें काहूर माजलें आहे हें सहज समजून येईल. इतकेंच नव्हे तर ही पिढी अनेक सामाजिक वैषम्यांचा नायनाट करून सामाजिक समतेची स्थापना करण्याचा आटोकाट प्रयत्न करील अशी उमेद उत्पन्न करणारीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

महाराष्ट्रीयांचा समग्र इतिहास कादंबऱ्यांच्या द्वारें लिहून काढण्याचा स्तुत्य उद्योग कांहीं कादंबरीकारांनीं चालविलेला आहे. परंतु या तऱ्हेचे ग्रंथ लिहिणारांनीं त्वरेपेक्षां तत्त्वावर लक्ष देणें अधिक इष्ट आहे, असा इषारा दिल्यास कोणासहि विषाद वाटणार नाहीं असें मला वाटतें. कादंबरीकार म्हणून स्वैरसंचारास थोडीबहुत सवलत ही असणारच, व ती असावयालाहि पाहिजे. तथापि विशिष्ट भावनांच्या परिपोषांत ऐतिहासिक सत्य विकृत होणार नाहीं, आणि ज्ञात व प्रख्यात ऐतिहासिक स्त्रीपुरुषांविषयीं—मग तें कोणत्याहि धर्माचे असोत—अवास्तविक समज निर्माण होणार नाहीं, याबद्दल काळजी घेणें फार आवश्यक आहे. कित्येक लेखकांच्या कृतींत हे दोष माझ्या दृष्टोत्पत्तीस आल्यानेंच मला ही सूचना करावी लागत आहे,

असा गैरसमज मात्र कोणीहि करून घेऊं नये. सामान्य सिद्धान्त नमूद करण्यापलीकडे माझा त्यांत कोणताहि उद्देश नाहीं. Haste is waste, जलदींत कदाचित् फसगत होण्याचा संभव असतो तो टळावा एवढाच काय तो हेतु वरील विवेचनाचा आहे.

नाटक व कादंबरी या नितान्त मनोरम भागांतून आपली दृष्टि काढून ती वाङ्मयाच्या दुसऱ्या भागाच्या निरीक्षणार्थ लावतांना, फुलझाडांनीं फुललेल्या बागेतून निघून, साळी, गहूं, ज्वारी किंवा कापूस यांच्या शेतांत जातांना येतो तसाच अनुभव कांहीं अशानें वाचकांस आल्याशिवाय राहात नाहीं. वाङ्मयाचे कांहीं प्रकार अन्तःकरणवृत्तीस प्रफुल्लित करितात; परंतु विचारांचें व सद्भावनांचें खाद्य देऊन जनतेच्या ठिकाणीं सहनशीलता, काटकपणा व कार्यक्षमता उद्भूत होण्यास चरित्रें, इतिहास, प्रवासवर्णन, शास्त्रीय ग्रंथ व तत्त्वज्ञानविषयक प्रबंध यांची अत्यन्त आवश्यकता आहे. या शाखेंतून गेल्या १॥–२ वर्षांत झालेली ग्रंथनिर्मितीहि महाराष्ट्रीयांस अभिमानास्पद अशीच आहे.

चरित्रग्रंथांत श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं प्रसिद्ध केलेले लोकमान्य टिळकांच्या चरित्राचे तीन खण्ड थोडक्याच अवधींत त्रिखण्ड कीर्ति त्रिकाल दुमदुमत ठेवतील अशीं चिन्हें दिसत आहेत. चरित्रनायक व चरित्रलेखक हे परस्परांशीं इतके समरस झालेले पाहण्याचे भाग्य वाचकांस क्वचित्च लाभतें. मॉर्लेकृत ग्लॅडस्टनचें चरित्र हाच ग्रंथ प्रस्तुत प्रकरणीं उदाहरणादाखल उल्लेखण्यासारखा आहे. परंतु या तीन खंडांचा अत्यंत विस्मयकारक परंतु कौतुकास्पद विशेष हा आहे कीं, समरसाची स्थिति अविचल ठेवून चरित्रकारानें चरित्रनायकाच्या आयुष्यांतील विविध प्रसंगांची एखाद्या विचिकित्सक न्यायाधीशाप्रमाणें निर्विकार चर्चा केलेली आढळते. किंबहुना श्री. केळकर यांच्या लेखणीचा कल दुसऱ्या बाजूच्या तोलांत थोडेंसें अधिक माप टाकण्याकडेच आहे, असा वाचकांस संशय येतो. निदान मला तरी ही कांटेतोल हेलकावे खाणारी पद्धति फारशी आवडत नाहीं. हा ग्रंथ म्हणजे गेल्या ३० वर्षांत श्री. केळकर यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक व अति कौशल्यानें जें वाङ्मयसेवामंदिर बांधिलें त्यावरील चढविलेला

भव्य सोनेरी कळसच होय. मराठी वाङ्मयाकडे ज्या कोणाची दृष्टि जाईल त्याला हा कळस प्रथमतः दिसल्याशिवाय राहणार नाहीं. त्याबरोबरच दिसून येणारें श्री. केळकरांचें शाब्दिक शिल्पकौशल्य हेंहि प्रेक्षकांस क्षणभर मोहित केल्यावांचून राहणार नाहीं. साहित्यक्षेत्रांत लीलेनें आक्रमण करणारे व त्यांतील प्रत्येक शाखेंत सहज प्रभुत्व संपादन करणारे श्री. केळकर नेहमीं नवीन वाङ्मयप्रांत काबीज करण्यांत गुतलेले असतात.

तत्त्वज्ञानाच्या शाखेतहि कांहीं ग्रंथ निर्माण झाले आहेत. प्रो. रानडे यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला तत्त्वज्ञानावरील ग्रंथ हा इंग्रजींत लिहिला गेला आहे. तोच जर प्रथमतः मायभाषेंत लिहिला गेला असता, तर इतर भाषेंतील व्यासंगी लेखकाला विचाराची सामुग्री पुरविण्याचें एक बलवत्तर साधन मराठी भाषेस उपलब्ध झालें असतें. अन्य भाषेंतील लोकांनीं विचारांची भिक्षा मागावयासाठीं एखाद्या विशिष्ट भाषेचा अभ्यास करूं लागणें म्हणजेच त्या भाषेचा खरा उत्कर्ष होणें होय. डॉ. रवींद्रनाथांची ‘ गीतांजलि ’ प्रथम बंगालींत प्रसिद्ध होऊन नंतरच तिचीं भाषांतरें सर्व देशांत झालीं.

या दृष्टीनें विचार करतां एक सूचना मला करून ठेवावीशी वाटते ती ही कीं, जे मराठी साहित्योपासक संशोधनाचें श्रेष्ठ कार्य करीत आहेत त्यांनीं आपल्या शोधाची ठेव आपल्या भाषेंत ठेवावी, मात्र ती इतरांस दुर्बोध व दुर्ज्ञेय होईल अशी नसावी. मराठीशिवाय इतर भाषेनें मी आपली लेखणी विटाळणार नाहीं हा के. राजवाडे यांचा अभिमान त्यांच्या श्रेष्ठ देशभक्तीचा निःसंशय द्योतक आहे. परंतु या इतिहासाचार्यानें केलेल्या प्रचण्ड कार्याचा प्रसार इतर सहव्यवसायी भिन्न वाङ्मयोपासकांत न झाल्यामुळें त्यांच्यापेक्षां कमी दर्जाच्या अनेक बंगाली व तामील लेखकांना संशोधक व इतिहासज्ञ म्हणून जगतांत सहज मिरवितां आलें व सर्व महाराष्ट्रीयांच्या परिश्रमपूर्वक चालविलेल्या संशोधनप्रयत्नांबद्दल सर्वत्र प्रतिकूल ग्रह निर्माण करतां आले, याचाहि विचार संशोधकांनीं अवश्य करावा. अस्सल मराठी कागदपत्र हे विश्वसनीय मानण्याकडे अजूनहि इतिहासज्ञांची प्रवृत्ति कां होत नाहीं? मायभाषेंतून चाललेल्या महाराष्ट्रीय संशोधनाच्या कार्याचें ज्ञान इंग्रजी-सारख्या जगाच्या बाजारांत चालणाऱ्या भाषेंतून कोणी परकीयांस करून

देत नसल्यानें मराठी इतिहास बदलले तरी इंग्रज इतिहासकारांची दृष्टि अजून पूर्वीसारखीच आहे. मराठी इतिहासांत झालेलें संशोधनकार्य इंग्रज इतिहासकारांच्या दृष्टीस पडेल तर त्यांनीं लिहिलेले इतिहास त्यांस स्वतःच काढून टाकावे लागतील.

संकलित पत्रांतून व त्यांचा सारांश देणाऱ्या विस्तृत प्रस्तावनांतून निव्वळ शक, मास व मितीचा उल्लेख करण्याचा कै. राजवाडे यांचा परिपाठ होता. वाचकांनीं अध्ययन करतांना इंग्रजी तारखा पाठ केलेल्या असतात, व पुस्तक हातीं घेऊन तें वाचतांना जंत्री बरोबर घेऊन बसणें शक्य असलें तरी सहजसाध्य नव्हे ! अशानें मिति, शक देण्याचा उद्देश तर सफल होत नाहींच, पण ग्रंथास विनाकारण दुर्बोधता येते. खास मराठी जाणणारालादेखील अशा शक, मिति निर्दिष्ट असलेल्या संशोधनकार्याकडे सप्रेम सहानुभूतीनें पाहण्याची प्रबल इच्छा असली, तरी तिची पूर्तता होण्यांत त्यांना अडचणी वाटतात. महाराष्ट्रीयांची बुद्धिमत्ता किती प्रगल्भ व गंभीर आहे याचा जगताला शक्य तितका लौकर बोध व्हावा व अशानें महाराष्ट्राविषयीं व त्याच्या वाङ्मयाविषयीं जगांतील प्रमुख लोकांच्या मनांत आदर उत्पन्न व्हावा हाच हेतु ही क्षुल्लक बाब आपणांपुढें मांडण्यांत आहे. पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाला उद्देशून माझी ही सूचना आहे.

मजसमोर गेल्या दोन वर्षांत प्रसिद्ध झालेल्या प्रमुख ग्रंथांची यादी आहे. तींत चरित्रशाखेंत येणाऱ्या सहा मराठी ग्रंथांपैकी तीन ग्रंथ प्रसिद्ध बंगाली व्यक्तींचीं चरित्रें आहेत. हें पाहून सुचलेले विचार येथेंच सांगून टाकणें इष्ट वाटतें. मराठी वाङ्मयावर बंगाली वाङ्मयाची दिवसेंदिवस अधिकाधिक छाप पडूं लागली हें स्पष्ट दिसतें. अनेक मालांतून प्रसिद्ध होणाऱ्या कादंबऱ्या बहुतेक बंगाली ग्रंथांचीं रूपान्तरें आहेत. भाषान्तरित किंवा रूपान्तरित ग्रंथानें वाङ्मयाचें खरें संवर्धन होत नाहीं. स्वतंत्र रचनेंतच वाङ्मयाचें खरें स्वारस्य व सामर्थ्य आहे. बंगाली वाङ्मयांत जें अनुकरणीय असेल, त्याचा अवश्य आदर व स्वीकार करावा. परंतु महाराष्ट्रीय वाङ्मयवृद्धि ही बंगसाहित्यभक्तांस शरण गेलेली आहे असें दर्शविणारे ग्रंथ निर्माण होणें हें महाराष्ट्रीयांच्या स्वातंत्र्यप्रेमी स्वैरवृत्तीस आळा घाल-

णारें व बुद्धिमत्तेस कमीपणा आणणारें आहे. कादंबरी व काव्य या क्षेत्रांत कांहीं प्रतिभासंपन्न वङ्ग लेखकांनीं फार मोठा लौकिक संपादन केला. व यांचा सन्मान सर्व जगभर होत आहे, यामुळें पुष्कळ महाराष्ट्रीय तरुण लोकांचीं मनें तिकडे आकर्षिलीं गेलीं असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं; परंतु प्रशंसेनें वर पाहतां पाहतां तीच प्रथा महाराष्ट्रांत सुरू करण्याची अंधानुकरणप्रियता महाराष्ट्रानें दाखविण्याचें कांहींच कारण नाहीं. बंगाली वाङ्मयाचा पगडा अधिकाधिक बसत चाललेला आहे, याचें ठळक उदाहरण म्हणजे आमच्याकडील 'गोपाळ' 'गोविंद' या साध्या व प्रेमळ नांवाऐवजीं बंगाली धर्तीचीं नांवे आपल्या कादंबरींतील व नाटकांतील पात्रांस द्यावींशीं वाटतात हें होय. आपल्या पोषाखाचा कंटाळा, चालीरीतींची उपेक्षा व नांवांचा तिरस्कार हीं अभिमानशून्यतेचीं पूर्वचिन्हें होत, हें सर्व लेखकवर्गानें लक्षांत ठेवावें अशी त्यास माझी नम्र सूचना आहे. सुशिक्षित महाराष्ट्रीयांच्या कुटुंबांतून गोदू, यमू, गंगू या पवित्र नांवाच्या कन्या जाऊन कमला, सरला, विमला या गंधर्वनगरींतील अप्सरांच्या कन्या अवतीर्ण व्हावयास लागल्या आहेत! वङ्ग वाङ्मयाचा जगांत बोलबाला होत आहे हें खरें असलें, तरी मराठी वाङ्मयाचें पावित्र्य, स्वातंत्र्य व कसदारपणा त्यांत फार अल्पांशानें आढळून येतो; हे दोन्ही भाषांच्या तौलनिक अभ्यासानें कित्येक विद्वानांनीं बनविलेले मत मी तरुण महाराष्ट्र लेखकांच्या कानांवर घालून ठेवतों.

प्राकृत भाषेंतून प्रथमतः अभिजात वाङ्मय निर्माण करण्याचा मान ज्या 'महाराष्ट्री'नें मिळविला व जिचा उल्लेख प्राकृत भाषेचे वैय्याकरण अत्यन्त आदरपूर्वक करितात व काव्यदर्शकार जिचा निर्देश "महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः" या गौरवपर वचनांनीं करतात त्या 'महाराष्ट्री' यांच्या सद्यःकालीन लेखकांनां विचाराकरितां किंवा शब्दसमृद्धीकरितां दुसऱ्या कोणत्याहि भाषेची याचना करण्याची आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं. गीताञ्जलीनें युरोपांतील व्यवहारमग्न लोकांचे डोळे दिपविले असले, तरी संत तुकोबा यांच्या उक्तांचा नित्यपाठ करणाऱ्या महाराष्ट्रीय वाचकांस त्यांतून उदात्त आध्यात्मिक कल्पनांच्या अस्पष्ट आविष्करणाशिवाय चकित

करण्यासारखें कांहीं आहे असें वाटावयास नको. आजपर्यंत मराठी भाषा ही "आपुलिया बळें" वाढली व तिला परभृत् वृत्तीचा तिटकारा आहे हें अर्वाचीन लेखकांनीं लक्षांत ठेवल्यास हल्लींच्या अनुकरणवृत्तीस बराच आळा आपोआप बसेल.

काव्याच्या बाबतींत नांव घेण्यासारखा एखादा ग्रंथ गेल्या वर्षांत प्रसिद्ध झाल्याचें मला माहीत नाहीं. मासिकांतून किंवा वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणारीं लहानमोठीं पद्यें संकलित करून ग्रंथरूपानें रसिकांस उपलब्ध झाल्याशिवाय वाङ्मयसमालोचनांत त्यांचा योग्य परामर्ष घेणें दुरापास्त होतें. तथापि तांबे यांच्या कवितांचा द्वितीय खण्ड व माधव ज्युलियन् यांची कृति हीं अर्वाचीन काव्यपद्धतीचीं सुरस फळें रसिकांनीं चाखून पाहाण्यासारखीं आहेत.

अर्वाचीन कवींचा उल्लेख आल्यानंतर त्यांनीं उत्पन्न केलेल्या निर्यमक व सयमक कवितेच्या वादासंबंधीं अगदींच मुग्धता ठेवणें उचित नाहीं. माझ्या मतें हा वाद पुष्कळ अंशीं निरर्थक आहे. काव्याचा आत्मा यमकांत नाहीं, हें यमकबद्ध रचनेच्या कट्टया पुरस्कर्त्यांसहि मान्य होईल. संस्कृत कविता, बहुतेक प्रौढ आंग्ल कविता व इतर पाश्चात्य कविता निर्यमक आहे. त्यांचीं अवतरणें मोठ्या आदरानें देतांना व तोंडानें म्हणतांना जर कांहीं रसहानि झाली असें वाटत नाहीं, तर मराठी काव्य निर्यमक म्हणतांना रसहानीची भीति कां वाटावी याचें समर्पक उत्तर कोणाहि साहित्यविशारदास निदान सहजासहजीं तरी देतां येण्यासारखें नाहीं.

तथापि श्रेष्ठ कविसंप्रदाय हाच काव्यरचनेंतील बाह्यांगाचें नियमन करीत असतो हें तत्त्व लक्षांत घेतलें तर मराठी "काव्यादर्श" रचणारास यमकबद्ध रचना हें मराठी काव्याच्या बाह्यस्वरूपाचें प्रमुख लक्षण म्हणून मानावें लागेल. या परंपरेचें उल्लंघन करणारी पण मिल्टन, डँटी किंवा कविकुलगुरु कालीदास यांच्या प्रतिभासंपन्न प्रौढ काव्यांशीं आपल्या लालित्यानें, शुचितेनें व उदात्ततेनें स्पर्धा करणारी कृति जेव्हां रसिकांच्या समोर सादर होईल तेव्हां या कृतींतील सहजमनोहरता व आकर्षकता यांचा परिणाम निर्यमक कवितेविषयीं

परमादर उत्पन्न करील. तेथपर्यंत साहित्यज्ञांनीं मधून मधून कितीहि वाद-विवाद केले तरी काव्यांतील कर्णमधुर रचनेस चटावलेल्या नादप्रेमी—काव्य-प्रेमी लोकांतील यमकबद्धतेचा आग्रह नष्ट होणार नाहीं, प्रतिभासंपन्न कवीं-कडून जर परंपराविच्छेद झाला तर त्याकडे आपोआप दुर्लक्ष होईल. सर्व-संन्यास करून जगद्धितार्थ आत्मसमर्पण करणाऱ्या त्यागी महात्म्यानें अंगावर अत्यंत अल्प वस्त्र परिधान केलें तर तो त्याग भूषणावह मानला जातो. परंतु अहोरात्र गृहस्थाश्रमांत राहून ख्यालीखुशालींत दिवस काढणारा जर स्त्री-पुरुषमिश्रित समाजांत देहलज्जारक्षण करण्यापलीकडे विशेष पोषाख न करतां जाऊं लागला तर त्याला कृपण किंवा विक्षिप्त यांपैकीं कोणती तरी एक पदवी पत्करण्याची पाळी आल्यास त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहींच नाहीं.

तथापि या बाबतींत आणखीहि एक भाषेतिहासज्ञांनीं विचार करण्या-सारखा प्रश्न आहे. मराठी भाषा व वाङ्मय यावर सर्वत्र संस्कृत वाङ्मयाची छाप पडलेली दिसत असतां एवढ्या एका बाबतींतच तेवढें वैशिष्ट्य मराठी काव्यपद्धतींत कसें आलें? याचीं दोन कारणें असण्याचा सम्भव आहे. प्रथ-मतः आद्य मराठी कवींस आपलें काव्य सर्वतोमुखी होण्यास यमकबद्धतेचा उपयोग होईल असें वाटलें असावें, आणि संस्कृत काव्यरचनेंत ज्या काळांत प्रास, अनुप्रास, यमक, महायमक, विविधबन्ध वगैरे कृत्रिम रचना निर्माण होऊं लागली व त्या पद्धतीची लोकप्रियता अधिकाधिक दृष्टोत्पत्तीस यावयास लागली त्या काळांतच मराठींतून पद्यरचनेचा उपक्रम झालेला असावा. अर्थात्, अशा काळांत चन्द्रहार गळ्यांत घालून डौलानें चालणाऱ्या गीर्वाण-शारदेच्या सान्निध्यांत येऊं पाहणाऱ्या साध्या पण सरळ मायभाषेंतील मायाळू देवीच्या गळ्यांत निदान यमकाचें तरी मंगलसूत्र घालून तिला रसिकांच्या सभेंत पाठवावें असें तिच्या उत्कर्षाविषयीं तळमळणाऱ्या आद्य मराठी कवींस वाटलें असल्यास त्यांत आश्चर्यकारक असा कांहींच प्रकार नाहीं. अशा रीतीनें उपक्रम झाल्यानंतर काव्यप्रसार शीघ्रतेनें व सौकर्यानें होण्याचें साधन म्हणून त्या पद्धतीची जोपासना करण्यांत आली असावी. हरिदास, भजनमंडळी व गोंधळी वगैरेंच्या मुखानेंच मराठी पद्यमय वाङ्मयाचा प्रसार होणें शक्य होतें. या काळांतील संस्कृत ग्रंथांच्या प्रसाराचा मार्ग मराठी ग्रंथप्रसाराच्या

मार्गाहून भिन्न होता. लेखनकलेचा संकुचित प्रसार, गायनपद्धतीचा अवलम्ब करून ग्रंथपठण करण्याची पद्धति व मुद्रणकलेचा अभाव—अशा अडचणींतून ग्रंथास गतिमान् करण्यास त्यांतील यमकबद्धता बऱ्याच अंशीं कारणीभूत झाली असावी. किम्बहुना, यमकें हीं काव्याला लोकप्रियता गांठण्यास्तव सौकर्यानें चालना देणारीं स्वयंप्रेरक चाकेंच होत असें म्हटलें तरी चालेल. असा हा यमकांचा पूर्वेतिहास असावा अशी माझी निदान आज तरी समजूत आहे.नूतन कवींत ज्या प्रमाणांत काव्यप्रतिभा प्रकाशित झालेली दृष्टीस पडेल, त्याच प्रमाणांत त्यांच्या हातून होणारें पूर्व नियमोल्लंघन हें क्षम्य मानलें जाईल. ही गोष्ट जर यमकांचें बंधन तोडूं इच्छिणारे कवी लक्षांत घेतील तर निर्यमक व सयमक हा वाद कसा तुटेल हें आपोआप कळून येईल.

अशा रीतीनें गेल्या ३०–४० वर्षांत मराठी भाषा व मराठी वाङ्मय यांची प्रगति होत असतां कै. राजवाडे यांनीं मराठी भाषा मुमूर्षु आहे व ती मृत्युपंथास लागलेली आहे हें विधान थोडया वर्षांपूर्वीं एका संमेलनप्रसंगीं केल्यामुळें पुष्कळ साहित्यसेवकांच्या अन्तःकरणांत एक प्रकारची विवंचना उत्पन्न झालेली दिसूं लागली होती. कै. राजवाडे यांचें भाषाप्रावीण्य सर्वश्रुत व सर्वमान्य होतें. त्यांनीं आपल्या वयाचीं अखेरचीं कांहीं वर्षे भाषेतिहासाध्ययनांतच खर्चीं घातलीं असल्यामुळें तर त्यांच्या मताला अधिक अधिकारयुक्तता आली होती.परंतु त्यांच्या या मताचें साहित्यसंमेलनाचे मागील पुणें येथील अधिवेशनाचे अध्यक्ष प्रसिद्ध साहित्यभक्त माझे विद्वान् मित्र रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यानीं आपल्या भाषणांत सप्रमाण निराकरण केलें असल्यामुळें त्यासंबंधीं अधिक विवेचन करावयाची मला आवश्यकता वाटत नाहीं. कै. राजवाडे यांनीं " ज्ञानेश्वरी " प्रसिद्ध केल्यास फार वर्षे झालीं नाहींत. त्या ज्ञानेश्वरीला त्यांनीं जी विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना लिहिलेली आहे तींतून एक उतारा वाचून दाखवितों. कारण त्या उताऱ्यामुळें कै. राजवाडे यांनीं मराठीच्या भवितव्यतेसंबंधानें केलेलें भाकित कदाचित् त्यांच्यावर मृत्यूची छाया पडल्यामुळेंच न कळत त्यांच्या विचारसणीचा ओघ आपोआप बदलला गेल्यामुळें करण्यांत आलें असें वाटतें. तो उतारा येणेंप्रमाणें:—

"मराठ्यांना स्वभाषेचा इतका अभिमान वाटतो तो उगाच फुकाचा नाहीं, मराठींतल्या शब्दचातुर्याची बरोबरी पृथ्वीवरील इतर कोणत्याहि भाषेला करतां यावयाची नाहीं. तसेंच कोणताहि गूढ किंवा सूक्ष्म अर्थ नाना तऱ्हांनीं यथेष्ट व्यक्त करण्याची तिची शक्ति अप्रतिम आहे, शिवाय अनेक थोर प्रासादिक ग्रंथकारांनीं तिला आपल्या उदात्त, गंभीर, ललित व रम्य विचारांचे निवेदन केलें; तिच्यावरील महाराष्ट्रीयांची भक्ति शुक्लेन्दुवत् उत्तरोत्तर वर्धमान स्थितींत आहे."

हे मराठी भाषेच्या भवितव्यतेबद्दल उद्गार ज्या पंडितानें थोड्या वर्षांपूर्वी काढले, त्यानेंच ती भाषा मुमुर्षु स्थितींत आहे हें म्हणणें विसङ्गत आहे, हें निराळें सांगणें नकोच. या विसंवादित्वाची मीमांसा पूर्वींच केली असल्यामुळें यासंबंधानें अधिक विस्तार करण्याची आवश्यकता नाहीं.

ज्या मराठी वाङ्मयानें गीतामृताचें यथेच्छ पान केलें आहे व औपनिषद तत्त्वाचा अहोरात्र निदिध्यास केलेला आहे व पुढील पिढीला पान करण्यासाठीं ज्ञानेश्वरी व गीतारहस्य या दिव्य ग्रंथांतून गीतामृत धारण केलें आहे, तें वाङ्मय व ती मराठी भाषा व ते मराठे लोक अमर आहेत व अमर कृत्य करण्यासाठींच त्यांचा अवतार आहे असा माझा दृढ विश्वास आहे. मग एखादा भाषाशास्त्रज्ञ क्षणैकनैराश्याच्या झटक्यांत कांहीं कां म्हणेना! आजपर्यंत अनेकदां मराठीनें आपल्या निरनिराळ्या अवतारांत सर्व भरतखण्डभर आपलें प्रभुत्व स्थापित केलें असा पूर्वेतिहास आहे व पुढेंहि योग्य अवधींत ती आपलें वर्चस्व स्थापन करील असा माझा दृढ विश्वास आहे.

सद्गृहस्थहो, माझ्या भाषणांत आणखी कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांचा ऊहापोह करण्याचा माझा मनोदय होता. पण कालाचा विचार करतां तसें करण्यास आतां अवसर नाहीं असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. तथापि श्री. केळकरकृत टिळक चरित्राच्या शेवटल्या दोन खण्डांत सामान्यतः निरनुनासिक लेखनपद्धतीचें अवलंबन झाल्यामुळें व कांहीं पत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतून स्वरचिन्हांचें लिपींतील सद्यःस्वरूप अजिबात बदलून गेलेलें दिसावयास लागल्यामुळें चालू वर्षांत शुद्धलेखनसुधारणा व लिपिशुद्धि या प्रश्नाचा बराच ऊहापोह होत आहे. त्यासंबंधीं निदान थोडा तरी उल्लेख केल्यावांचून माझें

भाषण समाप्त करणें मला प्रशस्त वाटत नाहीं. प्रचलित शुद्धलेखनपद्धति सर्वथैव निर्दोष आहे असें मी म्हणूं इच्छित नाहीं. ऱ्हस्वदीर्घांचे अनेक प्रकार व अनुनासिकांचा प्रचार यामुळें मराठी लेखनपद्धतींत क्लिष्टता आलेली आहे. कांहीं मूलतत्त्वें व नियम निश्चित करून त्या पद्धतीनें इष्ट ते फेरफार घडवून ती पद्धति अधिक सुकर करतां येण्यासारखी आहे कीं नाहीं, याचा विचार होणें जरूर आहे असेंहि मला वाटतें. परंतु श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं संमेलनासारख्या मराठी भाषेच्या अभ्युदयार्थ प्रयत्न करणाऱ्या संस्थांपुढें असा प्रश्न उपस्थित करून त्यावर तज्ज्ञांचें कांहींतरी मत निश्चित होण्यापूर्वींच एका विशिष्ट पद्धतीचा सर्वमान्य ग्रंथांतून अवलंब करणें हें मात्र मला मान्य नाहीं. लेखनपद्धतींत बंडाळी करण्याचा मार्ग शिष्टलेखकांनीं एकदां घालून दिला म्हणजे आपल्या इच्छेनुसार वाटेल त्या पद्धतीचें अवलंबन करण्याची सामान्य लेखकांस अनावर इच्छा होण्याचा संभव असतो, व त्यामुळें जी अनवस्था होईल तिचे परिणाम वाङ्मयास विघातक होण्याची शक्यता अधिक आहे. श्री. तात्यासाहेबांसारख्या निस्सीम साहित्यभक्तानें निरर्थक किंवा निष्कारण प्रचलित पद्धतीचा त्याग केला असेल असें मला वाटत नाहीं. त्यांच्याजवळ ही क्रान्ति आवश्यक आहे, असें सिद्ध करण्यास अनेक बलवत्तर कारणें व प्रमाणें असतील यांत शंका नाहीं. परंतु कांहीं शिष्टनिर्णय व्यवस्थित व सांगोपांग चर्चा होऊन नंतर नवीन पद्धतीचा उपक्रम करणें हाच भाषाभ्युदयाच्या दृष्टीनें शिष्टसंमत व कण्टकरहित मार्ग होय असें मला म्हणावें लागतें. शिक्षणाचा प्रसार आतां बराच झालेला आहे व लेखनव्यवसाय करणारा वर्ग एखाद्या विशिष्ट स्थितींतील किंवा भागांतील लोकांतच कोंडून राहिलेला नाहीं. उच्चारानुसार भाषा लिहिण्याच्या मोहास बळी पडल्यास महाराष्ट्रीयांच्या प्रांतिक भाषेतील पद्धतींत प्रत्येक जिल्हानिहाय व ज्ञातिनिहाय भेद दृष्टीस पडूं लागतील, व मराठी भाषा बोलणाऱ्या जनतेस एकभावनेच्या सूत्रानें ग्रथित करणाऱ्या सरस्वतीदेवीच्या मंदिरांतहि पंक्तिप्रपंचास प्रारंभ होईल, व वाङ्मयाचा उद्देश निष्फळ होईल. या परिषदेंत या प्रश्नाची गंभीर रीतीनें चर्चा होऊन कांहींतरी निर्णय देण्यांत यावा,

अशी माझी प्रतिनिधींस आग्रहाची सूचना आहे. लिपिशुद्धीचा प्रश्न थोडयाशा निराळ्या स्वरूपाचा आहे. छापखान्याच्या मालकांस जर नवीन पद्धति ही कमी खर्चाची आहे असें दिसून आलें, तर कांहीं थोडया संपादकांनीं सुरू केलेला उपक्रम अल्पावधींत सार्वत्रिक होईल. स्वतंत्र स्वर लिहितांना त्यांचें स्वतंत्र चिन्ह न वापरतां एका प्रकारासच कांहीं खूण करून निर्वाह केल्यास थोडींशीं स्वतंत्र चिन्हें लुप्तप्राय होण्यापलीकडे फारसें नुकसान नाहीं हें खरें. परंतु याहि प्रश्नाचा इतर साधकबाधक दृष्टीनें विचार करतां येण्यासारखा आहे, व निव्वळ अर्थशास्त्रदृष्टया लिपीचा विचार केल्यास रोमन लिपीसारख्या लिपीच्या हक्काचा विचार करण्याची आपत्ति संमेलनावर ओढवण्याचा संभव आहे. पुनः नागरी लिपी सर्व प्राकृत भाषांनीं स्वीकारावी हा प्रयत्न कांहीं वर्षांपासून सुरू आहे. अशा वेळीं नागरी लिपींतील वर्णमालेंत ढवळाढवळ करणें इष्ट आहे कीं नाहीं याचाहि विचार या प्रश्नाबरोबरच व्हावयास पाहिजे. विचारांच्या या निरनिराळ्या तऱ्हांचें केवळ दिग्दर्शन करण्यापलीकडे विस्तारानें कांहीं सांगण्यास मला अवसर नाहीं, म्हणून या प्रश्नाची संभावना मी एवढया विचारावरच करितों.

अखिल भरतखंडांतील प्राकृत भाषांत एकेकाळीं अग्रेसरत्व संपादन केलेल्या आपल्या या मायभाषेला हल्लींची अपकृष्टावस्था संपून आत्यंतिक उत्कर्ष स्थिति प्राप्त करून देण्याच्या साधनांचा योग्य विचार या संमेलनांत होईल व ग्वाल्हेरकरांनीं पूर्व इतिहासांत जो मराठयांचा लौकिक सर्व भरतखंडभर पसरण्याचें कार्य करून आपलें नांव हिंदुस्थानांत अजरामर करून ठेविलें आहे त्या कीर्तींत भर घालण्यासारखें नवीन कार्य या संमेलनांतील विचारविनिमयामुळें वाङ्मयक्षेत्रांत घडून येईल, अशी आशा प्रदर्शित करून व शांतपणें माझें भाषण ऐकून घेतल्याबद्दल आपले कृतज्ञतापूर्वक आभार मानून मी हें लांबलेलें भाषण संपवितों.

---

# वऱ्हाडची सर्वपक्षीय परिषद*

अकोल्यास सर्वपक्षीय वऱ्हाड प्रांतिक परिषद ता. २८–१०–२८ रोजीं भरली होती. त्यावेळीं अध्यक्ष श्री. अणे यांचें झालेलें भाषण—

## सायमन कमिशनवरील बहिष्कार !

स्वागताध्यक्ष व सद्‌गृहस्थहो, आजच्या परिषदेवर असा आक्षेप घेण्यांत आला कीं, ही परिषद सर्व पक्षांस विचारून भरविण्यांत आली नाहीं. आज अस्तित्वांत असलेल्या पक्षांत अनेक उपपक्ष निर्माण झाले असल्यानें, सर्वच पक्षांस परिषद बोलविण्याबद्दल विचारणें शक्य नव्हतें. एखाद्या पक्षास परिषद भरण्यापूर्वी विचारलें नसलें, तरी त्या पक्षाचा प्रतिनिधित्वाचा व स्वमतप्रदर्शनाचा हक्क नष्ट होत नाहीं. आजची परिषद सर्वपक्षीय असल्यानें या परिषदेचें अध्यक्षस्थान मिळणें, मला अभिमानाची गोष्ट वाटते. आजच्या परिषदेपुढें येणाऱ्या प्रश्नांचे राष्ट्रीय व प्रांतिक असे दोन भाग पडतात. राष्ट्रीय प्रश्नांपैकीं सायमन कमिशनवरील बहिष्कार व नेहरू कमिटीचा रिपोर्ट, या दोन महत्त्वाच्या बाबी आहेत. सायमन कमिशनवर बहिष्कार टाकण्याची गोष्ट आतां ठरून गेली आहे. बहिष्काराच्या कारणांची चर्चा होऊन गेली, ठराव पास झाले, त्यांची अंमलबजावणीहि झाली. कमिशननें व त्याच्या भक्तांनीं लोकमत आपणास अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न केला पण तो फसला. सायमनसाहेबानीं जाहीर केलें कीं, कमिशनला लोक प्रतिकूल नाहींत. मूठभर चळवळे विरुद्ध आहेत एवढेंच ! कमिशनपुढें आलेले पांचशें मेमोरॅन्डमूस, सौजन्यामुळें दिलेलीं मेजवान्यांचीं निमंत्रणें, व प्रांतिक कमेटयांची निवड, या गोष्टींचा पुरावा कमिशनच्या लोकप्रियतेबद्दल देण्यांत येतो ! हा पुरावा काय किंमतीचा आहे हें आपणांस माहीतच आहे.

## सोळा सभासदांची खोगीरभरती

कमिशननें आपल्या मनाची याबाबत भुरळ करून घेतली आहे. कारण मनाची भुरळ करून घेतल्याशिवाय, बिकट परिस्थितींत निभाव

---

* ' प्रजापक्ष ' अकोला ता. ४–११–२८

लागत नाहीं. तेव्हां कमिशनर्सना भुरळ पडली असली, तरी आपणांस भुरळ पडण्याचें कारण नाहीं. निरनिराळ्या प्रांतांत कमेट्या नेमल्या गेल्या म्हणून फुशारकी मारण्यांत येते, पण हे सोळा जण म्हणजे नाटकांतील खोगीरभरती आहे. आठपैकीं सात प्रांतांनीं कमेट्या नेमिल्या. कौन्सिल ऑफ स्टेटनेंहि आपले प्रतिनिधी निवडले, पण सरकारची, असेंब्लीपुढें सभासद निवडण्याचा विषय विचारासाठीं आणण्याची, हिंमत झाली नाहीं. असेंब्लींतून पांच सभासद घ्यावयाचे, पण तेहि पुरते न मिळतां चारच मिळालेले दिसतात. आतां, या प्रांतिक कौन्सिलांतील कमेट्या, सरकारी, सरकारनियुक्त व कांहीं लोकनियुक्त सभासदांच्या मतामुळें नेमिल्या गेल्या आहेत. लोकनियुक्त सभासदांतील बहुमत विरुद्धच राहिलें. आतां सरकारी व सरकारनियुक्त सभासदांचा मतदारसंघ म्हणजे हिंदुस्थानसरकार होय! हाच एक मतदारसंघ कोठें दहा तोंडानें, तर कोठें पंधरा तोंडानें बोलतो. अहीमही रावणाला जशीं कमीजास्त तोंडें होतीं, तसा कमीअधिक तोंडाचा हिंदुस्थानसरकार हा प्राणी आहे. निरनिराळ्या ठिकाणीं, निरनिराळ्या तोंडांनीं बोलणारा हा निर्जीव प्राणी ब्रिटिश सरकारचा प्रतिनिधि आहे.

## नऊदशांश मत प्रतिकूल!

मी म्हणतों त्याप्रमाणें या कमिट्यांची परीक्षा केली, तर या कमिट्या नेमण्यास देशांतील मतदारांपैकीं, फार तर एक दशांश अनुकूल होते व नऊ दशांश प्रतिकूल होते, हें कबूल करावें लागेल! अनुकूल मत देणाऱ्या लोकनियुक्त सभासदांच्या पाठीशीं असणाऱ्या मतदारांच्या संख्येचें प्रतिकूल मत देणाऱ्या सभासदांच्या पाठीशीं असलेल्या मतदारांच्या संख्येशीं हेंच प्रमाण पडेल! असो. अशा प्रकारें बहिष्कार टाकण्याचें निश्चित ठरलें असल्यानें, तो अमलांत आणण्याची आपल्यावर जबाबदारी येऊन पडली आहे. असेंब्लीचा ठराव धाब्यावर बसवून, सरकारनें कमेटींत पांच सभासद नेमिले. सरकार असें पाप करीतच आलें आहे. पण मला या सर्व प्रकारांत वाईट याच गोष्टीबद्दल वाटतें कीं, हे पांच सभासद या पापास मदत करावयास तयार झाले आहेत. या पांच जणांत आपल्या वऱ्हाड मध्यप्रांतां

तील एक सभासद डॉ. गौर आहेत. कमेटीवर जाऊन, त्यांनीं असेंब्लीचा, राष्ट्राचा व आपल्या मतदार संघाचा अपमान केला, या गोष्टीचा त्यांच्या मतदारसंघानें विचार करावा. आपली परीक्षेची वेळ पुढील जानेवारी अगर मार्च महिन्यांत येईल. तेव्हां साक्षी न देणें, कमेटी न देणें या गोष्टी अवश्य आहेत. या कामीं धोकेबाजी होणार नाहीं अशी खबरदारी मतदारांनीं घेणें अवश्य आहे.

## मध्यप्रांतहि बहिष्कारास अनुकूल

इतर प्रांतांपेक्षां आपल्या प्रांताची स्थिति अनुकूल आहे. सरकारची कमेटी नेमण्याची सूचना आणण्याची हिंमत नाहीं. कौन्सिलच्या ठरावाची दोघांहि दिवाणांनीं अमलबजावणी केली आहे. आपण सायमन् कमिशनबाबत, कौन्सिलनें केलेल्या ठरावाबरहुकूम कसें वागलों, हें रा. रामराव देशमुख यांनीं जाहीर केलें आहे. आणि ना. रावहि या ठरावाप्रमाणें वागत असल्याबद्दल हितवाद पत्र ग्वाही देत आहे. संशयाला जागा राहूं नये म्हणून ना. राव हे या बाबतींत जाहीर खुलासा करते तर अधिक बरें होतें. प्रांतांतील मुसलमान सभासदांचेंहि धोरण प्रतिकूल दिसत नाहीं व अशा प्रकारें सर्व बाजूंनीं आपल्या प्रांताची स्थिति बहिष्कारास अनुकूल अशीच दिसते. राष्ट्रीय दृष्ट्या दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे नेहरू रिपोर्ट होय. सायमन् कमिशनच्या रूपानें आलेल्या आपत्तीमुळें निरनिराळे धार्मिक व राजकीय पक्ष एकत्र होऊं शकले, व त्यामुळेंच देशाची एकमुखी मागणी मांडण्याचा प्रयत्न होऊं शकला. डॉ. बेझंट यांनीं पांच सहा वर्षें या दृष्टीनें प्रयत्न केला पण त्याला यश आलें नाहीं, पण या राष्ट्रीय आपत्तीमुळें नेहरू कमिटीचा रिपोर्ट होऊं शकला. लखनौच्या सर्वपक्षीय परिषदेनें तो मंजूर केला व ठिकठिकाणच्या सभांनीं व प्रातिनिधिक संस्थांनीं त्यास पाठिंबा दिला. पुढें भरणाऱ्या कन्व्हेंशन्मध्यें हा रिपोर्ट पास होईल.

## विरोधाचीं दोन टोकें

आज दिसणारी एकी दृढतर होणें अवश्य आहे. लखनौला हा ठराव पास झाल्याबरोबर सरकारच्या मनाची चलबिचल झाली. सरकारी उत्तेजनामुळें किंवा जात्या उच्छृंखलपणामुळें या ठरावाला विरोध होत आहे. या

विरोधाचीं दोन टोकें आहेत. एका टोंकावर निर्मळ स्वातंत्र्यवादी आहेत, तर दुसऱ्या टोंकावर जात्याभिमानी आहेत. या दुसऱ्या लोकांमध्यें कांहीं मुसलमान मोडतात. एका मुसलमान गृहस्थानें कमिशनपुढें साक्ष देतांना संयुक्त मतदार संघ निर्माण केले तर 'चांगला मुसलमान निवडून येणार नाहीं' म्हणून सांगितलें व जो आपल्या जातीचेंच सर्वथैव हित पाहील तो चांगला मुसलमान होय, म्हणून सांगितलें. या असल्या प्रकारचेच लोक निवडून आल्यानंतर ते आपल्या कौन्सिलच्या कारकीर्दीत अमक्या खात्यांत हिंदु नोकर किती व मुसलमान नोकर किती असले प्रश्न विचारण्याव्यतिरिक्त दुसरीं कामें करतांना दिसत नाहींत. खरोखर पाहिलें असतां कौन्सिलच्या कामांत जातिविषयक एखादाच प्रश्न उत्पन्न झाला तर व्हावयाचा. तेव्हां हे जातिविशिष्ट हेतू सोडिले तर चांगल्या मुसलमानास हिंदूकडून निवडून येण्यास किंवा हिंदूस मुसलमानाकडून निवडून येण्यास हरकत पडूं शकत नाहीं, हें लोकलबोर्डाच्या व म्युनिसिपल कमेटयांच्या निवडणुकीवरून दिसून आलें आहे. तेव्हां दोन्ही जातींत प्रेम, ऐक्य व सलोखा उत्पन्न करण्यास संयुक्त मतदार संघ अवश्य आहे. शिवाय त्यामुळें राष्ट्रीय कार्याचें महत्त्व अनायासें लक्षांत घेतलें जाणार आहे.

## स्वतंत्रतावाद्यांचा विरोध

आतां स्वातंत्र्यवाद्यांच्या विरोधाचा विचार करूं. त्यांना आपलें ध्येय कायम ठेवून या कामीं लक्ष घालतां येईल. या रिपोर्टांत त्यांच्या ध्येयाला विघातक असें कांहीं नाहीं. बदललेल्या काळाकडे डोळेझांक करून चालणार नाहीं. सायमन कमिशनवर बहिष्कार टाकण्याची गोष्ट प्रथम नेमस्तांनींच काढिली. बार्डोलींतहि त्यांनीं सत्याग्रह्यांना सहानुभूतीचें आश्वासन दिलें आणि या ऐक्याच्याच दृष्टीनें हा रिपोर्ट झाला आहे. तेव्हां, डोमिनियन स्टेटस् म्हटल्यानें बुजण्याचें कारण नाहीं. आज ज्या ज्या देशाला डोमिनियन स्टेटस् आहे त्या त्या देशाचीहि राज्यघटना, त्या त्या देशानें केली व पार्लमेंटनें ती मान्य केली. डोमिनियन् स्टेटस् म्हटलें, तरी राज्यघटना त्या देशानें करून, पार्लमेंटला स्वतःच्या हिंमतीवर मान्य करावयास लावावी लागते.

## डोमिनियन स्टेटस व रिस्पॉन्सिबल गव्हर्नमेंट

लाथ मारून व भांडून मिळविलेली घटना, ती डोमिनियन् स्टेटस्,व पार्लमेंटनें खुषीनें व मेहेरबानीनें दिलेलें तें रिस्पॉन्सिबल् गव्हर्नमेंट, असा कोणी अर्थ केल्यास तो चुकीचा होणार नाहीं. तेव्हां या दृष्टीनें, स्वातंत्र्यवाद्यांनीं या रिपोर्टाचा विचार केला पाहिजे. आतां आपल्या प्रांतिक विषयांचा विचार करूं.

## लॅण्ड रेव्हिन्यू कोड

आणखीं कोणत्या कारणाकरितां नसलें, तरी सेटलमेंट्चीं तत्त्वें कायद्यांत ग्रंथित करण्याची संधि, लॅण्ड रेव्हेन्यू कोडमुळें वऱ्हाडास आली याबद्दल मला आनंद वाटतो. इतर कोणत्याहि प्रांतास ही संधि मिळालेली नाहीं. एखादा लाडका आणि अबोल बाप्या ओ म्हणाल्याबरोबर आनंद व्हावा, त्या प्रकारचा हा आनंद आहे. सरकारनें सारावाढ करविण्याचें ठरविलें, पण ज्या तत्त्वांवर व ज्या गोष्टीवर ही वाढ करावयाची, त्याबद्दल सरकारी दप्तरांत कांहींच माहिती नसून, सरकारी अधिकाऱ्यांनीं आपल्या तर्कानें 'हवेंत बंगले' बांधण्यासारखें वर्तन केलें आहे. मात्र सारा घेण्याच्या व सारा आकारणीच्या तत्त्वाची चर्चा करण्याची टाळाटाळ करण्यांत आली आहे.आमचें म्हणणें हें कीं

## साऱ्याची मर्यादा निव्वळ नफ्यावर ठरवा.

सारा ठरवितांना कर्जाच्या बोजाचा विचार करा.पण असें करावयाचें टाळून शेतकऱ्यांना खर्च कसा करावा हें कळत नसल्यानें,हें कर्ज होतें म्हणून सांगण्यांत येतें. ली कमिशनपुढें स्वतःस मिळणारे सहा हजार रुपये खर्चास पुरत नाहींत, म्हणून ओरडा करणाऱ्यांना शेतकऱ्यांस खर्च कसा करावा हें कळत नाहीं असें म्हणावयाची लाज वाटली पाहिजे. आज परिस्थिति अशी आहे कीं, शेतकरी आपल्या मजुरीची किंमत करीत नाहीं. स्वतः उपाशी राहून शेताचे मक्ते देतो. म्हणून साऱ्याचें ठराविक प्रमाण ( स्टॅन्डर्ड् युनिट् ) ठरवा असें आमचें म्हणणें होतें, तें टाळून या कायद्यांत फक्त चौकशीचा मामुली फार्स करण्याची सवड ठेविली आहे एवढेंच! जमिनीच्या वाढलेल्या भावाकडे पाहण्यांत येतें, पण अवश्य लागणाऱ्या वस्तूंच्या वाढलेल्या भावा-

कडे कोणी पाहात नाहीं. सरकारच्या अशा हट्टी धोरणामुळें कायमधाऱ्याची मागणी करणें इष्ट होईल असें वाटतें.वऱ्हाडांत सेट्लमेंट् सुरू झालें,त्यावेळीं लोकांनीं विरोध केला असतां, सरकारनें असें आश्वासन दिलें होतें कीं, नव्या कायद्यानें तत्त्वांत कांहीं फरक झाला तर त्याचा विचार करूं. नव्या कायद्यांत असें एक कलम आहे कीं, सेटलमेंट्च्या ऑफिसरच्या रिपोर्टाचा तालुका-बोर्ड मेंबरांनीं विचार करावा व या दोघांचा रिपोर्ट सरकारकडे पाठविल्या-नंतर,सरकारनें अखेर निर्णय करावा. तेव्हां हा कायदा गतकालव्यापी करून, अलीकडे झालेल्या सारावाढी बाबतच्या कायद्याप्रमाणें, सरकारनें निकाल देणें अवश्य आहे.

## नझूलचें बंड

जुन्या लँड रेव्हिन्यू कोडप्रमाणें शहरांतील पडित जागेवर कर बसविण्याचा सरकारला अधिकार आहे, असे मला कोणी म्हटलें असतें तर मीं त्याला वेडा म्हटलें असतें. पण आतां पाहावें तर या कायद्याच्या नांवाखालींच कर बसविण्याचा प्रयत्न होत आहे. मोजणी करण्यासाठीं म्हणून नझूल आलें. लोकांना वाटलें कीं बरें झालें, भांडणाचा मार्ग बंद होईल. पण पाहावें तों आतां निराळाच प्रकार दिसतो. निदान खिंडारांच्या बाबतींत तरी विश्वासघातासारखी गोष्ट झाली आहे. शहरच्या लोकांनीं या बाबतींत शक्य तो विरोध करून बार्डोलीच्या लोकांची नक्कल म्हणून शेतकऱ्यांना उदाहरण घालून द्यावें.

## बेरार लेजिस्लेटिव्ह कमेटी

वऱ्हाडचा प्रश्नहि सोडविणें अवश्य आहे. आमच्या लेजिस्लेटिव्ह कमिटीची सत्ता कायदेकौन्सिलाइतकी तरी करून घ्यावी अशी माझी सूचना आहे. गव्हर्नरला व्हेटोच्या अधिकारानें सगळा कायदा फेकून देतां येतो. पण एका कलमाच्या ऐवजीं आपल्या लहरीप्रमाणें दुसरें विपरीत कलम घुसडतां येत नाहीं.आजची लेजिस्लेटिव्ह कमेटी कोणताच अधिकार नसलेली संस्था आहे. दिवाणगिरीचा प्रश्नहि आपल्या मनांत येत असेल. खरोखर दिवाण या प्रांताचा पाहिजे कीं, त्या प्रांताचा पाहिजे, हा प्रश्न नसून तो लायक आहे

किंवा नाहीं, व त्याजवर लोकांचा विश्वास आहे कीं नाहीं याचा विचार केला पाहिजे. पक्षाची शिस्त न पाळणारा माणूस स्वतःच्या पक्षासच पेचांत आणूं पाहतो, तेव्हां असा माणूस नव्या पक्षाला तरी कितपत मानील, हा विचार नव्या पक्षानें करावा. माझी खरी तक्रार सर मॉन्टेग्यु बटलरविरुद्ध आहे. त्यांनीं दिवाणांच्या निवडीचा विचार करतांना, त्यांच्या मागे लोकमताचा पाठिंबा किती आहे, याचा विचार करावयास पाहिजे होता. असो. दिवाणावर विश्वास आहे किंवा नाहीं, या प्रश्नाचा निकाल लावण्याचें योग्य स्थळ कौन्सिल होय. आणि तेथेंच या प्रश्नाचा निकाल लागलेला बरा, असें मला वाटतें.

---

# ब्रिटिश साम्राज्यशाहीचा नायनाट करूं या !*

लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत पब्लिक सेफ्टी बिलाला विरोध करतांना ७ फेब्रुवारी १९२९ रोजीं श्री. अणे म्हणाले:—

या बिलाची चर्चा मागील व चालू बैठकींत भरपूर झाली आहे. आतां नवीन सांगण्यासारखें कांहींच नाहीं. परंतु या बिलासारखा कायदा कोणत्याच सुसंस्कृत देशाच्या कायदेबुकांत सांपडणार नाहीं, असें जें कित्येक लोकपक्षीय सभासदांनीं म्हटलें, तें खोडून काढण्यासाठीं, मि. कॉसग्रेव्ह यांनीं लायब्ररींतील पुस्तकें धुंडाळून ऑस्ट्रेलियांत थेट असाच कायदा अस-ल्याबद्दल माहिती पुढें मांडिली आहे. त्याचा समाचार घेणें मला जरूर वाटतें. मि. कॉसग्रेव्ह यांच्यावर आज दोन दिवस टीकेचा भडिमार सुरू आहे. त्यांतच मीहि एक बाण सोडतों.

### कायद्यांतील मोघम भाषा

बिलकूल कठोर नाहीं. मि. कॉसग्रेव्ह हे पक्के खेळाडू वृत्तीचे आहेत. ते दोन झपाटे देतील व हांसत हांसत घेतीलहि ! मि. कॉसग्रेव्ह यांचीं विधानें दिवाण चम्मनलाल, रंगस्वामी अय्यंगार, व पं. मोतीलाल यांनीं खोडून काढिलींच आहेत. मि. कॉसग्रेव्ह व सर व्हिक्टर ससून यांच्या हें लक्षांत

---

*'महाराष्ट्र' नागपूर १७ फेब्रुवारी १९२९

आलें नाहीं कीं, या बिलाला आम्ही जो विरोध करितों, तो सरकारला हद्दपारी करण्याचा मुळींच हक्क नसावा या मुद्यावर करीत नाहीं. जो मनुष्य "मालमत्तेच्या मालकी हक्कांत गैरकायदा अडथळा आणण्याची खटपट करीत असेल" त्याच्यावर या कायद्याचा प्रयोग होणार आहे. ही मोठी खुबीदार व मोघम शब्दरचना आहे. ही रचना मात्र, नोकरशाहीनें आपल्या डोक्यांतून काढिली आहे खरी! या शब्दाचें आकलन मानवी बुद्धीस होण्याजोगें नाहीं. तसेंच संघाच्या वगैरे मदतीसाठीं, बाहेर देशांतून येणारा पैसा, पार्सलें, नोटा इत्यादि जप्त करण्यासंबंधाचें कलम हेंहि अद्भुतपूर्वच आहे. या कलमाचा अर्थ काय होतो, तो पं. मोतीलाल यानीं स्पष्ट करून दाखविलाच आहे. पण त्यांनीं केलेली फोड युरोपियन सभासदांना समजलेली दिसत नाहीं.

## पैसा मधल्यामध्येंच जप्त करणार

या कलमान्वयें पैसा पाठविणारा किंवा घेणारा, यांपैकीं कोणालाच हा पैसा वाटेंत जप्त झाला, गडप झाला याची बातमी कळविण्यांत येणार नाहीं असें दिसतें. मग त्यानें या कायद्यांत सांगितल्याप्रमाणें, तक्रार किंवा अपील तरी कसें करावयाचें? तुम्हाला वाटतें कीं, सिलेक्ट कमेटींत या दुरुस्त्या करतां येतील, पण लक्षांत ठेवा कीं, बिलाचें सर्व स्वरूप सिलेक्ट कमेटीला पालटतां येणार नाहीं. पैसे जप्त करण्याचें कलम हें सरकारला कोणत्याहि देशाचा व्यापारी संबंध तोडून टाकण्याविषयींहि लावितां येईल! या देशांत 'कम्युनिस्ट' आहेत असा सरकारला संशय आला म्हणजे झालें! पण कायदेपंडितांनीं अर्थ केल्यावर कायदा पास करणें न करणें हें इतराच्यांहि हातीं आहे कीं नाहीं? समजा, परदेशांतून येणाऱ्या रकमांबद्दल सरकारला नुसता संशय आला तरी सरकार त्या रकमा जप्त करून त्या देशाशीं व्यवहार बंद करू शकेल! त्यामुळें व्यापाराला किंवा व्यवहाराला सुरक्षितता राहणार नाहीं. इंग्लंडलासुद्धां आज रशियाशीं सर्व संबंध तोडून टाकावयाचा असेल म्हणून हें बिल पुढें आलें आहे. तें हिंदुस्थानच्या फायद्यासाठीं नसून इंग्लंडच्या सोयीसाठीं असावें असें वाटतें. म्हणून पैसा जप्त करण्याच्या कलमालाहि माझा विरोध आहे.

## हा दडपशाही कायदा कसा नव्हे !

किनी साहेब म्हणतात कीं, हा कांहीं दडपशाही कायदा नव्हे ! याला पं. नेहरूंनीं सणसणीत उत्तर दिलेंच आहे, परंतु मीहि एक सूचना करतों कीं, मि. किनी यांनीं हा कायदा दडपशाही नसल्याबद्दल जो अपूर्व शोध लाविला आहे, तें संशोधन त्यांनीं पुढें चालू ठेवावें. रौलट् रिपोर्ट त्यांनीं वाचला तर हा कायदा दडपशाही आहे कीं नाहीं याबद्दल त्यांची समजूत पटेल. दडपशाही कायदेकमेटी पूर्वीं नेमिली गेली होती. तीवरहि बरेच तज्ज्ञ कायदेपंडित होते, त्यांचा रिपोर्ट किनी साहेबांनीं वाचला तरीहि दडपशाही कायद्याची व्याख्या त्यांना समजेल. ज्या फौजदारी कायद्यालाहि सामान्य प्रोसीजर लागू पडत नाहीं, तो दडपशाही कायदा होय असें तज्ज्ञ म्हणतात. सारांश, किनी साहेबांचें संशोधन पुरें झालें म्हणजे मग त्यांनीं 'असेंब्ली'ला दडपशाही कायदा कोणता, व कोणता नव्हे हें सांगावें. तोंपर्यंत त्यांचा सल्ला कोणी ऐकणार नाहीं. किनी साहेबांचा दुसरा मुद्दा असा कीं, "असले कायदे दुसऱ्या देशांत असोत वा नसोत, हिंदुस्थानच्या परिस्थितींत जर असले कायदे जरूर असले तर ते केले पाहिजेत." याला त्यांनीं कांहीं उदाहरणेंहि दिलीं आहेत. त्यांपैकीं बंगालच्या 'रेंट् लॉ'चें उदाहरण तर अगदींच गैरलागू आहे. तो कायदा ईस्ट इंडिया कंपनीनें केलेल्या चुकीच्या नियमाची दुरुस्ती म्हणून १८४५ त करावा लागला. या देशांत शेतकऱ्यांना जमिनीच्या मालकीचा हक्क प्राचीन काळापासून आहे. हा हक्क कंपनीनें जबरीनें बळकाविला होता. त्याची थोडीशी दुरुस्ती 'रेंट लॉ'नें केली आहे.

## आजचें सरकारच कम्युनिस्ट

कम्युनिस्ट लोक जमिनीवर मालकी राष्ट्राची असावी असें म्हणतात. म्हणून त्यांस दोष देण्यांत येतो, पण ते जें तत्त्व उपदेशितात, तें ब्रिटिश-सरकारनें या देशांत आधींच अमलांत आणिलें आहे. राज्यकर्तेच शेताचे मालक हें तत्त्व हिंदुस्थानांत कधींच अस्तित्वांत नव्हतें. पण ब्रिटिश सरकार हल्लीं, आपणांस येथील सर्व जमिनीचे मालक समजत आहे. या देशांत कायदेमंडळें नव्हतीं, व लोकांचें मत कायदे करण्यांत घेतलें जात नव्हतें,

तेव्हांच सरकारनें एका वटहुकुमानें सर्व जमीन आपल्या मालकीची ठरविली; व शेतकऱ्यांना केवळ उपरी कुळें बनवून सोडिलें. सरकार स्वत: अशा प्रकारें वागलें असतां व वागत असतां, कम्युनिस्टांनीं तेंच तत्त्व प्रतिपादिलें म्हणून घाबरून जाण्याचें काय कारण? निदान तुम्हाला तरी कम्युनिस्टांना मज्जाव करण्याचा नैतिक हक्क कांहींच पोहोंचत नाहीं. या मुद्यावर जास्त बोलण्याची जरूरी नाहीं. पण मालकी शाबीत करण्याचा जेव्हां जेव्हां प्रयत्न केला, तेव्हां तेव्हां इंग्रज सरकारला राग येऊन, त्यानें या प्रयत्नास विरोधच केला आहे हें मात्र जातां जातां सांगून टाकतों.

## तुम्हीं वऱ्हाडांत काय केलें?

परवां नुकतांच वऱ्हाडांतील कायदेकारी मंडळानें (लेजिस्लेटिव्ह कमेटीनें) जमिनीवर शेतकऱ्याचीच मालकी असावी असा नियम केला होता, पण खुद्द हिंदुस्थानसरकारनें, त्या मंडाळाचा रिपोर्ट दोनदां झिडकारून आपल्या अधिकारांत "शेतकरी मालक नव्हे, कुळ आहे" असा नियम लागू केला आहे. अर्थात्, हा प्रश्न या बिलाच्या बाबतींत उद्भवत नाहीं, पण ना. किनी यांनीं, जमिनीच्या कायद्याचें उदाहरण येथें दिलें, म्हणून मला उत्तरादाखल हा खुलासा करणें भाग पडलें इतकेंच! मी कांहीं त्या कौन्सिलचा सभासद नाहीं. असतों तर उत्तर दिलें असतें. आमचा विरोध फक्त, ज्या-प्रकारें ही हद्दपारीची शिक्षा देण्यांत येणार, त्या प्रकाराला आहे. या बिलांत, कायद्याच्या मूलतत्त्वांना विरोधी अशीं तीन कलमें आहेत. या बिलाप्रमाणें जें नवें कोर्ट सरकारकडून स्थापिलें जाणार

## तसें कोर्ट जगांत अपूर्व व अजब आहे!

तसलें कोर्ट आस्ट्रेलियन कायद्यांत आहे, असें कॉंग्रेव्ह दाखवूं शकतील काय? या कोर्टापुढें, चौकशीची जी पद्धति सुचविण्यांत येत आहे, तीच ऑस्ट्रेलियांत 'इमिग्रेशन् लॉ'अन्वयें चालू आहे काय? या बिलाप्रमाणें ज्या आरोपीला हद्दपार करावयाचा त्याच्याविरुद्ध काय आरोप आहे, किंवा कोणत्या माहितीवर सरकार त्याला हद्दपार करणार, हें त्याला कळविण्यांत येणार नाहीं! यांत सर व्हिक्टर ससून यांना कांहींच गैरशिस्त दिसत नाहीं.

पण त्यांना न्याय व कायदा यांच्या मूलतत्त्वांचीहि ओळख दिसत नाहीं. सर व्हिक्टर ससून हे मोठे हुशार धंदेवाले असतील, पण कायद्याच्या मूलतत्त्वासंबंधीं ते अत्यंत अनभिज्ञ आहेत. त्यानीं लहान तोंडीं हा मोठा घांस घ्यावयाचा नव्हता ! असो. आस्ट्रेलियाच्या कायद्यांत विशिष्ट 'प्रोसीजर' सांगितलेलें नाहीं. याचा अर्थ इतकाच कीं, तें प्रोसीजर नेहमींप्रमाणेंच असेल ( तेथें आरोपीला आपल्यावर आरोप कोणता, व त्याबद्दल पुरावा काय हें कळविण्यांत येत असले पाहिजे ). दुसरा मुद्दा असा—

## सर डेनिस यांचें शब्दावडंबर

आतां सर डेनीस ब्रे काय म्हणाले तें पाहूं ! सर डेनीस ब्रे हे नेहमीं खोल बुद्धीचीं भाषणें असेंब्लींत करतात, असा त्यांचा लौकिक आहे. त्यांच्या भाषणांचा व शब्दांचा झोक सामान्य बुद्धीच्या माणसाच्या एकदम लक्षांत येत नाहीं. पण या बिलावर त्यांचीं जीं दोन भाषणें झालीं, त्याच्यासंबंधीं आपलें काय मत झालें ? शब्दावडंबराच्या पांघरुणाखालीं, सयुक्तिक कारणांचा अभाव त्यांनीं झांकून नेला, असें तुम्हांस वाटलें नाहीं काय ? त्यांचें भाषण म्हणजे नुसतें शब्दजाल होतें. त्यांत कितीहि खोल बुडी मारिली, तरी सयुक्तिक कोटिक्रम हातीं लागण्याची आशाच नाहीं. त्यांचें भाषण बुद्धिमत्तेचें द्योतक खरें ! पण, त्यांत जर मुद्दाच नाहीं, तर उत्तर तरी कशाला द्यावें ? त्यांचें भाषण कर्णमधुर व मृगजळासारखें ! सर अबदुल कय्युम यांनीं आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं, सरहद्द प्रांतांत एके ठिकाणीं कम्युनिस्टांचीं लहानशी वसाहत होती, पण ती आतां नष्ट झाली. कायद्यानें काय ती जमीनच वसाहतीच्या वाढीला प्रतिकूल होती ? याचा खुलासा, मी सर डेनिस यांस विचारिला, पण त्यांच्या लांबलचक व गोड उत्तरांत,त्या प्रश्नाचें उत्तर मात्र कोठेंच आलें नाहीं. कदाचित् त्या प्रश्नाचें उत्तर देणें, त्यांना गैरसोईचें असेल ! पण, हिंदुस्थान सरकारला ही कम्युनिस्टांची वसाहत नको असल्यामुळें, त्यांनीं कांहींतरी युक्ति लढवून या वसाहतीचा फन्ना पाडिला असला पाहिजे. पण ही युक्ति, सर डेनिस यानां

येथें सांगण्याचें टाळलें. कॉम्युनिझम् कोणाला हवा ? गृहमंत्री ना. केरार यांना कोणी सांगितलें कीं, लोकपक्षीय सभासदांनाहि कम्युनिस्ट चळवळ नको आहे. पं. मोतीलाल नेहरूहि तसेंच म्हणाले. पण मग आम्ही बिलाला विरोध कां करतों ? कारण हेंच कीं, सरकारचें हें बिल खरोखर कम्युनिस्टां-च्या विरुद्ध आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. तुम्हांला कम्युनिझम् जर निर्मूल करावयाचा तर त्याचें मूळ कोठें आहे, त्याच्या उत्पत्तीचीं कारणें कोणतीं, तीं बारकाईनें शोधून काढा !

## कम्युनिझम् हें साम्राज्यवादाचें अपत्य आहे.

मी थोडक्यांत माझें मत सांगतों. कम्युनिझम् कसा उद्भवतो ? तें साम्राज्य-वादाचें अपत्य आहे. साम्राज्यवादामुळें संपत्ति फार थोडया लोकांच्या हातीं सांठविली जात असते. या इंपीरियालिझमचा ज्यांस तिटकारा आला आहे ते 'कम्युनिझम'चा अवलंब करितात. तुम्हाला—सरकारला—कम्युनिझम हाणून पाडावयाचा असेल तर तुम्ही—हिंदुस्थानसरकार—आम्हाला मिळा व आपण सर्व मिळून ब्रिटिश इंपीरियालिझमचा या देशांतून नायनाट करूं या ! ब्रिटिश साम्राज्यवादी काय म्हणतील याची पर्वा न करितां तुम्ही सरकार आम्हांला मिळाले तर कम्युनिझम ठार झाला म्हणून समजा ! तुम्ही आम्ही साम्राज्यवाद हाणून पाडण्यास एकवटलों तर कम्युनिझम या देशांत येतो कशाला ? पण हिंदुस्थानांतील

## ब्रिटिश नोकरशाही ही साम्राज्यवादाची दासी

आहे. ती साम्राज्यवादाविरुद्ध कशी उठणार ? कम्युनिझम हा इंपीरियालि-झमच्या विरुद्ध अखिल जगाचा निषेधोद्गार आहे. हिंदुस्थानांत जे लोक देशाभिमानानें प्रेरित होऊन ब्रिटिशसाम्राज्यवादाला विरोध करीत आहेत, त्यांना बाहेर देशचे कम्युनिस्ट आपले बंधू समजतात, आपले सहाय्यक सम-जतात म्हणून सरकारला कम्युनिझम नको असेल तर त्यांनीं कांग्रेसवाले व राष्ट्रीयपक्ष यांना सामील होऊन प्रथम हिंदुस्थानांतून साम्राज्यवादाची हकाल-पट्टी करावी. त्य:साठीं तुम्हीं लोकांच्या मागण्यांचा नीट विचार करून त्या तावडतोब देऊन टाका. दोन चिलटवजा ब्रिटिश चळवळ्यांना दडपण्या-

साठीं तुम्हीं हें बिल आणावें हें नखाच्या कामाला कुऱ्हाड लावण्यासारखेंच हास्यास्पद आहे. काल श्री. केळकरांनीं मोठी सुंदर विनोदी उपमा आपल्या भाषणांत योजिली होती. एखाद्या डोंबारणीच्या केसांतील चार दोन उवा मारण्यासाठीं त्या केसांतून ट्रॅक्टर ( यांत्रिक नांगर ) फिरविणें जसें हास्यास्पद, तसेंच दोन कम्युनिस्टांना चिरडण्यासाठीं हें बिल आणणें हेंहि हास्यास्पद आहे ! एक तामसी माणूस आपल्या तोंडाभोंवतीं फिरणाऱ्या बारीक माशांना मारण्यासाठीं आपली तरवार आपल्या तोंडाभोंवतीं परजीत असे. तरवारीनें माशा तर मेल्या नाहींच, पण उलट त्यांचें नाक मात्र कापलें गेलें. तुम्ही हें बिल पास करण्याचा हट्ट धरून हिंदुस्थानचें कायदेबुक विकृत करीत आहांत. तुम्हीं आपलेंच नाक कापून घेऊन जगाच्या उपहासास पात्र होत आहांत ! म्हणून म्हणतों सांभाळा व हें बिल मागें घेऊन सर्वांच्या पाठीमागची कटकट चुकवा. मी या बिलास अत्यंत जोराचा विरोध करितों.

# रेल्वे बोर्डावर जादा सभासद नको !

रेल्वे बोर्डावर जादा सभासद नेमण्यासाठीं जी चौसष्ट हजारांची मागणी सरकारनें केली होती तिला विरोध करतांना श्री. मा. श्री. अणे म्हणाले:—

रेल्वे बोर्डावर नवा सभासद नेमावा कीं नाहीं, हा प्रश्न आज आपल्यापुढें आहे. ही मागणी असेंब्लीला सादर करतांना व्यापारी मंत्र्यांनीं अनेक अवांतर मुद्दे पुढें आणिले आहेत. पैकीं एक मुद्दा असा कीं, रेल्वेबोर्डावर जादा सभासद नेमण्याच्या ह्या प्रश्नावर विचार करतांना रेल्वे बोर्डाच्या हिंदीकरणाचा प्रश्न उपस्थित करतां कामा नये. रेल्वेचें हिंदीकरण करण्याची मागणी जुनीच आहे. इतकेंच नव्हे तर, रेल्वे बोर्डातून हिंदी लोकांना वगळण्याच्या सरकारच्या पक्षपाती धोरणाचा निषेध करण्यासाठीं असेंब्लीनें रेल्वेची सबंध मागणीच एकदां फेटाळून लाविली होती. म्हणून बोर्डावर नवा सभासद नेमण्याच्या सरकारच्या मागणीला लोकपक्षानें मंजुरी दिल्यास हिंदी सभासद कदाचित् रेल्वे बोर्डावर नेमिला जाईल, या आमिषाला असेंब्लीनें बळी पडूं नये !

**मासा गळाला लागावा म्हणून हें आमिष**

पुढें करण्यांत आलें आहे. ही मागणी करतांना रेल्वेबोर्डानें कांहीं नवीन रेल्वे आपल्या ताब्यांत घेतल्या आहेत. रेल्वेची लाईन कांहीं ठिकाणीं वाढविण्यांत येणार आहे वगैरे गोष्टी सांगण्यांत आल्या. हेतु हा कीं, रेल्वेचें काम वाढलें आहे असें लोकांना भासावें. पण हीं नवीं कामें अंगावर घेतल्यामुळें जबाबदारी खरोखरीच वाढते काय ? हें काम वाढलें, तरी त्यामुळें धोरणांत किंवा जबाबदारींत कांहींच फरक पडत नाहीं. शिवाय रेल्वेचा कारभार, व्यापारी दृष्टीनें चालविला पाहिजे असेंहि समजलें जातें, व त्या दृष्टीनें १९२३–२५ सालांतील कारभार काटकसरीच्या तत्त्वावर चालविण्यांत आला. मग आतांच हें काटकसरीचें धोरण कां सोडून देण्यांत येत आहे ? आपल्या सर्व खात्यांत रेल्वेनें आमूलाग्र काटकसर करण्याचें ठरविलें होतें. पण आतां सरकारला रेल्वेबोर्डावरील सभासद वाढविण्याची घाई

---

* 'महाराष्ट्र' नागपूर १० मे १९२९.

सुटली आहे ! १९२३–२४ सालीं होणारा नऊ लाखांचा खर्च आज साडे सतरा लाखांवर आलेला आहे.

### हा खर्च दुपटीवर कां गेला ?

हें खातें जर सरकार खरोखरीच व्यापारी दृष्टीनें चालवीत असेल, तर या दुपटीवर गेलेल्या खर्चाबद्दल जाब देणें, हें सरकारचें कर्तव्य नाहीं काय ? आपल्या मागणीला सरकारनें जर भरपूर कारण दाखविलें, तरच सरकारची मागणी योग्य वाटण्याचा थोडा तरी संभव आहे. यांनीं असें दाखविलें पाहिजे कीं, रेल्वेचा कारभार गेल्या पांच वर्षांत, त्यांनीं चोख रीतीनें चालविला असून, या कारभारापासून देशाचा दिवसेंदिवस अधिकाधिक फायदा होत आहे. १९२४–२५ सालापासून जर रेल्वेच्या आय-व्ययाचा आढावा घेतला, तर रेल्वेची फारशी भरभराट नसल्याचें दिसून येईल ! व्यापारमंत्र्यांनीं आपल्या भाषणांत, मजूर सभासद नेमण्याच्या आवश्यकतेचें पाल्हाळिक प्रतिपादन केलें आहे. मी त्यांना असें विचारतों कीं, इंग्लंडांत किंवा अमेरिकेंत मजुरांसाठीं म्हणून अशा तऱ्हेचा स्वतंत्र सभासद नेमण्यांत आला आहे काय ? मजुरांसाठीं स्वतंत्र सभासद नेमण्याची पद्धत कोठेंच नाहीं. इंग्लंड किंवा अमेरिका या देशांपेक्षां, हिंदुस्थानांतील मजुरांचा प्रश्न अधिक बिकट झाला आहे काय ? इतर देशांत जर स्वतंत्र सभासदाशिवाय व्यवस्था होऊं शकते, तर हिंदुस्थानांत तेवढी ती कां होऊं नये ?

### म्हणे कामाचा बोजा बेसुमार वाढला !

रेल्वेबोर्डाच्या शिरावरील कामाचा बोजा बेसुमार वाढला असून, त्यांना कामाचा नीट उरक करणें शक्य होत नाहीं, असें सांगण्यांत आलें. पण असें जर आहे, तर कमी महत्त्वाचीं कामें खालच्या अधिकाऱ्यांवर कां सोंपवीत नाहीं ! ऑक्वर्थ कमेटीनें या बाबतींत केलेल्या सुधारणा कां अमलांत आणण्यांत आल्या नाहींत ? या कमेटीच्या सूचनेप्रमाणें ' ॲडव्हायसरी रेटस् ट्रिब्यूनल ' स्थापन करण्यांत आलें, पण त्याच्याकडे जें काम सोंपवावयाचें, तें काम मात्र अद्याप सोंपविण्यांत आलेलें नाहीं. हाताखालच्या अधिकाऱ्यांवर काम सोंपविण्याचें धोरण जर रेल्वेबोर्डानें अमलांत आणिलें,

तर त्याच्या शिरावरील ओझें पुष्कळच कमी होईल. पण कामाची विभागणी करण्याच्या प्रश्नाचा, बोर्डानें मुळीं कधीं विचारच केलेला नाहीं.

### मजुरांकरितां आणखी एक सभासद कशाला ?

शिवाय, ज्या मजुरांच्या खात्याचा एवढा बाऊ आज करण्यांत येत आहे, त्या खात्याचें काम असें किती असतें ? असा प्रश्न फायनॅन्स कमेटींत, आम्ही मि. शेरिडन यांस विचारला होता. तेव्हां त्यांनीं असें सांगितलें कीं, मजूर खात्याचें काम हा माझ्या कामाचा एकदशांश हिस्सा आहे. शिवाय मला दुसरा प्रश्न असा करावासा वाटतो कीं, रेल्वेवरील मजुरांचा प्रश्न एवढा विकट कां झाला आहे ? हिंदुस्थानसरकारनें मजूर खात्यासाठीं स्वतंत्र सभासद नेमिला आहे. मजुरांच्या बाबतींत हिंदुस्थानसरकार, जें सर्वसाधारण धोरण आंखून देईल, तेंच धोरण रेल्वेबोर्डालाहि अमलांत आणिलें पाहिजे; म्हणून रेल्वेबोर्डानें हा प्रश्न स्वतंत्र सभासदाकडे सोंपविणें इष्ट नाहीं, असें मला वाटतें. मजुरांच्या प्रश्नांची सर्वच दृष्टीनें चौकशी करण्यासाठीं, एक स्वतंत्र कमिशनहि हिंदुस्थान सरकारनें नेमिलें आहे. त्या दृष्टीनेंहि रेल्वेबोर्डावर स्वतंत्र मजूरसभासद नेमणें अयोग्य होईल. आज या कामासाठीं स्वतंत्र सभासद नेमणें म्हणजे हिंदुस्थानसरकार, जें काम कमिशनकडून करून घेणार आहे, तें आपण आगाऊच हातीं घेण्यासारखें आहे.

### अगदींच लंगडें कारण !

इतर कारखान्यांतील मजुरांपेक्षां, रेल्वेमजुरांची स्थिति बरीच भिन्न आहे, असें व्यापार मंत्र्यांनीं सांगितलें व त्या दृष्टीनें स्वतंत्र सभासद नेमणेंच अवश्य आहे, असेंहि ते म्हणाले. या सभासदांच्या ठिकाणीं भूतदया विशेष प्रमाणांत असली पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. पण ज्या माणसांच्या ठिकाणीं भूतदया कमी प्रमाणांत आहे, ते कोणत्याच कामाला लायक नाहींत असें मी म्हणेन. अर्थात्, त्यांनीं पुढें केलेलें हें कारण अगदीं लंगडें आहे. कोणत्याहि दृष्टीनें विचार केला, तरी रेल्वेबोर्डावर स्वतत्र सभासद नेमण्याची मुळींच आवश्यकता दिसत नाहीं, आणि म्हणून हिंदीकरणाच्या आमिषाला बळी न पडतां, या मागणीला विरोध करणेंच योग्य होईल !

# पार्लमेंटच्या 'अंतिम अधिकाराचें' बुजगावणें*

लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत पं. मोतीलाल नेहरू यानीं व्हॉईसरॉय यांच्या एक्झि. कौन्सिलच्या प्रवासभत्त्याची मागणी नामंजूर करण्याची सूचना आणली असतां तीवर ता. १२ मार्च रोजीं श्री. अणे यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें:—

अध्यक्ष महाराज, भावी राज्यघटनेच्या (Constitution) ज्या प्रश्नावर सध्यां चर्चा सुरू आहे, त्याचा केवळ त्याच दृष्टीनें विचार करण्यास मी उभा आहें. आतांपर्यंत ज्यांनीं या चर्चेंत भाग घेतला, त्यांपैकीं पुष्कळांनीं या मूळ प्रश्नाचा विचार न करितां पं. नेहरूंच्या भाषणांत ओघानें जीं इतर विधानें आलीं,त्यावरच रण माजविलें. वस्तुतः आपल्यापुढें असा प्रश्न आहे. १९२४ सालापासून आजपर्यंत अनेकवार भावी राज्यघटनेसंबंधीं आम्हीं राष्ट्रीय मागणी केली आहे; पण राज्यशकट हांकण्यास जे जबाबदार आहेत, त्यांनीं या मागणीच्या अनुरोधानें राष्ट्राचें पाऊल पुढें पाडण्याच्या दृष्टीनें कांहींहि प्रयत्न केले नसल्यामुळें, त्यांचा निषेध करण्यासाठीं हा काट सुचविला आहे. तेव्हां याला जर कोणाला विरोध करावयाचा असेल तर तो विरोध एकाच दृष्टीनें झाला पाहिजे. मला—

### असेंब्लीपुढें एकच प्रश्न

ठेवावयाचा आहे. १९२४–२५ सालीं आम्हीं ज्या मागण्या केल्या, त्याला चिकटून राहण्यास आजची असेंब्ली तयार आहे कीं नाहीं ? सरकारची तरफदारी करणारांना गेल्या तीन वर्षांत सरकारच्या सद्हेतूबद्दल असा काय पुरावा मिळाला आहे म्हणून ते जुन्या मागणीचा पुनरुच्चार करण्यास आज तयार नाहींत, किंवा त्या मागणीमागें जाणें त्यांना सोईस्कर वाटतें ? याच दृष्टीनें याचा सर्व बिनसरकारी सभासदांनीं विचार केला पाहिजे. यामीनखानांचा असा सवाल आहे कीं, " गेल्या १२ महिन्यांत असें कोणतें

---

* 'महाराष्ट्र' नागपूर ता. ३१–३–१९२९.

पाप सरकारकडून घडलें म्हणून तुम्ही असा काट सुचवितां ? ” त्यावर अध्यक्ष महाराज, आपण त्यांना ताबडतोब बजाविलें कीं, ज्या प्रश्नाची चर्चा चालू आहे तो प्रश्नच त्यांना आजपर्यंत समजला नाहीं. पण माझा यामीनखान यांना असा सवाल आहे कीं, आजपर्यंत आपण जें धोरण स्वीकारलें आहे, तेंच धोरण पुढें चालविलें तर कोठें चुकतें ? आजवर आपण जें मागत आलों, त्याचीच आज पुनः मागणी केली जात आहे व तें अगदीं साहजिक असेंच आहे. प्रचलित धोरणांत जर बदल करावयाचा असला, तर तो बदल करा असें म्हणणारांनीं त्याबद्दल सबळ कारणें दिली पाहिजेत. या मागणीला विरोधक एकाच मुद्यावर विरोध करूं शकतात; तो मुद्दा म्हणजे गेल्या चारपांच वर्षांत सरकारच्या दृष्टिकोनांत फरक झाला असून सरकारच्या ध्येयप्राप्तीच्या दृष्टीनें राष्ट्राचें पाऊल पुढें पडत आहे व ही मागणी पुनः पुनः न केली तरी राष्ट्राचें उद्दिष्ट साध्य होईल. पण त्यांना हें म्हणणें अशक्य असल्यामुळें ते या मुद्यावर आपल्या विरोधाचें समर्थनच करीत नाहींत. यांच्यापुढें दुसऱ्याच गोष्टी येत आहेत. आजवर उघडया डोळ्यांनीं व प्रामाणिकपणें यांनीं जें धोरण अंगिकारिलें तें लाथाडून आज कित्येक जबाबदार सभासददेखील

## शुष्क मतभेदाचीं कोंबडीं

झुंजवीत आहेत. हा प्रकार केवळ वादविवादाच्या दृष्टीनें, प्रतिष्ठितपणास धरून नसला,तरी कदाचित् हानिकारक दिसत नसेल, पण मला उमेद आहे कीं, जेव्हां मत देण्याची वेळ येईल, तेव्हां ते पूर्वी कोणत्या धोरणानें बांधले गेले आहेत, व आज त्यांचे कर्तव्य काय आहे, याची त्यांस जाणीव राहील.

## विरोधकांची विचारसरणी

पं. नेहरूंच्या मागणीला दोन मुद्दयांवर विरोधकांनीं विरोध केला आहे. सर डार्सी लिंडसे यांचें म्हणणें आज हा प्रश्न अप्रस्तुत आहे. असें म्हणतांना, त्यांनीं गृहमंत्र्यांच्या भाषणाचें सार सांगितलें आहे. गृहमंत्र्यांचा विरोध मुख्य दोन मुद्यांवरः—(१)या प्रश्नाचा निकाल लावण्याची सारी सत्ता, पार्लमेंटच्या हातीं असल्यामुळें हिंदुस्थान सरकार कांहींच घोषणा करूं शकत

जाहीं, व (२) हिंदी राज्यघटनेप्रमाणें सरकारनें एक कमिशन नेमून, आपल्यावरील आपली जबाबदारी आपण पार पाडीत असल्याचें, व अंगीकृत धोरणानुसार आपण वागत असल्याचें सिद्ध केलें आहे: व कमिशनचा रिपोर्ट बाहेर पडेपर्यंत, सरकार कांहींच करूं शकत नाहीं. कारण, जोंवर वादग्रस्त प्रश्न निवाड्याच्या तराजूंत, अधांतरी तारकळत आहे, तोंवर हिंदुस्थान सरकार त्याबाबत कांहींहि धोरण जाहीर करूं शकत नाहीं. मला वाटतें, या दोन सबबीवर सरकार आपल्या निष्क्रियतेचें समर्थन करूं पाहात आहे. पण, यावर माझा पहिला सवाल असा आहे कीं,

## पार्लमेंटचा अंतिम अधिकार म्हणजे काय ?

पं. नेहरूंनीं सरकारपुढें जो प्रश्न टाकला आहे, तो प्रश्न करून, हें साऱ्या हिंदी जनतेचें मत आहे, अशी त्यांची आम्ही कबूली मागत आहोंत. असेंब्लींत ही मागणी वारंवार करण्यांत आली आहे. ही आम्हा लोकप्रतिनिधींची म्हणजेच साऱ्या जनतेची मागणी आहे, अशीहि आम्हाला सरकारची कबूली पाहिजे. याचा पार्लमेंटच्या अंतिम कारभाराशीं, किंवा पार्लमेंटच्या मानमरातबाशीं, काय संबंध आहे ? ही साऱ्या हिंदी राष्ट्राची मागणी आहे. एवढी साधी गोष्ट प्रांजलपणें हिंदुस्थान-सरकारनें, पार्लमेंट्ला कळवावयाला पाहिजे होती. ही गोष्ट मान्य केल्यानें पार्लमेंट्च्या अखेरच्या अधिकाराला बाध कोठें येतो ? हिंदुस्थानसरकारला पार्लमेंट्च्या हुकुमाप्रमाणें, कांहीं नियंत्रणाखालीं राज्यकारभार चालवावा लागतो हें खरें. पण हिंदुस्थानसरकार 'Man on the spot' असल्यामुळें या शब्दाला अधिक किंमत आहे. देशांत गेलीं पांच वर्षें जी वसाहतीच्या स्वराज्यासाठीं चळवळ चालू आहे, व त्या बाबतींत जबाबदार प्रातिनिधिक संस्थांनीं जें मत व्यक्त केलें आहे, ती सारी चळवळ खरीखुरी लोकमतनिदर्शक आहे, हें मान्य करावयास सरकार तयार आहे कीं नाहीं ? सरकारच्या अंगीं, जर प्रामाणिकपणा व कळकळ असेल, तर ते या गोष्टी मान्य करतील ! व लोकांच्या मागणीप्रमाणें तावडतोब घडून आलें पाहिजे, असें आपलें मत देईल! सरकारनें असें केल्यास, तें कृत्य सुधारणा कायद्या-

विरुद्ध होईल अगर पार्लमेंट्च्या अंतिम अधिकारास बाधक होईल असें मला वाटत नाहीं.

### सरकार, या पडद्याआड लपूं नका !

हें बुजगावणें नवें नाहीं. दुसरें असें कीं, पार्लमेंटचा अंतिम अधिकार ही काय नवीन गोष्ट थोडीच आहे? कानडा, आस्ट्रेलिया वगैरेसारख्या वसाहतींसाठीं नव्या राज्यघटना आंखण्यांत आल्या, तेव्हां काय पार्लमेंट्ला हा 'अंतिम अधिकार' नव्हता ? आज, हिंदुस्थानच्या बाबतींत जें 'अंतिम अधिकाराचें' बुजगावणें पुढें करण्यांत येत आहे, तें या वसाहतींच्या माथीं असेंच मारण्यांत आलें होतें ? सारांश काय,तर हिंदुस्थानला वसाहतींचें स्वराज्य देण्याचा जो सरळ प्रश्न सरकारपुढें टाकण्यांत आला आहे, त्याचें उत्तर देण्याची टाळाटाळ पार्लमेंट्च्या या 'अंतिम अधिकाराच्या' पडद्याआड लपून सरकारला करतां येणार नाहीं. एखाद्या राष्ट्राशीं तह करावयाला जेव्हां सरकार आपले प्रतिनिधी पाठवितें तेव्हां तें काय करितें ? ते प्रतिनिधी, तह किंवा कराररमदार काय करावयाचे ते करितात, व सरकार, पार्लमेंट्ला ते करार सादर करून, "याला तुम्ही मान्यता द्या, नाहींतर आम्ही राजिनामा देतों" असें स्पष्ट बजावितात ! हिंदुस्थानच्या बाबतींत हिंदुस्थानसरकार, हें धोरण स्वीकारावयाला तयार आहे काय ? हिंदुस्थानसरकारचें जें संदिग्ध धोरण आहे, तें आम्हाला मान्य नाहीं. हिंदुस्थानसरकारच्या धोरणाचा अर्थ असा आहे कीं, आम्हाला ज्या सूचना मिळाल्या आहेत, त्याव्यतिरिक्त आम्हीं कांहीं करणार नाहीं, व तुम्हीं काय म्हणतां तें समजून घेणार नाहीं. त्यांना सायमन कमिशनच्या रिपोर्टावरून हिंदुस्थानांतील परिस्थिति समजून घ्यावयाची आहे. ही सरकारला लाजिरवाणी गोष्ट नाहीं काय ? सुधारणाकायदा अमलांत आल्यापासून गेलीं दहा वर्षे, जर ते येथील राज्यकारभार चालवीत आहेत, तर त्यांना येथील परिस्थिति कशी आहे, हें इतरांपेक्षां अधिक माहीत असावयास पाहिजे ! अशा परिस्थितींत सरकारकडून कांहीं विशिष्ट लोकांचें जें कमिशन बनविण्यांत आलें आहे, त्या लोकांबद्दल मी,आज कांहीं बोलूं इच्छित नाहीं. कारण त्याची संपूर्ण चर्चा यापूर्वी झालीच आहे.त्यावर अवलंबून राहावयाची कांहीं जरूरच नाहीं.

## सरकारी मुद्दे पोचट आहेत !

अर्थात्, ज्या दोन मुद्यांआड सरकार दडूं पाहतें ते मुद्दे पोचट आहेत. त्यांत कांहींच तथ्य नाहीं. कमिशनचें कार्य काय ? परवां एके ठिकाणीं सायमन् साहेब म्हणाले कीं, माहिती गोळा करण्यासाठींच हें कमिशन नेमिलें असून हिंदी प्रतिनिधींशीं वाटाघाट करण्यासाठीं पार्लमेंट मागाहून एक "राउंडटेबल" सर्वपक्षीय परिषद नेमणार आहे.जर, खरोखर असा प्रकार व्हावयाचा असेल तर मला वाटतें कीं, हिंदुस्थानसरकारला या कमिशनचा रिपोर्ट बाहेर पडेपर्यंत वाट पाहण्याचें कारणच नाहीं. त्यांना जर आमची मागणी मान्य करावयाची नसेल, तर त्यांनीं आपला नकार स्पष्टपणें जाहीर करावा ! असेंब्लीं या बिनसरकारी सभासदांनीं ही सारी परिस्थिति लक्षांत बाळगून व अवांतर मुद्दे दृष्टीआड करून मत द्यावें. मला उमेद आहे कीं, असेंब्ली या साऱ्या प्रकरणांचा विचार निर्विकार व शांत चित्तानें करून पं. नेहरूंच्या बाजूनें आपलें मत देईल.

# सरकारचा अवाढव्य लष्करी खर्च*

दे. भ. माधवरावजी अणे यांचें ता. १९ मार्च १९२९ रोजीं, लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत पुढील भाषण झालें—

अध्यक्ष महाराज, सरकारच्या वसुलीखात्याच्या तज्ज्ञानें जी सूचना आणिली आहे, तीवर हिंदुस्थानच्या कारभारासंबंधीं चर्चा करावयास आपण आनंदानें परवानगी दिली आहे. तेव्हां ह्या संधीचा फायदा घेऊन, मी माझा अनुभव आपणांपुढें ठेवितों. सरकारतर्फे, आपणापुढें आलेल्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबींवर पुष्कळ चर्चा झाली आहे. आणि ती प्रमाणशुद्ध मत देणारांनीं सर्व बाजूंनीं विचार करून केली आहे; तेव्हां आतां चर्चा करणें थोडें कठीण असलें तर नवल नाहीं. उत्पन्नाच्या ज्या बाबी आहेत त्या एकतर स्थिर राहतील किंवा उण्याहि पडतील. पण ह्याच परिस्थतींत खर्चाच्या बाबी मात्र अधिकाधिक प्रमाणांत वाढत आहेत. त्यामुळें

## जमाखर्चाची तोंडमिळवणी

करणें, सरकारी तज्ज्ञांस कठीण झालें आहे. त्यांची जो अपेक्षा अगर इच्छा आहे, त्याप्रमाणें जर परिस्थिति प्राप्त झाली नाहीं, तर नवीन कर बसविण्याचा संकल्पहि त्यांना सोडून ठेवावा लागलाच आहे. अशा परिस्थितींत कराच्या आणखी बोजापासून, हिंदुस्थानची मुक्तता करावयाची असल्यास खर्चावर तीव्र नजर ठेवून, सावधगिरीनें कारभार हांकणें जरूर आहे. पुढील चार वर्षांपर्यंत लष्करी खर्च पंचावन्न कोटींचा स्थिर झाला आहे. हा खर्च स्थिर करावयास सरकारास, परिस्थितीनें जरी भाग पाडिलें असेल असें मानिलें, तरी सरकारास कर देणाऱ्यांच्या सोयींचा विचार करितां, सरकारचा लष्करी खर्च असमाधानकारक वाटतो. सध्यांचा लष्करी खर्च स्थिर राहणें, म्हणजे त्यावरील पार्लमेंटची दृष्टि शिथिल होत आहे असेंच दिसतें. ही गोष्ट माझे मित्र रंगस्वामी अय्यंगार, आणि पब्लिक्-अकौंटस्

---

* 'उदय' उमरावती

कमेटीच्या अहवालाचे लेखक, ह्यांनाहि मान्य आहे; व कर देणाऱ्या लोकांनाहि तसेंच वाटतें.

## सरकारचें जमाबंदी-खातें

सरकार एक ठराविक रक्कम लष्कराकडे तोडून देतें, व त्यांतून वाटेल तो खर्च करावयास परवानगी देतें, पण लोकांच्या इष्ट सोयीवर नजर देऊन लष्करी खर्चांत काटकसर कशी होईल, इकडे मात्र नजर देत नाहीं. लष्करी खात्यास अशी एक ठराविक रक्कम, वाटेल तसा खर्च करण्याकरितां तोडून दिल्यानें, एकंदर सर्व खर्चांतील तपशिलावर नजर ठेवून कांहीं प्रमाणांत काटकसर करणें जें शक्य असतें, त्या तत्त्वास शिथिलता येते आणि सभासदांचाहि खर्चावरील दाब कमी होतो. एखाद्या खात्यास एखादी ठराविक रक्कम तोडून देऊन तिच्या मर्यादेंत वाटेल तो खर्च करावयास त्या खात्यास परवानगी दिली, असा मुद्दा विचारांत घेतला तर काटकसर कशी हें एक गूढच आहे. लष्करी खर्चांत काटकसर घडेल आणि तो खर्च व जमाबंदी यांत सम संबंध येतील असें मानावयास सरकारबाजूला एक सबळ कारण दिसतें. कारण लष्करी खर्च १९२२-२३ इसवीपासून चालू १९२९-३० इसवीपर्यंत पाहतां ६५ कोटींवरून ५५ कोटींवर आला आहे. पण हे उतरते आंकडे दाखविल्यानें खर्चाचें योग्य ज्ञान होत नाहीं. लष्करी खर्चाची काटकसरीकडे प्रवृत्ति आहे किंवा नाहीं, हें स्पष्ट निदर्शनास यावयास एकंदर खर्चाचा नक्की आंकडा उपयोगाचा नाहीं, तर त्यांतील तपशीलवार खात्याचा ठोक आंकडा उपयोगी पडतो. ह्या ठोक आंकड्यांत जर उतार नसेल तर काटकसर झालीच नाहीं असें प्रत्येकानें समजावें.

## खर्चाच्या पावत्या

अधिकाऱ्यांच्या गैरव्यवस्थेशिवाय इतर कारणांमुळेंसुद्धां चुकीच्या असतात. यावरून कोणतीच काटकसर सिद्ध होत नाहीं. लष्करी ठोक खर्चाच्या रसिदी पाहिल्या, तरी त्या खर्चांत प्रसंगोपात्त वाढलेल्या खर्चावरून नक्की खर्चाचा आंकडा ठोक खर्चाशीं जर जुळता दिसला नाहीं, तर काटकसर झाली असें म्हणतां येत नाहीं. सरकारच्या जमाबंदी खात्यानें आपल्या अधिकारांत त्यांत

कांहीं काटकसर केली तरी त्यांस भूषणावह असें त्यांत कांहीं नाहीं.(ह्यानंतर श्री.अणे यांनीं मागील तीन वर्षांतील ठोक खर्चाचे आंकडे वाचले आणि सांगितलें कीं, ) ह्या वाढत्या ठोक खर्चावरून पुढील चार वर्षांत लष्करी खर्चांत काटकसर होत जाईल असें मानण्यास प्रमाण काय ? लष्करी अधिकाऱ्यांनीं खर्च करतांना जर आपला हात आंखडता घेतला नाहीं, तर त्या खात्याच्या तपशीलवार खर्चावर सरकारच्या जमाबंदीच्या खात्याच्या सभासदानें अगर मंत्र्यानें आणि ह्या राष्ट्रपंचायतींतील सभासदांनीं आपली नजर ठेवणें हाच एक मार्ग मोकळा आहे. गेल्या तीन वर्षांत ह्याबद्दल येथें कोणी कांहींच केलें नाहीं.

## लष्करी खातें व जमाबंदी खातें

ह्यांची व्यवस्था केवढीहि उत्तम असली, तरी ही व्यवस्था सुचविणारांचें अगर जमाबंदी खात्याच्या मंत्र्याचें ह्याबद्दल कोणी अभिनंदन करील असें मला वाटत नाहीं. अंदाजपत्रकावरील चर्चेंत ह्या खात्यांवर टीका होऊन लोकमत समजण्याचे प्रसंग येऊन गेले; पण पंचाईत ही कीं, लष्करी खर्चावरील वादविवाद म्हणजे व्यर्थ बडबड ठरते. सरकारी मंत्र्यानें ६५ कोटींवरून दहा कोटी खर्च कमी केल्याचें यश स्वतःकडे घेतलें; पण आरंभीं म्हणजे १९२२–२३ इसवीमध्यें सदर खर्चाचा आंकडा ६५ कोटींचा कां घेतला होता ? आज दहा कोटींची काटकसर झाली हें हक्कानें सांगण्यांत येतें. पण महायुद्धापूर्वी म्हणजे १९१३–१४ इसवीमध्यें लष्करी खर्च बावीस कोटींचा होता, तो आज शेंकडा दीडशें प्रमाणांत वाढला आहे हें कसें विसरणार ? हिंदुस्थानची स्थिति मूळ तत्त्वावर आणण्याचा हा प्रामाणिक मार्ग आहे काय ? कां युद्धकाळच्या स्थितीचें हें लक्षण ? वास्तविक आपण अर्ध युद्धकाळांत आहोंत; न जाणो, युद्ध उद्भवेल म्हणूनच बावीस कोटींवर खर्च जात नसेल ! निदान त्यामुळेच इंचकेप कमेटीनें सुचविल्याप्रमाणें तो पन्नास कोटींवरहि येत नसेल ! फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका इत्यादि महायुद्धाशीं जिव्हाळ्याचा संबंध असलेल्या राष्ट्रांचा लष्करी खर्च पाहिला तर तो त्यांनीं उत्पन्नाच्या शेंकडा पंधरा किंवा सोळा प्रमाणापेक्षां जास्त वाढूं दिला नाहीं.

## हिंदुस्थानचा लष्करी खर्च शेकडा नव्याण्णव

महायुद्धाच्या काळांत ग्रेटब्रिटनचा लष्करी खर्च एकंदर उत्पन्नाच्या मानानें शेंकडा३२, जपानचा शेंकडा८९, बेल्जमचा७४, इटलीचा१०·६ व फ्रान्सचा शेंकडा४१ प्रमाणांत वाढला होता. गेलें महायुद्ध हें प्रत्यक्ष फ्रान्सच्या जिवावर असतांहि फ्रान्सचा लष्करी खर्च शेंकडा ४१ पेक्षां वाढला नाहीं, ह्याप्रमाणें हे इतर राष्ट्रांचे लष्करी खर्च पाहिले आणि हिंदुस्थानचा लष्करी खर्च पाहिला, म्हणजे येथील राज्यकर्त्यांना लष्करी खर्च कमी करण्याची उत्कंठा नाहीं व तिकडे त्यांची प्रवृत्तीहि नाहीं अगर अनवश्यक कारणाकरितां तितका खर्च अवश्यच असावा, असें वाटतें. शिवाय जम्नादास मेहता यानीं सुचविलेल्या गोष्टी तर मी विचारांत घेतच नाहीं. पंचावन्न कोटींच्या आंकड्याकडेच पाहून, वास्तविक जमा-खात्याचा हिशेब लक्षांत घ्यावयास पाहिजे. वायव्य सरहद्दीवरील प्रांतांत फौज ठेवण्यास लागणारा खर्च हाहि लष्करी खर्चच ! पण तो सिव्हिल ॲडमिनिस्ट्रेशनबद्दल दाखविण्यांत येतो. हा खर्च लष्करी खर्चांतून वगळणें चुकीचें आहे. पुढील वर्षाकरितां हा खर्च ९५ लक्षांवर आहे. लष्करी जमाखात्यात मात्र तो सहा लक्षांचा नमूद आहे. ह्या रीतीनें होणारा तोटा लक्षांत घेतला तर तो बत्तीस लक्षांवर जाईल ! आणि मूळ रकमेवरील व्याज वगैरे जर ह्या तोट्यांत मिळविलें, तर हा आंकडा किती होईल ? (जम्नादास मेहता—एक कोटी ६८ लक्ष होईल). **अणे—होय, पण तो मला वाटतें १ कोटी ६३ लक्ष होईल. नक्की आंकडा ठरविणें सरकारी मंत्र्याचें काम आहे. तत्रापि व खरें जरी निरीक्षण केलें, तरी एकंदर**

## एकसष्ट कोटींचा लष्करी खर्च

होतो. ही एकंदर परिस्थिति लक्षांत घेतां, कर देणाऱ्या हिंदी लोकांच्या मानेवर, लष्करी खर्चाचा हा एवढा बोजा लादणें, हें न्याय्य आहे काय ? माणसीं अडीच रुपये हा बोजा पडतो, आणि तो फक्त ब्रिटिश हिंदुस्थानांत. ही गोष्ट जाहीर आहे कीं, प्रत्येक हिंदी मनुष्याचें उत्पन्न, इंग्रज म्हणतात त्याप्रमाणें धरिलें तरी सत्तर रुपयापेक्षां अधिक होत नाहीं. अशा परिस्थितींत लष्करी खर्चाचा एवढा बोजा लादणें, आणि तोहि राज-

निष्ठ प्रजेवर, हें योग्य आहे काय ? ह्याकरितां, लष्करी खर्चांत काटकसर घडवून आणणें जरूर आहे. दोन राष्ट्रांतील हा लढा नसून, एकाच सरकारच्या दोन खात्यांतील हा प्रश्न आहे; म्हणून जमाबंदी खात्याचे मंत्री लोकहिताकरितां लष्करी खर्चांत काटकसर करतील, व लोकांवर बसणारा कराचा बोजा टाळतील अशी उमेद आहे.

---

# सरकारचें जमीनमहसुलाचें धोरण*

जमीनमहसूल खात्याच्या धोरणावर दे. भ. बापूजी अणे यांनीं ता. २०-३-१९२९ रोजीं लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत केलेलें भाषण:—

### दीडशें वर्षांत याचा विचारच केला नाहीं.

माझ्या मतें, खर्चांत काटकसर करून लोकांचें दारिद्र्य कसें नष्ट होईल ह्याचा विचार सरकारास करणें जरूर आहे. माझ्या मित्रांनीं ह्यापूर्वींच औद्योगिक परिस्थितीचा, येथें विचार केला असल्यामुळें, त्या प्रश्नाकडे मी वळूं इच्छित नाहीं. शेतीवरच ज्यांचा निर्वाह आहे, त्या शेतकऱ्यांच्या हिताचा तुम्हांस अवश्य विचार केला पाहिजे. आज दीडशें वर्षें झालीं, पण ज्याला कांहीं निश्चित असें तत्त्व आहे, असें हिंदुस्थानसरकारास जमीनमहसुलाविषयीं, कोणतेंच धोरण ठरवितां आलें नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय ? आणि हा जमीनमहसूल हेंच सरकारच्या उत्पन्नाचें मुख्य साधन ! पण, त्याविषयीं कोणताहि ठरीव विचार सरकारचा नाहीं. निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या मर्जीवर व लहरीवर ही गोष्ट सोपविलेली दिसते ! लोकांच्या पुढाऱ्यांनीं, आजवर ह्या बाबतींत कांहींतरी, शास्त्रोक्त असें निश्चित धोरण असावें, म्हणून प्रयत्न केला, पण,

### ह्या शास्त्रोक्त प्रयत्नास सरकारचा विरोधच

झाला. जमीन महसुलाच्या बाबतींत सरकारचें धोरण काय, हें समजून घेण्याचा जेव्हां जेव्हां प्रयत्न होतो, तेव्हां सरकारतर्फे, सहारनपूर नियमांकडे

*‘उदय’ उमरावती १४ मे १९२९

बोट दाखविण्यांत येतें; आणि त्या नियमानुसार पन्नास टक्के सारा आम्ही घेणार असा सरकार हक्क सांगतें. पण या बोलण्यांत प्रमाणशुद्धता नाहीं. सरकारास जी व्यापारी हिशेबाची पद्धति मान्य झाली आहे, ती हिशेबाला घेऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा हिशेब करा व त्यावरून निव्वळ नफा ठरवा, असें जर सरकारास म्हटलें तर सरकार त्या गोष्टीस अव्यवहार्य म्हणावयास तयार! हें मी अगदींच बेजबाबदारपणानें बोलतों असें समजूं नका. वऱ्हाड कायदे–कमेटीपुढें जेव्हां वऱ्हाडचा जमीनमहसूल कायदा विचारार्थ आला तेव्हां लोकप्रतिनिधींनीं

### शेतीचा निव्वळ फायदा कसा काढावा

ह्याविषयीं एक निश्चित योजना कांहीं तत्त्वानुसार पुढें ठेविली होती. त्यांनीं सरकारास जमिनीचें मूळ भांडवल काय तें प्रथम निश्चित करावयास सांगितलें होतें. नंतर जनावरें, त्यांची राहण्याची व पोषणाची व्यवस्था, अवजारें वगैरेंचें भांडवल ठरवावें. हें सर्व भांडवल, त्याचें व्याज व इतर खर्च आणि शेतकऱ्याची पोटगी वगैरे जाऊन राहील तो नफा निश्चित करावयास सांगितलें. ह्या नफ्यांतील अर्धा भाग, नव्हे अर्धा घास, सहारनपूर नियमाप्रमाणें सरकारनें लागेल तर घ्यावा असेंहि म्हटलें. पण ह्या हिशेबाच्या पद्धतीनें स्पष्ट निदर्शनास आलें कीं, सध्यांच्या सारावाढीचें शेंकडा दहा किंवा वीस हें प्रमाणसुद्धां कमी करावें लागेल! ही वस्तुस्थिति स्पष्ट निदर्शनाला येतांच, शेतकऱ्यांचा निव्वळ नफा कसा काढावा, ह्या विषयींची ही प्रमाणशीर पद्धति स्वीकारावयास सरकार नाराज झालें. कारण, त्यास सर्वसाधारण अशी पोकळ हिशेबी पद्धति पाहिजे. नवे रस्ते, आगगाडी, बाजार वगैरे सोयींच्या वाढीमुळें, लोकांच्या उत्पन्नांत वाढ झालीच पाहिजे, असा सरकारचा अंदाज, आणि ह्याकरितां शेतीच्या विक्रीचे व लिलावांच्या किंमतीचे आंकडे तेवढे डोळ्यांत सलतात! म्हणजे ह्या

### अनुमानावर सारा सरकारचा व्यवहार

उभारलेला. ही अनुमानपद्धति, हा सध्यांच्या जमीन–महसूल पद्धतींत असलेला दोष होय! शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति व सध्यांची जमीनमहसूल

पद्धति ह्या दोन बाबतींतील गुंतागुंत काढण्यास सरकार जोंवर त्यांत डोकें घालणार नाहीं, तोंवर शेतकऱ्यांनीं ह्या अवस्थेंतून सुटकेची आशा करणें व्यर्थ आहे.व साधारण रीतीनें ह्या प्रश्नाचें उत्तर कधींहि समाधानकारक निघणार नाहीं. ह्या प्रश्नाकरितां शास्त्रीय पद्धतीचाच स्वीकार करावा लागेल. आज शेतकऱ्यावरील ऋण ऐकावें तर छातींत धडकी भरेल व ह्या रकमेचा व त्यावर त्यास द्याव्या लागणाऱ्या व्याजाचा जर हिशेब केला तर सरकारच्या वसूलतज्ज्ञांनीं आजपर्यंतच्या आपल्या आयुष्यांत असा व्यवहार पाहिला नसेल अशी त्या सन्मान्यांचीहि खात्री पटेल ! एवढेंच नव्हे तर

## सावकाराचें व सरकारचें कर्ज

व कर फेडतां फेडतां शेतकऱ्यावरील कर्जाचा बोजा मात्र एकसारखा वाढतच जातो व कर्ज फेडणें मुष्किलीचें होतें. पण ह्या स्थितीकडे पूर्ण लक्ष न पोहोंचवितांच सरकार साराआकारणी करितें. माझ्या मतें सरकार जें शेतकऱ्यांना त्यांच्या अशा ऋणी स्थितींत मदतीदाखल साह्य करितें तें वस्तुतः मुळींच फलदायी नसून केवळ भपका आहे. वऱ्हाडच्या प्रतिनिधींनीं वऱ्हाडचा जमीनमहसूल कायदा दोन वेळां विचारांत घेऊन त्यावरील आपले विचार सरकारांत दाखल केले. पण हिंदुस्थानसरकारांनीं काय केलें ? दुसऱ्या वेळीं हिंदुस्थानसरकारकडे तो कायदा आपल्या शिफारशीसह वऱ्हाडच्या प्रतिनिधींनीं पाठविला तेव्हां सरकारनीं सार्वभौमत्वानें ह्या शिफारशींना काट देऊन आपल्या मर्जीप्रमाणेंच कायदा निर्माण केला. कायदेमंडळ अथवा कायदेकमिटी केवळ शिफारसी करील पण त्यांतील सर्व सभासदांच्या अकलेच्या बेरजेपेक्षांहि जास्त ज्ञान असणारें हिंदुस्थानसरकार त्या सर्व

## शिफारसी एका फटकाऱ्यानें रद्द करूं शकतें

अशी ही स्थिति आहे ! सर्व प्रांतांतच जमीनमहसुलाच्या धोरणाविषयीं ही स्थिति आहे. मुंबईचा जमीनमहसूल कायदा तर त्या सरकारनीं थांबवून ठेविला आहे. हा प्रश्न आतां चालढकल करून सुटावयाचा नाहीं अथवा शेतकी कमिशन नेमूनहि सुटावयाचा नाहीं. शेतकी कमिशनच्या कार्यांत जमीनमहसुलाच्या धोरणास बिलकूल वाव नव्हता. सरकार आपल्या

करवसुलीचे मार्ग आपल्याच लोकांपुढें आणूं इच्छित नाहीं, ह्याचें हें एक दर्शक आहे. तात्पर्य काय कीं, जमीनमहसुलाच्या बाबतींत सरकार जोंपर्यंत निश्चित व सशास्त्र प्रमाण ठरविणार नाहीं, तोंवर सरकारची शेतकऱ्यांविषयीं सहानुभूति निव्वळ शाब्दिक व दिखाऊ आहे असेंच कोणीहि म्हणेल ! आणि ह्याकरितां माझा पक्ष सरकारच्या फायनॅन्स बिलास मदत करीत नाहीं. सरकारनीं खुशाल स्वतःच्या जबाबदारीवर तें पास करून घ्यावें.

---

# खादीप्रचार व बहिष्कार

यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या स्वदेशी बहिष्कार पोट कमिटीच्या विद्यमानें दे. भ. माधवरावजी अणे यांचें ता. १६ जून १९२९ रोजीं शिवराम थिएटरांत शेट पन्नालाल गुलराज यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर व्याख्यान झालें. त्याचा सारांश—

### काँग्रेसचे सभासद वाढवा.

खादीप्रचार या दृष्टीनें काँग्रेसचे सभासद वाढविणें इष्ट आहे. काँग्रेसचा सभासद झाला कीं, तो इसम खादीच्या विरुद्ध जाऊं शकत नाहीं.खादीकडे त्याची सहानुभूतीची दृष्टि राहते व काँग्रेसचा सभासद खादीचें कायमचें गिऱ्हाईक होऊन बसतो. म्हणून खादीप्रचार करणारांना माझी ही विनंति आहे कीं, काँग्रेसचे सभासद वाढविणें, हें खादीच्या प्रसारास मदत करण्यासारखेंच आहे. म्हणून काँग्रेसचे सभासद वाढविण्याचेंहि काम सुरू ठेवा.

खादीविक्रीकरितां पुरेसे स्वयंसेवक मिळत नाहींत, अशी स्वदेशी बहिष्कार कमेटीचे चिटणीस रा. दामले यांची तक्रार आहे. परंतु हें काम स्वयंसेवकाकडे सोंपविण्यापूर्वीं गांवांतील संभावित समजल्या जाणाऱ्या गृहस्थांनीं स्वतः प्रथम केलें पाहिजे. स्टेशनवर गाडी पकडण्याचें निकडीचें काम असलें व हमाल वेळेवर मिळत नसला म्हणजे मानापमान किंवा हलकेपणाचा विचार बाजूस ठेऊन जसा एखादा शिष्ट व श्रीमंत मनुष्य आपलें गाठोडें

* 'लोकमत' यवतमाळ ता. २१ जून १९२९.

घेऊन गाडींत शिरतो, त्याप्रमाणेंच खादीचें कार्य निकडीचें समजून खादीचें गाठोडें अगावर घेऊन गांवांतील प्रमुख गृहस्थ जर खादीविक्री करण्याकरितां निघाले तर स्वयंसेवक मिळत नाहींत ही तक्रार करण्याची वेळ येणार नाहीं.

## बहिष्कार व स्वदेशी यांची जोडगोळी

खादीमध्यें स्वदेशी व बहिष्कार या दोन्ही गोष्टी साधतात. स्वदेशीमध्यें बहिष्कार समावतो, परंतु निव्वळ बहिष्कारांत स्वदेशी साधत नाहीं. केवळ बहिष्काराचा तिखट उपाय अमलांत आणून भागणार नाहीं. इंग्लंडच्या रागावर इंग्लंडचा माल न घेतां जर तुम्ही जपान किंवा अमेरिकेचा माल घेतला, तरी स्वतःच्या पायावर स्वतःचीं वस्त्रप्रावरणें जोंपर्यंत तुम्हाला पुरवितां येणार नाहींत तोंपर्यंत बहिष्काराचा उपयोग होणार नाहीं. कारण इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यामध्यें जेव्हां आणीबाणीचा प्रसंग येईल, त्यावेळीं हिंदुस्थानपेक्षां जपान, अमेरिका वगैरे देशांना इंग्लंडच जास्त जवळचें वाटेल व तुम्हांला तुमच्या पुरतें कापड उत्पन्न करतां येत नसल्यामुळें तुम्हांला इंग्लंडबरोबर टक्कर देतांना हार खावी लागेल. आज इंग्लंडच्या हातांत सर्व जगाचा मालवाहतुकीचा धंदा आहे. तेव्हां केवळ बहिष्कार आचरतों म्हटलें तरी इंग्लंड आणीबाणीच्या वेळीं बाहेर देशाचा मालहि हिंदुस्थानांत येऊं देणार नाहीं. तेव्हां बहिष्कारावरोबरच देशांत स्वदेशी धंदे वाढविले पाहिजेत. व निदान वस्त्राच्या बाबतींत तरी देशाला दुसरीकडे पाहण्याची वेळ येऊं नये, याकरितां खादी वापरा व स्वदेशी आचरा. बहिष्कार व स्वदेशी ही जोडगोळी आहे. दोहींची कांस धरली तरच आपला स्वराज्याचा लढा तडीस जाईल.

## स्वराज्य द्या नाहींतर इंग्लंडची बेकारी वाढवूं.

कित्येक आंकडेपंडित असें विचारितात कीं, इंग्लंडचें साठ कोट रुपयांचें कापड हिंदुस्थानांत येतें, त्यापैकीं कच्च्या मालाची किंमत वजा करतां, इंग्लंडचा निव्वळ फायदा फारच थोडा—सहा अगर सात कोटींचा असेल, तेव्हां खादी वापरून तुम्ही इंग्लंडचें असें किती नुकसान करणार? पण आज इंग्लंडपुढें मुख्य प्रश्न बेकारीचा आहे. इंग्लंडच्या बेकारीचा प्रश्न ताबडतोब

सोडवितों अशी मजूरपक्षाची प्रतिज्ञा असून, रॅम्से मॅक्डोनाल्ड हे त्या उद्योगास लागले आहेत. अशा वेळीं कापडाच्या नफ्यांतील सहा सात कोट रुपये नफा मिळविण्याकरितां, जे लक्षावधी मजूर तेथें गिरण्यांतून कामें करीत आहेत, त्यांना आपण बेकार केलें, तर इंग्लंडवर एक महत्संकट प्राप्त होईल. आज इंग्लंडचें लक्ष, कांहीं कोटींच्या नफ्याकडे नसून, बेकारी बंद करण्याकडे जास्त लागलें आहे. अशा वेळीं, जर इंग्लंडला ' आमचे राजकीय हक्क देणार नाहीं, तर तुमची बेकारी आम्ही वाढवूं,' अशी, हिंदुस्थान धमकी देण्याच्या व ती कृतींत उतरविण्याच्या तयारींत असेल, व तसा निश्चय दाखवील तरच मजूर पक्षाकडून,तुम्हांला स्वराज्य प्राप्त होईल. इंग्लंडच्या राज्याधिकारावर मजूरपक्ष आहे. त्यामुळें तेथील राजकीय वातावरणांत जो फरक झाला आहे, त्याचा फायदा घेण्याकरितां तरी निश्चयानें खादी वापरा व स्वदेशीव्रत आचरा. आपसांत क्षुल्लक गोष्टीवर रणें माजवूं नका. पुढें काम पडलें आहे तें असें आहे कीं, त्याकरितां भांडणांची जरूरी नाहीं. सहा महिन्यांत जें काम झालें नाहीं, त्याची भरपाई करण्याकरितां उत्साहानें कार्यास लागा.

# ग्रामपंचायतीचा कायदा*

ले. असेंब्लीमध्यें मद्रासचे के. व्ही. रंगस्वामी अय्यंगार यानीं ग्रामपंचायतींची चौकशी करावी असा ठराव आणिला होता. त्या ठरावावर ता. ३ सप्टेंबर १९२९ रोजीं श्री. माधवरावजी अणे म्हणाले:—

## सरकारवर ही जबाबदारी आहे.

ग्रामपंचायतीचा प्रश्न प्रांतिक सरकारच्या कक्षेंतील आहे, मध्यवर्ती सरकारच्या अधिकारांतील नाहीं, हें खरें असलें तरी या बाबतींत मध्यवर्ती सरकारवरहि बरीच जबाबदारी पडते. पार्लमेंटनें स्वराज्याचा प्रश्न, देशांत स्थानिक संस्थांच्या यशस्वितेवर अवलंबून ठेविला आहे, व अशा अर्थाचे शब्द गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टाच्या उद्देशपत्रिकेंत नमूद केले आहेत. तर मग या स्थानिक स्वराज्य संस्थांची वाढ कशी होईल, हें पाहण्याची जबाबदारी प्रांतिक सरकाराप्रमाणें हिंदुस्थानसरकारवरहि पडत नाहीं काय? स्थानिक स्वराज्य संस्था, त्यांची वाढ व यशस्विता यांवर जर भावी स्वराज्य अवलंबून आहे, तर अशा स्थानिक स्वराज्यसंस्था स्थापन करावयास नकोत काय? गेल्या नऊ वर्षांत अशा तऱ्हेच्या ग्रामसंस्था स्थापन करण्याचे प्रयत्न सरकारनें काय केले? या प्रश्नाचें उत्तर नकारात्मकच द्यावें लागेल. उलटपक्षीं, लोकपक्षानें थोडीफार खटपट केली, हें प्रांतानिहाय सोंपीव खात्यांच्या दिवाणांनीं, जी कांहीं आपली अर्थिक परिस्थिति ओळखून खटपट केली त्यावरून सिद्ध होत आहे.

## प्रांतिक सरकारास टोंचणी लावा.

प्रांतिक सरकारच्या तिजोरींत पैशाची टंचाई पडते व मध्यवर्ती सरकारनें त्यांना मदत करावी; अशी हाकाटी असेंब्लींत अनेक वेळां झाली आहे. तथापि गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टांतील, स्थानिक संस्थांच्या वाढीचें मर्म, प्रांतिक सरकारच्या लक्षांत आलें आहे असें वाटत नाहीं. आणि हिंदुस्थानसरकार जर त्यांच्या पाठीमागें टोंचणी लावील तरच प्रांतिक सरका-

---

* 'केसरी' पुणें १७ सप्टेंबर १९२९

रांना त्याच्या जबाबदारीची जाणीव उत्पन्न होईल. या ठरावाचा हेतूहि हाच आहे कीं, एक चौकशी कमेटी नेमून प्रांतिक सरकारांनीं या ग्रामपंचायतीच्या चळवळीच्या बाबतींत काय प्रगति केली आहे, हें त्यांचें त्यांनाच कळून यावें. आणि अशा प्रकारच्या दृष्टीनेंच या ठरावाकडे पाहण्यांत यावें.

## राज्यें बुडालीं पण ग्रामपंचायती टिकल्या.

कांहीं वर्षांपूर्वी खेडेगांवांतील लोक, या ग्रामसंस्थांकडे आस्थापूर्वक पाहणार नाहींत असें सरकारी अधिकाऱ्यांस वाटत होतें. पण ही त्यांची समजूत निखालस खोटी आहे, कारण हिंदी लोकांच्या अंतःकरणांत जात्याच या ग्रामपंचायतींचें बीज अगदीं अनादि कालापासून रुजलें आहे. त्या ग्रामपंचायतींची घटना हल्लींच्या ग्रामपंचायतींच्या कायद्यापेक्षां भिन्न असेल. पण प्रत्येक खेड्यांत तेथील स्थानिक लोकांनीं चालविलेली ग्रामसंस्था होती व तिच्या कारभारांत मध्यवर्ती सरकार हात घालीत नसे ही गोष्ट कोणीहि इतिहासज्ञ कबूल करील. कित्येक राज्यक्रांत्या होऊन गेल्या पण ग्रामपंचायतीचा हा वेल अजून जीव धरून आहे व तो कसा फोफावेल हें पाहण्याची जबाबदारी सहाजिकच सरकारवर येऊन पडते ! ह्या ग्रामसंस्था कशा बुडाल्या हा आजचा प्रश्न नाहीं. पण आज इंग्रजी सरकारच्या अमदानींत तो वेल अगदीं निर्जीव झाला हें मात्र खरें ! परंतु सुदैवानें सरकारलाहि या स्थानिक संस्थांची उपयुक्तता पटली म्हणून आतां तरी लोकपक्ष व सरकार यांच्या संघटित प्रयत्नानें हा ग्रामपंचायतीच्या चळवळीचा वेल फोफावला पाहिजे.

## अधिकाऱ्यांस ही नसती पीडा वाटे !

गेल्या दहा वर्षांत माझ्या (वऱ्हाड) प्रांतांत जो अनुभव आला त्यावरून खेडेगांवांतील लोक आपण होऊनच ग्रामपंचायतीची चळवळ उत्साहानें हातीं घेतील असा भरंवसा वाटतो. कांहीं वर्षांपूर्वी खेडेगांवांतील पुढारी लोकांना या ग्रामपंचायतीच्या कायद्याची माहिती दिली कीं, ते स्थानिक सरकाराकडे ग्रामपंचायतीच्या स्थापनेकरितां अर्ज करीत व सरकारनें या बाब-

तींत आपल्या अधिकाऱ्यांमार्फत चौकशी केली की नापसंती दर्शवीत असें सांगण्यांत येई ! कित्येक वेळां हे अधिकारी ग्रामस्थ मंडळी प्रतिकूल आहेत असे रिपोर्ट करीत ! पण आतां यांतील इंगित काय आहे हें कळून आलें. सरकारचें या बाबतींतलें धोरण जरी प्रतिगामी व प्रतिकूल नसलें तरी या ग्रामसंस्थांच्या चळवळीचें मर्म सरकारी अधिकाऱ्यांच्या लक्षांत येत नसे ! त्यांना ही एक नसती पीडा आहे असेंच वाटे ! म्युनिसिपालिटया, लोकलबोर्डें यांचें हें काम आहेच ! मग ही आणखी ग्रामसंस्थांची ब्याद आपल्या मागें कशाला, अशी त्यांची समजूत ! यामुळें स्थानिक अधिकारी, जिल्हाधिकारी, वरिष्ठ अधिकारी या सर्वांच्या ठिकाणींच सहानुभूतीचा अभाव ! पण दिवाणगिरीचा अधिकार लोकपक्षानें घेतला त्यावेळीं ग्रामपंचायत अधिकारी म्हणून एक स्वतंत्र अधिकारी नेमिला. हा अधिकारी खेडेगांवांतून हिंडूं फिरूं लागला तेव्हां

## वारा अनुकूल दिशेनें वाहूं लागला

व कलेक्टर, कमिशनर वगैरे अधिकाऱ्यांचा दृष्टिकोनहि बदलला. जी काय थोडी वऱ्हाड प्रांतांत ग्रामपंचायतीची वाढ झाली, तीहि या अधिकाऱ्यामुळेंच. लोकांना या ग्रामपंचायतीची उपयुक्तता वाटून, या ग्रामपंचायतीची स्थापना व्हावी अशा तऱ्हेच्या मागणीचे त्यांनीं केलेले अर्ज कलेक्टर–कमिशनरांच्या दप्तरीं पडून राहूं लागले आहेत. माझ्याच यवतमाळ जिल्ह्यांतील पन्नास खेडेगांवांतील लोकांचे अर्ज पडून राहिले आहेत. अलीकडे सुमारें तीस ग्रामपंचायती स्थापन झाल्या. तत्पूर्वी अवघ्या सात आठ होत्या. यावरून लोकांमध्यें या स्थानिक स्वराज्यासंबंधानें आस्था उत्पन्न झालेली आहे हें दिसून येईल.

सुरवातीला प्रथम या ग्रामपंचायतीच्या खर्चाकरितां तीनशें रुपयांची वार्षिक देणगी दिली जाते. प्रांतिक सरकारनें बजेटांत या ग्रामपंचायतीकरितां कांहीं थोडया पैशांची तरतूद केली आहे. शिवाय लोकनियुक्त दिवाण व लोकपुढारी ग्रामपंचायतीची चळवळ करीत आहेत व जिल्हा लोकलबोर्डांचे अधिकारीहि मदत करीत आहेत. कांहीं जिल्हा बोर्डांनीं तर असा नियम

केला आहे कीं, बाजार–कराच्या वसुलांतील कांहीं उत्पन्न ग्रामपंचायतीला तोडून द्यावें.

## ग्रामपंचायतींचें समाधानकारक न्यायदान

ग्रामपंचायतीचा प्रसार करण्याचा दुसरा एक उपाय म्हणजे न्यायदानाचा अधिकार ग्रामपंचायतींना देणें हा होय. ग्रामपंचायतींना हा अधिकार देण्यांत आला आहे व या अधिकाराचा सदुपयोग तेथील ग्रामस्थ लोक करीत आहेत. या पंचायतीच्या निकालावर जिल्हाधिकाऱ्याकडे अपीलें होतात, नाहीं असें नाहीं. तथापि आतांपर्यंतच्या अनुभवावरून असें दिसतें कीं, सरकारी ऑनररी मॅजिस्ट्रेटपेक्षां या ग्रामपंचायतीच्या अधिकाऱ्यांना अधिक न्यायबुद्धि आहे. या ग्रामपंचायतीच्या अधिकाऱ्यांनीं केलेले निकाल ऑनररी थर्ड क्लास व सेकंड क्लास मॅजिस्ट्रेटच्या निकालाइतके चांगले आहेत. वऱ्हाड, महाराष्ट्रापेक्षां शिक्षणाच्या बाबतींत पुढारलेला नाहीं. तरी पण प्रांतिक सरकार व लोकपक्षांचे पुढारी ग्रामपंचायतीचें कार्य हें पवित्र कार्य समजून ग्रामपंचायतीची चळवळ यशस्वी करण्याकरितां झटत आहेत.

अशा प्रकारची सहानुभूति व प्रोत्साहन प्रांतिक सरकारनें दाखवावें हीच या ठरावांत मागणी केली आहे. व ही सहानुभूति वरिष्ठ सरकारच्या टोंचणीशिवाय येणार नाहीं. निरनिराळ्या प्रांतांत ग्रामपंचायतीची चळवळ चालू आहे व प्रांतानिहाय या पंचायतीचें क्षेत्रहि वेगळें असेल. या दृष्टीनें सर्व प्रांतांतील ग्रामपंचायतीच्या कामाला एकसूत्रता येण्याकरितां व खेडेगांवांतील लोकांत कोणते गुण उत्पन्न व्हावेत हें ठरविण्याकरितां कमेटी नेमून चौकशी करणें जरूरीचें आहे.

## चौकशी करण्याची आवश्यकता

मि. फ्रेड्रिक साइक्स यांना असें वाटतें कीं, "सायमन कमिशन बसलें आहे, तेव्हां हा ठराव मंजूर करण्याची जरूरी नाहीं." पण त्यांचा मुद्दा मला पटतच नाहीं. खेडेगांवांतील लोकांमध्यें जागृति उत्पन्न होऊन, जर ग्रामसंस्था स्थापण्याची चळवळ करणें जरूरीचें आहे, असें अनुभवानें ठरलें आहे, तर या ठरावाप्रमाणें चौकशी करणें अत्यंत जरूरीचें आहे. ती एक

कमिशनला मदतच होईल. कमिशनचा निकाल या ठरावाविरुद्ध न होतां या ठरावाला पोषकच होईल. ना. अझीझ यांना ग्रामपंचायतीवरील प्रांतिक सरकारचें नियंत्रण नसलें तर अनवस्था प्रसंग येईल असें वाटतें! प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा अधिकार दिला तर गोंधळ माजेल ही समजूत चुकीची आहे. प्रांतिक सरकार व जिल्हाधिकारी यांचें नियंत्रण अजिबात नाहींसें होईल ही भ्रामक समजूत आहे. खेडींपाडीं सुधारण्याची चळवळ सुरू झाली आहे. अर्थात् सरकार या बाबतींत काय करणार आहे हा खरा प्रश्न आहे. आणि या ठरावानेंहि तोच प्रश्न पुढें आणिला आहे. या ठरावावर सरकार जें धोरण स्वीकारील त्यावरूनच प्रत्यक्ष गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टांतील उद्देशपत्रिकेप्रमाणें तें काय करावयास तयार आहे हें दिसून येईल.

---

# जमीन, जनावरें व जंगल

यवतमाळ येथें ग्रामपंचायतप्रबोध व्याख्यानमाला नोव्हेंबर १९२९ मध्यें करविण्यांत आली होती. तींत दे.भ. माधवरावजी अणे यांचें एक महत्त्वाचें भाषण झालें. ह्या भाषणाचा हस्तलिखित रिपोर्ट रा. सा. उत्तमराव इटकीकर एम्. एल्. सी. चिटणीस, विदर्भ ग्रामपंचायत संघ यांचेकडून मिळाला त्यावरून हें भाषण दिलें आहे.

## ग्रामशब्दाची व्युत्पत्ति

सद्गृहस्थहो! गांव व्यवस्थित व सुस्थितींत राखण्यास ग्रामपंचायत आहे. म्हणून ग्राम ह्या शब्दाचें काय महत्त्व आहे हें आपण पहिल्यानें पाहिलें पाहिजे. ग्राम या शब्दाची उत्पत्ति फार प्राचीन काळांत झालेली आहे. एकएकटें राहण्याचें सोडून देऊन मनुष्य अरण्यांत ठिकठिकाणीं गट (कळप) करून राहिला त्यावेळीं 'ग्राम' हा शब्द उपयोगांत आणला गेला. अरण्यांतील पशू, पक्षी व कीटक इत्यादींचा आवाज बऱ्याच अंतरावरून रात्रीच्या प्रहरीं आपण ऐकला असेल. असे निरनिराळ्या प्रकारचे आवाज एकत्र झाले म्हणजे त्यांचा ध्वनि किती मधुर वाटतो, ह्याची कल्पना आपणांपैकीं पुष्क-

ळांस आहेच. अरण्यांत मनुष्यें कळप करून राहावयास लागल्यावर त्यांच्या ठिकाणांहूनहि असाच मधुर आवाज एकएकट्या माणसास ऐकूं जाई, व त्यामुळें त्याला आनंद होई. निरनिराळ्या प्रकारचे आवाज एकत्र होऊन त्यापासून जो एक मनमोहक सूर निर्माण होतो, त्याला प्राचीन काळीं ग्राम ही संज्ञा असल्यामुळे गट करून राहिलेल्या मनुष्यांच्या ठिकाणांस ग्राम म्हणून संबोधण्यांत येऊं लागलें. आपण कधीं बाजाराला गेलां असाल. तेथील उत्पन्न होणारा आवाज ४–६ फर्लांगावरून ऐकल्यास तो गोड वाटल्याशिवाय राहिला नसेल. त्याला सुद्धां ग्राम म्हणतात. गाणारे किंवा पेटी वाजविणारे सप्तसूर एकदम एकत्र लावून एक राग वाजवितात, किंवा म्हणतात त्यालाहि त्या शास्त्रांत ग्राम म्हणतात. ग्राम ह्या शब्दावरून आपली एक कल्पना निश्चित झाल्याशिवाय राहणार नाहीं. ग्रामांत मतभेदरूपी कितीहि प्रकारचे आवाज निघोत; परंतु लांबून त्या गांवची एकोपारुपी कीर्ति ऐकून लोकांच्या मनांत आनंद उत्पन्न होईल. तें ठिकाण ‘ ग्राम ’ह्या नांवानें संबोधण्यास पात्र ठरेल. प्राचीन काळानंतर बरेच वर्षांनीं ‘ ग्रामास ’ गांव किंवा खेडें म्हणून लोक संबोधावयास लागले.याचासुद्धां इतिहास देण्यासारखा आहे. परंतु आपल्या विषयाच्या दृष्टीनें तो येथें सांगणें महत्त्वाचें नाहीं.

## जमीन, जनावरें व जंगल हे तीन ‘ज’कार

गांव किंवा खेडें बनण्याचें साधन मनुष्य आहे व तो जगण्यास आणि वाढण्यास ‘जमीन’ ‘जनावर’ ‘ जंगल ’ ह्या तीन जकारांची आवश्यकता आहे. या तिहींचीहि जोपासना व सुस्थिति जेथें होते तें खेडें होय हें यावरून स्पष्ट आहे. तीनहि जकार कच्चा माल तयार करण्यास मदत करितात. ह्या तिहींचाहि निकट संबंध खेड्यांशीं असल्यामुळें देशाच्या दृष्टीनें त्याला विशेष महत्त्व आहे. शहर हें ठिकाण कच्चा माल फस्त करणारें असल्यामुळें त्याला इतकें महत्त्व असणें शक्य नाहीं. आपल्या देशांत खेडीं फार आहेत. त्याचा अर्थ तीनहि जकारांचें प्राबल्य फार आहे हें उघड आहे. एक एक खेडें उर्जितावस्थेस आणून देशाचें कल्याण सरकारास करावेंसें वाटल्यास त्याला ह्या तीनहि गोष्टींची व्यवस्था लावणें जरूर आहे.

सरकारनें ॲग्रिकल्चर, फॉरेस्ट व व्हेटर्नरी अशीं निरनिराळ्या प्रकारचीं अनेक खातीं निर्माण केलीं. या सर्व खात्यांचीं तोंडें वेगवेगळ्या दिशेकडे आहेत. एकानें सुचविलेले विचार दुसरें खातें ऐकावयास तयार नाहीं. सर्व खातीं एकत्र होऊन ह्या तीन जकारांचा विचार अद्यापि झालेला नाहीं. आपआपल्या खात्यासंबंधीं प्रत्येकास विशिष्ट महत्त्व वाटत असल्यामुळें ह्या बाबींची किंचित्‌हि वाढ होऊं शकली नाहीं. आतां खेडयांचें सर्व बाजूनें कल्याण व्हावें ह्या हेतूनें गांवचा कारभार तेथील रहिवाशांच्या हातीं देतां यावा म्हणून कार्यकर्त्या लोकांनीं पंचायती स्थापन करण्यास सरकारास भाग पाडलें आहे. त्या ग्रामपंचायती सर्वत्र स्थापन झाल्यास त्या ह्या तीनहि जकाराबाबत योग्य धोरण सुचवितील, तेव्हां हा प्रश्न आपोआप सुटेल असें मला वाटतें.

## खेड्यांत पक्का माल बनविण्याच्या अडचणी

कच्चा माल खेड्यांत निर्माण केला जातो. ह्या कच्च्या मालाचा पक्का माल तयार करावा ही इच्छा खेड्यांतील लोकाना होणें साहजिक आहे. तसेंच अभिमानाचेंहि आहे. आपली उर्जितावस्था व्हावी म्हणून खेडयांतील माणूस आहे यापेक्षा कच्चा माल जास्त पैदा करण्याचे निरनिराळे मार्ग शोधू शकेल व त्याकरितां निरनिराळीं सुधारलेलीं साधनेंहि उपलब्ध करूं शकेल. परंतु पक्का माल आपल्याच गांवीं करावा ह्या त्याच्या इच्छेस बऱ्याच अडचणी निर्माण झाल्याशिवाय राहावयाच्या नाहींत. बाहेर देशांतील लोक पक्का माल तयार करितात. त्याकरितां त्यांना पैसा गुंतवावा लागतो व तो पुढें मिळविल्यानंतर त्याचा चोख हिशेबहि ठेवावा लागतो. ह्यामुळें तिकडे अर्थशास्त्र निर्माण झालें आहे. तें त्या लोकांना अनायासेंच येतें. आपल्या देशांत ही स्थिति नाहीं म्हणून आपलें अर्थशास्त्रहि अजून लिहिलें गेलें नाहीं. म्हणून बऱ्याच अडचणी असणें स्वाभाविक आहे.

## त्या निवारण्यास ग्रामसंस्थांचेंच सहाय्य हवें.

ह्या अडचणी कशा घालवाव्या ह्याचें दिग्दर्शन सध्यां असलेल्या ग्रामपंचायत कायद्यांत केलेलें दिसत नाहीं. ग्रामपंचायत कायदा करणाऱ्याची व

कायद्यावरून झालेली, त्यांतील काम करणाऱ्यांची दृष्टि शहराच्या नमुन्याचें खेडे करून दाखवूं अशी असल्याचें मला दिसतें. शहरांतील सडका, कंदील, नळ, पायखाने वगैरेसारख्या गोष्टी खेड्यांतून केल्या म्हणजे आपली कामगिरी झाली असें लोकांस वाटतें. त्यांच्या पहाण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे असें मला वाटतें. लोकांच्या ह्या प्रयत्नांनीं खेड्यांतील लोकांच्या खरोखरीच्या अडचणी सुटत नसल्यामुळें त्यांचें लक्ष अशा शहरपद्धतीकडे वळावें तसें वळणार नाहीं.परंतु त्यांच्या जीवितास उपयोगी व जवळच्या अशा तीन जकाराच्या गोष्टी कार्यकर्त्यांनीं व पंचायतींनीं हातीं घेतल्यास खेड्यांतील लोकांची आस्था वाढेल.शेतकऱ्याची सुस्थिति अथवा अवनति ह्या तीन गोष्टींवर अवलंबून असल्याने पंचायतींतील लोकांनी त्याचा सशास्त्र विचार करावयास पाहिजे. खेड्यांतील पेढीचा किंवा पचायतीचा सरपंच बोलावून त्याला औपचारिक रीत्या खेड्यांतील सुखदुखा:चीं माहिती विचारल्यास तो ती उत्तम तऱ्हेनें सांगूं शकेल. खेड्यांतील लोकांशीं संबंध नसलेल्या शहरविद्वानांस खेड्यांतील लोकांची गाऱ्हाणीं ततोतत सांगता येणे अशक्य आहे. यावरून पाहातां लोकांच्या नक्की अडचणी शोधून काढून त्यावर इलाज करणें व त्यांना सुस्थिति प्राप्त करून देणें, ह्यायोगाने त्यांच्या प्रातिनिधिक ग्रामपंचायत संस्था व त्यांतील लोक जास्त उपयोगी होतील, हें आपण खात्रीनें समजावें.

## जनावरांशिवाय शेतकरी स्वावलंबी होणार नाहीं.

पंचायतीला आपल्या खेड्यांतील शेतकरी सुस्थितींत आणावयाचा असल्यास त्याच्या शेतींत उत्तम व जादा पीक कसें निघेल याबद्दल मार्ग सुचवावे लागतील. त्याच्या शेतीकरितां त्याला उत्तम जनावरें मिळतील अशी व्यवस्था करावी लागेल. उत्तम जनावरें मिळण्यास मुबलक चारा ज्या जंगलांतून मिळेल तें जंगल व त्यांतील चारण्याचे दर व इतर नियम शेतकऱ्यास हितावह होतील अशी तजवीज घडवून आणावी लागेल. जमिनीची मशागत उत्तम व थोड्या खर्चांत व्हावी, याकरितां यंत्रें उपयोगांत आणावींत व लोकांची आर्थिक स्थिति सुधारावी असें म्हणणारे कांहीं लोक आहेत. यंत्रें

आणून जनावरें नाहींशीं करणें ही कल्पना मला शक्य कोटींतील वाटत नाहीं. जनावरांचीच जरूर शेतकऱ्यांच्या शेताकरितांहि आहे. त्यांच्या जमिनींत यंत्रें, कांहीं खत टाकून तिचा मगदूर वाढवितील हें अशक्य आहे. शेतकऱ्याजवळ जितकी जमीन असेल ती खतण्याकरितां पुरेशीं जनावरें त्याच्याजवळ असावयास पाहिजेत. असें असेल तरच तो स्वावलंबी होऊं शकेल. शेतकरी लोक बाहेरून रासायनिक खत आणून त्याचा उपयोग करीत नाहींत, म्हणून त्यांना कळत नाहीं, हें म्हणणें मला पटत नाहीं. प्राचीन काळापासून त्यांना खताची किंमत माहीत असली पाहिजे. एरव्हीं ते खतास सोनें म्हणून कधींच संबोधितेना. आतां प्रत्येक गोष्ट आंकडे शास्त्रानें सिद्ध करावी लागते. शेतकी खात्यानें आपल्या शास्त्राचा उपयोग करून जमिनीला खताच्या उपयोगाकरितां किती जनावरें लागतील, मिळालेल्या खताचा उपयोग कसा व्यवस्थित होईल ह्याचा विचार करून त्याची माहिती लोकांस पुरवावयास पाहिजे. खताच्या किंमतीपेक्षां दुसरें जळण शेतकऱ्यास स्वस्त व कमी त्रासांत मिळालें तरच तो शेणाचा उपयोग खताकडे करूं शकेल. पुरेसें खत जमा करण्यास शेतकऱ्याजवळ तेवढीं जनावरें हवींत व जनावरें जगविण्यास त्याच्या शेतांत तितका कडबा, गवत, वगैरे सारखा चारा पाहिजे. जनावरांच्या संख्येप्रमाणें आज लोकांजवळ चारा नाहीं. हें सरकारी आंकड्यांवरून व खेड्यांतील प्रत्यक्ष स्थितीवरून दिसून येणारें आहे. म्हणून सरकारनें जनावरांना पुरेसें जंगल ठेवावयास पाहिजे.

## जनावरांच्या किंमती वाढल्या व माणसांच्या उतरल्या !

चराईकरितां वेगळी जमीन ठेवणें हें अशक्य आहे किंवा नाहीं ह्याचा विचार ( रॉयल कमिशन ऑफ ॲग्रिकल्चर ) शेतकी कमिशननें केला— त्यांच्या सूचनांवर फॉरेस्ट कॉन्सरव्हेटर मंडळींनीं असा शेरा मारिला कीं, असें करणें बिलकूल अशक्य आहे ! हाच प्रश्न फॉरेस्ट कमिटीनें आतां हातीं घेतला आहे. फॉरेस्ट खात्याच्या धोरणामुळें शेतकऱ्यांस बरेंच नुकसान पोहोंचलें आहे. त्यांच्या धोरणामुळें जनावरांचा धंदा करणारे वंजाऱ्यासारखे लोक उत्तम व पुरेशीं जनावरें वाढवूं शकत नाहींत. मग खास

शेतकऱ्यास जनावरांची नसल सुधारून ती मजबूत करण्याचें काम तर दूरच राहिलें. ह्यामुळें शेतकऱ्यांच्या धंद्यास लागणारा जनावरांचा पुरवठा अपुरा पडतो. त्याचा परिणाम जनावरांच्या किंमती वाढण्यांत झाला आहे. जमिनींच्या किंमती वाढल्या नसतां जनावरांच्या वाढल्या व माणसांच्या उतरल्या, ह्यांच्या ह्या कार्यकारणभावांचा विचार लोक करीत नाहींत. सन १८९१ सालीं जंगलखात्याचें धोरण ठरलें. जंगल वाढवून राखावें व त्याचा सर्वांना उपयोग व्हावा, म्हणून त्यांत मौजे व राखे निर्माण केलें. ह्या जंगलाचा उपयोग विशेषेंकरून शेतकऱ्यांस होईल असा सिद्धांत त्या वेळीं ठरवून दिला. ह्याचा वार्षिक आढावा त्या जिल्ह्याच्या डेप्युटी कमिशनरकडे यावा, ही पद्धतीहि सुरू झाली. हा डेप्युटी कमिशनर सर्वांचा वाली ( अज्ञान, मूर्ख वगैरेंचा ) त्याच्या सल्ल्यानें जंगलमधील ( सी ) क्लासचा ( ए ) क्लास करण्यांत आला. शेतकऱ्यांना ही माहिती होणें शक्य नव्हतें. त्यांचीं जनावरें एका वर्गांतून दुसऱ्या वर्गांत चारलीं गेलीं ह्या सबबीवर तीं भराभर कोंडवाड्यांत घातलीं गेलीं. अजूनहि अशा गोष्टी मधून मधून होत असतात. जंगलाचा अधिकारी आपल्या ताब्यांतील खात्याचा तज्ज्ञ समजला जातो; शेती खात्यांतील अधिकारी आपल्या खात्याचा तज्ज्ञ समजला जातो. एकानें दुसऱ्याच्या खात्यांत काय करावें, कोणत्या सूचना कराव्या, इत्यादिसारख्या हितकर गोष्टी वरील तत्त्वांमुळें कोणी सांगू शकत नाहीं. शेतकऱ्याचा संबंध सर्वांशीं असल्यामुळें, त्याला त्याच्या सोईनें सर्व घडवून आणावयाचें असल्यानें वेगवेगळ्या खात्यांच्या तज्ञांची एकवाक्यता करणें प्राप्त होतें. आजपर्यंतच्या अनुभवांवरून वेगवेगळ्या तज्ज्ञांची एकवाक्यता होणें दुर्मिळ आहे. म्हणून तूर्त शेतकी पंडित व अरण्यपंडित यांचें भांडण लागून त्यांच्याकडून आपल्या अडचणींची चौकशी करण्यापलीकडे शेतकऱ्यास दुसरा मार्ग नाहीं.

## सरकारी धोरणांत बदल करणें अवश्य आहे.

शेतीचें काम करण्यास आणि तिला पुरेसें खत पोहोंचविण्यास, पुरेशीं जनावरें शेतकऱ्याजवळ राहाण्यास चाऱ्याकरितां सरकारनें जंगलमध्यें सवलती द्यावयास पाहिजेत ही गोष्ट आतांपर्यंतच्या विवरणावरून आपल्या लक्षांत

आली असेल. सरकारच्या सुव्यवस्थेमुळें पुरेसा चारा मिळाल्यास शेतकऱ्यास चांगलीं जनावरें ठेवितां येतील व त्यामुळें त्या गांवच्या दूधदुभत्याचा प्रश्न-सुद्धां सुटेल. खेड्यापाड्याच्या जवळ असणाऱ्या शहरांनासुद्धां ह्या दूध-दुभत्याचा उपयोग होईल. लोकांना ह्यामुळें कसदार आहार मिळेल व प्रजा सुदृढ दिसावयास लागेल. मात्र हें सर्व घडून आणावयास सरकारला आपल्या खात्यांतील सध्यांच्या धोरणांत बदल करावा लागेल.

## शेतकऱ्याचें कर्ज कसें फिटेल हें कोडेंच आहे.

शेतकऱ्यास जंगल व जनावर यांची आवश्यकता त्यांच्या जमिनीकरतां किती आहे ह्याचें दिग्दर्शन येथपर्यंत झालें आहे. जनावरांचे शेण किती महत्त्वाचें आहे हें कळलें आहे. ह्या शेणास शेतकरी जसें सोनें म्हणतात तसेंच जमिनीलाहि सोनें म्हणतात. बाहेरील सावकार लोक आमच्या जमि-नीस सोनें म्हणावयास तयार नाहींत. जगांत सोन्याची किंमत ठरलेली आहे व म्हणून ते सावकार सोन्याचा संग्रह वाढवितात. जमिनीची किंमत ठरलेली नाहीं, म्हणून खऱ्या व्यापाऱ्याच्या मतानें जमीन हें तारण बरोबर दिसत नाहीं. आपल्या साऱ्याकरितां सरकारनें मात्र शेतकऱ्याच्या जमिनीबद्दल हें ठरविलें आहे. शेतकऱ्याचें तारण निश्चित किंमतीचें नसल्यानें जगांत त्याची असावी तेवढी पत नाहीं; ती वाढविण्यास निरनिराळे मार्ग शोधावयास पाहिजेत. व त्यामुळें खेड्यांतील शेतकरी सुस्थितींत आणावयास पाहिजे. सेंट्रल इंडिया कॉटन कमिटी ह्याच एका दृष्टीनें विचार करीत आहे. निर्भेळ कापसाचा पुरवठा सतत टिकवितां यावा हा तो विचार होय. ह्या विषयांचा विचार करण्याकरितां त्या कमिटीनें आपल्या वऱ्हाडांत चौकशी केली. त्यांत त्यांना कपाशीच्या पेऱ्याचें क्षेत्रफळ शेकडा ६० व दर एकरीं कर्ज ३०ते६० रुपये आढळलें आहे. एका रेव्हेन्यू इन्स्पेक्टरनें एकरीं गहाणी कर्ज २५–३० रुपये असल्याचें सांगितलें आहे. शेतकऱ्यानें वर्षभर केलेल्या व्यवहारां-तून खर्च केला असल्यामुळें त्याला वायदासुद्धां देणें कठीण होतें. एवढें कर्ज कसें फिटेल हें मला कोडेंच वाटतें! शेतकऱ्यांना नक्की हिशेब करतां येत नाहींत. तो खर्चाचा हिशेब न सांगतां उत्पन्न तेवढें बोलतो म्हणून इतर

लोकांना त्याच्या धंद्यांत नफा दिसतो असें माझें म्हणणें आहे. म्हणून कार्य-कर्त्या लोकांनीं शेतकऱ्याच्या आर्थिक परिस्थितीचा व त्याच्या राहाणीचा अभ्यास करून तो सुखी होईल असे इलाज शोधावयास पाहिजेत. माझ्या मतें तीन जकार बरोबर सोडविले तर हें कोडें सहज सुटेल.

### ग्रामपंचायतींनीं पुढाकार घ्यावा

ग्रामपंचायतीला हे सर्व प्रश्न अति निकडीचे आहेत. तिनें शेतकऱ्याचे हे प्रश्न सोडविले म्हणजे सर्व गोष्टी आपोआप सुटतील. जंगल, शेती व मुलकी हीं खातीं कोठें तरी एकत्र करून त्यांत पंचायतीनें मदत केल्यास यश दाखविणें सोपें आहे. ग्रामपंचायतीला आपल्या गांवाबाहेरहि पुष्कळ करतां येण्यासारखें आहे, हें या तीन जकारांच्या हकीकतीवरून स्पष्ट आहे. शिवाय आज विविध प्रकारें माहिती प्रसिद्ध होत आहे तिचाहि फायदा अवश्य करून घ्यावा.

---

## जंगलच्या तक्रारी*

३ डिसेंबर १९२९ रोजीं घोणसा येथें श्री. दत्तात्रय कृष्णाजी काणे यांच्या अध्यक्षतेखालीं वणी तालुका परिषद झाली, तींत दे. भ. बापूजी अणे यांचें पुढील आशयाचें भाषण झालें:—

शेतकऱ्यांच्या तक्रारी शेतकऱ्यांनींच सांगितल्या पाहिजेत. कोटटोपी घालणाऱ्या एखाद्या रामभाऊ भागवतासारख्या गृहस्थानें शेतकऱ्यांच्या तक्रारी सांगितल्या तरी तो शेतकऱ्यांतर्फे बोलत नाहीं व तो शेतकऱ्यांना बिघडून टाकील असें बोलतात व हेंच त्यांचें धोरण आहे असा अनुभव मागें पांढर-कवडा तालुक्यांत जंगलसंबंधीं भांडण झालें त्यावेळीं आलेला होता. तेव्हां असें म्हणण्यास जागा राहूं नये म्हणून या परिषदा भरविण्याचा उपक्रम केला आहे. यांत आपल्या तक्रारी तुम्ही सांगा. ज्यांना लिहितां वाचतां येतें त्यांनीं जंगलकमिटीच्या प्रश्नास उत्तरें लिहून पाठवावीं.

---

* 'लोकमत' यवतमाळ १३–१२–१९२९

## जंगलाची उत्पत्ति जीवनाकरितां, शास्त्राकरितां नाहीं.

जंगल अधिकाऱ्यांचें म्हणणें कीं, गुरांची संख्या वाढली त्याला आम्ही तरी काय करावें ? परंतु गुरें वाढलीं कीं कमी झालीं हें शेतकऱ्यासच माहीत ! गेल्या ५।२५ वर्षांपूर्वी लागवडीची जमीन किती होती व आतां किती आहे ? त्या मानानें जनावरें वाढलीं कीं कमी झालीं ? जमिनीच्या प्रमाणांत जनावरें वाढलीं नाहींत तर पुरेसें खत मिळणार नाहीं, व वाढलेल्या वहितीला जरूर इतकीं जनावरें राहत नसतील तर जनावरांना पुरेसा चारा मिळत नाहीं म्हणून तीं राहात नाहींत कीं काय याची चौकशी झाली पाहिजे. जंगलचा शेतकीशीं काय संबंध आहे याची शहानिशा झाली पाहिजे. जंगलचें हल्लीं नवें शास्त्र होऊन बसलें आहे व अरण्यशास्त्राच्या पंडितांनीं उपदेश करावा, त्याप्रमाणें जंगलखात्याचें काम चालावें असा प्रकार झाला आहे. परमेश्वरानें जंगल उत्पन्न केलें तें शास्त्राकरितां उत्पन्न केलें नाहीं. जंगल, हवा, पाणी हे पदार्थ त्यानें लोकांच्या जीवनाकरितां निर्माण केले आहेत. जंगलचे अधिकारी बेशरमपणें सांगतात कीं, पाहिजेत कशाला ह्या इतक्या गाई ? हे अधिकारी म्हणजे चीफ कन्सर्व्हेटर ! जो शेतकरी जनावरें आपल्या पोटच्या पोरांप्रमाणें वाढवितो त्याला हें उत्तर मिळतें ! आंब्याचें झाड फळांनीं लदबदलेलें पाहिलें म्हणजे जसें तोंडाला पाणी सुटतें, त्याप्रमाणें गाय पाहिली कीं, ह्या लोकांच्या तोंडाला पाणी सुटतें कीं काय ? गाईंना खायला मिळालें नाहीं म्हणजे त्या महाग पडून खाटकाला विकल्या जातील व आपणाला अनायासेंच थोडक्यांत अन्न मिळेल या बुद्धीनें हा अधिकारी तिकडे पाहतो कीं काय असा संशय वाटतो ! शेतकीची सुधारणा व्हावी असें वाटत असेल तर स्वस्थ न बसतां पुढें येऊन तक्रारी करा. तक्रारी केल्यावर रिपोर्ट काय होतो तें पाहूं, व सरकारनें कारवाई न केली तर काय करायचें तेंहि पाहूं ! सरकार कितीहि बलाढ्य असो, लोक निकरावर आले तर गोंधळ माजवूं शकतात व शास्त्रें जागच्या जागींच राहतात ! म्हणून माझें आग्रहाचें सांगणें हेंच आहे कीं, कायदेशीर तक्रारी करा, व जर कमिटीनें जंगलचा अन्याय दूर केला नाहीं तर आमचा आम्ही जंगलचा अन्याय दूर करून घेऊं असें त्या कमिटीला सांगूं. ज्या तक्रारीकरितां आम्ही चळवळ करीत आहोंत त्या इतःपर राहूं द्यावयाच्या नाहींत असा निश्चय करा.

# निःशस्त्र प्रतिकार*

उमरावती येथे ता० २० एप्रिल १९३० इ. रोजीं श्री. माधवराव अणे यांचें झालेलें भाषण—

माझा ह्या विषयाकडे प्रथमपासूनच ओढा होता. निःशस्त्र प्रतिकारा-विषयीं मीं पूर्वींच "हरिकिशोर" पत्रांत लेख लिहिलेले आहेत. माझें पूर्वींचेंच मत कायम असल्यामुळें मी आज सत्याग्रहास तयार झालों आहें.कारण हीच परिस्थिति निर्माण व्हावी अशी माझी पूर्वींपासून इच्छा होती. तेच विचार व आचार आज जुळण्याची वेळ आली आहे. लो. टिळकांनीं १९०६ सालीं हीच निःशस्त्र प्रतिकाराची दिशा राष्ट्राला दाखविली होती, व आम्ही वेळ आल्यास तिचा अवलंब करूं असें सरकारास स्पष्ट बजाविलें होतें. बंगालच्या फाळणीच्या वेळीं बहिष्कार व स्वावलंबन हे दोन निर्वाणीचे मार्ग त्यांनीं सुचविलेच होते. कर न देण्याचा मुद्दाहि त्यांनीं त्याच वेळीं पुढें आणला होता. " सिव्हिल डिसओबिडिअन्स "लाच त्या वेळीं 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' हें नांव होतें. दोहोंचा अर्थ एकच.पण दोहोंमध्यें थोडा तात्त्विक फरक आहे. लो० टिळकांचा निःशस्त्र प्रतिकार हा प्रवृत्तिपर होता. तर महात्माजींचा प्रतिकार निवृत्तिपर आहे. म्हणूनच सविनय कायदेभंगाचा थोडक्यांत अर्थ, सत्ताधाऱ्याची आज्ञा तर मानावयाची नाहीं व आपला विनय तर सोडावयाचा नाहीं असा आहे. विनीत राहा ! असा म० गांधी ह्यावेळीं सारखा उपदेश करीत आहेत. म्हणजे स्वतः शारीरिक क्लेश सहन करा व प्रतिपक्षाच्या हृदयांत बदल घडवून आणा! विनीत राहण्याच्या परिस्थितींत लोक नाहींत हें पाहतांच,स्वतःला लोक काय म्हणतील याची क्षिति न बाळगतां म० गांधींनीं बार्डोली येथें मनमोकळेपणानें आपलें पाऊल १९२२ सालीं परत घेतलें. आज मात्र त्यांच्याहि वृत्तींत थोडा पालट होऊन ते म्हणूं लागले आहेत कीं, अराजकता पत्करली, परंतु ही मृतवत् शांततेची गुलामगिरी आतां नष्ट केलीच पाहिजे ! राष्ट्रानेंहि त्यांच्या म्हणण्यास फार मोठ्या प्रमाणांत रुकार देऊन जिकडून तिकडून कृतीनें जबाब दिला आहे.

---

* 'उदय' उमरावती ता० २२ एप्रिल १९३०

## मी ह्याच चळवळींत कां पडलों ?

अशा वेळीं आपण आपलेंहि कर्तव्य करावें ह्याच हेतूनें मी ह्या चळवळींत सामील झालों आहें. दुसरा विचार असा कीं, राष्ट्राच्या उन्नतीच्या वेळीं अशी एक वेळ येत असते कीं, कोणी एक महापुरूष निर्माण होतो, व तो सांगेल तशी बहुजनसमाज कृति करूं लागतो. आज म॰ गांधींसारखा जगद्विख्यात महापुरूष येथें अवतीर्ण झाला आहे. ही महा सामर्थ्यवान् व्यक्ति आज जें सांगत आहे, त्याप्रमाणें वागणें आपलें कर्तव्य आहे असें वाटून मी आज ह्या सत्याग्रहांत भाग घेत आहें. म. गांधींचा स्वभाव 'बोले तैसा चाले' असा आहे. जें बोलावयाचें तें करून दाखवावयाचेंच असे अलौकिक निग्रही पुरूष ते आहेत. ते तपस्वी आहेत व जणुं काय व्यावहारिक गोष्टींत आपल्या तपश्चर्येची परीक्षाच करावयास ते निघाले आहेत. शिवाय आज जें कर्तव्य त्यानीं हातीं घेतल आहे तें आपल्या आयुष्यांतील शेवटचें कार्य. अगदीं निर्वाणीचा उपाय म्हणून हा लढा त्यांनीं सुरू केला आहे. असा मोठा लढा व अशी मोठी चळवळ पुढें शतकों शतकें येईल कीं नाहीं याची शंका आहे. मग आपल्या उरल्यासुरल्या आयुष्यांत तर खात्रीनें येणार नाहीं. मग आपण प्रयत्न कां करूं नये ? हाहि एक ह्या चळवळींत पडण्यास कारण झालेला विचार आहे. ह्याशिवाय परिस्थितीहि आज ह्या चळवळीस अनुकूल अशी आहे. फक्त कांहीं आक्षेपक असें म्हणतात कीं, अद्यापि समय प्राप्त झाला नाहीं. इंग्रजांस पुरेसा वेळ द्या, त्यांना नीट विचार करूं द्या, त्यांची खात्री करून द्या ! परंतु माझें मत असें आहे कीं, ज्यांना कार्यच करावयाचें नसतें त्यांच्या उपयोगी पडणारा हा पुराणकालापासूनचाच शास्त्रार्थ आहे. आक्षेपकांचें दुसरें विचारणें असें कीं, तुम्हांस आतांपर्यंत " डोमिनिअन स्टेटस् " चालत होतें व आजच एकदम पगडी फिरवून

## तुम्हीं स्वातंत्र्य कां बोलतां ?

राऊन्ड टेबल परिषद् भरविण्यापूर्वींच एवढी घाई कां करितां ? त्यास उत्तर हेंच कीं, राऊन्ड टेबल परिषदेंत स्वराज्याचा तर नाहींच, पण प्रत्यक्ष

'डोमिनिअन स्टेटस्' चाहि विचार व्हावयाचा नाहीं; अशी स्पष्ट इशारत व्हॉइसरॉय साहेबानीं असेंब्लींतील आपल्या भाषणांतून राष्ट्रप्रतिनिधींना वारंवार दिली आहे. दिल्ली येथें पुढाऱ्यांनीं जाहीर पत्रक काढून कांहीं मागण्या केल्या, त्या पुढीलप्रमाणें:—( १ ) नेहरूयोजनेला अनुसरून सुधारणा देतों असें जाहीर करा; ( २ ) राऊन्ड टेबल परिषदेंत राष्ट्रीय पक्षाचे सर्व पुढारी घेऊं असें वचन द्या. ( ३ ) त्यापूर्वींच देशांतील सर्व राजबंदींची मुक्तता करा व ( ४ ) आजच डोमिनिअन स्टेटस् मिळाल्याप्रमाणें राज्यकारभार चालू करा. परंतु सप्टेंबरपासून व्हॉइसरायानीं जीं भाषणें केलीं त्यांत त्यांनीं स्पष्ट केलें आहे कीं, ह्यांपैकीं एकहि अट मान्य होणें शक्य नाहीं. ह्या नसत्या भ्रमांत हिंदी लोकांनीं पडूं नये. राष्ट्रप्रतिनिधींच्या तोंडावर त्यांनीं असें झोंकून दिलें आहे कीं, "डोमिनिअन स्टेटस् हें ध्येय आम्हालाहि कबूल आहे; पण तो शेवटचा मुक्काम समजून आज पहिला मुक्काम कोणत्या दिशेला करावयाचा एवढाच आजचा प्रश्न आहे. फक्त पहिल्या टप्प्याचाच विचार राऊन्ट टेबल परिषदेंत व्हावयाचा आहे, अधिक नाहीं." हें भाषण होण्यापूर्वीं मीहि म. गांधींस म्हणत होतों कीं, व्हाइसरॉय साहेबांस तुम्ही पुरेसा वेळ देत नाहीं. पण व्हाइसरॉय साहेबांचें गेल्या जानेवारींतील वरील आशयाचें बोलणें ऐकून मला वाटूं लागलें कीं, आतां स्वयंनिर्णयाचीच वेळ आली आहे. दक्षिण आफ्रिका, कानडा, आस्ट्रेलिया ह्यांस स्वयंनिर्णयाचें तत्त्व लागू आहे; मग त्यांच्या बरोबरीनें साम्राज्याचें एक स्वतंत्र घटक म्हणून बसणारे आम्ही हिंदुस्थानचे लोकच स्वयंनिर्णयास लायक कां नाहीं? हा डाव आहे; पण तो हाणून पाडला पाहिजे. आमचा स्वयंनिर्णयाचा हक्क सरकारास मान्य करावयास लावण्यासारखी आपण परिस्थिति निर्माण केली पाहिजे, व तितकें करूनहि त्यांनीं तो हक्क मान्य केला नाहीं तर निःशस्त्रांकडून जो झगडा होणें जरूर आहे तो झगडा केला पाहिजे. व त्यांतच आमचें म्हणणें काय आहे हें स्पष्ट केलें पाहिजे.

**सत्याग्रहयुद्ध हा एकच मार्ग**

ह्यासाठीं म. गांधींनीं स्वीकारलेला सत्याग्रहयुद्धाचा एकच मार्ग उरला आहे. तोच मार्ग योग्य व न्याय्य आहे. असेंब्लींतील एकट्या विरोधास

सरकार जुमानत नाहीं. आंत व बाहेर सारखी चळवळ पाहिजे. असेंब्लींत सरकारनें जी बेगुमान वृत्ति प्रगट केली, तिला जबाब म्हणून हीच चळवळ करणें योग्य आहे. प्रतिकार सुरू केला पाहिजे. एका छोटयाशा अग्नीनें काम होत नसेल तर मोठें अग्निकुंड तयार करून त्यांत प्रचंड होम केला पाहिजे व त्यांत वालखिल्याच्या अग्निकाष्ठाप्रमाणें स्वतःच्या आहुती देऊन मोठा यज्ञ सुरू केला पाहिजे. त्या यज्ञाच्या अग्नीनेंच ह्या गुलामगिरीच्या राक्षसास भस्म केलें पाहिजे. एका अग्नीनें भस्म होत नसेल तर चोहोंबाजूंनीं अनेक अग्नी पेटविले पाहिजेत ! मात्र या यज्ञांत ओलीं लाकडें नकोत; त्यानें विस्तव विझेल. स्वार्थत्यागी लोकांचीं कणखर लांकडें व वाळलेल्या गोवऱ्या हव्यात. त्यांनीं दुसऱ्याचा स्वयंपाक करून देण्याकडे किंवा एखादें मढें जाळून टाकण्याकडेच आपलें सर्वस्व खर्च करण्यापेक्षां त्या यज्ञकुंडांत पडावें तें बरें, व ही वेळ आजच आहे. पुढें माणसें शतपट वेगानें निःसत्व बनत जातील. कारण हें अधःपतन आहे. पूर्वी दीडशें वर्षांत जें पतन झालें, तेवढें पतन पुढील केवळ पंचवीस वर्षांत होईल व हाच क्रम राहिला तर आपण माणूस राहू कीं पशू होऊं हें सांगवत नाहीं. म्हणून त्वरा केली पाहिजे.

## तरुणांस चळवळींत सामील करा.

ही वेळ गमावतां कामा नये. ह्या चळवळीच्या नेत्यांचा ईश्वरावर मोठा विश्वास आहे. नेटानें चळवळ केली तर एकतर तो शत्रूपक्षाच्या मनांत अशी प्रेरणा उत्पन्न करील व त्या योगानें आपलें कार्य होईल; व तशी प्रेरणा होऊनहि सरकारनें कांहीं केलें नाहीं, तर परमेश्वर आपणांमध्यें आपलें कार्य करून घेण्याचें सामर्थ्य उत्पन्न करील. मग आतां आपला ऱ्हास पूर्ण करून घ्यावयाचा कीं उरलें सुरलें बळ एकवटून शेवटचा प्रयत्न करावयाचा, एवढाच प्रश्न उरला आहे. अशा वेळीं ह्या युद्धाच्या नेत्यांच्या हाताखालीं आपणहि शिपाई व्हावें व आपलें कर्तव्य करावें एवढाच माझा हेतू आहे. ह्यावेळीं आपलेच लोक दूरदूर राहून आपल्याशीं वितंडवाद करितात व कांहीं लोक ही चळवळ दडपून टाकण्यासाठीं आपल्याच लोकांवर वरवंटा फिरविण्यास तयार होतात. अशा लोकांना आपल्या चळवळीकडे आपलेपणानें

पाहावयास लावावयाचें असेल तर त्यांच्या पोराबाळांस ह्याच चळवळींत सामील करून घ्या. मुलेंच सांपडलीं म्हणजे त्यांजवरील प्रेमामुळें तरी ह्या प्रकारच्या आपल्या देशबांधवांचें प्रेम ह्या चळवळीवर व देशकार्यावर बसेल व अशा रीतीनें आपसांतील भेद नाहींसे होतील.एका रक्ताचे सर्व लोक एकाच ध्येयाकडे वळतील व ह्यामुळें इतरांस शिक्षा करणें व चिरडणें ज्यांस सोपें वाटतें त्यांचीं स्वतःचींच मुलें ह्यांत पडलीं म्हणजे त्यांच्या लोखंडी मुठी ढिल्या होतील. म. गांधी असें सांगत आहेत व तेंच खरें आहे. परमेश्वराचें कार्य त्याच वेळीं प्रकट होईल. आतां ह्या

## यज्ञांत आहुती ह्या पडणारच

त्यासाठीं घाबरण्याचें कारण नाहीं. एकादा राजवाडा बांधावयाचा तर त्या खालीं कित्येक गरीबांच्या झोपड्यांचा चुराडा जें सरकार करतें त्याच सरकारनें गरीबांच्या आहुती पडतील म्हणून ही चळवळ थांबवा असें म्हणणें कुचकामाचें आहे. नवी दिल्ली बांधली तेव्हां तेथें किती गरीबांस देशोधडीस लावलें ह्याचा विचार करा. " लॅण्ड ॲक्विझिशन " असें मोठें नांव देऊन कायदेशीर अन्याय केला. एका राजवाड्यापायीं किंवा एका राजधानीपायीं जर अशा आहुत्या पडतात तर हें देशाच्या स्वातंत्र्याचें मोठें प्रचंड मंदिर बांधावयाचें आहे ! ह्यांत कितीतरी आहुती पडणार हें निर्विवाद आहे. हें पाया भरण्याचें काम आहे व स्वातंत्र्यमंदिराच्या पायांत आपण भरलों जात असल्यास आपणाला अवर्णनीय आनंद व उत्साह प्राप्त झाला पाहिजे ! हें आपलें भाग्य होय; एवढ्यानेंच आपणांस समाधान वाटेल. कांहीं लोकांस हें पटत नाहीं. आपण व आपलीं मुलेंबाळें ह्यांनीं ह्या यज्ञापासून अलग राहावें, फळ घेण्याच्या वेळीं तें आयतेंच आपल्याला मिळेल अशी त्यांची वृत्ति आहे. स्वार्थ सोडला पाहिजे हें ते जाणतात पण त्यांस माल तो सोडवत नाहीं. संन्याशाच्या ते पायां पडतात; पण मुलानें संन्याशी व्हावें असें मात्र त्यांस वाटत नाहीं. अशांनींहि स्वार्थ सोडला पाहिजे. कोणाचा असाहि आक्षेप आहे कीं, अद्यापि मिठाचा सत्याग्रह करणाऱ्या इकडील पुढाऱ्यांस पकडलें नाहीं,मग आम्हीच नांव कशाला द्या? मिठाचा नाहीं तर

दुसराहि कायदा मोडण्याकरितां तुमची जरूरी आहे.तें काम सुरू करण्याचा प्रसंग वऱ्हाडला येईलच.मिठाचा सत्याग्रह करणाऱ्या पुढाऱ्यांना पकडण्याचें काम सरकाराचें आहे. त्यांना वाटेल तेव्हां ते करतील, न करतील; पण मिठाच्या कायद्यापुरतें हिंदुस्थानसरकार वऱ्हाडांत जिवंतच नाहीं असें समजावें व दुसरीकडे वळावें. अन्यायाचे कायदे पुष्कळ आहेत. अन्यायी कायद्यांचें ह्या भूमींत मुबलक पीक आहे. तेव्हां तुम्हांस काम नाहीं असें होणार नाहीं. हें पीक समूळ उपटून काढण्याचें काम तुमच्यानें होणारहि नाहीं.त्यासाठीं

**एखादा प्रचण्ड विलायती नांगरच**

आणावा लागेल! तेव्हां कायदेभंगाची तयारी असेल त्यांनीं सेनापतीच्या पुढें जाऊन उभें राहावें, ते देतील तें काम करावें; ह्यासाठीं पोषाखाचीहि पर्वा किंवा अपेक्षा करूं नये. सर्वांना खादीचेच पोषाख असले पाहिजेत असा नियम करून ते बसले. पण पुरेशी खादी मिळणार नाहीं व सर्वांना ती पुरणार नाहीं. तेव्हां कपड्याचा प्रश्न मागें ठेवूनहि तुम्ही या युद्धांत खुशाल सामील व्हा! कोणतेहि कपडे घालणारांनीं कायदेभंग केला तरी आज तो हवा आहे.

सरकार शासन करील तें तिघांच्या आधारें; पोलीस, मॅजिस्ट्रेट व तुरुंग. पण ह्या चळवळीनें ह्या तिघांसहि ढिलें करणें शक्य आहे. राहतां राहिलें सैन्य; पण शक्य तोंवर सरकार सैन्याचा उपाय टाळील. सैन्य वापरल्यास सुधारलेलें जग त्यांचा हात धरल्याशिवाय राहणार नाहीं. सैन्य हें परचक्राशीं लढण्याकरितां आहे. स्वदेशांतच लढण्यासाठीं नव्हे. इतकेंहि करून सरकार जर सैन्याचा उपयोग करील, तर ईश्वर आपणांस त्याच्याशीं तोंड देण्याचें सामर्थ्य देईल, किंवा त्यास निर्बल करून टाकील असा महात्मा गांधींचा विश्वास आहे. म० गांधींसारख्या वंद्य विभूतीवर शस्त्रास्त्रांचा पाऊस पाडलेला,किंवा त्यांच्याशीं पाशवी शक्तीनें झगडलेलें,जगासच आवडणार नाहीं व सारें जग त्यावेळीं इंग्रज सरकारावर उलटल्याखेरीज राहणार नाहीं. अशा परिस्थितींत आपण आपलें कर्तव्य केल्याशिवाय राहूं नये ह्याच हेतूनें मी ह्या चळवळींत पडत आहें. **मला चळवळ आंत–बाहेर सर्वत्र सारख्याच प्रमाणांत पाहिजे.** म्हणून बाहेरच्या चळवळीकरितां मी पुढें आलों आहें.

# तरुणांवरील जबाबदारी*

अकोला येथें ता. २२–५–३० रोजीं श्री. ब्रिजलाल बियाणी यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. माधवराव अणे यांचें झालेलें व्याख्यान:—

मित्रवर्य व भगिनींनो! आपल्या येथें जो काय संग्राम चालू आहे या संबंधाची चर्चा या अकोलें शहरांत अनेक सभांतून झाली आहे. किंबहुना या प्रांतांतील प्रत्येक लहानमोठ्या गांवांतून झाली आहे. यासंबंधीं मी माझे विचार मांडून अधिक कांहीं सांगावें असें नाहीं, यावेळीं कशार्ची आवश्यकता असेल तर कोणी सांगूं नये व कोणी ऐकूं नये, याचीच आहे. मोठमोठ्या समुदायासमोर भाषण उचित आहे असें मला वाटत नाहीं. हा कलह इतर प्रांतांप्रमाणें या प्रांतांतहि पेटावा असें प्रत्येक तरुण माणसाला वाटत आहे. माझें आजचें व्याख्यान म्हणजे

## विस्तवाला फुंकर घालणें आहे.

अग्नि प्रदीप्त झाला आहे. अशा वेळीं आपणांस जें काम साधावयाचें आहे त्याचें भांडें ठेवावें लागतें. आजचा हा मंगल प्रसंग आहे असें मी समजतों. कारण राष्ट्रांतील प्रमुख पांच व्यक्तींना सरकारनें अटक केली आहे, अशा आणीबाणीच्या प्रसंगीं आपण धैर्यानें वागलें पाहिजे. जो वर्ग वर्तुळाकार परिषदेच्या मार्गे लागला आहे, त्याला असें वाटत आहे कीं, देशांत जी परिस्थिति उत्पन्न झाली आहे ती चांगली नाहीं. आपणांस स्वातंत्र्याचें भांडण बरेच दिवस लढवावें लागणार आहे. चारपांच महिन्यांत स्वातंत्र्य मिळेल असें म. गांधीहि मानीत नाहींत आणि आपणहि मानीत नसालच! हें स्वातंत्र्याचें भांडण कित्येक दिवस भांडावयाचें आहे.

## ‘परफीडिअस’ राज्यकर्ते

सध्यांचे राज्यकर्ते अत्यंत स्वार्थसाधु आहेत. त्यांच्या स्वार्थाचा नायनाट करीपावेतों आपणास हा लढा लढविला पाहिजे. अशा या सरकारला कोणत्या शब्दानें आळवावें हेंच मला कळत नाहीं. फ्रेंच देशामध्यें यांना अद्यापहि “परफीडिअस अलाइज” म्हणतात; म्हणजे सर्व तऱ्हेच्या

---

* ‘प्रजापक्ष’ अकोला ता. २५ मे १९३० इ.

लुच्चेगिरीचा ज्यांत समावेश होतो असा त्या शब्दाचा अर्थ आहे. आणि हाच शब्द मी या सरकारला लावतों. फ्रेंच देशामध्यें यांना किती किंमत आहे हें ' परफीडिअस ' या शब्दावरून कळून आलेंच आहे. त्याचप्रमाणें गेल्या दीडशें वर्षांचा यांचा जो आपल्याशीं सहवास आहे, त्यावरूनहि आपणास ही खात्री पटणारी आहे. त्यासाठीं आपणास फ्रान्स देशामध्यें जाण्याची जरूरी नाहीं. पहिल्यानें हिंदुस्थानाशीं संबंध जोडण्यासाठीं जी लुच्चेगिरी केली ती दृष्टिआड केली, तरी एकदां संबंध जोडल्यानंतर त्यांनीं ही लुच्चेगिरी बंद करावयास पाहिजे होती. १८३३ च्या चार्टर ॲक्टापासून परवांच्या ॲक्ट-पर्यंत आपण यांचा इतिहास पाहिला तर यांनीं नुसतीं आश्वासनें देण्या-पलीकडे कांहीं केलें नाहीं. पहिल्या आश्वासनाइतकेच आपण शेवटच्या आश्वासनाजवळ आहोंत. अशी ही यांची लुच्चेगिरी आहे. म. गांधींना १०० वर्षांपूर्वींचें गंजलेलें हत्यार वापरून अटक करण्यास ज्यांना लाज वाटत नाहीं अशांची ही राज्यपद्धति नष्ट होत नाहीं तोंपर्यंत कांहीं उपयोग नाहीं. यांच्याकडून वचनांची इतकी खैरात वांटण्यांत येते कीं, आम्हांला पाहिजे त्यापेक्षां अधिक देण्याचा यांचा विचार असावा असें पुष्कळ वेळां वाटतें. पण यांच्या तोंडूनहि खरें काय हें वदविणारा एक सत्याग्रही ( म. गांधी ) त्यांच्या घरांत जाऊन बसला व बाप दाखव नाहींतर श्राद्ध कर अशी स्थिति ह्या सत्याग्रहीनें निर्माण केली. व्हाइसरॉयचे धनी दुसरे असल्याकारणानें त्यांना म. गांधींच्या प्रश्नावर उत्तर देतां आलें नाहीं. अर्थात् याला उपाय म्हणून म. गांधींना कलकत्याच्या कॉंग्रेसनें पास केलेला ठराव लाहोरला अमलांत आणणें भाग पडलें.

## स्वातंत्र्याची आरोळी तरुणांनीं ठोकली !

यावेळीं तरुणांना आणि वृद्धांना हें सांगून ठेवणें अवश्य वाटतें कीं, कलकत्ता कॉंग्रेसच्या वेळीं आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे ही आरोळी तरुणांनीं ठोकली. आम्ही इंग्रजांचें तोंडहि पाहणार नाहीं असें तरुण म्हणूं लागले. अर्थात् ही धडाडी वृद्धांना नव्हती. मी इंग्रजांचें तोंड पाहणार नाहीं असें तो बोलत असला तरी त्याचें तोंड पाहिल्याशिवाय याचा एक दिवसहि जात नसे. पण यावेळीं म. गांधींनीं तरुण आणि वृद्ध यांच्या तडजोडीची

जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतली आणि एक वर्षभर तरुणांनीं आम्हास सवलत द्यावी असें ठरलें. अर्थात् म. गांधींनी, "डोमिनिअन् स्टेटस्" ची आशा निष्फळ समजून, कलकत्त्याला तरुणांना दिलेल्या आश्वासनाची आठवण ठेवून लाहोर कॉंग्रेसमध्यें कलकत्त्याच्या ठरावाला त्यांनीं उचलून धरलें. तेव्हां सध्यांची लढाई कलकत्त्याला तरुणांना दिलेल्या आश्वासनास अनुसरून चालू केली आहे हें तरुणांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. लाहोरच्या निर्णयानंतर त्यांनीं मार्च महिन्यापासून हा लढा चालू केला आहे. या लढ्यांत देशांतील थोरथोर पुढाऱ्यांना उचलून सरकारनें तुरुंगांत डांबून ठेवलें आहे.

## तरुण पक्षावरील जबाबदारी

तेव्हां उरलेल्या तरुण पक्षावर अशी जबाबदारी आहे कीं, हे सर्व पुढारी संपले तर आपण पुढें होऊन हा झगडा लढविला पाहिजे. सरकार असें भासविण्याचा प्रयत्न करीत आहे कीं, आमची राज्यसत्ता जनतेच्या संमतीनें चालली आहे, स्त्रीपुरुषांच्या आशीर्वादानें चालली आहे. हें त्यांचें ढोंग नष्ट केलें पाहिजे. अनत्याचारानें हा लढा लढविला जात असतां लोकांचीं टाळकीं पोलिसांच्या दंडुक्यानें झोडपलीं जात आहेत. अर्थात् त्यांची ही सत्ता चालत असेल तर ती दंडुक्यावर चालली आहे. असो; पण आपण अनत्याचार सोडतां कामा नये. म. गांधींचें श्रेष्ठत्व जर कशांत असेल तर त्यांनीं उभारलेल्या अहिंसा तत्त्वाच्या श्रेष्ठत्वांत आहे हें विसरूं नका !

ठिकठिकाणच्या बातमीवरून असें दिसतें कीं, तरुण आपली जबाबदारी ओळखत आहेत. आज हजारों स्वयंसेवक मिठाच्या सत्याग्रहांत भाग घेत आहेत आणि आपला लढा शांततेनें चालवीत आहेत. शांततेचा भंग तेव्हांच होतो कीं, जेव्हां गुंड त्या जमावावर सोडण्यांत येतात. कांहीं पोलीस ऑफीसरकडून उपद्याप करण्यांत येतात, तेव्हांहि शांततेचा भंग होतो. आणि असले हे प्रकार चव्हाट्यावर येऊं नयेत म्हणून प्रेस ऑर्डिनन्स-खालीं वर्तमानपत्राची मुस्कटदाबी करण्यांत येते. यासाठींच प्रेस ऑर्डिनन्स जिवंत केला आहे, आणि स्वतःचा गौरव करणारीं वर्तमानपत्रें जिवंत राहूं देण्यांत येत आहेत

## राज्यकर्त्यांना उद्यांच लंडनला जावें लागेल

सध्यांच्या चळवळींत कायदे मोडण्याचें काम चालू आहे; पण यापासून स्वातंत्र्य मिळणार कां ? असेंहि कांहींनीं मला विचारलें, कायदे कायम ठेवण्यासाठीं लष्कर ठेवण्यांत येत असतें. केवळ लष्करी सामर्थ्यावर आपण राज्य चालवूं शकत नाहीं अशी परिस्थिति राज्यकर्त्याला निर्माण झाली तर ह्यांना दुसऱ्या दिवशीं लंडनला जावें लागेल.तरुणांना माझें असें आव्हान आहे कीं, त्यांनीं या अनत्याचारी युद्धांत भाग घ्यावा ! ज्यावेळीं अधिकाऱ्यांना आपल्या मुलावर, भावावर अगर कोणत्याहि नातेवाइकावर गोळ्या झाडण्याचा प्रसंग येईल, त्यावेळीं त्यांचा हात थरथर कांपेलहें लक्षांत ठेवा. म. गांधींचा मार्ग आहे तो हा आहे. १८५७ साल तुम्ही आम्ही विसरलों असूं,पण सरकार विसरलें नाहीं. तेव्हां तरुणांना माझें असें सांगणें आहे कीं, बाबांनो!माझा बाप कोण आहे हें न पाहतां मातृभूमी दुसऱ्याच्या बंधनाखालीं आंवळली जात आहे, तिला मुक्त करण्याची कोशीस करा ! आणि हें बल तरुणांमध्यें एकवटून येवो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून मी हें आपलें भाषण संपवितों.

# विद्यार्थ्यांना स्फूर्तिदायक संदेश !*

कायदेभंगाची जय्यत तयारी झाल्यानंतर दे. भ. बापूजी अणे यांच्या मुखांतून त्यांचे अधिकारयुक्त शब्द ऐकण्याकरितां यवतमाळचा विद्यार्थी-गण उत्सुक झाला होता. म्हणून त्यांच्या आग्रहास्तव त्यांनीं शिवराम थिएटरमध्यें ता. २ जुलै १९३० रोजीं सध्याकाळीं श्री. अण्णासाहेब जतकर यांच्या अध्यक्षतेखालीं विद्यार्थ्यांस उद्देशून पुढील आशयाचें भाषण केलें. ते म्हणाले:—

येथील विद्यार्थ्यांनीं विद्यार्थी संघ काढण्याचें ठरविलें आहे हें कळल्यापासून मला आनंद झाला आहे. कालच्या मिरवणुकींत विद्यार्थ्यांनीं फार मोठ्या प्रमाणांत भाग घेतलेला पाहून त्यांना परिस्थितीची जाणीव होत आहे असें दिसतें. विद्यार्थी शाळेंत दाखल झाला कीं, त्याचा बाह्य जगाशीं संबंध सुटला असें कित्येक मानतात,परन्तु हें वाटणें वेडेपणाचें आहे. विद्यार्थ्याला आई, बाप, भाऊ, बहीण व इतर नातेवाईक असतात त्यांचा संबंध आपल्या-पेक्षां विद्यार्थ्यांशीं जास्त येत असतो ही गोष्ट मास्तरांनीं विसरून चालावयाचें नाहीं. हा संबंध तुटणें शक्य नाहीं.विद्यार्थ्यांचे पालक ज्या चळवळींत भाग घेतात त्या चळवळीची छाया मुलांवर पडूं नये असें मानणें हास्यास्पद होईल व असा प्रयत्न कोणी केल्यास तो अयशस्वी झालाच पाहिजे.

## तरुणांकरितांच स्वातंत्र्य

आज वयातीत पुढारी स्वातंत्र्याकरितां धडपड करीत आहेत. परन्तु स्वातंत्र्य मिळेपर्यंत ते मरतील व नष्ट होतील. त्यांच्यापैकीं फारच थोडयांना स्वातंत्र्याचा उपभोग घ्यायला मिळेल.मग ही चळवळ कोणाकरतां ? ती भावी पिढीकरतां आहे. पारतंत्र्याच्या नरकात भावी पिढी पिचूं नये म्हणून हा प्रयत्न आहे. मृत्यूची जोखीम पत्करून मनुष्यानें ज्ञानाचें फळ चाखलें अशी बायबलमध्यें कथा आहे. आपल्या वैदिक कल्पनेप्रमाणें स्वातंत्र्य व

* 'लोकमत' यवतमाळ ता. ६–७–३०

ज्ञान ह्या एकच वस्तू आहेत. तेव्हां स्वातंत्र्याला पराङ्मुख करणारी वृत्ति जर उत्पन्न होत असली तर तें ज्ञान नव्हे, तें योग्य शिक्षण नव्हे.

## विद्यार्थ्यांनीं शाळा सोडाव्या

प्रां.काँ.क.चे अध्यक्ष असल्यामुळें काँग्रेसचे अध्यक्ष पंडित मोतीलाल ह्यानीं मुंबईस विद्यार्थांना जो उपदेश केला, त्यांतील प्रत्येक अक्षराला मी मान्यता देतों! १८वर्षांच्या वरील जीं मुलें असतील, त्यांना कायद्यानेंहि कोणचें काम करायला पालकाची संमति लागत नाहीं. तेव्हां अठरा वर्षांवरील विद्यार्थ्याला स्वतः विचार केल्यानंतर जर या स्वातंत्र्यचळवळींत उडी घ्यावी व शाळा सोडावी असें वाटलें,तर त्याकरतां पालकाला विचारण्याची जरूरी नाहीं.मात्र पक्का विचार करून निश्चयानें ह्यांत पडावें व मग ज्या येतील त्या आपत्ती सहन करून आपला निश्चय ढळूं देऊं नये. १९२० सालीं स्वातंत्र्याचें युद्ध सुरूं झालें नव्हतें, त्यावेळीं शाळा सोडाव्या येवढाच उपदेश होत असे. शाळा सोडल्यानंतर काय करावें याबद्दलचा कार्यक्रम नव्हता, म्हणून विद्यार्थ्यांनीं शाळा सोडाव्या असा उपदेश मीं केला नाहीं. आज परिस्थिति बदलली आहे.आज स्वातंत्र्ययुद्ध सुरूं झालें आहे, आज खरोखर कोणीही न सांगतां शाळा व कॉलेजें ओस पडलीं पाहिजेत. देशांतील तरुण जर आज ह्या चळवळींत पडले नाहींत तर वृद्धांच्या हातून चळवळ फार दिवस टिकणार नाहीं. स्वातंत्र्याची चळवळ एकदां सुरूं झाली, म्हणजे स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय ती थांबत नाहीं, असें स्वातंत्र्य मिळविलेल्या देशांचा इतिहास सांगत आहे. ही चळवळ दोनचार महिने चालणारी नाहीं. म्हणून तरुणांचे तुंगेच्या तुंगे चळवळींत सामील झाल्याशिवाय आपलें अभीप्सित साध्य व्हावयाचें नाहीं. वृद्ध चळवळींत पडले तरी त्याची फिकीर सरकार करणार नाहीं. परंतु ज्यांच्यावर पुढें राज्य करावयाचें अशी तरुण मंडळीच बिथरली तर मात्र इंग्रजांचें धाबें दणाणल्याखेरीज राहणार नाहीं. ज्यावेळीं शाळा, कॉलेजें ओस पडतील, विद्यार्थ्यांचें अभ्यासांतून लक्ष उडेल, नोकरीची वृत्ति राहणार नाहीं तेव्हांच इंग्रजांचें मरण त्यच्यां डोळ्यां पुढें उभें राहील, म्हणून अठरा वर्षांवरील विद्यार्थ्यांनीं शाळा सोडाव्यात व या चळवळींत भाग घ्यावा असें माझें मत आहे.

### आणखी एक कारण

आज आपल्यापैकींच लोक चळवळींतील लोकांवर लाठ्या चालवतात व अत्याचार करीत आहेत, त्याबद्दल त्यांना फिकीर वाटत नाहीं. परन्तु जर त्यांचींच मुलें त्यांच्या लाठीखालीं सांपडूं लागलीं तर त्यांचे हात कचरतील, हृदय धडधडेल व ते नोकरीवर लाथ मारून बाहेर पडतील. येवढ्यासाठीं तरी सब विद्यार्थ्यांनीं या चळवळींत पडलें पाहिजे. जीं मुलें चळवळींत पडतील त्यांना हाल सोसावे लागतील, आपत्ति सहन करावी लागेल. पण त्याबरोबरच आपले लोक जे आपल्या पुढाऱ्यांवर लाठी चालवतात त्यांच्यांत तरी परिवर्तन होईल ही इष्टापत्ति तरी निघेल. अठरा वर्षांच्या आंतील विद्यार्थ्यांनीं पालकांची संमति घेऊन या चळवळींत पडावें. त्यांच्या पालकांनीं संमति दिली तर त्यांनीं खुशाल स्वातंत्र्याच्या चळवळींत भाग घ्यावा.

### राष्ट्रीय निशाणाचा अपमान

कोणी करील तर तो होऊं देऊं नका ! ज्या विद्यार्थ्यांनीं आपल्या छातीवर राष्ट्रीय निशाणाचे झेंडे लावले असतील ते त्यांना त्यांच्या शिक्षकानें, पालकानें, इन्स्पेक्टरनें अगर दिवाणानेंहि काढायला सांगितले तरी ते काढूं नका ! तो राष्ट्रीय निशाणाचा अपमान आहे. कोणत्याहि व्यक्तीनें राष्ट्रीय निशाणाला एकदां आपल्या हृदयावर स्थान दिलें कीं, तेथून तें काढणें म्हणजे निशाणाचा अपमान आहे. प्रथमच विचार करून झेंडा लावा, पण एकदां लावला कीं मग प्राणाचीहि पर्वा न करतां त्याचें संरक्षण करा ! ज्यानें राष्ट्रीय निशाण शरीरावर धारण केलें तो काँग्रेसच्या छत्राखालीं आला असें मी समजतों. त्यानें काँग्रेसची प्रत्येक आज्ञा मान्य केली पाहिजे.

### तरुणांचीं कर्तव्यें

लहान वयांत तरुणांनीं स्वातंत्र्याच्या लढाईत भाग घेतला अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत. विश्वासरावांनीं कितव्या वर्षी पानपतच्या लढाईत भाग घेतला ? स्वातंत्र्यसंस्थापक श्री. शिवाजी महाराज यांनीं तोरणा किल्ला केव्हां घेतला ? म० गांधी, पं० मोतीलाल, श्री. अब्बास तय्यबजी यांज-

सारख्या वृद्धांनीं उत्पन्न केलेल्या तेजानें जर कोणी प्रज्वलित होणार असतील तर ते तरुणच ! निश्रेयस् साधण्याकरितां तरुणांनीं कंबर बांधून सदैव तयार असलें पाहिजे असा वेदांचा संदेश आहे. तेव्हां अठरा वर्षांवरील विद्यार्थ्यांनीं स्वतःच्या हिंमतीनें यांत उडी घ्यावी. त्याला पालकांच्या संमतीची जरूरी नाहीं. पण याप्रमाणें स्वातंत्र्ययुद्धांत पडण्याचा विचार झाला नाहीं तर दररोज राष्ट्रीय झेंड्याला वंदन करा. प्रभातफेऱ्या काढून युद्धमंडळांस मदत करा, आपल्या अभ्यासाचा वेळ सोडून रिक्रिएशनचा वेळ या कार्यांत खर्च करा ! याप्रमाणें करूं लागलांत व कांहीं आपत्ति आली तर ती आनन्दानें सहन करा. तुमच्या पालकांवर आपत्त्या कोसळत असतांना तुम्ही किती दिवस आपत्ति टाळूं इच्छिणार ? हीं कामें सर्व वयाच्या विद्यार्थ्यांस करतां येतील; हीं कामें करूं लागलांत कीं, तुमच्या मनाची स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेण्याची आपोआप तयारी होईल.

## स्वातंत्र्याचा कंटकमय मार्ग

स्वातंत्र्याचा मार्ग कंटकमय आहे. म्हणूनच म० गांधींनीं समुद्रकांठीं कड्याकपाऱ्यांतून मीठ वेंचण्याचा कार्यक्रम काढला. म्हणूनच काँग्रेसच्या अनुज्ञेनें जंगलांत जाऊन स्वातंत्र्य मिळविण्याची खटपट सुरूं आहे. तेथें जातांना तुमच्या पायांत कांटे मोडतील, अंगाला क्षतें पडतील, त्यांतून रक्ताच्या चिळकांड्या उडतील. तेव्हांच स्वातंत्र्य प्राप्त होईल हें लक्ष्यांत ठेवा. ( टाळ्यांचा कडकडाट ! )



लो. ना. बापूजी अणे यांचा जंगलचा कायदेभंग —पुसद, १० जुलै १९३०

# कायदेभंगास प्रयाण !*

श्री. बापूजी अणे यानीं स्वत: कायदेभंग करण्याकरितां पुसद येथें जाण्याचें ठरविलें; म्हणून त्यांना निरोप देण्याकरितां ३ जुलै १९३० रोजीं संध्याकाळीं ८ वाजतां यवतमाळच्या शिवराम थिएटरांत डॉ. टेंबे यांच्या अध्यक्षतेखालीं प्रचण्ड सभा झाली. तींत लो. ना. बापूजी अणे यानीं पुढील आशयाचें भाषण केलें. ते म्हणाले:—

यवतमाळ गांवांत २३ वर्षें मी राहिलों. तेवढ्या अवधींत आपण सर्वांनीं मला निरनिराळीं कामें करण्याची संधि दिलीत. परंतु आज कार्य करण्याची तुम्ही व सर्व वऱ्हाड प्रांतानें मला जी संधि दिली आहे, त्याबद्दल मला अत्यानंद व धन्यता वाटते. आजपर्यंत शाब्दिक कार्य करण्याचीच मला तुम्ही संधि देत होतां. पण या वेळीं शरीरानें कांहींतरी कार्य करण्याची मला संधि मिळाली आहे याबद्दल आपल्याला मी धन्यवाद देतों. याबरोबरच तुम्ही माझ्यावर अत्यंत मोठी जबाबदारी टाकली आहे हें मी ओळखतों, पण त्याची काळजी मला वाटत नाहीं. कारण युद्धमंडळ ती जबाबदारी पार पाडण्यास सिद्ध आहे असें मला वाटतें. युद्धमंडळानें मला फक्त सेनापति नेमलें आहे, तें कार्य करायला मला आनंद वाटतो. मी सर्व वऱ्हाड व मराठी मध्यप्रांत हिंडून आलों व मला असे आढळून आलें आहे कीं, माझ्याप्रमाणेच तरुण लोक स्वातंत्र्ययुद्धांत उडी घेण्यास तयार आहेत. हे हजारों तरुण यवतमाळ जिल्ह्यांत कायदेभंगाकरितां येतील तेव्हां आपल्या जिल्ह्यावर काय जबाबदारी येत आहे हें ओळखून कार्य करा हेंच मला सांगावयाचें आहे.

## देश स्वतंत्र झाला पाहिजे

माझा देश स्वतंत्र झाला पाहिजे, हेंच माझें पहिल्यापासून ध्येय आहे व त्या दृष्टीनेंच मी आजपर्यंत काम करीत आलों. स्वातंत्र्य मिळवण्याकरितां स्वातंत्र्ययुद्ध सुरू झालें पाहिजे असें मला नेहमीं वाटे. ती आज परिस्थिति प्राप्त झाली आहे. त्यांत बळी जाण्यास मी तयार आहें. जर या युद्धाला यज्ञाची उपमा दिली, तर जंगलचा कायदेभंग हा यूप आहे व त्याला बळी

---

* 'लोकमत' यवतमाळ ता. ६–७–१९३०

देण्याकरितां मी बकरा आहें असें मी समजतों. यज्ञांतील पशु व यूप यांना यज्ञांत जितकें महत्त्व आहे, तेवढें ऋत्विज, होता, पुरोहित किंवा यज्ञकर्ता या कोणालाहि नाहीं. सर्वांत जास्त पुण्य पशूला मिळतें, म्हणूनच मला आज आनंद होत आहे. आजपर्यंत आयुष्यांत ज्या भल्याबुऱ्या गोष्टी घडल्या असतील, पाप झालें असेल, तें स्वातंत्र्ययुद्धांत बळी जाण्यानें पार धुवून जाईल असा माझा विश्वास आहे.

---

# भावी राज्यघटना व संस्थानिक*

सोमवारीं ता. २८ एप्रिल १९३१रोजीं दुपारीं स्थानिक सद्गृहस्थांबरोबर श्री. माधवराव अणे यांचें खाजगी संभाषण झालें, त्यांत मुख्यत: दोन गोष्टींचा ऊहापोह झाला. हिंदुस्थानच्या भावी संयुक्त राज्यघटनेंत संस्थानिकांचा समावेश कितपत हितावह आहे असा प्रश्न कांहीं जणांनीं श्री. बापूजी अणे यांना विचारला व पूर्वपक्ष म्हणून असें प्रतिपादन केलें कीं, संस्थानिक हे अजून प्रजासत्ताक राज्यपद्धतीला अनुकूल नसल्यामुळें व हिंदुस्थानसरकार हें सामर्थ्यसंपन्न राहणें हें संस्थानिकांच्या संरक्षणाच्या दृष्टीनें जरूर असल्याकारणानें संयुक्त राज्यघटनेंतील मध्यवर्ती कौन्सिलांतील संस्थानिक नेहमीं सरकारचा पक्ष उचलून धरतील व हिंदुस्थानच्या सुधारणेस हरघडी विरोध करतील. यावर श्री. अणे यांनीं अत्यंत मार्मिक व अनुभविक असें उत्तर दिलें. ते म्हणाले:—

## संस्थानिकांच्या वृत्तींतील फरक

चालू राज्यघटनेंत नरेंद्र मंडळांत जे संस्थानिक १९२० सालापासून येऊन बसतात त्यांची २० सालाची व आतांची स्थिति यांत महदंतर पडलें आहे. नरेंद्र मंडळाची बैठक सुरू असतां १९२० सालीं असा देखावा दिसत असे कीं, पुष्कळसे संस्थानिक बैठकीस येतच नसत. त्यांत जे येत ते भाषण करीत नसत व लोकांत मिसळत नसत आणि जे थोडे बोलत तेसुद्धां कागदावर लिहून काढून वाचीत व वाचतांनासुद्धां त्यांचे हातपाय लटपटत असत. इतका भित्रेपणा १९२० सालीं त्यांच्यांत होता. परंतु ह्याच नरेंद्र मंडळाच्या हॉलशेजारीं लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचा हॉल आहे. व तेथें सरकार व लोक-

---

* 'प्रागतिक' जळगांव ता. ४–५–३१

पक्ष यांच्या प्रतिनिधींत ज्या वेळीं निर्भयपणें सडेतोड वाद होत असत, त्या-वेळीं संस्थानिक हे प्रेक्षकांच्या गॅलरींत हजर राहात, व कै. पं. मोतीलाल नेहरूप्रभृति पुढाऱ्यांची सरकारी धोरणाविरुद्ध भाषणें ऐकत. ह्या लोकपक्षांच्या प्रतिनिधींच्या सहवासाचा संस्थानिकांच्या मनावर हळुहळू इतका परिणाम होत गेला कीं, जे संस्थानिक वीस सालीं हातपाय लटपटत भाषण करीत, ते सडेतोड व निर्भीड वृत्तीनें बटलर–कमिशनच्या वेळेस सरकारशीं दोन हात करण्यास समर्थ झाले. हा संस्थानिकांच्या वृत्तींतील फरक लक्षांत घेतला म्हणजे भावी राज्यघटनेंत संस्थानिकांचा लोकप्रतिनिधींशीं प्रत्यक्ष सहवास हा किती विलक्षण सामर्थ्य व तेज संस्थानिकांत उत्पन्न करील हें सहज समजून येणार आहे. आज अशी परिस्थिति आहे कीं, संस्थानिक व लोकप्रतिनिधी यांचा सहवास एके ठिकाणीं घडवून आणण्याची सोय नाहीं. लोकप्रतिनिधींची संस्थानिकांशीं मिसळून त्यांच्या मनावर स्वातंत्र्य वृत्तीचा थोडा तरी परिणाम व्हावा किंवा करतां यावा, अशी इच्छा आहे. परंतु तसा योग व स्थान हल्लींच्या राजवटींत नाहीं. ही अडचण नवीन राजवटींत नाहींशी होणार आहे, हा एक मोठाच फायदा आहे.

## संस्थानिकांचा पक्ष अपरिहार्य

दुसरी गोष्ट अशी कीं, हिंदुस्थान जर पूर्णपणें संयुक्तराज्यपद्धतीनें सांभा-ळावयाचा असेल, तर आहेत ते घटक सलोख्यानें एकेठिकाणीं नांदू देणें हाच एक उपाय आहे, याशिवाय गत्यंतर नाहीं. संस्थानिकांच्या अंमलाखालीं हिंदुस्थानचा बराच मोठा भाग आहे व आज तरी त्या भागाचे मालक म्हणून ते मिरवीत आहेत. तेव्हां हल्लींच्या राजवटींत मोठमोठे जमीन-दार व भांडवलवाले यांचा जसा एक पक्ष आहे, तसा संस्थानिकांचा एक पक्ष पुढील राज्यघटनेंत दाखल होणें अगदीं स्वाभाविक आहे. याहि दृष्टीनें संस्थानिकांचा प्रवेश हा अपरिहार्य होय.

तिसरी गोष्ट अशी कीं. संस्थानिक हे सरकारच्या बाजूनें प्रसंगविशेषीं मत देतील, हें जरी खरें असलें तरी ज्या ठिकाणीं त्यांच्या हिताविरुद्ध एखादी योजना नसेल, तेथें सरकारला सामील होऊन लोकप्रतिनिधींचा क्षोभ करून घेण्याचें संस्थानिकांस काय कारण ? हिंदुस्थानच्या लोकांच्या सुधारणेच्या व

संस्थानिकांस न नडणाऱ्या अशा सर्व बाबींवर संस्थानिक हे उत्तरोत्तर सहवासानें लोकपक्षास सहाय्यच करतील, त्यास विरोध करणार नाहींत. तिऱ्हाईत माणसास मदत करून आपल्या शेजाऱ्याचें नुकसान करणें ही गोष्ट मनुष्यस्वभावास सोडून आहे. याहि दृष्टीनें संस्थानिक हे आपल्या मार्गांत कांहींतरी धोंड उभी करतील असें वाटत नाहीं.

### संस्थानी प्रजेच्या स्वातंत्र्यास मदत

चवथें कारण असें कीं, हल्लीं संस्थानी प्रजा ही संस्थानिकांच्या लहरीप्रमाणें वागविली जाते. परंतु ज्यावेळीं संस्थानिक लोक हे मध्यवर्ती कौन्सिलांत बसून लोकपक्षांनीं आणलेलें एखादें बिल उचलून धरतील, त्यावेळीं त्यांच्या तोंडांतून निघालेलीं भाषणें हींच संस्थानी प्रजेच्या स्वातंत्र्याच्या सनदा होण्यास कारणीभूत होतील. एक प्रकारें संस्थानी प्रजेची यांत सोय झाली आहे. एखाद्या राजामहाराजांनीं जो गोष्ट कौन्सिलांत घडून यावी म्हणून मत दिलें, तीच गोष्ट संस्थानी प्रजेस आम्ही देणार नाहीं, असें त्यास म्हणतां येणार नाहीं. व त्यानें जर हट्टानें म्हटलें व आपल्या धोरणांत फरक केला नाहीं तर त्याच्या अमलाखालील संस्थानी प्रजेचा क्षोभ होऊन त्याला स्वस्थपणें राज्य करणें मुष्किलीचें होईल.

ह्या सर्व दृष्टीनें विचार करतां संस्थानिक हे भावी राज्यघटनेंत मध्यवर्ती कौन्सिलांत आले तरी त्यापासून अपाय होण्याचा संभव नाहीं. यापेक्षां जर संस्थानिक लोक आपल्या प्रजेचे प्रतिनिधी पाठवितील, तर दुधांत साखर पडल्यासारखें होईल. पण तो दिवस अजून दूर आहे. व तशी वेळहि आल्याशिवाय राहाणार नाहीं एवढें मात्र खास.

---

## वकिलांनीं काय करावें ?

कांहीं वकिलांनीं श्री. बापूजी अणे यांस वकिलांनीं काय करावें असा एक प्रश्न विचारला व त्यावर देशभक्त बापूजींनीं अत्यंत मुद्देसूद व उपदेशपर असें उत्तर दिलें. ते म्हणाले—' गेल्या शांतियुद्धांत सुमारें हजाराच्या वर वकिलांनीं भाग घेतला होता व वऱ्हाडांत खुद्द यवतमाळ जिल्ह्यांत ५०

वर वकील व त्यांचे इतर व्यवसायबंधु यांनीं द्रव्याची अतिशय मदत केली. यवतमाळचें शिबीर त्यांच्याच मदतीवर टाकून मी माझा कार्यक्रम करीत असे आणि त्यांनींहि पण मोठ्या हौसेनें, निरलसपणें व उदार बुद्धीनें द्रव्य-सहाय्य केलें. एवढेंच नव्हे तर वऱ्हाडांतील चळवळींचीं मुख्य सूत्रें वकील वर्गाच्याच हातीं होतीं व त्यांच्याच भरंवशावर चळवळ यशस्वी झाली. वास्तविक प्रत्येक वकिलानें कांहींतरी सार्वजनिक काम आपल्या आयुष्यात करीन असा जर निश्चय केला तर त्याला त्यापासून सात्त्विक आनंद होऊन लोकांचेंहि कल्याण होईल; मात्र सार्वजनिक कार्य करतांना त्यापासून स्वार्थाची अपेक्षा नसावी व कर्तव्यबुद्धीनें काम करावें. यावर एका वकिलानें असें उत्तर दिलें कीं, चालू चळवळींत म्हणजे सन १९२० पासून वकीलवर्गास शिव्या खाव्या लागत आहेत, तेव्हां अशा स्थितींत सार्वजनिक सेवेचा काय परिणाम? व त्यापासून श्रेय तें काय ? यावर श्री. अणे म्हणाले कीं, ब्राह्मण म्हणून जरी आज कित्येक वर्षें आम्ही शिव्या खात आहोंत, तरी ब्राह्मणवृत्ति सोडणें कांहीं हितावह वाटत नाहीं. तसेंच वकील म्हणून जरी शिव्या खाव्या लागल्या तरी त्या खाण्यापासून आपलें काय नुकसान होणार? एवढ्याकरितां सार्वजनिक काम कर्तव्यबुद्धीनें व निर्लोभतेनें करावें म्हणजे झालें. शिवाय सार्वजनिक कार्याचा कोणत्याहि कारणानें कंटाळा आला तरी

## प्रत्येकानें एक तरी शास्त्र शिकलें पाहिजे.

एवढा जरी निश्चय केला, तरी त्यापासून पुष्कळ फायदा होण्यासारखा आहे. लो. टिळक असें म्हणत कीं, प्रत्येक सुशिक्षित माणसानें अव्याहत-पणें निदान एक शास्त्र तरी संपूर्ण शिकण्याचा प्रयत्न करावा व आपली त्या शास्त्रांतील योग्यता असामान्य करून ठेवावी, म्हणजे कधींकाळीं तरी लोकांना आपली गरज खास भासते. उदाहरणार्थ मुंबईचे के. टी. शाह हे अर्थशास्त्रविशारद आहेत. आजपर्यंत ते कोणत्याहि चळवळींत पडले नाहींत, परंतु आज कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीला त्यांची जरूरी लागली व सार्वजनिक काम करण्याचा सुयोग त्यांना अनायासें प्राप्त झाला. ह्या दृष्टीनें एखाद्या शास्त्रांत पारंगतता प्राप्त करून घेणें व त्याचा

अभ्यास सतत चालविणें हीदेखील सार्वजनिक सेवाच आहे. व त्यापासून शिकणारांचें व लोकांचें सारखेंच कल्याण आहे.एवढी गोष्ट प्रत्येक वकिलानें अवश्य लक्षांत ठेवावी. वकीलवर्गाची वृत्ति ज्या विद्येवर अवलंबून आहे, ती विद्या सार्वजनिक कामास उपयोगी पडण्यासारखी आहे. लोकांच्या नेहमींच्या अडचणींचा अभ्यास करून व त्यांची योग्य मांडणी सरकारपुढें करून त्या अडचणी दूर करणें हें काम प्रत्येक वकिलास सहज करतां येण्यासारखें आहे. जे सार्वजनिक कार्यकर्ते फक्त चळवळींत उदयास आले, त्यांच्याकडून असलीं कामें शांततेच्या काळांत होऊं शकणार नाहींत व त्यांना त्याचें ज्ञानहि असणार नाहीं. अशा स्थितींत हरतऱ्हेनें सार्वजनिक कार्य करण्याची जबाबदारी, त्या बाबतींत विशेष ज्ञान असलेल्या वकिलांवर पडते,तरी एवढा प्रयत्न प्रत्येकानें करावा. यांत देशहित आहे असें आम्हांस वाटतें.

येणेंप्रमाणें वरील दोनहि विषयांवर अत्यंत बोधप्रद, चिकित्सक व मार्मिक असा जो संवाद झाला, तो प्रत्येक सुशिक्षित मनुष्यानें लक्षांत ठेवावा व त्याचें सदोदित मनन करावें असा आहे.

# गांधी-आयर्विन समेट*

लोकनायक माधवराव अणे यांचें गांधी-आयर्विन समेट यावर अत्यंत विचारपरिप्लुत व सुश्राव्य व्याख्यान ता. २८-४-३१ रोजीं सोमवारी रात्रीं ९॥ च्या सुमारास येथील काँ. कमिटीसमोरील पटांगणांत दे. भ. अण्णासाहेब दास्ताने यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. ते म्हणाले —

जळगांव येथें आल्यानंतर आपण सर्व मंडळीनें जो प्रेमभाव प्रगट केला, त्याबद्दल मला आनंद होत आहे. मात्र माझी ज्या थोर विभूतींशी तुलना केली, त्यांच्या योग्यतेचा मात्र मी नाहीं. दोन प्रेमी जीव एकमेकांना भेटले म्हणजे एकानें दुसऱ्याची स्तुति करतांना असले उद्गार काढणें सहज असतें; परंतु त्यावरून खरोखरच त्यांत कांहीं तथ्य असतें असें कोणीहि समजूं नये. लोकमान्य व महात्मा या दोघांच्या सान्निध्यांत मला बसण्याचा योग आला, त्यावरून मी स्पष्ट सांगतों कीं, त्यांची विशाल बुद्धिमत्ता व सखोल दूरदृष्टि यांची सर माझ्यासारख्या य:कश्चित माणसाला कशी येईल? तेव्हां प्रशंसा ही विचारापेक्षां विकारमय असते असें समजणें भाग आहे, असो. आतां आजच्या विषयाबद्दल म्हणाल तर असें म्हणावें लागतें कीं, पूर्वखानदेशच्या काँग्रेस कमेटीची शिस्त फार जबरदस्त आहे असें वाटतें. आतांच अण्णासाहेब दास्ताने यानीं मीं कोणत्या विषयावर बोलावें हें मला सांगितलें. वास्तविक बोलणारा ज्या विषयावर हौसेनें बोलेल, तो विषय त्यानेंच निवडावयाचा असतो. पण या बाबतींत मला आतां स्वातंत्र्य राहिलें नाहीं. तुम्हांवर काँग्रेसची शिस्त पाळण्याची जबाबदारी आहे, पण पाहुण्यावरसुद्धां या शिस्तीचा अंमल चालविण्यांत आला आहे. असो.ही शिस्त संभाळून अण्णासाहेब यानीं ठरविलेल्या विषयावर मी आपले विचार सांगतों व हें सांगतांना मग माझ्या हौसेचें म्हणून जें सांगावयाचें आहे तेंहि पण ओघाओघानेंच मी सांगेन

इतकी प्रस्तावना करून दे. भ. अणे म्हणाले:—वास्तविक कराचीच्या काँग्रेसनें समेटावर आपलें शिक्कामोर्तब केलें असतांना याच विषयावर

---

*'प्रागतिक' जळगांव ४-५-१९३१

आतां पुनः बोलणें जरूर नाहीं, कारण समेट आतां बहुमतानें मान्य झाला आहे; तेव्हां समेट कां झाला, तो फायद्याचा कां तोट्याचा, याचा विचार आतां कर्तव्य नाहीं. ज्या अर्थी याबद्दल जिज्ञासा आहे, त्याअर्थी दोन शब्द सांगणें जरूर आहे.

या समेटाची भाषा सुरू होण्यापूर्वी एक वर्षाचा इतिहास आपण पाहिला पाहिजे. लाहोर कॉंग्रेस होण्यापूर्वी विलायतसरकारनें गोलमेज परिषदेची योजना केली होती. या परिषदेस जावें कीं जाऊं नये असा कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांसमोर प्रश्न होता. महात्मा गांधी लाहोरास येण्यापूर्वी लॉर्ड आयर्विनला भेटले व म्हणाले कीं, जर ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें हिंदुस्थानास तुम्ही वसाहतीच्या पद्धतीचें राज्य देऊन भागीदार करीत असाल, तर आम्ही परिषदेला येतों. आम्हाला तुम्ही कमींत कमी काय देतां तें बोला. लंडनला या, तेथें बोला, चर्चा करा, असले पोकळ डाव आम्हांला नकोत. तुमच्या मनांतून काय द्यावयाचें आहे तें आधीं सांगा. यावर लॉर्ड आयर्विन काय उत्तर देणार! ते म्हणाले, तुम्ही जें अभिवचन मागतां तेंच कसें द्यावयाचें हें तर गोलमेज परिषदेंत ठरणार आहे. तेव्हां आधीं मी वचनबद्ध होऊं कसा? अर्थात् महात्मा गांधींना असलें गोलमोल उत्तर रुचलें नाहीं.

## लाहोर कॉंग्रेसमध्यें गोलमेज परिषदेवर बहिष्कार

नंतर लाहोर कॉंग्रेसमध्यें गोलमेज परिषदेवर बहिष्कार पुकारला गेला व युद्धास सुरवात झाली. लॉर्ड आयर्विन व म. गांधी यांची ही मुलाखत म्हणजे शांतियुद्धाचा पाया आहे. तुम्ही काय किमान देतां हें सांगत नाहीं, व सांगितल्याखेरीज आम्ही येत नाहीं, अशी दोन्ही पक्षांत तेढ पडली व दोन्ही पक्ष युद्धास सज्ज झाले. युद्ध चालू असतां विलायतेंत गोलमेज परिषद सुरू झाली. १००।१५० लोक सरकारनें गोळा केले. ठराव केला. दोन मोठे ग्रंथ तयार केले. विचार केला. प्रत्येक गोष्ट तूर्त ठरविली आहे असें समजून पुन्हां आपण विचार करूं असे त्यावर शेरे मारले व घरोघरीं मंडळी परत फिरली. इतकें जरी शांततेनें चाललें होतें, तरी कायदेभंगाच्या चळवळीची आग सर्वस्वी वाढत होती. सरकारला याच चळवळीमुळें जास्तजास्त अडचण व त्रास होऊं

लागला होता व गेलेले प्रतिनिधी जेव्हां परत फिरले, तेव्हां त्यांनासुद्धां आपण येऊन काय केलें हें सांगण्याची पंचाईत पडली. परंतु कांहींतरी सांगितलें पाहिजे म्हणून गेलेले प्रतिनिधी परत येतांना म्हणूं लागले कीं, आम्ही विलायतेंत जी वाटाघाट केली त्यांत कांहींतरी स्वराज्य आहे; ती चर्चा अगदींच टाकाऊ नाहीं. तुम्ही वाटल्यास तेथें चला, आपण पुन्हां बोलूं. विलायतेंत प्रांतिक स्वायत्तता, मध्यवर्ती सरकार लोकांना जबाबदार, अशी योजना त्यांनीं तयार केली आहे. आतां कांहीं थोडे सेफगार्डस् आहेत. पाहूं, त्यांचें काय जुळेल तसें करतां येईल ! अशा प्रकारें आलेले लोक बोलूं लागले. सरकारला असें वाटलें कीं, म.गांधी पूर्वीं काय देतां हें सांगा म्हणत होते. आतां गोलमेज परिषदेंत कांहींतरी ठरलें आहे. तेव्हां आपली योजना म्हणून अमुक आम्ही देणार आहोंत असें सांगण्यास त्यांनीं सुरवात केली व त्याप्रमाणें मि. बेन, मॅकडोनाल्ड व व्हॉईसराय यांनीं भाषणें केलीं. समेट होण्यास अशा तऱ्हेनें जें वातावरण निर्माण झालें त्यांतून

## समेट उत्पन्न झाला

दोन्ही युद्धमग्न राष्ट्रें ज्यावेळा लढाईच्या ऐन रंगांत असतात, त्यावेळीं जर एखाद्या पक्षाकडून तहाचें पांढरें निशाण दाखविलें गेलें, तर दुसऱ्या बाजूच्या सेनानायकाचें हें कर्तव्य असतें कीं, ही पांढरी झेंडी खरोखर तहाची इच्छा आहे म्हणून दाखविली कां हूल आहे? याचा शहानिशा केल्यावर मग वाटल्यास युद्ध करावें. परतु तोंपर्यंत त्यानें युद्ध करू नये. असा युद्धनीतीचा नियम आहे. शांतियुद्ध ज्या दोन संस्कृतींमध्यें चाललें होतें, त्यांचा जरूर विचार केला तर असें दिसून येईल कीं, या दोन्ही संस्कृती जिवंत राहणार. तेव्हां यांच्यांत सलोखा करून घेणें हेंच फायद्याचें आहे. दोन भिन्न संस्कृतींत लढा उत्पन्न झाला म्हणजे तीन स्थित्यंतरें होतात, एक म्हणजे एका संस्कृतीनें दुसऱ्या संस्कृतीला अजिबात नाहींसें करावयाचें. दुसरें म्हणजे, नवीन संस्कृतीला पहिल्या संस्कृतीनें पचवून टाकावयाचें व तिसरी स्थिति म्हणजे दोन्ही संस्कृतींनीं नांदावयाचें, यांपैकीं पहिली गोष्ट आज शक्य नाहीं. दुसरी गोष्ट आपण पूर्वीं करून दाखविली आहे. द्रवीडियन

संस्कृति आम्हीं पचविली, परंतु ती विद्या आम्ही विसरलों त्यामुळें आतां तिसरी गतीच मानणें भाग आहे. यादृष्टीनें समेटाकडे नजर दिली पाहिजे.

## समेटाची पांढरी झेंडी सरकारनें दाखविली

ही गोष्ट शाबीत करण्यास दोन दाखले आहेत. पहिला दाखला असा आहे कीं, गोलमेजचे प्रतिनिधी लंडनहून निघाल्यानंतर कॉंग्रेस वर्किंग कमिटीची अलाहाबादला बैठक झाली. वास्तविक वर्किंग कमिटी ही सरकारनें ऑर्डिनन्स काढून गैरकायदा ठरविली होती. एवढेंच नव्हे तर, तिचे सभासद कैद केले होते. अशा स्थितींत कायदेभंग करून कॉंग्रेस वर्किंग कमिटी सरकारनें भरूं दिली. तिचे सभासद कैद केले नाहींत, एवढेंच नव्हे तर ह्या कमिटीनें केलेला ठरावसुद्धां आतां प्रसिद्ध होणार इतक्यांत शास्त्री, सप्रु, जयकर यांच्यामार्फत ‘ ठराव प्रसिद्ध करूं नका ’ असा तारेनें संदेश पाठविला. दुसरी गोष्ट अशी कीं, वर्किंग कमिटीचे ३५ सभासद त्यांची शिक्षेची मुदत भरण्यापूर्वी सोडून देण्यांत आले. सरकारनें या गोष्टी करून तहाचे पांढरें निशाण उभारलें असें कां म्हणूं नये ? या निशाणाला पाहून शांतियुद्धाचे सेनापति म. गांधी यानीं युद्धनीतीचा नियम म्हणून सरकारनें दाखविलेली ही निशाणी खरी कीं खोटी हें पाहण्यासाठीं आपलें मंडळ जमवून विचार करण्यास सुरवात केली.

आतां यापुढें समेटाच्या बोलण्यास सुरवात कशी झाली, त्यांत काय ठरलें, वगैरे सांगावयाचें आहे. लॉर्ड आयर्विन व म. गांधी यांच्यांत जीं खलबतें झालीं, त्यांत कोणत्या अटींवर तात्पुरता तह करावा यावर बोलणें झालें.

## समेट म्हणजे तह नव्हे

समेटाची भाषा बोलतांना युद्धशास्त्राच्या नियमाप्रमाणें आपण केलेली मान्याचा जागा न सोडतां पुन्हां युद्ध सुरूं झाल्यास युद्ध करतां येईल अशीं शस्त्रें व आपल्या मान्याच्या जागा कायम ठेवणें एवढेंच धोरण पाहावयाचें असतें. तहांत राष्ट्राराष्ट्रांतील मूलभूत वादांचा निकाल असतो; तो वाद समेटांत निवूं शकत नाहीं. जर्मन महायुद्ध झालें, त्यावेळींसुद्धां असा ट्रूस

ठरला गेला. इंग्रजांनीं जर्मनांना नामोहरम केलें, तरी त्यांना अजिबात नाहींसें करणें शक्य झालें नाहीं. जगाच्या विचारांचा हल्लीं जो प्रवाह वाहात आहे, त्या दृष्टीनें पाहातांना महायुद्धानें जर कोणती एक गोष्ट शाबीत केली असेल तर ती ही कीं, राष्ट्र लहान असो वा मोठें असो, त्याचें अस्तित्व नाहींसें करणें कांहीं शक्य नाहीं. तें जिवंत राहाणार. ज्याअर्थीं जगाचा विचार अशा प्रकारें महायुद्धापासून सुरू झाला, त्याअर्थीं इंग्रज राष्ट्रालाहि आज हिंदी राष्ट्राला नाहींसें करणें शक्य राहिलें नाहीं. तेव्हां दोघांनीं सलोख्यानें नांदणें हाच एक मार्ग राहिल्यामुळें सरकारलासुद्धां शांतियुद्धापुढें नमतें घ्यावें लागलें. या दृष्टीनें समेट झाला म्हणजे आम्ही युद्धांत आक्रमण केलेली मान्याची जागा सोडली, किंवा आमचीं शस्त्रें बोथट केलीं किंवा काय हें आपण पाहूं. शांतियुद्धाचीं हत्यारें तीन होतीं. दारूबंदी, परदेशी कापडावर बहिष्कार व कायदेभंग. या तीन हत्यारांपैकीं पहिलीं दोन हत्यारें समेटामुळें मुळींच बोथट झालीं नाहींत. उलट समेटामुळें तीं जास्त तीक्ष्ण झालीं. पिकेटिंग करणें हा एक गुन्हा आहे, असें पूर्वीं होतें पण समेटामुळें पिकेटिंग करणें हा एक हक्क प्राप्त झाला आहे. परदेशी कापडावरचा बहिष्कार कायमच राहिला. वास्तविक या अटी मान्य करण्यांत सरकारनें किती आढेवेढे घेतले, कोणत्या सूचना, उपसूचना मांडल्या या गोष्टींचा विचार फार मोठा आहे. मुलाखत जवळ जवळ १०–१२ दिवसांच्या वर चालली. तासचेतास यावर रणें माजलीं तेव्हां समेट झाला. पिकेटिंगच्या बाबतींत तर महात्माजींनीं जय मिळविला!

ज्या हिंदुस्थानांतील स्त्रियांचें नखसुद्धां दृष्टीस पडणार नाहीं, त्या स्त्रियांनीं गेल्या युद्धांत पिकेटिंग करून देशाची अमूल्य कामगिरी बजावली. खरोखर स्त्रियांच्या मनाची ठेवण निसर्गत: पिकेटिंगला अनुकूल असल्यामुळें, म. गांधी यांनींतर स्त्रियांशिवाय इतरांनीं पिकेटिंग करूं नये असेंच म्हटलें आहे. प्रत्येक गृहांतील मातेनें, बहिणीनें, कन्येनें, पत्नीनें आपल्या घरांतच पिकेटिंग करून देशसेविकेचें काम केलें, तर बाहेर पिकेटिंग करण्याची जरूरी राहणार नाहीं. इंग्रजांचें राज्य आपल्या घरांत वाढत जाऊन परदेशी मालानें आपलें घर विटाळणार नाहीं. एवढी जर खबरदारी स्त्रियांनीं घेतली तर परकीय

वस्तूंचा व्यापार कधींहि चालणें शक्य नाहीं.समेटाचें बोलणें सुरू होत असतांना ज्या बारीकसारीक गोष्टी घडल्या, त्यासुद्धां अत्यंत बोधप्रद आहेत. म. गांधी यांनीं समेटाची भाषा आपल्या एकट्याच्या जबाबदारीवर केव्हांहि केली नाहीं. जी जो सूचना लॉर्ड आयर्विन यांनीं मांडिली, तिला आपला विरोध अगर संमति दाखविण्यापूर्वीं म. गांधी यांनीं ती सूचना कॉंग्रेस वर्किंग कमिटीपुढें मांडलेली आहे. अशा रीतीनें

## कॉंग्रेस कमिटी म्हणजे एक सरकार

आहे, असा एक मोठा अधिकार निर्माण झाला आहे. जें वर्चस्व सरकारचें तेंच कॉंग्रेस वर्किंग कमिटीचें, हा दर्जा जर उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आलें तर तें या शांतियुद्धामुळें आलेलें आहे. दुसरी क्षुल्लक गोष्ट, पण अत्यंत महत्त्वाची ती अशी कीं, म. गांधी रोज लॉर्ड आयर्विन यांस भेटत. भेट संपतांना लॉर्डसाहेब महात्मा गांधींस म्हणत, उद्यां भेटाल काय? आपण बोलणें करूं. म. गांधी म्हणत आपल्या मर्जीस वाटेल तर बोलण्यास येईन! अशा रीतीनें दुसऱ्या दिवशीं आयर्विन साहेबांस म. गांधी यांना पुन्हां चिठ्ठी पाठवून आमंत्रण करावें लागे. या एका क्षुल्लक गोष्टीवरून कोण समेटाची भाषा प्रथम करीत होता ही गोष्ट लक्षांत येईल. कित्येक लोक असें विचारतात कीं, पोलिसचौकशी हा विषय कां गाळण्यांत आला? वास्तविक या प्रश्नावर ५।६ दिवस ऊहापोह झाला. एवढ्या अवधींत प्रांतांचे गव्हर्नर व होममेंबर येऊन गेले. त्यांच्या वाटाघाटी झाल्या. सरकारलासुद्धां मोठा पेंच पडला. युद्धाला ज्या साधनांनीं सरकारनें तोंड दिलें व ज्या पोलीस डिपार्टमेंटच्या जोरावर पुढें पुन्हां युद्ध सुरू झालें कीं लढावें लागणार त्याची चौकशी करून त्यांना तोंडघशी पाडणें त्यांच्या दृष्टीनें अविचाराचें होय. पोलिसचौकशी मागण्यांत म. गांधी यांचा हेतू सरकारनें आमच्यावर खोटे आरोप करून आम्हांस अत्याचारी ठरविलें ही गोष्ट खोडून टाकून आम्ही खरे अनत्याचारी असून निरपराधी आहोंत, एवढें शाबीत करावयाचें होतें. पण सरकारानें ज्यावेळीं त्यांची अडचण पुढें मांडली, तेव्हां अशी तोड निघाली कीं, म. गांधी व आयर्विन यांच्या

मध्यें जी भाषा या विषयावर झाली त्याचें निदान द्योतक म्हणून तरी याचा विचार करतांना अशी शब्दयोजना घालण्यांत यावी कीं, वास्तविक सरकारलासुद्धां चौकशीची जरूरी वाटते. परंतु तें करणें कठीण आहे एवढा अर्थ त्यांत येईल. पुष्कळ शब्दप्रयोग सुचविले गेले. Govt. is unwilling अशी योजना पुढें आली. कॉं. वर्किंग कमिटीनें उत्तर दिलें कीं, ही योजना ठीक नाहीं.

## हे कोण तिस्मारखां

कीं त्यांची लहर नाहीं म्हणून आम्हीं मान्य करावी. तेव्हां Govt. find it difficult अशी शब्दयोजना झाली, तेव्हां समाधान झालें. अशा रीतीनें वाटाघाट होतांहोतां समेट झाला आहे. समेटाच्या नंतर गोलमेज परिषदेस जावें कीं नाहीं, म. गांधी तेथें जाऊन चर्चा करतील कीं निघून येतील वगैरे प्रश्नांवर आतां काय सांगणार? मात्र येवढें सांगून ठेवतों कीं, समेट झाला म्हणजे तह नव्हे, ही गोष्ट सर्वांनीं लक्षांत ठेवावी. ज्यावेळीं एक हात कमरेवरील तरवारीच्या मुठीवर असतो व दुसऱ्या हातानें तहावर सही करण्यासाठीं लेखणी धरलेली असते त्याचवेळीं त्या सहीच्यावर पाहिजे तो मजकूर आपणांस लिहवितां येतो; पण जर आपण ही वृत्ति धरली नाहीं व आपलीं शस्त्रें जय्यत ठेविलीं नाहींत, तर मात्र तहाची भाषा आपण म्हणूं ती आणूं शकणार नाहीं. युद्ध थांबलें नाहीं. युद्धवृत्ति पूर्ण तह होईपर्यंत कायम ठेवणें हेंच प्रत्येकाचें आजचें कर्तव्य आहे. निदान आपल्या मुलाला या पारतंत्र्याच्या नरकांत खितपत पडावें लागणार नाहीं एवढी खबरदारी घेतली पाहिजे. ज्यावेळीं हिंदुस्थानचे इतिहासकार या युद्धाचें महाभारत लिहितील त्यावेळीं त्या महाभारताचा एक अध्याय, एक श्लोक, अर्धा श्लोक, अर्धें पान, निदान एक अक्षर तरी आम्ही आपल्या रक्तानें लिहिलें आहे, एवढी कीर्ति राहील, याला साजेसें वर्तन आज प्रत्येकानें केलें पाहिजे.

---

# हिंदी राजकारणाचें भवितव्य

पुणें येथील वसंतव्याख्यानमाला गुरुवार ता. ३० एप्रिल १९३१ पासून सुरू होऊन पहिलें व्याख्यान लो. ना. बापूजी अणे यांचें "हिंदी राजकारणाचें भवितव्य" या विषयावर श्री. दा. वि. गोखले यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. ते म्हणाले:—

"चिटणीसांनीं या मालेचा गेल्या ५७ वर्षांचा इतिहास सांगितला. माझा या शहराशीं गेल्या २५ वर्षांचा संबंध आहे. पण व्याख्याता या नात्यानें या मालेशीं आज पहिल्यांदांच माझा संबंध येत आहे. मागें एकदां रा. अण्णासाहेब भोपटकर यानीं ("Manu's Politics") मनूचें राजकारण या विषयावर या ठिकाणीं व्याख्यान दिलें; त्यावेळीं मी अध्यक्ष होतों. पण त्याशिवाय मला या मालेचा कधींच लाभ घेतां आला नाहीं. मालेच्या चिटणिसांकडून दरवर्षी मला व्याख्यानाचें निमंत्रण येत असतें व मी त्यास उत्तरहि पाठवितों. या मालेसंबंधीं माझी अशी कल्पना आहे कीं, एकाद्याला नुसतें भाषण करितां येतें म्हणून त्यानें येऊन मालेत व्याख्यान देऊं नये. ज्यानें एखाद्या विषयाचें वर्ष दोन वर्षे अध्ययन केलें आहे, त्यानेंच पुण्याच्या या समजदार व समंजस समाजापुढें येऊन या ठिकाणीं बोलावें.

माझ्या भाषणाचा विषय कोणता हें मला कळण्यापूर्वींच तो "केसरींत" प्रसिद्ध झाला (हंशा). माझ्या व्याख्यानाचा विषय म्हणून जो प्रसिद्ध करण्यांत आला आहे त्याचा मला चांगलासा अर्थबोध झाला नाहीं. सध्यां "राजकारण" या शब्दाच्या अर्थाचें क्षेत्र विस्तृत झालें आहे. राजकारणांत अनेक विविध व्यवहारांचें स्वरूप दृष्टोत्पत्तीस येतें. पूर्वी परकीयांपासून रक्षण करण्यांतच फक्त राजकारण होतें, पण आतां राजकारणाची व्याख्या इतकी वाढली आहे कीं, प्रत्येक मनुष्याच्या जीविताशीं राजकारणाचा संबंध येऊन पोहोंचला आहे. तेव्हां राजकारणाच्या भवितव्यासंबधीं मी काय सांगूं शकणार? कारण मी कांहीं ज्योतिषी नाहीं (हंशा). माझा ज्योतिषावरील विश्वास

फारच कमी आहे, मी स्वतःची पत्रिका कधीं केलेली नाहीं व माझा हातहि मीं कधी कोणास दाखविला नाहीं.

## दोन भवितव्यांची सांगड

आजच्या राजकारणांतून काय निष्कर्ष निघणार असा तुमचा अंदाज आहे, असाच आजच्या विषयाचा अर्थ असावा असें मला वाटतें. राजकारण चालविण्याच्या कलेला व विद्येला राजकारण म्हणतां येईल, त्याचप्रमाणें राजसत्ता मिळविण्याची कला व सत्ता यालाहि राजकारण म्हणतां येईल. आज ज्यांच्या हातांत राजसत्ता आहे, त्यांच्या राजकारणाचें भवितव्य, आणि ज्यांना आज राजसत्ता मिळवावयाची आहे, त्यांच्या राजकारणाचें भवितव्य यांची सांगड आज पडली आहे. यांपैकीं एक प्रश्न सुटला कीं दुसरा सुटलाच! दुसऱ्या लोकांच्या हातांत सत्ता जाते, त्यावेळीं त्या परतंत्र अंतःकरणांत स्वाभिमानाची ज्योत पेटते व असें झालें कीं तेथें राजकारण उत्पन्न झालेंच.

## हिंदी चळवळीचें सिंहावलोकन

इंग्रजांची सत्ता येथें बरेच वर्षांपासून आहे. इंग्रजांच्या देशांत राजसत्ता प्रजातंत्र पद्धतीनें चालविली जाते. अशा प्रजातंत्र राज्यकर्त्यांचें राज्य आपल्या देशावर असतांना, येथें मात्र एकतंत्र पद्धतीचा राज्यकारभार कां चालविला जातो, येथें प्रजातंत्र राज्यपद्धति कां अमलांत आणली जात नाहीं, याचें इंगित हिंदी लोकांच्या ध्यानीं जसजसें येऊं लागलें, तसतशी चळवळ जोरांत सुरू झाली. राज्यकर्त्यांनीं दिलेल्या आश्वासनांचा राष्ट्रीय सभेंत अनेकवार उल्लेख करण्यांत येऊं लागला. निव्वळ इंग्रज लोकांच्या भलेपणाच्या विश्वासावर बरेच दिवस त्यांचें येथें घकलें. मोर्ले–मिंटो सुधारणांपेक्षां जास्त कांहींहि न देण्याइतके इंग्रज लोक उदार आहेत हें समजल्या-नतर, बंगालफाळणीच्या निमित्तानें चळवळीला दुप्पट जोर चढला. 'टिळक स्कूल ऑफ थॉट' यावरील लेख प्रसिद्ध होऊं लागल्यावर स्वावलंबनाचीं तत्त्वें अंगिकारल्याशिवाय वाजवी हक्क प्राप्त होणार नाहींत, अशी विचारसरणी राष्ट्रांत उत्पन्न झाली. प्रतिकाराच्या रूपानें शत्रूला

अडचणींत आणण्यासाठीं बहिष्काराची चळवळ सुरू करण्यांत आली. १९१४ सालानंतर होमरूललीग स्थापन होऊन स्वराज्याचे हक्क मागणाऱ्या लोकांची संख्या जास्त वाढत चालली व प्रचंड बहुमत स्वराज्याच्या चळवळीच्या मागें आहे, हें स्वराज्यसंघानें राज्यकर्त्यांना दाखवून दिलें. स्वराज्य आम्हास पाहिजे,अशी नुसती वाच्यता करून भागत नाहीं, असें कळून आल्यावर बहिष्काराचा ठराव व असहकारितेचा कार्यक्रम राष्ट्रापुढें आला. इतःपर राज्यसत्ता मिळावयाचीच असेल, तर कांहीं तरी उद्योग केला पाहिजे, व तो प्रतिकाराचा केला पाहिजे असें समजून असहकारिता, बहिष्कार व निःशस्त्र प्रतिकार वगैरे कार्यक्रम पुढें येऊन लाहोर कांग्रेसनें अहिंसा व कायदेभंग यांनीं युक्त अशी सत्याग्रहाची चळवळ पुढें मांडली. राष्ट्रांत या कार्यक्रमानें स्वाभिमानी लढाऊ वृत्ति उत्पन्न केली आहे. गेल्या बारा महिन्यांचा आढावा घेतल्यास आपणास असें आढळून येईल कीं, सत्तेला न भितां, सत्तेनें केलेल्या अनन्वित प्रकारांचा निषेध म्हणून कांहीं काळ कां होईना, मी सरकारची सत्ता मानणार नाहीं, असे म्हणणारे शेंकडों लोक गेल्या बारा महिन्यांत पुढें आले.

## दोन संस्कृतींचा झगडा

दोन संस्कृतींचा झगडा सुरू झाला असतां, त्याचा निकाल तीन प्रकारांनीं होऊं शकतो. पहिला प्रकार म्हणजे एका संस्कृतीनें पाशवी शक्तीच्या जोरावर दुसरी संस्कृति अजीबात नष्ट करणें. दुसरा मार्ग म्हणजे एका संस्कृतीनें आपल्या श्रेष्ठ गुणांच्या तेजानें दुसऱ्या संस्कृतीला आत्मसात् करणें; आणि तिसरा मार्ग म्हणजे करारमदार करून दोन्ही संस्कृतींनीं आपापसांत तह करून राहणें. एके काळीं शक, हूण वगैरे जातींनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून हिंदू लोकांना जिंकण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनाच आपण आत्मसात् करून बसलों! अशी आमची हिंदु संस्कृति मोठी संग्राहक आहे, असे आपण तिचें वर्णन करितों व गेल्या हजारों वर्षांत तिनें इतर अनेक संस्कृती पचविल्या आहेत हेंहि खरें आहे. पण गेल्या हजार वर्षांत आपल्या संस्कृतीचा

## पचनशक्तीच कमी झाली आहे !

असें मला वाटतें. आमचे मुसलमान बंधू आज येथें कित्येक शतकें आहेत ! मूठभर पार्शी लोकांचा समाज उदाहरणार्थ घ्या ! अन्य संस्कृतीला आत्मसात् करण्याची शक्ति आतां हिंदी संस्कृतीला राहिली नाहीं असें दिसतें. अर्थात् भिन्न संस्कृतीशीं आपणास यापुढें करारमदार करूनच निर्णय लावून घेतला पाहिजे. एकानें दुसऱ्याचें समूळ उच्चाटण करण्याचा काळ आतां राहिला नाहीं. फार तर तूं आमचा पाहुणा आणि मी घरचा यजमान असा करारमदार करून घेतां येईल. पण पाहुण्यांना घरांतून निघून जा असें सांगतां येणार नाहीं ( हंशा ). पाहुणा आपण होऊनच कंटाळून किंवा इतर कांहीं कारणांनीं देश सोडून गेला तर मात्र गोष्ट निराळी ! स्वराज्यप्राप्तीचा प्रश्न अशा एखाद्या लढ्यानें संपेल असें मला वाटत नाहीं. पांचपन्नास हजार माणसें तुरुंगांत गेलीं म्हणजे लढा संपला असें नाहीं. हा प्रश्न इतक्या सुलभ रीतीनें सुटल्यास आमच्यासारखीं

## परमेश्वराचीं लाडकीं लेकरें

दुसरीं नाहींतच असें म्हणावें लागेल.कायदेभंगाच्या चळवळीस सुरुवात झाली त्यावेळीं चळवळ जोरांत होती हें खरें व लोकांच्या झुंडीच्या झुंडी कायदेभंग करण्यास तयार होत्या. पण नंतर लोकांची ती तयारी दिसली नाहीं. कायदेभंगाचा पुन्हां अवलंब करावयाचा असल्यास अनुभवाच्या गोष्टी हिशोबांत घेतल्या पाहिजेत. देशांतील लोक एक प्रकारच्या वैराग्याच्या कल्पनेनें देहदंडास तयार झाले. पण खरी कायदेभंगाची चळवळ देहदंडानेच संपली असें नाहीं. देहदंडाबरोबर मालमत्तेच्या नुकसानीस लोकांनीं तयार झाले पाहिजे. या स्वार्थत्यागाच्या कल्पना देशांतील थोर थोर व्यक्तींनीं प्रत्यक्ष कृतींत आणून दाखविल्या पाहिजेत. राष्ट्रांत चळवळ जिवंत राहाणें आवश्यक आहे. हा सहजासहजीं सुटणारा प्रश्न नाहीं. प्रतिपक्षाला पेंचांत आणि अडचणींत आणून आपणास यापुढील राजकारण लढविणें जरूर आहे. चळवळीला शिथिलता येऊं देतां उपयोगी नाहीं. लोक देहदंडाला तयार आहेत, पण मालमत्तेचें नुकसान करून घेण्यास लोक तयार

नाहींत. किसानांना या दृष्टीनें तयार करावें लागेल व जी कसोटी यापुढें द्यावी लागेल तिचा विचार केला असतां गुजराथहि अद्याप कायदेभंगाच्या पुऱ्या परीक्षेला उतरलेला नाहीं असें म्हणावें लागेल.

## किसानांना करबंदीचा उपदेश

करण्यापूर्वी शहरांतील लोकांनीं सरकारला द्यावयाचे कर न देऊन पाहिल्यास कसोटी लागूं शकेल. म. गांधी तहाचें बोलणें करण्यास जात आहेत ही गोष्ट त्यांच्या तत्त्वांना अनुसरूनच आहे असें मला वाटतें. अहो, मी तुमच्याशीं तहाची वाटाघाट करण्यास तयार आहें, असें कोणी आपणांस सांगत असतां त्याकडे दुर्लक्ष करणें बरोबर होणार नाहीं. तहाचें बोलणें हें जरी दांभिकपणाचें असलें, तरी तें तसें आहे ही गोष्ट प्रथम जगाच्या निदर्शनास आणावी लागते. सेनापति तहाची भाषा बोलण्यांत गुंतला असतांनाहि सैनिकांनीं तयारींत असावें लागतेंच.

## तलवारीच्या मुठीवर हात आहे

ज्या सेनापतीचे सैनिक युद्धाच्या तयारींत असतात त्याच सेनापतीला अखेर यश प्राप्त होतें. लोकांची मनोवृत्ति व मनोभूमिका कायम ठेवण्यासाठीं पुनः चळवळ चालू होणार असें लोकांना सांगून त्यांच्या भावना जागृत ठेवल्या पाहिजेत. तहाच्या वेळीं जी परिस्थिति होती, त्यांत बदल होऊं देतां उपयोगी नाहीं व कोणत्याहि प्रकारें माघार घेतां उपयोगी नाहीं. तलवारीच्या मुठीवरील हात दूर करून चालणार नाहीं; व तलवारीच्या मुठीवर हात आहे याची जाणीव प्रतिपक्षास करून देण्यासाठींच चळवळ आपण केली पाहिजे. ऐकावयास तयार नसलेल्याबरोबर सत्याग्रह; परंतु लोकलज्जेस्तव कां होईना ऐकण्यास तयार झालेल्याबरोबर बोलण्यास तयार असणें हाच सत्याग्रह होय.

या तहानेंहि झालें तर कार्य होईल; नच झालें तर पुढील लढ्यास तुमची तयारी पाहिजे. त्यांतून अखेर निकाल काय होईल तें कोणी सांगावें? या तहानंतरचा लढा पुढें कोणत्या मार्गानें चालेल हें मी सांगूं शकत नाहीं; कारण मीं कांहीं ज्योतिषी नाहीं. जगांत आज निरनिराळ्या प्रकारचे वारे वाहात

आहेत. रशियांत सुटलेली वावटळ व निरनिराळ्या देशांतील वावटळी यांच्या झंझावाताचा आपल्या या देशावर काय परिणाम होईल हें जाणण्याची ऑब्झर्व्हेटरी आमच्याजवळ नाहीं. परंतु या झंझावाताचा उपसर्ग परतंत्र राष्ट्रांना भोंवणार आहे, हें आपण लक्षांत आणून स्वराज्यप्राप्तीचे प्रयत्न केले पाहिजेत. नाहीं तर आपणां परतंत्र लोकांचे हाल कुत्राहि खाणार नाहीं. आपण आपल्या चळवळीची पराकाष्ठा करण्यावरच आपल्या राजकारणाचें भवितव्य अवलंबून आहे.

---

# सातारा जिल्हा परिषद*

सातारा जिल्हा परिषद ता. १ मे १९३१ रोजीं मसूर येथें भरली. त्या सभेचे अध्यक्ष लोकनायक बापूजी अणे यांचें भाषण:—

मसूरकर महाराज, प्रतिनिधि बांधव व भगिनींनों, आपण मला अध्यक्ष होण्याचा मान दिला याबद्दल मी आपला आभारी आहें. माझ्यावरील आपल्या प्रेमामुळें, आपण मला मान दिला यांत आपलें सौजन्य व्यक्त होतें. या प्रसंगीं मला मागील आठवण होते. बारातेरा वर्षांपूर्वीं वांईस झालेल्या परिषदेच्या वेळीं हाच मान मला आपण दिला होता. त्यावेळचा काळ माझ्या डोळ्यासमोर आहे. त्या काळांत व आजच्या काळांत जरी अंतर पडलें असलें, तरी आपल्या प्रेमामध्यें अंतर पडलें नाहीं, याबद्दल मला अत्यंत आनंद वाटतो.

स्वागताध्यक्षांनीं आपल्या भाषणांत, या ठिकाणचें ऐतिहासिक महत्त्व काय आहे, हें दाखविलेंच आहे. मसूरचा व हा जिल्हा ज्या खोऱ्यांत आहे त्याचा इतिहास सर्वांस मशहूर आहे. 'मशहूर'चाच अपभ्रंश मसूर झाला असावा असें मला वाटतें.

---

* 'केसरी' पुणें ५ मे १९३१

सातारा जिल्ह्यानें आतांपर्यंत निरनिराळ्या ठिकाणीं परिषदा भरवून अव्याहत रीतीनें काम चालविलें आहे. आपल्या जिल्ह्यांत कायकर्ती माणसें असल्यानें आपल्या प्रयत्नांस यश येत गेलें.

## आम्ही वऱ्हाडकरांनीं आपल्याच जिल्ह्याचा आदर्श

आपल्यापुढें ठेवून आमच्या शक्तीप्रमाणें, गेलीं सोळा वर्षें आमच्या प्रांतांत काम चालू ठेवलें आहे. लो. टिळकांनीं आम्हांला राजकारणाचा धडा शिकविला. तेच महाराष्ट्राचे गुरु. तेव्हां गुरुगृहीं जाऊन, आमच्या कामगिरीचा अहवाल मला निवेदन करण्याची संधि आपण दिली याबद्दल मला आनंद वाटतो. तीनशें वर्षांपूर्वींचा इतिहास पाहिला, तर महाराष्ट्रांत, त्यांतल्या त्यांत या सातारा जिल्ह्यांत अनेक सत्पुरुष होऊन गेले, शिवरायासारखे राजे होऊन गेले. धर्मकारण व राजकारण यांची ही उज्ज्वल परंपरा अद्याप चालू आहे. या जिल्ह्यानें पूर्वींची स्वातंत्र्याची कामगिरी चालू ठेवण्याची शिकस्त केली आहे. त्या कालाचा व आतांच्या कालाचा विचार करणारी थोर विभूति आपल्या गांवांत चमकूं लागली आहे. या विभूतीच्या कार्याचा पसारा पाहतां थोडी आशा वाटूं लागली आहे.

## महाराष्ट्रांतील चळवळ

लोकमान्यांच्या वेळचा काळ व आजचा काळ यांमध्यें बरेंच साम्यहि आहे. स्वराज्यसंघाची गोष्ट घ्या. त्यावेळीं लोकांमध्यें जागृति उत्पन्न करून 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असें प्रत्येकाच्या मनावर बिंबविण्याची लोकमान्यांनीं पराकाष्ठा केली व लोकांच्या मनोभावना याच विचारांनीं प्रदीप्त केल्या. लोकमान्यांच्या कालानतर आज पुन्हा अशीच वेळ आली आहे. त्या वेळच्या शिकवणीचा परिणाम, लोकांच्या अंतःकरणावर चांगला झाला, याचा अनुभव चालू सत्याग्रहाच्या चळवळींत आला. सुपीक जमिनींत पेरलेलें बीं वांया जात नाहीं हेंच खरें. या कालानंतर या जमिनींत पेरणी झाली. पण मध्यंतरीच्या अत्यंत कष्टदायक उन्हाळ्याच्या झळीनें बींच नाहींसें होतें कीं काय, अशी भीति वाटत होती. पण, देशांत सुरू झालेल्या चळवळीच्या अमृतमय सिंचनानें, तें पूर्वींचें बीं पुनः जोमानें उगवलें व त्याचा अपेक्षेबाहेर विस्तार झाला. महात्मा गांधींसारखा कष्ट व मशागत करणारा माळी

लाभला, त्यामुळें पीक नष्ट होईल ही भीति आतां उत्पन्न होणार नाहीं. पीक खाण्यासाठीं जीं फिरतीं जनावरें आहेत, त्यांचाहि उपद्रव कमी होईल. सत्याग्रह, बहिष्कार, स्वदेशीचा पुरस्कार इत्यादि साधनांनीं,महात्मा गांधींनीं ही चळवळ सुसज्जित केल्यामुळें, आतां भय उरलें नाहीं. सांगण्याचा मतलब हा कीं, पूर्वीची शिकवण कायम आहे. त्यामुळें जी चैतन्याची ज्योत निर्माण झाली आहे, ती मागच्या खेपेपेक्षां, जास्तच प्रकाशमान होईल, व पुनः राजकारणास तेज येऊन महाराष्ट्रच सर्वांचा आदर्श होईल.

हल्लीं देशांत समेटानें जें वातावरण निर्माण झालें आहे, त्यामुळें कांहीं

**विचारवंत लोकांना मोठी विवंचना**

लागली आहे. उद्यां काय करावें हा प्रश्न ते पुढें आणतात. पण माझ्या मतें, हा प्रश्नच आपण विचारूं नये. या समेटावर कॉंग्रेसनें आपलें शिक्कामोर्तब केलें आहे. या समेटामुळें आपलें नुकसान झालें नाहीं, हें आपण सर्वांनीं लक्षांत ठेवावें.

या देशाची घटना ठरविण्याचा हक्क आमचा आहे. पण सरकारनें या हक्काची पायमल्ली करून, सात शहाण्यांचें एक कमिशन नेमिलें. त्यास विटाळ लागेल म्हणून एकहि हिंदी गृहस्थ त्यांत घेतला नाहीं. हिंदी जनतेनें या कमिशनवर बहिष्कार घालून आपलें मत प्रगट केलें. या कामीं एका महान लोकनायकाचा नाहक बळी पडला, असें माझेंच मत नाहीं, तर डॉक्टरांचें मत आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. पुढें रा. टे. परिषदेचें आमंत्रण आलें. विलायतसरकारनें विचारविनिमय करण्यासाठीं पाचारण केलें. राष्ट्रीयसभेनें आपलें म्हणणें यावर काय आहे, याची जाहीर घोषणा केली व दिल्लीस एक जाहीर पत्रक ( मॅनिफेस्टो ) प्रसिद्ध केलें. राष्ट्रीयसभेनें या परिषदेंत भाग घेतला नाहीं. व्हॉइसरॉय व गांधी यांची पुढें गांठ पडली, तेव्हा गांधीजींनीं व्हॉइसरॉय यांस "वसाहतीचें स्वराज्य देऊं शकतां काय" असा सवाल टाकला पण त्यांच्याकडून नकारार्थी उत्तर मिळालें. पुढें सत्याग्रहाची मोहीम सुरूं झाली. दांडीची मोहीम सुरू करण्याच्या अगोदर लाहोरच्या कॉंग्रेसनें स्वातंत्र्याचा ठराव पसार करून हेंच तत्त्व उच्चारिलें होतें. पुढें दांडीचा प्रताप काय झाला. हें सर्वांस माहीत आहेच.

गेल्या बारा महिन्यांत जी 'न भूतो न भविष्यति' चळवळ देशांत झाली, त्या चळवळींत लोकांनीं अपूर्व स्वार्थत्याग करून तसेंच अपूर्व यश मिळविलें.या चळवळीचीं वर्णनें अमेरिकन वृत्तपत्रकारांनीं इंग्लंडच्या किनाऱ्या-पर्यंत पोहोंचविलीं व हिंदुस्थानांत कोणत्या प्रकारची चळवळ सुरू आहे याची माहिती इंग्रज लोकांना दिली. चळवळीचा परिणाम तेथील लोकांवर व लँकेशायरवर झाला. पुढें रा. टे. परिषदेंत वाटाघाट झाली. पुढें मुख्य प्रधानांना जाहीर रीतीनें वसाहतीच्या स्वराज्याची घोषणा करावी लागली. ही सायमन कमिशननें जी शिफारस केली होती तिची पुढील पायरी होय.

## समेट कसा झाला ?

राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी या सभेंत आल्याशिवाय हिंदुस्थानास उपयुक्त अशी योजना होणेंच शक्य नाहीं, अशी खात्री पटल्यावर समेट करावा असें इंग्रजी मुत्सद्यांना वाटूं लागलें. गोलमेज परिषदेच्या वाटाघाटींत निष्पन्न झालेल्या योजनेस हल्लीं जें फेडरेशनचें स्वरूप आलें आहे, त्याचा विचार करण्यासाठीं सर्वांची मदत पाहिजे असा विचार झाल्यावर समेटाची भाषा पुढें आली. या चळवळीनें अशा प्रकारें दिंडीचे दरवाजे खोलून आंत जाण्यास सवड करून दिली. हा थोडक्यांत या चळवळीचा इतिहास आहे. समेटाच्या पुढील वाटाघाटीसाठीं हा अर्धनग्न फकीर यमुना नदी ओलांडून गेला व त्यानें व्हाइसरॉयाची भेट घेतली. समेटावर सोळा दिवस एकसारखी चर्चा झाली. त्यांत निरनिराळे चमत्कारिक प्रसंग उपस्थित झाले व शेवटीं एकदां तडजोड झाली. या तडजोडीस ' ट्रूस ' असें मी समजतों. पण सरकार 'सेटलमेंट' असें म्हणतें. हा समेट झाला म्हणजे आपल्यास स्वातंत्र्य मिळालें असेंच नाहीं. राऊंड टेबल परिषदेंत याबद्दल वाटाघाट होईल. तेव्हां या संधिकालांत आपण कांग्रेसनें ठरविलेल्या व आंखलेल्या विधायक कार्य-क्रमाचा प्रसार जास्त जोरानें केला पाहिजे. व आपलें सामर्थ्य वाढविलें पाहिजे. हाच उद्देश मनांत ठेवून व दूरवर दृष्टि पोहोंचवून महात्माजींनीं समेटा-च्या अटींत बहिष्कार व निरोधनाचीं कलमें ग्रथित केलीं आहेत. त्याच-बरोबर दारूबंदीचे कलम आहे.

### शिबिरें मोडूं नका.

या स्वातंत्र्याच्या युद्धांत स्वयंसेवकांची अत्यंत मोठी कामगिरी झाली. त्यांनीं मोठ्या ईर्षेनें भाग घेऊन यश मिळविलें. ज्या ज्या शिबिरांनीं हें कार्य पार पाडिलें, तीं शिबिरें मोडूं नका असें माझें आपणांस आग्रहाचें सांगणें आहे. तह मोडला, रा. टे. परिषदेंत कांहीं निष्पन्न झालें नाहीं व पुन्हां युद्ध पुकारण्याचा प्रसंग आला तर स्वयंसेवकांना ताबडतोब भाग घेतां यावा म्हणून शिबिरें राखा. पुढच्या कार्यांत हल्लींपेक्षां जास्त कार्य कसें करून दाखवितां येईल याचा विचार करून सर्वत्र एकसूत्रीपणा राहील असा विधायक कार्यक्रम आंखून आपण स्वयंसेवकांना परत येण्याची आज्ञा द्याल तरच पुढील चळवळीस जोर येईल.

या स्वातंत्र्ययुद्धांत महिलांनींहि उत्तम कामगिरी करून दाखविली आहे. श्रीमती सौ. लीलावतीबाईसारख्या सुशिक्षित स्त्रियाहि मोठ्या हौसेनें भाग घेण्यास पुढें येत आहेत ही गोष्ट अभिमानास्पद आहे. तेव्हां स्त्रियांनाहि ज्ञान देऊन त्यांनाहि या युद्धांत भागीदार करून घ्या.

---

## युद्धाच्या तयारींत राहा*

शनिवार ता. २० जून १९३१ रोजीं पुसदच्या लोकांनीं, यवतमाळ जिल्हा युद्धमंडळाचे दुसरे डिक्टेटर लोकप्रिय डॉ. भास्कर महादेव टेंबे यांना नृसिंह संस्थानाच्या आवारांत मानपत्र देऊन सत्कार केला. त्या प्रसंगीं लोकनायक श्री. बापूजी अणे यानीं पुढील आशयाचें छोटेंसें पण तडफदार भाषण केलें. ते म्हणाले:—

" माझे सन्माननीय मित्र व राष्ट्रकार्यकुशल नेते डॉ. टेंबे यांच्या या सत्काराच्या मंगल प्रसगीं मला यावयास मिळालें हें मोठें भाग्यच समजतों व त्याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानतों. यवतमाळपासून पुसदपर्यंत मोटारमध्यें बसून येण्यांत आम्हांस मोठे 'कष्ट' झाले, एवढा सुकुमार

---

* ( खास बातमीदाराकडून. )

मी खास नाहीं ! ' येऊं शकत नाहीं ' असें सांगून चुकल्यानंतर, मागाहून मीं येण्याचें ठरविलें यावरून पहिल्या व दुसऱ्या निमंत्रणांत मी अगत्याच्या दृष्टीनें फरक मानतों असेंहि समजण्याचें कारण नाहीं. शंकररावजी सरनाईक यांचा लेखी व तोंडी निरोप हे दोन्ही माझ्या दृष्टीनें सारखेच मोलवान् आहेत व त्यांचा शब्द मी केव्हांहि मोडूं शकत नाहीं, एवढेंच मी तूर्त सांगतों. असो. आज आपण माझी अतिशय प्रशंसा केली तिजवर मी असत्यत्वाचा आरोप करूं इच्छित नाहीं. कारण असल्या निमित्तानें अवास्तव स्तुति करण्यास शास्त्राचीहि संमति आहे."

यानंतर डॉ. टेंबे यांच्या सार्वजनिक कामगिरीसंबंधीं व्याख्यात्यांनीं गौरवपूर्वक उल्लेख केला.

" डॉ. टेंबे यानीं आपल्याकडे 'निष्ठुर'पणाचा आरोप ओढून घेतला व शेंकडों अस्सल तरुणांना बंदिवासाच्या होमकुंडांत लोटल्याचा कबुलीजबाब दिला, हाच विषय मला आजच्या प्रसंगीं अतिशय रमणीय व मोहक वाटतो. धान्याचे भाव उतरले, नाण्याचें दुर्भिक्ष माजलें, शेतकऱ्यांच्या तोंडावरचा नूर उतरला, या घटकेपर्यंत पाऊस जवळपास नाहीं— अशी दुर्धर आपत्ति चोहोंकडून असतां, सगळ्या आपत्तींचें मूलकारण जें पारतंत्र्य त्याचें निराकरण करण्याच्या प्रयत्नांत आपण आहोंत.

### पारतंत्र्याचें निराकरण

अनेक शतकें आपण पारतंत्र्यपंकांत रुतल्यामुळें अनेक दोष राष्ट्रांत उत्पन्न झाले आहेत. त्यांचें निरसन करण्यास समर्थ अशा तेजोगोलांचा उदय होण्याचा समय आला आहे. कालिदासानें म्हटल्याप्रमाणें 'यात्येकतोऽस्तशिखरं पतिरोषधीनाम्'—एका क्षितिजावर चंद्र बुडतो आहे, तर दुसऱ्या क्षितिजावर सहस्ररश्मि वर येत आहे असा मला आजचा काल भासतो ! अनेक पिढ्यांत वाढलेले दोष नाहींसे व्हावयाचे तर त्याकरितां असल्या भीषण आपत्तींतूनच गेलें पाहिजे. ग्रीष्मांत प्रखरतर चंडांशु तापल्याशिवाय वर्षाकालांत जलसिंचन होत नाहीं. त्याप्रमाणें आपत्तींचा कडेलोट होतो तेव्हांच ऊर्जितावस्थेचा सूर्य उदयाचलावर येत असतो. ह्या आपत्ती म्हणजे भावी

भाग्योदयाचें निःसंदिग्ध पूर्वचिन्ह होय. तो परमेश्वराचा संदेश होय असें समजून या आपत्तींकडे आशायुक्त अंतःकरणानें पाहिलें पाहिजे. असो.

आपण नुकताच जो स्वातंत्र्याचा रणसंग्राम केला, त्याचें स्वरूप अधिक भीषण होऊं नये म्हणून प्रतिपक्षाच्या इच्छेस अनुसरून आपण तो तहकूब केला आहे. पण ही तहकुबी म्हणजे युद्धाची परिसमाप्ति होय असें मात्र समजूं नका. तहकुबी तात्पुरती आहे. मध्यंतरींच्या बोलण्याचालण्यांत इष्ट फल प्राप्त झालें तर तें कोणास नको ? ती मोठीच परमेश्वरी कृपा समजूं. पण एवढ्या अल्प स्वार्थत्यागानें, एवढ्याशा युद्धाच्या चुणकीनें एखाद्या राष्ट्रास स्वातंत्र्य प्राप्त झाल्याचा दाखला इतिहासांत तर उपलब्ध नाहीं. माझें आपणांस विचारणें आहे कीं, आपण असल्या गौरवांत गढून कर्तव्याची विस्मृति पडूं देणार कीं या गुणगौरवाच्या मुळाशीं आपली जी युद्ध-कार्यास संमति आहे ती दृढ करणार ?

**स्वातंत्र्याचा लढा स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत संपत नाहीं,**

हें लक्षांत ठवा, व स्वातंत्र्यसंपादनास आवश्यक अशी त्यागवृत्ति कायम ठेवा व ती जास्त कणखर कशी करतां येईल या विचारांत आपला काळ घालवा अशी सूचना मी आपणांस मुद्दाम करूं इच्छितों; व आजचा प्रसंग घडवून आणण्यांत आपण आपल्या ठिकाणच्या या तयारीचें आश्वासन देतां असेंच मी गृहीत धरून चालतों. या शहरास स्वातंत्र्याची पंढरी म्हणून लोकमान्यांनीं संबोधिलें होतें. या क्षेत्रांत स्वातंत्र्याचा विठोबा जागृतपणें वास करीत आहे. येथलें स्वातंत्र्याचे भक्त नुसते आरती ओवाळणारे नसून खरे हाडाचे सद्भक्त आहेत असा माझा अनुभव आहे, व जेव्हां जेव्हां काम पडेल, तेव्हां तेव्हां हें स्वातंत्र्यप्रेम प्रकट करण्याची जबाबदारी आपणांवर आहे. या गांवास लोकमान्यांचे पुण्य चरण लागल्यानें तो पुनीत झाला याची जाणीव असल्यामुळेंच मी गुदस्तां त्यांचें स्मरण करून स्वातंत्र्याचा संग्राम येथें सुरूं केला व त्यांचा कैलासांत वसत असलेला आत्माच यशापयशाची चिंता वाहात आहे म्हणून मी निर्धास्तपणें तो लढलों. त्यांच्या पुण्याईनें आपणांस यशहि प्राप्त झालें. पुनश्च जेव्हां युद्धाचा प्रसंग येईल तेव्हांहि मी पुसदकडेच, या पुण्यक्षेत्राकडेच बोट दाखवीन असें मी सांगतों.

## स्वतंत्रतादेवीच्या मंदिरांतील रक्षिकांनो!

शेवटीं माझ्या भगिनीवर्गास उद्देशून मला मुद्दाम सांगावयाचें आहे कीं, त्यांनीं हें स्वातंत्र्ययुद्ध नुसत्या पुरुषवर्गाचें नसून तें आपलेंहि आहे असें समजावें. वारकरी सांप्रदायांत संत असतात, तशा संतिणीहि असतात. आजचें स्वातंत्र्ययुद्ध म्हणजे एका जनतेनें दुसऱ्या जनतेविरुद्ध चालविलेला रणसंग्राम होय; व जनतेमध्यें जसा पुरुषवर्ग येतो तसाच स्त्रीवर्गहि येतो. हे दोघेहि आपापलीं कर्तव्यें योग्य प्रकारें करतील तरच त्यांनीं बनलेलें राष्ट्र स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास पूर्णपणें समर्थ होऊं शकेल. म्हणून भगिनीवर्गास मी तूर्त एका बाबतींत विशेष आग्रहाची विनंति करितों, ती म्हणजे परदेशी कापडा-वरील बहिष्कार आपण म्हणजे एका भावाची बहिण, आपल्या पतीची गृहिणी किंवा घराची मालकीण असें न समजतां पवित्र अशा स्वतंत्रता देवीच्या मंदिरांतील एक रक्षक, कॉंग्रेसनें घरोघर ठेविलेली एक देशसेविका अशी भावना करून तुम्ही पहारेकऱ्याचें काम करावें कीं घरांत परदेशी कपडा म्हणून येऊं द्यायचा नाहीं! असा पहारा भगीनींनों, तुम्ही करा म्हणजे बाजार ओळींत जाऊन पिकेटिंग करण्याचें प्रयोजनच उरणार नाहीं. आपल्या घररूपी स्वातंत्र्यमंदिरास परदेशी कापडाचा अमंगल स्पर्श न होऊं देण्याची कामगिरी डोळ्यांत तेल घालून करा. देवींनो, तुम्हांला पदर पसरून एवढी भिक्षा मागतों; नव्हे चार महिन्यांनीं दिवाळी यायचीच आहे, त्यावेळीं तुम्ही भाऊबीजेची ओंवाळणी म्हणून एवढी कामगिरी करून राष्ट्र स्वातंत्र्य–संपादनास समर्थ करा.”

# परिशिष्ट

—'नवीन पंथ' या महत्त्वाच्या लेखमालेंतील ५ व ६ हे लेखांक आणि 'गणपतिदेवता' हा अप्रकाशित लेख पुस्तक अर्धे अधिक छापून झाल्या-नंतर आमच्या हातीं आल्यामुळें त्यांचा समावेश परिशिष्टांत केलेला आहे.

—संग्राहक.

# नवीन पंथ*

## निःशस्त्र ऊर्फ संरक्षक प्रतिकार

### लेखांक ५ वा

गेल्या तीनचार लेखांत निःशस्त्र प्रतिकाराची आवश्यकता, त्याचा उद्देश, नवीन पंथाचें अंतिम साध्य, राष्ट्रांतील लोकमत एकवटून व त्याचें नियमन करणारी एका केंद्रोपवर्ती राजकीय संस्थेची अत्यावश्यकता वगैरे मुद्यांचें अल्प विवेचन झालें. आतां प्रचलित राजसत्तेचा प्रतिकार केल्याशिवाय तर तरणोपाय नाहीं. पण या प्रतिकाराचे किती प्रकार आहेत आणि त्यांपैकीं आपणास सद्यःस्थितींत कोणता सुसाध्य आहे हें पाहूं. प्रचलित राजसत्तेचा प्रतिकार तीन मार्गांनीं करतां येतो. एक तर सरकार ज्यांच्या साह्यानें आपला राज्यकारभार हांकतें त्यांच्याचकडून संप वगैरे करवून किंवा लोकांकडून कर वगैरे देण्याचें बंद करवून चालत्या गाड्यास खीळ घालण्याचा प्रयत्न करणें हा होय. प्रथमतः या युक्तीची कल्पना प्रसिद्ध आयरिश देशभक्त पार्नेल यास आली व त्यांनीं सर्व आयर्लंडभर प्रवास करून या मताचा चोहोंकडे प्रसार केला, व अशा रीतीनें इंग्रजी भांडवलावर चालणारे कारखाने अगदीं बुडण्याच्या स्थितीस आणिले व विश्वासू माणसाच्या अभावीं राज्यकारभार हांकण्याचें काम केवळ अशक्य करून सोडिलें. दुसरा प्रकार म्हणजे जे अधिकारी सरकाराकडून नेमिले जातात, त्यांच्यांतील जुलमी अधिकाऱ्यांस शासन करून ज्या शांततेच्या जोरावर जुलमी सरकारला जुलमाला कायदेशीरपणाचें स्वरूप देतां येतें त्या शांततेचा भंग करण्याकरितां चोहोंकडे दंगेधोपे सुरूं करावयाचे व अशा रीतीनें सरकारला सळो कीं पळो करून सोडावयाचें, हा होय. रशियन लोकांनीं याच प्रतिकाराचें अवलंबन करून झारसारख्या मी मी म्हणणाऱ्या बलाढ्य बादशहास लोकांपुढें नाक घासावयास लाविलें व ड्यूमा सभेची स्थापना केली. अशा प्रकारच्या प्रतिकाराचें निर्मूलन करणें राजास फार जड जातें. लक्षावधि लोकांना कंठस्नान

---

* 'हरिकिशोर' यवतमाळ १० जून १९०७

वातल्याशिवाय हा प्रतिकार बंद पाडण्याचा दुसरा उपायच नाहीं. पण असा कोणता पाषाणहृदयी राजा आहे कीं, जो आपल्या तरवारीनें आपल्या प्रजेपैकीं लक्षावधि लोकांना गतप्राण करून, त्यांच्या ऊष्ण रक्तप्रवाहांत आनंदानें स्नान करील? पण, या प्रतिकाराची गणना संरक्षक प्रतिकारांत करतां येत नाहीं. तिसरा प्रकार राजसत्तेच्या विरुद्ध उघड बंडाचें निशाण फडकावणें आणि युद्धांत बादशाही सत्तेस चीत करून आपला अम्मल बजावणें हा होय. अगदीं प्राचीन काळापासून जगांतील लोकांना हा मार्ग अवगत आहे, कारण हा मार्ग शीघ्र फलदायी असून त्याचें अवलंबन करण्यांत इतर मार्गांपेक्षां, काटकपणा आणि स्वार्थत्यागहि कमी दर्जाचा लागतो.

परकीय सत्तेचें जूं झुगारून देऊन स्वतंत्र होऊं पाहणाऱ्या देशानें यांपैकीं कोणत्या मार्गाचें अवलंबन करणें श्रेयस्कर आहे, हें ठरविण्यापूर्वी त्यांनीं आपल्या परिस्थितीचें नीट मनन केलें पाहिजे. एका विशेष परिस्थितींत देशास जो मार्ग इष्ट व सोयीस्कर असेल, तो दुसऱ्या परिस्थितींत उलट विघातक होईल. कायद्यांत कांहीं स्वसंरक्षणाकरितां लोकांना हक्क दिला आहे त्यांत असें सांगितलें आहे कीं, आपणावर ज्या माणसांनीं चाल केली असेल त्यांनीं दिलेल्या त्रासाच्या प्रमाणांतच आपण आपल्या संरक्षणाकरितां त्याला इजा दिली पाहिजे. हा जसा व्यक्तीच्या संरक्षणाचा नियम "फौजदारी" कायद्यांत सरकारनें घालून दिला आहे, तोच नियम देशोद्धारांतहि उपयोगी पडतो. हिंदुस्थानच्या परिस्थितीचा विचार केला असतां, येथें पार्नेलनें काढिलेला संरक्षक प्रतिकारच जास्त उपयोगी होईल असें आम्हांस वाटतें. यावरून प्रतिकाराचे इतर मार्ग कुचकामाचे, बेकायदेशीर आणि अनीतीचे आहेत असें आम्ही म्हणत नाहीं. दुसऱ्या देशांतील लोकांना निःशस्त्र करून त्यांना लुबाडण्याकरितांच येऊन राहिलेल्या लोकांनीं स्वोद्धाराचे चाललेले प्रयत्न बेकायदेशीर आणि अनीतीचे आहेत, असें म्हणण्याची जुलमी राजाची फार पुरातन पद्धत आहे. पण एकंदर जगानें या स्वार्थसाधु वल्गनांकडे कानाडोळा केला आहे व लोकांचे प्रयत्न यशस्वी झाल्याबरोबर त्यांचें अभिनंदनच केलें आहे इतकेंच नव्हे तर वरीलप्रमाणें स्वार्थी उद्‌गार काढणाऱ्यांवर जर दुर्दैवाच्या फेऱ्यानें तसा कांहीं दुर्धर प्रसंग ओढवला तर त्या

उद्गारांत गर्भित केलेल्या तत्त्वानुसार वागण्यास ते मुळींच तयार नसतात, याबद्दल इतिहासाचा भरभक्कम पुरावा आहे. ज्या देशांत राजाच्या किंवा राजपक्षाच्या जुलुमामुळें प्रजेची मालमत्ता आणि प्राण यांची सुरक्षितता अजिबात नाहींशी झालेली असते, तेथील लोकांनीं आपली या जाचांतून सुटका करून घेण्याकरितां उघड बंड करणें किंवा गुप्त मंडळ्या स्थापन करून अधिकाऱ्यांचे खून, दंगेधोपे आणि संप यांचा चोहोंकडे देशभर सुळसुळाट करून सोडणें हें अगदीं विहित असतें. अशा वेळीं रक्तपाताच्या भीतीनें गांगरून जाऊन मर्दपणाच्या मार्गापासून च्युत होणें षंढत्वाचें द्योतक समजलें जातें. मग तें राजकृत कायद्यांनीं विहित असो वा नसो. श्रीकृष्ण परमात्मा यांनीं अर्जुनाला कुरुक्षेत्रांत जो उपदेश केला आहे, तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे. "क्षुद्रं हृदयदौर्बल्यम् त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप" हा भगवंतांचा उपदेश परिस्थितीला अनुलक्षूनच केला आहे. पण ज्या देशांतील राजा प्रजाजनाला अशा उघड रीतीनें लुटीत नाहीं, प्रजेचें जीवित आणि वित्त यांचें हरण दिवसाढवळ्या इतक्या निःशंक रीतीनें होत नाहीं, तेथील प्रजेनें संरक्षक प्रतिकाराचें अवलंबन करणें हेंच योग्य होईल. "ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्" हें गीतावाक्य आपण नेहमीं उराशीं बाळगिलें पाहिजे. उघड शत्रूशीं उघड वैर, गुप्त शत्रूशीं गुप्त वैर हाच न्याय या ठिकाणीं लागूं केला पाहिजे. बंड किंवा सशस्त्र प्रतिकार यापेक्षां संरक्षक प्रतिकारांत साहस जरी कमी लागत असलें, तरी त्या गुप्त युद्धांतहि धैर्य आणि स्वार्थत्याग यांची पहिल्या इतकीच आवश्यकता आहे. इतकेंच नव्हे तर काटकपणा आणि कार्यक्षमता हे गुण कांकणभर जास्तच पाहिजेत. बंड किंवा सशस्त्र प्रतिकारांत मूठभर धाडसी माणसें आपल्या साहसानें आणि शारीरिक बलानें जें कार्य अल्प कालांत घडवून आणितात, तेंच कार्य या संरक्षक प्रतिकारानें घडवून आणितांना सर्व देशांतील लोकांना एकदिलानें एकमतानें, व धैर्यानें बराच अधिक वेळपर्यंत झुंजावें लागत असतें.

नवीन पंथानें "संरक्षक प्रतिकाराचेंच" अवलंबन करण्याचें आणखी एक कारण असें आहे कीं, परकीय सत्तेच्या करड्या अमलाखालीं आज कित्येक शतकें भरतखंडांतील कांहीं लोकांनीं घालविल्यामुळें "स्वराज्य"

चालविण्यास लागणारी कर्तृत्वशक्ति, शौर्य, जूट, धैर्य इत्यादि गुणांचा त्यांच्यांत बराच लोप झाला आहे असें म्हटल्यास चालेल. या प्रबल शत्रूशीं झगडण्यास आरंभ करणें हेंच या गुणांचा त्यांच्यांत विकास होण्याचें उत्तम साधन आहे. बंडाचें शिंग फुंकल्यास शत्रूच्या तोफखान्याच्या माऱ्यांत आपलें अस्तित्वहि नाहींसें होईल. तेव्हां ज्या उपायानें आपण एकदम चिरडून न जातां हळुहळू आपलें प्रतिकारसामर्थ्य व स्वातंत्र्यपालता ज्याच्या योगानें वाढत जाईल अशा निःशस्त्र प्रतिकाराचेंच अवलंबन करणें सध्यां हितावह आहे.

एवढी गोष्ट मात्र खरी आहे कीं, संरक्षक प्रतिकाराचा उपयोग करते-वेळीं समाजांत पराकाष्ठेची जूट पाहिजे. प्रजेंत फूट पाडून त्यांना एकेकट्यांना दाबण्याकडे जी सरकारची प्रवृत्ति होत आहे हिचें योग्य निरीक्षण करून आपण आपलें हत्यार परजलें पाहिजे. निःशस्त्र प्रतिकारवाद्यांना लोक जहाल म्हणतात, परंतु खरा जहाल पंथ उत्पन्न होऊं नये, निर्वाणीचा आणि रक्त-पाताचा प्रसंग होतां होईतों टाळावा म्हणून संरक्षक प्रतिकाराचा मार्ग नवीन पक्षानें उचलला आहे. पण आमचे कांहीं दीर्घशहाणे भेकड पुढारी सरकारच्या कच्छपीं लागून नेमस्तपणाचा डांगोरा पिटून जर या नवीन कंपूंत फूट पाडून त्यांपासून निष्पन्न व्हावयाच्या कार्यसिद्धीस विघ्नें आणतील व सरकारहि हल्लींची जुलमी रशियन पद्धति चालू ठेवील तर सरकारला व आमच्या नेम-स्तांना कितीहि अनिष्ट असला तरी खरा सशस्त्र प्रतिकाराचा जहाल पंथ कालांतरानें अस्तित्वांत आल्यावांचून राहणार नाहीं.

---

## लेखांक ६ वा.

मागील लेखांत प्रचलित सत्तेच्या विरुद्ध प्रजेस कोणत्या प्रकारचे प्रति-काराचे मार्ग खुले आहेत, आणि त्यांपैकीं आम्हा हिंदुस्थानवासियांस तूर्त तरी निःशस्त्र प्रतिकाराहून अन्य साधन कसें शक्य नाहीं हें सिद्ध करून दाखविलें. आजच्या लेखांत या संरक्षक प्रतिकारांत कोणत्या कोणत्या गोष्टींचा समावेश होतो, त्यांपैकीं आपणांस किती साध्य आहेत, आणि किती असाध्य आहेत, याचा थोडासा अधिक विचार करावयाचा मानस आहे.

प्रतिकाराच्या ज्या इतर प्रकारांचा उल्लेख मागील लेखांत आला आहे, त्यांत आणि संरक्षक प्रतिकारांत मुख्य भेद असा आहे कीं, इतर मार्गांचें अवलंबन करणाऱ्यांकडून कांहींतरी क्रिया व्हावयाची अपेक्षा असते; परंतु संरक्षक प्रतिकारांत याच्या उलट आपणांकडून होत असलेली क्रिया बंद करण्याची जरूरी असते. सरकारला ज्या गोष्टींनीं आपणांकडून मदत होते, त्या गोष्टी करावयाचें सोडून देणें हें या मार्गाचें मुख्य तत्त्व आहे.

सरकारच्या हिताला विघातक कृति करावयाची हा एकाचा बाणा आहे तर सरकारला हितकर कृति करणें सोडून द्यावयास लावावयाचें हा संरक्षक पक्षाचा मंत्र आहे. अरेरावी सरकारला जेरीस आणून, त्यांना लोकपक्षास योग्य मान द्यावयास लावणें हा एकच उद्देश दोघांचाहि आहे, पण या साध्याच्या प्राप्त्यर्थ दोघांचेहि मार्ग निरनिराळे आहेत. दोघांनाहि एकच गड सर करावयाचा आहे, परंतु हल्ला चढवावयाच्या दोघांच्या दिशा भिन्न आहेत. ज्या देशांत सरकारची राज्यव्यवस्था कांहीं थोडयाशा लोकांच्या प्रत्यक्ष मदतीवर आणि एकंदर जनसमूहाच्या संमतीवर चाललेली असते, तेथील लोकांना ती सत्ता उलथून पाडण्याच्या कामीं संरक्षक प्रतिकारासारखें दुसरें साधन नाहीं. जेणेंकरून सरकारची राज्यव्यवस्था सुरळीत चालेल किंवा परकीय व्यापाऱ्यांना पैसे लुबाडण्यास सोयीस्कर पडेल अशी कोणतीहि गोष्ट करावयाची नाहीं असा लोकांचा निर्धार झाला, तर परकीय लोकांना या भरतभूमींत श्वासोच्छ्वास घेणेंदेखील मुष्कील जाईल. राज्यव्यवस्थेचीं जीं निरनिराळीं खातीं आहेत, त्यांतील काम कसें चालतें हें एकदां पाहिलें म्हणजे या मार्गानें राज्यकर्त्यांस कसें डबघाईस आणतां येईल, याची वाचकांना सहज कल्पना करतां येईल. नाना तऱ्हेचे कर बसवून आणि जमीनधारे कल्पनातीत वाढवून सरकारनें लोकांना अगदीं निःसत्त्व आणि कंगाल करून सोडिलें आहे. त्यामुळें देशांत दुष्काळ आणि प्लेगसारख्या महा भयकर रोगांनीं आपलें कायमचें बिऱ्हाड दिलें आहे. आपली औद्योगिक स्थिति सुधारण्याकरितां काढलेल्या उद्योगधंद्यांना कोणत्याहि प्रकारचें उत्तेजन न देतां, परकीय स्वतंत्र व्यापार--राक्षसीचें त्यांना स्तनपान करावयाला लावून, या अर्भकांना चढाओढरूपी दुःसह

काळकूटानें अकालीं यमसदनास पाठविण्याचें घोरतर पातक प्रत्यहीं सरकार करीत आहे.या स्थितीस जर आपण कंटाळलों असूं तर परदेशी माल विशेषतः विलायती माल घेण्याचें बंद करून इंग्रजी खाडींत जाऊन मिळणाऱ्या द्रव्यौघास मुंबई बंदरावरच अडवून धरिलें पाहिजे. अशा तऱ्हेचा सक्त व्यापारी बहिष्कार जर आपण घातला तर इत्युत्तर विलायती व्यापाऱ्यांकडून हिंदी प्रजेची लूट होणें आपोआप थांबेल. त्याचप्रमाणें सरकारी शाळांतून मिळणारें शिक्षण एकदेशीय, कुचकामाचें आणि शारीरिक, मानसिक आणि नैतिक शक्तीचा ऱ्हास करणारें असल्यामुळें तें जर आपणांला नकोसें झालें असेल, तर आपलीं मुलें त्या शाळांत पाठविण्याचें बंद करणें हाच उत्तम उपाय आहे. हा शिक्षणविषयक बहिष्कार जर सार्वत्रिक झाला, तर लोकशिक्षणाचीं सूत्रें सरकारच्या हातून आपोआप निसटतील. त्याचप्रमाणें न्यायखात्याची व्यवस्था फार असमाधानकारक व मोठया खर्चाची आहे.फौजदारी कायदा हा फाजील खुनशी आहे.लोकांना न्याय मिळण्याची सोय करण्यापेक्षां कोर्ट फी आणि स्टांपाच्या रूपानें लोकांच्या तिजोरींतील पैसे आपल्या खजिन्यांत ओढण्याकरितांच या खात्याची स्थापना झाली आहे. डार्विननें सांगितलेल्या मानवजातीच्या पूर्वजानें मांजराच्या तंटयांत न्याय देतेवेळीं जो खवा गिळण्याचा मार्ग आंखून दिलेला आहे त्या क्षुद्र मार्गापासून रेखामात्रदेखील च्युत न होतां त्याची सुधारून वाढविलेली आवृत्ति त्या पूर्वजाच्या पश्चिमेकडील लाडक्या लेंकरांनीं हिंदुस्थानांत सुरू केली आहे, अशी जर तुमच्या मनाची निःसंशय खात्री झाली असेल, तर असल्या पक्षपाती सरकारतंत्रानुयायी कचेऱ्यांतून आपल्या कज्जांचा निकाल लावून घेण्याची संवय तुम्ही अजिबात सोडून दिली पाहिजे, इतकेंच नव्हे तर अशा तऱ्हेची संवय सोडण्यास तयार नसलेल्या माणसांवर सामाजिक बहिष्कार घालून, काम करण्यास माणसें मिळण्याची टंचाई पाडून न्यायखातें चालविणें केवळ दुर्धर करून सोडिलें पाहिजे. अशाच रीतीनें अंमलखात्यांतील अधिकाऱ्यांकडून जीं जुलमाचीं व अरेरावीचीं अनन्वित कृत्यें होतात त्यांची आपणांला जर चीड आली असेल, तर कोणत्याहि कारणाकरितां या जुलमी अधिकाऱ्यांचे दारोठे ओलांडावयाचे नाहींत असा मनाचा

निश्चय केला पाहिजे. आपल्या सार्वजनिक चळवळींत त्यांना हात घालावयालाच सांपडणार नाहीं, निदान आपण होऊन तरी त्यांना हात घालूं देतां कामा नये, इतकी जय्यत तयारी आपणांस केली पाहिजे. अशा तऱ्हेची मनोवृत्ति तयार झाली व लोकांनीं या अडवणुकीच्या मार्गाचें अवलंबन केलें, म्हणजे एक क्षणभर देखील परकीय सरकाराला राज्य करणें कठीण जाईल हें उघड आहे. कदाचित् कांहीं युरेशियन्, निमगोरे, मिश्रबीज किंवा खिस्ती विदूर आणि देशद्रोही आर्यपुत्र अशा प्रसंगीं कोसळून खालीं येऊं पाहणाऱ्या सत्ता-मंदिरास हात देण्याकरितां पुढें सरसावतील; पण लोक-क्षोभाच्या प्रदीप्त वणव्यांत ते एका क्षणांत जळून खाक होऊन जातील.

नवीन पंथ लोकांना कंठरवानें ज्या संरक्षक प्रतिकाराचें अवलंबन करण्याचा उपदेश करीत आहे, त्याचें स्वरूप सामान्यतः वरीलप्रमाणें आहे.वरील विवेचनावरून वाचकांस सहज दिसून येईल कीं, संरक्षक प्रतिकार आणि स्वावलंबनाचा मार्ग हे परस्परपोषक, परस्परसहाय्यक आहेत. परकीय मालास बहिष्कार घातल्यामुळें उत्पन्न झालेल्या गरजा पुरविण्याकरितां स्वदेशी चळवळीची व उद्योगधंद्याची वाढ देशांतून झपाट्यानें झालीच पाहिजे. सरकारी शाळांतून काढून टाकलेल्या मुलांच्या शिक्षणाची सोय करण्याकरितां राष्ट्रीयशाळा आणि विद्यापीठें यांची स्थापना करण्याची गोष्ट केवळ क्रमप्राप्त आहे. आपले तंटे-बखेडे सरकारी कोर्टांतून निकालाकरितां न्यावयाचे नसले, तर ग्रामपंचायतीचें पुनरुज्जीवन केल्यावांचून मग गत्यंतर नाहीं, त्याचप्रमाणें कोणत्याहि कारणानें अधिकाऱ्यांचें तोंड पाहावयाचें नाहीं, पोलीसची मदत घ्यावयाची नाहीं असा कृतसंकल्प झाल्यावर चोर, दरवडेखोर व इतर हलकट लोक यांच्या निंद्यकर्मांनीं आणि कुटिल कारस्थानांनीं समाजाच्या शांततेंत भंग होऊं नये, लोकांची मालमत्ता सुरक्षित राहावी, त्यांच्या जिवास किंवा शरीरास अपाय होऊं नये म्हणून स्वसंरक्षणाकरितां एक स्वयंसेवक लोकांची सेना तयार केल्यावांचून आपला निभाव लागावयाचा नाहीं. इतका सर्व खटाटोप केवळ एखादी क्षुल्लक सुधारणा सरकारनें घडवून आणिल्याबरोबर सोडून देणें निव्वळ मूर्खपणा होणार आहे. ज्या सत्तेच्या जोरावर सरकार आपणांस दिवसेंदिवस अधिकाधिकच खालीं खालीं चेपीत नेत आहे, ती

सत्ता आपल्या हातांत आल्याशिवाय हें संरक्षक प्रतिकाराचें शस्त्र खालीं ठेवितां यावयाचें नाहीं. हें प्रतिकाराचें कवच अंगांत आहे तोंवर, आपण काळासहि भारी आहों, पण तलखी जास्त झाल्यामुळें, किंवा ओझें असह्य झाल्यामुळें, किंवा एखाद्या क्षुल्लक आमिषास बळी पडून थोडीशी वेदना सहन न करितां आपण किंचित् विश्रांतीकरितां थोडा वेळ तें काढून ठेवूं तर लघुशंकेच्या वेळीं खालीं ठेविलेलें शिवलिंग रावणाला जसें पुन्हा उचलतां आलें नाहीं, तद्वत् आपली स्थिति होईल व आपला भावी स्वातंत्र्याचा वृक्ष बीजस्थितींतच करपून जाईल.

सरकारच्या राज्यव्यवस्थेला कोणत्याहि प्रकारची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत करण्याचें नाकबूल करणें एवढया गोष्टीनेंच संरक्षक प्रतिकाराचें सर्व क्षेत्र आच्छादित होत नाहीं. संरक्षक प्रतिकाराची व्याप्ति वरील साधनापेक्षां जास्त विस्तृत आहे. युरोपांतील लोक जेव्हां या मार्गाचें अवलंबन करतात, तेव्हां ते सरकारला कर द्यावयाचेंच एकदम बंद करतात. सर्व राज्यव्यवस्थेचें जीवन लोकांकडून वसूल होणारा कर, हें होय. हा झरा आटवून टाकला, तर त्याच्या कालव्यावर आणि घाटांवरील पाण्यावर वाढविलेला नयनाल्हादक राज्योद्यान, लोकक्षोभाच्या तीव्र तापानें वाळून जातो. युरोपियन लोकांच्या लक्षांत राज्यनीतीचें हें तत्त्व चांगलें उतरलें असल्यामुळें, त्यांच्याशीं आणि राज्यकर्त्यांशीं जेव्हां एखाद्या विशेष कारणामुळें झुंज लागते, तेव्हां ते संरक्षक प्रतिकारांत समाविष्ट झालेल्या इतर बाबींकडे ढुंकूनदेखील न पाहतां, सरकारी खजिना कोरडा ठणठणीत पाडून, अधिकारी सत्तेच्या पोटासच चिमटा घेतात. अनिष्ट राजसत्तेच्या विरुद्ध लोकमताचें प्रदर्शन करण्याचा सर्वांत तीव्र मार्ग बंड करणें हा आहे व त्याच्या खालोखाल कर देण्याचें नाकारणें ही गोष्ट होय. एकदां संरक्षक प्रतिकाराचा अंगिकार केला म्हणजे कर न देणें ही गोष्ट कशी ओघास येते हें लहानशा उदाहरणावरून सिद्ध करून दाखवितां येईल. अशी कल्पना करा कीं, संरक्षक प्रतिकारांतील कलमान्वयें लोकांनीं आपलीं मुलें सरकारी शाळांतून काढून घेतलीं व राष्ट्रीय-शाळा काढून त्यांच्या शिक्षणाची सोय केली. अशा लोकांना सरकारी शाळांचा तादृश उपयोग नसतांनादेखील शाळापट्टी ही द्यावी लागतेच

च याशिवाय राष्ट्रीय शाळांच्या शिक्षणाचा बोजाहि यांच्याच डोक्यावर असतो. अशा स्थितींत दारिद्र्यानें गांजलेल्या लोकांना हा दुप्पट खर्चाचा बोजा सहन न झाल्यामुळें कोणतातरी एक बोजा खालीं उतरून ठेवणें भाग पडतें, व उत्क्रांति तत्त्वांतील उत्तमावशेषाचे ( Survival of the fittest) न्यायानुसार राष्ट्रीय शिक्षणाचा बोजा कायम ठेवून अनवश्य अशी सरकारी शाळापट्टी न देण्याकडे त्यांची प्रवृत्ति स्वाभाविक होते. गेल्या कॉन्सर्व्हेटिव पार्लमेंटानें जेव्हां शिक्षणसंबंधीं बिल पुढें आणिलें आणि पसार करून घेतलें, तेव्हां इंग्लंडमधील लोकांनीं शिक्षणसंबंधीं कर द्यावयाचें अजिबात बंद केलें. पार्नेलनें आयर्लंडांत सुरू केलेल्या चळवळीचा "जमिनीवरील सारा द्यावयाचा नाहीं;" हा बीजमंत्र होता. सार्वभौम कायदे करणाऱ्या पार्लमेंटांत ज्याअर्थीं आपला प्रतिनिधि घ्यावयास इंग्रजसरकार तयार नाहीं, त्याअर्थीं पार्लमेंटनें बसविलेले कर आम्ही देत नाहीं असा खणखणीत उलट जबाब अमेरिकेनें इंग्लंडच्या विरुद्ध युद्धाला सुरुवात करण्यापूर्वीं निर्वाणीचा निरोप म्हणून पाठविला होता. युक्तिवादाचें हत्यार बोथट झालें म्हणजे कर देण्याचें बंद करणें हाच मार्ग जास्त श्रेयस्कर असतो, असें जगाच्या इतिहासावरून दिसतें.

करदाननिषेधाची मात्रा इतकी जाज्वल्य, तीव्र, शीघ्रफलदायी आणि रामबाण असून हिंदुस्थानांतील लोकांनीं तूर्त अंगिकारावयाच्या संरक्षक प्रतिकारौषधीचें जें सामान्य स्वरूप वर निरूपण केलें आहे, त्यांत तिचा मुळींच नामनिर्देश केला नाहीं, याचें कारण काय ? अशी वाचकांस साहजिक शंका येईल. त्यावर असें उत्तर आहे कीं, एखादी महौषधि विवक्षित रोगावर अनुभवसिद्ध रामबाण असली, तरी तो रोग झालेल्या प्रत्येक व्यक्तीस तिचे वळसे उगाळून देणें नेहमीं हितावहच होतें असा कांहीं नियम नाहीं. दिव्यौषधीचें सेवन करणाऱ्याला तिची उष्णता सहन करण्याचें सामर्थ्य नसलें, तर त्या व्यक्तीचा मूळ रोग कदाचित् नाहींसा होईल, पण त्याहीपेक्षां भयंकर असा दुसराच असाध्य आजार उद्भवण्याचा संभव असतो. करदाननिषेधाची मात्रा अनुभवसिद्ध गुणकारी तर खरीच, पण ती लागू होण्यापूर्वीं समाजाची जी एक विशेष प्रकारची तयारी पाहिजे, ती आपल्या

देशाची आहे कीं नाहीं याचा पूर्ण विचार झाला पाहिजे. ज्या ठिकाणीं तिचा 'हटकून' गुण आला, त्या देशांची परिस्थिति आमच्या परिस्थितीहून थोडी निराळी होती. आयर्लंडमध्यें जेव्हां या चळवळीनें उचल खाल्ली होती, तेव्हां लोकांनीं सरकारनें बसविलेले कर देण्याचें बंद न करितां प्रजेला निःसत्त्व करण्याकरितां ज्या जमीनदारांच्या वर्गास सरकारनें हातांत धरिलें होतें, त्या जमीनदारांना सारा देण्याचें साफ नाकारिलें. हिंदुस्थानांत बंगालप्रांत व वऱ्हाड आणि मध्यप्रांत यांतील थोडा भागखेरीज सर्व जमीन खालसा असल्यामुळें, सरकार जमिनीचे प्रत्यक्ष मालक आहेत. बंगाल्यांत जरी जमीनदारांचा वर्ग, सरकार आणि कूळ यांच्या दरम्यान आहे, तरी हा वर्ग लोकहितास निरंतर जपणारा आहे, व सरकारच्या रोषास सामान्य प्रजा आणि जमीनदार हे सारखेच पात्र आहेत. अर्थात् सारा देणें तहकूब केल्यापासून सरकारचें कांहींएक नुकसान न होतां आपल्या हितचिंतक जमीनदारांना मात्र आपण ठार बुडवूं. लोकांनीं जमिनीचा सारा सरकारला देण्याचें नाकारण्याचा दाखला आयर्लंडाच्या इतिहासांत मिळत नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांनीं जमिनीवरील शेतसारा न देणें म्हणजे सरकारी कर न देण्यासारखेंच आहे. मागील भागांत जें संरक्षक प्रतिकाराचें स्वरूप वर्णन केलें आहे, त्याचें मुख्य धोरण असें आहे कीं, अंगीं योग्य सामर्थ्य आल्याशिवाय कायद्याचें उल्लंघन करूं नये व विनाकारण अतिप्रसंग ओढवून घेऊन रुजूं घातलेलें बीं, मोड येण्यापूर्वीच चेंगरलें जाऊं नये. विलायती माल न वापरतां देशी माल वापरल्याबद्दल, सरकारी शाळांतून मुलांना न शिकवितां राष्ट्रीय शाळांत घातल्याबद्दल व कोर्टांतून महाग न्याय विकत घेण्याऐवजीं आपसांत तंट्याचा निकाल लावण्याबद्दल, कोणासहि कायदेशीर रीतीनें शिक्षा होणें शक्य नाहीं. याबाबतींत सरकार ढवळाढवळ करील, तर तें आपण होऊन लोकांना बेकायदेशीर मार्गाचें आक्रमण करण्यास उत्तेजित करीत आहेत असाच त्याचा अर्थ होईल व त्याचा परिणाम काय होईल हें सांगणें आज कठीण आहे. करदाननिषेधानें कायद्याचें उघड उल्लंघन होत असतें, इतकेंच नव्हे तर सरकारला तें युद्धास आव्हान आहे. आज आपली ही तयारी आहे काय ? नसेल तर कायद्याची मर्यादा न ओलांडतां कांहीं काळपर्यंत संरक्षक प्रतिकाराच्या इतर मार्गांनींच सरकारला जेरीस आणण्याचा आपण जारीनें प्रयत्न केला पाहिजे.

इंग्लंडांत मागील कान्सर्व्हेटिव्ह पार्लमेंटनें लोकमताविरुद्ध जेव्हां शिक्षणाचा कायदा पसार करून घेतला, तेव्हां लोकांनीं शाळापट्टी द्यावयाचें उघडउघड नाकारिलें. पण इंग्लंडमधील स्थिति व हिंदुस्थान यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. त्यांत लोकांचा उद्देश सरकारच्या नाकीं नव आणण्याचा नसून कॉन्सर्व्हेटिव्ह प्रधान-मंडळाविरुद्ध लोकमत तयार करून, मतदारांच्या साह्यानें त्यांना पदच्युत करून त्यांच्याजागीं लिबरल प्रधान-मंडळाची स्थापना करावी हा होता. तेथें सामान्य लोकांना पार्लमेंटसभेंत सभासद निवडून देण्याचा हक्क असल्यामुळें, आणि देशाच्या सर्व राजसत्तेचीं सूत्रें पार्लमेंटच्या ताब्यांत असल्यामुळें, करदाननिषेधापासून हिंदुस्थानांत जे परिणाम होतील, त्यांचा इंग्लंडांत बिलकूल संबंध नाहीं, म्हणून हेंहि उदाहरण आपणांस फारसें उपयोगी नाहीं. अमेरिकन लोकांची स्थिति व आमची स्थिति यांत बरेंच साहश्य आहे. आमच्याप्रमाणें तेहि परकीय सत्तेच्या वरवंटयाखालीं चिरडले जात होते; तथापि स्थानिक बाबतींत आमच्यापेक्षां त्यांना पुष्कळच अधिक स्वातंत्र्य होतें. त्यामुळें अमेरिकेनें इंग्लंडवर घातलेल्या बहिष्काराची व्याप्ति आमच्याइतकी विस्तृत करण्याचें कारण नव्हतें. राष्ट्रीयत्वाचे गुण विकसित करण्याचा त्यांना निराळा प्रयत्न करावा लागला नाहीं. फक्त इंग्रजी मालावर बहिष्कार घातला व तो अत्यंत कडकडीत रीतीनें पाळला, व त्यापुढें एक पायरी जाण्याची त्यांना आवश्यकता प्राप्त झाली. स्वतःचा प्रतिनिधि नाहीं तर करहि द्यावयाचे नाहींत, असा स्पष्ट ठराव त्यांनीं राष्ट्रासमोर मांडिला व या ठरावाबरोबर जें काहूर उठणार होतें त्याची त्यांनीं कडेकोट तयारी करून ठेविली होती व अखेरीस त्यांनीं इंग्रजांशीं दोन हात करून शत्रूच्या प्रेतासनावर विराजमान झालेल्या स्वातंत्र्यदेवीचें दर्शन घेऊन तिची प्राणप्रतिष्ठा संयुक्त संस्थानांत कशी केली इत्यादि कथाभाग इतिहासज्ञांस विदितच आहे. आज आपली तशी कांहींच तयारी नसतां, करदाननिषेधाचा मार्ग पत्करून एवढ्या थरावर गोष्ट आणणें ही मुत्सद्देगिरी होणार नाहीं. करदाननिषेधाच्या तत्त्वाचा उघड अंगिकार केल्याबरोबर ज्या घनघोर संग्रामास आरंभ होईल त्यांतून यशस्वी व्हावयाचें असेल तर सर्व देशांतून राजकीय संस्थांचें

मोठें जाळें पसरून दिलें पाहिजे व एक गांव दुसऱ्या गांवाशीं व एक प्रांत दुसऱ्या प्रांताशीं, या संस्थांच्या दुव्यामुळें घट्ट जोडले गेले पाहिजेत, व या सर्व संस्थांना बाहुल्याप्रमाणें नाचविणारी केंद्रोपवर्ति मुख्य संस्था निर्माण केली पाहिजे. सार्वभौम इंग्रजसरकारशीं बरोबरीच्या नात्यानें रणांगणांत अशी संस्थाच काय ती टिकाव धरूं शकेल. ती अजून निर्माण व्हावयाची आहे. तेथपर्यंत सरकारशीं आपणांस जितकें तुटक आणि विलग राहतां येईल तितकें राहिलें पाहिजे. क्रमाक्रमानें बहिष्काराचें क्षेत्र वाढविलें पाहिजे. तुमुलयुद्धाचें आव्हान आपण होऊन न देतां, तें सरकारकडून नीति आणि युक्ति यांस सोडून वागण्यानें मिळणार आहे, अशी मनाची खात्री बाळगून "प्रतिनिधि नाहीं तर कर नाहीं ( No representation, no taxation ) या तत्त्वाचा अंगिकार न करतां, राजसत्तेंत प्रवेश नाहीं, तर आमचें सहाय्यहि मिळत नाहीं ( No control, no assistance ) हें आपलें ब्रीदवाक्य केलें पाहिजे.

---

# गणपति देवता*

गजाननाची पूजाअर्चा आज हजारों वर्षांपासून भरतखंडांत प्रचलित आहे. ही देवता अर्वाचीन आहे, वैदिक नव्हे, म्हणून आर्य लोकांच्या पूज्यतेस ती पात्र नाहीं असें मत प्रतिपादन करणारा पक्ष या १९ व्या किंवा २० व्या शतकांतच उत्पन्न झाला नसून यापूर्वीं कित्येक शतकें वरील मताचे लोक अवतीर्ण झाले आहेत व त्यांचें समाधान करण्याकरितां पूर्वाचार्यांनीं गणपति देवतेचें वैदिकत्व प्रस्थापितहि केलेलें आहे. वेदांतील कित्येक मंत्रांतून गण-पति हा शब्द वाचण्यांत येतो; तेव्हां निदान गणपति ही देवता प्राचीन वैदिक आर्यांना अपरिचित नव्हती. परंतु हल्लीं ज्या विशेष तऱ्हेची देवता गणपति या नांवानें पूज्य समजली जाते, त्या तऱ्हेची देवता वेदांतील मंत्रांत उद्दिष्ट आहे कीं नाहीं, असा प्रश्न शिल्लकेंत राहतो. या प्रश्नाचें उत्तर देण्या-पूर्वीं, देवताविषयींचा विचार व त्यांचें स्वरूप, कोणकोणत्या तत्त्वांनीं आमच्या प्राचीन आर्यांनीं बनविलें आहे, याचा थोडासा विचार करणें जरूर आहे.

जुन्या आचार्यांच्या मतें प्रत्येक देवतेचें स्वरूप दुहेरी असतें. एक प्रज्ञा-चक्षुगम्य व दुसरें चर्मचक्षुगम्य. पहिलें स्वरूप सिद्धांच्या विचारांचा विषय असतो व दुसरें साधकांच्या उपासनेचा विषय असतो. पहिलें स्वरूप म्हणजे जगत्कल्याणाकरितां अवश्य असे जे गुण मानवांत असावे लागतात, त्यांतील कांहीं गुणांचा समुच्चय एखाद्या देवतेच्या ठिकाणीं कल्पिलेला असतो. अर्थात्, ज्या ज्या काळीं ज्या ज्या गुणांची अपेक्षा समाजांतील विचारी लोकांना, समाजाच्या उन्नतीकरितां वाटत असते, त्या त्या काळीं तद्गुण-विशिष्ट अशी देवता विचारी लोकांच्या मननाचा विषय होते, व परमेश्वराचें वर्णन त्यांच्या मुखांतून तशा विशेष तऱ्हेनेंच केलें जातें.

परंतु अशा विशिष्ट गुणसंपन्न देवतेचें ध्यान यमनियमादि साधनांनीं युक्त अशा सत्पुरुषासच केवळ सुकर असल्यामुळें, सामान्य जनांच्या समोर काल-कल्पित सद्गुणांचें ध्येय शाश्वत ठेवण्याकरितां व त्या गुणांची वाढ त्यांच्यांत

*सन १९१४ सालीं श्री. अणे यानीं लिहिलेला अप्रकाशित लेख

होण्याकरितां वरील गुणसमुच्चय ज्यांत कल्पिलेला आहे, अशी प्रतिमा करून तिची उपासना समाजाकडून विचारी व समर्थ करून घेतात. ज्या गुणांची समाजाला अपेक्षा किंवा अत्यंत जरूर असते, त्याच गुणांचा अध्यारोप या देवतेवर केला असल्यामुळें, या देवतेच्या उपासनेबरोबर क्रमाक्रमानें त्या गुणांचाहि विकास समाजांत व्हावयास लागतो, व तो विकास पूर्ण स्थितींत आला म्हणजे समाजाचें किंवा राष्ट्राचें इष्ट कार्य सिद्ध होतें.

तथापि वरील गुणांचा अध्यारोप जीवर केला आहे,अशी मूर्ति बनविण्याचें व ती समाजांतील सर्व व्यक्तींच्या पूज्यतेस पात्र करण्याचें काम फार कठिण असतें. विचारी पुरुषाची सर्व बुद्धिमत्ता येथेंच दृष्टीस पडते. कारण अशा प्रसंगीं त्याला बऱ्याच गोष्टींचीं धोरणें सांभाळावीं लागतात. प्रथमत: ज्या समाजांतील लोकांसमोर ही मूर्ति ठेवावयाची, त्यांच्या पूर्व—कल्पनांशीं व पूर्वाचाराशीं ती मुळींच विसंगत नसली पाहिजे. इतकेंच नव्हे तर, त्यांना ज्या वस्तू किंवा कल्पना गंभीर व उदात्त वाटत असतील, त्या सर्व त्या मूर्तींत समाविष्ट झाल्या पाहिजेत. याशिवाय जे नवीन विचार किंवा जी नवीन शक्ति समाजांत जागृत व्हावयाला पाहिजे, तिचा संकेत त्या लोकांना समजेल अशा तऱ्हेनें या नवीन देवमूर्तींत असला पाहिजे. या दोन तत्त्वांवर ज्या देवमूर्तीची रचना झाली नसेल, असली कोणतीहि कल्पना देवत्वास पोहोंचत नाहीं व समाजाच्या आदरास पात्र होत नाहीं. म्हणूनच अर्वाचीन शास्त्रीय शोधक एखादी मूर्ति दृष्टीस पडली म्हणजे तिच्या हातांतील आयुधें, अंगावरील भूषणें, ती ज्यावर आरूढ झाली असेल तें वाहन, तिची शरीराची ठेवण वगैरे अवांतर गोष्टींचा फार बारकाईनें अभ्यास करतात, व ही मूर्ति अमुक काळांतील असावी असा तर्क बांधतात. सर्वदा जरी त्यांचीं अनुमानें बिनचूक येत नसलीं, तरी बऱ्याच वेळां तीं खरीं ठरलीं आहेत. एवढीच गोष्ट अशा तऱ्हेच्या अभ्यासपद्धतीचा गौरव करण्यास पुरेशी आहे.

ही अभ्यासपद्धति विशेषेंकरून भरतखंडांतील विद्वानांनीं स्वीकारिली पाहिजे. जगांतील सर्वांत पुरातन राष्ट्र भरतखंड आहे, म्हणूनच जगांत उठलेल्या सर्व वावटळींतील झंझावातांचे तडाखे जुनाट वृक्षाप्रमाणें त्यानें सहन केले आहेत. या वावटळीच्या वेगांत हजारों राष्ट्रें उदयास आलीं व

नाहींशी झाली, परंतु भरतखंडांतील लोक, त्यांचा धर्म, त्यांची संस्कृति हीं कैलासशिखराप्रमाणेंच अजून स्थिर आहेत. परंतु एवढालीं मोठालीं तुफानें निरनिराळ्या दिशांकडून येऊन गेल्यामुळें भरतखंडेतर लोकांच्या कल्पनाहि त्या तुफानांबरोबर आल्या, व ज्या टिकाऊ व संग्राह्य होत्या त्यांनीं भारत–धर्माच्या शरीरांत, कोणत्या ना कोणत्या स्वरूपानें कायमचें ठाणें दिलें आहे. मूळ वैदिक आर्यांच्या कल्पना व आचार काय होते, यांचा ऋग्वेद हा आदर्श आहे. यांत गंगायमुनांच्या कांठीं यज्ञयागादिक करणाऱ्या आपल्या महानुभाव तपस्वी पूर्वजांचें प्रतिबिंब स्पष्ट पाहावयाला मिळतें. परंतु त्याचबरोबर आपल्याला असेंहि आढळून येईल कीं, त्या ऋषींचे आचार-विचार, त्यांच्या धार्मिक कल्पना यांचा ठसा जरी आपल्या सर्व प्रचलित व्यवहारांवर स्पष्ट उमटला आहे, तरी कांहीं कांहीं ठिकाणीं तो पुसट झालेला आहे. त्यांच्यांत पूर्वींचें तेज किंवा ओज राहिलें नाहीं व इतर कांहीं गोष्टी तर अगदींच नवीन अशा आहेत. त्यांचा पूर्व ऋषींना मुळींच परिचय नव्हता. तेव्हां आपला इतिहास लिहिणाराला आम्ही पूर्वीं कसे होतों, हें सांगतांना ऋग्वेदादि श्रौत ग्रंथांचें साह्य मिळतें. आम्हाला हल्लींची स्थिति कशी प्राप्त झाली, हें दाखविण्याला त्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. जिला ऐतिहासिक–पद्धति हें नांव देण्यांत येतें, त्या दृष्टीनें जर वेदकालापासून आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचा अभ्यास केला, तर आमच्या मध्यंतरींच्या इतिहासावर चांगलाच प्रकाश पडेल. परंतु तो अभ्यास करणारे विद्यार्थी हेहि हिंदूच पाहिजेत, परके नकोत. ज्याप्रमाणें भागीरथीचा प्रवाह, कैलास शिखरावरील हिमशिलांत प्रथम उत्पन्न झाला, व पुढें निरनिराळीं वळणें घेऊन, व भिन्नभिन्न प्रवाहांच्या संकरानें क्रमानें विस्तृत होऊन, शेवटीं कपिलमुनींच्या तपश्चर्येनें पुनीत झालेल्या सुंदर वनांत सागराशीं एकरूप झाला, तशीच स्थिति कांहीं अंशीं या आमच्या हिंदुधर्माची झालेली आहे. उत्तर ध्रुवावरील तपस्वी ऋषींच्या मुखांतून प्रगट झालेला हा प्रवाह निरनिराळ्या भूमींतून संचार करीत करीत अखेरास भरतभूमींत येऊन स्थिर झाला, व या आपल्या दीर्घ प्रवासांत लक्षावधि रानटी व प्राथमिक स्थितींत असलेल्या लोकांच्या असंस्कृत आचार-

विचारांचें, त्याचप्रमाणें भौतिक सुखाच्या मार्गे लागलेल्या व स्वतःस सुधारलेलें समजणाऱ्या राष्ट्रांत धर्माच्या नांवाखालीं मोडणाऱ्या मार्गांचें शोधन करण्याचें काम त्यानें कमींतकमी दहा हजार वर्षेपर्यंत केलें आहे. त्यामुळेंच या धर्मांत विलक्षण वैचित्र्य व व्यापकत्व आलें आहे. अनेक प्रवाहांचा भागीरथीशीं संकर झाला असतां, तिच्या शुद्धोदकांत निरनिराळ्या भूमींतील द्रव्यें मिसळलीं असतांहि ज्याप्रमाणें तिचें मूलस्वरूप व तिचा प्रभाव नाहींसा झाला नाहीं, त्याचप्रमाणें हिंदुधर्मांत इतर लोकांच्या शेंकडो कल्पना शिरल्या असल्या, तरी त्यांचा या भागीरथींत प्रवेश होतांच, त्या सर्व हिंदुमय बनल्या, हीच हिंदुधर्माची थोरवी आहे. या धर्माच्या या संग्रहत्वामुळेंच व " दुसऱ्यास तत्काळ आपल्यासारखें करण्याच्या " प्रवृत्तीमुळेंच हिंदुधर्माची व्याख्या करण्याचें काम मोठें दुर्घट झालें आहे. सूतादिक पौराणिक व मन्वादिक स्मृतिकार यांनीं या धर्माची मोठी सेवा केली ती हीच कीं, आर्यसंस्कृतींत प्रवेश झालेल्या लोकांना त्यांच्या पूर्वस्वरूपाची स्मृति राहूं नये; आपण आर्य आहोंत, आपणां सर्वांचा धर्म एक आहे, व अनादिकालापासून आपण याच धर्माचे व याच संस्कृतीचे दास आहोंत, अशी भावना आज जी आसेतुहिमाचल दृष्टीस पडते, तिचें खरें श्रेय स्मृतिकारांकडे व पौराणिकांकडे आहे. कित्येक हजार वर्षे त्यांनीं हें एकीकरणाचें, हें समष्टीचें कार्य बिनबोभाट व शांतपणानें चालविलें व अखिल भरतखंडास आर्यावर्त बनवून सोडिलें. या त्यांच्या महनीय कामगिरीची ज्यांना ओळख पटत नाहीं असे कांहीं अल्पदृष्टि पंडितमन्य आज हयात आहेत. परंतु त्यांची व त्यांच्या अज्ञानाची नुसती कींव करण्यापलीकडे त्यांचा जास्त उल्लेख करणें म्हणजे काळाचा अपव्यय होय.

हा समष्टीचा काळ आतां संपत आला असून व्यष्टीच्या युगास सुरवात झाली आहे. इंग्रजी परिभाषा वापरून लिहावयाचें असल्यास Synthesis चे दिवस जाऊन Analysis चे दिवस आले आहेत, असें म्हणावें लागेल. या व्यष्टीचीहि पण तितकीच जरूरी आहे. मनुष्याला परमेश्वरानें देह दिल्यानंतर तो सुदृढ व्हावा, त्याला रोगराई होऊं नये अथवा झाल्यास त्याचा प्रतिकार करतां यावा, म्हणून ज्याप्रमाणें शरीराची अंतर्गत रचना

समजून घेणें जरूर असतें, त्याशिवाय रोगप्रतिबंधक किंवा रोगनिवारक उपायांची योजना करणें अशक्य होईल, त्याचप्रमाणें या हिंदुधर्माच्या विराट शरीरांत ज्या निरनिराळ्या आचारविचारांची व देवतांची स्थापना करण्यांत आली आहे व त्या सर्वांची क्रिया समतोल व एकसारखी चालण्याकरितां वेदांतशास्त्राची प्राणस्थानीं प्रतिष्ठा करण्यांत आली आहे, त्या शरीरावर हल्लीं हळूहळू आघात व्हावयाला आरंभ झाला आहे. तेव्हां अशा प्रसंगीं या विराट पुरुषाच्या शरीरांतील सर्व क्रियाधिष्ठात्री देवतांच्या स्वरूपांची पृथक् पृथक् मीमांसा होणें हें अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय यांतील मर्मस्थान कोणतें व दुसऱ्याच्या हल्ल्यापासून कोणत्या भागाचें रक्षण करणें अत्यंत जरुरीचें आहे हें ज्ञानच होणार नाहीं.

आपल्या गणपतीची योजना या पुरुषाच्या बुद्धिस्थानाच्या ठिकाणीं झालेली आहे व वाणीच्या ठिकाणीं सरस्वतीची प्रतिष्ठा आहे. गणपती-संबंधानें वेदांमधून, भारत व रामायण या राष्ट्रग्रंथांतून, इतर अष्टादश पुराणांतून, स्मृतींतून किंवा सामान्य स्तोत्रांतून जें वर्णन येतें त्याचा सारांश थोडक्यांत असा आहेः—

गणपति हा शंकरपार्वती यांचा मुलगा आहे. षडानन कार्तिकेय नांवाचा यास एक बंधु आहे. याचें मस्तक हत्तीचें असून, एक दांत तुटलेला आहे. तो विघ्नहर्ता आहे व प्रत्येक मंगलकार्याला तत्स्मरणपूर्वक आरंभ केला नाहीं, तर तें कार्य शेवटास जाणार नाहीं. याच्या मस्तकावर चंद्र आहे, म्हणून याला भालचंद्र असेंहि एक नांव आहे. सर्व विद्या याला अवगत आहेत, किंबहुना चौदा विद्या व चौसष्ट कला या याच्या पत्नी आहेत. मूषक हें याचें वाहन आहे व याला मोदक फार आवडतात. पूजासामुग्रींत दूर्वा आणि शमी याला अत्यंत प्रिय आहेत. गणपति ही शीघ्र प्रसन्न होणारी देवता आहे.

गुणदृष्टीनेंच या देवतेकडे पाहिलें असतां बुद्धिदान आणि विघ्नहरण हे विशेष गुण या देवतेंत आहेत असें आपणांस स्पष्ट दिसून येतें. ऋग्वेदां-तील दुसऱ्या मंडलांतील २३ वें सूक्त असें आहेः—

" गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपश्रवस्यमम् । ज्येष्ठ राजं ब्रह्मणाम् ब्रह्मणस्पतिं आनः श्रृण्वन्नुतिभिः सीदसादनम् "

हें सूक्त बृहस्पति देवतेला उद्देशून आहे व बृहस्पतीलाच गणपति आणि ब्रह्मणस्पति अशीं विशेषणें दिलीं आहेत. बृहस्पति हा देवांचा पुरोहित व मुख्यमंत्रि आहे. देवांवर संकटें आलीं असतां, त्यांतून निभावण्याची युक्ति सुचविणारा बृहस्पतीच आहे. प्रसंगविशेषीं बृहस्पतीनें नास्तिकशास्त्रदेखील निर्माण केल्याची कथा हरिवंशांत आली आहे. त्वष्टयानें अखिल विश्वांतील तत्त्वें एकत्र करून बृहस्पतीला निर्माण केलें व त्वष्टयानें त्याच्या हातांतील परशूची धारा तीक्ष्ण केली, असाहि उल्लेख ऋग्वेदांत आहे. शुक्ल यजुर्वेदांत गणपतीलाच तूं निधिपति आहेस, कविपति आहेस, आणि प्रियपति आहेस असें म्हटलें आहे. यावरून याकाळीं गणपति ही पृथक् देवता समजण्यांत येत होती असें दिसतें. "गणानां त्वा गणपतिं" या मंत्रांतील 'गण' शब्दाचा अर्थ काय, हें पाहणें जरूर आहे. अलीकडे, वेदांचीं जीं भाषांतरें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांत गण म्हणजे समुदाय, जनसंघ असाच अर्थ दिला आहे. परंतु हें सूक्त बृहस्पतीला उद्देशून आहे, ही गोष्ट लक्षांत घेतली, म्हणजे गण शब्दाचा मनुष्यसमुदाय असा अर्थ करणें ठीक नाहीं असें मला वाटतें. गणपति व बृहस्पति हे एकच आहेत, ही गोष्ट " गणानां त्वा गणपतिं हवामहे इति ब्राह्मणस्पत्यं, ब्रह्मवै-बृहस्पतिर्ब्रम्हणैवैनं तद्भिषिज्यति " या ऐतरेय ब्राह्मणांतील वचनावरून स्पष्ट आहे. परंतु बृहस्पति हा जनसमुदायाचा नेता आहे असा कोठेंच उल्लेख नाहीं. तूं कवींत श्रेष्ठ आहेस, तूं गणांत श्रेष्ठ आहेस, एवढेंच सूक्तकार म्हणतो. पुढें एके ठिकाणीं बृहस्पतीला " सर्व गण " असें विशेषण दिलेलें आहे. तेथें त्याची व्युत्पत्ति निरुक्तकार यास्काचार्यांनीं 'गणो गणनात्' अशी दिली आहे. निघंटूत गण शब्द वाणीवाचक शब्दगणांत घातला आहे, तेव्हां गण हा शब्द मनुष्यवाचक नसून वाणिवाचक आहे, हें उघड आहे. वेदांतील शब्दांचें निरनिराळ्या दृष्टीनें वर्गीकरण करण्याचा क्रम सुरू झाला व या प्रत्येक शब्दसमूहास गण अशी संज्ञा होती. यास्काचार्यांचा निघंटु हा नुसता गणसंग्रह आहे, व त्यांच्यापूर्वी इतर आचार्यांनीं असा उप-

क्रम केल्याचें, निरुक्त व निघंटु या दोन्ही ग्रंथांवरून दिसून येतें. वेदांतील अवघड शब्दांचे कोश रचण्याचा काल सुरू झाला, तेव्हां हे गण अस्तित्वांत आले. या गणांची थोडीशी कल्पना निघंटूवरूनहि येते, पण त्यापेक्षां जास्त स्पष्ट पाणिनीय गणपाठावरून येते. हा गणपाठ कदाचित् पाणिनीच्या पूर्वीच कोणी केला असल्याचा संभव आहे, किंवा पाणिनीनें आपल्या व्याकरणास लाघव आणण्याकरितां मुद्दाम रचिला असेंदेखील असेल. तरी पण अशा प्रकारचे शब्दगण अस्तित्वांत होते व ते नीट आल्याशिवाय वेदार्थ होणें कठीणच असल्यामुळें त्यांचें अध्ययन वेदकालीं सुरू होतें व अशा तऱ्हेचे गण रचणारा पुरुष हा त्या काळीं मोठा बुद्धिमान् आणि विद्वान् समजला जात असे. म्हणूनच बृहस्पतीला गणपति हें विशेषण दिलें आहे, समाजाचा नेता हा अर्थ मुळींच ध्वनित होत नाहीं असें मला वाटतें. शब्दांचे वर्ग व वर्गीकरण करणारे ऋषि या उभयतांना ' गण ' संज्ञा होती हें 'गणाद् गण:' या निरुक्त वचनावरून सिद्ध होतें.

गणपतीच्या स्थूल स्वरूपाचा विचार करण्याकरितां भरतखंडांतील प्राचीन इतिहासाचें किंचित् सिंहावलोकन केलें पाहिजे. भरतखंडांतील आसेतु हिमाचल राहणारे सर्व आर्य आहेत अशी सामान्य कल्पना लोकांत प्रचलित आहे. आम्ही आर्यांचे वंशज आहोंत असें मोठ्या अभिमानानें आम्ही म्हणत असतों. परंतु खरा प्रकार याहून निराळा असला पाहिजे हें निरनिराळ्या भागांतील लोकांच्या आचारविचारांचें, चालीरीतींचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां तेव्हांच लक्षांत येईल. वैदिक किंवा पौराणिक देवतांशिवाय इतर पुष्कळ भिन्न देवता निरनिराळ्या प्रांतांतून दृष्टीस पडतात. एका प्रांतांतील लोकांत जी वस्तु मंगल प्रसंगीं त्याज्य समजली जाते तिच्यावांचून दुसऱ्या प्रांतांतील लोकांत तो मंगलप्रसंग अपूर्ण समजला जातो. लग्नादिक मंगल प्रसंगांत शास्त्रोक्त विधि खेरीजकरून बाकीचे कुलाचार व व्यवहार करण्यांत येतात, त्यांचा परस्परांशीं मुळींच मेळ पडत नाहीं. इतकेंच नव्हे तर भिन्नभिन्न प्रांतांत स्त्रियांमधून केले जाणारे उत्सव व व्रतें हींदेखील भिन्नभिन्न आहेत. एकाच आर्यवंशाचा हा सर्व विस्तार असता तर इतका भेद त्यांच्या आचारविचारांत उत्पन्न झालाच नसता. अलीकडे

मानववंशशास्त्र म्हणून नवीन शास्त्र निर्माण झालें आहे, त्याच्या अभ्यास-कानीं मनुष्य जातीच्या प्रमुख शाखांतील लोकांच्या नासिका व मेंदू यांचें माप करून त्यांचीं प्रमाणें बसविलीं आहेत. त्या शास्त्राच्या दृष्टीनेंदेखील पाहतां भरतखंडांतील सर्व लोक एका आर्यवंशाचीच संतति नसून त्यांत निरनिराळ्या वंशांतील लोकांची मिसळ झाली आहे असें सिद्ध होतें. आर्य लोकांनीं सप्तसिंधूच्या प्रदेशांत प्रथम वसाहत केली, तेव्हां हिंदुस्थान देश हा निर्जन नव्हता. त्यांतील कांहीं लोक बरेच सुधारलेले होते व कांहीं मात्र अगदीं सुधारणेच्या प्राथमिक स्थितींत होते. त्यांच्यांत धर्मकल्पना रूढ झाल्या होत्या व कित्येक देवता त्यांनीं आपल्या उपासनेकरितां निर्माण केल्या होत्या. त्यांच्यांतील बहुतेक लोक हे शिवोपासक होते असें दिसतें. महाभारत, रामायण इत्यादि ग्रंथांतून राक्षसांचीं व असुरांचीं जीं वर्णनें वाचण्यांत येतात त्यांवरून ते लोक रानटी होते असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. त्या लोकांत विशिष्ट तऱ्हेची राज्यपद्धति प्रचलित होती. ते संघ करून राहात. कांहीं नीतिबंधनें त्यांना मान्य असत. त्यांना सुंदर नगरें बांधतां येत होतीं, इतकेंच नाहीं तर शिल्पकलेंत ते कदाचित् आर्य लोकांपेक्षांहि पुढें गेले असतील, असें मानण्यास आधार आहे.

या अनार्य लोकांच्या लहानमोठ्या अशा अनेक वसाहती सर्व देशभर पसरल्या होत्या. जरी सर्वसाधारणतः हे लोक शिवभक्त होते, तथापि त्या श्रेष्ठ देवतेशिवाय प्रत्येक ज्ञातीच्या भिन्न भिन्न क्षुद्र देवताहि होत्याच. निरनिराळे प्राणी आणि निरनिराळे वृक्ष यांस ते पूज्य मानीत असत. ज्याला Totemism असें अर्वाचीन ग्रंथकारांनीं नांव दिलेलें आहे, अशा प्रकारची कार्यपद्धति प्रचलित होती, असें अनुमान निघतें.

रामायणांत दंडकारण्यांतील वानर, अस्वल, गृध्र इत्यादि प्राण्यांच्या साह्यानें श्रीरामचंद्रानें लंकेवर स्वारी करून रावणाचा पराजय केला, असें वर्णन आहे, हें आपणां सर्वांना माहीत आहे. जनमेजयाचें सर्पसत्र आपल्या वाचनांत असेल. त्याचप्रमाणें इतर प्राण्यांशीं देवादिकांचीं युद्धें झालीं, अशा कथाहि आपण नेहमीं कीर्तनांत व पुराणांतून ऐकत असतों. सामान्य श्रद्धाळू व धार्मिक लोक, हे सर्व प्राणीच होते अशीच आपली समजूत करून घेतात,

व असल्या बुद्धिहीन प्राण्यांच्या हातून परमेश्वरानें अचाट कृत्यें करवून घेतलीं यावरून, ते परमेश्वराचें सामर्थ्य अगाध आहे, व त्याची लीला अतर्क्य आहे, असें म्हणून त्याच्या ठिकाणीं अनन्यभावानें लीन होतात.

परंतु ज्यांची बुद्धि इतिहासवाचनानें जागृत झाली आहे, त्याला हे सर्व तिर्यग् योनींतील प्राणि होते, ही कल्पना मुळींच ग्राह्य होत नाहीं. वानरांच्या हातून झालेले पराक्रम हे तिर्यग् योनींतील प्राण्यांकडून झाले नसून, माणसांकडूनच झाले आहेत, असेंच तो प्रतिपादन करीत असतो; व येथपर्यंत त्याचें प्रतिपादन बरोबरहि आहे. परंतु कवि त्यांचा वानर, अस्वल या शब्दांनीं काय म्हणून उल्लेख करतो याचें स्पष्टीकरण त्यांना देतां येत नाहीं. या अनार्य जाती होत्या. त्यांच्याविषयींचा तिरस्कार, कवीनें त्यांना वानर वगैरे नांवें देऊन दाखविला आहे, अशी कांहीं ग्रंथकारांनीं या नांवाची उपपत्ति देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु वानरांविषयींचे रामायणांतील उल्लेख तिरस्कारपूर्ण मुळींच नाहींत, उलट त्यांच्यांतील पराक्रमी वानरांविषयीं आद्य कवीनें सर्वत्र प्रशंसापर उद्गार काढलेले आहेत. याशिवाय केवळ तिरस्कारच दाखविण्याकरितां कवीनें या नांवाची योजना केली असती तर एकाला वानर, दुसऱ्याला गृध्र, तिसऱ्याला अस्वल अशी प्राणिवर्गांतील निरनिराळ्या योनींची निवड करीत बसण्याची त्याला कांहीं जरूरी नव्हती. तेव्हां या ज्ञातींविषयीं तिरस्कार दाखविण्याकरितां ही कृत्रिम शब्दयोजना कवीनें केली अशी ही कल्पना सुसंगत नाहीं. हीं निरनिराळीं नांवें त्या त्या ज्ञातींत प्रचलित असलेल्या कांहीं विशेष चालीरीतींवरून देण्यांत आलीं असलीं पाहिजेत. वानर हें ज्याचें निशाण आहे किंवा वानरापासून आपला वंश उत्पन्न झाला अशी कल्पना असल्यामुळें,जे वानराचें चिन्ह निरंतर आपल्या अंगावर धारण करतात, किंवा वानर ही ज्यांची पूज्य देवता समजली जाते, त्या लोकांचा कवीनें वानर या नांवानें उल्लेख केला आहे. हल्लीं उत्तर अमेरिकेंत अशा ज्ञाती आहेत कीं, ज्यांच्यांत एखादें श्वापद, पशु किंवा पक्षी हा अत्यंत पूज्य समजला जातो. त्याला ते मारीत नाहींत, त्याचें मांस भक्षणहि करीत नाहींत, मरणानंतर आपल्या थडग्यावर त्या विशिष्ट प्राण्याची प्रतिमा करून मांडतात व साधारणतः त्या प्राण्याला आद्य पूर्वज समजतात. सर्व

सृष्टि त्याच्याचपासून उत्पन्न झाली, अशी त्या ज्ञातींतील कांहीं ज्ञातींची समजूत आहे. कोणत्याहि महत्कार्यांत आपल्या स्वतःच्या नांवाचा निर्देश न करतां आपल्या ज्ञातिवाचक प्राण्याचाच ते उल्लेख करतात. एखाद्या वनस्पतीला वगैरे जर ते पूज्य मानीत असतील तर लग्नप्रसंगीं प्रथमतः त्या वनस्पतीशीं वधूचा विवाह करतात, व नंतर ज्ञातींतील वराशीं तिचा विवाह होतो. लाँगफेलो या अमेरिकन कवीच्या खालील ओळी आपल्यापैकीं पुष्कळांच्या वाचण्यांत असतील.

And they painted on the grave boards
Each his own ancestral tribe
Each the symbol of his household.

हिंदुस्थानांत अजूनहि कांहीं जातींत वरील प्रचाराचा धर्म आहे. बंगाल प्रांतांतील मुंडारी आणि आरोआन या लोकांत वरील प्रकारच्याच कल्पना आहेत व इतर पुष्कळ जातींतहि वरील तऱ्हेच्या कल्पना असल्याचें आपल्या दृष्टीस येईल.

धर्मविचाराच्या उत्क्रांतींत ही स्थिति एकवेळ येऊन जाते असें आर्य लोकांच्या अवतारक्रमाकडे पाहिलें म्हणजे दृष्टोत्पत्तीस येईल. मत्स्य, कच्छ, वराह, नृसिंह हे अवतार आर्यांच्या 'टॉटेमिक्' स्थितींतील धर्मकल्पनांचे स्मारक आहेत. कच्छ अवतार व वराहअवतार यांविषयीं शतपथ ब्राह्मणांत जो उल्लेख आहे, त्यावरून एके काळीं खुद्द आर्यांचे पूर्वज हे या धर्माच्या पूर्वावस्थेतून गेले होते, असेंच म्हणणें भाग पडतें. शतपथ ब्राह्मणांतील कूर्मावताराचा उल्लेख खालीलप्रमाणें आहेः—

" स यत् कूर्मो नाम एतत् वै रूपम् कृत्वा प्रजापतिः प्रजाः असृजत् । यत् असृजताकरोत् तत् यत् अकरोत् । तस्मात् कूर्मः काश्यपो वै कूर्मस्तस्मादाहुः सर्वाः प्रजाः काश्यपा इति स यः स कूर्मोऽसौ स आदित्यः ।

शत. ब्राह्म. ७.५, १.५

वरीलप्रमाणेंच वराहाचा उल्लेख दुसऱ्या ठिकाणीं आला आहे. तैत्तिरीय संहिता व तैत्तिरीय ब्राह्मण यांतहि अशाच तऱ्हेचा उल्लेख दोन स्थळीं

आलेला आहे. वरील प्रकारचे उद्‌गार काढणारे लोक 'टॉटिमिस्ट' होते, हें निर्विवाद आहे. परंतु आर्यावर्तात प्रवेश होण्यापूर्वी ते या स्थितींतून निघून फार पुढें गेले होते, व धर्मविचारांत त्यांची अतिशय प्रगति झाली होती. ही गोष्ट ऋग्वेदावरून स्पष्ट आहे. परंतु भरतखंडांतील मूळच्या रहिवाशांच्या धर्मकल्पना या टोटेमिझमच्या पायरीवर होत्या ही गोष्ट लक्षांत ठेविली म्हणजे त्यांचा उल्लेख निरनिराळ्या प्राण्यांच्या नांवानें कां करण्यांत येतो हें सहज समजेल.

शिव हे प्राचीन अनार्य लोकांतील बहुतेक जातींचें पूज्य दैवत होतें ही गोष्ट शंकराच्या शरीरावरील निरनिराळीं भूषणें व त्याचीं उपकरणें पाहिलीं असतांदेखील लक्षांत येण्यासारखी आहे. नरमांसभक्षक राक्षस हे शिवाचे अनुयायी होते, हें त्याच्या गळ्यांतील नररुंडमाला जगाला जाहीर करते. नाग लोकांची शिवभक्ति शंकराच्या शरीरावरील सर्पभूषणांवरून निदर्शनास येते. त्याचप्रमाणें त्याचें व्याघ्रासन व्याघ्राला पूज्य मानणाऱ्या वनचरांच्या शिवोपासनेचें द्योतक आहे. अर्धांगी असलेली पार्वती किंवा गिरिजा ही पर्वतावर राहणाऱ्या अनेक जातींच्या शिवाराधनेची साक्ष देते व अंगावर पांघरलेलें गजचर्म हें देखील हत्तीला दैवत अगर पूज्य समजणाऱ्या कोण्यातरी अनार्य ज्ञातीच्या शैवत्वाचें असंशय द्योतक आहे. या सर्व ज्ञाती जरी शिवोपासक होत्या, तरी त्या प्रत्येकीची पृथक् देवता एखादें वन्य किंवा ग्राम्य श्वापद अथवा एखादा वृक्ष अशी होतीच. या सर्व ज्ञाती परस्परांशीं नेहमीं मित्रत्वानें वागत होत्या असेंहि नाहीं. नरमांसभक्षक राक्षस व असुर हे तर सर्व ज्ञातीचे द्वेष्टे होते, म्हणूनच या राक्षसांचा पराभव करण्यांत या इतर अनार्य लोकांचें साह्य झालें. वानर, गृध्र अस्वल हे श्रीरामचंद्राचे, रावणवधार्थ अनुयायी झाले व त्यांच्या साह्यानें रावणाची लंका रामचंद्रानें पादाक्रांत केली, या रामायणीय कथेचा ऐतिहासिक अर्थ याप्रमाणें आहे असें मला वाटतें.

आर्य लोकांच्या व अनार्य जंबुद्वीपस्थांच्या धर्मकल्पनांत मुख्य भेद हा होता कीं, आर्य हे यज्ञयागादिकांनीं परमेश्वराची आराधना करीत व अनार्य लोक व्रतादिकांनींच आपापल्या देवतांस प्रसन्न करण्याचा प्रयत्न करीत.

यज्ञाची कल्पना या लोकांस मुळींच मान्य नसे. व्रतांची कल्पना आर्यांना थोडयाबहुत अंशानें कबूल होती. तथापि देव हे अग्निमुख आहेत, असा त्यांचा दृढ विश्वास असल्यामुळें यज्ञाशिवाय ते आपणांस प्रसन्न होणार नाहींत, व त्यांच्या प्रसादास आपण पात्र होणार नाहीं, हीच त्यांची सर्वसाधारण कल्पना होती. व्रतादिकांना आर्यधर्मांत त्या कालांत गौणस्थान दिलें जात असे. जेव्हां या अनार्य जातींतील राक्षसादिकांचा संहार, आर्यांनीं कांहीं अंशीं स्वबलावर व कांहीं अंशीं इतर लोकांच्या साह्यानें केला आणि त्यांचे पाय या भूमींत स्थिर झाले, तेव्हां त्यांनीं आर्यसंस्कृतीचा प्रसार अनार्य लोकांत करण्याचा उपक्रम केला. यावेळीं त्यांच्या लक्षांत अनार्य लोकांच्या व स्वतःच्या धर्मकल्पनांमधील स्थूल भेद आला. व्रतप्रधान व यज्ञ विरहित अशा या अनार्य लोकांच्या संघाला त्यांनीं "व्रात" हें नांव दिलें. गणपतीला गणपत्यथर्वशीर्षाच्या अंतिममंत्रांत व्रातपति असें नांव दिलें आहेः—

" नमो व्रातपतये नमो गणपतये नमः प्रमथपतये नमस्तेऽस्तु लम्बोदरायैकदन्ताय, विघ्नविनाशिने,शिवसुताय वरदमूर्तये नमः"

असा हा मंत्र आहे. तेव्हां या व्रात शब्दाचा अर्थ काय आहे याची थोडीशी जास्त चर्चा करणें अवश्य आहे. व्रात हा शब्द मनुष्यवाचक आहे असें निघण्टूंतील " मनुष्याः, नरः, धवाः, जन्तवः, विशः, " इत्यादि चोवीस शब्दांचा जो संग्रह आहे त्याच्याशेवटीं "इति मनुष्यनामन्युत्तराणि पंचविंशतिः" या वचनावरून दिसतें. तथापि या शब्दसंग्रहांत दिलेल्या प्रत्येक शब्दानें वाटेल त्या मनुष्याचा बोध होत नसून निरनिराळ्या जातींच्या मनुष्यांचे वाचक हे निरनिराळे शब्द असावेत असें वाटतें. निरुक्तावरून व्रातशब्द अनार्यांतील कांहीं जातींचा वाचक असून तो आर्य जातींतील मनुष्यांचा वाचक नाहीं, असा निर्णय करतां येत नाहीं. याकरितां आंपणाला दुसरीकडेच आधार पाहिला पाहिजे.

संस्कारहीन द्विजाला "व्रात्य" असें म्हणण्यांत येत असे. ( "द्विजातयः सवर्णासु जनयन्त्यव्रतांस्तु यान्, तान् सावित्रीपरिभ्रष्टान् व्रात्यानिति विनिर्दिशेत् ॥ मनुस्मृति अ० १० श्लोक २० पहा. ) व्रातशब्दाला

'य' प्रत्यय लागून 'व्रात्य' हें रूप तयार झालें आहे व हा 'य' प्रत्यय 'शाखादिभ्यो यः' या सूत्राप्रमाणें लागला असें मानिलें तर 'व्रात इव व्रात्यः' व्राताप्रमाणें जो तो व्रात्य असा या शब्दाचा उपपत्तिशुद्ध अर्थ होतो. " शाखादिभ्यो यः " या सूत्रांत ' इवे प्रतिकृतौ ' या सूत्रांतील इव या पदाची अनुवृत्ति घ्यावी लागते. संस्कारहीन द्विजाला व्रात्य हें नांव त्याची स्थिति व्राताप्रमाणें होती म्हणून देण्यांत आलें, एवढी गोष्ट सिद्ध आहे. तेव्हां हे व्रात आर्य द्विजांहून भिन्न असले पाहिजेत हें अनुमान स्वाभाविक आहे. इतकेंच नाहीं तर व्रातांविषयीं आर्यांच्या मनांत फारसा आदर नव्हता हें देखील उघड आहे. त्यांच्यांत यज्ञयागादिक कर्में नव्हतीं.

ऋग्वेदांतील पांचव्या मंडलांतील सातव्या सूक्तांत खालील मंत्र आहे:—

" गोभिर्यदीमन्ये अस्मन् मृगं न मा मृगयन्ते अभित्सरन्ति धेनुभिः "

ऋग्वेद ५–७, १८–१.

जरी इतर यजमान तुला उत्तम प्रकारच्या स्तुतीनें आळवतात आणि (व्रा मृग न मृगयंते ) व्रा ज्याप्रमाणें मृगाची मार्गप्रतीक्षा करतात, त्याप्रमाणें तुझी मार्गप्रतीक्षा करतात, तरी हे देवा, तूं आम्हांकडेच ये असा या मंत्राचा अर्थ आहे. व्राः व्रात्याः असें निरुक्तकार यास्काचार्य लिहितात.व्राः, व्रात्याः, व्रैषाः, इतर यजमानांच्या प्रैष मंत्राला व्राः अर्थात् व्रात्याः असें म्हटलें आहे आणि हे व्रात किंवा व्रात्य वन्यश्वापदांची शिकार करीत असत असें दिसतें.

'व्रातिन' असा एक शब्द संस्कृत भाषेंत आहे व त्याची व्युत्पत्ति पाणिनीच्या मतानें "व्रातेन जीवति" या सूत्राप्रमाणें व्रात शब्दाला खञ्प्रत्यय लागून होते. भट्टोजी दीक्षितांनी या सूत्राची व्याख्या करतांना ' व्रातेन शरीरायासेन न तु बुद्धिवैभवेन " असें लिहिलें आहे. त्यावरील टीकेंत टीकाकार लिहितो " यद्यपि व्रातशब्दो लोके संघातवाचकः तथाप्यत्रत्य भाष्यादिग्रंथपर्यालोचनतया इह अयमेवार्थ उचितः इति भावः" शरीरकष्टानें होणाऱ्या उपजीविकेला पाणिनीय कालीं व्रात हा शब्द लावण्यांत येत होता. यावरून सरळ अनुमान असें निघतें कीं, पाणिनीच्या कालीं व्रात शब्द विशेष तऱ्हेच्या उपजीविकेचा वाचक बनला. तशा तऱ्हेची उपजीविका करणाऱ्यांना 'व्रात्यीण' म्हणत व धर्मभ्रष्ट आचरण करणाऱ्या आर्यांना व्रात्य अशी संज्ञा होती.

अनार्य लोकांच्या कांहीं संघांना व्रात हा शब्द लावण्यांत येत होता, ही गोष्ट शतरुद्री यांतील चवथ्या अनुवाकांतील खालील वचनावरून दिसून येईलः—"नमो व्रातेभ्यो व्रातपतिभ्यश्च वो नमः" व्रात आणि व्रातपति या उभयतांचा नमस्कृतिपूर्वक उल्लेख केला आहे. दुसऱ्या व तिसऱ्या अनुवाकांत अनेक वनचर ज्ञाती आणि भिन्न तऱ्हेच्या निषाद,स्ताय इत्यादिकांचा निर्देश केल्यानंतर चौथ्या अनुवाकाच्या आरंभींच मातृकाचा उल्लेख करून त्यानंतर निरनिराळ्या संघांना उद्देशून मंत्र आलेले आहेत.

" गृत्सेभ्यो गृत्सपतिभ्यश्च वो नमो नमो, व्रातेभ्यो व्रातपतिभ्यश्च वो नमो नमो, गणेभ्यो गणपतिभ्यश्च वो नमो नमो, विरूपेभ्यो विश्वरूपेभ्यश्च वो नमो नमः "

गृत्स, व्रात, गण आणि विरूप या शद्बांनीं या संघांचें वर्णन आलेलें आहे. या चारी शब्दांशीं आपल्या आराध्य गणपति देवतेचा निकट संबंध आहे. गणपतीला कोठें कोठें गृत्समद असेंहि म्हटलें आहे. गृत्समद मोठा गाणपत्य ऋषि होऊन गेला व " गणानां त्वा " या मंत्राचा द्रष्टा म्हणून तो वैदिक वाङ्मयांत प्रसिद्ध आहे. विरूप शब्दांत वक्रतुंड, विकट इत्यादि जीं गणपतींचीं नांवें आढळतात, त्यांचें मूळ सांपडेल. या प्राचीन ज्ञातींतील कांहीं चालीरीतींचा उल्लेख या चार विशेषणांत झाला आहे. व्रतवैकल्यादि देहदंडन हा या लोकांचा धर्म होता, हें व्रात शद्बावरून व्यक्त होतें. गृत्स किंवा गृत्समद शब्दानें मेधावी आहे मद ज्याचा असा अर्थ होतो. अर्थात् मदस्राव होणाऱ्या कोणत्या तरी श्वापदाला हे पूज्य मानणारे लोक होते. हत्तीशिवाय दुसऱ्या कोणत्याहि वन्य पशूचा मदस्राव होत असल्याचें निदान ऐकिवांत नाहीं. 'विरूप' या पदानें निरनिराळ्या प्राण्यांचीं रूपडें घालून किंवा त्यांचीं सोंगें घेऊन हे लोक राहात असत असें दिसतें. ऐतरेय ब्राह्मणांतील चौथ्या पंचकेंतील पहिल्या अध्यायांत या राक्षसांना व असुरांना विरूप नांव कां देण्यांत आलें, याची कथा दिली आहे. ती कथा देण्यांत कांहीं विशेष तात्पर्य नाहीं. तथापि विरूप शद्बानें अनार्य जातीचा बोध होत होता, एवढें त्यावरून सिद्ध होण्यासारखें आहे. द्वादशाहांतील तिसऱ्या दिवशीं जेव्हां देव स्वर्गास जाऊं लागले, तेव्हां राक्षसांनीं व असुरांनीं त्यांना अड-

थळा केला. संतापून जाऊन देवांनीं ' तुम्ही विरूप व्हा ' ' विरूपा भवत ' असा शाप दिला. व त्यामुळें त्या राक्षसांचीं रूपें कुत्सित झालीं. तथापि ते राक्षस या देवांचा पिच्छा सोडीनात, म्हणून अशा विरूपांशीं लढण्याला योग्य असें अश्वाचें रूप देवांनीं घेतलें व पिछाडयांच्या माऱ्यानें राक्षसांस पिटाळून लाविलें, अशी ही कथा आहे. ही कथा ऐतिहासिक दृष्टया फार महत्त्वाची आहे, असें मला वाटतें. घोडा हा प्राणी कदाचित् या अनार्य राक्षसांना माहीत नसावा. व आर्य लोक जेव्हां घोडयावर आरूढ होऊन युद्धास सज्ज झाले, तेव्हां मेक्सिकोमधील विझकोटन् कॅटल् व त्याचे अनुयायी यांची स्पॅनिश घोडेस्वार पाहिल्याबरोबर जी गाळण उडाली, तशाच तऱ्हेचा प्रकार या प्राचीन आर्यांचा झाला असावा, असें अनुमान फारसें अयुक्तिक होईल असें मला वाटत नाहीं. इतर बहुतेक प्राण्यांचीं तोंडें धारण केलेल्या राक्षसांचें व असुरांचें वर्णन आपल्या वाचण्यांत येतें, परंतु अश्वासुर किंवा तदर्थक दुसरा एखादा राक्षस कधीं आर्यांना त्रास देत असल्याचें आपल्या वाचण्यांत नाहीं. यावरून घोडा हें जनावर कदाचित् आर्य लोकांनींच प्रथमतः भरतभूमींत आणिलें असेल, असा माझा तर्क आहे. असो. 'विरूपेभ्य:' या पदाचा अर्थ निरनिराळीं रूपें घेणारे किंवा निरनिराळीं रूपें असलेले असा आहे, व मनुष्याशिवाय इतर दुसऱ्या प्राण्यांचीं रूपें धारण करण्याचा प्रघात त्या जातींत चालू असल्याचें हें स्पष्ट प्रमाण आहे. मागें 'टोटेमिझम्' संबंधीं जी हकीकत दिली आहे तीवरून असा प्रकार कां उत्पन्न होतो याची आपणांला कल्पना येईल. गृत्स किंवा गृत्समद,त्रात हे सर्व तिर्यगुपासक होते, असें म्हणण्याला कांहींच प्रत्यवाय नाहीं.

शिवाच्या शरीरावर असलेल्या गजचर्मावरून, एक गजोपासक अनार्य संघ शिवभक्तांत होता, असें मीं वर सांगितलें आहे. गज हें ज्यांचें चिन्ह आहे, अशा लोकांचा स्पष्ट उल्लेख म्हणजे गजेंद्रमोक्षाची कथा ही आहे. गजाचें व नक्राचें युद्ध हजारों वर्षे चाललें व अखेरीस श्रीविष्णूनें येऊन गजाला त्या नक्रग्रासांतून वांचविलें ही कथा श्रीमद्भागवतांतील अष्टम स्कंधांत आहे. या कथेचा सरलार्थ 'एवढाच आहे कीं, गजानुयायी अनार्य व नक्रानुयायी अनार्य या दोन टोळ्यांत अनेक वर्षे युद्ध चालून,

शेवटीं विष्णुपूजक आर्यांच्या कुमकेनें, गजानुयायांची, त्यांच्या शत्रूपासून सुटका झाली. हा गजेंद्र पूर्वजन्मीं द्रवीड होता, असेंहि भागवतांत लिहिलें आहे. द्रवीड हे व्रात्य आहेत असें मनुस्मृतिकार म्हणतो. या सर्व प्रमाणांचा समवायिक इत्यर्थ असा निवतो कीं, व्रातांमध्यें गजानुयायी लोक होते.

गृत्समद व भ्रुशुंडी हे दोन ऋषी मोठे गाणपत्य होऊन गेले. गृत्समद हा व्रात्य होता अशी पौराणिकांची माहिती होती, असें म्हणण्यास त्याच्या जन्माची जी हकीगत गणेश पुराणांत लिहिली आहे, तिजवरून दिसतें. मृचक्न्वी नांवाच्या ऋषीला मुकुंदा या नांवाची स्त्री होती. एके दिवशीं रुक्मांगदनामक एक क्षत्रिय राजा शिकार करीत असतां या ऋषीच्या आश्रमांत आला. त्याला पाहून मुकुंदा मोहीत झाली. परंतु रुक्मांगद हा एकपत्निव्रत असल्यामुळें तिची इच्छा त्याजकडून पूर्ण झाली नाहीं. तेव्हां ती आपले दिवस रुक्मांगदाच्या विरहावस्थेंत काढूं लागली. एके दिवशीं ऋषि आश्रमांतून बाहेर गेला हें पाहून, इंद्रानें रुक्मांगदाचें स्वरूप घेऊन, या ऋषिपत्नीशीं संभोग केला, व त्याच्या वीर्यापासून मुकुंदेच्या उदरीं गृत्समदाचा जन्म झाला. वर्णसंकरामुळें उत्पन्न झालेल्या जातीला पूर्वाचार्य व्रात्य म्हणतात, अशी बौधायनानें व्रात्य शब्दाची व्याख्या केली आहे. तिजवरून पाहतां, गृत्समद हा व्रात्य होता, अशी पौराणिक सूताची माहिती होती व म्हणूनच त्याच्या जन्माची अशी विलक्षण कथा पुराणांतून सांगितली आहे. गृत्समद हा अनार्य जातींत उत्पन्न होऊन ऋषिपदाला पोहोंचला, त्यासंबंधानें जी कथा आहे, तीहि प्रकृत प्रकरणीं विचार करण्यासारखी आहे.

एके दिवशीं गृत्समदाला श्राद्धाचें आमंत्रण आल्यावरून तो जेवावयास गेला. त्याच्या पंक्तीस अत्रि वगैरे दुसरे कांहीं ऋषी होते.तेथें कांहीं एका तात्त्विक प्रश्नावर चर्चा उत्पन्न झाली असतां अत्रीशीं गृत्समदानें उत्तरपक्ष केल्यावर “तूं ऋषिवीर्यापासून उत्पन्न झाला नाहींस, तेव्हां तुझा आमच्याबरोबर वाद करण्याचा अधिकार नाहीं” असें उपरोधिक भाषण अत्रीनें केलें व गृत्समद श्राद्धांतून रागारागानें उठून गेला. गृत्समद आपल्या आचरणानें जरी तत्कालीन आर्यांना पूज्य झाला होता,तथापि तो जन्मतः अनार्य असल्यामुळें त्यानें

श्राद्धादिक यज्ञांत येऊन बसण्याची त्याची योग्यता नाहीं असें त्या कालच्या ऋषींचें मत होतें, व ते गृत्समदाच्या या कृत्याचा धिःकार करीत होते असें यावरून दिसतें. गृत्समदाच्या पोटीं त्रिपुरासुर उत्पन्न झाला, इकडे पाहिलें म्हणजे गृत्समद हा अनार्य होता, याविषयीं शंकाच राहात नाहीं. आपल्या ज्ञातीच्या लोकांचा आर्यांत समावेश व्हावा अशी खटपट करणारा हा पूर्वकालिन सुधारक होता व त्याचें कार्य यशस्वी होण्यापूर्वी त्याला आर्यांकडून बराच त्रास झाला असावा असें वाटतें.

भ्रुशुंडी हा आयुधोपजीवी निषाद होता व तो मुद्गल ऋषीनें दिलेल्या गणपति मंत्राचा जप करून अखेरीस ऋषिपदाला पोहोंचला अशी भ्रुशुंडीची कथा आहे. यास भ्रुशुंडी नांव पडण्याचें कारण त्यानें गणपति मंत्राचें दीर्घ पुरश्चरण केल्यामुळें त्याच्या भ्रूस्थानीं सोंड उत्पन्न झाली असें दिलें आहे. गजानुयायी लोक हत्तीचें रूपडें करून आपल्या तोंडावर घालीत असत व अशा रीतीनें आपलें गजानुयायित्व लोकांसमोर प्रगट करीत असें मला वाटतें. अशा या अनार्य संघामधील भ्रुशुंडी हा पुरुष होता हें निर्विवाद आहे.

या दोन गाणपत्यांची ही मूलपीठिका पाहिली म्हणजे अनार्यांत गजचिन्हधारण करणारे कांहीं संघ होते व पुढें त्यांनीं आर्यसंस्कृतींत येण्याचा प्रयत्न केला असें अनुमान काढावयास कांहींएक प्रत्यवाय नाहीं, असें मला वाटतें.

या गजानुयायांशीं व सेन नांवाच्या दुसऱ्या आर्य संघाशीं कधीं कधीं लढाया होत व त्यांमध्यें गजानुयायांचा पराभव सेन संघांनीं केला असावा असें अनुमान करण्यास पौराणिक कथांतून जागा आहे. गणपति व कार्तिकेय सेनानी या उभयतांचें युद्ध होऊन त्यांत गणपतीचा एक दांत पडला व तेव्हांपासून गणपतीला एकदंत असें नांव पडलें.ही पौराणिक कथा आपल्या ऐकिवांत आहे. सेनांनीं जेव्हां गजभक्तांचा पराभव केला,तेव्हांपासून आपल्या शत्रूच्या निशाणावर स्वतःच्या विजयाची कायमची खूण म्हणून द्विरदगज काढण्याची मनाई केली असावी व पराभूत गजभक्तांनीं ती निमूटपणें मान्य केली असावी,असा या कथेंतील इतिहास आहे. सेन हादेखील अनार्यांचा संघ होता व त्यांच्या नायकास–पतीस सेनानी असें म्हणत, असें " नमः सेनाभ्यः सेनानिभ्यश्च वा

नमः" या शतरुद्रीयांतील चवथ्या अनुवाकांतील मंत्रावरून दिसतें. गजानुयायी अनार्य व सेन यांचा निकटचा संबंध होता हेंदेखील एकाच अनुवाकांत या दोन्ही संघांच्या जवळ जवळ असलेल्या उल्लेखावरून वाटतें. गृत्सपति, व्रातपति किंवा गणपति हा शिवाचा एक मुलगा व सेनानी कार्तिकेय हा दुसरा व वडील मुलगा असें म्हटलें आहे. यावरून सेन हेहि शिवभक्त अनार्य होते व सर्व अनार्य संघांत हा संघ अत्यंत प्रबल व बलाढय असावा हें कार्तिकेयाला देवांनीं आपला सेनापति केला, या कथेवरून स्पष्ट आहे. सेनवंशांत अनेक प्रतापी राजे झाले व बखत्यार खिलजीचा पुत्र महंमद यानें बाराव्या शतकाच्या अखेरीस लक्ष्मणसेन याचा पराभव करून बंगाल प्रांत, काबीज करीपर्यंत हा सेनवंश आपल्या शौर्यानें सर्व भरतखंडभर गाजत होता. बंगाल इलाख्यांत या सेन वंशाबद्दल अशी एक कथा प्रचलित आहे कीं, आदिसूर नांवाच्या एका सेन राजानें प्रथमतः कनोज देशांतून पांच ब्राह्मण बंगाल प्रांतांत आणिले व तेव्हांपासून वैदिक विद्येचा अभ्यास या प्रांतांत सुरू झाला. सेन वंशांतील राजांनीं आर्य संस्कृति घेण्याचा प्रयत्न केव्हां केला हें या आदिसुराचा काळ जर निश्चित तऱ्हेनें काढतां आला तर ठरवितां येईल. हा सेनवंश बहुधा दक्षिणेंतून बंगाल प्रांतांत आला असावा असा डॉ. राजेंद्रलाल मित्र व रमेशचंद्र दत्त यांचा तर्क आहे. कसेंहि असलें तरी सेन हे मूळचे अनार्य होते व ते शिवोपासक होते, ही गोष्ट निर्विवाद आहे. या सेन संघाचें चिन्ह मयूर असावें असें सेनानीचें वाहन मयूर आहे यावरून दिसतें.

प्राचीन अनार्य जातींची कांहींशी कल्पना येण्यास वरील विवेचन पुरें आहे. आर्य लोकांच्या धर्मांतील विशेष म्हणजे यज्ञयागादिक क्रिया ही होती. शेती आणि व्यापार हें त्यांचें शांततेच्या काळांतील उदरनिर्वाहाचें साधन होतें. आर्यांनीं हिंदुस्थानांत ज्या सुधारणांचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला व ज्यांत त्यांना पूर्ण यश आलें त्या ह्याच होत. अनार्य ज्ञाती जरी निरनिराळे संघ करीत, व राज्य-स्थापनेपर्यंत देखील जरी त्यांची मजल गेली होती, तरी शेती व व्यापार यांची त्यांना ओळख नसावी असें वाटतें. आर्यांच्या संस्कृतीचा अनार्य लोक जसजसा स्वीकार करीत चालले, तसतसे आर्यलोकांच्या यज्ञांत, आपल्या उपास्य देवतांना हविर्भाग असावा व आपणांला आर्यांनीं सर्व

तऱ्हेनें बरोबरीचे हक्क द्यावेत असें भांडण या दोन पक्षांत उपस्थित झालें. जेते आर्य हे जित अनार्यांना हे सामाजिक व धार्मिक बरोबरीचे हक्क द्यावयाला तयार नव्हते हें अनेक कथांवरून दाखवितां येईल. सर्व अनार्यांची साधारण उपास्य देवता शिव ही होती. आर्यांच्या यज्ञांत इतर सर्व वैदिक देवतांना हविर्भाग मिळतो; परंतु शिवाला तसा हविर्भाग मुळींच मिळत नाहीं. दक्षप्रजापतीच्या शापामुळें शिवाला हविर्भाग मिळत नाहीं असें श्रीमद्भागवतांत सांगितलें आहे. इंद्राच्या सभेंत सर्व देव एकत्र झाले असतां, दक्षप्रजापति तेथें आल्याबरोबर बृहस्पतिप्रमुख सर्व देवतांनीं उठून दक्षास उत्थापन दिलें, परंतु शिवमात्र आपल्या आसनावरून चल झाला नाहीं, म्हणून संतापानें दक्षानें शाप दिला कीं, देवादिकांच्या यज्ञांत तुला हविर्भाग मुळींच मिळणार नाहीं. शिवाला त्यापूर्वी हविर्भाग असल्याचें वैदिक ग्रंथांवरून दिसत नाहीं. उलट या सभा म्हणजे आर्यसंस्कृतींत समाविष्ट झालेल्या अनार्यांनीं आपल्या हक्काचें व आपल्या देवतांना योग्य स्थान मिळण्याकरितां सामोपचारांनीं आर्यांजवळ केलेले प्रयत्न होत, व दक्षासारखे दीर्घसूत्री आर्य जरी उपनिषदादिक विचारांनीं शिवाशीं वैदिक रुद्राचें तादात्म्य करावयाला तयार झाले व आर्यसंस्कृतींतील देवत्रयींत त्याची गणना करावयाला तयार झाले,तथापि तरी हविर्भागांत त्याचा विभाग आहे ही कल्पना त्यांना असह्य वाटत होती. अखेरीस सामोपचारांनीं हा प्रकार मिटत नाहीं असें पाहून अनार्यांनीं दंडनीतीचा आश्रय केला. दक्षप्रजापतीनें जेव्हां यज्ञ केला, तेव्हां सर्व देवांना सन्मानपूर्वक बोलाविलें, परंतु शिवाला निमंत्रण केलें नव्हतें. पार्वती ही शिवाचें न ऐकतां तेथें गेली परंतु तिचा अपमान दक्षानें केला, तेव्हां शिवाच्या गणांनीं दक्ष–मखाचा विध्वंस केला. या कथेंत याज्ञिक देवतांत शिवाला स्थान मिळावें म्हणून शिवानुयायांनीं निकराचा कसा प्रयत्न केला याचें काव्यमय चित्र काढलें आहे. आपल्या संस्कृतींतील जी विशिष्ट पद्धति तिचा अनार्यांनीं आदर करावा, परंतु अनार्यांच्या उपास्यांना तींत स्थळ असूं नये या वैदिक मतानुयायांच्या अट्टाहासापासूनहि बोध घेतां येण्यासारखा आहे. दिवसेंदिवस या अनार्यांचा आर्यसंस्कृतींत अधिकाधिक प्रवेश व्हावयाला लागल्यावर, त्यांना व्रात्य असें नांव देऊन आर्यसंघाचे अवयव बनविण्यांत आलें.

अशा या संयोगाच्या कालांत गणपति या देवतेचें प्रस्तुत रूप तयार झालें. ज्या अनार्य लोकांनीं आर्यसंस्था मान्य केल्या, त्यांच्यामधील व आर्यांमधील विरोध नाहींसा होऊन ते प्रेमानें एकत्र बंधूप्रमाणें राहूं लागले, याचें कारण त्यांच्या उपास्याला वैदिक देवतांच्या गुणांचे अलंकार चढवून व सर्व मंगलप्रसंगीं त्याला आद्य स्थान देऊन आर्यांनीं आपल्या संस्कृतींत नवीनच प्रविष्ट झालेल्या आपल्या बंधूंची समजूत घातली व त्या देवतेची उपासना दोन्हीहि पंथांनीं सारखीच सुरू ठेविली. गणपति हा विष्णूचा अवतार शिवशक्तीच्या ठिकाणीं प्रादुर्भूत झाला, ही कल्पना मोठी हृदयंगम व उदात्त आहे,व गणपतीच्या मूर्तीकडे पाहिलें म्हणजे या सर्व कल्पनेचें मूर्तस्वरूप तींत आढळतें. वेदांतवेत्त्यांनीं तर गणपति हें प्रणवाचें सगुण रूप आहे अशी कल्पना केली आहे व प्रणवाशिवाय कोणत्याहि कृत्यास आरंभ करतां येत नाहीं, एवढ्याचकरितां गणपति पूजनाशिवाय मंगलकार्य न करण्याचा प्रघात पडला, असेंहि ते प्रतिपादन करतात. याशिवाय इतर पुष्कळ रूपकें गणपतीच्या स्वरूपावर केलेलीं आढळतात. गणपतीच्या वाहनाकडे सूक्ष्म रीतीनें पाहिल्यास गणपतीची मूळपीठिका नजरेस येते. मूषक शब्द गुणसाधर्म्यावरून दुसऱ्याच्या प्राप्तीवर उपजीविका करणाऱ्या चोरादिकांचा वाचक बनला आहे. अशा तऱ्हेच्या लोकांच्या उपासनेंत असलेल्या पशूंचें शिर या मूर्तींत आणून व तो देव शिव–पार्वतीचा पुत्र अशी कथा प्रचलित करून त्या लोकांच्या शिवोपासनेची ओळख त्या मूर्तींत ठेविली गेली. बाकीचीं विष्णुचिन्हें त्याच्या शरीरावर स्थापण्यांत आलीं, आणि अखेरीस ब्रह्मणस्पति वा बृहस्पति या वैदिक देवतेशीं नामसादृश्यावरून त्याची एकात्मता करून ‘ गणानां त्वा ’ या वैदिक मंत्राचा विनियोग तिच्या ठिकाणीं केला. हा सर्व प्रकार व्हावयाला कित्येक हजार वर्षें लागलीं असतील. गृत्समद, भृशुंडी, मुद्गलप्रभृति हजारों तपस्व्यांची तपश्चर्या या कामीं खर्च झाली असेल, तेव्हाच या दोन परस्परांच्या सन्निध येऊन पोहोंचलेल्या लोकांचा एकजीव झाला; त्यांची एकतानता झाली.पूर्वीचें अनार्यावर्त हें केवळ आर्यावर्त बनलें. मीं ज्या तऱ्हेनें वर विवेचन केलें, त्या तऱ्हेनें हिंदुस्थानाच्या एकंदर इतिहासाकडे पाहिलें, म्हणजे त्यांतील कांहीं गूढ स्थलांचा थोड्यातरी प्रमाणानें सयुक्तिक उलगडा होतो.

वैदिक आर्य यज्ञाला कंटाळले व त्यांच्यांत यज्ञ नको म्हणणारे लोक उत्पन्न झाले, म्हणून बौद्धमत प्रादुर्भूत झालें अशी बौद्धमताची पीठिका देतात. परंतु यज्ञ ही ज्यांची उपासना–पद्धतीच नव्हे, असल्या संघांची जेव्हां बरीच मोठी संख्या आर्यसंस्कृतींत शिरली, तेव्हां त्यांतील विचारी पुरुषांनीं आपल्या पूर्व संस्कारानुरूप यज्ञयागाची मीमांसा करावयाला आरंभ केला. जैमिनीची पूर्वमीमांसा अशा तऱ्हेच्या आर्य संस्कृतींत नूतन उत्पन्न झालेल्या विरोधी पक्षाला उद्देशून लिहिली आहे. या अनार्यांना आर्य करण्याचीं साधनेंदेखील आर्यांनीं उत्पन्न केलीं. "शाक्यानां अयनम्' 'व्रात्यस्तोम' इत्यादि यज्ञ कसे अस्तित्वांत आले व त्याचें प्रयोजन काय याचा खुलासाहि वरील विवेचनावरून करतां येतो. त्याचप्रमाणें बौद्धमतानें भरतखंड व्याप्त झाल्यावर बौद्धमताची धूळ झाडून टाकण्याकरितां ज्या साधनांचा उपयोग केला, त्यांत पंचायतन–पूजा हीं प्रमुखत्वेंकरून योजिलेली होती. निरनिराळ्या मतांच्या लोकांना आपल्या मतांचा समवाय करितां यावा आणि कर्ममार्गाला ज्ञानार्जनाकरितां लागणाऱ्या मनःशुद्धीचें साधन एवढेंच महत्त्व देऊन त्यांनीं वेदांत शास्त्राची पुनरपि रचना केली. भिन्न भिन्न देवतांच्या उपासकाला साधनोपाय म्हणून पंचायतनपूजा सांगितली. त्यांत विष्णु, सूर्य, शंकर, देवी व गणपति इतक्या देवतांची योजना केली. द्रविडप्रभृति अनार्य लोकांनीं व्यात असलेला दक्षिणापथ व वैदिक आर्यांनीं वसविलेला आर्यावर्त या उभयतांचा संयोग ज्या देशांत होतो तेथेंच गणपतीची उपासना अधिक भक्तिपुरःसर व्हावी हें या देवतेच्या ऐतिहासिक स्वरूपास धरून आहे. विष्णु आणि सूर्य, शिव आणि देवी या दोघांमधील दुवा जोडणारी गणपति ही संयोगी देवता, ही पंचायतनाची कल्पना काढून सर्व देश पंचायतनोपासक बनविला यांत त्यांनीं जी भरतखंडाची सेवा केली, तेवढी मोठी सेवा दुसऱ्या कोणाच्याहि हातून आजपर्यंत झाली नाहीं. परस्परविरोध नाहींसा केला; सर्वच देवता या ईश्वराचीं निरनिराळीं रूपें आहेत ही कल्पना दृढ केली आणि तद्द्वारां राष्ट्राचें धार्मिक पायावर एकीकरण केलें, म्हणूनच गणपतिपूजक हे एकीकरणवादी आहेत, संयोगगामी आहेत, व समष्टिनिष्ठ आहेत. दुसऱ्या कोणाचा विरोध करावा, किंवा दुसऱ्या कोणाशीं

स्पर्धा करावी हें गणपत्युपासकाचें ब्रीद नव्हे. आजपर्यंत अनेक मतांतील विरोध गाणपत्यांनीं नाहींसा केला आहे व समष्टीचें कार्य घडवून आणिलें आहे. आणि हल्लींच्या काळांत जर समष्टीची जरूर असेल, तर गणपत्युपासना होत आहे यापेक्षां जास्त नेटानें व नियमानें झाली पाहिजे.

समाप्त.

# सूचि

( प्रथम संदर्भ देऊन पुढें पृष्ठांक दिले आहेत. )


अखिल महाराष्ट्र परिषद ३१०
अग्नि–उपासना ५६
अँग्लो इंडियन व सरकार ६
अणे –वकिलीची तहकुबी ४३४
अद्वैतवाद४१
अधिकार नाहीं तर सहकार्य नाहीं ५८०
अनार्यांशीं संबंध ५२,५९८
अनार्यांचे आर्य ५९९
अनार्यांच्या वसाहती ५८८
अनुभव हिशेबी पाहिजे ५५७
अर्जुन व्यामोह १३६
अर्जुनलाल शेटी २७६
अर्थशास्त्र, खेडेगांव ५२०
असंतोष, कार्यनिष्पत्ति २३८
असतोष व सुधारणा ३८७
असहकारिता–रहस्य २८६
–राष्ट्रीय सभेनें कां स्वीकारली ११८
आगरकर १५०
आजचा सुशिक्षित वर्ग २६७
आंत शिरून यंत्र ( कौन्सिलें ) बंद पाडा ३९१
आधुनिक वाचकवर्ग ८७
आपटे, कादंबरीकार४६७
आप्त वाक्य ५२
आमचें स्वातंत्र्य व जगाची संस्कृति२३२,२४१
आर्थिक पारतंत्र्य २८०
आर्यावर्त सुधारणांचे आदिपीठ२११
इंग्रज–अधिकारी व गृहस्थ १५७
इंग्रजी गृध्रनीति १२२
–साम्राज्यवाद३७१
इंग्लंडचे राजकारणाचे मार्ग ११
इतिहासाचा उपोद्घात १९१
इतिहास संशोधक मंडळ, पुणें ८५
ईश्वरविषयक कल्पना ३९
उत्कलवासी जनार्दन व भरतखंड ६५
उत्सव–त्रिशतसांवत्सरिक२४२
उपसाहित्य ६९
उपनिषदें–तीन वर्ग ४४६
उपासना व गुणविकास ५८२
एकमुखी मागणी ४६४
एकोणीसांचा मसुदा २४२
एकोणिसावे शतकांतील पुढारी४,११
एतद्देशीय अधिकारी १०
ऐक्याकरितां समेट ३५६
ऐक्याचा खून ४३५
ऐक्याचे प्रयत्न १२७
ऐक्याशिवाय तरणोपाय नाहीं ४०१
ऐतिहासिक अभ्यासपद्धति ५८३
ओरिएंटल् डिप्लोमसी (कर्झन) १९९
कन्सेंट् बिल २८२
कनिष्ठ ध्येय २७
कॅप्चरिंग पॉलिसी ३४६
कम्यूनिझम ४९४
करबंदी तूर्त अशक्य ४२७–५७७
कर्तृत्वशून्य दैववाद ६५
कर्म म्हणजे काय २०३
कर्मकांड उद्देश ६१
कर्ममार्ग प्रतिष्ठा ५३
कर्ममार्गाचें महत्त्व, चित्तशुद्धि ६०१

कर्मवाद व पुनर्जन्म ४५
कर्मविषयक सिद्धांत ४४६
कर्मज्ञान विरहित भक्ति ६५
कर्टिस २२९
कांग्रेसमध्येंच डायार्की ३९०–४१३
कांग्रेस डे. क्रॅ. पक्ष ३८८
कांग्रेस व प्रतियोगी पक्ष ४३०
कांग्रेसचें बळ वाढवा ३६९
कांग्रेस लीग स्कीम ३४३
कायदेमंडळ कमेट्यावर कां जावें ३९४ –दिखाऊ डोलारे ३८०
कायदेपालन मर्यादा १०, १७, ३०
काळपुरुष–इंग्रजी कल्पना ३७८
कार्लाईल–वाङ्मयाविषयीं विचार७८
किसानांपूर्वी शहरवासी ५५८
कुशल नेता ३६२
केंद्रोपवर्ती संस्था ४, १२, ३०,५८०
केळकर न.चिं.कांटेतोल लेखनपद्धति ४७३– निरनुनासिक लेखन ४८१
केळकर दिवाण ४१४, ४२४
कौन्सिल–उमेदवार कसा पाहिजे ४३३ –५वा विरोधी पक्ष पाठवा ३४९ –मध्यप्रांतीयांची मर्दुमकी ३६८ –ची किंमत ३१७
क्रमक्रांतिवाद २३८
क्रांजी–बोअर जनरल २००
क्रियासिद्धिः सत्त्वे २८४
खिलाफत २५९
खेडेगांवच्या अडचणी १८६
गजेंद्रमोक्ष कथा ५९५–५९६
गणेशब्दार्थ ५८६
गणपति –ग्रथांतर्गत वर्णन ५८५, ५९२,५९४ –पूजकांची कामगिरी ६०१ –योजना ६०० –विष्णूचा अवतार ६०० –संग्रहवादी देवता [२२३
गांव पंचायती ३०
गृत्समद ५९६–६००
गोखले–नामदार २३४
गोरक्षण व गोवध १२७
गौर–डॉक्टर ४८५
ग्रंथकार–समकालिनांचें विचारसाम्य ७५
ग्रंथप्रकाशन–खंडशः नसावें ८०
ग्राम–शब्दाचे अर्थ ५१८
ग्रामपंचायती–व तीन 'ज' कार ५२५ –पूर्वकालीन ५१५ –बाजार कर ५१७ –भावी उत्कर्षाची आशा ४३८ –राष्ट्रीय मनोवृत्तीच्या शाळा ४५० –करितां स्वतंत्र अधिकारी ५१६ –हल्लींचा सदोष कायदा ५२० –हिंदु०सरकारवरील जबाबदारी ५१४ –याच ग्रामदेवता होत ४४० –व फॉरेस्ट १८६ –स्वराज्याचे प्रतीक ३२५
ग्रामसंस्था–जुनीच आहे ४३०
घोडा–आर्यांनीं आणला ५९५
चळवळ आंत बाहेर सारखी पाहिजे ५३२
चांगला मुसलमान; मुसलमानी व्याख्या ४८६
चातुर्वर्ण्य ६०
चार आश्रम व तीन ऋणें २०१
चारी युगांचें समकालीनत्व ४४४
चिपळूणकर विष्णुशास्त्री १००,१४९
जगाची उन्नति व आमचें स्वातंत्र्य २३२- २४१

जंगल व जंगलखातें २९३-५२१-५२६
जंगलच्या तक्रारी ५२५
जन्मजात ऋणत्रयी ५७
जपान ५
जमीन महसूल–सरकारी धोरण ५०८
जहालपक्ष १७
जिल्हासभा (डिस्ट्रिक्ट असोसिएशन) १७५,२१९,२६२ –ध्येय व उद्देश २२२ –जिल्हापरिषदा–उपक्रम व हेतु २९१ –द्विविध कर्तव्य ३९८
जिल्ह्याच्या सुखदुःखांचा विचार ३६४
जोशी–वीर वामनराव ३०१, ३२६, ४३०
जोशी–सर मोरोपंत ४२९, ४३४
टॉटेमिसम् ५८८
टॅबे डॉक्टर ५६४
डायर्कीचा टोणगा ३७५
डिव्हाइन डिस्पेन्सेशन २८१
डेमोक्रॅटिक पार्टी ४१३
डेमॉक्रसी २४३
ड्रेपनें दिलेली माहिती २६०
डोमिनिअन स्टेटस् ४८६
तरुण, विद्यार्थी व राजकारण २०८
तरुणांवरील जबाबदारी ५३३
तीन ‘ ज ’ कार ५१९
तुर्कस्थान व खलिफा १२१
त्रैवर्णिकांची समान योग्यता ६३
दक्षमख विध्वंस ५९९
दादाभाई नौरोजी २६, २३०
दान ६४
दिल्ली समेट १३०
दुहीचें बीज १२४
देवांचें अश्वरूप ५९५
देवता गणपति ५८१
देवतांचें दुहेरी स्वरूप ५८१
देशद्रोह्यांवर बहिष्कार २०, व कडक शासन ३०
देशभक्तांच्या विपत्ति २०७
देशोन्नतीचीं कलमें ४
धर्म–मातृभूमी उद्धार हाच ३३६ –कल्पना आर्यानार्यांची ५९१;५९२ –नारायणीय २२६ –प्रयोजन ३९ –मनुष्य सहोदरत्व ३६ –वृषभरूप ३३ –हेतुमान व कल्याण ३४ –व्याख्या ४०
धर्मांतर प्रयत्न १२७
नॅचरलायझेशन बिल ३७९
नझूलचें बंड ४८८
नवमताचा उदय व प्रसार २१०
नवीन पंथ–लेखमाला १ –अंतिम ध्येय २६, ३१
नवीन पक्ष व राष्ट्रीय सभा ७, ३०
नव्या जुन्या पक्षांतील फरक २, १३
नव्या दिल्लीखालीं ५३१
नागपूर सत्याग्रह १३३
नियतकालिकें–विभाग ७३
निःशस्त्र प्रतिकार १, ३१५ –उपयोग ७ –दोन प्रतिकारांत फरक ५२७,५७३–भूमिका ३१७ –मर्यादा २२,२५ –शिक्षण ३२१
नीतिशास्त्राचा पाया ५५
नेहरू–पं. मोतीलाल १५६,४३१ –रिपोर्ट ४८५
नोकरशाहीचें ब्रीद २८६
पंचायतन पूजा ६०१

पंजाबांतील जुलूम १, ६
पंजाबी बांधवांचें वर्षश्राद्ध २६९
" पंजाबी " वरील खटला २०५
पब्लिक सेफ्टी बिल ४९०
परकीय सरकारचें धोरण १०, १४
-सत्ता हीच मोठी अनीति ३७२
परगणा सभा-स्थापना २९२
परतंत्र हिंदु०चा मुख्य प्रश्न५,११,१५
परदेशी कपडा २७९, ५९६
परदेशी राजकारण २५१, ३५७
परमेश्वराचा संदेश ५६५
पराक्रम व विरोध ३४२
परांजपे-तपस्वी बाबासाहेब २७२, ३०१, ३२६
पराविद्या ५१
पारतंत्र्य : आपत्तींचें मूळ ५६४
पार्नेल आयरिश देशभक्त ५७७
पार्लमेंट व हिंदु० सरकार ५०१
पिझस्ट्रटची गोष्ट २०८
पुनर्जन्म व कर्मवाद ४५
पोलादी चौकटीचा कारभार ३३३
प्रतिकार ३, ८, २८
-व स्वावलंबन ५७५, १४
प्रतिकार-संरक्षक-ची व्याप्ति ५७६
प्रतियोगी सहकारिता ३८३, ३९०, ३९३, ४०६, ४११
प्रतिसहकार पक्ष-स्थापना ४०३
प्रयत्नांती परमेश्वर (ब्रह्मसायुज्य) ४१
प्रातिनिधिक-सत्ता शोध-२४३
-संस्था ३६५
प्लासीची लढाई २०
फुल्लरशाही ६
फ्रेंच रेव्होल्युशन १९८
बंगाल-पुढें कां १०८
-फाळणी ५, २८४
बलीवामनकथा २३३
बर्कनहेड ४६१
बहिष्कार व स्वदेशी १५ -वर तडजोड २८ -विस्तार २१ -राजकीय व सामाजिक २१
बिगार बलुता चळवळ २७५, २९३
ब्राह्मणेतर-भेद राजकीय नव्हे ४२९
भक्तिमार्ग ६४
भरतखंड राष्ट्रसंघ १०८
भावना जागृत ठेवा ५५८
भिक्षांदेहि पंथ २,४,२८
भुशुंडी ५९६,५९७,६००
भानू-प्रो. १९४
मतदार-मंडळें ३२६ -हाच परमेश्वर ३९७
मतदार-मतें कोणास द्यावींत ३६३
मद्यपान निषेध ३०
मनुष्याचें श्रेष्ठत्व ३६
मनोव्यापार ३८
मराठा-अणे यांची व्याख्या १९५
-इतिहासांतील उणीवा १९१
-चें कर्तव्य २०० - चे विशिष्ट गुण १९५ -व्युत्पत्ति १९३
मराठी -ची उपेक्षा १०६ -चे तीन प्रभु १०० - चें सामर्थ्य ९९
मवाळांचें सहकार्य ३५८
महात्मा गांधी -१२१, १५९, २५०, ३०६, ३२३, ५३५ व आयर्विन समेट ५४७
महाराष्ट्र-एक राष्ट्र आहे १०९ -चे गुरु लोकमान्य ५६० -तील वाच-

-नाभिरुचि ८५ - ष्ट्रीय प्रश्नांची उपेक्षा १०८ -साहित्य संमेलन १३ वें ४६६ -विस्तार १९४ -व्युत्पत्ति १९२
मानसशास्त्र ५८८
मासिकें मराठी-चा आत्मघातकी मार्ग ९२-इंग्रजीकडे धांव १०७ -उपयुक्तता व योग्यता ७६-कर्तव्य १०३ -ग्रंथपरीक्षण व दिग्दर्शन ७८ -चित्रें ९७, ११४-निश्चित धोरण पाहिजे १०४--व राजकारण १०३ -विद्वानांचे लेख मिळवा १०६ -सात प्रकार ७९
मायभाषेंतच लिहा ४७४
मुकुंदराज -जन्मभूमि १९४
मुडीमनरिपोर्ट ३७४
मुदतबंदी मजूरपद्धति २३४
मुंजे डॉक्टर ४४६
मुसलमान व ख्रिस्ती राष्ट्रें २५९--बाहेरचा आधार १२० -भावना ११९
मूर्ति-नियोजकाचीं धोरणें ५८२ -व शास्त्रीय संशोधक ५८२
मैमनसिंग व कोमिल्ला २३
मोर्ले-लॉर्ड २०९, २५२, २७८
यमक निर्यमक वाद ४७७
यवतमाळ जिल्हा १९२५-२६-नापिकी १६४ -राष्ट्रीयशाळा २६६ -सभा (डि. अ.) १७५, २१९, २६२ -सिंहावलोकन १९२१ पावेतोच्या कार्याचें२८९
रशिया व हिंदुस्थान ११ -राज्यक्रांति ३१७-३२०
राजकारण-हल्लींचें २२९-५५४ -परदेशी २५१-३५७
राजकीयपक्ष -मीमांसा ४२९
राजवाडे वि. का. ८५, २१३ मराठीविषयीं मत ४७९
राजसत्ता लोकमतानुयायी हवी १०
रानडे न्या. मू. १९८, २१३
रामदासांचें कार्य २१२,३६०
रामायणीय कथेचा ऐतिहासिक अर्थ ५९१
राव डेप्युटी कमिशनर १७६
राष्ट्रगोप ६५
राष्ट्र व धर्म १९८
राष्ट्रीय ऐक्य ४४९
राष्ट्रीय कमिशन४६४ -दैवत श्रीराम-२१६ -मागणी १९२ -सभा २८
राष्ट्रीय सभा जनताजनार्दनाचें देऊळ ४३६
राष्ट्रीय सभेचें शिष्टमान्य धोरण १२६
राष्ट्रीयत्व व विश्वबंधुत्व २४७
राष्ट्रोद्धार-राजसूययज्ञ ३०
राष्ट्रोन्नतीच्या अवस्था २१३
रिस्पॉन्सिबल गव्हर्मेंट ४८७
रेल्वे बोर्ड ४९६
रूसो जपानी युद्ध १२
लखनौ योजना ११८
लष्कर व कायदा २१३ -खर्चाचा तपशील ५०५
लिपिशुद्धि व छापखाना ४८२
लेकी प्रोफेसर १९५
लेनिन ३१७,३२०
लेलेशास्त्री ८०

लोकक्षोभाची आंचे ३८७
लोकमताची मुस्कुटदाबी १७
लोकमान्य टिळक १९४,२०७,२७८ –चें अलौकिकत्व ४१७ –च्या आधींचें राजकारण २८१ –चें कार्य ४३६ –व वर्तमान पत्रें १४९ –चा लोकसंग्रह १३५ –विलायतची कामगिरी २५२ –चा स्वाध्याय १५१ –हिंदुधर्मावरील विचार ५०
लोकनिंदा व बहिष्कार ६
लोकप्रतिनिधी खरे ३५९
लोकसंग्रह २२३ –चिकीर्षूंची कृति व उक्ति १४८ –धर्म, तत्त्वत्रयी १४५ भगवंतांची व्यापक दृष्टि २२५
ल्यूथरचा छळ १९९
वकिलांनीं काय करावें ५४४
वंगवाङ्मय–मराठीवर पगडा ४७५
वंगभंग १३, २७८
वतनदार पुढारी २८
वर्तमानपत्रें –कामगिरी २२० –द्विमुखी १०० –प्रधान कर्तव्य ७५ –व लोकमान्य टिळक १५२ –वाङ्मय पोषक नाहींत ७४ –विलायती ७४
वऱ्हाड–ऐतिहासिक विस्तार १९४ –चा प्रश्न ३०३ –व ब्रिटिश नागरिकत्व ३८२ लॅन्डरेव्हेन्यु कोड ४८७
वाङ्मय–इंग्रजी व उपयुक्ततावाद ७६ –उद्देश ७८ –एडवीन आर्नोल्ड ७२ –करमणूक हा उद्देश नाहीं ७७ –ग्रंथांचें वर्गीकरण ७३ मनोरंजनाचे अनिष्ट परिणाम ८९ मराठी–इंग्रजी पूर्वीचें ८६–मालेंचे विचार ७१ –विवेचन ६८ते७४ व्याख्या ७० –व साहित्य ६८
वाद्यवादन विरोध १२८
वारकरी पंथ ६६
विद्यार्थ्यांना–संदेश ५३७ –उपदेश २०१
विद्यारण्य ( सायणाचार्य ) १९६
विवेक व कृति २१८
विरुप–एक अनार्य–संघ ५९४
विरोध–राजकोय हवा ३४२ –व्यत्ययाशिवाय व्यर्थ–३८४
वैयक्तिक ध्येय व समष्टी कार्य १४५
वैश्य व त्याचा आचार ६३
वैश्वदेव २०२
व्रात–अनार्यसंघ ५९२–विशेष उपजीविका वाचक शब्द ५९३
व्हॅलिडेशन ॲक्ट– १८
व्हॅलेरा–डी २८०
शंकराचार्य ३४
शाळा–बहिष्कार १९२० व १९३० चा ५३८
शास्त्र व कला वाङ्मय नव्हे ७०
शिकागो धर्मपरिषद ३४
शिक्षण कसें हवें २०४
शिबिरें मोडूं नका ५६३
शिवदैवत ५९१
शिवा व घोरा तनू २८४,३४१
शिवाजी–चे गुरु रामदास ३६० –त्रिशत सांवत्सरिक उत्सव ४४२
शीख व रजपूत २००
शूद्र –अनार्य आहे ६५ –त्याचा आचार ६४
शेतकरी –जमिनीचा मालक ४५४

—व जनावर ५२१
शेतसारा कसा ठरवावा ४५८,५०९
शेतीचा निवळ नफा ५०९
श्राद्धयज्ञ ५९
श्रुति —विषयक तीन कल्पना ५१
—प्रामाण्य ४९
श्रौतीय आचार ६२
सत्याग्रह —आत्माहुती यज्ञ ५३० —सर्व व्यापी ३०८ —व निःशस्त्र प्रतिकार ३१५ —प्रसंगावरच होतो ३४५
संघशक्ति ३६१
सत्कार्योत्तेजक सभा धुळें ८४
सत्तेचा उगम ९
संतकामगिरी २१२
सदाचार —प्रामाण्य ५३
संभाजी १९९
समर्थांचें कार्य२१२ —शिकवणूक३६०
सरकार —मोठा बलुतेदार ४५६ —आ-तांची व्याख्या ३१६ —लोकमताचें भय गेलें ३३३
संरक्षक प्रतिकार—उद्देश १,८ —तप-शील ५७२ —व स्वावलंबन ५७५
संरक्षक व संरक्षकेतर प्रतिकार ५७३
संस्कृतिप्रसार २४६
चा झगडा २४७, ५५६
साबरमतीला काय ठरलें? ४०४
साधनांचा आग्रह नको ३१, ३७२
सायमन कमिशन ४८३
साम्राज्याशीं संबंध २३७
सारडाबिल —दुष्परिणाम ४५१
सिली —ग्रंथकार २४३
सुधारणा केव्हां येतात? २४०
सुरतेचा अनिष्ट प्रकार २१६
सुरेंद्रनाथ बॅनर्जी १९
सेन ५९७,५९८
सोव्हिएट स्थापना ३२०
स्टोक्स —बिगार चळवळ २९३
स्थानिक संस्थांचा उपयोग २२१
स्मृतिकाल २४३
स्वदेशी—व बहिष्कार २८४, ५१२ —राजकीयच आहे १५ —व्यापकत्व [२९
स्वयंनिर्णयाची वेळ ५२९
स्वराज्य चळवळ २५४ —प्राप्तीचे मार्ग २, २८
" स्वराज्य पक्ष "—धोरण १५६ —फूट ४२३
स्वार्थत्याग ५५७
स्वावलंबन ३, २८ —मर्यादा ७ —व प्रतिकार परस्पर पोषक ५७५
स्वातंत्र्य —केव्हां मिळेल ५४० —ची पंढरी, पुसद ५६५
हॅमडन व पिम् ३१६
हिंदी चळवळीचें सिंहावलोकन ५५५
हिंदुधर्म—पंथ, भेद ५० —प्राचीनत्व व थोरवी ५८४ —मीमांसा ३३ लोकमान्यांचे विचार ५० —विराट शरीर ५८५ —चें साध्य ४६
हिंदुमुसलमान ऐक्य ११८ —धर्मैक्या-करितां नव्हे —१२९
हिंदुपद—स्थापना १९७
हिंदुस्थान—आर्य आले तेव्हांचें— ५८७
हुकूम मोडण्याची प्रथा १९
ज्ञानार्जन—उदात्त हेतू ४८

# “ बापूजी वाङ्मय–मंडळ ”

## यवतमाळ

---

### अध्यक्ष

श्री. भीमराव हणमंत ऊर्फ अण्णासाहेब जतकर,
बी. ए. एल्एल्. बी.

### उपाध्यक्ष

श्री. डॉ. भास्कर महादेव टेंवे, एल्.आर.सि.पि.
अँड एस्. (एडिंब्रो); एल.एफ.पी.एस. (ग्लासगो).

श्री. लक्ष्मण रघुनाथ ऊर्फ नानासाहेब अभ्यंकर
बी.ए. एल्एल्. बी.

### कोषाध्यक्ष

श्री. महादेव कृष्ण द्रविड, बी.ए. एल्एल्.बी.

### चिटणीस

श्री. त्र्यंबक सदाशिव बापट, बी.ए. एल्एल्. बी.

श्री. गजानन नरहर पंडित, बी.ए. एल्एल्. बी.

### सभासद

१. श्री. यशवंत खुशाल ऊर्फ अप्पासाहेब देशपांडे
एम्.ए. एल्एल्. बी.

२. श्री. अमृत रंगराव साकळे, बी.ए. एल्एल्. बी.

३. श्री. लक्ष्मण काशिनाथ ओक, बी.ए. एल्एल्. बी.

४. श्री. श्रीधर श्रीकृष्ण पांडे, बी.ए. एल्एल्. बी.

५. श्री. रामचंद्र बळवंत जोशी

६. श्री. सदाशिव हणमंत बल्लाळ

७. श्री. वामन नारायण देशपांडे

८. श्री. विष्णु बळवंत रानडे

९. श्री. डॉ. त्र्यंबक गणेश बंदे

१०. श्री. गणपत सीताराम माळवी, एम्. एल्. सी.